पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३७

माधवराव पेशव्याच्या कर्नाटकांतील स्वाऱ्या

[किंमत—२ रुपये किंवा ५ शिलिंग २ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 37

THE KARNATAK EXPEDITIONS OF MADHAVRAO I (1761–1772)

This selection brings together a large number (over 200) of very useful papers, which mainly relate to Peshwa Madhavrao I's undertakings in the region usually called the Karnatak, extending from the river Krishna right south up to Madras and Tanjore and westward to Seringapatam and Bednore. It will be remembered that this region was mostly subdued by the Marathas under the glorious lead of this Peshwa's father, Balajirao. The papers relating to that subject have been published in a previous selection, No. 28. The unforeseen disaster of Panipat at the beginning of the year 1761 not only undid much of the success which the two previous Peshwas had achieved in their endeavours to establish Maratha supremacy throughout India, but indirectly helped the rise of Haidar Ali, who cleverly managed to suppress the Hindu Ruler of Mysore, and, immediately on receipt of the news that the Marathas had been humbled at Panipat, seized the opportunity to consolidate his strength so as to become a rival both of the Marathas and the British, who had been for some time casting longing eyes on that part of India.

The Marathas had not found time to establish a firm hold on their southern conquests, and the sudden rise of Haidar upset their previous calculations. Murarrao Ghorpade, who was the only prominent Maratha Jagirdar in the territory concerned, had established himself at Gooty to the south of the Tungabhadra and consequently had to bear the full brunt of Haidar's first crushing onslaughts. A few important news-letters included in this selection speak eloquently of the heroic stand that Murarrao made.

In order to follow carefully the contents of these papers the student will do well to remember the following main expeditions of the Peshwa into the south :—

(1) October 1763–June 1765.—The conquest of the region between the Krishna and the Tungabhadra.

(2) October 1766–June 1767.—Maratha penetration into the districts south of the Tungabhadra.

(3) October 1769–1770.—The same expedition continued to the south of the Tungabhadra and led to some stiff fighting.

(4) Up to June 1772.—The Peshwa was prevented by ill-health from being personally present in this last expedition, which consequently was carried to completion by his able generals Trimbakrao Pethe and Gopalrao Patwardhan.

It appears that Haidar, consummate general though he was, miscalculated the young Peshwa's ability and felt greatly relieved upon learning that he had been overtaken by the lingering and mortal disease which

ultimately cut off a most promising career almost at a time when its star was in the ascendant.

Besides the papers which describe the various actions comprised by these main campaigns there are other episodes which have been incidentally described in them, and of which little definite has so far been known in history. For instance, the Peshwa had to undertake a year's vigorous warfare to overcome Babuji Naik Joshi, a near relation of the Peshwa family, who had figured prominently in the two preceding regimes but who now deserted the Peshwa's cause. How he became disaffected towards Madhavrao had not hitherto been known but is now disclosed in some of these letters. One account says, "Babuji Naik made friends with Haidar Naik; his correspondence with Haidar was intercepted. It showed that he had supplied Haidar with men and mares. He was thereupon confronted with his accusers and his guilt brought home to him." In consequence he was ordered to give up Sholapur and another strong fort which he had held in his possession for a time. He started to fulfil his contract in obedience to the Peshwa's demands, but seizing a convenient opportunity raised the standard of rebellion No. 99. He was hotly pursued, soon made to submit and heavily punished, having most of his Jagir confiscated. This ruin of the famous Baramati family was, it should be noted, completed later by Bajirao II, so that little is now le at that place of its former splendour. Many other minor affairs are vividly dealt with, which the student will be well advised to note, in order to grasp the real aim of the great Peshwa's policy.

It is not the purpose of this note to follow in detail the various deeds of valour and diplomacy which are disclosed in almost every page of this selection ; the details found therein go far to confirm the accounts given and opinions expressed by the great research scholar Khare as the result of his study of the Patwardhan records. The Peshwa assumed the burden of Government at the age of 16, and contending against heavy odds both from within his own family as well as outside it, proved himself in the short space of eleven years, not only a capable general but a just and strong ruler, thereby amply justifying the eulogies which the first Maratha Historian has passed on him.

Most of the letters are addressed by Haripant Phadke to Nana Fadnis who was at Poona. These two prominent lieutenants of the Peshwa owed much to his stern discipline and subsequently made excellent use of their training during the troubles that followed the murder of Narayanrao.

No. 1] [1-5-1761

पौ छ २९ रमजान
चैत्र मास मुा नजीक
अरणी प्रां सावनूर

श्री

राजश्री विसाजी कृष्ण व हरि गोपाळ
गोसावी यांसी

सुा इहिदे सितैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावलें. श्रीरंगपटणचा तह मुकणजी हरिदत याचे विद्यमानें जाला व पाटणकराचे कुमकेस हैदर नाइकाचे पार(प)त्यास फौ(ज) पाठविली व लुटीचा हिसा त्याणी न दिल्हा, आपले फोजेस निरोप दिला, हैदर नाईक आम्ही समजोन घेऊं म्हणोन बोलिले. त्याउपरी स्वामीचे आज्ञेप्रमाणें आदवानीकडे यावें, त्यास मगदुलाखान दिा हैदरनाईक फुलचरीहून दोन हजार फौज च्यार हजार बार पाचसात तोफा फिरंगी काफरी घेऊन घाट चढोन आला. तो बेंगरुलास आलिया होसकोटा वगैरे सरकारचा मुलकास उपद्रव करील, याजकरितां त्यास गार करावें म्हणजे जगदेवगड तालुका किले व ठाणी देतील हे चितांत आणून फौज पाठविली व आपणहि गेलो. वेढा घात(ला). पारपत्य केलें. तेव्हा हैदर नाइकानी वकील पाठविला. जगदेवची ठाणी द्यावयाचा करार केला, ठाणी दिल्ही; व हली खंडेराव बनाजी व मुकणजी संस्थानाची उपेक्षा करून गेले. रुपये कसे द्यावे म्हणून लिहितात. अगोदर फौजेस खर्चास देवेना याजकरितां निरो(प) दिल्हा. त्यास कराराप्रमाणे द्यावयाविसी ताकीदपत्रें पाठवावीं व उभयेतां येविसीचा पर्याये हुजूर लिहितील तो मनास न आणावा, म्हणो(न) विस्तारे लिहिलें ते कळले. ऐशास ते आपले मते बहुत पर्याये लावितील व रदबदल करितील, परंतु आम्ही कोठे आइकतों? येथे कोणी रदबदलीस आला नाहीं. आलियावर आज्ञा करणे ते केली जाईल. तुम्ही कराराप्रमाणें वसूल घेणें. छ ९ रजब बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa acknowledges the receipt of a letter from Visaji Krishna and Hari Gopal reporting the defeat of an army under Magdulakhan, one of the lieutenants of Haidar Naik.*

No. 2] [29-5-1761 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादा
स्वामीचे सेवेसी

सेवक जगंनाथ विसाजी कृतानेक नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ २३ रमजान मुकाम मडकशिरें येथें आपलें प्रतापेंकडून स्वस्तिक्षेम असो विशेष. राजश्री मुरारराव घोरपडे ममलकतमदार यांनीं श्रीमंत राजश्री नानासाहेबास व आपणांस पत्रें लिहिलीं त्यांवरून सर्व भाव कळों येईल. राजश्री श्रीनिवासराऊ भानजीचा पु(त्र) कंदुकूरवाले यांनीं दगा करून मारिला व गुमनाडकर पालेगार यांनीं हुलड मांडिली व घटमकर यांनीहि बहुत उपद्रव सरकारच्या ठानियांसी उपद्रव केला, तें पत्र बजिनस रायास दाखऊन रायानी त्यास कुमक स्वार १०० व प्यादे हजार व जेजाला पंचवीस देविली व दारूगोळी सरंजाम करून पाठविलें. पत्र येतांच दुसरे दिवशीं रवाना केलें. आपणांस तों उभयेतां भगवंतराऊ व श्रीनिवास भानजीनी पत्रें लिहिलीं असतील. तीं पत्रें बजिनस तीर्थरूप याजकडे पाठविलीं. त्याच्या नावें लिहिलीं. आपणहि मागोन घेऊन पाहावीं. सर्व इस्तार लिहिला. आपण तो देशाकडे जातात. इकडे पालेगार यांनीं लबाडी करावी आणि आपण तिकडे जावें. ठानियांतील लोक कैसें ठरतील? रुपयेयाची मिठी सोडून लोक यांस पोटास देऊन तूर्त दोन हजार फौज जागां जागां ठेवावी, कांहीं गाडदीहि ठेवावे. इकडे चहूकडून पाळेगार यांनीं हुलड मांडिली. तुम्हाकडे जोडी पाठविली, खुद्द तुमची सरकारची आली, तर हें काम कांहीं सरकारचें नाहीं ऐसें चित्तांत भासतें की काय? असो; नानाप्रकारें पेंचीं धरून निषिद्ध करून संबंध ठेवावा. येथें जे जासूद आहेत ते आजारी. येकास नारू जाहाला, येक रोगी आहे, येक दरबारीं पाहिजे. तुम्हास यैसें करणें होतें तर आम्हास बातमीस कशास पाठविलें? आमचें पोट न भरलें तर पोटांत काव्या घालूं. परंतु तुमचा प्रकार तो कोन्हीकडून सुटे पाडून उगेंच पेंचीं धरावें. असो; राजश्री भगवंतपंतीं व श्रीनिवास भानजी यांनींहि येथें जोडी पाठविली. त्यास रायानीहि उत्तर देऊन रवाना केलें. राव तोहि प्रसंग संभाळून सरकारच्या ठानियास कस्त करून जागां जागां बंदोबस्त करवितात. या प्रकारें लिहिलें तर स्वामींनीं रागास न यावें. सेवक सर्व प्रकारें आडाणी आहे हें तों आपण जाणत असतां, आपण तुंगभद्रातीरीं राहोन इकडे पाळेगारांनीं धामधूम बेरड्यांनीं करावी, आपण उगेंच राहावें, हें आपणां उचित नाहीं. श्रीमंत नानासाहेबांकडील वर्तमान उत्तम प्रकारें राजश्री नागोजी श्रीनिवासराऊ यांनीं लिहिलें, रावहि संतोष जाहले, वरचेवर जो गृहस्त व राव याचा बाणदार

व सरकारचा जासूद यांजबराबर बारीक मोठें वर्तमान लिहीत जातों. आपणांस तो पावत असेल. परंतु आज्ञापत्र येत नाहीं. कंदकूरकर यांचे पारपत्यास कोण्ही नामी सरदार पाठऊन बंदोबस्त व्हावा ऐसें आहे. इतकियावर आपल्या मर्जीस जो मजकूर येईल तो करावा. श्रीनिवास भानजीनी पत्र लिहिलें कीं, आम्ही मुलें लेकरेंसहित अग्निसंवस्कार करून मरावें. जर आपणांस ठाणियाचीं अगत्यें असिलीं तर त्यास कुमक पाठवावी; नाहीं तर सोडून येतील. गुमनाडकरानें पांच हजार प्यादे जमा करून नानाप्रकारें मुलकांत खराबी करावी. तुम्ही संनिध असतां हा प्रसंग न घडावा. त्यास ताकिदा पाठवाव्या. बरें. तुम्ही गेलिया सरदार दो महिन्या श्रीमंत दादासाहेबांकडून बंदोबस्तास यावया योग घडवावा. सांप्रत्यकाळीं वर्तमान तो या प्रकारें आहे, आपल्यास मजकूर थोडा लिहिला. यापेक्षां नानासाहेबांस बारीक मोठें वर्तमान यथाप्रकारें लिहिलें. संताजी नाईक म्हणतो कीं, दोन वरषें जाहालीं, कर्जदार जाहालों; वरास जातों. लग्न करून येईन म्हणतो. त्यास आज्ञा काय ते लिहिणें. येथें कोण नाईक व जासूद पाठवावयाचें असेल तरी पाठवावें. नाहीं तरी सोडून द्यावें. सेवेसी श्रुत होये हें विनंती.

¶*Jagannath Visaji requests Visaji Krishna to send a strong force to put down disorder created by the Palegars of Kundkur, Gumnad and other places.*

No. 3] [*2-2-1762* ?

श्री

अपत्यें बापूनें चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ २ साबानपावेतों मुकाम पुणे येथें वडिलांचे आसीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलीं छ २४ रजबूचें आसीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. तेथें कितेक प्रकारची आज्ञा होती, त्याचा मजकूर सर्व कचा लिहिला आहे. श्रुत होय तपसीलवार:

राजश्री बाबूराव+ बाबा यांस पत्र दिल्हें. त्याणी दोनतीन वेळ वाचून पाहून चिटणिसांचे हवाला केलें. निरुतर ध्यावयाविसीं दोन दिवस विनंती करीत होतों. जाबसाल न होय. काल छ ४ साबानी प्रहर

राजश्री त्रिंबकराव मामा लस्करांत गेले, आद्याप पावलियाचें पत्र आलें नाहीं. त्यांस पत्र वडिलीं लिहिलें आहे तें लस्करांत सरकारचे जासूद आथवा सांडणीस्वार जातील त्यास रुपया दोन रुपये देऊन पाठविलें. जाबसाल

+ फडणीस.

रात्रीस विनंती केली तेसमई बोलिले कीं, आम्ही काय म्हणोन मजकूर त्यास ल्याहावा? तेव्हां मी बोलिलों कीं, स्वामीच्या चित्तास येईल तैसें लेहून देवावें. त्यानंतर बाबाच बोलिले कीं, सुभा निघाला म्हणून हें त्यास काय ल्याहावें! तदनंतर मी विनंती केली कीं, सुभा निघाल्यास चिंता काय आहे? स्वाम पहिल्यापासून त्याजवर कृपा करीतच आहेत. तेहि स्वामीच्या पदरचेच आहेत. तेथें सुभ्याचा मजकूर काय? याहीपेक्षां विशेषात्कारें सांगणार सर्व प्रकारें स्वाम समर्थ आहेत. याजवरून बाबानी निरुतर केलें कीं, ते समर्थच आहेत. इतके जाबसाल होतच आहेत तों राजश्री आपाजीपंत मजमदार सुरतकरहि आले. त्याणीहि विनंती कितेक प्रकारें केली. त्याचा सारांष कीं, हा प्रकार लस्करांतच जाहाला. यास आमचा उपाय काय आहे म्हणोन बाबानी निरुतर केले. तदोतर आपाजीपंत बोलिले कीं आपण त्यास घरोब्या आलियावर इनाम द्यावें येणेंप्रमाणें करार करून पाठवितों. निरुतर आलियावर सेवेसीं पाठवीन कलम

१

राजश्री बापू सासवडींच आहेत. लस्करांत जावयाचा प्रकार दिसोन येत नाहीं. सासवडींच राहणार यैसें भासतें कलम

१

श्रीमंतांचा मुकाम चिकोडीपली-कडे पांचसा कोसावरचा होता. उभयतां श्रीमंत तुंगभद्रातीरपर्यंत जाऊन कर्नाटक प्रांतें दबाव बसऊन खंडणी त्या प्रांतांत करावी, तुंगभद्रातीरापुढें न जावें, देसीं उभयतांनीहि यावे. येणेंप्रमाणें तूर्त मजकूर दिसोन येतो. ठरतां ठरेल तो खरा. श्रीमंताजवल तूर्त कारभार राजश्री बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश व दिनकरपंत वगैरे शागीर्द मंडळी करीत आहेत. मामा गेलियावर मामानी करावा. येणेप्रमाणे.

[पुढील दोन बंद गहाळ.]

¶*The writer, one Bapu, gives news about Baburao Fadnis, Trimbakrao Mama, Sakharam Bapu and says that the Peshwa and Raghunathrao intend returning home after having gone up to the river Tungabhadra.*

No. 4] [*27-2-1762*

श्री

राजश्रिया विराजित रामान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो त्रिंबक भास्कर सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ २ साबान यथास्थित असो विशेष. आपणाकडील फार दिवस वर्तमान कलत नाहीं.

सविस्तर लेहून संतोषवीत असावें. यानंतर इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादा-साहेब व रावसाहेब कर्णाटक प्रांतें अर्कटाकडे जातात आहेत. कोलापूर प्रांती खंडणी घेतली. पुढेहि त्या प्रांते पाचसात लाख (खं)डणी जाहाली. राजश्री बाबूजी नाईक दिवाणगिरीचा कारभार श्रीमंतापासी करितात व राजश्री बाबूराव फडणीस पुण्यांत कारभार करितात व त्रिंबकरावमामा वडुतावरून लस्करास गेले असतील, त्याणी कारभार करावा यैसा करार आहे. मातुश्री गोपिकाबाई वडुतास आहेत. याप्रमाणे वर्तमान आहे. श्रीमंत बापू सासवडी आहेत. तूर्त लस्करास जावयाचा माार काहीं नाहीं. श्रीमंताची येक दोन पत्रे आली होती. येणे म्हणौन आली नव्हती, उगीच आली होती. तीर्थरूप रा हरिपंत काकाचा सांभाल करीत जावे. आपल्या मामलतीचा माार तरी दोन महिन्यात पैका उगऊन घ्यावा. माहालाची आशा धरून पैका आजचा उद्या घ्यावा यैसा प्रसंग नाहीं. जितकी उगवाउगव केली तीच उपयोगी आहे. बहुत काय लिहिणे, लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*Trimbak Bhaskar reports to Naro Shankar the movements of the Peshwa and Raghunathrao Dada in the Karnatak; the activities of other principal sirdars are also alluded to.*

No. 5] [*March 1762*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूराव राम स्वामी गोसावी यांसी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथिल कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे विशेष. खासा स्वारी कितुर प्रांती आली. कितुरच्या ठाण्यास मोर्चे दिल्हे. ठाणे जेर होऊन देसाई रा गोपालराव गोविंद याचे मारफातीने भेटीस आला. खंडणीहि मातबर जाली. पैक्याटक्याचा निर्गम सत्वरच होईल. या उपरी सोंधे बिदरूरच्या सरदेस जात असो. तेथील निर्ग(म) करून घेऊन हरपन्हली चित्रदुर्गाकडे जाऊन तेथील गुंता उरकून उपरांत खासा स्वारी होणार. सविस्तर तीर्थरूपास लिहिले आहे त्याजवरून कलेल. [पत्र येवढेंच अपूर्ण लिहिलेले आहे.]

¶*The Peshwa writes to Baburao Ram that he subdued Kittur and is proceeding towards Sondha-Bednore.*

6301

No. 6] *[1-3-1762*

घडणी रु. नं. ५१२

श्रीशंकर

याद़ी सरंजाम फौजिकरिता राजश्री बाबूराव सदासिव फौज ८००१ आठ हजार सरंजामी समंजुती तयार राखावी, ज्या समई म्हटले त्या वेलेस तयारी राखावी. सर्व प्रकारे पेशव्याचे दौलतेची अंगेजिनी करावी. हिदुस्थान वगैरे सोडऊन दौलत उभी करावी. याकरितां सर्व येकचित जालो. सन सलास सितैन मया व अलफ

५००००० देसी सरजाम [पुढे तपशील]
९००००० गुजराथेत महीकिनारियास
१०००००० मालव्यात.
―――――
२४०००००

येणे प्रा चोवीस लक्ष सरंजाम सन मजकुरी नेमून द्यावा.

छ ४ माहे साबान फाल्गुन मास सन इसन्ने सितैन मया व आलफ.

¶Baburao Sadashiv is given an assignment of twenty-four lacs by the Peshwa in order to conciliate him and secure his co-operation in re-establishing the Peshwa's prestige in India lost by the reverse at Panipat.

No. 7 *[20-3-1762*

पो छ ८ रमजान

चैत्र शुा ११ मुा तुंगभद्रा.

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विसाजी बाबूराव विज्ञापना यैसीजे. राजश्री मुरारराव हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यांहीं राजश्री सिवराव घोरपडे व खंडेराव घोरपडे यासमागमें दोनी अडीच हजार फौज छ २० साबानीं देऊन गुडीबिड्याहून सिलगडेस पाठविली. तथून तीन कोस.बालापूर. त्यानी जमावसुदा बालापुरास दोनी कोसावर येऊन उभे राहतात. हैदरखान यानें मोरचे लावले असतां मोरचे कायम करून बंदोबस्ती करून तीनी हजार फौज, हजार बार तुरक स्वार, दोनिसें लाहानी तोफ घेऊन स्वार मात्र पुढें आले. तुरक स्वार कांहीं ब * व बान दोनी च्यारसें राऊत हैदरखान देखील वोढा पाहोन दबा धरून फौज तोंडावर देऊन दुतरफा * ज जालें. इतकियांत हैदरखान व तुरक स्वार * * घोरपडेचे फौजेस पोटी

+ हिशेब पुरा झालेली.

गवसोन जूज जाले. छ २३ साबानी शनवारी दो प्रहरा जूज होताच हैदरखान याजला [फाटले] न जाले. हैदरखानाकडील लोक ठार जखमी जाले. हें वर्तमान साइंकालीं रायास कललिया रात्री जाली. छ २४ साबानी रविवारी येकादसी प्राथ:कालींच स्वार होऊन बालापूरचे रोखें नाईकजी थोरात व मुकुंदराव वेंकटगिरीकर किरकोल लोक सेपनास घेऊन उदलकोंडा दो कोसावर तेथून सिलगटे पाच कोस तेथपावेतों जाऊन रानोजी देवकर थोराताकडील याजबरोबर पंचवीस राऊत देऊन पुढें सिलगटियास पाठविले. तेथें लोक जमा जालेले त्यास घेऊन सिवराव घोरपडे व आनखी जखमी परभारें पांच साहा कोस रायाचा मुा कोडीकोड तेथे पाठविले. इनसखान बार फिरंगी वगैरे गुडीबिड्यांत आहेत. रावहि व फौजहि गुडीबिड्यांत आहे. येथून बालापूर पांच कोस. राजश्री गोपालराव सबनीस यासमागमे रायाकडील दोनी हजार प्यादा व बालापूर याजकडील [फाटले] जमाव करून नदीगडास पाठविले. रात्री सद पाहोन किल्यातून इतबारी येनार. प्यादे किल्यांत संद पाहोन जावें. इकडून रायानी खा [फाटले] हैदरखानास दिखाई (?) देऊन फौज बाहेर ये * * * नदीगडाकडून प्यादे यानी निकट करून किल्यात येऊन पावावें यैसे केलें आहे. बालापूर जेर जालें आहे. [फाटले] आहे. खंदक भरितात, दमदमा तयार करीत आहेत. याकडील फौज थोडकी. त्याहीमध्यें कोन्ही पाडाऊ कोन्ही जखमी. येक दोनी वेलां घोरपडे कचकरले, यामुलें राव खासा इनसखान बार फिरंगी जमाव घेऊन फौज सुधां जानार आहे. याजकडील पाडाऊ लोक गेले आहेत. त्याभवत्या चौकिया ठेविल्या. याजकडील वकील त्यासहि चवकी ठेविली आहे. कडपेकर यानी रायाकडे सांडनीस्वार पाठविला. पहिलें वचन आलेच होते. समये हाच आहे. बसालतजंग सिधवटा आले. त्यासी जुजावे लागतें. तुम्हाकडील उपराला यावा म्हणोन कडपेकरानीं लिहिलें. बजिनस सांडनीस्वार आला आहे त्यासी कांहीं जवाबसाल जाला नाहीं. बसालतजंगास मिरजोवलकर व मुस * * ना येक या दोघानी बीर भरून सिधवटास घेऊन गेले आहेत. अबदुल मजीदखानाचा लेक यासी बाहेर काहाडावें म्हणोन योजना करून गेलें आहेत. महमदअलीखान अरकाटेंत आहे. नेल्लूर सर्वीपलीकडे जाऊन बंदोबस्ती करून माघारे अरकाटेस आले, येलुरास येणार आहे. हैदरखानाकडे रायाचे पनास घोडे व पाडाऊ लोक गेले आहेत. त्यांत भानपाचा पुत्र तिमपा पाडाऊ गेला. रायानी भस्मांगी पाहाडी किला घेतला होता तो हैदरखानाने मागती घेतला, त्याजकारतां कांही त्यासी वांकडें बोलत आहे. गरीब कोन्ही फकीर येतात ते सांगतात. त्यासी चौकिया मातबर ठेविले आहे. सिवराव घोरपडे यास जखमा पांच हलक्या आहेत. पाडाऊ गेले नाहींत.

जुजले फार. लोकानी कमी केली, खंडेराव घोरपडे वगैरे लोक पाडाऊ नेले आहेत, त्यास ते स(डे) जाले आहेत. स्वामीची खासा स्वारी तुंगभद्रेतीरास आहे म्हणोन दाटी आवाई जाली आहे, यावरून हैदरखान यानी मोरचे पुढें सरकाविले. खंदक भरितात. रायाकडील लोक व प्यादे यासी जुमज खाऊ देत नाहीं. सरकारची फौज आलियानें हैदरखान पलोन बेंगरुलास जात आहे. सरकाराकडून आनंदराव कैवारकर वकील त्याजपासी होता त्यास बेंगरुलास पाठविलें. सडी फौज व तुरग स्वार तीन हजार व बान लाहानी तोफा बालापुराहून पुढें दोन कोसावर येऊन उतरले आहे. यानी गुडीबिड्याच्या आसरियानें आहेत. राजश्री मल्हार रघुनाथ व सेवकास निरोप स्वामीकडे जावयाचा जाहला. कागदपत्र लेहून तयार केले. इतकियांत सिलगटी * स्वार राऊत पलो आले. त्यानी सांगितले जे फौज बु * * खासे पाडाऊ करून घेऊन गेले म्हणोन छ २३ शाबानी (शनि)वारी दोन प्रहरा जूज जालें. शनवारीं साईकाळीं वर्तमान आलें * * राव दिलारी होऊन रविवारी प्रात:कालींच स्वार होऊन पुढें जाऊन जखमी * * किरकोल लोक चहुंकडे गेलेले तेही खारीस (?) आले, तेव्हां वर्तमान ठीक कललें. हाजार फौज निवल व सिवराव घोरपडे व कितेक जखमा सिलगट्यांत ठेविले आहेत. येका दो रोजीं रायापासीं येणार आहेत. गुमनायेडपाली याकडील हजार प्यादा हैदरखानापासीं आहे. तो पालेगार मात्र हैदरखानापासीं आहे. येका दो दिवसीं सेवकास निरोप देणार. निरोप आलिया सेवेसीं येत असों. राजश्री भगवंतपंतानी येक दोनी ठाणी मावारी घेतली. या समयांत फौज आलियानें उपयोगी पडेल. गेलेली ठानी हस्तगत होतील. हैदरखानाचें पारपत्य उत्तम प्रकारें होऊन येईल. जासूदजोड्या नाहींत याजकरितां अर्जुदार हरकारा जोडीबराबरी विनंतीपत्र लेहून सेवेसी पाठविले आहे. यास रुपये यांच देऊन पाठविले आहे. शेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao gives an account of an encounter between Murarrao Ghorpade and Haidar Ali in which Murarrao suffered heavy losses.*

No. 8] [*16-4-1762*

छ २० रमजान सुा इसने
सितैन मया अलफ.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशा-
स्त्री स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. खासा स्वारी कर्नाटकच्या बंदो-

बस्तास आली. कितूरकर देसायाचे पारपत्य करून खंडणी घेऊन सोध्याचे सरहदेस आलो. तेथीलहि खंडणीचा निर्गम करून घेतला. बिदरूरचेहि मातबर आले. खंडणी विल्हे लाविली. लाहान मोठी संस्थाने राहिली ती चुकऊन घेऊन प्रजन्यकालाचा आवकाष पाहून माघारे फिरोन देशास येऊ. आपल्यास कलावे यास्तव लिहिले आहे. आपले संतोष वृत वरिचेवरी लीत जावे. बहुत काय लिहू हे विनंती.

¶*The Peshwa Madhavrao writes to Ramshastri about his successes in the south.*

No. 9] [*15-7-1762*

श्रीहेरंब

मंजूर होलकर छ २२ जिल्हेज

विशेष. तुम्हाकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तुम्ही कोठपावेतो पोहचला, कोणकोणाकडील वकील आले, हिंदुस्थानचे काय वर्तमान आहे, तरी सविस्तर लिा. इकडील वर्तमान तरी हैदरआलीची व चिरंजीवाची गाठ पडिली. हैदर मागे सरोन झाडीत गेला. हाली परजन्यकाल आला. शत्रूवर हात पावत नाही. साा तिकडे छावणी कर्णे प्राप्त जाली. तेव्हा फौजेचे पोटास पाहिजे. याची हरतरतूद करून रुपया तिकडे पाठवावा लागतो. यास्तव काही सरकार माहालच्या रसदाचा यैवज व आपल्याकडील यैवज यैसा तिकडे पाठवावयाची योजना केली. हा यैवज वख्तसीर जाऊन त्यास पावला तरीच फौजेची स्थित राहील. करनाटक प्रांते महर्गता भारी, आणि शत्रूसी गाठ, यैसा प्रसंग बनला आहे. त्यास तुम्हाकडे सरकारचा यैवज येणे तो राा गंगाधर येशवंत यानी देऊन जावे यैसा करार तुम्हीच केला होता. त्यास मशारनिले तै(से) न करिता परभारेच तुम्हाकडे गेले. राहूजीपंत कृष्णराव हुजूर कामाकाजाबदल ठेविले. यानी सरकारच्या यैवजाचा निकाल करून द्यावा ते काहीच घडत नाही. नाना प्रकारचे मुदे मात्र मनमाने तैसे घालितात. पैकी जे करून देणे ते येथारितीने तुमचे मनोदयासाठी सरकारातून करूनहि दिल्हे. ऐसे आसता आद्याप यैवजास ठिकाण नाही. सरकारात तरी यैवजाची वोढ. कारण की मसलत भारी पडली. हे सर्व तुम्ही जाणतच आहा. ये प्रसंगी तुम्हास उचित हेच की, सर्व प्रकारे यैवजाचा सरबराहा करून मसलतीस उपयोग पाडावा. तरी तुम्हाकडे सरकारचा यैवज मागील येणे आहे तो व पुढील यैवज हिंदुस्थानचा वगैरे त्यापैकी

काही, यैसा यैवज तुम्ही आपले स्वदेसचे माहालावर नेमून द्यावा आणि वराता माहालोमाहाली पाठवाव्या. येथे सरकारात यैवज घेतला जाईल. मागील यैवज तरी यापूर्वीच सरकारात येऊन पोहचावा. त्यासहि दिवसगत लागली. याउपरी लाबणविर न घालावे. स्वदेसी आपले माहाल आहेत, त्यापैकी यैवज नेमून वराता पाठवाव्या. यैवज घेतला जाईल. तूर्त हिंदुस्थानातून रुो पाठवणे, आपल्यास हुडणावल दुहीरी वगैरे मजकुरासाठी सोईस पडणार नाही. देसचे माहालचा यैवज सोईस आहे. सरकारातहि यैवजाची निकड आहे. हाच रुपया उपयोगी जलद पडेल. यास्तव लिा प्रो वराता पाठवाव्या. करनाटकचे मसलतीमुले हरतरतुदीने यैवज मेलवावा लागतो. कलले पाहिजे. गाईकवाडीकडील दोन लक्ष आपण देवविले त्याची पत्रेदेखील तुमचे कारभारी देत नाही. आम्हावर मनसुब्याचे पेच मोठे पडले व पडतात. निजामअली व हैदर नाईक दोन शत्रू मोठे. याखेरीज इगरेज हबसी याचाहि पेच कोकण प्रांते. ऐसे तिहीरी पेचामुले दौलत मोठे संकटात आहे. परंतु ईश्वरी दया येक साधन मोठे आहे. त्याचेच दये करून सर्वहि पेच वारतील. आपण कालजी करू नये. हिंदुस्थान प्रांतीचा सरकारचे मुलकाचा व आपले प्रांताचा बंदोबस्त करून ऐवज व बाहेरील ऐवज मेलऊन पाठवावा. हेच मोठी आमची कुमक आहे. हिकडे जसे बनेल तसे करून मनसुबा सेवटास नेत आहो.

¶*This is a draft letter of Raghunathrao addressed to Holkar asking him to remit money at once to meet the expenditure of the campaign in the South. The writer describes how Haidar in a skirmish with Madhavrao was repulsed and forced to flee into the forest. "There are at present three great enemies to the State—Haidar, Nizam Ali and the English ; but, by God's grace, they will all be subdued," he adds.*

No. 10] [*19-7-1762?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री **पंतप्रधान**
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. मालोजी व बाबाजी जासूद याजबरोबर छ ४ जिल्हेजचीं आज्ञापत्रें पाठविलीं तीं छ २६ जिल्हेजीं काल साईंकालीं होसकोटास सादर जाहालीं. कितेक मजकूर आज्ञापत्रीं लिहिला तो सेवकास कलोन समाधान जाहालें. हालीं

१ यापुढील मजकूर राघोबाच्या हातचा. तसाच आरंभीचा 'मंजूर' हा शेराहि त्याचाच आहे.

इकडील वर्तमान लिहिणें ते अलाहिदा पत्रीं लिहिलेंच आहे. सारांश नवाब बसा-लतजंग व हैदरआलीखान येकत्र होऊन आमचे गळीं पडणार. हैदरआलीखान यास सिरेयाच्या सुभ्याच्या सनदा नवाब याणी दिल्या. हैदरआलीचें लिहिलें आलें कीं, किला सोडून देणे. त्याजवरून साफ जाब सांगणे तो सांगितला. तो येऊन गळीं बेमुरवत पडणार. सिबंदी ठेवणें ठेविली आहे. परंतु कानडे माणोस. देशचे विस्वासू माणूस मावले मात्र आहेत ते दोनसें पावेतों होतील. यांत परिणाम लागणे धण्याचें पुण्य आहे. फौज कांहीं तरी आल्यासिवाय शत्रूचें पारपत्ये कैसें होतें? होसकोट्यांत हजार माणोस कनिष्टपेक्षां असावें ते दोनसें मावले आहेत; बाकी हे प्रांताचे आहेत, त्यांचा विश्वास काये? सुगम दिवस होते तों उत्तम चालिलें, हालीं दिवस यैसे आले! दोनच्यार हजार फौज ज(ल)दीनें रवाना केली पाहिजे. आम्ही सेवक लोक; स्वामीचे कामावर खर्च व्हावे हेच वासना श्री सेवटास नेईल. स्वामीचे निदर्शनास येईल परंतु पुढें सेवट नाहीं. याउपर आपण धणी आहेत. हे विज्ञापना.

¶*The writer requests the Peshwa from Hoskota to send succour to enable him to stop the advance of Nawab Basalatjang and Haidar.*

[No. 11] [20-8-1762?

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

बाळाजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य बाजी गोविंद साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ २९ मोहरमपावेतों वर्तमान येथास्थित असें विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर ऐसें नसावें. हर घडीं पत्र पाठऊन संतोषाचें वर्तमान व दरबारचे मर्जीचें लिहावें. राजश्री तात्याचें कूच कधीं होणार, कोणत्या मार्गें कर्नाटकांत जातात तें लिहावें. इकडील वर्तमान तर करवीरकरांस शंकराजी घोरपडे वगैरे जाऊन मिळाले. त्याचा जमाव प्रस्तुत बराच आहे. आमची फौज दाहा हजार जमा जाहाली. त्याचा काट कांहीं चालावयाचा नाहीं. पोटाची मात्र अबाळ फार आहे. राजश्री दारकोजी भालेराव याजकडे आमचें कर्जाऊ रुपये ५५ पंचावन येणें. त्याचे रावताची नेमणूक पुण्यांत जाहाली आहे, त्यास रोजमरेयांत वजा करून ऐवज उगऊन द्यावा आणि खासगत कामकाज असेल ते आपण मनावर घेऊन करून देत जावें. बहुत काय लिहिणें, लोभ असों दीजें, हे विनंती.

¶*Baji Govind inquires of Balajipant about the probable time Haripant would leave for the Karnatak.*

No. 12] [1763 ?

श्रीगणपत

पुरवणी राजेश्री दादासाहेब

विज्ञापना. या संस्थानचें मुख्य कर्तर (?) व प्रधानपंत व दोडमां कर्तराची आई व नजराज हे मुख्ये चौवे जन व हरकी व अनेत्र येक दोन सरदार याच्या मायेचे ते व देव ब्राम्हन आदीकरून हे सर्वत्रहि आपले फौजेचा मार्ग लक्षितात. येथें आवई जे, तुम्ही फौजसुद्धां फिरून गेलेत. हे प्रतीहि पुसतात, फौज येती की नाही? फौजेंत त्रान आहे किं नाही? आद्याप तुम्हांस पत्र कां न ये? फौजा येत नाहीत. लटक्या गोष्टी तुम्हीं आम्हांसी येकांत करितां. याप्रमाणे हे म्हनतात. तर आपण कोठें आहां, फौज किती आहे, मनसब्रा काये हे येकांत पत्रीं आज्ञा करावी. व मुख्यांस दिलभरवसा होये असे पत्र मुख्यास व सामादिकांस हें येकांतीं पत्र आपन लिहून उपचार थैल्या आगर कांहीं नको, सेवकाच्या लाखोट्यांत घालून येकांतीं आज्ञा यावी म्हणजे त्याचें समाधान होईल. कितीक गोष्टी त्यासी बोलतो हें प्रमाण. हलीं यासी लडाईकरितां तुम्हांस पुरवना. चहूकडे तानावे. येथें आहे काये? जगदेवाच्या मुलकांत येक दोन हजार फौज पाठवावी. घाटाखालीं येकदाच हजार फौज पाठवावी. येथील बाहेर पडला आहे त्यास मिलऊन घ्यावें. आनिख फौजा मिलून तूर्त याच्या नमुदास सिरे आलीकडे पांच हजार फौज पाठवावी. कडूर बानावराकडून आपण ठानी घेत यावें. पुढें कोने कोने जागां हे बंदोबस्ती करितात पाहूं बरें? कसें वर्तमान तें वरचेवर सेवेसी विनंती करितों. या पत्राचीं प्रति उत्तरें सुतरस्वाराबरोबर लवकर यावीं. हें पत्र कोन्हाचे हातीं न पडावें. फाडून टाकावे.

¶*A Maratha envoy at the Court of some Karnatak chieftain intimates to Visaji Krishna that the appearance of Maratha forces in the Karnatak would be hailed with delight.*

No. 13] [15-2-1763 ?

पौ छ २० शाबान.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शेषो नारायण करद्वये जोडून सा। नमस्कार विनंती प्रार्थना. ता। छ १ माहे शाबान मु। नजीक सांगोले स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. सेवेसी प्रार्थना ऐसीजे. स्वामी ईश्वरपूर्णअवतार. सेवकाचे

आराध्य दैवत. स्वामीचे चरणाविना निजध्यास सेवकास दुसरा नाहीं. स्वामीचे स्मरणमात्रे सर्व जनाचे तापत्रये दूर होतात. स्वामीची आज्ञा तारक मानोन आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली. सन इसनेच्या कारभाराचा तगादा सेवकाचे माथां भारी राहिला. स्वामी साभिमानी, कृपावंत. तेव्हां सेवकाची उपेक्षा होऊन तगादा राहील असें कदापि घडणार नाहीं. श्रीमंत राजश्री प्रधानपंत यांस व राजश्री बापू यांस करवीरचा कारभार करारानुरूप विले लावून देणे आणि सेवकाचे तगादेचा निर्गम होणे येविशी स्वामींनी आगोदर आज्ञा केलीच आहे. त्याच आन्वये श्रीमंत व बापू सेवकांसी बोलतात. परभारेहि चिकोडीकराची रदबदल करणार; करितात. परंतु बापूचे लक्ष स्वामीचे आज्ञेविना दुसरे नाहीं. आणिखी सेवकाचे आगत्यवादाविसी बापूस आज्ञापत्रीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shesho Narayan requests Raghunathrao Dada to induce the Peshwa to settle once for all the affairs of Kolhapur in the spirit of the agreement which has been already proposed.*

No. 14] *[19-2-1763*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे शेवेशी

विनंती सेवक रामाजी महादेव मुकाम कल्याण चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ९ माहे शाबानपावेतो स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींचे आज्ञापत्र छ १८ माहे रजेबचे सादर जाहाले ते छ ४ मिनहूस सेवकास पावले. तेथें आज्ञा कीं, गोपालराव गोविंद अमर्यादा करून गेले. उपरांत गोविंद हरि मिरजेचे ठाणें बलाऊन होते, यास्तव किल्यास मोर्चे लाऊन मारगिरीखाली जेर केले. पुढें परिणाम उत्तम नाहीं हे जाणोन गोविंद हरि यानीं आन्यायें माफ करून घेऊन येऊन भेटले. छ १७ रजेबी किला फत्ते जाहाला. हे हर्षाचे वर्तमान सेवकास आज्ञापत्र सादर जाहाले त्यावरून बहुत संतोष जाहला. ज्यानी अमर्यादा केली ते शासन पावले. स्वामीचा पुण्यप्रताप समर्थ आहे. ज्यावर अवकृपा होईल ते पादाक्रांत होतील, तेथें मिरजेचा मजकूर काये आहे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo acknowledges receipt of a letter from Dadasaheb giving news of the surrender of the fort of Miraj by Govind Hari Patwardhan.*

6309

No. 15] [*4-9-1763*

[वरील भाग फाटला आहे.] देव नामजाद प्रांत साष्टी गोसावी यांसी सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा अर्बा सितैन मया व अलफ. खासा स्वारी मजल दरमजल कर्नाटक प्रांती हेदर नाइकाच्या पारपत्याकरिता तुंगभद्रातीरास चालली, याजकरिता तुम्ही जंजिरे विजेदुर्ग व सुवर्णदुर्ग प्रांतीचा बंदोबस्त करून ते प्रांतपैकी तूर्त खर्चास रुपये नख्त ५०००००० पनास लक्ष सरकारात जलदीने पाठऊन देण. येक घडीचा दिरंग न लावणे. जाणीजे छ २९ सफर. बहुत काय लिहिणें?

¶*The Peshwa requisitions money from Vijaydurg and Suvarnadurg to prosecute his Karnatak campaign.*

No. 16] [*1764?*

२

बोलले की, हैदरनायेकाने गुदस्ता आपल्या सरकारात सा लक्ष रुा दिल्हे· अवंदाहि आठ लाख रुा सरकारांत देतो व दोन तीन लक्ष रुा दरबारखर्चाचे देतो. हे न करून त्याची कुमक न करावी, तो पैका देतो तो टाकावा आणि श्रीमंतासी सख्य राखावे यात नफा काये? या आन्वये हैदरनायेकाचा पक्ष धरून गुलाम सैदखान फार बोलले. तेव्हा समसामुदौलानी व माा कबीरखानानी उतर दिल्हे की, हैदरनाईक उदंड जाले तरी जमीदार. त्याची कुमक नवाबानी करावी ही गोष्टी [एक ओळ फाटली.] मनुश्य. प्रस्तुत तुम्ही द्रव्यावर दृष्ट देऊन त्याची कुमक कराल. तो बलावल्यावर तुमच्या प्राणाचाच ग्राहक होईल. त्यास हैदर नायेकाची कुमक सहसा न करावी व त्याचा पक्ष न धरावा. श्रीमंतासी ज्या रीतीने कलेल त्या रीतीने सख्य करावे आणि उभैतानी येकमते होऊन हैदरनायेकाचे उतम प्रकारे पारपत्य करावे. त्याचे निर्मूलच करावे. तो बलावल्याने नवाबास व श्रीमंतास वाईट आहे. याप्राा समसामुदौला व माा कबीरखां फार बोलले व हेहि बोलले की आपण हैदरनायेकाचे कुमकेस जातील ही गोष्ट श्रीमंतास लोपेल कीं काये? आपण हैदरनायेकाचे कुमकेस जातात हे श्रीमंतास कलल्यावर ते हैदर-नायेकाचा पिछा सोडून आपल्याच सुमारे येतील. श्रीमंत दादासाहेब नासिकांत फौजेची तयारी करितात ते तिकडून येतील, मुलकाची खराबी करितील. तुम्हांसी बार+ येतील. या प्रकारे फार बोलले. याचे उतर गुलाम सैदखानानी दिल्हे की, नवाब व भोसले व हैदरनाईक येकत्र (एक ओळ फाटली.) नाहीं. त्यास

+बंदुकीचे आवाज.

समसामुदौलानी व मा। कबीरखानानी उतर केले की, गुदस्ता भोसले व श्रीमंताचे सरकारचे सर्व लोक व संपूर्ण राज्य तुम्हाजवल मिलोन होते, तेव्हा काये साध्य जाले जे पुढे काये होणार? ह्या गोष्टी परस्परें खराब व्हावयाच्या मात्र आहे. या प्रकारे दरबारी परस्पर फार बोलणी जाली. सारांश समसामुदौला उमदे माणूस दुरंदेस व सर्व प्रकार त्याणी पाहिले आहेत. त्यास दोहीकडील बऱ्याच्या गोष्टी त्याणी सांगितल्या. केवल नवाबाचे पदरचे म्हणून (पुढील मजकूर गहाळ.)

¶*This mutilated letter gives the substance of a discussion at the Nizam's court between Samsam-ud-daula and Said Khan regarding a proposed alliance between the Nizam and Haidar against the Peshwa.*

No. 17] [*1764*

छ ६ साबान

श्री

चिरंजीव राजश्री राव प्रधान यासी आसीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. त्रिंबक खंडेराव याजकडील गाडदी कांहीं आबाजी नाइकाबराबरी व कांही रेणको आनाजीबराबरी गेलेच आहेत. बाकी असतील त्याजसी कर्नाटकचे स्वारीस रवाना करावे व आणखी एक दोन पथके तेथे गाडदी अ * * * * * * * * * * * * * * * * बर * * * बर तोफा * * पाऊण शेर गोल्याच्या व * * * तीची पावणे दोन शेर गोल्याची ये * * * आहेत. गढी घ्यावयाच्या उपयोगी नाहीत हे जाणून येथें ठेविल्या. वरकड तोफा आम्हाबराबर नाहीत. त्रिंबक खंडेरायाच्या तोफा आबाजी नाइकाबरोबर गेल्या. आपण रेणकोपंतास बलावावें. मजकडे त्याचा कारकून आला होता त्यास मी रगडून सांगितलें. आपणाकडे रवाना केले आहे. त्याजबराबर च्यार तोफा त्रिंबक खंडेरायाकडील आहेत त्या येतील. ते गाडदी व तोफासुधां रेणकोपंत बलाऊन घ्यावे हे आशीर्वाद.

¶*Raghunathrao Dada writes to the Peshwa about despatch of artillery and contingents for employment in the Karnatak.*

No. 18] [*1764?*

श्री

सेवेसी विज्ञापना. खानानी बहुता प्रकारें हैदरखानास सांगितलें, परंतु मान्य न करितां स्वार होऊन जात आहेत. तयारी जाली आहे. सेवेसी विदित जाले पाहिजे.

6311

कादरखान वगैर जमातदार काली निरोप घेऊन गेले. त्यापैकीं संभर गाडदी माघारे आले आहेत. वरकडाचा विचार आहे. जे येतील ते लेहून सेवेसी पाठऊ. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The witer mentions that Haidar Khan was departing, without minding the importunities made to him by some Khan.*

No. 19] [*1764?*

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विज्ञापणा येसीजे. राजश्री रायाचे बंधु राजश्री सुभानराव घोरपडे रायासी यागी होऊन गजिर्दगडासच होते. येकदोनी वेलां रायानी कारकून पाठऊन बोलाविले. त्यानें रायाची गोष्ट मान्य केली नाहीं. सद पाहोन रायाचे गोडहाळ+ तुंगभद्रेचे सनिध दोनी कोस कोपल सरकारचें किला गोडहाळांत रायाचे देवतार्जन व मनुशें व वस्तभाव राघू म्हणोन त्या गांवीं ठेविलीं असतां, सुभानराव येऊन गाव घेऊन वरकड लोकांस व राघूस निरोप देऊन बाहेर काहडून देऊन वस्तभाव देवतार्जन वडिलाचे वेलचे ते बलकाऊन गांव घेतला. हें वर्तमान रायास कललें. दुसरे दिवशीं राजश्री रामचंद्रपती रायास व सेवकास लिहिले जे, गोडहाळ पहिलेपासून रायाकडे होते. आजिपरियंत सरकारचे कोपळास उपद्रव जाला नाहीं. आतां सुभानराव याने कोपलची रयेत व कितेक बाजारकरी यांस उपद्रव दिल्हे हे रायास पत्रे पाठविली. राव यानी परिछिन सांगितले जे, सुभानराव आमचे यैकत नाहीं. आमचाच गांव घेऊन बलकाऊन आमची मनुष्यास बेइजत करून बाहेर काडून दिल्हे. यानें आम्हांसी लबाडी केली. त्यासी तुम्ही समजून घेणे, म्हणोन रायानी रुबरू परिछिन सांगितले व रामचंद्रपंतास पत्र लिहिले. से(व)काने लिहिलें जे त्यास धरून कैद करून गोडहाळ घेणे, ठाणे बसवणें. रायानी सांगितले आहे. जर करितां राव कांहीं शब्द ठेवील तर आम्ही जावों म्हणोन पत्र पाठविली असतां, सुभानराव याने कजिये करून कोपलचे येक दोनी खेडी घेतली. आंतरंगे रायानी सांगितलें असेल म्हणोन सवशये जाला आस, तर रायानी आतांहि परिछिन सांगितलें जे, श्रीमंत स्वामीची मरजी रक्षने जरूर. त्याच्या तालुकियास हरगीज उपद्रव देनार नाहीं म्हणोन रायानी सांगितलें आहे. राजश्री नागोराव येथून श्रीमंत स्वामीकडे गेले आहेत. आमचे जागा ममता करीत आसतां आम्ही वाईट कैसियास्तव करावें? पालेगार पठान यानी लबाडी करून सरकार तालुक्यास उपद्रव दिल्हा. थोडके दिवसा त्यांचे पारपत्ये होऊन येईल. आम्ही उपराला करावा तर

+ In Karnul District.

6312

आम्हापासी फौज थोडकी. त्याहीमध्यें चहुकडून येक प्रकार जाला. हैदरखान याचे चित्तांत कीं, रायाच्या तालुकियास उपद्रव द्यावा म्हणोन रायानी सांगितलें. वकिलानी रायास लिहिलें आहे. श्रीमंत स्वामिकडील च्यार पांच हजार फौज येती, तर ते व आम्ही सामील होऊन पठान पालेगार याचे पारपत्य उत्तम रीतीनें करूं. फौजाचे मार्ग लक्षीत आहे. खुद रायाचे फौज जाऊन कुस्ती घेत नाहीं. सुभानरायासी व रायाशीं चित्त सुद नाहीं. उपरी परकोडा सरकारची जागा पाहाडी मातबर सरंजाम च्यार पांच महिने जुजेल. राजश्री लक्षुमनपंतीं गाडधी व मावले तीनसें स्वार व फिरंगी दारूगोली सरंजाम मातबर केला आहे. जुमज खानार नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao reports to the Peshwa the mutual differences between the Ghorpade brothers—Murarrao and Subhanrao and their movements.*

No. 20] [*1764?*

श्रीमंगलमूर्ति

सेवेसी विसाजी बाबूराव विज्ञापना ऐसीजे.

राजश्री राव ममलकतमदार याजपाशीं दोनी हजार फौज, दोनी हजार बार प्यादे, च्यारशें आरब नवे ठेविले. त्याजपासीं दोनी तोफा लाहानी व रायाकडील दाहा तोफा, येक फटकडी व दोनी तोफा च्यार शेर गोळीयाच्या दोनी, वरकड लाहान तोफा व फिरंगी काफरी मिलोन शंभर आहेत. मातबर स्वस्थानावर जावत नाहीं. लहान सहान पाहोन उपद्रव करितात. १

हैदरखान यानें रायाकडील खंडेराव घोरपडे वगैरे लोक धरून नेले. त्यास कैद बेंगरुळांत केले. त्यास पोटास मात्र देऊन मातबर चवकी ठेविली. त्यांस सोडीत नाहींत. श्रीमंत स्वामीची खासा स्वारी आलियावर त्याची सुटका

सरकारचा गुरूमकोंडा यासी कडपेकर उपद्रव देतात. आसपास पालेगारहि उपद्रव करितात. हैदरखानाची फौज आणावी म्हणोन या विचारांत कडपेकर होते, इतकियांत खासा स्वारी मनोली प्रांतीं आली म्हणोन वर्तमान कललियावर फौज आली नाहीं. हैदरखान मग्न जाला. घोरपडे याचीं ठाणीं घेऊन शेर जाला. त्याजपाशीं फौज पांच हजार करनाटकी, बार तीन हजार प्यादे वगैरे, दोनी हजार फिरंगी काफरी वगैरे, दोनी हजार तुरुकस्वार, पांचशें पालेगार वगैरे तीन हजार पनास तोफा वगैरे सरंजाम आहे त्यामुळें रायाकडील लोकांनीं सलाबत खादली. कोण्ही त्याजकडे जात नाहींत. पिनगुडा मडकशिरें

होईल व रायाकडील ठाणींहि येतील. याजकरितां रायांनीं राजश्री नागोराव श्रीनिवास वकील यास लिहिलें आहे. फौज आलिया रायाचें ऊर्जित होत आहे. फौजेचा मार्ग लक्षीत आहेत. १

महमदअलीखान चेनापटणीहून अरकाटेस आला म्हणोन वर्तमान आहे. १

हरपनहलीकर स्वस्थानिक यांहीं हैदरखानाचे वकील ठेऊन घेतला आहे. पैका देतों म्हणतात. कालहरण करितात. खासा स्वारी या प्रांतें आलियावर जे जे वलवल करितात त्यांचें पारपत्यहि होत आहे. मातबर फौजेचा दब बसला आहे. १

महमद अलीखान रायाचे उपरालियासी येत नाहीं. तूर्त फौजेस व फिरंगियास पोटास पाहिजे. राव कांहीं देत नाहीं. राव गुतीस जात नाहीं. घरच्या बाइका म्हणतील गड किले गमाविले, म्हणोन गुतीस जात नाहीं १

सेवकापासीं जासूदजोड्याहि नाहींत. येक जोडी मात्र आहे. त्यास रोजमराहि नाहीं. वरचेवर सेवकानें जालें वर्तलें लेहून विनंतीपत्र पाठवावें लागतें. सेवकास रोजमरा नाहीं १

जुजबी प्यादे मात्र ठेविले. ठानी मात्र राखिलीं आहे. खासा स्वारी तुगभद्रेचें तिरास आलियावर रायाची किरकोल ठाणीं गेलेलीं तेहि येतात. मातबर किले पिनगुडा व मडकशिरें व माहाराजगड मात्र मातबर किले त्यासहि रायाकडील अनुसंदान फितूर आहे. मातबर फौजेचा शेह जालियावर तेहि जागा येईल. रावहि स्वामीच्या आज्ञेशिवाय नाहीं. १

रायाचा कारभार परस्परें होऊन यावें, पैका देऊं नये, मातबरी राहावी, पालेगार पठाण यांजवर दब बसावा. कैलासवासी श्रीमंतांहीं रायाचें ऊर्जित केलें, दाहा लक्ष रुपयांचे परगणेहि दिल्हे, त्यामुळें रावहि धड जाला, परंतु विश्वास नाहीं यामुळें इतका प्रकार जाला. राज्यांतील मातबर सरदार म्हणोन श्रीमंताहीं मानबुजरखी राखोन रायावर ममता पूर्ण केली १

नडममुडिस हला केली तर गांव लुटला जातो मग पैका मिलत नाहीं. याजकरितां गांव जेर करून पैका घ्यावा या येत्नांत आहे. १

बसालतजंग यानें कपलीची पेठ मारली. हैदरखान बिदनुराकडे गेला. १

सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Visaji Baburao reports how Haidar was daily gaining ground over Murarrao Ghorpade.*

6314

No. 21] [1764 ?

श्री.

पुा श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना. बादशाहाकडून नवाबास फर्मान व येक दुपटा खिलत[1] आला होता. त्यास नवाबानी छ ४ राखरी गोषेमाहालापलीकडे फर्मानवाडीचा[2] डेरा उभा करविला. त्रितिय प्रहरी नवाब बहुत जलुसाने[3] स्वार होऊन फर्मानवाडीस गेले. समागमे समसामुदौला व मा। कबीरखां व मा। ताहेरखां व वफादारखां व मा। नवाजखां व मा। गौसखां व गुलामसैदखां व मीर मुसाखां वगैरे तमाम उमदे लहाण-थोर फर्मानवाडीस गेले होते. डेऱ्यात जाऊन फर्मान घेतला. डोईमध्ये पागोट्यात खोऊन दुपटा पागोट्यावर बांधून पुन्हा स्वार होऊन चालले, ते शादियाने[4] वाजवीत घरास दाखल जाले. तमाम उमद्यानी लाहान थोरानी नवाबास नजरा गुजरानिल्या. फर्मान कृपेचा होता.

हैदरनाइकाडून काजमबेग व कामीलबेग तेथून इकडे यावयास्तव चालले. दाहापाच मजलीवर आले म्हणून यापूर्वी सेवेसी वरचेवर वर्तमान लिहिण्यात आले होते. त्यास त्याजकडून येक भला माणूस अगोधर पुढे जौबसालास येथे याजवळ आला होता. त्याणे शोहरत[5] घातली होती, की जवळपास येऊन पोहचले आहेत परंतु ते येऊन गदवालेस राहिले आहेत. येथे येत नाहीत. तेथून (न)वाबास लिहिणे ते लिहितात व तेथे बसून गाडदी पायेदल व काही स्वार वरचेवर निगादास्त करून नवाबाचे नाव करून गाडदी व स्वार हैदरनाइकाकडे पाठवीत आहेत, म्हणोन येथे वर्तमान वरचेवर येत आहे. हे विज्ञापना.

¶The letter describes how the Nizam received with great eclat the firman and the robes of honour sent to him by the Emperor ; Kajam Beg and Kamil Beg deputed to carry on negotiations with the Nizam on behalf of Haidar Naik are reported to be on their way to meet the Nizam.

No. 22] [1764 ?

श्री

विज्ञापना. आजच गुरुवारी दोन घटका रात्र प्रथम प्रहरीं अकस्मात शहरात हुलड जाली आणि झाडून रयत पेठकरी वगैरे पळों लागले. त्यास साऱ्यांस बाहेर जाऊन धीर भरंवसा देऊन जेथें तेथें लाऊन दिल्हे. दोन प्रहर रात्र घोळ पडला.

---

१ सन्मानाचा पोशाख. २ फर्मानबाडी=वस्त्राचा दरबार. ३ समारंभानें. ४ मंगलवाद्यें. ५ आवई.

याप्रमाणें लोक हवालदील जाले आहे. किल्याची जागा आणि वस्ती मोठी. फाहाडपसारा आणि आवया याप्रमाणें पडतात आणि खासा स्वारी मागें सरली आहे. जागा नाक्याची असोन केवल तोंडासी. श्रीरंगपटणापासून सिऱ्यापर्यंत सरकार अमलाची जागा कोणी मोठी मध्यें नाहीं. त्यापेक्षें मर्जीस आल्यास दोन हजाराचे आलीकडे जमेत जितकी बारीस येईल तितकी पाठविल्यास जाग्याचा नक्ष राहील यैसें दिसोन येतें. मर्जी आसिल्यास सत्वर रवानगी करावयास आज्ञा करावी. हजार दीड हजार स्वार व गाडदी पांच सातसें असिल्यास मुलकास भरवसा पडेल, आणि खासा स्वारी वेठणीचे व दाण्याचे तगच्याईमुलें आलीकडे पलीकडे गेल्यास किल्यापासून दाहापाच कोसावर पुढें दबाव राहील यैसा विचार आहे. त्यांत स्वामीची मर्जी असेल ती खरी. मी गलबलून लिहितों यैसें ध्यानांत येईल तरी मी घाबरा जालों नाहीं. परंतु चित्तांत गोष्ट आली ती सुचविली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा लोभाची अभिवृधि असिली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to strengthen the post from which the writer sends out this despatch.*

No. 23] [*January 1764 ?*

श्रीभवानीशंकर

विनंती विज्ञापना यैसीजे. बातमीचे वर्तमान लिा ते आक्षरशा वाचून उतर पाठऊन देणार स्वामी समर्थ आहेत.

हैदरनायेकाचे लस्करांतून धोंडाजीपंत वकील नवाबाकडील होता तो आला. च्यार लक्ष रुपयेहि पाा. नवाबानी मतलब लिा होते ते हैदरनायेकाने कबूल केले. वकीलहि दुसराहि वकिलासमागमे देऊन नवाबाकडे आले असे. मनसुबा दिसोन येतो. की नबाबाची फौज कुमकेस घेऊन जावी. हैदर नायेक आणि मनसुबीयात दगाहची गोष्ट आहे. सुलाह जाली हे वर्तमान लोकप्रसिद्ध, परंतु सुलाह जाली हेच लटकी. रावसाहेबाकड सुलाहाची गोष्ट टाकावी, इकड आपली मजबुती करावी, तोपावेतो पावसाला जातो, नदीनाले उतरतात, युध करावे हा त्याचा खुलासा आहे. हे वर्तमान दरगाह कुलीखानाचे पत्रात आले ते लिा आहे. कलले पाहिजे.

दुसरे वर्तमान. रावसाहेबाचे लस्करातून सोळा दिवसाचे मनुश आले. कागदहि दरगाह कुलीखानास आला. त्यातहि हैदरनायकाचा मजकूर सुलाहावर गोष्ट घालावी, आशा दाखवावी, पैका देऊ दिलाऊ, पावसाला जाये तो या गोष्टीवर राखावे, नवाबाकडील फौज घेऊन येऊन युध करावे हे वर्तमान आले, तेहि लिा आहे.

नवाबानी हैदरनायकाचे वकिलास व आपल्या वकिलास बोलाऊन पाच घटका पावेतो येकांत करून मग दुसरे दिवसी मीर मुसाखां व वफादारखा व महमद ताहारखा व हैदरनायेकाचे वकिलास व हैदरयारखा व व जगनाथपंत व शामजीपंत टकले व सदासिव रामचंद्र यैसे याजला पाचारून एकांत केला. येक प्रहर मग दरबार केला. हैदनायेकाकड कागदपत्र पाठविली. खातरजमा केली. नवाबाचे व हैदरनायकाचे चित येक आहे. पूर्ण कलो दीजे. निजामअली बहुत गोष्टीचा खोल. याचेहि मनांत हेत आहे की येकदा प्रसंग युध्याचा घालावा. इकडून आपण उठावणी करावी, तिकडून हैदरनायेकाने उठावणी करावी. फौजेचा जमाव होऊ न द्यावा यैसा मनसुबा केला आहे. बागलाणात व खानदेशात व नासिक प्रांताकडे उपद्रव करावा हा विचार आहे. सूचना मात्र लिा आसे. तुमचे वकिलास जागरिचे उमेदवार केले आहे. बारीक वर्तमान लिा हे वर्तमान स्वामीस परस्परे कललेच असल. परंतु आम्ही यैकिले ते लिहिले.

¶*The letter reports the news that the Nizam and Haidar have formed an alliance against the Peshwa and are resolved to march against him as soon as the monsoons are over.*

J *No. 24*] [*3-2-1764*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री बाजीपंत अणा स्वामीचे सेवेसी

पोष्य माहादाजी बलाल व हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ३० रजब मुा नाझें जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सदैव पत्री कुशल वृत लिहून संतोषवीत जावे. इकडील वर्तमान तर श्रीमंत दरमजल येथपर्यंत आले. विठल सिवदेव दोन हजार फौज जमा जाली. नारो शंकर चांभारगोंद्यास गेले आहेत. वरकड कोणी सरंजामी आले नाहींत. आठा दिवसानी कृष्णेवर जातील. विशेष लिहिजेसे नाही. राजश्री मल्हारजी होलकर याजकडील प्रकर्ण पाठवावयाविसी श्रीमंतानी श्रीमंत नाना फडणीस यास पुण्यांस लिहिलें होते. त्यांस प्रकरण येथे होते ते सारे कागद तुम्हाकडे पाा आहेत. समजोन श्रीमंतास समजावावे. येथून श्रीमंतांनी श्रीमंत दादासाहेब यास व राजश्री चिंतोपंत यास पत्रें लिहिली ते लाखोटे करून पाा आहेत. प्रविष्ट करावे. कागदपत्र पावलियाचे उतर पाा. रुमाल खादीचा त्यांत

कागद बांधोन पाठविले आहेत. तिकडील नवल विशेष वृत लिहीत जावे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस अद्याप आले नाहीं. कलावे. मल्हारबा दवंडाहून पुढे तीन मजली गेले म्हणोन येथे वर्तमान आहे. गंगोबा राहूजीपंत कोठे आहेत ते लिहून पाठवावें. श्रीमंत त्रिंबकास कधी जाणार? सांप्रा कालीं मनसुबा काय? तुमचे काही काम लागते की नाही? सविस्तर लिहावें. बहुत काय लिहिणे, कृपालोभ असो दीजे, हे विनंती.

¶Mahadaji Ballal and Hari Ballal, writing from the Peshwa's camp at Nazre, inform Bajipant that they will reach the Krishna in about a week's time. The addressee is further requested to forward certain papers, concerning Malharji Holkar to Raghunathrao.

No. 25 *[2-3-1764?*

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबक * * * *
स्वामीचे सेवेसी.

सेवक विसाजी बाबूराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल छ २१ शाबान मुकाम गुडीबिडा प्रांत चिकबालापूर स्वामिचे कृपेंकरून येथास्थित असे विज्ञापणा यैसीजे. हैदरखानासी बसालतजंगासी वाकडें जालें. याजकरितां बसालतजंग कडपीयाकडे गेले. हैदरखान यानी चिकबालापुरास मोरचे लाविले. याजकरितां राजश्री राव ममलकतमदार यासी चिकबालापूरकरानी लक्ष रुपये व इटगीदुर्ग द्यावे यैसा करारमदार करून मातबर दरमियाने घेऊन कुमक करावी. जर करितां कुमक न करावी तर बालापूर गेलियावर मडकसिरे पिनगुडारा (इतका) सरंजाम पाहिजे, म्हणोन योजना करीत आसतां वर्तमान आले. श्रीमंत खासा स्वारी कोल्हापुरास आली. या प्रांतें येतात म्हणोन राजश्री नागोराव यानी रायासी लिहिलेंवरून अवसान धरून रायानी गुतीहून कूच करून पिनगुड्यास बुनगे हती जडभारी तोफा ठेऊन सडे होऊन येथें आलें. येथून पांच कोस बालापूर. येथून स्वारी पाठविली. हैदरखानाचे कही भरावयास आली होती. वीस उंटें दोनिसं तटे दाहा घोडीं दोनी हजार बैल घेऊन आले. तुकोजी नलगे जखमानी चूर व आनिक येक दोनी मातबर पाडाऊ याजकडे आले. बुलगे वगैरे यास सोडून दिल्ही. हैदरखानानें पेठ घेऊन दरवाजेपावेतों मोरचे कायेम केले आहे. रायाकडील लोकानी निकड करून पेंढारी वगैरे दोनी हजार राऊत (फाटले). खंडेराव घोरपडे छ * रोजीं (फाटले) हैदरखानाच्या पाच (फाटले) माने तहकीक

त्याही गर्धे हैदर (फाटले) न्हाचा नाहीं. रायास चहुकडील उप * * त आहे. खुद राव जात नाहीं. जर करिता राव खुद गेले तर यासी त्यासी जूज भारी होईल. घोरपडे दुरूनच जें कांहीं जालें तेंच. महमद अलीखान वेलुरांतच आहे. बसालतजंग यानी महमद अलीखानास लिहिलें जे, तुमची आमची भेटी व्हावी म्हणोन लिहिलें. त्यास महमद अलीखान नेलुर सर्वापलीहून अरकाटेस येऊन येलुरास यावें. पुढें भेटीस येऊं म्हणोन दिसगतीवर घातलें म्हणोन बसालतजंग कडपियास गेले. श्रीरंगपटनी मखदूम नाईक याचें प्रबल जाले आहे. रायाच्या चितांत जे, सरकारची फौज आलियानें हैदरखानाचें पारपत्य करावें येसे परिछिन राव बोलिले. त्यास उत्तर दिल्हें पहिलेच मनसबा पाहोन केला नाहीं * (जर) करिता हैदरखानासी बसालतजंगासी गांठी पडों दिली नसती तर तो का शेर होता? राव बोलिले जे येसें होईल हें ठाऊक नाहीं. बालापूर घेतलियावर मडकसिरे पिनगुडा कोठें राहों देनार नाहीं. हे आतां रायास सुचलें. खासा स्वारी श्रीमंत स्वामींची आली म्हणजे या मुलकांत दाब बसला. रायाची रीत येक प्रकार जाली आहे. कोन्हाचा इतबार करीत नाहीं. कोन्हाचा मनसबा मनास येत नाहीं. जे करणें तें आपलें अनुमतें करावें. याची सलाबत मात्र आहे. फौज म्हणावी तर कांहीं जीव नाहीं. सरकारची फौज दरसालास या प्रांतें येती त्या प्रमानें रायापासीं फौजेचा सरंजाम.

¶*Visaji Baburao communicates to Trimbakrao that Murarrao Ghorpade thinks of engaging Haidar provided the Peshwas' troops be despatched in time to his help.*

No. 26] [*4-3-1764*

पौ छ ६ रमजान
आर्बा फालगुन मास
इा कासिद

श्री

सेवेसी माहादाजी बलाळ व नारो गंगाधर व हरि बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ३० साबान मुकाम येडूरमाजरी वर्तमान यथस्थित असें विशेष. स्वामींनीं छ २९ साबानाचीं पत्रें सांडणीस्वाराबरोबर पाठविलीं तीं काल पावलीं. जाब मागाहून पाठऊं. आज येथून कूच जालें. लांबदुरचे

6319

ओढ्यावर मुकाम होईल. मनोलीचें सुमारें ज्ञात आहेत. चिकोडी कागल वगैरें ठाणीं घेऊन शेषोपंताचे हवालीं करावयास राजश्री विठल शिवदेव पाठविले आहेत. ते तिकडील गुंता उरकून लौकरच लष्करास येऊन मिळतील. श्रीमंत राजश्री दादा-फडर्णास चतुर्दशीस लस्करास आले. कळलें पाहिजे. राजश्री नारो शंकर श्री-कोल्हापूरास गेले होते तेथून लस्करास आले. च्यार रोज जाले. फार बरें वाटत नाहीं. मोडशी जाली म्हणतात; परंतु वाखा फार आहे. उतार पडला म्हणजे लिहून पाठवितों, हें विज्ञापना.

राजश्री बज्याबाचें नालबंदीवर देणें जालें. पैका नेमून द्यायाविशी येक दोन वेळां श्रीमतांस पुशिलें, परंतु देतों देतों म्हणतात. दर येका ये जागा नेमून घेतों. कळावें हें विज्ञापना. दमाजी गायेकवाड याजकडे दीड लक्ष बाकी होती, त्यास कृष्णाजी नाईक कडू व कांबरस मिळोन येक लक्षाची वरात दिली. वरकड किरकोळ वराता जाल्या, बाकी कांहीं येक पैसा राहिला नाहीं. मागाहून यादी पाठवितों. हें विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write home from Yedur Manjri to say : " Vithal Shivdeo has been despatched to restore Kagal Chikodi to Sheshopant. Manoli is the next place where the army encamps."*

No. 27] [*19-3-1764*

पौ छ २३ रमजान सन आर्बा

श्री

आपत्ये मोरोबाने साष्टांग नमस्कार विनंती. ता छ १९ रमजान मु॥ मनोळी सुखरूप असो विशेष. आपण एकदोन पत्रें पा॥ ती पावली. इकडील वर्तमान तर मनोळीस मोर्चे लागलें. च्यार रोज जाले. ठाणे चांगले. दोन हजार प्यादा आंत आहे. निकड केली तर आठरोज लागतील. हे काम जाल्यावर मग हैदर नाईकाकडे जावयाचा विचार. हैदर नाईक बिदरुरांत आहे. तिकडील सविस्तर वर्तमान लेहून पाठवीत जावें हे विनंती.

¶*Moro Baburao writes that batteries have been erected at Manoli and that after subduing the place they would march against Haidar.*

No. 28] [24-3-1764

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बाजीपंत दाजी स्वामीचे सेवेसी

पोष्य माहादाजी विष्णु सां नमस्कार विनंती येथील कुशल ता। फाल्गुन वद्य सप्तमी मंदवार जाणून स्वकीय लिहीत जावे विशेष. येथील वर्तमान तरी श्रीमंतानी मनोळीस मोरचे लाविले आहेत. आजी आठ दिवस जाले. चौकडून मोरचेबंदी करून तोफाची मारगिरी होत आहे. सेनासमुदाय झाडून जमा जाला आहे. याउपरी कोण्ही यावयाचे नाहीं. मनोळीत कृष्णाबाई सिंदी आहे. तिचे मानस खडणी जीवनमाफीक द्यावी. याचे मानस ठाणे घेऊन शेषोपत यांसी द्यावे. त्यास ते कबूल करीत नाहीं. सर्वांनी मरावे ऐसे म्हणतात. किला फार-करून जेर जाला आहे. दो चौ दिवसीं जमिदोज होईल. आपणास कळावे. श्रीरंगपटण येथें हैदर नाईक याचा मेहुणा कारभारी होता, त्यास जुने कारभारी एकत्र होऊन त्यास कैद करून मारिला. आणखी त्याचीं ठाणी होती तीं घेतली. हैदर नाईक खासा बिदनुरीच आहे. तुम्ही आपणाकडील वर्तमान लेहून पाठवीत जावें. कृपा केली पाहिजे. तूर्त या मुकामी महर्गता विशेष आहे आणि तृणहि मिळत नाहीं, तेणेकरून लोक बहुत हैराण आहेत. पुढेहि यापेक्षां माहागाईची आवाई ऐकतों. कृपा कीजे हे विनंती.

¶*Mahadaji Vishnu reports to Bajipant Daji that a brother-in-law of Haidar was assassinated by his rivals in Seringapatam. Manoli—continues the writer—will soon be captured.*

No. 29] [21-2-1764 ?
or April 1764 ?

श्री

विज्ञापना. आपलें पत्र छ १८ साबानचें जासुदासमागमें आलें तें पावलें. बुराणद्दीन हो? मीकटे याजवर कूच करून आला, तुम्हीं बहुत सावधपणें राहावें, दगेखोर आहे, बातमी राखून सावध आसावें म्हणोन लिहिलें. त्यास येथेंहि बातमी आली. त्यांत दोनसें राऊत व येक हजार बार व च्यार तोफा सेद आनसर घेऊन धारवाडास खजिना न्यावयास रवाना जाला, तो मिश्रीकोब्यापलीकडे तीन कोशपरियंत आला. रातोरात धारवाडीस येणार म्हणून बातमीचा माणूस आज सकाळीं प्रहर दिवसास आला, त्याणें काल त्या फौजेस सोडिले. त्यापक्षीं रात्रींच धारवाडास फौज त्याची

आली आसावी. * * बातमी आज चौ घटकेंत यावीसी आहे. त्यां * * ल बातमी प्रा आला असलियास खजिन्याचें का * * रवाडासच आला. इतकेंच काम झाडून कूच करून आला असलियास दग्यासच आला आहे. त्यास आपण दोन दिवसानीं त्या सुमारें येतों म्हणोन लिहिलें. त्यास त्याचें येणें जालें, त्यापक्षीं त्याचे तोंडावर निकडीनेच आलें पाहिजे. इकडे जागाजागा फौजा पसरल्या आहेत. संद पाहून कोठं दगा करील याजकरितां ही बातमी तहकीक आहे. * * न कूच सत्वरच होऊन इकडे येणें घडावें. येथील स्थलाचा मजकूर तरी काल नवे हुबलीस ठाणें घातलें, येविसींचा मजकूर लिहून पा आहेच. जुनें हुबलीचा मजकूर आजपावेतों उरकला आसावा. आत खबरदारी कांहींच नाहीं. माणूस थोडें, नेट बसला आसतां थोडक्यातच उरकावें असा आहे; परंतु याची * * * वरचेवर येते, याजमुळें नेट बसवितां येत नाहीं (भ) य प्रदेशकडून घडल तिकडे करावयाचें, याप्रमाणें वर्तमान आहे. याउपरी होईल तें मागाहून लेहून पाठवीन. आम्ही सावधच आहों. इकडे आला हें वर्तमान तेथें आणऊन मग वडिली कूच करून यावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶The writer refers to the impending arrival of Buran-ud-din, one of Haidar's commanders near Dharwar and the consequent preparations made by the writer to check his aggression.

No. 30] *[17-4-1764*

—च्या कृपेकरून क्षेम असे विशेष. येथील वर्तमान तर हुबलीचे ठाणे घेतल्यावर दरमजल मु॥ मजकुरास आलो. छ १३ सवाली हकिमियां[1] सावनूरकर याच्या भेटी जाहाल्या. काल सारे सरदार समेत श्रीमंत मेजवानीस शहरात गेले, ते बारा घटका रात्रीस डेरियास आले. श्रीमंत रा दादोसहि[2] नेले होते. आज सावनूरकरास येथे मेजवानी आहे. आपली फौज दरमजल येथे आली म्हणोन सावनूरकराचा बच्याव जाहाला. नाही तर मीरफैजुला दाहा हजार फौजनसी हणगलावर आला होता. सावनूरकरास नस्तनाबूत करावा हे मानस होते. परंतु श्रीमंत लौकर येऊन पोहाचले. मोठे येहसान[3] त्याजवर केले. खासा हैदर नाईक माहादेवहली बिदरुदापासून तीन मजली आहे तेथे येऊन राहिला आहे. बंकापुरास दोन हजार फौज पाठविली आहे. मखदुमखान त्याचे मेहुणा बसवा-

१ हकीमखान. २ मोरोबा फडणीस; ३ कृपा; उपकार.

पटणास हजार राउतानसी आला आहे. गोपालराव याजकडील ठाणी झाडून आली. येक बंकापूर धारवाड मात्र त्याजकडे राहिले आहे. सावनूरकर पठाण समागमे येणार. येका दो रोजी कूच करून तुंगभद्रा पार होणार. हैदर ना॥ झाडीत आहे, बाहेर येत नाही. या फौजेने[१] झाडीत जावत नाही. दिवस अखेरीचे आले. अद्याप येक पैसा खंडणीपैकीं आला नाही. आपली फौज चालीस हजार देखील सरंजामी जमा जाहाली. रोजमरा कोणास पोचत नाही. नालबंदी तो पावलीच नाही. महर्गता फार जाहाली आहे. छावणी करावी न करावी हाच मनसबा घाटत आहे. रामचंद्र जाधवराव मोगलआली निजामअलीस जाऊन भेटले, ही बातमी आली नकले. छावणी केल्यास नि (अपूर्ण)

¶*This fragmentary letter reports the meeting of the Pesh... ... the Nabab of Savanur at his Capital. The letter also speaks about the movements of the enemy in different parts of the Karnatak.*

No. 31] *[6-5-1764*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक माधवराव सदासिव सां नमस्कार विज्ञापना. वैशाख शुध ९ पर्यंत रटेहळी स्वामीकृपेने सुखी आसो. सेवेसी विनंतिपत्रें तीन पाठविलीं, परंतु कृपा उत्तरें सांभाल न जाला. सेवक पदरचा आणि स्वामी कृपेस पात्र आसे. सांभाल करणार धणी आसेत. श्रीमंत रावसाहेब सडे जाले. हैदर नाइकाची गाठी प्रतिपदेस घातली. युध्य जालें. शत्रूची बहुत खराबी जाली. दोनसें घोडे दोनसें मनुष्य ठार जालें. जखमी किती असतील न कले. त्या उपरि नित्य सडे त्याभोवते उभे राहातात. त्यानें किले मजकूरचा आसरा केला असे. सावणूरकर तरी पूर्वीच भेटला आहे. तो आज येणार. राजश्री मुरारराव घोरपडेहि आज दाखल होणार. हरपनहलीकरहि चौ दिवसांत येणार. स्वामीचे कृपेनें व आशीर्वादें शत्रूचे पारपत्य लौकरच होऊन येईलसें दिसतें. प्रताप माहाराजाचा भारी असे. सेवकाचें विस्मरण आत:करणांतून न करावें. चरणदर्शनाची इछा विशेष आसे. बहुत काय लि॥ कृपा करावी हे विज्ञापना.

---

१ फौजेनें म्हणजे फौजेच्यानें. फौज=घोडदळ.

राजश्री चिंतोपंत तात्या व राजश्री कुकाजीपंत स्वामीस नमस्कार. लोभ असावा. राजश्री रामचंद्रजी बावा यासी आसीर्वाद. लोभ करून उत्तरे पाठवित जावी. हे विनंति.

¶*Madhavrao Sadashiv informs Dadasaheb of a fight between the Peshwa and Haidar in which the latter sustained a heavy defeat.*

No. 32] *[6-5-1764*

पा। छ १८ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक कृष्णराव बल्लाळ व रामचंद्र गणेश, कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ४ जिलकाद मु। नजीक रट्यळी, प्रांत बिदनूर, सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेश. कृपा करून पत्र पाठविलें तें पावोन परम संतोश जाहला. आज्ञा कीं, तुम्हांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सविस्तर लिहिणें. ऐसियास विशेष वर्तमान स्वामींचा निरोप घेतल्या ता। कांहीं ल्याहावया योग्य जाहालें नाहीं. यास्तव लिहिलें नाहीं. राजश्री केशो नारायण यांस, तिगस्तां स्वामींनीं वचन दिल्हें होतें. त्या वचनाचा उधार श्रीमंत राजश्री रावसाहेबीं करून, बदोबस्त करून दिला. तदनंतर दरमजल खासां स्वारी सौनुरास आली. सौनुरचे पठाण भेटले. हजार, बारासें स्वार, हजार प्यादा त्याजसमागमें आहे. हैदर नाईक बिदनूरचे झाडींत होता. खासां स्वारी सौनुराहून हवनुरास, तुंगभद्रातीरास गेली. इतक्यांत हैदरनाईक हरिहरावर पंचवीस हजार प्यादा व बार दाहा हजार फौजेनसीं आला. इतक्यांत खासा स्वारी हवेरीची पेंठ मारून, तेथून सडे होऊन, तीन कोस पुढें आले. हें वर्तमान हैदरनाइकास कळल्यावर कूच करून, बिदनूरचे रोखें कूच करून रट्याळीचा मुकाम केला. राजश्री गोपाळराव व विठ्ठल सिवदेव, वैशाख शुद्ध २ प्रात:काळींच कूच करून सडे फौजेनसीं गेले. रट्याळीजवळ गांठ पडली. हैदर नाईक थोडी फौज पाहून, उभयेतांवर चालोन आला दोन आडीच कोस, इतक्यांत खासां स्वारीहि आली, दोप्रहरां गांठ पडली. तेव्हांपासून दीड प्रहर पा। परस्पर तोफांचा मार होत होता. आम्हांकडील तोफांनी शेंसवाशें, दीडशेंपर्यंत, माणूस त्यांजकडील ठार, पांच सातशें जखमी, घोडें सवाशें ठार, याखेरीज जखमी, आम्हांकडील चालीस पंनास माणूस ठार, दोनशें जखमी, घोडें शंभर ठार, याप्रमाणें होऊन

सायंकालचे चऊं घटका दिवसास फौजांनीं चालोन घेतले. परंतु गारदी फार वास्तव त्यांणीं गारद्यांचे बुरूज बांधोन, आपले फौजेस हात लागूं दिला नाहीं. लोक जखमी होऊं लागले, तेव्हां फौजा निघाल्या. मातबर सरदार कोणी जायां जाहाला नाहीं. राजश्री बाबूजी नाईक यांचा पुतण्या रघुनाथ बाबा गोळी लागून ठार जाहला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Krishnarao Ballal and Ramchandra Ganesh report to Dadasaheb particulars of the Peshwa's doings in the Karnatak, particularly the fighting with Haidar at Rattehalli.

श्री

पुा श्रीमंत दादा साहेब स्वामींचे सेवेसी

विज्ञापना. त्या दिवसीं जूंज जाहालें, त्याजमुळें त्याजवर दाब आपले फौजेचा फार राहिला, नाहीं तर तो मगरूर छापे घालिता. इतक्या उपरी तोच आपले गोटाची रातची बंदोबस्ती करीत अस्तो. त्यास कललें कीं ज्या दिवशीं फिरोन निकड करतील, त्या दिवशीं आपली स्थित राहाणार नाहीं. मुराररावहि चऊं कोसावर आले. उद्यां भेटी. तीन हजार फौज, तीन हजार गारदी, हरपन-(ह)लीकरहि पांच हजार प्यादा, पांचशें राउतांनसी भेटीस येत आहे. स्वामींचे पुण्येंकडून अमित्रांचें पारपत्य लौकरीच होईल. आपल्यास खर्चाचा पेंच मात्र भारी आहे. ईश्वर इच्छा प्रमाण. श्रीमंत रावसाहेब स्वामींचे चिंतन करीत अस्तात कीं, जें होणें तें वडिलांचे पुण्येंकडून होईल. गुदस्तां वडील होते, त्यांचें ते करीत होते. प्रस्तुत मला चिंता करावी लागते. बरे. सर्व वडिलांचे पुण्येंकडून बरेच होईल, याप्रमाणें निजध्यास आहे. आम्हीं म्हटलें कीं, दादासाहेब आम्हांस कागद लिहीत नाहींत. तर अंत आम्हांस विसरले. इतक्यांत स्वामींचें पत्र आलें. त्याजवरून जीवनकला आली. आम्हांस स्वामीखेरीज दुसरें जीवन आहे असा पदार्थ कोणीच नाहीं. विशेष लोभहि नाहीं. येक लोभ स्वामींचे पायांचा मात्र आहे. यांत आमची सर्व जिंदगानी आहे. स्वामींनीं आपले लेकांप्रमाणें आमचें चालविलें आहे; स्वामींचें शरी(र) बहुत नातवान जाहालें म्हणून आइकलें. त्याजवरून चित्तास स्वस्थ नाहीं. तर स्वामींनीं औषधीउपायें करून, पथ्य करून ज्या गोष्टीनें शरीर स्वस्थ राहिल्यास त्या शरीरापासून दौलतीचा उपभोग अथवा तपस्येचाहि उपभोग होत असतो. तर सारांश, शरीराची जतन करावी. हे विज्ञापना.

¶Krishnarao Ballal and Ramchandra Ganesh report to Raghunathrao stiff fighting between the Peshwa and Haidar. The writers praise the high qualities of Dadasaheb and attribute all the Peshwa's achievements to his blessing. Evidently they are trying to please him by sweet words.

6325

No. 33] [30-5-1764

पौ छ ८ जिल्हेज सन खमस

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य माधवरांव विस्वनाथ साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २८ जिलकादपावेतो मुाा जनस्थान वर्तमान येथास्थित असे. आम्ही आपली आज्ञा घेऊन स्वार जालों ते जनस्थानी येऊन श्रीमंताचे दर्शन घेऊन अहिरनिसी सेवेत असों. आपलेकडील वर्तमान पत्र येऊन नवल विशेष कुशलार्थ न कलला यैसे नसावें. सदैव पत्रद्वारा परामर्श करीत असावें. स्नेह ममता वृद्धिंगत असावी, हीच इछा आहे. श्रीमंतांकडील विजय संपादनार्थ प्रकार सविस्तर लेखन करून संतोषावाप्ति करीत असावें. श्रीमंत राजश्री रावसाहिब यांसी पत्र लिहून लखोटा करून आपल्याकडे पाठविला आहे व राजश्री मोरोपंत फडणीस व गुरुजी व नारोपंत यांसहि पत्रे लिहून लाखोटे करून आपल्याकडे पाठविले आहेत, तर आपली माणसें हमेश लस्करात जातच आहेत, त्यामध्ये मुजरद जाबसाल घेऊन येईल ऐसा शाहाणा इतबारी असेल त्याजवल लाखोटे देऊन रवाना करावे. माणसास ताकीद करावी की, श्रीमंताचा लाखोटा मोरोपंताजवल देऊन त्यांजकडून श्रीमंतास प्रविष्ट करऊन जाबसालाविसी लागू होऊन जाबसाल घेणे व मोरोपंत व गुरुजी व नारोपंत यांचेहि पत्राचे जाब घेऊन येणे यैसी ताकीद करावी. सारांश श्रीमंताचे व या त्रिवर्गाचे पत्राचे उतर आम्हास ज(न)स्थानी येऊन पोहोचे ते अगत्यरूप करावें. तिकडील उतरे येतील तीं आपले कारकून येथे श्रीमंता-संनिध असतात त्यांजकडे पाठऊन त्यांस खोलून लिहून, जेणेकरून आम्हाजवलच प्रविष्ट होत ते करावे. आम्हास आपले ममतेचा भरवसा, तेणेकरून स्वस्थ आहों. बहुत काय लिहिणे, लोभाची वृधि करावी, हे विनंती.

¶*Madhaorao Vishvanath requests Nana Fadnis to forward the accompanying letters to the Peshwa and dispatch the latter's reply quickly and carefully.*

No. 34] [3-6-1764

पो छ १० जिल्हेज सन खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो बालाजी कृष्ण कृतानेक साां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा जेष्ट शुध्ध चतुर्थी मुाा ठाणे कुंदगोल प्राा सावनूर स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो

१ त्र्यंबकराव मामाचा भाऊ रघुनाथरावाकडे पाठविण्यांत आला होता

विशेष. स्वामींनी कृपा करून छ २१ जिल्कादचे पत्र पाठविले ते पावोन परम आनंद जाला. ऐसेच सर्वदा पत्री सविस्तर लिहीत असावे. इकडील वर्तमान तरी येंदा या प्रांती स्वारीच्या येण्यास दिवस अखेरीचे यामुळें शत्रूचे पारपत्य येथास्थित होऊन न आलें, या करिता या प्रांती छावणी करावयाचा निश्चये जाला आहे. तपसिले श्रीमंतांची पत्रे आपणास आली आहेत, त्यावरून सविस्तर अवगत जालेच असेल. प्रस्तु(त) नरगुंद मुदगल सरकार या प्रांती परजन्यकाल क्रमावा, उपरात बाजतबरसाद जसा मनसबा दिसोन येईल तदनुरूप करावे, याप्रमाणे सिधांत जाला आहे. महर्गता विशेष. गुंदस्तां पर्जन्य पडिला नाहीं. यामुळें वैरणहि नाही. यामुळे लस्करची जनावरे फार गलाली, या प्रकारचा विचार आहे. हैदरनाईक जडे हनवटीवर बिदनूर प्रांतें आहे. श्रीमंताचे छावणीचा ठराव जालियाचा प्रकार त्यास कललियावर तो पुढे काये मनसबा करील पहावें. स्वामींनी वरचेवर पत्री दर्शनातुल्य लाभ देत असावे. (सर्व) प्रकारे आपले आहो. वरकड कितेक अर्थ श्रीकृपेकरून दर्शन जालियावर विदित होतील. बहुत काये लिहिणे. आपली पत्रे सर्वदा येतात. परंतु आमचे घरचे पत्र येत नाही. तरी येसे नसावे. पत्रे येतील त्यासमागमे घरचेहि पत्र आणून पाठवावयाची आज्ञा असावी. कृपा केली पाहिजे हे विनंती.

राजश्री नारोपंत नाना व लक्ष्मणपंत देशमुख व आपाजीपंत स्वामीस सां नमस्कारः विनंती लिा परिसोन कृपा करीत जावी हे विनंती.

¶*Balaji Krishna writes home to Nana Fadnis about the Peshwa's intention of cantoning in the Karnatak during monsoon.*

No. 35] [*18-6-1764*

पो छ १७ जिल्हेज खमस जेष्ट

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पा सखाराम भगवंत सा ना वि उपरी. येथिल कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावे विशेष. आपण पत्र विस्तारे पाठविले ते पावोन बहुत संतोष जाला. घरचे पत्रहि पावले. आपण तिकडे आहेत तो तिकडील काळजी नाहीं. छावणीचा प्रकार जाला, परंतु सर्व गोष्टीची अनुपत्य आहे. ईश्वर निर्वाह करील. रसदाची

त्वरा व्हावी येविसी श्रीमंतानी येकदोनदा लिहिलेच आहे. सांप्रत घरी पत्र पाठविले पावतें करावें. यैवजाची वोढ आहे, याची पुरवणी करणें आपणाकडे आहे. बहुत काय लिा, लोभ असो दीजे हे विनंति.

¶*In view of the intended stay of the Peshwa in Karnatak Sakharam Bapu asks Nana Fadnis for fresh supplies of provisions from Poona as the old stock had been exhausted.*

No. 36] *[20-6-1764*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत स्वामी गोसावी यांस

पोष्य मोरो बाबूराऊ नमस्कार विनंति उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान सविस्तर कळलें. याच प्रमाणें बरचेवर तिकडील वर्तमान लिहून पाठवीत जाणें. इकडील वर्तमान तर हैदर नाईक झाडींत सिरला, याजकरितां श्रीमंत मुदगल सरकारांत आले होते. पुढें गदवालपावेतों जावें, च्यार दिवस पोट भरावें हीच कस्त होती. परंतु हैदर नाईक बंकापुरास आला म्हणोन राजश्री गोपाळरायाचें पत्र सावनुराहून आलें, त्यावरून पुढें जावयाचा रोख सोडून माघारे फिरले. दरमजल सावनुरांत जात असेत. तेथें गेलियावर जो मनसुबा होईल तो लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंति.

पोष्य हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंता. आपण पत्र पाठविले तें पावोन आनंद जाहाला. सदैव पत्रीं कुशल वृत्त लिहून संतोषवीत जावें. बहुत काय ल्याहावें कृपा केली पाहिजे हे विनंति. रवाना छ १९ (फाटले) तूर्त सावनुराकडे जात * होनगुंद इतक्यांत पंधरा (फाटले) जातीलसें दिसतें. हे विनंती.

¶*Moro Baburao writes to Bajipant that the Peshwa was moving towards Savanur as Haidar was reported to be threatening that place.*

No. 37] *[23-6-1764 ?*

पो छ २० मोहरम

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नाना फडणीस स्वामीचे सेवेसी

पो गोपाळराव गोविंद कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २२ जिल्हेज भृगुवासर मोा इटगे मनापूर वर्तमान येथास्थित जाणोन स्वकीये

कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र मिरजेस पाठविले, तेथून आम्हाकडे पत्रे आले; त्याजवरून सविस्तर वर्तमान कळले. प्रस्तुत श्रीमंताचा मोकाम येथे आहे. महिना पंधरा दिवस नवलगुंद तालुक्यात दाणावैरण मिलवितात. डोंगरात गवते जाहाली म्हणजे धारवाडाजवल येके जागा महिना दोन महिने राहाणार असा मनसबा आहे. आम्हास तूर्त सावनुरी पंधरा दिवस फौजसह राहावयासी आज्ञा केली, त्याजवरून सावनुरास गेलों. हैदर नाइक जडे हनवटीवरी होता, तेथून बिदरुरास गेला म्हणोन वर्तमान आहे; बातमी तथ्य येताच लिहून पाठऊ. चितवृत आपले ठाई आहे. सदैव पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. आपले कृपेचे विस्मरण होत नाही; तरी अविस्मरयुक्त पत्र पाठवीत जावे. तिकडील बंदोबस्त आपण करितात, तेथे विस्तार काये ल्याहावा? बहुत काये लिा लोभ कीजे हे विनंती.

पोष्य नारो कृष्ण व नीलकंठ त्रिंबक व मोरो बलाल व वामनराव गोविंद व परशराम रामचंद्र कृतानेक सा ना विनंती. आपण कृपा करून पत्र पाठविले ते पावले; लिहिला अभिप्राय सर्व कळला. आम्हापासून अंतर पडले ते मनांत येऊन विशेष लिहिले, यैसियास आम्ही असा स्नेह संपादिला आहे कीं, विस्मरण पडून चित उद्विग्न व्हावे असा अर्थ नाही. सदोदित अंतःकरण स्वामीपासी आहे, तत्रापि सेवकांपासून अंतर पडले तरी क्षमा करावी. आम्हास आधार आपला; इतके लिहिणेहि उपरोधिक, तत्रापि अतिशय प्रीतिकरून लिहिले आहे. सदैव पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. सालमजकूर आमचा निभाव होऊन, घरास येऊ तेव्हा खरे; पैसा नाही, सरदारी मोठी, खर्च भारी, वरकड सर्व कृपा कसकसी आहे ते जाणतच आहां; तेथें विस्तार लिहिणे काये? बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Gopalrao Patwardhan and his brothers report to Nana Fadnis that the Peshwa intended to cantone his forces in the neighbourhood of Dharwar and adds that Haidar had taken refuge in Bednore. The letter shows how Nana was rising into importance and enjoying the full confidence of the Peshwa.*

No. 38] [*11-7-1764*

श्री

चिरंजीव राजश्री बाजीपंत यासी नारो गंगाधर आशीर्वाद उपरी. आषाढ शुद्ध त्रयोदशी मुकाम नजीक गजेंद्रगड वर्तमान येथास्थित असें विशेष. तुम्ही पत्र

पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. * * * पत्रद्वारें आनंदवीत असावे. आपले शरीरास जपत जाणें. श्रीमंत राजश्री नाना फडनीस सांप्रत तेथें गेले आहेत, उत्तम गोष्ट जाहाली. इकडील प्रकार तर छावणी जाहाली, तेव्हां महिना दोन महिने पोट भरलें पाहिजे, याअर्थें श्रीमंतांनीं राजश्री गोपाळराव यास सावनुरास ठेविलें. हजार दीड हजार गाड(दी) शिवाय फौज असे ठेविले. राजश्री विठ्ठलपंत, रास्ते, शाहाजी भोसले * * आणेगिरें, तालुका नवलगुंद या जागियास ठेऊन आपण खासा स्वारी मुदगल सरकारांत जावें, गदबल पावेतों फिरोन कांहीं मेळवावें, म्हणोन मनसबा करून सिदनुरावर गेले. तीस हज़ार खंडणी सिदनुरची केली. पुढें जावें तों सावनुराहून गोपाळराव यांचें पत्र आलें कीं हैदरनाईक बंकापुरावर येकाकीच आला. सावनूरच्या गळां पडणार अशी बातमी आल्यामुळें माघारें फिरोन गजेंद्रगडाजवळ आले. हैदरनाईक माघारां फिरोन हणगलास गेला असें काल वर्तमान आलें. याउपरीं काय विचार होईल पाहावें. तुमचे खाजगत कर्जवामाच्या वसुलाचा प्रकार तर, राजश्री माहादाजीपंत जोशी यांणीं लिहिलें आहे * * त्याजवरून कळेल. तुमचे घरचीं पत्रे पुण्याकडून वरचेवर येतच असतील. कृष्णापा मिरजकर याजविशी चिरंजीव अण्णास तुम्हास लिहिलें, त्याजवरून त्याणी आम्हास लिहिलें, ऐशास कृष्णापाचा आमचा कांहीं व्यवहार बहुतां दिवसांचा नाहीं. व्याज़बट्टा त्यांजकडून आम्हांस भोगला आहे असें कांहींच नाहीं. प्रथमग्रासे मक्षिकापात जाहालें असे. कृष्णपा मुदला कोण अकलेनें रजबदल करितात? आम्हास ही गोष्ट सर्वथैव पुरवणार नाहीं. तुम्ही त्याजला परिछिन्न सांगणें कीं, याउपरी तुमची आब्रू राहणार नाहीं. पैक्याचा निकाल व्याजसुद्धां करून द्या असें म्हणावें, निकड करावी. तुमचे विचारें होईल तसा फडशा चिरंजीवास लिहून करावा. बहुत काय लिहिणें? राजश्री तात्यास पत्र पावतें करणें. लोभ असों दीजे हें आशीर्वाद. कागद ज्याचे त्यांस द्यावे. राजश्री मामा, गोविंद शिवराम चितोपंतास द्यावें. राजश्री आबाजीपंत सोवनी यास नमस्कार.

¶*Naro Gangadhar writes to his son Baji who was at Nasik with Raghunathrao from the Peshwa's camp at Gajendragad: "Gopalrao Patwardhan was posted at Savanur while the Peshwa with the main army advanced upon Sidnur. News was then received that Haidar had, all of a sudden, descended on Bankapur and planned an attack on the isolated force of Gopalrao. To counter Haidar's action the Peshwa fell back and while encamped at Gajendragad learnt that the enemy had withdrawn. Savanur was thus automatically relieved."*

6330

No. 39] [12-7-1764

श्री

राजश्रिया विराजित राजन्य राजश्री
बाजीपंत अणा स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बल्लाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ १२ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत मुदगल सरकारांत गेले होते. त्यास हैदर नाईक बंकापुरास आला म्हणून बातमी आली; त्याजवरून माघारे फिरले. आतां हैदर नाईक हणगलावर गेला म्हणून वर्तमान आहे. श्रीमंत गजेंद्रगडाजवल आले आहेत. आठ पंधरा दिवस इकडेच कर्मणूक करणार; मग पुढें जातील. पुढें होईल तें लिहून पाठऊं. श्रीमंत राजश्री नाना पुण्याहून तिकडे कधीं गेले, काय वर्तमान, तें लिहून पाठवावें. चिरंजीव राजश्री गोविंदपंत पिंपलनेराहून तेथें आले आहेत, त्यांस लाखोटा पाठविला आहे तो प्रविष्ट करावा; तेथं नसिले तर पिंपलनेरास पाठवावा. कामाचा कागद आहे. कलावें. कृपा केली पाहिजे हे विनती.

¶*With the Peshwa's move towards Gajendragad, Haidar is reported to have retired upon Hangal, writes Hari Ballal to Bajipant Anna at Nasik.*

No. 40] [13-7-1764

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत अणा
स्वामीचे शेवेसीं

पोष्य बापूजी राम सोमण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १३ मोहरम मुकाम मौजे मुधोळ तालुके गजेंद्रगड जाणोन स्वकीये कुशल लिहीत असावें विशेष. आपणांस येक दोन पत्रें पाठविलीं तीं पावलींच असतील; परंतु येकाहि पत्राचें (उत्तर) पाठऊन साभाळ न केला. तेणेंकरून चित्त उद्विग्न आहे, तरी ऐसें न करावें. सदैव पत्रप्रेषणेंकरून सेवकाचा सांभाळ करीत असावें. यानंतर इकडील वर्तमान तरी हैदर नाईक झाडींत गेल्यावर खासा स्वारी माघारी फिरोन, सरकार मुदगल व गदवाल प्रांतें जावयाचा मनसबा करून, मजल दरमजल गदवालानजीक येऊन पोहचले, तों हैदर नाईक झाडींतून बाहेर निघोन बंकापुरास आला, हें वर्तमान राजश्री

गोपालराव गोविंद याणी सावनुराहून लिहून पाठविलें; त्यावरून श्रीमंत सावनूरच्या रोखें मागती फिरले. येक दोन मजला सावनूर राहिले. हें वृत्त नफर मजकुरास कळलें; त्यावरून फिरोन बंकापूर सोडून झाडीच्या रोखें हनगलाजवल गेला. तदनंतर सावनूरचा रोख सोडून मुकाम मजकुरीचे रानांत व धारवाडचे तालुक्यांत महिना पंधरा दिवस फिरस्ते असावे, याप्रमाणें डौल आहे. मौजे मुधल तालुके मजकुरास छ ११ मोहरमी मोर्चे लाविले आहेत. आज हला होणार आहे; ठाणें घेऊन दौलतराव घोरपडे यास द्यावें. सावनूर * * वालीस राजश्री गोपालराव गोविंद आहेत. नफर मजकुराची फौज बंकापुरींहून येक दोन रोज सावनूरचे नजीक येई तेव्हां मशारनिलेचें पथक तयार होऊन, शहर सोडून कोस दीड कोस जाऊन नजरानजर मात्र होई. येक दिवसी गांठ पडली, त्यास नफरास नतीजा पोहचऊन माघारे फिरविले व स्वारीहि आली; तदनंतर झाडींत गेला. कलावें. सर्व आपणांस क्षणाक्षणाचें वर्तमान कलतच आहे; परंतु सूचना मात्र सेवकानें लिहिली असे. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ निरंतर असों दीजे. स्नेहांत अंतराय न कीजे; पत्रीं दर्शनातुल्य लाभ देत असावें हे विनंती. आपण ज्या क्षेत्रीं आहांत, तेथं आमचे श्रीस नमस्कार सांगावे.

¶*Bapuji Ram Soman reports the tactics of Haidar against the numerically superior Maratha forces. With the approach of the Peshwa he retired into the woods from which it was difficult to dislodge him and when the Peshwa moved away towards Gadval he suddenly appeared before Bankapur and threatened to march upon Savanur. The Peshwa on getting the news fell back upon Savanur when Haidar too disappeared in the forests. In a skirmish he had with Gopalrao he suffered heavily. Mudhol is being invested adds the writer.*

No. 41] [*20-8-1764?*

पौ छ २७ रबिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

पोष्य भिकाजी नाईक रास्ते कृा सा विा. येथील वर्तमान ता श्रावण वद्य ८ पावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीकडून बहुत दिवस पत्र येऊन परामृष होत नाही; तरी सदैव कृपा करून, सांभाल करीत जावा.

श्रीमंत रा राव छावणीस करनाटक प्रांती राहिले आहेत. हैदर ना यांचे मसलतीस गुंतले आहेत. आपण वडील आहेत; तरी सर्व प्रकारे कुमक करून, शत्रू पराभवातें पावे तो अर्थ करावा. स्वामी, तो तरतूद करीतच असतील; परंतु सूचनार्थ लिा असे. स्वामी पुण्यसील, स्वामीचे आसीर्वादे येश येईल. बहुत काये लिा कृपा लोभ असो द्यावा हे विज्ञापना.

¶*Bhikaji Naik Rastia writes to Raghunathrao to render assistance to the Peshwa to enable him to humble down Haidar.*

No. 42] [*25-8-1764*

पौ छ १३ रावल खमस

श्री

राजश्री जानोजी धुळप गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमन्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा खमस सितैन मया व अलफ. कोंकणपटीत सोंधे बिदनूर याप्रो हैदरनाईकानी ठाणीठुणी घातली आहेत, ती काबिजात करून तो प्रांत सरकारच्या आमलात आणावा, हे मसलत तुम्हास सांगितली आहे; तरी तुम्ही व फिरंगी व सावंत येकत्र होऊन जलमार्गे व खुशकीने जिकडून सावेल तिकडून प्रांत सर करणें. येकसान आम्हां जाणून मसलतीची आज्ञा केली आहे. सरकार कामकाज जाहाल्यावरी तुमचे मनोदयानरूप ऊर्जित केले जाईल. कितेक साहित्याविसीं राजश्री विसाजी केशव यास पेशजी आज्ञा केली आहे. व हालींहि पत्र लिहिलें आहे. साहित्य करितील व तालुकियाकडील लोक दोन हजार देविले आहेत त्याप्रो येतील. मसलतीस खर्चवेच लागेल, तो सरकारांतून राजश्री पांडुरंग मुरार पाठविले आहेत, यांचे विद्यमाने करीत जाणे. वरकड आज्ञा करणे ते रा चिंतो नारायेण यास केली आहे. हे व पांडुरंग मुरार सांगता कळेल. फिरंगी यास वगैरे यास सरकारची पत्रे तुम्हाकडे पाठविली आहेत. त्यास फिरंग्याकडील वगैरे राजकारणे चालून मायेममतेत वेऊन सरकार कामावर उपयोगी पडे ते करणे. जाणिजे छ २६ सफर बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa commands Janoji Dhulap to attack Haidar from the sea and reoccupy the states of Sondha and Bednore, with the help of the Portuguese and the Sawant.*

No. 43] [Rd. 27-8-1764

पौ छ २८ सफर खमस
श्रावण

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ सफर मु॥ नजीक धारवाड जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिले वर्तमान सविस्तर कळले. यैसेच निरंतर पत्र पाठऊन कुशल वृत लिहीत जावे. श्रीमंताची भेट जाली; दुसरे दिवसी आज्ञा केली कीं, तुम्ही व राजश्री चिंतो विठल मिळोन माहालचा कारभार करून, रसदाचा ऐवज जमा करणें; जे तुम्हीं कराल ते प्रमाण, असे सागोन श्रीत्रिंबकेश्वरास गेले. येथे माहालकरी यासी बोली लाविली. लक्ष्मण कोनेर दीड लक्ष व बाळोबा पावणे दोन लक्ष, व नारो बाबाजी पारनेर तीस हजार, याप्रो करार जाला. आपले लक्ष धरून त्यांचे कमावीसदाराच्या पाठी थापटून सरकारकाम करितो. तेथे तोफखाना वगैरे तयार होते, येविसीचा खर्चाचा प्रकार (लि)हिला तो सर्वहि कळला. त्यास आमची इछा हीच होती कीं, सर्व कारभार आपले हाते घ्यावा. येणेकरून सरकारकिफायत आहे, तीच गोष्ट श्रीमंतानी केली. उतम जाहाले. लक्ष्मण कोनेर दीड लक्ष रु॥ करार केले; त्यास कमी बेरीज जाली असे दिसते. त्यांचे च्यार रुपये फाजील सरकारात आहे खरे; परंतु इकडे अडचणीचे दिवस, खर्च भारी, याजकरितां कांही अधिक बोलावे, वरकडहि माहाल विल्हे लागतील; त्यास च्यार रु॥ साधतील ते साधावे. केवळ आजमासावरी नजर दिल्ही तरी ठीक कसे पडेल? यास्तव गुदस्ताचे आजमासे आल्यास करावे. विसाजी केशव तेथें आले आहेत, यैशास पुरंधरचे कुमकेचे साहित्य होत नाहीं. त्याचे मनातील खुलासा कसा तो येकांती काढावा. तेथे तरी श्रीमंतानी शफतपुरसकर कबूल करून श्रीमंतासहि पत्र लिहिले आहे. गुता नाही यैसे आसोन, सुस्ती काये म्हणोन करितो हे आपण येकाती ठिकाण लावावे. ईश्वरी सतेने जे घडणे ते घडेलच; परंतु यानी यैसे न करावे. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bapu, in reply to a letter from Nana asks him to exact more money from Mahals under Raghoba's favourites*

6334

No. 44] [26-9-1764

पो छ ६ राखर सन खमस.सितैन

हा यमाजी प्याद

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम भगवंत सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २९ रबिलवल मुा धारवाड जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्ही छ ९ रबिलवलचे पत्र नासिकाहून पाठविले तें छ २४ मिनहूस पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कललें. ऐवजाचा झाडा श्रीमंताकडे पाठविला तो आम्ही अक्षरशा वाचून पाहिला. तुम्ही तेथे असता ऐवज मालवजाची (?) काळजी करावी असे नाही. जी कस्त[1] होईल ती कराल यांत संशय नाहीं. कितेक ऐवज करार होणे तो श्रीमंत त्या प्रांती आहेत तोपर्यंत करून टाकावें. नवल विशेष वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावे. प्रस्तुत धारवाडास मोर्चे लागले आहेत. श्रीकृपेने लवकरच कार्यसिधी होईल. कलावे * सर्व कारभार येंदाचा उतमच जाला. कोठे कोठे काही कसर वोढीमुळे मात्र वाटते. जेथवरी होईल तेथवरी करावे. पुरंधरचे द्रव्याविसी श्रीमंताची मर्जीहि थोडीसी नरम जाली आहे, म्हणोन यैकतो. यैशास सर्व त्यांचे पदरचेच आहेत. गुंता काये आहे? तूर्त धारवाडास मोर्चे आहेत. आठा पंधरा दिवसी निकाल होईल. तदोतर दुसरा मनसबा होणे तो होईल. तिकडील वर्तमान लिहित जावे. बहुत काये लिा लोभ असो दीजे हे विनंती,

¶*Sakharam Bhagwant writes to Nana Fadnis that Dharwar had been invested and regrets to learn that Raghunathrao had been put out on account of Purandar.*

No. 45] [15-10-1764

पो छ १ जावल कार्तिक मास

हावली मा सांडणीस्वार

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो माधवराव बलाल प्रधान ना वि उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिा जाणें विशेष. तुम्ही दारूगोल्याच्या दोन रवानग्या मिरजेस केल्या;

१ शिकस्त.

त्यास दारूगोला लस्करात येऊन खर्च जाला. इकडे दारू चांगली मिलत नाहीं याजकरितां पुण्यात जी दारू तयार असेल, ती पत्र पावतांच भाडेयाचे बैल करून धारवाडास पाठविणे; व बाण पुण्यात तोफखान्यात तयार असतील ते झाडून पाठवणें. इकडे दारू गोला मिलत नाहीं. लडाईचे दिवस, याजकरितां जसजसी जमा होत जाईल, तसी रवानगी करीत जाणे. रा छ १९ रबिलाखर सुा खमस सितैन मया व अलफ * बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Madhaorao Ballal asks Nana Fadnis to send a fresh supply of gunpowdar and ammunition to Dharwar.*

No. 46] *[15-10-1764?*

श्रीभवानीप्रा

सेवसी त्रिंबकराव तुकदेव कृतानेक विज्ञापना तागाईत छ १९ रबिलाखर इंदुवासर मुकाम किल्ले कोपल स्वामींचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. विज्ञापना. राजश्री गोपालराव याच्या भेटी जाहाल्यानंतर सविस्तर वर्तमान लेहून जामुदासमागमें सेवेसी विनंती लिहिलीच आहे. हरपनहल्ली येथील खंडणी करून ताम्र हल्ली नर्जाक तुंगभद्रातीरीं मुकाम होता. त्यास समागमें राजश्री हरिपंत व राजश्री विसाजीपंत आहेत. त्यांचे विचारें कोपलचे रखवालीस बाहादरबिंडीयास शिबंदी विशेष बालगावी लागली, त्यास कोपल किल्लाहि थोर आणि खाली पेठ मातबर आहे. त्याजप्रमाणें आंत भरती विशेष नाहीं. आडीचशें तीनशेंपर्यंत लोक आहेत. याजकारितां फौजेनिशी तेथें जाऊन गावास मोर्चे लाऊन पेठ घ्यावी. इतक्यांत किल्ला देखील हस्तगत जाहाला म्हणजे उत्तमच जाहालें; नाहीं तरी पेठ घेऊन जाजती शिबंदी बाहादरबिंडियांत आहे ती येथें आणून ठेवावी; म्हणजे कोपलकरांचा दरवाजाच धरिलासा होतो. हा मनसबा राजश्री गोपालराव यांच्या सर्वांच्या मतें होऊन, परवा मंदवारीं कूच करून, कोपलास येऊन, गावास मोर्चे दिल्हे. स्वामीचे पुण्यप्रतापेंकरून कार्य येथील स्वल्पच दिवसांत होऊन येईल. होनगुंदे येथील कार्याकरितां राजश्री मल्हारराव यास आज्ञा केली होती. परंतु फौजेचा मजकूर जिकडे रोख पडला. तिकडे गेली याजमुळें तें कार्य राहिलें. प्रस्तुत कोपलास फौज आली आहे. येथून होनगुंदे पांच गांवें आहे हणमसागर साडेतीन गांवें; तेथून होनगुंदे दीडगाव; येक दोन मजला लष्कर पुढें गेलें म्हणजे या दबावांत कार्य होऊन, सहजांत येतें. तेंहि स्वामीकार्यच आहे; परंतु येविशी राजश्री गोपाळराव व राजश्री अंताजीपंत रास्ते व येशवंतराव या त्रिवर्गास स्वामीची

6336

आज्ञा पाहिजे. याजकारितां सेवेसी विनंती लिहिली आहे. कोपल येथील कार्य जाहाल्यानंतर पुढें दोन मजला येऊन होनगुंदे येथील ठाणें हस्तगत करून राजश्री त्रिंबकराव याचे स्वाधीन करणें, म्हणून त्रिवर्गास तीन आज्ञापत्रें आलीं म्हणजे सहजांत कार्य होऊन येतें. आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. पत्रें त्वरीत येऊन कार्यें होये तें करणार स्वामी खावंद आहत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Tukdeo discusses the plans of leading an attack on Koppal and Hungund as arranged by Gopalrao Patwardhan.*

No. 47] [*29-10-1764*

पॉा छ ११ जोवल
सन खमस कार्तिक

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व नारो गंगाधर व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ३ जमादिलवल मुाा धारवाड स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले तें पावोन, आनंद जाहाला. सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. इकडील वर्तमान तर धारवाडीस मोर्चा लागल्यास दीड मास जाला. अर्धें काम जालें. पुढें काम चालत आहे. मीरफैजुलाचा भाऊ आंत आहे. फैजुला दोन हजार स्वार व चार हजार बार घेऊन, बारा पंधरा कोसावर आला आहे. मधीं आपली फौज राजश्री गोपालराऊ व रास्ते आहेत. त्याच्याने पुढें येवत नाहीं. इकडे मोर्च्याचे काम निकडीने चालिलेच आहे. या उपरी घडेल ते लिहून पाठऊ. हैदर नाइक जडे अनवटीवर आहे. मोगलाकडे त्याचे राजकारण लागले आहे. याजकरिता दम धरिला आहे. धारवाड हस्त(गत) जालियावर होईल मनसुबा तो लिहून पाठऊ. ताजाकलम छ ४ जमादिलवल धारवाड बोलूं लागलें. येक दोन रोजात निकाल पडेल असे दिसते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. आपाजीबरोबर पत्रें पाा तीं पावली. जाब मागाहून लिहून पाठवितो. हे विज्ञापना.

सेवेसी धोंडाजी नाइक नवाले कृतानेक साष्टांग नाा विाा कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The siege of Dharwar by the Peshwa's army and its iminent fall are reported in this letter by Mahadaji Ballal and Hari Ballal.*

[No. 48]
पौ छ १३ जावल
खमस कार्तिक

३१ आक्टोबर १७६४

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल ता छ ५ जमादिलवल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. छ १५ रबिलाखरचे पत्र पा तें पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळलें. श्रीमंताचा निरोप घेऊन पुण्यास आलां उतम गोष्ट जाली. मामलीतीचा व ऐवजाचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. इकडील वर्तमान तर धारवाडास मोर्चे लागल्याला दीड महिना जाला. जेर जाले आहे. लवकरच हस्तगत होईल. तिकडील नवल विशेष वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावे. मुख्य गोष्ट छावणीमुळे सोये मनसब्यास पडली; परंतु आकल्पित काही विघ्न न यावे. मोगलातहि शक्त नाही; परंतु ईश्वरी सतेने घडेल ते खरं. वरकड बरेच आहे. बहुत काय लिहिणे, लोभ आसो दीजे हे विनंति.

¶*Sakharam Bapu writes to Nana Fadnis of the siege of Dharwar and hopes that the place will soon surrender.*

[No. 49]
छ १६ जमादिलावल.

[1-11-1764?]

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक भास्करराऊ दादाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम मार्गसीर शुद्ध ९ स्थिरवारपर्यंत स्वामीचे दयं येथास्थित असें विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें पाऊन संतोष जाहला. राजश्री बळवंतरायांसी कलह न करितां जमाव पाठवून देणें म्हणून आज्ञा केली; अशास राजश्रींनीं आषाढ मासीं नवलगुंदकर, व गदगकर, व राजश्री विठल विश्राम, व शिंदें मनोलीकर, व राजश्री मालोजी घोरपडे मुधोलकर, यांस सामील करून घेऊन, सात आठ हजार हशम व दोन अडीच हजार स्वार जमा करोन, विलायेत खराब करून, नरगुंदावरी चालोन

आले; हलाच केली. स्वामीचे पुण्यप्रतापें मारून काढिले. तदनंतर दीड कोंसाचे फरकानें उतरले. दाहाबारा झुंजे जाहाली. या गरगशामुळें नवलगुंद परगणा आम्हा निसबताचा मुलुख अगदीं पडला. शेवटीं कार्तिक अखेरीस राजश्री हरिपंत निसबत राजश्री तात्या नरगुंदास येऊन आम्हांस व त्यास धारवाडास घेऊन गेले. तेथेंहि मातुश्री आनुबाईची गोष्टी न आइकतां राजश्री बळवंतराऊ उठोन आले. गरगशा न उरकतां परिणाम नाहींसे पाहून, राजश्री हरिपंत पुन्हा नरगुंदास येऊन, बाहेरील शाह मात्र उठविला. शिबंदीखालीं कांहीं ताकद राहिली नाहीं स्वामींनीं कृपा करून उर्जित करावें. आम्हांकडील जमाव बागडकोटेस राजश्री कृष्णाजीपंताकडे स्वामीचे आज्ञेप्रमाणें पाठविला आहे. उरला जमाव कोपलाकडे रवाना केला. राजश्री तात्यासमागमें स्वामीचे सेवेसी येतों. इकडे काटकांनीं व इत्यादिकांनीं मर्यादा राखिली नाहीं. हे वृत्त वरचेवरी श्रुत होतच असेल स्वामीचे पदरचे सेवक म्हणून सर्वांस असाध्य स्थल मात्र रक्षून आहों. इकडे फौज आल्याखेरीज हालखुद राहत नाहींत. सेवेसी श्रुत होये, बहुत काय लिहू कृपा असावी हे विज्ञापना.

¶*[Bhaskarrao Dadaji reports to Raghunathrao the disturbed conditions round about Nargund owing to the warfare conducted by the King of Kolhapur in league with the Chiefs of Nawalgund and Manoli and by Vithal Vishram.*

No. 50] *[1-11-1764*

पो छ १६ जोवल
खमस कार्तिक

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ६ जमादिलवल मुाा धारवाड येथे असों विशेष. हरि परशराम सोमण यांस धारवाडचे मोर्च्यांत बुधवारी सप्तमीस रात्रीस गोळी लागली. मस्तकीं गोळी लागली. येक प्रहर प्राण होता. तदोत्तर देह विसर्जन केले. मर्द माणूस, चाकरीची हाऊस मोठी. बुधवारी रात्रीस सुरंगाने बुरूज धारवाडाचा उडविला. सारी मंडळी मोर्च्यांत येके ठाई बसलो होतो; परंतु ईश्वरें ज्यास बोलाविले त्याणेंच जावें. वो राजश्री रघुनाथ भट सोमण पुण्यांत आहेत, त्याचे समाधानाविसी श्रीमंतानी आपणांस लिा आहे. आपण जाऊन त्यांचे बहुत प्रकारें समाधान करावें. मृत्युलोकाची वस्ती अशाश्वत हे खरें; परंतु ज्यास दुख प्राप्त होते ते निवारण होत नाहीं. आपण त्यांस विवेकाच्या गोष्टी सांगोन खेद न करीत तें केले पाहिजे.

6339

श्रीमंतानी खर्चास देविले आहे, त्याप्रोा द्यावयाची आज्ञा करावी. गंगाधरपंत दिलीस राहिले. हरिपंतानी कर्नाटकांत वस्ती केली. भगवंतें ज्या काली जे नेमिले असतें त्यांत अंतर होत नाहीं. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal reports to Nana Fadnis the death by a shot of Hari Parsharam Soman in the siege of Dharwar, and requests the addressee to carry condolences to his family. One Gangadhar of the same family appears to have died at Delhi. These are instances of national sacrifice.*

No. 51] [*5-11-1764*

पाो छ २२ जमादिलौवल.

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब
वडिलाचे सेवेसी

अपत्यें माधवराव साा नाा विाा. येथील कुशल ताा छ १० जमादिलोवल प्रावेतो वडिलाचे आसीर्वादे येथास्थित असे विशेष. धारवाडीचे किल्यास मोर्चे दिल्हे होते त्यास किल्यात मीर फैजुलाचा भाऊ होता याजमुळे * * * ईकानी मीर फैजुलास सांगित * * * म ऊन आपले भावाची (कुमक) करणे. त्याजवरून मीर फैजुलानी दोन हजार फौज व गाडदी व प्यादे पांच सात हजार व पांच सात तोफा वेऊन, जडे अनवटीहून मुरगोडच्या ठाण्यास आला. रातबिरात येऊन छपा घालावा या विचारात होता. त्यास तो मुरगोडास येताच राा गोपाळराव व आनंदराव रास्ते व शाहाजी भोसलें व आणखी पथकें मिळोन झाडी अलीकडे चौ पांचा कोसावर ठेविले. मजबुदी चांगली केली. याजमुळे त्याची हिमत यावयाची न जाली. ठाणे जेर जाले. कुमक येऊन न पोहचें असे किलेकरानी पाहून, ठाणे द्यावयाची बोली लाऊन, कौल घेतला. आज कार्तिक शुध द्वादसी सोमवारी तिसरे प्रहरी सरकारचे निशाण किल्यावर चढोन ठाणे वडिलाचे आसीर्वादे फते जाले. सेवेसी कळावे यास्तव लिाा असे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhaorao writes to Raghunathrao Dada that Dharwar capitulated after a stiff resistance.*

No. 52] [6-11-1764

पो छ १८ जोवल·

खमस कार्तिक

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सा। नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ ११ जोवल मु। धारवाड येथास्थित असे विशेष. धारवांडचा किला कार्तिक शुध त्रयोदसीचे दिवसी फत्ते होऊन सरकारचे निशाण चढले. मीर फैजुला याचा भाऊ किल्यात होता तो कौल घेऊन बाहेर निघाला. लोक-सुधा बाहेर काढिले. आज गोपाळरायाचे गोटात आहेत, उदैक तिकडे जातील. येथे च्यार पाच मुकाम होऊन किल्याचा बंदोबस्त होऊन तुंगभद्रातीरास जावे असा मनसबा आहे. श्रीमंताचे पत्री सविस्तर मजकूर लिहिला आहे, त्यावरून विदित होईल. वरकड अधिकोत्तर लिहिजेसारिखे नाही. अधिक म्हणावयास हरि परशराम यास गोळी मस्तकी लागून दिवंगत जाले. पाच सा दिवस दिवस जाले; व येक सेख झरझरी मेले. वरकड मातबरांत कोणी जाया जालें नाही. जखमी थोडे बहुत आहेत. आपणास कळावे म्हणून लिहिले असे. साळउंबरे येथील कुरणाच लोकाचा उपद्रव फार होता, येविसी त्यास ताकीद करावी. बहुत काये लिहू; कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. सेवेसी धोंडोबा नाईक नवाले याचे सा। नमस्कार. लोभ कीजे हे विज्ञापना.

¶*The capture of Dharwar is reported by the writers Hari Ballal Phadke and Mahadji Ballal Guruji.*

No. 53] [6-11-1764

पौ छ २२ जमादिलोवल

खमस सितैन कार्तिक मास

श्री

राजश्री जानोजी धुलप

गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सु।। खमस सितैन मया व अलफ. धारवाडचे किल्यास मोर्चे देऊन तोफा व जेजाला व बाणाची मारगिरी करून, खंदक घेऊन, किल्यास सुरंग लाऊन, तीन च्यार बुरूज उडविले. किला जेर जाला. याउपरी हला करून कापून काढितात असे किलेकरी यास पुर्ते समजोन, किला द्यावयाचा मजकूर

6341

घालून, कौलाविसी बाजीद जाले. त्याजवरून कौल देऊन त्यास बाहेर काढून छ १० जमादिलोवली सरकारचे निशाण चढऊन किला फते केला. तुम्हास कलावे याजकरितां लिहिले असे. तुम्ही अरमारची व खुशकीची तयारी करून स्वारीस निघालेच असाल. प्रस्तुत कोठे आहा; सोंधे बिदरूरचे तालुकियात कधी येणार ते सविस्तर लिहिणे. जाणिजे छ ११ जमादिलोवल बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa intimates Dhulap the capture of the Dharwar fortress and enquires how he was proceeding with the task assigned to him.*

No. 54] [*8-11-1764*

पो छ २७ जांोवल

सन खमस कार्तिक

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बालाजी जनार्दन स्वामी गोसांवी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्हीं छ ४ जमादिलावलची पत्रे पाठविली ती छ १० मिा पावोन लिा वर्तमान सविस्तर कललें. दारूगोले सिसें बाण याची रवानगी पुण्याहून मिरजेस केली, त्याचें तेरीज पाठविलें तें पावले; त्यावरून कललें. त्यास याउपरीं गोले व सिसे याची रवानगी न करणें. दारूची तर्तूद पेशजी लिहिल्याप्रमाणें करून, पंचवीस तीस खंडीपर्यंत आणखी दारू मिरजेस पाठऊन देणे. तेथून लस्करात आणिली जाईल. व बाण तयार होतील ते पाठवीत जाणें. गोले व सिसें याची तर्तूद येथें आहे, दारू व बाण मिलत नाही; याजकरिता लिहिले प्रों रवाना करणें. रा छ १३ जौवल सुा खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Madhavrao Ballal writes to Nana Fadnis to send a fresh supply of rockets and powder. Cannon balls and lead—adds the writer—are not required.*

√ *No. 55*] [*2-12-1764*

पो छ १९ जााखर सन खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

पो बालाजी शंकर कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ८ जाखर मुाा नजीक जडीहाणवटी लस्करात क्षेम असो विशेष. स्वामीचा निरोप घेऊन आलो ते लस्करास सुखरूप पावलो. इकडील वर्तमान तर हैदरनाईक

जडीहणवटीवर आहे. त्यास व आपणास दोन तीन कोशाचे अंतर आहे. वाला नदीपलीकडे दीडा कोशावर झाडीत आहे. त्यास दोन तीन रोज श्रीमंताची व त्याची गोलागोली जाहाली. काली मंदवारी मार्गसीर्ष सुध ८ प्रात:काली श्रीमंताची स्वारी खासा वगैरे सर्व सरदार गेले होते. त्यास आपल्या तोफा त्याचे लस्करावरी लाविल्या होत्या. त्याणे पाच साहा हाजार गाडदीयानसी व पाचसात तोफा वेऊन आपले तोफावरी चालून घेतले. तेव्हा मुरारजी घोरपडे याजवरी मार जाहाला; तेव्हा खासी हुजरात जरीपटका व श्रीमंत याणी उठावणी केली. त्याजकडून हाजार दीड हजार गाडदी वगैरे ठार जाहाले. पाडाव तोफा सुमार ६ व घोडी सेदीडसे आली. मोठी फते जाहाली. उदईक ठरतो की जातो पहावे. इतक्या दिवसात कालची जरब त्यास भारी बसली. याउपरी फतेच आहे. वरकड वर्तमान मागाहून सविस्तर येईल. स्वामीस कलावे. बहुत काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती. जासूद जलद आलियास इनाम देवावे हे विनंती.

¶*The action of Jadi Hanwati in which Haidar sustained a severe defeat is reported to Nana Fadnis by Balaji Shankar.*

No. 56] *[1765?*

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री दादासाहेब
स्वामी गोसावी यांस

पोष्य नारायेण व्यंकटराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन परामर्ष होत नाहीं; तेणेकरून चित सापेक्षित आहे: तरी यैसें नसावें. सदैव पत्रद्वारें साभाल करीत असावें. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी, फौजेसुधां सोधे प्रांतें जाऊन, मसलत उलगडून, परगणें हणमसागर प्रांते येऊन मुकाम जाहला आहे. येथील व अनगुंदी व कनकगिरी संस्थानाकडे सरकारची बाकीचा यैवज येणें आहे. त्याचा निशा करून घेऊन, पुढें आदवानी प्रांतें जात असो. हें स्वामीस विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे. वरकड कितेक वर्तमान श्रीमंताचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून कलेल. बहुत काय लिहिणें लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

¶*Narayan Vyankatesh Ghorpade of Ichalkaranji writes to Raghunathrao, informing him that the writer is proceeding to Adoni after finishing the affairs of Kanakgiri and Anagundi.*

No. 57] [*2-2-1765*

पौ छ २२ साबान
सन खमस

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ साबान मुाा नजीक हरपनहली स्वामींचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान उभयता श्रीमंताच्या भेटी जाल्या. पूर्वी सेवेसी लिहिलेंच आहे. हरपनहली चित्रदुर्गचे वकील आले आहेत. लवकरच फडशा होईल. तदोतर जो विचार होणे तो होईल. नवाब निजामअलीखांन कर्नोलास आहेत. बसालतजंगाचे कटाक्ष लागले आहे. संल्य होणार असी बातनी आहे. मोगल इकडे येत नाहीं. सयाजी गायेकवाड दोन च्यार रोजात येऊन मिळतील. फौज पंचेंतालीस हजार जमा जाली. तोफखानाहि मातबर जमा जाला. याउपरी मातबर मनसुबा होईल. हैदर नाईक बिदरूरचे झाडीत आहे, कळलें पाहिजे. पुढे नवल विशेष आढलेल तें लिहून पाठऊ. श्रीकासींत फिरंगियाचा अमल जाला. दक्षणी लोकास फारच उपद्रव जाला आहे. गाड्याच्या चौक्या कनास (कर्णास) चापा (चांप) या प्रों शोभा जाली आहे, तिकडे वर्तमान आलेंच असेल. हरपनहलीची खंडणी सवातीन लक्ष रुा जाली. कळले पाहिजे. हैदर बाटकेपणे वोढ धरीत आहे, परंतु जसी काबू पडेल तसें करील. तांब्राकडील अनुसंधान चुकल्यास पैका देऊन सद्रूक करीलसे दिसते. राजश्री सखारामपंत द्वितीयेस लग्नास लक्ष्मेश्वरास गेले आहेत. अद्यापि आले नाहींत; परंतु लौकरीच येतील, विदित व्हावें हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write about the meeting of Madhavrao and Raghunathrao, the mobilisation of the army of Nizamali and about Benares being occupied by the English.*

No. 58] [*9-2-1765*

श्री

राजश्री जानोजी धुलप
गोसावी यासीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत रामान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुाा खमस सितैन मया व अलफ. इंग्रजाचे आरमार येऊन मालवणास लागलें

म्हणून वर्तमान कळलें. त्यास हे वर्तमान तुम्हास कळलेच असेल. तुम्हीं खबरदार असालच. सारांश तुम्हीं फार सावध राहाणें. काबू साधेल तितकीच करणें. हुशारीने वाऱ्यावर राहाणें. इंग्रेजाची बातमी राखून वर्तमान वरचेवरी लिहिणें. जाणीजे छ १८ साबान. बहुत काय लिहिणें.

¶Madhavrao Ballal instructs Janoji Dhulap to remain watchful as an English fleet is reported to have arrived against Malwan.

No. 59] [*28-2-1765*

पो छ २७ रमजान सन खमस
फाल्गुन ह्या धोंडजी संभाजी
जासूद जथें सखाजी सितोला.

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक सां नमा विा ताा छ ७ रमजानपावेतो मुा नजीक कुमसी प्रां बिदरूर वर्तमान यथास्तित असे विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाही तर सविस्तर ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत हैदर नाइकाचा तह तीस लक्ष रुपयावर होत होता, परंतु हैदर नाने आइकिले नाही. तेव्हां बिदरुरास जावे, ठाणे घ्यावे, हैदर नाईकाचे पारपत्य करावे, यैसी पकी मसलत करून झाडींत सिरले. हरनहळीचे ठाणे गोळी न वाजविता घेतले. कुमसीचे ठाणे तीन दिवस जुजले. छ मज़कुरी सरकारचे निशान घेतात. सल्यास आले. या उपर अनंतपूर येथून साहा कोस आहे, तेथें मीर फैजुल्लाखान च्यार हजार फौज, च्यार हजार गाडदी, यैसे होता तो काळच निघोन पलीकडे दाहा कोसावर किला आहे तेथे गेला. हैदर नाईक खासा बिदरुरास आहे. उदईक कूच होऊन अनंतपुरास जाणार. ते ठाणे घेतल्यावर बिदरुरास जाऊन तेथील ठाणे घालणार. तेव्हां हैदर नाा अनंतपुरास खासा स्वारी गेल्यावर तेथे राहात नाही. येकादा किला बळकाऊन बसणार. श्रीमंताची फतेच दिसते. सारांश तो चोर लाहान माणूस, पुरती जरब बसल्याविना सला करीत नाही. वरकड लस्करचे वर्तमान तर खर्चाची तंगचाई[1] मोठी. कोठे कर्ज देखील मिळत नाही. दरमहा पाच लक्ष रुपये खर्चास लागतात. पैसा कोठून येत नाही. हरपनहळी चित्रदुर्गचे खंडणीचा यैवज आला तो खर्च होऊन गेला.

---

१ तंगी, टंचाई, दुर्भिक्ष्य.

बिदरूर प्रांतीची हवा फारच वाईट. फौजेस विसा पंचविसा दिवसी रोजमरा देतात. लोकात काही हाल राहिले नाही. याउपर होईल वर्तमान ते मागाहून लेहून पाठवीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Baji Govind says : Peace negotiations with Haidar broke down and the Peshwa marched on Harnhalli. It surrendered without resistance. The Peshwa then besieged Kumsi which despite resistance was reduced in a couple of days. Faizulla Khan fell back from Anantpoor when he heard of the Peshwa's intention to attack it. Haidar is reported to be encamped at Bednore.*

No. 60] *[12-3-1765*

पौ छ २८ रमजान
सन खमस.

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ १९ रमजान मुाा अनंतपूर स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे विशेष. बारीची ठाणी कुमसी, हरणहली, येनूर वगैरे घेऊन ठाणी बसविली. येथे दारूगोळा बाण वगैरे सरंजाम सापडिला. तेथून बारीआंत येऊन अनंतपुरास मोर्चे लाविले. रामचंद्र कणबी सा कोस आहे तेथे मजबुदी फार आहे. अनंतपुरास मोर्चे लावून चार दिवस जाले. त्याचा वकील समागमे होताच. तहाच्या गोस्टी बोलू लागले. अनंतपूर घेतल्यावर पुढें निदान सेवटच मांडले. येश अपेश भगवंताधीन यास्तव दोहीकडून सलूख करणे जरूर प्राप्त जाणून निश्चयांत आले. यैन अठावीस, नजर पांच, खर्च दोन याप्रो पस्तीस जाहाले. बंकापूर बसवापटण द्यावे, राजश्री मुरारराव याची ठाणी सोडावी, नवाबाची पहिलीच सुटली. येथून काली राजश्री नारो शंकर व हरि गोपाल तिकडे गेले आहेत. करारमदार होऊन तेथून मीर फैजुला येईल आसे आहे. निमे यैवज रोख येईल, निमेची निशा महादसेटीची होईल. झाडीतून बाहेर जावे, ठाणी बसल्यास मग कोणिकडे जातील, या प्रमाणे ठरले आहे. गेले आहेत ते आलियावर ठरेल ते प्रमाण. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter reports the terms of the agreement proposed between the Peshwa and Haidar Ali.*

No. 61] [12-3-1765

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १९ रमजान मुा मौजे अनंतपूर प्रांत बिदरूर क्षेम असो विशेष. येथील वर्तमान तर हैदर नाइकाचा तह जाहाला. अठावीस लक्ष खंडणी जाहाली. सरकार तालुक्यापैकी बंकापूर, हरिहर, बसवापटण व गोपालराव याचे बंधु सोडून द्यावे. मुराररराव सावनूरकर पठाण यांचा मुल्क सोडावा, या प्रा तूर्त कालानरूप ठरले, पका तह करावयाकरिता राजश्री नारो शंकर, हरि गोपाल कालुच निघोन गेले आहेत. सविस्तर मागाहून लेहून पाठऊ. आम्हा उभयेतास बरे वाटत नाही. ज्वराची पीडा जाहाली आहे. काही उताराखाली आहो. स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून सीघ्रच आरोग्य होईल. इकडील हवा फार वाईट आहे. सला लवकरच होऊन स्वारी माघारी फिरेल. विदित जालें पाहिजे. पुढे होईल तें लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

राजश्री नारोपंत नाना देशमुख आपाजीपंत सर्व मंडलीस कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The terms of the treaty concluded with Haidar are communicated in this letter by Mahadaji Ballal and Hari Ballal.*

No. 62] [13-3-1765

पो छ १८ रमजान सनखमस
फालगुन मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी विष्णु व बाबूराव केशव कृतानेक सां नमा विा. येथील कुशल ता फालगुन वद्य शस्टी भोमवार मुा अनंतपूर नजीक बिदनूर येथे स्वामीचे कृपेकरून क्षेमरूप असों विशेष. स्वामीकडून प्रस्तुत आसीर्वादपत्र येऊन सांभाल होत नाहीं याकरितां चित्त सापेक्षित असे. तरी यैसे नसावें. येणारासमागमे पत्र पाठवावयासी लेखकास आज्ञा जाली पाहिजे. येथील वर्तमान तरी हर्फनली चित्रदुर्ग येथील निर्गम करून इकडे आले. हैदर नाईक याजकडील

ठाणी हरिहर, हरणअल्ला, कुमसा वरून अनंतपुरास मोर्चे लाविले, तों त्याजकडून वकील आले. खंडणीचा करार ठरला. यैन आठावीस याची नजर व दोन दरबारखर्च या प्रो जाला. वसुलास राजश्री नारो शंकर राजे व राजश्री हरि गोपाळ उभयेता काली गेले. निमे रोख निमे सावकारी निशा या प्रा यैकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Vishnu and Baburao Keshav report to Nana Fadnis that the Peshwa proceeded to Anantpur and invested the place, after capturing Chitradurg, Harpanhalli and other places. It also refers to the subsequent treaty.*

No. 63] [*30-3-1765*

पो छ २३ सवाल चैत्रमास
हा जासूद जथे भिकाजी ना
आ १ लक्ष्मण
१ [कोरी जागा]
—
२

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार वि॥ उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. बिदरूर प्रांतची ठाणी दोन · च्यार घेऊन फौजसुधा बिदरूरच्या झाडीत सिरोन अनंतपुरास मोर्चे दिल्हे. ते ठाणे घेऊन पुढे जाऊन बिदरूरच ध्यावे इतक्यावर मजकूर जाला. तेव्हा हैदर नाइकानी वकील पाठऊन मोठे बजीदीने तहाचा पैगाम केला. तीर्थरूपाचे विचारे, मसलत लांबऊ नये, त्याजवरून तह केला. अठावीस लक्ष रुा करार करून निमे रोख व निमेस मुदत केली व बंकापूर व सावनूरकराची ठाणी मुलुक व रा मुरारराव घोरपडे याचा मुलूक ठाणी दिल्ही. या प्रो होऊन माघारे फिरोन तुंगभद्रातीरास आलों. रा छ ८ सवाल सु॥ खमस सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa Madhaorao intimates to Nana Fadnis that he has concluded a treaty with Haidar, in pursuance of the advice of Raghunathrao Dada.*

6348

No. 64] [*26-4-1765*

पो छ १७ जिल्काद खमस वैशाख

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ जिलकादपावेतों मुकाम नजीक सोंडूर पालें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, वराडचें मजमुविशी श्रीमंतांस पत्र पाठविलें आहे, देऊन उत्तर घेऊन पाठवणें. त्यावरून पत्र दिल्हावर कारभारी यास बोलाऊन आणून रागें भरले. गैरवांका समजाऊन पत्र कोणी दिल्हें? कारभारी, पहिलें आपणांस ठावकें नाहीं, म्हणत होते, मग देण्याची याद चिटणिसाकडून आणविली. तों राजश्री चिंतोपंतांनींच मखलाशी लिहिली आहे, तेव्हां वेगळे वाटेनें रागें भरोन ताकीद करून लवकर ताकीदपत्रें देविलीं, तीं ताकीदपत्रें व पत्राचें उत्तर पाठविलें आहे. आपले आसामीची त्यास फारच गोष्ट लागली कीं आपण नानाकडे आसामी करार करून दिल्ही. नानाचें अगत्य आपणांस पुर्तें. माझी ममता नानाचे जागां फार हें यास ठावकें असोन गैरवांकां आमचें कानावर न घालितां मखलाशी करून दिल्ही. याप्रमाणें येकादोवाजवळ भाषण केलें. सदाशिवपंताचे पत्रावर आपलें स्वदस्तुरें दाहा ओळी लिहिल्या आहेत. आपले-विशी राजश्री हरिपंत भिडे फारच श्रीमंतांची खातरदास्त करीत असतात. कळावें. श्रीमंत मोरोबादादा श्रीमंतांचा निरोप घेऊन आजच कोल्हापुरास, तेथून पुळेयाचे गणपतीस, तिकडूनच पुणेयास येतील. इकडील कामकाजाचा गुंता फार करून उरकला. याजउपर दरमजल कूच करून दरमजल ज्येष्ठ शुद्धांत पुणेयास येतील. थोरले श्रीमंत आठ दाहा दिवस पुण्यास राहून मग चावडसेस जाणार असा विचार आहे. घडेल तें खरें. फौजेस सालमजकुरीं नालबंदीस पैसा नाहीं. हैदरनाइकाकडील पुढील हप्त्याचे चवदा, त्यापैकी पांच लक्ष रुपये तूर्त सावकारा-पासून व्याज कापून घ्यावें व कांहीं खाजगीकडून पांच लक्ष पावेतों कर्ज घ्यावें व सावकारांपासून पांचपावेतों कर्ज घेऊन पंधरा लक्षांवर फौजेची रवानगी करावी, याप्रमाणें मजकूर. पडल्या घोड्यांचा वगैरे अजमास पाहातां, दोन्ही स्वाऱ्यांचे फौजेस पंचवीस लक्ष रुपये असावे, त्यांत ऐवज सदर्हूप्रमाणें दिसतो. सेवेसी कळावें. घोरपडे यांजकडे बारा हजार रुपये नजरेचा ऐवज करार केला तो पुण्याचे खर्चास द्यावयाविशी श्रीमंत रावसाहेबांस विनंती केली आहे. तूर्त आम्ही श्रीमंत दादासाहेब श्रीकार्तिकस्वामीजवळ राहिले आहेत, यांजवळ आपण आहों, श्रीमंत रावसाहेब पुढें बल्हारीकडे गेले; दोहोचोहों दिवशीं गांठ पडल्यावर कागद पत्र घेऊन पाठवितों. राजश्री गोपाळराव व रास्ते विसाजी नारायण यांस

छावणीस राहा म्हणतात; अद्याप त्याचें बोलणें चालणें विल्हेस लागलें नाहीं. बंकापुरचा किल्ला गोपाळरायास दिल्ह्याखेरीज छावणीस राहात नाहीं. थोरल्या श्रीमतांचे विचारें तूर्त किल्ला सरकारांत ठेवावा ऐसें मानस आहे; ठरेल तें खरें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*The letter, written from the camp near Sondur Pale, reports that Moroba Fadnis would shortly go to Poona* via *Kolhapur, that the Peshwa had advanced upon Bellari and that Raghunathrao would reach Poona in about a month.*

No. 65] [*30-4-1765*

पो छ १७ जिलकाद
सन खमस ह्या
सांडणीस्वार.

श्री

सेवेसी माहादाजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ ९ जिलकादपावेतों मुकाम नजीक केचनगुड क्षेम असें विशेष. श्रीमंत उभयेतां श्रीविरूपाक्षदर्शन घेऊन त्रिरात्र क्षेत्रीं क्रमिली. उप्रांत कूच जाहलें तें स्वामीचें दर्शन जाहालें. प्रथम दिवशीं कनिष्ठ येजमानांनीं दर्शन घेतलें. थोरले श्रीमंत त्रिरात्रपावेतों क्षेत्रीं राहिले. कनिष्ठ फौजसमेत कूच करून बल्हारी, कनकगिरि, केचनगुडच्या कारभारास्तव दोनतीन मजल आले. त्यास बल्हारी पंनास ठरली. गुड व कनकगिरीचाहि गुंता आजउद्यां उरकेल. थोरलेहि श्रीमंत यात्रा करून उदयिक येतील, तदनंतर मनसबा होणें तो होईल. आदवानी, रायचूर भनुकौताल इकडे जावयाचा येक मनसबा आहे. दुसरा प्रकार, बंकापूर अद्याप हस्तगत जाहलें नाहीं. तपसीलच लागला आहे. खांसा स्वारी फारच लांबली. वीस गांवें येथून बंकापूर राहिलें. नारो शंकराचें पत्र कालच आलें कीं, सा रोजांचा वाइदा किल्लेदारानें केला आहे. त्यास सा रोजीं हस्तगत जाहलें तर उत्तम; नाहीं तर खासा स्वारी मावारी फिरावी लागेल म्हणोन पत्र आलें होतें. त्यास तेहि मार्गप्रतीक्षा करावी लागते. येकूण वैशाखी पौर्णिमा तुंगभद्रेपलीकडेच होईल. देशीं भोंसल्याचे गडबडेविशीच्याहि खबरा येतात. नालबंदीस ऐवज तों काहींच नाहीं असा प्रकार आहे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस स्वामीच्या क्षेत्राहून आज्ञा घेऊन कोल्हापुरास गेले. समागमें माहादाजी विष्णु गेले. तेथून श्रीगणपति पुळें येथील दर्शनास कोंकणांत

जाणार. विदित जाले पाहिजे हें विज्ञापना. गोपाळराव, मुरारराव, रास्ते सावनूरकर पठाण यास छावणीस ठेवणार. याच्याहि कारभारास आठ रोज लागतील. हें विज्ञापना.

¶*Mahadaji Narayan writes from the Peshwa's camp in Karnatak that the tribute from Bellari had been fixed at Rs. 50 thousand and that the fort of Bankapur had not yet capitulated.*

No. 66] *[28-5-1765*

नकल बा। असल.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नरसोबा नाईक तांबेकर गोसावीं
यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा खमस सितैन मया व अलफ. पेठ बुधवार का। पुणे येथील कमावीस तुम्हाकडे आहे. त्यांस तुम्हीं विनंती केली कीं, सालगुदस्तां पेठ मजकुरची घरें मोगलाचा दंगा होऊन लुटली व जलाली, त्यामुले इस्तावियाचा कौल दिल्यास वसाहत होऊन पेठेची आबादी होईल म्हणौन. त्यावरून पेठेची आबादीवर नजर देऊन इस्ताव करार झाले बितपसील:

सन आर्बा सितैन. मोगलाने पेठ सन सलासात जाललली, सा। सन मजकुरी माहाल मजकूर कार्याकारण पटी करून वसूल करावा, सरकारात काही देऊ नये. सा। माफ.

सन सीत सितैन पेस्तर साल

मख्ता रुपये
१२५०.

तपसील:

३०० तूर्त रसद
९५० हसेबंदी
२०० पौष

सन खमस सितैन. साल मजकुरी बा। पेसजी मख्ता रूपये १२५० पौ वजा पेठेस कौल देऊन वसाहत करविली सा। सूट २००.

बाकी मख्ता रूपये
१०५०.

तपसील:

३०० तूर्त रसद.
७५० हसेबंदी
१५० पौष शुध १

6351

१५०	माघ	१२५	माघ शुध १
१५०	फाल्गुन	१२५	फाल्गुन शुध १
१५०	चैत्र	१२५	चैत्र शुध १
१५०	वैशाख	१२५	वैशाख शुध १
१५०	जेष्ट	१००	जेष्ट शुा १
९५०		७५०	
१२५०		१०५०	

येणेप्रमाणे सालगुा सन आर्बा सितैन पेठ मजकुरी माहाल मजकुर खर्चास कार्याकारण पटी करून वसूल करावा. सरकारात काही घेऊ नये. माफ केला असे. साल मजकुर सन खमस सितैन साडेदाहासे रुपये व सन सीत सितैन साडे बारासे रूपये येकूण तिसाला सदरहुप्रो इस्तावा करार केला असे. कराराप्रो उगवणी करून पेठेची आबादानी करणे. जाणीजे छ ७ जिल्हेज.

बार.

¶ *The Peshwa grants remission of the cess to Narsoba Naik Tambeker to whom the Kamavisi of Budhwar Peth in Poona City was assigned. The concession was granted owing to the Nizam's attack and depredations in the city.*

No. 67] *[8-6-1765*

पो छ १८ जिल्हेज
सन सीत सितैन जेष्ट.

श्री

सेवेसी शंकराजी राम विज्ञापना यैसीजे. तागाइत छ १ जिल्हेज जाणून किले बंकापूर वर्तमान येथास्थित असें विशेष. किले मजकूरचें वर्तमान फत्तें जाहालियाचें सांडणी स्वारासमागमें सेवेसी लिहिलें होतें. विदित जाहालेंच असेल. सांप्रत किला हस्तगत जाहाला. येक रोज राजश्री नारो शंकर राजबहादर येथें मुकाम होता. छ [पुढील अर्धा बंद फाटलेला.]

[फाटलें.]

अमलांत चालत होता. हालीं दिव्यास तेल मात्र देवितों. नैवेद्याची आज्ञा चालवणार स्वाम समर्थ आहेत.

२ घड्यालची
२ भालेदार चोपदार

२०

6352

वीस आसामी ठेविलें विना कामाचें
नाहीं. दस रोज करार केले. जामीन
घेऊन ठेविले.

किल्याचे खबरदारीविशी व बंदोबस्तीविशी रात्रंदिवस खबरदार आहों. सेवेसी विनंती लिहिली आहे. श्रुत होऊन उत्तराची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना

¶*The capture of the fort of Bankapur is reported to the Peshwa by Shankaraji Ram.*

✓No. 70] [21-7-1765 ?

पौ छ २४
सफर श्रावण
मास.

श्री

राजश्री दादासाहेब
गोसावी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित दमाजी गायेकवाड सेनाखासखेल शमशेरबहादुर दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय निजानंद लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लेखनान्वय ध्यानास आला. तेथें लिहिलें कीं, हैदरनाईक यांचे पारपत्य होऊन स्वारी देशास आली. पुढें मातबर मनसबा करतव्य यास्तव येथें असावें, या गोष्टीस विलंब न करावा, यैसें लिहिलें. त्यास इकडे आम्ही आज सातआठ मास विसानगरास आहों. येथील बंदोबस्त जालेविणा उ * * * येते ? यानी मागती हिंदोस्तानचें वृत्त ऐकून सुरईकर (?) यांजकडे मातबर माणोस पाठऊन त्याजकरवीं फौज मातबर ठेवितात. पुढें बाजे बरसात त्याजला यां प्रांती घेऊन यावें. हेहि दाहा हजार फौजेनसीं आहेत. त्यास (हे) पारपत्ये होऊन या प्रांतीचा बंदोबस्त न जाहाल्यास प्रांत राहाणें कठिण हें साहेब जाणत आहेत. याचा साकल्यार्थ राजश्री रामचंद्र बसवंत विनंती करितील त्याजवरून ध्यानास येईल. सेवेसीं श्रुत होये. चिरंजीव राजश्री सयाजी गायेकवाड याची रवानगी [फाटलें.] पडल्या आज्ञेप्रमाणें सत्वर येऊन पोंहचतील. इकडेहि दंगा आहे याजकरितां

विनंती लिहिली आहे. आमची नजर येक साहेबाचे पायासी आहे. अन्यत्र दैवत नाहीं. श्रुत होये. रवाना छ २ माहे सफर. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Damaji Gaikwad pleads inability to participate in the grand expedition of Raghoba on the ground of troubles within his domains.

No. 71] [19-9-1765

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलांचे सेवेसी

आपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ३ रबिलाखरपावेतो वडिलांचे आशीर्वादे येथास्थित असे विशेष. राजश्री विठलराव सिवदेव याचे सातसे राऊत आजमासे आहेत म्हणोन पहिले लिहिले होते. त्यास छावणी करावयाचा मनसुबा ठरला तेव्हा सर्वांचे लोक उठउठोन देसी गेले, त्याजबराबर यांचेहि लोक गेले. प्रस्तुत मारनिले सावनुरास ठेविले आहेत. यांचे लोक प्रस्तुत जमा होत चालिले. सरंजामाप्रमाणे राऊत सत्वरच महिनापंधरा दिवसी जमा होतील. मारनिलेविसीचा कोणेविसीचा संशय चितांत न आणावा. शेवसी श्रुत होय. सालमजकुरी याणी चाकरी चांगली केली. दोनतीन जुजे केली. वडिलास कळावे हे विज्ञापना.

¶Madhavrao informs Dadasaheb that the troops under Vithal Shivdeo were disbanded but would be soon remobilised. "Vithal Shivdeo rendered good service this year", adds the writer.

No. 72] [3-12-1765?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

गोविंदपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पो मलार खंडेराव सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष वद्य शेष्टी मुाा शेहर हैदराबाद स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असो विशेष. बहुत दिवस आपणाकडोन कृपापत्र येऊन परामर्ष न जाहाला. तरी सदैव पत्रद्वारें सांभाळ केला पाहिजे. आम्हाकडील वृत तरी आपण श्रीमंत राजश्री नाना आदिकरून मर्पीरुलमुल्क यासी व राजश्री सोयरोपंत यासी पांच

6354

च्यार पत्रें आपण पाठविली, परंतु अद्यापि निरोप देऊन मार्गस्त करात नाहा. तेथें आम्हापासोन रुपये घेतले व पंचेवीसा हजाराचा रोखा घेतला त्याचे बोलण्याची तो वार्ताच नाहीं. त्याणे रुपये घेतल्या खेरी(ज) अजपावेतों पांच हजारांचे खर्चाचे पेचात आलों. माणूसपण राहिले नाहीं. दैवबलेतरी की स्वामी सारखे मुरबी अस्तां प्रयत्नहि बहुत करून पत्राची पुरवगी फारच केली. दुसरें, श्रीमंताचे पदरचा कारकून हें सर्व या राज्यांत ठावके जाले. दुसरे कोणाचीं मामलत केली नाहीं, अथवा कोणाचे हवाला घेतला नाहीं, अगर कोणापासी जबाणीहि गुंतली नाहीं. ऐसे भिऊण चालून एक श्रीमंताचे पायाचा आधारावर व स्वामी मुरबी या तवक्याणे त्या प्रांती वस्तीस राहतो. बारा महिने पुणियात राहून गरीबीनें सर्वांचे आर्जव करून कालक्षप करीत होतो. ऐसे असतां प्रारब्ध-गतीणे येथें येऊन फसलों आहों. येंदा मागाईचा समये. दुसरे, घरीं येदा दोन लग्न जरूर कर्तव्य. प्रकार तरी या गतीचा जाला आहे. परंतु येक भरवसा आहे की, स्वामी माझे रुणी आहेत. सर्वदु:खे परिहार करून उर्जिति कराल. दुसरे, या राज्यांत सर्वास कळले कीं, मल्हार खंडेराव श्रीमंताचे पदरचा, याचे आगत्य श्रीमंत राजश्री नानास फार आहे. दुसरे याजकडे काही लांझ्या[1] नसतां हैदरअलीने बदमामली करून धरून रुपयेहि घेतले व खराब केले. ऐसे असतां मर्षीरुलमुलकांनीं अगत्य धरून यासी मार्गस्तहि करून देत नाहीं. तेथें पैका घेतला आहे त्याचा विचार काये? लौकिकांत बोलतात कीं, हा सरकारचा कारकून, लांझ्याखेरीज खराबीत आणला आहे. याचा अभिमान श्रीमंतास पडोन हैदरअलीचे पारपत्य करतील, यैसे इकडीलच लोक बोलतात. त्यासी लांझ्या खेरीज मजला नाहक पेचात घातले आहे, याजविसी हैदरअलीचे पारपत्य करणेहि श्रीमंत राजश्री नाना स्वामीस अपेक्ष्य नाहीं. दुसरे, त्याचे म्हणविल्यास त्याजकडे कोणी पाहाणार नाहीं. मी तो सरकारचा. दुसरे, माझेविसी पत्रेहि वारंवार आली असतां हे माणीत नाहीत. त्यापक्षी श्रीमंतास क्षेमा होणार नाहींच. पारपत्य करून, मजला खराब करून सर्वश्व नाष केला आहे तोहि भरून घेऊन त्याजपासून गुन्हेगारीहि घेतील कीं, पुढें कोणी धन्याचे मंडळीकडे व्यग्रता न पाहे. आणि यात नक्ष आहे. असो. सविस्तर श्रीमंतास श्रुत करून राजश्री गोविंदराव मामास सांगोन आपणहि ममतेचे वाटेणे बोलोण यांचे पत्र मर्षीरुल-मुलुक यासी व सोयरोपंतास पा पाहिजे कीं, पांच पत्रे तुम्हास आम्ही लिहिलीं व उभयेतां श्रीमंताणी तुम्हांस व मर्षीरुलमुलुकास पाठविली असतां अद्यापि त्यास निरोपच नाहीं, तेथे यैवजाचा वगैरे मार्ग होणे कलतच आहे. याजवरून

---

१ भानगड, संबंध.

श्रीमंतांची मर्जी ठीक नाही उभये पक्षीचे स्नेह्यात हे गोष्ट करणे उचित नाहीं. असो. आतां त्यासी निरोप देऊन मार्गस्त करून द्यावे. कदाचित निरोप देतच नाहीत येसे असल्यास त्याची तजवीज होणे ते सरकारातून होईल. थोडके कामासाठीं महद विरुद्ध पडले. हैदरअलीचे पारपत्य करावयासी अशक नाही, परंतु याची दृष्ट स्नेहावर असतां तिकडोन हा प्रकार. तेव्हां हे गोष्ट ठीक नाहीं. पत्र पावतांच निरोप देऊन मार्गस्त करावे अगर उतर पाठवावें म्हणजे सरकारातून परभारे पडदूरकराचे पारपत्य होईल. याप्रों पत्रे पाा व एक पत्र श्रीमंताचे नावें दाबाचें सोयरोपंताचे नावें पाठवावें. अवदेकर ब्राम्हणाचा कसबे आवढियाचा अमल हस्तबुर्द[१] द्यावयाविसीं सरकार सनद असतां मर्पीरुलमुल्क म्हणतात कीं, तेथील ऐवज जबिहतजंगाचे पुठ्यांत आहेत त्या अंखा प्रों हिसेरसदि देऊं. लाच अमल देत नाही. ब्राम्हण फार श्रमी जाले. येथेहि तीनशें रुपये खाले. फळ कांहीं नाहीं. स्वराज्याचे आमलाचा आब फार गेला. कोणी पुसत नाहीं. भेटीनंतर सविस्तर श्रुत होईल. बहुत काय लिहिणे, लोभ करावा, हे विनंती. राजश्री भाऊ व आबा व आणा आदिकरून सर्व मंडळीस सां नमस्कार विनंती.[+]

¶*Malhar Khanderao to Govindpant Tatya : complains that he was unnecessarily detained in the Nizam's camp and had not received his passport.*

No. 73] *[Jan.-Feb.1766*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. राजकी वर्तमान तरी नवाब या मुकामास आले. तीन च्यार मुकाम येथें केले. मुकाम करावयाची कारणें, येक तरी पाणी पाहायास जासूद गेले आहेत ते आले पाहिजेत. लस्करास पुरेसारिखे पाणी असिल्यास तिकडे कूच करावें. दुसरें माहाराजांनी दोन तीन वेळां लिहिलें कीं, खासा स्वारी हिंदुस्थानांत जाती. श्रीमंत रावसाहेबांची रवानगी दक्षणेस केली आहे. नवाबांच्या श्रीमंत रावसाहेबांची भेटी होतील. त्याजवरूनहि याणी स्थिरता केली. तिसरें, राजश्री रामचंद्र जाधवरावराव व निंबालकर हेहि जवळ आले आहेत,

१ खातेवहींतील नोंदीप्रमाणें. + पत्र गोविंदपंत तात्या खासगीवाले यास असावें.

त्यांची प्रतीक्षा आहे. इतक्या कारणास्तव येथें मुकाम केले, पिराजी घाटगे व उदाजी आटोले काल येऊन भेटले. दोनशें स्वार आहेत. गोविंदराव नामें सैफुद्दौला सायेरचे बक्षी त्याचे पेशकारीचा खिलत नवाबानी दिल्हा. निम आस्तीन दिल्ही. पंचुलाल शहा सवरजंगाचा पेशकर जाला, त्यास निमअस्तीन खिलत दिल्ही व गदाबेगखां याजला मिरये तमामी ? आज तगीर नजफअलीखां दिल्ही. वस्त्रें तीन पारचे दिल्ही हे विज्ञापना. हैदर नायेकानें अवदा जमाव ठेविला आहे. देशांतूनहि जागाजागाहून लोक येऊन येऊन गेला. पहावें अवदा तो काये करितो. जर श्रीमंत रावसाहेब व नवाब समागमें गेले तरी उत्तम. त्याचें पारिपत्य उत्तम प्रकारें होईल अथवा पेका तन्ही देईल. माहाराजाची श्रीमंत रावसाहेबांस जशी आज्ञा असेल तसी वर्तणूक करितील. हे विज्ञापना.

¶*The writer explains to Dadasaheb why the Nizam was required to halt at a particular place. He also mentions the interview between the Nizam and Piraji Ghatge and Udaji Atole.*

✓*No. 74]* *[3-3-1766*

पौ। छ २९ रमजान
सन सीत फाल्गुन मास
हा। यमाजी प्यादा.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २१ रमजान मु। मनरथ स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १३ रमजानचे पत्र यमाजीबा। पा। ते पावले. पांडबाचे लेकाचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. श्रीमंतास पत्र एकांती देऊन लि।प्रमाणें विनंती केली. मग त्यानी सांगितले कीं, ते येथें आले, भीड पडली, यामुळें पत्र द्यावे लागले. आतां नानांनी लि। त्यास तूर्त तकूब पत्र लिहिणे. पुणियास गेलियावर नानाचे विचारें देवऊं. दुसरे दिवशीं राजश्री बापूचे कानावर घातले. श्रीमंतांचे आज्ञेवरून त्याणींहि हीच सला दिली की, तूर्त मोघम ठेवावे, पुण्यास गेल्यावर द्यावे लागतील म्हणोन सांगितले, त्यावरून पत्र लि। असे. वरकड इकडील वर्तमान पूर्ववतच आहे. मोगल चहू रोजी येणार. निंबाळकराकडील कांही गुंता उरकला नाहीं. राजश्री रामचंद्रपंत आज फौजसुधां लस्करापासून दोन कोसावर राहतील. दर मजल प्रतिनिधीकडे जाणार. कळावे. नवल विशेष आढळेल ते लिहून पाठवीन. शरीर प्रकृत कशी आहे ते लिहिणे म्हणोन आज्ञा, त्यास महिना सवा महिना ताप येत होता,

आतां बरा आहे. सारा दिवस कसाला होत नाहीं. प्रकृत एकसारखी राहत नाहीं. औषध घेतो. दरबारास एकवेळ च्यार घटका जातो. स्वामीची कृपा माझे ठाई पूर्ण आहे तेणेकरून मजला चिंता काय ? भोग आहे तो भोगिला पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant to Nana Fadnis reporting the doings of the Peshwa and his vicinity to the Nizam and inquiring after the health of the addressee.*

✓ *No. 75]* *[8-3-1766*

श्री

राजश्री रामचंद्र गणेश

गोसांवी यांसी

उपरी. आजी शुक्रवारीं प्रहर रात्रीं राजश्री बाबूराव सदाशिव न पुसतां निघोन गेले. त्यास तुम्ही व चांगलीं चांगलीं पथकें पत्र पावताच जीन ठेवून त्याचा पाठिलाग करणें. मोहरीचा घांट व वांगीचा घांट दोन्ही तिन्हीं घाटाची खबर आणून येक दोन दिवस पाठिलाग करून त्यास हस्तगत करणें म्हणजे तुमचे सेवेचा मजरा होईल. राजश्री आतांच निघोन गेले. तुम्ही पत्र पावतांच खासा तुम्हीं पाठिलाग करणें आणि हस्तगत करणें. जाणीजे छ २६ रमजान.

¶*Ramchandra Ganesh is asked by the Peshwa to proceed at once in pursuit of Babuji Naik and capture him.*

✓ *No. 76]* *[9-3-1766*

श्री

राजश्री माधवराव रामचंद्र गोसावी यासी

सुा सीत सितैन मया व अलफ. राजश्री बाबुराव सदाशिव यांजकडील पागा व जामदारखाना वगैरे सरंजाम जप्त करून मोजदाद करून ठेविली आहे. त्यास सारी बाडबिछादी आणावया सदासिव वेंकाजी कारकून याजबाा राऊत देऊन पाा आहेत. याचे पदरीं सर्व चीजवस्त घोडी हती वगैरे असेल ते घालून घोड्यास धरावयाची माणसें वगैरे सोय करून देऊन पाठऊन देणे. राजश्री नारो कृष्ण जोसी तेथें आहेत त्यांजकडे बाबूजी नाईक यांची वस्तभाव जी असेल ते त्यास पुसोन त्याजपासून घेऊन सदासिव वेंकाजी याजबरोबर पाठऊन देणे. जाणिजे,

छ २७ रमजान. आज्ञा प्रमाण. सिलेदार लोक आहेत त्यांस हुजूर पाठऊन देणे. आज्ञा करणें ते केली जाईल. भगवंतराव कडेकर याजबा। फौज गाडदी देऊन पाठविले आहेत याजबा। सर्व चीजबस्त व सिलेदार लोक नाइकाकडील यास हुजूर पाठवणे छ मार.

¶*The property and all the belongings of Babuji Naik are ordered to be confiscated by the Peshwa's order.*

✓No. 77] [9-3-1766

पैा छ ६ सवाल सीत
अधिक चैत्र

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व नारो गंगाधर व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २७ रमजान मुा मनरथ वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री बाबूजी नाईक छ २६ रमजानी शनवारी आवशीचे प्रहर रात्रीस दोनसें स्वारांनसी पलोन गेले. फार करून सोलापुराकडे जातील. बातनी कलतांच फौज पाठीमागे लाविली. दाहापंधरा थोर थोर पागाच पाठिलागास आहेत.

राजश्री रामचंद्र गणेश फौजसुधा आठ कोसावर राहिले होते, त्यास रातोरात चिठी गेली कीं, तुम्ही फौज घेऊन पाठीलाग करणें. त्यास ते सडी फौज घेऊन जातील. तूर्त प्रतिनिधीकडे जाण्याचा मजकूर राहिला. सारे येकवट जमा व्हायास आठचार दिवस लागतील. मोगल येथून सा कोसांवर आहे. त्याजकडून मीरमुसाखान सेरजंग जगंनाथ धोंडाजी काल येथे आले. आतां बोलणें हेच कीं, परस्पर रहस्य असावे, पुढें मसलत काय, हेच आहे. आज उद्यां जातील. तूर्त नाईक गेले हाच शोध आहे. पुढे जे ठरेल ते लिहून पाठऊं. नाइकाची सारी फौज रामचंद्रपंताबा। चाकरीस दिल्ही होती. दोनसें खास पागा मात्र जवल होती. बाजिदागिरी करून गेले, परंतु पाठीलाग लवकर जाला. सांपडणे न सांपडणे ईश्वरी इच्छा. हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis is informed of the movements of Babuji Naik who slunk away all of a sudden and who was therefore being pursued by Ramchandra Ganesh.*

✓ No. 78] [About 9-3-1766

श्री

विज्ञापना राजश्री बाबूजी नाईक याजपासी सोलापूरचा व वंदनचा किला मागणार हें वर्तमान कर्णोपकर्णी नायेकास कललें, त्याजवरून त्याणीच किल्याच्या

चिठ्या श्रीमंतास आणून दिल्ह्या. सरकारचे ठाणें गेलें असतां किला हस्तगत न जाला हें वर्तमान यैकोन फाल्गुन वद्य त्रयोदशीस रात्रीं नाईक श्रीमंतास न पुसतां गेले. च्यार घटकानंतर श्रीमंतास वर्तमान कललें. मागें फौजा पाठविल्या, परंतु फौजेची त्यांची गांठ न पडली. नाईक सोलापुरास जाऊन पोहोचले. मार्गीं जाता कलबांत गेले होते. दताजी ठाकूर कलमचा देशमुख त्याणें नायेकास येक रात्र ठेऊन घेतलें होतें, याजकरितां श्रीमंतानी दताजी ठाकूर यासी धरून आणिले. कलमांत ठाणें बसविले. यादवराव जगथाप याणें नाइकास सोलापुरास पोहचाविले याजकरितां त्यास शासन केलें. नाइकाची फौज व हत्ती घोडीं ठिकाणीं लागलीं तीं सरकारांत आणिलीं, त्याचे परगणे वगैरे जप्त केले. नाईक सोलापुरीहून हैदर नायेकाकडे गेले म्हणून वंदता आहे. श्रीमंत सोलापुराकडे फौज पाठऊन आपण खासाहि च्यार दिवस त्याच शहावर जाणार असें आहे. हे विज्ञापना.

¶*The flight of Babuji Naik from the Peshwa's camp to Sholapur, and the punishment inflicted on those who sheltered him on the route are mentioned in this letter.*

✓*No. 79*] [*10-3-1766*

श्री

राजश्री माधवराव रामचंद्र गो

सुा सीत सितैन मया व अलफ. बाबूजी नाईक कलमांत कोंडिले आहेत. त्यास पाच तोफा नारो आनंदराव याजबा देऊन जलद पुढे रा करणे. तुम्ही गोटसुधा कूच करून बुनगेसुधां मागाहून जाऊन पोहचणें. तोफा फार जलद पाठवणे. जाणिजे. छ २८ रमजान. आज्ञा प्रमाण.

¶*Madhavrao Ramchandra is instructed to send with all possible despatch five pieces of artillery to Kalamb where Babuji Naik has been besieged.*

No. 80] [*10-3-1766*

श्री

राजश्री माधवराव रामचद्र गो[१]

सुा सीत सितैन मया व अलफ. बाबूराव सदासिव कलमात आहेत. सरकारची फौज गावाभोवती आहे. तोफा तुम्हाजवल आहेत त्या आणावयास

---

१. ९-३-१७६६.

रामचंद्र गणेश यांणी तुम्हास लिा आहे. तर जलदीने तर्तूद करून तोफखान्याकडील नारो आनंद याजबाा तोफा देऊन जलद राा करणे. उतर पाठवणे. जाणिजे. छ २८ रमजान. आज्ञा प्रमाण.

¶*Madhavrao Ramchandra is asked to send without delay Naro Anant with guns as desired by Ramchandra Ganesh.*

✓No. 81] [10-3-1766

श्री

राजश्री रामचंद्र गणेश गो

उपरी. राजश्री बाबूराव सदासिव यांस कलमात कोंडिले. तुम्ही फौजसुधां भोवतें आहा. जमिदारास तुंम्ही सांगोन पाा की, नाइकास आमचे हवाली करणे. त्यास त्याणे सांगितले जे, माझे घरास आले, मी देत नाही, असा जाबसाल केला म्हणोन तुम्हाकडून सांडणी स्वार आला त्याणे जबानी सांगितले. ऐसियास तुम्ही जलदी करून गाठिले, गावात कोंडिले, ही मोठी गोष्ट जाली. सरकारची फौज गावाभोवती उभी असतां गावकरी यांनी दम धरणें, ही गोष्ट कलतच आहे. तेंव्हा इमान प्रमाण द्यावे ह * * * * असे राजकारण लावतील तर ती गोष्ट परिछिन कार्याची नाहीं. कोणे समई कोणती गोष्ट करावी हे तुम्ही जाणतच आहा. हा समय वचन प्रमाण द्यावयाचा नाही. परिछिन धरावें. त्याजकडील राऊत, सिलेदार अथवा सेवटचा लाहान माणूस असेल त्यास कोणी जामीन राहून आमचे हवाली करा म्हणतील तर ऐकूं नये. खाशापासून सेवटचे माणसापर्यंत सारेच बिन्हाड हुजूर घेऊन यावे; येथे आलियावर कर्तव्य ते केले जाईल. चिरंजीव राजश्री नानासमागमे फौज देऊन रवाना केले. त्यास जाते समई सांगितले तेहि तुम्हास सांगतील. सारांश गोष्ट जी न व्हा(वीसी) ती जाली. याउपरी त्यास घेऊन हुजूर येणें. कदाचित गावकरी याच्याने निभावेना तेंव्हा बाहेर लाऊन देतील अथवा तेच जाहाली करून बाहेर निघतील, तर तो समय सांभाळून मिठी घालून जिवंत दस्त करणें. त्यांतही लोकांची दाटी जाल्यावर मग त्याचे भवितव्य असेल तसे होईल. जिवंत धरावयाचा मात्र प्रेत्न होईल तो करावा. सारांश गोष्ट वचनप्रमाणास कोणासी काही न गुंतणे. लिा प्रो करणे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. जाणिजे छ २८ रमजान.

¶*Ramchandra Ganesh invested Kalamb where Babuji Naik sought refuge and asked the headman to surrender the refugee. The latter refused. The matter being referred to the Peshwa, the addressee was instructed that his business was to take Babuji a captive and not to be deterred by any opposition.*

No. 82] [11-3-1766

पो छ ६ सवाल सन सीत
चैत्र अधिक बा। राऊत.

श्री

शेवेसी विज्ञापना. ता। छ २९ रमजान मु॥ नजीक पोहनेर वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री बाबूजी नाईक न पुसत गेले, हा मजकूर आलाहिदा पत्रीं लिहिलाच आहे. आपली फौज पाठीमागें लागली व रामचंद्र गणेश तिकडून धावले. त्यास रविवारी चार घटका दिवसास नाइकाची गाठ पडली. पंनास राउतानसी होते. आपली फौज पाहातांच पळाले ते कसबे कलंब पा। धारूर या गावांस सिरले. आपली फौज गावाभोवती उभे राहिले. जमीदारास सांगोन पा। जे, चोर आमचे हवाली करणे. त्याणे सांगोन पाठविले की, माझे घरास आले, देत नाही. गांव वेढिला आहे. सांडणीस्वार तेथून सोमवारी संध्याकाळी आला, त्याणे सांगितले त्यावरून येथून राजश्री नाना पुरंदरे हुजुरात राहिली होती ती देऊन संध्याकाळीच रवाना केले. जिवंत धरून आणावे अशी श्रीमंत स्वामीची आज्ञा आहे. स्वामीस कळावें. पुढें आढळेल ते लिहून पाठवीन. राजश्री नारोपंत नाना पाळंदे नानासमागमें गेले आहेत. हे विज्ञापना. येथें सात आठ मुकाम होतील हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana Fadnis details of the pursuit of Babuji Naik by Ramchandra Ganesh.*

No. 83] [11-3-1766

श्री

राजश्री रामचंद्र गणेश
गोसावी यांसी

उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. चिरंजीव राजश्री नाना फौज घेऊन येतील. तुम्ही आपले नेमणुकेप्रमाणें फौज घेऊन ज्या कामास गेला त्या कार्यास जाणें. जातां जातां पांगरी व सिराढोण हे दोन्ही घेऊन तेथील बंदोबस्त करून पुढें खानापूरच्या रोखें जाणें. पांगरी सिराढोणी आमलदार असतील ते धरून कैद करणें आणि आपले कमाविसदार काईम करणें. बाबूजी नाईक याची बातमी कोठें आहेत, पुढें उद्योग काये करितात, सोलापुरास पावले न पावले, भवानरायाकडे कागदपत्र पाठवितील याचा पुर्ता शोध करून वरचेवर वर्तमान पाठवीत जाणें. जाणिजे. छ २९ रमजान. बहुत काय लिहिणे.

¶*Ramchandra Ganesh is asked to capture Pangri and Shirdhon and to put into confinement the officers there, and to be watching the movements of Babuji Naik.*

No. 84] [12-3-1766

श्री

चिरंजीव राजश्री नाना यांसी आसीर्वाद. उपरी: यादवराव जगथाप दिा माहाराव निंबालकर याणीं बाबूजी नाइकांची कुमक करून काढून दिल्हे, म्हणून तुम्ही लिहिले ते कलले. ऐसियास, निंबाळकराकडील खिजमतराऊ व येशवंतराव पोतनीस आहेत त्यास सांगितले. त्याणी सांगितले कीं, ये गोष्टीचा आमचा गुंता नाही. सरकारांतून बंदोबस्त करावा. त्यावरून तुम्हांस लिहिले असे. तर दोनसे राऊत पाठऊन यादवराव जगथापाचे घर मांडवे व वासी व विटकूर या तीन जागामध्ये आहे ते जफ्त करून, वस्तभाव, घोडी, गुरढोरे, कुल जे असेल त्याची मोजदाद करून व मुलेमाणसें आपल्याजवल आणून हुजूर पाठऊन देणे व यादवराव यासहि हुजूर पाा. यादवराव जगथाप घरी नसला तर त्याचे लेक बाऊबंद जे सांपडतील ते पाठवावे. तीनसे राऊत समागमे देऊन बंदोबस्तीने पाठवणें. रवाना छ ३० रमजान. धारूरकर दताजी देशमुख व त्याची मुलेमाणसें व गावांत मातबर सावकार कोणी असला तर त्याजबाा राऊत देऊन पाठऊन देणे. राा छ मजकूर. देशमुखाची वस्तभाव, घोडीपिढी, जराबाजरा, जें असेल ते हुजूर पाठऊन देणें. छ मजकूर हे आसीर्वाद.

¶*Nana Purandare is asked by the Peshwa to confiscate the property of Yadavrao Jagthap and arrest him with his relatives and family for having helped Babuji Naik in his flight.*

No. 85] [14-3-1766

श्री

आसीर्वाद उपरी. राजश्री रामचंद्र गणेश याची रवानगी प्रांतनिधीकडे करणें. मशारनिलेनी जाता जातां ढोकी व पांगरी येथील ठाणी बैसऊन पुढें जावें. दताजी ठाकुर देशमुख व यादवराव जगथाप यास कबिलासुद्धा घेऊन हुजूर येणे. हरदू जणास कोणी जामीन होतील, हातीं घेतलि, तर कोण्हाचे हातीं न देणें, त्यास येथेंच घेऊन येणें. अत:पर तुमचें काम तिकडे नाहीं. पत्रदर्शनीं तुम्ही फौज सुधा येणं. रवावा छ २ सवाल. बहुत काय लिहिणें ? हे आसीर्वाद

¶*Ramchandra Ganesh is ordered to capture the villages of Dhoki and Pangri and to imprison Dattaji Thakur and Yadavrao Jagthap and not to release them on securities. The writer of the letter appears to be the Peshwa.*

No. 86] [15-3-1766

कै(तानेक) ता छ ३ स(वाल)

न यथास्थित असे विशेष. आपण छ * रमजानची पत्रें पा ती पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कलले. राजश्री नारो शंकर यानी आठ हजार रुपयाची चिठी राजश्री विष्णुपंत गद्रे याजवर लेहून दिल्ही, ती येथे राहिली होती, ती हाली पा असे. उतर पाठवावे. इकडील वर्तमान, राजश्री बाबूजी नाईक पलोन सोलापुरास गेले. याउपरी आपली फौज दोन हजार सोलापुराभोवती राहिले. नवाबाजवल येऊन राहिले होते. त्याजकडील कारभारी येऊन बोलूनचालून गेले. ते बेदराकडे [पुढील सात आठ ओळी मजकूर फाटण्यांत गेला आहे.] कोणी सापडेल त्यास जप्त कराव(याची) मसलत आहे. कमलाकर भास्कर व दिवाकर जोसी याजविसी राजश्री कृष्णराव बलाल व मी विनंती केली, हे फक्त कादार, याजकडे गुंता काय ? घरबीर कांही जप्त करू नये, असे करार जाले. त्यास पत्रहि पा असे. त्याणी सरकारचे चाकर असे होऊन, नाइकाकडील दुसरे जे कोणी असतील त्यांस दाखऊन द्यावे असे केले आहे. जोसीबावांस सांगावे, चिंतामण नाईक ओंकार याणी उपकर्णे ठेविली याजकरितां पेचांत आले, राहुटीस गारदी यांची [पुढील मजकूर फाटला आहे.]

¶*A mutilated letter from Haripant probably to Nana Fadnis reporting the trouble created by Babuji Naik at Sholapur.*

No. 87] [Recd 15-3-1766

पौ छ १ सवाल सीत.

श्री.

सेवेसी विज्ञापना. सर्वा मानकरीयांचा निमे ऐवज नालबंदीपैकीं दिल्हा. महिपतराव घोरपडे यांचा ऐवज पावला नाहीं म्हणोन त्याचे कारकूनाचें पत्र आलें, त्यावरून खटे आहेत. महिपतरायानी चाकरी सर्वा मानकऱ्याहून अधिक केली व अबोलणा, येकनिष्ठ, सार्वकाल स्वामीचे कल्याण त्याच गोष्टी सांगत असावें, असा यांचा प्रकार असतां यांचा ऐवज न पावावयाचें कारण काय ? स्वामीचीं पत्रें येतात कीं, मानकरी यांचा निमे ऐवज दिला. त्यावरून आम्ही यांस सांगतो कीं, तुमचा ऐवज पावला. असें असतां याप्रो त्यांचे कारकुनाचें लिहिलें आलें. यास्तव सेवेसी विनंती लिहिली असे. वरकडाप्रमाणें याचा ऐवज पावता करून

---

१ पत्र हरिपंताचें.

त्यांचे कारकुनाचें पत्र यावें. वरकड मानकरी घरीं गेले त्यांचा पैका स्वामींनीं दिला. मानकरीं यांपैकीं खंडेराव दरकरे व माहादजी भोसले व महिपतराव घोरपडे लोक सुधां येथें राहून, पैका पावला नाही, यामुळें फार खटे आहेत. कृपा करून यांचा ऐवज पावता करून कारकुनाचीं पत्रें यावीं. महिपतरायाचा ऐवज सन आर्बाचा राहिला आहे तो देवावयास आज्ञा करावी. महिपतराव चाकरीस फार उपयोगी आहेत. हे विज्ञापना.

¶*Haripant requests Nana Fadnis to pay off the expenses incurred by the several Sardars who exerted loyally in the Peshwa's services. Mahipatrao Ghorpade and others are mentioned as instances who had not received their dues.*

No. 88] [*15-3-1766*

नकल

श्री

राजश्री रामचंद्र गणेश गोसावी यांसी

उपरी. बाबूजी नाईक याचे जुजेदान[1] सापडले, त्यात ऐवजाची याद सापडली. त्यात साडेच्यार लक्षपर्यंत नख्त व मोहरा मिलोन सिलक आहे, तो ऐवज बारामतीस पुरला आहे असी बातमी कलली. त्यास माहीत भुजंग नाईक व सेटी जाधव जामदार आहेत हे उभयता बारामतीसच आहेत. जड जवाहीर कुल त्यास ठाऊक आहे. ऐसियास बारामतीचे जतीस नारो राम समसेरबाहदराकडील व माणिकराव सामराज रा। केले आहेत. त्याजबा। राऊत नाही, याजकरितां येक शाहाणा माणूस व पाचसे राऊत देऊन पत्र पावताच रवाना करणे. त्याणी नारो राम याजवल जाऊन लि॥प्रमाणे करावे. तुम्ही नारो रामास याप्रो॥ लिहिणे. उभयतास मुले माणसेसुधा आधी दस्त करून वस्तभावेचे ठिकाण लावावे. आबाजी त्रिंबक बारामतीचे फौजदार याची जती करावी. वस्तभाव तेथे बंदोबस्त करून भुजंग नाईक व जामदार व आबाजी त्रिंबक यास हुजूर पाठऊन देणे. येथून हुजरे दोन रा। केले आहेत ते तुम्हाकडे येतील. त्यासंच बराबर पाच राऊत देऊन आधी रवानगी बारामतीची करणें. सोलापूरचे किल्यांत जमातदार आहेत, कासीराम हजारी येक व दुसरा सुभानसिंग. दोघा माणसे जफ्ती करावी लागतात. त्यास सुभानसिंगाची माणसे कुगांव परगणे इंदापर येथे राहतात व कासीरामाची इंदापुरीच राहतात. त्यास नारो रामास लेहून हरदू जणाचीं माणसें जफ्त करवणे. त्याचे घरची चीजवस्त कुल जफ्त करविणे.

---

[1] जुजदान=सुटे कागद ठेवण्याची वही.

रामचद्र गोविंद याची माणसें बारामतीस आहेत ती जफ्त करवणे. जाणिजे छ ३ सवाल सुा सीत सितैन मया व अलफ. या कामाची जलदी सत्वर करणे. प्रतिनिधीचे वर्तमान जे येईल ते वरचेवर इकडे लिहीत जाणे. बहुत काय लिहिणे?

¶*Ramchandra Ganesh is asked to attach the whole property of Babuji Naik and to imprison the Naik's servants Bhujang Naik and Jadhav, who knew where the Naik's cash and the jewels were hidden.*

No. 89] *[17-3-1766*

पैवस्ति छ ६ सवाल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
रामचंद्रपंत तात्या
स्वामीचे सेवेसी

पोष्य जगनाथ बाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ५ सवाल प्रात:कालपर्यंत मुकाम कसबे मार्डी येथें वर्तमान येथास्थित असे विशेष. तुमचें पत्र काल संध्याली आलें तेव्हांच श्रीमंताचीं पत्रें आम्हांसहि सांडणीस्वाराबरोबर आलीं. त्यांत मजकूर कीं, मागाहून फौज रवाना करितों, तुम्ही मजबूद ठाणें पाहोन बहुत खबरदारीनें राहाणें, पांच सांत दिवसांत फौज येऊन पोंचेल. परंतु आम्ही ठाणी तीन घेतलीं आहेत, त्यांत प्यादे मात्र ठेविले आहेत. राजश्री बाबूजी नाईक याचा मनसबा आहे कीं, तोफा बाहेर काढून, ठाणीं बसविलीं आहेत हीं तोफा लाऊन मागती फिरोन घ्यावी यैसा मनसबा आहे. यास्तव तुम्हांस हें पत्र लिहिलें आहे. तरी आपणांस येक दोन रोज गुंता असेल तरी पांचसें राऊत चांगले पाठऊन द्यावे म्हणजे बहुत उपयोगी पडतील. या कामास हैगै न करावी, पत्र पावतांच आधीं पांचसें स्वार रवाना करून जलद येऊन पोहचेत ते करावे. आपण लिहिलें कीं, श्रीमंताची परवानगी पाहिजे, त्यास पत्र जाऊन येईतोपर्यंत आवकाश लागतो, यास्तव श्रीमंताच्या पत्राचा उजूर न करितां पांचसें स्वार सत्वर रवाना करावे. हेहि अनुकूल न पडे तरी वाईकर देवकर हे पथक आपणांजवळ आहे, त्यास निरोप देऊन आम्हांकडे जलद पाठवावें. त्याविसीं आपणांस श्रीमंतांचा शब्द लागला तरी त्याचा जाब आम्ही करूं. हे गोष्टीची फिकीर किमपि न करावी. बहुता अर्थी पांचसें स्वार आधीं पाठवावे. नाही तर हें पथक तरी अगत्य पाठऊन द्यावें. याउपर फौज पाठवीत नाहीं तरी ठाणी तोफा लाऊत घेतील. यास्तव पांचशें स्वार सत्वर आठ दिवस पा. अनमान न करणें. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ कीजे, हे विनंती.

¶*Jagannath Baji writes to Ramchandra Ganesh asking him to send 500 troops to prevent Babuji Naik from recapturing the places taken from him.*

No. 90] [18-3-1766

पौ छ १२ सवाल सन सित चैत्र अधिक.

श्री

विज्ञापना. ताा छ ६ सवाल मुाा नजीक पोहनेर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान, राजश्री नाना पुरंदरे फौज सुधा माघारे आले. कलमांत बाबूजी नाईक होते. तेथील देशमुख धरून आणिला. बेडी घातली. ब्राह्मण आहे. यादवराव जगथाप मातबर माणूस. त्याणे नाइकास धीर देऊन काढून दिल्हे, आणि फिरोन नानांस भेटावयास आला. तो येथें आणिला. पाऊणशें वर्षांचा, शंभर जखम आंगावर होती. त्याचा शिरच्छेद केला. पुढें होईल तें लिहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports the confinement of the Deshmukh of Kalamb and the execution of Yadavrao Jagtap who helped the Naik to escape.*

No. 91] [31-3-1766

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री रामचंद्रपंत तात्या स्वा-
मीचे सेवेसी

पोष्य नागो राम भागवत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा आधिक चैत्र वद्य ५ जाणून स्वकीये कुशल लेखन करावें विशेष. आम्ही बिडास जातेसमई आपली आमची भेटी जालीच होती. बीडचे कामकाज करून मागती श्रीमंताकडे लस्करात आलो. आपण राजश्री बाबूजी नाा याजकडे स्वारीस गेला. आमची आपली भेट जाली नाही. लस्करात आठ दाहा दिवस होतो. तेथून श्रीमंतानी च्यार पागा समागमे देऊन बारामतीस रवाना केले. येथे च्यार दिवस राहून नाइकाचें मुलेमाणसे घेऊन पुणियास गेलो. तेथे च्यार दिवस राहून पागा दवंडेस ठेऊन वामोरीस जाणार, हे तजवीज आहे. श्रीमंत परलीस[1] दर्शन करून सत्वरच नासिकास येणार. चिरंजीव राजश्री भगवंतराव याणी वेदमूर्ति राजश्री लक्ष्मणभट नामजोसी यास पैठणाहून सासवडास मुलीस पाहावयास पाठविले होते. ते मुलीस पाहून मागती पैठणास आले म्हणौन चिरंजिवाचे पत्र पैठणाहून आम्हास आले. घटीत तो उतम आलेच होते. लस्करात

---

१ परळी वैजनाथ.

तुम्ही आम्ही आसता शोध केलाच होता. ऐशास घटीतहि उतम आले व तुमचेंहि घरी सर्वांचे मानस की, योग घडोन यावाच. याचप्रा आमचे घरी सर्वांचे मानस ब्रह्मसूत्र आसल्यास ईश्वर योग घडवील. तुम्हासहि सासवडाहून पत्र आलेच आसेल. लग्ने वैशाख मासी आहेत. दिवस मध्ये सवा महिना राहिला आहे. यास्तव सूचनार्थ मजकूर आपणास लिहिला आहे. जर आपला निश्चये असला तर चिरंजीव भगवंतराव यास पत्र आपण लेहून पा. तेहि आपणास उतर लिहितील. आम्ही घरी आसलो तर उतमच आहे. कोठे साहेब चाकरीस खावंदानी पा तर आमचा गुंता न ठेवावा. आइते समई आम्ही येऊं. तोपर्यंत साहित्य करून ठेवावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Nago Ram Bhagwat of Wamori writes to Ramchandra Ganesh Kanade on the subject of the marriage of the latter's daughter into the writer's family and incidentally mentions that Ramchandra Ganesh was pursuing Babuji Naik.*

No. 92] [*March 1766*

श्री

राजश्री माधवराव रामचंद्र गो

सुा सीत सितैन मया व अलफ. तेथे बाबूजी नाइकाचे कारभारी यादवराव व राघोपंत पोतनीस वगैरे जे कोणी असतील त्यास पाठऊन देणे. रामचंद्र गणेश किती फौज घेऊन गेले? कोठपावेतो पोहचले? बातमी कसकसी आली? तुम्हाजवळ फौज किती आहे? ते लिहून पाठवणे. नारो कृष्ण जोसी (अपूर्ण)

¶*The Peshwa asks Madhavrao Ramchandra to send to his presence Yadorao, Raghopant Potnis and others who were in the service of Babuji Naik.*

No. 93] [*2-4-1766*

श्री

सेवेसी आज्ञाधारक दादो उधव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २१ शवालपर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असें विशेष. राजश्री बाबूराव सदाशिव श्रीमंत राजश्री रावसाहेबाचें लस्करांतून रुसोन गेले, त्यांजवर सरकारच्या फौजा रवाना जाहाल्या, तेव्हां मशारनिल्हेस लुटून घेतले, आणि सडे पांचसात स्वारांनिशी जाऊन किल्ले सोलापुरांत दाखल जाहाले, बाहेर सरकारच्या फौजा बसल्या आहेत, किल्ल्यांतून गोळी वाजवितात, मुलेंमाणसें सर्व जफ्तींत आहेत, गांव सरंजाम सर्व जफ्त केले, पंचमाहालांत राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी होऊन सडी स्वारी पुणियास गेली,

म्हणून कसबें बाहादरपुरा प्रगणें आशेर येथें वर्तमान जासुदानें जबानी सागितलें त्यावरून सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*This is a news-letter mentioning the movements of the Peshwa and Babuji Naik and the latter being shut up in the Sholapur fort.*

√*No. 94*] [*About 2-4-1766*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बच्याजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य निळो केशव खरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे, विशेष. बहुत दिवस आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी असें न करावें. निरंतर पत्रद्वारें सांभाळीत जावें. राजश्री रामचंद्रपंत तात्या फौजसुधा पंढरपूर प्रांतें आले म्हणोन वर्तमान श्रवणांत आलें; त्यास, पुढें मसलत कोण्हीकडे आहे, फौज किती समागमें आहे, राजश्री बाबूजी नाईक सोलापुरास आले, त्याच्या पाठीमागें फौज श्रीमंतांनीं रवाना केली, त्यास नाईक कोठें आहेत, सरकारची फौज पा। ही कोठे आहे, हें तपशिलें लिहिलें पाहिजे. आमच्या येजमानाचें वर्तमान आपल्या श्रवणांतच आहे. त्यास प्रसंगीं तेथें तुम्ही आहां. त्यास तात्याचा मोकाम या प्रांतें आहे किंवा मजल दरमजल पुढें जाणार? येजमानाच्या विचारें तात्याची भेट होऊन आपली स्थापना व्हावी असें आहे; त्यास, तुमचें उत्तर आल्यावरी येथून कारकून पाठवितों. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ कीजे, हें विनंती.

¶*The writer Nilo Keshao makes enquiries about the pursuit of Babuji Naik.*

No. 95] [*3-4-1766*

पो। छ २७ सवाल.

श्री

सेवेसी बाळाजी जनार्दन कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २२ सवालपर्यंत येथास्थित असें विशेष. राजश्री

बाबूजी नाईक यांची मुलेमाणसे राजश्री लक्ष्मण नारायेण यांणीं आज्ञेप्रमाणें कैद करून पुणियास आणिलीं त्याविशीचा मजकूर:

हाली माणसांबराबर घोडीं बसावयास लाहानथोर मिळोन सतावीस व उंट नफर पांच व हत्ती नग येक होता तो व गुरांपैकी गाई म्हशी मिळोन आठ, येणेप्रमाणें पुणियास आणिलीं ती तेथेंच ठेविलीं आहेत. बाकी शाहातर घोड्यांपैकी शिंगरें लहानथोर व पसा वगैरे मिळोन येकूण पंनास रास व गुरें गाईम्हशी असें बारामतीसच नारो राम याजवळ ठेविले आहे. तेथें दाणा तीनच्यार खंडी व गवत यंदाचें सवा लाख व जुनें गतवर्षीचें आडीच लाख येणे प्रमाणें आहे. त्यास घोडीं व गुरें तेथें ठेवावीं कीं येथे आणावीं याची काय ते आज्ञा केली पाहिजे व येथें आणिलीं हीं कोठें ठेवावी याची आज्ञा केली पाहिजे.

भुजंग नाईक व शेटी जाधव जामदार व आबाजी त्रिंबक यांस लस्करांत पाठवणें म्हणोन स्वामीचें पत्रीं आज्ञा होती. त्यास, शेटी जामदार लक्ष्मण नारायण तेथें पोहोचले नव्हते तो पूर्वीच पळोन गेला. त्याचा बारीक शोध मशारनिलेनी केला, परंतु ठिकाण लागलें नाहीं. आबाजी त्रिंबक यास आज तीन महिने ज्वर येत होता, याजकरितां त्यास जावयास ताकत नाहीं. त्याचा जामीन घेऊन घरीं चौकी ठेविली आहे. भुजंग

दोन जामदारखाने होते त्यांस कुलुपें होतीं. त्यांच्या किल्यांचा शोध भुजंग नाइकाजवळ वगैरे माणसांजवळ केला. त्यास त्याणी सांगितलें कीं, किल्लया आम्हांजवळ नाहींत, जामदार घेऊन गेला, याप्रमाणें सांगितलें. त्यास लक्ष्मण नारायण व नारो राम व नागो राम व कृष्णाजी नारायण ऐसें बसोन लोहाराकडून कुलुपें तोडून जामदारखान्याचा शोध केला. त्यास आंत गोप सोन्याचे साहा मिळोन अजमासे नवद तोळे व नख्त सत्याणव रुपये याप्रमाणें सांपडले. बाकी जिनाचें सामान व भांडी व कापड वगैरे किरकोळ रेजगाण आहे, त्याचे मोजदादीस कृष्णाजी नारायण यांस ठेविले आहेत. ते व नारो राम मिळोन मोजदाद करितील. तिसरा जामदारखाना खर्चाचा भुजंग नाइकाचे हवालीं होता, त्याचें किल्ली कुलूप त्याजवळच होतें, त्या जामदारखान्याचा शोध केला. त्यांत अजमासे शेताळितशें रुपये सांपडले. पैकी दोन हजार बागलकोटी, बाकी चांगले, याप्रमाणें सांपडलें. मोजदादीचें काम चालीस लागलें आहे, तें जाहालें म्हणजे तपशिलवार जाबता मागाहून शेवेसी लेहून पाठऊं. जामदारखान्याचे स्थलाचा भूमिगत शोध करावा कीं न करावा याची काय ते

नाइकाची चौकशी करणें आहे, याजकरितां त्यास पुणियास आणिले आहेत. लस्करांत पाठवावयाची आज्ञा जाहाली तर पाठऊन देऊं. जामदारखान्याची कुल माहितगिरी शेटी जामदारास होती. तो सांपडता तरी सर्व ठिकाण लागतें. त्याचा शोध करावयास नारो राम व माणिकराव यांस निक्षून ताकीद केली आहे व लक्ष्मण नारायण तेथें असतां माणसेंहि शोधास लाविली आहेत. ठिकाण लागल्यावर लेहून पाठऊ. नारो राम गेल्याचे सूचनेनें पळाला. लक्षुमण नारायण याणी शोध बहुत केला, पुढेंहि करावयास सांगितला आहे.

नारो राम याजबराबर पांच पागा स्वामीनी पाठविल्या. त्यास बारामतीचा बंदोबस्त जो व्हावयाचा तो याचे पूर्वीचें स्वामीचे प्रतापें होऊन आला. त्यास पागा प्रतिनिधीचे कुमकेस रामचंद्र गणेश याजकडे पाठवावयाची मर्जी असल्यास आज्ञा व्हावी. येविशी स्वामीस लक्ष्मण नारायण याणी बारामतीहून लिहून पाठविलें आहे. त्यास याची काय ते आज्ञा जाहाली पाहिजे. पागापैकी तूर्त मानसिंग खलाटे व गोविंदराव परांडे दोन पागा बारामतीस ठेऊन बाकी तीन पागा पुण्यास आणिल्या आहेत. येथें दाणावैरण पुण्याचे बेगमीपैकी द्यावी लागते व बारामतीस गला वैरण आहे ती तेथें पागा आहेत आज्ञा करावी. हा ऐवज सांपडला त्यापैकी नागो राम वगैरें पागास स्वामींनीं ऐवज रोजमऱ्याचा वगैरे देविला; त्यास, या ऐवजीं च्यार हजार रुपये व बाकी राहिले ते मामलतीचे ऐवजीं येणेंप्रमाणें देविले:

बारामतीचे मामलतीपैकी बाकी अजमासे रुपये १००००, दाहा हजार राहिले होते, त्यास रयेत तजावजा होऊन गाव वोस होत होते, त्यास लक्ष्मण नारायण याणी रयेतीस दिलदिलासा देऊन हप्ते बांधून दिल्हे रुपये:

३००० तूर्त.
३५०० अधिक चैत्र वद्य येकादशी
३५०० चैत्र शुद्ध एकादशी
———
१००००

येणेप्रमाणें दाहा हजार रुपये घ्यावयाचा करार केला, त्यास येथून गाडदी व हशम व स्वार पाठविले होते. त्यांस व आंता नेहेमीं ठाण्यांत लोक ठेविले आहेत त्यांस मिळोन पांच साहा हजार रुपये खर्च होतील; बाकी च्यार हजार रुपये राहिले ते नागो राम वगैरे पागा यास स्वामींनीं ऐवज देविला त्यापैकी लाऊन दिल्हा.

बारामतीस शिंगरें चांगलीं आहेत त्यांस तेथें बरकडवाडीचें ठाण चांगलें आहे. स्वामीची मर्जी तेथें शिंगरें व पसा घोड्या ठेवावयाची जाहाल्यास तेथें वैरण जरूर असिली पाहिजे.

त्यांस खर्च होत आहे. येविशींची काय ते आज्ञा जाहाली पाहिजे.

याजकरितां लक्ष्मण नारायेण याणी नवे गवताची गंज जपोन राखोन ठेविली आहे. त्यास येविशीची काय ते आज्ञा जाहाली पाहिजे.

सविस्तर उत्तर पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. शेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Nana Fadnis submits to the Peshwa an inventory of the belongings of Babuji Naik and the contents of his Jamdarkhana confiscated by the Peshwa's order. He also mentions the arrangements that were made for supplying fodder, etc., to the horses and cattle attached.*

No. 96] [*5-4-1766*

पो छ २४ सवाल
सन सीत चैत्र अधिक

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी छ ६ सवालची पत्रे जासुदाबा पा ती पावली. श्रीमंतची पत्रे श्रीमंतास वाचून दाखविली. जाब मागाहून पाठवितो. आज श्रीमंत परलीस गेले आहेत. देवलाचे जाग्याचे पत्र पाठविले, तेणेकरून संतोष जाहाला म्हणोन पत्री आज्ञापिले व सेवकास बहुमानपुरसर लिहिले तेणेकरून आनंद जाला त्यास पार नाही. येविसीची पुरवणी श्रीमंतास होती ती दाखविली. पाहून हास्य केले. स्वामी सर्वज्ञ आहेत तेथे विस्तार काये लिहिणे, आपले भक्तीनरूप श्रीमंतानी कृपा करून जागा दिल्ही. कलावे हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis, mentioning how very gratified the writer was at the Peshwa having kindly given the addressee the spot, viz. the Belbag, to build his temple. This request had been once refused by the Peshwa.*

No. 97] [*Recd. 5-4-1766*

पो छ २४ सवाल सन सित चैत्र अधिक.

श्री

विज्ञापना. बाबूजी नाइकाची जफ्ती करावयाची याजकरितां राजश्री लक्ष्मणपंत देशमुख बारामतीस पा. राऊत व पाईचे लोक रवाना केले, माणसें सांपडलीं, उत्तम गोष्ट जाली. आपलें पत्रापूर्वी येथें पत्र नारोपंताचें बारामतीहून आलें होते

येथून पत्र गेलें कीं, पुण्याहून कारकून आले आहेत, त्याचे गुजारतीनें सर्व मोजदाद करून पुण्यास पाठवावें. माणसें पुण्यास रवाना करणें. लक्ष्मण-पंतांनीं वस्तभाव व माणसें घेऊन पुण्यास जावें, असें लिहिलें आहे. येविशी आपणांस सरकारचें पत्र गेलेंच आहे. बायकाचे व मुलांचे आंगावरील नग काढूं नयेत, याप्रमाणें लिहिलें आहे. पुण्यास माणसें पावल्यावर बंदोबस्त करावा. आपलीं पत्रें आलीं त्याचे जाब मागाहून पाठवितों. बाबूजी नाइकाकडील गांव शीव, महाल, लस्करांतून जप्त जाले. वानवडीचे बागेची काा मी करून घेतली त्यास * * नाइकाकडेच होता म्हणोन ऐकिलें. त्यास मर्जीस आल्यास मजकडें कमावीस सांगावी. बागास उपयोगीं पडेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the confiscation of the property of Babuji Naik.*

No. 98] [*8-4-1766 ?*

छ ८ जिल्हेज

श्री

राजश्री मोरोपंत दादा स्वामी
गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो माहेमाजी सिंदे रामराम विनंती. येथील कुशल ताा छ २७ शवालपरयेंत जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. मीर अली रजाखान वगैरे हुजूर कैदेंत होते, ते सुटोन येऊन पटणास पोंहोंचल्यानंतर आम्हांस हैदराने बहुमान करून जवाहेर तुरा व सिरपेंच वस्त्रें देऊन निरोप दिल्हा, ते येऊन पौश वद्यें शस्टी गुरुवारी[1] सुमुहूर्तेंकरून सिन्यांस सुरक्षित पावलों. या उपरी श्रीमंताचे व आपलें दर्शनास त्वरेनेंच येत असों; कळावें. वरकड मजकूर श्रीमंताचें पत्रावरून कळेल, व सहश्रायु चिरंजीव वेंकाजी सिंदे याचे पत्रीं सविस्तर मजकूर लिहिला आहे. वर्तमान निवेदन करितील तेणेप्रमाणें आपण बंदोबस्त करून घ्यावा. बहुत काये लिहिणें, कृपा निरंतर करीत जावी, हे विनंती.

¶*Mahimaji Sindia writes that he was released and given an honourable send-off by Haidar Ali in exchange for the release of Mir Rejakhan from the Peshwa's confinement.*

---

(१) २-१-१७६६.

√ *No. 99*]

[पो *13-4-1766*
[*9-3-1766*

पा छ ३ जिलकाद
सीत चैत्र वोंडसे मुा.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री दादासाहेब
वडिलांचे सेवेसी

विनंती. राजश्री बापूजी नाईक यांणी हैदरनाईकासी स्नेह केला, कागदपत्र याचे त्यास, त्याचे यास, यांणी त्यांस घोड्या पाठविल्या व कांहीं राउतहि चाकरीस पाठविले, हें वर्तमान कळलें तेव्हां मशारनिलेचा संशये जाला. सदरहूप्रमाणें त्याचें आंगीं लाविलें, तदोत्तर त्याजकडे दोन किले होते ते मागितले. किल्याच्या चिठ्या मशारनिलेनीं दिल्या असतां अंतस्त किले न देणें यैसें किलेकरांस लिहिलें हेंहि कळलें. मातबर मनुष्य, भलती गोष्ट करूं नये, यास्तव विचारेंच सांगत गेलो. राजश्री भगवंतराव व भवानराव याचा कजिया. भवानराव भगवंतरायांस भारी पडले. भगवंतराव खानापुरांत, भवानराव बाहेर, त्यांची कुमक करावी, फौज पाठवावी, यास्तव राजश्री रामचंद्र गणेश पांच हजार स्वारांनशी कुमकेस रवाना केले, ते साहा कोसावर जाऊन उतरले. पथकें नेमल्याप्रमाणें मशारनिलेकडे जात होतीं, त्यांस मशारनिलेनीं रदबदल केली कीं, आमच्या लोकांस रामचंद्र गणेश यांजबरावर चाकरीस पाठवावें, यैसें गवगवा करितात म्हणोन. त्याजवरून नाईक मशारानिलेचें पथक रामचंद्र गणेश याजबराबर रवाना केलें. शिलेदार व पागा व दोन हत्ती नाइकांनीं पाठविले. हे सवड सांपडली याजमुलें लांबवालांबव करून आपण सडे पंचवीसा स्वारांनशी राहिले. किलेकरी किले देत नाहीं यैशीं पत्रें अस्तमानीं छ २६ रमजांनीं आलीं. उदईक नाइकास पुसावें, निग्रह करणें तर करावा, असा प्रकार होता. त्यास नाइकांनीं छ २६ रमजांनीं दीड प्रहर रात्रीस जीन ठेऊन पलोन गेले. बातमी येतांच पागा व पथकें पाठीस लाविलीं. त्यांनीं पिछा धारूरच्या घाटावर करीत कळंब दत्ताजी ठाकूर देशमुख धारुरकर यांचे गांवांजवळ दृष्टादृष्टी होऊन दोन घोडीं च्यार तटें पाडाव केलीं. नाईक गावांत पंनास पाऊणशें राउतांनसी गेले. सरकारचे शेंसवाशें राऊत. हेहि थकले, तेहि थकले. जागांजागां चौकीस राऊत रामचंद्र गणेश यांनीं बैसविले असतां छ २७ रमजांनीं मध्यरात्रीस बाबूजी नाईक सोळा स्वारांनशी कळंबातून निघोन, आपले आपले म्हणोन, सोलापुरास गेले. सोलापुरास राजश्री जगनाथ बाजी अगोधर पाठविलेच आहेत, त्यानी ठाणेबंदी केली आहे व करितात. कलंबकर देशमुख धरून

6374

आणिला आहे. मशारनिले उपद्राप काये काये करितात तसतसा त्याचा प्रतिकार करणें प्राप्त जाहालें. हें सविस्तर वर्तमान वडिलांस कळावें याजकरितां लिहिलें असे. सारांश, बाबूजी नाइकास मातबर कारभार करणें तेव्हां सोलापुरांत बैसोन होतो यैसा अर्थ नाहीं. तेव्हां बाहेर निघोन उपद्राप करतील तर बाहेर निघालियावर समजोन घेणें तसें घेतलें जाईल. किंबहुना दक्षणेकडे जाऊन हैदरनाईकास मिळोन उपद्राप करतील तर तिकडे आमची मोहीमच आहे. दोघांचेंहि पारपत्य जें होईल तें केलें जाईल. हे दोन्ही प्रकार न करितां किल्यातच राहून उपद्राप करितील तर पांच हजार फौज ठेऊन त्याचा उपद्राप निर्फळ होये ते करून. जरी पुंडावे न करितां स्वस्थ राहतील तर हजार पांचशें राऊत ठेऊन निश्चित राहात तें करून. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*The Peshwa reports to his uncle (who is on his way to the north) how Babuji Naik became disaffected and how measures had to be taken to restrain him. Babuji Naik, says the letter, kept secret correspondence with Haidar Ali, and sent him presents. This naturally roused the Peshwa's suspicion and the Naik was asked to surrender the forts in his charge. While outwardly professing submission the Naik instructed his servants not to deliver the forts and himself with a few followers, managed to escape from the Peshwa's camp and shutting himself in the fort of Sholapur refused to deliver the place. The letter is important in as much as it explains the causes of Babuji Naik's defection, a point which hitherto was not clear.*

No. 100] [पो *14-4-1766*

पो छ ४ जिलकाद

श्रीभवानीशंकर

श्रीमंत कृपासागर रा दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक गोविंद यादव सिधये बातमीनवीस आवरंगाबाद करद्वये जोडून सां नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. बहुत दिवस जाले, आभयेपत्र स्वामीकडील आले नाही. सेवकावर कृपालु होऊन पत्र पाठऊन तोषवीत जाणे. तेणेकरून चिताचे समाधान होईल. छ १९ माहे शवालपावेतो बातमी लिहून सेवेसी पाठविली ते वाचून पावलियाचे पत्रोत्तर पाठऊन सांभाल केला पाहिजे. कासीद जोडिया पाच याची परवानगी देऊन सेवकाकड रवाना कराव्या.

6375

मुकाम मनरथ तेथून बाबूजी नाईक पलोन कलम गावास रातोरात वीस कोस गेला. याचे मागे फौजा मागे पाठविल्या. कलमगावातून यादोराये जगताप याने आपली घोडी देऊन बाबूजी नाइकास इटकूरमांडव पोचाऊन तेथूनहि पुढे सोलापूरचे किल्यास पावते करून यादोजी जगताप आपल्या गावास आला तो फौज मागे लागली होती. कलमचे देशमुखास धरले. त्याने यादोजी जगतापाचे नाव घेतले की, आमचे गावातून त्याने घेऊन गेला. ते फौज इटकुर मांडवेस जाऊन यादोजीस धरून त्याचे घराची वस्तभाव सर्व घेऊन व कलमचे देशमुखास धरून बमये कबिले व त्याची वस्तभाव हजूर घेऊन आले. यादोजीने श्रीमंतासी जाबसाल केला, पोटचे द्यावे, पाठीचे न द्यावे; त्यास, आपल्या चरणापासी आलो, जे उत्तम दिसेल ते करणे. बाबूजी नाइकास पोहचविले खरें. आता स्वामीस करतव्य असेल ते करावे. त्यावरोन श्रीमंत रावसाहेबी आज्ञा केली की, याचे सिरछेद करा. आज्ञाप्रमाणे तो मुक्तीस पाठविला. बाबूनाईक सोलापूरचे किल्यात दाखल जाला. किल्याची बंदोबस्ती करून सर्व सरंजाम किल्यात केला. फौजेवर बाबूजी नाइकाने छपा घातला. से दोनसे माणसे स्वार मारून किल्यास दाखल जाला. पागाचा सरदार ब्राह्मण कऱ्हाडा तो मेल्यावर फौज माघारे फिरली. बाबूजी नाइकाची पागा धाकटे नाना याने उंट व पालखी वस्तभाव सर्व हजूर घेऊन आले. जागा जागा ताकीदपत्रे गेली आहेत की, ज्याचे गांवाचे बाबूजी नाईक निघोन जाईल, यादोरायाची गत होईल, घरदार खालसेस लागेल.

बाबूजी नाइकाचे पुत्र व स्त्री बारामतीस धरले. घरावर चौकिया बसविल्या. सोलापूरचे किल्यावर विसाजी बिनीवाला व नागोराये राहोरी वामोरीकर व आणीक सरदार पाच हजार सवार पाठविले.

मोरोपंत कारकून बाबूजी नाइकाचा तो धरला आला, त्याने सर्व वर्तमान सांगितले. सिवराम नाईक वाघोलीवाला याजवर चौकी बसविली आणि कोन्ही चुलतभाऊ बाबूजी नाइकाचा होता याजवरहि चौकी बसविली होती. पाचं दिवस होती, मग सखाराम बापूने याच्या चौकिया उठविल्या. पैका अंतस्थ मध्यावर्तीही घेऊन उठविल्या हे वर्तमान सर्व कलले असेल. परंतु सेवकास कलले ते सेवेसी लिहिले.

जगनाथपंत व मीरमुसाखां व सेरजंग व धोंडो राम वकील व कृष्णराव बलाल श्रीमंत रावसाहेब यांचे भेटीस आले. येक प्रहरपरियेंत खिलबत जाली. जे जे मतालब होते ते त्याचे करून कागदपत्र करून देऊन त्याजला रुखसत करून

6376

दुसरे दिवसी रावसाहेबी कूच केले. पोहनेरजवळ गंगातीरास मुकाम केले. तेथे निंबालकर माहाराव व जाधव चेंद्रसेन भेटीस आले. परस्परे भेटी जाल्या, वस्त्रे पांघुरणे व हस्ती देऊन रुकसत करून दुसरे दिव(सी) रावसाहेबाचे कूच होणार. पुण्यास जावे हे येक बोलवा व येक नासिक प्रांत जावे यैसे वर्तमान आहे. पुढे जे वर्तमान कलेल ते लिहून पाा.

निजामआलीने धारू(र)चा किला पाहून हैदराबादेस जाणार आहे. नवाबाची इतराजी दारकबाईवर आहे यैसे दिसोन येते. बीड माहाल जफ्त करावा यैसा हेत नवाबाचा आहे.

सदासिव रामचंद्रास नवाबानी सांगून पाठविले की, आवशाचा किला आम्हास द्या. त्यावरोन सदाशिव रामचंद्राने किल्या(स) सरंजाम करून खबरदार जाला. किला बलकाऊन बसला. नवाबासी व सदासिव रामचंद्रासी चित शुध नाही. सर्व सरदार बेदिल जगनाथपंताने केले.

साहेबजादियास येलंग दलाकडे फौज देऊन रवाना करणार

महमद आलीखा आरकाटचा सुबा व फिरंगी यैसे बाजवाडास आले हे खबर नेमिदास साहुकार याचे दुकानी आली ते सेवेसी लिहिली. पुढें जे होईल ते लिहू(न) पाा

शाह सवारजंगाने इकड धामधूम मांडली आहे. पाच हजार स्वार, च्यार तोफा, त्यापासी. फुलबारी वगैरे परगण्यांत खंडणी घेतो. गोदरी लुटली.

राजाराम बाबूराव हे फौज ठेवितात, याचा काये इरादा आहे तो कललियावर लिहून पाा.

जाणोजी भोसल्यासी व नवाबासी भेटी जाल्या नाहीत, या उभयेताचे मध्यावतीत इसमाइलखा होता. रंगोपंत वकील होता तो मेल्यावर तो मजकूर तसाच राहिला. जाणोजी भोसले इनामपुराकडे गेले. कळावे हो लिा.

हैदर नाइकाने फोजचा जमाव केला. महमद अलीखा व फिरंगी व पठाण बसालतजंगास समागमे घेऊन हैदराबादेस यावे हा त्याचा मनसुबा आहे.

¶*This is an important news-letter from Govind Yadav to Raghunathrao describing the pursuit of Babuji Naik by the Peshwa's forces and the stern punishments inflicted by him on his partisans. It should be noted that Chandrasen Jadhao is mentioned as still living.*

No. 101] [15-4-1766

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री रामचंद्र गणेश गो

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही गोपाल नाईक तांबेकर यांजपासून वीस हजार रुा घेऊन पुण्यास राजश्री बालाजी जनार्दन यांस लिहून पाा कीं, हे वीस हजार रुा नाइकास द्यावे व दुसरे पंनास हजार रुा खर्चास पाठऊन द्यावे; नाही तर तुम्हाजवल येऊ, म्हणौन तुम्ही यास लिहिले. त्याणी लस्करांत लेहून पाठविले. ऐसियास पुण्यास ऐवज नाही. त्यांचीच खर्चाची वोढ. असे असता तुम्ही चिठी केली ही गोष्ट अपूर्व आहे. व दुसरे पंनास हजार पाठवणे म्हणौन त्यास लिहिले, याचा अर्थ काय ? तुही तिकडे फौजसुधा गेला आहा. राजश्री भवानरायांचे बंडात मिलाले असतलि त्यांची ठाणी घ्यावी, मुलूक जप्त करावा, पैका मेलवावा, पोट परभारे भरावे. असे जाते समई सांगितले असतां पुण्यास चिठ्या करितां हे काय ? पुण्यास ऐवजाची चिठी न करणे. तिकडील बंडांत मिलाले आहेत त्यांचा मुलूक जप्त करून पैका मेलऊन फौजेस रोजमरा देणें. पुण्यास ऐवज आहे नाही हे तुम्ही जाणतच आहा. जाणिजे. छ ९ जिलकाद सुाा सीत सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa gives Ramchandra Ganesh a strong reprimand for writing to Poona for money and asks him to raise it by confiscating the property of persons who had joined Bhavanrao.*

No. 102] [17-4-1766

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री बाबूजी नाईक यांजकडील वस्तभाव सरकारांत ऐवजसुधा आली. त्यास वस्तभाव होती ती दिल्ही नाही. त्याचा निकाल राजश्री गोविंद सिवराम याचे विचारें जाला, त्याप्राा करून निकाल करून दिल्हा म्हणौन लिहिले व त्याजकडील ऐवज जिनस आला त्यास ऐवज लाऊन दिल्हा, येविसींची याद तपसीलवार पाठविली ती पावोन लिहिले वर्तमान

सविस्तर कळले. तोडमोड करून निकाल काढिला, उतम गोष्ट केली. नाईक बारामतीस आहेत. वर्षप्रतिपदेस गंगातीरास टोक्यास जाणार. तेथे दोन माहिन राहाणार म्हणौन लिा ते कळले. रा छ ७ जिलकाद बहुत काय लिहिणे? हे विनंती.

¶Peshwa Madhaorao expresses to Nana Fadnis his pleasure at the successful termination of Babuji Naik's dispute reported by the latter.

No. 103] [Recd. 22-4-1766

पो छ १२ जिलकाद
सीत चैत्र

श्री

विज्ञापना. स्वामीनी पत्र पा तें पावले. सरकारचा[1] लाखोटा श्रीमंतानी अक्षरशा वाचून पाहिला. जाब त्याहावयास मजला सांगितला की, माझे चितात ये गोष्टीचा संशय कांहीं नाहीं. नानानी इतका इतिहास कशावरून लिहिला? मी विनंती केली की, कदाचित स्वामीचे चितात संशय येईल याजकरितां तपसीलवार वर्तमान कळावें म्हणोन लिा. उतर सरकारचें आहे त्यावरून कळेल. सारांश गोष्ट, आपलेविसी श्रीमंत दुसरा विचार जाणतच नाहीं. हे विज्ञापना.

¶Haripant reports to Nana the words of the Peshwa on the receipt of his letter. The Peshwa said " Why should Nana write such a long explanation when I have not any suspicion in my mind about him?"

No. 104] [Recd. 22-5-1766

२ पुरवणी
पैा छ १२ जिल्हेज.

श्री

सेवेसी पांडुरंग कृष्ण गोडबोले सा नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री रावसाहेबांची स्वारी हाली मनरथाकडे आहे. मोगल भागानगराकडे जाणार. राजश्री बाबूराव सदासिव याजकडे वंदनचा किला व सोलापूरचा किला सरकारात घेतला, त्यास सोलापूरचा किल्यास सरकारचे लोक गेले आहेत. त्यासी

१ पेशव्यांच्या नांवचा सरकारी लखोटा.

नाईक माारनिलेनी गोली वाजविली, याप्राा वर्तमान आलियावरी नाईक माारनिले रात्रीस तयारी करून सडे स्वार मात्र दोनतिनशानिसी पलोन गेले. मागाहून सरकारचे लोक गेले, त्यास फौजे कलंब पाा बीड येथे आढलेले. परंतु मौजे मजकुरात गेले. तेथील पाटिलाने सोलापुरास काढून दिल्हे. यावरी पाटिलाचे डोके मारिले व घरदार जप्त केले. बारामतीस चौकी पाा आहे. श्रीमंत राजश्री राव-साहेब श्रीगोंदेस येणार होते, परंतु हे मसलत लांबली म्हणोन तूर्त येणेंहि अवकाशावरी आहे. राा गोपालराव गणेश याणी राजश्री आपाजी गणेश याचे फौजेवरी दगा करून छपखूनं+ करून काही लोक लुटिले व बाकीचे पलोन गेले. माारनिले तो फोजेतू(न) दमाजी गाईकवाड याजकडे गेले होते. मागे हे वृत्त जाले. येणे प्राो. नासिकात वर्तमान आले. जवारचे राज्यास त्याचे भावाबंदानी दगा करून जिवे मारिले. आसमंताद् भागे जवार प्रांती धामधूम करितात. अणकाई ठणकाईकर याणे किल्याभोवती धामधूम केली आहे. पाटील धरून नेऊन नागवितो. वाटेने मार्ग मारितो. साहुकार वगैरे मार्गी येवजसीर दाहा पंधरा कोसी असल्यास दगा करून धरून किल्यास नेऊन मालमवेसी घेऊन खंडहि घेतो, याप्राा हे गडबड करितात. वरकड वर्तमान यथास्थित आहे. जाले कलले ते सेवेसी लिाा आहे. स्वामीचे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. बाबू भागवत सौ मातुश्री बाईसाहेबासमागमे स्वामीकडे आज्ञेप्राा येतच होता, परंतु स्वारी राहिली यास्तव चांगली सोबत मिलेतोपर्यंत राहिला आहे. परंतु बाबूची साहेबापासी विनंती आहे की, जर चांगली सोबत लवकर न मिलाली तरी पुढे सौ मातुश्रीबाईसाहेबाची स्वारीसमागमे यावे तोपर्यंत आंनदवलीस देवासनिध चाकरी करावी. तरी साहेबांचे मर्जीस आले तर कृपा करून याचे विनंती ध्यानात आणून आज्ञा करणे ते केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Pandurang Krishna Godbole reports, to Nana Fadnis the doings of Babuji Naik and the scuffle between Gopalrao Ganesh and Appaji Ganesh in Gujarat.*

No. 105] *[23-5-1766*

श्रीव्यंकटेश प्राा

पुाा श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ १३ जिल्हेजीं श्रीमंताकडून साडणास्वार आले व जोडींहि आली. त्यांत मजकूर, धोंडोपंत यास आज्ञा होती कीं, कसेंहि करून नवाबाचा

+ Secretly.

6380

मुकाम करवणें अगर माघारे नवाब कूच करून कृष्णातीरास येत यैसें केल्यानें तुम्ही येकनिष्ठ सेवक, यैसें बहुता प्रकारें लिहिलें होतें; व त्याच अन्वयें नवाबास व रुकनुदौला(स) पत्रें खालिते होते, त्याचे जाब दिल्हे. त्यांत अन्वये पूर्ववत प्रमाणेंच लिहिला. भिकनखान व राजाराम गोविंद श्रीमंतापासून स्वार होऊन इकडे जाबसालाकरितां निघाले आहेत. आज उद्यां येतील. यथें आल्यावर त्यासी उत्तरें कशीं करितात तें पाहावें. सर्व लक्ष रुकनुदौला आपल्याकडे ठेवितात. आपले विचारा शिवाये नाहींत. जें करणे तें कायम तेंच करावें. ज्यांत पेंच याजवर न ये व आपणांवरही न ये तें मजबुतीनें करावें. दुसरे विचारांत पडों नये. जें करणें तें बळकट करावें. इकडील गुंता किमपि राहिला नाहीं. हें विनंती छ १४ जिल्हेज. हें विनंती.

¶*The Peshwa is informed of Raghoba's attempts to arrange that the Nizam does not march onwards or, preferably, returns to encamp on the river Kistna.*

No. 106] [*31-5-1766*

पो छ ३ मोहरम सबा जेष्ठ.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २१ जिल्हेज मुाा नजीक चित्रदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान, श्रीमंत येथें आले. दोन च्यार दिवसात तुंगभद्रेवर जाऊं. दरमजल पुण्यास येत असेत. कलावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs Nana Fadnis of the movements of the Peshwa's army on his return journey from the South.*

No. 107] [*15-7-1766*

घडणी रु. नं.

५१२.

श्री

यादी राजश्री बाबूराव सदाासिव यांजकडील कलमे सुाा सबा सितैन मया व अलफ.

आपली वस्तभाव घोडी व हती व उंटे व गुरे व कापड व पैका व दाणा व भांडीं वगैरे सुतलीचा तोडा आदीकरून जे आणिले असेल ते माघारे द्यावे. काही ठेऊ नये. कलम १

आपल्यामुळें यादव जगथाप व दताजी ठाकूर वगैरे याची वस्तभाव घोडी व मुलेमाणसे, वतन, पैका जो घेतला असेल तो माघारा द्यावा. जफ्ती मोकली करावी. कलम १.

सरकारांतून जप्ती झाली असेल ती मोकली करावी. त्यांस सोडावे. वस्तभाव आली असेल ती माघारी द्यावी. येणेप्रमाणे करार[2].

जप्तीमुले सरकारात वस्तभाव कुल जी आली असेल ते जराबाजरा[1] देविली जाईल. जप्तीमुले वस्तभावेची तसनस जाली असली तर चौकसीमुले ठिकाणी लागल्यास ताकीद करून देविली जाईल. येणेप्रो करार[2].

कमावीसदार व सोहिरेधाईरे व चाकरलोक यांची वस्तभाव पैका घेतला असेल तो जराबाजरा माघारा द्यावा. त्यांस सोडावे. जामीनकतबे माघारे द्यावे. कलम १

सरकारात आले असेल ते माघारे द्यावे. त्यास सोडावे. कतबे जामिनापासून घेतले असतील ते माघारे द्यावे. येणेप्रो करार[2].

मागील हिसेबाचा लांझ्या[3] आपल्यास पुसूं नये. हिसेब पावल्याचे अभयपत्र देऊन हरयेक जागा पोट भरावयास निरोप द्यावा कलम १

सदरहूप्रो तुम्ही विनंती केली त्यावरून तुम्हास कबज दिल्हे असे. तुम्हाकडे लांझ्या नाही. येणेप्रो करार[2].

जाबसालास रामचंद्र गोविंद व दाहा पांच कारकून येतील त्यास अभये असावे कलम १

जाबसालासाठीं यावे. उत्तम आहे. येणेप्रो करार.

सरकारचीं कलमे :

१ सोलापूरचा किला सरकारांत आल्यापासून आजपर्यंत जकिरा व जंगी सामान असेल ते कुल सरकारचे, त्यासुधां किलां सरकारांत द्यावा. माध्यस्ताचे हवाली करावा. तुमची वस्तभाव माध्यस्थाचे हवाली करावी. किला हवाली जाला म्हणजे कराररप्रो वस्तभाव फारखती द्यावी.

१ सरकारचे सिलेदाराची वगैरे घोडी वस्तभाव जी नेली असेल ती सोडून द्यावी. सोलापूर व अहीररवाडी येथील तालुकियाचे पाटील व लोक नेले असतील ते सोडून द्यावे.

१ नवद हजार रुा तिगस्ता कर्नाटकचे स्वारीस सरकारात घेतले आहेत ते मागू नयेत. खते माघारे द्यावे.

—

३

येणेप्रो तीन कलमे करार[2]

छ ७ सफर आषाढ मास

¶*Babuji Naik, on his defeat, enters into an agreement with the Peshwa; the terms of the agreement accepted by the Peshwa are also given in this paper.*

---

१ लहानमोठी. २ मखलासी हरिपंताच्या हातची असून 'करार' थोरल्या रावसाहेबांच्या हातचा. ३ लफड.

6382

No. 108] [11-12-1766

पो छ १२ रजब सन
सबा सितैन.

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ ८ रजबी मुाा नाझरें+ वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत या मुकामास आल्यास दोन दिवस जाले. श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री रमाबाई आज येथे येतील. या तलावर आणखी येक दोन मुकाम होतीलसे दिसतें. पुढे सुरापूरचा रोख आहे. राजश्री बापूजी नाईक याजकडील राजकारण लागले आहे. सिधीस जाईल तें सेवेसी लिहून पाठऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writing to Nana Fadnis communicates the movements of the Peshwa marching towards Surapur.*

No. 109] [13-12-1766

श्री

तीर्थरूप राा दादासाा वडिलांचे सेवेसी

आपत्ये माधवराव साा नाा विाा येथील कुशल ताा छ १० रजब मार्गसार सुध द्वादसीपर्यंत वडिलांचे आसीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. सांप्रत वडिलाकडून आसीर्वादपत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सविस्तर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर नवाब निजाम अलीखान भागानगरीच आहेत. फिरंगियाचा त्याचा तह जाहाला. हैदरखान कोयेमतुरास कोडग व अनंतसेनच्या राज्याचे शाहावर आहे. त्याजकडील मीर फैजुला व मीर रेजा फौज आठ सात हजार, बारा हजार गाडदी व तोफखाना घेऊन फिरतो. त्यानी गुमनाडपाले घेऊन तेथे ठाणेबंदी करून रायेदुर्ग प्रांते आले. बलारी, रायेदुर्ग हरपनहली, चित्रदुर्ग वगैरे संस्थानास पैका खंडणीचा मागतात. राज्य खराब करू म्हणोन लिहिले, त्याजवरून कुल संस्थानिकानी पत्रें पाठविली कीं, उपराला करावा; नाहींतर येवनाक्रांत संस्थानें होतात म्हणोन, त्यास तेथून फौज पाठऊन उपराला करावयास फौज कोठे आहे? जे आहे ते वडिलास विदित असे. उगाच दबा(व) टाकीत आम्ही कृष्णातीरास जातों. या दहशतीने हैदरखानाचे सरदार निघोन गेले तर उत्तम आहे. केवल राा गोपालराव गोविंद व रास्ते याचेच

+Near Pandharpur.

दबावानी ते जातील असा प्रसंग नाहीं. पुढे होईल ते वर्तमान सेवेसी लेहून पाठऊन. महंमद अलीखान व इंग्रेज चेनापटणास आहेत. भोसले नागपुरास आहेत. वडिलाकडे फौजेची निकड याजकरिता भोसल्यास व रा दामाजी गाईकवाड यास वरच्यावरी पत्रें पाठवितो. हाली कारकून पाठविले आहेत, ते उभयेतास निकड लाऊन वडिलाकडे रवाना करितील. वडिलाकडूनहि उभयताकडे पत्रे व हरकारे येतच असतील. अत:पर ते उभयेता येऊन पोहोचतील. भोसल्याचे पत्र हिंदुस्तानास जातों म्हणोन आले होते. नवाबानी रा कृष्णराव बल्लाल यांस बोलाविले त्याजवरून मारानिलेस नवाबाकडे रवाना केले, तो मजकूर दोन तीन पत्री सेवेसी लिहिलाच आहे. मारानिलेस नवाबाजवळ पाऊन पत्र अद्याप आले नाही. मारनिले नवाबाकडील मजकूर लिहितील तो सेवेसी लिहून पाठऊन. वडिली तिकडील वर्तमान वरचेवरी लिहावयास आज्ञा करीत जावी. त्या प्रांतीचे वर्तमान आपल्याकडील कलत नाही. त्यास वडिली आज्ञा करून त्या प्रांतीचे वर्तमान लिहावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhavrao writes to his uncle Raghunathrao that he intends to march into Karnatak to resist Haidar for levying contributions from the Chiefs of Bellary, Chitradurg and other places which were under his protectorate ; he also states that Damaji Gaikwad and Janoji Bhonsle are directed to proceed towards the north to join the addressee ; the movements of the English and the Nizam are also alluded to.*

No. 110] *[16-12-1766*

पौ छ १८ रजब सबा[1]
मार्गसीर्ष बा यमाजी
खिजमतगार

श्री

[2] सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १३ रजब मु होनूर पा जत स्वामीचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष. पा इंदापूर येथील फडशा जाला, त्या यादी आपणाकडे पाठविल्या आहेत, त्यावरून कलेल. पांच यादीपैकी येक ताकीदपत्राची याद होती ती येथे ठेविली; नकल करून पाठविली असे. राजश्री कमलाकरपंत याजपासून दाहा हजार रुा घ्यावे, याप्रो करार जाला. राजश्री बापूनी रजबदल फार केली, त्यावरून इतका फडशा

---

१ पैवस्ती नाना फडणिसाची. २ पत्र हरीपंताचें.

जाला. नाही तर मोठ्या घोळांत पडते. राजश्री माधवराव मामा निरोप घेऊन पंढरपुराकडून पुण्यास गेले. कोकणचे हिसेब पाहावे म्हणौन आज्ञा जाली. सरंजाम पांच हजाराचा द्यावा म्हणौन गतवर्षी करार केला होता. त्यास गाव दिल्हे नाही. पांच हजाराची वरात इतलाख बालोबावर दिल्ही. पुढील साला-पासून पाच हजार इतलाख येकाधे माहालाकडे लाऊन द्यावे, याप्रों करार जाला आहे. कलावे. वरकड इकडील वर्तमान सोलापुराकडील रसायण लवकर होइलसे दिसत नाही. दरमजल सुरापुराकडे जात असेत. कलावे, सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना. बाबूजी नाइकाचा सला होत नाही. लाख रुा जाजतीस, साठ हजार पागा, हे कबूल जाले, परंतु ते ऐकत नाही असे जाले. पुढे होईल ते लिहू. हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana the disposal of several matters effected by the Peshwa and the failure of the negotiations with Babuji Naik.*

No. 111] [*20-12-1766*

पो छ २१ रजब सन
सबा सितैन ब्रा मुराद साडणीस्वार

श्री

विज्ञापना. ताा छ १७ रजब मुा मौजे इभरामपूर पाा हिपरगे वर्तमान यथा-स्थित असे विशेष. इकडील वर्तमान आज कूच जाले. सुरापूरकराचे तालु-क्यात मुकाम होईल. त्याजकडील वकील आले आहेत. बाबूजी नाइकाचे पहिले बोलणे आपणास लिहिले होते. त्यास नाईक म्हणतात कीं, आमचे घोड्यास खर्च लागला तो आमचे पैक्यात वजा करू नये व पन्नास हजार सिबंदी सा महिन्यातें पडली ती द्यावी. त्यावरून श्रीमंतानी कबूल केले. रामचंद्र कृष्ण लिमये सोलापुरास पाा आहेत. बोलून आलियावर सेवेसी लिहून पाठऊ. उभयेतामध्यें ज्याची गाठ पडत्ये त्यास पुसतात की, नाना ये समई काय करीत असतील. कलेल ते ते समई जाबसाल करीत असतो. नित्य कृत्याचा प्रकार कोठवर काय ल्याहावा? विदित व्हावे हे विज्ञापना.

¶*Haripant reports to Nana Fadnis the agreement effected with Babuji Naik by the Peshwa, whose stern and inquisitive nature is incidentally alluded to.*

---

१ पेठे.

No. 112] **[22-12-1766**

पौ छ २९ रजबू

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना फडणीस
साहेबाचे शेवेसी

विनंती शेवक नारो नरसिंह कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ताा छ १९ रजेब मो कुंभारी नजीक सोलापूर जाणौन सेवकाचे वृत येथास्थित आसे विशेष. विनंतीपत्रे सेवकानें पाच सात सेवेसी पाठविली, परंतु येकहि आज्ञापत्र सादर न जाहाले, तेणेकडून सेवकाचे चित्त परम खिन्न जाहाले आहे. आज्ञेप्रो आजपर्यंत राा रामचेद्रपंतासमागमे आहो. ज्याप्रमाणे आज्ञा त्याच बरहुकूम आजपर्यंत आहे. प्रस्तुत श्रीमंताची खासा स्वारी विजापूर प्रांतीं आहे. राजश्री नाइकाचा विवेक व्हावा यैसे दिसते. दिडा लक्षाची जाहगीर द्यावी, दरम्यान राजश्री गोविंद सिवराम व विसाजी कृष्ण याणी यावे, नाइकास घेऊन श्रीमंताकडे जावे, आनकूल पडल्यास सदरहूप्राा जाहागीर घेऊन असावे, हे नच पुर्वे तरी किला सरकारात देऊन आपली चिजवस्त जराबेजरा घेऊन जावे, येणेप्रमाणे तह ठरला आहे. याच आन्वये ठरल्यास पुढे काये व्होईल ते पाहावे. शेवक तो येकनिष्ठने आजपावेतो आहे. येथील मजकूर आवघा सिबंदीचा वगैरे बारीक मोठा सेवेसी आल्यानंतर विज्ञेति करीन. जातिनिसी रामचंद्रपंत भलेच आहेत. परंतु प्रांतीचे कानड लोक ब्राम्हण मोठे कारस्थाई आहेत. सर्व गोष्टीने भलच आहेत. अवघा लटका कारभार करितात. स्वामीची तो मजला आज्ञा जे, आज्ञेसिवाय न यावे. याजस्तव विनंती लिा आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडील नेमणुकीचे कारकून व हवालदार आले आहेत. आम्ही कार्याकारणे कमीजाजती सिबंदीचा घोरेवा धरून आहो. पुढे ज्याप्राा स्वाम आज्ञा करतील त्याप्राा वर्तने. सेवेसी श्रुत होये. मजला तो सर्व प्रकार आधार आश्रा चेरणाचा पूर्वीपासोन आहे. हे विज्ञापना.

¶*Naro Narsinh reports to Nana Fadnis that an agreement had been effected between the Peshwa and Babuji Naik.*

---

१. लहानमोठी. २. घोरण.

6386

No. 113] [*25-12-1766*

पौ छ २८ रजब ब॥

आरफ मा। सांडणीस्वार

श्री

सेवेसी[1] विज्ञापना. ता। छ २२ रजब मु॥ नजीक सुरापूर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान सांडणीस्वारा बा। लिहून पाठविले, त्यावरून कळलेच असेल. राजश्री बाबूजी नाईक यांजकडे सोलापुरास सांडणीस्वार पाठविला आहे, तेथून उतर येईल तें लिहून पाठऊ. सुरापूरचे खंडणीचा जाबसाल लागला आहे. करारात येईल ते लिहून पाठऊ. साल गु॥ मोगलाकडील सवारजंग याणी सरकारचे माहालापासून पैका घेतला, त्याचे रुजुवातीस निळोपंत पानसी पा। होते. त्याणी तेरीज धरून आणिले ते दफ्तरात आहे, त्याची नकल करून पाठवावयास आज्ञा करावी. वरकड कागदपत्र पेशजी लिहिल्याप्रो निकड करून पाठवावें. श्रीमंत राजश्री बाबांची[2] शरीर प्रकृत कसी आहे, श्रीमंत रा। दादा[3] कधी निघोन येणार, ते लिहिलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadnis, reporting the doings of the Peshwa in his tour and inquiring after the health of Baburao Phadnis and his son Moroba.*

No. 114] [*26-12-1766*

पौ छ २९ रजब सन

सबा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना फडनीस साहेबाचे

सेवेसी

चरणरज आज्ञांकित महादाजी चिंतामण सा। नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २३ माहे रजबूपावेतो मु॥ मंगळवेढ येथे साहेबाचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. राजश्री बाबूजी नाईक याचे वर्तमान तरी, श्रीमंताकडून आपाजीपंत व रामचंद्रपंत पंढरपूरकर हे लस्करातून कुमठेनजीक विजापूर च्यार कोश तेथून रवाना होऊन सोलापुरास गेले. त्यास तहेरहचा प्रकार तरी, अडीचशे घोड्यानशी चाकरी करावी, सिगेवण द्यावे, खेरीज खासगी सरंजाम लाख रुपयाचा आहे तो द्यावा, बारामती द्यावी आणि लस्करातून गोविंद सिवराम तात्या याणी व राजश्री विसाजी कृष्ण यानी किल्यास येऊन भेटीस श्रीमंताचा

---

१ पत्र हरिपंत फडक्याचें. २ बाबूराव फडणीस. ३ मोरोबादादा.

6387

घेऊन जाणे, दरम्यान विसाजीपंतास घ्यावे, याप्रो करार होऊन आपाजीपंत व रामचंद्रपंत किल्यातून श्रीमंताकडे गेले आहेत, याप्रो वर्तमान आहे. शेवकाचे वर्तमान तरी, राजश्री हरिपंत तात्या यानी लस्करातून रुपये ५०० पाचशे खर्च पाठऊन दिल्हा आहे. साहेबानी पुणियाहून गाडदी याचे रोजमरे रुपये १५०६||. पंधराशे पावणेसात पाठविले, त्यास गाडदी यानी लस्करात रोजमरे घेतले. त्यास लस्करातून हरिपंत तात्यानी चिठी पाठविली की, तुम्ही रुपये याजला न देणे. आम्हाकडे पैका पाऊठन देणे. त्याजवरून तो यैवज हरीपंत तात्या याकडे पाठविला. येथे मावले लोक आा ५० पनास चाकरीस आहेत. त्यास त्याची रोजमराची नेमणूक रामचंद्र त्रिंबक याजवरी जाली आहे. त्यास लोकानी आजतागाईत येथे मंगलवेढात चाकरी केली, याकरिता रामचंद्र त्रिंबक रोजमरा देत नाही. येथे लोक उपासी मरतात, म्हणून पनास साठ रुपये खर्चावयास आम्हाजवल घेतले आहेत. त्यास रोजमरा तेथून पाठऊन द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. नाही तरी रामचंद्र त्रिंबक याजला ताकीदपत्र की, यांचा रोजमरा हजरी घेऊन द्यावा. चाकरी येथे जाली आहे. आणि आपलीहि आज्ञा आहे की चाकरी मुलामांणसापासी करावी, याजकरिता दया करून रोजमरे अथवा ताकीदपत्रें पाठविली पाहिजे. रोजमरे दोन भरले आहेत. सनदेप्रो रोजमरे द्यावे म्हणून ताकीदपत्राची आज्ञा जाली पाहिजे. येथे आम्हास रोजमराविशई तंबी लावितात; याकरिता दोहीतून येकाची आज्ञा जाली पाहिजे. येथे जासूदजोड्या ५ पाच आहेत, त्याचे रोजमरे कोणाचा एक कोणाचे दोन भरले आहेत, त्यासी रोजमरेची आज्ञा जाली पाहिजे. येथे गवत मिलत नाही, किलेदार काही देत नाहीत याकरिता गवत कुरणात देणे. ठाणेदारास ताकीदपत्राची आज्ञा जाली पाहिजे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Mahadaji Chintaman writes to Nana Fadnis communicating the terms offered to Babuji Naik, and asks supplies of money to pay his troops.*

No. 115] [*Recd. 27-12-1766*

पौ छ १ साबान
हाा सेख न्यामत सांडणीस्वार

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. राजश्री बाबूजी नाईक याणीं सोलापुरचा किला सरकारांत देऊन हुजूर दर्शनास यावे याप्रमाणें करार जाला. त्याजकडे राजश्री विसाजी

कृष्ण याची रवानगी केली. त्यास नाइकाची चीजवस्त सरकारांत आली, त्यांत आजमासे एक लक्ष तेरा हजार रुपये त्याचे नख्त द्यावयाचे ते तूर्त दिल्हे पाहिजेत. ऐसियास, पेशजी पुणियांत स्वारी असतां एकंदर जमाखर्चाचा अजमास समजाविला ते समई बाबूजी नाइकाचे ऐवजास पाऊण लक्ष वजा करून ठेविले आहेत असे वाटतें. तो ऐवज असिला तर उतमच जाहालें. तो ऐवज वजा करून बाकी ऐवज राहील त्यास कर्ज घेऊन द्यावे. पाऊण लक्ष वजा केले नसिले तर सारेच कर्ज घेऊन द्यावे लागतील, याजकरितां हे पत्र लिहिले असे, तर ऐवजाची तरतूद करून ठेवणें. येथून तुम्हावर वराता होतील त्याप्रमाणें ऐवज देणे. सारांश गोष्ट बाबूजी नाईक दर्शनास न आले तर येवज द्यावा लागेलच, याजकरिता तरतूद करून ठेवणे. रवाना छ २४ रजब सुा सन सबा सितैन मया व अलफ. सत्वर ऐवजाची तर्तूद ठेवणे. हे पत्र सांडणी स्वाराबा रवाना केले आहे. याउपरी सत्वरच ऐवजाविसी वरात होईल. त्यास वरात पावताच ऐवज पावावा. लिा प्राा सत्वर करणें. रवाना छ २९ रजब. बहुत काय लिहिणे? हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to make necessary arrangements for making a payment of about Rs. 1,13,000 to Babuji Naik.*

No. 116] [27-12-1766

पो छ ४ साबान सबा पौष.

श्रीशंकर

शेवेसी नारो नरसिंह क्राा सां ना विा येथील कुशल ताा छ २४ रजब जाणून मुाा डोणगाव नजीक सोलापूर स्वामीच्या कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विा. इकडील वृतांत, श्रीमंतांचा मुाा सुरापुरनजीक आठसात कोषीं आहेत. सुरापूरवाले यांजकडील परगणियांची खंडणी होऊन पुढे काडलूर संगमास जाणार यैसेहि आहे. राजश्री नाइकाकडील विवेकाचा मजकूर, लस्करातून राा रामचंद्र कृष्ण लिमये व आपाजी राम आले होते. नाइकास दीड लक्षाची जाहागीर द्यावी. बारामती वगैरे मिलोन व जराबजरा चीजवस्त द्यावी आण किला खाले करून सरकारात घ्यावा. येणेप्राो नाइकासी करार ठराऊन मागती उभयेता लस्करास गेले आहेत. येणेप्राा श्रीमंताचे मर्जीस आले उपरी राा गोविंद सिवराम तात्या व राा विसाजी कृष्ण उभयेता येऊन नाइकाची समजावीस पाडून किला सरकारास घेऊन मारनिलेस समागमे लस्करास न्हेणार, येणेप्राो

निळेये ठरला आहे, परंतु निभावणी होऊन परिणामास लागल तेव्हा प्रमाण मानावे शेवकास रा रामचंद्रपंतासमागमे येऊन च्यार मासपर्यंत होत आले. वारंवार शेवेसी विनंतीपत्रे लिहीत गेलो, परंतु येकहि प्रत्योतर न आले, याजवरून चित परम खिन्न जाले आहे. आज्ञा घेऊन येतेसमई जे, मारनिलेसमागमे आसावे आण त्याजकडील काजकामाची वगैरे आवधी चौकसी पाहात जावी. आज्ञेप्रो आजपर्यंत सिबंदी, प्यादे व स्वार वगैरे काजकाम जें सरकार निसबतीचें तें सर्व ध्यानांत आणीत आलो. हली श्रीमंत रा दादासाहेब यांजकडील किल्याचा बेहेडा व हावालदार व सबनीस व फडणीस येणेप्रों आले आहेत. परंतु सबनीस व फडनीस किल्याचे निसबतीचे, माहाली फडणीस आलाहिदा असावा, त्यानें माहाली मजकुराचें काजकाम करीत जावे, यैसे आसोन हाली हेच सर्व मनास आणितात. या कारकुनानी किला निसबतीचे मात्र काजकाम मनास आणावें, माहाली मजकुराचे काजकाम प्रथक आहे आणि पेशजीपासोनहि माहालची फडनिसी आलाहिदा आहे. आहिरवाडी परगणा यांची फडनिसी यासिवाये, येणे-प्रकारें नाइकाच्या कारकीर्दीत असता हाली येणेप्रो आहे, तेव्हा आम्ही काये काजकाम मनास आणून आसावे? मजला तो आज्ञा श्रीमंताची व आपली होती जे, किला दाखल सरकारात होये तोपर्यंत मारनिलेकडील सिबंदीचे वगैरे सर्व मनास आणावे आण पुढे आज्ञेप्रो यावे, यैसी आज्ञा स्वामीची जाहाली होती. मजला तो स्वाम धर्णी म्हणोन विनंती लिा आहे. केवल उगेच उठोन सेवेसी आलो तर आपली बेमर्जी होईल याजस्तव मुजरद विनंती लिा आहे. लस्करास जावे तर मार्ग चालत नाही, येणेप्रा आहे; कृपा करून आज्ञापत्र सादर करावे म्हा आज्ञेबरहुकूम वर्तेन. बेहेड्यात नेमणूक सबनिसाची व फडनिसाची किलेकडील, वरकड माहाली फडनीस आलाहिदा, यांस काही माहालचे काजकाम दखलगिरी करवयासी कारण नाही. रा दादो उधव यांचे पत्र रा रामचंद्रपंतास आणोन मात्र माहालाची काजकाम लिहिणे करितात. यांत स्वामी ज्याप्रमाणें मजला आज्ञा करतील तेणे प्रा वर्तेन. मी स्थापित पूर्वीपासोन याच चेरणाचा आहे. माझा सर्व वगवशिला माहाराज आहेत. माहालची काजकामाची नेमणूक शेवकाची करून मारनिलेस स्वामीचे पत्र आले म्हणजे शेवकाचीहि स्थापना केलीसारिखी होईल. आहीरवाडी परगणियाची फडनिसी यासिवाये आलाहिदा आहे. यात ज्याप्रो मर्जीस येईल त्याप्रो जैमातच्यापरी (?) कृपा करून आज्ञा करणे ती करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶Naro Narsinh writes to Nana Fadnis about the settlement of the dispute with Babuji Naik over the fort of Sholapur and requests orders about his own duties.

6390

No. 117] [27-12-1766

घडणी रु. नं.
९१२

श्री

यादी राजश्री बाबूराव सदासिव सुा सबा सितैन मया व अलफ.

खासा जातीची तैनात कुल डौलाची सालिना रुा
१००००१

यासी सरंजाम लाऊन द्यावा देखील बारामती येक लक्ष येक रुपया वसुली द्यावी येणेप्रमाणें +करार.

पहिली करारीची याद जाली आहे त्याप्रो करार असे येणे प्रो +करार.

तुम्ही हुजूर येऊन निखालसपणें येकनिष्ठेने येक वर्ष चालल्यास कृपा संपादून घेतल्यास इंदापूर दिल्हे जाईल. येणेप्रो +करार

सोलापूरचा किला जकिरासुधां राजश्री विसाजी कृष्ण हवाली करावा. येणेप्रा +करार

छ २४ रजब मागें सीषे मुा नजीक जेटगी पाा सुरापूर

घर पागा राऊत चांगले करोल व आडहत्यारी व भालेकरी मिलोन स्वार २५० अडीचसे.

तैनात निवल देखील कापड पडले पानसुधा दरमाही तैनात सालिना रुा पच्यासी हजार ८५००० करार केले असेत. सामान चांगले बालगावे. कनिष्ट गाळ वजा होईल. येणेप्रो सरंजाम लाऊन दिल्यास वसुली लाऊन द्यावा; न दिल्हा सरंजाम तर इतलाख[1] सदरहू प्राा नख्त देत जावे. येणेप्रमाणे +करार

निखालसपणे चालावे. हुजूर यावे. कृपा संपादून घ्यावी. इकडील कोणे गोष्टीचा संशय धरू नये. तुम्ही करारप्रो वर्तल्यास केल्या कराराप्रो चालविले जाईल. खातरजमा असो देणे. येणेप्रमाणे +करार

¶Babuji Naik is given a personal allowance of one lakh on his rendering allegiance to the Peshwa. The paper mentions the conditions on which the allowance is granted.

\+ हस्ताक्षर माधवराव. १ गैरसरंजामी, पगारी.

No. 118] [28-12-1766

पो छ ४ साबान सबा.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेंसी

पोष्य रामचंद्र त्रिंबक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तो छ २९ रजब मुा डोणगांव प्रों सोलापूर जाणौन वर्तमान यथास्तित असें विशेष. बहुत दिवस आपल्याकडून पत्र येऊन परामृष होत नाही, तेणे करून चित सापेक्षित असे. विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत पंतप्रधान सुरापूर प्रांते आहेत. सुरापूरचा घासदाणा घेऊन कडलूर संगमावर आठचार मुकाम होणार. लष्कराहून रा रामचंद्र कृष्ण व आपाजी राम यैसे सोलापुरास आले होते. बोलून लस्करास जाऊन फिरोन सोलापुरास आले. करारात आणून सोमवारी लस्करास गेले. आज सात रोज जाले. तेथून रा विसाजी कृष्ण व रा गोविंद सिवराम सोलापुरास येऊन श्रीमंत रा नाईक यांस श्रीमंताचे दर्शनास घेऊन जाणार. बारामती देखील दिढा लक्षाची जागीर दिली व वस्तभाव सर्व द्यावी देखील पागा येणेप्रो करार जाला. यानी किला द्यावा, पुढे कृपा संपादून घेऊन इंदापूर मागावे, यैसे मानस आहे. आजपर्यंत आम्हासी त्यासी नित्य खटखट लडाई होत होती. सात रोज होत नाहीं. त्यांची कही गवताची होते. मौजे बाळ्यास आम्ही ठाणें घातलें त्यामुलें शहरची वेस बंद जाली. बाल्यावर किल्यावरील गोले येऊन पडतात. दोन तीन येलगार तोफा लाऊन त्यानी फारच केले, परंतु ठाणें कायेम राहिलें. त्यावरून शहर घाबरे जाले व खासी स्वारी संनिध आली त्यावरून सलुकाचा मजकूर लौकर जाला. आजपर्यंत आम्हांकडील घोडे माणूस फार जाया जालें. पंधरापर्यंत घोडे व माणूस चांगले पंधरापर्यंत, सिवाये किरकोल; या प्रों सोलापूरचेहि जाले. चौशा रावतांची बोली करार जाली. लोकानी चाकरी तो येथे फारच केली. लस्कर लांबत चाललें. लोकास नालबंदी अद्याप नाहीं याजकरितां विनंती लिा आहे. नालबंदीचे यैवजी तूर्त खर्चास देवावें आणि लोकांस आपलेजवल चाकरीस बोलावावें किंवा आज्ञा करणे ते करावीं. तेथे चाकरी करतील. सेवा चाकरी ध्यानांस आणून लोकांचे व आमचे ऊर्जित करणे आपल्यांकडे आहे. पेसजी येक दोन पत्रें पो परंतु उतर न आलें. वरकड वर्तमान रा नारो नरसिंह यानी

लिा आहे त्यावरून अवगत होईल. मारानिलेच ऊर्जित करणें स्वामीकडे आहे. बहुत कार्ये लिा, कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Ramchandra Trimbak writes to Nana Fadnis that the dispute between the Peshwa and Babuji Naik has been finally settled. It was agreed that the Naik should deliver the fort to the Peshwa who in return should give a Jagir worth one and a half lakhs to the Naik.*

No. 119] [*31-12-1766*

पो छ २८ रजब
सन सबा सितैन.

श्री

विज्ञापना. सुरापूरची खंडणी येक लक्ष पांच हजार व येक गांव तालुक्यांतील खंडणीपूर्वी खंडला त्याचे सतर हजार येणे प्रो जाले, परंतु वसूल येणे दुर्घटच दिसतें. राजश्री बाबूजी नाईक यांजकडे ग्रहस्त गेले होते ते आले. पहिल्या लिा प्रो ते कबूल जाले. राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी लौकरच होईल. पुढे होईल ते लिहून पाठवीन. दीडं माहीचा पट छावणीतील कूल पाठवावा. शागीर्दपेशा वगैरे डौल आलकिडे काय वाढलीं हे लवकर समजावणे म्हणोन निकड़ श्रीमंतानी लाविली आहे, तर लौकर लेहून पाठवावयास आज्ञा करावी, हे विज्ञापना.

¶*Haripant requests Nana Fadnis to send the muster-roll as the Peshwa wanted to examine it. "Contribution from Surapur", he says, "has been fixed at one lakh but it is very difficult to recover it".*

No. 120] [*After Dec. 1766*

श्री

राजा निजामशा यास पत्र की, पानपतची गर्दी जाहाली. त्या साली तुम्ही सरकारचे तालुकियांत दुंडी करून ठाणी उठविली, त्यापासून सात साला अमल तुम्ही केला. उपरांतिक तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांची मसलत हिंदुस्थानात जाहाली, गोहदेस लागले होते, तेव्हा सरकारची ठाणी सरकारांत घेतली आणि सात सालाचा ऐवज तुम्हाकडे यावयाचा तो स्वारी मसलतसीर जाणौन तुम्ही बोलिल्याप्रो कागदपत्र करून दिल्हे. परंतु बदमामली करून सात सालाचा ऐवज घेतला तो हिशेब करून जमिदाराचे रुजुवातीने हाली

गोपाळराव गणेश वकील यास सस्थान मजकूरचा बंदोबस्त सांगितला आहे. तरी वाजवी पैसा ठरेल तो मारानिलेकडे देणें. याजकडे ऐवज न दिल्हा तरी उतम नाही हे समजोन फैसल करून देणे म्हणौन चिटणी(सी) पत्र १

¶*Draft of a letter from the Peshwa to Raja Nizamsha asking him to settle the payment of dues in arrears for the province which was being administered by him for seven years following the battle of Panipat.*

No. 121] [*1767?*

श्री

शेवेसी विज्ञापना. प्रात:काली राउतासमागमे गुंजेहालीचे वर्तमान सविस्तर लिहिले होते त्यावरून श्रुत जालेच असेल. येरगिरे येथे रात्री चौकीस फौज उतरून रखवाली केली. मग त्यासी बोली लाविली. त्यास आम्ही वीस हजार म्हणत होतो. त्यास पंधरा हजार पावेतो आले होते. ते आपणाकडील राऊत कारकून आले. त्यांस गावकरास मिळून आम्हासी कजिया करू लागले. मग आम्ही आपल्याआपल्यात कजिया करावा कार्यांचे नाहीं, यास्तव आपणास कळावे म्हणोन लिा असे. इकडे आम्ही तुंगभद्रापावेतो राऊत पाठविले होते, त्यास नदी पावेतो थोडेबहुत हिरवे आहे. राऊत येतास गावकर आम्हासी बोलेणासे जाले. यास्तव गाव मातबर आहे, याचा विचार काय असेल तो विल्हे लाविला पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One Maratha General complains to another about the misconduct of his men.*

No. 122] [*January 1767?*

श्री

विज्ञापना तााा छ ६ रमजान मुाा गुड वर्तमान यथास्थत अस विशेष. श्रीमंत राजश्री नारायणराऊ छ ४ रमजानी श्रीमंताचा निरोप घेऊन गेले. परभारे गंगापुरास जातील. समागमे राजश्री बच्याजीपंत आहेत. वरकड माघारे फिरणारे राजश्री बालोबा, नारो बाबाजी, दादो उधव, बावाजीपंत, सिदोपंत आदिकरून फार करून मंडली सोबतीने गेले. कळले पाहिजे. इकडील वर्तमान गदवालची खंडणी लाख रुाा जाली हे पूर्वी लिहिलेंच आहे. अदवानीकडे सालेसालची बाकी येणे, त्याचा ठराव तीन लक्षाचा प्रथम जाला, परंतु पैक्याची

6394

निशा न पडे तेव्हा ती गोष्ट राहिली. मुल्कच जबरदस्तीनं पाचसालक्षाचा घ्यावा असे ठरले. भनू कवताल व सिदनूर व खडकुरा चहू माहालात ठाणी घातली. भनूचा किला चांगला. येका दिवसांत तोफाची मारगिरी करून घेतला. यामुले तमाम ठाणी देत चालिले. तलालकोटा (तकल) परगण्याचे ठाणे किला चांगला त्यास मोर्चे लागले आहेत. येक दोन रोजात फैसल होईल. इकडील बंदोबस्त करून चित्रदुर्ग, हरपनहलीची खंडणी घेऊन सिऱ्यांस जातील. मोगलाकडून राजश्री कृष्णराव आले. नवाब बाहेर निघाले. त्यांच्या येण्याचा प्रकार तर श्रीमंतांची पत्रें निकडीने यावी असी गेली तर येतील, नाही तर नाहीं असें आहे. इकडील अर्थ नवाबानी यावेच असाहि नाही. सिऱ्यांस जावयाची त्वरा आहे. हैदर नाईक कविमुतुरास आहे. तोहि पेचांतच आहे. त्याचे मते खंडणी उरकावी परंतु पैका अमका देतो असे बोलत नाही. यंदा पैका मिलावा असा डौल दिसतो. श्रीसतेकडून घडेल ते खरे. मीर फैजुला श्रीरंगपटणच्या रानांत आहे. पांच हजार फौज व बारा हजार गाडदी आहेत. खासा फौजेसी गाठ घालणार नाहीसे दिसते. सिऱ्याची कमर मोडल्यासिवाय वकील यथास्थित बोलत नाही. सिऱ्यास गेल्यावरी त्यांचे बोलणे असेल ते कलेल. तावत्काल सारी लबाडी आहे. काही बातमी राखतात. पुढे होईल ते शेवेसी वरचेवर लिहून पाठऊ. हे विज्ञापना.

¶Haripant Phadke reports Nana Fadnis the progress of the Peshwa's campaign against Haidar and gives it as his opinion that Haidar will not come to terms until the province of Shira is overrun.

✓

No. 123] *[January 1767*

श्री

सेवेसी सटवोजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती येसीजे. चिठी पाठविली तेथें आज्ञा कीं उदैक शनवारीं खासा स्वारी सेऱ्यास दाखल होऊन तेच समई मोर्चे लागणार, तरी तुम्ही भोजन करून तयारीनिसी खासा स्वारी समागमें चालणें म्हणोन. त्यावरून आज्ञेप्रमाणें पुढें आगाडीसच आहो. हे विज्ञापना.

¶The writer Satvoji Jadhaorao promises to proceed to Shira as directed to join in the attack on the place.

No. 124] [1-1-1767

पो छ २९ रजब

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक गोपाळ गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २१ रजबूपावेतो स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपापत्र पाठविले ते उतम समई प्रविष्ट होऊन परम समाधान जाले. इकडील वर्तमान बिदनूरचा गुता उरकून तुंगभद्रातीरी हरिहरानजीक दक्षण-तीरी मुकाम जाला. तेथें बसवापटणचा व चित्रदुर्गचा मामला विल्हे लाऊन उतर तीरी मुकाम जाला. त्या तळावर राजश्री बाबाचे शरीरी ज्वरातिसाराची व्यथा जाली. पाचसात दिवस फारच श्रमी केले. दानधर्महि केला. व्यथा भारीच होती, परंतु स्वामीचे पुण्येकरून उत्तम प्रकारें उतार पडला. उपरांतिक वैशाख वा॥ ९ बुधवारीं तुंगभद्रेतीरीहून कूच करून मजल दरमजल चवथे मजलीस हानगलानजीक मुकामास आले. सावनूरवाला कहीचा लबाडीस आला, यास्तव एकदोन मुकाम येथें करून सावनूरचा गुंता उरकून मजल दरमजल देशास येणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopal Govind informs the Peshwa that he would return (to Poona) after having settled the affairs of Bednore, Chitradurg and Savanur.*

No. 125] [4-1-1767?

॥

श्रीमंत राजश्री महिपतराव दादा
स्वामी गोसावी यासी

सेवक मुकुंदराव श्रीपत कृतानेक दंडवत प्रा॥ विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ ३ शाबान जाणून स्वकीय कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीकडून बहुत दिवस पत्र येऊन सांभाल होत नव्हता. त्यास प्रस्तुत हरकारे आले याजबराबर पत्रें पाठविलीं, पावलीं. बहुत समाधान जाहालें. यैसेंच निरंतर येणारा वार्तिकासमवेत पत्र पाठऊन परामर्श करीत असावें. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी प्रस्तुत पटणकराचा व सरकारचा तह होऊन बेंगरूळ व देवनहली वगैरे तालुके घेतले होते, ते सोडावयाबद्दल श्रीमंताचीं आज्ञापत्रें व कारकून आला. तेव्हां आज्ञेप्रमाणें आम्हांकडील ठाणीं तमाम सोडावीं

लागली. ठाणी घेतलेपासून सिबंदी चढली. त्याचा मार्ग होईल म्हणून श्रीमंत राजश्री गोपाळरावजीचे लस्करास गेलो होतों. दीड मास समागमें होतों; परंतु कांहीं निर्गम जाहाला नाहीं व कांहीं या प्रांती आम्हांकडे ठाणीं आहेत त्यांची बेगमीहि केली नाहीं. धातुपोषण साल्जाब होऊन ठिकाणास आलों तों होसकोटे तालुकेच पाच साहा गांव पटणकरानी मारून नेले, यैसा प्रकार तह जाहाला असतां होतो तेव्हां परिणाम कळतच आहे. यांत श्री कसा परिणाम लावील पाहावे. येविसीचा सकलार्थ श्रीमंतास विदित व्हावा याजकरितां सरकारांत पत्रें पाठविलीं आहेत व सविस्तर चिरंजीव रावजीस लिहिलें आहे. आपणांस निवेदन करील त्याप्रमाणे साल्जाब उगऊन देविले पाहिजे; येविसीं विस्तार लिहिणे न लगे .सर्व प्रकारें चालवणें स्वामीस अगत्य आहे. आम्हाविसी राजश्री गोपाल रावजीस ल्याहावें म्हणोन दोन तीन वेळ आपणांस लिहिलें; परंतु आमचे साहित्याविसीं रावजीस ल्याहावयास स्मरण जाहालें नाहीं. असो; आमचा लाभकाल. आपणांस शब्द काय लावावा? आपण म्हणतील कीं आम्हांस आणशब्द, म्हणजे तर तुम्ही वडील, आम्हांस छत्र. तुम्हांसिवाय आम्ही ल्याहावें कोणास? आमचें अगत्य आणखी कोणास? रुसणे तुम्हांवर रुसावें. बरें करणें तुम्ही करावें यैसा प्रकार आहे; परंतु रुणानुबंधास उपाय काय? वरकड मजकूर पुरवणी पत्री लिा आहे त्यावरून ध्यानांत येईल. आण श्रीमंतास प्रसंगोचित विनंती करून कर्जापासून मुक्त करविलें पाहिजे. राजश्री रावजीनी कृपा आम्हांवर बहुत केली. बहुताजवळ आमची सिफारस केली. बहुमान केला. येक हती दिल्हा. आपणांस कळावें. बहुत काय लिहिणे लोभ असों दिल्हा पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat writes to Mahipatrao that according to the terms of the treaty with Haidar Ali, Bangalore and Devanhali had been evacuated. He complains he had not received funds to pay off his men. Mahipatrao Chitnis is alive at this time.*

No. 126] [*9-1-1767*

नकल.

श्री

सेवेसी लक्षुमण गंगाधर बापट मुकाम किले सोलापूर लष्कर गोविंद शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत पौष शुद्ध १० दशमी शुक्रवार दोन घटका दिवसपावेतों स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे, विशेष. काल गुरुवारीं दोन घटका रात्रीस किल्ला सर जाहाला, सरकारचें ठाणें

6397

आंत गेलें. खंडेराव निंबाजी निसबत विसाजीपंत व सरकार रावसाहेबांकडील मावले रामचंद्र त्रिंबक याजपाशीं होते ते दोनशें व तात्या गोविंद शिवराम याजकडील शंभर मावले नवे आणिले, ते व बारगीर मिलोन येकून च्यारशें आंत गेले. राजश्री बाबूजी नाईक लोकसुधा वाटेवर आले आहेत. लष्करांत येतील किंवा बारामतीस जातील तें न कलें. साद्यंत रामचंद्र त्रिंबक याजकडून सेवेसी लिा असें. आम्ही श्रीमंत दादासाहेबांच्या सनदा व रावसाहेबांची सनद नरसिंगराव याचें नांवाची गोविंद शिवराम यासी दाखविली. त्यांनीं साफ सांगितलें कीं दादासाहेबाकडील येक माणूस ठेवीत नाहीं. आपण दुसरी सनद गोविंद शिवराम यांसी घेऊन पाठविली किंवा आपण आला तर उत्तम. नाहीं तर बरा विचार नाहीं. किला बहुत आजप आहे तो पत्रीं कोठवर लेहावा? या गोष्टी तों रावसाहेब यांनीं केल्या. दादासाहेबाची मर्जी आपणांवर व आम्हांवर गैरमर्जी या गोष्टीनें होईल. त्यासी रावसाहेबांस विनंती करून सनद पाठवावी. आपणांकडील मावले सनदेप्रमाणें आले आहेत, त्यांसी आम्हांस काय आज्ञा बाबूजी नायकाची आली? रामचंद्रपंताविशी मात्र आहे, आम्हांविशी कांहीं नाहीं. आम्हांस काय आज्ञा ती करावी हें विनंती.

¶*Lakshman Gangadhar Bapat reports the capture and occupation of the fort of Sholapur by the Peshwa's troops and requests further orders.*

No. 127] [*10-1-1767 ?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक त्रिंबक नारायेण क्रा सा ना विा येथील कुशल. ता पौष शुध्ध ११ मुा शहर बराणपूर वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत रा पंतप्रधान स्वामीची आज्ञापत्र देवदुरग सुरापूर प्रांत बेडर येथील मुकामची आली. त्यांत मजकूर की, रा हयेदर ना यांजकडील वकील आहेत, अद्याप चुकोती झाली नाही. नवाब निज्यामअली भागानगरात आहे. तिकडे रा कृष्णराव बलाल काले गेले आहेत. चौकडील अनुसंधाने आली आसे. पुढे वर्तमान येईल ते सेवेसी विनंति लिहिली जाईल. वराड प्रांती मोगलाकडून असलमखान सुभा होता त्याणी भोसल्यासी सलूक केला. सा मोगलानी तगीर करून रुकनदवला याचे भा(वास) सुभा सांगोन दिवाणी नजफ अलीखान यास सांगावी अथवा

राजाराम बाबूराव यांस सांगावी. दोन उमेदवार केले असेत. बहुतेक राजाराम पंतास दिवाणगिरी होईल. वरकड सविस्तर वर्तमान मागाहून सेवेसी लेखन करू. * सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Trimbak Narayan informs Raghunathrao Dada of the dismissal of Asalamkhan, the Subhedar of Berar, ordered by the Nizam on account of the former's friendly attitude towards Bhonsle of Nagpur; the progress of peace negotiations with Haidar is also referred to.

No. 128] *[16-1-1767?*

पो छ २९ साबान

श्री

सेवेसी लक्ष्मण नारायण व माहादाजी नारायण व बाबूराव केशव क्रमा सां ना विा. येथील कुशल ता छ १९ साबान मुा नजीक रायेचूर प्रां आदवानी स्वामीचे कृपावलोकने वर्तमान येथास्थित असें विा. स्वामीकडून पत्र येऊन सांभाल होत नाहीं. तरी सदैव पत्रीं सांभाळ केला पाहिजे. येथील वर्तमान अदवानी रायेचूर मिलोन तीन लाख खंडणी जाली आहे. वसुलाचा जाबसाल होणे आहे. बसालतजंगाकडील जाबसाल जालियावर तुंगभद्रातीरास जातील. राजश्री गोपालराव पंधरा कोसावर आहेत. प्रस्तुत लस्करांत महर्गता फारच जाली. जोरीबाजरी तीन सेर, चार सेर याप्रमाणे जाली आहे. रविसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत; पावलियाचे उतर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶The letter informs that the Peshwa fixed rupees three lakhs as tribute from Adoni and Raichur.

No. 129] *[29-1-1767*

पो छ ६ रमजान

श्री

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलाचे सेवेसी

अपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २८ शाबानपावेतो वडिलाचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. वडिली दोन तीन पत्रें पाठविली त्याची उतरें पाठविली ती पावोन सविस्तर निवेदन जालेच असेल, व बालाजी वामन दामले याजविसी लिहिले त्याचेंहि उतर सेवेसी पाठविलेच आहे

व तेहि निघोन गेल ते सेवेसी येऊन पावलेच असतील. नवाब निजामअलीखान आले. छ २४ शाबानी दरम्याने डेरे होऊन भेटी आमच्या त्याच्या जाल्या. त्याजवर आम्ही छ २५ शाबानी त्याच्या डेऱ्यास गेलो. दुसरे दिवसी ते आमच्या डेऱ्यास आले. परस्परे सिष्टाचाराचे बोलणे जाले. वरकड करारमदाराचा ठराव अद्याप जाला नाही. जाल्यावर सविस्तर सेवेसी लेहून पाठऊ. याजकडील कारभार उरकल्यानंतर जावयाचा निश्चय होईल. सेवेसी श्रुत होये. हे विज्ञापना.

¶*The Peshwa writes to his uncle about his meeting with the Nizam.*

No. 130] [*Recd. 2-2-1767*

पौ छ २ रमजान सबा मा(घ)

श्री

विज्ञापना. मोगलाकडे राजश्री कृष्णराऊ गेले होते ते निघोन आले. चहू रोजी लस्करास येतील. नवाब बाहेर निघाले. दरमजल इकडे येत असेत. कललें पाहिजे. गदवालची खंडणी येक लक्ष बाकी सुधां जाली. अदवानी तीन लक्ष बोलिलें. परंतु निशा आली नाहीं. होईल तेव्हा लिहून पाठऊ. दोन रोजा तुंगभद्रेवर जाऊ. कलले पाहिजे. विदित व्हावे हे विज्ञापना.

¶*The sums of tribute promised by the states, viz., Gadval and Adoni, are given in this letter.*

√

No. 131] [*Recd. 2-2-1767*

पौ छ २ रमजान सबा
माघ हाा जासुद जथे
मुकुंदजी नाईक

श्री

विज्ञापना. राजश्री बाबूजी नाईक यांजकडील ऐवजाचा मजकूर पाऊण लक्षाचा लिहिला तो कलला. येथे मी विनंती केलीच होती. आपण लिहिल्यावरून संशय निवृत्त जाली. येक लक्ष तेरा हजार कशावरून लिहिले म्हणोन

आज्ञा केली. ऐसियास येथे राजश्री बापूनी अजमास सांगितला त्यावरून लिा होते. जितके नख्त त्यांजकडील आले असेल तितकेंच घ्यावयाचे, नाइकाचें माणसास, घोडी उंटास खर्च जाला तो मागू नये व बख्याचा ऐवज त्यांजकडील जाला होता त्याचे कसे ते लिा म्हणोन लिा, त्यास किरकोल दिकत काढावयाची नाहीं; कळावे हे विज्ञापना. नाइकाकडील यादी सर्व पावल्या. हे विज्ञापना.

¶*Haripant writes to Nana Fadnis answering certain queries with reference to the settlement with Babuji Naik.*

No. 132] [10-2-1767

पौ छ २१ रमजान सबा

माघ हा यमाजी

श्री

शेवेसी बगाजी रघुनाथ साा नमस्कार विज्ञापना. ताा छ १० रमजान मुा नजीक रायेदुर्ग येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींनी कृपा करून छ २१ साबानचे पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाले. यैसे सदैव पत्र पाठवावयासी आज्ञा केली पाा. जे लेखण्या फार आहेत त्यास लेखण्या न पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रो आनखी पेर मलालियास लेखण्या करून पाठवितो. इकडील वर्तमान तर तमाम साच्या खंडण्या जाहाल्या. हैदर नाईक याची खंडणी होयाची आहे. त्यास त्याकडील वकील वीस लक्षे-पावेतो बोलतो. परंतु श्रीमंताची मर्जी तीस पावतो दिसती. त्यास जलद खंडणी व्हावी याजकरिता मजल दर मजल सिन्यास जातात. सिन्यास मोरचे लाविलीयावर जलदीन खंडणी होईल. याजकरितां दाहा दाहा कोशाची कुचे करून जातात. निजाम आलीखान याची फौज कुमकेस सात हजार पावेतो आली आहे. विसा कोशाचे आंतर आहे. खासा आला नाहीं. पुत्र फौज घेऊन येणार याप्रो वर्तमान आहे. कितेक बारीक वर्तमान राजश्री तात्याणी लिहिले आहेत त्याजवरून विदित होतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bagaji Raghunath writing from Raydurg says that contributions have been levied on several districts in the Karnatak and that Haidar has been asked to pay thirty lakhs. To bring pressure to bear on him the army is marching upon Shira. The Nizam has also sent a force to cooperate with the Maratha army, the letter adds.*

No. 133] [10-2-1767

पो छ २१ रमजान सबा

माघ वा यमाजी

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १० रमजानपावेतो मुा नजीक सां राइदुर्ग येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी सेवकावर कृपा करून पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले. याप्रकारे सदैव आलिया माणसासमागमे पत्र पाठऊन सेवकाचा सांभाल केला पाहिजे. यानंतर प्रांत कर्नाटक येथील संवस्थानची खंडणी वगैरचा यैवज आज ता रुपये

१४३०००	सां सुरापूर
५५०००	सां देवदुर्ग
१००००	सां गुडगुटे
४१००००	सां चित्रदुर्ग
४००००	सां बलारी
२५०००	सां आनेगोंदी
३५०००	सां केंचनगुड
४००००	सां राइदुर्ग
५००००	खंडण्या गुा गोपालराव
१०००००	सां गदवाल
३००००	काी तलालकोट
२५०००	किरकोली गावगना
९६३०००	

[या पुढे २ ओळी फाटल्या आहेत.]

राहिला आहे तोहि लवकरच होईल. हरपनहलीकर वकील आला आहे तो दोड लक्ष रुपये खंडणी बोलतो. हे म्हणतात निदान तिन साडेतीन लक्ष पावेतो घेऊ. या प्रकारचे वर्तमान आहे. दरमजल सिन्यास जाणार. निजाम आलीकडील पंधरा हजार फौज व पंचवीस तीस तोफा पाच हजार गाडदी याप्रमाणे येथू(न) सात आठ गांवे लांब आले आहेत. वरकड आधिकोत्तर वर्तमान राजश्री हरिपंत तात्या याणी लिहिले आहे त्यावरून निवेदन होईल. स्वामीस कलावे म्हणोन सेवकाने लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. हैदर नाईक

येथून विसा गांवावर सिऱ्यापलीकडे आहे. सिऱ्याच्या ठाण्यात तोफा पाऊणसे व पाच हजार गाडदी याप्रो मजबुदी करून ठेविलीन आहे व त्याजकडील वकील लस्करात आला आहे. वीस लक्षपावेतो खंडणी बोलतो, हे पनास लक्ष रुपये. घेऊ म्हणतात. कलावे हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant gives a list of the amounts of tribute to be received by the Peshwa from the various places in the Karnatak; the movements of the forces of the Nizam and Haidar are also reported.*

No. 134] [*10-2-1767*

पो छ २१ रमजान सबा

माघ ह्या यमाजी

श्री

शेवेसी बाबूराव केशव व बाबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ १० रमजान पावेतो मु॥ नजीक रायदुर्ग स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. अदवानीची खंडणी तीन लाख पंधरा हजार करार होऊन पैका वसूल न ये याजकरिता कसबे भनूस मोर्चे लावावयाकरितां स्वारी गेली. प्रहरपर्यंत दाहा तोफाचा मार जाहाला. आतील किलेदार ठार पाडिला. तेव्हां लोकास धीर न धरवे. वकील पाठऊन पंधरा हजार खंडणी द्यावयासी कबूल जाले. परंतु ठाणें घालावें म्हणोन श्रीमंताची मर्जी. याजकरिता ठाणेदाराचे कबिले व सिपाई हत्यारानिसी काढून देऊन ठाणे घातले. ठाण्याची पहिली खंडणी गोपालराव गोविंद याणी बारा हजार घेतली होती, परंतु अदवानीच तह बिघडला याजमुले ठाणे घेणे लागले व कौतालचे ठाणे च्यार हजार फौज पाठविली व काही तोफा पाठविल्या तितक्यानेच ठाणे बसले. भनूहून बारा कोस कूच करून सिदनुरास आले. तेथे लडाई न होताच ठाणे पडिले. भनूचे ठाणे जलद पडताच तमाम मुलकात दबाव पडिला. संस्थानिक चित्रदुर्ग, आनेगोंदी, बलारी, रायदुर्ग आदिकरून खंडण्या जाहाल्या. हरपनहलीची खंडणी होणे आहे ते दोन च्यार रोजात होईल. खंडण्याचा गुंता उरकल्यावरी दरकूच सिऱ्यास जाणार. निजामअलीखान भागानगराहून तोफखाना घेऊन पंधरा हजार फौजेनिसी रायचुरानजीक आले आहेत. दरकूच येऊन मिलणार. दोही सेनेतील सारा तोफखाना सिऱ्यास लाऊन किला लौकरी फते करावा असा मनसुबा आहे. मीर फैजुला याने दोन हजार माणसे किल्यात ठेऊन बंदोबस्त करून बिदरूर प्रांतास गेला. हैदर नाईक घाटाखाली पंधरा

6403

हजार राऊत व वीस हजार पायदल याप्रमाणे आहे. सेतुपती राजा व कडपेकर मोगल मिळोन मार्ग धरिला आहे. वर यावयासी वाट नाहीसारिखी जाहाली आहे. अदवानीचे मुलकात स्वारी होती तेव्हां हैदर नाइकाचा वकील मुछदी आदिकरून पत्रेसहित वस्त्रें व खासा व बाबू, गोपालराव यास हती आणिले. श्रीमंत वस्त्रे घेत नवते, परंतु गोपालराव याणी रदबदली केली यास्तव घेतली. हस्ती घेतले. तुंगभद्रा उत्तरतीरास होते तेव्हा तुंगभद्रेचे दक्षण

[पुढील मजकूर गहाळ.]

¶*Baburao Keshao and Babaji Mahadeo writing to Nana Fadnis : report how the successful capture and occupation of Bhanu by the Peshwa rendered the way quite smooth for the capture of other places and for exacting tributes from them.*

No. 135] [*11-2-1767*

पौ छ २१ रमजान

सबा माघ

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ११ रमजान मुा नजीक रायदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ साबानची पत्रे साडणीस्वाराबा। पा। ती पावली. श्रीमंतांचीं पत्रे व मोगली पोशाक पावले. जाब मागाहून पा। देतो. वरकड इकडील वर्तमान तर संस्थानच्या खंडण्या जाल्या त्या पूर्वी लि। आहेत. आलीकडे केंचनगुड पस्तीस हजार, बलारी चालीस हजार, रायदुर्ग चालीस हजार, चित्रदुर्ग चार लक्ष, याप्रो खंडण्या जाल्या. हरपनहलीची होणे त्यास वकील लवकरच येतील. इतके जाले म्हणजे मग खंडणी व्हावयाची नाहीं. श्रीमंत दरमजल सिन्यास जात आहेत. सिन्यांस मोर्चे लावावे हा निश्चय जाहाला दरमजल जात असों. नवल विशेष होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादा फडनीस आले नाहीत, आलियावर लेहून पाठऊ. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write to Nana Fadnis mentioning the different states and the tributes fixed from them. The Peshwa is proceeding to Shira.*

6404

No. 136] [15-2-1767

पौ छ ४ सवाल सन सबा

हा जासूद जथे नारोजी ना

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १९ रमजान मुा सिरें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत दरमजल सिऱ्यास यावें या उद्येशे काल छ १४ रमजानी चौदा कोसांची मजल करून सिऱ्यास दाखल जाले. किल्यात माणूस जुजते च्यार हजार, दाहा तोफा, त्यासिवाय सातसे राऊत, पांच तोफा घेऊन शहरपन्हा पाठीमागें घालून उभे राहिले. आपली फौज येतांच तो(फा)ची मारगिरी होऊ लागली, मग मोर्चे कोठून लागणार? मग विचार जाला की हे राऊत मारून काढिल्याखेरीज ठीक नाहीं. मग खासें निशाण हत्तीवर होते तसेंच फौज उठली. हुजरातचे लोकानी दाट निकड केली. निशाण किल्याचे दरवाज्याजवल उभे केले. से पनास घोडे लुटून आणिले. लोक मारिले. राहिले ते पलोन किल्यात गेले. तेच मोर्चे काइम केले. आपलेकडील मालोजी पिसाळ व सिदोजी घोरपडे व अमृतराव यादव व बाबाजी पुरंदरे यांजकडील व्यंकटराऊ कारकून होता तो, वरकड वीस पंचवीस भले माणूस ठार जाले. सेपनास जखमी. घोडी पंचवीस पडली. आतून मार दाट बसतो. तोफा पाच सांडविल्या. त्यात येक आपल्याकडे आली. चार गोलीचे दाट मारांत आहेत, निघत नाहीं. तजविजेने काढून आणितील. चौदा कोसाची मजल करून लडाई घेऊन मोर्चे काइम केले. मोठी गोष्ट जाली. हैदर नाइक पटणास आल्याची बातमी बोलतात. ठीक नाही. सिऱ्यास मोर्चे लागले आहेत. आत माणूस सरंजाम चांगला आहे. इकडूनहि निकड होत आहे. होईल ते लिहून पाठऊ. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. चार तोफा येणे त्या हस्तगत जाल्या. येक तोफ मातबर बारा सेरी आहे. सिरें लवकर येत नाही असें दिसतें. मोर्चे निकडीने चालिले आहेत. खासा श्रीमंत येऊन मोर्च्यांत बसले आहेत. कलावे हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal describe the positions and strength of the two armies and also the skirmish that took place between them at Shira. The place was being invested vigorously under the direct supervision of the Peshwa, add the writers.*

6405

No. 137] [17-2-1767

श्री.

सेवेसी विज्ञापना येथील वर्तमान ता। छ १७ रमजान मुक्काम सिरें येथें स्वामीचे कृपे कटाक्षेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र व रविशंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले ते मस्तकीं वंदून भाक्षिले. याच-प्रकारें सदैव पत्रीं सांभाळ व्हावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. इकडील वर्तमान तरी श्रीमंतीं तुंगभद्रेवरून छ ७ रमजानी कूच केलें ते दरमजल लांब लांब मजली करून सिऱ्यास छ १४ मिनहूस दाखल जाहाले. आले त्याच रोजी डेऱ्यास न येतां सिऱ्यापासून दिडा कोसावर उभे राहिले होते. सिऱ्याचे बंदोबस्तीस मीर म्हणोन हैदर नाईकाचा मेहुणा हजार बारासें स्वारानीसी व कांहीं प्यादे घेऊन आला होता, तो सात तोफा बाहेर काढून फौजसुधां डेरे राहुट्या देऊन राहिला होता. तो तोफाची मारागिरी करीत होता. फौजेचा पुढें रिगाव न होय तत्राप जनार्दन राम वगैरे पथके याणी तोंड लाविलें. ही बातमी खाशास कळतांच हुजुरात सुधां स्वारी पुढें गेली. हातघाईची लढाई जाहाली. मिरास मोडून आंत घातला. दोनसेंपर्यंत घोडे पाडाव केले. डेरे राहुट्या कांहीं राहिल्या, तोफा खंदकांत लोटून दिल्या. आपले फौजेने फार केली. मोर्चे खंदकाजवळ काईम लागलेच केले. दोन तीनसें माणूस त्याचें जखमी जाहले व चाळीस पनास ठार जाहलें. आपणांकडील पांच साहासें घोडे माणूस जखमी जाहालें व चाळीस पनास ठार जाहालें. थोकात सिदोजी घोरपडे व मालोजी पिसाल व अमृतराव मामा खास चौकीचे ठार जाले व निरापा खताल व आपाजी मुढे जखमी जाहाले. खासा रावसाहेब त्या रोजापासून मोर्च्यांतच आहेत. ताल्या तेथेंच आहेत. वरकड मंडळी बुनग्यांत आहों. मोर्च्यास व बुनग्यास आद कोसाची तफावत आहे. हैदरनाईक श्रीरंगपटणास आल्याची खबर आहे. पंचवीस हजार गाडदी व सात हजार फौज याप्रमाणें आहे. मीर फैजुला बसवा-पटणाजवळ पांच साहा हजारानसी आहे. सिऱ्यांत च्यार हजार प्यादा व हजार स्वार व पंधरा हत्ती व दारूगोळा मुबलग याप्रमाणें सामान चांगलें आहे. रोज गोलागोली मातबरच होत आहे. तोफा खंदकांत त्याणी लोटिल्या आहेत त्या काढाव्या यास्तव येक दोन रोज रात्रौ आपल्या लोकानी मोठा लघट गेला होता, परंतु तोफा न निघाल्या. त्यास काल रात्रौ दोन तीन तोफा मोठा येलगार करून काढिल्या. त्यांत येक भारी आहे. त्याणी तोफावरच मारगिरी आरंभिली आहे. परंतु राहिल्या त्याहि काढणार. रास्ते मागें राहिले होते ते काल आले. गोपाळराव मागें आहेत. येका दोहों रोजांत येतील. निजाम-

अलीहि आठा पंधरा रोजांत येऊन सामील होईल. सिरे आठा चौ रोजांत यावेसे आहे. हैदर नाइकाचा वकील बातमीदाखल होता त्यास लाऊन दिल्हा. श्रीमंताचा प्रताप थोर, दबाव भारी पडला आहे. हैदर नाइकाचें पारिपत्य लौकरच होईल. सेवेसीं कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विज्ञापना.

सेवेसी माहादाजी विष्णु व बाबूराव केशव व माहादाजी नारायण सां नमस्कार विज्ञापना. देशमुखानी वर्तमान लिहिल्यावरून विदित होईल. आज सायंकाळीं बावा या(चे) हातास जखम गोळीची चाटून गेली. सरकारचा निशाणाचा हती पहिल्याच हल्याचे वेळेस जखमी जाहला. पहिल्या दिवशीं आपणाकडील लोकांनी शर्त केली. हे विज्ञापना.

¶*Baji Govind gives a detailed description of the fighting at Shira led by the Peshwa himself. The garrison was driven in to seek the shelter of the walls which were then closely invested.*

No. 138] [*20-2-1767*

पो छ ९ सवाल सबा
फाल्गुन हा॥ चिमाजी
जासूद जेथे बयाजी गणजी

श्री

सेवेसी महादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २० रमजान मु॥ सिरे वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण छ २४ साबानचे पत्र पा॥ तें पावोन लिहिले वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तर श्रीमंत छ १४ रमजानी सिऱ्यास दाखल जाले. येथे आलियावर सिऱ्यांचे बाहेर हजार पाचसे माणूस, दोन हजार पायदळ, सा तोफा होत्या त्याजवर चालोन घेतले. लोक मोडून गावांत घातले. सा तोफा पाडाव आल्या. सेपनास घोडी आली. दोनसे माणूस त्याजकडील ठार जालें. आपलेकडील वीसपंचवीस ठार, चारसे माणूस जखमी जालें. मोर्चे खंदकापर्यंत गेले. लोकांची मेहनत फार होते. हें वर्तमान पूर्वी सेवेसी लि॥ आहेच. राजश्री मुरारराव आज येतील. राजश्री गोपाळरावहि येतील. दोन्ही फौजा एकत्र जाल्या म्हणजे चहूकडून येलगार होईल. आत माणूस जुजते फार आहे. गोल्यांचा मार अतिशय होतो. माणूस जाया * * हात होते. श्रीकृपेकडून सिरे

6407

फते होईल, परंतु प्रेत्न फार लागेल. हैदर नाईक पाटणास आला. पुढे होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री दादा फडनीस अद्यापि अले नाहीत. आलियावर लेहून पाठऊ सिऱ्याचे मोर्च्यांची चाकरी लोकांस फार पडते. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal report to Nana Fadnis that the siege of Shira was being vigorously prosecuted.*

No. 139] [*Recd. 21-2-1767*

पा छ २१ रमजान सबा
माघ हा यमाजी.

श्री

सेवेसी विज्ञापना. आदवानीची खंडणी बंसालतजंगाकडे तीन लक्ष रुा जाहाली होती, त्यास निशा[1]ने पटे यास्तव त्याची ठाणी तमाम घेऊन हरि रामाचे हवाला केली. प्रथम ठाणे भनू म्हणौन घेतले. त्यास खासा स्वारीच मोर्च्यास गेली होती. सकालचे प्रहरा दिवसास तोफा लागू जाहाल्या त्या साइंकालपावेतो मारगिरी होत होती. तीनसे साडेतीनसेपर्यंत गोले ठाण्यास पडिले. लोकाचेहि मोर्चे समीप जाऊन पोहचले. चालीस पनास माणूस जखमी जाहाले. जिवाजी दोरगे ठार पडिले. आणखीहि च्यार पांच ठार जाहाले, तो संध्याकाल जाहला. आतील सामान थोडके हे ठाण्यातील किलेदाराने पाहून बंगला बारेदारीचा होता तेथे कुराण जवळ घेऊन मरणास प्रवर्तला. त्यास दोन गोल्या मोर्च्यातील लागोन ठार जाहला. मग ठाणे कौलास आले. प्याद्यास कौल देऊन हात्यारानिसी बाहेर काढिले. तदनंतर खासा स्वारी डेऱ्यास आली. किलेदाराचा क़बिला आत होता तो वस्तभावेनिसी बाहेर काढिला. हती येक व घोडी लहान थोर त्रेचालीस व उंटे च्यार आत होती ती सरकारात लाविली. दारू व सिसे व काही धान्य व [2]जंगी जेजाला दोनसे व दाहापाच जंबूरे सापडले. हे ठाणे घेतल्यावर दुसऱ्या ठाण्यास विलंब लागला नाही. दहशत भारी बसली. गोपालराव यास कौताल ठाणे अदवानीकराचे घ्यावयासी पाठविले आहेत, त्याणी ठाणे जाताच घेतले. मागे राहिले आहेत, त्यास लवकर येणे म्हणोन पत्रे गेली आहेत. सिऱ्यास जाऊन लवकर सिरे घेणार. मीर फैजुला सिऱ्याचे उपराल्यास पाचसात हजार जमावानिसी आहे. निजामअलीहि समीप आला आहे. सीघ्रच सिरे हस्तगत होईल. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

---

१ जामिनकी. २ लढाईच्या उपयोगी. जंग = लढाई.

खुलाशाचे वर्तमान अलाहिदा पत्री लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. राजश्री कृष्णराव बलाल काले लस्करात आल्यावर आपला नमस्कार प्रविष्ट केला. फार संतोषी जाहाले. मी कचे वर्तमान हैदराबादेहून लिहून पाठविले होते, कळलेच असेल, याप्रमाणे बोलले. हे विज्ञापना.

¶*The letter describes the fight at Bhanu between the Peshwa's forces and those of Basalatjang. The fight was undertaken to recover the tribute of Adoni from Basalatjung who had previously agreed to pay it.*

No. 140] [*21-2-1767 ?*

* * * * * * * * * *

कोस गदवलच्या रोखे कृष्णातीरीच मुकाम होईल. जवल मुकाम स्वामीचा जाला म्हणजे सोमवारीच भेटीचा योग घडेल. उदैक मुक्कामास आलियावरी सेलक्याचे स्वार सेवेसी पाठऊन. विदित जाहाले पाहिजे. राजश्री मुऱ्हाररायाचा दुसरा अविलंब नाहीं. सोमवारी भेटीचा योग होय यैसे केले पाहिजे. बहुत काय लिहिणे, सेवेसी श्रुत होये, हे विज्ञाप्ति.

¶*This fragmentary letter refers to the meeting of Murarrao Ghorpade and the Peshwa.*

No. 141] [*24-2-1767*

पो छ ७ सवाल सन सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ रमजान मुाा सिरें स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत छ १४ रमजानीं सिरेयास दाखल जाहाले. तेच दिवसी बाहेर फौज उभी होती ती व तोफा व पांवर्प्यादे[1] होते त्यासी लडाई जाली. साहा तोफा पाडाव आल्या. सिवाय घोडी आली, लोक मारले गेले. आपलेकडील मालोजी पिसाल, सिदोजी घोरपडे ठार पडले, हे पेहिले[2] सेवेसी लिहिलेच आहे. आठा दिवसात मोर्चे खंदकावर गेले. आंतून मारगिरी फार जाली. पांचसे माणूस जखमी जाले. चालीस ठार. घोडी चालीसपर्यंत ठार जाली. किल्यात मीर रजा हैदर नाइकाकडील सरदार मातबर, हजार दोन हजार

१ पायदळ शिपाई. २ पूर्वी.

राऊत व च्यार हजार पांवप्यादासुधा होता, त्याणें राजकारण लाविलें कीं, 'आपण हैदराचे इतरांजींत आहें, मजला पदरीं घ्यावें.' त्यावरून श्रीमंतानी कबूल केले. येक हजार राऊत दर राउती दरमहा तीस रुा व येक हजार गारदी. पंधराचेसें[१]न्या प्रमाणे ठेवावयाचे कबूल केले. इमान प्रमाण दिल्हे. त्याणे आपले इमान श्रीमंतास देऊन काल भेटीस आले. भेट जाली. गोपालरायांचे गोटात जाऊन राहिले. आज किल्यांतील प्यादे निघतील. उदैक सरकारचे निशाण चढेल. किल्यांत कोण ठेवावा हा निश्चय जाला नाहीं. श्रीमंत दैववान. असा किला व आंत सरंजाम पोख्त असतां लवकर यावा असें नवतें, परंतु श्रीमंताचे पुण्यप्रतापेकडून मोठी फते जाली. मीर रजा हैदर नाइकचे पदरी माणूस मातबर. आणखी याचे स्वाधीन गुरुमकोंडा व हुसकोटे वगैरे जागे आहेत, तेहि सरकारात देईल. मीर रजा माणूस, चांगला माणूस. चारसे पठाण जवल फार चांगला आहे. यंदा श्रीमंताचा प्रताप या प्रांती फार आहे. हैदर नाईक श्रीरंगपटणास आहे. सिर घेतल्याने त्याचे अवसान जाईल. सिन्याचा बंदोबस्त करावयास आठ दिवस लागतील. तदोतर जो प्रकार मनसुब्याचा ठरेल तो सेवेसी लिहून पाठऊ. सारांश गोष्ट, सिरे लवकर येईल असा भरवसा नवता, परंतु मोठी फते जाली. या उपरी जो मनसुबा ठरेल तो लिहू. राजश्री मुरारराव आले. सारी फौज येकत्र जाली. सिरें घेतल्यानें तमाम पालेगारांवर दबाव बसला. यंदा इकडे छावणी होती तर फारच नफा होता. परंतु श्रीमंत राजश्री दादासाहेब देशास येणार आहेत, यामुले हेहि येतीलसें दिसतें. श्रीमंत राजश्री दादा फडनीस विज्यापुरास आले, तेथून पत्र आले होते. राजश्री बाबा वैद्य ते समागमेच येतील. आलियावर लेहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal report that Shira capitulated after putting up a stout defence.*

No. 142] *[26-2-1767*

पौ छ ४ सवाल सन सबा.

श्री

सेवेसी विज्ञापना, येथील वर्तमान छ २६ रमजान मुकाम कसबें शिरें येथें स्वामीचे कृपेंकटाक्षेंकरून येथास्थित असें विशेष. शिरें फत्तें जाहालियाचे वर्तमान छ २४ रमजानी सेवेसी लिहून पाठविलें आहे, त्याजवरून सविस्तर विदित

---

१ शेन्याप्रमाणें.

होईल. शिरें मुकुंद श्रीपत याचे हवाला करणार. काल निशाण मोर्च्यांतून गोटास आलें. शिवरात्र येथें होईल. उपरांत श्रीरंगपटणास जातील. मीर रजा याची वस्तभाव झाडून दिल्ही. गोपाळराव याचे गोटाजवल जागा दिल्ही. कलावें हें विज्ञापना.

¶" *Shira is captured and handed over to Mukund Shripat for administration. The Peshwa will proceed to Seringapatam after Shivratra," says the report*

No. 143] [*26-2-1767*

पौ छ २९ जमादिलौवल.

श्रीगजानन

सेवेसी विनंती. सेवक मल्हार चिंतामण वाघ साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा माघ वद्य त्रयोदसीपावेतों आज्ञाधारकाचें वर्तमान येथास्थित आसे. यानंतर येथील वर्तमान सविस्तर राजश्री गोपालराव सेवेसीं दिनप्रति(दि)ने लिहीत आहेत, त्याजवरून आवगत होतच आसेल. सांप्रत खास दस्तुरचें आज्ञापत्र राजश्री गोपालराव यास सादर जालें. तेथें आज्ञा जे, सरकारचे कारकून आहेत त्यास गणती येथास्थित पांचवे सावे दिसीं देत जाणें, सरकार-किफायेती होये तें करणें, म्हणोन लिहिलें. येशास, गणतीचें वर्तमान पूर्वी येक दो पत्रीं सेवेसीं लिहिलें, परंतु फिरून आज्ञापत्र सादर जालें नाहीं, याजकरितां अलीकडे वर्तमान ल्याहावयास आंतर पडिलें. छावणीस असतां हजरी घेतली ते सेवेसीं पाठविली. त्या आलीकडे सिरयेचे पारपत्यास गुंतले. स्वार आले ते रोज-बरोज गणतीं घेऊन रोजमुरा चाली लागला, याजमुले खडे गणती जाली नाहीं. तेथून कूच जालियाउपर हरपनहालीचे नजीक खडे गणती घेतली. तदोतर कोपल घेऊन मुद्दल सरकारांत आलियाउपर लस्कर स्वारी सिकारीस लागलें तें आजपावेतों आदवनी प्रांत बलारी रायदुर्ग चित्रदुर्ग सिरे वगैरे आठ आठ मजली लोक लुगारीस गेले आहेत. लस्करांत ढोराचे कलप मात्र नाहींत. आम्ही गणतीविसीं वारंवार म्हणतों, परंतु हे प्रत्योतर करितात कीं, आठवडियाचा आठवडा रोजमुरा देत जा म्हणिजे गणती जेव्हां म्हणाल तेव्हां घेणे. ये गोष्टीचें उत्तर प्रत्योत्तर द्यावयास फार सुचतें, परंतु खावंदाचे मर्जीचा आर्थ कलावा हेंच मानस होतें. सांप्रत आज्ञापत्र आलें याजवरून बहुत समाधान जालें. याउपर खडेगणती उत्तम प्रकारे घेतो. सारे लस्करची येकदां खडगणती व्हावी म्हणिजे उत्तम. राजश्री गुणबा व राजश्री त्रिंबक तुकदेव व राजश्री हरि राम व सारे सरदार यांस

आम्ही विनंती केली कीं, सारे लस्करची खडेगणती येकदा व्हावी. तुम्हांकडे सरकारचे कारकून आहेत ते गोपालरायाची गणती घेतील, आम्ही तुमची गणती घेऊं. म्हणिजे उत्तम. घालमेलीचा प्रकार होणार नाहीं. ये गोष्टीस राजश्री गोपालरावहि राजी आहेत. परंतु खामखा आगत्यवाद धरून याजकडून सांगितल्याने ते यैकतील यैसें नाहीं. यास आदरसत्कार करिताच पुरे होते. जे गणती सांगितली त्याप्रमाणें खर्चास द्यावें. मनांत मात्र येते कीं, गणती होऊन खर्चास द्यावें, परंतु समर्थ नाहीं, यैसें बोलतात. येविसीची विनंती आम्ही सेवेसी ल्याहावी यैसी योग्यता काये? परंतु सेवाधर्म कचें वर्तमान सेवेसीं कलवें, पुढें सारे लस्करची खडे गणती येकंदर व्हावी म्हणिजे येथास्थित. याजकरितां येथील सरदारास आज्ञापत्रें सादर व्हावीं कीं, सरकारचे कारकून तुम्हांजवल आहेत त्याजकडून सारे येके दिवशीं खडे गणतीची च्यार च्यार दिवस अगोधर ताकीद करून उत्तम प्रकारें कोणाचा परा न फुटतां गणती सरकारची होती त्या रीतिनें देणे, यैसें आज्ञापत्र पाठवावे, अगर सरकारचे कारकून स्वामीनी येथें पाठविले आहेत त्यांतून येकाचेच नावें सर्वांस आज्ञापत्रें पाठवावीं कीं, यास गणती देणे व कारकून सरकारचे आहेत त्यांस येक आज्ञापत्र सादर व्हावें कीं, फलाणियास गणती येकंदर घ्यावयास सांगितलें आहे, तर ते तुम्हीं येक विचारें होऊन स्वामीकार्य करणे, यैसें आज्ञापत्र मर्जीस येईल तर पाठवावें, म्हणिजे गणती यथास्थित होईल. राजश्री गोपालराव यानी पागेचे गणतीस मात्र आम्हासी छद्म केलें आहे. गोट गणतीहि दिल्ही नाहीं, खडे गणतीहि देत नाहींत. वरकड लोकाची गणती जसजसे जमा होत गेले त्याची गणती आम्ही घेतली, सिवाय रोजमुराहि दिल्हा नाहीं, याजमुलें कचे गणतीचा पाया आम्हाजवल नावनिसीवार घोडियाचा रंग देखील लिहिला आहे. आम्हांबरोबर राजश्री भिवाजी व्यंकटेश व राजश्री कासी लक्ष्मण दिल्हे आहेत, हे आमचे विचारें वर्तोन स्वामीसेवा उत्तम प्रकारें करितात. वरकड येथील राजकी वर्तमान तर कूच मुकाम जालें तर सर्वांस चिठ्या पाठवाव्या, कारभार करणे तो राजश्री विसाजी नारायण याजवांचून कांही येक होत नाहीं, बिनीस त्यानी आपले पतकानसी चालावें, राजश्री मल्हारराव याचे डेरियास दोचौ दिवसा जावें, कार्यभाग जाला तो व पुढें करणें तो सांगावा, गणेशपंतासहि कार्याकारण बोलाऊन आणावें, राजश्री यशवंतराव यानीहि यैक्यता संपादिली आहे, कार्यभागास उजूर करीत नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Chintaman informs the Peshwa that his orders regarding the weekly muster of the entire army have not been properly executed as the majority of the soldiers are out plundering and most of the commanders are putting the writer off with all sorts of excuses.*

No. 144] [March 1767 ?

श्री

[पहिला बंद गहाळ.]

विज्ञापना—गेले. गोपाळरायाचे हिसेबाचा फडशा जाला. सतावीस लाख रुो कर्ज समजाविले. त्यापैकी आठ लाख रुो तोडून एकूणीस ठरले. त्यात पाच लाख पथकाची सिलक वजा घालून, बाकी चवदा राहिले ते दरसाल दोन लाख प्रमाणे द्यावे, येणेप्रमाणे करार करून मागील जाबसाल पुसो नये याप्रमाणे करार होऊन फडशा करून नारो आपाजी पुण्यास गेले. हैदर नाइकाची खंडणी लौकरी जाली तरी अर्काटाकडे जाऊन श्री गोविंदजीचे दर्शन घ्यावें असा श्रीमंतांचा मनोगत आहे. खंडणीचा प्रकार, मदगिरी माघारी दिल्यास चाळीसपर्यंत व्हावी असा अन्वय दिसतो. परंतु येथील वोढ भारी आहे. दुसरे, यंदा प्रतापहि भारी वाढला आहे, त्याजवर सलाबत मोठी पडिली आहे, त्याची खराबी बहुत, माणूस कोणी राजी नाही, असा विचार आहे. आजपर्यंत बेंगरूळ अथवा त्याजसीच गाठ पडिली असती, परंतु चेनरायदुर्गास पंधरा दिवस लागले यामुळें मनसबा लांबणीस पडिला. याउपर श्रीइच्छेकडून काय होईल पाहावें. प्रस्तुत नेट आहे याप्रमाणेच धरिल्यास मोठेच काम व्हावेंसे आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This letter reports the probable terms of an agreement which the Peshwa would be willing to offer to Haidar.*

✓ No. 145] [March 1767 ?

श्री

सेवेसी हरि बलाल सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. हैदर नाईक याजकडील वकील येथे आला आहे, त्याजकडील बाकीचा निकाल जाला पाहिजे. यास्तव सेवकराम व त्याचा बाप सिवलाल यास लस्करात पाठवावे, म्हणजे सरकारचे बाकीचा निकाल करून देतील. सेवकराम येथे न आल्यास काहीच ठिकाण लागणार नाहीं, याजकरितां जासूद जोसी(डी) पाठविली आहे. आपणहि त्याजबरोबर माणसे देऊन उभयेतां लस्करास ये तें करावें * येविसी सरकारचें पत्र स्वामीस गेलेंच आहे. सेवकरामास जरूर पाठवावे म्हणजे फडशा होईल व हिशेबहि तपसीलवार पाठवावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant requests Nana Fadnis to send Sevakram and his father Shivlal to settle with the agent of Haidar the amount of tribute due from him to the Peshwa.*

No. 146] [3-3-1767

पो छ २० सवाल सबा
फालगुन ह्या बहिणाजी
जासूद जथे कर्णोजी नाईक

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ २ माहे सवाल मुा किले मदगिरी येथे स्वामीचे कृपेकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. हिकडील वर्तमान तरीं सिरे फते जाहालियाचे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहून पाठविलेच आहे, त्याजवरून विदित जाहालेच असेल. सिरेयाची मामलत मुकुंद श्रीपत यास सांगितली. फडणिसी राजश्री नारोपंत नानाकडे मागे होती त्याप्राा त्याची त्याजकडे सांगावी म्हणौन श्रीमंतास दोनतीन वेळ विनंती केली, परंतु न आइकिली. वाो राजश्री विनायकभट थथे यास सांगितली. सिउबाने येऊन राहावे. मजमू थथे याजकडे होती ती कृष्णाजी गंगाधर सेणवी, पहिले हशमाचे दफ्तराकडे होता त्यास सांगितली. सबनिसी कृष्णराव बलवंत याजकडे होती ती नारो मोरेश्वर सिवणेकरे यास सांगितली. याप्रमाणे दरकी[१] धंदे सांगितले. सिऱ्याहून छ २९ रमजानी कूच करून त्याच रोजीं मुकाम मजकुरास आले. हा किला यावयासी येक दोन रोज लागतील. येथेहि हैदर नाइकाची मजबुदीच्च आहे. हे कार्य जाहाल्यावर पुढें चिकबालापुराकडे जातील. तेथील खंडणी जाहाल्यावर हुसकोटे गुरुमकोंडा या रोखे शह देऊन तेथील अमल बसऊन पुढे श्रीरंगपटणास जातील. हैदर नाईक पटणास आहे म्हणून दाट खबर आहे. सामानहि चांगलेच आहे म्हणौन चोरबातमीचा बोलवा आहे. निजामअली अनेगोंदीजवल आला. पुढे दरमजल येत आहे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस व बाबा वैद्य अद्याप येऊन दाखल जाहले नाहीत. गजेंद्रगडाजवल आल्याची खबर आहे. सिऱ्यास मुकुंद श्रीपाद याजवल मााराविलेकडील पागा व धोंडो दत्तात्रय मिलोन पाचशे स्वार व पाचशे गाडदी हुजूरच ठेविले. आठसे प्यादे नवे त्याणी ठेवावे या प्राा तेथील नेमणूक जाहली. मीर रजा सिऱ्यातील यास जमावसुधा समागमे घेतला आहे. गोपालराव याचे गोटाजवल राहावयाची नेमणूक करून दिल्ही आहे. हैदर नाईक पटणांस आहे, त्यास बरे वाटत नाही, असी दाट खबर आहे. फालगुन मास लिहिली आहेत कामें यास लागले. पुढे चैत्रात काही त्याजकडील अनुसंधान लागेल तर पाहावें, नाही तर पटणाकडे जातील. इकडे छावणी होती तर मोठी मोठी कामे सहजात होती. परंतु तो

१ अधिकाराचे हुद्दे.

डौल दिसत नाहीं. पुढे जे होइल ते सेवेसी लिहून पाठऊ. हैदर नाइकाने आजपावेतो दुराचरण केले त्याचे प्रायेश्चित्त बरेवजेने व्हावे असा समय होता, परंतु देसचा पायेबंद जबरदस्त आहे, यामुळें छावणी होणे दुरापास्त आहे. हैदऱ्या[1] निर्मूळ करावयाचा समय हाच आहे. श्रीकृपेने जे घडेल ते खरे. विदित व्हावे हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal to Nana Fadnis, informing him of the measures taken by the Peshwa for garrisoning Shira newly conquered. The Peshwa then proceeded to Madgiri and would soon come up against Haidar, they add.*

✓ *No. 147*] [*6-3-1767*

पो छ १७ सवाल
सन सबा बाा रहि-
मतखान व घासी.

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ सवाल मुाा किले मदगिरी प्रांा श्रीरंगपटण स्वामीचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष. सिरे फते जालें. मुकुंद श्रीपत यास तेथे ठेविले हे पूर्वी लिााच आहे. सिरेयाहून कूच करून येथे आले. त्यास मदगिरीचा किला या प्रांती पाहाडी चांगला फार अवघड, माणूस सेवटील चौबुरजीत जावयास अवघड, अशे रीतीचे स्थल. खाली शहरपन्हां[2] चिरेबंदी. हैदर नाइकाचे विश्वासु स्थल. त्यास मोर्चे लाविले. येका दिवसांत हला करून शहरपन्हा घेतला. लूट फार जाली. दाहा पंधरा वर्षांत आपले फौजेस असी लूट मिलाली नवती. शहरपन्हा घेतला. वरील लोक कौलास आले, त्यास खाली उतरून सरकारचे निशाण चढले. बिदरूरचा राजा व राणी येथे कैदेत ठेविली होती ती सांपडली. श्रीमंतानी आणून बहुत बहुमान केला. राहुव्या वगैरे सरंजाम देऊन ठेविली आहेत. मोठे येश आले व किला फार चांगला हस्तगत जाहाला. याउपरी हुसकोटे कोल्हाराकडे जातील. हैदर नाइकाचा वकील पटणाहून निघाला. येकदोन रोजात लस्करात येईल. तदोतर बोलण्याचा प्रकार होईल

---

१ हैदराचा असा हलका उल्लेख केलेला अनेक वेळा येतो. हैदर हलक्या कुळांतला म्हणून नफर मजकूर असाहि बरेच वेळा उल्लेख केला गेलेला आहे. २ शहरपन्हा=तटबन्दी.

तो लिहून पाठऊ. श्रीमंत राजश्री दादा फडणीस छ ३ सवाली लस्करांत दाखल जाहाले. कळले पाहिजे. हैदराचा वकील लस्करांत आला. याउपरी होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal Phadke report the capture of Madgiri and the acquisition of a large amount of plunder.*

No. 148] [*8-3-1767*

पो छ १७ सवाल सन सबा

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ ७ सवालपावेतो कसबे मेदगिरी येथे सुखरूप असो विशेष. किले मजकूर हस्तगत जाहाल्याचे वर्तमान पेशजी लिहिले आहे, त्याज-वरून विदित होईल. मदगिरीचा सुभा लक्ष्मण बलाल मेहेंदले आपाकडील यास सांगितला. सिबिका दिल्ही. फडनिसी लक्ष्मण गोविंद नारो बाबाजीकडील यास सांगितली. मजमु मोरो खंडेराव कारकून सिलेदार यास सांगितली. तूर्त येथील रखवालीस स्वरूपजी खुले यास पथकसुधा ठेविले. येथील बंदोबस्त करून पुढे बालापुरास जावयाचा मनसबा सिध जाला, तो हैदर नाइकाकडील करीमखान व आपाजी राम वकील कालच येथें आले, त्याच्या भेटी जाहाल्या, याजमुले येकदोन मुकाम करावेसे ठरले. राजश्री गोपालराव व रास्ते यास पुढे चिक-बालापुराकडे रवाना केले. मुरारराव याची फौज मडिकसरे घ्यावयासी पाठविली आहे. वकिलासी बोलोन खंडणीचा मजकूर सिधतेस आला नाही. परंतु बोलावयाचा भाव तूर्त तीस पस्तीसपावेतो बोलावे, मदगिरीचे ठाणे माघारे घ्यावे असा वकिलाचा भाव आहे. परंतु येजमानाचा भावगर्भ पंनासास उणे करू नये, सरकारचा तालुका व मुराररावाचा मुलूक झाडून सोडावा, कडपे तालुक्यात त्याणी ठाणी घेतली आहेत ती सोडावी, असे आहे. अद्याप त्याच्या व यांच्या बोलण्याचा अर्थ बहुतकरून कोणास समजला नाही, परंतु स्थूलमानेकरून बोलवा आइकला तो लिहिला आहे. यंदा हैदरनाईक फार करून आयास आला आहे. घाटाखालून फजीत पावोन आला, इकडे श्रीमंतानी येवून ठाणी घेतली. नवाबहि आदवानी तालुक्यांत आले, मागाहून येत आहेत, याजमुले त्याच्या लोकानी धास्त खाऊन बहुत बेदिल आहेत. याजमुले श्रीमंत जसे म्हणतील तसे आइकेल, यांत गुंता नाही. येथील सुभा राघो बावाजीस सांगत होते त्यास ते कबूल न करीत. मग लक्ष्मण बलाल मेहेंदले यांस सुभा सांगितला. मदगिरी किला या प्रांती दोलताबादेप्रमाणे आहे. जागा बाकी चांगली आहे.

हैदरनाइकास थोडेसें बरेहि वाटत नाही, यामुळे फार करून सला करावा हा त्याचा मानस आहे. मातबर खंडणी देऊन मुल्क पहिल्याप्रमाणें सोडिल्यास आइकावे ही येथील मर्जी आहे. फौजेचा दबाव चांगला पडिला आहे. हा किला लौकर आला यामुळे बहुत हैदरनाइकाने दहशत खादली आहे. कळावे बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*The measures taken by the Peshwa in settling the newly conquered district of Madgiri and the various officers appointed to administer it are given in this letter. Negotiations started by Haidar through Karimkhan and Apaji Ram are also referred to.*

√*No. 149*] [*18-3-1767*

पो छ ९ जिल्काद सबा.

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ १७ सवाल वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंतानी मदगिरीहून कूच करून दोन कोस चेनरायदुर्गास याच मुकामी आले. किला पाहाडी बेलाग, वरते तीन परिघ. मोर्चे लावणे प्राप्त जाहाले. आठ दिवस मोर्चे बसले. तोफांची मात्र मारागिरी होते. भिंताड मजबूद. उपाय नाही. आणखी दोनच्यार दिवस वाट पाहून हला करावी असे होत आहे. घडेल ते खरे. राजश्री गोपालराव फौजसुधा जाऊन थोरले बालापूर घेतले. वरकड राजश्री मुराररायाची ठाणी फार करून बसली. येकदोन राहिली तीहि बसतील. हैदर नाइकाचा वकील गोपाळरायाचे लस्करात आला आहे. त्याची बोली की सिरे बाळापूर घेतले ते घेतले. आतां दुसरी जागा घेऊं नये. मदगिरि पटणची ती माघारी द्यावी. तीस लक्ष रुा खंडणी देतो. श्रीमंताचे मानस की, पहिला सरकारचा तालुका झाडून सोडावा व मदगिरि नवा किला घेतला हा सोडू नये. आणि खंडणी घ्यावी येविसींची भानगड पडली आहे. मदगिरी सोडिली नाही तर खंडणी होत नाही. फेदीस काम पडेल असे दिसतें. श्रीसतेकडून घडेल ते लेहून पाठऊ. आपाजी जाधव यांचे पाठीवर पुळी जाली होती. पंधरा वीस दिवस श्रमी केले. काल फाल्गुन वाा २ मंगळवारी रात्रौ देवाज्ञा जाली. मोठा सरदार गेला. ईश्वरी इच्छा प्रमाण. मोगल हरपनहलीचे रानात आला. मागाहून येतो. मोगलाचे येणे व्यर्थ जाले. सरकाच्या खंडण्या जाल्या. त्याजपासून तोंहि घेतो. रुकनुतदौले पाच हजार फौजेनसी पुढे येणार आहेत. नवलविशेष होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant writes home that the Peshwa's guns are pounding the walls of Chenraidurg, which would later on be assaulted. Balapur has been invested and Haidar is seeking terms. Appaji (Satvoji) Jadhav is reported to have died.*

No. 150] [18-3-1767

पो छ ९ जिलकाद सबा सितैन.

श्री

सेवेसी माहादाजी नारायेण व लक्ष्मण नारायेण सां नमस्कार विज्ञापना. येथील ता छ १७ सवाल मुकाम किले चेनरायेदुर्ग प्रां श्रीरंगपटण येथे स्वामीचे कृपे-कटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी मुकाम मजकुरास श्रीमंत छ १० सवाली आले. येताच मोर्चे लाविले. किला अवघड. आंत लोक फार आहेत यामुळे अद्याप बोलो लागले नाहीत. गोलागोली रोज होत आहे. गोपालराव व आनंदराव रास्ते यास पुढे चिकबालापुरास पाठविले आहेत. त्याणी थोरले बालापूर हलके होते ते घेतले. धाकटे बालापूर मजबूत आहे ते त्याचे वस्तू यावयाचे नाही व हाहि किला लौकर आला पाहिजे यास्तव त्यास येथे बोलाविले आहे. येका दोहो रोजी हला करून किला घेणार. उपरांत धाकटे बालापुरास जाणार. हैदर नाइकाचा वकील गोपालराव याजवल आहे. अद्याप काही बीत[१] बसत नाही. यांचा मानस पहिल्याप्रमाणे मुलूक व हाली मदगिरि किला घेतला हा सोडून मातबर खंडणी निदान चालीस लाख-पावेतो जाहाल्यास सलुख करावा असे आहे. पुढे होईल ते लेहून पाठऊ. सटवोजी जाधवराव यास बरे वाटत नव्हते, त्यास फाल्गुन वद्य द्वितीयेस भोमवारी देवाज्ञा जाली. मातबर सरदार गेला. सेवेसी कलावे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना. निजामअली रायेदुर्गाजवल आला. खंडण्या घेत येतो. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Narayan reports that Gopalrao Patwardhan and Anandrao Raste captured Balapur and that the Peshwa has besieged the fort of Chenraidurg ; the letter also announces the death of Satvoji Jadhav, son of Pilaji Jadhav, which happened on the 17th of March 1767.*

No. 151] [20-3-1767

पा छ ३ जिलकाद सबा

चैत्र हा राणोजी रामजी

जथे बजाजी नाईक

श्री

शेवेसी बाबूराव केशव व बाबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १९ सवालपावेतो मुा किले चेनरायदुर्ग स्वामीचे कृपेकरून कुशल असो

१ घडी बसत नाहीं. तडजोड ठरत नाहीं.

विशेष. या किल्यास मोर्चे लागोन आज दाहा दिवस जाहाले, रोज तोफाचा मार होतो, पाहाडी दगडी किला, कोटाचे काम मजबूद, याजकरितां काहीसी सफेली ढासलते. रिकामे[1] माणूस वर जावयासी संकट पडते. तीन आंगे बेलाग[2] आहेत. येक आंग काहीसे[3] आहे, तेथे तोफा नेऊन दोनतीन दिवस मार होत आहे. हला करावयासी यकायेकी हिया होत नाही. येकदोन रोजा हला करावी असा मनसुबा आहे. हैदर नाइकाचे खंडणीचा मजकूर अद्याप काही नाही, निजामअली चित्रदुर्गानजीक आले आहेत. वरकड नवल विशेष लिहावेसारिखे नाहीं. शेवेसी श्रुाा होय हे विज्ञापना.

¶The writers Baburao Keshav and Babaji Mahadeo report that the fort of Chenraidurg is still holding out. Its strategic strength makes it invulnerable.

√*No. 152*] [*20-3-1767*

पो छ १९ जिलकाद चैत्र.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक बालाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १९ सवालपर्यंत यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लस्करातून काल पत्रें आलीं. लस्करचा मुकाम किले मदगिरीनजीक आहे. सिरे फते जाहाल्याचे वर्तमान पेशजी स्वामीस लिहिलेच आहे. सिन्याहून कूच होऊन किले मजकुरास गेले. त्यास मदगिरीचा किला त्या प्रांते फार अवघड, माणूस सेवटील चौबुरजीत जावयास अवघड, अशे रीतीचे स्थल. खाली शहरपन्हा चिरेबंदी. हैदर नाइकाचे विश्वासु ठिकाण. त्यास मोर्चे लाविले. येका दिवसांत हला करून शहरपन्हा घेतला. लूट लस्करात फारच आली. शहरपन्हा घेतलियावर किल्यावरील लोक कौलास आले, त्यास खाली उतरून सरकारचे निशाण चढले. हा किला पाहाडी आहे, फार चांगला आहे. दौलताबादेचे प्रतिमेचा आहे. अलपसायासे हस्तगत जाहला. या किल्यात बिदनूरचा राजा व राणी अटकेस होती ती सापडली. त्यास बहुमान वस्त्रें दिल्ही.

---

१ (?) २ कठीण. लाग न चाले असे. ३ कांहींसें सुकर.

राहुट्या वगैरे सरंजाम देऊन ठेविली आहेत. याप्रमाणे वर्तमान लिहून आले आहे. स्वामीस विदित व्हावें याजकरितां लिहिले आहे. *सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Janardan reports to Raghunathrao Dada that the Peshwa captured the forts of Shira and Madgiri; he further states that in the latter place were found the King and Queen of Bednore who had been confined there by Haidar and who were released and treated with respect due to their rank by the Peshwa.*

No. 153] *[21-3-1767*

पौ छ ३ जिलकाद सबा चैत्र हा

राणाजी रामजी जथे बजाजी नाईक.

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २० नवाल मुकाम किलें चेनरायदुर्ग येथे स्वामीचे कृपेकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी किल्ला अद्याप आला नाहीं. दोनतीन रोज खासा स्वारी जात असत्ये, परंतु हाल्याची सोय होत नाहीं. आपणाकडील तोफाची किल्याचे बुरुजावर मारगिरी होत आहे. भिताड पाडून आज उद्यां हला करणार. हैदर नाइकाकडील वकील गोपालराव याजवल आहे तो, मदगिरि सोडावी आणि तीसपस्तीसपावेतो खंडणी घ्यावी म्हणोन बोलतो, परंतु याप्रमाणें तह करावा ही मर्जी नाहीं. मदगिरि राहून चालीसपावेतो कबूल जाहाल्यास तह व्हावासा आहे. निजामअली पाचा साता गांवावर आला. दरमजल येत आहे. येथील गुंता उरकला म्हणजे चिकबालापूरास जाणार. गोपालराव व रास्ते पुढेच आहेत. सेवेसी कलावे म्हणोन लिहिले आहे. बहुत काय लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Nana is informed about the proposed attack on the fort of Chenraidurg. The writer further says that the negotiations for a treaty have been started by Haidar but the terms offered by him are not acceptable to the Peshwa.*

No. 154] *[1-4-1767*

पौ छ १९ जिलकाद

सबा चैत्र हा माहादजी सिंदा

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जिलकाद मुाा थोरले बालापूर वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान चेनरायदुर्गचा किला घेतला हे पूर्वी सेवेसी लिाा आहे. थोरले बालापूर राा गोपालरायानी घेतले. येथे श्रीमंत आले. येथून पुढे राजश्री गोपालराव, रास्ते व राजश्री

रामचंद्र गणेश यांजबा पांच हजार हुजरात देऊन चिकबालापुरास रवाना केले. त्याणी मोर्चे लाविले. येथून आठ कोस आहे. श्रीमंतानी आज कूच केले, चिकबालापुराआलीकडे दोन कोस राहातील. बालापूर लवकरच येईल. नबाब रामदुर्गपर्यंत आले, तेहि येत आहेत. हैदर नाइकाकडील करीमखान आला होता तो फिरोन पटणास गेला. आठां दिवसी यावयाचा करार केला. सा दिवस जाले. दोन चार रोजा येईल. मनोदयानरूप जाबस्वाल जाल्यास नवाब आल्या-पूर्वीच फडशा होईल. नाही तर चार दिवस अधिक लागतील. होईल ते लिहून पाठऊ. आपण सांडणीस्वाराबा व जासुदाबा पत्रें व सरकारचा जिनस अफ्ता-गीर पडदे वगैरे पा ते पावले. पोशाक पावले, मर्जी प्रसंन जाली. जाब तयार जाले आहेत मागाहून पाठऊ. प्रतापगडचा व दुसरे दोन कागद श्रीमंतानी तूर्त रवाना करविले ते खिजमतगाराबा पा आहेत. वरकड मागाहून पाठवितो. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. श्रीमंत रा दादा लस्करात आलियावर गाडी-खान्याचे जागाविसी श्रीमंतास विनंती केली. बरी झटपट जाली. श्रीमंतास विनंती केली कीं मनःपूर्वक देणे तर द्यावी, नाही तर तसेच सांगावे. फिरोन पुसणार नाही. तेव्हा कृपा करून सांगितले की निखालसपणे ती जागा दिल्ही. येविसी श्रीमंतानी आपणास व रा तात्यास पत्रे लिहिली आहेत व दादानी पत्रे लिा आहेत ती पाहून त्याची पैरवी करून जागा हवाली करून ध्यावी. श्रीमंताचे चित्तांत पुर्ते आले की ही जागा दिल्याखेरीज श्रीमंत बाबांचे[१] समाधान राहात नाही. त्यावरून संशय न ठेविता जागा दिल्ही. आपण उद्योग करून कार्य करून घावें. लांबणीवर पडले म्हणजे लांबच पडते. येविसी मी ल्याहावेसे नाहीं. ये गोष्टीची जितकी त्वरा तितकी उपयोगी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana Fadnis of the capture of Chenraidurg and further states that the places invested by Gopalrao and others will soon fall.*

No. 155] [*14-4-1767*

पो छ २९ जिलकद सन सबा

श्री

शेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सा नमस्कार विज्ञापना. ता छ १४ जिलकाद मुा कसबे हु(स)कोट येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान

१ बाबूराव राम फडणीस.

येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर दोनें[1] बालापुरे देवनहली व नंदीगड व हुसकोटे येणेप्रा ठाणीं घेऊन तमाम आमल बसला. पुढे मोगल येणार आहे तो आलियावर मग बेंगरुलास लागतील[2] किंवा काये मनसबा होईल हे न कले. मोगल मदगिरीवर आहे. सोला कोशाचे अंतर आहे. आजपर्यंत श्रीकृपेने मनसुबा चांगला होत आला. खंडणी होऊन फडशा होणे त्यास मदगिरि आदिकरून त्याची स्थलें घेतली ती देत नाहीं, तेव्हा खंडणी कसी होते? त्यांत मोगल मागाहून येतो त्याचा गुढंगा[3] आंतून आहे. मोगल लवकरच येऊन मिलेल. मग काय ठराव होणे तो होईल. छावणीचाच मनसुबा, परंतु देसी जरूर जाणें यामुले विसकलीत दिसतें. दिवस मसलतीचे राहिले नाही. जे होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. लस्करांत रोग फार आला आहे. मजला आठ चार दिवस ताप येतो. उपाय करितो. आपले आर्शीर्वादेकरून उतमच होईल. केवळ शरीर अशक्त. पुण्यांत तीन महिने वाखा जाला. वरचेवर उपद्रव होतो. असों. जगन्निवास ठेवील तसें राहावें. हे विज्ञापना.

राजश्री नारोपंत नाना स्वामीस सा। नमस्कार लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write about the successive victories in the campaign and reiterate their opinion that the Peshwa's return to Poona would undo all that has been achieved so far.*

No. 156] [*27-4-1767?*

पौ छ २४ जिलकाद

श्रीविठल

शेवसीं राघो बावाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २१ जिलकादपर्यंत येथास्थित आसे विशेष. ताराचंद याजबराबर इभरामखान लोहाणी हैदरखान याजकडील पाडाव किलेयांत ठेवावयास पाठविले ते येऊन पावले. आज्ञेप्रमाणे बेडी घालून ठेविले. ताराचंद जमादार याचे विद्यमानें होसकोटेयास बंदीवान आणून पोहचाविला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ragho Bawaji acknowledges receipt of a captive of war from the army of Haidar.*

---

१ चिकबालापूर व दोडबालापूर. २ एकाद्या किल्यास किंवा ठाण्यास लागणें = वेढा देऊन बसणें.
३ फितूर, हैदराकडे सत्र अशा अर्थीं किंवा मोगलासहि कांहीं अंतस्थ मुद्दे साधावयाचे आहेत अशा अर्थीं.

No. 157] [24-4-1767

पैा छ १३ जिल्हेज.

सबा हाा ब्रोथाटी बारदार

श्री

शेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल साां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २४ जिलकाद मुाा नजीक बेंगरूल येथास्थित असे विशेष. इकडील वृत जाहाले ते वरचेवरी पूर्वी शेवेसी लिहून पाठविलेच आहे. प्रस्तुतचे वर्तमान तरी आपाजीराम हैदरनाइकाकडून बोलीचालीच्या संदर्भास आले होते, ते सा दिवसाचा वाइदा करून गेले. त्यास आज आठ दिवस जाहाले. येका दो रोजी येतील. त्यात मुलकाचा लढा मातबर आहे. दुतर्फा ये गोष्टीची आड मातबर आहे आणि देसी जावयाची निकड इकडील बहुत आहे, यामुळे थोडी-बहुत त्याची गोष्ट आइकून खंडणीचा प्रकार होईलसा दिसतो. त्यामध्ये घडेल ते खरे. मोगलहि विसा कोसावर आले आहेत. रुकनुतदौले इकडे यावयास मोगलापासून निघाले आहेत. येका दो रोजी येऊन पोहचतील. तदोतर परिछिन्न पडशा होईल. सारांश खंडणीचा प्रकार घडो न घडो, परंतु देसी येणे जरूर होते यात संदेह नाही. पैका नाही यामुळे खंडणीचा यैवज वहात वाटोले करून घेतीलसे दिसते. विदित व्हावे. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. येक महिना जाला, स्वामीकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तर लिहून पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडे पाऊस पडू लागला आणि मसलतीचा सेवट येकहि नाही. नद्यास नावा नाहीत. जे होईल ते लिहून पाठऊ. छावणी करिते तर फार काम होते व पैका मुल्लक फार मिलता, परंतु देसी जाणे यामुले खंडणीहि जाली तथापि हलकीच होईल. कर्ज दाहा बारा लक्ष लस्करात घेतले आहे. कसी तरी खंडणी जाली आणि बाहेरचे बाहेर फिटले म्हणजे फार आहे. मजला समाधान वाटत नवते, आता बरे आहे. विशेष होत नाही. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal write that negotiations with Haidar through his agent Apajiram are progressing as the Peshwa is anxious to return.*

No. 158] [3-5-1767

ले.

पैा छ २२ जिल्हेज सन सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाळ व हरि बलाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ जिल्हेज मुाा बेगरुलानजीक वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी

सांडणीस्वाराबा पत्रे पा ती पावली. सविस्तर मागाहून लिहून पाठवितो. इकडील वर्तमान एकतीस लक्ष रुा खंडणी जाली. यासिवाय मोगलाची पेशकसी दरसाल सा लक्ष, तीसाला अठरा लक्ष याप्रमाणे ठराव जाला. माहादशेट निशेसाठी हैदर नाइकाकडे पाठविले. सा दिवस जाले. चहू दिवशीं जाबस्वाल आला म्हणजे कूच करून दरमजल पुण्यास येणार. मग काही गुंता नाही. मोगल सा कोसांवर राहिला आहे. रुकनुतदौले येऊन भेटले. लस्करांतच आहेत. दोन रोजा निरोप घेऊन नवाबाकडे जातील. इकडे नित्य पाऊस पडतो. वाटेने हैराणगत होईल. सविस्तर मागाहून लिहून पाठवितों. श्रीमंत लवकर पुण्यास येणार. यांचे मर्जीची कामें असतील, लवकर आटोपावयाजोगी, ती आटोपून घ्यावी. वरकड नवल विशेष लिहिजेसें नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶[*Mahadaji Ballal and Hari Ballal give the terms of the treaty concluded with Haidar.*

√*No. 159*] [*5-5-1767* .

पेाा छ २० जिल्हेज सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ६ जिल्हेज मुाा नजीक बेंगरूल वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १३ जिलकादचे पत्र प्याद्याबाा पाां तें पावोन बहुत संतोष जाहाला. लिहिले वर्तमान कलले. लाखोटे पाठविले आहेत हे श्रीमंतास प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रेाा पत्रें प्रविष्ट करून उत्तरे घेऊन पाा असेत, त्यावरून कलेल. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाची खंडणी येकतीस लक्ष जाली व मोगलास पेशकसी सा लक्ष द्यावयाचा करार आहे. त्याचे तिसाला अठरा लक्ष येणेप्रेाा ठराव जाहाला. ऐवज निमे तूर्त, निमे आश्विनपर्यंत, दोन हतियानी, याप्रेाा ठरले. निशा करून घ्यावयासाठी माहादसेट पटणास पाा, त्यास आठ दिवस जाले. येक दो रोजी जाबस्वाल आला म्हणजे येथून कूच करून दर-मजल देशास येणार, मग मार्गी काही गुंता नाही. सिरे, चेनरायदुर्ग व मदगिरि व थोरले बालापूर हुसकोटे, इतका मुल्क सरकारात राहिला. वरकड ठाणी चिकबालापूर, नंदिगड, कोल्हार वगैरे सरकारात घेतले होते ते सोडून द्यावे, बसवापटण त्याजकडे आहे तसें असो द्यावे, याप्राा करार जाला. मोगलाकडील

१. नजराणा.

रुकनुतदौले श्रीमंतास भेटावयास आले. नवाब सा कोसाचे अंतरे आहेत. रुकनुतदौले याची भेट जाली. मेजमानी परस्परें जाली. येक दो रोजात निरोप होईल. याप्रा इकडील वर्तमान आहे. स्वामीस कलावें म्हणौन लिा असे. पुण्यातील कामे श्रीमंताचे मर्जीची लवकर आटोपावयाजोगी असतील ती निकड करून आटोपून घ्यावी. नवल विशेष आढलेल ते लिहून पाठऊं. मिराकडे गुरुमकोंडा वगैरे कडप्याचा मुल्लूक त्याचीच ठाणी होती तो सरंजामात त्याजकडे करार करून दिल्हा. कलावे. श्रीमंताकारणें पाटणी तांदूल मण, दोन मण, तुंगभद्रेचे अनमाने युक्तीस पडल्यास जरूर पाठऊन द्यावे. सूचनार्थ लिहिले आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter mentions the articles of the treaty concluded by the Peshwa with Haidar.*

✓*No. 160*] [*8-5-1767*

पेाा छ २२ जिल्हेज
सन सबा

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ जिल्हेज मुाा नजीक बेंगरूल वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाचा तह जाहाला. येकतीस लक्ष रु. खंडणी जाली. येविसींचा तपसील येक दोन पत्रीं सेवेसी लिहिला. ती पत्रें पावोन वर्तमान विदित जाहालेच असेल. महादसेट पटणास जाऊन ऐवजाची निशा करून घेतली. कांही ऐवज लस्करांत आला, राहिला तो मागाहून घेऊन येतील. दोन च्यार रोजांत माहादसेट आले म्हणजे दरकूच पुण्यास येत असत. आज तोफखाना पुढे रवाना जाहाला. छावणीस फौज राजश्री गोपालराव व रास्ते राहतील असें आहे. मोगलाकडील (रुक)नुतदौले आले होते. परस्पर आदर हो(ऊन बि)दा जाहाले. वरकड इकडील नवलविशेष वर्तमान लिंहिजेसे नाहीं. श्रीमंताचे मर्जीची कामें आहेत, त्यात लवकर व्हावयाची ती नि(कड) करून करावी. सूचनार्थ विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writers Mahadji Ballal and Hari Ballal report that Haidar agreed to a levy of thirty-one lakhs and that Mahadshet had been deputed to Seringapatam to receive the assurance for the money.*

No. 161] [About 9-5-1767

पो छ २७ जिल्हेज सन
सबा बाा कासीद अजूरदार

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जिल्हेज दोन प्रहर दिवस मुाा नजिक सिरे सा कोस वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान हैदर नाइकाकडील खंडणीचे साडेपंधरा तूर्त यावें पैकी नव आले, साडेसा येणे, त्यास माहादसेट मागे आहेत, घेऊन येतील. या तलावर दोन तीन मुकाम मुरारराय़ांचे रवानगीकिरितां होतील. मग दरमजल तुंगभद्रा कृष्णा उतरून दरमजल पुण्यास येणार. तुगभद्रेवर गेले म्हणजे फौजाचे नालबंदीचें काम चालीस लागेल. मोगल बेंगरुलाजवल आहें. त्याचे मते माझी खंडणी थोडी जाली, कांही अधिक हैदर नाइकास शह द्यावा. श्रीमंतानी करार केला त्यास अंतर पडते म्हणोन कृष्णराव बलाल मोगलाकडे पाा आहेत कीं, कूच करून भागनगरास जाणे. उतर येईल ते लिहून पाठंऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. सेवसी श्रुत होय. हे विज्ञापना.

राजश्री नारोपंत नाना स्वामीस साष्टांग नमस्कार. लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal to Nana write about the tribute that was agreed to by Haidar.*

No. 162] [17-5-1767?

पाो छ १ मोहरम सन सबा

श्री

तीर्थस्वरूप राजश्री नाना
वडिलांचे शेवेसी

आपल्ये मोरोबाचे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १८ जिल्हेजपावेतो मुाा नजिक चित्रदुर्ग जाणोन स्वकीय संतोषवृत्त लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण छ ३ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें छ १६ मिनहूस पावलें. जाग्याविसीचा मजकूर लिहिला तो कलला. जागा स्वाधीन जाहाल्याप्रों आहे. दों चहू रोजानी निशेष करून घेतो म्हणून लिाा, उत्तम आहे. हें काम दिकतीचे आहे. यासाठी जितकी त्वरा होऊन सत्वर स्थल हस्तगत करावें आणि त्यास जागा देविली आहे ती त्यास देऊन ते तेथे जाऊन राहिले म्हणजे गुंता नाही.

इकडील वर्तमान तर सर्व सरकारचें पत्रांवरून कळतच आहे. हालीहि हरिपंतानीं लिहिलें आहे त्यावरून ध्यानास येईल. खासा स्वारीहि सत्वरीच देशास येणार. श्रुत होय. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Moroba Dada informs Nana Fadnis of the Peshwa's intention to return to Poona.*

√*No. 163*] [*27-5-1767*

पो छ ६ मोहरम सबा

श्री

शेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २८ जिल्हेज मुाा नजीक कोपल येथे कृपेकडून सुखरूप असो विशेष. इकडील होत गेले वृत ते वरचेवर लिहीत गेलोच आहों. राजश्री गोपाळराव काल फौजसुधां मिरजेस गेले. सावनूरवाले गेले. मुराराराऊ गेले. आता हुजरात मात्र राहिली आहे. त्यापैकी वरचेवर फौज जातच आहे. या उपरी गुंता राहिला नाहीं. मजल दरमजल देशास येतच आहेत. टोक्यास जावयाची संभूत[१] आहे. त्यांमध्यें घडेल ते खरे. स्वांमीस कळावे याजकरितां लिहिले असे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal and Hari Ballal inform Nana that the Southern campaign has been brought to a close and that the army is returning home.*

√*No. 164*] [*4-10-1767 ?*

पाा छ १० जमादिलोवल.

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना विनंती. कोपलच्या किल्यास राजश्री गोपाळराव यांहीं वेढा घातला होता. तीन दिवसात किला माहाराजांचे पुण्यप्रतापेकरून बहुत मेहनत करून फते केला. सेवसी शृत होये हे विज्ञापना

¶*News is reported that Gopalrao Patwardhan captured the fort of Koppal.*

---

१ संभूत वार्ता. वास्तविक संभूत याचा अर्थ किंचित्, यत्किंचित् असा आहे. परंतु ऐतिहासिक वाङ्मयांत त्याचा वार्ता या अर्थी पुष्कळ वेळां उपयोग करतात.

6427

No. 165] [7-12-1767

पौ छ ८ साबान समान पौष मास,

श्री

श्रीमंत राजश्री रावसाचे सेवेसी

आज्ञाधारक राजो दादाजी दिा हजरत मोहदिन सो सां नमस्कार विनंती उपरी. ठाणेच सनद हजुरास नवाब बंदगान अलीजवळी माहाराजांनी पाठविले असतां बजिनस सनद हुजरे सांघाते देऊन नवाबसानी येथें पाठविले होते. माहाराजाचे सनदप्रमाणें ठाणें पावलें. तफशील.

१ भनू
१ कविताळ
१ मोसकी
१ सिंदनूर
१ रवडकुंब
—
५

येणेंप्रमाणें पांच ठाणें माहादजी दगडे व बयाजी कामळे हुजरेचे माफतान आम्हांस पावले. सेवेसी श्रुत असलें पाहिजे, हें विनंती.

छ १५ माहे रजब सन ११८१ हिजरी

¶*A receipt given to the Peshwa by Rajo Dadaji for having taken possession of five places according to a Sanad.*

No. 166] [9-1-1768

पाो छ २१ रमजान
माघ वद्य अष्टमी

नकल

श्री

राजश्री महिमाजी सिंदे गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीरवाद. सुरू समान सितैन मया व अलफ. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. तालुके ममतानगड सरकारातून मीर रजा अलीखान याजकडे आहे. तेथील पुरातन संस्थानिक दासापा नाईक हैदरअलीखान याच्या कैदेत होता. तेथून सुटोन तालुके मजकुरी येऊन पाचसातसे प्यादे मेळऊन भुइकिला ममतानगड यानी घेतला. याजकरितां मीर रजाकडील संजीवन रडी याणी आम्हास लेहून

पाठविले. त्याजवरून त्याचे कुमकेस जाऊन भुइकिला घेऊन रडीचे हवाली केला व दासापाची व संजीवन रडीची भेट करून देऊन खासा स्वारी या प्रांते येई तोपावेतो कजिया न करावा याप्रा करार केला म्हणून लिहिले ते कळले. उतम केले. याउपरीहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. जाणिजे. छ १८ साबान. आज्ञा प्रमाण.

¶*Madhavrao Ballal acknowledges receipt of a letter from Mahimaji Sindia, reporting that the fort of Mamatangad was recaptured by Sanjeewan Raddi.*

No. 167] [*17-11-1768*

पौ छ २३ रजब
सन तिसा हा सेख
इसमाल सांडणी स्वार

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. चिरंजिव राजश्री नारायणराव यांचे स्वारीसमागमे खर्चास पंचवीस हजार रुपयांचे होन सांडणीवर घाळून जलदीने पाठऊन देणे. रा छ ३ रजब सुरु तिसां सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to send 25,000 Hons to his brother Narayanrao.*

No. 168] [*16-2-1769*

पो छ ८ सवाल

श्री

सेवेसी गणेश मल्हार विज्ञापना ऐसिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत रावसाहेब तर माणुरावर आहेत व नवाब निजामअल्लीहि दो कोसावर आहेत. याचा मजकूर आहे कीं, करणाटकचे वर्तमान तर नवाब हैदर नाईक कृष्णावर आला आहे. त्यास्तव मोगलास बलाविले आहे की, तुम्ही व आमची फौज घेऊन त्यास तंबी पोहचाऊन त्याजपासून खंडणी घेऊन ज्याप्रमाणें करार आम्हासी गतवर्षं केला आहे तो देवणे. याप्रमाणें बोली आहे. दुसरें, राजश्री राणोजी भोसले बलापुराकडे गेले आहेत. इकडील तो हे वर्तमान आहे. फार काय लिहिणे? हे विज्ञापना.

¶*Ganesh Malhar writes that the Peshwa and the Nizam intend to undertake a joint expedition to check Haidar's aggressive policy.*

No. 169] [*15-4-1769*

पौ छ ७ जिल्हेज तिसा चैत्र

बा। रुस्तमखान सांडणीस्वार

श्री.

विज्ञापना. स्वामांना छ १७ जिलकादचें पत्र पाठविलें तें पावलें. श्रीमंत लांब गेले याजकरितां नाना प्रकारचीं वर्तमानें उठो लागलीं. त्यास श्रीमंताची कार्यसिधी होऊन सुखरूप पुण्यास यावें म्हणजे निरोप घेऊन टोक्यास जावें. स्वतः कांही अभिषेक करावा असा कांहीं निश्चय केला आहे म्हणून लिहिलें. व यास दोन तीन महिने लागतील हे वर्तमान भिकाजी नाइकांस सागोन ठेवणें, पुढें उपयोगी पडेल, नाहीतर येथे आल्यावर हटकिल्यास तर्क निघों लागतील म्हणोन लिा तें कळलें. भिकाजी नाइकास सांगून ठेविलें. वरकड श्रीमंताची स्वारी भोसले यांची भेट जालियावर लौकरच येईल. स्वामींची भेट होईल तदोतर जसी आज्ञा तसें करावयास येईल. त्याचा आगा येव्हापासून कशास बांधिला पाहिजे? इकडील वर्तमान तर मर्जी बरी आहे. पुण्यास आल्यावर सर्व समजेल. नवाल्यांचा हिंगण्याचा मजकूर लिहिला तो कळला. वाकडा अर्थ किमपि नसतां इतके कशावरून लिहिलें म्हणोन पत्री आज्ञा केली. त्यास कोणाचे लिहिल्यावरून लिहिले होते असें नाहीं. त्यास फार दिवस लागले, पुण्यांतच होते व सर्व प्रकारे स्वामी त्यांचे वाली, हे जाणोन विनंती लिहिली होती. दुसरा कांहीं अर्थ नाहीं. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana of the health of the Peshwa who, he says, was soon returning to Poona after finishing the affair of the Bhonsles.*

No. 170] [*5-5-1769*

पौ छ १९ मोहरम सबैन वैशाख हा। लालखान

सांडणीस्वार.

श्री

सेवेसी विज्ञापना. ता। छ २७ जिल्हेजपावेतों मुकाम नजीक देवरायदुर्ग कुशल असो विशेष. स्वामींनी छ ४ जिल्हेजचें पत्र पाठविले, वांछित कालीं पावोन आनंद जाहाला. इकडील वर्तमान मुलबागलचा किला घेऊन पाडून टाकिला. तेथून दरमजल निघाले ते मुकाम मजकुरास आले. या किल्यासमीप पांच सात किले होते ते घेतले. त्यापैकीं देवरायदुर्ग मात्र ठेऊन सेव्याजी आई-तोले नारो शंकर यांजवळ होते त्यास आणून स्थापना केली. गोपाळराव याच

मुकामास आले. छावणीस राहण्याचा मनसबा गोपाळरायानीं सांगितला कीं यंदाची मसलत नासली आहे. हैदरासी गांठ. विना भारी फौज राहिल्या-वितरिक्त त्याजवर दबाव पडोन जागाच काईम राहे इतकें मात्र व्हावे. त्यास खासा स्वारीच राहवी; नाही त्यापेक्षां येखादा मातबर मुत्सदी हुजरातची फौज ठेवावी, आम्ही त्यास राजी आहों. त्याजवरून त्रिंबकरावमामाच्या शेंडीस फुलें बांधत होते. त्याणी शरीरप्रकृतीची हलाखी सांगितली. त्याजवरून किंचित विस्मये-करून आपण राहण्याचा मनसबा केला. श्रीमंत राजश्री नारायेणराव व बाई यास अक्षत्रितीयेस पुण्यास रवाना करावी. समागमे पथकेंहि नेमली याप्रमाणें येक मनसबा ठरला. दुसरे दिवसीं पुन्हां मामाकडेच राहण्याचें अनुसंधान गोविंद सिवराम याजकडूनच लाविलें. येक तुम्ही रहावें, नाहीं त्यापेक्षीं आम्हीं रहावें म्हणोन सांगितलें. त्याजवरून त्याणी विनंती केलीं कीं, ज्यापक्षीं स्वामीच राहतात त्यापक्षीं आपण देशास जावें, मी राहतों. परंतु मी सांगेन तीं पथकें व बालकोबा अगर मलबा यांतून एक द्यावा. पोरव्ती बेगमी करून द्यावी म्हणजे राहावयास आगाध काये आहे? त्याजवरून आज्ञा जाली कीं आम्ही ज्याप्रमाणें सांगों त्याप्रमाणें कबूल करावें नाहीं तर साफच सांगावें. त्यास यानी विनंती केली कीं हैदराच्या पारपत्यास मजला ठेवितां, तेव्हां सामान चांगलेंच असल्यास स्वरूप राहील. केवळ काढले रेघेनेच करीन म्हटल्यास ठीक पडणार नाहीं. राहाणारानें कशास राहावें; त्याजरून थोडेसे सर्द होऊन मामाचे राहाणे महकूफ केलें. आतां आपा बलवंतराव कारभारी बालकोबा याची कमाण चढली आहे. त्यास आपाचा तों गुंताच नाहीं. कारभारी जरत्कारू. छावणीस राहाणें म्हणोन सांगितलें. नाहीं, तो अगोधरच कांगावे करूं लागले आहेत, मग सांगितल्यावर काय म्हणतील तें पाहावें. परंतु त्याचें शरीर फार तुटलें आहे. सामर्थ्य नाहीं हे गोष्ट खरीच आहे. पुढें कसें करितील तें पाहावें. बज्याबाहि दुखणेकरीच आहेत. त्यास राहा म्हणतीलसें सेवटीं दिसतें. कोणी राहावयास धजत नाहीं. आज येक मास जाहाला, लोकांस रोजमरा नाहीं. महर्गता मोठी जाली आहे. स्वामीनी लाख रुपयांची हुंडी पाठविली त्यापैकीं कांहीं यैवज मुदती आगोधरच घेतला. बाकी यैवज राहिला तो मुदतीस भरणा करितील. लाख रुपये कर्ज सावकाराकडे करार केलें त्याचा भरणा होता मुसकल. यैवजच लस्क-रांत नाहीं. छावणीस फौज आठ हजार नेमली आहे. त्याचा पांचमाही आकार दाहा लक्ष रुपये जाहाला. या खेरीज नालबंदीस यैवज पाहिजे. तरतुदेविसीं पेशजीं स्वामीस लिहिलें आहे त्याजवरच भिस्त आहे. छावणीस सरदार कोण राहतो ये गोष्टीचा सिधांत नाहीं. गोपाळराव वडीलपण कबूल करीत नाहीं

धाकटेपणच कबूल करितात. आम्हांकडील बाजीपंत नेमणुकेंत येतीलसें दिसतें. सरदार कोण होईल तो पाहावा. कामावर न राहण्याची तोहमत गुदरली, तपी बसावयाच्या लागांत आहेत. पर्ज्यन्य तो सुरू जाला. नद्यास पाणी यावयाचे दिवस समीप आले, यास्तव यक्षत्रितिये आलिकडेच सिधांत होणें तो होईल. या छावणीमुळें बहुत लोक न राहात, यास्तव पेंचाखालीं येतीलसें दिसतें. राघोबावाजीस हुसकोट्याचा सुभा सांगितला. रामचंद्र त्रिंबक तगीर जाहाले. रामचंद्र त्रिंबक याजकडे तफावत लागली यामुळें दूर जाले. गणेश गंगाधर पागा याजकडील दिवाणगिरी विसाजी आपाजी बाबूजी नाईक याजकडील यास होती व फडणिसी रामराव अबाजी यास होती. त्यास उभयेतां भांडों लागलें यास्तव दोघेहि दूर केले. दिवाणगिरी जैरामपंत बापट गोविंद सिवराम याजकडील यास व फडणिसी राघोपंत खरे मेहुणपुऱ्यांतील यास सांगितली. मजमू बालाजी हरि साठे याची होती ती जैरामपंतीं करून घेतली तेव्हां दिवाणगिरी कबूल केली. धारवाडाकडे हैदर नाइकाकडील कांहीं आवडाव होतो यास्तव तिकडे नरसिंगराव धायगुडे व शहाजी भोंसले व राजमंडलचे लोक नेहमी छावणीस पो निघोन गेले. या बरोबर खंडोपंत मामाहि पुण्यास जावयासी गेले. बहुत काये लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The letter reports the unwillingness of several commanders to accept the command of the Karnatak force after the Peshwa's departure. They feared they would not be supported by an adequate force to cope with Haidar.*

No. 171] *7-5-1769*

पो छ १ मोहरम तिसा
स्वार दिा * * चौकी संध्याकाल.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ जिल्हेज मुाा निंबदेव्हारे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २७ जिल्हेजचे पत्र राा राघोपंत आइतोले यांचे राउताबाा पाा ते पावले. पुण्यापर्यंत डांक बसविली आहे, दिनचर्येचे वर्तमान लिहून पाठवीत जाणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्राो दररोज वर्तमान लिहीत जाऊ. उदैक पारनेरचा मुकाम, मंगलवारी गणेगाव, बुधवारी थेऊर, गुरुवारी पुणे, याप्राो येत आहेत. कलावे. वरकड आपण सांडणीस्वाराबाा छ २६ जिल्हेजचे पत्र पाा तेहि पावले. आता इकडील वर्तमान

अधिकोत्तर लिहिजेसे नाहीं. राजश्री गोविंदराव तात्या यास आपण पत्र मागे पाा होते ते प्रविष्ट केले. त्याचे उतर त्याणी पाठवितो म्हणौन सांगितले, इतका जाबस्वाल लिहिणे राहिला होता. भोसल्यापासून करार करून घेतला व त्यास सरकारातून करार करून यादी दिल्या त्या पुण्यास आल्यावर दाखवनि. गंगापुराहून श्रीमंत मातुश्री बाईसाहेब येतात, उंटे कामाठी पाठवावे, म्हणून लिाा होते. त्यास येथे उंट नाहीत, कामाठी मात्र पाठऊ, म्हणौन लिाा. त्यास, येथेहि उंटाविसी लिाा होते, त्याजवरून चालीस उंट त्याजकडे रवाना केले. कळले पाहिजे. तीर्थस्वरूप राजश्री आबाजीपंतास बरे वाटत नाही, षष्टीस श्रीमंत येत नसिले, तर तुम्ही पुढे येणे म्हणौन आज्ञा. त्यास षष्टीस श्रीमंत येतात, मीहि येतो. विदित जाले पाहिजे. प्रवरासंगमकरानी धोंडभट खरे यांचा पुत्र सिमग्यात मारिला तो कलह लागला आहे. त्यास श्रीमंत तेथे आले. वाो रा गोविंद दीक्षित याणी श्रीमंतास सर्व वर्तमान सांगितले, त्याजवरून गावास बहिस्कार केला. गोविंद दीक्षित व धोंडो माहादेव दौलताबादकर यास वर्तमान मनास आणावयास सांगितले आहे. गावांत कोणी जेवावयास जाऊ नये, डोकी न्हाव्याने करू नये, इतका निकर्ष केला आहे. हे ल्याहावयाचे कारण हेच की, राजश्री कृष्णाजी नाईक थथे याणी काल मजला आपला निरोप सांगितला, त्यास आज्ञेपूर्वीच तेथील बंदोबस्त जाहाला. टोक्यास श्रीमंत आले ते दिवशी आपले वाड्यांत स्वयंपाक करून भोजन केले, च्यार घटका बसले होते, मग डेऱ्यास गेले, हे काल लिहिलेच आहे. नाईक येथे काल खरवंडीस आले. श्रीमंत राजश्री दादांची भेट जाली. आगतस्वागत भाषण होऊन आज निरोप घेऊन टोक्यास गेले. मुंजीकरिता निघोन आलो म्हणोन सांगितले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. खजिना गोविंद अनंताबाा पाठविला तो पावला. सरकारचा जाब मागाहून येईल हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana Fadnis of the probable date of the arrival of the Peshwa at Poona.*

No. 172] [*19-7-1769*

श्री

राजश्री नाना फडणीस गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महिमाजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. तागाईत छ माहे रबिलौवलपावेतों वर्तमान यथास्थित असे

विशेष. आम्हाकडील वर्तमान तरी, पेशजी चिरंजीव उदाजी शिंदे व सुबराव-कृष्ण कारकून यांजबरावर विनंतीपत्र पाठविलें त्यावरून विदित जालें असेल. मीर रजा व हैदरअली येक होऊन आम्हांवरी कमरबंदी केली; याकरितां विना धण्याच्या पायांपाशीं न जातां शत्रुचे पारिपत्य होऊन सरकारसनदा पूर्वी सादर जाल्या होत्या तेणेंप्रमाणें गुरुमकोंडा तालुका किलासुधा सरकारदाखल होणें नाहीं म्हणून, देशे लोकसुद्धां पुणियास येत होतों, तों मौजें अनगुंड ता। चित्रदुर्ग येथील मुकामीं सरकारचें पत्र छ ८ सफरचें आलें तेथें आज्ञा जे, तुम्ही कोठें आहां? काय तरतूद करितां? तुमची व मीररजा अलीखान याची लढाई जाली म्हणून परस्पर लिहिलीं येतात. तुम्ही कोण जागां होता? काय मजकूर करीत होता? मिराजवळ फौज किती होती? कोण जागाहून धाऊन छपा घातला? लडाई कैशी जाली.? लोक जायां किती जाले? हल्ली ते कोठें आहेत.? काय उपद्राप करितां, करणार? साधनसंपत्य तरतूद कशी आहे, तें सविस्तर वर्तमान हुजूर लेहून पाठवणें म्हणून आज्ञा, तरी येविशीच विनंतीपत्र पाठविलेंच आहे. मीररजाबराबर हैदर अलीखान याणी आपणांकडून श्रीनिवासराव बारकी व मनेखान व खास पागा मिलोन सा हजार फौज व च्यार हजार बार देऊन कळसपाकाहून कूच करून मटलेवारपाल्याच्या मुलुकांतून वाट बातमी बंद करून बातमीचीं माणसें कैद करून छ २० जिल्हेजीं मौज. बडपलीनजीक राचोटी दोन कोसावर तेथें प्रथंकाळींच्या साह घटिका दिवसास येऊन आमच्या गोटास वेढा देऊन उभे राहिले. आम्हांकडील गोलागोली दोन प्रहरपर्यंत जाली. आम्हां-पाशीं सामानपैकीं तळाव्यास व जतीस तालुकियांत व घालवेडाकडे मिलोन तीनशें स्वार व बार अगोधरच गेले होते. छ मजकुरीं कूच जालें होतें; सबब कांहीं स्वार राचोटीस बिनीबराबर गेले. बाकी धरेचें तोंडी शंभरदीडशें स्वार व बार सातशे राहिलों. तिसरें प्रहरीं येक प्रहर पावेतों तीन हिरिऱ्या जाहाल्या. त्याजकडील नामी नामी सरदार दाहावीस ठार जाले, शें दीडशें जखमी जाले. आम्हांकडील लोकांनीं कामकाज फारच चांगलें केलें, फार शर्थ केली, तेणेंप्रमाण यादी लेहून पाठविल्या आहेत. आमचें सामान थोडें, ते भारी फौज; मग निघोन कडप्यास गेलो. तेथें साहित्यच नवाबाच्या हातून न होय, याकरितां गुतीस आलों. तेथेंहि सोय न पडे, मग तेथून चिरंजिवाची रवानगी हुजूर केली. तेथून कूच करून हडे अनंतपूरकर सवस्थानिक यांणीं आम्हांस पत्र लिहिलें जे, जागा सरकारची, तुम्ही येथें येणें. कुमकी फौज देऊन खर्चाची बेगमी करितों म्हणून. त्यावरून सवस्थान मजकुरास जाऊन आठ दिवस राहिलों. आम्ही कडप्यास आलेवरी तेच फौजेनशीं मीररजा अलीखान ठाणें तलपुलास वेढा

दिल्हा. ठाण्यास रो रखमाजी राजे भोंसले कोल्हापूरकर ठाण्यावरी लढाईच्या जखमी होते सबब ठेविले होते. त्याजपाशीं आणिखी वीस आसामी नामीनामी होती, त्यांनीं महिनापावेतों ठाणें लढविलें. चौथे पांचवे दिवशीं नित्यबाहेर निघोन मोर्चेवर पडोन मोर्चे हमेशा उधळून जाऊं लागले, तेव्हां मिराने हैदर-अलीस लेहून, त्याचे मुकाम पुगनुरावरी होता तेथून कूच करून तळपुलापासून साहा कोंसावरी मुकाम केला. त्यास पेशजी तोफा होत्या त्यांजवरी तळपुलावरीं आणखीं साहा तोफा भारी, पक्कें बेतालीस शेर गोळा वजन ऐशा, पाठऊन येके बाजूची सफेली व दोन बुरूज बरोबर केले तरी राजश्री कौल न घेत. निदान पतकरल. तेव्हां श्रीनिवासराव बारकी हैदरअलीकडील यांणीं राजश्री रखमाजी राजे यांस इमान बेलतुळशी दिल्या जें, तुमचीं घोडीं व मालमालिस्त हत्यारसुधा मंडळी लोकसुधा सरहाद पार करून देतों म्हणून बाहीर काढून हैदर अलीच्या भेटीस नेले. त्याणी यास जाबसाल केला जे, पेशव्यांकडे तुम्ही राहून आम्हावरी गोळी चालवितां. आमच्या जागियास तुम्ही कोण? म्हणून खाशीं चांगलीं घोडीं नऊ वगैरे चीचवस्त घेऊन पावलोक जमातदार दाहावीस रुबरू नेऊन गर्ली दिल्हा, कितेकांचे शिरछेद केले. बाकी राजश्री रखमाजी राजे व नरसिंगराव सूरवंशी, आष्टकर व गणोजी जाधव व मानाजी थोरात, कारवेकर ऐसे नजरबंदींत ठेविले, त्यांस सोडीत नाहीं. तळपुलांत ठाणें घालून मीर व आपण हैदरअली ऐसें कडप्याचे रोंखें येऊन मुकाम करून राहिले हें वर्तमान हडे अनंतपुर संवस्थानिक यांणीं ऐकिलेवरी बोलिले जे, तुम्हांस कुमक दिल्यान हैदरअलीशीं दावा पडतो, नजीक मुकाम आहे. मग तेथून कूच करून येक निश्चयें धन्याकडे जावें म्हणून बाळापुरास येऊन तेथील बंदोबस्ती करून निघालों तें हरिहरास आलों, तों छ १४ सफरचें सरकारचें पत्र आलें. तेथें आज्ञा जें हैदरअलीखान घांट चढून वरते आलियावरीं दुर्बुधीस प्रवर्तक होणार ऐशी वर्तमानें येतात. तरी तुम्ही जागां बंदोबस्त करून दारूगोळा सरंजाम पोख्त करून खबरदार राहाणें. हैदरखानाची बातमी विश्वासु माणसांपासून तहकीक आणून हुजूर लिहीत जाणें. किल्ल्यांत लोक पहिले हैदराकडील असतील त्यांचा इतबार न धरणें. त्यांस जाहीर काम सांगोन आपले जागां खबरदारी करून बंदोबस्तीनें राहणें म्हणून आज्ञा, त्यावरून माघारें गेलों. हैदरअलीखान याजकडील अंतरंगीची बातमी आम्हांकडे हमेशा येतात. तेथें वर्तमान जें, परिछिन्नवादे हुसकोट, बाळापूर, मदगिरी, चेनरायेदुर्ग, व शिरे हे तालुके सलुखेन दिल्यानें उतम, नाहीं तरी ते आपलीं ठाणीं आपण घ्यावीं व सेनापतिकडीलहि मुल्क तमाम घ्यावा व तुगभद्रा पार व्हावें म्हणून आपले ठायीं भाषणें करितात, हे एथ वर्तमान येतात. राजश्री

गोपाळरावजी यांणीं हैदरअल्लीस पत्रें लिहिलीं होतीं जें, बाळापूर तालुका सरंजामास आपणांकडे आहे वगैरे सरकारी तालुके आहेत, यांस तुम्हाकडून उपद्रव होऊं न द्यावा. श्रीमंतांच्या चित्तांत किलाफ न ये तें करावें म्हणून उत्तम रीतीचीं लिहिलीं, तीं पत्रें बाळापूरकर माणसाबराबर त्याजकडे पाठविलीं. त्यांचें उत्तर रावजीस हैदरअल्लीनें लिहिलें जें, च्यार महिनेनी शिर, हुसकोट बालापूर तालुके आमचे आम्हास द्यावें, ऐसा करार असतां दोन वर्षे जालीं, तुम्हासारखें उमदें माणूस दरम्यान असतां, कार्यभाग होऊन येत नाहीं, याजवरून काय म्हणावें ? हल्ली श्रीमंतांस विनंती करून आमचे जागे आम्हांस प्राप्त होय तें करावें म्हणून. व बाळापूर सरंजाम तुम्हाकडे आहे, तेथील किल्लेदार महिमाजी शिंदे याणी आपणांकडील पळाले लोकांस वगैरें लोक चाकरीस ठेऊन आपल्या तालुक्यांत दंगा करितात, ठाणीं मुलूक घेतात, सबब त्यांशीं विरुद्ध करणें अवश्यक जालें, कळावें, म्हणून रावजीस कागद लिहिला तो बजिनस आम्ही वाचून पाहून छ १० रबिलौवलीं मिरजेस रवाना केलें आणि रावजीसहि पत्र लिहिलें आहे. सारवंश हैदरअल्लीची बदफैलीची नजर पुरती यांत संशय किमपि नाहीं. आमच्या लस्करची, सरकारची व लोकाची वगैरें येकंदर आजमास पाहतो. दोन तीन लक्षाचें वित्त व बाजारबुणगे व कोमटी सावकार आले होते, त्यांचें लक्षांरुपयांचें वित्त व येकंदर स्वारांचीं वगैरें घोडीं पाहतां लढाईत पडलीं तें व पाडाव गेलीं तें व तलाव्यास व बिनीस राचोटीकडे गेले होते ते परतोन लढाईची आवई ऐकोन आम्हाकडे येत होते त्यासी लढाई सचंतर होऊन घोडीं पाडाव गेलीं तें वगैरें मिळोन दोन आडीचशें घोड चांगली व लहानथोर मिळोन गेलीं. ज्या जागियास गेलीं ते जागियास पाहिलीं पाहिजे, याकरितां याचा अभिमान साहेबास आहे. आम्ही सरकारी शिलिकी बारगीर. निषाण धण्याचें आणि आज्ञा धण्याची. आम्हांकडे काय आहे ? जैशी आज्ञा होईल तेणेंप्रमाणें वर्तणूक करूं. महमद अल्लीखान अरकाटकर याजकडे नेहमी वकील पेशजीपासून ठेविला होता, येविशी पेशजी विनंती लिहिली होती. त्याजकडील पत्रें हमेशा येत होतीं जें, हैदरअल्लीचा सेह उरकलियावरी खामखा कुमक व तोफा व दारूगोळा देतों, सर्वप्रकारें श्रीमंतांचे पदरींचे आहों, म्हणून येत असतां हल्ली हा प्रकार घडलियावरी नेहमी कारकून ठेविला होता तो हडे अनंतपूरच्या मुकामीं आला. त्याजबराबर पत्रहि आलीं व रुबरू कारकुनापाशींहि भाषेण केलें जें, गोरदरानी व फिरंगियांनीं च्यार महिनेचा सलुख केला, माझा कांहीं सलुख परिछिन्न नाहीं, मी सरकारच्या पदरींचा आहे. खासा स्वारी कर्नाटकांत आलियावरी सरकारचें पत्र घेऊन तुम्ही आपला कारकून मजकडे

6436

पाठवावा म्हणजे सरंजाम, तोफा, दारूगोळा व फिरंगी घेऊन घाटेमाथां येऊन तमाम ठाणीं हैदराकडील घेऊन सरकारदाखल करून देतों. सरकारी आज्ञा घेऊन कांहीं कुमकी फौज घेऊन तुम्ही पुढें यावें म्हणजे तें कार्य मजकडे लागलें. यैस निशापुरस्कर आमच्या कारकुनापासी बोलोन आम्हांस पत्रहि लेहून पाठविलें. हैदरअलीच्या लस्करांत देशची फौज च्यार हजार व सावनूरपासून कडपे कर्नोळ तमाम संस्थानिक यांची कुमक व रोजगारी लोक आहेत, त्यांस ज्या जाग्याचे त्या जाग्यास ताकीद जाल्यानें रिकाम पडत. त्याचें पारिपत्य व्हावयास धण्याचें नांव पदरीं फौज समागमें असतां आम्हांस आसकेता नाहीं. मग खांसा स्वारी आलियावरी इभ्रतीनें सेवक लोक करताले. धण्याचे पदरीं लोक आहेत म्हणून त्यास गल प्राप्त जाला. त्याचे लोक तों पदरीं राहून शिफारस करीत आहेत. कितेक अर्थनिवेदन करावयाकरितां राजश्री हरि माणकेश्वर व मालो रघुनाथ कारकून पाठविले आहेत. हे सेवेसी विनंती करितलि ते ध्यानांत आणोन सेवकाची उभारणी होऊन शत्रूचें पारिपत्य होये तो अर्थ करणार आपण आहेत. आम्ही तों शिलकी बारगीर. सर्व लौकिक व अभिमान आपला आहे. रवाना छ १९ रबिलौवल. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे, हें विनंती.

¶Mahimaji reports that he was heavily out-numbered by Haidar's forces and withdrew. He asks for reinforcements to recapture the lost places.

✓*No. 173*] [*9-10-1769*

श्रीशंकर

राजश्री हरिपंत फडके

स्वामीचे शेवेसी

विनंती उपरा. लस्करसहवर्तमान आम्ही मौजे वलतीचे मुा आल्याचे वृत कलोन आपण चिठी पाठविली ते पावली. श्रीमंताचे शरीरी सावकाश नाहीं यैसे समजोनच संनिध उदैक येऊन कोसाचे तफावतीनें राहणार. परवांचे दिवसी बुधवारी सूर्योदयी श्रीमंताचे पायावर डोई ठेऊन दर्शन घ्यावे हाच हेत. बरोबर दहापांच येतील. उपचार परकी असतील त्यास उपरोधास्तव करणे उचित. आम्ही पदरचे सेवक; आम्हाविषयीं त्या गोष्टीचा विचार चितात आणावासा नाहीं. दिवस मिळून बुधवारचा. येथें दर्शन घेऊन लागलेच आज्ञा जाल्यास पुणियास जाऊन दोन प्रहरी समय चांगला आहे तेव्हां त्या श्रीमंताचे पायावर डोई ठेवून घरासहि जावयाचा विध आहे तोहि उरकून मागती सेवेसी येऊ.

6437

सर्व कलले असावे, त्याप्रमाणें आज्ञा होऊन घडावे, याकरितां लिहिले असे. राजश्री त्रिंबकपंत वर्तक घरास गेले आहेत. तुम्हीच समीप असतां वरकडांनीं येऊन विनंती विशेष करणे ते कोणती? या चिठीचे उत्तर समजेसे पाठवावे. उदैक लोणीसंनिध मुकाम करून राहूं. कलावे. रवाना छ ८ जमादिलाखर दोन प्रहर रात्र. हे विनंती.

¶*The writer informs Haripant that he would soon be going to Poona to wait upon the Peshwa who is ill.*

No. 174] *[16-10-1769?*

श्री

राजश्रिया विराजित रामाजन्य राजश्री
बाबूरावजी स्वामीजीचे सेवेसीं

पो बाळाजीराव कृतानेक सा। समस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १९ जोवलपावेतो मु॥ पुणे यथास्थित जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. आपण पत्री संभाल केला तेणेप्रा। संतोष जाहाला. याच प्रकारे सांभालीत असिले पाहिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत खासा स्वारी डेरेदाखल जाहाले. कर्नाटकात फौजा छावणीस आहेत. लवकरच हैदर नाईक याजकडील गुंता फैसल्यात यावासा आहे. रा। सेनासाहेब सुभा लवकरच येत आहेत. वरकड घरचे पत्रावरून कलो येईल. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती. रा। गणेशपंत दाजी व विनायेकपंत दाजी सा। नमस्कार, लोभ करणे हे विनंती.

¶*Balaji Ram informs Baburaoji that the Peshwa intends starting on a fresh expedition into Karnatak and has pitched his camp outside Poona; the writer also states that the Bhonsle of Nagpur is to accompany the Peshwa on this expedition.*

No. 175] *[29-10-1769*

पो छ १ रजब सन सबा
सिंतैन हा। घासीखान
सांडणीस्वार

श्री

सेवेसी विज्ञापना. ता। छ २८ जमादिलाखर मु॥ श्रीशंभो माहादेव वर्तमान यथास्थित असे विशेष. त्रयोदसीस श्रीमंत येथे आले. याउपरी कोणता रोख

धरितील पाहावे. फलटणास मालोजी नाइकानी कजिया केला यास्तव लस्करांत आणिंले. पाऊण लक्ष रुपये नजर करार केली. येक महिनियात पुण्यात भरणा करावा याप्रो कबूल करून गेले. पुण्यास मुदतीस भरणां करावयास त्याजकडील कारभारी नरसिंगराव कोनेर व नारो भगवंत येतील. लस्करात विठल येशवंत कारकून त्याजबा दिल्हा आहे, त्याणे उभयतास घेऊन आपणाकडे पुण्यास यावे, आणि पावणा लक्षाची निशा करून द्यावी, याजकरिता पा आहे. स्वामीकडे येतील. वरकड नवलविशेष लिहिजेसे नाही. राजश्री बापू आदिकरून मंडळी अद्यापि कोणी आले नाहींत. कळावे. लक्ष्मणपंत खरे यांणी शंभर गाडे लाकडाचें दस्तक पा म्हणौन सांगितले होते, त्यावरून घेऊन पा असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadnis reporting the arrival of the Peshwa at Mahadeo and the punishment inflicted on Maloji Naik Nimbalkar of Phaltan.*

No. 176] *[5-11-1769*

श्री

विज्ञापना. ता छ ९ रजब मु लोणंद वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंतांनी वानवडीहून कूच केल्यापासून येथे कीर्द घातली आहे. फिरोन श्रीमंत पुण्यास गेले. श्रीमंत रा नारायणराव यांची स्वारी निराली जाली. त्यास वानवडीहून कूच जाल्यापासून श्रीमंतांची गाठ पडे तोपर्यंत इकडील बोटखत करावे लागेल असेच दिसते. आपण सिधांत करून लिहितील त्याप्रमाणे करू. लेहून पाठवावे. येथून महादेव वीस कोस आहे. हळुहळू चहु मजलींनी जाऊ. कळले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेबानी बाईस जातेसमई आज्ञा केली की, फौजेस दुसरियाने कागद लिहावें, त्याजवरून नावनिसी लेहून काढिली. येथे चिटणीस कोणी नाहीत, याजकरितां याद पा असे. आपण पाहून चिटनिसाजवळ देऊन पत्रें लेहून बस्त्या लाऊन रवानगी करावयास आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadnis reporting the movements of the Peshwa and his brother Narayanrao and asks that orders be issued calling men to join.*

No. 177] [*19-11-1769*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत आणा स्वामीचे सेवेसी

पो लक्ष्मण नारायण देशमुख सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ रजब मुाा मौजे गारवाड पाा आकलूज येथास्थित असे विशेष. आपण गेल्यापासून पत्र न आले तरी असे नसावे. सदैव पत्री संतोषवीत जावे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत उभयेता नीरा उतरोन राा नरसिंगराव धायेगुडे याचे घरी मेजवानी घेऊन फौज श्रीमंत राजश्री नारायेणरावसाहेब याजबाा ठेऊन आपण खासा वाईस जाऊन पुण्यास कार्तिक शुाा शष्टीस दाखल जाले. नारायेणरावसाहेब यास फाजे घेऊन माहादेवानजीक राहावे म्हणोन आज्ञा. त्याजवरून येथपावेतो आले. येथे तूर्त थोरले श्रीमंतांची आज्ञा येईतोपावेतो मुकाम होणार. थोरले श्रीमंत कार्तिक वाा पंचमीस डेरेदाखल जाले. दरमजल येणार. येथे बालकोबा व आम्ही आहो. राजश्री तात्यास बरे वाटत नाही म्हणोन वर्तमान आहे. त्यास, सविस्तर कलावे म्हणौन श्रीमंती सांडणीस्वार पाठविला आहे. सविस्तर ल्याहावे. बहुत काये लिहिणे, कृपा कीजे, हे विनंती. समस्त मंडळीस साा नमस्कार सांगावे हे विनंती.

¶*Lakshman Narayan Deshmukh writes to Bajipant Anna reporting the movements of the Peshwa and his brother. The writer inquires about the health of Haripant (Phadke ?).*

No. 178] [*20-11-1769 ?*

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माधव गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २० रजब मों पटण स्वामीचें कृपेकरून श्रीमंतासंनिध सुखरूप असो विशेष. आलीकडे बहुत दिवस कृपापुरस्कर पत्र येऊन सेवकांचा सांभाल होत नाहीं, तेणेकरून सेवकांचें चित बहुत उद्विग्न आहे. सदैव पत्रद्वारें सेवकाचा सांभाल करावा. यानंतर इकडील वृत पटणचे खंडणीचे वगैर साद्यं(त) वर्तमान श्रीमंतांनी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. सदोदित सेवकावर कृपा वर्धमान असावी.

तेणेकरून सेवकांचे चित समाधान होऊन स्वामिकार्य करावयाची उमेद वाढते. स्वामी सर्वजाण आहेत. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Patwardhan writes to Dadasaheb informing him about the progress of the Karnatak expedition. Negotiations are going on over the tribute to be realised from Pattan says the writer.*

/ *No. 179*] [*11-12-1769*

पौ छ १७ साबान

सबैन.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १२ साबान मुकाम पंढरपूर वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ साबानचें पत्र पाठविलें तें पावलें. कृष्णास्नान करून पुण्यास आलों म्हणोन लिहिलें ते कललें. इकडील वर्तमान तर पंढरपुरास पांच मुकाम जाहले. आज कूच जाहलें. करजगीचे सुमारें जात आहेत. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब येथून सोला कोसांवर आहेत. येक दोन रोजांत त्यांची भेट होईल. श्रीमंत राजश्री बाबाची प्रकृत आतां बरी आहे. अशक्तता फार आहे. श्रीमंत दादा वद्य प्रतिपदेस निघोन येणार म्हणोन लिहिलें तें कललें. इकडील वर्तमान नवल विशेष लिहिजेसें नाहीं. सुरापुराकडे जाणार होते तो मजकूर राहिला. आतां कृष्णातीरचा रोख धरून जात आहेत. हैदरनाईक आपली बंदोबस्ती करीत आहे. कृष्णा तुंगभद्रा तिरास गेल्यावर कांहीं रसायण जालें तर होईल जे होईल तें लिहूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal, from Pandharpur, informs Nana Fadnis of the route that would be followed by the Peshwa's army marching towards the Karnatak where Haidar was preparing for a stiff fight.*

√ *No. 180*] [*18-12-1769*

पौ छ २ रमजान सन सबैन

पौष मास.

श्री

राजमान्य राजश्री आबाजी गदाधर

गोसावी यासी

स्नो माधवराव बलाळ प्रधान आशीर्वाद. सुहुर सन सबैन मया व अलफ. बदरुदीन दारूवाला याजपासून कसबे बैजापूर व ममदापूर येथे दारू पाऊणसे खंडी

खरिदी करावयाचा करार साल गुा करून तुम्हास दारूचे कारखान्यावर पाठविले आहे. त्यास बावन खंडी दारू तयार होऊन तुमचे पदरी माप पडेल म्हणोन तुम्ही लिा ते कळले. बाकी तेवीस खंडी दारू राहिली ते हली दर ८८३॥। पावणेच्यार शेर प्रो घ्यावयाचा करार करून तूर्त ऐवज पाठविला येणेप्रो—रुो.

५५३ रोख बदरुदीन दारूवाला याजवळ दिल्हे.

१९०० हुंडी, गंगाधर गोविंद याची, येथे घेऊन गोविंद भिकाजी यांजवर वैजापुरची हुंडी आलाहिदा पाा असे, हे त्यास देऊन ऐवज घेणे.

२४५३

याो चौविसे त्रेपन रुो तूर्त पाा असे, तरी घेऊन जरूर पावल्याचे उतर पाठविणे आणि तेवीस खंडी दारू दुबारी सोऱ्याची चांगली करावयाचा करार केला असे. तरी दारू चांगली दुबारी करऊन माप घेऊन लिहून पाठवणे. दारू वाईट होत्ये म्हणोन हुजूर विदित जाले, याकरितां चौकशी करून घेत जाणे. जाणिजे छ १९ साबान. आज्ञा प्रमाण. बार.

¶*The Peshwa gives instructions to Abaji Gadadhar about purchasing good gunpowder.*

No. 181] [*25-12-1769*

पाो छ २६ साबान सबैन.

श्री

विज्ञापना. श्रीमंत राजश्री बाबाची प्रकृत बरी आहे. अशक्तपणा फार. श्रीमंत राजश्री दादा प्रतिपदेस निघोन येणार म्हणोन लिा ते कलले. प्रतिपदेस निघालेच असतील. श्रीमंत दरमजल तुंगभद्रेवर जात आहेत. दादांची गाठ तुंगभद्रेखेरीज पडत नाही. लस्करात आले म्हणजे लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter reports that Moroba Dada will meet the Peshwa on the bank of the Tungabhadra.*

No. 182] [*1-1-1770*

पाो छ १५ सवाल सबैन.

श्री

सेवेसी माहादाजी बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ रमजान मुकाम नजीक चित्रदुर्ग येथास्थित असें विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालों

तें छ ३ रमजानीं सत्रावे रोजीं तुंगभद्रातीरी लस्करांत पोहोंचलों. तेथून मजल दरमजल श्रीरंगपटणास जावयाचे उद्देशें येथपर्यंत आले, पुढें पटणास जात आहेत. हैदर नाईक मसूरचे बारीमध्यें बात्येऱ्या बांधून होता, त्यास टाळा देऊन पटणाकडे आले. झाडींत उपाय नाहीं यास्तव त्याजकडे न जात्तां इकडे आले. त्याचे शहावरी गोपाळराव रास्ते मिळून दाहा हजार फौज ठेविली आहे. याउपरी हैदर नाईक तिकडेच राहील किंवा इकडे येईल पाहावें. सांडणीची डांक ठेविलीच आहे. स्वामीचा निरोप घेतल्यापासून येक मुकाम जाहला नाहीं. श्रीमंतांची मर्जी पूर्ववत्प्रमाणें बरी आहे. सदाशिवपंत प्रतिनिधीकडील अद्यापि आले नाहीं. आलियावर स्वामींचे आज्ञेप्रमाणें कामें करून घेतों. खाजगीकडील अनंदराव जिवाजी याजकडील नेमणूक होत आहे. त्यांचीहि रवानगी लौकरच होईल. याहून विशेष लिहावयाजोगें नाहीं. होईल तें मागाहून लिहून पाठवीन. विदित व्हावें, कृपा केली पाहिजे, हें विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal writes: "Haidar having taken up an invulnerable position in the woods near Masur-pass, a small force of ten thousand has been detached under Gopalrao and Raste to watch his movements, while the Peshwa with the main army is heading towards Seringapatam."*

No. 183] [*2-1-1770*

पाो छ १६ रमजान सबैन

हाा कासीद जथे रायेमल

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ रमजान मुाा नजीक गडगनाथ वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सदैव पत्रीं तिकडील वृत ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादा काल छ ३ रोजी सायंकाली लस्करांत दाखल जाहाले. हैदर नाईक मासुरास आहे. राजश्री गोपालराऊ, रास्ते दोनी फौजा त्याचे तोंडावर ठेऊन वरकड फौज श्रीमंत श्रीरंगपटणचे मुलकांत जाणार. याउपरी घडेल ते लिहून पाठऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal reports to Nana Fadnis about Haidar being at Masur and Moroba Dada having joined the Peshwa's army.*

6443

No. 184] [4-1-1770

पौ छ १६ रमजान सबैन

श्री

सेवेसी बालाजी शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ ६ रमजान मु॥ नजीक अरणी प्रा॥ सावनूर यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी हैदर नाईक मासुरावर आहे. बा॥ चौदा हजार फौज व प्यादे दाहा हजार व गाडदी दाहा हजार व तोफा पंचवीसपर्यंत आहेत. राजश्री गोपालराव व रास्ते सावनूरचे रानात तोंडावर ठेऊन खासा स्वारीचा रोख श्रीरंगपटणचा धरिला आहे, परंतु हैदर नाईक झाडीत आहे. बाहेर निघत नाही. यास्तव त्याचे फौजेस विसा कोशाचें अंतरे श्रीरंगपटणचा डौल देऊन खासा स्वारी राहणार. हैदर नाईक झाडीतोन बाहेर निघाल्यास सावनूरच्या रोखे गोपालराव वगैरे फौजा आहेत. या रोखे खासा स्वारी असाहि मजकूर आहे. असेहि करितां झाडीतून बाहेर निघाल्यास तिकडून गोपालराव व इकडून खासा स्वारी मिलोन पारपत्य करावे, झाडीतून बाहेर निघेना तरी श्रीरंगपटणचे मुलकांत जाऊन ठाणी सोडवावी हाहि प्रकार आहे. वरकड श्रीमंत राजश्री मोरोबा दादा छ ४ रमजानी लस्करात दाखल जाहाले. सेवेसी कलावे. मौजे केम येथील फाजिलाचा यैवज देवावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. स्मरणार्थ विनंती लिहिली आहे. लोकांचे देण्याचा तगादा लागला आहे यास्तव तूर्त रोख यैवज पावे यैसी आज्ञा केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Balaji Shankar reports the movements of the two forces, the Peshwa's and the Haidar's, in the province of Savanur.*

No. 185] [5-1-1770

पो छ १९ रमजान सबैन

हा॥ सांडणस्वार.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ७ रमजान मु॥ हरिहर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर हैदरनाईक मासुरावर आहे. राजश्री गोपालराऊ व रास्ते फौजसुधा सावनुरानजीक ठेऊन श्रीमंत फौजसुधा दरमजल श्रीरंगपटणाकडे जात आहेत. पुढे होईल ते लिहून पाठऊ. आपण श्रीमंतास पत्र लिहून तोब्याची पत्रके पा॥ ती पावली.

समजाऊन मागाहून जाब पाठऊ. श्रीमंत राजश्री दादा लस्करांत दाखल जाले हे वर्तमान पेशजी लिहिलेच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs that the Peshwa is heading towards Seringapatam leaving Gopalrao and Rastia at Savanur in the rear. Haidar is encamped upon Masur.*

√ *No. 186*] [*5-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन

हा सांडणीस्वार

तीर्थस्वरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

अपत्यें मोरोबाने साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ७ रमजान मुा हरिहर वर्तमान यथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालो ते गडगनाथचे मुकामी लस्करांत सुखरूप दाखल जाहालों. वरकड इकडील वर्तमान तर राजश्री गोपालराऊ व रास्ते सावनुरानजीक दाहा हाजार फौज ठेऊन श्रीमंत सारी फौजसहवर्तमान श्रीरंगपटणचे तालुक्यांत जावें याअन्वयें चालिले आहेत. येक दोन ठाणी घेतल्यावर मग कांही जाबस्वाल लागला तर लागेल. होईल ते लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान तीर्थरूपाचे शरीरप्रकृतीचें वरचेवर लिहून पाठवीत जावें. पुंढे[१] मनसब्याचा प्रकार ठरेल तो लिहून पाठऊ. बहुत काये लिहिणें, कृपा कीजे, हे विज्ञापना.

¶*Moroba Dada informs Nana Fadnis of his arrival in the Peshwa's camp at Gadagnath.*

√ *No. 187*] [*5-1-1770*

पौ छ ६ सवाल सबैन.

श्री

शेवेसी लक्ष्मण बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ७ रमजानपर्यंत मुा नजीक हरिहर येथे स्वामीचे कृपेकरून क्षेम असे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंत रा दादा लस्करांत येऊन पोहचले. हैदरअली याजकडील वकील आले आहेत, परंतु पोकल बोलणे पुण्यात बोलत होते तेच बोलतात. प्रस्तुत मासुरावर मुकाम त्याचा आहे. राजश्री गोपालराव व रास्ते यास सावनूरच्या तालुक्यात त्याच्या तोंडावर ठेऊन श्रीमंत कडूरबाणावर या मार्गे श्रीरंगपटणाच्या

---

१ येथून अक्षर मोरोबाचें.

सुमारें जातात. राजश्री मुरारराव यासहि पत्रे गेली आहेत. सत्वरच येतील. चित्रदुर्गवाल्यासहि समागमे घेणार. वरकड सर्व वर्त(मान) येथास्थित आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Lakshman Ballal reports that the Peshwa is proceeding towards Seringapatam; the arrival of Moroba Dada and the peace negotiations reopened by Haidar are also mentioned.*

No. 188] *[6-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन
हा सांडणीस्वार सेख अली
व फते मा.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ८ रमजान मुा नजीक बसवापटण वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर राजश्री गोपालराऊ व रास्ते दाहा हजार फौजेनसी सावनुरानजीक ठेविले. हैदर नाईक मासुरावर आहे. श्रीमंत दरमजल श्रीरंगपटणचे तालुक्यांत जात आहेत. ठाणी घ्यावी, निकड करावी, असा मनसुबा आहे. आम्हीं पटणांकडे चालिलो. याउपरी हैदर नाईक कोणता मनसुबा करील ते पाहावें. होईल ते लिहून पाठऊ. आपण पुणियाहून कागदपत्र पाठवितील त्यास ताकीद असावी कीं, लक्ष्मेश्वरावरून हरपनहली चित्रदुर्गावरून लस्करास यावे, याप्रो सांगावे म्हणजे ठीक येऊन पोहचतील. हरपनहली चित्रदुर्गकरास श्रीमंतानी ताकीद केली आहे. काही गुंता पडणार नाहीं. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाहीं. राजश्री गोपाल नाईक यांचा सेवगावचा जाबस्वाल श्रीमंत राजश्री दादा आले, आतां करून घेऊन, लिहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs Nana Fadnis that the Peshwa is proceeding to Seringapatam, capturing on the way the places belonging to Haidar. The writer directs the route by which communications can safely be sent.*

No. 189] *[6-1-1770*

पो छ १९ रमजान सबैन
हा साडणीस्वार

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ ८ रमजान पावेतो मुा नजीक बसवापटण येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित

असे विशेष. स्वामीकडे येक दोन पत्रे पाठविली, परंतु पत्र येऊन वर्तमान कळले नाहीं, तरी स्वामी कृपावंत होऊन पत्र पाठविले पाहिजे. वरकड इकडील वर्तमान तरी हैदर नाईक मासूरच्या ठाण्यात राहिला आहे. आपाजी राम लस्करात आला आहे, परंतु त्याचें बोलणे कोणी आईकत नाही. त्याजवळ दोन जासूद-जोड्या नेहमी राहुटीस ठेविल्या आहेत. कोणाचे राहुटीस जाऊ देत नाहीं व दरबारीहि जावयाची आज्ञा नाही. श्रीमंताचा फार करून मानस पाटणास जावे, त्या प्रो श्रीमंत रा। दादा फडणीस याचाहि मानस तसाच आहे. हैदर नाईक झाडी सोडून बाहेर पडत नाही. फौज आपली गोपालराव, रास्ते बो। करून पंधरा हजार पावेतो जमा जाली आहे. बागलकोटास तो दोन अडिचे (अडीचसे) बैलाची (तोफ) होती ते बराबर घेतली आहे. धारण पेशजीचे पत्रीं लिहून पाठविली आहे त्याप्रोच हाली आहे. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री लक्ष्मणपंत देशमुख याणी पत्र लिहून पाठविले आहे त्याप्रों स्वामीस विदित होईल. मागाहून आढळेल ते वर्तमान सेवेसी लिहीत जाईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant to Nana Fadnis writes news from the South about Haidar being at Masur and about the Peshwa intending to proceed to Seringapatam.*

No. 190] *[15-1-1770*

पौ। छ ६ सवाल सबैन

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १७ रमजान मु॥ चिकनाइकहली प्रां। श्रीरंगपटण वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान श्रीमंताची स्वारी या प्रांती आली. प्रथम बुदेहालचे ठाणें घेतले. तेथे खंडो भरारी यास ठेविले. पुढे ठाणी कंदिकिरे व हंदिकिरे घेतले. चिकनाइक-हली मातबरच ठाणें. येक दिवस चार घटका तोफा लागल्या होत्या. कौलास येऊन दिल्हे. पुढें पटण तालुक्याची ठाणी घेतच आहेत. आपाजी राम लस्करांत आहेत. खंडणीचा मजकूर बोलत आहेत, परंतु मर्जीप्रो नाहीं याज-करिता होत नाहीं. मर्जीप्रों घडोन आल्यास होईल, नाही तर तूर्त ठाणी घेणें हाच मनसुबा आहे. पुढें होईल ते लिहून पाठऊ. माहालचे तोव्यांची पत्रके आली त्याचा जाबस्वाल जाला नाहीं. जाला म्हणजे लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis mentioning the places captured by the Peshwa's army. Haidar has once more opened negotiations through Appaji Ram, adds the letter.*

[या पत्राचा दुसरा बंदच सापडला.]

केले. चिकनाइकनहली येथील मजकूर मागे लिहिला आहे. त्यास ऐसी नवद पावेतो ब्राम्हणमंडली व मावले लोक व खिजमतगार व खासबारदार व जासूद व सिलेदार मिलोन धरून नेले. त्यापौ मोरो खंडेराव व नरसिंगराव नारायण लेले याचे पुत्र दोघे बच्याजीपंत बर्वे यांचे मेहुणे व येक बटिक मावल्याची व येक पोर इतक्यास ठेऊन बाकीचे आसामीची नाके कापून लाऊन दिल्हे. त्यात निलो रखमाजी व पांडुरंग पंत दोघे कारकून पहिले दादासाहेबाकडील उष्टरखान्याकडे होते ते व हरिपंत म्हणोन उमेदवार व तुकोपंत उमेदवार व मोरो खंडेराव याचा आच्यारी व केसो राम फाटक रामभट फाटकाचे पुत्र हुंदिकिऱ्याचे ठाण्यात ठेविले होते ते, इतके ब्राम्हण मंडलीची नाके गेली. फार गोष्ट वाईट जाहाली. केसो राम फाटक व तुकोपंत ऐसे बुधेहालास गेले त्यास गोपालराव गोविंद याणी तबीब देऊन ज्याचे त्याचे आंगाची कातडी काढून नाके लावविली. बाकी आसाम्या सिऱ्यास आल्या त्याजकडे येथून तबीब रवाना केला आहे. मराठे काही येथे आले त्यांची नाके लावावयाची तबीबास आज्ञा जाली आहे. ब्राम्हणमंडलीचा मोठा घात जाहाला. श्रीमंतास फार वाईट वाटले. मुरारराव घोरपडे येऊन भेटले. जमाव चांगलाच आहे. निखालसहि आहेत. हिकडील तालुका सोडऊन मग बेंगरुलास जावे आणि घ्यावे ऐसा डौल आहे. पांडुरंगपत गोडबोले यास कोकणातून चांगल्या तोफा आणावयाकरितां रवाना केले. मुंबईसहि जावे, तेथून चांगल्या तोफा खो करून आणाव्या, याप्रमाणे आज्ञा होऊन आजच गेले. बहिरजी मोरे याजकडील प्यादे परशराम वगैरे दोन आसामी छ ९ सवाली रवाना जाले ते छ २९ मिा लस्करात दाखल जाले. जाब तयार होत आहेत. येका दोहो दिवसी येथून रवाना होतील. आज्ञेप्राच कागद ज्याचे त्यास दिल्हे. मसलत थिजली. रंग पडत नाही. पर्जन्यकाल समीप आला अद्याप प्रथम दिवस आहे. मागील सिलक फार करून खर्च जाली. याउपरी कर्जासी गाठ आहे. बाहेरील कोठून यैवज यावयाचा नाहीं. विदित व्हावें हे विज्ञापना.

¶*This letter of which the first part is missing describes the atrocities perpetrated by the enemy on the Maratha garrison at Chiknaikanhalli. Many Brahmin and Maratha soldiers had their ears and noses cut off. The letter also announces the arrival of Murarrao Ghorpade in the Peshwa's camp at Shira.*

6448

No. 192] 1-2-1770

(कर्नाटक रु. नं. ९६४)

पो छ २१ सवाल सबैन

श्री

सेवेसी विज्ञापना. येथी वर्तमान तारीख छ ४ सवाल मुा कसबे बलूर परगणे मजकूर प्रां श्रीरंगपटण येथे स्वामीचे कृपेकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र छ १४ रमजानचे पाठविले ते छ ३० मिनहू पावोन आनंद जाला व रविशंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले ते मस्तकी वंदून आदरे-करून भक्षिले व आज्ञेप्रा ज्याची पत्रे व तीलगुलाच्या थैल्या होत्या त्या प्रविष्ट केल्या. उतरे घेऊन मागाहून पाठऊन देतो. श्रीमंताची पत्रे व बादली थैल्या येताच वाड्यातच[1] तात्यानी प्रविष्ट केल्या. बाकी दोन बादली थैल्या राहिल्या त्या येक श्रीमंत सौ मातुश्री रमाबाईस दिल्ही व येक श्रीमंत राजश्री दादास दिल्ही. वरकड राहिल्या थैल्या आज्ञेप्रा पत्राचे लखोटे करून नेऊन दिल्या. इकडील वर्तमान तरी वरचेवर आढलते ते लिहीत असतो. हैदर नाईक बसवापटणाचे आलीकडे चेनगिरीवर आहे. आपाजी राम व रजा आली याणी भला माणूस त्याजकडे पाठविला आहे. बीत बसल्यास मग आपण जाणार. येथून श्रीरंगपटणास जावे हा मनसबा घाटत आहे. इतक्यात आपाजी रामाने भला माणूस पाठविला आहे तो येऊन बीत बसल्यास पटणाकडे जावयाचे महकूब होईल. महिमाजी सिंदे याजबरोबर हजारबाराशे स्वार किरकोल वं दोन तोफा देऊन आजच रवानगी मिराचे तालुक्याकडे जाहाली. आपणाकडील बालाजीपंत फाटक बरोबर दिले. ठाणी तमाम घेतात. कोणी ठाणे लडत नाही. काही ठाण्यात लोक ठेवितात, काही ठाणी पाडून जमीनदोस्त करितात. खंडण्या जीवन पाहून होतात. त्यात सोने रुपे होन रयतीचे हाल करावे तेव्हा उत्पन्न होते. काही रयतीत जीव राहिला नाही. स्वामीनी लाख रुपयाच्या हुंड्या पाठविल्या त्या पावल्या. ज्याच्या त्याणी कबूल केल्या. मुदतीस भरणा होईल. राजश्री विसाजीपंत यास माझे काम सांगितले त्यास माझा पाड काय? परंतु स्वामीनी पदरीचा कुटुंबांतील सेवक याचे चालवणे जरूर हे चितात आणून विसाजीपंतास सांगितले, तेव्हा माझे कार्य जाहाले असेच समजोन

---

१ मुळांत 'बाडांतच' असें असावें. नकलकाराची चूक दिसते.

आनंद जाहाला तो पत्री काय ल्याहावा? याविसी मी विनंति वारंवार लिहित नाही. बहुत काय लिा कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Peshwa's news-agent from Balur communicates that Haidar has pitched his camp at Chengiri and that Appaji Ram has despatched a special messenger to him to know the terms which should form the basis of the peace-talks.*

No. 193] [*10-2-1770*

पौ छ ८ जिल्काद सबैन
फाल्गुन हस्ते अलीबेग
सांडणीस्वार.

श्री

विज्ञापना. चिकनाईकहालींचें ठाणें श्रीमंतानी घेऊन ठाण्यांत च्यारसें प्यादे खंडणीचे वसुलास व ठाण्याचे बंदोबस्तास ठेविले होते. मोरो खंडेराव कारकून सिलेदार ठाण्यांत ठेविले. आणखी सिलेदार चार कारकून ठेविले व पंचवीस राऊत नरसिंगराव नारायणराव लेले यांचे पुत्र दोघे व सेव्याचा गुमास्ता पोतदाराकडील येक गुमस्ता व विस खास बारदार कांहीं बोथाटी बारदार इतके ठेविले होते. त्यास गावकरी लबाड. त्यास खंडणीचा पैका पडूं लागला व जाचहि होऊं लागला. त्याणी हैदर नाइकाकडे भेद करून हजार दीड हजार पाईचे माणूस माघ शुध पौर्णिमेस शनवारी रात्रौ आणिले आणि गावकुसावरून दोऱ्या टाकून लोक घेतले. गाव मोठा. काहीं कळलें, काहीं नाहीं, तो गांवांत सिरोन सरकारचें माणूस कारकूनसुधां कापून काढिलें. कांहीं लोक दरवाजा उघडून पलाले परंतु तीनसेपर्यंत ठार जाले. मेरो खंडेराव जखमी धरून नेला असें वर्तमान आहे. वरकड मेले कोण, वाचले कोण, याचें अद्यापहि ठिकाण नाहीं. परंतु फार करून विल्हे लागले. वाचले असते तर कोणी तरी येताच. हैदरखानाकडील लोकानी गावांतील रयत काढून दुसरे गावी घालून आपण ठाणें वोस टाकून गेले. च्यारसें माणूस ठाण्यांत असतां असें न व्हावें, परंतु आमचे लोकांची गाफिली आणि गांवकरांचा दगा यामुळें असी गोष्ट जाली. हें वर्तमान श्रीमंतास कलतांच लस्करांतून नरसिंगराऊ धायगुडे व शहाजी भोसलें यास चिकनाईकहलीस रवाना केले व महिमाजी सिंदे याजबराबर हजार फौज देऊन गुरूमकोंड्याकडे पाठविलें होते, त्यास माघारे आणऊन चिकनाईकहलीस राहावयास

१ वाड नकलेची हे पत्र नकल आहे. मूळ नकलेच्या बंदावर 'कर्नाटक रुमाल नं. ९६४' व 'तपासलें १८।६।९७' असे दोन शेरे आहेत.

आज्ञा केली. तीनसें गारदी पाठविले आहेत. फिरोन सरकारचें ठाणें घालावें असें करून रवाना केले. तीनच्यारसें माणूस व ब्राह्मण मारले गेले, वाईट गोष्ट जाली. हे वर्तमान कचें स्वामीस कलावें म्हणौन लिहिलें असे. वरकड ठाणीं घेतली ती काईम आहेत. हैदरखान झाडीत आहे. हैदर नाईक पुढें मैदानांत निघता तर येक दिवसांत तमासा दाखविते. परंतु योग घडत नाहीं. गोपाल-राऊ सावनुराकडे होते त्यास फौजसुधां बोलाविले. ते बुंदेहालाजवल येऊन राहातील. याप्रमाणें वर्तमान आहे. हे विज्ञापना.

¶*The loss of Chiknaikhalli to Haidar's forces is reported. The whole garrison was surprised and cut down.*

✓*No. 194*] [*13-2-1770*

पो छ १६ सवाल सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णराव बलाल कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून हमेषा पत्रे येतात त्याजबाा पत्री परामृष करीत असिले पाहिजेत. यानंतर इकडील वर्तमान. श्रीमंत तुंगभद्रा दक्षणतीरे आल्यावर श्रीरंगपटणची ठाणी दाहाबारा सोडविली. चित्रदुर्गवाले येऊन भेटले. कडपेकर याजकडील वकील आले. व महमद अलीकडी(ल) राजकारणे घेऊन आला होता. त्यासी बोलोन त्याची रवानगी केली. आंवंदा श्रीमंताचे मानस आहे की हैदरनाइकासी सलोक न करिता तमाम इकडील पालेगार वगैरे मेलऊन पारपत्ये कराव यैसे आहे. चित्रदुर्गकर पाच हजार प्यादा व दिड हजार फौज चांगली व बाण दारूगोली जंगी सामान आहे. चाकरी करावयाची उमेद आहे. कितेक ठाणी घेत घेत नागमंगल पो खासा स्वारी आली. पांचा सा लक्षाचा मुलुक सुटला. आणिक पांचसात ठाणी चिकबालापूरपाो आहेत ती सुटली म्हणजे चौदा पंधरा लक्षाचा मुलूक सुटल. बेंगरूल व पटण मात्र राहील. तूर्त खासा स्वारी नागमंगलावर आहे. येथून पटण चौदा पंधरा कोस राहिले आहे. राजश्री मुराररावहि गुतीहून निघाले आहेत. लौकरीच येऊन पोहचतील. हैदर नाइकाकडील सलूखाचे राजकारण आहे. पाहावे. या प्रांतीं लशकरात कुलथ्या दाहा पाइली, जोरी पाच पाइली,

बाजरी साडेचार, हरभरे दोन, गहू दोन अडीच, तांदूल खर्ची तीन पाइली, तूप शेर, गूळ अडीच शेर, तेल चार शेर येणे प्रा. तूर्त चारा नाचणकाड. बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Ballal informs Nana Fadnis that the Peshwa proposes this time to completely humble Haidar with the assistance of some polygars in the South. "The Raja of Chitradurg has promised him his support. Murarrao is on his way to join him. Haidar too dreading consequences has already opened negotiations" are the items of news in the letter.*

No. 195] [*15-2-1770*

पौ[१] छ ८ जिलकाद
सबैन फाल्गुन
हा अलीबेग सांडणीस्वार

श्री

तीर्थस्वरूप राजश्री नाना वडिलाचे सेवेसी

अपत्यें मोरोबानें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ १८ सवाल मुकाम मागडी कुशल असो विशेष. आपण छ २३ रमजानचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कललें. तीर्थरूपांची शरीरप्रकृति बरी आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. आपाजी गणेश यांचे फाजिलाचे पट पो ते पावले. श्रीमंतांस समाजाविले. त्याचीं उत्तरें सरकारचे पत्रांत लिहिलीं आहेत त्यांजवरून कळेल. तोब्याचीं पत्रकें पा होतीं त्याचा फडशा तूर्त होत नाहीं म्हणोन पेशजीं श्रीमंतांनीं लिहिलेंच आहे. इकडील वर्तमान तर ठाणीं घ्यावयाचा उद्योग आहे. पुढें होईल तें लिहू. आवजी कवडे याजकडे हजार रुपये कर्जदादन येणें त्यास महिपतराव कवडे यांचे ऐवजांत वजा करून घ्यावें, म्हणोन लिा. त्यास कवडे देशीं चाकरीस गेले आहेत व त्याचे नालबंदीची वरात आपणांवर दिल्ही आहे, तेथें वजा करून घेतलेच असतील. इकडील वर्तमान तर श्रीमंतांनीं बुदेहाल वगैरें नागमंगलपर्यंत ठाणीं घेतली, कांहीं पाडलीं, कांहीं ठेवावया लायेक मजबूद पाहून ठेविलीं. बंदोबस्त केला. बहिरवदुर्ग पाहाडी जागा फार चांगली, दोन तीन दिवसांत घेतली. वर मजबूद दाहा माणसें असल्यास कांहींच व्हावयाचें नाहीं. परंतु सहजावारीच कार्य जालें. हाली मागडीचे गढी मुकाम आहेत. ठाणें पाडिलें. झाडीत पाहाडी किले दोन आहेत, त्यांचे आश्रयानें कांहीं बुनगे होते ते येक दोन स्वारिया पाठऊन लुटून टाकिले. हैदरखान झाडींतच आहे, बाहेर निघत नाहीं. येरवीं फडशा लौकरीच होता.

लहानाहि प्रकार अद्यापि मनोदयानरूप बोलत नाहीं. मिराचे राजकारण आहे, बहुधां घडेल. च्यार जण च्यार खबरी त्यास लिहितात यामुळें बाहाराम[1] जाले आहेत. फौज छावणीस राहातें हें कललियावर नरम पडतील असें वाटतें. गोपाळराव त्याचे सुमारावरच दुर्गाचे मुलकांत आहेत. वरकड विशेष कांहीं लिहावें असें अद्यापि नाहीं. होईल तेव्हां लिहून पाठऊं. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत असावें. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हें विज्ञापना.

[2]पैवस्ति छ ८ जिलकाद सबैन फालगुन

हाा अलीबेग सांडणीस्वार

७-३-१७७०,

¶*Moroba writes to Nana Fadnis that Haidar's territory up to Nagmangal has been overrun.*

√*No. 196*] [*17-2-1770*

श्री

शेवेसी पांडुरंग गणेश मोडक कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा माव वाा सतमीपर्यंत मुकाम नजीक बेंगरुल येथे आपले कृपेकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाचे तोंडावर फौज ठेऊन श्रीमंत पाचसात ठाणी घेत श्रीरंगपटणानजीक बारा कोसपर्यंत आले. तेथे पाच सात मुकाम होते. उपरांत तो रोख सोडून बेगरुलानजीक आले. येथे आलियाजवर बहिरवगड किला पाहाडी फार बिकट होता तो घेतला. आणिक एक दोन किले आहेत ते घेऊन बेगरुलास लागणार. ठाणी घेतली होती त्यापैकीं फौज हिकडे आली याजवर चिकणहळी ठाणे होते त्यामध्ये तेथील लोक जुने होते त्याणी भेद करून हैदर नाइकास घेऊन दिल्हे. चित्रदुर्गवाल्याकडील व सरकारचे ऐसे च्यारसेपर्यंत माणूस होते व पाच सात ब्राम्हण ऐसे होते ते मारले गेले, ऐसे जाले. हैदर नाइकाकडील वकील सलुकाचा मजकूर बोलत होता, परंतु मुरळीत बीत बसत नाहीं. हैदर नाईक तो झाडी सोडून लढाईस तो येकंदर येत नाहीं. आमचे पाठीमागें दाहा बारा कोसाचे अंतरानें त्याजकडील फौज दोन तीन हजार लपोन फिरत्ये. कहीची तटे कांही दगा करून नेतात. त्याजवर सरकारची फौज पाळत लाऊन एक दोनदा गेली परंतु गाठ पडिली नाहीं. बेगरुळ बिकट आहे. लवकर आले तर बरेच जाले, नाही तर फौज ठेऊन श्रीमंत माघारे

---

१ बाहाराम = वहंम = दिक, भग्न. २ पैवस्ती नाना फडणिसाचे हातची.

फिरतील. फार करून छावणी होईलसे दिसत नाहीं. मग पाहावे. घरी प्यादा चौकीस कानोजी म्हातारा होता तो वारला. याजकरितां कृपा करून चवकीस चांगलासा सुरलीत गडी द्यावा. यापूर्वींच आपण दिल्हे असेल परंतु सूचनार्थ लिा आहे. पुढें होईल मजकूर तो लेहून पाठवीन. श्रीमंत नानास एकादशीस देवाज्ञा होऊन उभयतास कैलासवास जाला म्हणून श्रीमंतास पत्र आपण लिा होते ते श्रीमंतास प्रविष्ट केले. त्यांचा तो कालच जाला होता. ते पुण्यवंत त्याप्रो त्यास श्रम न होता एकादशीस महायात्रेचे मार्गी देवाज्ञा जाली त्याचा खेद आपण विवेकेकरून एकदर करू नये. कळावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. साष्टी-पर्यंत गडी जरूर दिला पाा हे विज्ञापना.

¶*Pandurang Ganesh Modak reports that the Peshwa is heading towards Bangalore and that Haidar still refuses to come to terms.*

No. 197] *[6-3-1770*

पाो छ २२ जिलकाद सबैन
फाल्गुन हाा परशराम

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ जिलकाद-पावेतो मुकाम किले नंदीगड पाा बालापूर येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपालु होऊन छ ९ सवालचे पत्र पाठविले ते पावोन (परम) समाधान जाहाले. याप्रमाणे सदैव * * * आज्ञा जाहाली पाहिजे. * * * * किले मजकुरास मोर्चे आज लावि * * * * बालापूर घेतले. त्याचे बंदोबस्तास माहिमाजी सिंदे यांस ठेवावयाचा करार जाहाला आहे. माहादाजीपंत गोडबोले यास फडणिसी व हरि माणकेस्वर यास मजमू याप्रमाणें सांगितले. वरकड सर्व वर्तमान राजश्री देशमुख व आत्या याणी लिहिले आहे त्यावरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant reports the successful occupation of Balapur which he says is given in the charge of Mahimaji Sindia.*

No. 198] [6-3-1770

पो छ २२ जिलकाद

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णराव बलाल कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ७ जिलकाद मुा नंदीगड जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजें विशेष. आपण साडणीस्वाराबरोबर पत्रे पाठविले ते पावलें. यैसच स्मरणपूर्वक हरघडी पत्री परामृर्ष करीत आसावें. येथील वर्तमान हैदरखानाकडील दाहा पंधरा ठाणी मातबर घेऊन वीस लक्षाचा प्रांत सोडविला. छ ६ जिलकादी नंदीगडास त्रितीये प्रहरी मोर्चे लाविले. येका दो रोजा गड सर होऊन फते होईल. किला घेतल्यावर कोलारचा किला घेऊन प्रांताचा बंदोबस्त करावा. आलीकडील सरदेस किला बेंगरूळ येक राहिले, तेथीलहि राजकारणे आहेत, घडल्यानें किला येईल. तो किला सरकारात आल्यावर पंचवीस लक्ष्ये रुपाया प्रांत पटीची पटीच सुटली. राहाता पंटण आणि बिदनूर राहिलें. श्रीमंताचेहि मानस आहे कीं तमाम या प्रांतातील पालेगार व सरदार कडपेकर कर्नोलकर पठाण आणून हैदरखानाचे पारपत्ये करून दोन तीन करोड रुपयाचा प्रांत मधेच त्याने दाबिला आहे तो सोडवावा यैसे आहे. मुराराराव घोरपडेहि येऊन भेटले. हैदरखान ठाणे तरीकिरे येथे होता. राजश्री गोपालराव व रास्ते बुधिहाळ सरकारचें ठाणें आहे तेथून च्यार कोसावर होते. खानाने फाल्गुण शुध प्रतिपदेची रात्री सडा होऊन दगा करावयास पाच हजार फौज व दाहा बारा हजार प्यादे व पंधरा तोफा व बाणाचे चालीस पनास उंट घेऊन रातोरात बारा कोस चालून येऊन तीन प्रहर गुास्त जाल्यावर छापा घालावा यैसे तजविजीत होता. तो राव मार व रास्ते यास बातमी आली की खान मजकूर दगा करावयास येतो, हे यैकून उभयता हुशारच होते. पाहाटची च्यारपाच घटका रात्र राहाताच त्याने तोफाची हाणामार करून गडबड केलीं. उभयेतानी आपली तयारी करून खान मार यास ठासून राखिले. आपण बुणगे लोंक घेऊन संभाळून निघाले. रात्रीची घालमेल जाली, सबब दाहा वीस घोडी व माणसे जाया जाली. हैदर नाइकहि तेथून माघारे गेला. परंतु समये रात्रचा यास्तव थोडासा गलाटा जाहाला, परंतु संभाळून

6455

निघाले. श्रीमंतांचे लशकरामुळे हैदरखानाचा प्रांत खराबीखाले आला आहे. पाहावे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Ballal gives to Nana Fadnis the extent of the territory lately acquired by the Peshwa from Haidar and describes a sudden night-attack of the enemy to surprise Gopalrao and Rastia which failed owing to the latter's vigilance.*

No. 199] *[8-3-1770*

पो छ २२ जिलकाद सबैन
फालगुन हा। परशराम
प्यादा

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ९ जिलकाद मुकाम किले नंदीगड परगणें चिकबालापूर येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. येथें छ ६ जिलकादीं आले. येतांच मोर्चे किल्यास लाविले आहेत. येका दोहों रोजांत किला फते होईल. बुधेहालांत खंडो रघुनाथ ठेविले होते त्यास ठाणें टाकून गोपालराव याचे लस्करात आले. दहशत खाऊन ठाणें टाकून आले. गोपालराव, रास्ते बुधेहालानजीकच आहेत. मीर रजा व टिपूसाहेब पांच हजार फौजेनसीं बेंगरुलानजीक होते, त्यास हैदऱ्यानें आपणांकडे बोलाविलें. यास्तव तिकडे कडुरबाणावराकडे जात आहेत, यास्तव याचे पाठलागास बालाजी पलाडे वगैरे दोन हजार फौज रवाना केली आहे. हैदर ना थोडकासा हावभरींत जाहाला आहे. फौजेचा चांगला जथ करून फिरोन गोपालराव याजकडे येईलसें वाटते. येथून बातम्या पाठविल्या आहेत. तो बाहेर चांगला निघोन लडाई देतो असें जाहल्यास खासा स्वारी त्या रोखें जाईल. सलुखाचा प्रकार अद्याप कांहीं नाहीं. पुढें छावणी होईल किंवा मातबर फौज ठेऊन देसी येतील हें नकले. छ १ जिलकादचीं पत्रें गंगापुरास खिजमतगार गेला त्याबराबर पाठविलीं आहेत म्हणोन पत्रीं लिहिलें आहे. त्यास खिजमतगाराबराबर पत्रे गेली नाहींत. गुरुजीचे खिजमतगाराबराबर पत्रें गेलीं आहेत त्याजवरून कलेल. हैदरनाईक बाहेर निघाला तरी मग कोल्हाराकडे जाणार. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baji Govind writes to Nana Fadnis about the military tactics of Haidar and the measures taken by the Peshwa to meet them.*

6456

No. 200] [14-3-1770 ?

पैा छ १९ जिलकाद

श्रीगणराज

सेवेसी. गोपालराव गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सावनूरकरावर वरात दिल्ही. पैशासी संबंध नाहीं. वरचेवर रा मल्हार मुकुंद यास सांगोन त्यास मुलुक जप्ती होईल हे भयहि सुचविले. तथापि पैसा मिळावयाचे त्राणच त्यास नाहीं. भगवंतराव येथें आले त्यास पुशिले. तुम्ही आषाढ मासी रुपये देऊं म्हणत होता त्याची वाट काय ? तेव्हां त्यास जाबसाल सुचेनासा जाला. सावनूरकराकडे भगवंतराव यास पाठविले, तो तेथें पठाणाचा गवगवा असा कीं, प्राणाशीं गांठ. सत्तर हजार होनाचा ऐवज पठाणाचा देणे, त्यास पैसा द्यावयास नाहीं. सरकारचा पैका न दिल्यानें राहिली दौलत तेहि जाते हे कळले असोन चिंता करीत नाहींत. कां कीं आधी पठाणाच्या हातनें वाचणे घडत नाहीं, तेथें दौलतेची चिंता काये ? या प्रकारचे वर्तमान. स्वामीनी तो सावनूरचा ऐवज तूर्त येईल यैसे वाटोन आम्हास देविला आणि आज्ञाहि जाहाली होती कीं पैका न देत तर मुलुक जप्त करणे. त्यास आम्ही इकडे आल्यावर वरातांचा ऐवज चौघावर देविला. तितकीहि खष्ट कुले. कर्ज मिळेचना. थोडे बहुत मिळाले तर व्याज तिहोत्रा द्यावे यैसा प्रसंग प्राप्त जाहाला. फौजेचा गवगवा व ठाण्याची शिबंधी व तोफखान्याचा खर्च. आलीखान वगैरे गाडदी. खर्च तो अनिवार तेव्हां उपाये नाहीं. आजपावेतो सावनूरकराच्या पैक्याची वाट पाहिली. पैसा नये तेव्हां दोन चार महाल जप्ती करऊन महालचे ऐवजी रसदा घेऊन थोडासा ऐवज वरातेपैकीं उगविला आणि कामाविसीनें महाल दिल्हे. बाकी वरातचा ऐवज येणे तो व सरकारचा पैका मुल्कक जप्ती केल्याविना येत नाहीं. मोरबा व आणिगीरे व हनगल तिही स्थलच्या सनदा देऊन रसदा घेतल्या आहेत. त्यास ठाणी अद्यापि बसली नाहीं. हनगलच्या लागास एक ग्रहस्त गेला आहे. हस्तगत जाले असेल तर उत्तमच जाहाले. आणिगिरे, मोरबा, येथें जप्तीच्या चिठया पाठविल्याच आहेत. जवळच आहे. ठाणी घालावयाचे कांहीं संकट नाहीं. परंतु स्वामीचे पत्र जप्ती न करणे म्हणोन आल्यावर संदेह निर्माण जाहाला आहे. परंतु पहिली आज्ञा आहेच. येवढी स्थले तो घेतली पाहिजेत. रसदा घेतल्या आहेत, यास्तव उपाये नाहीं आणि वरकड मुलुक राहिला त्याची जप्तीचीच आज्ञा पाहिजे. श्रावण मास तो सहजेच गेला. पैका न ये. वाट कोठवर पाहावी. जप्तीच करावा हा आग्रह नाहीं. परंतु जाले वर्तमान रसद घेतल्याचे श्रुत व्हावे यास्तव विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Govind Patwardhan explains his financial difficulties caused by the miserable situation of the Nawab of Savanur.*

Bk Ca 13—21 6457

No. 201] [10-4-1770

३ मोहरम सबैन

कासीद जथे रायेमल

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ १३ जिल्हेज मुकाम मौजे हेसरगटे परगणे बेंगरूळ येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंताची स्वारी मुलबागलाहून माघारी फिरली. बेंगरूलावरून सिन्याचे रोखे येत आहे. बेंगरूल मजबूद. अखेरीचे दिवस. वैरणीचा मोठा पेंच. यास्तव बेंगरुलास मोर्चे लाविले नाहींत. हैदर ना। श्रीरंगपटणास गेला. खंडणीचे कांहीं जाले नाहीं. गोपालराव येका दोहो रोजीं येऊन मिलतील. सरंजामी फौज छावणीस गोपालराव याजबराबर ठेऊन खासास्वारी दरमजल देसी येणार. पुण्याहून पैका आला म्हणजे फौजेस नालबंदी देणार. कापड फौजेस नालबंदीचे देत आहेत. श्रीमंताची शरीरप्रकृत थोडकीसी बिघडली आहे. उष्णकाल बहुत, यास्तव लौकरच पुण्यास स्वारी दाखल होईल. रामचंद्र त्रिंबक याजकडे पनास हजार रुपये तजकऱ्याचे निघाले याजमुळें मामलत दूर करून महिमाजी सिंद्यास सांगणार. येका दो रोजी वस्त्रे होतील. यंदा फौज देखील यवनसुधा भारी जमा जाहाली, तत्राप हैदराचें पारपत्य न जाहालें. भारी किला बेंगरुला-सारखा साध्य न जाहाला. पैकाहि न मिलाला. गोपालराव संकटास्तव छावणीस राहातील. खासा असतां कांहींच न जाले, मग याच्यानें काय होणार? गोपालरावजीवर छपा पडिला त्या दिवशीं नारायणराव कृष्ण याचा भाऊ माधवराव यास गोळा पायास लागला होता, आठ पंधरा दिवस होता तो मृत्य पावला. याजमुळें गोपालराव अजुर्दे आहेत. इकडे महर्गता मोठी. वैरणीचें संकट. छावणीस फौज राहील, परंतु महर्गतेमुळें बेजार होईल. हैदरखान यास कांहीं मानिणार नाहीं यैसे आहे. येका दो रोजीं गोपालराव भेटतील. तेथें दोन च्यार मुकाम करून गोपालराव बिदा जाले म्हणजे जलद येतील. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Baji Gavind reports that the Peshwa was re[illegible] [illegible] steps without assailing Bangalore and that the expedition as a whole must be regarded a failure as the enemy had not been much impressed.*

6458

No. 202] [16-4-1770

पैा छ १ मोहरम आवसीची
सा घटका रात्र. चिमाजी
व शहाजी जासूद जथे
वाघोजी नाईक.

श्री

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बालाजी
जनार्दन स्वामी गोसावी यांसी**

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ ३ जिल्हेजचे पत्र पाठविले ते छ १९ जिल्हेजी देवरायदुर्गचे मुकामी पावोन लिहिले वर्तमान कलले. नव्या तोफांचे कारखान्याकरिता बालाजी वामन दामले याणी नवे घर बांधिले. फार करून तयार जाले. पाच हजारपर्यंत अजमासे लागतील. कडक बिजली तोफ फोडून साडेपाच खंडी पंचरस काढिले व आनंदवलीस जंबुरे पंचरसी बारातेरा आहेत तेहि मोडून आणविले. चार साडेचार खंडी पंचरस निघेल. येकूण दाहा खंडीचा अजमास आला. यासिवाय पंचरस करावयास तांबे कथील जस्त मिलोन चालीस खंडी देविले, त्यास पनास पंचावन हजार रुा लागतील. काही ऐवज दिल्हा व काही द्यावयाचा आहे. याखेरीज कोलसे रायवल व खैराचे मिलोन दीडशे खंडी व मेण, राल, तेल, तूप, सुंभ, काथा वगैरे सात हजार, येकून येकंदर सतसष्ट हजार अजमासे लागतील. यासिवाय कारेगराचा दरमहा अडसेरीसुधा तीन हजार अजमासे आहे. काम जलदीने चालत आहे म्हणून लिहिले ते सविस्तर कलले. यैसियास कडक बिजली व जंबुरे मिलोन दाहा खंडी पंचरस जाले. पुढें चालीस खंडी पाहिजें ते सारेच खरेदी करून घ्यावयाचे नवते. आणखी फुटक्या तोफा असतील त्याचे काढावयाचे होते. केवल खरेदीच करून देईन म्हटल्यास पैका फार होतो, याजकरिता पैका देऊन जितके खेाा केले असेल तितकेच पुरे करणे. तुम्ही पैक्याचा अजमास लिहिला, त्यापैकीं पैका देऊन पंचरस घेतले असेल ते घेतले; याउपरी खरेदीस पैका न देणे. सारांश गोष्ट, तोफा तर यार्दीप्रेाा जाल्या पाहिजेत. परंतु येकदाच साऱ्या करीन म्हटल्यास खरेदीस पैका फार लागेल. याजकरिता पुण्यात येक कनमुरडी व नारंजन दोन तोफा आहेत त्यांचे पंचरस काढावे. नगर दौलताबादेस जायबंदी तोफा असतील त्याचे काढून आणावे. दोही स्थली नसल्यास पुरंदरचे माचीस गणेश तोफ ठेविली आहे, ती खाली उतरून त्याचे पंचरस काढावे. याप्रेाा तिकडे तोफा

असतील त्यांचे पंचरस काढावे. मदगिरीस येक दोन तोफाचे पंचरस आहे. दुसरे लस्करांत फेरोजंग तोफ जाया जाली, त्याचे पंचरस काढिले आहे ते तुम्हाकडे पाठऊन देऊं. दोन महिनियानी तुम्हाजवळ पोहचेल. जसे जसे जमा होत जाईल तसतसे काम चालीस लावणे. दाहा खंडी कडक बिजली व जंबुरे मिलोन जमा जाले. दुसरे तुम्ही चालीस खंडीचा अजमास लिहिला, त्यापैकी खो॥ करून दिल्हे असेल ते इतक्याचेच काम चालीस लावणे. दुसरे खरेदी करून न देणे. तीन हजार कारखान्याचा दरमाहा आहे म्हणोन लिहिले. त्यास तुम्ही सरंजाम तोफांचा केला असेल तितक्यांचा कारखाना चालीस लावावयाजोगे कारागीर ठेवावे. जाजती असल्यास दूर करावे. जसजसा पंचरसाचा सरंजाम सिलकी तोफांचा होत जाईल तसे काम चालवावे. केवल खरेदीच करून तोफा करीन म्हटल्यास पैका मुबलग लागेल. याजकरिता लिहिल्याप्रे॥ तोफाचा कारखाना चालिवणें. कोलसे वगैरे जिनस हा तर खरेदी करून दिल्हाच पाहिजे तो द्यावा. पंचरस मेलविल्यास सिलिकी तोफांचेच मिलेसे आहे. यास्तव पत्र पावे तोपावेतो खरेदी जाली ती जाली. या उपरी पंचरस खरेदी न करणे. सरंजाम सिलकी व खरेदीचा जमा जाला असेल त्याचे काम चालीस लावणे. वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जाणे. रा छ १९ जिल्हेज. हे विनंती.

¶*Madhavrao Ballal advises Nana Fadnis to observe utmost economy in the manufacture of guns by utilising metal of old guns and not making new purchases.*

No. 203] [*17-4-1770*

पो छ १ मोहरम
सबैन हस्ते वाघोर्ज
नाइकाकडील जासूद.

श्री

सेवेसीं हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २० जिल्हेज मुकाम किले देवरायदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २२ जिलकादचें पत्र सांडणीस्वाराबराबर व दुसरे पत्र छ २ जिल्हेजचें सांडणीस्वाराबराबर पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कललें. इकडील वर्तमान तर देवरायदुर्गास मोर्चे लागले आहेत. किला थोर पाहाडी बाका आहे. आंतील लोकांचें कांहीं राजकारण लागलें आहे, सिधीस जाईलसें दिसतें. होईल तें लिहून. या किल्यामुळें सरकारचे तालुके बालापूर मदगिरि चेनरायदुर्गास फार उपद्रव लागत होता. किला आला म्हणजे निर्वेध पटी जाली. येथून कूच

6460

जाल्यावर जें होईल तें लिहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पुण्याचीं पत्रें दोन रवानग्या सांडणीस्वाराबराबर आलीं व लाख रुपयांची हुंडी आली ती सावकारानी कबूल केली. त्याची सरकारचीं उत्तरें मागाहून पाठऊन देऊ. चौकडे व पोशाक अफ्तागीर पंखा पाठविला तो पावला. जाब मागाहून पाठवितो हे विज्ञापना.

¶Hari Ballal writes to Nana Fadnis that the strong hill fortress of Deoraidurg is being invested. He acknowledges the receipt of money sent from Poona.

No. 204] [*20-4-1770*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री अंताजीपंत मामा वडिलांचे सेवेसी.

अपत्यें बहिरवानें चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत चैत्र वद्य दशमीपावेतों मुकाम देवरायदुर्ग नजीक मतगिरी येथें वडिलाचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलीं पत्र फाल्गुन वद्य त्रयोदशीचें पाठविलें तें चैत्र वद्य तृतीयेस पावलें. कोंकणचें पत्र प्रस्तुत आलें नाहीं म्हणोन लिहिलें. हल्ली आलें असिलें तर पाठवावें. इकडील अधिकोत्तर वर्तमान ल्याहावें येसें नाहीं. हैदरनाइकाची खंडणी अद्याप आली नाहीं. देवरायदुर्गास मोर्चे लाविले होते; किला कठिण होता, सभोंवतीं झाडी व डोंगर ऐशी जागा कठिण, परंतु श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून लौकरच हस्तगत जाला. आणखी येक दोन किले घ्यावयाचे आहेत, तेहि किले देवरायदुर्गाचे किलेदाराचे स्वाधीन आहेत. किलेदार सापडला आहे, किले येतील. छावणीचा अद्याप ठराव नाहीं. लस्करांत महर्गता फार जाली होती. जोरी पांच शेर व तांदूळ च्यार शेर, हरभरे साडेतीन शेर च्यार शेर, तूप पावणेदोन शेर, तेल तीन शेर साडे तीन शेर, याप्रमाणें महर्गता जाली होती. मोगलांकडील फौज व मुराराव घोरपडे व सावनूरकर पठाण, व चित्रदुर्गाचा राजा येसे फौजसुधां आले आहेत. कळावें, बहुत काय लिहिणें, हें विज्ञाप्ति.

चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत अणा व सदोबास आशीर्वाद. आलिया माणसाबरोबर पत्र पाठवीत असिलें पाहिजे.

6461

सेवेसी भिकाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. पत्र पाठऊन संतोषवीत जावें. राजश्री बहिरोपंत यास वर्षप्रतिपदेस अफ्तगीर दिल्हें. बहुत काय लिहिणें हें विनंती.

¶*Bahirao writes to Antajipant informing him of the capture of the fort of Deoraidurg and some other adjoining forts. The writer also quotes prices of some articles that had gone very high in the army.*

No. 205] [24-4-1770

पो छ १९ मोहरम सबैन
वैशाख हा। लालखान
सांडणीस्वार

श्री

विज्ञापना. ता। छ २७ जिल्हेज वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान फार करून किले कोट घ्यावयाचे ते घेतले. पुढे छावणीचा डौल त्यास सरकारची हुजरात सात आठ हजार व राजश्री गोपालराव, रास्ते वगैरे सरंजामी मिळोन वीस हजार फौज ठेवावी. ही गोष्ट न घडल्यास खासा श्रीमंतानी छावणी करावी, श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब यास पुण्यांत पाठवावे, याप्रों मनसबा घाटतो. यास सिधांतास आठ दिवस लागतील. हुजरातचे फौजेत सरदार राजश्री त्रिंबकराऊ मामा व आपा, बलवंतरायांचे पुत्र, व बालकोबा तात्या इतके आहेत. यांत कोण राहावयाचा ठराव होईल तो लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री मामा छावणीस राहात नाहींत. राजश्री आपा व बालकोबा तात्या राहातील. कळावे हे विज्ञापना.

¶*Haripant informs Nana Fadnis of the progress of the army and its future programme.*

No. 206] [30-4-1770

पो छ १९ मोहरम सबैन
वैशाख हा। कासमबेग
सांडणीस्वार

श्री

सेवेसीं हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ मोहरम मुकाम निजगल वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान निजगल किला पाहाडी अवघड तो घेणे याजकरितां राजश्री गोपालराव, रास्ते

व गायेकवाडाची फौज यांस सांगोन मोर्चे लागले. किला थोर. येके आंगें मोर्चे व हैदरखानाकडील कुमक हजार गारदी किल्यावर आले, तेव्हां श्रीमंत देवरायदुर्गाजवल होते तेथून कूच करून किल्याजवल मुकाम करून चहूकडून किल्यास मोर्चेबंदी करून तोफाची मारगिरी सुरू केली. आठ दिवस किला झुंजला. आंतील लोकानी निकड फार केली. सेवटी हला करावयाचें ठरलें. त्यास आज छ मजकुरीं प्रात:कालीं सर्व लोकांस ताकीद केली. श्रीमंत राजश्री रावसाहेब व श्रीमंत नारायणरावसाहेब तोफाजवल उभे राहून हला केली. आंतील लोकानी निकडीची मारगिरी केली असतां आपलेकडील लोकांनी मोठी शर्त करून हला करून किला घेतला. आंतील लोक कापून काढिले. असी आंतील लोकांची मारागिरी कधीं पाहिली नाहीं. असें असतां आपलेकडील लोकानी फार निकड करून हला चढविला, मोठे शर्तीनें किला घेतला. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब थोरले श्रीमंताचे पाठीमागें उभे होते. त्यास उजवे हाताचे मंणगटास मण्याजवल वरील अंगें गोली लागली ती वरून कातड्यातून आंतील आंगें नाडीजवल पार जाली. हाड व सिरा काही जायां जाल्या नाहींत. जखमी हलकी आहे. भगवंतें मोठी खैर केली. बहुत लोक श्रीमंताजवल उभे होते व गोल्या दाट येऊन पडत असत, परंतु यांसच गोली लागली. श्रीमंताचा पुण्य प्रताप थोर, तेणेकरून मोठी खैर जाली. परंतु श्रीमंत नारायणराव याणी कांहीं काहिली केली नाहीं. दम हिमत धरून बसले होते. गोटांत आले. जखम सेकून बांधिली. जर हाड व सिरा सांपडल्या असत्या तर फार हैराण होते. परंतु हलकी जखम लागली. भगवंत त्यास रक्षिणार इतकेंच खरे! सविस्तर स्वामीस कलावें. आपलेकडील हजार माणूस हल्याचे दिवसीं जखमी व शंभर ठार याप्रमाणें जालें. परंतु असा हला करून किला कधीं घेतला नवता. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*The storming of the hill-fort of Nijgal directed by the Peshwa in person is reported in graphic details. The Peshwa's brother received a bullet wound on the wrist which luckily happened to be not very serious.*

No. 207] [*1-5-1770*

पौ छ १९ मोहरम सबैन

वैशाख हा। कासंबेग सांडणीस्वार.

श्री

सेवेसी विज्ञापना. ता। छ ४ मोहरम पावेतो मु॥ निजगल कुशल असो विशेष. किले निजगलास राजश्री गोपालराव येऊन बैसले होते, त्याच्याने शेवट न जाहाला. याजकरिता खासा रावसाहेब आले. पाच सात रोज मोर्चे लाविले होते. हेदराकडील पालक लेक कुमकेस आला होता याजमुळे किल्यात

अवसान धरून राहिले. काल इंदुवारी प्रातःकालीच हला केली. मोठा मार परस्परे जाला. श्रीमंत राजश्री नारायेणराव यास उजवे हाताच्या मणगटास गोळी चाटून गेली. जखम हलकी आहे. भगवंते खैर केली. चिंता नाही. आपाजी मुढे, गंगाराम पिसाळ यांस जखमा लागल्या. भारी आहेत. वाचता दिसत नाही. पोखरगीर गोसावी व मिराजी सरनोबत कासी बलाल याजकडील हे ठार जाहाले. हजार बाराशे माणूस जखमी जाहाले. दोनतीनशे पावेतो ठार जाहाले. किला खालील दोन तबके घेतली. बाले किला मात्र राहिला आहे. खाली चौक्या बसल्या आहेत. किल्यावर पाणी नाही. येक दोन रोज लागतीलसे दिसते. हैदरखानाची लडाई व्हावी त्या लडाईत जे माणूस जखमी ठार व्हावे तितके माणूस या पाहाडापासी जाले. परंतु भगवंते खैर केली. किलाहि हस्तगत लौकरच होईल. महर्गता सर्वा गोष्टी जाहाली आहे. पैका कर्जहि मिलत नाही. स्वामीस यैवजाविसी लिहिले आहे, त्याजवर भिस्त आहे. हैदरखानाचा पालक लेक या किल्यास कुमक आला, याजमुले अवसान धरून आजपावेतो लडला. कलावे म्हणून लिहिले आहे. त्रिंबकरावमामाचा छावणीस राहावयाचा निश्चये जाला आहे. आपणाकडील बाजीपंत राहातील. श्रीमंत ग्रहणास कोपलाजवल तुंगभद्रेवर सुवर्णतुला करणार. साहित्यास विठलपंत वाकेनीस रवाना होणार. बाले किल्यावर पाणी नाही. सातआठसे माणूस बाले किल्यास गेले आहे. कौल मागत नाही. मागितला तत्राप जिवंत सोडित नाही. कापून काढणार. शेदीडशे माणूस दोन तबकात तिकडील कापून काढिले. काही धरून आणिले आहेत त्याची डोकी मारणार. रामबाण तोफ काल हल्यासमयी फुटली सिऱ्या हा. तोफ फार चांगली होती. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. स्वामीनी कृपापत्र छ १६ जिल्हेजचे पो ते छ २९ मिा पावले. तात्याचे पत्र प्रविष्ट केले हे विज्ञापना.

¶*The letter describes the attack on Nijgal led by the Peshwa in person and in which Narayanrao received a wound on his right wrist. "The Peshwa desires to get himself weighed against gold on the Tungbhadra on the occasion of the eclipse" says the letter.*

No. 208] [*5-6-1770*

पो छ २० सफर इंहिदे.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामींचे शेवेसीं

विनंती सेवक नारो बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० सफरपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे.

यानंतर हुजूरचें आज्ञापत्र सादर जालें, तेथें आज्ञा कीं नारंज तोफ सरकारची पंचरसी जायां जाली ती बंकापुरांत ठेविली आहे, तिचे पंचरस काढून दुसरी तोफा वोतावयाची आहे, किल्यांत ठेवावयाची उपयोगी नाहीं, याजकरितां तुम्हास लिहिलें असे. तरी तोफ पुणियास राजश्री बालाजी जनार्दन याजकडे पत्र पावतां तरतूद करून रवाना करणें म्हणोन आज्ञा. त्यास, हुजूरचे आज्ञापत्र आलें तेव्हां नारंज तोफ पंचरसी जाया जाली, किले मजकुरीं असेलच, ते पुणियास रवाना करावयास किले मजकुरीं गाडा बैल वगैरे सरंजाम नाहीं तो हुजूरून पाठवावयाची आज्ञा करून तोफ न्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत म्हणोन हुजूर विनंतीपत्र सरकारच्या जासुदाबराबर सेवेसी पाठविलें आहे. त्यास, किले मजकुरीं नारंज तोफ जायां जाली सरकारची आहे ते पुणियास रवाना करावी लागती, तरी तोफ केवढी, किल्यांत कोणते जागा आहे, जाया जाली आहे कीं बार निघतात, चांगली आहे, येविसीचा शोध मनास आणून लिहोन पाठवणें म्हणोन किले मजकुरीं पत्र लिहिलें होते. किल्याहून बलबंतराव बच्याजी व सिवाजी गणेश याचें उत्तर आलें कीं, कवताल भन येथून रामबाण तोफ किल्यास आली, ती पातशहा बुरुजावर ठेविली आहे. तोंडास थोडी जाया होती, त्यास बांगडी मातबर देऊन पहिलीच तैयार केली आहे. दररोज दाहापंधरा वीस परियेंत बार काढावयाचे उपयोगाची आहे. श्रीमंत कैलासवासी नानासाहेबीं पांचसात तोफा कर्नाटकच्या स्वारीहून किल्यास पाठविल्या होत्या, त्या तोफेंत येक नारंज तोफ मातबर होती. ते व आणखी तोफा हैदरखान याजकडे किला होता ते वेलेस नेल्या. त्यापैकीं येक तोफ सिदी बुरजावर आहे. इचे नांव गंगाप्रसाद. ही तोफ तोंडी थोडीसी जाया आहे. बांगडी बसऊन मजबुत केली आहे. चांदरातीस ती तोफ सोडीत असतो. निकडीस दाहा बारा बार निघतील. आणखी येक तोफ पंचरसी पके तीन सेर गोल्याची ते सावनूरची पाडाव आहे. हैदरखानानें आणिली होती. येणेंप्रमाणें पंचरसी तीन तोफा किल्यात चालत्या आहेत. याजसिवाय पंचरसी तोफा किल्यात नाहींत. या खेरीज बांमडी व बिडी पांचसात लाहाण थोर तोफा किल्यांत आहेत म्हणोन लिहिलें आहे. पंचरसी नारंज तोफ जायां जाली. किल्यांत कोणी नाहीं. फुटक्या दोन तोफा रेहकल्याप्रमाणें पंचरसी किल्यांत आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Babaji, who had been asked to get the gun Naranj* (नारंज) *sent to Poona to be recast, writes to the Peshwa that inquiries for the gun at Bankapur elicited the information that it was taken away by Haidar when he occupied Bankapur.*

6465

Bk Ca 13—22

No. 209] [12-5-1770

पौ छ १९ मोहरम सबैन
वैशाख हा। लालखान
सांडणीस्वार.

श्री

सेवेसी विज्ञापना. काल इंदुवारी आवसीचे दाहा घटका रात्रीस श्रीमंत राजश्री नारायेणराव मुहूर्तेकरून पाव कोसावर जाऊन राहिले. येका दोहों रोजीं श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री बाईचा मुहूर्त आहे. मग निघोन पुण्यास जातील हा डौल केला आहे. परंतु फारा गोष्टीने मातबर फौज व तोफखाना सरदार चांगले योजून ठेऊन आपण उभयेतां बरोबरच पुण्यास येतीलसें वाटतें. पुण्यास जावयाची तों मर्जी फार आहे. तूर्त हैदर नाईक श्रीरंगपटणचे आलीकडे आहे. छावणीस राहतात असें जाहल्यास खंडणी करावयाचा पैगाम लावील. परंतु खंडणी करावयाची मर्जी नाहीं. नस्तनाबूद करून टाकावा हा मनसबा आहे. पुढें होईल तें लेहून पाठऊं. मागें स्वामीचीं येकदोन पत्रें आलीं, तीं पावोन संतोष जाहाला. याचप्रकारें सांभाल जाला पाहिजे. छावणीस सरदार ठेवावयाचें धंद्रच आहे. मनसबा उरत नाहीं. मामाचा आग्रह न राहवे ऐसे नाहीं, परंतु मनोदयानरूप साहित्य जाल्यास राहावें असें आहे. तसी मर्जी येजमानाची नाहीं, याजमुले बनत नाहीं. सेवट कसा होईल तो पाहावा. यातील बारीक बारीक मनसबे राजश्री तात्यांस विदित आहेत. तात्यानीं स्वामीस लिहिले असतील त्याजवरून विदित होतील. प्रस्तुत गकारनामकाचे व येजमानाचें रहश्य मोरोबा आबानें केलें आहे. परस्परें आइक्य भावसा दिसतो; मग अंतर्याम उभयेतांचे कसे असतील ते ते जाणोत. लौकिकीं तर चांगलें दिसों लागलें त्याजवरून लिहिलें आहे हे विज्ञापना.

¶*The news about Narayanrao starting back on an auspicious day, about Haidar being in the vicinity of Seringapatam and about Trimbakrao Mama being left in command is given in this letter.*

No. 210] [25-5-1770

पौ छ २८ मोहरम सबैन
जेष्ठ हा। सांडणीस्वार.

श्री

विज्ञापना. राजश्री त्रिंबक राऊ मामा छावणीस ठेविले. राजश्री मुरारराव सेनापति, राजश्री गोपालराव, रास्ते आदीकरून पंचवीस हजार फौज ठेविली.

खर्चाची बेगमी पुण्याचे ऐवजावर; त्यास, आपणाकडून ऐवज आला म्हणजे रवाना करूं. छावणीस फौज चांगली राहिली. कामकाज होणे धण्याचा प्रताप. हें वर्तमान येक दोन पत्रीं लिहिलेंच आहे. हिंदुस्थानांत राजश्री रामचंद्र गणेश याची व नवलासिंग जाटाची लढाई जाली. तीन प्रहरपर्यंत मथुरेजवल युध जालें. जाटाचे फौजेनें सिकस्त खादली. च्यार पांच हजार माणूस जाटाकडील रणास आले. चालीस तोफ व हती वीसपर्यंत व च्यार पांच हजार घोडे वगैरे लस्करांत आले. हें वर्तमान पुण्यास आलेच असेल. येथें पत्रें आली, त्यांत विशेष मजकूर आढलला तो लिहिला असे. आपलेकडील हजार बारासें माणूस ठार व जखमी मिलोन व आठशें घोडे ठार याप्रमाणें जाले. मोठी निकडीची लडाई होऊन फते आली. कलावें. श्रीमंत येथून कूच करून कपाटसंगमास ग्रहणाकरितां जात आहेत. तेथें तुला जाली म्हणजे कूच करून दरमजल पुण्यास येणार. जेष्ठ वद्य पंचमीचा मुहूर्त आहे. घडेल तें खरें. अधिकोत्तर कांहीं लिहिजेसें नाहीं. सेवेसी. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis that it has been decided to leave Trimbakrao Pethe in command of the Karnatak force with Gopalrao Patwardhan and Murarrao to help him. He also reports the magnificent victory over Navalsing Jat gained by Ramchandra Ganesh near Muttra.*

✓*No. 211*] [*31-5-1770 ?*

घडणी रुमाल नं. ९६९.

छ ७ सफर जेष्ठ सन सबैन.

श्री

यादी राजश्री त्रिंबकरावजी यासी पत्र की, चिकबाळापूरचे संस्थानिक, आम्ही त्या प्रांती आसता, आले होतेत. त्यांनी आपल्या संस्थानविशी विनंती केली होती त्यास करार या प्रकारचा जाहाला की, नंदीगडावितिरिक्त संस्थान संपूर्ण त्यांस द्यावे. ते सांप्रत लाख रुपये नजर देतात व पुढे सालाबाद खंडणी लाख रुपये देत जावी येणेप्रमाणे करार जाहला होता. हालीं सांप्रत त्यांजकडून वेंकटाचार्ये आम्हाकडे आले. त्याणी सांगितलें की, या करारापा्रा राजश्री त्रिंबकरावजी यांसी पत्र द्यावें. आम्ही आवघे संस्थानिक त्यासी रुजू होऊन याप्रा्रा करार त्यांस समजाऊन येवजाची निशा करू. त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले आहे. तरी या कार्यासाठी मारनिले तुम्हाकडे येतील तरी हे कार्यें करून देणे म्हणून पत्र—१

6467

नंदीगड सरकारात ठेवावा. चिकबालापूर व मुल्क यांचे स्वाधीन करावा. संस्थान हवाली केले याजकरितां येक लक्ष रुा सरकारची नजर करार केली आहे. त्यास तूर्त पंनास हजार रुपयांची निशा करून द्यावी, मग संस्थान यांचे हवाली करावे. राहिले पनास हजार, त्यास गणेशगड व गुडिबिंडा दोन्ही किले हैदरखानाकडे आहेत ते याणी जमाव करावा व सरकारची फौज छावणीस राहिली आहे त्याचे शहामुळें किले हस्तगत जाले तर पंनास हजार राहिले ते संस्थानिकापासून सरकारांत घ्यावे. ही गोष्ट न जाली, किले न आले, तर पेस्तर खासा स्वारी येईल ते समई संस्थानिकापासून संस्थान सरकारात घेऊन पंनास हजार रुा माघारे द्यावे. दोन्ही किले येऊन संस्थानिकाकडे बालापूर राहिले तर पेस्तर सालापासून सरकारची खंडणी घेत जावी. संस्थानिकाने सरकारात येकनिष्ठेने राहून रुजू असावें. प्रयोजन लागल्यास जमाव घेऊन चाकरीस यावें. याप्रो वेंकटाचार्यें संस्थनिकाकडील याचे गुजारतीनें करार जाला, त्याजवरून तुम्हाकडे पाा आहेत. संस्थानिकापासून जामीन घ्यावा असा करार आहे, तर तुम्ही मनास आणून याप्रो करारात येऊन तुमची खातरजमा जाल्यास सदरहूप्रो ऐवजाची निशा करून घेऊन चिकबालापूर याचे स्वाधीन करणे म्हणोन त्रिंबकराऊ यास पत्र. येथून पत्र लिहिल्यातरखेपासून * * तुम्हाजवळ यावे. पैक्याची सावकारी निशा करून घेऊन येक महिन्यातच पैका द्यावा असा करार केला असे. सहरहू प्रो करार असे. पत्र देणे. छ ४ सफर सन सबा ज्येष्ठ.

¶*Peshwa Madhavrao communicates to Trimbakrao Pethe, in command of the Karnatak expedition, the settlement he proposes to effect with the chief of Chikka Balapur, mentioning the conditions to be observed by that Chief.*

No. 212] [*2-6-1770* ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत स्वामीचे सेवेसी

पो मोरो बाबूराव साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ७ सफर मुाा नरेंद्र जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें विशेष. सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी सविस्तर लिहून पाठवणे. इकडील वर्तमान तर हैदर नाइकाकडून काही सल्याचा संदर्भ लागला आहे. सिधीस जाईल ते खरे. तिकडील नवल विशेष जरूर लिहीत जावे. राजश्री गोंविंदराव तात्या यास पत्र लेहून लाखोटा पाा आहे, प्रविष्ट करणे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे, हे विनंती.

¶*Letter from Morobadada to Bajipant mentions that Haidar negotiates for peace.*

/

No. 213] [6-6-1770

पौ छ १३ सफर
सन इहिदे.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ सफर मुाा शंभु माहादेव वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ ८ सफरचे पत्र सांडणीस्वाराबरोबर पाा ते पावलें. कपाटसंगमाहून पत्र आले, त्या अलीकडे पत्र येत नाही म्हणोन लिाा. त्यास, इकडून तर पत्रें दर रवानगीस पाठवितों. आगेंमागें पावतच असतील. उदैक दुधबावीचा घाट उतरून खालीं मुाा होईल. तेथून निरेवर जातील. कळले पाहिजे. सांडणीस्वाराबाा सनगे व ऐवज पाठविला तो पावला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes to Nana Fadnis about the homeward march of the Peshwa and acknowledges receipt of money sent from Poona.*

√No. 214] [7-6-1770

पौ छ १२ सफर इहिदे
सबैन बाा भिवजी
जासूद जथे बनाजी
नाईक.

श्री

विज्ञापना. छ ६ सफरचे पत्र सांडणीस्वाराबाा पाा ते छ ८ मिाा पावलें. गंगापुरास जावयाचा विचार राहिला म्हणोन लिाा ते कळले. श्रीमंत साळप्याचे घाटे येणार होते, परंतु फेरा पडतो याजकरितां दिगंची म्हसवड, दुधबावीचे घाटे निरा होळमुरुमावर येणार. आंबे वगैरे पाठविणे ते या मार्गे पाठवावयास आज्ञा करावी हे विज्ञापना. सरकारचे रिझेचे कामाचा मज(कूर) देव्हारा व नीलाची मूर्ति व आरशांचे ताट यांचा लिहिला तो कळला. विठल विश्रामाचे वरातेचा मजकूर तर त्यास यैवज द्यावयाचा करार फार दिवसाचा. त्यांत राजश्री गोविंद सिवराम व दादांची रजबदल. त्यास कांहीं सोंद्याकडे दंगा करावा, सावंतास मेळऊन घ्यावे म्हणोन सांगितले: इतका अगत्यवाद, याहून अधिकोतर नाहीं. नारो बाबाजीचे तालुक्यांतील सुपे परगणा विठल विश्रामास पेस्तर सालापासून काा सांगितली. रसद नारो बावाजीकडे द्यावी. सुप्यांस जमाव करून सोंदे प्रांतीं दंगा करावा असी योजना; याजकरिता कमाविस सांगितली. कळावे हे विज्ञापना.

¶*Hari Ballal reports to Nana Fadnis the details of the route which the Peshwa has fixed for his homeward march.*

No. 215] [16-6-1770?

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री नाना फडणीस स्वामीचे सेवेसी

पो मोरो बलाल कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २१ सफरपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. आपला निरोप घेऊन मिरजेस आलो. त्याजवर आपणाकडे येक दोन पत्रे पाठविली. तदोतर श्रीमंतहि स्वारीस निघाले, आम्हास बलाऊ पाठविले. आम्ही गलगलियाच्या मुकामी जाऊन भेटी घेतली. तेथून बराबर गलगनाथपर्यंत गेलो. तीर्थस्वरूप राजश्री गोपालराव दादा श्रीमंताचे भेटीस आले. तेथून निरोप घेऊन घरास येणार होतो; त्यास तीर्थस्वरूपास सावनूर प्रांतीं राहावयाची आज्ञा जाहाली. मजला तैसेच बराबर घेऊन गेले. शरीरी समाधान नवते. पुढे कर्नाटकात गेलियावर दिवसेदिवस अधिकच अस्वस्थता होत गेली. सर्व मजकूर राजश्री हरिपंत तात्यानी आपणास श्रुत केला असेल. शरीरी अस्वस्तता आहे. तीर्थस्वरूप छावणीस राहिले यामुले तिकडील खर्चाची बेजमी करून पाठविली पाहिजे व लोकाच्या वराता लस्करातून येतात त्याची वाट केली पाहिजे यामुले मी येथे राहिलों. ऐशास बापूजी बलाल आपणाकडे येऊन ऐवजाकरता विनंती करितील त्याप्रमाणे निर्वाह करून आपण देविला पाहिजे. सालमजकुरी सरदारीत काही बाकी राहिली नाहीं. बालापूर, हरिहरची पै * * नाही. सावनुरप्रांती हैदरनाइकाचा उपद्रव, असे असून पैका पाठविला पाहिजे. पडली घोडी म्हणता फारच पेच पडला आहे. आपली कृपा आहे त्यापक्षी आपणच निभावणार आहेत. पहिले दोन लक्ष तो पावते केलेच असतील. हालीचे तीन लक्ष कृपा करून देविल्यास सैन्यातील स्वस्थता होईल. विदित होय हे विज्ञापना.

¶*Moro Ballal Patwardhan requests Nana Fadnis to send sufficient amount of money to enable him to liquidate the arrears of the troops on duty in the Karnatak.*

No. 216] [11-7-1770

पो छ २ रबिलाखर
इहिदे.

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जिवाजी गोपाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत आषाढ वद्य ४ जाणोन स्वामीनी कृपा करून स्वकीये कुशल

लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री राघो हरि यास स्वामीचें आज्ञापत्र येणें म्हणोन आलें, त्याजवरून यांची रवानगी करून सेवेसीं पाठविले आहेत. या प्रांतींचे व सेवकाचें साकल्य निवेदन करितील त्याजवरून सेवेसीं विदित होईल. स्वामीचे आज्ञेप्रमाणेंच वर्तणूक करीत असों; सारांश, मी बहुताचा वाईट जाहलों आहें, यामुळें बहुत लोक स्वामीचे मर्जीत आंतर पाडावयाच्या साधनांत आसतील; परंतु पूर्णाभिमानी स्वामी आहेत. आन्य दैवत जाणत नाहीं व अमार्गें चालणार नाहीं, हें ध्यानांत दृढ आसावें. स्वामी सर्वज्ञ आसोन विस्तार ल्याहावासा काये आहे? वरकड सन सबैनचा कागदपत्र तयार करावयास सुस्ती करीत नाही, हैदरखानाचा मुलूक व सरकारचा मुलूक जवळजवळ. तिकडून जमाव सरहदसे येऊन सरकारच्या मुलकास उपद्रव करावयाच्या विचारात ते, यास्तव सरकारच्या मुलकाचें रक्षण व्हावयाकरितां सिबंदी जाजती ठेऊन जागांजागाचे बंदोबस्त करून रखवालीस सुभेदार आम्ही नेहमी धारवाडासच वैशाखपर्यंत गुंतलों. त्यानंतर येथें नवलगुंदीं वैशाखांत आलों. येथील कामकाज जमाबंदीचें उरकलें. देसायाकडून यैवजाचा निर्गम होणें, त्यास दिवसगत लागली, तोहि उलगडा होत आला. येक दोन दिवसानी गदगास जाणे होईल. कोपल गदगचा बंदोबस्त करून माघारे धारवाडास येतील. हुजूरून तिन च्यार हजार फौज आली याजकरितां प्रस्तुत फारसी गडबड नाहीं. येंदा लस्करची पायमाली व नापीक जाहाल्याकरितां वसुलास ढील पडली. रयेतहि कानडे नातवान आणि थोट[1]. यास्तव युक्तीनें पेस्तरची लावणी होऊन वसूल घ्यावा लागतो. सख्ती जाहाल्यास पलतात, यैसें वर्तमान आहे. प्रस्तुत तमाम लावण्या होतात यास्तव वसूल तटला आहे. पेरण्या जाहाल्यावर वसूल चालता होईल. वसूल पडोन कमाविसदाराचे उलगडे पडावयास आस्विन कार्तिक पाहिजे. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Jivaji Gopal impresses on Nana Fadnis the necessity of maintaining a strong force to defend the frontier towns against attacks from Haidar.*

No. 217] [October 1770 ?

श्रीगणराज

सेवेसी गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. गुरुवार दोन प्रहर तीन घटका स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. येलवंतीचें ठाणें गोली न वाजतां हस्तगत जालें. आंतील प्यादे हत्यार बाइकासुद्धां

---

१ दुर्मट, उद्धट.

जा(तील) तेथे पोहचाऊन द्यावयाचा करार आहे. त्या [फाटले.] काढीलें. पोंहाचाऊन देतों. [फाटलें.] लागेल म्हणून आज्ञा. त्यास तलकल घ्यावयाचें आहे यांत गुंता नाहीं, परंतु दोन दिवस जावयास येक दिवस तेथें च्यार दिवस जर आपण गळगनाथापासींच मुकाम करून राहिले तरी यावयास लागतील असें आहे. इतकियांत हरपनहलीवाल्यानी लबाडी केली तरी पारपत्य जालें पाहिजे. तोफा सेवकासमागमें; दिवसगत लागल्यानें स्वामी शब्द ठेवितील, कीं, हे माहीत असतां उमजून लिहिलें नाहीं. यास्तव लिहिलें आहे. रातोरात उत्तराची आज्ञा करावी त्याप्रमाणें तलकलास जावयाची आज्ञा जाली तरी जाऊं. आजी तलकल न घेतलें तरी येतेसमई घ्यावें लागेल. तेवढें ठाणें राहिल्यानें वाईट, परंतु आजी गेल्याने पुढील मनसब्यास पेंच पडेल. राजश्री सुभानजी घोरपडे याही घेतली आहे. राजश्री रामचंद्र * * *

* * * * * *

पाठवितों. बहुतेक चिठीनें ठाणें देतील. तेथेंही प्यादे येलवंतीचे आहेत. न दिल्हे तरी उपाये नाहीं. आम्हांस समजलें त्याप्रमाणें लिहिलें आहे. स्वामीची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक घडेल. आम्हाकडे व विसाजी नारायेण याजकडे शब्द न यावा. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopal Govind writes how the place Yelvanti was captured by him and proposes to capture Talkal and other places.*

No. 218] *[19-11-1770*

श्रीसांब

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य भगवंतराव बापूजी कृतानेक विज्ञापाना ऐसीजे. राजश्री त्रिंबक सूर्याजी यास स्वामीनी सोंदे प्रांत वगैरे किलेकोट हैदर नाईक याजकडील घ्यावयास रवानगी केली आणि मशारनिलेस जामीन असावा म्हणून आज्ञा केली. त्याजवरून मशारनिलेस आपण जामीन असों. किलेकोट घेऊन सरकारांत न देत, बदमामली करितील तर आपण हजर करून देऊं. छ १ शाबान सुा इहिदे सबैन मया व अलफ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bhagvantrao Bapuji stands surety for Trimbak Suryaji who was deputed by the Peshwa to capture the district of Sondha and its forts from Haidar.*

No. 219] [21-11-1770

श्री

तीर्थस्वरूप राजश्री काका
वडिलाचे शेवेसी

आपत्ये केसो विश्वनाथ टिलक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष शुध ४ पावेतो मुाा श्रीकोल्हेश्वर कृष्णा दक्षणतीर ताा सातारा प्रांत कराड येथें सैन्यात आपले आसीर्वादे सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान यथास्थित असे. श्रीमंतास किंचित्समाधान नवते म्हणून दोन च्यार मुाा जवल जवल जाहली. प्रस्तुत चांगले आरोग्य आहे. आतां दरमजल कर्नाटक प्रांती मनोलीचे रोखे निघोन जाणार. उदईक राजश्री मुधोजी भोसलेहि याच मुकामी येऊन भेटी होणार. राजश्री त्रिंबकराव मामा याणी किले गुरुमकोंडा सरकारांत घेतला पुढें तिर्पतीकडे स्वारीस गेले. श्रीव्यंकेटेशदर्शन घेऊन कांहीं संस्था-निकापासून खंडणीदंडणी घेऊन मागती श्रीरंगपटण प्रांती येतील. इकडून श्रीमंतहि जातील तेसमई खंडणीदंडणीचा ठराव होणे तो होईल. प्रस्तुत मजकूरच आहे. या प्रांती धारण अस्त्यापदार्थे बरीच आहे. लशकरामुलें महर्गता तीन च्यार पायलीची आहे. पेशजी पर्जन्य पडिला होता तोच. दुसरा पडिला नाहीं. येणेप्रमाणें वर्तमान आहे. आपणाकडील सविस्तर आसिर्वाद पत्री ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. सैन्यांत राजश्री पांडुरंगपंत दादा व राजश्री गोविंदपंत तात्या आहेत त्याणी पत्रे लिाा आहेत त्याजवरून कलेल. बहुत काये लिहिणें कृपा लोभवृध्रि केली पाहिजे हे विनंती.

हेाा राजश्री आपाजीपंत यांसी नमस्कार. लिाा परिसोन लोभ करून पत्री लेखन करीत असिले पाहिजे. हे विनंती.

हेाा राजश्री गणेशपंत मराठे यांसी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. लोभ करून पत्र पाठऊन संतोषवीत असिले पाहिजे. दाजी गंगापुरी गेला म्हणून आमचा अविस्मर होईल तरी होऊं न द्यावा. लोभ करीत असावें. लोभाचें लक्षण जे कागदीपत्रीं स्मरण करून समाचार वारंवार घेतल्यानें बहुत हर्ष होतो. बहुत काये लिहिणें. लोभ करीत असिलें पाहिजे हे विनंती.

मातुश्री मावसीबाई यांसी साा नमस्कार प्रविष्ट करावे.

¶*Keso Vishvanath writes from Kolheswar about the Peshwa's recovery from illness and his intention to proceed to Karnatak.*

No. 220] [21-11-1770

श्री

यादि निसबत राजश्री त्रिंबक सूर्याजी सुा इहिदे सबैन मया व अलफ. स्वामीनी आज्ञा केली कीं, तुम्ही यामागें कामेंकाजें केलीं तीं देखिलीं नाहीं. हाली रुबेरू करून दाखवणें म्हणोन आज्ञा जाली. आज्ञा ते शिरसा. शेवकाची चाकरी मेहनत, खावंदाचा पुण्यप्रताप येश आहे; तरी कृपाळु होऊन सेवकास सनदा द्याव्या. संवदे प्रांतीची निमा वरघांट आहद सामराणी तहद बांधारी कोंकणपटीं किले मर्दनगडपासून गोकर्ण माहाबलेस्वर होनावरपर्यंत किले व ठाणीं व मुलुक याच्या सनदा द्याव्या. स्वामीच्या पुण्यप्रतापें सदरहू प्रांतांत सरकारचा अमल होईल. त्यासी कर्जवाम करून मसलत सुरू केली पाहिजे. त्यासी येथास्थित सरकारचा अंमल जाल्यानी दरम्यान कोण्ही रसदा घ्यावयास सिद्ध होतील ते न व्हावें. किले व प्रांत सेवक श्रमसाहस करून सोडवितो तो तालुका सेवकाचें ताबीनात असावा. जो कोण्ही साहेबकामावर उभा राहील, श्रमसाहस करील त्यास सेवक वचन देईल. धंदे रोजगार व बक्षिसें वगैरें देऊन मसलत पुरी करून कार्यसिधि जाहलियावर स्वामीनीं सेवकाचें वच्यन पार पाडणार स्वाम धणी समर्थ आहेत. भाऊबंद, पुत्र, पुतण्ये व सरदार व कारकून सुधां मसलतीस जातो. मसलत सिधीस गेल्यानंतर सर्वत्रांचें चालविणार खावंद समर्थ आहेत.

सदर्हूपैकी कलमें

संवंधे वरघांट अहद साम्राणी बांधारी कोंकणपटी किले मर्दनगड यापासून गोकर्ण माभलेश्वर होनावरपर्यंत किले व ठाणी मुलुक जो हैदरखान याचा मुलुक असेल त्यांत स्वारीसिकारी करून किले व मुलुक काबीज करावा. मसलतीस खर्च होईल तो, सरकारचा व हैदरखानाचा बिघाड आहे तों पो सदरहू मुलुकावर फेडावा. सरकारांत मागों नये. कलम. १

श्रमसाहस करून तुम्ही मसलत सरकार नक्ष राखून शेवटास नेल्यास

सदरहू मुलुकपैकी किलेजात व जमीदोज ठाणीं सुटतील व तालुका सुटेल त्यापैकी किले व जमीदोज ठाणी यांत माणसें घालून बंदोबस्त राखावा. ठाणीं, किले व तालुका सरकारांत द्यावा. कलम. १

हैदरखानाचा सलूख जाहालाच, तहांत सदरहू किलें जात वगैरे व तालुका सोडणें जाहाल्यास सोडावा लागेल. कदाचि(त) सलूख होऊन तालुका व किले सरकारांत राहिले तर किले खेरीजकरून तालुका

तुमचें स्वरूपानसार ऊर्जित केलें जाईल. कलम १

तुम्हाकडे कमाविशीनें ठेविला जाईल. कलम. १

आम्हास समागमें मसलतीस कितेक लोक चाकर व कुमकी मिळतील त्यांस कांहीं बक्षीस द्यावें म्हणोन. त्यास तुम्ही मनस्वी वचनें कोणास न देणें. सरकारांतू(न) चाकरी पाहून कार्याकारण रदबदली आइकिली जाईल. कलम. १

सदरहूप्रमाणें पांच कलमें लिहिल्याप्रमाणें मशारनिलेचें नावें सनद देणें.

छ ३ शाबान इहिदे सबैन
मार्गसीर्ष
सनद लिहिणे

¶*Sanad to be granted to Trimbak Suryaji who has expressed readiness to wrest the Canara District from Haidar.*

No. 221] [*1770 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री तात्या
स्वामीचे सेवेसी

पोष्य सदाशिव मल्हार सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेख करीत आसिले पाहिजे विशेष. महमद इसप याजविसी जे बोलणे ते आपल्यासी बोललों आहो, तरी हरयेकविसी यांचा गौर करीत जावे. रोजमरा वरचेवर पावऊन यांस आडचण कोणेविसी न (पडे) ते करावे. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶*Sadashiv Malhar writes to Haripant Tatya asking him to promote Muhammad Isaf into service and pay him regularly. The writer is probably one of Mahadji Sindia's subordinates.*

6475

No. 222] [1771 ?

श्री

विज्ञापना. इकडील वर्तमान दर रवानगीस लिहीतच गेलों. पटणाजवळ आले. हैदर झाडींत. खंडणीचें राजकारण म्हणावें तर पुण्याचे बोलणें. त्यास जरब म्हणावी तर ठाणी घेतली. मुलकाची खराबी फार जाली. परंतु दोन स्थलें मातबर, त्यांत यकाचे गळीं पडते म्हणजे लौकर निकाल पडता. गळीं पडण्याचा प्रकार इकडून मलमलींत, कारण मजबूद स्थलें तोफखाना आपला थोडा, यामुळें अनमान दिसतो. हैदरखान चित्तांत आणितो कीं महिना दोन महिने हे मुलकांत धामधूम करितील अखेर देशास जातील. मग जलदी का करावी ? असे दोहीकडील भाव आहेत. मसलत लांबणीवर पडलिसी दिसते. श्रीकृपेकडून घडेल तें खरें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. नकासखाना खासगीकडे सांगितला. तिकडेच ठेवावयाची मर्जी. मीं दोन तीन वेळ विनंती केली परंतु मर्जी नाहीं. मग आग्रह कशास करूं ? हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes that Haidar is refusing to come to terms though the army has by now occupied most of the Mysore territory and is at the gate of the capital itself. He expects to reoccupy the lost territory when the Maratha forces retire for the monsoon.*

No. 223]

पौ छ १० जिल्हेज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी स्वामीचे शेवेसी

पोष्य गणेश शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ८ सवाल मुकाम पुणें सुखरूप असो विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी यैसें नसावें. सदोदित पत्र पाठऊन संतोषवीत आसिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी खासा स्वारी

[फाटलें. एक ओळ.] गेली. तेथोन फौजा राजश्री मलबा बापू व कृष्णराव बलवंत याजबराबर दाहा हजार व तोफखाना देऊन राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ याजकडे रवाना केली. खासा स्वारी माघारे पुणियांस माघ शुा पंचमीस दाखल जाहाली. शरिरास औषध घेऊन उपाये येथास्थित करणार याप्रमाणें आहे व कर्नाटकचें वर्तमान तरी राजश्री त्रिंबकराव मामानी गुरुमकुंडा

घेऊन श्रीवेंकटेशास जाऊन बेंगरूळचे सुमारे आले आहेत. हैदरखान पटणांत आहे. गोपाळराव गोविंद हे आदवानी व बल्हारीकडे त्यांच्या सरंजामांत खंडण्या आहेत त्या घ्यावयाबद्दल आले होते. त्यांस शरीरीं समाधान नाहीं म्हणून सडे मिरजेस आले, तेथें देवाज्ञा जाले. त्याची फौज वामनराव घेऊन राजश्री मामाकडे जाणार व मलबाहि मागाहून पावलेच असतील. याउपरी मग तिकडे हैदर नाईक याजवर जाणार. खंडणीचे जाबसालाबद्दल आपाजीराम आला आहे. परंतु खंडनी मर्जीप्रमाणे होत नाहीं म्हणून राहिली. कलावें. राजश्री बाळकोबा तात्याहि, पौष वद्य अमवाश्ये देवाज्ञा जाले व विष्णु माहादेव पंडित व आबाजी पंत फडके हेहि देवाज्ञा जाले. याप्रमाणें चांगलेच लोक गेले यैसे इकडील वर्तमान आहे. कलावें राजश्री निळो गोपाळ याजकडे आमचा यैवज येणें आहे तो राजश्री माहादाजीपंत यास ठाऊक आहे. त्याणीच दिल्हा आहे. तो उगवला पाहिजे, यास्तव पेसजी आपणांस दोन तीन पत्रें पाठविली आहेत, परंतु उत्तर आलें नाहीं. तरी त्याचा यैवज बालाजी गोविंद याजकडें वरात तीन हजाराची होती ती राजश्री चिंतो अनंत याणी त्याजकडे पाठविली होती, परंतु त्याजकडून यैवज आला नाहीं. राजश्री गंगाधर बलाल बुंधले यास ठाऊक आहे. त्याजला आम्ही पूर्वी लिहिले होते त्याचे पत्र आम्हांस आलें कीं यैवज देवस्थली याजकडे गेला नसिला तरी तुम्हास पाटऊन देऊं. देवस्थली याचे पत्र घेतले कीं, आपल्याकडे यैवज आला नाहीं म्हणून पत्र घेऊन मुजरद जोडीबरोबर त्याजकडे पाठविले आहे. त्याचे उत्तर आलें नाहीं याजकारितां ते आपणांजवळ आले आहेत तरि मशार-निलेजवळ हें सांगोन यैवज हरतजविजीने उगऊन घेतला पाहिजे. नाहीं देत तरी आम्हांस सरकारचीं पत्रें घेऊन ब्राम्हण करून पाठवावा तेव्हां यैवज आपला उगवेल. यास्तव हें काम आपण केलेंत तरी यैवज आपणच दिल्हासा होईल. वारंवार लिहावें तरी आपली मर्जी खटी होईल. राजश्री गंगाधर बलाल याचें आम्हांस उत्तर आलें आहे तें पाहिजे तरी आपले घरी आहे पाठऊन देतों. त्याचे हातचा दस्तायैवज आहे कीं देवस्थलीयाचें पत्र आलें कीं यैवज आला नाहीं म्हणजे रुपये देवाल त्यास देऊं म्हणोन आलें. त्याजवरून देवस्थलीयाचें पत्र घेऊन कासीदजोडी याजकडे पाठविली आहे. कलावें. राजश्री कृष्णाजी राम लघाटे हे आपणासमागमें गेले. त्यास त्याचे घरीं खर्चावेंचाची अनुपत फार आहे. घरी बाइकास दुखणी जाहालीं आहेत. त्यास रोजगार नाही, तेव्हां घरीं खर्चास येणें कलतच आहे. त्यास अंतरवेदींतील महाल सुटले त्यांतून येका माहालची जफ्ती यास सांगोन च्यार रुपये कर्ज फिटे तो अर्थ करावा. आपलेहि नातलग जाहालेच आहेत. आपले लोकास इकडे जागा नाहीं म्हणोन त्या प्रांते गेले

आहेत. तरी सर्वांचे कल्याण आपले हातीं आहे. केल्यास ईश्वर आपल्यास येश देईल आणि हेच कीर्त राहेल. आम्हीं लिहिलें म्हणोन रागास याल तरी आपण सूज्ञच आहेत. येथील लोकांस राजश्री हरिपंत तात्या आहे म्हणून गरीबगुरीबाची जाबसाल व कामें होतात. तिकडे आपण आहेत. राजश्री माहादाजीपंत आपल्या जवळ आहेत. आम्ही राजश्री त्रिंबकराव मामाकडे राजश्री धोंडो नारायेण तबलद्राराचा कारकून ठेविला होता त्यास मामाजवळ मेहनत केली. त्याणी बोलाऊन अफ्तागिर दिल्हे ; आणि राजश्री माहादाजीपंत यास आपण दिल्हे नाहीं, तेव्हां चाकरी केली नाहींसें वाटतें. असो, आपण देवितीलच. परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपालोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Ganesh Shankar writes to Baburaoji about the death of Gopalrao Govind Patwardhan and of the return of the Peshwa to Poona on account of his ill-health ; the movements of the army in the Karnatak are also reported.*

No. 224] [*10-2-1771*

पौ छ ९ मोहरम

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्य लक्षुमण नारायण देशमुख साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ २४ सवाल मुकाम पुणें येथास्थित असे विशेष. आपणांकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी ऐसे नसावें. सदैव पत्रीं संतोषवीत जाणें. इकडील वर्तमान तरी श्रीमंत फौज तोफखानासमेत स्वारीस निघाले होते. त्यास मिरजेआलीकडे दरमजल गेले. तदनंतर प्रकृत थोडकीसी ठीक नव्हती. यास्तव दाहा हजार फौज व दाहा तोफा राजश्री कृष्णराव बलवंत व मल्हार जगजीवन यांजबराबर देऊन मामाकडे कर्णाटकांत रवाना केले. गणोबा नाईक रास्ते यास सातसे राऊताची सरदारी नवी सांगितली. त्यास होनगुदे गुजारत सरकारांत घ्यावयाचें केलें आणि आनंदराव भिकाजी याजकडे कमाविसीनें सांगितलें होतें. त्यास तेथें अमल * * * * * सालमजकुरी गणोबा नाईक

यास होनगुदे कमाविसीनें सांगोन घेऊन द्यावयाविसीं आपास सांगितलें होतें. आपानी मोर्चे लाऊन होनगुदे घेऊन दिल्हे आणि पुढें मामाकडे गेले. मलबास माघारे आणविले ते आले. आपणांकडील बगाजीपंत व सदासिवपंत करमरकर गेले होते. सदाशिवपंत आपले वडिलास भेटावयासी जावयासी मलबाबराबर माघारे आले. कोकणांत गेले. खासा स्वारी माघारी फिरली ती माघ शुा पंचमीस पुण्यास आली. पाटणकर, निबालकर, दरेकर, मान्ये, घोरपडे इतके मानकरी यांस समजाविस नालबंदी साल मजकूरची पावली होती. त्यास फौजेस निरोप देविला. खाशास मात्र बराबर ठेविलें. नालबंदी पुढिले सालीं धरावी ऐसा मनोदय आहे. परंतु मानकरी लोक आईकत नाहीं. पुढें सिधातात काय ठरेल तें पाहावें. दीड हजार फौज बराबर ठेविली आहे. विसाजी केशव अरमार सुधा तयार होऊन बिदनुरचे रोखें जात आहेत. मामाहि बिदनुरचे रोखें येत आहेत. आपाजी राम वकील हैदर नाइकाकडील येथें आहे. जाबसाल येतात जातात. परंतु कांहीं निकालाचा जाबसाल पडत नाहीं. हैदर नाईक पटणांत आहे. श्रीमंताचा प्रताप थोर आहे. मनोदयानरूपच घडेल. मुंबईस इंग्रजानें तयारी केली आहे, कोणीकडे मुसाडी देईल हें नकले. यास्तव साष्टीस गोविंद सिवराम व कांहीं फौज व गाडदी पाठविले आहेत. श्रीमंताची * * * आहे. बालकोबा तात्या व आबा फडके व विष्णु विश्वनाथ देवडीचे मृत्य पावले. स्त्रिया राहिल्या. चांगले माणूस गेले. गोपालराव मिरजेस खासा आले होते ते व गणेशपंत रास्ते याजकडील कर्णाटकांत मृत्य पावले. मातबर माणूस गेले. आपणास कलावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणे. कृपा कीजे हे विनंती.

¶*Lakshman Narayan Deshmukh writes to Baburaoji giving news about the illness of the Peshwa during the course of his march to the South. The Peshwa cancelled his programme and sent his forces to join Trimbakrao under Krishnarao Balwant and Malhar Jagjivan. Deaths of prominent persons are also referred to.*

No. 225] [*March 1771* ?

श्रीशंकर

सेवेसीं त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक नमस्कार विज्ञापना. पत्रीं आज्ञा कीं, राजश्री सखारामपंतीं तुम्हांस गुरूमकुंड्याचे तालुक्याविसीं पुसलें होतें कीं हलीं

तेथें राजश्री बाजी रघुनाथ तुम्हांकडून आहेत ते लाख. दीढ लाख रुपये रसद देतील कीं काय ? तुम्हीं उत्तर केलें कीं सरकारचें काम इतबारानें मात्र करून चाकरी करितील. आगाऊ पैका देऊन मामलत करणार नाहींत. त्यास हालीं दीड लक्ष रुपये रसद देऊन मामलत करणार उभा राहिला, त्यास मामलत सांगणार, तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें, यैसी पत्रीं आज्ञा. त्यास ज्या गोष्टींत सरकारचा नफा आणि मामलतीचा बंदोबस्त ते गोष्ट करावी. त्यामधें आमचे निसबतीनें बाजी रघुनाथ तेथें ठेविले, त्याविसीं आम्हीं सरकार उपयोगी लिहिलें तर तें प्रमाणांतहि येणार नाहीं, तेव्हां लिहिणेंहि ठीक नव्हे; परंतु गुरामकुंडा गेल्यावर मागती कोणें श्रमानें आला तें विदित असतां लिहिणें कशास? सरकारची जागा इस्तावा सालेसाल बांधोन दिल्हाच आहे, त्याप्रमाणें जमाहि आकारावी. जमेंत नुकसान न यावें. जागा जतन करून खर्चांत करार करून सरकारांत पैका देऊन निभावणी झाल्यास रसद घेऊन मामलत सांगावी हें उत्तम. प्रस्तुत दरबारची चाल भलत्याचे मामलतीवर भलत्यानें उभें राहावें, सिबंदी तोडून खर्च कमी करावा, जागा जतन होणे ते खावंदाचे कपालावर मागें गमाविली त्याचें पारपत्य कोणी केलें ? पुढें गेली तर कोण करितो ? कची जमा मात्र नाकर्तेपणें कमीही जाली तरि कची समजाविली हा मात्र गुण. मग फाजिल सरकारांत जाले तर मखलासी वगवसिला असल्यास होतच आहे. मग चिंता काय ? आज आम्हीं लिहिणें अनुचित. तथापि खावंदाचेंहि आम्हीं यैसे आम्ही आपले मनांत आणून वर्तनूक करितों. याकरितां मात्र लिहिलें. आम्हांस बरें वाईट करावें न करावें कोणी पुसेल तर बोलावें, तें नसतां लिहिणें हेंहि अनुचित; परंतु वर्षा दो वर्षी निदर्शनास येईल ते अगोधर सेवक लोकीं सुचवावें, त्याहावें हा मात्र सेवाधर्म म्हणून लिहिलें. येरवीं बंदोबस्तानें खर्च होऊन राहिले. लाख पनास हजार रुपये तर तेही पोत्यास अखेर सालीं येतील. गुदस्तां पाऊण लक्ष रुपये त्याणी खर्च वेंच इमारत करून आणून दिल्हेच होते, पुढेंहि देतील; परंतु त्या गोष्टी पसंद नसतां लिहिणें अनुचित हेंच खरें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Information was sought from Trimbak Vishwanath whether the agent appointed by him at Gurumkonda was prepared to pay one and a half lakhs. In case of the latter's inability the Peshwa would consider transferring the Taluka to another candidate who would agree to the sum. Trimbakrao Vishwanath sends a spirited reply that the place has been reoccupied at a great sacrifice and considerations of money must not be allowed in the assignment of such an important outpost. The whole letter is in Trimbakrao's hand.*

6480

No. 226] [10-3-1771

नकल

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबकराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २१ जिलकाद मुा मोतीतले नजीक श्रीरंगपटण तीन कोसपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीच्या आज्ञेप्रो टुमकुराहून कूच करून हेबुरावर आलो, तो हेदरखान सात आठ हजार फौज व पंचेतालीस तोफा व पंधरा हजार गाडदी व बारवाले फिरंगी यासिवाये करनाटकी प्यादे वगैरे बेमबलग बाण घेऊन मोठे तरतुदीने मागडीवर आला. चोरी छपीने सरकारच्या फौजेवर छपा घालावा याअर्थे येका दोन वख्त तयार होऊन यावयाचा विचार केला. येकदा तर तीन कोस निघोन आला. हजार दोन हजार दिवटीचे पोत करून बैलाचे सिगास बाधून लस्कराकडे पिटावे, त्या रोखे आमच्या फौजेनी जावे आणि आपण निरालेच येऊन गोटावर पडावे इत्यादिक मायावी कर्तुत्व. आमच्या तर बातम्या जागा जागा बारीक बारीक होत्या. बातमी येऊन पोहचताच येकदा तर फौजेची तयारी करून गोटाबाहेर जाऊन उभे राहिलो. त्यास वर्तमान कलताच माघारे जाऊन मागडीच्या रानात आवलून राहिला. आम्ही कूच करून त्याचे समोर भैरवदुर्गाजवल येऊन हेबुराजवल येक दोन मुकाम केले. हैदरखान बिदनुरच्या झाडीत सिरल्यानंतर मग आम्हास झाडीत सिरो देईल हा भरवसा न पुरे. याअर्थे बिदनूरचा रोख सोडून तुरविकिऱ्यावर आलो. तो हैदरखान मागडीच्या झाडीतून निघोन नागमंगलावरून मेलकोटे देवाचे स्थल चौफेर बिकट जागा त्याच्या आश्रियास येऊन राहिला. ते बातमी आम्हास कलताच सडी फौज करून राजश्री कृष्णराव बलवंत याजबराबर राजश्री सखराम हरि व नीलकंठराव थोरात व भवानजी वाग व महिमाजी मु(ढे) व अंतोजी माने, दोरगे, निगडे मंडली वगैरे फौज देऊन रा केले. त्यास सखाराम हरि व निलकंठराव थोरात व भवानजी वाग व महिमाजी मुढे व आंतोजी माने व दोरगे व निगडे मंडली पुढे गेले. तेव्हा हें वर्तमान त्यास कलताच हैदरखानाची हजार दीड हजार फौज गोट सोडून गोटापुढे आली होती त्याजवर चालून घेतले. मागे उपरालियास कृष्णराव होते. तेव्हा हैदरखानाचे फौजेस उधलून मारीत मारीत गोटात नेऊन घातले. आडीच तीनसे हैदरखानाचे घोडे पाडावा करून आणिले, तों हैदरखानानी तोफा, गाडदी पुढे घालून तोफाची व बाण, जेजालाची मारगिरी फार केली. ते

समई सखाराम हरीस डोईवर तरवारीची चोट लागली. वरकड मातबर सरदार फारसे जखमी जाले नाहीं. तीस चालीस घोडी ठार जाली. से पनास माणूसहि जखमी व ठार जाले. इतक्यात आम्ही फौजसुधा जाऊन पोहोचलो. अस्तमान जाहाला याजकरिता लढाई महकूफ केली आणि कोसाचे तफावतीने मुकाम केला. रात्रीस हैदरखान जरा भर सरोन मेलकोट्याचे पश्चमेस माचीस पुढे तोफा रोखून आरब्याने राहिला. हे बातमी आम्हास कलल्यानंतर दुसरे दिवसी आम्ही मेलकोटे डावे टाकून त्याणी तोफा पसरोन राहिला होता तिकडून कसे आहे हे पाहावयास गेलो, तों झाडीची बारी आद कोस, येक्या घोड्यानी जावे, झाडीत गेल्यानंतर आत कोस दीड कोस चौफेर मैदान होते व चहूकडून डोंगर व कोठे कोठे कडे तुटले होते. त्या मैदानात तोफा नेऊन सुरू कराव्या तों हैदरखानासारिखा सामानपूर शत्रु, समयोचित चालोन आलाच तर तोफा बाहेर येणे कठीण, याअर्थे चौफेर फिरोन मुकामास आलो. श्रीरंगपटणास त्यास जावयाची वाट होती तेथे छबिना ठेविला. रा। वामनराव गोविंद व आनंदराव गोपाल व नरसिंगराव धायेगुडे व गाईकवाडाचे पथकसुधा सारी फौज पश्चिमेच्या मैदानात ठेविली. आम्ही मेलकोट्याचे पूर्वेस राहोन डोंगरावर तोफा चढऊन तेथून त्याचे लस्करावर तोफाचा मार दिल्हा. तेव्हा त्याणी ते जागा सोडून किल्याचे पोटात नाले पाहून तोफाचा मार चुकाऊन डेरे दिल्हे. तेव्हां पुढे डोंगर होते त्याजवर चौक्या बसऊन बाण लाविले व जेजाला चढऊन जेजालाचाहि मार देऊन तोफा तेथे चढवावयाचा विचार करून येक दोन तोफा चढवावयास लाविल्या. तेथून मार बसल्यास आपला परिणाम नाही हा अर्थ हैदरखानानी चितात आणून छ १८ जिलकादी दोन घटका रात्रीस आवसीच्या तयार होऊन कूच केले. तों आम्हाकडे बातमी नाही. वामनराव वगैरे सरदार पश्चिमेकडे होते ती वाट चुकाऊन दक्षणेकडे खिंड होती त्या मार्गे पटणास चालिला. डोंगरावर सरकारच्या चौक्या होत्या त्यांस हैदरखानाचे तलावर सामसूम पाहून हैदरखान गेला हे बातमी घेऊन सरकारची माणसे आली. परंतु खरे लटके न कले. कडूर बाणावरचे वाटेने बिदनूरच्या रोखे गेला किंवा पाटणच्या मार्गे गेला हे तथ्य न कले. तेव्हा मेलकोटे डावे टाकून कडूरबाणावरच्या मार्गाकडे काही फौज व पटणचे मार्गे कृष्णराव फौजसुद्धा पुढे मध्यरात्रीस रवाना केले. इतक्यात हैदरखान तळ सोडून कोस दीड कोस चालिला. त्यातून त्याचे लस्करचे दोघे तुरक स्वार पलोन आले. त्याणी बातमी सांगितली की हैदरखान पाटणच्या मार्गे चालिला. त्याजवरून आम्ही तेच समई नगारा करून फौजसुधा तयार होऊन तोफा बराबर घ्यावयाची तयारी करऊन पटणच्या मार्गे चालिलो. त्यास पाटणच्या वाटेवर छबिना होता त्याची व हैदरखानाची

गाठ पडिली. तेव्हा त्याणी आम्हाकडे व वामनराव गोविंद याजकडे बातमी पोहचाविली. त्यास वर्तमान कलताच तेहि तयार होऊन तिकडून येऊन पोहचले. कृष्णराव पुढे फौजसुधा रवाना केले होते तेहि जाऊन पोहचले. च्यार घटका रात्र असता लढाई सुरू जाहाली, तो त्याणी तोफा चौफेर पसरून गाडदी, फिरंगी, बारवाले याचे बुरूज बाधून मोठे कवायेतीने लढत लढत पटणाच्या मार्गे चालिला. तोफा व बाण व फिरंगी याची मारगिरी येकसंतत होत होती ते लिहिण्यात येत नाहीं. तों आम्ही सूर्योदई छ १९ जिलकादी फौजसुधा जाऊन पोहचलो. चौफेर फौजा घातल्या, परंतु त्याचे मारगिरीपुढे घोडे हती पुढे तोंड न करी. ते समई तोफा येऊन पोहचल्या नाही याजमुले काही उपाये न चाले. ज्याप्रो चित्रात फिरंगी गाडद्याचे बुरूज लढवाई काढितात त्याप्रो गोल बाधून बरखंदाजी, बाण व तोफाची मारगिरी बेहद करीत लढत चालिला. पटणापासून तीन कोसावर अलीकडे मोतीतले आहे याजवर आला, तो आम्ही त्याचे डावे बाजूस पाणी धरून चालत होतो. हैदरखान माथ्यावरून चालत होता. पिछाडीस काही हुजरात व उभयेता रास्ते व हिंदुराव सेनापती याची फौज व दौलतराव घोरपडे याचे पुत्र आनंदराव ऐसे होते. उजवे बाजूस वामनराव गोविद व आनंदराव गोपाल व धायेगुडे व गाईकवाडाचे पथक होते. इतक्यात कृष्णराव माधव याणी कस्त करून जिलेबीच्या दोन तोफा घेऊन येऊन पोहचले. त्या तोफा सुरू केल्या तो मागाहून दुसऱ्या दोन तोफा येऊन पोहचल्या. त्यानंतर तोफाची व बाणाची मारगिरी केली. गोले त्याच्या लस्करात पडताच लस्कर जमून चालत होते ते गलबलून काही अंतर पडिले. थोडेसे तोड लाविले इतका अवसर पाहून स्वामीचे नाव घेऊन निशाण चालविले. तो हुजरात पथके जलद निशाणाजवल येऊन पोहचली. ते समई वामनराव गोविद व आनदराव व गणपतराव रास्ते व आनंदराव गोपाल व धायेगुडे व गाईकवाडाचे पथक व हिंदुराव सेनापति याजकडील खंडेराव घोरपडे व मालोजीराव घोरपडे व दौलतराव घोरपडे यांचे पुत्र आनंदराव घोरपडे व कडपेकर याजकडील महिपतराव मल्हार सारे सरदारानी निकड करून घोडे चालविले. त्यास हैदरखान पुढे आघाडीस चालिला होता, पिछाडीस तोफा व गाडदी फिरंग्याचे बुरूज बाधून चालत होता; ते उधलून मारीत मारीत हैदरखानापावेतो निशाण घेऊन जाऊन पोहचलो. तेव्हा हैदरखानानी मोतीतल्यासमीप डोंगर होता त्याचा आश्रये करून डोंगरावर पाच सात हजार माणसानसी सडा जीव घेऊन चडला. तमाम त्याची फौज मारून गारत केली. मोठी लढाई जाहाली. राव सेनापति याजकडे तोफा आल्या त्यासुधा चालीस पंचेतालीस तोफा व वीस पंचवीस हती, सात आठ हजार घोडे व खजाना

6483

जवाहीर व जरी निशाणे हौदे व अंबारी साहेब नौबत पाडाव आली. सारी सलतनत लुटून फौज मारून ताराज केली. हजार दोन हजार माणूस कापून टाकिले. हैदरखान जीव मात्र घेऊन डोंगरावर चढला. तेथूनहि येक वख्त चालून आला. तेव्हा फिरोन मारीत मारीत डोंगरावर लाविला. उपाये न चाले, तेव्हा डोंगरावर चढला. त्याजवर आम्ही इकडील बंदोबस्त राखून दोन हजार फौज घेऊन जलद डोंगराखाली जाऊन पोहचली. इतक्यास च्यार घटकाचा आवकाश पडिला, त्याजमुळे हैदरखानानी कलरूचे सोंग घेऊन पाई उतारा आथवा येक घोड्यानी आगोधर पळून पटणास गेला. डोंगरावर लोक व सरदार होते त्यानी नामुरादीने कौल मागितला, त्याजवरून कौल देऊन हातेर वगैरे घेऊन जिवानसीमात्र सोडून दिल्हे. लालामिया व मीर रजा व लाला बक्षी वगैरे मोठे मोठे पाच सात सरदार पाडाव करून आणिले व कितेक लढाईत ठार जाले. वरकड लोकात हैदरखान पाहावा तों वोलखी माणसे घालून चौकसी केली, परंतु न सापडला. हजारो माणूस दाती तृण धरीत असता त्यास आपले लोक मारीत नाहीं या अर्थे सोडून दिल्हे. मीर फैजुला बराबर होता, परंतु त्याचे ठिकाण लागले नाही. लढाईत पडले किंवा कोण्हास सापडले हे ठिकाण लावीत असो. स्वामीचे पुण्यप्रतापे स्वामीची आजीम अस्मानी फते जाहाली. सरकारच्या फौजेतील माणूस घोडे फार जखमी व ठार जाले. आम्हास गोलीची जखम उजवे कानास लागली. गोली निघोन गेली. खैर जाहाली. लौकरच जखम बरी होईल. वर्तमान अधिक उणे सेवेसी जाईल याजकरिता लिहिले असे. निलकंठराव त्रिंबक, गोपालराव गोविंद याचे भाऊ व अंतोजी माने पागेकडील कामास आले. कृष्णराव बलवंत याचे घोड्यास जखम गोलीची लागली. आनंदराव गोपाल याचा गेंद घोडा पडिला. मोठे शर्तीची लढाई जाली. हुजरात व सरंजामी सरदार लोक याणी निकड केली. लोकानी चाकरी मोठे तऱ्हेने केली. सरकारचे निशाणाचे हतीच्या पायास गोला लागला तो कापून काढिला. खैर जाली. लस्करचे घोडे ठार फार जाले व मातबर लोक जायाजखमी फार जाले व कितेक ठारहि जाले याचा तपसील मागाहून सविस्तर लेहून पाठऊ. स्वामीची फते जाली याजमुले इतकीहि क्षित जालीसी सर्वास वाटली नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Vishwanath reports in a graphic manner the fiercely contested battle of Moti Talav near Seringapatam. Haidar's forces were completely routed, he himself flying away in disguise. The victory marks Trimbakrao as a great general because, with consummate skill, he laid the enemy prostrate.*

No. 227] [12-4-1771

पौ छ २७ मोहरम इहिदे.

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २६ जिल्हेजपावेतों मुकाम नजीक श्रीरंगपट्टण वर्तमान येथास्थित असें विशेष. येथील वर्तमान तर हैदर नाइकाचा मोड होऊन पटणास येऊन तोफा सुरू करून गोळ्यांची मारगिरी दुतर्फा होत आहे, व हैदर नाइकाचें सल्ल्याचें राजकारण राजश्री सेनापति याचे विद्यमानें मुरलीदासाचा भाऊ रघुनाथदास बोलावयासी येणार होता. त्यास सेनापतीचे हातून सल्ला करावयाचा नाहीं, येविशीचे तपशील तोफखान्याकडील सांडणीस्वाराबराबर लिहून पाठविलेच होते त्यावरून कळलेच असेल. त्यावर आज पंचवीस दिवस नित्य दुतर्फा तोफांची मारगिरी होतच आहे. हल्ली हैदर नाइकाकडील वकील राजश्री शामराव गोपाळ नरसींपूरकर राजश्री अनंदराव रास्ते यांचे विद्यमानें सलुखाचा प्रकार बोलावयासी आला. हैदर नाइकाचे हलाखीचा प्रकार, सर्व जिनगानी लुटली गेली, आतां कांहीं हाल राहिला नाहीं. कृपा करून रयातच कराल तर तीन साला खंडणीपैकी येक साला पायेमल्ली मजरा द्यावी, बाकी सोडावी; आणि दुसाला अठ्ठावीस लक्ष घ्यावें. मदगिरि, चेनरायदुर्ग सोडावें व नवा मुलुख घेतला आहे तो सोडावा, याप्रमाणें बोलों लागल्यावर रास्ते यांणीं फारच निषेध केला. हें लबाडीचें बोलणें तुम्हास बोलावयाचें असलें तरी आमचे विद्यमानें बोलो नये. परभारें हरकोणाचें हातें बोलावें. आमचे विद्यमानें बोलत असाल तर आमचे तीन साला खंडणी व दरबारखर्च व मागील बाकीचे दाहा व पाळेगारापासून वसूल पंधरा घेतले आहेत ऐसें सत्तर होतात. वाजबी कराराप्रमाणें पैका पुण्यास पावता न केला. दोन सालें सारीच फौज ह्याच मसलतीस गुंतली त्याचा खर्च दोन क्रोडी जाहाला. ऐसा पैका मातबर होतो, त्यास तुमचे विच्यारें निदान मामलतच करावी असें असल्यास निदान येक क्रोड रुपये व सोधे बिदनूर सोडावें. याजखेरीज पालेगाराचा व सरकारचा मुलुख तुम्ही घेतला आहे तो सोडावा. फक्त पट्टण मात्र तुम्हांकडे ठेवावें. राजेयाचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. पेस्तर सालापासून खंडणी करार होईल त्याप्रमाणें फौज या प्रांतीं न येतां पैका पुण्यास पावता करावा, ऐसें साफच सांगोन वकिलास पाठविलें; आणि सर्वांचे विचारें आज दोन वर्षें फौज खराब जाहाली, पुढें छावणी केल्यास हुजरातचे फौजेस कार्तिक मासपावेतों पंनास लक्ष रुपये, याखेरीज सरंजामियांतहि हाल राहिला नाहीं, त्यास सत्तर पंचाहत्तर लक्षपावेतों व कोल्हार व चिकबाळापूर सोडों नयें; याप्रमाणें सर्व

6485

जाहाल्यास तह करावा; ऐसा सर्वांनी विचार केला. त्यास वकील गावांत जाऊन पहिल्यानें बोलिलों त्याप्रमाणें कबूल होत असल्यास फिरोन येतों, नाहीं तरी राहुटी व उंट आहेत ते पाठऊन द्यावे. त्यावरून कबूल होत नाहीं. उंट राहुटी गावांत वकिलाची पाठविली. निदान पंनास लक्षपावेतों विल्हेस लावावे, हें हैदर नाइकाचें मानस. येथील तों वर लिहिल्याप्रमाणें जाहालें तरी करावें, नाहीं तरी छावणीच करावी, हा डौल. या तलावर वैरण अगदीं मिळत नाहीं. दाणा दोन पायली मिळत होता तोहि आतां फारसा मिळत नाहीं. रोज लोकाचीं घोडीं थकोन राहातात. च्यार दिवस आणखी वाट पाहाणार. कांहीं तळ्यावर येऊन बोलो लागल्यास उत्तमच जाहालें; नाहीं तरी चित्रदुर्गकरहि छ २४ जिल्हेजीं येऊन भेटले, हजार स्वार पांच हजार प्यादां समागमें आहे, त्यांचे व सर्वांचे विचारें बिदनुराकडे अगर घांटाखाली जावें. कोणतें ठरणें तें याच तळावरून ठरल्यावर मागाहून लेहून पाठवितों. हैदर नाइकाचे तोंडावर दाहा हजार फौज वीस कोंशीं ठेऊन वरकड फौज सुद्धां वैशाख शुद्ध द्वितीयेस कूच करून कडुर-बाणावरचे वाटेनें बिदरूराकडे जावें हा ठराव जाहाला आहे. कळावें सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Baji Govind reports the alternative peace proposals—one put forth by Haidar, the other submitted for his acceptance by Rastia making extravagant demands. The writer does not expect that Haidar would accept Rastia's demands unless modified.

No. 228] *[15-5-1771*

पौ छ २९ सफर इहिदे

श्री

श्रीमंतर राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २९ मोहरमपावेतों मुकाम कैरव संमत रायदुर्ग वर्तमान येथास्थित असें विशेष. श्रीमंतांनीं या प्रांतीं फौज छावणीस राजश्री त्रिंबकराव मामा याजवळ ठेऊन आपण देशीं गेले. फौजेचे बेगमीस ऐवज देविला तो अद्याप येऊन पोहोचला नाहीं. लोकांचा गवगवाच आहे. धारणहि माहागच आहे. प्रस्तुत श्रीमंत देशीं गेले. छावणीची फौज पट्टणचे मुलकाचा शह सोडून अलीकडे आल्यामुळें हैदरखानाची फौज थोरले बाळापुराजवळ व हगलवाडीजवळ जमा जाहाली आहे. ठाण्यांत पोख्ती शिबंदी नाहीं. हगलवाडीहून कोठेंहि ठाणीं दगा करून घ्यावीं

6486

हें त्याचें मानस आहे. याउपर कूच करून त्याच रोखें जाऊन ठाण्याचा बंदोबस्त करितील. तूर्त मोठा पेंच वैरणीचाच आहे, यामुळें येकदां फिरल्या मुलकांत फौज गेल्यानें घोड्यांत हाल राहणार नाहीं. कळावें. प्रस्तुत मामा राजश्री मुराररात्र व गोपाळराव यांचे विचारेंच सल्ला मसलत करणें ती करितात. उभयेतां येथें येत असतात. सर्वांचें येक चित्तच आहे. धन्याचें कार्यास काम पडल्यावर मन वाढविण्याविशी कोणी मागें घेणार नाहींत. धन्याचें पुण्यप्रतापें सर्व येथास्थितच होईल. कळावें सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Baji Govind informs Nana Fadnis of the condition of the army under Trimbakrao Mama in the Karnatak. The letter shows how under the strict and wise regime of the Peshwa there was perfect amity among the various Maratha leaders acting a thousand miles away.

No. 229] ✓ *[2-6-1771*

श्री

राजश्री हरबाजीराव सुभेदार गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो॥ रघुनाथ बाबाजी आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १ सफर जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपणाकडील च्यार रोज कांहीच वर्तमान कलत नाहीं व किल्याचेहि वर्तमान कलत नाहीं. किल्याजवल फौज उतरली आहे. गोला-गोली तुमची व त्याचीं रोज होत आहे म्हणोन परस्परें वर्तमान आईकतों, त्या तहकीकचें वर्तमान लिहिलें पाहिजे, व लस्करांत राजश्री मामाकडे वर्तमान लिहिलें की नाहीं हें ल्याहावें. देवनहलीस हैदरनाइकाची फौज पांचसें स्वार व दोन हजार प्यादे गाडदी काल दरोगा घेऊन आला आहे म्हणोन वर्तमान आहे. तहकीक आलियावरी लिहोन पाठवितों. चिकबालापुरावर जमाव वरचे(वर) रवाना होतो. नरसया वलमवाडी घाटाखालील बालापुरावर येतात. बेंगरुलाहून दारोगा पटणचें वर्तमान की, तुमचे येथील कोण भेदले आहेत त्याज-वरून वरचेवर फौज जमा होत चालली. च्यार तोफा बेंगरुलाहून रवाना जाहल्या. सविस्तर वर्तमान कचें लिहोन पाठवणें. सैन्यांत मुजरद जोडी वर्तमान लिहोन पाठऊन जरूर जरूर सर्व वर्तमान लिहिणें. बहुत काय लिहिणें. रवाना छ १ सफर लोभ कीजे हे विनंती.

¶Raghunath Bawaji reports to Harbaji Subhedar the arrival of Haidar's forces at Devanhali and makes enquiries about the fort where the addressee was stationed.

No. 230] [15-6-1771

पा छ ७ राविल.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री सखाराम हरि गोसावी
यासी

श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुहूर सन इसने सबैन मया व अलफ. तुम्हास निरोप समई रस्तेविसी सागणे त्याप्रकारें सागितलें असतां तुम्ही सिरे प्रांती स्वस्त जाऊन बसला. हे इकडे मनसुब्याचे तोड लागले असता या दिवसात लस्करात माहागाई फार. तीन सेरप्रमाणें दाणे मिलत नाही असें असता या दिवसात तुम्ही मेहनत करून रस्त आणून पोहचवावी ते न जाले. हे गोष्ट मनसुब्याचे प्रकारें तुम्हापासून चुकोन गेली. असो. याउपरी पत्रदर्शनी [illegible] पंचवीस हजार रस्तेचे बैल घेऊन तुम्ही दरमजल येऊन पोहचणे. गरूडगिरीकडील गुंता उरकलाच असेल. अत:पर येक घडीचा विलंब न करितां रस्त घेऊन हुजूर येऊन पोहचे ते करणे. तुम्ही तुरविकीरा याचे सुमारे लस्करापासून येक मजल दाहा बारा कोसावर राहाणें. आधी जरूर लौकर लिा-प्रकारे करणे. जरूर जाणोन लिा असे. जाणिजे छ १ रावल. बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa gives a sharp reprimand to Sakharam Hari for not arranging timely supplies for troops acting in the campaign and asks him to send them at once.*

No. 231] [6-12-1771

पा छ १८ रमजान
मार्गसीर्ष वद्य ५ पंचमी

श्री

राजश्री जानोजी धुलप गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा इसने सबैन मया व अलफ. रा तुलाजी आगरे याचे मूल हैदर नाइकाकडे गेले. त्यापैकीं राघोजी आंगरे याणी हैदर नाईक याचे आरमारची सरदारी कबूल करून हैदर नाईक याचे आरमार पाल २ दोन व गुराब ९ नव सिलेपोस तयार करून सदाशिवगडास आले. पुढें येऊन उपद्रव करावयाची उमेद राखतात,

म्हणोन सावताच्या वाडीतून रा मोरो गिरमाजी कारकून सरकार याणी लिहिले, तरी तुम्ही जंजिरे विजयदुर्ग येथे जाऊन आरमारची तयारी जलदीने करून सर्व साहित्य आरमारावर चढऊन आरमार सिलेपोस दर्यास तरते करून जंजिरे मजकुरच्या वाडावर खबरदार राहाणे. हैदराचे आरमाराची बातमी दुरुस्त राखणे. सरकारचे आरमार बाऱ्यावर खबरदार राहिल्याचे वर्तमान वरचेवर हुजूर लिहीत जाणे. हुजरून आज्ञा होईल तदोतर आज्ञेप्रा करणे. तोपर्यंत जंजिऱ्यासमीपच राखणे. जाणीजे छ २८ साबान बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa instructs Janoji Dhulap to keep the fleet under him ready as Haidar's fleet under the command of Raghoji, the rebel son of Tulaji Angria, was reported to be heading towards Vijaydurg.*

No. 232] [*2-4-1772*

पो छ २९ मोहरम सन
इसने. चैत्र वद्य १२ बुधवार

श्री

राजश्री हरबाजीराव धुलप सुभेदार गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी रामचंद्र आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ २० माहे मोहरम जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावलें. लोक तूर्त सिडलगटेकर कानडे आसामी पाठविले ते आज येथें पावले. नरसिह नाईक सिडलगटेकर येथें होता याणें इमानेंइतबारें चाकरी नेमिल्या जागें उत्तम प्रकारें केली. आता मोबदला लोक आले, तेव्हां मशारनिलेस लोक सुद्धां तुम्हांकडे पाठविला आहे; येऊन पोहोंचेल. नरसिंह नाईक याचा येक आसामी तेथें मयत जाला. बाकी येकोणीस आसामी माघारे पाठविले आहेत. तुम्हास कळावें. बाकी लोक लौकर पाठऊन द्यावे येविसीं पांच च्यार वेळां लिहिलें आहे त्याप्राणें लोक सत्वर पाठऊन द्यावे. पहिले कानडे पळत होते. त्याचें पारपत्य चांगलें पळाल्याचें जाल्यावर आतां कानडे पळत नाहीं. हालीं मावळे तटाचे तटावरीळ रात्रीचे पळोन जातात. कानड्याचें कोणत्या प्रकारें पारपत्य केला असेल त्याप्रमाणें मावळ्याचें करावें. ही गोष्ट धन्यास कळल्यावर कोठवर जाईल ? न कळता प्रकार आपणास कोणता आहे ? आपल्या लोकांचें कोणत्या रीतीनें चालवितों त्याचा अर्थ राजश्री बळवंतराव मल्हार याणी सांगितलाच असेल. तुम्हांकडील मावळ्यानी अबरू सोडिली इतकें लिहिलें म्हणून रागास न यावें. कारभार सरकारचा

यास्तव दराऊन लिहिणें लागलें व घरोब्याचा अर्थ यास्तव साध्यांत ल्याहावें लागलें. अतःपरी पळोन गेल्या लोकांचें पारपत्य करून त्यांसच इकडे पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Harbaji Dhulap is advised not to spare deserters but to enforce strict discipline among his men if he does not want to incur the displeasure of the Peshwa.*

J *No. 233*] [*7-5-1772*

श्रीशंकर

+सेवेसी विज्ञापना. ताा छ ३ सफर मुाा नजीक चेनरायेपटण येथे असो विशेष. स्वामीचे आज्ञापत्रीं तर बनेल तसा सलूखच करावा. कारण कीं तिसरी छावणी पडेल. दोन छावण्यामुळे मबलग पैाा खर्च जाला. हिदुस्थानातूनहि पैका न आला. व तुम्हाकडीलहि मसलत सेवटास न गेली. याउपर पैका पाठवणे बनत नाही तर निदान पक्षी पंचवीस लक्ष रोख, बाकी पंचविसाची पकी निशा न होये तर जातीचा दस्ताऐवज हैदरनाइकाचा लिहून घेऊन नंदीगड, चिकबालापूर, ताा किलेसुधा व मिडगिसी आदीकरून सर्व किले मुलुक सोडून देऊन सलूख करणे यैसे साफच येके पत्रीं लिा. तेच प्रमाण मानून त्याच अन्वये पंचवीस लक्ष रोख व जवाहीर व हती यासिवाय सा लक्षाचे म्हणजे तिही लक्षाचा माल येकून येकतीस घ्यावे. तूर्त बाकी येकूणीस लक्ष राहिले ते वर्षात तिही मुदतीनी दर सा लक्ष तेतीस हजार याप्राा दस्ताऐवज बाहादराचा लिहून घ्यावा. नावास श्रीरंगपटणातील सावकार आहेत त्यांचे रोखेहि घ्यावे ते पकी निशा नव्हे. बाहादराचा रोखा तोच खरा, याप्राा ठराऊन ऐवज पद्री घ्यावयास सरकारचे पोतेनीस व पोतदार ऐसे राजश्री राव सेनापति व राजश्री लक्षुमणराव रास्ते उभयता मोती-तलावावर फौजसुधा राहावयास गेले त्याबाा दिल्हे. सोडचिठ्याहि किल्याच्या सेनापतीबाा दिल्या. आज्ञेप्राा येथवर मजकूर आला तो विदित व्हावा याकरिता लिहिला असे. हा तह दोन वर्षे मेहनत केल्यासारखा न जाला. नंदीगड, देवरायदुर्ग, चिकबालापूर, गुडीबिंडा, मिडागिसी ही स्थळे स्वामीचे प्रतापे खासा-स्वारीचे येणे जाले त्या साली व येक दोन आलीकडे घेतली ही पुनः येणे कळतच आहे. आपला तालुका आधीच थोडा, त्याचे संनिध हे जागा. याउपर पके बांधून करील तेव्हा समयोचित सरकारचे जाग्यास दगाच जाणावा. लौकिकातहि

+ सवंध पत्र त्र्यंबकराव मामाच्या हातचें आहे.

चांगलेसे न दिसले व येथे आम्ही चौघे आहो यांसहि समर्पक न वाटले, परतु तिसरी छावणी कसी होते? फौज दो छावण्यामुले खराब जाली. इतकेहि निभावेल. स्वामीचा प्रताप तसाच आहे, परंतु मुख्यत्वेकरून स्वामीचे शरीरी सावकाश नाहीं हेच चिंता मोठी ईश्वरे निर्माण केली. त्या वर्तमानाबरून शत्रूने वोढ धरून पके निशेचा पंचविसा लक्षाचा करार असतां लबाडीस येऊन हैदर ब्रोलू लागला. सेवटी आज्ञेचे अन्वये कबूल करून लिहिले प्रकारे उरकावेसे केले. परंतु सेनापति व रास्ते मध्यस्त खरे, परंतु तेहि खटेच कीं, स्वामीचे शरीरी आरोग्य असतें तर पंचवीसच घेऊन करारास कां फिरलास हे निमित्य ठेऊन छावणीहि करून हेच पंचवीस पोटास खाऊन किले न देतां पारपत्यहि करितो, परंतु उपाय नाही. ईश्वरे मोठे कालजींत आम्हा सर्वास घातले. यामुले लाचार जालो. त्यास कराराप्रा॥ बहुतकरून निर्गमात येईलसे वाटतें. याउपर हे येकूणीस येणे. विकृत संवछरपर्थंत ठराव पौ॥ बाकी खरसंवछर होऊन गेला. त्याचे येणे पंधरा. नंदन संवछर लागला याचे पंधरा. येकूण तीस लक्ष आणि येकूणीस, येकूण येकूणपनास लक्ष. वाजबीज येणे. हे विना फौज आल्याखेरीज हैदर देणार नाही, तेव्हा मागती मोहीमच दिसते. मग दिल्हे जागे येणे, शत्रू जबेंत येणे कठीण. त्यापेक्षा पंचवीस रोख पदरी पडतांच मातबर जागे न सोडावे. लबाडासी लबाड बोल्याचे पाप नाहीं. स्थले हाती असल्याने लौकर जरबेंत येऊन येकुणपनास लक्षाचा निकाल येकेच वर्षात मेहनत केल्याने होईल हाहि येक विचार, परंतु स्वामीस आरोग्य त्यापक्षी सर्व घडेल. नाही तर तिकडील वर्तमानावरच फिरोन लबाडीच्या गोष्टी बोलतो, कालहरण करून पाहातो येवढेंच संकट. तथापि प्रसंगोचित स्वामीस सुचवावे ल्याहावे या आशये रास्ते व सेनापतीचे मनातील भाव वेऊन कोणासहि नच कलतां सेवेसी जलद लिहून पा॥ असे. श्रीचे कृपेने आरोग्य आणि मर्जीस आल्यास उतर अति सत्वर आलें तर जागे त्याचे हाती न गेले त्या पूर्वीच उतर पोहचल्यास होईल. परंतु सर्व समर्पक लिहून छावणी होऊन येक वर्ष मोहीम जाली, पा॥ उगाच येक पक्ष अवसर जानोन लि॥. मर्जीस कालदेश जाणोन न आल्यास योजिल्या प्रा॥ जागे देऊन सलूख होतच आहे. उतर कसे ते लौकर यावे. हे विज्ञापना.

¶Trimbakrao Pethe solicits the Peshwa's advice regarding the policy to be adopted towards Haidar. Reports of the Peshwa's illness had considerably modified Haidar's attitude and emboldened him to infringe some of the articles of the treaty signed last year. Trimbakrao asks whether the treaty should be adhered to or whether they should renew the conflict. The letter is a pathetic commentary on the increasing illness of the Peshwa as he was at this particular moment the nation's main-stay.

6491

No. 234] [May 1772

श्री

अजमास खर्च स्वारी राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ सुा इसने सबैन मया व अलफ. स्वारीस राहिल्यापासून खर्च सालमजकूरचे वैशाख अखेरपर्यंत. रुा.

१२९०००००० कित्तायाद

६५०००००० हुजुरून ऐवज पावला.

६१५००००० कित्ता

३५००००० खंडण्याचा ऐवज वसुलास दिला

६५००००००

४६५०००० मामानी खर्चाचा अजमास मामापासून वैशाख पर्यंत पाा त्याची बेरीज

१७५०००० सालमजकूरची नालबंदी मामानी अजमासांत लिहिली नाही ते.

१२९००००००

१०००००० मांमांनीं जमाखर्चाचा अजमास पाठविला त्यांत कांहीं साल गुाा काही सालमजकूरची जमा लिहिली आहे, त्याखेरीज साल गुाा व साल मजकूर अखेर सालपर्यंत ऐवज जमा आला, होणे त्याचा खर्चही होईल साा अजमासे.

१३९००००००

तपसील.

२३३०००० स्वारीसमधे ऐवज.

७३२००० हालीचे मामाचे अजमासांत लिहिले आहेत ते

१००००० साल गुाा व साल मजकुरी जमा होईल तें जमा धरून खर्च लिहिले साा

१७३२०००

५९८००० सिलक अजमासे

२३३००००

६५००००० हुजुरून ऐवज पावला
　　　११५०००० किता ऐन
　　　३५०००० खंडण्याचा ऐवज वसुलास दिला.

　　　६५०००००

८८३०००००

५०७०००० हाली ऐवज पाहिजे
　　　३३२०००० मामानी पाठवावे म्हणून लिा ते
　　　१७५०००० नालबंदी सालमजकूरची

　　　५०७००००

१३९०००००

सन सबैनांत फौजेची चाकरी खासा स्वारी बाा जाली तीच फौज छावणीस राहिली त्यास नालबंदी पावली तो ऐवज वजा केला तर रुा १०००००० बाकी निवळ खर्च १२९०००००

¶*This is an important paper giving the approximate expense of the Peshwa's Karnatak expeditions. In the case of no other expeditions has such a financial statement been so far discovered. The paper gives figures of expenditure incurred by Trimbakrao Pethe for nearly two years, i.e. since the time the Peshwa returned to the Deccan in the summer of 1770 leaving behind Pethe in charge, who returned to Poona in June 1772 owing to alarming reports of the Peshwa's health. The total expenditure for two years as mentioned in the last line is one crore and twenty-nine lakhs of rupees.*

No. 235] [*7-6-1772*

श्री

राजश्री हरबाजीराव धुलप सुभेदार
परगणे चिकबाळापूर गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित तमाजी नारायेण सुभेदार परगणे निजगलदुर्ग वगैरें रामराम विनंती उपरी येथील कुशल तागाईत छ ५ माहे राबिलावल जाणोन स्वकुशल सर्वदा लेखन करीत जालें पाहिजे. यानंतर

कृपा करून पत्र पाठविलें तें उत्तम (प्रकारें) प्रविष्ट होऊन लिहिला भावार्थ अवगत जाहला. विशेष वोखदाबा आलें जरूर अस, तरी सत्वर पाठऊन द्यावें म्हणून लिहिलें होत, तरी प्रस्तुत कच्चा दाहा शेर आलं पाठविल अस, पावलियाचा जवाब लिहिला पाहिजे. आंबे पायेनघाट तालुक्याहून पिकले चोखोट जिनसवार पाहून पाठवावें म्हणून लिहिलें होतें तरी होसहल्ली व रुडबुर वगैरें स्थलीं चोखोट जिनस आंबे हमेषा होत असतां सरकारास हे पावत होते. हल्ली लहाणेच जमाऊ बहुत येऊन हरदो तालुकेच आमराईत उतरून येक आबा नाहीं सारिखा तमाम खाऊन गेले, त्यांपैकीं येकहि बाकी राहिला नाहीं, करितां येथून पाठवणेस संदर्भ घडला नाहीं. सुभेस चौंकडून बेष जिन्नस आंबे येत असले त्यांपैकी आमचे हिश्शेस कांहीं कृपा करून पाठविलिया उपयोगीं पडतलि. आगत्य कांहीं जिन्नसवार आंबे पाठवी तैसें करावें. लष्करचे वर्तमान आम्हाकडे बातमी आली जे सल्याचा जवाबसाल उरकला. पैके पावणेस तुंगभद्रा पार जाहालियावरी ऐवज देऊ; तवपावेतों रास्तेस ठेऊन जाणें; त्याजबराबर पैके देऊन पाठवितों म्हणून हैदरखानानें सांगून पाठविला म्हणे; ऐसियासी श्रीमंत मामासाहेबांनीं जवाब सांगून पाठविले जें * * * * च्य ऐवजीं टिपूसाहेबांस पाठऊन दिल्हिया आम्ही लष्करसहित कूच करून जात असों. ऐवजसहित रास्ते लष्करास येऊन पावलियावरी टिपूस निरोप देऊन पाठवितों ऐसे साफ जबाब दिल्हे. मूल प्रस्तुत सल्लाची गोष्ट मानसिक आहे. आजि उदियांत जोडीहि येणार त्याजबराबर श्रीमंत सौभाग्यवतीचें कागदपत्रांसहित येईल; आलें म्हणजे तें सविस्तर लिहून पाठविलं जाईल. आपणांकडे हुजूरची बातमी तहकीक आलिया लिहून पाठविणेस कृपा करावीं. सल्लाचें प्रकर्ण आजीं प्रथम दिवस आहे. छावणी या प्रांतीं होणें मजकूर आहे ऐतद्विषयीं विस्तार लिहिला काये असे? आम्ही आपले पदरचे असों कृपालोभ कीजे. पूर्वीची कृपा आहे तीच कृपेची वृद्धी करावी हें विनंती.

¶*Tamaji Narayan writes to Harbajirao Dhulap that the army is retiring.*

No. 236] [*4-4-1773*

पो छ १३ मोहरम

श्री

राजश्री नारो आपाजी गोसावीं यांसी

सुरु सलास सबैन मया व अलफ. तुम्ही छ ८ मोहरमची पत्रें पाठविलीं ती छ ११ मिनहूस पावली. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबानी हैदरखानाकडे

राजकारण लाविले होते त्याचे जाब नरसीह भट आचारी व सुभा हरकारा घेऊन आला. जाब घेऊन जावे त्यास दादासाहेब बाहेर निघतात हा लौकिक जालामुळें जाब दिल्हे नाही. आपाजी रामाकडे सांगून पा. त्याणे आपला कागद हैदरखानास लेहून दिला तो कात्रजेस धरिला. नरसीभट व सुभा हरकारा धरून आणिले त्याजपासून जुबान्या लेहून घेतल्या त्याच्या नकला व आपाजी-रामांचे कागदाची नकल करून पा ती पावली, त्याजवरून सविस्तर वर्तमान कळले. सुभा हरकारा व त्याजबराबरची जासूदजोडी पुरंदरावर अटकेत ठेविली, नरसीभट पुण्यात ठेविला आहे म्हणोन लि॥ ते कळले. त्यास सुभा हरकारा जासूदजोडी पुरंदरी ठेविली आहे ती बहुत बंदोबस्तानें ठेवणें. दगा करून गेला तर मुदा नाहीसा होईल. तसाच नरसीभट पुण्यांत ठेविला आहे तोहि बंदोबस्ताने ठेवणे. दुसरा मजकूर आपाजी राम सरकारचे मायेचे पुण्यांत असोन असी कर्मे करितात हे ठीक नाही, यास्तव त्याजवर चौकी चांगली ठेवणें. अमक्या गोष्टीस्तव चौकी ठेविली असे कळू न देणें. तुम्ही चौकसी केली ही गोष्ट बोभाटांत येऊन त्यास कळलीच असेल, परंतु सरकारातून याच गोष्टीसाठी चौकी ठेविली हे मात्र सांगूं नये. आतील माणूस बाहेरील आत येकंदर जाऊं न देणे व कागदपत्र कोणीकडून येईल तो पत्ता लाऊन धरणे व आतून बाहेर जाऊं न देणे. ही गोष्ट तीर्थस्वरूपांस कळलीच असेल. बाहेर निघणार होते ते निघाले नसतील. वाड्यांत असिले तथापि चौकीपाहाऱ्याचा बंदोबस्त त्यास नकळता चांगला करणें. इतक्यात खासा स्वारी लौकरच येत असे. येविसी राजश्री कृष्णराव बलाल यास लिहिले आहे ते व तुम्ही मिळोन बंदोबस्त करणे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. कदाचित तीर्थस्वरूप जलदी करून आम्ही येऊ तो आगोधर निघाले तर जलद आम्हाकडे लिहून पाठवणे. जाणिजे छ ११ मोहरम बहुत काय लिहिणे.

¶*Raghunathrao Dada opened correspondence with Haidar through the former's Vakil Appaji Ram at Poona. Their letters were intercepted by Naro Appaji. Hence the Peshwa Narayanrao ordered him to keep a vigilant eye over his uncle and Appaji Ram till he returned to Poona. This is an official letter to Naro Appaji from the Peshwa.*

No. 237] [*9-2-1774?*

श्री

वद्ये १३ व १४ व अमावस्यां+ या मितीचीं पत्रें लोकाची आलींत यांत मार कीं दशमीस येथील वर्तमान मुख्यास विदित जाले. त्याजवरूण खासगत

\+ माघ वा॥ शके १६९५.

आपले लाकानसी आपले जागा खबरदारी केली आहे. इकडील लोकहि आपलाले जागा खबरदार आहेत. ज्या तलावर होते त्याच तलावर सर्वत्र जेथील तेथेच आहेत. किंचित वक्रता रा॥ वामनराव यांजवर दाखविली होती. हा कालवर जेथील तेथे येथास्थित आहेत. चौ पांचा रोजांत कूच होऊ सकेल, तर कूच करूण इकडे यावें हाहि विचार आहे. हयेदर ना(इ)काकडील यैवजाची मार्गप्रतीक्षा आहे. चौरोजांत यैवज येणार म्हणून वार्ता आहे. या दिवसांत मुख्याची प्रकृतींत भ्रम व हवालदील आहे. घटिकेंत काही, घटिकेत काही, यैसेहि यैकतो.

¶*A report from the Maratha Camp in Karnatak says that Raghunathrao, since getting intelligence of the plot hatched against him in Poona, is taking every means to strengthen his position. The news has so upset him that he is reported to have lost balance of mind.*

Index to Selection No. 37

Karnatak expeditions of Madhavrao I (1761-1772)

(N.B.—Figures denote numbers of letters)

MO-III Bk Ca 13—26

B—*concld.*

C

D

E

G

H—*concld.*

I

J

K

K—*contd.*

L

L—*contd.*

M

M—*contd.*

M—*contd.*

M—*concld.*

N

N—*contd.*

P

R

R—*contd.*

S

S—*contd.*

T

MO-III Bk Ca 13—27

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३८

माधवराव बल्लाळ व निजाम

[किंमत—२ रुपये ८ आणे किंवा ४ शिलिंग ६ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Section No. 38.

MADHAVRAO BALLAL AND THE NIZAM.

(1761–1772)

This selection comprises one hundred and ninety-three documents extending over a period of twelve years from 1760 to 1772 describing the relations of Peshwa Madhavrao I with the Nizam. In making the selection papers of such nature as had already been published by Rajwade and others have been intentionally excluded in order to avoid re-duplication. While these papers do not supply many new historical facts, they corroborate by circumstantial evidence most of the important changes in the relations between the Peshwa and the Nizam which occurred after the battle of Panipat. These relations are marked by three well defined phases. The first phase is distinguished by the alacrity with which the Nizam, realising the humbled condition of the Maratha forces, launched an attack upon Poona towards the end of 1761. The Nizam's forces were, however, repulsed by the Marathas, who showed an unexpectedly united front to the enemy at this dangerous crisis in the Peshwa's fortunes. The following year witnessed a growing estrangement between the young Peshwa and his uncle who conciliated the Nizam by handing over to him all the territory that had been captured by Sadashivrao Bhau on the battle-field of Udgir, a year or two before.

The second phase commences with the alarming combination formed against the Peshwa by the Nizam, Janoji Bhonsle and Gopalrao Patwardhan, who joined forces, invaded, burnt and mercilessly plundered the districts of Nasik and Poona. The Nizam, however, was ultimately routed at the decisive battle of Rakshasbhuvan on 10th August 1763 and severe terms were inflicted upon him at the gates of Aurangabad. The young Peshwa thus became free to start on his brief but brilliant career in which he gradually overcame all his opponents.

The third phase commences towards the end of 1765 when dissensions arose between the Nizam and the Bhonsle Raja of Nagpur which the Peshwa was called upon to settle. It was a critical moment for Maratha politics and the good faith of the Peshwa was put to a crucial test. Nizam Ali had carried to the Peshwa his grievance against Janoji Bhonsle and asked the latter's help in order to have his wrongs rectified. The Peshwa, true to his pledges, at once undertook an expedition and compelled the Bhonsle to satisfy his rival's claims. This purpose having been achieved, Madhavrao and the Nizam had a cordial meeting in Berar in February 1766, thereby creating for the time being a kind of balance of power in Deccan politics. The Nizam's relations with the British at this period deserve to be studied in conjunction with the Marathi papers. It should be remembered that the Peshwa not only continued his friendly attitude towards the Nizam till his death in 1772 but that attitude virtually lasted for over two decades, up to the acrimonious dispute which culminated in the battle of Kharda in 1795.

No. 1] [2-10-1760

छ १ रौवल इहिदे.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विनंति सेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विनंती. ता छ ११ माह सफर मुा भागानगर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. मौजे वरखेड पो चांदूर या गांवाचे सनदेकरितां लिहिलें, त्यास आज्ञेप्रो व लिहिल्याप्रो सनद सिद्ध करविली आहे. मजला श्रीमंतानी हुजूर बोलाविले आहे. त्यास येताना सनद घेऊन येतों. रुकनुदौलाकडे कर्ज येणे आहे त्याविसीं आज्ञापत्र सादर जाहालें. त्यास कर्जाच्या ऐवजाचा जाबसाल करून घेतो. राजकी वर्तमान तरी विशेष नाही. नवाब छावणीस आले. सरदार फौज घरोघर गेले. बादबरसात श्रीमंताचे आज्ञेप्रो वर्तणूक करितील. मा इसमाइलखां बाहादर येथेंच आहेत. त्यांचेंहि पत्र वरखेडाविसीं त्यांचे कमावीसदारास घेतो. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Dhondo Ram writes to Nana promising him to secure a sanad from the Nizam for the village of Varkhed.*

No. 2] [About January 1761

श्री

पुा श्रीमंत माहाराज राजश्री दादा-
साहेब साहेबाचे शेवेसी

विज्ञापना ऐशीजे. कलबुरग्याची किलेदारी आलीनकीखानाकडे सांगितली. त्याजपासून नजर ऐन बतीस हजार व दरबार खर्च आठ यो चालीस हजार रो घेऊन किलेदारी त्याजकडे सांगितली. राजश्री आबाजी नाइकावर दौड पाठवावयाची तजवीज जाली होती. त्यास रा नाईक पेरोजाबादेकडून निघोन लांब कलबुरग्याचे सुमारें आले म्हणौन यास वर्तमान कलले, यांजकरिता यांजकडून मनसुबा राहिला व नाइकासहि दौडेची बातनी लागली की, दौड येणार, म्हणौन तेहि टाळून गेले. हे विज्ञापना.

¶*News about the assignment of the Killedari of Kalburga to Alinakikhan and the flight of Abaji Naik is reported to Raghunathrao.*

No. 3] [5-1-1761?

पो छ २७ जमादिलावल

श्री

पुरवणी श्रीमंताचे सेवेसी.

विज्ञापना छ २७ जमादिलावल प्रहररात्र येवेलेस राजाजीचे घरी मुरादखां व रायणा येकांतीं बसले होते. जाधवराव तर तिकडे आले. राजाजी यकांती हेच तजवीज करीत होते कीं जाधवानें तर बइमानी केली. त्याचे माहालातची जप्ती केली पाहिजे. जप्तीचे परवाने कोणाचे स्वाधीन करावे, काय करावे म्हणोन मुरादखानास पुसत होते. आणखी कारभार तर येकीकडेच राहिले. मोठा मनसबा हाच घाटीत होते. सांगनाऱ्यानी राजाजीस उत्तर दिल्हे कीं सांप्रत जप्ती करणें उचित नाही व तजवीजहि पोख्त नाहीं. येक तर न होयाचे कर्म तें जालें. दुसरें महर्गता या प्रकारें; आपला देश नाहीं, पराये+ देशांत येऊन पडले, तें नं जाणून कोण समय कसा. जर याच वेलेस खामखा जिदे[१] जाधवासी बाधली तर तेथें श्रीमंतास सलाहा देऊन जिदीनें आदिकच विचार लांबवितील. आतां अगोधर तुम्ही आपली तजवीज व मजबुती पोख्त करून ज्याजला हें लोकांस धान्य भक्षायास मिले तो विचार करावा; न जाणू, अस्या वेलेस तुम्ही जप्ती करविली, तिकडून जाधवानें श्रीमंताकडून फौजा भागानगरच्या सुमारें पाठऊन देश खराब करविला तर काये करावे? सध्या जाधवास तेथें जरी आहे तरी आपले ममतेंतच लिखापढीने घ्यावें. इकडील निर्गमता जाली म्हणजे आपले देशास गेलिया उपरांतिक जप्ती केलियानें कोण आडवा येतो? हरयेक गोष्ट काबूनें करावी, याप्रमाणे राजाजीस दर्शविले. त्याजवरून समजून उगेच राहिले. आपाराय प्रभुहि येथेंच आहे. तोहि राजेजीचे घरीं आला होता. त्याजलाहि उमेदवार केले कीं जाधवाचा मुलूक तुम्हांसच देऊं. सरदारी तुम्हीच थाटनें. त्यानें करार केला कीं सर्व प्रकारें माझें चालविल्यानें जाधवाप्रमाणें फौज ठेऊन चाकरी करीन. हे विनंती.

¶*The plans of Rajaji (Vithal Sundar) for the confiscation of the mahals of Jadhao for his treachery are reported to the Peshwa.*

No. 4] [14-3-1761

छ १४ साबान

श्रीदत्तात्रेय

अर्ज विज्ञापना ऐसीजे ताा छ ६ साबान. मुकाम गुंजोटीहून सिरसीस गेलो. शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष: प्रार्थना असीजे. बिरजनाथ निजाम-

+ दुसऱ्याच्या. १ निकड, आग्रह, भांडण.

अलीपासून रुखसत जाला. समागमे स्वार दोन हजार व दोन हजार गारदी आहेत. नवाब सलाबतजंगाकडे जातो असे तोंडे बोलतो; परंतु हळुहळु भालकी चिटकोपे वगैरे माहाल मोगलाई लोकाचे येथे घासदाणे कोठे यकुनीस हजार कोठे च्यार पांच्या घेत घेत प्रा निलगे येथे आला आहे. सिरसी तालुके सरकार येथेहि घासदाणाविसी चिटी राऊत पाठविले. सारांष सरकारच्या तालुकियातहि घासदाणा खंडणी घेणार म्हणऊन राजश्री धोंडो आकदेव तालुकेदार प्रा गुंजोटी व आलंद याणी फिदवीस सांगितले, कीं तुम्ही बिरजनाथास समजाऊन सांगून पाहणे. त्याजवरून फिदवी सिरसीस गेला. उदईक बिरजनाथास उतम रीतीणे ग्रहस्तपणे तोंडात साकर घालितो की असी कोते अंदेशी न करी. स्वामीची आज्ञापत्रे सादर जाली की जलद हुजूर येणे. मार्गी बिरजनाथ सरकारच्या तालुकियात हंगामा करणार यास्तव दोन दिवस अदिक लागले तरी लागोत, परंतु सलुख राखून त्याजला सरकारच्या तालुकियात उपद्रव न दे ऐसे करूण चवथे पाचवे दिवसी सेवेसी येतो. जर बिरजनाथ ग्रहस्तपणे न ऐके तरी हुजूर विनंती लिहिणे ते लेहूण फौज पाठऊन पारपत्य उतम करावे लागेल. शेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*The plans and movements of Nizam Ali's agent Brijanath are reported to the Peshwa probably by Dhondo Ram.*

No. 5] *[6-4-1761 ?*

श्रीवेंकटेश प्रसन्न

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी समर्थांच्या
पादांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञाप्त ऐसीजे. निजामआल्ली-खानांशीं करार हैदराबादेची सुभेदारीचा नेमस्त जाला होता. त्यास सोमवारीं छ २९ माहे (सा)बानी, वस्त्रें देऊन, रुखसत करितात. निजामआल्लीखान रोजियासी पिराचे दर्शनास जातात. छ ६ रमजानी, नवाब सलाबतजंग वगैरे लस्कराचें कूच नेमस्त आहे. निजामआल्लीखानांनीं धारूरचे घाटें भागानगरास जावें. थोरले नवाब वगैरे लष्कर वराडामधून निर्मळकडून भागानगरास जाणार, पुढे जें होईल तें सेवेसी शृत केले जाईल. राजश्री कृष्णरावजीचे पत्रावरून कळों येईल. हें विज्ञप्त. रविवारचे रात्रीं च्यार घटका प्रथमी रवाना केलें असे. हें विज्ञाप्त.

¶*Krishnarao Govind reports to the Peshwa the plans and the movements of the Nizam and his brothers and says that the Subhedari of Haidarabad is assigned to Nizam Ali.*

6499

No. 6] [May 1761 :

श्री

पोट भरावे त्यास दरम्यान लाला बृजनाथ याची मसलत पडली. चैत्र मास समग्र त्यांचे पारपत्यास लागला. खर्चास कांहीं नाहीं, तेव्हां सरकारचा ऐवज अक्कलकोटास होता, त्यापैकीं पन्नास हजार रुपये उसने दाखल घेऊन काम चालविले. प्रस्तुत सुरापूर प्रांती आलो. तो मुल्क अगदी उजाड होऊन गेला आहे. नवाब सलाबतजंग व बसालतजंग या प्राते सगरावर दोन अडीच महिने मुक्काम करून राहिले होते. त्याउपर श्रीमंत राजश्री दादासाहेबहि याच मार्गे पंचमहालातून विज्यापुराकडे गेले, त्यामुळें मुल्क चोलवटोन बहुत खराब जाला. प्रस्तुत आम्ही या तालुकियांत येऊन पंधरा वीस दिवस जाले. वस्ती कोठे राहिली नाहीं. सुरापुराजवळोन सहा कोसावर उतरलो आहो. संस्थानात जीव काडीमात्र राहिला नाहीं. वकील येऊन भेटले. खंडणी मात्र त्याचे माथा मारिली. रुपया नक्त अगर निशापाती कांहींच होत नाहीं. त्याचेच वाइदे रोखे घेऊन, वसुलास कारकून ठेवावा; वरकड येत्न होत नाहीं. दोन चार रोजा येथील गुंता उरकोन भीमातीरास येतो. नवाब सलाबदजंग व निजामअल्लीखान मुलकाचे सरदेस कलबुर्गियावर आहेत. त्यांची बातमी राखोन ते कोण्हीकडे गेले म्हणजे आम्ही फौजेस निरोप देऊन सेवेसी येतो. सेवकानीं स्वामीचा निरोप घेऊन आलीयातागाईत पत्र आले नव्हते, इतकेच पत्र आले. तरी कृपालु होऊन सविस्तर वर्तमान लेहून पत्र पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. निजामआल्ली याणी कलबुर्ग आपले हस्तगत केले. बसालतजंग यांजकडे सांडणी पाठविली कीं लौकर भेटीस येणे. त्याचा मार्ग पाहत आहेत. छावणीस शहरास जावे, आगर धारूरावर जावे यैसे आहे, म्हणून वकिलाची लिहिली आली होती. स्वामीस वरचेवर वकिलाचे लिहिले येत असेल, त्यावरून मोगलाकडील वर्तमान सेवेसी कलत आसेल. जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले असे. दो ती रोजांत येथून कूच करून भीमातीरास जाऊन, फौजेस निरोप देऊन देशास येतो. रुपया मुलकांत मेलवावा तो हंगाम गेला, याजमुले कर्ज जाहाले. खानगीस व रोजमन्यास कर्ज करून फौजेस निरोप दिल्हा. श्रीमंत दादासाहेबास अर्ज पूर्वीच केला होता. हंगाम रुपये मेलवावयाचा नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A mutilated news-letter describing the movements of Raghunathrao, Salabat Jang and Nizam Ali. The writer complains that he could not collect enough funds for his expenses.*

6500

No. 7] [11-6-1761

पौ छ १७ जिलकाद
सन इसने.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा-
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ माहे जिलकाद मुकाम नजीक कसबे तांडूर निजामआलीखानाचे सैन्यात स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ १९ शवालचीं आज्ञापत्रें जासुदांसमागमें पाठविलीं ती छ ४ जिलकादी आडकीचे मुकामीं पावोन सिरसा वंदिली. सविस्तर आज्ञा कलली. इकडील वर्तमान तरी, सलाबतजंग व निजामआलीखान यांच्या भेटी कलबुरग्यावर जाल्याचे व निजामआलीखानास कुल येख्तियारीची वस्त्रें दिल्याचे व कलबुरग्याहून कूच जाल्याचें वर्तमान वरचेवर सेवेसी लिहीत गेलो तीं विनंतीपत्रें पावोन सविस्तरार्थ ध्यानास आला असेल. हे कलबुरग्याहून निघोन कोयेलकोंड्याकडे जावयाचे उद्येशे निघाले, ते सेडंबाजवल कोसाचे आंतराने येऊन दोनतीन मुकाम केले. सेडंबाचे ठाणें आपले सरकारांत आहे. त्यास, दोन दिवस कहीचा हंगामा सेडंबावर जाला होता. परंतु राजश्री नागो राम याजकडून राजश्री मलार जगंनाथ येथें आले होते त्याणी व मी राजे विठलदास यांसी सांगून, आमच्या उभयेतांच्या सांगितल्याप्रो राजाजींनी रखवाली करविली. वरकड चितापूर परगण्याचे वगैरे गांवचा चारा, लांकडे गेली. कांही उपद्रवहि लागला. गिरमाजी खंडेराऊ व भगवंतराव; तांडूरचा अमील, ऐसे पुढे आडकीकडे पाठविले होते त्याणी आडकी लुटली. मागून नवाबहि कूच करून आडकीस गेले. दोन तीन मुकाम आडकीवर जाले. आडकीचा जमीदार आनंतरू पलोन गेला. पुढे पंचमाहाल व कोयेलकोंड्या प्रांते जावें ऐसा मार होता, तो राहिला आणि छ ४ रोजी आडकीहून कूच पांच कोसाचे माघारे केले. तांडूर उजवे टाकून बेदरचे शुमारे जावें ऐसा निश्चय जाला आहे. वरकड वर्तमान आलाहिदा पुरवण्यांत लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होयें हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram communicates to Dadasaheb the movements of the Nizam, his brothers and his Sardars.*

6501

No. 8] [21-6-1761

छ १७ जिलकाद
सन इसनै

श्री

पुरवणी श्रीमंत माहाराज राजश्री
दादासाहेब साहेबांचे शेवेसी

विज्ञापना ऐशीजे. राजश्री आबाजी नाईक या प्रांती फौजसुधां आहेत. प्रस्तुत पेरोजाबाद त्याणी जाधवरायाचा गाव पेठेचा मातबर मारिला म्हणौन. जाधवरायाजवळ बातमी आली, त्यावरून जाधवराव निजाम अलीखानाजवळ जाऊन हे गोष्टीकरिता फार श्रमी जाले. त्याजवरून त्याणी राजश्री आबाजी नाईक यासी पत्र लिहिलें आहे, कीं तुम्ही आम्हाकडील लोकाचे गाव मारितां, उपसर्ग देता, ऐशास हे आज्ञा तुम्हास श्रीमंताची आहे कीं काये, आज्ञाच आली असेल तर तसा जाबसाल लिहिणे, नाही तर तुम्हासच ह्या गोष्टी करणे, तर फार दूरवर विचारून करणे, म्हणौन पत्रे लिहून शुतरस्वार मुजरद त्याजकडे पाठविला आहे. या प्रकारे पत्रे लिहिली आहेत म्हणौन वार्ता आहे. राजश्री जाधवरायानी रा। धोंडोराम यास बोलाऊन नेले होते. म्हणो लागले की राजश्री आबाजी नाइकानी आमचा गाव परोजाबाद मारला. ऐशास त्याणे केले ते उतम केले. याची समरा+ आम्ही घेऊ तेव्हा श्रीमंतास विशाद येईल. याकरिता तुम्ही काही त्यास लिहावयाचे असेल ते लिहा. नाहीं तर आपण समरा घ्यावयास चुकणार नाही म्हणौन बोलिले. पेरोजाबाद पेठेचा गाव मारिला हे तहकीक तो आले नाहीं. जाधवरायाणी कोण्या भरावर काये विस्तार करून सांगितला हे न कले. त्याजवरून तजवीज ठहरली होती कीं नाइकावर दोडे तोफा व सरकारची फौज रामचंद्र जाधवराया-समागमे देऊन पाठवावे हा मनसुबा जाला होता; परंतु मागती महकुफ जाला. महमद कबीरखा याजला बातशाई बक्षीगिरी होती. ते निजाम आलीखानासमागमे होतेच. साप्रत त्यास इस्तकलालिची वस्त्रे जाली; व समसुदी मा। खा मा। कबीरखानाचा भाऊ याजला सायेरची बक्षीगिरी जाली. कादरखा गाडदी याचे गाडदी काही गेले होते, त्याचे ऐवजी साठ गाडदी नवे हादरखानाचे रिसालियात ठेवविले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Raghunathrao is informed of the plunder by Abaji Naik of Ferojabad belonging to Ramchandra Jadhav. Jadhav was consequenlty provoked and complanied about it to Nizam Ali and with his support threatened Abaji Naik with a strong counter-attack if he did not retrace his steps.*

+ समरा = बदला, वचपा.

No. 9] [21-6-1761

पौ छ १७ जिलकाद

श्री

पुा श्रीमंत मा। राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ऐशीजे

गिरमाजी खंडेरायास दोन महिन्याचा निरोप देणार. मागती म्हणतात की निरोप दिल्हा तरी मागती येणार नाहीत, याजकरितां निरोप न द्यावा. त्यास त्याजपासी मराठे आहेत. छावणीस राहातात यैसे नाही. १

तांडूर वगैरे या प्रांती जमिदाराचे प्राबल्य, ते अमिलास वगैरे सुभे बघत नाहीत. याजकरितां सिवाजी केशवास तांडुरात फौजसुधा ठेवणार व तांडूर सिवजीपंताकडे जागीरहि देणार आहेत. सनदा सिध्ध होतात १

दादजी पवारहि छावणीस जावयासी निरोप-मागतो. यांचे मनांत त्यास निरोप द्यावयाचा नाहीं. यांचे मते कीं, गिरमाजीपंत व सिवाजीपंत व दादजी पवार यासी बेदरचे आसपास येक येक जागा राहावयासी द्यावी. तेथें त्याणी छावणी कराव्या, परंतु मराठे लोक कसे राहातील पाहावें. १

करनूल कडपे व सावनूर येथील पठाणाचे वकील येथें आहेत. त्यास त्यांजला यांची पत्रे वरचेवर जातात की सत्वर येणे. त्याणी आपले मतलब लिहून पाठविले होते, की आम्हापासून या मागे आंतरे पडली व आम्ही चाकरीस आलो नाहीं. ते अवघे मागील आन्याये क्षमा करून पुढें आम्हास जागिरा व मनसबा द्याव्या. सर्फराज करावे. आम्ही येऊन पोहचतों. त्याजवरून याणी मतलब दसखत करून पाठविले की तुमचें मागील आन्याये क्षमा केले व पुंढे तुम्ही जलद येऊन पोहचावें म्हणजे जागिरा मनसबा देऊन सर्फराज केले जाईल. याप्रो त्यांच्या मतलबाच्या यादी पाठविल्या व त्यास इनायेतनामे पाठविले की जलद येऊन पोहचणे. मग ते आतांच येतात कीं बादबरस(त) येतात पाहावे. बहुधा बादबरसात येतील १

¶*Items of news forwarded to Dadasaheb apparently from the camp of the Nizam, who is reported to have started mobilizing his troops.*

No. 10]. [21-6-1761

पौ छ १७ जिकाद

श्री

पुा श्रीमंत माा राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी :

विज्ञापना ऐशीजे. मुरारराव घोरपडे यांच्याहि आर्ज्या वरचेवर येतात. यांचे इनायेतनामे त्यास जातात कीं तुम्हीं खातरजमेन राहाणे व जमावसुधा येणे. तुम्हास जागीर वगैरे देऊन सर्फराज केले जाईल. १

आणीकहि लहाणमोठ्या सरदारांची व संस्थानिकांची पत्रें यासी येतात, त्यांस हे समाधानेकरूनच जाब लिहितात व लाऊन ठेवितात. कोणा येकास साफ उतर देत नाहीत. १

इंगरेजासहि पत्रे सत्वर यावयाविसीं जातात; व त्यांजला बावन हजार होनाची जागीर करार करून दिवानी मोहरेने सनद करून पाठविली. दोन हजार इंगरेज व दाहा हजार गाडदी यावे हा त्यांचा त्याचा करार आहे. त्यास इंगरेजानी छावणींत येऊन पोहचावे ऐसे लिहिण्यात व बोलण्यात आहे. मग पाहावे किती इंगरेज व किती गाडदी येतात. त्याप्रमाो पुढे त्यास जागीर व नख्त काये देणार, त्याचा ठराव होईल. १

हणमंतराव निंबालकर खरडयाहून कूच करून डेरेदाखल जाले होते. शाहाजी सुपेकर श्रीमंत पंतप्रधान स्वामीकडून हणमंतरायाकडे आले. त्याणे हणमंतरायास काये सांगितले न यांचा मनोदय बेदरावर छावणी करावी. त्यास बेदरावर छावणी केली तरी तेथे चारा व लांकडे नाहीत. यास्तव धारूराजवळहि छावणीचा जागा पाहायास सांगितली आहे. तेथे डोंगर जवळ आहेत. चारा लांकडे आहेत. म्हणोन धारुराजवळ छावणी करावी हेहि चर्चा आहे. १

श्रीमंत पंत प्रधान स्वामीच्या लस्करातून व स्वामीचे दरबारीहून यांसी वर्तमाने येतात कीं बादबरसाद श्रीमंत बिघाड करितात व याचे चितांत हाहि संशय आहे कीं आम्ही हिंदुस्थानात श्रीमंत दादासाहेबांसमागमे गेलो नाही, त्याजवरून त्याचे मनात वैश्यम आले असेल. याजकरितां बादबरसात श्रीमंत बिघाड करितील खरें. तिसरे स्वामीनी राजश्री लाला नंदरामजीस सलाबतजंग व बसालतजंग यांजकडे पाठविले होते. त्यास ते कितेक राजकारणी माार सलाबतजंगासीं बोलले होते; कितेका गोष्टीचा करार करून गेले तो माार सलाबतजंगाचे कारभारियाकडून यांसी कलला. त्याजवरूनहि यांचे चितांत कितेक संकल्प विकल्प आले. त्याजवरून हे आपले सावधतेस आतांपासोन लागले आहेत. बेदरावर

कले, त्याजवरून हणमंतराव याजकडे न आले. यास्तव राजाजी विस्मय करीत होते की श्रीमंताचा आमचा स्नेह असतां श्रीमंतानी हणमंतरायास लिहिलें कीं न जाणे. त्याजवरून हणमंतराव न आले. १

छावणी करावयाचें प्रयोजन हेंच कीं येखादा बखेडा जाला तरी तमाम. मराठे वगैरे फौजा ऐकत्र व्हाव्या. थोर मराठे लौकर येत नाहीत. त्यांस एखादा बाहाना करावयासी जागा होती ती न व्हावी. १

¶*News is reported to Dadasaheb about the negotiations started by the Nizam with his neighbours like Murarrao Ghorpade, the English, Hanmantrao Nimbalkar and others in view of probable hostilities with the Peshwa.*

No. 11] [*21-6-1761*

छ १७ जिलकाद सन
इसने सितैन

श्री

पुा श्रीमंत माहा(रा)ज राजश्री दादा
साहेब साहेबांचे सेवेशी

विज्ञाप्ति ऐशीजे हिदायद मोहिदीखा यांची मातोश्री किले फरकनगरी आसती त्यास तिजवल काही द्रव्य व जवाहीर आहे, त्याचे जप्तीस मीर मुसाखा छ ६ मिनहूस लस्करातून रवाना जाले. त्यास हाहि प्रकार बोलिले आहेत की तुम्ही पुढें जावे, जप्ती करावी; आपणहि येतो म्हणोन वार्ता आहे. फरकनगराकडून माघारे बिदराकडे छावणीस यावे हेहि बोलवा आहे. सेवेसी वृत (श्रुत) होये हे विज्ञप्ति.

¶*The letter reports that Mir Musa Khan has been asked to confiscate the property of the mother of Hidayat Mohiddin Khan (Muzaffarjang).*

No. 12] [*28-6-1761*

छ ९ जिलकाद इसने

श्री

सेवेसीं विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २२ सवालपर्यंत मुकाम कसबे गोगी परगणे सगर नजीक सुरापू(र) येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून छ ३० रमजानचें पत्र सेवकास पाठविलें तें छ १४ सवालीं पावलें. लालाब्रजनाथ याचें पारपत्य करावें म्हणोन आज्ञा. ऐसियास सेवकाकडील वर्तमान तरी स्वामीचा

निरोप घेऊन निघालों ते बेदरानजीक श्रीमंत राजश्री दादासाहेबाजवळ आलों; समागमेंच होतों. पंचमहालचा बंदोबस्त करून विज्यापुरावर गेलियानंतर फाल्गुण अखेर आम्हांसमागमें दोन तीन हजार फौज व बारासें गाडदी व दोन तोफा देऊन खर्चास कांहीं न देतां दोन महिने फिरोन यावें म्हणोन आज्ञा करून रवाना केलें. अबदलपूरचे सुमारें दरमजल सुरापूरचे तालुकियांत भीमा दक्षणतीरास आलों. फौजेचा शह पडोन सुरापूरवालियानें वकील चुकोतीबद्दल पाठवावा तों लालाब्रजनाथ दोन हजार फौज व दोन हजार गाडदी सरकार जाहागिरीचे तालुकियांत सिरोन अलंद गुंजोटी व नलदुर्ग व अकलकोट येथील खंडण्या करून तमाम मुलकांत रोखे केले. अकलकोट परगणियाचे बोरगांव मारून ताराज केलें. आठनवसें माणूस जळोन मेलें. परगणे मजकूरचे जमीदार सर देशमुख व देशमुख तेथें होते ते धरून नेले; व नरसो रायाजी त्यांचे मदतीस कांहीं स्वार घेऊन गेला होता तो जळोन मेला. त्याचीं घोडीं काढोन नेलीं. आकलकोटावर येणार हें वर्तमान आकलकोटचे कमाविसदारानीं वगैरे सरकारचे कमाविसदारानीं लिहिलें, त्याजवरून सड्या फौजा त्याजवर रवाना करून मागाहून गाडदी व तोफा घेऊन दरमजल चाललों, हें वर्तमान ब्रजनाथास कळतांच मजल दरमजल धारासिवास गेला. कृष्णराव निंबाळकर धारासिवकर त्यास सामील जाला, व राजश्री मकरंदसिंग नाईक निंबाळकर हेहि जाऊन सामील जाले. दोन अडीच हजार फौज व गाडदी प्यादे मिळोन तीन च्यार हजार नेली[1] त्याजवळ जमा जाली. धारासिवचा आसरा करोन राहिला, तों आम्हीं जाऊन पोहोचलों. धारासिवाजवळ घाटाखालें उतरलों. त्याचें आमचें नित्य युध्य लागलें, इतकियांत श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे मुलकांतून ब्रजनाथ याचा बोभाट गेला. त्याजवरून राजश्री रामचंद्र गणेश यासमागमें पांच हजार फौज देऊन रवाना केलें. तेहि येऊन पोहोंचले. आम्हीं घाटाखालें उतरलों होतों, त्यांस घाटावर उतरले. लालाब्रजनाथ याणी बुनगे गावांत घालून सडे गांवाचे आसरियाने होते, त्यास हला करून मोडून गांवात घातले. दोन तोफा व तीन नोबती उंटासुधां पाडाव केल्या. कृष्णराव निंबाळकर यास भाला लागोन मृत्य पावला. गावास मोर्चे लाऊन तोफांचा मार केला, तेव्हां ब्रजनाथ जेर होऊन सलुकास आला. द्रव्याचा प्रकार पाहातां केवळच शुस्क विचार, याजकरितां रामचंद्रपंत यांचे विचारें सरकार तालुकियांत घेतला. रुपया फिरोन घ्यावा ऐसा करार करून वोलों[2] घेतल्या, व नरसो रायाजी याचीं घोडीं बोरगांवाहून नेलीं होतीं ती पनास साठ घेतलीं, व दोन हती घेऊन सलुख केला. राजश्री रामचंद्र गणेश यांसहि

---

१ बंदूक. २ ओलीस ठेवून घेतले.

खर्चाची ओढ याजकरितां फौजेस निरोप देऊन दरमजल पुणियास गेले. आम्हीहि फौजेस निरोप द्यावा, मुलुकगिरीचे दिवस कांहीं राहिले नाहीं; परंतु निजाम अलीखान उदगिरीवर होते, व नवाब सलाबतजंग व बसालतजंग कृष्णातीरास आलियाचें वर्तमान आलें. मुलकांत फौज असावी याजकरितां फौजेस निरोप दिल्हा नाहीं. निजाम अलीखान भागानगराकडे गेले. आम्ही सुरापूरचे तालुकियांत आलो, तों सलाबतजंग बसालतजंगासी बिघडोन यातगिरीवर आले. त्याजकडे श्रीमंत राजश्री दादासाहेबीं वकील पाठऊन राजकारण केलें होतें, त्याविसीं बलवंतराव बाबूराव यांचीं पत्रें आम्हांस आलीं. आम्हीहि लेहून पाठविलें कीं भीमातीरानें त्याणी यावें म्हणजे आम्हीं जवलच आहों; येऊन नवाबास श्रीमंताकडे घेऊन जातों. त्यास ते कलबुर्गीयास गेले, तों निजामअलीखान भागानगराहून मजल दरमजल कलबुर्गीयास येऊन दाखल जाले. उभयेतांच्या भेटी जाल्या. पुढें काये मनसुभा करून कोण्हीकडे जातील नकले. श्रीमंत राजश्री दादास्वामी याणी आम्हासमागमें फौज गाडदी व तोफा देऊन रवाना केलें. खर्चास कांहीं दिल्हें नाहीं. दोन महिने मुलुकगिरी करून (अपूर्ण)

¶*This is a report of a battle between Lala Brijanath and the writer—a servant of the Peshwa, in which the latter received help from Raghunathrao and succeeded in driving Lala Brijanath from Dharashiva.*

No. 13] [*After June 1761*

श्री

पुा श्रीमंत मा राजश्री दादासाहेब स्वामीचे
शेवेसी विज्ञापना

स्वामीनी आज्ञापत्रीं लिहिले कीं कचे पके वर्तमान श्रीमंत पंत प्रधान स्वामीकडे लिहीत जाणें. त्यास आज्ञाप्रमाणे श्रीमंताकडे वरचेवर वर्तमान लिहीत असतों. १

मजला घरींहून निघोन अवघ्र च्यार वर्षे जालीं. मातुश्रीचा वृधापकाल; च्यार वर्षे कुलस्वामीचे व मातुश्रीचे

माझी खर्चाची फार आडचण आहे याजकरितां राजश्री कृष्णराव बलाल यासीं खर्चाविसीं तपसीलवार लिहिलें आहे, ते सेवेसी विनंती करितील. त्याप्रो खर्चाची बेगमी करून पाठविणार माहाराज धणी समर्थ आहेत. १

च्यालीसगाव परगण्याची माहाराजानी कृपा करून राजे विठलदास

6507

दर्शन नाही. देवदर्शनास व मातुश्रीचे दर्शनास आगत्यरूप गेले पाहिजे, याजकरितां विनंती लिहिली जाते कीं प्रस्तुत नवाबहि छावणीस राहातील. मजला माहाराजानी आज्ञा करावी म्हणजे मी शेवेसी येईन. माहाराजाचे पायांचे दर्शन घेईन. आपली स्वारी खर्चाची व घरच्या खर्चाची व स्वामीनी कृपालु होऊन गांव दिल्हे आहेत त्यांची बंदोबस्ती करून घेईन, व देवदर्शन व मातुश्रीचें दर्शन घेऊन, पुढे जे शेवा माहाराज सांगतील ते करीन. १

आली गव्हार शाहाजादा बंगालियांत होता त्याची पत्रे यांसी दोन फर्मान आले आहेत. त्यास आज छ ७ रोजी मुकाम जाला आहे. फर्मानबाडी करून ती पत्रे घेणार. यांचेथे तरी वर्तमान आले आहे कीं आली गव्हर याजपासी तीस चालीस हजार फौज व इंगरेज व गाडदी आहेत. तो दिलीस येतो. सुज्याउदौला नजीबखानहि त्यास सामोरे जाणार ऐसे याचेथे वर्तमान आहे. साहुकारियांत वर्तमान कीं आली गव्हर वाराणसीस गेला. १

यांजला सोडचि(ठी) दिल्ही. खरीफाचा माल आपले सरकारात घ्यावा व रबीचा वसूल यांजकडे द्यावा, ऐसा करार जाला होता. त्यास खरीप रबीचा वसूल झाडून सरकारांतच कमाविसदारानी नेला. त्याजवरून राजे विठलदास म्हणत होते कीं करार जाला असतां कमाविसदारानी झाडून वसूल न्यावा हे काये? त्यास कमाविसदारांस ताकीद होऊन रबीचा यैवज आम्हाकडे देत तें करावे, म्हणोन राजे मारानी सांगितले त्याजवरून विनंती लिहिली असे. १

गिरमाजी खंडेरायास दाहा लक्षाची जागीर पूर्वीच दिल्ही आहे व सिवाजी केशव यांसी उडणगाव वगैरे व तांडूर वगैरे मिळोन दाहा लक्षांची जागीर दिल्ही आहे. सिवाजीपंत तांडुरात राहणार. वरकड पाहावे, कोण कोण राहातात कोण कोण जातात. १

¶*This news-writer reports to Raghunathrao that Ali Gohar with his army of 40,000 men is advancing on Delhi and Shuja-ud-daula and Najeebkhan are preparing to welcome him. The writer also requests Dadasaheb to make arrangements to enable him to meet his expenditure and to settle the affairs of Raja Vithaldas and Girmaji Khanderao.*

6508

No. 14] *[18-7-1761*

पौ छ २० जिल्हेज
सुा इसने सितैन.

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब साहेबाचें

सेवेसीं

आज्ञाधारक भिकाजी नाईक वाकडे अर्ज छ १५ जिल्हेज मुा करमले विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान तरी राा माहाराव जसवंत याचा पुत्र अनंदराव जयेवंत निंबालकर हजार श्वारानसी तांब्राकडे बेदरास जाणार आहेत. पूर्वी जगदेव पाचसातसे श्वारानसी गेले आहेत. राा वेंकटराव निंबालकर दोहो चौ रोजानी जाणार आहेत. करमलियासी ब्रिडाहून जासूद कारकून आले आहेत. हे निघाले म्हणजे तेहि निघतील. प्रस्तुत धारूरास मोगलआली येणार. मागाहून मासपक्षाने खासा येणार म्हणौन वदंता आहे. सरकारचे जागिरीची ठाणी आलंदगुंजोटी राा जाधवराव याणी घेतली. धोंडो आकदेव नलदुर्गास आले आहेत. चितापूर पंचमाहाल (व)गैर सर्व ठाणी घ्यावी या उदेशे फौजा रवाना करणार आहेत. नांदेड वगैर गंगातीर प्रांती सिवाजी केशव जितीकर व गिरमाजी खंडेराव व काही मोगली फौज यैसे दाहा हजारपावेतो रवाना केल्या म्हणोन वर्तमान आहे. मोगलाने बेदरापासून डाकचौकी पुणियापावेतो बसवणे म्हणोन आज्ञा केली. प्रस्तुत डाक करमालियापावेतो आली आहे. पुढे जाईल. राा माहाराव जसवंत याणी मागे पेडगांवीहून तोफ आणिली होती, ते किले परांडे येथे नेऊन किल्यावर चढवावी या उदेशे छ १२ जिल्हेजी करमलियाहून रवाना केली. माहाराव याचा कनिष्ठ पुत्र व गोविंद खिजमतराव यैसे साहेबाकडे रवाना करावे हा सिधांत जाला. उभयेता निंबालकरास मोगलाकडील पत्रे आली होती, की गलिमाकडील ठाणी सर्व तुम्ही आपल्या तालुकियातील वगैर सर्व जप्त करणे. प्रस्तुत जानोजी निंबालकर याणी हजार स्वार इजाफे[१](त) व दोन हजार प्यादे ठेवावे हा उद्योग केला आहे. मोगलाकडील बातमी येथे आली ते ऐकोन सेवेसी विनंती लिहिली आहे. राा माहाराव निंबालकर परांड्यास जाणार म्हणोन बोली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Bhikaji Naik Wakde, from Karmala, writes to Raghunathrao regarding the aggressive activities of the Nizam.

---

१ जास्त, अधिक.

6509

No. 15] [19-7-1761

श्री

सेवेसी विज्ञापना छ १६ ज़िल्हेजी रविवारी नवाबाचा मुकाम कलबुरगे याची वाडी पानेगावांवर जाला. आज सोमवार छ १७ मिनहून कूच होऊन मुकाम भिवरेवर सरडेकी गावावर मुकामास रा। जाले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News is reported that the Nizam moves his camp to Sardeki on the Bhima.*

No. 16] [21-7-1761

पो। छ १७ जिलकाद
सन इसने.

श्री

पु। श्रीमंत मा। राजश्री दादा-
साहेब स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐशीजे.

मा। कबीरखां पातशाही बक्षी हे पहिले सलाबतजंगाचे जवळून निजाम आलीखानाकडे जलगंदलास गेले होते. त्याजवरून पातशाही बक्षी-गिरी सलाबतजंगानी दुसरियासी सांगितली होती. प्रस्तुत सलाबत-जंगाची निजाम आलीखानाची भेट जाल्यावर पातशाही बक्षीगिरीची वस्त्रे मा। कबीरखानास दिल्ही. १.

मा। कबीरखानाचा भाऊ मीर शमशु-दीखां याजला नवाब सलाबतजंगाचे सरकारचे सायरची बक्षीगिरीची वस्त्रें जालीं. १

खंडागल्यास कोंडलवाडी व बेमगल व कांसारवाली ऐसी मिलोन दोन लक्षांची जागीर दिल्ही. नवाबाचे राजाजीचेथे खंडागला गेला होता. त्यांची त्याची परस्परें शफत जाली. बाजीराव घोरफडे यांजपासीं आले होते. त्यास त्याजपासीं दोनच्यारसे लोक चांगले होते. याणी याजला जागीर देतो म्हणून नादी लाऊन ठेविले होते. धारूर परगण्यांत आंठरा गांव होते ते गुदस्तां आपले सरकारात जप्तीत आले होते ते प्रस्तुत मुरादखां वगैरे फौजा धारूर प्रांते गेल्या होत्या त्या समई ते गांवचीं आमचे सरकारची ठाणी उठऊन बाजीराव घोरफड्याचा अमल बसऊन दिल्हा. प्रस्तुत राजश्री आबाजी नाईक याजकडून फौज जाऊन ते गांव मागती घेतले. बाजीराव घोरफड्याची ठाणी उठविली, माणसें मारिली. त्याजवरून व येथें भक्षावयासी न मिले याजवरून बाजीराव घोरपडे उठोन कलबुरग्याजवलचे मुकामीहून

खंडागला लग्ननिमित्य निरोप मागत होता त्याजवरून त्यास म्हणाले कीं, निरोप देतो. परंतु तुम्ही पडदुरास न जावें. कोंडलवाडीस छावणी करावी. त्यास याचे कारण हेंच कीं यांचे मतें खंडागला पडदुरास गेला म्हणजे लौकर येणार नाही. कोंडलवाडीस आसिलिया सत्वर येईल. त्यास खंडागला म्हणू लागला की, पडदुरास गेल्याखेरीज माझा बंदोबस्त होत नाहीं. ऐसी भवति न भवति होत आहे. त्यास खंडागल्यास म्हणो लागले की, प्रस्तुत च्यार रोज निरोप देत नाहीं, पुढे देऊ. त्याजवरून तो आपले जागां आजुर्दा आहे. १

रुसून जाऊन कलबुरग्यांत राहिले आहेत. त्यांजकडे याणी शुतरस्वार पाठविला आहे कीं, मागतीं येणें. त्यास तो आला तरी नाहीं. मागती त्याची रदबली लागली आहे. मग येतो न येतो पाहावें १.

सदासिवपंत निंबालकराकडील तीनच्यारसें स्वारानसी होते. त्यास, त्याजकडील लोक छावणीस राहात नाहीत. निमित्य त्याचे लोकानी निरोप घेतला. देण्याघेण्यामुळे कट-कट जाली. सदासिवपंतास दोन दिवस आडविले होते. येकून त्याचेहि लोक राहात नाहींत. निरोप घेऊन जातात. सदासिवपंतानी लोक भारी बोल्या करून आणिले होते. येथें पंचवीस रुो सरासरी होती, त्यांतहि तेरखांचे कजिये पडिले, याजमुळें सदासिवपंतावर पेंच पडिला. १.

¶News from the Nizam's camp reported to Dadasaheb refers to the appointment of Muhammad Kabirkhan as the Bakshi and to the grants of Jagir to Khandagale and Baji Ghorpade by the Nizam. This Baji Ghorpade appears to be a son of Maloji Ghorpade of Mudhol.

No. 17] *[28-7-1761*

छ २४ जिल्काद इसन्ने

श्री

पुा तांडूरचे मुकामी नवाब सलाबतजंगाने पातशाहचा फरमान घेतला तेव्हा तमाम सरदारांचा नजरा घेतला. राव खंडागले यानी येक मोहोर व पाच रुपये नजर केले. परंतु निज्याम अलीखान जवल ऐसियामुळें बोलण जाले नाही. ते दिवसी मात्र नवाब सलाबतजंगाच दरसन रायास जाल. दुसर नवाब सलाबत-जंगाचे चितामधे भागानगरास छावनी करायाची होती, परंतु निज्याम अलीखाना-पुढे काही चालणा. निज्यामअलीखानाने बेदरची छावनी केली. याचा

चितामधे लबाडी करायाची आहे. बदमामलीचे रंग दिसत आहेत. सरदारापैकी निरोप देत नाही. ऐसाईकरिता निरोप दिल्हा तर इमान प्रमान करून निरोप द्यावा. ऐसी बलकटी मांडली आहे. राव खंडागले यास निरोप कोडलवाडीस देत आहेत. पडतूरचा निरोप देत नाही. निज्याम अलीखान तर बेदरचा किला मधे आहे. नवाब सलाबतजंग बाहेर आहे. येक पाहर नवाब किलात गेला होता, मग बाहीर आला. निज्याम अलीखानाने पाच मोहरा नवाबास नजर केला. पाच रुपये किलेदारान नजर केले.

श्रीमंत विस्वासराव यास लडाईमधे देवआज्ञा जाल्हली म्हणऊन मुरादखानाचा भावास स्वामीजीकडे वस्तर देऊन पाठवीत आहेत. करनूलकर व कडपेकर व व शाहनूरकर वगैरे पालेगीर व फिरंगीयास तमाम कागद निज्याम अलीखानाने पाठविले आहे. या प्रमाने हकीकत ऐसे. सेवेसी श्रुत होये सेवेसी विज्ञापणा.

¶*News-letter from the Nizam's camp, communicates the severe friction that was rising between Nizam Salabatjang and his brother Nizam Ali.*

No. 18] *[2-8-1761*

श्री

तुम्हाकडे तीस हजार रुा सरकारचे रसदेचे येणें ते तुम्हास दिल्हे, त्या यैवजी तुम्ही फौज जाफा ठेऊन चाकरीस यावें असा करारमदार जाला असतां अद्याप न आला. हली मोगलाने बिघाड केला आहे; सबब खासा स्वारी श्रावण वद्य पंचमीस डेरेदाखल होऊन दर मजल जाणार. तरी तुम्ही पेशजी करार जाल्या प्रो सदरहू यैवजापुर्ती नवी फौज जमा करून जलद निघोन हुजूर चाकरीस येणे, हे न होये तरी सालाबाद तुमचे लोक असतात त्या प्रो लोक घेऊन येणे आणि रसदेचा सदरहू यैवज सरकारात भरणे. येविसी दिसगत न लावणे. जलद लोक सुधा येणे.

¶*The Peshwa orders a Sardar of his to join him as hostilities have broken out with the Nizam.*

No. 19] *[2-8-1761*

श्री

राजश्री मावजी झुजरपुरे गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुरू इसने सितैन मया व अलफ. मोगलानें बिघाड केला. सबब

6512

खासा स्वारी श्रावण वद्य पंचमीस डेरेदाखल होऊन दर मजलं जाणार. तरी तुम्ही पत्र पावताच राऊत सुधा तयार होऊन येणे. येवज येथेच पदरी घातला जाईल. ऐवज घेऊन घरी जाऊन तयार होऊन येईन म्हणाल तरी अवकाश नाही. याजकरिता तयारीच करून जलद राऊतसुधा येणे. दिरंग न लावणे. जाणिजे छ ७ मोहरम बहुत काय लिहिणे.

माधवरावाचा शिक्का व लेखनसीमा.

¶*The Peshwa fixes his day—the fifth day of the dark half of Shravan, to march against the Nizam and asks Mavji Juzarpure to join at once with his contingent at Poona.*

No. 20] [*24-8-1761*

छ २३ मोहरम इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब साहेबाचे सेवेसी. खिजमतीस भिकाजी नाईक वाकडें मुा करमले छ १९ मोहरम अर्ज विज्ञापना यैसीजे. राा आनंदराव जयेवंत निंबाळकर श्रावण वद्य ५ तिसरे प्रहरी कूच करोन तांव्राकडे जावे या उद्येशे दोन कोस मुक्काम केला. तेथून पुढे मजल दरमजल तुळजापुरास जावे, तेथे एक दोन मुकाम करोन कांहीं फौज जमा करोन पुढे जावे, यैसा विचार केला आहे. मुरादखान निजामअली याजकडून निंबाळकरास न्यावे या उदेशे धारुरास छ १५ मोहरमी दाखल जाले. तेथून राा माहाराव जानोजी जसवंत यांसीं पत्र आले होते कीं आम्हास उभयतांकडे नवाबसाहेबी पाठविले आहे, फौजा घेऊन सत्वर यावे म्हणोन आज्ञा आहे. याणी उत्तर लिहिले जे, चिरंजीव दाजीस आम्ही रवाना फौजसुद्धा करितो. तुम्ही आम्हाकडे न यावे. राजश्री हनमंतराव निंबाळकर यासी फौजसुधा घेऊन घाटावर आवसेयाचे मुकामी जाणे, तों हेहि येऊन सामीलात होतील म्हणून उत्तर दिल्हे आहे. आलीगोर बांगालिया-हून चालीस पन्नास हजार फौजनिसी हस्तनापुरास यावे या उदेशे दिलीहून पनास कोसावरोन तांव्रास इनायेतनामे आले. त्याची नकल येथे आली त्यांत मजकूर की, तुम्ही दक्षण प्रांतीचा बंदोबस्त करणे, मागाहून इनायेतनामे बाहालीची सनद सीरपाव पाठऊन म्हणोन येथें बोलतात. राा जाधवराव सिबंदीच्या गवगव्यामुळें किले नळदुर्गास आले होते तेथे आठ दहा रोज राहोन पाच सातसे स्वार व गाडदी हजार बारासे पावेतो यैसे आकलेकोट प्रांत यात धामधूम करोन पुढे आकलकोटास जावे यैसा सिधांत केला. राा शाहजी भोसले याणी कांहीं स्वार व

पावलोक जमा केले होते, त्याच्या याच्या लोकाची गांठ पडोन लढाई जाली. जाधवराव याजकडून दहावीस घोडी पाडाव केली. ज्याणे नलदुर्गचा किला फितुराणे घेतला होता त्यास जिवे मारील आणि आपली सरद पार करोन दिल्हे म्हणोन वर्तमान आहे. जाधवराव भालकीस फिरोन गेले. आनंदराव याच समागमे कारकून गोविंद दादाजी खुर्द त्याचे दिवाण गेले. मागाहून माधराव याच्या तर्फेनें यशवतराव मंत्री येका दोहो चौ रोजानी जाणार आहेत. करमालियाहून निघतेसमई से दीडसे स्वार व गाडदी शागीर्द पेशा मिलोन दोनसे पावेतो गेले. रा माहादाजी निंबाळकर व रामराव मिरजगांवकर हे उभयतां येथे माहाराव याणी बोलाऊन आणीत होते. त्याजला आज्ञा केली जे जाजती फौज ठेवणे, त्यास त्याची समजूत करोन इजाफा ठेविणे, येसा करार करोन निरोप घेऊन उभयता गेले. माहाराव याचे कनिष्ट पुत्र रा यशवंतराव व गोविंद खिजमतगार यैसे पुणियासी यावयाचा करार जाला होता. पुर्वील एक दोन वेळा अर्जी सेवेसी लिहिली होती. यैशास प्रस्तुत शरीरास समाधान नाहीं म्हणोन राहिले आहेत. जाण्याचा सिधांत होईल ते समई सेवेसी अर्जी लिहिली जाईल. तूर्त राहिला आहेत. रा माहाराव जानोजी जसवंत चार रोजानी किले परांडे यासी जाणार म्हणोन वदंता आहे. माहाराव याचे शरिरास समाधान आहे. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञाप्ति.

¶*Bhikaji Naik Wakde reports to Raghunathrao the plans and the movements of Maharao Nimbalkar.*

No. 21] [*25-8-1761*

श्री

श्रीमंत राजेश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक गोविंदराव बाबर कृतानेक विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ता छ २४ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. साहेबी पत्र पाठविले ते उतम समई पावोन बहुत समाधान पावलो. तैसच आज्ञा की मोगलानी बिगाड केला याजकरिता खासा स्वारी श्रावणवद्य पंचेमीस डेरादाखल होणार. पुढे मजल दरमजल जावे लागते. त्यास तुमचे लोक जे जमा जाहाले असतील ते ज्यास घोडी आसेल त्यास तयारीनसी घेऊन येणे. यैवज येथेच पदरी पडेल. यैवज घेऊन जावे, मग तयार होऊन यावे यैसा मजकूर नाहीं. दिरंग न लाविता जलदीने यावे यैसी आज्ञा. त्यास आपण येकनिष्ट सेवा वीस बावीस वरशें केली आणि उभयेता श्रीमंत दयाच करीत गेले. त्याहीमधे लोकांचा जथ आज जहालिया बाबरखेरीज-

करून हजार लोकांचा आहे. पेसजी जे जे जाहले वर्तमान ते स्वामीस दखलच असे. श्रीमंत राजेश्री भाऊसाहेब याजपासी सेवा मेहनत जे करावयाचे ते केली. निदान समई घोडा तेथेच ठार जाहाला आणि तीर्थरूप महिपतराव बाबर व लिंबाजी बाबर सतर आसामी जागाच वरी राहिली. परंतु ईस्वरे मौत राहिली नाही. मौबरायेती (?) तरी श्रीमंताचे पायाजवल सार्थकच होते. परंतु ईस्वराचे चितास न आले. हाली तयार होऊन यावयाची आज्ञा, त्यास लोकाचा जथ आजी निकडीचे कामास म्हटलिया हजार स्वाराचा आहे. त्यास थोडे बहुत द्यावे लागते. ऐसियास पेसजीचे कर्ज साठ हजार रुा पुनेतीलच आहे. त्यास हजार लोकाचा येक आवर्जा करून द्यावा आणि पेसजीच्या कर्जापासोन मुक्त करून मोवम यैवज द्यावयाची आज्ञा जाहलिया लोकास थोड बहुत देऊन तयार होऊन येतो. पूर्वी सेवा मेहनत करीतचे आलो. हलीहि सेवा करून ऊर्जित करून घ्यावे यैसा हेत कायावाचामने असे. दुसरा तिसरा अर्थ स्वामीचे पायासिवाये चितात आणीत नाही. पूर्वीहि निकडीची सेवा करीत आलो हलीहि जैसी आज्ञा करितील तैसी सेवा करून दाखऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govindrao Babar on being asked to join against the Nizam recounts first his past services at Panipat under Bhausaheb and the severe losses he suffered on that fatal field. He promises that as desired he would soon join provided money to defray his debts was paid to him.*

No. 22] [*27-8-1761* ?

आईसाहेब त्याजवरी कृपा केली याचा व नाईक मशारनिल्हेच्या भाषणाचा व राजश्री प्रतिनिधीच्या बळाबळाचा प्रकार विस्तारे लिहिला तो कळला. यैशास आम्ही मोगलाचे शेहास गुतलो देखोन नाइकानीं छपा मारिला. बंड उपस्थित केले, परंतु श्रीकृपेनें व वडिलाचे पुण्य करून मोगल हतवीर्य होऊन सळख केला, तो मजकूर तुम्हास लिहिलाच आहे. या वर्तमानावरून नाइकाचा मनसुबा विरेलच; व कांहीं फौजहि पुण्यास पाठवून देतो. फौजेची अवाई पडोन वारापाणी होतील संशये नाहीं. घाटाखाली फौज पाठवावयाविसी राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यास लिहिले असे, तेहि पाठवितील. सारांश नाइकाचे कुंभाड उभे करावयास राजश्री बाबाजी जाधव व बालाजी केशव अध्वर्य जाले आहेत. त्यासी तुम्ही बोलणे कीं नाईक कोणे तऱ्हेचे माणोस आहेत, त्याची बुद्धि कसी, राज्याचा बंदोबस्त करणे असोन गोष्टी नाहींत. हे तुमचेच अघातास व मातुश्रीचे अकल्याणास प्रवर्ततील. परिणामी तुम्हास त्यास कलेल. लटके बखेडियांत न पडणे. म्हणोन त्याजशी बोलणे. ते तुम्हासी काय बोलतात ते

+ ईश्वरी माया.

लिहिणे. येविसी यास व राजश्री महादाजी[1] नाईक निंबाळकर यास पत्रें लिहिली असेत, ते त्यास देणे. नाइकाकडेहि तुम्ही जाऊन त्याची भावभक्ति कसी, बोलणे चालणे उद्गार काये ? कर्तव्य काये ? राज्याचा बंदोबस्त करितात ते सर्वेहि अंतर बाह्य मनास आणून लिहिणे. व मातुश्रीचा विचार कसा आहे त्याची मर्जी कोणीकडे मुतवंजे[2] आहे ते लिहिणे. वरकड राजश्री सभाजी राजे याची स्त्री गरोधर आहे म्हणोन लिहिले ते कळले. या उपरीहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. जाणिजे छ २६ मोहरम वरचेवर जलद वर्तमान लिहीत जाणे. मामास लिहून फौज प्रतिनिधीचे कुमकेस आणून त्याजपेक्षा जबरदस्तीनें राहिल्यास सर्व कजिये उरकतील. बहुत काय लिहिणे ? लेखन सीमा.

¶*This appears to be the Peshwa's letter to his agent residing with Tarabai at Satara. It urges the agent to impress upon the lady the treacherous behaviour of Babuji Naik and report her plans. Trimbak Vishvanath, Mahadaji Nimbalkar and others are also mentioned in the letter.*

No. 23] [*August 1761*

पौ छ २० मोहरम

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
त्रिंबकराव मामा स्वामीचे सेवेसी

पो॰ त्रिंबक देशाई सां नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्व(कीय) कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीही पत्र पाठविले ते छ १८ मोहरमी संध्याकाली पावले. मोगलाकडील दाटीचे वर्तमान फारच आहे. तुम्ही बहुत चौकसीने अलंगनौबत[+] करून फार सावध असणे म्हणोन आज्ञा. त्यास खबरदार असो. पाहारे बराबर फिरवीत असतों. दारू आणावयासीहि प्रात:काली बैल इसापुरास रवाना करितो. दोनसें पावेतों माणोस मेळऊ. याची जागा दाखल आहे त्याचा बंदोबस्त करणे व हाली तुम्हास बोरघाटहि धरणे लागेल त्यास लोक जमा जाहालियास तेहि होऊन येईल येविसी किले इसापूर व लोहगड यासहि आज्ञा असावी लस्करचे वर्तमान फौज किती जमा जाहाली, राजश्री होलकर सिंदे कितीका दिवसी येऊन पोहचतील हे सविस्तर लेहून सेवकास पत्र येईल ते करावे. किले सरसगड व मीरगड व कोथला येथे पत्रे लेहून पाठविली जे, चौकी पाहारे अलंगनौबत बहुत सावधपणे असणे. आपणा कलावे. बहुत काये ल्याहावें. से पंनास बरकंदाज येते तर फारच उतम होते हे विनंती.

¶*Trimbak Desai informs that instructions have been issued to forts Sarasgad, Mirgad and Kothala to be prepared against attacks from the advancing army of the Nizam.*

---

१ मानसिंगरावाचा पुत्र ? २ उद्युक्त. + निशाण व डंका.

No. 24] [*Received on 11-9-1761*

पौ छ ११ सफर इसने

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री गनेशपंत
दादा साहेबाचे सेवेला

सावजी व सोमाजी जासूद मुा पोहनर चरनावरी मस्तक ठेऊन दडवत विनंती उपरी. आपनास बातनीस पाठविले यासी बातनीचे वर्तमान तर रा मानाजी फाकडा आजपावेतो सरगरापासी आहेत सुप्यात व येकू माहार असे तिथे आहे. खदारकर व सरगरासी लढाई बुधवारी जाली. खंदारवालियाची फार धाने (दैना?) जाली. तीनसे च्यारसे माणूस पडले. आता सुप्यास वेढा पडला आहे. धारासित्र सरगरान मारला. आब्या परगनियाची गुर व गाव मारले. सरगरायान व मानाजी फाकडा यानी धूम माडली आहे. जोरावरजग यान वेडा घातला. दोन हाजार फौज आहे. खदारकराची दीड हजार फौज आहे. साहेबजादा पाचशा फौजानसी आला आहे. पाचसे हस्तीखान आहे हे विनती.

बुनग्यातून

घाटावरून वणजोर व बुनग्यातून जासूद व कासीद वगैरे माणसे रहदारी कोडाईबारीने लस्करात येतील. त्यास येता जाता घाटापार करून देत जाणे. वणजोर याचे बैलावर गिरासेचा सिरस्ता असेल तो घेत जाणे.

¶*News about a skirmish between Manaji Sindia and Sargar and the Raja of Khandar is reported to Ganeshpant by the two messengers Savji and Somaji.*

No. 25] [*14-9-1761*

पो छ २८ सफर

श्री

राजश्री गणेश विठल गोसावी यासी

सुरु इसने सितैन मया व अलफ. तुम्ही बारावे सफरचे विनंतिपत्र पाठविले ते छ १४ मिनहूस पावले. बारासे गार्दी पनास स्वार जमा जाले आहेत. आझीप्रो गंगा उतरोन जातो. सिदी अंबर याजकडीलं हती पुणियात राहिला आहे तो पाठऊन द्यावयाविसी आज्ञा करावी. रोजमरियास ऐवज नाही त्याची पैरवी करावी म्हणून लिहिले ते कलले. ऐशास जलदीने गंगा उतरून जाऊ(न) वेरूलचे ठाणें उठवणे. सिदी अंबर याजकडील हतीहि ताकीद करून पाठऊन

दिल्हा जाईल. रोजमरियाचा मजकूर तरी दोन महिनियाची बेगमी तुम्हास करून दिल्हीच आहे. पुढील बे(ग)मीची पैरवी करणे तेहि केली जाईल. दो महिनियाची बेगमी केली त्याचा खर्च कसा केला तो तपशीलवार लिहिणें. मनास आणून पैरवी केली जाईल. जाणिजे छ १४ सफर. बहुत काय लिहिणे ?

¶*The Peshwa acknowledges receipt of a letter from Ganesh Vithal telling about the enlistment of 1,200 Gardis in the latter's army and orders him to march against Ellora and recapture it.*

No. 26] [*20-9-1761*

छ २८ सफर

श्री

राजश्री गणेश विठल गोसावी यासी

सुरु इसने सितैन मया व अलफ. तुम्ही छ १७ सफरचे विनंतीपत्र पाठविले ते विसात्रे मिनहूस पावले. गंगा उतरावयास टोकियास जातो. गंगा उतरोन ठाणी आज्ञेप्रमाणे उठवितो. येक दोन ठाणी कापून काढितो. आमचे सामान अद्यापि आले नाही. ताकीद करून पाठवावे म्हणोन लिा ते कळले. ऐशास सत्वर जाऊन ठाणी उठवावयाचे करणे. तुम्हाकडील नेमणुकेचे लोक राहिले आहेत त्यासहि ताकीद करून रा करितो. येऊन पावतील. खासा स्वारीहि सत्वरच नगरास दाखल होईल. रा उधव वीरेश्वर याची पत्रे आव टाकून येतात. त्यास भरोसा देऊन बंदोबस्त उतम प्रकारे करवणे. वेरूळचे ठाणे उठवावयासी पेशजी लिहिलेच आहे त्याप्राो करणे. नगरास स्वारी पोहचलियावर तुमचे खर्चाचीहि काही बेगमी केली जाईल. जाणिजे छ २० सफर बहुत काय लिहिणे ? तुम्हाबरोबरील नेमणुकेच्या लोकास ताकीद केली आहे. येऊन पोहचतील. जाणिजे छ मा

¶*The Peshwa orders Ganesh Vithal (Waghmare?) to recapture Toke, Ellora and other places from the Nizam.*

No. 27] [*28-10-1761*

पौ छ ६ राखर

कार्तिक.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक सांा नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ माहे रावल मुकाम मौजे टिपराळें पो उदगीर, या मुकामापासोन साकोळ मागे अर्धा

6518

कोस आहे व आगाडीस दोन कोस मौजे सिरूर आहे, स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २७ रोजीं मंगलवारी लस्कर येथे आले. काल छ २८ रोज बुधवार प्रतिपदेस येथे मुकाम जाला. राजश्री हणमंतराव निंबालकर छ २७ रोजीं लस्करचे आगाडीस दोन कोस येऊन उतरले होते. त्यांजकडून रा। तुकाजी चव्हाण व येसाजी मुकुंद बक्षी संध्याकाली येथे आले. तुकोजी चव्हाण, येसाजीपंत व गोपालराव वकील ऐसे त्रिवर्ग राजे विठलदास यांजकडे गेले. भेट जाली. त्यांचे त्यांचे खिलबत जालें. निश्चय ठहरला की, राजे विठलदास याणी सामोरें जाऊन त्यास घेऊन यावे. त्याजवरून काल छ मारी बुधवारी राजे विठलदास व राजे विनायेकदास व विठलदासांचें आणीक दोघे पुतणे व नातू व विनायेकदासाचा पुत्र हे मंडली व मा। कबीरखा पातशाही बक्षी वगैरे हे हणमंतरायाचे डेऱ्यास गेले. दोन घटिका बसले. आगतस्वागत जाले. घटकाभर खिलबत जाले. परभारे समाधानाच्या गोष्टी वचनप्रमाण जालें. उपरांतिक राजे विठलदास आदीकरून त्रिवर्ग पुतणे व दोघा नातांस वस्त्रें दिल्ही. विठलपंतांस येक हती दिल्हा. मा। कबीरखानास वगैरे वस्त्रें दिल्ही. उपरांतिक स्वार होऊन नवाब सलाबतजंगाचे डेरियास आले. हणमंतरायाची त्याची भेट जाली. नजरा गुजरानल्या. तेथे घटकाभर बसून आगतस्वागत जालें. पानदानें देऊन आज्ञा दिल्ही. तेथून निजामदौलाचेथे गेले. त्याची भेट जाली. त्यासहि नजर गुजरानली. दोन घटका बसून परस्परें समाधानपूर्वक भाशण जाले. तेथूनहि पानदान इनायेत होऊन, आज्ञा घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. आज येथे मुकामच आहे. शकरी देसाईण आठा कोसावर वांझरेवर आली. तिजपासी हजारबारासे प्यादे व तीनसे स्वार आहेत व सरकारचा खजाना तिजसमागमे तीन लक्ष रुपये आहेत म्हणोन याप्रों वर्तमान आले होतें. पांढरे राणोजी दोनसे स्वारानसी आगाडीस येऊन उतरलेत व सरगरहि रेणापुरापलीकडे आले आहेत व शिवाजी केशव नांदेडाजवल गंगा उतरतात म्हणोन याप्रों वर्तमान येतात. याणी आपले जागा तजवीज केली आहे की, बहिरबुणगे धारूरचे किल्याचे आश्रयास ठेवावे, जरिंदे होऊन चालावे. धारूर उजवे टाकून येक मार्ग पाहिला आहे. मग पाहावे कोणत्या मार्गे जातात. शकराई व रायेणा देसाई व सिवाजी केशव व गिरमाजी खंडेराव सूर्याराव सरगर, पांढरे [पुढील बंद गहाळ].

¶*Dhondo Ram, writing from the Nizam's camp near Sirur, informs Dadasaheb of the meeting of Hanmantrao Nimbalkar with Vithal Sundar and Salabatjang.*

6519

No. 28] *[24-11-1761*

पौ छ २९ राखर इसने

श्रीर

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. सेवक बसालतजंगाचे लस्करांस पोहचल्याउपरांतिक आत्नाणुसार कामकाज येथास्थि(त) करीत आहे. इकडील संवशये व काळजी तिळांश चितावर न धरावी. सारांवश भारी फौज मिळऊ; येंदा हरउपाये करू. निजामअलीखाचे पारिपत्य केल्यास कासी रामेश्वर समुद्रतीरपर्यंत सकळ पृथ्वींत स्वामींचे लौकिक नाव त्या देसी व कर्नाटकात समग्र लाहाणथोर पाळे वगैर लोक उगेच राहून येथास्थित खंडण्या देतील व राज्यहि सरकारातून (न) खशा होईल. जे श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेबामागे चांगला बस्त केला म्हणून स्वामीची येश कीर्ति विस्त्रातोमुखी वाखाणीजेल. कदाचित येंदा समयावरी द्रिष्टी देऊन आल्पस्वल्प मुलुक निजाम अलीखास देऊन सलुख केलिया तमाम मुलकात बदन-कसी होऊन जागाजागा लाहाण थोर अवघे डोई उचलून समग्र बंदोबस्तहि घडून जाईल. येरव्ही सरकारात फौज कम राहिल्यास कितेक फितुरी लोक आपलाले जमावणसी जाऊन अमित्रासी मिळतील. उपरांतीक काम भारी पडल. सर्व गोष्टी विपरीत घडून येतील. सेवक दौलखाई केवळ अमर्यादेने विनंती केली आहे, ती दूर आलोचणेकडून ध्याणास आणून सेवकाची आमर्यादा क्षमा करावयासी स्वामी समर्थ आहेत.

¶*The writer importunes the Peshwa to adopt stern measures in putting down Nizam Ali and thus add to the glory of his revered ancestors*

No. 29] *26-11-1761*

पौ छ ३० रबिलाखर

श्रीशंकर

आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना ऐसीजे. येथील क्षेम ता। छ २८ माहे रबिलाखर गुरुवार मु। राक्षसभुवन माहाराजाचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री सेनासाहेब सुभा यांचा मुकाम येथें आहे. याणी तोफा व कबिले माघारे वाटे लाऊन दिल्ही. आतां सडे होऊन स्वामीकडे येतात. खासा स्वारी कोठें आहे.

मोगल कोठे आहे, याणी कोणते ठिकाणी यावें हे आज्ञा काय करणे ते करावी. महाराजाचे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.+

¶*Vyankatrao Moreshwar informs Raghunathrao of the arrival of Janoji Bhonsle at Rakshasbhuvan and asks for orders as to where he (the Bhonsle) should meet the addressee.*

No. 30] [*Received on 28-11-1761*

पौ छ ३० राखर मदवार

च्यार घटिका रात्र

श्री

विज्ञापना ऐशीजे. मा। कबीरखां पातशाही बक्षी व कादरखां गाडदी कही भरावयासी गेले आहेत. खंडागले वगैरे समस्त आपलाले मिसलीवर तयार आहेत. नवाबाची स्वारीहि तयार आहे. प्रवरासंगमच्या हवेल्या तरी कुल जाळिल्या. टोकेचे हवाल्यास अद्याप रक्षण आहे, हे विज्ञापना. टोक्याच्या हवेल्यास येक दोन लाहाण मोठ्यास आग्निस्पर्श केला हे विज्ञापना.

¶*News is sent to the Peshwa about the burning and plundering executed by the enemy at Toka and at Pravara Sangam.*

No. 31] [*29-11-1761*

श्री

वडिलांचे शेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १ जमादिलोवल मुकाम धारवाड सुखरूप असो विशेष. छ १४ रबिलाकरचीं पत्रें राजश्री धोंडेराम याजकडून आलीं, त्यांत मजकूर नवाबानीं श्रीमंतासी बिघाड करावा की सलुखच राखावा म्हणून पुसिलें. त्याजवरून शेरजंग मीरमुसाखां व महमद कबीरखां वगैरे कितेकानीं सांगितलें कीं श्रीमंतासी बिघाड सहसा करूं नये. याविसीं साधक गोष्टी फारच सांगितल्या. गुलाम सैदखां व देवराज हरकारे याच्या दरोग्यानीं मसलत सांगितली कीं श्रीमंतासी बिघाड करावा. हैदर नाइकाची कुमक करावी. येतद्विशई त्या उभयेतांनीं साधकबाधक मसलत सांगितली, परंतु त्याचा मनसबा कोता. वरकडाचा मनसबा दूरदेसीं याप्रमाणें विस्तारें पत्रें लिहिलीं आहेत, तीं वाचून पाहावीं. ऐसियास आपण शहराकडे गडबड तूर्त न केल्यास उत्तम आहे. आद्याप नवाबाची निघायाची गडबड कांहींच नाहीं. यास्तव त्याचे गडबडे आगोदर आपणच गडबड कश्यास करावी?

+ २८ रबिलाखर गुरुवारीं २१-२-१७५४ किंवा २६-११-१७६१ या तारखांस येतो. सेनासाहेबसुभा जानोजी भोसले; बातमी रघुनाथरावास दिलेली दिसते.

नवाबासहि गडबड करावयास प्रतिकूल फारच आहे. त्यांत राजश्री रामाजी बलाल भोसल्याकडे स्वामीनी पाठविले आहेत त्यांचाहि इरादा काये तोहि कलेल. त्याप्रमाणें कर्तव्य न कर्तव्य तें करावें. त्यास वडिलीं लौकर इकडेच यावयाचे करावें म्हणजे सर्व मनसबे साध्य आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

¶*The discussions in the Nizam's court regarding the attitude to be adopted towards the Peshwa are reported probably to Raghunathrao by one of his subordinates.*

No. 32] *[29-11-1761*

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री रघुनाथपंत दादा
गोसांवी यासीं

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. गोसावियानी पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. यावयासी दिरंग लागला आहे याजविसी विस्तारे लिहिलें; व मोगलानी देवस्थानी उध्वंस केला हे हिंदुधर्मास उचित नाहीं. मंगलावारी युध्य नेमिलें आहे. यास्तव रातोरात भेटीस यावे म्हणोन लिहिल. ऐशियांस पैठणचे मुकामी गोसावियाचे पत्र आलें कीं गुजाटयाचा घाट चढून यावे. आम्ही आगाडीस घाट चढून जातो याजवरून या सुमारे यावे; तरी आपण घाट चढून गेलियावर मोगलाचा मुकाम घाटांखाली होईल. आमचा बुनगीचा गुंता म्हणोन करंजीच्या घाटाचे सुमारे आज छ १ जमादिलोवली सोला सतरा कोसाची मजल करून तीसगावांवर आलो. तो आजच भेटीस यावयासी निकडीने पत्रे आली ती सध्याकाली पोहचली. येथून सडे होऊन, बुनगे ठेऊन रातोरात यावयाचे करावे तरी आपल्यास आम्हास फारच अंतर व बुनगीहि ठेवावयाचे ठीक नाहीं. त्याजवरून उदईक सोमवारी करंजीचा घाट चढून नगरा आसपास बुनगे ठेऊन, सडे होऊन मंगलवारी येऊन पोहचतो. वरकड मोगलानी बहुत बदराहा वर्तणूक केली याचे पारपत्य निक्षूण्य व्हावे यास्तव बहुत विषदे लिहिलें. त्यास हाच दढोतर विचार केलिया आपलेच प्रतापे होऊनहि येईल. रा छ मजकुर +सुज्ञाप्रति विशेष काये लिहिणे. कृपालोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

¶*Janoji Bhonsle explains the cause of his delay and assures Raghunathrao that he would soon march and join him in putting down the Nizam.*

\+ येथून पुढें हस्ताक्षर जानोजी भोसल्याचें आहे.

No. 33] [*November 1761*

श्री

सेवेसी मल्हार बाबूराव विज्ञापना. बुधवार प्रहर दिवस चढता मुा उरली. मोगलाचा कुचाचा नगारा च्यार घटका मागील रात्र राहाता जाहाला होता. नवाब निजाम आलीखानानी आज प्राथ:कालापासून दरबार केला होता. आवघे सरदार लाहानमोठे मिळाले होते. राजे विठलदास व निजामआलीखान (न) वाब सलाबतजंगाचे डेरियास गेले होते. दोन घटका खिलबत केले. सुला-हाचा मजकूर. मग मुकाम केला. कालचे रात्री विठल सुंदर तीन च्यार हजार फौज घेऊन डोंगरात दऱ्याखोऱ्यामधे दाना काढावयास गेले होते. थोडाबहुत घेऊन आले. आता डोंगरात फौज पाठवायाची दानादुना काढायाची बुध्य धरली आहे. याची तजवीज करनार धनी समर्थ आहेत. श्रुत होये हे विज्ञा-पना. आज धारन बाजारी [फाटले] पीठ तीन सेर याप्रमाणे. हे विज्ञापना.

¶*The movements of Nizam Ali and Vithal Sundar near Urli are communicated to the Peshwa by Malhar Baburao.*

No. 34] [*1-12-1761*

पो छ ११ जमादिलावल

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
साहेबाचे शेवेसीं

विनंती आज्ञाधारक महिपतराव कवडे दंडवत विज्ञापना. येथील कुशल छ ३ जमादिलावलीं मुकाम नजीक पालीम साहेबाहाचे कृपावलोकनेंकरून सेवक लोकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. साहेबी कृपाळु होऊन छ २४ रबिला-खरचें आज्ञापत्र सादर केले, तेथें आज्ञा कीं तुम्ही दोन हजार फौजेनसी ते प्रांतें आहा; परंतु जालनापूरचें ठाणें मोंगलानें फिरोन घातलें. मागती तुम्हीं घ्यावयाचें न केलें. तैसेंच पडदूर कोरेगांवचें ठाणें घेऊन खंडागलियाचे कबिले दस्त न केले म्हणून शब्द लाऊन आज्ञापत्र लिहिलें. ऐसियासी जालनापुरांत ठाणें खंडागली-याचे वगैरे शहाकरितां मातबर मुस्तकीम[१] असावें म्हणून राजश्री त्र्यंबक खंडेराव यांसी सांगत असतां त्याणी आपले गाडदी वगैरे सामान येऊन बंदोबस्त करितों म्हणून मान्य केलें. त्या भरवसियावर इकडे आलों. खंडागलियाकडील ज्ञरी

---

१ भक्कम.

असेगांव परबणी वगैरे ठाणी घेतली. कोरेगावासहि च्यार रोज अधिक गुंता जाहालियास वरकड सरकारकामांत रखणा होतो याजकरितां इकडे आलों. सेलगाव सोनपेठ खेड कसबा येथें सरकारचीं ठाणी कायम केलीं. याउपरी वसमतेकडे जावें म्हणजे तेथून कितेक सरकारचे जागिरीचे माहाल आहेत तेथीलहि बंदोबस्त करावयाचा विचार केला. येथून जालनापूर लांब राहिलें. तिकडे तूर्त जावयाचें केलें, तरी इकडे जाहाला बंदोबस्त तो ठीक राहणार नाहीं. सरकारकाम द्रष्टीस येतें. त्यास सेवकापासून अंतर स्वामिसेवेसीं होणार नाहीं. ठाणी बसवीत असों. रयत लोक तमाम फौजेच्या दहशतीमुळें तफरखां जाहाले आहेत. त्यास कौल पत्र देऊन जमा करितों. इकडे खंडागलीया व सरगर व खंदारकर याणी मुलकांत जीव राहूं दिल्हा नाहीं. सांप्रत रयतीस सोहलत दाखऊन सरकारकाम चालीस लाविलें आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahipatrao Kavde writes to Dadasaheb, informing him why he was not able to send relief to Jalna and how he has been doing good work in other quarters.*

No. 35] [*3-12-1761*

पौ छ २६ जावल

श्रीराम

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित मुधो मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल वर्तमान तागायत छ ५ जमादिलावल मुकाम नरसापूर येथें माहाराजाचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असे. राजश्री सुरेराव येलमेयासी नवाब निजामआलीखान याचीं पत्रें छ ३ जमादिलावलीं कीं आम्ही कूचे दरकूचे करून पुण्यास जातों. तुम्हीं व गिरमाजी खंडेराव यैसे मिलोन खानेअलमास मिलावें. ते प्रांतें राजश्री महिपतराव कवडे याचे पारपत्ये करणे आणि तहत औरंगबाजपावेतों मुलकाची जती करून रुपये वसूल करणे. ते प्रांतींच राहाणे. आम्हांकडे न यावें. राजश्री गिरमाजी खंडेराव यासीहि पत्रें आल्यात कीं सुरेराव तुम्ही येक जागा होऊन आज्ञेप्रमाणे करणें. त्यास गिरमाजी खंडेराव येदलाजाजम गेले. सुराराव‌हि अपाराव पेटस जाणार. ऐशास राजश्री महिपतराव कवडे हे प्रांतें आहेत, त्यामुले जबरदस्त धास्त आहे. सेवेसी माहाराजाकडे महिपतराव आल्यानें तमाम मुलूक जातो. ऐशास महिपतराव हे प्रांतें राहिल्यानें इकडील मुलुक हाताखालींच आहे. जबरदस्त हे प्रांतीं लाहान मोठ्या सरदारास धास्त आहे.

यामुळें महिपतरायावर कोण्ही जात नाहींत. सुरेरायानीं सेवेसीं पत्र लिहिलें असे रखेनुते होईल. माहाराजाचाच म्हणून अद्यप आहें. कांहीं उत्कर्श केला. कदाचित गेला तरी सेवेसीं बातमी येईल. हे सेवेसीं विज्ञापना.

¶*Mudho Malhar writes to Dadasaheb, giving the general condition of the province of Narsapur and the movements of some sardars and explains what he did to give effect to the instructions given to him to check the march of the Nizam on Poona.*

No. 36] [*3-12-1761*

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ५ जमादिलोवल वर्तमान यथास्थित असे विशेष. सरकारचा खजिना * * * राजश्री लक्ष्मण कोनर लस्करास येत आहेत. ऐशास गुंजालेयाच्या घाटास व निंबेदेहेवे-याच्या घाटास दाहदाहा राऊत पुढे पाडऊन खजाना लस्करात लौकर येऊन पोचे ते करणे म्हणऊन आज्ञा. आज्ञेप्रमाणे दोन घाटास दाहादाहा राऊत दोन वाटानें पाठविले आहे. राऊतास सांगितले की जाताजाता बातमी लोकाची चांगली राखोन लक्ष्मण कोनेर याजवल जाणें. घाटाखाली त्याची गाठ पडली तर मोगल जे वाटेने जात असेल ते वाट टाकून दुसरे वाटेने लस्कराची बातमी चांगली राखोन आपलें लस्करांस लौकर येऊन मिलणे. घाटावर गाठ पडली तर खिजाना (वि) ऊन माघारे नगरास जाणे म्हणोन लक्ष्मणपंतास पत्र लिहून देऊंन राऊत व कारकून रवाना केले आहेत. विदित जाले पाहिजे. कागद रवाना. गुरुवार प्राथःकाल हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna as instructed sends some guards to help Lakshman Konher to carry the Peshwa's treasure safely to its destination.*

No. 37] [*4-12-1761 ?*

श्री

राजश्री हरिपंत तात्या स्वामींचे

सेवेसी

विनंती उपरी. तागायत छ ६ जमादिलावल संध्याकालपावेतो कुशल असो विशेष. छ ४ जमादिलोवलचे पत्र पाठविले ते पावोन सविस्तर कलो आले. सदैव याच प्रकारे लिहीत जाणे. गडबड येथें विशेष जाहाली. लोक फार

---

१ बिघाड.

करून गेले. सडेज वोरघर संवरक्षण मात्र आहे. वरकड सर्व उरकले. लोहगड राजमाची विसापूर, सिंहीगड, पुरंधर इत्यादिक स्थलास लोक गेले. तुमची आमची माणसे लोहगडास पाठविली. राजश्री गोविंदपंत याच्या लिहिल्यावरून सविस्तर कलेल. राजश्री आबाजीपंतास जलद माघारे पाठवावे. बातमी वरचेवरी लिहीत जावी. सडे घरी अहोबाळ्यास ठेविले आहे. वरकड सर्व चिरंजीव राजश्री राघोपंताबराबर लावून दिल्ही. तात्या मोठी गडबड जाहाली. भोसले यांची आवाई इकडे येतात म्हणोन. दर्याबाई वगैरे याणी दंगा तिकडे काठी कारडी वगैरे या रानांत मांडला आहे. बसालतजंग तिकडून येणार, तो भिवरीच्या पाण्यानें पुण्यास येणार ऐशा अनेक प्रकारच्या खबरा येतात. लोक गडबड करितात. प्रमाण कोणते मानावी. एवंच मोठा घोर आहे. जगदीश काय करितो कलत नाहीं. सदाशिवपंत वैद्य पडल्याचे वर्तमान ऐकोन परम खेद जाहाला. गुदस्ता महाअनर्थांतून जगला तो येथें कामास आला. इच्छा श्रीहरिची. विशेष काय लिहिणे ? कृपा केली पाहिजे, तुम्ही आपले जागा घोडे पिढे चाकर माणूस यांचा तंगबेस्त[१] राखून परम सावध होऊन जाणे हे विनंती. भोसले मिलतात की नाहीं ? नगराकडे आले म्हणतात याचा अर्थ काय आह तो ल्याहावे हे विनंति.

¶*Haripant Phadke is informed that at the approach of the Nizam's forces people are flying from Poona to hill forts for protection.*

No. 38] *[7-12-1761*

पौ छ ९ जमादिलावल
सोमवार दोन प्रहर

श्री

श्रीमंत महाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक सिवराम आनंदराव चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती यैसिजे. काली रविवार संध्याकाली मोकाम जाहालियाउपरी, दोन घटिका रात्री नवाब निजामअलीखा याचे ढालायेत येऊन आम्हास व चागोजी ना व आत्रघे जासूद धरून नेऊन देवडीवरी सारी रात्र बैसविल. प्रातःकाल प्रहर दिवसावरी सोडून दिल्हा. त्यासी रा विनायेकदास यासी ज्वाबस्वाल जाहला. ते बोलिले की अम [पुढील बराच मजकूर फाटला आहे] (का)सीदजोड्यास

---

१ तयारी.

आटक केलिया आम्ही तुम्हास अटक करू यैसे बोलोन आम्हास सोडून दिल्हे. तैसाच रा शिवाजीपंताकडील रा मलारपंत व परसराम जोडीया बैसविल्या होत्या त्यासीहि साडून दिल्हा. साहेबी त्या जोड्यास अटकाव केलिया ते आमचे जिवाचा घोर करितेत. काली त्याच्या जोड्या कोणी बैसविल्या होत्या त्यासी ताकीद करावी. पुढे जोडियासी कोणी अटक न करीत यैसी गोस्टी करावी; आगर साहेबाची मनी तैसच करण असालिया आम्हास बोलाऊन घेणे. यावरी साहेब धणी आहेत हे विनंती. आज्ञाधारक चागोजी ना दडवत विनंती रानी लिा आहे त्याजवरून कलो येईल. हे विनती.

¶*Shivaram Anand writes to Raghunathrao of the confinement and subsequent release by Nizam Ali of himself and the news-bearers.*

No. 39] [*11-12-1761* ?

पौ छ १६ जावल.

श्रीशंकर

सेवेसी माधवराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ १३ जमादिलोवलपरियंत वर्तमान येथास्थित असे विशेष. येथे येंदा कामाठी व हशमी माणसांचा भरणा थोडका. तत्रापि निकड करून जवाहीर-खाना व खजिना झाडियानसी पुरंधरास रवाना केला व जामदारखाना व सिलेखाना झाडियानसी सिंहीगडास रवाना केला व जिनसखानाहि बहुतकरून रवाना केला. तोफखान्याचा जकिरा तर फारच आहे त्याहिमध्ये उपयोगी जिनस व दारूगोला, तोफा बाण लडाईचा सरंजाम हा झाडियानसी सिंहीगडास रवाना बहुतकरून जाला. काही राहिला आहे तोहि लौकरच पाठवितो. कोठीचा सरंजाम काही गेला. बहुत राहिला आहे, त्यासहि मदत करून रवाना करितो. किल्यावर जिनस चढवावयाविसी रा गोविंद सिवराम यांसी सांगितले आहे. तेहि तरतूद करून चढवितील. वरकड सरजाम कावनई तालुखा (?) व त्रिंबक व लोहोगड, पुरंधर सिंहीगड विसापूर येथील बेगमी दारूगोल्याची थोडीबहुत करावयाची ती केली आहे. विदित होये. प्रस्तुत सप्तरिषीस वर्तमान जाले ते परस्परे विदित जालेच असेल. तेथील कारकुनाचे पत्र आले ते बजिनस पाठविले आहे त्यावरून विदित होईल. खजिना सेवेसी रवाना करणार. दंग्याचे दिवस; वाटेचे रखवालीस राऊतांचा भरणा भारी पाहिजे म्हणून खोलंबा जाला आहे. येविसी पूर्वीहि विनंती लिा, परंतु राऊत आले नाहीत. तर पांचसे राऊत जरूर पाठवावे. येथे आहेत; त्यांस दररोज रवानग्याबरोबर राऊत द्यावे लागतात. जागा जागा

रखवाली पाहिजे. येथेहि श्रीमंत मातुश्रीबाई आहे. नेहमी शेदीढशे राऊत पाहिजे. याजकरिता येथील राऊत खजिन्याबरोबर पाठवावयास उपयोगी येत नाहीत. राऊत पाठवावयाविसी आज्ञापिणार स्वामी समर्थ असेत. उंटे येथे नाहीत. स्वामीनी पाठविली ती थोडी. त्यांजवर सारा भरणा रवाना होत नाही. आली आहेत त्यांजवर जाईल तितका रवाना करितो. परंतु आणखीहि उंटे पाठविली पाहिजे. उंटे नगरी बहुत आहेत, तेथे आज्ञा गेल्यास वरचेवर येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. आजच सांडणीस्वाराबरोबर आज्ञापत्र आले, तेथे आज्ञा की, दाहा सांडणीस्वार पाा आहेत व तेथे आहेत त्यादेखील यैवज भरून पाा. यैशास, उटांची व राऊतांची वाट पाहिली, फार दिवस येत ना, मोगलांची गडबड फार जाली, म्हणून खजिना पुरंधरी रवाना केला. हाली येथे थोडासा यैवज आहे. मोहरा, होन, रुो मिळोन पंनाससाठ हजार रुो-परियंत सांडणीस्वारांबरोबर पाठवितो; व उंटे स्वामीनी पाा ती पुरंधरास पाठऊन त्याजवर जाईल तितका यैवज तेथून रवाना करितो. त्याजबरोबर राऊत स्वामी-कडून येतील ते देऊन पाठऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Madharao Viswanath Pethe reports to the Peshwa that he managed to despatch valuable treasure to Purandhar where it was quite safe from the hands of the plunderers from the Mughal camp.*

No. 40] *[12 December 1761*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे चरणसेवेसी

सेवक आज्ञाधारक सिवराम आनंदराव चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती उपरी. लस्कर आजी प्रहर दिवसा कुचे जाहाल. बोलवा श्रीगोंदियाची सेवेसी विदित्य आहे तरी माहाराजाचे चितास येईल तरी आपण कूचे करून ते स्थली मुकाम क(रू)न तोफ लाविलिया ते वाट सोडून दुसरी वाटेने जातील. तोफची इभरत आपणाकडील इकडे बहुत आहे. काली तोफचे गोले आपणा-कडील इकडे आले ते कोणास काही लागले नाहीत. परंतु लस्करा(त) (गो)ला येताच फार घालमेल होते. दाटीमुलें येकावर येक पड(ता)त. सेवेसी कलावे हे विनंती.

¶*Shivaram Anandrao reports to Raghunathrao the good effect produced by the Peshwa's artillery which the writer advises should be advanced to Shrigonda to deflect the enemy's course.*

6528

(फाटले.) विज्ञापना येसिजे. छ १९ रविवारं दोन घटका मागील रात्र राहाता आपाराव (हाके) रेणापूरकर पाऊनसे रावतानसी आपले लष्करांतून सिवाजीपंताचे गोठात आले. सिवाजीपंत आपार्जीरायाचे राहुटीस जाऊन भेटले. दीड प्रहर दिवस राहता आगाडीस लढाईचे तोंड लागले; तेव्हां नवाबाची आगाडी माग फिरविली. आपलेकडले राऊतानीं बुनगे दोनकसे घेऊन गेले. दहा पांच मानूस ठार जाहले. वीसेक मानूस जखमी जाहाले. तेव्हां सिवाजी केशव व लक्षुमणराव खंडागले चालून अगाडीस आले. तेव्हां त्यामध्यें युद्ध (फाटले.) तेव्हां सिवाजी केशव याजकडील * * (फाटले) नामीं सरदार (फाटले) जखमी आहेत. वाचाविसे नाहींत. पंधरा मानूस ठार जाहाले. वीसएक मानूस जखमी आहे. घोडीहि दहायेक ठार जाहाली. दोनचार जखमी आहेत. लक्षुमणराव खंडागले धारकरी सिपाई चवदा पंधरा ठार पंचवीसेक जखमी आहेत. दाजी निंबालकर याजकडीलही दहा बारा मानूस मातबर ठार जाहाले, विसेक जखमी आहेत. पछाडीस हणमंतराव निंबालकर याजकडील हैबतराव नलवडा व दनोसिंग मातबर सरदार ठार जाहाले. यासी नामांकित वगैरे चारसे मानूस ठार जाहाले. हजारेक जखमी आहे. घोडी ही दोनेकसे जखमी आहेत. राम (फाटले) कडील तीस मानूस ठार जाह (फाटले). खंदारकर (फाटले) गमोडे नामी सरदार ठार जाहाल्यासिवाये वीसेक मानूस ठार चालीसेक जखमी आहेत.

(पुढील दोन ओळी मजकूर फाटण्यांत गेला आहे.)

नवाब निजामअल्लीखान याचे पागेवरले खास दोन मोगली टोपीवाले ठार जाहाले. या सिवाये ठार जखमी आहेत. आपले तोफाचे गोल्यानीं व बानानीं फार शर्तम[१] केली ते पत्री लिहिता पुरवत नाहीं. लष्कर आवघे सेनसडा जाहाले. कांहीं बाकी उरली नव्हती. रात्री बहिर एकीकडे, फौज एकीकडे, मिसलीची बेमिसल जाहाली. कोन्ही कोन्हास भेटले नाहीं. काल यवन लोकास कळू आले. कूच करा (फाटले)चा आवाका देखील राहेला नाहीं. (फाटले) वजी कूच करतील. अद्याप (फाटले) जाहाला. (फाटले) येवन लोकाना आवसान देखील नेवून गेले होते. मोठी मार दिल्ही. श्रुत होय हे विज्ञापना.

रवाना छ १६ जमादिलौवल दोन घटिका दिवस.

¶*The letter vividly describes the havoc created in the enemy's ranks by the Peshwa's army.*

+ जमादिलौवल. १ शामत = शहामत = पराकाष्ठा.

No. 42] *[15-12-1761*

श्री

सेवेसी नागो राम चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील-वर्तमान तागाईत छ १७ जमादिलावल मंगळवार प्रात:काळ पर्यंत स्वामीचे कृपाकटाक्षेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीची आज्ञा मंगळवारी घेऊन निघालों ते रविवारीं छ १९ मिनहूस सातारियास पावलों. चिरंजीव राजश्री माधवराव रत्नाकर यांस पुढें रवाना केले होते ते आगोदरच शनवारीं पावले. राजश्री गंगाजीराव खानविलकर तेहि शनवारींच पावले. आज्ञेप्रमाणें त्याणी सर्व मजकूर राजश्री विष्णुपंतांस सांगितला. मातुश्री आईसाहेबांस देवाज्ञा जालियाचे वर्तमान पेशजी लेहून पाठविलेंच आहे. आम्ही रविवारीं सायंकाळीं दाखल होतांच राजश्री विष्णुपंताची भेट जाहाली; व राजश्री शिद्‌भट दीक्षित व मशारनिले यांणीं आम्हास दरबारास घेऊन जाऊन दर्शन करविले. आपलें संतोषाचें वर्तमान व मोगलाचें वर्तमान राजश्रींनी आपले स्वमुखें पुशिलें. सर्व मजकूर मोगलांचें युद्ध जाहालें, तोही मजकूर वगैरे सर्व सांगितला; त्याजवरून माहाराज बहुत संतोष जाहाले. बोलिले कीं आम्ही खासा बाहेर निघोन डेरेदाखल होतों; ईश्वर पंतप्रधान यांस येश देत आहे म्हणून बोलिले. येथील विचार पाहातां ज्याप्रमाणे पूर्वीपासून बंदोबस्त आहे त्याजप्रमाणेंच आहे. आणि माहाराजांचीहि सर्व प्रकारें आपले ठायीं ममता बहुतच आहे. येथें बोलण्यांत पाहातां दुसरा विचार किमपि आढळला नाहीं. सेवकाचे व माहाराजाचें बोलणें समक्ष जाहालें. त्यांत भावार्थ हाच कीं रात्रंदिवस आपलें स्मरण करून ज्या गोष्टीनें स्वामीचें कल्याण तेच इच्छा आहे. माहाराज सोमवारीं आऊसाहेबाची राख गोळा करावयासी माहुलीस गेले होते, समागमें मराठे लोक व आम्ही फौजसुद्धां गेलों होतों. राख गोळा करून दोन प्रहरां शहरास आले, तों इतक्यांत राजश्री माधवराव विश्वनाथ व राजश्री गोविंद शिवराम हे पुणियाहून आले, त्यांजला आम्ही व विष्णुपंत वगैरे सामोरें जाऊन आणिलें. त्यास राजश्रीची भेटी जाहली. कितेक मजकूर मोगलाकडील दाटीचा व बाबाजी जाधव मोंगलाकडे मिळोन लबाडी करणार हा अर्थ दर्शऊन किल्यावर चालावें म्हणोन राजश्रीस विनंती केली. त्यास राजश्रीनी बहुत आग्रह केला कीं न जावें. आपण डेरे दाखल होऊन फौज मेळवावी आणि आपल्यास सामील व्हावें, ऐसे कितेक गोष्टी बोलिले; परंतु या उभयेतांनीं बहुतच आग्रह करून सर्व गोष्टी येकीकडे ठेऊन स्वामीचे आज्ञेप्रमाणें किल्यावर राजश्रीस दाखल केलें. सोमवारीं

दोन प्रहर रात्रीस दाखल जाहाले. सेवेसी श्रुत होये. या उपर सेवकाचे येथें कार्य कांहीं राहावयाचें नाहीं. आज्ञा येतांच स्वार होऊन सेवेसी येईन हें विज्ञापना.

¶Nago Ram reports from Satara the news of Tarabai's death and her funeral ceremony. He also mentions that the King is favourably inclined towards the Peshwa in his struggle against the Nizam. The writer however took good care to keep him well guarded at the fort of Satara.

No. 43] *7-12-1761*

श्री

विज्ञापना छ १९ जमादिलावल गुरुवार ५॥। ४९८ वर्तमान. आज प्रात:कालीं दोनघटका रात्र असतां कुच्याचा नकारा जाल्याचें वर्तमान शेवेसी लिहिलें होतें. त्यास तयारी जाली. हाती तयार जाले होते. मागती मुकाम केला. झंड उभे केले, हेहि वर्तमान शेवेसीं लिहिलें. बाह्यात्कारें तरी लौकिकी चर्चा कीं सलुख होतो, याजकरितां मुकाम केला. येक मजकूर कीं श्रीगोंद्यांत सिंद्याचे हवेलींत कांहीं द्रव्य भूमिगत आहे म्हणोन राजे विनायेकदास कालहि हवेलींत गेले होते. आजहि ऐसे कोणी यासी सांगितलें आहे. प्रात:कालीं गेले होते. आद्यापि हवेलीतच आहेत. आजेचंद खांदारकर व मुरादखां वगैरे व महमद जाफरखां अर्जबेगी हेहि गावांत गेले आहेत. बेलदार खाणायानिमित्त गेले आहेत. नवाब निजाम आलीखांहि हवेलींत जावयासी स्वार होऊन गेले आहेत. या प्रकारचें वर्तमान आहे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना. * *

[यापुढे * तीन ओळी मजकूर फाटला आहे.] *

डेऱ्यांतच आहेत. प्रस्तुत हणमंतरायाचे त्याचे खिलवत होत आहे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶The Nizam gets rumours of the hidden treasure in the Sindia's residence at Shrigonda and goes there to search for it. The letter reports the affair to the Peshwa.

No. 44] *[17-12-1761*

श्री

विज्ञापना. छ १९ जावल गुरुवारचे वर्तमान प्रात:कालीं कूच जालें होते. तमाम हातीवर आंबाऱ्या जाल्या होत्या. लस्करची तयारी जाली होती. मागती मुकाम केला. झंडे उभे केले. याचे कारण कीं, काजीनें सांगितलें जें सिंद्याचे हवेलींत द्रव्य आहे. त्यास प्रात:कालीं रा विनायेकदास व खंदारकर व मा

6531

जाफरखां आर्जबेगी वगैरे बेलदारांस घेऊन हवेलींत गेले. तमाम हवेली जेथें जेथें भ्रम होता तेथे तेथे काणली. बलदें फोडिली. बलदांत काणली, परंतु कोठें काहीं सापडले नाहीं. दो प्रहराचे अमलांत नवाब निजामआलीखांहि स्वार होऊन गेले व त्याचेमागून नवाब सलाबतजंग गेले. उभयेतांनी हवेलींतच भोजन केले. संध्याकालपावेतो तेथेच होते. आस्तमानी आपलाले डेऱ्यास आले. विनायेकदास व खंदारकर हवेलींत रात्रपावेतो होते. येकदोन भांड्याची पेंवे सापडली. येक पेंव खंदारकरास भांड्याचे सांपडले. काल पंचवीसतीस मण भांडी सापडली व खंदारकरास येक दाण्याचे पेंव सापडले. नक्त काही सापडलें म्हणोन बोलतात. परंतु पतेवार ठिकाण ला(गला) नाहीं प्रमाण कललियावर शेवेसी लिहितो. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*This is a news-letter reporting that the Nizam encamped at Shrigonda and ordered to search carefully Sindia's residence for hidden wealth.*

No. 45] [*18-12-1761* ?

श्री

चिरंजीव राजश्री हरिपंत तात्या याप्रति आबाजी बल्लाळ मुकाम पुणे आसीर्वाद उपरी. येथील क्षेम ताा मार्गसीर्ष वद्य सप्तमीपावेतो सुखरूप असो विशेषे. तुम्ही पत्र छ १८ जमादिलोवलचें पाठविले ते पावले. पेडगावचे सुमारें मोंगल जातो म्हणोन लिहिले ते कललें. पुढें मोंगल कोणीकडे जाणार हे सविस्तर लिहोन पाठवणें. इकडील वर्तमान येथास्तित असे. तीर्थस्वरुप राजश्री काकाकडोन वसईचा मजकूर लिहिला होता त्याचें उतर पाठवावें. वस्तवानी सर्व लोहगडास गेली. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वाद.

पोष्य वासुदेव नारायण वैद्य साा नमस्कार लिहिला परिसोन हरघडी पत्र पाठवीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Abaji Ballal writes to Haripant Phadke, his younger brother, communicating the writer's well-being at Poona.*

No. 46] [*20-12-1761* ?

पोा छ २६ जमादलावल

श्रीदत्तात्रय

सेवेसीं आज्ञाधारक जीवनराव केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम तागायत छ २२ जमादिलावल मुकाम मौजे कडेगत परगणे आंबडपावेतो सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों, ते किले आमदानगरावरून गुंजालियाचे घाटे उतरलो, तों वर्तमान ऐकिलें

6532

जे, शहरांत मुरादखानाचा भाऊ हिमतखान आहे, त्याणें तमाम सरकारचीं ठाणीं उठऊन आपलीं ठाणीं सेंदुरवादे व पिंपरी व येकतुनी व दाभाडी व आंबड वगैरे येथें बसविलीं. जाळनापूरच्या ठाणियास खंडागलीयाकडील दोनसें स्वार व दोनसे प्यादे येऊन मोरचे दिल्हे आहेत. पैठणास ठाणें सें दोनसें स्वार व प्यादे यैसे मोकरर होऊन शहरापासोन कोस दोन आले आहे, हें वर्तमान ऐकून छ १८ रोजीं विसा कोसाचे कूच करून सेंदूरवादें येथें जाऊन तेथें मोगलांचे तर्फेन कमाविसदार होता तो धरून आणिला, ते दिवसीं तेथील यात्रेचा सेवटला दिवस होता. थोडी बहुत यात्रा होती, त्यामुलें कोनकोनाची यात्रेच्या लोकांची वस्तभाव लुटली आली. तैसेच परतोन येऊन तेच दिवसीं सावखेडियाचा मुकाम केला. दुसरे दिवसीं तेथें मुकाम करून जे वस्तभाव मात्र कराराची आली होती ते ज्याची त्यास पावती करून कबजे घेतली. तदनंतर पैठणास आलों. तों पैठणास ठाणें येत होतें तें परतोन शहरांत गेले व बिडकीणगावचेंहि ठाणें उठोन शहरांत गेले. त्याउपरि मुकाम मजकुरास आलो. येथून जालनापुर बारा चवदा कोस आहे व आंबड नव कोस आहे. ऐसियास स्वामीनी तों मजला हुजूरून रुकसत करविलें जे, तुम्ही आपल्या मुलकांत जाऊन तेथें कांहीं पैसा पैदा करून फौजेचा पैसा जेथवर झाडेल तेथवर झाडणें. त्यास दरमियान मोंगलानीं सरकारच्या कमाविसदारास उठऊन देऊन आपलीं ठाणीं बसविलीं, यास्तव पांच सात दिवस या प्रांतीं राहून मोंगलाचीं ठाणीं उठऊन देऊन, सरकारच्या कमाविसदाराचा अमल चालता होयेसे करावें लागतें. मोंगलाचीं ठाणीं टाकून पुढें जाता येत नाही. मोंगलाची ठाणी उठवायास जावें तरी मार्ग सरकारचया मुलकांतून, जगलांत जिराईत, फौज ज्या वाटेणें जाती तेथें जिराईत खराब होईल. जेथें ठाणें असेल तो गांव मारला जाईल, हुजूरची ताकीद कीं सरकारच्या परगणियास उपसर्ग न लावणें. येविसीं जीं आज्ञा काये ती सादर जाली पाहिजे. आज्ञापत्राची मार्गप्रतीक्षा करावी तर जालनापुरास रामचंद्रपंत खंडागल्याकडील याणे मोरचे लावले. आम्हीं जवल असतां ठाणें गेलें तर येक प्रकार दिसेल यास्तव जालनापुरास गेलों. श्रीकृपा आहे तरी त्याचें पारपत्य स्वामीच्या प्रतापें करूण होईल. तदनंतर अंबाडास येऊन ठाणे घ्यावयाचा उपाय करीन. पडतूर प्रांतांतहि जाईन. तदनंतर जतीच्या माहालांत जाईन. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

सेदूरवादे येथील मोगलाचे कमाविसदार धरले. त्यांच्या पायांत बेड्या घालून सेवाळेयास पाठविले हे विज्ञापना.

¶*Jivanrao Keshav reports his expedition into the Nizam's territory towards Paithan and Jalnapur to collect tribute.*

6533

No. 47] [Received 24-12-1761

पौ छ २६ जावल
दीड प्रहर रात्र

श्री

राजश्री रघुनाथ पंडित गोसावी यांसी

᳚ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित उदाजी चव्हाण हिंमतबहादर ममलकतमदार दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाला. मोगल शहर औरंगाबाद येथें येऊन सडा होऊन, मागती गंगातीरास क्षेत्र टोंके येथें आला. देवब्राम्हणांचा गांव त्यास कौलकरार देऊन येक रोज रखवाली केली. दुसरे रोजीं मुकाम तेथें करून श्रीस भग्न करविलें. देवालय आदिकरून गांव सर्व जाळिला व ब्राम्हणांस उपद्रव केला. याप्रमाणें हिंदुधर्मावर यांणीं बदनजर ठेविली आहे. कौल देऊन विश्वासघात केला. याचें पारपत्य पुरतें करून नस्तनाबुद करणें प्राप्त जालें. मागें हमेशा बिघाड सलुक होत गेले. परंतु याप्रमाणें असुरी दुष्कर्म जालें नव्हतें. हिंदुधर्माचा उछेद केला. ये गोष्टीची ईर्षा सुब्यावर आहे. कितेक लोक कितेक प्रकारें आम्हांविशीं आपणास सांगत असतील; परंतु आमचें लक्ष आपणांपाशीं आहे. आमच्या येण्यास दिवसगत लागायाचा प्रकार आपणांकडेच आहे. आजच्या प्रसंगीं ह्या ईर्षेपरीस दुसरी इरे नाहीं. याउपरी लिंगोपंताजवळ आपण सरंजामाची रीत सांगोन उतर समर्पक येतांच, आम्हीं दरकूच येतों. कळलें पाहिजे. विशेष काय लिहिणें, कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे, हें विनंती.

¶*Udaji Chavan learns of the sack of Toka by the Nizam and promises to join the addressee if proper arrangements were made for his force.*

No. 48] [25-12-1761 ?

श्री

श्रीमंत महाराज राजेश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी. सेवक अगन्याधारक येसाजी नाईक बातमीस मुरादखान याजकडील वर्तमान छ २१ जमादिलोवलीचे रोज रामचंदर व नासरमन मुलीख व महमूदखान गाडदी अयेसे तीन सरदार अपनाकड आले. त्याच्या निघालीयावर नवाबानीं मुरादखानास अघाडीस पाठविले. त्या दीचे सार निघनार होतो तो धरूण देवडीस नेले. खारीमधें

ताकीद केली कीं सार बाहेर न जाऊ देन. मुरादखानस हरवलीस फरमावले तो आज आघाडीस होता. केडगांवावर मुक्काम जाला. येंह वरत की यावर काये होईल तो सेवेसी विदित होईल. हे विदन्यापना.

¶*A news-writer gives to the Peshwa news about the movements of some Sardars of the Nizam.*

No. 49] [*Received on 28-12-1761 ?*

पौ छ १ जाखर भोमवार

श्री

श्रीमंत राजश्री बापू साहेब
स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामींनी जासुदांचा मार लिहीला त्याप्रो राजश्री राजे विठलराव यांसी विचारिलें. त्याणी उतर केले कीं, आम्हाकडून कोणी गोष्टीचा आटकाव नाहीं. श्रीमंताकडून आटकाव जाल्यास आम्हासहि केला पाहिजे. तिकडून निर्मल जाल्यास इकडूनहि गुंता नाही, ऐसे बोलिले. त्यास बातनीचे कामास दोहीकडूनहि आडथला नसावा हें उचित आहे. हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram writes to Sakharam Bapu saying that Vithal Sundar is equally anxious that a common understanding should exist between the Peshwa and the Nizam, on the point of messengers residing in hostile camps.*

No. 50] [*About 30-12-1761*

श्री

सेवेसी मल्हार बाबूराव विज्ञापना. सुकुरवार तिसरा प्रहर मुा उरली. नवाब निजाम आलीखानानी राजे विठलदासास चोबदार बलाऊन पाठविला. राजे विठलदास तेच स्वार होऊन नवाब निजाम अलीखानाचे डेरियास आले. च्यार घटका खिलबत जाहल. मजकूर कांही कलला नाही. जाहेराना सुलाहचा मजकूर. लस्करांत गलाची धारन जोर बाजरी च्यार सेर शास, मठ शास च्यार सेर, हरभरे शास आडीच सेर, पीठ तीन सेर, कनीक आडीच सेर, तांदूल आडीच सेर तूप पाऊन सेर, गूल दीड सेर, तमाखू सेरभर या प्रमान धारन आहे. नदीचे काठोकाठ किराना आपले लस्करातून बेपारी आणीत-असत, येविसी ताकीद करनार धनी समर्थ आहेत. डोंगर कडाडीन दाना निघतो त्याजमुल लस्करात

स्वस्त जाहाल आहे. वैरनकाडी थोडीबहुत मिलतच आहे. बाजे कोन्हास मिलतहि नाही. नवाबाचे खासे हत्तीस चिंचाची लाकड खायास व लक्षुमणराव खंडागलेचे हातीपुढे तरवड व कांट्या पडल्या आहेत हे विज्ञापना.

¶News from the Nizam's camp about an interview between the Nizam and Vithaldas and the rates of corn prevailing in the camp is reported to the Peshwa by Malhar Baburao.

No. 51] [*About 30-12-1761*

श्री

सेवेसी मल्हार बाबूराव विज्ञापना. रविवार प्राथःकाल मोगलाचा कुचाचा नगारा जाहला आहे. मुल नदीवर जानार यैसी वदंता आहे. आनंदराव निंबालकर स्वामी समर्थाचे भेटीस येनार आहेत यैसी वार्ता आहे. श्रुत होये हे विज्ञापना.

¶Malhar Baburao sends news that the Nizam is ready for the day's march. A rumour that Anandrao Nimbalkar is to see the Peshwa personally in connection with the peace negotiations is also referred to.

No. 52] [*Dec. 1761*

श्री

सेवेसी नारो शंकर विज्ञापना.. स्वामींनीं चिठ्ठी पाठविली ते वाचून चित्तास परम खेद जाहाला तो पत्रीं कोठवर ल्याहावा? यवनांकडे हिंदु सरदार आहेत त्यांसहि स्वामींनीं चिठ्या ल्याहाव्या, जे तुम्ही हिंदु मातबर सरदार असोन देवाचा विध्वंस करविला यांत तुमचें कल्याण होईल कीं काय? ऐसें अगत्यरूप मर्जीस आलें तरी ल्याहावें. वरकड युध्याचा मजकूर स्वामीचा विचार तोच आमचा. भवानीशंकर स्वामीचें आराध्य तो यवनांचा निःपात करील यांत संदेह नाहीं. आपण प्रतापी, तपस्वी, पुण्यवान आहेत. भवानीशंकर स्वामीचा मनोरथ सिद्धीस नेईल, संशय नाहीं. स्वामीच्या आज्ञेप्रमाणें लोकांस बोलाऊन ताकीद केली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

भोसल्यांसी ताकीद करून लौकर येत तें करावें, हें विज्ञापना.

¶Naro Shankar writes to Dadasaheb saying that he is in full agreement with him regarding the campaign against the Nizam. The writer advises Dadasaheb to address a strong remonstrance to the Hindu Sardars of the Nizam against the wanton destruction of the Hindu temples by the latter's forces.

No. 53] [December 1757

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे
सेवेसी

आज्ञाधारक सेवक कृष्णाजी हरकारे मुा लशकर नजीक निजामआली साा दंडवत विनंती उपरी. विनवावया प्रार्थना येसी जे, कालचे लडाईमधे दोन सुबेदार हिबराहीमखां गारद्याचे सांगातील कामास आले व गारदी जखमी सुमार १९ जाले. असमलखां पठाणा सांगातील दोन जौनें[1] कामास आले व पधरा जौन जखमी आहेत. या सिवा(य) तमासे बीन व कहीवाले कामास व जखमी जाले. याउपरातिक आज सणवारी येथून कूचे करीत होते. तितक्यामधे सलाबतजेंगाचा साडाणीस्त्रार आला. सांगून धाडले की तुमचे लशकरचे कितिक लोक जखमी जाले व कितीक कामास आले ते मजला लेहून पाठवा. मग कूचे करा. त्याचे उतर यानी पाठविले त्याचा मैब (?) आलियावर कूचे मुकामाची खबर सेवेसी विनंती लिहिली जाईल व बसालतजेंग येथ येणार आहेत. कलाव बहुत काय लिहिणे आणि आज धाणेरा पिटला की जरिदे स्वारी सांगाते येणे व रांडपोर कोन्ही सांगात न घेणे व दाणा चौ चौ दिवसाचा घेणे व आज खलबतीमधे नवाब व वाजदे आली व मुरादखां व विठोजीपंत व दरवेश महंमदखा अर्जबेगी व हरकाऱ्याचा दारोगाहि होता आणि मग नवाबसाहेबी म्हटल की आज दोन प्रहर जाले, परंतु मऱ्हाटेचे लशकरची बातमी ताहल[2] न आली सबब काय ?

व देहडीवर चौबदार बोलत होते की पठाणाचे घरचे दोन बाणाचे उंट व येक नगाऱ्याचा उंट व तोफाच्या बैलाची माल घेऊन गेले, इतक्यात इबराहीमखा गारदी फार म्हणतो की मजला येकल्यास हुकूम कराल तर मी जाऊन लढाई घेईन. लोक खर्चावाचून फार हैराण आहेत. दंगा देहेडीवर होणार आहे.

¶Krishnaji Harkare sends news to the Peshwa describing a skirmish between the Maratha and the Nizam's forces. This letter probably refers to an earlier campaign when Ibrahimkhan was serving the Nizam.

No. 54] [1761

श्रीगणराज

सेवेसी गोपालराव गोविंद विज्ञापना येसीजे. आजी तोफा लावावयाचा मोठ लाग होता. परंतु आलस कां केला न कले. असें केल्यानें मोगल आया कस

---

१ जौन = जवान = सिपाई. २ ताहाल = आतांपर्यंत, अद्यापि.

येतो? त्यास तो पुण्यास जाईपर्यंत दररोज तोफा लावाव्या. महागाही त्याच्या लष्करांत बहुत जाली आहे. यास्तव जितकी मेहनत निकडीची होईल तितकी कामाची. मेहनतही जों पुणेंयाचा तसनस न जाला तोंच करावी. मग करून सार्थक काये? सर्व काळजी धण्यास असतां सेवकांनीं लिहिल्यास स्वामीस वाटेल कीं, आपल्या घराचे काळजीकरितां लिहितात. परंतु आम्ही लिहितो ते घराकरितां लिहित नाहीं, सरकारकामास्तव लिहितो. करणे न करणे धण्याचा एखत्यार. विदित होय. आमचेनें उगे राहावत नाहीं यास्तव लिहितो. हे विज्ञापना.

¶Gopalrao Govind enquires as to why guns were not brought to act at the proper time. He also suggests measures for preventing further devastation by the enemy.

No. 55] [*About 26-1-1762*

पुरवनी.

[मागील बंद गहाल.] ने सर होईल याची (चि)तात काळजी न आणावी. इकडील येवणाचाहि युध्य प्रसंगाचे त्यास वर्तमान ल्याहावे कीं, तिकडून शकटभेद करून मोगलआली व रामचंद्र जाधवराव यास सैनापति कबूल करून आणिले. परंतु त्यास सैनापतीचे यैवजी इकडील मुल्हक देऊन त्याचे मनोधारन रक्षिले. तुम्हीहिं तिकडील बंदोबस्त करून भेटीस सत्वर यावे. तुमचे आलियावर जो मनसबा हिंदुस्थानचा करायाचा असल तो करून. यैसी निखालसपनाची पत्रे गेलियावर त्यास सहजच [फाटले] त होईल की, आम्ही चाकरीचि प्रसंगास गेलो नाही, परंतु त्याची ममता आमचे ठाई पूर्ण आहे. याजमुले पुढे कामकाज मातबरच त्याजपासोन घडोन येईल. मुलकीहि दबाव मातबर राहिल की त्याचे संग्रही जितके मातबर माणूस आहेत त्यांच्या उभारणिया. उत्तम प्रकारच्या केल्या, तेव्हा सहजच म्हनतील की श्रीमंतांचे बरोबरीचे मातबर मणुशे आहेत यैसा मुलकी दबाव पडलियास सहजच सर्व बंदोबस्त माहाराजांचे मनोदयानुरूप घडोन येतील. मातबर माणूसहि साहेबांचे संग्रही बहुत आहेत, परंतु मुलकी जुजरसी करून आपला बंदोबस्त रक्षिला यैसा जो असल तो कोन्हेहि जातीचा असो, परंतु साहेबचाकरीस अंतर न पडे यैसा जाणून त्याची उभारणी केली तर पुढे साहेबा(स) काबाल खंदार परियेंत मुल्हक सर होऊन हस्तगत होईल. परस्तुत येकदोन वरीश खजाना जमा करायाचा हेत धरू नये. पुढे मुलकी बंदोबस्त जालियावर खजाना बहुत मिलल. कितीक शेवेसी मजकूर लिहिला

म्हणोन सेवकाचा अपराध क्षमा करावा. आम्ही बातमीचे फक्त चाकर आहो. परंतु साहेबाचे अन्नाचे प्रतापे जो सुचला तो सेवेसी लिहिला आहे. अंतर पडत असल तर क्षमा करनार आपन समर्थ आहेत. सेवेसी विज्ञाप्ति.

¶*This fragmentary paper mentions the winning over of Ramachandra Jadhavrao and Mir Mogal to the Peshwa's side from the enemy's ranks.*

No. 56] [*31-1-1762?*

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना तागाईत छ ९ जमादिलाखरपर्यंत वर्तमान यथास्तित असें विशेष. जागजागां पुण्यात कुचेबंदीचे मेढे घालणें, तोफाची सोये करणें, मोर्चे बांधणें, या गोष्टीची जलदी ज्या प्रकारें आज्ञा आली त्या प्रकारें करीत असों. मोगलाचे पारपत्य व्हावे, स्वामीचीच जरब त्याजवर बसावी ही गोष्ट आबाल-वृद्धांचें चितांत आहे; परंतु या गोष्टीस सर्व प्रकारें तरतूद मेहनत रात्रंदिवस आठपंधरा दिवस उत्तम प्रकारें होऊन आमचे लस्करांतून दाणा कितेक प्रकारें जातो. वकील बराबर वीस पंचवीस उंठ येतात ते भरून जातात, राऊत पडशा नेतात. पोहचावणार पोहचवितात. ये गोष्टीचें पारिपत्य होऊन बंदोबस्त होईल, आणि लढाईच प्राप्त जाली तर हिमतीनें लडाई होईल. तर मोगल आलीची व जाधवरावाची जागीर बहाल होऊन मग बरोबरीचा सलुख होईल, त्यांत वजन आणि लौकीक. जर मेहनत परिछिन्न रात्रंदिवस फौजा उभ्या करून चौफेर होत नाहीं, लडाई पडल्यास हिंमत धरून सरदार झुंजत नाहींत, तर जसा होईल तसा सलुख येव्हांच करणें उचित. स्वामी सर्वज्ञ, स्वामीस सर्वहि समजतें; परंतु त्याप्रमाणें रूपास आल्यास यश कीर्ति दिगांतरी जाईल. चहूंकडे मुलकांत दाणा आहे; केवळ त्याबरोबर महिना दोन महिने फिरेन म्हटल्यास त्यास दाणा-पाणी चारा मिळेल. आणि स्वामीस पोटाचें संकट पडेल, यास्तव जरूर मेहनत करून जरब देणें तर रात्रंदिवस भोंवतीं गस्त जाली पाहिजे. गोल्याचे मारा-बाहेर कडें फौजेचें बसेल तेव्हां मोगल जेर होईल. स्वामीचे स्वरूपाप्रमाणें कार्यहि होऊन येईल, यांत संशये नाहीं. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Preparations to defend Poona and overcome the invading forces of the Nizam are reported. The writer warns the addressee (Peshwa) to beware of his own Sardars who do not put their heart in the campaign.*

No. 57] [January 1762

श्रीगणराज

सेवेसी गोपाळराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक सा। ना। विनंति सांडणीस्वार आले याणी राजश्री रामचंद्र जाधवराव येऊन फौजासुधा भेटले म्हणोन सांगितले. आम्हीहि विसा घटिका रात्रीस करारप्रमाणे बाण टाकिले. राजश्री नाइकाचाहि ग्रहस्त आम्हाजवळ होता. प्रात:काळी केडगावाज * * * आम्हांसहि थोडे थोडे वर्तमान कळलेच. आम्ही रात्रौ उपवासी, घोड्यास दाणा नाही, यास्तव गोटास आलो. जाधवराव आले, निमे काम जाहाले. स्वामीचा पुण्यप्रताप विचित्र आहे. मोगलहि बुडतो. संशय नाहीं. नवाब मोगल अलीखानहि आले फार करून कामच जाले. काही बाकी राहिली नाही हे विज्ञापना.

¶*The letter is addressed to the Peshwa by Gopalrao Patwardhan and Malharrao Raste saying that negotiations have proved fruitful as a result of which Ramchandra Jadhav has deserted the Nizam and has come over to the Peshwa with all his forces.*

No. 58] [January 1762?

श्री

श्रीमत् सेवेसी

दंडवत विनंती उपर. श्रीमत् आज्ञेप्रमाणें नवाब यांस अर्ज केला कीं श्रीमंती सांगितलें आहे जे दुतर्फा फौजा अजीम मिळाल्या आहेत. याजकरितां रईयेतेची पायेमाली होती ते न व्हावी व दुतरफाहि माली मुलकी बंदोबस्त करावयासी जावें लागतेंच, परस्परें स्नेह जाला. याउपर नवाबसांनी आमच्या डेरियासी यावें. व आम्हींहि त्यांचेथें येऊं येसा अर्ज केला. त्यानी फर्माविलें कीं येविशई श्रीमंत आम्हासीं व आम्ही श्रीमंतासीं काहीसें बोललो आहोत कीं खलकुला[१] अराम पावे ते गोष्ट कांही मुर्नेके[२] करावी. राजश्री गोविंद सिवराम बक्षी व राजश्री राजे विठलदास यांसीहि येविशई आज्ञा केली आहे. ते विस्तरें विनंती करितील. सारांश याचे मनास कीं आपण अगोधर कृपा करावी हे विनंती.

¶*The writer communicates Dadasaheb's request to the Nizam and his reply to it that he is in complete accord with Raghoba in the matter of preventing molestation of ryots caused by the encamping of the two armies as peace has been concluded.*

१ खलककूल = सर्व लोक. २ साफ, अवश्य.

No. 59] [2-2-1762?

छ ७ रजब.

श्रीशंकर

विज्ञापना शनिवारी दोन प्रहर रात्रपरियेंत बसून हणवतरावाचा जागीर येक लाख चोवीस सरकारात पंचावन हजार बीड व परबणी लिहून दिल्ही, ते आम्हापासून मुजरा घेऊन बहाल म्हणोन दसखते जाली. विज्यापुरात ती लाखाची बाकी राहिली तिचे माहाल भरती हवेलीत गावगणेवार न होता जवलील तरफात व्हावी ते जाली नाहीं. राजे बिरजनाथ व अबूलफकरखा बसालतजंगाकडून शनवारी रात्रीस आले. खान भेटीस आले. बिरजनाथ आज प्रात:काली येणार. त्याचे भेट जालियावर लिहूं. दसखत करूं असे म्हणतात. बलवंत बाबूराव व धोंडो राम याचे नावे राजाजीही दोन दोन हजार व जगनाथपंत येक हजार व हशम तुळाजीस ८०० रुपये सिरसालीयातील बाकी दसखत करविली. आमानत माहाल मेहकर व धारूर याची फर्द दसखत जाली नाही. आज करूं म्हणतात. आम्हास येथूनच रुखसत करूं म्हणतात. तोपरियेत कामे (उर)कतील ते सेवेसी विनती लिहिली जाईल. बहुत काये लिहीणे हे विज्ञापना.

¶*This letter mentions the territory made over to the Peshwa by the Nizam.*

No. 60] [13-2-1762?

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक राघो शंकर दिा धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ताा छ १८ माहे रजब मु मुाारूग पाा उदगीर जागीर जाधवराव स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. यापूर्वी वरचेवर सेवेसी विनंतीपत्रे विस्तारे पाठविली आहेत त्यांजवरून सविस्तरे ध्यानास आले असेल. प्रस्तुत नवाब भागानगरचे बाहीरून चालले ते दर मजल छ १० रजबी कसबे कारेमुंगी वांजरातीर जागीर रुस्तुमराव पांढरे तेथून बेदर सात कोस तेथे येऊन पोहचले. आगोधर तजवीज केली होती की वांजरासंगमचे घाटे गंगा उतरावी. सरदारास वरचेवर ताकिदा गेल्या की तुम्ही वांजरासंगमचे तेथे जलद येणे. स्वामीची तर यांजला त्वरा की जलदी येणे. दुसरे शेरजंग व धोंडो-

राम व मोरोपंत याणीहि वरचेवर नवाबास लिहिले की विलंब कामाचा नाहीं. याजकरिता याणी तजवीज केली कीं वांजरासंगमचे घाटे जलदीने उतरून माहोर प्राते व्हावे. त्यास सरदार आद्याप घरोघर, जर नवाब वांजरेसंगमचे घाटे चालले, फौजा माघाऱ्या राहिल्या, समयास न आल्या तर येकले जाऊन काय करावे, म्हणून रुकनुदौला व जगनाथपंत तजवीज करू लागले. निदानी हे ठराविले कीं, उदगीर वरवाल राजुरे इकडून चालल्याने जाधवराव उभैता निंबाळकर सदासिव रामचंद्र वगैरे दबाव दिल्याने तालुके खराबीत दरमजल चाल्याने येत गेलिया सत्वर येऊन शामील होतील, म्हणजे फौजसहित मसलतीचे शुमारे चालू. विना-सरदाराचे सरहदेस गेल्याखेरीज सरदार लवकर येणार नाहीत. येणेप्रा तजवीज केली. सराफा रुकनुदौलाचे भाऊ भागानगरीहून लस्करास यावयाचे होते म्हणून नवाबानी कारेमुंगीवर च्यार पांच मुकाम केले होते. सराफा व दिवानजीचे भाऊ लस्करास येऊन छ १३ रजबी शामील जाले. यानंतर नवाबानी कोर-मुंगीवरून छ १९ रजबी कूच करून दरमजल उदगीरचे शुमारे दोन तीन मजला पुढे आले. येथून उदगीर सा कोस आहे. प्रस्तुत तालुका जाधवरायाचा आ (अपूर्ण)

¶*Ragho Shankar writes to Dadasaheb, giving the movements of the Nizam whom the addressee had befriended against his own nephew Peshwa Madhavrao. The writer informs when and where the Nizam can be expected to join Dadasaheb.*

No. 61] [*11-4-1757*?

श्रीराम

छ २१ रजबी मुकाम केला. प्रहरा दिवसापासून दोन प्रहर रात्रपरियेंत सिबंदीचा हगामा होता. दो प्रह(र) रात्रौ कृस्णाजी मोरेस्वर आले. ती लक्ष्या रुपयापैकीं काही भरना, नगदी दिधला. बाकीचा हवाला इबराहिमखा गारदी याचा घेतला. परंतु तो कबूल करीत नाहीं. छ २२ रजबी सिकाकोल राजे बंदरीचे राज्याची पत्रे आली की, दो चौ मातबरा जागा तुमचे नावचे छेडे चढविले. कोन्ही सरदार मातबर जेलद रवाना करने. त्यासी आपन रुजू होऊन बंदोबस्त मुलकाचा केला जाईल. त्याजवरूण आदमखा गारदी काही फौजनसी बिदा (करनार). छ २३ रजबी कुच्याचे दोन नगारे जाले. [फाटले] तयार जाली. इबराहीमखा तयार जाले [फाटले] सांगून पाठविले की, लोकांचा [फाटले]

+ विठ्ठल सुंदराचा भाऊ, आणखी एक भाऊ चिंतोपंत म्हणून होता.

आहे, तर दीड लक्ष रुपये [फाटले] पाठवाल तर कूच होईल व पेशखाना नवाबाचा पुढे गेला होता तो गारदीयाने जाऊ दिधला नाही. त्यानंतर दोन प्रहर दिवस-परियेंत उभे राहिले. सेवटी लाच्यार होऊन मुकाम केला. त्याजउपर चौ घटका राजे विठलदास याची वधू आली. संध्याकालीच लग्न लागले. ब्राम्हनाचा समुदाये पंचेवीस होते. लग्न लागलियाउपर लज्याहोम जाला. त्यानंतर चिरा बांधून निमो[१] व शाल पांघरूण नाच पाहत बसले. आनीक मनसबदार वगैरे उमदे लोक आले होते. ब्राम्हनाही मना केले की, साडे जालियाउपर पोशाक करणे. त्यासि त्यांची गोष्ट चितास न आली. नवाबसाबानी एक चिरा व केशरी जामा वगैरे वस्त्रे व त्याचे श्रीस जेडावाचे बाजूबंद दिधले. मोरोपंत, त्याचे बंधु, यास वराडची नायेबत देनार आहे. जानोजी भौ कूच करूण वनीवर गेले. सांडनीस्वार आला की, तुम्ही जेलदीने कूच करूण वनीवर येने. निर्मलचे जमिदाराचा वकील आला आहे की, खोज्या आमील पाठविला आहे त्याचा अमल दखल होत नाही. काही फौज कुमकीसाठी देने. त्यास उतर केले की, नवाब साहेब पंधरा रोजात त्या जालियात येतात. कुल बंदोबस्त होऊन येईल. लक्षेमनराऊ खंडागले याचे नावे पत्रे लिहून दिधली की, खोज्या सरकारचा आमील नर्मलेस पाठविला आहे त्याचा बंदोबस्त करून देने. यैसी मुखे समज्यायेश केली. छ २४ रजबी मुकाम (केला). रात्रौ राजे विठलदासाही साडे केले [फाटले] रजबी मुकाम करूण इबराहिम [फाटले] समज्यायेश केली. पैसा नगदी दिध [फाटले] करावा. मनसबदार जानोजीचे [फाटले] की, पैसे बाकीचे सत्वर पाठऊन देने [फाटले] चे लोकास दिधले पाहिजेत. नवाबसाबाने राजे विठलदास यास संतोशाची वस्त्रे दिधली. येक जिगा किमत रुपये पंधरासेचा बक्षीस केला. जानोजी भो याने वनीचे गढीसी मोरचे लाविले आहेत. येक हला केला होता त्याविळेस पनास मनुशे ठार जाले. पंचेवीस जखमी जाले. गढीत सरंजाम बहुत आहे व पानी व दारूगोली सा महिने पुरल यैसी आहे. परंतु मुधाजीने लिहिले आहे की, जानोजीसी लडाई करायासि अंतराये न करणे. मोगल येईल तर त्यासी भेटने. छ २६ रजबी कुच करून मौजे नादापूर पाा वन तेथील मजल केली. वनीचे लोकावर मोगलाची सलाबत पडली.

[पुढील बंद गहाळ.]

¶*News from the Nizam's camp reporting the marriage of Raja Vithaldas. It belongs to an earlier period, when Ibrahimkhan was in the Nizam's employ.*

---

१ आंतून घालावयाचा अर्धा आंगरखा.

No. 62] [13-4-1762

[पहिला बंद गाहाळ.]

२

पुरवणी श्रीमत् माहाराज राजश्री पंत प्रधान स्वामी करून आणविले की तुम्ही आम्ही तिनी पिडीचे आहो. तुम्हास आम्हास काही सुटत नाही. येंदा तो परगणें कर्जदारास घालून दिल्हे आहेत. पुढे चिटगोपे सोडून देतो, खुशाल राहणे. आपले परगणे नवाबाखाले वगैरे गुतले आहेत ते सोडून आलियाउपरी दोनी माहाल तुमचे तुम्हास देऊ. तुमचा आमचा दुसरा विचार काये आहे. रो भास्करराव व माधोराव सदासिव व लक्षेमणराव व आपाजीपंत बेबलखेड यासी सोडून द्यावे. त्याच नाव न घ्यावे. याप्रमाणे रो आपाजीराव मलार यासी भालेरायाकडून फासा घालून आणिल. प्रेमपत्री भेटी आण प्रमाण जाहाली. घोडा १ बैसायासी दिल्हा. डेरा दांडा राहुटी पाल काही नाही. चौघ खिजमतगार व रो नरसिंगराव व जिवाजी माणकेश्वर * * * राव बकसी येक दोघ ब्राह्मण समागमे आहेत. येऊन पछयातापात पडल्यासारखी गोस्टी दिसते. आपाराऊ मलार याचे समाधान प्रेमरी (?) करून छ १७ रोजी मंगलवारी तेथून कूचे करून नवाबाचे मुलाजमतीस आले. छ १८ रोजी नवाबाची व जाधवरायाची भेटी जाहली. बेदरानजिक वाडीवर दिडा कोसाचे तफावतीन गोला चुकवोन आवघे उतरले आहेत. नवाब सलाबतजंग याची फोज व बशालतजंगाची फौज मिलून सात आठ हजार आहे व उभयेताचे गारदी पाच साहा हजार तोफखाना वगैरे जे काये आहे ते सेवेसी विदित्य अस. नवाबाची व जाधवरायाची भेटी जाहालेया तेसमई समागम कोणास नेले होते म्हणाल तरी जाधवराव, व आपाजीराव मल्हार व भालेराव तिघाच्या भेटी जाहाल्या. सांप्रती जाधवरायाची व भालेरायाची प्रीति श्नेहभाव विशेषाकार दिसतो. आपाजीराव मलार याजवर तेजिल[१] नाही. म्लानवदन दिसतें. लक्षुमणराव बेदरात आहे. बेदरास नवाब आल्या उपरी येक दोनी लडाई जुझा जाहाल्या. त्याजवरी छ २३ रोज सोमवारी हाला करविली तेव्हा शाहार सोडून बाहीर किलेदाराचे मोरचे जागा जागा बैसले होते याजवरी मोगलाकडील तमाम फौजा व गारदी व तोफखाना नेऊन हाला करविला, तेव्हा नवाबाकडील करीमखान गारदी व बकसी यानी जाऊन त्याचे दोनी गुमज घेऊन मोरचे तुडविले. से पनास लोक त्याच याचे जखमी जाहले. दाहा पाच मृत्य पावले. नवाबाकडील लोकानी किलेदाराचे लोक मोडून शाहरात पलविले. मोड खावोन पलून

१ तजेला, हुरूप.

जात असता हे पाहोन जाधवरायाकडील लोकानी घोडी घालून खंदक दाखविला, तेठाई रो उजनाजी येथील याचे माडीस तिरकस भाला लागला. हाड वाचल आहे. खैर अस. यासिवाये पांच सात भले लोक जखमी जाहले व पाच सात गार्दी जखमी जाहले. त्या दिवसी मंगलवार पेठ व दोन गुमज धरून नवाबाकडील मोरचे काईम होऊन बैसले. नवाबाकडील लोकानी मोरच बरे चालविले आहेत. त्यास व खदकास बान टपा अस. तमाम जागा जागा धरून आहेत. जाधवराव व पाढेरे येक जागा लालकोट व महजीद तफिराचा तकिया धरून बैसले आहेत. इकडील तोफाचे गोले गावात जातातीं. त्याचे गौले याजवल येतातीं. छ २८ रोजी प्रात:काली किल्याचा गोला जाधवरायाकडील महजिदीचे. मोरच्यात पडून तिघे गारदी निजले जागा ठार जाहले आणि नवाबाकडीलहि दोघ उडून गेले. गावात नित्य सेहे पौणासे गोले हाणितातीं. गावातहि माणसे जाया जाहाली असतील. पूर्वी किलेदारानें या कजियास्तव जाधवरावाची एकत्र करून घेतल होते. पुढे सला जाधवरायाचे विदमान होणार. किल्याचे लोक याजकडे येत जात असत. यांचेहि जाऊन येतातीं; आणि रदबदलीचे रोखे जाधवरायाचे नवाबाकडे येत जात आहेत. पुढे कैस करितातीं पाहावे. आणि चितापूर प्रांती पाच साहा गावात सरकारची ठाणी आहेत. याकरिता नवाबास पैगाम लाविला आहे की मातबर च्यार (अपूर्ण).

¶*This fragmentary news-letter describes a skirmish between the Nizam and Laxmanrao Khandagale at Bedar. It incidentally mentions several persons—Bhaskarrao, Madhorao Sadashiv and Apajirao Malar etc. and also the peace talks opened by Jadhaorao.*

No. 63] [*11-6-1762*

पौ छ १७ जिलकाद.

श्री

पुा श्रीमंत मा राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ऐशीजे. नवाब निजामआलीखानानी खलिता व राजे विठलदास यांणी सेवेसी पत्र पाठविलें आहे, देवाजी नागनाथाचे विद्यमाने, ते पावतील. राजश्री राजे विठलदास म्हणो लागले कीं, श्रीमंत दादासाहेबांची, आमचे यजमानाची व आमची शफतप्रमाण जाली आहे त्याजवर कायेम असो. तिलतुल्य आजपावेतों आम्हांपासून आंतर नाहीं व पुढेहि आमचा हाच मनोदय कीं, श्रीमंतांचा आमचा अकृत्रिम स्नेह चालावा. श्रीमंतानी हरयेक मनसबा करणे तो

आमच्या विचारे करावा. आम्ही जो मनसबा करणे तो श्रीमंतांचे विचारे करावा. श्रीमंतांनी आम्हांस सांगून पाठवावें कीं आम्ही आमकेकडे मुलुकगिरीस जातों, तुम्ही आमकेकडे जाणें. आम्हांवर येखादे समई पेंच आला तरी ते समई श्रीमंतानी ते गोष्ट ध्यानास आणू नये व श्रीमंतावर येखादा पेंच येखादे समई आला तरी ते गोष्ट आम्ही ध्यानास आणू नये. आम्हांस काम लागले आणि आम्ही श्रीमंतांस बोलाविले अथवा फौज बोलाविली तरी यावे व फौज पाठवावी. श्रीमंतास येखादें काम लगल्यास, श्रीमंतानी आम्हास बोलाविल्यांस जाऊं व फौज पाठऊं. ऐसा प्रकार श्रीमंतांचा व आमचा चालावा हेच यजमानाचे व आमचे मानस आहे. त्यास, श्रीमंताकडून वर्तमान येतात कीं, बिघाड करणार. त्यास हे गोष्ट काये आहे ? आस्तु. आम्ही तरी आम्हाकडून सहसा बिघाड करीत नाही. ऐसे असतां श्रीमंतानी बिघाड केला तरी ते गोष्टीस आमचा उपाय नाही. याप्रो राजाजी बोलले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. राजाजीच्या बोलण्याचा तरी भाव या प्रकारचा आहे. बोलण्यांत तरी कांही व्यंग प्रकार नाहीं. परंतु जमाव करितात, नवी फौज ठेविली आहे व ठेवितात व इंगरेजास बोलाविले आहे व करनाटकचे सरदार पठाण घोरफडे वगैरे यांसी बोलाविले आहे व बेदरची छावणी करणार. ऐशा कितेक गोष्टीवरून संशय होतो, याजकरितां वारंवार विनंती लिहितो. कचेपकें व जालें वर्तमान तरी सेवेसी वरचेवर लिहिलें पाहिजे हे विज्ञापना.

¶*The writer reports that while protesting through his minister—Vithal Sundar—against the Peshwa's warlike preparations despite friendly understanding the Nizam is calling together his forces.*

No. 64] [*12-7-1762*

श्री

पुरवणी श्रीमंत माहाराज राजश्री
दादासाहेब साहेबाचे सेवेशी

विज्ञापि ऐशीजे, छ १९ मिनहूस नवाब निजाम आलीखां व तमाण लाहाण मोठे अमीर त्रितीय प्रहरीं नवाब सलाबतजंगाचे डेरियास गेले होते. राजे विठलदास याचे शरीरीं समाधान नवतें. पोट येक दोन दिवस दुखत असतें यामुळें न गेले. तेथें गेलियावर नवाब सलाब(त)जंगानीं निजाम अलीखानास पांच पारचे वस्त्रें दिल्हीं. व खास मोहोर आपली निजाम अलीखानाचे स्वाधीन केली व लिआबदी+ निजाम अलीखानास सलाबतजंगानी दिल्ही. सर्व राज्याभाराचा बंदोबस्त त्यानीं करावा. सर्व येख्तीयार निजाम

+ = पोषाख.

अलीखानाचा हे करीतील तें करूत. आपण भोजन करून समागमें असावें हा प्रकार जाला. प्रस्तुत निजाम अलीखानानी डेरे दोन सलाबतजंगास पाठऊन दिल्हे. दुसरी बोलवा आहे कीं बसालतजंगहि याजकडे येतात म्हणोन वर्तमान येथें आलें आहे. बसालतजंग मागें फिरले याचे त्याचे लस्कराचा सत्ताविसा कोसाचा तफावत आहे म्हणोन बोली दाट आहे. पुढें छावणीस जावयाची बोली या प्रकारें आहे. येक मनसबा कीं हैदराबादेस जावें. येक मजकूर बिदरचा व येक आवरंगाबादेचा व सिकाकोल राजबंदरीची आवई आहे. आद्यापि निश्चयांत नाहीं. निश्चयां आलियावर मागाहून सेवेसी लिहून पाठवीन. हे विज्ञाप्ति.

¶*News is sent to Dadasaheb that Nawab Salabatjang has made over to his brother Nizam Ali the entire charge of the State's administration.*

No. 65] [*1-8-1762*

श्री

पुरवणी राजश्री जाधवराऊजी.

गुलाबरायें काशिंदाबराबर पत्र पाठविलें तें छ १० मोहरमीं रविवारीं च्यार घटिकां दिवस असतां पावलें. लस्कर आजी रविवारीं भडगावांवरी आहे. उदयीक कासारीचे घांटाचे वाटें गिरणाचे पाण्यावरी ६ कोस जातील. मलगांवावरी जाऊन तेथून कासारीकडे जावें येसें आहे. परभारें पाणी नाहीं याकरितां न गेले. उदापुराकडे निमें लस्कर गेलें. मुकरबखान अलम गोपालसिंग माधोराऊ पिंगळे आणिक कितेक हफिजुदीखान हिरदुलाखान मा। आनवरखान बहुत लोक घरास बिदा केले. बहिरही फारसी गेली. निमें लस्कर आहे. पहिले येथून लिहिले कीं सत्वर घांट चढोन जाणें; न गेलेत. आतां हे आडवे आले. जरी सोमवारीं घांट चढणें बनेल तरी जाणें. नाहीं तरी दोन्हीं लस्करें येक होतील. जरी घाट सोमवारीं चढवत नाहीं तरी जेथें असाल तेथेंच राहाणें. हे निघोन जातील. त्यावरी सुखरूप जाणें. नवाब विचारीत होते. जाब दिधला कीं, घांट चढोन गेले असतील. आपण तरी आलां. सज्ये आहांत. आता दोन्हीं लस्कर जवळी आलीं. संकट आहे. * * * * दाहा कोस आंतराय आसों दीजें. जवळी फार न येणें. काये काम आहे ? नित्य येक जोडी आम्हाजवळीं पाठवीत जाणें. खबर कळेल. नवाबाचें पत्र व आमचें पत्र पावलें असेल. पलाकडे आणीक घांस असेल तरी तिकडें जाणें. अथवा हे जातील ; मग जाणें. हें विनंती.

¶*The movements of the forces of the Nizam are communicated to Jadhavrao with a caution not to move northwards if he has not already done so.*

No. 66] [6-8-1762

पौ छ २७ मोहरम
श्रावण मास

श्री

राजश्री रघुनाथराव दादा
गोसांवी यासी

॥ सकलगुणांलकरण आखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीं रामचंद्र जाधवराव दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत आसावें विशष. बहुत दिवस जाले, आपल्याकडील वर्तमान कलत नहुते, त्याकरिता चित सापेक्षित आसतां आपलें पत्र आले ते प्रविस्ट होऊन चंद्रामृतें च्यातकतृती-प्रमाण आलाद जाहाला. कितेक मजकूर रा माणको शंकर याचे मुखोदगते विदित जाले. यैशास चिताचे ठाई बहुत आस्ता धरोन श्वराजे सेविलें होत की श्रीमंत नानासाहेब व भाऊसोचे जागा आपण उभयेता आम्हांस वडील आसत. रुबरू कामकाज करोन दाखवावें; आम्ही सरफराजीस पोहचावे, यैशे कितेक प्रकारचे आर्त आंतर्यामी स्मरोन आलो होतो, त्यास आमचे हातें काही कामकाज रूबकार घडून आले नाहीं. आपणहि न घेतलें. येक संवछर आवम्र बीनयैवजी करोन ठेविले. जमीयेती विन्हां आम्हां लोकाचा परिणाम सुधा नव्हे म्हणोन आठ दाहा हजार फौज बमयेजिनसी राहिलो. परंतु आपणाजवल नौकरी करोन दाखवायाचा योग घडला नाही. आखेर प्राख्तनाची गर्दश मात्र उभी राहिली, तेणकडून आपाये होऊन दुर्ग प्राप्त जालें सर्वस्व बुडालों. तदनंतर काही उदित कालाचा समये आला. आपल्यासहि कृपा निर्माण जाली. बंदविमोचेन केलें. यावज्जन्म आपले विस्मरण पडणार नाही. कितेकांनी पुण्ये खर्चिल परंतु आपण चितावर न घेता मुक्त केलें, यावत्प्राण हृदई स्मरणी करोन दिली प्रस्तुतहि सर्वस्व आपले आसो इतर आर्थ नाही. येविशईच कितेक मजकूर राजेश्री माणको शंकर याहीं सेवसी लिहील आसे त्यावरोन चितारूढ होईल. सदैव पत्रद्वार सांभालीत आसिल पाहिजे रा छ १९ मोहरम बहुत काये लिा हे * वीनंती.

¶*Ramachandra Jadhao writes a humble letter to Raghunathrao expressing his regret for not getting an opportunity for serving the Peshwa and requesting him to offer him service. The writer is grateful to the addressee for releasing him from confinement.*

6548

No. 67] [4-9-1762

पैवस्ती छ १९ भाद्रपद
वद्य प्रतिपदा मंदवार प्राथ—
कालचे दोन घटिका रात्री

श्री

विनंति उपरी. मुरादखान यानें पत्र पाठविलें जे औरंगाबादेहून वणजारवाडीहून निजामपुराकडोन लासुराकडे श्रीमंत राजश्री दादासाहेब याच्या भेटीस जातों. तुम्हांस कलावें म्हणून लिहिलें. याप्रमाणें पत्र पाठविलें. त्यास आपण आपले बुनगे फत्तेबाद दरवाज्याकडे ठेऊन सडे तो पुढें आपण मागें येैसें जावें. मुराद-खानाची फौज दोन हजारपावेतों आहे. छ १९ सफरीं रात्रौ शहरांतून निघाला तो चांभारटेकडीजवल पाहिली दाहा मशाला पाहिल्या. सारांष, आपण निघोन तयार होऊन त्याच्या पाठीमागेंच जावें. रोज्यावरीलहि फौज अणवावी कलले पाहिजे. आपल्या बातमीच्या जासुदानी वर्तमान सांगितलें असेल. आपलें बुनगे खंडकपीर दरवाज्याकडे आथवा फत्तेबादेकडे ठेवावें. पत्रदर्शनी, तयार होऊन निघोन जावें. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे बिनंती. आपला सांडणीस्वार येक पुढें श्रीमंत दादासाहेबाकडे जलदीने रवाना करावे. कचेश्वरी आहेत येैसें बातमीचे वर्तमान आहे. तरीं जलदीनें सांडणीस्वारची रवानगी करावी हे विनंती.

¶*The writer mentions the movements of Muradkhan and an interview that was being arranged between him and Dadasaheb.*

No. 68] [5-9-1762

पैवस्ति भाद्रपद वद्य द्वितीया प्रातःकाल
सूर्योदय सुरसन सला सितैन.

श्री

विनंति उपरी आपणाकडे पहिली दोन पत्रे पाठविलीच आहेत. तिसरा मनसबा ऐसाजे. मुरादखान याणें पत्र पाठविले त्यास त्याणी पत्र लिहिले असोन त्यास पुढें जाऊं द्यावे ऐसे नाहीं, परंतु यामुलें कजिया जाला तरी दरबारचा पेच पडेल किंवा काय हा विचार नकले. पुढें आम्हास वर्तमान कलोन तो गेला तरी तैसाही शब्द लागेल. त्यास आपण मातबर सरदार दोही अर्थातील कोणता मनसबा करावा तो विचार ल्याहावा व पहिल्या पत्रांतील अर्थ कार्याचा असिला तरी तोहि द्यावा. पत्राचे उत्तर लौकर पाठवावे. मुरादखान निजामपुराहून पुढें मार्गानें

जात आहे. त्याचा मनांतील कर्म काय असेल ते तो जाणत असेल. सारांश यैवज पुढें गेल्यास उत्तम गोष्टी दिसत नाहीं. यात आपल्या मनसब्यामध्यें उत्तम दिसेल ते करावे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*A Maratha Commander is asked by his subordinate to give explicit orders as regards the attitude to be adopted towards Muradkhan's movements.*

No. 69] *[17-11-1762?*

पौ छ ३० राखर

श्रीशंकर

श्रीमंत राजेश्री

पंत प्रधान स्वामी

चे सेवेसी

विनंती सेवक सकलग्रहस्तमंडली प्रतेष्ठानकर चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना. यैसीजे : स्वामीहि कृपा करून सेवकास आज्ञापत्र सादर केले कीं तांब्राचा रूख पैठणाकडे दिसतो. तुम्ही मुलेमानसे वस्तभाव बाहेर काढणे म्हणोन आज्ञा केली, ते पत्र मस्तकी वंदोन वर्तनूक करीत होतो, तो वर्तमान दुसरे आले कीं ताब्राचा रूख टोकियाकडे जाला म्हणौन. त्यावरून विनंतीपत्र सेवेसी केले आहे कीं इतकियावरी जैसी अज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करून. सर्व प्रकारे क्षेत्राचा अभिमान माहाराजास आहे. बाहेर निघावयासी लोकास सरंजाम व मार्गाचा निभाव कैसा होतो? क्षेत्र ब्राम्हणाचे आहे. यांचे छेत्र स्वामी समर्थ प्रतिपालक आहेत. जैसी आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तनूक करून. विशेष काये लिहिणें. कृपेचे भुकेलो आहोत हे विज्ञाप्ति.

¶*Prominent residents of Paithan inform the Peshwa that as directed by him they have made arrangement for the safe removal of their families in the event of an attack by the Nizam. They further say that they are free from danger as the Nizam is moving towards Toke and not towards Paithan.*

No. 70] *[19-11-1762*

श्री

राजश्री रघुनाथराव दादा

गोसांवी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा रामचंद्र जाधव-राऊ दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून श्वकीये लिहित आसिले पाहिजे

विशेष. आपण पत्र पाठविले ते उतम समई प्रविस्ट होऊन पत्रार्थ श्रवण संतोश जाला. यैसंच सर्वदां पत्री कुशल वृत लेहून ममतापूर्ण करीत असावें. इकडील वर्तमान आमचे समक्षे राजेश्री माणको शंकर याणी भाशण केलें असे. यानी आपल्यास तपसीलवार अर्थ लिहिले आहेत ते निवेदनांत येतील. तेणेप्रों मनोरथ सिधीस पाववणार आपण वडील आसेत. मारनिल्हेचे पत्राप्रमाणं पत्रोतराची व पत्रें सत्वर रवाना करावी विदित जालें पाहिजे. रा छ २ माहे जोवल बहुत काये लिहिणें ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Ramachandra Jadhao assures Raghunathrao of his full accordance with his views which fact—he says—must have already been communicated to him by Manko Shankar.*

No. 71] [*19-12-1762* (?)

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण विज्ञापना. छ ३ जमादिलाखर चोथा प्रहरपावेतो वर्तमान येथास्तित आसे विशेष. राजे विनायेकदास तयार होऊन आद्यापि डावे बाजूस आहेत. सरंजामसुधा तयार होन गेले आहेत. मागून राजाबाहादरहि जाणार आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पूर्वी पत्र लिहीले आहे त्यावरून मजकूर मनास आणून पत्राचे उतर पाठवावे हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan Joshi informs Dadasaheb that Raje Vinayakdas and Vithal Sundar have taken posts with their forces on the left side.*

No. 72] [*25-12-1762*

श्री

सेवेसी नारो आपाजी सा नमस्कार विनंती ता छ ९ जाखर सायंकालपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ ५ जमादिलाखरचे सादर जाहाले ते छ मजकुरी सायंकाली पावले. तेथे आज्ञा की मोगलाचा मुकाम ज्या गावी होतो तेथे त्यास दाणियाची पेवें सापडतात याजकरिता आपले तालुकियात तमाम गावगना ताकीद करून पेठातील दाणे काढऊन सारे येक जागा जमा करून ठेवणे. मोगलाचा रोखा गावाकडे जाला म्हणजे गलियास आगी लाऊन देणे व येकंदर मोगलाचे हातास दाणा न लागे ते करणे म्हणोन आज्ञा. आज्ञे-प्रमाणे पत्र पावताच माणसे रवाना केली. आज्ञेप्रा बंदोबस्त करितो. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa issues an order to Naro Appaji to the effect that "All grain in every town should be collected in Government granary and must be burned down on the approach of the enemy". Naro Appaji says he would readily execute the order.*

No. 73] [1762

(पहिला बंद गहाळ)

२

छ १३ रोजींच सलाबतजंगाच्या व निजामअल्लीखानाच्या भेटी बंदेनवाज पिराचे दरबारांत जाल्या. क्रियाशपथ जाली. सलाबतजंगानी सरदारीनें असावें. निजामअल्लीखानांनीं कुल कारभार करावा. सलाबतजंगाशीं कोणे गोष्टीची तफावत करूं नयें व त्याच्या मानमहत्वांत अंतर करुं नये ऐसा करार जाला. त्याउपरी निजामअल्लीखान सलाबतजंगाचे डेऱ्यास गेले. सलाबतजंगाची मातुश्री व सलाबतजंग व निजामअल्लीखां या तिघांचें खलबत जाहालें. तेथेही मागती परस्परें शपथ जाली. उपरांतिक छ १९ रोजीं सलाबतजंगाचेथें दरबार जाला. निजामअल्लीखानास कुल कारभाराचीं वस्त्रें दिल्हीं. शिरपेंच आपले हातें बांधला, मोहर त्याचे स्वाधीन केली याप्रमाणें जालें. पुढे कोणीकडे जातात पाहावें. धारूरची व कृष्णेकडील व भागानगरची ऐशा वांटा लिहून आणविल्या आहेत. मग पाहावें कोणीकडे जातात. सविस्तर मागून लिहितों. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हें विज्ञापना.

¶*This news-letter of which the first portion is missing reports an interview between Salabatjang and Nizam Ali in which the former made over to the latter, the whole administration of the state.*

No. 74] [1762?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना. नवाब बसालतजंग याजकडील वर्तमान: पेशजी वज्रकरूराजवल उतरोन सरकारची ठाणी इडपनगल वगैरे दोन चार लहान ठाणी घेऊन राजश्री लक्ष्मण वेकाजी यास सांगोन पाठविले कीं लक्ष रुपये खंडणी देणें. ठाणी माघारी सोडून कूच करून जातों. त्याजवरून मशारनिल्हेनी उदरपकोंडा पहाडी किल्ला व वज्रकरू दोन्ही जागाची उस्तवारी[१] केलीच होती. तेथें राहून साफ सांगोन पाठविले कीं, आम्ही कांहीं पालेगार नाहीं. नवाब आम्हास खंडणीविसी पैगाम करितात. लक्ष रुपयाचे ऐवजी तोफाचे गोळे आहेत. आपले धण्याचे निमकावर लक्ष ठेवून सेवा मात्र दोन चार महिने

१ व्यवस्था, मजबुती.

यथास्थित करून दाखवू, म्हणून जाबसाल केला. त्याजवर नवाबाजींनीं दोन तीन ठाणेत सातआठशे बारवाले ठेवून आपण लष्करसहित कूच करून रामेदूर्ग सुमार गेले. लक्ष्मण वेकाजी याणी धण्याचे पुण्यप्रतापे हिंमत धरून आपले जमावानसी ठाण्यावर चालोन गेले. त्याणी याजकडील जमाव स्वल्प पाहून ठाणे सोडून बाहेर पडिले. याणी अंगेजी[१] करून दोनशे गाडदी मारून हातरे व निशाणे वगैरा पाडाव केले. त्याणी सिकस्त खाऊन निवोन गेले. ते वर्तमान वरकड ठाणेयातील गाडदी यास कलोन तेहि पळून नवाबाचे लष्करात गेले. मशारनिल्हेनीं गांवांत सरकारचे लोक ठेवून बंदोबस्ती केली. याउपर दोनशे राऊत ठेवून आदवनीकडील मुलुकावर स्वारी सिकारी करावयाची उमेद राखिली आहे. येणेप्रमाणे मशारनिल्हेकडील लिहिले आहे. हे वर्तमान नवाबजीस कलले. आलीकडे नवाब कूच करून परशरामपूर सिरे ताल्लुक पालेगाराचे गावास मोर्चेबंदी करून तेथील खंडणी घेऊन सिऱ्यास यावयाचा मनसबा करून हैदरआलीकड संदर्भ लाविला आहे की, आपण ऐक दोन दिवसांत सिऱ्यास जाऊन मोर्चे देतो. तुम्ही खुद सामानसहित कुमकेस येणे. नाहीं तर मीर फैजुलाखान या समागमे दोन तीन हजार फौज व तोफा देऊन पाठवणे म्हणोन. त्याजवरून हेहि कबूल करून मीरफैजुलाखानास फौज व तोफा सामानसरंजाम करून देऊन सिरे यास रवाना करणार. उभयेताचे एकमत होऊन नवाब सिरे याजवल चार कोसाचे तफावतीनें येऊन उतरले आणि आजउदिया गले पडणार. नवाबाचे लष्कराहून वरचेवर माणूस पाठवून बातमी आणवीत असतो. हैदरआलीखान अथवा मीरफैजुलाखान फौज सुद्धा येऊन बसालतजंगास सामील व्हावे, त्याणी याणी मिलोन सिरे याचे गळी पडावे येसा मनसबा होता. परंतु पटणकराचा व हैदर अलीखानाचा कजिया अद्याप वारला नाहीं. यास्तव या उभयेतास जावयास गांठ न पडली. यास्तव नवाबानें तूर्त सिरे यास जाण्याचे मंहकूब+ करून दाद नाईक पाल्यास आले. तेथून मीरफैजुलाखान याचे भावास हैदरअलीखानाकडे खलात व इनायतनामा देऊन पाठविले आहेत कीं तुम्हीं हे समई येऊन भेटणे. सिरे याचा किल्ला तुम्हास देतो, जे सांगाल ते ऐकितो, म्हणोन बहुत प्रकारें सांगोन लेहून पाठविले आहे. तीहि जाण्याचे तर्तुदींत आहेत. हैदरखान नवाबास मिलल्यास मनसबा भारी पडल यास्तव आम्हाकडून एक भला माणूस व तीन जोड्या देऊन खानाकडे रवाना केले आहेत. कित्येक लिहिणे तेहि लिहिले आहे. बसालतजंगास न मिलावे, आपले जागा राहावे, येणेकडून श्रीमंताचा स्नेह सारोधार

१ उठावणी; पराक्रम, + रहित.

चालेल. संवस्थानिकाची व तुमची स्पर्धा, बहुताचे तुम्ही वाईट, एक श्रीमंताची कृपा संपादिल्याने तुमचे सर्व प्रकारे कल्याण आहे. येविसी श्रीमंताचे सेवेसी लिहिले ते आम्ही लेहून तुमचा व श्रीमंताचा स्नेह सारोधार चाले ऐसा करून श्रीमंताचीं पत्रे येविसी तुमचे नांवें आणवितो. तुम्ही कोते अंदेसी मनसबा सर्वथा न करावे म्हणोन लेहून व सांगून पाठविले. व मागील बाकी खंडणीपैकी संस्थानिकाकडे आहे त्यांजपैकीं लाख दोन लाख रगात करून देऊ, हेहि आशा दाखविली आहे. हरप्रत्नेकडून बसालतजंगाची त्याची गाठ पडोन द्यावी म्हणून प्रयत्न करीत आहो. धन्याचे पुण्येंकडून होईल ते खरें. तूर्त त्याचे नांवें पत्रे मजकूरची पाहिजेत त्याची याद आलाहिदा लेहून पाठविली आहे. त्याप्रमाणे पत्रे जलदीनें पाठविली पाहिजे म्हणजे फार उपयेगी पडतील. पालेगा(रा)चे नांवे पत्रे पाहिजेत त्याचीहि याद लेहून पाठविली आहे, तेणेप्रमाणे आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a news-letter to the Peshwa from the camp of Basalatjang who was proceeding to capture Sira and who for that enterprise asked Haidar Ali's help. The writer dissuaded Haidar from acting against the Peshwa.*

No. 75] *[2-1-1763?*

पौ छ २४ जमादिलाखर
पौष सुा सलास सितैन.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी,

विनंती. सेवक आज्ञाधारक गुंडो कासी मुकाम नजीक मनोसमासाल श्रीभीमातीर चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञप्ति. येथील वर्तमान तागायत छ १७ माहे जमादिलाकर पावेतों साहेबाच्या कृपावलोकणेंकरून येथास्थित असे विशेष. छ १ जमादिलाकर तिसरा प्रहरा राजश्री पिराजी नाईक निंबालकर याची व निजामअली याची भेट जाली. निजामअलीनी शब्द गौरोव उत्तम प्रकारचा केला. छ ८ माहे जमादिलाकर संध्याकाळीं मुरादखान येऊन लशकरांत दाखल जाले. छ ९ माहे जमादिलाखर तिसरा प्रहरां निजामअली फर्मान घ्यावयासी फर्मान बाडीस येऊन फर्मान घेतला. छ १० माहे जमादिलाकर भूम निंबालकर यानी घेतली. मुधोजी नाईक निंबालकर भुमेतून निघोन खर्डियासी गेले. छ ११ माहे जमादिलाखर निजामअली श्रीभीमापार मनोस-

मासाल येथल्या घाटावर पार जाले. छ १५ माहे जमादिलाखर निजामअलीनीं कूच करून विजापूरच्या रोखें कूच १ कोस ८ केलें. छ १६ माहे जमादिलाखर मागारे श्रीभीमेवर नजीक मनोसमासाल येथें येऊन उतरले. वार्ता येसीजे, राजश्री गोपाळराव गोविंद यानी कांहीं द्रव्य देऊ करून निजामअलीस मागारे फिरविले येसी वार्ता बहुतसी आहे. सेवेसीं श्रुते होये. आम्ही येथून बातमी देऊन जासुदजोड्या साहेबाकडे पाठविल्या त्या मागती फिरोन आल्या नाहींत व आम्हांस खर्चासहि नाहीं. लशकर परावे.[१] येथें कोन्ही कर्जवामही देत नाही. येक जासूद आम्हांपासीं राहिला होता तो सांप्रत्ये सेवेसी बातमी देऊन पाठविला आहे. आम्हांपासी जासूदजोड्या नाहींत व खर्चासही नाही. जासूदजोड्या व खर्चास पाठवणार साहेब समर्थ आहेत. उपवासी न मरे तो अर्थ करनार धणी समर्थ प्रतापी आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The interview between Piraji Naik Nimbalker and the Nizam and the subsequent departure of the latter to Bijapur and his return from Manoli on receiving money from Gopalrao Govind are reported to the Peshwa by Gundo Kashi.*

No. 76] *[8-1-1763*

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण विज्ञापना. छ ३ जमादिलाखर चौथा प्रहरपावेतो वर्तमान यथास्तित आसे विशेष. राजा व विनायेकदास व खांदारकर राजे व शक्री मानासिंग जाधवराव, मुरादखान इतके जण मिळोन डोंगराकड कही भरावयासीं गेलस वाटते, परंतु ते हालतात. गोपाल रावजसि भेटावयासी जातो. बरोबर तोफाही आहेत. डोंगराकड दक्षणेकडील आगी जातात. सेवेसी खांदारकर राजा कहीबरोबर होता तो येऊन त्यास सामील होऊन बरोबर गेले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. काही गाडबड दिसल्या; बरोबर गाडदी आहेत व सरंजाम लडाईचा आहे. तरतूद करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री सदासिवपंत निंबालकर यासी तळपेकरता लोकानी आडविले आहे. राजाजीची बळावण दोनतीन आली; परंतु गेले नाहीत. सेवेसी श्रुत होय.

¶*Krishnaji Narayan communicates to the Peshwa the movements of the armies and the foraging parties of the Nizam's sardars.*

---

१ परावें=परक्याचें, दुसऱ्याचें.

No. 77] [25-1-1763?

पौ छ २४ रजबू.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
दादासाहेब स्वामीचे सो

विनंती शेवक राघो शंकर दिा धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १० माहे रजब मुाा नजीक बेदर तफावत तीन कोस स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. यापूर्वी वरचेवर विनंतीपत्रे विस्तारे सेवेसी पाठविली आहेत त्याजवरून सर्व ध्यानास आले असेल व सरकारातून शुतरस्वार नवाबास व रुकनुदौलास पत्रे घेऊन आला होता, ते पत्रे ज्याची त्यांस देऊन उत्तरे घेऊन सेवेसी शुतरस्वारासमागमे पाठविली आहेत व विनंतीपत्रहि विस्तारे पाठविले आहे त्याजवरूनहि सविस्तर श्रृत जाले असेल. प्रस्तुत नवाब दरमजल नित्य सात आठ कोस चालत छ ९ रजबी बेदरानजीक येऊन पोहचले. सांप्रत याणी स्वामीचे मर्जीप्रमाा मसलतीचे रोखावर दरकूच चालावयाची त्वरा मांडली आहे. काल जाधवरायास नवाबानी व रुकनुदौलानी शुतरस्वारासमागमे पत्रे लिहून पाठविली कीं, आम्ही बेदराजवल येऊन पोहचलो. श्रीमंत उभयता येकत्र होऊन मलकापुरावर पावले. आम्हास आतां विलंब करणे कामाचे नाही. ऐन मसलतीचा समय आहे. त्यास तुम्ही येक क्षण विलंब न करिता येका दो रोजात आम्हासी शामील होणे. जर तुम्हास विलंबच लागला तर आम्हास तुम्हास शामील करावयास तुमचे जिल्यात यावे लागेल. येणेप्रमाा पत्रे गेली आहेत. याजवरून जाधवरावहि लवकरीच येतीलसे दिसते. तसीच उभयता निंबालकराकडेहि काल शुतरस्वार पत्र घेऊन गेले कीं, आविलंबे यावें. आम्ही वंजरासंगमचे घाटे गंगा उतरावयास जातो. तुम्ही त्या शुमारे जलद येणे. आम्ही दरमजल श्रीमंतांचे मर्जीप्रमाा त्या प्रांते चाललो. येक क्षण विलंब कामाचा नाहीं. जर विलंब लागला तर नाखुशीचा सबब जाणावा. पुढे आम्हावर शब्द नसे. येणेप्रमाा फारच निक्षूणपणे पत्रे लिहिली आहेत. सांप्रत रुकनुदौलानी व जगनाथपंतानी सिपाई लोकांचाहि थोडाबहुत निकाल करून फैसला केला. आता फार करून सिपाई लोकांचाहि हंगामा होत नाहीं. याजमुले दरकूच चालावयासी यांजला फुरसत जाली. जाधवरायाकरिता येखादा या जिल्यात मुकाम करितील. जाधवराव आले म्हणजे कोठे मुकाम न करिता वंजरासंगमचे घाटे गंगा उतरून तिकडे चालावे येणेप्रमाा मनसबा करीत आहेत की, वंजरा संगमास गेलो म्हणजे साहेबजादा व खंदारकर वगैरे येऊन मिलतील व तिकडून निंबालकरहि व

6556

सदासिव रामचंद्रहि येतील, कोणे गोष्टीचा गुंता पडणार नाही, म्हणून याप्रमाणे तजवीज केली आहे. सारांश, जाधवरायाकरिता येखादा मुकाम वंजरेवर करतील. येथून वंजरा आठ नव कोस आहे. जाधवरात्र आले म्हणजे वंजरासंगमेवर दर-मजल गंगेचा घाट उतरतील. याजला गुंता प्रस्तुत इतकाच. वरकड काही नाही. आतां तजवीज रात्रंदिवस हेच लागली आहे. चंद्रभान खंडागले येथे पांच सा महिणे जाले कीं, जाबसालाकरिता राहिले होते. याणी तर खंडागल्याच्या जागिरा तमाम तगीर करून मालोजी घोरपड्यास सांगितल्या. प्रस्तुत चंद्रभान-रायास बेमगल वगैरे माहाल देणे करार करून रुकसत केले की, जमीयत घेऊन सत्वर येणे. स्वार होऊन जाणार. राजश्री जगनाथपंत आपले जागिरीवर मोगडमपलीकडे सहज पाहाव [पुढील बंद गहाळ.]

¶*Ragho Shankar informs Dadasaheb of the movements and preparations made by the Nizam to meet the Peshwa.*

No. 78] [*January 1763*

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री दिवाकर पुरुषोतम
गोसावी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा सलास सितैन मया व अलफ. राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यास सदासिव येमाजी जाऊन भेटले. नानाप्रकारचे मनसबे करितात. (अपूर्ण)

¶*The Peshwa informs Divakar Purshottam of secret talks held by Sadashiv Yemaji with Janoji Bhonsle. The letter is incomplete.*

No. 79] [*10-2-1763*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री पंतप्रधान स्वामींचे शेवेशी

विनंती सेवक आज्ञाधारक गुंडो कासी मुक्काम बागुरडी प्रांत कलबुर्गे श्रीभीमातीरं चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ १० माहे रजबपावेतो साहेबाच्या कृपावलोकणेकरून येथास्थित असे विशेष. छ १२ माहे रजब राजश्री गमाजी येमाजी दिा प्रतिनिधि हे स्वार होऊन राजश्री जाणोजी भोसले याजकडे गेले. छ १९ माहे रजब निजामअली

यानीं श्री भीमातीरीहून माघारे फिरोन काठी मुरडीहून केपलीपासी श्रीभीमा पार होऊन छ २२ माहे रजब कलबुर्गीयासी दाखल जाले. छ २३ माहे रजब राजश्री विनायेकदास विठ्ठल सुंदर याचा पुतन्या पांच हजार फौज देऊन राजश्री जाणोजी भोसले याजकडे पुढें पाठविलें. छ २४ माहे रजब राजश्री जाणोजी भोसले येऊन कुलबुर्गियावर दाखल जाले. छ २५ माहे रजब प्रहर दिवस आलियावर निजामआल्लीच्या व जाणोजी भोसले या उभयेताच्या भेटी जाल्या. निजाम-आलीनी छ मजकुरी कूच करून श्रीभीमेवर बागुर्डीवर आले. रोख मागारा दिल्हा आहे. लस्करांत वार्ता कीं राजश्री जाणूजी भोसले व प्रातिनिधि व गोपाल-राव यैसे येकत्र होऊन निजामआल्लीस कांहीं द्रव्य व कांहीं मुल्क देऊं करून माघारे मिरजकडे फिरविले यैसी वार्ता बहुतसी आहे, बंदोबस्त करणार साहेब समर्थ प्रतापी आहेत. राजश्री जाणूजी निंबालकर करमालियांत आहेत. त्याज-कडील पत्रे राजश्री आनंदराव निंबालकर याजला येतात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The negotiations for an alliance between the Pratinidhi, Janoji Bhonsle and Gopalrao and Nizam Ali to whom a sum of money was offered by the former to induce him to march on Miraj, are reported to the Peshwa by Gundo Kashi.*

No. 80] [19-2-1763

श्री

राजश्री मल्हारजी होलकर गोसावियासी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री रघुनाथ बाजीराव आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. मोगलाचा बिघाड जाला. राजश्री जानोजी भोसले त्यास जाऊन सामील जाले, याजकरिता आपण यावे येतद्विषई दोन पत्रे पेशजी लिहिली, ती पावलीच असतील, त्यांजवरून सर्व कलले असेल. सविसाचे रजबची तेथून बातमीची पत्रें आली, त्यांत त्याचा फार निश्चय आहे. सातारियास यावे, स्वारी जिकडे जाईल तिकडे पिछास लागावे हा त्याचा मनोदये आहे. ऐशास प्रस्तुत येवन वर्षाप्रो नव्हे. भोसले सामील जाले याजमुले भारी जाला, यास्तव तुम्ही यावे. मोगलास पुर्ती जरब द्यावी हे उतम आहे. सरकारची फौज भारी आहेच, आपण आलियाउपरी भोसले मिलाले त्याचाहि मजकूर फार नाही, परंतु याचे, पारपत्य जाले म्हणजे सहजात चहूकडे दहशत पडोन बंदोबस्त होईल. तरी पत्र

पावते क्षणी कूच करोन सत्वर येऊन पोहचावे. अनमान कराल तरी आमची शफत असे. सविस्तर मजकूर हरि रघुनाथ पाठविले आहेत हे सागतील त्यावरून कळेल. ता छ ९ शाबान बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

¶*The Nizam having been joined by Janoji Bhonsle has declared war against the Peshwa. He intends to march against Satara, capture the Chhattrapati and then pursue the Peshwa wherever he goes. Raghunathrao therefore asks Malharrao Holkar to join him at once with his forces.*

No. 81] [*20-2-1763* ?

श्री

विनंती शेवक रावो शंकर दिा धोडो राम कृतानेक सां नमस्कार विनती विज्ञापना ताा छ माहे साबान मुकाम बेहरोभाऊ नजिक औरंगाबाद स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. वेगळे पुरवण्यावर सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिले आहे त्याजवरून सर्व ध्यानास येईल. नवाब येथून दो चौ दिवसा येथून कूच करून गंगेचे रोखे चालतील. धारुरास जावे म्हणौन बोलत आहेत. पुढे जसे जसे वर्तमान होत जाईल तसे सेवेसी लिहिण्यात येत जाईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ragho Shankar sends news to Dadasaheb from Aurangabad about the movements of the Nizam.*

No. 82] [*February 1763*

विज्ञापना. मल्हारबास जलद मेळऊन घ्यावे येविशी पत्रे दररोज रवाना करावी. बाबूजी नाइकास जलदीनें पत्र रवाना करून आणवावे. त्याच प्रो जाधवरायासहि पत्र ल्याहावे. एक दोन तीन पत्रे दररोज रवाना करावी. सांडणीस्वार जबानीनें सांगत होता. मल्हारबाचे कासीद जात होते. याजकरितां त्यास त्वरेने पत्रें जावी. मल्हारबाचे मते कर्नाटकात कजिया पडेल. आपण निवोन जाऊं या विचारें त्याणी चित्तात आणिले होते. आपण इकडे येतीलसे त्याचे मानसीं नवतें. याउपरी त्यांस येणेंच प्राप्त जाले. तथापि पत्रें लौकर लेहून रोजबरोज रवाना करावयाची आज्ञा करावी. हे विज्ञापना.

¶*Sakharam Bapu advises calling together Holkar, Babuji Naik, Jadhavrao and other sardars to help in the campaign against the Nizam.*

6559

No. 83] [17-3-1763

श्री

श्रीमत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

पो गोविंद रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनती येथील कुशल ता छ १ रमजानपर्यंत स्वामीचे कृपेकरून लस्करांत सुखरूप आसो विशेष. बहुता दिवसी स्वामी गेल्यादारभ्य स्मरण होऊन पत्र पाठविले ते उतम समई पावले. परम समाधान जाहाले. ऐसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषवीत जावे, योग्य आहे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत मिरजेहून कूच करून येडूरच्या मुकामास गेले. तेथून राजश्री आबा पुरंधरे याजबरोबर फौज देऊन कर्णाटकांत पाठवावे हा निश्चयेकरून आबाची रवानगी केली. आबा मुहूर्तेकरून दोन तिन कोसावर जाऊन राहिले. फौजेस ताकीद होऊन फौज जमा होत चालली. असें असतां मोगलाने श्रीमतासी बिघाड करून दोन मजली माघारा आला. श्रीमंतास संकट प्राप्त जाहले. कर्णाटकची मुल्कगिरी आगदीच बुडाली. सारा मनसबा केला तो व्यर्थ जाहला, असा समजून आबास माघारे आणिले आणि येडूरच्या मुकामाहून रोज कूच दरकूच औरंगाबादेस दाखल जाहाले. औरंगाबादेस हला केला ते दिवसी राजश्री दादासाहेबाचे आरिष्ट गेले. हतीवर बसले होते. माहातास गोळी लागोन जखमी फार जाहला आहे. वाचेल तेव्हा खरा. औरंगाबादचा हला नामोहरम जाहला; परंतु दोन लाख रुपये खडणी शहरची करार करून वसुलात घेतली. मोगल मजल दरमजल यांजवर आला. मोगलाचा यांचा वीस कोसाचा तफावत होता. तो याणी शहराहून कूच करून निघाले. त्यास दोन प्रहरी भोजन करून शेतखान्यात गेले. तिकडून माघारे येतेसमई येक गाड्याने तरवारेची हूल श्रीमंतांवर चालविली. हूल काही कारीगर जाली नाही. तेच क्षणी गाड्यास धरून ठेविला. त्याने नाव रामचंद्र जाधवराव याचे घेतले. रामचंद्र जाधव वाटेस येताना मनमानेसा उपद्रव करून ऐवज घेत आले, हाहि राग होता. दुसरा हा त्यात आन्याये, तिसरा मोगलास मिळाला; कागद सांपडले. हे तीनहि आन्याये मातबर त्याचे आगी लागू जाल्यावर रामचंद्र जाधव व श्रीपतराव यास कैद करून दौलताबादेस ठेविले. पायात बेडी घातली. लस्कर तमाम लुटून पस्त केले. मोगल दुसरे दिवसी शहरदाखल जाहाला. आमची फौज कासारबारीचा घाट चढोन आली. होलकरहि चांदवडाहून येऊन भेटले. मनसबा पोख्त करून वराडात जावे ऐसा करार करून मजल दरमजल चालले. आमची फौज पस्तीस च्यालीसपर्यंत आहे. ऐकदिल नाही. फौजेत फितूर, घरचा फितूर; कारभाऱ्यांची चित सुध नाही. आबा बापू येकविचारे

चालत नाहीत. येवज चाहूकडून दगाच आहे. मोगल आजनठ्याचा घाट चढोन यासी आडवा येईल. बातमी आजच आली. येक दोन रोजात लढाई मातबर होईल. तूर्त पुणियास भय नाही असे वाटते. ईश्वर करील ते खरे. चिरंजीव आपणाजवल आहे. कलेल तसे त्यास साभालून घेणारे आपण समर्थ आहेत, आम्ही सेवक घरचे आहो. कृपा करावी हे उतम आहे. बहुत काय लिहिणे ? लोभ आसो दिल्हा पा। विनती.

¶*Govind Raghunath informs Naro Appaji that the Nizam has broken relations with the Peshwa and has assumed a hostile attitude. The Peshwa therefore is preparing to meet him and has recalled Aba Purandare from Karnatak where he had been dispatched. The writer refers to an attempt on the life of Raghunathrao made by Ramchandra Jadhav and his consequent imprisonment.*

No. 84] [*29-3-1763*

श्री

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान ता। मोकदम का। राक्षसभुवण सु॥ सलास सितैन मया व अलफ. खासा स्वारी मजल दरमजल या प्रांतास आली आहे. को। मजकुरचा घासदाणा करार जाहला पाहिजे; तरी को। मजकुरचे पाटील कुलकर्णी घासदाणियाची खंडणी करावयास हुजूर येणे. तूर्त घासदाणियाचे ऐवजी रुपये ५००० पाच हजार आणविले असेत. देखत आज्ञापत्र ऐवज घेऊन हुजूर येणे. या कामास स्वार दिमत रो। आबा सरनाईक पा। आहेत. यासी मसाला रुपये ५०० पाचसे देणे. जाणिजे छ १३ रमजान. आज्ञाप्रमाण.

¶*The Peshwa issues orders to all village officers of Rakshasabhuvan to remit the ghasdana cess and thus help the Peshwa's army encamped thereabout.*

No. 85] [*31-3-1763*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री नारो
आपाजी गोसांवी यांसी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सु॥ सलास सितैन मया व अलफ. पुणियात तोफा आहेत, त्या किले सिंहगड येथें चढवाव्या. कदाचित न चढेत तरी पुरून जागाजागा टाकाव्या. कोणास कल्ह देऊ नयेत.

कारखानियाची माणसें असतील त्यास मात्र कर्द्ध द्यावें. परंतु बभ्रा न हो ते करणे व गाडे छकडे जागा जागा ठेवणे ; येक जागा न ठेवणें. तुम्ही व राजश्री जिवाजी गणेश मिलोन बंदोबस्त करणें. विलंब न लावणें. गडबडीचे दिवस आहेत. जाणिजे, छ १५ रमजान, बहुत काये लिहिणें ?

¶*The Peshwa asks Naro Appaji to remove the guns at Poona to Sinhagad or to bury them under ground if they can't be removed. He further asks him to take prompt measures for the defence of Poona in consultation with Jivaji Ganesh.*

No. 86] [*3-4-1763*

पो छ २४ रमजान

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्रीं
नारो आपाजी गोसावीं यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुा सलास सितैन मया व अलफ. पुणियात जवाहीरखान्यात सालगुदस्ता सिलकेस जवाहीर व जडाव व सोने रुपे वगैरे दागिने किती होते, त्यापैकी सालगुदस्त मोडले किती, त्याचा झाडा तपसीलवार लिहून पाठवणे. सालगुदस्ता दागिने मोडून बाकी सोन्याचे व रुप्याचे व जडाव व जवाहीर वगैरे जे राहिले असेल त्याचा मोजदादीचा झाडा सत्वर काढून पाठऊन देणे. लस्करात खर्चास ऐवज पाहिजे त्यासारिखी तरतूद करावी लागेल. तरी पत्र पावताच झाडा काढून जलद पाठऊन देणे. खासा स्वारी सोलापुरच्या मार्गे मजल दरमजल जाते. मोगल पाठीवर आहे. मोगलाचा व आमचा वीस कोसाचा तफावत आहे. तरी झाडा सोलापूरच्या मार्गे जलद पाठऊन देणे. मिरजेस लक्ष्मण कोनेर याजला तगादा सख्त करून ऐवज लौकर जमा होय ते करणे. खंडो बाबूराव याचा झाडा आलाहिदा ऐवजाचा पाठविला आहे. लस्करातून त्याजवर वराता केल्या आहेत. परंतु वरातदारास कांहीं ऐवज त्यानी अद्याप दिल्हा नाही. तरी तुम्ही त्याजला ताकीद करून वराते प्रो ऐवज झाडून देवणे. बाकी ऐवज राहिला त्याचा वसूल तुम्ही बेमुरवत होऊन करणे. भराडीकडील ऐवज वसूल करावयास त्रिंबकपंत शागीर्द आला आहे म्हणून लिा त्यास ऐवजाविसी त्रिंबक यास पत्र अलाहिदा पाठविले आहे. त्याप्रो तुम्ही ऐवज भराडियाचा वसूल जलद घेणे. रामचंद्र नारायेण भावे याणी मालसंगवीचा ऐवज भरणा तुम्हाकडे केला म्हणून त्याचे बंधु हुजूर

सांगत होते. त्यास भरणा जाला असिला तरी उत्तमच झालें; झाला नसला तरी वसूल घेणे. दमाजी गाईकवाड याजकडील ऐवजाचा मजकूर तुम्ही लिहिला. साराश तुम्हांस कलेल त्याप्रमाणे ऐवज जमा करीत जाणे. वराता येतील त्यांस ऐवज पावता करीत जाणे. काही सोन्याचे व रुप्याचे दागिने असिले तरी ते पुढे कोणते कामास येणार? यास्तव मोडून ऐवज करणे. येथे मोगलासी गाठ लौकरच पडेल. चार दिवस ओढून मोगलास हावभरी करितो. दोचौ दिवसात लढाई मातबर घ्यावी ऐसे योजिले. श्री सता प्रमाण. होणे ते होईल. लढाई मातबर करावयाचे मानस आहे. तुम्हास कलावे. मातुश्री आई वगैरे बायका सान्यानी आजकाल किल्यावर असावे. मोगलाची फौज दोन तीन हजार जरी तिकडे आली तरी त्यास आडकाठी काही नाही. गलाठा होईल यास्तव वारंवार लिहितो. परंतु मातुश्रीचे मनास येत नाही. असो, श्री कृपा करील, कांहीं चिंता नाही. परंतु आम्हास सुचले ते लिहिलेच पाहिजे. तुम्हीहि विनंती वरचेवर करीत जाणे. छ १७ रमजान रविवार प्रात:काल बहुत काय लिहिणे?

¶*The Peshwa instructs Naro Appaji to realize promptly all Government dues from various Kamavisdars and submit a complete list of the household ornaments. He suggests that the ladies of the household should be sent to Sinhagad, as Poona, being denuded of forces, would be unsafe in case of an attack from the enemy.*

No. 87] [*3-4-1763*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सदासिवपंत तात्या स्वामीचे सेवेसी. पो बालाजी अनंत व बापूजी अनंत आबेकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायेत छ १८ रमजानपावेतो मुा बेदर येथे वर्तमान येथास्थित असे विशेष. आपणाकडून पत्र येऊन समाचार वर्तमान कलत नाहीं; तरी ऐसे नसावे. सदैव येणारा मनुशासमागमे पत्र पाठऊन आनंदवीत असावे. यानंतर इकडील वर्तमान तरी, निजामअली किल्याचे आश्राने राहिला आहे. आम्ही भोवताला तलावा मात्र देतो. दिवसात दोन च्यार गोलेहि सोडितो. वरकड अधिकोतर नाही. पुण्याकडील वर्तमान तरी सर्वज्यन पलोन गेले म्हणोन पत्रे येतात. तुमचे व आमचे घरचे वर्तमान कलत नाही. कलावे बहुत काय लिहिने? कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंती. सेवेसी हणमंतराव लक्षुमण करकरे सा नमस्कार विज्ञापना. लिा परिसोन कृपा करावी. सर्व भरवसा आपला आहे. पदरीचा आहे. कलावे बहुत काय लिहिणे.

6563

रा। बाजीपंत करकरे याचे रुपये ५५ पंचावन येसाजी बच्याजी जासूद जथं केरोजी नाईक याज बा। पा। आहेत हे मशारनिल्हेस पावते करून उत्तर पाठऊन घ्यावे. हे श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The two Ambekar brothers Balaji and Bapuji Anant write to one Sadashivpant (?) about the movement of the forces of Nizam Ali. He refers to the panicy conditions prevailing in Poona owing to rumours of an attack from the Nizam.*

No. 88] [*15-4-1763*

श्री

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री त्रिबकरावजी स्वामीचे सेवेसी. पो गणपतराव रामचंद्र सा। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ १ माहे सवालपर्यंत येथास्थित असे. यानंतर दौलताबादचे मुकामीहून सरकारचे नावे आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा कीं सरकारचे फौजेचा मुकाम दौलताबादे-नजीक आला; तुम्ही येऊन भेटावे ते अद्याप आलेत नाहीत हे गोष्ट कोण? तरी या उपरी पत्र पावतांच सत्वर लस्करांत हूजूर येणे म्हणोन, ऐसियास पा। कुंभारी येथील मामलत साल मजकुरी नलदुर्गचे मुकामी आम्हाकडेस जाली. तेथून निरोप घेऊन निघालो ते तेथे पोंहचल्यास पांच सात दिवस जाले. माहाली कारकून पाठविला आहे; त्यास प्रस्तुत भोंसल्याचे गडबडीमुळें रयेत तजा-वजा होऊन गेली आहे. पाटील देखील कोणी भेटला नाही. आज तीन वर्षें या माहालावर अफत आहे. रयेतीस पोटास देखिल नाही. याजमुळे बहुत करून रयेत पोट भरावयास पहिलीच गेली आहे. कोणी कोणी गांवावर राहिले होते, ते या गडबडीमुळें निघून गेले. वस्ती देखिल राहिली नाही. माहाल मजकूर सिबंदी वगैरे खर्च कर्ज घेऊन करणे लागतो. येणेप्रमाणें माहलाचे वर्तमान आहे. सेवेसी विदित हे विनंति.

¶*The writer Ganpatrao Ramchandra describes to Trimbakrao the disturbed conditions of the ryots of Naldurg which prevented the writer from joining the Peshwa's forces in time.*

No. 89] [*20-4-1763 ?*

श्री

तीर्थरूप राजश्री दादा वडिलाचे सेवेशी.

आपत्ये नेगोजीने सा। दडवत विनंती येथील कुशल ता। छ ६ सवाल मंगळवार जाणून वडिलांचे आशीर्वादे सुखरूप असो विशेष. काली मंगळवारी मोगल चालोन पिपळगांवपर्यंत आम्हापासून कोसावरी आला. मग आम्ही तयार होऊन

मोगलावरी गेलो. सकाळचे १ प्रहर दिवसापासून संध्याकाळपर्यंत युद्ध जाले. मोगलास तंबी पोहोचाविली. मोगल माघारा नेऊन वैजापुरात घातला, करोलानी भावंताले मार देऊन बहुत त्याचा नाश जाला. त्याजउपरी येक [१] हिरीरी गंगाजी पवार यानी व आणखी व पागेचे लोक व सिलेदार ऐसी केली. त्यासी गंगाजीने तरवारीने मोगल जखमी केला व सिदोजी दोंदे याणी भाल्याने जखमी केला व आणखी सिवाजीने बदुखेच्या धोपाटा घातल्या. ऐसी हातघाई केली. गंगाजीने शर्त केली वरकड आणखीहि एक दोन हिरीऱ्या जाल्या, परंतु करोलानीच मार देऊन मोगल थंडा केला. मोगलाचे जखमी माणूस पनासेक जाले असेल. घोडीहि दाहा पधरा जाले असेल. वरकड आणखी वर्तमान त्याजकडील कोणी बोलीस आले नाही. आपण सांगितल्याप्रमाणे राजश्री शंकराजी निकम यास सांगितले. त्याच्याहि चित्तास आले आहे. जे वर्तमान जाले ते लिहिलें आहे. पुढें जे वर्तमान होईल ते वरचेवरी लिहिले जाईल. आपणाकडील वर्तमान वरचेवरी लिहित जावें, त्यासारिखे वर्तणुक केली जाईल. हे विनती. मोगल राऊत ५०० व बरकदाज ६०० व जेजाला ७५ तोफा २ बाणाचे उंट २ येणेप्रमाणे सामान आहे. याखेरीज गावातही आहे कळावे. म्हणून लिहिले असे हे विनंती.

स्नो राघो गोविंद आशिर्वाद उपरी जुजाचे वर्तमान तपसीलवार लिहिलें आहे. मोगल जबरदस्त आहे. आमची मथ नव्हे, आम्ही लाग पाहिला, परंतु दोन हजार फौज व करोल पाचसे असावे तेव्हा मोगल आगदी बुडता * * *

¶*The writer Negoji gives an account of a severe encounter between the Marathas and the Nizam at Pimpalgaum.*

No. 90] [*25-4-1763*

पो छ २२ सवाल

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आपाजी गोसावि यासी.

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुरू सलास सितैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्रे पा छ ५ सवाली पावोन लिहिले वर्तमान विदित जाले. तुम्ही पत्रे पाठविली त्याचा जाबसाल येणे प्रो बितपसील

सासवडच्या घराचे मजकुराविसी पत्र व यादी तपसीलवार पा	नरसिंगराव धायगुडे याचा मजकूर जफ्तीचा व कबिल्याचा लिहिला तो

---

१ हल्ला.

ती पावली. त्याचा जाबसाल पेशजीस पाा आहे त्याप्रमाणे करणे कलम १

वाड्याचे सफेलीचे वर्तमान लिहिले ते कलले. तुम्हास कलेल त्या रीतीने तरतूद करून बंदोबस्त राखणे १

तुम्ही कारभार पुणियास पैवस्त-गिरी जाल्यापासून तालेबंद आकारून पाठविला तो पावला. रमजान महि-न्याचा पुढे आकारून पाठऊन देणे कलम १

कलला. मारानिलेच्या तीर्थरूपास अटक करावयाविसी पेशजी पत्र पाा आहे त्याप्राो करणे कलम १

गणेश हरि याचा मजकूर लिहिला तो कलला. खबरदारी त्याचीअसो देणे कलम १

चिरंजीव राजश्री नारायेणराव याचा मजकूर लिाा तो कलला कलम १

सगुणाबाई व पार्वतीबाई यांचीहि रवानगी लवकर करावी कलम १

सदरहू लिहिल्या कलमाचा अर्थ सविस्तर ध्यानांत आणून त्याप्रों वर्तणूक करणे जाणिजे छ ११ सवाल.

¶*Peshwa Madhavrao answers some of the queries referred to him for orders by Naro Appaji, the officer in charge of Poona.*

No. 91] [*4-5-1763*

श्रीशंकर

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री
स्वामीचे शेवेसी

विद्यार्थी त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल वैशाख बहुल सतमीपर्यंत आपले आसिर्वादे करून सुखरूप असों विशेष. यंदाचे प्रसंगानरूप आपण किले विसापुरास आलित उतम केले. आम्ही याच प्रसंगा-करितां राजमाचीस आलों आहो. तिकडील वर्तमान फौज कोणीकडे गेली जाणार, श्रीमंत कोणते प्राा आहेत हे या कालीं कोणासच कलत नाही. तथापि आपण पुढें उघडे प्राा आहेत. आम्ही केवल डोंगरांत आलो. आम्हास तर सुतरां कलत नाही. यास्तव शोध करून येक दों दिवसा आड फारच गलबलेचे दिवस आहेत तों दोन च्यारदा वर्तमान लिहून पाा. लोहगडचे पेठेस दगा करून लुटली. लोभे करून अन्यत्रहि दग्यास प्रवृत्त होतीलच. यास्तव अगत्य वर्तमान आणून लिहून पाा. तलेगावी फौज आहे ती जवलच आहे, यास्तव

डोंगर काठाडीने माणसें पा। वर्तमान आणऊन दोन च्यार वेळ अगत्य लिहून पा। बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Trimbakrao Vishwanath requests Ramshastri to supply him news about the movements of the Peshwa and his army.*

No. 92] [*5-5-1763*

श्री

वेदशास्त्रसपन्न राजश्री रामशास्त्रीबावा स्वामीचे सेवेसी विद्यार्थी नारो आपाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २१ सवाल वैशाखपावेतो येथास्थित आहें विशेष. स्वामीनी आसीर्वादपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. मावळात मराठ्यांची दोनतीन हजार फौज येऊन गाव जाळितात. लोहगडची माचीहि जाळिली, लुटली. ते समई विसापुरकर याणी भरती किल्यावरी कमी असतां जाऊन बरेंच कामकाज केले, येतद्विशईचा कितेक मजकूर विस्तारें लिहिलें तो सविस्तर कळो आलें. ऐशियास बहुतापुढें थोड्याने काये करावे? तऱ्ही विसापुरकर वगैरे याणी आपले जिवाप्रमाणें शर्त केली. सेवटी माची लुटली गेली यास उपाये काये? दिवसच सर्वास येक प्रकारचे आले आहेत. श्रीमंताकडील बातमीचें वर्तमान ल्याहावें म्हणौन लिहिलें; त्यास श्रीमंत भालकीकडे गेले. त्यांचें तूर्त माघारें यावयाचें लक्ष दिसत नाही. तिकडेहि याचप्रकारें ते खंडण्या घेतात. जेथे पैका यावयास उसीर लागतो ते गाव लुटून, जाळून खराबी करितात याप्रो। आहे. मोगल पुणियाहून बारा कोसावरी नांदुरास मुकाम करून आहे. राजश्री विनायेकदास चाकणे नजीक आहेत. काही थोडे बहुत मोगलास देऊन शहर वाचवावें याप्रो। मजकूर केला आहे. राजश्री नरसिंगराव जनार्दन धायगुडे रखवालीस पुण्याच्या त्याजकडून आणविले आहेत. कळावें म्हणौन लिहिलें आहे. निरंतर आसीर्वादपत्र पाठवावें. बहुत काये लिहिणें, कृपा आसों दीजे हे विनंति.

¶*Naro Appaji writes to Ramshastri about the miserable condition of the province owing to the raids carried on by the enemy's detachments and says that both the Peshwa and the Nizam are devastating the territory of each other.*

6567

No. 93] [8-5-1763?

श्री

गुरुवर्य वेदशास्त्रसंपन्न राजश्री
बावा स्वामीचे शेवेसी

जनार्दन भट शाळग्राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. आपण पत्र पाठविले ते पावोन परम संतोष जाला. सदैव पत्र पाठऊन संतोषवीत गेले पाहिजे. इकडील वर्तमान तर यवन राजापुरास गेला; तेथून पुढें जाणार. अवरंगाबादेचा रोख आहे व गमाजी यमाजी साताऱ्या प्रांती म्हसव्यांत आहे. पुढें मोगलाकडे जाणार. गोपाळराव मोगलाजवळ आहे. श्रीमंत तर भागानगरची खंडणी घेऊन मेदगावर आले. बसालतजंग पांच हजार फौज व सात हजार गाडदी सुधां श्रीमंतांस भेटला व हयदर नाइकास तिकडील कांही कर्नाटकांतील प्रांत देऊन आपला केला आहे व मीरखान ठोका व नागोराम याणीं च्यार पांच हजार फौज मिळऊन पैठणाची खंडणी पंधरा हजार घेतली व बाबूजी नाईक बारा हजार फौज सुधां खंडण्या घेत घेत बालेघाटावर आले. श्रीमंतांजवळ चाळीस हजार फौज आहे. मोगलाच्या पारपत्यास येतात कळावें. आम्ही तर भुगावास जाऊन प्रस्तुत राहतो. गावांची घरे राहिली आहेत. पुण्यांतील घरांचा मजकूर तर आपणांस कळलाच आहे. फिरून पुण्यात जायाचें प्रयोजन नाहीं. गडावर वस्तभाव गेली होती ती मात्र राहिली आहे. बाकीचा (यापुढील बंद मिळाला नाहीं.) होय आपणास कळावें कृपा करीत गेले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Janardan Bhat Shaligram writes to Ramshastri communicating news about several persons. The Peshwa has exacted tribute from Haidrabad and has proceeded to Medak says the writer.*

No. 94] [8-5-1763

श्री

पुरवणी राजश्री विनायेक धोंडो व
बाबूराव बापूजी गोसावी यांसि

आसीर्वाद. सुाा सलास सितैन मया व अलफ. पुण्याहून राजश्री बाबूराव काणे यांचे भाऊ येथे छ २३ सवाली तलागडास आले. त्याणी वर्तमान सांगितले की, नवाब निजामआली काली शुक्रवारीं सेखसला पीर याचे दर्शनास येणार होते. पारगावावरी मुकाम होता. आज पत्र लोहोगडाहून येका ग्रहस्थाचे पत्र येका ग्रहस्तास आले. त्याणी लिा आहे की, सुक्रवारी नवाब पुण्यास येणार होते. पुण्यास आले असतील. व राजश्री नारो आपाजी यांसी नवाबा-

कडील ग्रहस्थांनी लिा कीं, कांही तऱ्ही पुण्याची खंडणी द्या म्हणजे पुण्याचे वाटे जाणार नाहीं. त्यास थोडी बहुत पुण्याची खंडणी देतील ऐसें दिसते, म्हणजे नबाब साताऱ्याचे रोखे जातील. ऐसे वर्तमान ब्राम्हण आला त्याणे व पत्रावरून कळले. व तमाम घांट लोक पाठऊन आम्ही बंद केले आहेत, परंतु तुम्ही बातमी चहूकडील मनास आणीत जाणे. व हती या प्रांती आले म्हणून किले कोरीगडास व सिंहगडास लेहून पाठविले आहे कीं, बातमी वरचेवरी लिा. हती इकडे आले याजमुळे बातमीची खबरदारी बहुतच करावी लागली आहे. व राजश्री रामाजी माहादेव व सुभेदार कल्याणभिवंडी व राजश्री विसाजीपंत सुभेदार वसई यासी पत्रें पाठविली आहेत व चंदीची याद त्याजकडे पाठविली आहे. ती पत्रेंच बजिनस तुम्ही वाचून पाहून उभयेता सुभेदारांकडे रवाना करणे. पुढे घाटावरी धामधूमच राहिली तरी पाऊस समीप आला. घरेदारे हतीस व माणसास जाली पाहिजेत. त्यांचे विचारे सुर(ली)त जागा असेल तेथे हती ठेवितील अगर कल्याणभिवंडीस सुरलीत नसेल तरी अगर वसई प्रांती सुरलीत नसे तरी त्यांची उतरे येतील त्याप्रमाणे करावे लागेल. तर देखत पत्र उभयेता सुभेदारांची पत्रें व दोन तालका चंदीच्या पाठविल्या आहेत, त्या दोघांच्या पत्रांत घालून लाखोटे करून सत्वर त्याजकडे पाठवणे. त्यांची पत्रे आमचे नावे येतील ती वाचून पाहून आम्हाकडे पाठवणे. रा। छ २४ सवाल

¶*The writer refers to the impending attack of the Nizam on Poona, the consequent panic caused by it and the precautions taken by the residents.*

No. 95] [*15-5-1763*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री
राजश्री सातबादादा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. येथील कुशल तागायत जेष्ट शुध द्वितीया मुकाम कवडी जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण गेले यापासून कांहींच वर्तमान कलत नाहीं. तरी सविस्तर ल्याहावें. तुम्हीं नेमिल्या स्थलास गेले नंतर राजश्री हरबास फुडा रवाना केलाच असाल. मशारनिलेनीहि दो रोजांत आटपाआटप करून तुम्हापासी येऊन पोहचलेच असतील, अशास तेथील गुंता उरकून सत्वर यावें. नवाबांचा तूर्त मुकाम येथेंच आहे. राजश्री राजे बहादुर सासवडाहून अद्याप आले नाहींत. येका दो रोजांत येणार आहेत. राजश्री विनायेकदास पुणेस संगमावर आहेत. पुणेची कांहीं बाकी राहिली नाहीं

परवतीच्या वगैरे सेहरांतील देवाच्या मुहूर्ती झाडून फोडल्या. सेहराभोंवत्या चौक्या बसऊन हवेल्याचा झाडा घेतात. ·फुडा आणखी काये अवस्ता करितील हें कळेना. गाडा तरकारी व आंबाडी भरून पाठविलेत ते पावले. कांहीं बैलाची सोई पाहून आणावे. गाडे दौडेहून आणविले आहेत त्यांची बेजमी करावी लागती. दिवसेंदिवस वोजे भारी होत आहे त्याची तरतूद करावी लागती तर बैल जरूर आणावे. आपण आटाला घेऊन जलदीनें यावें. अडचण रानांत फार. राहूं नये. आटाला सांभाळून आल्यास उत्तम. कदाचित गुळ्याची बातमी आली. जवळ असल्यास पागा व लोक पाठवावे. तुम्हीं खुद न जावें. आतां गुढी बलावली जोहालत[१] न करावी. सहजांत जाहालें तर उत्तम. लौकर यावें. राजश्री प्रतापवत यांजकडे पत्रें देऊन स्वकीये कार्यास राजश्री जनार्दन त्रिंबकास रवाना केले. कळावे. या पत्राचे उत्तर जलद पाठवावे. आज दोन तीन रोज वर्तमान कांहीं कळलें नाही. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

¶*The news of the devastations round about Poona wrought by the Nizam's forces is communicated to one Satba.*

No. 96] [*May 1763?*

श्री

राजश्री हरिपंत तात्या स्वामीस

विनंती. उपरी, आपला निरोप घेऊन आलों तो सोमवारीं साईकालीं पुणियासी सुखरूप पावलों. वरकड वर्तमान तरी पुणियांतील सर्व माणसें व दाणा ऐसें घेऊन जागजागां किलोकिलीं गेलीं. श्रीमंत सौभाग्यवती मातुश्री आनंदीबाई व रमाबाई व मातोश्री सगुणा मातुश्रीबाई व नारायेणराव ऐसीं किले पुरंधर येथें गेलीं. मातुश्री गोपिकाबाई मात्र पुणियांत सडी राहिलीं आहेत. मोंगल पुण्यापासून च्यार कोसांवर जेव्हां राहील तेव्हां निघोन पुरंधरास जाणार यापमाणें वर्तमान आहे. श्रीमंत राजश्री बाबाचे घरची व श्रीमंत राजश्री नानाचे घरचीं माणस सर्व किले लोहगड येथील पेठेस गेलीं. आपले घरचीं माणसेंही लोहगडास गेलीं. राजश्री नारोपंत करमरकर यांची माणसें वगैरे जिनस किले पुरंधर येथें गेलीं. राजश्री आबा मात्र सडे आणखी दोन कारकून येणेप्रमाणें येथें आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. अद्यापहि लोक पुणियांतील वस्तभाव पाट, जाती, संदुखा, तूप, तेल वगैरे किरकोल जिनस देतच

---

१ मूर्खपणा.

आहेत. कलावें. आम्ही येथें आलों तो राजश्री हरिपंत नातू याचे घरचीं माणसें सर्व कांहीं कोकणांत व कांहीं सेडाणीस गेलीं आहेत. हरिपंत मात्र नारो आपाजी. याचे वाड्यांत आहेत. घरीं कोणी नाहीं. तेव्हां सेजारी नारोपंत साठे आपल्या घरांत होते त्याणी कवाड उघडिलें तेव्हां घरांत वोटीवर मात्र आलों. दुसरे दिवशीं च्यतुर्थी जाहाली. भोजनाचें संकट पडलें. भात करावयास भांडें नाहीं. तेव्हां श्रीमंत नानाचे घरचीं भांडीं होतीं ते त्याचे घरीं दिल्ही. त्यापैकीं येक तपलें मात्र ठेऊन घेतलें. त्यास सदाशिवपंत व आम्ही मिलोन भात करून जेवलों. उदकुंभासी गांठ पडली आहे. परंतु दारीं विहीर आहे. त्याची मात्र सोई पाहून राहिलों आहों. आठा चोहों दिवसीं घरास जाणार. परंतु श्रीमंत राजश्री नानास भेटावयास गेलों. त्याणी आज्ञा केली. सदाशिवपंत व कृष्णाजीपंत यांस सांगितलें कीं, तुम्ही आपलीं घोडीं आणून आमचे पागेस लावणे आणि आम्हांस सांगितलें कीं, तुम्ही आपलें घोडे माणूस आपणाजवल ठेवणें. तुम्हांस काम सांगावयाचें आहे. त्यास कोणत्या पेचांत पडों तें पाहावें. तात्याचे येथून घरास जावें हा हेत धरून आलों त्यास पेचांत पडतों आसा रोख दिसतो. आणि भोज्यनाचेंहि विपत्य. बरें, जे जाहालें तें उत्तमच म्हणावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*The extreme disorder created at Poona and the evacuation by the people due to the apprehended attack on Poona by the Nizam is communicated to Haripant Phadke.*

No. 97] *[May 1763?*

श्री

आपत्येसमान गणेश विस्वनाथ साष्टांग नमस्कार विनंती. तात्या, आपले घरीं गेलों होतों. सर्व घरचा प्रकार पाहिला तो बराच आहे. राजश्री आबा पुढें आले म्हणोन बंदोबस्त चांगलाच जाहाला, नाहीं तरी गलाटा होता. पांचशें रुपये भाडे खर्च पडला, परंतु वस्तभाव सर्व ठिकाणी गेली. श्रीमंत राजश्री बाबा व नाना याची मनुशें व वस्तभाव सर्व लोहोगडास गेलीं. पुण्यामध्यें कोणी येकानें काडीची मता ठेविली नाहीं. घरें रक्षावयास मात्र सडे राहिले आहेत. मोगल भीमेवर येईतोंपावेतों कोणी घर सोडून जात नाहीं. याप्रमाणें सर्वांचा निच्यय आहे. सरकारच्या वाड्यांत मातुश्री गोपिकाबाई मात्र राहिलीं आहेत. श्रीमंत नानाफडणीस पुण्यांतच आहेत. राजश्री माधवरावमामा सातारियास गेले आहेत. तेथील बंदोबस्त करून येतील. वरकड वर्तमान तरी मातबर मातबर

6571

लोक होते त्याणी देखील उदकुंभाची प्रार्थना केली आहे. तांब्याचें भांडें न मिले याप्रमाणें लोकांनी कारभार केला आहे. घरें मात्र राहिली. दरवाजे देखील ज्याचे सोई आहे तो काढून नेतच आहे. कोठे नेऊन लावणार आहेत तें ईस्वर जाणें. आमचा प्रकार म्हणावा तर राजश्री सदाशिवपंत व आम्ही मिलोन हरिपंताचे विहिरीवर येका तपल्यांत भात करून भोज्यन करून राहातों. राजश्री कृष्णाजीपंत आपल्ये बिराडीं गेले. वस्ती आहे. आम्ही उभयेतां घरास जावयाच्या विचारांत आहों, परंतु श्रीमंत नानाचे भेटीस काल गेलों आणि घोड्याचे दाण्याची चिठी मागों लागलों. तेव्हां बोलिले कीं, कृष्णाजीपंत व सदाशिवपंत यांची घोडी आमचे पागेस ठेवणें. आम्हांस सांगितलें कीं, तुम्ही आपलीं घोडीं व माणूस आपणांजवल ठेवणें. तुम्हांस काम सांगावयाचें आहे. त्यास मी घरीं जावें हा हेत धरून आलों त्यास हा प्रकार येथें आढलला. कोणत्या पेचांत पडूं तें न कले. बरें. ईश्वरकृपेनें जें होईल तें खरें. परंतु आपणास कलावें म्हणोन लिहिलें आहे. तुम्ही आपणांकडील वर्तमान लेहून पाठवित जावें. ज्याप्रमाणें आज्ञा होईल त्याप्रमाणेच वर्तणूक करीन. वरकड वर्तमान राजश्री आबाचे पत्रावरून सविस्तर कलेल. बहुत काय लिहिणें? लोभ करावा; वियोग जाहाला म्हणोन लोभ टाकूं नये. हे विज्ञापना.

¶*This is another description of the confused state of things at Poona when threatened by the Nizam.*

No. 98] [*3-6-1763*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामशास्त्री
स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी नारो आपाजी कृा नाा विनंती उपरी येथील कुशल जेष्ट वाा सप्तमी जाणून स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन कुशलार्थ कलों आला. श्रीमंताचे लस्करचे बातमीचे वर्तमान लेहून पाठवावें म्हणून लिा ऐशास श्रीमंतास भागानगर प्रांते जाऊन तिकडील मुलूक लुटून जालून ताराज केला. मातबर संस्थानापासून खंडण्या घेतल्या. भागानगरासहि तंबी पोहचाविली. तेथील खंडणीची बोलीचाली लागली आहे. बसालतजंगाकडील राजकारण ठीक जालें. त्यास लौकरीच सामील करून घ्यावें, आणि माघारे फिरोन येवनासी गाठ घालावी ऐसें वर्तमान आहे.

बातमीची पत्रें काली याप्रा लस्करांतून आली. मोगल तलेगावाहून कूच करून घोडनदीवर गेला. नगरचे सुमारे जाणार. आपणास कलावे, यास्तव सविस्तर लिा आहे. बहुत काये लिा कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Letter from Naro Appaji to Ramshastri Prabhune :—" The Peshwa's army has advanced far into the Nizam's territory and is spreading destruction all over. The Peshwa has been successful in winning over Basalatjang to his side and now intends to march back to his territory and close upon the enemy who is ravaging the Peshwa's territory between Talegaon and Nagar."*

No. 99] [*13-6-1763*

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यासी

विनंती उपरी. तुम्ही छ २१ जिलकादची पत्रें पाठविली ती छ २९ मिहूस पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कलले. तुम्हास ऐवजाविसी लिहिले होते त्यावरून राजश्री लक्ष्मण नाईक व गोपाल नाईक तांबेकर यास पुण्यास ऐवज देऊन त्याचे मारफातीने हुंड्या रो

३८००० निबाजी नाईक दसपुत्रे यांचे जागेच्या

१००० आबाजी नाईक काबरस

३००० हुडी लक्ष्मण ना व .... तांबेकर याणी केली ते

३००० हुडी श्रीपत नाईक काबरस याणी केली ते.

६०००

१२००० माहादसेट वीरकर हुडी केली लक्ष्मण सेट वीरकर

३००० नरसापा नाईक बेटगिरी लिहिली कृष्णाजी नाईक बेटगिरी

७००० भिमंणा नाईक निा भगवंत नाईक परांडे हुडी केली नरसापा नाईक पराडे

३००० वेकापा नाईक नवलगुंदकर याजवर गणपा नाईक यांणी लिहिली.

४००० गोपाल नाईक निा तिमणा नाईक बागडकोटकर
लिहिली तिमणानाईक बागडकोटकर

३००० शेषगीर नाईक बागडकोटकर लिहिली गोविंद ना देवळे

३८०००

५००० निबाजा नाइक दशपुत्र याजवर लिहिला आमणा
नाईक दसपुत्रे

४३०००

येकून त्रेतालीस हजार रुपयांच्या हुंड्या आठ रोजाच्या मुदतीच्या पाठविल्या त्या पावल्या. रुपये अर्कट गंजीकाठी घ्यावा म्हणौन लिहिलें ते कळले. हुंड्या येथे आल्यावर ज्याच्या त्यास दाखविल्या. मुदतीस ऐवज देतो म्हणौन कबूल केले आहे. ऐवज जमा जालियावर तुम्हास लिहून पाठऊ. पुण्यात ऐवजाचा तोटा. पहिली नेमणुक केली होती त्याप्रो ऐवज आला नाही, परंतु लस्करांत ऐवजाची निकड याजकरितां मुबादला करून सदरहू ऐवज पाठविला म्हणौन लिहिले ते कळले. त्यास इकडे ऐवजाचा तोटा फार. तुम्ही पाठविला हा ऐवज मोठ्या समयास येऊन पोहचला. इकडे नख्त रुपयाचे दर्शन नाही. किरकोळ खर्चास फार पेच पडतो. तुमच्या नख्त ऐवजाच्या हुंड्या आल्या, या फार उपयोगी पडल्या. याउपरीहि जितकी तर्तूद होईल तितकी करून ऐवज लस्करास पाठवित जाणे. हुंड्याचा ऐवज लस्करात लक्ष्मण नाईक व गोपाल नाईक तांबेकर याचे तसलमांत पैकीं जमा धरिला जाईल. रा छ १ जिल्हेज सुहूर सन आर्बा सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.[1]

¶*Peshwa Madhavrao informs Balaji Janardan of his having received the money that was despatched by the latter and that it proved of great service.*

No. 100] [*Recd. 6-7-1761*

छ ३ जिल्हेज

श्री

सेवेसी विज्ञापना आज्ञाधारक राणोजी चवरे दोन्ही करकमल जोडून सा। दंडवत विनंती उपर. रायानें नवाब निज्यामअलीखानास सांगितले जे, दोन वरस श्रीमंताकडील नाईक व जोड्या चार आहेत. तेव्हां नवाब बोलला जे

१ पत्र माधवराव पेशव्याचें.

साराच सरदारापासी बातनी श्रीमंताची आहे. तेव्हां इसमायेलखान म्हणू लागला जे मजपासी बातनी नाही. तेव्हा नवाब बोलले जे तुम्हापासी बातनी चोरून तरी आसल.• बातनी तमाम सेर जागाजागा आहे. दुसरे रायाने नवाबास सांगितल जे मी आपला ब्राम्हण पडतुरचा हिसोबासाठी श्रीमंताकडे पाठवितो. रो दमाजी गाईकवाड याचा तगादा पैकाचा आहे. त्यां जाबसालासाठी वकील पाठवीत आहे. मग तुम्ही म्हणू लागल जे वकील का पाठविला. ता। छ १८ ते दिवसी निरोप जाल्हा. ता। छ १९ जिल्हेज ते दिवसी लोकाच देणे घेने केले. ता। छ २० जिल्हेज ते दिवसी रायानें कूच प्राथककाली केला. कोडलवाडीचा वाटन जाणार आहे. रायाकडील भला मानूस दो चऊ दिवसा येथून स्वामीकडे येणार. याबराबर मजला रो बलवंतराव व रो धोंडो राम पाठवीत आहेत. राव खंडागले ये समई स्वामीजीने पदरी घावे. निज्यामअलीखान हावभरीचा गोस्टी सांगत आहे. खामखा बद्मामली करील अस दिसत आहे. राव खंडागले याप्रमानें बोलत होते; आत्नी जणाची बोली हेच आहे; आनी आम्हास येथील चलतर दिसत आहे. नाना परकारचा गोस्टी रो राजेबहादर करीत आहे. निज्यामअलीखान तर बहुत हावभारी जाल्हा आहे. राव खंडागल्यास बोलत असे, आता भांडायाचा कोन्ही दिसत नाही. श्रीमंत भाऊसाहेब मर्द माणूस होता; त्या बराबर लोक मर्द होते. ते तमाम फऊज बुडाली. आता लाख फऊज आली तर मारून चालवीन, ऐसा रायापासी बोलत होता, म्हणऊन राव भले लोकास सागत असे, याप्रो हकीकत आहे. खंडागल्या वचनाचा ठीक ज्याचा होईल त्याचाच: सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This is a news-letter from the Nizam's court sent to the Peshwa by some one of his agents, describing the aggressive and haughty demeanour of the Nizam. Vithal Sundar and Damaji Gaikwad are mentioned.*

No. 101] [*19-6-1763*

श्री

शेवेसीं सिवाजी गोविंद च्यरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत अधिक आषाढ शुध नवमी इंदुवार पावेतो वर्तमान येथास्थित असें विशेष. लस्करचें वर्तमान तरी श्रीमंताकडून गदवालच्या मुकामाहून जासूद जेष्ट वद्य अष्टमीचे कागद जासूद घेऊन आले ते काली सिंहगडी गेले. श्रीमंताची व बसालतजंगाच्या भेटी जाहाल्या. तो समागमें आहे. मजल दरमजल येऊन मोगलास गाठावें ऐसा विचार आहें म्हणोन जासूद सांगतात. मोगलांच्या लस्करातून धोंडोराम वकील

यांचा कागद छ १ जिल्हेजचा जतिगांवनजीक वाजरांतीर मुकामचा आला, तो काली छ ६ जिल्हेजीं येथे जासूद घेऊन आले. त्यांतील मजकूर साऱ्या मराठ्या फौजा गोपाळरांव आद्यकरून समागमें आहेत. धारूरावर खासा मोगलानें छावणी करावी आणि विनायेकदास व जानोजी भोसले यास शहरास फौज देऊन छावणीस रवाना करावें. श्रीमंत पुण्यास छावणीस आले तरी मोगल देखील शहरास छावणीस यणार म्हणोन त्यांणी लिहिलें आहे. गमाजीपंत अद्यापि सातारियास म्हसव्यावर आहे. त्याजवळ मोंगलाकडील सरदार जंगी हजारी हजार स्वारांनसी होता तो रुसोन निघोन मोगलाकडें गेला. खासा गमाजीपंत मात्र दोंअडीच हजार फौजेनसी आहे. काला रविवारी मातुश्रीबाई येणार होती त्यास रजश्वला जाहली याजकरिता च्यार दिवस राहाणें जाहालें. त्रयोदसीस यावें यैसा करार आहे. वरकड सारें लोक यावयासी लागले. तमाम छपरें घालितात. जिनसाचा निर्ख तांदूळ सडीक बारीक कैली ८८२॥ व डाल तुराची ८८२। व जोरी ८।.। व बाजरी ८८२।॥ व गहू ८८२॥ व उडीद तीन पाइली व तूप वजन पके ८८१८९ तेल ८८२।. याप्रमाणें आहें. लक्षुमण जासूद यास राजश्री मोरोपंताकडे पंचमीस रवाना केला. चक्रपाणि यास माहाराजांकडेस कागद देऊन रवाना करीत होतों तो न जाई व येथेंही चौकीस असत नाहीं. रोजमरा मागतों, त्यास सांगितलें कीं येथें देणार कोण? धन्याकडे जावें. मी कोठून द्यावा? तीन रोज कागद लिहून जाहाले, परंतु तो न जाई, ते कागद हाली सेवेंसी पाठविले आहेत. सेवेसीं श्रुत होय. हें विज्ञापना.

¶*Shivaji Govind writes about an interview between the Peshwa and Basalatjang and gives the movements of the two armies.*

No. 102] *[22-6-1763*

श्री

चिरंजीव राजश्री बालाजीपंत याप्रती मोरो हरि आशीर्वाद उपरी. ता। आधिक शुध द्वादसी बुधवारपावेतो मुकाम सातारा वर्तमान कुशल आसे विशेष. बहुतां दिवसा लक्षुमण जासूद याजबा। जेष्ट वद्य द्वादसीचे पत्र पात ते अधिक सुध नवमीस येथे पावले. लिहिल्यप्रा सविस्तर कलले. आम्हकडील वर्तमान तरी लस्करातून फालगून मासी आलो त्या ता। हा कालवर येथेच आहो. कोकणात गेलो नाही. लग्नाकरिता कोकणात जावे लागते म्हणून पेशजी लिहीले होते. त्यास वैशाख मासी सूध नवमीस चिरंजीव मुलीचे लग्न सातारा जाले. रा। गणो कृष्ण दाते खालगावकर याचा पुत्र कोकणांतून नवरा आणिला. लग्नाचे दुसरे रोजीं रा। गमाजी बावा या प्रातात येतात म्हणून आवई पडोन गडबड बहुतच जाहाली. त्यामुले

6576

कोकणात मुलेमाणसे पाठवावी तरी मला वाट व तिवरा घाट तमाम वाटा मोरगिरीकर व वासोटेकर यास सांगोन बंद केला. कोकणात जावयाचा उपाय राहिला म्हणून कुटुंबसुधा किले परलीवर जाऊन राहिलो. तेथें वारा पाऊस बहुत यांजकारितां घर नवे बांधिले. गमाजीबावाहि दोन च्यार हजार फ्रोजेनिसी सातारा येऊन साताराच्या गडास मोर्चें दिल्हे आणि तमाम गावगना रोखे करून पैका येक साला जमेप्राा रयतेपासून घेतला. मुलूक काही जालिला. काही लुटिला. शाहारचे मात्र वाटेस गेले नाही. परंतु जितका मातबर माणूस सापडला त्याजपासून खंड घेतला. इतक्यात रा गोपालराव बरवे व नरसिंगराऊ पागेचे यैसे पाचा हजारा फौ(ज)नसी मिरजे आलीकडे श्रीमंताकडून याच्या पारपत्यास आले. त्यावरूनही बातमी गमाजीबावास कलताच येथून निघोन चिमणगावावरी मुकाम केला आहे. गावगना खंडण्या घेतच आहेत. पुढेहि फौज आलियावरी त्यांचे त्यांचे कसकसे होईल ते पहावे. श्रीमंतहि भिमातिराने पंढरपूरच्या रोके येत आहेत. मोंगलासी लढाई करावी यैसा मनसबा आहे. या आठा पधरा रोजात कायेतो निवाडा होईल. येथील वेडा उठलीयावरी राजश्री अच्युतरावजी याणी आह्मास बलाविले ह्मणून सडे गडावरी आलो आहो. माणसे परलीवरी आहेत. गमाजीबावा घाटाखाले आजी उद्या गेले म्हणजे मुले माणसे सातारां आणवितों आणि तुम्हास लेहून पाठऊ. सातारा किला श्रीमंताच्या पुण्यप्रतापे रक्षिला आहे. या पलणीमुले गलादाणा वैरणकाडी राहिलीच नाही. गलाठा आमचा जाहाला. संसार भारी. कार्यप्रयोजन दरसाल करावे लागते. तेथें राहून आमचा काल कसा चालतो? दरबारी आम्हाविसी साहित्याची गोष्ट बोलतो कोण? काये करावे? यैसे संकटात पडिलो आहे. त्यास श्रीमंत समीप आले म्हणजे तेथील कारभाराचा मानमार्ग पाहून श्रीमंत राजश्री शास्त्रीबावाच्या कानावर सर्व आमचा मजकूर घालून त्यांचा मनोदये पाहून आम्हाकडे लेहून पाठवावे. त्याप्राा वर्तावे लागेल. बहुत काये लिहिणे हा आशीर्वाद.

¶*Moro Hari Bhave reports details of the siege of Satara by Gamaji Yamaji.*

No. 103] [*15-7-1763*

(पहिले ४ बंद गहाळ.)

पौ छ ३ मोहरम आषाढ
शके ८९ सन आर्बा सितैन.

५

न ये तो सर्व चालविणें आपणास आहे. उपरी गांवांत च्यार इस्टमित्र आहेत कीं गांव सर्व खराबीस आनिला हे संकट. बरे, श्रीसिधेश्वर जाणत आहे कीं, गावासी चाकरी इमाणें इतबारें केली, घरें वाचविलीं, प्रत बुडविलीं खटपट केली.

येजमाण श्रीमंत राजेबहादर बोलिले कीं, तू आमचा चाकर आसतां खेडकडूस दोन लक्ष रुपये चुकती करून द्यावी आगर जालावी होती; ते तुम्हीं हावालादार होतास तर हें काम निमखहारामी केली. तेथें श्रीमंत विणायेकदास उत्तर करूं लागले कीं, हावालादार होता परंतु आमला पायें घरीं पैका आहे ते देखील सांगितलें नाहीं. गांवच्या पांड्याणे सांगूण पाठविलें, तावजी समागमी कीखनीत गावासी पाठवणें. हें उत्तर श्रीमंतापासी विणायेकदास करूं लागले, ते समई राजश्री निलकंठराव हरि गोपाळराव याचे भाऊ होते. तुम्हीं परभारें पत्र पाठऊन उत्तर घेऊन जावें. असी धनीयाची मर्जी आमचेविशाई आहे. आपण साप उत्तर कचेरीस केलें कीं आमची जेन्मभू मिरासीची जागा श्रीक्षेत्र ज्याप्रो पंढरी त्याजप्रमाणें खेड आनि आपण साहेबाचे चाकर म्हणवीत आसतां आपले गांव न रक्ष्यावे तरी समर्थच्या पदरीं असावें कशासी? बरे, लवकीक तरी की आपला गांव वाचविला हेच मातबरी जाली. परंतु महाराज यानी दिल्हा तेव्हा गांव वाचविला यांत काही आमचा पुरुशार्थ जाला नाहीं हे उत्तरें जालीं. हे कर्म येजमाणापासी गावी तो सर्वतोमुखी की, विसोबाणें गांव खराब केला. बरे? दोहींकडून सुखोततो नाहीं. बरे, श्रीसत्ता परंतु निंबालकर चाकरीस आसतां त्याच्या मातबरीएवढी इतर कोणाची मातबरी नाहीं. आदचाकर त्याचे गाव प्रो बीड प्रो बरडों प्रो तुळजाणापूर इतर गैरतर्फा सर्व बेचिराख जाल्या. दिवा चालीस पणास कोस चऊंकडून नाहीं. हे दशा तहात भागानगरापो जाली. मुलकाचा सत्यानास होतो तो कागदीं लिहितां हात चालत नाहीं. कानीं आइकूं नये. गरती बाइका मुसलमाण आनितात. हे आकांत मांडिला आहे. श्रीमंत दादासाहेब व नवाब बसालतजंग यो तीस हजार स्वार सडे जरारे होऊन श्रीभीमापार बहिरबुनगे मिरज प्रांतीं येऊन याच्या तोंडावर येतात. यासी त्यासी फेर चालीस कोसाचा आहे. लढाई परछिण होणार. श्रीमंत दादानीं किले कलबुर्गे लुटून तारा (ज) केले. तमाम लुटीत भागानगरापासून आ(ब)दुलपूरपर्यंत आले. आलंद गुंजोटी दोन प्रगणे चवाणाचे दोनसे गांव खराब केले. परंतु धारण पांच साहा शेराची जाली. रोज दररोज शेदोनसे घोडी उठोनीस आलीं. गुरें मिलविलीं आहेत ते मरतात. वइरण तो येक रा नाहीं. तेलंगण देश, घोडी जाया जाली आहेत. आशासी येंदाची मोहीम धावनीची जाली. याजमुलें गालाब्यासी आले. परंतु लढाई परछिण होईल अगर सला होईल. सर्वांचा मणोदय देखील दादाचा मनसुबा की सला करावा. राजश्री बापू मात्र सल्यासी राजी नाही. ऐसी ताजी खबर आहे. तूर्त श्रीमंत दादासाहेब परगणे आबदुलपूर त्या जागा आहेत. हे किले आवसे त्या मइदाणात आहेत. मोंगलाच्या छावनीचा

करार नाहीं की, कोठें करितात. दादांचाही करार नाहीं की प्रांतास येतात. हें वर्तमान आहे. जेथें आवेंध राहील त्याच्या आसपास हेही राहणार. मोंगलापासीं सर्व मराठे आद्याप छ मजकूरपर्यंत भोसले गोपाळराव सर्व आटोकाट जो जमाव आहे तोच आहे. उद्यां काये होईल तें पहावें. धारण आद्याप सोला शेर हरभरे, पंधरा चवदा शेर कणीक आहे, दीडशेर तूप आहे, आठ नव शेर मीठ, ऐसी धारण आविधाच्या सइन्यांत आहे. येणेप्रमाणें आजपर्यंत मजकूर. स्वामीची जैसी आज्ञा येईल त्याजप्रमाणें शेवक वर्तनूक करील. बहुत काय लिहिणें, कृपालोभ आसो द्यावा, हे विज्ञप्ति.

राजश्री नारोपंत नानास साष्टांग नमस्कार. सर्वस्वें शेवक पदरचा जाणोन सतेणे लिहिलें. कृपा आसों द्यावी हे विनंती.

राजश्री गोविंद नाईक यासी साष्टांग नमस्कार. कृपा आसों दीजे हे विनंती.

¶*The ravages of the two warring parties in the country are very vividly described in this incomplete letter. Basalatjang and Raghunathrao are reported to be desolating each other's territory.*

No. 104] [*6-7-1763*

पौ छ १० मोहरम आषाड शुध १२

श्री

राजश्री अनंदराव धुळप

गोसावी

ऽ अखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा आर्बा सितैन मयां व अलफ. तुम्ही पत्र पाठविले पावले. सातारा प्रांते धामधुमिचे प्रसंगामुले सरकारची सनद सादर जाली. यावरून दोनसे लोक तिवऱ्याचे घांटे रवाना केले आहेत. त्यास त्या लोकानी कोणत्या मार्गें यावें? निभाव पडेसा असेल त्या मार्गास दोघे माहितगार माणसे पाठवावी, म्हणोन लिहिलें. त्यास राजश्री सदासिव येमाजी प्रस्तुत कराड प्रांते गेले आहेत. सातारियास यावयास लोकांस वाटेचा कांही पेंच नाहीं. तिवऱ्याचे घाटें येतां किले वासोटियाचे लोकांची मात्र बातमी राखून यावें. पुढें ब्राम्हणोलीस कोणी वासोटकर वगैरे असिले तर तो शह चुकाऊन यावे म्हणजे अलीकडे कांही गुंता नाहीं. तर वासोटकरांचा मात्र पेंच घांट मेटीं सांभाळून सावधपणे रात बिरात खबरदारीने राहून लोक सातारियास येऊन पोंहचत यैसे करणे. जाणिजे छ २४ जिल्हेज बहुत काये लिहिणे.

¶*Madhavrao Ballal advises Anandrao Dhulap to send his contingent of 200 by the Tiwra pass so that it might reach Satara safely.*

6579

No. 105] [11 August 1763

श्री

२

(पहिला बंद गहाळ आहे.)

व माधवराव नरसिंग पागा हुजूर यास जखमा भारी लागल्या, याप्रमाणें वर्तमान जाहलें. ईश्वरें मोठें येश दिल्हें. मोगल पलीकडे होता त्याचें पत्र आलें कीं मी कांहीं तुमचे केलें नाहीं. विठल सुंदर यांणीं तुम्हासी दावा बांधला होता त्याचा सूड घेतला. तुमची लूट आणिली ती मजकडे आहे, ती पाठऊन देतों. भाऊसाहेबाचा करार आहे त्याप्रमाणें असो द्यावा. मोगलाचा धर सुटला. बुधवारीं मध्य रात्रीस पलीकडून कूच करून औरंगाबादकडे गेला. विठल सुंदर याचें शीर व विनायकदास याचें शीर पालखींत घालून मोगलाकडे पाठविलें. गोपाळसिंग खदारकर व शाहाजी सुपेकर व खडांगले याचा पुत्र व चवाण हेंही मारिले गेले. तीन अंबारिया हतीसुद्धा व खासेआणखी गंगेमध्यें बुडाले, ते कोण बुडाले हें कळलें नाहीं. याप्रमाणें वर्तमान जाहालें. तात्या व सखारामपंत बापू व पिराजी नाईक निंबाळकर हे जानोजी भोंसले यास आणावयास गेले आहेत. भोंसले च्यार कोसावर आहेत. उदयीक भेटी होतील. उपरांत तपशीलवार लेहून पाठऊं.

¶*The writer describes the battle of Rakshasabhuvan, the losses of the Nizam and the deaths of Vithal Sundar and his nephew Vinayakdas. The letter is fragmentary.*

No. 106] [16-8-1763

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
हरिपंत स्वामीचे सेवेसी

सेवक नारो कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत श्रावण सुध ८ मंगळवार पावेतों वर्तमान उत्तम असे विशेष. सांप्रत आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी सविस्तर लिहून पाठविलें पाहिजे विशेष. नवाब निजामअलीखान औरंगाबादेस छावणीस जावयासी राक्षसभुवनी गंगा उतरून जाताना संधि पाहून श्रीमंत साहेब स्वामीनी दौड करून मोंगलाचे फौजेवर हला करून दरोबस्त फौज लुटून पस्त केली. मोंगलाकडील उमदे सरदार स्वर्गवासी केले. खासा मोंगल जीव घेऊन शहरास दाखल जाल्याचीं बातमीचीं पत्रें आम्हांस आलीं त्याजवरून बहुत हर्ष जाला, तो विस्तार पत्रीं

कोठवर ल्याहावा! मोंगलास सिकस्त केला, येणेंकरून दक्षण प्रांतीं व हिंदुस्थानात वगैरे मुलकांत कीर्ति विस्तार जाला. शत्रुवर गालेब जाली. आपणांस साद्यंत द्रष्टीगोचर आहे त्याप्रमाणें सविस्तर ल्याहावें. वरकड पेशजीं सरकारचीं आज्ञापत्रें आलीं व आपणहि पत्र पाठविलें त्यांत गुजराथ व खानदेश खेरीज सरंजाम मुलुक राहिला आहे त्याची सालमजकूर रसद जलदीनें घेऊन सरकारांत आदा करावी म्हणून मजकूर. त्याप्रमाणें ऐवज जमा करावयाचे तर्तूद सीघ्र करून देखील वण दिंडोरी सालाबादप्रमाणें ऐवज जमा जाला म्हणजे भरणा पोहचाऊन देतों. मागाहून दो चौ दिवशीं कारकून शाहाणा माणूस तुम्हांजवलच पाठऊन निमित्तास मात्र तुम्हांजवल येईल, त्याजबराबर सविस्तर लिहून पाठवितों. करणार समजावणार तुम्हीच आहा. तेथें कोणेविसीं आम्हांस काळजी वाटत नाहीं. तुम्ही लिहिल्याप्रमाणें माहादाजीपंत यासी पत्र आपलें आलें ते धुळ्या प्रा केलें हलीं श्रीमंतास व बापूस पत्रें लिहिलीं आहेत. प्रविष्ट करावीं. कारकून बंदोबस्त करून पाठवितों. चिंता न करावी. तुमचे लिहिलेप्रमाणें पोषाकहि पाठवितों हे विनंती.

¶*The Peshwa's splendid victory over the Nizam at Rakshasbhuvan is reported by Naro Kirshna Darve to Haripant.*

No. 107] [*28-8-1763*

श्रीराम

वकाया लस्कर ता। छ १८ माहे सफर

श्रीमंत दादासाहेबाचे मुकाम ता। छ मजकुरपरियेत पयेलनावर आहेत, व महमद मुरादखान बहादुर श्रीमंताकडून आले होते. नवाबासी जाबस्वाल करून फिरून श्रीमंताकडे गेलेत; व नवाब निजाम अलीखांन निघादास्त सिबंदी व जमाव फवजेचा करितात. बाहीर निघावयाचे वर्तमान आहे; व येका महिन्याची तलब सिबंदीचे सा लक्ष रुपये राजे बहादुराचे घरीहून देविले व निममाहा दुसराहि देवितात; व राजे मुरारदास बहादुरास इनायेतनामा पाठविला आहे की दाहा लक्ष रुपये नगद व फवज घेऊन येने व गुलाम सईदखानासहि अलजपुराहून बोलाविले आहे; व नित्य आपले खास लोकासी विचार होत असतो की सुले करावी की लडाई करावी. दिसोन येते की सुले ठयेरेल. दोन्हीकडून सुलेचा जाबस्वाल आहे. पूर्वी निरख गल्याचा होता. त्यास नवाबास आलियावर पुना निरख जाला आहे.

---

१. वरचढ.

हयेदर नाईक याने करनाटकविज्यापुरचे कुल तालोकियात दखल आपला केला; व वीस हजार स्वार व पनास हजार प्यादे व सामान लडाईचा आपले समागमे फार केला आहे; व शानुरास येऊन, तेथील फवजदार दिलेरखान त्यासी लडाई करून अडीच लक्ष होन नजर मोकरर करून घेतले; व किले बंकापुरास कबजा गोपाल गोविंदचे लोकाचा आहे तेथे मोरचे लाऊन घेरा घातला आहे. व मोरचे किलियाजवल पावले आहेत त्याची बाहादुरी ल्याहावयात येत नाही की खजानापुर व मुलुक फार व फवज मोठी आहे; धुंद मोठी ठेवितो.

¶*This is one of the daily accounts reported to Poona from the Nizam's camp.*

No. 108] *[16-9-1763?*

दृढतर येकलास[1] होईल; व मुल्रुकहि आबाद होईल व परस्परे एकविचारे जालिया नफेहि फार होतील. समर्पक बेदस्तावजीनें बोलयाचे बोलले. उपरांतिक नवाबानीं भगवंतपंतास रुकसत केले. पानदान दिल्हे व वस्त्रे दिल्ही. जगनाथ धोंडाजीचा भाऊ राजश्री मोरोपंत याजला नवाबानीं भगवंतपंताचे समागमे द्यावयास्तव नेला. त्यावरून रुकसत केले. पानदानांतून विडे दिल्हे व पत्राची उत्तरेहि लिहून दिल्ही. इतका मजकूर जाल्यानंतर आम्ही आपलाले घरास आलो. छ २ रबिलावली भगवंत रुकनुदौलापासूनहि रुकसत जाले. येथून येका दो दिवसा स्वार होऊन भगवंत गोविंद व मोरोपंत श्रीमंताकडे जातील नवाबानीं मोरोपंतासहि सांगितले कीं, आम्ही जे मजकूर तुम्हास सांगि(त)ले आहे ते श्रीमंतास अक्षरशाहा बोलणे. पुढें जो मजकूर होईल तो विस्तारे वरचेवर लिहिण्यांत येईल. भगवंतपंत आज उद्या स्वार होऊन श्रीमंताकडे जातील. त्याजसमागमे मोरोबाहि जातील. भगवंतपंत येथें आले होते त्याणी श्रीमंतांचें हृदगत कांही सांगितले नाहीं. हाच जाबसाल केला कीं, आपण कृष्णरायास कां बोलाविले होते. हा भाव कलल्यावर कृष्णराव येतील व श्रीमंताचेहि हेच मानस कीं परस्परे स्नेह असावा. त्यास याणी उत्तरे केली त्याचा विस्तार करून प्रकार सेवेसी लिहिला आहे त्याजवरून ध्यानास येईल. त्यास याचे मानस कीं, श्रीमंतानीं कांहीं द्यावे किंवा भगवंतपंत यासी कांहीं दस्तावेजी गोष्टी बोलले नाहीं. जे याणी सांगितले ते ऐकोन घेतले. त्याप्रमाणें सेवेसी व श्रीमंत राऊसाहेबास विनंती लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुतहोये हे विज्ञापना.

¶*Bhagvantpant and Moropant are deputed by the Nizam to the Peshwa for further deliberations. The first part of the letter is missing.*

---

१ स्नेह.

No. 109] [After September 1763

श्री

पुा राजश्री आबाजीपंत स्वामीचे सो.

विनंती उपरी. नवाब व कारभारी व शेरजंग वरचेवर श्नेहाचे रीतीने फारकडून गोड गोड गोष्टी बोलत आहेत. परंतु मी दस्तावेजी मजकुराचे उतर सहसा देत नाहीं. समर्पक बोलायाचे तेच बोलतो. तथापि प्रसंगोपात कदाचित बोलावे तरी सोये पडत नाहीं. गतवरशी औरंगाबादेवर तह ठरला. नवाबानी ब्यासी लक्षाचा मुल्क जाधवासुधा सरकारात दिल्हा. त्याउपरांतिक श्रीमंतानं कृपाळू होऊन राजश्री सुभेदाराचे विद्यमाणे दाह लक्षाचे माहाल देऊन सनदा करून दिल्ह्या. ऐसे असता मजला बाजी जाधवास मेळऊन घेतले व ब्यासी लक्षाची जागीर सरकारची आहे त्यापैकी नवाबानी जाधवास विसा येकविसा लक्षाचे माहाल करार करून दिल्हे ते जाधवाने माहाल आटोपले आहेत. यावेगळे स्वामीनी भोसल्यास माहाल दिल्हे आहेत. त्यांपैकी पंचवीस लक्षाचे माहाल नवाबाचे जफ्तींत आहेत. यावितरिक्त किरकोल माहाल यांचेच कबज्यात आहेतच. सारांश, आपल्याकडील ठाणी आद्याप सुरलीत नाही. यांचे जफ्तीत आहे. असे असताना यांसी कोणीहि प्रकार बोलायास सोये कसी पडती हे विज्ञापना.

¶*A news-writer from the Nizam's court refers to the grant of mahals to Baji Jadhav by the Nizam and suggests that no negotiations should be opened with the Nizam as long as he has under him all the mahals that once belonged to the Peshwa.*

No. 110] [Date of Receipt 8-10-1763

पौ छ ३० रौवल

श्री

श्रीमंत राजश्री तात्या

स्वामीचे सेवेसी

पो जगनाथ धोंडाजी साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील कुशल ताा छ रोल मुाा भागानगर स्वामीचे कृपेण येथास्थित जाणून स्वामीनी स्वानंदलिहित असिले पाहिजे विशेष. कृपापत्र छ रोवली पावले. लिहिले की गतवरशी बारा महिने येके जागा होतो. सेवट विठल सुंदर मारला गेला; व मोगलाई फौजेची काय गत जाली ते पाहिली व सलुक जाला ते समई कसकसे

जाले हे पाहिल्यात आले. त्याजउपर रुनानबंधेकडून स्वामी तेथे राहिले व सेवकाचे येणे इकडे जाले. यात त्या दौलतीची आशा स्वामीस वे या दौलतीची आशा सेवकास, तेव्हां उभयेपक्षी विरोध नसावा यैस बोलल्यात येत होते तेंच जाहाले पाहिजे, ते काही दिसेनासे जाले म्हणून पत्र लिहिले. न दिसावयाचा यांचा प्रकार हाचा कीं पहिला सल्लक पका नाही यास्तव खान [या पुढील बंद गहाळ].

¶*Jagannath Dhondaji writes to Haripant Phadke from Bhaganagar, commenting on the attitude of the Nizam which the writer does not find satisfactory.*

No. 111] [*2-11-1763*

श्री

विनायेकदास दिमत निजामअली फौजसुधां सिहिगडास आले, तेव्हां ऐवज द्यावयाचा करार केला. सुाा आर्बा सितैन मयां व अलफ. रुपये १३५०००

यासी भरणा

	४१८९९।।।·	पोतांपैकी छ ७ राखर
* तसलमातीस खर्च लिहिले आहेत		२६४९० ऐन नख्त रुपये
		१५४०९।।।· होन नाणें ४३१५ येकूण
		४१८९९।।।·
	९३४५९	जवाहिरखानापैकी दागिने ३५ किमत रुपये
* येकबेर्जी खर्च परदरबार-खर्च लिहिले आहेत		
	२१८८१।।=	परभारे पैकीं
* तसलमातीस लिहिले आहेत.		१०२६० कर्ज गुजारत वलभ सुंदरपैकी देविले छ २९ मोहरम.
		६११।।= पुण्याचे मुकामी बाणदार व इतमामी राऊत दिाा निजाम अलीखान यास रखवालीस ठेविले हाते; सबब खर्चास दिल्हे.
		३७०८— हरि अनंत कारकून दिाा सुभा पुणे याचे तसलमातीस साल गुाापैकी यैवज होता त्यापैकीं
		१००. कमावीस बाा गंगा विष्णु पौ.

6584

१४१॥– रामजी बापूजी कारकून दिा सुभा प्रा पुणे यांचे तसलमातीस सन सलासात दिल्हे आहेत रुपये ९४८ पौ.

६११॥=

१० किा छ २९ मोहरम जनार्दन आपाजी यांजकडे गुदस्ता तसलमातीस ऐवज दिल्हा आहे त्यापौ देविले.

११००० खंडो बाबूराव यांजकडे सालगुदस्ता पवारांची दिवाणगिरी सांगोन नजर लाख रुपये करार केले त्यापौ देविले. रुपये

२११८८१॥=

१९०९९॥= किा परभारेपैकी सन मजकुरी खर्च आहे पैा

* येकबेर्जी परदरबार खर्च पडिले.

४९०१।॥=

२१७८॥= किा छ २९ राखर दाभाडी पाटणी निा बालकृष्ण आपाजी साल मार पैा देविले.

२७२३।· किा छ २९ राखर मौजे दाभाडी व पाटणे निा बालकृष्ण आपाजी सालमार पौ देविले.

१०१९३।॥· छ २९ राखर प्रां कल्याण भिवंडी निा रामाजी माहादेव साल मारपौ देविले.

१९०९९॥=

१३२२९६

२७०४

¶*The paper tells us how Sinhagad saved itself when threatended by a force under Vinayakdas. It paid a ransome of a lakh and thirty-five thousand rupees.*

No. 112] [21-11-1763?

पौ छ २९ जावल

श्रीं

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे
सेवेसी

आज्ञाधारक नारो त्र्यंबक मुकाम जंजिरे विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ माहे जमादिलौवलपर्यंत स्वामीचें कृपावलोकनें करून आज्ञाधारकाचें व प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित आहे विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा कीं, निजामअल्लीखानास मिळावयास ताहारखान पठाण अदवाणीकर हजार स्वारांनशी जात होता. त्याचा मुकाम शाहागडावरी जालियाची खबर येतांच त्याजवरी राजश्री गोपाळराव गोविंद यांस पाठविले. मागें त्याची कुमक करील यास्तव खांसा स्वारी मोहलियावरी जाऊन मोगलाचे उभी राहिली. कुमक पोहोंचू न दिल्ही. खान मशारनिलेनीं गांवाचा आश्रये केला परंतु बेजरब घोडे मशारनिलेनीं चालविले, त्याचा मोड जाला. पांच सातशें घोडीं आणिली व दोन हत्ती आणिले. बाजारबुनगे सर्व लुटोन पस्त केलें व राजश्री सुरेराव येलमे व गिरमाजी खंडेराव मोगलांकडून सरकारांत आले त्यांस भागानगर प्रांतें जफ्तीस रवाना केलें. हे हर्षाचें वर्तमान सेवकास कळावें म्हणून आज्ञापिलें, त्याजवरून संतोषाचें वर्तमान ऐकतांच सेवकास परम संतोष जाहाला. वरकड जंजिरे मजकूर व कोट किल्ले यांचा बंदोबस्त आज्ञेप्रमाणें करावयाचा त्या प्रकारें करून खबरदारीनें असों. सेवेसी श्रुत होये हें विज्ञाप्त.

¶*Naro Trimbak notes with delight the news of the success of Gopalrao Govind over Tahar Khan Pathan of Adoni, who had started to join Nizam Ali.*

No. 113] [24-11-1763?

श्रीभवानीशंकर

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

सेवक गोविंद यादव मुकाम शहर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. छ १८ माहे जमादिलौवल. बलभरायकडील हरकारा पत्र नवाब दरगाकुलीखानास घेऊन आला; पत्रें वाचली. पैकीयाचा तह या प्रकारें: सालगुदस्तांची बाकी मागतात, जामीन मागतात, याशिवाय दरबारखर्च मागतात. त्यास नवाबानीं

जाब लिहिला आहे. दोन महिन्याचा वायेदा करून घेणें. स्वामींनीं दोन महिन्यांचा वायेदा कबूल हैरगीज[1] न करणें. दगाबाजीची गोष्ट आहे. यासाठी स्वामीस सूचना लिहिली आहे. पैकियाचें काम. याची निशा पोख्त करून घेणें. मग तेथून कूच करणें. छेडूं नये; छेडलें तर खाली सोडूं नये. येथें तुमचा मोठा धाक आहे. बाहेरील पुरे तमाम पळून शहरांत गेले. शहरची आवस्था घरघरचें येक येक मनुश्य बारीदार रात्रीं कोटावर नेऊन बसवितात. फौज शाहरांत दोनशें स्वार पायेदळ हजर आहेत, परंतु खर्चायास मिलत नाहीं. मवची फौज जमा केली. दरगाकुलीखा दुअर्थावर आहे. मोठे नवाबाकडे कागद पाठविले आहे. स्वामीसी करारमदार करून तेथून पुढें कूच करावें. आजची गोष्ट दो महिन्यांवर गेली. नवाबाचा तोपरियेंत जाबसाल काय येतो, पुढें मोठे नवाबाचा व श्रीमंताचा काये मनसुबा होतो तो पाहावया(चा) आहे. शहरांत दरगाकुलीखान आहे. जे मामलत चुकवाल त्याची निशा पकी घेऊन मग कूच करणें. मोठे नवाबाकडील वर्तमान तर लगर हवदावर लस्कर आहे. नवाबांनीं नवरोजे केले. आतां लेकाची सालगांठ[2]. त्याची श्यादी करितात. नाच होतात. आमीरास बोलाऊं पाठविलें. जानोजी निंबालकर याचे पुत्रास बोलाविलें. त्यांहीं उत्तर लिहिलें आहे. श्रीमंत साहेब आमच्या मुलकांत आले आहेत, ते गेलियावर आमचें येणें होईल.

¶*Govind Yadao requests Dadasaheb not to grant any concession to Darga Kulikhan in making payment of fines due from him. The writer also gives news about the Nizam.*

No. 114] [*6-12-1763*

श्री

चिरंजीव राजश्री हरिपंत तात्या याप्रति आबाजी बलाल मुा पुणें आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता मार्गसीर्ष शुध त्रयोदसीपावेतो समस्त सुखरूप असो विशेष. तुमचा निरोप घेऊन आलों ते पाचवे दिवसी पुणियास पावलों. राऊत बराबर आणिले होते त्याजबराबर पत्र पाठविले ते पावलेच असेल. माणसे लोहगडास गेली. सामान बहुतेक गेलें. काही राहिले आहे तेही रवाना करितों. आम्ही च्यार दिवस पुणियास राहो. मग लोहगडास जाऊ. चिरंजीव गोविंदपंत लोहगडास गेले आहेत; तेहि चोहो दिवसी येतील. ते आलियावर आम्ही जाऊ. सरकारचा जामदारखाना सिंहगडास गेला. आख घ्यावयाचे राहिले. पुढे बनेल

---

[1] बिलकूल. [2] वाढदिवस.

तेंव्हा खरे. तुम्ही बहुत सावधपणे राहोन वर्तमान लिहित जाणें. अंजनवेली-कडील येथास्थित आहे. दीक्षिताची उभयेता वाडियांतील माणसें राजमाचीस गेली. व रा। रामाजीपंत बरवे राजमाचीस माणसे घेऊन गेले. आम्ही महि-नाभर राहो. पौशमासी जाऊ. इतकियात काये होते हा मजकूर कळेल. चिा। मल्हारपंत बावधनास घरास गेला आहे. आमची भेट जाहाली नाही. बहुत काय लिा। लोभ असो दीजे हे आसीर्वाद. वेदमूर्ति रा। त्रिंबकभट वैद्य याणी रुा। आठसे देविले होते त्यास त्याचा यैवज राजमाचीस गेला आहे. आठा पंधरा दिवसी हातास येईल. यैवज आम्हाकडे आला म्हणजे त्याचे घरी पावता करितो. त्रिंबकभट यास सांगावे हे आशीर्वाद.

¶*Abaji Ballal informs Haripant Phadke of the arrangements he had made for the protection of his men from the ravages of the enemy. The letter describes the helpless condition of the citizens of Poona who sought the hills of the Mawal for safety.*

No. 115] [*24-12-1763*

श्रीपांडुरंग

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामी माहाराजांचे सेवेसी

विनंती सेवक माहादाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायेत छ १८ जमादिलाखरपावेतों माहाराजांच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वृत्त येथास्थित असे. यानंतर आपला व यवनांचा युद्धप्रसंग जाला; ईश्वरें यशाची वृद्धि केली. ताम्रांचा पराभव जाला. हत्ती तोफखाना व नौबती, निशाणें हस्तगत जालीं. पुढें राहिला पदार्थ तोही सत्वरींच लयास जाईल. स्वामीचें पुण्य अगाध, धर्मसंस्थापक तेणेंकरूनहि यश प्राप्त होतें. त्यांत पूर्वस्थित येवनाची कर्णी ऐकत होतों. थोडी बहुत नजरेनेंहि पाहिली. देवालयें राहीं पावलीं नाहींत. तीर्थी देशोदेशीं स्नान होणें संकट आतां सर्वांचे मनोरथ पूर्ण होऊन धर्मसंस्थापन जालें. विज्ञापना.

¶*Mahadaji Govind Kakirde congratulates Raghunathrao upon his success over the Nizam at Rakshasbhuvan.*

No. 116] [*1763?*

श्री

सेवेसी विज्ञापना. मोगलाचे लष्करांतून वर्तमान आले आहे कीं वाघोलीकडे जावें. त्यास तेथें दाणा फार असेल यास्तव कोणी शाहाणा कारकून पाठऊन रा।

आपाजी जाधव यास ताकीद करून गला ह्माडोन काढवावा अगर आपले लष्करची कही घालून दाणा लुटवावा. केवल मोगलाची समीपता जाल्यावर गांव जाळून टाकावा. तूर्त दाणा गांवात नाहीं; ऐसा विचार लौकर जाहाला पाहिजे. मोगलाचा मुक्काम जाला; हे विज्ञापना.

¶*The writer suggests measures to prevent the granaries of Wagholi and other places falling into the hands of the Nizam.*

No. 117] [*1763?*

(पहिला बंद गहाळ.)

२

हेच उत्तर दारकाबाईनें लिहिले. चंद्रसेन तोहि आपल्या मुलकाचा बंदोबस्त करितो. फौज जमा हजार तीन व पायदल यैसे पांच हजार जाली आहे. फौजेस खर्चायास देत नाहीं. जानोजी भोसल्याकडे कारकून पाठविला आहे. नवाबास सांगून पाठवितो कीं मी तुम्हाकडे येतो. इकडे स्वामीस लिहिले आहे की, मी येतो. जानोजीने नागपुराहून कूच केले आहे. नवाबाकडील सूत्र लागले आहे. तेथील ग्रहस्त शहरास आला आहे. त्यानीं वर्तमान सांगितले ते लिहिले आहे. भगवंतराऊ वकील नबाबाकडे जाबसालसाठीं राऊसाहेबानीं पाठविले. तिकडून जाबसाल करून जगनाथपंतानी आपला भाऊ मोरोपंतास समागमे देऊन रवाना केला असे. श्रीमंताकडे आथवा राऊसाहेबाकडे जातील. परंतु तेथून निघाले आसेत. कळले पाहिजे. दरगाकुलीखान आपले मुखे सांगत होता कीं, सलुक करून नवाबास समागमे घेऊन हैदर नाईकाचे पारपत्य करावे यासाठीं भगवंतराये वकिलास नवाबाकडे पाठविले होते. नवाब बसालत-जंगाची आवस्था मोठी हैराणींत आहे. पांचशे स्वार बमये पायदल आहे. लासूरचे किल्लेत दाखल जाला आसल. निजामआलीनें त्याचा मुलूक दबाविला आहे. पठान निजामआलीसी भेटले. बसालतजंग आपला जीव घेऊन पळून लासूरास गेला. कळले पाहिजे. दिल्लीकडील वर्तमान कृष्णराऊ भास्कर याचे पत्र पाठविले होते त्याजवरून प्रविष्ट जाले आसल.

सतु हरकारा व कृष्णाजी याजबरोबर विनंती पत्र पाठविले त्याचे उत्तर आति सत्वर पाठविले पाहिजे. नवाबासी करारमदार जाला त्याची तजवीज पोख्त करून घेऊं. हे विज्ञाप्त.

¶*A mutilated news-letter from Aurangabad, reports the departure of Janoji Bhonsle from Nagpur and his intrigues with Nizam Ali, probably during 1762.*

No. 118] [1763 end

श्री

स्वामीचे शेवेशी विज्ञापना यैसीजे. छ २८ रोजीं अलाउदौला याचा काळ जाला. आलाउदौला म्हणजे सयेफजंग यांचे सापत्न बंधु. पेशजी याचे हाते सलाबतजंग यांचा वध करविला. त्यास त्या दिवसापासून दौला मजकूर यास भ्रमहि होता व हरवख्त जंग मजकूर याची तसबीर दृष्टीसमोर उभी राहत होती कीं मजला निरपराधें कां मारिलें त्याजमुळें चैन पडत नव्हते, व रक्तपितीहि जाली होती. येलगंदलचे किल्लेदारीचे काम मशारनिल्हेकडे होते. ते सिवाये पन्नास हजाराची जागीर होती. मृत्य पावले तेच दिवशीं जागिरीस व किल्यास जप्ती गेली. दौला मजकूर यास पेशजी आवरंगाबादची सुभेदारी जाली होती तें शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The news of the death of Alauddaula, who was employed to murder Salabatjang, and the subsequent confiscation of his property is communicated to the Peshwa by his news-agent.*

No. 119] [1763

श्री

सां विज्ञापना. सेवक नारो शंकर सां नमस्कार विज्ञाप्ति. आज्ञापत्र सिरसा वंदिले. दोन दिवस मात्र लस्कराप्रा आम्ही चालतो. चाकरीस कोताई होईल यैसे नाहीं. आज्ञेप्रा प्रत:कालींच स्वार होऊन मोगलाचे शहावर जात आसो. नित्य याचप्रा घडोन येईल. दोन कंयच्या[१] बाण आज्ञा करून पााले पाहिजेत. हे विज्ञापना.

¶*Naro Shankar informs the Peshwa that he is proceeding against the Nizam as instructed. He asks for more rockets.*

No. 120] [2-2-1764

पौ छ ३ साबान

श्री

श्रीमंत माहाराज प्रीथवीपति

विष्णु आवतार राजश्री दादासाहेब स्वामी समर्थाचे सेवेस विनती सेवक विज्ञापना आज्ञाधारक आबाजी नाईक साटे च्येरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दडवत विनंती. येथील कुशेल जाणून स्वामी समर्थाचे आसीर्वादेकरून सेवक

---

१ कंची कैंची=चोवीस बाणांची एक गड्डी.

गुलामाचे वर्तमाण छ २९ माहे रजेब मुकाम आवरंगाबाद येथास्थित आसो. येथील दरबारचा मजकूर छ २७ रोजी मंगलवारी कबीर महमदखान पातशही हापसी स्वार होऊन महाराऊ निंबालकराच्या डेरियासी पेसेवे नवाबाचे मुलाजमतीस आणावायास गेले. येक घटका खलबत सिस्टार (शिष्टाचार) जाला. कबीर महमदखानास वस्त्रे येक घोडा माहाराऊ निंबालकरानी दिल्हा. स्वार होऊन माहाराऊ निंबालकरास घेऊन नवाबाच्या मुलाजमतीस आले. माहाराऊ निंबालकर, महादाजी निंबालकर, धारराऊ निंबालकर, रामराऊ भासा दाजीबा निंबालकराचा पुत्रहि होते. मुलाजमत जाली. जाबत्यप्रमाणे नजरा जाल्या. खलबतखान्यात जाऊन सिस्टाचार बोलण जाले. याणे आश्र (फा) नवाबानी दिल्ही. माहाराऊ निंबालकरास येक सिरपेच दिल्हा. दाजीबा निंबालकराचे पुत्रास एक सिरपेच दिल्हा. स्वार होऊन आपल्या डेरियासी आले. हैद्र-नाईकाचा वोकील आला आहे. साहा लाखाच्या हुंड्या घेऊन आला आहे. करणोल कडपियाची ठानी सावणूर बंकापूर वगैरे ठाणी घेतली. त्याच्या सनदा मागतो. स्वामीस कलावे. वोसमतेस भोसल्याची फऊज ठानी बसवावयाची आली. वोसमतकर खाणे आलम भाडतात, शहाजी शुंपेकरास सरगरास हुकूम जाला आहे. ताकिदा गेल्या. वोसतेस जाऊन खाणे आलमाची कुम(क) करणे. दिलीचे वर्तमाण आले. नजीबखान रोहिल्याची सुरजमल जाठाची लढाई जाली. सुरजमल जाट सुरजमल जाटानी मोडला (?) सुरजमल जाट मुरत्ये पावला. जोहरमल जाट गाजुदीखान पलोन बलमगडास गेले, ऐसे वर्तमान आले आहे. स्वामीस कलावे. सेवेस श्रुत होये हे विज्ञापना. रवाना गुरुवार पाहार दिवस.

¶*Abaji Naik Sate writes to Raghunathrao in a cringing tone about an interview between Maharao Nimbalker and the Nizam.*

No. 121] *[18-2-1764?*

पौ छ १९ शाबान.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक माहादाजी हरि दिा राजश्री लक्ष्मुमण कोनेर कृतानेक सां[1] नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायेत माघ बहुल प्रतिपदा मुा किले देवगिरि वर्तमान येथास्थित आसे विशेष. राजश्री लक्ष्मुमणपंत याणीं किले मजकूरचे बंदोबस्तास पाठविले होते. त्यास येथील बंदोबस्त करून पुढें माहालच्या

१ सामोरे.

6591

बंदोबस्तास जाणार. त्यास या प्रांती मोगलाकडील कही तमाम माहालांत येऊन कुणबियांचा माल वगैरे लुटून नेतात. धूम मांडली आहे. इकडे फौज नाही, तेणेकरून त्यांस दहशत नाहीं. आम्हांजवळ च्यारसे स्वार आहेत ते माहालोमाहालीं आहेत, तेणेकरून कहीचा बंदोबस्त होतो यैसा अर्थ नाहीं. जाहागिरीचा तह नाहीं. तव आगोधरच मुलुकांत जप्ती केली आणि मुलकांत धूम मांडली आहे. याचा बंदोबस्त विना फौज आलियावाचून होत नाहीं. मोगलाकडून तेथे हिमतखान व राजश्री धोंडोपंत सरकारचे वकील आले आहेत. त्यांस समक्ष सांगोन यास ताकिदी पाठविल्या पाहिजेत. सरकारचीहि पत्रे नवाबास पाठविलीं पाहिजेत. साहेबीं इकडील बंदोबस्त केला तरच शहर गिर्दनवाईचे माहाल राहातील. नाहीं तर परिछिन पैसा सरकारांत येत नाहीं यैसें आहे. याजकरितां सेवेसी विज्ञापना लिहिली आहे. तर फौजेचा बंदोबस्त कांहीं केला पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे, हे विज्ञापना.

¶*Mahadaji Hari, an officer at the fortress of Deogiri, requests Raghunathrao to send a detachment to protect the Ryots from pillage and other atrocities by the Nizam's forces.*

No. 122] [*25-2-1764*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोविंदपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पोष्ये बाबूराव माणकेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान ताा छ २१ रजब जाणून स्वकीये लेखनाज्ञा करीत आसिले पाहिजे विशेष. श्रीमंताची व नवाब निज्यामआलीखान याची भेटी होऊन मुलुक सुटणार. यास येवनाकडील माहाल सरकारात येतील त्यापैकी आम्हाकरिता येक माहल साळसुद ध्यानास आणून श्रीमंतास विनंती करून निश्चयात आणून सनद पत्रें करोन घ्यावी. कर्डेतर्फेचे गाव थोडे राहिले त्याजवर संसार चालत नाही. लोकाचे देणे फार जाले त्याणे बेजार केले. काही स्थित राहिली नाहीं. पत्री तपसील कोठवर ल्याहावा? सर्व माहित आपणास आहे. ल्याहावे यैसे नाही. कुटुंबवत्सल, पदरी खर्च बहुत, मिळकत राहिली नाही? यास्तव बहुत गरिबी जाणून स्वामीस पत्र मुजरत लिहिले आहे. कृपा येऊन लिहिल्याआन्वये उदेग करोन शेवकाचे चालवावे ऐसे ध्यानास येऊन चालविल्यास उतम आहे. सैन्यात यावें म्हणजे कार्ये होईल यैसे उतर आलियासीं सत्वर येऊन पोहचतो. आम्ही येऊन काय

करावयाचे आहे. आमची पूर्ण कालजी आपणास; त्यापक्षी पत्री विशेष काये ल्याहवे. तात्या बहुत आनुपतीत आलो. ब्राम्हणाचे ऊर्जित करून कुटुंबाचे चालविल्यास श्रेयेशकर आहे. भरवसा जाणोन विनंती लेखन केली असे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*On hearing of the negotiations between the Peshwa and the Nizam by th terms of which certain territories were to be made over to the Peshwa, th writer Baburao Mankeshwar requests Govindpant (Limaye) to use his influenc and secure for him one village for his maintenance.*

No. 123] [*16-3-1764* (?

श्री

शेवेसी विज्ञापना ऐसीजे दिनचर्येचें वर्तमान

छ १२ रमजान शुक्रवार संध्याकाळी दोन घटका दिवस राहाता खलबतात निघाले समसामुदौला बोर्याब+ जाबसाल करून येक घटका रात्री बरखास हुकूम मुकाम.

छ १३ रमजान शनवार साहा घटका दिवस राहाता खलबतांत आले. समसा मुदौला वगैरे मा। हुसेखान बोरयाब जाबसाल करून येक प्रहर दोन घटक वाजलीयावर बरखास. खासा दौला परवानगी घेऊन रायेचूरच्या किल्यात गेले. संध्याकाळ प्रहर दिवस राहात खलबतात आले. बसालतजंग व मीर बहीरम खान व खोजे आबदूल वाहदखान बोरयाब जाले. बसालतजंगास रुकसतीचे वि दिल्हे. साहा घटका दिवस राहातां स्वार जाले. स्वारी पालखीची बसालतजंगाचे डेऱ्यास गेले. तीन घटका बसले. बसालतजंगानी नवाबास पांच थान पारच्याचे नजर केले. च्यार थान पारच्याचे मीर मोगलास दिल्हे. तीन घटका दिवस राहिल्यास नवाब दौलतखान्यास दाखल जाले. प्रहर रात्रीं हुकूम कूच.

छ १४ रमजान रविवार साहा घटका दिवस आलियावर खलबतांत आले समसामुदौला बोरयाब जाले. केशरीसिंग हजारी रायेचूरच्या किल्याचा त्यास ती पारच्याचा खिलत मेहरबानीचा दिल्हा. किल्याच्या तैनातीस साबक दस्तूर बाहार केला. प्रहर दिवसा आलियावर स्वार जाले. स्वारी हतीची मजलेस मुतव जाले. मुसाफत साडे पांच कोस जरिबी मु। देऊर सगूर पो। रायेचूर दर्या व कृष्ण घाट काल्या चौत्र्याचा दोन प्रहर दिवस वाजलीयावर दौलतखान्यास दाखल जाले बसालतजंग रायेचूरच्या किल्यांत जाऊन दाखल जाले. संध्याकाळ येक घटका.

¶*A writer reports the daily happenings in the Nizam's Court and mentio among other things the arrival of Basalatjang at the Raichur fort.*

+ बोरयाब = चटईवर बसून, बोरया = चटई.

No. 124] [21-3-1764

श्रीभवानीसाहेब

श्रीमंत कृपासागर राजश्री

दादासाहेब स्वामीचे शेवेसी

सेवक गोविंद यादव दिमत चिमणाजी मुकाम अवरंगाबाद कृतानेक सा नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. छ ७ रजबचे आभयेपत्र पाठविले ते उतम समई पावोन मस्तकी वंदून वाचून परम समाधान जाले. सदैव याच प्रकारे सदोदित पत्र पाठऊन सेवकाचा परामृश करीत जाणे. छ १७ माहे रमजानपावेतो वर्तमान जाले ते सेवेसी लिहून पाठविले. श्रीमंत रावसाहेब व नवाब निजामअली यासी श्नेह बहुत उतम प्रकारे जाला. रावसाहेब ग्रहणाकरिता गंगातीर मनरथी आले. नवाब लाखनवाडाचे घाटाखाले होते. जाणोजी भोसल्याचा पैगाम भेटायाचा मारफत इसमाईलखानाचे होणार आहे. हैदरनायेकाकडील वर्तमान आले आहे की फौज जमा केली, आणिखीहि स्वार ठेवीत आहे. बावीस तीस हजार स्वाराचा जथा केला. पुढे हरामजादगीवर येणार आहे यैसा विचार दिसतो. नवाब बसालतजंगाचा मुलुक दबावीत सुटला. नवाब दरगाकुलीखानाची सुबेदारी निघाली. याचे जागा सादतखा होऊन आले; परंतु राजाराम बाबूराव याचा कारभार तीनसे रुपये दरमाहा नवाब सादतखानास देत जावे. तमाम शहरचे कामकाज राजारामानी करावे. नावास मात्र सुबा.

आता पुढे जे वर्तमान होईल ते पैदरपै श्रीमंत रावसाहेबाकडील व नवाबाकडील वगैरे लिहून सेवेसी पाठवीत जाऊ. कासीद जोडियाचे काम आहे. कासीद जोडिया तेनात करून देणारा स्वामी समर्थ आहे.

¶*Govind Yadav informs Raghunathrao that negotiations were successfully concluded with Nizam Ali. "Military operations have been started by Haidar which may perhaps be directed against the Peshwa", reports the writer from Aurangabad.*

No. 125] [21-4-1764

श्री

सेवेसी मल्हार बाबूराव दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागाईत छ १९ सवाल मंदवार मुकाम शहर औरंगाबाद. आज्ञाधारकाचें वर्तमाण येथास्थित असें. येथील वर्तमान तर पांडुरगराव येकटे नवाबांनी सोडून शहरास पाठविले. दरगाहकुलीखानास नवाबांनीं पत्र लिहिलें

आहे कीं शहरांत हवेलियावर वस्तभावेंवर तोडे केले आहेत ते मोकळे करून पांडुरंगरायाचे स्वाधीन करणे. यांजकडे वीस लक्ष रुपये येणें आहेत. त्यांत यांस पांच लक्ष रुपये माफ केले. बाकी रुपये पंधरा लक्ष, त्यांत निमे साडेसात लक्ष रुपये हवेलिया व वस्तभाव विकूण तूर्त द्यावे. बाकी रुपये पुढे द्यावे. हवेलीयावरील तोडे मोकळे केले ते ऐवजाची तजवीज करितात. नवाब बेदरापुढें एक मजल कूच करून आदोणीचे सुमारें गेले. रामचंद्र जाधवराव साहा हजार फौजेनिशीं नवाबांस भेटले. आपला बेविसा लक्षांचा मुल्क व साठी लक्षाचा मुल्क ऐसा नवाबांस लिहून दिल्हा. मधें जगन्नाथराव कारभारी आहेत. यांचेच विद्यमानें बसालतजंग व मोगलअलीचें सूत्र लागलें आहे; तेहि नवाबास भेटतील. ऐसें वर्तमान येथें आहे. सदाशिव रामचंद्र व शेरजंग आज पांच रोज जाहाले शहरांतून निघोन नवाबांकडे गेले. करांड्याची खडांगल्याची लढाई जाल्याचें वर्तमान लिहिलें तरी आलें नाही; परंतु उडालें आहे कीं खडांगळा मोडून लुटला. दोघे लेक धरले, ऐसें वर्तमान आहे, उडालें आहे. हिंमतखान व धोंडोराम अद्याप येथेंच आहेत. करांडा वाटेवर आहे, यास्तव निघावयास अनमान करितात. दोन तीन दिवसांनीं निघतील. शहरांत बंदोबस्त कांहीं नाहीं. शहरचे गीर्दनवाई दोन च्यार कोशीं वाटा पडतात, माणूस वागूं देत नाहींत. अवघे शहरचे लुच्चे दरगाह कुलीखान सुभे आहेत व हयातखान कोतवाल आहेत. आणिक वर्तमान अमलांत आलियावर लिहिल्यांत येईल. मोगल बदमामली आहे. याच्या क्रियेस व शपथेस प्रमाण नाहीं. स्वामीचे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Baburao reports news from Aurangabad about the orders issued by the Nizam regarding, among other topics, the instalment of money to be received from Pandurangrao.*

No. 126] [*29-4-1764*

पौ छ २० जिलकाद
आर्बा

श्री

सेवेसी मल्हार बाबूराव व रामजी नाईक विज्ञापना. येथील क्षेम तागाईत छ २७ सवाल रविवार मुकाम शहर औरंगाबाद वर्तमान येथास्थित असें विशेष पहले विनंतीपत्र पाठविलें तें पाऊन वर्तमान ध्यानास आलें असेल. सावकाऱ्यांत लिहिलीं आलीं आहेत जे नवाब निजामअलीखानांनीं करांड्यावर रामचंद्र जाधवराव व माहारराव निंबालकर व खंदारचा राजा व मुरादखान ऐसे रवाना केले. सांप्रत

नवाबांजवळ कारभारी जगन्नाथराव उतुरकर आहेत. राज्याजीचा किताब व येक्तीसा हजाराची जाहागीर यैशी दिल्ही. येवनांचें लष्कर कुहिरीच्या मैदानांत आहे. दोन दिवस शहरांत दाट वार्ता उडाली होती जे मुरादखानास नवाबांनीं कैद केलें. त्यावरून दरगाह कुलीखानांनीं शहरपन्याचे दरवाज्यावर बंदोबस्ती केली आहे, जे मुरादखानाची वस्तभाव व मुलें माणसें न जाऊं पावेत; यास्तव बाबाजीपंत मुरादखानाचा याची मुलें माणसें शहरांत धोंडोरामाचे घरीं लपालीं होतीं ते आज संगमनेरास निघोन गेलीं. बायेकाची पालखी दरवाज्यावर अटकावली होती. वर बुरखा होता. धोंडोरामांनीं दरगाह कुलीखानास सांगून पाठविलें जे आम्ही साताऱ्यास कुटुंबासहित देवदर्शनास जातों, यानिमित्य परवानगी घेऊन काहडून दिली. मुरादखानाचें वर्तमान लिहिलें तें अद्याप कोठें आले नाहीं; परंतु उडालें आहे. हिमतखां व धोंडोराम अद्याप येथेंच आहेत. अगोधर मुरादखानांनीं हिंमतखानास लिहून पाठविलें होतें जे आमचें पत्र तुम्हास येईल तेव्हां निघोन येणें, तोंवर न यावें. हत्तीचा येथें फार शोध केला. कोठें विकाऊ नाहींत. हत्तीची खेप नांदेड व समतेजवळ आली आहे. त्यांत दाहा घ्यावे व मोठाले पंधरा येकूण पंचवीस हत्ती आहेत. पंधरा विसा दिवसांत येथें येतील. आलीयावर सेवेसी लिहिलें जाईल. येथून सावकार गेला तो धारुरीं अटकला; व सदाशिव रामचंद्र व शेरजंग हेहि बिडीं आटकले. पुढें कराड्याची फौज जोगाईचे आंब्यावर आहे. दुसरे माहादजी शिंदे चांबारगोंद्या-बाहेर निघाले, यास्तव नवाबांनीहि तेथून रामचंद्र जाधवराव व मुरादखान व माहाराव निंबाळकर पांच साहजार फौज रवाना केली आहे. कराड्यांस हुसकाऊन सावकार व सदाशिव रामचंद्र यैसे घेऊन जावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Baburao and Ramji Naik report news from Aurangabad mentioning the despatch of some force under his Sardars by the Nizam against Karande and the imprisonment of Muradkhan. The paper mentions Mahadji Sindia issuing from Shrigonda against Nizam Ali to avenge the devastation of his residence and property.*

No. 127] [*21-4-1764 ?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक धोंडों राम कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ २७ शवाल मुकाम अवरंगाबाद स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. नवाब निजामनमुलुक याची स्त्री बिबी बेगम येथे आहे. त्यांची

विहीण सैद शरीफखानाची स्त्री बुऱ्हानपुरात आहे. त्यास सैद शरीफखानाचा तरी काल जाला. याजकरितां बिबी बेगम याणी आपले विहिणीस बुऱ्हानपुराहून येथे आणविले. ती आपली वस्तभाव घेऊन येत होती. त्यास सरकारचे कमावीसदार त्याजला येऊ देत नाहीत. आटकाव करितात. येविसी पहिले सरकारचे पत्र कमाविसदारांस सादर जाले होते. परंतु त्यास येऊ न दिल्हे. प्रस्तुतहि बिबी बेगम याणी पत्र लिहिले आहे. प्रविष्ट होईल. कमावीसदारास पत्र द्यावें कीं सैद शरीफखानाची स्त्री व माणसे वस्तभावसुधा येतील त्यास येऊं द्यावे, अटकाव न करावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Dhondo Ram requests Raghunathrao to allow a passport to the wife of Said Sharifkhan to proceed from Burhanpur to Aurangabad where she is going at the request of her sister, the wife of Nizam Ali.

No. 128] [*7-5-1764*

पो छ २१

जिल्काद आर्बा

व काया लष्कर नवाब साहेब तागायत छ ५ जिल्काद

श्री

नवाबसाहेबा कलले येदगीर कृष्णातीर प्रांतात आहेत. पांच मुकाम जाले. पुढें आनखी होनार. कृष्णेस डोहलोट जाला. मुल्याची आज्ञा कीं मऱ्हाटे उमराव याची फौज पलाडल्याचे तीरास बसालतजंगाचे मुलकांत पाठवावी. जेव्हां रुकसत करतील ते खरे.

रांजे रामचंद्र जाधव यासी शहाजी सुपेकर व रुकुनतदौले याचे मार्फतेने दिवान नेमस्त जाले कीं दहा पंधरा हजार फौजेनसी चाकरी करावी. पहिले पंधरा लक्ष रुपयाचा मुलुक आहे. सांप्रत दहा लक्ष रुपयेचा मुलुक पांच महाल वगैरे त्या प्रांती मुल्याहि नेमस्त केल कीं आपल्या पुत्रास दाहा हजार फौज देऊन राज-बंदरी सिकाकोल तिकडे पाठवाव. त्यास देनगी सिपाई तयेनातीची पाहिली. रुा फार दिसोन आले. छयावंनीहि जवळच अली, याजकरितां पाठवाव्यांत विलंब जाला.

मुरादखाजी व राजे कंदाहार याची अर्जी नजर गुजरली. आपन रुकसत होऊन कराडीयावर आलो. त्यासी आपल्यासी पंधरा कोसाच अंतर होत. त्यास कराडीयावर आपन लागोलाग जाऊन पछाडीवर छापा घातला. कराडीया पलोन गेला. आपली फौज गालब राहिली.

6597

घ्यावी. मुख्याहि वस्त्र व जेवाहर दोन-तीनदां दिधली. सनमान फार केला.

लष्करांत वर्तमान आले कीं हैदर-नाइकासी श्रीमंताचे फौजेसी अंतर पंधरा वीस पंचवीस कोस आहे. लष्क-रांत महाग आहे. उभेताची पत्रे नवाबास आली. हैदरनाइकाचा वकील आला आहे.

सदाशिव रामचंद्र लष्करांत दाखल जाले. बक्षी पातशाई आनायास गेला होता. फौज पाहिली. याउपर पंधरा लक्षाचा मुलुक कराराप्रमाणें

बसालतजंगाहि आपले तर्फेने भला माणूस पाठविला आहे कीं आमच्या मुलकास जप्त करावयाचे काये प्रयोजन? आपसांत आनभाष पहिलेप्रमाणें आहे. आज्ञा कराल तर भेटायास येऊं. हैदरीयारखान लष्कराजवळ पोहचले. एका दो दिवसा दाखल लष्करांत होतील. यासी मुख्याचेहि आमसी स्नेह फार आहे. भेट जाली या वर्तनूक होईल ते खरे.

∴ वर्तमान औरंगाबाद तागायत छ १९ जिलकाद.

मुरादखा परबानी पाथरी या जिल्ह्यांत बमये फौज आहेत. शोहरत आहे कीं कराडीया मागती कांहीं जमाव करून येणार

हिंमतखाजी शहरीहून कूच करून बाहेर उतरले आहेत. लष्करास जानार. तोप नसरतबक्षे देवगिरीतून मनुष्यहि फत्तीयाबहाद्दर ठानीया बाहेर केली.

पुढे बाईल परगनीयातून जमा जाले व कांहीं होतातं.

जैनगरची चिठी आली यांत लिहिले होते कीं अबदाली काबुलचे मुलकांत जिवंत आहे. परंतु फौज कांहीं त्या सागत थोडी आहे, पुढें फौजेचा जमाव करनार व सिंध लाहोर प्रांतांत दिल्लीपावेतो मुलकांत काबीज आहेत.

सिंदयाची फौज पैठन अंबाड प्रांतात आहे. फौज रोज बरोज गोला होती. धोंडो राम वकील अंबाडांत आहे. जिवाजी कृष्णाजी सरसुभे पैठनांत येऊन तहकीकांत कराया कारन कारकून परगनियांत गेले.

राजश्री मल्हारराऊ होलकर नरमदा उतरोन पुढें गेले. इंदुरास पावले. वर्तमान ऐकिलीयांत आलें कीं श्रीमं-ताचे फौजेची व हैदरनाइकाचे फौजाचा मुकाबला जाला. हैदर नायकाचे फौजेची सिकस्त जाली व तो पळोन गेला.

¶*This is a news-letter communicating the movements of the Nizam, Mahadji Sindia, the fighting between the Peshwa and Haidar and the plans of Holkar and the Abdali. Abdali is reported to be preparing for another descent upon Delhi.*

6598

No. 129] [*8-5-1764*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे
सेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ६ माहे जिलकाद मुकाम अवरंगाबाद स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. अवरंगाबादेहून दोन तीन वेळां वर्तमान विस्तार शेवेसी लिहिलें होतें त्याजवरून विदित जाहालें असेल. हिमतखांनाचा चालायाचा प्रकार तरी नित्य शपथपूर्वक म्हणतात कीं, मी आज चालतों, उद्यां चालतों, ऐसें म्हणतां सवा मास जाला. चालत नाहींत. त्यास याणी मुरादखानास लिहिलें आहे. त्याच्या उत्तराची प्रतीक्षा करितात किंवा नवाबांस लिहिलें आहे त्याचे जाबाची वाट पाहातात कीं याचे मनांत जायाचें नाहीं हें कळत नाहीं. मी दोन च्यार वेळां त्यांस म्हटलें कीं, तुम्हास येणें नसिलें तरी तसेंच साफ सांगावे, म्हणजे मी जातों. त्यांस साफ सांगत नाहींत, ना चालत नाहींत. लौकिकांतच कीं, नवाब मुरादखानावर असंतुष्ट, याजकरितां हे जात नाहींत. हे गेले आणि दोघे बंधु येक जाले म्हणजे यांसी नवाब अविचार करितील. अशी यांचे चित्तांत नाना प्रकारच्या कल्पना लोक घालितात, त्याजवरून हे संशयांत पडतात. दुसरें, करांड्याचा वसवास होता त्याजला मुरादखानानीं मोडिले. प्रस्तुत चर्चा उठली कीं, मुरादखानानीं करंड्यास मोडिलें. तों मागती जमाव करून या प्रांतास येणार. त्या हिंमतखानाची बातमी राखून मार्गी त्यांसी गांठील. याप्रमाणें हिंमतखानाचे पोटांत लोक भयें घालितात, तों तों हे संशयांत पडतात. त्यास मजला सरकारचें आज्ञापत्र सादर जालें कीं, हिंमतखान न येत तरी तुम्ही पुढें जाणें. त्यास पत्र पावतेक्षणींच मी वैशाख शुद्ध ५ पंचमिस निघोन बाहीर राहिलों. त्यास हिमतखानानी बहुतां प्रकारें सांगून पाठविलें व रुका लिहिला कीं, शुद्ध दशमी शुक्रवारीं मी निश्चयात्मक निघतों. तुम्ही आम्हास टाकून न जावें, असें बहुतां प्रकारें लिहिलें. त्याजवरून आणीक दोन रोज त्याची प्रतीक्षा करितों. आले तरी त्याजसमागमेंच जातों. नाहीं तरी मी एकटाच जातों. मी एकटाच हिंमतखानास टाकून गेलों म्हणून स्वामिंनीं चित्तांत रागास न यावें. हिंमतखान स्वामीस लिहितील कीं, अमके आम्हास टाकून गेले, त्याजवरून स्वामीनीं मजवर रागास न यावे. मी मोठ्या अडचणींत आहे. हिंमतखानास टाकून जावें तरी हिंमतखानाची मर्जी राहात नाहीं. हिंमतखानाची मर्जी राखावी तरी सरकारचे कामांत अंतर पडतें. तिकडे मुख्य

यवन नानाप्रकारचे मनसबे करितात तो प्रकार स्वामीस उमजविला पाहिजे असें आहे. विस्तारें वर्तमान रामाजी नाईक धांगरेकर विनंती करितील. त्याजवरून श्रुत होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram complains to Dadasaheb about the dilatoriness of Himmatkhan in preparing for a march as he was afraid he would thereby incur the Nizam's displeasure. He further reports the defeat of Karande in a skirmish with Muradkhan.*

No. 130] [*11-5-1764*

पौ छ २१ जिलकाद

वैशाख आर्बा.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ९ माहे जिलकाद मुकाम अवरंगाबाद स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री कृष्णराव बल्लाळ व मी सख्याचा जाबसालास अवरंगाबादेस आलों होतों, ते समयीं राजश्री राजे सदाशिवराव यांची व कृष्णरायांची भेट येकांतीं जाली. कितेक बोलणे जालें. सदाशिवरायांनीं आपलें हृदगत सांगितलें होते त्याप्रमाणें राजश्री कृष्णरायांनीं व मी सविस्तर विनंती केली होती. त्याजवरून स्वामींनीं सदाशिवरायांस व राजश्री सखो अनंत यांसी पत्रें पाठविलीं. सदाशिवरायाचे मनांत सखोपंतास स्वामीचे सेवेसी पाठवावयाचें होतें; परंतु मध्यें गडबड जाली याजकरितां ती गोष्ट राहिली. प्रस्तुत राजश्री पांडुरंगराव शहरास आले आहेत. यांचा मनोदाय कीं, राजश्री सखोपंतास सेवेसीं पाठवावें म्हणजे हे येऊन समक्ष सर्व विनंती करितील. पत्रीं कोठवर काये लिहावें? सखोपंत शाहाणे माणूस पुरातन व स्वामीचे पदरचे; कैलासवासी श्रीमंत राऊसाहेब तथा नानासाहेब त्यांच्या पायांसी यांचा दाट परिचय होता. ते याजवर कृपा अंत:करणपूर्वक करीत होते. सारांश, सखोपंत कार्याचे मनुष्य आहेत. स्वामीचे दर्शनास येतील तेव्हां विदित होईल. राजश्री पांडुरंगरायानीं सेवेसी पत्र लिहिलें आहे व सखोपंत मुखोत्तरें सविस्तरें विनंती करितील ते मनन करावी. प्रस्तुत राजश्री पांडुरंगरायांचे पत्राचें उत्तर पाठवावें. त्यांस लिहावें की राजश्री सखोपंतास पाठऊन द्यावें व सखोपंतासहि येक पत्र लिहावें कीं, भेटीस येणें, स्वामी समर्थ आहेत. राजश्री पांडुरंगरायाची निष्ठा स्वामीचे ठायीं विशेष आहे. सर्वाचें चालवावें यास्तवच

स्वामींनीं अवतार धरिला आहे. प्रस्तुत नवाबांनीं सदाशिवरायांवर उपद्रव केला हें वर्तमान स्वामीस विदित जाहालें. त्याजवरून स्वामींनीं वाईट मानिलें, आणि त्याच्या साहित्याविशी नवाबांस पत्र लिहिले व हिंमतखानास समक्ष सांगितलें व मजलाहि आज्ञा जाली होती. त्यास स्वामी अजातशत्रु आहेत. मागील जाल्या गोष्टी स्वामीचे चित्तांत नाहींतच. पुढें यांजवर सर्व प्रकारें कृपा करावी. हे सर्व प्रकारें पदरचे आहेत. पांडुरंगरायाचा हेत स्वामीचे पदरीं पडावयाचा आहे. त्यास यास पदरीं ठेविणार स्वामी समर्थ आहेत. असें केल्यानें स्वामीची कीर्ति वाढेल म्हणावें तरी स्वामीची कीर्ति संपूर्ण पृथ्वींत आहे. स्वामीस उपमा द्यावयासी दुसरा पदार्थ नाहीं. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Dhondo Ram informs Dadasaheb of the proposal of Raja Sadashivrao of putting Sakhopant into the Peshwa's service. Sakhopant was already a trusted servant of the Peshwa during the regime of the last two Peshwas. Raja Sadashiv was not in good graces with the Nizam. Can he be Sadashiv Ramchandra ?*

No. 131] [*6-6-1763*

पो छ १० जिल्हेज
आर्बा सितैन

श्री

राजश्री आनंदराव धुलप
गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा आर्बा सितैन मयां व अलफ. रा गमाजी येमाजी सातारियास येऊन शहरासमीप फौजसुधा उतरले आहेत. पावलोक जमा करितात याचा मुदा काये तो समजत नाही. त्यास किल्यास भरणा पोख्त आहे; परंतु जिल्हाल्याचे लोक असावे याकरितां तुम्हाकडील अरमारपैकी लोक आसामी ३०० तीनसे नेमिले आहेत, तरी बाा येक सरदार मातबर शाहाणा देऊन पत्र पावताच आधीं सदरहू लोकांची रवानगी करून जलद रात्रीचा दिवस करून सातारियास येऊन पोहचत ते करणे. अणसकुरा वगैरे घाट ते प्रांतीचे लोक चढल्यास त्याणे यावयास मार्गी निभाव होणार नाही. [शिक्का] याकरितां तिवरा वगैरे घाट साताऱ्यासमीप आहेत, याकरितां यांच घाटाने लोक रवाना करणे. बहुतेक बरकंदाजांचा भरणा. अरमारचे छावणीचे दिवस याकरितां तपसील ल्याहाल तरी कार्यास येणार नाही आधी हे लोक रवाना करून राहिल्या लोकानिसी छावणी करणे. लोका बा

सरदार असेल त्याचे आज्ञेत लोक चालिले पाहिजेत याकरितां तुमचे चुलते तिघे आहेत त्यातून येक जणानी लोकांबा यावें. जाणिजे छ २३ जिलकाद.

¶*Madhav Rao orders Anandrao Dhulap to despatch with all possible haste a contingent of 300 men to the rescue of Satara which was threatened hu Gamaji.*

No. 132] [*28-7-1764*

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विनंती. ताा छ २८ माहे मोहरम मुाा भागानगर स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. मी येथें पावल्यावर सेवेसी दोन विनंतीपत्रें पाठविलीं ती प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान निवेदन जाहाले असेल. सांप्रत नवाबानी छावणी येथे केली. कोठें जाणेयेणे तरी सध्या नाहीं. सिकाकोल राजबंदरी प्रांते साहेबजाद्यास पाठविणार आहेत. आतां छावणीचे दिवसांत चहूकडील राजकारणें घाटितील. बादबरसात जें कर्तव्य तें करितील. यांजला राजकारणें मिलोन श्रीमंतांचे सख्य व दुसरे करनाटक प्रांतीचे. त्यास हैदर नायेकाचा वकील येथें आहेच. जाबसाल होतच आहे. हैदर नायेकापासोन याणी साहा लक्ष रु घेतले. मातबर दरबारचे दंडक आहेत कीं, जो जाबसाल येईल तो लाऊन ठेवावा. सेवटी बनेल तो करावा. इतःपर हे छावणीचे दिवसांत काये मनसबे करितात पाहावें. गुदस्तां गंगातीरीं युध्य जालें त्यापासोन मुरादखानाचे-विसीं नवाबांचे चितांत निर्मलता नव्हती. प्रसंग पाहात होते. येथे प्रस्तुत काबू सांपडली. छ २६ मोहरमी मुरादखान व हिमतखान यांसी नवाबानी दरबारास बोलाऊन नेऊन, दाहा घटका रात्र गेल्यानंतर उभेतासहि कैद केले. त्यांचे समागमे च्यार हाती, दाहा उंटे, सातआठ खांसी घोडी, वस्तभाव होती ती सरकारांत आणिली. अवरंगाबादेस त्यांची कुटुंबे व भाऊ आहेत त्यासहि अटकाव करविला. प्रस्तुत नवाबाजवल कुल येख्तियारीचा कारभार मीरमुसांखां रुकनुदौला करितात. शेरजंग व गुलामसैदखां हे उभैतां रुकनुदौलाचे ममतेंत आहेत. जें करणे तें अवघे येक विचारे करितात. शेरजंग स्वामीचे स्मरणांत विशेष आहेत. आपणास पत्रहि देत होते. हे मनुश्यें तांतडीने राा केली. मागून पाठवितों. सेवेसी श्रुत होये. सरदार मराठे वगैरे सर्वांस आपलाले स्थलास रुखसत केले. राा सदासिव रामचंद्र व सिवाजी केशव मात्र आहेत. हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram writes news to the Peshwa from the Nizam's Camp communicating the imprisonment of Muradkhan and Himmatkhan by the Nizam. The writer also refers to negotiations going on between the Nizam and Haidar.*

6602

No. 133] [*28-7-1764*

पौ छ १६ सफर
खमस सितैन.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २८ माहे मोहरम मुाा भागानगर स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. मी येथे नवाबापासीं पावल्यावर दोन वेळां विनंतीपत्रें, येक स्वामीपासून जासूदजोडी आज्ञापत्रें घेऊन आली होती त्याजसमागमें व येक येथून मुजरद जासूदजोडी, येकून दोन विनंतीपत्रें पाठविलीं ती प्रविष्ट होऊन सविस्तरार्थ ध्यानास आला असेल. माा मुरादखां यांचेविसीं नवाबाचे चितांत निर्मलता नाही व मंडलीचे चितात नाहीं हें वर्तमान पूर्वी शेवेशी विदित होतें. गुदस्तां गंगातीरी श्रावण मासीं युध्यप्रसंग जाला त्यापासून मुरादखानास पेचांत आणावयाचे विचारांत होते, परंतु काबू न फावली याजकरितां गोष्ट आमलांत न आली. प्रस्तुत करांड्याचे कृत्य करून, मुरादखान आले व हिमतखानहि आले. दोघे समागमेंच नवाबास भेटले. त्यास नवाबानी बहुतच कृपा दाखविली. प्रथम हिमतखां व मी नवाबाचे भेटीस गेलों. परस्परें कुशलविचारणा जाली. स्वामीचे आज्ञेप्रों नवाबांसी जो माार बोलणे होता तो बोललो. हिमतखानापासी स्वामीनी कितेक माार सांगितले होते ते हिमतखानानी नवाबास सांगितले. त्याउपरी मी येकटाच नवाबाकडे गेलो होतो तेव्हांहि जाबसाल जाले. छ २६ मोहरमीं नबाबानी मुरादखान व हिमतखान यासी दोन घटका दिवस असतां दरबारास बोलाऊन नेले. नवाब खिलबतेंत बसले. उभैतांसी कितेक भाषण केले. नवाबानी आगोधर फिरंगी गाडदी यांसी सांगून ठेविले होते. दाहा घटका रात्र गेल्यावर नवाब उठोन माहालांत गेले. उभैता बंधूपासोन गाडद्यांनीं हत्यारें घेतली आणि आटकाऊन ठेविले. भोंवताली फिरंगी गाडद्यांची चौकी ठेविली. नवाबाचे देवढीवर दोघांच्या पालख्या व कोतल घोडी होतीं ती सरकारांत नेली. उभैतांची वस्तभाव दो हवेल्यांत होती ती जफ्त केली. तीनच्यार हाती व दाहापांच उंटे व सातआठ घोडीं खासी होती ती सरकारात नेली. उभैताहि जरिंदेच होते. येक हती व उंटे व घोडी कांही बेदरात ठेविलीं होती ती तेथेंच जफ्त करविली. उभैतांस येथें कैद केले तेच समई शुतरस्वार बेदरास, अवरंगाबादेस राा केले. अवरंगाबादेस त्यांचे कुटुंब, भाऊ,

6603

भाचे होते त्यासहि आटकाविंतील. उभैतास नवाबानी आपले हवेलींतच कैद केले. त्यांजला इत:पर किल्यांत पाठविणार गोलकोंड्याचा त्याचा भाचा दाऊदखान त्यांजलाहि कैद केले. उभैता बंधू व येक भाचा असे कैदेंत आहेत. बाबाजीपंत ते दिवसीं रात्रींच कोणीकडे गेले न कले. वरकड खानासमागमे फारसे लोक नवते. अवघ्यांस अगोधरच निरोप दिल्हा होता. कांही वस्तभाव, घोडीं, येक हाती, उंटे असी बेदरास पाठविली होती तीं तेथील तेथेंच आटकाविली अवरंगाबादेसहि सर्वांस आटकावितील. या प्रकारें वर्तमान जाहालें. इत:पर काये काये मार होतो तो पाहावें. उभैतास कैद केल्यावर नवाबानी स्वामीकडे व श्रीमंत रावसाहेबांकडेहि पत्रें रा। केली आहेत. प्रविष्ट होऊन वर्तमान कळले असेल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram reports to Dadasaheb the imprisonment of both Muradkhan and Himmatkhan by the Nizam and the confiscation of their property.*

No. 134] [*22-8-1764*

पौ छ ११ रावल खमस

श्री

श्रीमंत् राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी.

आज्ञाधारक माहादाजी केशव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता। श्रावण वद्य १० पर्यंत मुकाम निर्मल येथे स्वामींचे कृपावलोकणेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी या प्रांताचे कामकाज व जगपतराव वगैरे यांचे सेवेचा अर्थ आज्ञा होती. पुनरपि सर्व गोष्टी राहाविल्या. गुदस्ता टोकेयाचे मोकामी सेवेसी आलो तेव्हां आज्ञा जे, पुढें आज्ञा करू तेव्हा प्रांत हस्तगत करावा. तदनंतर सरकारातून कुस्तातूर वगैरे गाव रसद देऊन केले व सारबाड, देगलूर रा। नरसिंगराव धायेगुडे व रा। पिराजी नाईक निंबालकर यास रसद देऊन करून इकडे आलो. अमल कोठेहि बसला नाही. सांप्रत रा। धोंडो राम व मुरादखान भागानगरास गेले. खान मजकूर तो बिले लागले. पुढे धोंडोपंत यांचा जाबसाल होऊन सुरलीत अमल बसावा यैसा प्रकार दिसत नाही. जाधवराव व नवाब नाना प्रकारचे विवंचनेत आहेत. स्वामींचे पुण्यप्रतापे कार्य होईल तेव्हा खरे. राजश्री गिरमाजी खंडेराव व रघुनाथराव पिंगले वगैरे या प्रांताचे लोक यावर नवाबाचा राग आहे. आणि हे आजुर्दा असेत. यांचे मानस स्वामींचे पदरी पडावे यैसे आहे. रा। गिरमाजी खंडेराव याणी आपले

ठिकाणा आम्हास नऊन कितक गोष्टी सरकारचे उपयोगाच्या बोलिले. दाहा हजारपर्यंत फौज ठेऊन या प्रांते जफ्ती करावी. सनदा तो पूर्वीच सेवकापासी आहेत. त्यामधे मारनिलेकडील जागीर आहे त्याच्या सनदा आलाद्या व वरकड सर सनद व सिरपाव व आज्ञापत्र या प्रां आल्या. सेवकाचे विद्यमाने फौजेची बोली करून जफ्ती करून सरकारची सेवा करावी यैसे त्याचे मानस आहे. बहुता प्रकारे बोलिले यावरून सेवेसी विनंती लिा आहे. कृपा करून पदरी घ्यावे. उपयोगी प्रसंग असलीया आज्ञा करावी तेणेप्रा वर्तणुक करू. आणखीहि येक दोघे मातबर यामधे पदरी येतील. रा गिरमाजी खंडेराव याणी सेवेसी विज्ञापना लिहिली असे. त्यास आज्ञा करणार स्वामी समर्थ असेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Keshav reports to Raghunathrao Dada that Girmaji Khanderao, Raghunathrao Pingle and other servants of the Nizam are willing to come over to the Peshwa as they have incurred the Nawab's displeasure.*

No. 135] [*About September 1764*

श्री

पुा राजश्री चिंतोपंत तात्या ताा राजश्री आबाजीपंत
स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, नवाब डेरेदाखल होऊन बाहीर उतरले आहेत. मातबर दरबार, तेथे राज्यभाराचा कारभार व चहूंकडील राजकारणे येऊन बाज खात आहेतच. केवल तोडून टाकितात ऐसे नाहीं. चहूकडील राजकारणे लाऊन ठेवायाचा दंडकच आहे. परिनामी कोणीहि प्रकार आमलात येणे न येणे हे ईस्वराचे स्वाधीन. परंतु तामकदूर[१] धावत करावयासी आंतर करीत नाहींत. मग बाह्यात्कारे किंवा अंतरंगे असो; परंतु थोर दरबारी कोणीहि राजकारण आले तरी त्यास तोडून टाकीत नाहींत हे रीतच आहे. गुदस्ता नवाब औरंगाबादेहून निघाले ते कृष्णातीरास गेले. हैदर नाइकाचे वकिलासी हेच बोलत गेले की, आम्ही हैदरनाइकाचे कुमकेस चालतो व हैदर नाइकासहि हेच लिहीत होते कीं, कृष्णेपर्यंत आलो आहोत, कृष्णा उतरून तुमचे कुमकेस परिछिन्न येतो. कृष्णेपर्यंत जाऊन हैदर नाइकाचे राजकारण लाऊन ठेऊन सा लक्ष रो मात्र कसेहि करून त्याजपासोन घेतले व तोंडें मात्र बोलत गेले. परंतु आमलात काही न आणिता, हैदर नाइकास कृष्णेस पानी आले म्हणौन बाहाना लिहोन माघारे फिरले ते भागानगरास छावणीस आले. साा१।, कसेहि त्याजला नादी लाऊन पैका मात्र

---

१ शक्ति आहे तोंपर्यंत = यथासामर्थ्य.

घेतला. त्याचप्रमाणे आतांहि त्याजला वरचेवर लिहितात की, गतवरशी कृष्णेस पानी चढले म्हणून कुमकेस येणे न जाले. आंता आम्ही परिछिन्न येतो. तुम्ही खातरजमा राखणे. यांत भाव हाच की, आवंदाहि कसे करून त्याजपासोन पैका घ्यावा. सध्या हैदरनाइकाने तीन लक्षाच्या हुंड्या बशर्ती कुमकेस यावें म्हणौन वकिलाजवळ पाठविल्या आहेत की, कृष्णेपर्यंत पावले म्हणजे तीन लक्षाचा भरणा पावता करावा. यांजला तर कसेहि करून सध्या तींचा ऐवज खरेपण दाखऊन हस्तगत केला पाहिजे. दुसरे, यांजला तर सहजानसार कृष्णेपर्यंत जाणेच आहे. बसालतजंगाचा मुल्क दबाऊन आपली ठाणीठुणी कायेम केली पाहिजेत. दुसरे, वर्शाप्रो जमीदारापासोन जागाजागाहून पेशकशा घेतल्या पाहिजेत. तिसरे, करनुलकरास काढून आलफखां, हिमतबाहादरचा पुत्र, त्याचे ठाणे कायम करून दिल्हे पाहिजे. इतक प्रकार यांजला आगत्यरूप कर्तव्य. आंतरंगी तर याप्रमाणे याजला केले पाहिजे. यांजला तर सहजेच कृष्णातीराकडे जाणेच आहे. हैदर-नाइकास उपकार दाखऊन लिहावें कीं, तुमचे कुमकेसच आम्ही कृष्णा उतरून आलो आहोंत. जलद येऊन पोहचतो. असा उपकार दाखऊन कोणेहि रीतीने ऐवज घ्यावा. दुसरे, याजला आंदेशेहि प्राप्त जाले आहेत, कदाचित हैदरनाइकाचे लस्करांत कुमकेस गेलो तरी येक तो जमीदार पेशा; दुसरे, सरदार परकी राज्याचा; न जाणू सोये बनेल किंवा न बनेल. तिसरे, आम्ही जरी गेलो तरी श्रीमंत परिछिन औरंगाबाद वगैरे मुलक जफ्त करतील. मग तर परिछिन्न बिघाडच श्रीमतांसी जालासा होईल. यापेक्षा राजकारणे लाऊनच ठेवावी यांतच उतम आहे. याप्रो आंदेशेहि करीत आहेत. यांजलाहि हजार पेंच हजार झटे आहेत. याजकरिता हे तोंडेकरूनच जे करणे करीत आहेत की, कोणेहि रीतीने द्रव्य हस्तगत करावे. मुख्यत्वे हा यांचा मनसबा. जर मी सिधांत करून लिहोवें की, बिघाडच करितील किवा हैदरनाइकाची कुमकच परिछिन्न करतील तरी हा सिधांत लिहिण्यात कसा येतो? येकायकीच आंतर्बाह्य ध्यानात कसा येतो? ज्या ज्या समई यांची वर्तनूक पाहिल्यात येती व मनसबा कोणे रीतीचा घाटीत आहेत मनस-ब्याचा सिधांत कसा कसा आमलात येतो इतक्याचाहि संदर्भ ध्यानात वरचेवर आणावा, तेव्हा समयाचे समयास सेवेसी कचापका मजकूर श्रीमंतांचे सेवेसी लिहिण्यात येत जाईल. व प्रस्तुत जो जो प्रकार आमलात येतो तो वरचेवर सेवेसी लिहिण्यात येतच आहे. परंतु पाहिल्याआंती येथं प्रकार सांप्रतचा या रीतीचा असे. श्रीमंतास व आपणास येथील कचापका मजकूर कलावा म्हणौन विस्तारे लिहिले असे. याजला हरयेक प्रकार सा महिन्यानंतर करणे तो आजच श्रीमंतास घाबरें करून लिहावा काये? याणी येखादा मनसबा योजिला आणि यांसच येखादा

पेंच बसला तरी सहजेंच मनसबा व्यर्थ जाला. राज्यभारास जसा पेंच पडतो आथवा उत्कर्ष होतो त्याप्रोचं करावे लागते. मातबर माणूस येका वर्षाचा मनसबा योजून ठेवीत असतात. परंतु त्याप्रोच सेवटवर अवघ्या गोष्टी घडून येतात कीं काये? याजकरितां ज्या समई जसा प्रसंग पाहावा त्याप्रो करावे लागतें. प्रस्तुत यांसी केवल बजिदी करून सख्याचा प्रकार बोलावा तरी हे पाये पसरितात. यांचे मते कीं, त्यांजला हैदरनायेकाचे काम पडलें आहे म्हणून गलां पडतात. दुसरे, याणी आपल्याकडून आजच बिघाड कां करावा? जाधवाचा मुल्लुक याणी दाबिलाच आहे. भोसल्यांचा मुल्लुक याणीं सोडिलाच नाही. यांची ठाणी आहेत तसीं आहेत. यांचे मतें कीं, श्रीमंतानीच आपल्याकडून बिघाडायाचा प्रकार केला तरी मग आपण करावा. सारांश, हैदरनायेकाच्या लस्करांत जाऊन यांसी मिलायाचा संशय आहे कीं, तो हरामी आहे; न जाणो त्याणे दग्राच केलाच तरी. दुसरे, त्याचे लस्करांत मिलाल्यास श्रीमंतासी परिछिन्न बिघाड जाला, असे नाना प्रकारचे मनसबे करितात. त्यास, मी हरयेक गोष्ट' आजच सिधांत करून श्रीमंतास कसी लिहावी? राज्यभाराचा कारभार; न जाणो कोणे समई काये प्रकार घडतो. हैदरनाइकाची कुमक करीत नाहीत, बिघाड करीत नाहीत हे कशावरून लिहावें व हे करितात हेच सेवटास गेले तरी उपाय काये? आथवा हेच पेंचात आले तरी ईस्वरी सता. जाधवाच्या मुलकाचा व भोसल्यांच्या मुलकाचा जाबसाल मी यांसी नित्यशा करितों. त्यास, जाधवाच्या मुलकाचा जाबसाल हे करितात की, जाधव तुम्हाकडे गेले तेव्हा त्याचा मुल्लुक तुम्ही घेतला. आतां तो आम्हाकडे आला तेव्हा त्याचा मुल्लुक आम्हाकडे आला, या प्रकारे बोलतात. त्यास मी उतर केले की, जाधव आम्हाकडे आला तेव्हां आम्ही त्याचे मुलकाचा मोबदला दिल्हा होता. प्रस्तुत गतवर्षी त्यांसी लक्षाचा मुल्लुक श्रीमंतास तुम्ही दिल्हा त्यांत जाधवाचा मुल्लुक दिल्हा आहे. असी उतरे प्रतिउतरे होतात. भोसल्याच्या मुलकाचे हे म्हणतात कीं, भोसल्याकडील कोण आला होता आणि त्याजला आमच्या सरदारानी व कमाविसदारानीं आमल न दिल्हा आशा जितक्या गोष्टी आहेत तितक्या घालमेलीच्या आहेत. त्यामध्यें मी यासीं समर्पक जाबसाल करावयासी चुकत नाहीं. आणि येथील वर्तणूक व मनसबे जे होतात ते श्रीमंतास व स्वामीस लिहावयासी चुकत नाहीं. स्वामीनी सर्व मार श्रीमंतास शृत करीत जावे व प्रस्तुत हा मार श्रीमंतास निवेदन करावा हे विज्ञापना.

¶*This is an important document addressed to Chintopant Tatya and Abajipant (Abaji Mahadev ?) from the Camp of the Nizam minutely reviewing his vacillating attitude towards all the three powers, the Peshwa, Haidar Ali and Bhonsle and exposing the palpable subterfuges of his entire policy.*

6607

No. 136] [31-10-1764 ?

श्री

श्रीमंत माहाराज प्रिथवीपति कासीविस्वेस्वर राजश्री
दादासाहेब स्वामीस समर्थाचे सेवेसी

विनंती सेवक विज्ञापना. आज्ञाधारक आबाजी नाईक साटे चेरनावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दंडवत विनंती. येथील कुशेल जाणून स्वामी समर्थाचे आसीर्वादेकरून सेवक गुलामाचे वर्तमाण छ ९ माहे जमादिलावल मुकाम भागानगर येथास्थित असे. येथील दरबारचा मजकूर [फाटले] जाबसाल नवाबास चऊ रोजा लाख रुपये कुचाचे देतात. करार जाला आहे ऐसे कृष्णातीरापावेतो जावे, दाहापंधरा लाख होतील ते द्यावे, कृष्णापार जाल्यावर वीस लाख रुपये द्यावे, हैदर नाइकाची कुमक केली तर करोड रुपये द्यावे ऐसा करार करितात. नवाब बेद्रापावेतो येतात तेथे फऊज जमा करून कृष्णतीरास जावे ऐसाहि मणसुबा आहे. स्वामीचाहि रोख पाहातात. गदवालचे पालेकरास नवाबाची कुमक गेली आहे. गदवालचे [पुढील बंद गहाळ.]

¶*Abaji Naik Sate informs Raghunathrao of the Nizam's intention to proceed to Karnatak for helping Haidar in return for money promised by the latter.*

No. 137] [20-11-1762 ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पो रघुनाथ हरि कृतानेक सां ना वि॥ येथील कुशल ता॥ मार्गसीर्ष शुध ९ मु॥ चाकण जाणोन स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. आलीकडे पत्र येऊन परामृष होत नाही, तरी यैसे न करावे. सदैव येणाराबराबर पत्र पाठऊन तोशवीत जावे. यानंतर आम्ही पुणियाहून स्वार होऊन राजश्री माहादाजी गोविंद याजबराबर निंबेदेव्हारे याचे घाटावर आलो. पुढे रंग गडबडीचा पाहिला. पुणे पलो लागले. श्रीमंताची भेट व आपली भेट घ्यावयासी रीघ न होये. त्यात रावताचा जमाव तीर्थरूपाकडे, आम्हाबराबर नाही, यैसे च्यार विचार मनांत आणून वस्तभाव संभालावयासी पुणियास आलो. आविंदाचे व आपली फौजेचे वर्तमान कलत नाही, तरी सविस्तर लिहून पाठविले पाहिजे त्याप्रो॥ येण्या राहाण्याचा प्रकार करू. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

सेवेसी कासी बलाल सां ना लि॥ परिसोन लोभ कीजे हे विनंती.

¶*Raghunath Hari refers to the advancing forces of the Nizam and the consequent consternation in Poona.*

No. 138] [24-12-1764 ?

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक धोडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ३० माह जमादिलाखर मुकाम किले यादगिरि भीमा उतरतीर स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ ९ माहे मारचें आज्ञापत्र पाठविलें ते पावोन सिरसा वंदिले. हैदर नायेकाची लढाई होऊन त्याचे उत्तम प्रकारें पारपत्य केले, गाडर्दी मारिले, धरून आणिले, जखमी केले, तोफा, बंदुखा, भाले, घोडी आणिल्याचे वर्तमान विस्तरें आज्ञापत्री लिहिले त्याजवरून संतोष जाला तो विस्तार कोठवर विनंतीपत्रांत लिहावा? पृथ्वीपतीसारिखे स्वामीच्या तेजापुढें टिकणार नाहींत; मग हैदर नायेकाचा मार कायै? येथे सर्वांचे मनोदय भंग जाले, ब्रखेडे तुटले, यांचेथे या आगोधर च्यार दिवस वर्तमान आले होते. माझे पत्र मी रूकनुदौलाकडे घेऊन गेलों. सविस्तर अक्षरशा वाचून दाखविलें. रुकनुदौला प्रमाण संतोष पावले. त्याचे ममतेत होते त्यास श्रम जाले. आस्तु: स्वामी साक्षात विष्णूचे अवतार आहेत. इत्यादिक हैदर नायेकासारिखे दैत्यांश याचे संव्हारास्तव माहराजानी अवतार धरिला आहे. इत:परहि जे माहराजासीं विरुद्ध आचरण करितील त्याची गती या प्रकारचीच. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*[Dhondo Ram, the Peshwa's agent with the Nizam, congratulates him (the Peshwa) on his brilliant successes over Haidar.*

No. 139] [1764?

श्री

पुरवणी श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना. गतवरशीं इस्माईलखां गंगेवर लडाईत सर्वा गोष्टीनें खराब जाले होते. शरीरास जखमा लागल्या. पाये लंगडा जाला. लोक तमाम जखमी व जायां जाले. घोडीं हाथी वगैरें सर्व दौलत लुटली गेली. शहरांत महिणा दोण महिणे राहून इलाज करून पुन्हां रुकसत होऊन अलजपुरास गेले. तेथें सांप्रत इस्माईलखानांनीं आपला सरंजाम तयारी येथास्थित करून घोडीं, उंटें, हाथी नूतन खरीद करून फौज हजार बाराशें नवी चांगली पठान लोक ठेऊन इकडे यावयास्तव सिद्ध जाले आहेत. इकडूनहि नवाबांनी व कारभारियांनीं खातरजमेचे वरचेवर इनायतनामे लिहीत गेले कीं, सरंजामीनें खातरजमेनें यावें.

गौरपरदास्त यथास्थित केली जाईल. त्याजवरून खानमजकुरानेंहि बाहेर निघावयाची तयारी केली आहे. सत्वरींच बाहेर निघनार व इकडे येणार. अवंदाचे वेळें सरंजाम नव्हतां म्हणोन हुजूर चाकरी(स) आले नव्हते. याजकरितां आतां * * * सरंजामीनें येत आहेत. अवंदा हे काहीं नवे स्वार व गाडदी ठेवीत नाहींत. जुनी फौज गाडदी आहेत ते आहेत. लोकांचे निममाहे चढले आहेत त्यांची द्यावयाची वाट करितात. आजपावेतों मीरमुसाखानाचे कारभारांत शिबंदीच्या देण्याघेण्याचा हंगामा तरी जाला नाहीं व फारसा बोभाटहि नाहीं. इतक्यावर बाहीर निघावयाचे दिवस आले आहेत, तेव्हां पाहावें काय प्रकार होतो. कारखाने हत्ती उंटे व तोफखाना यांचा सरंजामीस ऐवज मीरमुसाखानानी दिल्हा, त्याचा बोभाट प्रस्तुत तरी कांहीं नाहीं. हे विज्ञापना.

¶*The letter reports that Ismailkhan has raised a new force despite his reverses of the last year and is marching to join the Nizam.*

No. 140] [*1764?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादा-
साहेब स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. राजश्री कृष्णराव बलाल श्रीमंतांची आज्ञा घेऊन नवाबाकडे आले. नवाबानाहि कृष्णरायांस निरोप दिल्हा. ते चिरंजिवाचे वृतबंधाकरितां बारामतीस गेले. नवाबानी राव मारनिलेस हती वस्त्रे दिल्हीं. हती नवाबाजवळून घ्यावा तो आपले स्वारीस ठेवावा असी श्रीमंतांची आज्ञा होती त्याजवरून घेतला. मजलाहि नवाब हती देतात, परंतु खर्चाकरितां मी घेत नाहीं. त्यास, आग्रहच करून हती देऊं लागले तरी सेवटपावतर नाही म्हणे उचित नाही. हती घेऊन ठेवितो. मग जसी स्वामीची आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करीन. हतीच्या खर्चास बेगमी करून द्यावी असाहि जाबसाल आहे. जसे होईल तसें सेवेसी लिहितो. हतीविसीं जसी आज्ञा हे विज्ञापना.

¶*Raghunathrao is informed that the Nizam presented two elephants—one to Krishnarao Ballal—the Peshwa's Vakil there, and another to the writer who was reluctant to accept it on account of the heavy charges of its maintenance.*

No. 141] [1764?

२

[पहिला बंद गहाळ.] णे ध्यावयासी गेले होते ते काल लस्करांत येऊन ग्रामील जाले. आबदुलहादीखां माहोरचे किलेदार आज येऊन नवाबांची मुलाजमत करणार. राजश्री श्रीपतराव, राजश्री विठोजी चव्हाणाचे कारभारी होते, त्यांजला येथून तांडूर वगैरे माहाल सरंजामांत देऊन फौज ठेवणे म्हणून कसत केले होते ते प्रस्तुत दोनतीनसे स्वारानसीं येऊन नवाबाची मुलाजमत केली. इसमाईलखानास यांची पत्रे गेली कीं, तुम्ही जलद येणे की वराडचे जाबसाल पुसिले पाहिजेत. राजश्री सदासिव रामचंद्रहि जाधवरायासमागंमे येतात म्हणून वर्तमान आहे. राजश्री कृष्णराव बलाल याणी दोन मजली पुढे यावें म्हणून नवाबाचें मानस, याजकरितां शेवेसी दोनतीन विनंतीपत्रे पाठविलीं आहेत व राजश्री कृष्णरायांसहि लिहिलें होतें. त्यास, त्यांचे येणेहि जाले नाही व आज्ञापत्रहि सादर जालें नाहीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This fragmentary letter mentions the interviews between the Nizam and some of his Sardars—Abdul Hadikhan, Shripatrao etc.*

No. 142] [1764

दादासाहेब मुशफक मेहरबान
कद्रदान नियाजमदां सलामत

ॐ बादज आरजुपें मुलाकात खुशवख्ती आयात मशहुद खातरआतर बाद नियाजमंद रात्रंदिवस साहेबाचे दुवागोईत मशगुल आसे दिगर. आमच्या हवेल्या व दुकाणा शहर औरंगाबादेस आहेत त्यास दुकाना तो आम्ही शाहसाहेब म्हणोन दरवेश थोर बहुत औरंगाबादेस राहतात त्याजला दिल्या आसेत. तेथील जे काही उत्पन्न होते ते शाहसाहेब आपले खर्चात आणितात व हवेल्या आम्हाकडेच आहेत त्यास आम्ही पदरी पडलियावर श्रीमंत नानासाहेब वैकुंठवासी व श्रीमंत भाऊ-साहेब याणी नवाबास पत्रें लिहिली होती कीं कविजंग याजकडील हवेल्या व दुकाना औरंगाबादेत आहेत त्याजला कोन्ही मुजाहीम न होये ते करणे. त्याज-वरून गतवरशीपरियेंत कोन्ही मुजाहिमत केली नाही. गतवरशी बिगाड त्या समई विठलदास याणी आमच्या हवेल्या व आम्ही दुकाना शाहसाहेबास दिल्हा आहेत त्या जप्त केल्या आसेत त्या आद्यापपावेतो जप्तीत आहेत. याजकरितां सेवेसी विनंति की परस्तुत हिमतखान नवाबाकडून सेवेसी आले आहेत त्याजला समक्ष

ताकीद व्हावी आणि नवाबास व महमद मुरादखान याजला पत्रें सादर करावी कीं कविजंग यांच्या हवेल्या औरंगाबादेत आहेत, त्यांची व याणी आपल्या दुकाना शाहसाहेबास दिल्यात त्यांची जप्ती मोकली करून पूर्वी चालत आल्याप्रमाणे याजकडे चालू देणे. हे सर्वस्व पदरचे आहेत यांचे आगत्य आम्हास सर्व प्रकारे आसे. येणेप्रमाणे सरकारची पत्रे नवाबास व महमद मुरादखान याजला सादर जाल्या. आमचे हवेल्याची व दुकानाची जप्ती मोकली होईल. दिगर कसबे तुरकाबाद उर्फ खराडी हा गाव आमचे किबलेगाहीचे कुटुंबाचे नावे दरोबस्त इनाम आहे, तेथेहि गतवरशी नवाबाची जप्ती जाली आसे. ये बाबेहि सरकारचीं पत्रें नवाबास व महमद मुरादखानास सादर जाल्या जप्ती मोकली होईल. नियाजमंद सर्व प्रकारे पदरचा आहे. साहेबासिवाये नियाजमंदाची फिकीर कोन्हास आसावी? ज्यादा काय लिहिणे? मेहरबाणी आसो दीजे हे कितावत.

¶*Raghunathrao is requested to write both to the Nizam and Muhammad Muradkhan asking them to release from confiscation the shops and other buildings owned by Kavijang at Aurangabad.*

No. 143] [*18-3-1765*

श्री.

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
माणको शंकर गो।

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सुा खमस सितैन मया अलफ. तुम्हीं विनंतीपत्र छ ९ रमजानचे पाठविले ते छ २१ मिनहूस प्रविष्ट जाहाले. नवाबाकडील व वरकड उमदे उमद्याकडील बातमी वर्तमान बारीक बारीक लिहिले ते सर्वहि अवगत जाहाले. शाबास! यैसेच असावें. तुम्ही निष्ठापूर्वक सेवा करिता, सरकार उपयोगी कामास जपता; फार उतम आहे. तुमच्या श्रमानरूप तुमाचा गौरहि होईल. याउपरीहि तेथील वर्तमान बहुत नाजूक असेल ते सोध लाऊन तहकीक खरें असेल ते लिहीत जाणे. जाणिजे. छ २५ रमजान आज्ञा प्रमाण.

¶*Raghunathrao speaks very highly of Manko Shankar for the great care with which he supplied him with information from the Nizam and his Sardars.*

२

(शा)हाजादा कृष्णापार दाहाहजार फौजेनसी गेला आहे. रामचंद्र जाधवाची वार्ता आहे, कृष्णा उतरावें. नवाबाची धुन (?) हैदर नायकाकडे फार आहे. मोगल काबाडी गाठीतों. याचा इतबार हरगीज न करणें. रामचंद्र जाधवाणें सर्व प्रकारें विडा उचलला आहे. छ ६ माहे जिलकादपावेतों लस्करचें वर्तमान आलें तें संकलित लिहिलें. पुढें जें येईल तें लिहून पाठऊं. सदाशिव रामचंद नवाबासी येऊन भेटला. पंध(रा) लक्षाची जागीर दिल्ही. अवसा, उदगीर कांहीं हैदराबादकडे देतात. नजर देऊं केली याची बाकी राहिली ते नवाब मागतो.

जगजीवनराऊ पोवार याजला पांचा लक्षाची जागीर जाली. दोन परगणे वराडांत व दोन परगणें बालाघाटांत, तीन परगणे खानदेशांत चालिसगाऊ व राजदेहार व जलगाऊं जामोत यैसे दिल्हे आहे. येक मोहरीवर ठाणे करून दिल्हें. हैदरयारखान नवाबास भेटला.

मुरादखा कडें, अष्टी पाथर्डी परवणी हा जिला सोंपला आहे, तेथें आहेत. तीन हजार घोडीं बमये पैदल त्याजपाशीं जमाव आहे.

शहरीहून हिंमतखा मुरादखानापाशीं जात आहे. परस्तानीं भुचडमलच्या बागांत उतरले आहेत. येथून जोडी गेली आहे. जवाब आलियावर जातील.

धोंडोपंत वकील परगणे पिंपरीवर आहेत. हिमतखानाची वाट पाहत बसले आहेत. मल्हारजी होलकर उजेनेस पोहोचला. त्याचा वकील जैरामपंत कागदपत्रें घेऊन नवाबाकडे गेला. आंबाडावर आहे. त्याचा खुलासा घेऊन लिहून पाठवितों.

माहादजी शिंदे याची फौज दुधना नदीवर होती. तोही हिंदोस्थानाकडे जातो.

आलीगौहर पातशा बंगालाकडे गेला. नजीफखां रोहिला दिलीपाशीं आहे. जाटाशीं सलुक नाहीं. माधोसिंग राजा यानें आपली फौज जाटांकडे व रोहिल्याकडे पाठविली. माधोसिंग जैनगडीं आहे. कळलें पाहिजे.

छं १९ जिलकादचे दिवशीं पुणियाहून कागद राजश्री भगवंत नाइकाचें येथें आला. त्यांत लिहिलें आहे कीं, श्रीमंत राऊसाहेब यांहीं हैदरनायेकास लुटून घेतलें. दोनशें स्वारानसही हैदरनायेक पलाला. हें वर्तमान नवाब दरगाकुलीखानास व कोतवालास सांगून पाठविलें. आम्हीं भगवंतनाइकाचें येथें गेलों.

यांणींही आम्हास सांगितलें. भगवंतानें मोठें येश दिल्हें. कितीक दुस्मन पायेमाम[1] जाले. हें वर्तमान यैकिलें तें लिहिलें. मागाहून मुफसल[2] वर्तमान लिहून पाठवितों.

¶*This is a fragmentary news-letter furnishing news from various quarters—especially about the Nizam's grants of Jagirs to several of his Sardars, the Peshwa's victory over Haidar, Mahadji Sindia's march to the North etc.*

No. 145] [*27-6-1765*

श्री

राजमान्य राजश्री लक्ष्मण नाईक
मरलीकर गोसावी यांसी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुाासीत सितेन मया व अलफ. राजश्री भवानराव याणी जमाव करून खूल माजऊन राजश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधि यांसी कज्या अरंभिला आहे. त्यास तुमचे पुत्र दत्तोबा नाा त्याजकडे राहून खुलात सिरून मुलकात दंगा मांडला आहे म्हणौन हुजूर विदित जाहलें तरी तुम्हीं आपल्या पुत्रास अशा खुलांत पाठऊन या रीतीची वर्तणूक करितां हें गोष्ट परिछिन्न कार्याची नाहीं. हालीं हे पत्र सादर केलें तरी देखत पत्र आपल्या चिरंजिवास भवानरावाकडून आणून पंडित माारानिले याजकडें पाठवणें. येविसी गै केली कामाची नाहीं. पष्ट समजोन वर्तणूक करवणे [पुढें दोन आडीच ओळी कोऱ्या ठेऊन नंतर] जाणिजे छ ८ मोहरम

¶*Lakshman Naik Kamarlikar is informed by the Peshwa that the addressee would be severely dealt with, should his son persist in his course against Bhagwantrao Pratinidhi.*

No. 146] [*21-10-1765?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. ताा छ ५ जाावल मुा भागानगर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. या पूर्वी वरचेवर सेवेसी विनंतीपत्रें कचेपके मजकुराची पाठविली आहेत

---

१ पायमाल = नष्ट. २ सविस्तर.

त्यांजवरून [सर्व] ध्यानास आले असेल. सांप्रतहि राजकी वर्तमान विस्तारे सेवेसी पुरवण्या लिहिल्या आहेत त्याजवरून श्रुत होईल. नवाबानी राजश्री कृष्णराव बलाल यांजला बोलावण्याविशी श्रीमंत रावसाहेबास पत्रे लिहिली होती हे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले आहेच. ऐसियासी, कृष्णरावाचे तर येणे जाले नाहीं. राजश्री भगवंत गोविंद नामे कारकून श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणे नवाबाकडे येथे आले. प्रथम रुकनुदौलाची भेट करविली. उपरांतिक नवाबाची भेट करविली. सरासरी बोलणे जाले. हे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले होते त्याजवरून श्रुत जाले असेल. त्यानंतर रुकनुदौला, शेरजंग, जंगनाथ धोंडाजी येके जागा बसोन, मजला व भगवंत गोविंद याजला बोलाऊ पाठविले. त्याजवर आम्ही उभयता तेथे गेलो. खिलवत करून बसले होते. रुकनुदौला, शेरजंग आम्हास म्हणो लागले की, नवाबाच भाव हाच की ज्याप्रमाणे यामागे मोठे नवाबाचा व श्रीमंतांचा स्नेह यकविचारे दृढतर चालत होता त्याप्रमाणेच आतांहि स्नेह तसाच दिवसेदिवस विशेषे वाढत जावा. याजमध्ये सर्व गोष्टी होऊन येतील. नवाबाचे मानस फार करून स्नेहावर आहे. श्रीमंतानीहि याप्रो निखालस होऊन नवाबाचा स्नेह राखावा. त्यास मी उतर केले की, तुम्ही मात्र मुखेकरोन गोष्टी गोडगोड बोलतां, परंतु आमलात येकहि गोष्ट येता दिसत नाही. चहूकडील राजकारणे करीत आहांत. हैदरनाईकाचे राजकारण दाट करीत आहांत. वकिलासीं खिलवते नित्य घाटितात. भोसल्यासी राजकारण राखून ठेऊन नौबसाल करीतच आहांत. हे वर्तमाने श्रीमंतास परभारे वरचेवर पावतच आहेत. याजवरून तुमचे बोलण्याचा विस्वास कसा पुरतो व स्नेह परस्परे निखालस कसा होऊन येतो? जेव्हां काही तुम्ही चहूकडील राजकारणातून हात उचलून निवळ येक वचणेकरोन येक श्रीमंतासीच स्नेह राखावा ऐसे जालियास परस्परे सहजेच येकविचार व येक इतफाक व येकदिली राहील आणि परस्परे नफेहि होतील. ऐस्या बोलण्याने विस्वास पुरतात की काय? याप्रो समर्पक उतरे जे करावयाची ते केली. त्यास म्हणो लागले की, श्रीमंतानी आमची कदरेदानी[1] केली म्हणजे आम्ही सहजेच चहूंकडील राजकारणे दूर करून श्रीमंतांचेच लक्षाप्रमाणे वर्तनूक करून श्रीमंतांचे कुमकेस फौज पाठऊ, तोफा पाठऊं, किंभवना श्रीमंतांचे मर्जीस आले तर नवाब खासेच चालतील. याप्रो याणी मजकूर बोलोन विचार ठराविला की, राजश्री भगवंत गोविंद याजसमागमे दोणी प्रहस्त भला मणुश देऊन श्रीमंताकडे रवाणा करावे. त्याजवरून जगनाथ धोंडाजीचा भाऊ मोरोबा यास तेथे श्रीमंताकडे पाठवायाची तजवीज ठराविली कीं,

---

१. गुणग्राहकता; मनुष्यपारखू.

नवाबानी जें सांगावे ते श्रीमंतांस जाऊन निवदन करावे. ते दिवसी इतका प्रकार जौबसालाचा होऊन आम्ही आपले घरास आलो. छ २९ राखरी नवाब रूकनुदौला शेरजंग येकत्र स्थली खिलबतेत बसोन आम्हा उभयतास बोलाऊ पाठविले कीं, हजूर येणे. त्याजवरून आम्ही उभयता नवाबाचेथे गेलो. प्रथम नवाबानी स्वामीकडील व श्रीमंत रायांकडील [पुढील बंद गहाळ.]

¶*Dhondo Ram, writing from Haiderabad, communicates to Dadasaheb the substance of a conversation that took place between the writer and Bhagvant Govind on one side and Ruknudaula and Sherjang on the other about the Nizam's overtures of friendship with the Peshwa. The concluding portion of the letter is missing.*

No. 147] [*13-11-1765*

पौ छ २७ जमादिलाखर

श्री

राजश्री हवालदार किले चंदन
गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा सीत सितैन मया व अलफ. भवानराव व कानोजी मोहिते हे उभयेता येकत्र होऊन वाई देश प्रांते दंगे आरंभिले आहेत म्हणोन कलले. यैसियासी येविसी रा गणेश विठल तुम्हास पत्र लिहितील त्याप्रमाणे भवानराव, कानोजी मोहिते यांचे पारपत्य करणें जाणिजे. छ २८ जमादिलोवल आज्ञा प्रमाण. [शिक्का]

¶*The Commandant, Fort Chandan, is instructed to take action against Bhavanrao Pratinidhi and Kanoji Mohite so as to stop their mischievous activities.*

No. 148] [*2-12-1765*?

पौ छ ९ रजब
मुा यदलाबाद.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक राघो शंकर दिा धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ १८ माहे जाखर मुा भागानगर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे

वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी वरचेवर विनंतीपत्रे सेवेसी विस्तारे पाठविली आहेत, तीं प्रविष्ट होऊन सविस्तरे श्रुत जाले असेल. सांप्रत नवाब आद्यापवरपर्यंत गोवर्धनदासाचे बागाजवळच उतरले आहेत. बागाची सैर पाहून रागरंग पाहात आहेत. प्रस्तुत सिबंदीचा गवगवा. कारण की नवाब बाहीर निघाले आहेत. त्यास शंकरी जमिदारनीपासोन नजरपटी आडीच लक्ष रुो व रायेणा जमिदारापासोन दीड लक्ष रुो करार करून घेऊन बरतरफीवाले व बाहालीवाले हिसे रसदप्राा चिठ्या सिपाह लोकाच्या करून दिल्ह्या. राहिले सावकार कारवानचे याजपासोन दीड लक्ष रुो करार करून घेतले. तनखा कोणाची करून देत नाहीत. नगद मागत आहेत. सावकार म्हणतात की वाइदावाइदेन करून देऊ म्हणतात. रुकनुदौला व जगनाथपंत ऐकत नाहीत. त्यास नगद काही चिठ्या करून फैसला आज होईल खरा. गोवर्धनदासाचे बागाजवळून आज छ १७ जाालाखरी कूच करून बारोदारीवर जाऊन उतरू म्हणून काल नवाबानी तजवीज केली होती. परंतु आज कूच मवकुफ राहिले. उदईक कूच करून बरादारीवर जाणार. सिपाहचा थोडा बहुत दिवानजींनी फैसला केला. कारखाने चराईत गेले होते, ते काल येथे आले. बारादारीवर जाऊन उतरून पुन्हा तेथून लगट चालावे ते बेदर प्रांते जाऊन निघावे म्हणून मनसबा करीत आहेत. परंतु सर्व लक्ष तिकडील मनसब्यावर आहे. तिकडील मर्जीप्राो करावे हा इत्यर्थ जनामध्ये हेच वार्ता आहे. साठ पासट तोफा लाहाण मोठ्या नवाबाचे डेऱ्याजवळ उभ्या टाकल्या आहेत. बैल वरचेवर तोफेस जमा करीत आहेत. इसमाईलखानाकडून दोनतिनसे बैल दोन वेळ मिळून नवाबाचेथे दाखल जाले. याखेरीज जाहाज्या तालुकियातून बैल येत आहेत. सारांश सरजामीत आहेत. सरदारास अद्यापवर इनायतनामे जात आहेत की आम्ही बेदरचे मैदानात जात आहोत. तुम्ही सरंजामी करून फौजसुधा जलद येऊन शामील होणे. पिराजी नाइकानी वसमत घेतली व खानआलम नांदेडी येऊन राहिले म्हणून नवाबाचेथे वर्तमान आले. पिराजी नाइकाचा जाबसाल रा जाधवरायाचे विद्यामाणे नवाबाचेथे पहिलेपासोन आहेच. आद्यापवरहि सिलसिला तुटला नाही. जाधवरायाचे विद्यमाणे दाहाविसाचे माहाल यावे म्हणून पिराजी नाइकास लिहिली गेली आहेत. आमलात येईल तेव्हा खरे. समसामुदौला चवदा कोसावर साहेबजाद्याचे रोखावर आहेत. दाहाबारा तोफा व काही जजायले बारदार व स्वार वगैरे जाऊन शामील जाले आहेत. आता काही सिपाहची समजावीश जाली आहे. इतःपर स्वार जाणे ते जातील. देवराज मुस्तोफी होता तो शांत जाला. त्याचें मुस्तोफगिरीचे काम रा खंडेराव नामे सिपाहाचे वकील त्याजला होऊन

वस्त्रे जाली. पसतीस हजाराच्या कबजा सिपाहच्या दिल्ह्या. प्रस्तुत कूच मवकूफ राहिले. छ २१ रोजी कूच ठरले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Ragho Shankar communicates to Raghunathrao the movements and plans of the Nizam, his halt near the garden of Govardhandas, his minister's efforts to raise men and money to march on Bedar. The writer also mentions the friendly talks opened with the Nizam by Jadhavrao on behalf of Piraji Naik Nimbalkar.

No. 149] *[10-12-1765 ?*

पो छ २७ जमादिलाखर

श्री

राजश्री गोविंद रघुनाथ

गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो महिपतराऊ कवडे दंडवत उपरि येथील कुशल जांणून स्वकीये कुशल लेखन करित आसिलें पाहिजे विशेष. तुम्ही पिरा सांडणीस्वार याजबारार पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान सविस्तर कळलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब पंढरपुराकडे येणार म्हणोन लिहिलें होतें त्याजवरून आम्ही अजणुजेचे स्वार होऊन गुरसाल्यास आलों. श्रीमंत माझ्याचे सुमारें आल्यास आम्हीहि दर्शनास येत आसों. तेथें आल्यास तुमची भेट होईल. भेटीनंतर सविस्तर वर्तमान कळेल. प्रस्तुत श्रीमंताचा मुकाम कोणे स्थली आहे, तिकडे आणखी कितेक दिवस लागणार, पंढरपुरास कधीं येणार, कर्नाटकांत जावयाचा मनसुबा आहे किंवा आणखी कोणीकडे जावयाचा आहे ? निजाम अलीखान बेदरास आले. राजश्री रामचंद्र जाधवराव वगैरे त्यास सामील जाले, त्यांचा मनसुबा कोणिकडे जावयाचा आहे, हे बातमी सरकारांत आलीच असेल, त्याप्रमाणें आगदीं तपसीलवार वर्तमान सांडणीस्वार पाठविला आहे, याजबराबर लिहून पाठवणें. राजश्री अंबाजीपंत तात्या अद्याप आले नाहींत. पुणियांतच आहेत. मामलेतीचे यैवजावर वराता सरकारच्या जाल्यात. त्याचेच गवगव्यांत आहेत. तेथील निर्गम जाल्याविना त्यांचें येणे त्वर्त होतां दिसत नाहीं. आम्ही श्रीमंत समीप आल्यास दर्शनास येऊं. भेटीनंतर आज्ञा होईल त्याप्रमाणें केलें जाईल. हैदर नाइकासी व श्रीमंत राजश्री रावसाहेबासी युध्य जालें. सख्याची रदबदली त्याणे घातली आहे म्हणोन यैकिलें यैशास तिकडील वर्तमान सरकारांत आलेच असेल तेही सविस्तर लिहिणें. रवाना छ २६ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶Mahipatrao Kavde writes to Govind Raghunath inquiring news about the movements of Raghunathrao Dada proceeding to Karnatak.

No. 150] [December 1765

श्री

पुरवणी श्रीमंत माहाराज राजश्री
दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. इंग्रेजाचा जाबसाल गुदस्तांपासोन यांजकडे यावयाचा आहे. त्यास इंग्रेजाचा व फिरंग्याचा हर्षामर्ष होता त्यामुळें त्यांचें येणें न जालें. सांप्रत त्यांजकडील जाबसाल लागला आहे. हसनअलीखान यांजकडून राजबंदरीस आहे. त्याणें मागें यांजला लिहिलें होतें कीं, इंग्रेज चाकरीस येतात. यांचे बोलीचा करार करून पाठवावा. त्याजवरून याणी हसनअलीखानास लिहिलें होतें कीं, दोन लक्ष रुपये दरमाहा देत जाऊं. याप्रमाणें करार करून त्यास पाठवणें. त्याणी ते गोष्ट कबूल न केली. त्याजवरून मग शिकाकोल राजबंदरीं मच्छलीबंदर व मुर्तजानगर मुस्तफानगर हे इंग्रेजाकडे जागीर द्यावयाचा करार केला. चोवीस लक्षांची जागिरीच्या सनदा शिकाकोल वगैरेच्या करून पाठविल्या. इंगरेजानीं छावणींत येऊन पोंहचावें. पनास हजार होनाची जागीर हसन अलीखानास राजबंदरींत सनद करून पाठविली. इंग्रेजास आणावें हा यांचा मोठा मनोदय आहे.

खंडागल्याचा यांचा बेलभंडार जाला. त्याजला तांडूर देतात. तो घेत नांहीं. सेवटीं ती लक्षांचे माहाल वराड प्रांतें त्यास देणार हें ठरतें. खंडागल्या आज्ञा मागतो.

कलबुर्ग्याच्या किल्यांत सयेरच्या मिषें निजाम अलीखानांनीं आपला बंदोबस्त केला आहे. गाडदी किल्यांत ठेविले आहेत. ख्वाजे रहमतुलाखा याजपाशीं कांहीं द्रव्य मागतात. त्याचे मध्यस्तींत सैद काबीलखान आहेत. अद्यापि निश्चय नाहीं. त्याजपासोन कांहीं द्रव्य घ्यावें, मग त्याजला किल्याबाहीर काढावें, हा मनोदय आहे. त्याजपासोन काये घेतात हा निश्चय जाल्यावर सेवेसी लिहिल्यांत येईल. त्याणें संतोषेंकडून कांहीं दिल्हें तरी उत्तम; नाहीं तरी त्याची अप्रतिष्ठा करून त्याजपासून कांहीं घ्यावें हाही विचार आहे.

कलबुरगे परगण्यांतील जमीदार आणिले आहेत. त्यांजपाशीं स्वारी मुबारकची नजर मागतात. किलेदार ख्वाजे रहमतुला खानाकडील फडच्या व्हावा व परगणे कलबुरगे येथील नजरेचा निकाल होयेपावेतों मुकाम येथेंच आहे. पुढें कोणीकडे जावयाचा मजकूर तरी वाटा चहूंकडील लिहून आणविल्या आहेत. त्यामध्यें आल्या वाटेनें भागानगरास जावें, खममपावेतों दबा देऊन तिकडील

पैका येईसा करावा. उपरांतिक बनल्या सारिखें बंदरास च्छावणीस यावें, नाहीं तरी भागानगरीं छावणी करावी, हें विप्रांचें मानस. हे विज्ञापना.

¶*News from the Nizam's Court, the assurances of help from the English, the grant of a jagir to Khandagale, and the occupation of the fort of Kalburga by Nizam Ali are reported to Raghunathrao.*

No. 151]   [*1765?*

श्री

विज्ञापना. भोंसल्यांचे तर्फेने मीरखलील जाबसालास येथें आहे. त्याणें भोंसल्यांची पत्रे हैदरनायेकाचे नावाची आणून हैदरनायेकाचा वकील मेहदी-आलीखां याचे विद्यमानें हैदरनायेकाकडे पाठविली होती. त्याचीं उतरें प्रस्तुत भोंसल्यांचे नावे मेहदीआलीखानापासीं आली तीं मीरखलीलाने भोसल्यांकडे पाठविलीं. हैदरनायेकाने भोसल्यांस लिहिले आहे कीं, तुम्ही मातबर माणूस व वचनाचे प्रमाणिक. तुम्ही जो मनसबा योजाल तो सिध्धीस जाईल व तुम्ही मनसबा करावाच. त्यास तुम्ही मातबर फौजेनसी नवाबांस घेऊन भेटावे म्हणजे सहजेंच आमचीहि भेट होईल. उपरांतिक तुमच्या आमच्या समतें जें कर्तव्य ते करूं. या प्रकारे पत्रें लिहिली होती. पत्राचे मसविदे वकिलापासीं आले होते. वकील मेहदीआलीखान याणेहि याच आन्वये भोसल्यांस पत्रे लिहून पाठविली. हैदरनायेकाने भोसल्यांस वस्त्रे पाठविली होतीं तींहि वकिलाने दोन जासुदांच्या जोड्या समागमे हैदरनायेकाची जोडी बरोबर देऊन पाठविलीं. हाती घोडेहि तयार केले होते, परंतु मार्गांचे कठिण याजकरितां न पाठविले म्हणून भोसल्यांस लिहिले होते हे विज्ञापना.

¶*The writer communicates to the Peshwa that efforts are being made by Haidar and the Bhonsles of Nagpur to enter into an alliance.*

No. 152]   [*1765?*

श्री

पुा श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना. रा माहदजी सिंदे याची राजकारणाची पत्रें रा सदासिव रामचंद्र याचे विद्यमाणे नवाबास व रूकनुदौलास येके ग्रहस्ताबरोबर आली आहेत. सुगारा तर पूर्वीच लागला होता. परंतु विनाशोध कसे लिहावे याजकरिता सांप्रत शोध घेतल्यात आला की, राजकारणाची पत्रे आली आहेत. त्यास

दिवानजींनी व जगनाथपंतानी त्यांचे ग्रहस्तास उतर दिल्हे कीं, प्रस्तुत श्रीमंतांचा व नवाबाचा स्नेह आहे. राजकारण आम्हास आनकूल कसे पडते म्हणून ऐकिल्यात आले आहे. उतरेहि आद्याप पत्राची दिल्ही नाहींत. उगेच लाऊन ठेविले आहे. पुढे आमलात येईल त्याप्रो सेवेसी लिहिण्यात येईल. हे विज्ञापना.

¶*The news about Mahadaji Sindia's despatches to the Nizam and his minister is communicated to the Peshwa by his news-agent at the Nizam's camp.*

No. 153] [*18-1-1766 ?*

पौ छ, १० साबान

दीड प्रहर प्रातःकालचा.

श्री

श्रीमंत राजाश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ६ शाबान मुकाम तुरुकधामणी परगणे कलमनुरी स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. सांगवीचे मुकामीहून शेरजंग व मी नवाबाचें लष्करांत पावल्याचें वर्तमान लिहून शुतरस्वार सेवेसी रवाना केले होते, तीं विनंतीपत्रें प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान विदित जालें असेल. सांगवीहून नवाबांनीं कूच करून सोमेश्वर राहाटीस गंगातीरासच आले. साहेबजाद्याचे भेटीकरितां तेथें दोन तीन मुकाम केले. तेथून छ ३ रोजीं कूच करून दाहा कोस आले. छ ४ रोजींही तेरा कोसाचें कूच करून कलमनुरीजवळ आले. छ ५ रोजींही बारा कोसाचे कूच करून वासिमास यावें असें ठरले होते, परंतु मार्गी पाणी नाहीं. दुसरें, छ ४ रोजीं खानअलमा समागमें नवाबानीं फौज-तोफा देऊन कलमनुरीचें ठाणें घ्यावयासी पाठविलें. त्यास ठाणें हस्तगत जालें नाहीं. याजकरितां काल पांच कोसांचीच मजल केली. आज सात कोसांचें कूच जालें. खानेअलम तोफा फौज घेऊन गेले. परंतु कलमनुरीचे ठाण्यांत पांच सातशें माणूस आहे. खानेअलमाच्यानें कांहीं जालें नाहीं. याजकरितां आज रुकनुदौला फौज व मोठ्या तोफा व गरनाळ घेऊन गेले आहेत व समतचें ठाणें तरी अगोदरच पिराजीनाइकाचे लोक टाकोन गेले होत. तेथें खानेअलमानें आपलें ठाणें बसविलें. कलमनुरीहि घेऊन त्याचेच स्वाधीन करणार. परभणी राजश्री गोविंदराव पिंगळ्यास याणी दिल्ही आहे. तेथें आगाजी सरगर

व गोविंदराव पिंगळे जाऊन ठाणें बसऊन आले. म्हैसे तरी साहेबजाद्याचे जागिरींत दिल्हें आहे. मुधोळ आगाजी सरगराचे हवाले केले आहे. हें ध्याव-यासी सरगराकडील फौज गोविंदराव पिंगळे घेऊन गेले आहेत. स्वामींनीं भोसल्यांस जागीर दिल्ही होती तेथें प्रस्तुत हे जफ्ती करितात. नवाब दरमजल स्वामीकडे येतात. इत:पर यांचे येण्यांत गुंता नाहीं. उभैतां निंबाळकर व जाधवराव सदाशिव रामचंद्र हे अद्यापि आले नाहींत. नवाब त्यांची प्रतीक्षाही करीत नाहींत. मोगली व खंदारकर वगैरे मराठी फौज नवाबाजवळ साहेबजादे-देखील दाहा हजार आहे. खेरीज पायेचें माणूस पांचसात हजार व तोफखाना आहे. इतक्याच सामानानशी स्वामीचे वचनावर येतात. अवरंगाबादची सुभे-दारी सोहराबजंगास जाली आहे. त्यांची नियाबत सियादतखानास व राजाराम बाबूराव यांसी सांगितली आहे. ते आज उद्यां स्वार होऊन अवरंगाबादेस जाणार. अवंदा अवरंगाबादेहून येतांना सुलतानजी थोरात वगैरे दोन तीनशें स्वार मोरोपंत घेऊन आले. नवाबास भेटविलें. त्यांजला मनसबा जागीर देणार. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Efforts made by Khan Allum to capture Kalamnuri and other places and the movements of the Nizam are communicated to Dadasaheb by Dhondo Ram. The approximate strength of the Nizam's army is also given.*

No. 154] [*18-1-1766*

श्रीलक्ष्मीनरसिंह.

बंद ३

१.

वर्तमान लशकर ता छ ९ रजब.

छ १५. जमादिलाखरेस नवाबसाहेबी दरबार केला. इमामजंग बसालतजंगा-कडोन जाबसालास अला होता त्याजला वकिलास च्यार पांघरने खिलात देऊन रुकसत केले.

छ १६. नवाबसाहेब स्वार होऊन शाह मुस्तजासाहेबाचे दरगाहामधे गेले. तेथे रुपये १२५ सवासे नजर केले. मग दरगाहाचे फकिरानी येक पागोटे दिलें

छ १७. अर्ज जाला की, हयेदरनाईक फौज चाकर ठेवितो. मीर आबासखां पहिले मीर मोगलाचा चाकर होता तो हयेदरनाइकापासी अहे. त्याजला विज्या-पूरची सुबेदारी नेमस्त केली. श्रीमंत नरबदा उतरले म्हणजे विजापूर प्रांतांत अमल करावा.

छ १८. मीर सफिउल्लाखानास रामचंद्र जाधवराऊ याजकडे रुकसत केले. जाधवराऊजीचा लेक मेला म्हणऊन मातमीचा खिलात पाठविला.

छ १९. आबदुल सलामखां, आबदुल हइखानाचा भाऊ, येऊन भेटला. रुपये पांच नजर दाखविली. नवाबसाहेबी कबूल केली.

छ २०. कुचे करून नवाबसाहेब स्वार होऊन गोलकुंडियाच्या किलियांत तमाशा पाहावा म्हणऊन गेले होते. मागती संधियाकाली दाखल जाले. सुलतानजीचे वकिलाचे लेकास मातमीचा खिलात जाला.

छ २१. ताा छ २२. दरबारास जाब जाला. नवाबसाहेब पालकीत स्वार होऊन बराबरी पाहयास्तव गेले. अर्ज जाला की, श्रीमंत दादासाहेब धोडपचे किलियावरून कासारबारीने खांदेसात उतरून गेले. श्रीमंत माधोराऊ अमदानगर ? खालते गंगातीरावर अले. हयेदरयारखानास श्रीमंत दादासाहेबाकडे कृष्णराऊजीस सांगाते देऊ(न) पाठविले.

छ २३. नवाबसाहेबी दरबार केला. भागानगरचे लोकास रुकस(त) केले. तपसीलवार खिलात दिधले.

मीर आबदुलकादरखा सुबेदारास सरपेच पाने दिधली. रायेनास येक वस्त्र देऊन रुकसत केले.

संकरी इजला येक बाजूबंद जडावयाचा दिधला.

मीर हाफजखा व खुदावदखानास पाने देऊन रुकसत केले.

छ २४. नवाबसाहेब दुसरियाने गोलकुंडियाचे किलियाचे सयेरेस्तव गेले.

छ २५. दरबार केला. कागद दिवानीचे दस्तखत करविले. मग आर्ज जाला की, श्रीमंत दादासाहेबासी हयेदरयारखानासी भेट जाली. सकाराम बापूनी फार मोगलाचे अनभाश करायास्तव काही मुलक द्यावा श्रीमंतास विनंती केली.

छ २६. छ २७. मुकाम जाला.

छ २९. नवाबसाहेबी कूच केला. जनवाडियावर अले.

छ ३०. कूच लशकरचा जाला. तीन कोस अले. जनवाडियावर उतरले. तिसरा प्रहर दरबार केला. लोकास खिलत जाले. ताा:·

¶*Daily report from the Nizam's camp is sent to the Peshwa. The death of Ramchandra Jadhav's son is reported.*

6623

No. 155] [20-1-1766

पौ छ १२ शावाल (शाबानं ?)
माघ मास

श्री

विनंती शेवक रावो शंकर दिा धोंडो राम कृतानेक सांा नमस्कार विज्ञापना. ताा छ ८ माहे साबान मुाा अवरंगाबादचे नजीक बेहरोजवाडी स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. नवाब हैदरयारखानाचे बागाजवल होते. तेथून छ २ साबानी कूच करून बेहरोजवाडी नारेगावाजवल येऊन उतरले ते आजपर्यंत मुकामच आहेत. जिनसीस पुर्ते बैल नाहींत. सिबंदीस दिल्हे पाहिजे. याजकरिता कूच करावयासी मागेपुढे पाहत आहेत. विप्रमंडली आद्याप कैदेतच आहे. मोरो सुंदर व खंडेराव यांचा फडच्या सोहराबजंगाचे विद्यमाणे पाचा लक्षावर जाला. बाजे घोडे व जिनस व दोन लक्ष रुाा नगद घेतले ते मुजरा नाहींत. पाच लक्ष रुाा कोरे घेऊन मुक्त करावे त्यास सदासिवराव व राजारामपंत वगैरे मंडली राहिली तिचाही मुरादखानाचे विद्यमाणे जाबसाल होत आहे. जेव्हां यांचा फडच्या होईल तेव्हा अवघे येकदाच मुक्त होतील. उपरांतिक पाहावे कसा विचार करतील. मागून विस्तारे लिहिण्यात येईल. जेव्हा विप्राचा निकाल पुर्ता होईल तेव्हा सिबंदीसहि समजावितील आणि पुढे कूच करतील, परंतु औरंगाबादभोवताला चारा वालला राहिला नाहीं याजकरिता कुल भोवताले माहाल आहेत तेथून ओला चारा कापून कहिवाले आणीत आहेत व घरेंदारेहि लुटीत आहेत. मोठा जुलूम होत आहे. मुसलमानाची शाबेबरात[१] आहे त्यास शाबेबरात येथेच करावी म्हणून बोलवा आहे. उपरांतिक कूच करावें असा मनसबा आहे. जिनसीस बैल नाहींत ऐसे घोरात पडले आहेत.

विठोजी चव्हाणाची व रामचंद्र जाधवरायाची जुज जाले. जाधवरायानी विठोजी चव्हाणास मोडून धुडावले. चव्हाण चालीस पनास स्वारानसी पळून नलदुर्गाचे किल्यांत पळून गेला म्हणोन वर्तमान आले. करांड्या भोसल्याकडून वसमतचे ठाणे घ्यावयासी दोनअडीच हजार स्वारानसी बेदर प्रांती आला आहे. याणी शाहाजी सुपेकर व पिंगले व खदारकर व खडागले याजला लिहिली पाठविली कीं वसमतचे ठाणे करांड्याचे हाती न जाता तुम्ही मदत कुमक करून ठाणे रोखणे. त्याजवरून खंडागले व खदारकर वगैरे हेहि दोनअडीच हजार

१ मुसलमानांचा एक सण.

स्वार आहेत यांची व करांड्याची जुज जाले व करांड्याचा मोड जाला म्हणोन येथे वर्तमान आले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

¶*Ragho Shanker describes the encampment of the Nizam's army and the troubles that it entailed on the adjoining territory. He refers to the imprisonment of certain Brahmins on account of non-payment of dues. A skirmish between Ramchandra Jadhao and Vithoji Chavan and a defeat sustained by Karande when he attempted to capture Vasmat are also described. Udaji Chavan, son of Vithoji is here being mentioned for the first time.*

No. 156] [*20-1-1766*?

पौ छ १० साबान

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा

साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ८ माहे शाबान मुा पेनगंगा येथून वासीम च्यार कोस. स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमा(न) ष सरकारचे मु (आ)ज्ञापत्र पाठवि(ले) सविस्तर आज्ञा कळली. नवाबास व रुकनुदौलास व शेरजंग व रा जगनाथपंत व मोरोपंत यांसी पत्रे पाठविली ती पावती केली. छ ७ रोजी प्रात:काली नवाब व रुकनुदौला व शेरजंग व जगनाथपंत व मोरोपंत व मी इतके जणे येकत्र बसून नवाब आदीकरून सर्वांची खातरजमा उतम प्रकारे केली व मजला आज्ञापत्र होते ते नवाबास व सर्वत्रास दाखवावयाचेच होते याजकरिता आक्षरशाहा वाचून दाखविले. राजश्री कृष्णराव बलाल याणी माहाराजाचे आज्ञेप्रा मजला पत्र लिहिले होते. त्याचाहि मार नवाबास व सर्वास सागितला, त्याजवरून सर्वांची खातरजमा जाली. रुकनुदौला, शेरजंग व जगनाथपंत व मोरोपंत याणी पत्राची उतरे शवसी लिहिली आहेत त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञा(पना).

¶*Dhondo Ram reports to Raghunathrao Dada that he handed over the letters of the latter to the Nizam and his Sardars and they were all satisfied.*

No. 157] [*23-1-1766*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ११ माहे शाबान मुा नजीक वासीम स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान

+ धोंडो राम हा निजामाकडील वकील पेशव्यांचा, त्याच्या कारकुनाचें हें पत्र पेशव्यास.

येथास्थित असे विशेष. छ १० रोजीं नवाबानीं पेनगंगेहून कूच करून दाहा कोस आले. वासिमापुढे तीन कोस आले. भोसल्यांनीं येऊन सरकारची मुलाजमत केली. हे वर्तमान नवाबांस कललियावर नवाबांचे व कारभारी यांचे मनांत संशय यावा. त्यास, स्वामीनी आगोधरच त्याचा पर्याये नवाबास व रुकनुदौलास व राजश्री जगंनाथपंत व शेरजंग यांसी लिहिला होता. त्याजवरून नवाब आदिकरून सर्वांची खातरजमा जाली व मजला आज्ञापत्र सादर जाले होतें त्याजवरून मी नवाबांची व कारभारी यांची खातरजमा केली. नवाबास व कारभारी यासी स्वामीच्या लिहिल्याचा विस्वास याजकारितां स्वामीचे लिहिल्याप्रो कोणे गोष्टीचा संशय न आणितां दरमजल येतात. भोसल्यांनी येऊन मुलाजमत केल्यावर त्याजला सरकारचे व नवाबाकडील मतलब करून घ्यावयाची आज्ञा जाली हे वर्तमान नवाबांस आले, त्याजवरून नवाबांस व कारभारी यासीं फार संतोष जाहाला. म्हणो लागले कीं, श्रीमंतांचा आमचा आकृत्रिम श्नेह जाला व करार जाले आहेत त्याचा आनुभव हाच कीं, आम्ही लिहिलें नसतां व सूचना केली नसतां श्रीमंतानी आम्हाकडील कामाचे जाबसाल आगोधर भोसलियांसी केले. स्वामीनी नवाबांस व सर्वांस खातरजमेची पत्रे लिहिली होतीं त्याची उतरे पाठविली आहेत ती प्रविष्ट जालीं असतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. आज छ मारी गुरुवारी नवाब येथून बारा कोसाचे कूच करून मंगरुलावर गेले. रुकनुदौला नवाबास फार त्वरेन घेऊन येत आहेत. हे विज्ञापना.

¶Dhondo Ram explains to Raghunathrao how he tried to remove the misgivings in the minds of the Nizam and his ministers and how they were satisfied.

No. 158] *[26-1-1766?*

पैवस्ती छ १६ साबान
तिसरा प्रहर

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसीं

विनंती. शेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १४ माहे शाबान मुकाम खेडधमणी आडान नदी स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. शुतरस्वारासमागमें आज्ञापत्र सादर जालें. सविस्तर आज्ञा कलली. नवाब व रुकनुदौला व शेरजंग व राजश्री

जगनाथपंत यासीं पत्रें होतीं. प्रविष्ट जालीं. नवाब व सर्वत्र म्हणो लागलें कीं श्रीमंताच्या आमच्या भेटी व्हाव्या हा हेत होता. परंतु श्रीमंतास उत्तर प्रांतास जावयाची त्वरा व तिकडे कामेही उमदीं आहेत. त्यास श्रीमंत तिकडे गेल्यानें बंदोबस्त होईल, म्हणजे ही गोष्ट सर्वांच्या उपयोगी आहे. वरकड श्रीमंताचा व आमचा श्नेह व करार जाला आहे त्याप्रमाणें दोहींकडूनही आंतर नसावें ही थोर गोष्ट आहे. भेटीचा प्रकार उगाच बाह्यात्कार लौकिकी आहे. सारांश आंत:करणें शुध्य असावीं व जो निश्चय ठरला आहे तो परिणामपावेतों अमलांत यावा हीच दढता पाहिजे. या अन्वयें बोलले व पत्राचीं उत्तरेंही पाठविलीं आहेत त्याजवरून विदित होईल. नवाब म्हणो लागले कीं, श्रीमंत त्या प्रांतास गेल्यानें आमचींही कितेक कामेंकाजें आहेत तीं श्रीमंतानीं करून द्यावीं. श्रीमंताचा आमचा आकृत्रिम श्नेह जाला, तेव्हां श्रीमंताचीं कामें तीं आमचीं व आमचीं तीं श्रीमंताचीं. नवाबानी यादीहि कामाची पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram writes to Dadasaheb of the Nizam's compliance with the terms of the agreement already arranged. As Dadasaheb is proceeding to the North, the Nizam proposed to entrust to him some of his own missions in that region.*

No. 159] [*January 1766*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना राजश्री जानोजी भोसले माहाराजासमागमे हिंदुस्थानात जातात म्हणून नवाबानी वराड प्राती उपद्रव न केला; व स्वामीचे लिहिल्याप्रमाणे नवाबानी केले. येकून स्वामीनी नवाबास व रुकनुदौलास व राजश्री जगनाथ-पंतास माहाराजानी लिहिले कीं वराड प्रांती न राहावे, त्याप्रमाणेच अमलांत आलें. प्रस्तुत आज्ञापत्र येऊन वर्तमान कलत नाहीं; परंतु वर्तमान ऐकिले कीं भोसल्यांनीं पांच हजार फौज माहाराजाचे शेवेत ठेऊन भोसले माघारी आले. त्यास याचें कारण काहीं कलले नाहीं. स्वामीनी त्यास संतोषेकडून आज्ञा दिल्ही, मर्जी राखून निरोप घेऊन आले, किंवा कांहीं बाहाना करून आले, की उगेच उठोन आले की मागती महिना दोन महिन्यानंतर येतों म्हणून आले, हे काही कलले नाही. सविस्तर आज्ञा लिहिली पाा. श्रीमंत रावसाहेबाच्या व नवाबाच्या भेटी जाल्या. परस्परे डेन्यास येणीजाणी जाली याचे वर्तमान पूर्वी शेवेसी लिहिले होते त्याजवरून श्रुत जाहाले असेल. स्वामीनी नवाबांस पंधरा लक्षांचा

मुलुक दिल्हा होता, त्याचे परगणे लाऊन दिल्हे, त्याची आलाहिदा यादी पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The details of an interview between the Peshwa and the Nizam is communicated to Dadasaheb.*

No. 160] [*January 1766*

श्री

विज्ञापना. भोसल्यानी यांजकडे लिखापढी[१] गरम राखली आहे. आगोधर मीरखलील नवाबाकडे पाठविले, त्यानी नवाबाची रुकनुदौलाची भेट घेऊन जेथवर बोलावयाचे प्रकार होते ते बोलले. परंतु याणी केवल तोडून उतर दिल्हे नाहीं. राजकारणाचे रीतीने गोष्ट लाऊन सांगितली. प्रस्तुत हरि राम नामे ग्रहस्त नवाबाकडून भोसल्यांचेथे वकिलीवर राहात आहे. त्यांजला भोसल्यानी कितीक मजकूर सांगून इसमाइलखानाकडे आगोधर पाठऊन, इसमाइलखानानी आपला भला माणूस जमियत तलबखां हरि रामाचे समागमे देऊन उभयतास नवाबाकडे पाठविले ते येथे च्यारपांच दिवस जाले की आले. रुकनुदौलाची भेट घेतली. इसमाइलखानास भोसल्याचे आगत्य. येक तर त्यांचे लगते राहात आहेत. दुसरे, सुभेदार वराडचे; जानोजी भोसल्याचे येथास्थित असिल्याने सुभेदारीचे महत्व. तिसरे, भोसल्याची मध्यस्ती. असा प्रकार जाणून दुराग्रहे करून ग्रहस्त पाठविले आहेत. रा हरि रामाने रुकनुदौलाची भेट घेऊन भोसल्याकडील मानस सांगितले की, लक्ष प्रकारे, श्रीमंत आम्हासी बिघाडितात हे होणेच नाही. तुम्ही आपले पदरी श्रीमंतांचे आश्रयाने उगाच दोश बांधून घेतात यांत नफा कोणता? निदानी श्रीमंत आम्ही येक होऊ. तुम्हास मात्र आर्धोदकी पडणे लागेल. आगर राजकारण करणे तर आम्हासी करा. तुम्हास आमचा विस्वास नसेल, आम्ही तुमचे चाकर होतो; तुमचे निशाण बालगितो आणि येकचिते राहून मातबर मातबर कामे करू. तुम्ही आम्ही येकत्र जालियां श्रीमंत तुम्हाकडे पाहातील कास्यास ? श्रीमंतावरच आपण भारी राहू. अस्या नाना प्रकारे गोष्टी सांगितल्या त्यास रुकनुदौलानी आद्यापि उतर प्रतिउतर केले नाहीं व तोडूनहि सांगितले नाहीं. इतःपर पाहावे काय उतर प्रतिउतर देतात. परंतु भोसले याणी गरम राजकारण लाविले आहे. इसमाइलखानाने गावेलच्या किल्यावर दोनतीन हजार गला भोसल्याचे लिहिल्याप्राा दाखल केला म्हणून वर्तमान आहे. हे विज्ञापना.

¶*The intrigues carried on by the Bhonsles with Ruknuddaula through Ismailkhan against the Peshwa are reported to Dadasaheb.*

---

१ राजकारणी पत्रव्यवहार.

No. 161] [*January 1766*

श्री

पुा श्रीमंतांचे सेवेसी

विज्ञापना. स्वामीनी शुतरस्वाराचे जोडीसमागमे नवाबास खलिता व रुकनुदौलास खलिता, येकून दोन खलिते पाठविले ते पावले. बजिनस खलिते उभैयतास येकांती जाऊन पावते केले. पत्रे वाचून फारच संतोष पावले व म्हणो लागले कीं, आम्हास वरकड गोष्टीवर द्रिष्ट नाहीं. येक परस्परे सफाई व श्नेह मजबत असावा. मुख्यत्वे श्रीमंतांची मर्जी प्रमाण. आतां तर श्रीकृपेने सफाई येथास्थित जाली आहे. येणेकरोन फार फार कामे परस्परे केल्यात येतील. येणेप्रा मजकूर बोलले. दुसरे, रुकनुदौला व राजश्री जगंनाथपंत हे उभैता तिकडील मर्जीप्राच नवाबास सांगावयाचे ते सांगत आहेत व नवाबाची मिजाज ठिकाणी ठेवीत आहेत. पत्राची उतरे नवाबाची व रुकनुदौलाची घेऊन सेवेसी पाठविली आहेत त्याजवरून सर्व ध्यानात येईल. राजश्री मोरोपंत यांणीहि निस्तोषे करोन रुकनुदौलास व जगंनाथपंतास फारच प्रांजले लिहिले होते त्याजवरूनहि फारच संतोष जाले. स्वामीनी राजश्री जगंनाथपंतास पत्र लिहिले होते त्याजवरून प्रस्तुत याणी मनसबा ठरविला कीं, येथून कूच दरकूच नांदेड प्रांती चालावे. साहेबजादे याजला लिहिली गेली आहेत कीं, नांदेडचे जिल्यात यावें. समसामुदौलाहि रवाणा साहेबजाद्याकडे जाले आहेतच. आपणहि खासे दरमजल बेदरप्रांते चालून जाधवराव वगैरे याजला मेळऊन घेऊन नांदेड प्रांते उतरावे येणेप्राो मनसबा करीत आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer reports that he handed over to the Nizam and his minister the Peshwa's despatches and informs the Peshwa of their desire for continuing friendly relations with him (the Peshwa).*

No. 162] [*January 1766*

श्री

विज्ञापना. मारमुसाखा व शेरजंग व जगंनाथपंत यांजसी मी बोललो कीं, तुम्ही श्रीमंतास वरचेवर श्नेहाचे प्रकार लिहितां व मजकडून लिहवितां आणि तुम्ही नवाबांस घेऊन कृष्णातीरास जातां, हैदर नायेकास वरचेवर लिहितां कीं, तुमचे कुमेकेस्तव आलो व येतो, त्यांजपासोन पैका घेतां व आणीक कितेकांस लिहितां कीं, हैदरनायेकांचे साहित्य करणे व चहूकडील राजकारणे घाटितां हें काये? त्यास,

मजसी उत्तर केले कीं, कृष्णेचे आलीकडील पलीकडील माहालांची पेशकसी घेतली पा। व बसालतजंगाचे मुलकाचे बंदोबस्त केला पाहिजे याजकरितां जातो असें गोड बोलतात. परंतु मीरमुसाखानास नाना प्रकारचे बखेडे करावे म्हणून सांगतात कीं, कृष्णातीरास जावें, पुढे आरकाटेकडे जावयाचा रूख करावा म्हणजे श्रीमंतांची मसलत खराब होईल. हैदरनाईक श्रीमंतांसी स्नेह करणार नाहीं व पैकाहि देणार नाहीं. हैदरनाईक आपल्यास पैका देतच आहे. त्यास तो राहिल्यानेच बराच आहे. अशा बखेड्याच्या मसलती स्वामीच्या मनसब्यास विरुध्ध त्या सांगतात व जाबसाल तरी स्नेहाचे करितात व इच्छाहि कांही ठेवितात त्याचे प्रकार पूर्वीं लिहिल्यांत आलेच आहेत. सारांश, यांजला स्वामीचे प्रतापाचे सुख आहे कीं काये ? सर्व गोष्टी बलावर आहेत. स्वामीचा प्रताप आहे म्हणून हे स्वस्त आहेत. नाही तरी हे या मागेहि कोणी गोष्ट करावयासी चुकले नाहीत व पुढेहि चुकणार नाहीत. हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa the substance of a conversation that he had with Ruknuddaula and others regarding the Nizam's relations with the Peshwa. The writer charges them with double-dealing in their attitude.*

No. 163] [*January 1766*

श्री

श्रीमंत माहाराज बाबा दादा
साहेब साहेबाचे सेवसी

आज्ञाधारक वेंकाजी रघुनाथ विज्ञापना यैसीजे. श्रीमंत रावसाहेबी आम्हास रा। माहाराव निंबालकर यासी आणावयास पाठविले. आज्ञप्रमाण करमालियास येऊन दाखल जाहालो. सरकारची पत्रे दाखविली. त्यानी आज्ञा माने केली, मजल दरमजल कूच करून यावे. त्यास सरकारची वराता लाखा रुपयाची जाहाली; यामुळे परगणियांत यैवजाची तरतूद करायास पंधरा दिवस लागले. नवाबाची पत्रे निंबालकरास दररोज येतात कीं जलद फौजसुधा येऊन सामील होणे. त्यावरून कूच करून छ २९ रजबी तुळजापुरास दाखल जाहाले, तेच दिवसी शाहाजी भोसले आले. त्याच्या व निंबालकराच्या भेटी जाहाल्या. भोसले तेथून कूच करून साहेबाकडे आले. निंबालकरहि नवाबाकडे चालले. नवाब उदगीरीच्या मुकामी आहे, यास्तव भेटीस गेले. निंबालकराजवळ च्यार हजार फौज आहे. रा। हयेबतराव निंबालकरासहि सरकारची पत्रे आहेत; परंतु ते म्हणतात कीं नवाबाचे पत्र येईल तर आदी जाऊ; नाही तर जाणार नाही, याप्रमाणे

जाबसाल केला. आदियाप तयारी नाही. बिडासहि नवाबाची पत्रे गेली आहेत. खासां नवाबहि स्वामीकडे यावयाची बाबे भरती करून येणार. याप्रमाणे दररोज येथ बातनी येती त्यावरून सेवसी विनंती लिहिले आसे. खावंदाच्या प्रतापे करून निंबालकरास मजल दरमजल घेऊन येतो. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Venkaji Raghunath reports to Raghunathrao his arrival at Karmala and his efforts to induce Maharao Nimbalkar to mobilise his forces and join the Peshwa. The writer says that he would soon join the addressee.*

No. 164] [*Beginning of 1766*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. भोसल्यांचे पत्र आले तें बजिनस पाठविलें आहे, नवाब व रुकनुदौला व सर्वांस दाखऊन माघारे पाठवणें म्हणून आज्ञा. त्यास, पहिले कासद आले त्यांजसमागमे तरी-पत्र आले नाही. मागून दुसरा कासद पत्र घेऊन आला. त्यास रुकनुदौला व शेरजंग जगनाथपंत मोरोपंत यांसी पत्र दाखविले. नवाबास आज दाखऊन शेवेसी पाठवितो.

नवाबांच्या पत्राची उतरे मागून पाठवितो. रुकनुदौला व शेरजंग व जगनाथपंत मोरोपंत याणीं शेवेसी पत्रे लिहिलीं आहेत त्याजवरून विदित होईल.

नवाबाचे मनात होते कीं, स्वामीची भेट घ्यावी, परस्परे सर्व प्रकार बोलण्यात यावे, मग स्वामींनी उतरेस जावें. त्यास, स्वामी जावयाची त्वरा लिहिली त्याजवरून नवाबास भेटीची नाउमेद जाली. हे विज्ञापना.

¶*Peshwa's Vakil with the Nizam sends Bhonsle's letters to Dadasaheb for his perusal after showing them to the Nizam and his minister. He also sends to him the despatches received from the Nizam.*

No. 165] [*13-2-1766*

पौ छ १३ रमजान

फाल्गुन मुा हांडे.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री

दादासाहेब स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ माहे रामजान मुकाम नजीक टांकली कांठी पूर्णा स्वामीचे कृपावलोकनेकरून

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. पूर्वीं सरकारचे शुतरस्वारासमागमें श्रीमंताच्या व नवाबाच्या भेटी जाल्याचें व परस्परें बोलणीचालणी जाल्याचें वर्तमान विस्तारें विनंतीपत्र सेवेसीं पाठविलें आहे व त्यासमागमें रुकनुदौला व शेरजंग व राजश्री जगनाथपंताचे पत्राचीं उत्तरेंहि सेवेसीं पाठविलीं आहेत, त्याजवरून तपसिलें सर्व ध्यानास आलें असेल. प्रस्तुत येथील प्रकार सर्व माहाराजाचे मर्जीप्रमाणेच आहे. परस्परे भेटीकरितां व भाषणाकरितां कुरूंदखेडावर पांचसात मुकाम जाले. छ २ रमजानीं उभयेता शैन्याचें कूच जालें. श्रीमंतानी कुरुंदखेडापुढून कूच केलें ते टाकलीपुढें दोन तीन कोस जाऊन उतरले. इकडे नवाबानी कुरुंदखेडाहून कूच केलें ते सात आठ कोस टांकलीजवळ कांठी पूर्णेवर येऊन उतरले. इत:पर स्वामीनी मर्जीप्रमाणें श्रीमंत राजश्री राव व नवाब घाट चढून जातात. ज्यांत माहाराजाचा संतोष ते मुख्यत्वें नवाब व रुकनुदौला याजला प्रकार करणें जरूर. स्वामीनी नवाबास पंधरा लक्षाची जागीर देणें करार केली. त्यास प्रस्तुत माहाल पंधराचे लाऊन द्यावयाची निवड श्रीमंताचेथे होत आहे. माहाल नेमस्त होऊन यादी ठरली म्हणजे मागून विस्तारें सेवेसीं विनंती लिहिण्यांत येईल. आज छ ३ रोजींहि नवाबाचें कूच होऊन टाकलीचे नाक्यावर गेले. भोसल्याकडील भवानीपंत श्रीमंत रावसाहेबांसमागमें आले आहेत. राजश्री रंगो गणेश वकीलहि आहेत. इसमाईलखानहि आले आहेत. नवाबाकडील व भोसल्याकडील जाबसाल होत आहेत. नवाबाचा व भोंसल्याचा तहनामा जाला आहे त्याप्रमाणें नवाबाकडूनही अमलांत यावें व भोसल्याकडून अमलांत यावें असें होईल. वर्तमान तें वरचेवर लिहिल्यात येईल. सेवेसीं श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram writes to Raghunathrao assuring him of full co-operation of both the Nizam and Ruknuddaula in what the Peshwa proposed. He further refers to the negotiations going on between the Nizam and the Bhonsle.*

No. 166] [*20-2-1766*

पौ छ १९ रमजान.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १० माहे रमजान मुकाम स्वस्ती वडगांव स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंताचे व नवाबाचे कुरुंदखेड्यावर दाहा

मुकाम जाहाले; परस्परें भेटी जाल्या; डेऱ्यास येणी जाणी जाली, हें सविस्तर वर्तमान पूर्वी शेवेसीं लिहिलें होतें त्याजवरून विदित जाहालें जसेल. श्रीमंत रावसाहेब कूच करून दरमजल गंगातीरास ग्रहणाकरितां गेले. नवाबही कूच करून जातील. नवाबानी राजंबदरीं सिकाकोल प्रांतें अथवा करनाटक प्रांतें जावें तरी मृगसालास दिवस थोडे राहिले, याजकरितां गंगातीरास नवाबही जातील. पुढें छावणी बेदर अथवा भागानगर दोहींतून येक जागां करितील. अवंदा नवाबास पैका मिलाला नाहीं. वराड प्रांतें आले, त्यास वराडचा पैका कांहीं स्वामीनी घेतला. भोसल्याकडील मुलूक राहिला तेथें जाऊन पैका घ्यावा तरी स्वामीची मर्जी नाहीं. याजकरितां वराडांत उगेच आले, उगेच गेले, असें जालें सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*An interview between the Peshwa and the Nizam and their subsequent departure to the river Godavari are communicated to Dadasaheb by Dhondo Ram.*

No. 167] [*About 26-2-1766*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. आज्ञापत्र सादर जाहाले की सरकारचा शफतेचा कागद आहे तो नवाबास देऊन त्याप्रमाणेच नवाबाचा कागद घेऊन पाठवणे. नवाबाकडील कागद न ये तरी सरकारचा कागद पाठऊन देणे म्हणोन आज्ञा. त्यास भोसले स्वामीचे शेवेत येऊन त्याणी मुलाजमत केली. पुढे नवाबाचे मनात कीं स्वामीची भेट व्हावी, परस्परे सर्व प्रकार बोलण्यांत यावे, समक्षच शफतप्रमाण होणे ते व्हावी असें होतें. त्यास स्वामीची उतरप्रांतास जावयाची त्वरा याजकरितां स्वामीनी श्रीमंत राजश्री रावसाहेबांसच जे सांगणे ते सांगितलें कीं नवाबाची भेट घ्यावी शफतप्रमाण घ्यावी द्यावी. ज्याप्रो रावसाहेबास आज्ञा होती त्याप्रो रावसाहेबाच्या नवाबाच्या भेटी जाल्या. परस्परे बोलणे होऊन परस्परे शफतप्रमाण जाली. रावसाहेबानी स्वामीकडील व आपल्याकडील शफत प्रमाण दिल्ही; त्या प्रसंगात मी म्हणावे कीं रावसाहेबाची शफत वेगली व स्वामीची वेगली जाली पाहिजे तरी प्रकार येके रीतीचा दिसतो. यवनास संशय होतो कीं घरातील फूट आहे तसीच आहे, याजकरितां त्याप्रसंगी बोलणे उचित नाही म्हणून उगाच राहिलो. श्रीमंत रावसाहेबानी स्वामीकडील व आपल्याकडील

शफत नवाबास दिल्ही व स्वामीकडील व आपल्याकडीलं शफत नवाबापासोन घेतली याप्रो जाले. याजकरितां मी स्वतंत्र स्वामीकडील मजकूर नवाबासी बोललो नाही; त्या समई बोलावे तरी येक प्रकार दिसतो. वरकड रुकनुदौला व जगनाथपंत स्वामी वेगले नाहीत. त्यास नवाबाचे पत्र शफतेचे स्वामीचे पत्राप्रो घेऊन पाठवावे किंवा कसी काये आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करीन हे विज्ञापना.

¶*The writer reports to Raghunathrao the details of the Peshwa's visit with the Nizam and the oaths they exchanged. The letter reveals the tension that was rising between the Peshwa and his uncle.*

No. 168] [*24-3-1766*

पो छ २ सवाल
सन सीत सीतैन

श्री

सेवेसी हरि बलाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २३ रमजान मुाा मनरथ वर्तमान यथास्थित असे विशेष. कासीदजोडी स्वामीकडून पत्रे घेऊन आली होती त्याचे जाब कांही सांडणीस्वार व आपाजी यमाजी यांजबाा गेले. जिवाजी नानाजीचे कागदाचा जाब राहिला होता तो हली पाा असे. वरकड इकडील वर्तमान तर उदैक कूच करून मनरथापलीकडे जातील. मोगल शाहागडावर येणार. पुढे होईल ते लिहून पाठऊं. वरकड वर्तमान स्वामीचे कृपेकडून यथास्थित असे. हे विज्ञापना.+

¶*Hari Ballal intimates to the Peshwa that the armies would proceed beyond Manrath and that the Nizam would come to Shahagad.*

No. 169] [*31-3-1766*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री रामचंद्र गणेश
गोसावी यांसी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. धारासिवास तुम्ही मोर्चे लाविले आहेत म्हणोन कलले. ऐशास तुम्ही ठाण्यास उपसर्ग न करणे. ठाणे घेतले असिले

+ पत्र पेशव्यास.

6634

तरी नवाबाकडील लोकाचे हवाली करणे. सरकारचा पैका येणे त्याचा वाजबी निकाल करून घेणे. जाणिजे छ १९ सवाल सुा सीत सितैन मया अलफ बहुत काय लिहिणे.

¶*Ramchandra Ganesh is asked by the Peshwa to discontinue action against Dharasiva.*

No. 170] [*March 1766*

२

[पहिला बंद गहाळ.] हे, आद्याप जाधवराव येथे आले नाहीत. आलंद गुंजूटीकडे आहेत म्हणून वर्तमान आले आहे. शुतरस्वार व ग्रहस्त बोलाऊ गेले आहेत. जाधवरायाणी यांजला लिहिले आहे कीं, जलद येऊन पोहचतो. उभयता निंबालकरापैकी मात्र माहाराव बाहीर निघाले आहेत. सहजेच नवाब त्यांचे सरहदेस गेले म्हणजे ते येऊन भेटत आहेत. बीडकर तर आद्याप घरीहून निघाले नाहीत. सदासिव रामचंद्रहि अवंढ्याचे किल्यात आहेत. सारांश याणी तजवीज केली की, विना सरहदेस गेलियाखेरीज सरदार येऊन भेटत नाहींत. याजकरितां त्यांचे सरहदेत जाऊन जलदीने त्याजला मेळऊन घ्यावे म्हणून वरवाल राजूर वगैरे तिकडे चालले आहेत. रुकनुदौला व जगनाथपंत हेच म्हणतात कीं, येकले जाऊन काय करावे ? फौजासहित गेल्यानेच काम आहे. प्रस्तुत नवाबाजवळ गुरुबक्षसिंगराव पांढरे दोनसे स्वारानसी व गोविंदबक्ष पांढरे पनास राऊतानसी येऊन मुलाजमत केली व खान आलम नांदेडात होते. पनासा स्वारानसी येऊन मुलाजमत केली. गिरधरसिंग दोन-तीनसे स्वारानसी येऊन मुलाजमत केली. रुकनुदौलाचे भाऊ आहमदयारखां पाचास्या स्वारानसी येऊन लस्करात पावले. आजमखां व दाऊदखां वगैरे जमादार मागेच राहिले आहेत. आतां नवाबाचेथे लोक वरचेवर जमा होत चालले. रुकनुदौलाचे व जगनाथपंताचे मानस फार करून हेच कीं, कसेहि मसलतीचे रोखावर जलदीने चालावे. परंतु फौजेकरिता गुंता पडला आहे. शेरजंग, धोंडो राम, मोरो धोंडाजी हे अवरंगाबादेतच आहेत. लवकरीच निघणार म्हणौन वर्तमान आले आहे. शेरजंगानी तर शुतरस्वार तर वरचेवर पाठविले आहेत की, जलद येतो. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना. पिराजी नाईक भोसल्याकडे गेले म्हणून वर्तमान आले हे विज्ञापना.

¶*This news-letter from the Nizam's camp, probably addressed to the Peshwa, reports that the Nizam, in right earnest, was mobilising his forces. The first sheet of the letter is missing.*

6635

No. 171] [20-4-1766 ?

लक्ष्मी नारसिंह

वाकाया लशकर नवाब साहेब ताा छ १० जिलकाद

छ ९ जिलकादिस नवाबाहीं आपले पुत्रास राजे दवला बाहादूर खिताब देऊन व सिकाकोल, राजबदरी येथील सुबेदारीची वस्त्रे देऊन रुकसत केले. समागमे दाह हजार १०००० फौजे सरकारची तईनात केली. तोपखानाहि सांगात दिधला. गुलाम गौसखा बहादूर व माा सईदखां व आब(दूल) रसीदखां बाहादूर वगैरे सालवार तईनात करून रवाना केले. लशकरातून कूच केला.

इनायेतनामा भागानगरास रवाना जाला की मरमत हवेली सरकारची करणे नवा(ब) साहेबापासी कदवाल-वालियाचा वकील आला आहे. तेथील नजर पेशकश मुकरर होनार आहे.

नवाब साहेबाचा इरादा होता की आदुनी लायेचूर इकडे जाव. बसालतजंगाचे मुलकात अमल करावा. याउपर रामचंद्रराऊ जाधव यानी आर्ज केला कीं त्या प्रांतात माहागाई धान्याची फार आहे. चारा मिळत नाही. समागमे फौजा येनार नाहीत. याचे विनंतीप्रमाणे तिकड जाणे मवकूफ केले. भागानगरची छावनी नेमस्त जाली. काही दिवस या प्रांतात मुकाम आहेत. थोडे रोजात कुचे होईल. हैदरयारखाजीची मुलाजमत नवाबसाहेबाची जाली. कृपा फार केली. मिरमुसाखां दिवान व रामचंद्र जाधवराऊ व कबीरमााखा वगैरे आमीर भेटायास आले होते.

वाकाया शहर आवरंगाबाद ताा छ २० जिलकाद

परगुणे उंडणगाऊ जागीर दरगाह कुलीखांजी याची आहे. जमाबंदीचा फडच्या न जाला. येक दोवे जमिदार पाा मजकूर याही कमायेशदार याचे ठाने आपले गांवी ठेविले. जागरीचे लोकास आमल देत नवते. याजवर खांन मजकुराहि दोनसे गारदी व तोप परगनियांत पाठऊन ठानियाचे गाव घ्यावे. याउपर मानकोपंत कमायेशदार दिमत सटवाजी जाधवराऊ येथ येऊन खानाची भेट कासी मुरार

सिंदीयाची फौज आंबाड प्रांतातून पुढे घाटापावेतो गेली. मुरादखांजीस नवाबसाहेबाही इनायेतनामा फार कृपे करून लिहून पाठविला. हजूर बोलाविले. त्याजवरून त्यानी व राजे कंधार यानी वसमत प्रांतातून कूच केला. नादेडचे वाटेने लशकरास जातील. हिमतखाजी दो चौ रोजांत कूच करून जातील.

देवगिरीतून तोप बाहेर आली. त्याचे सरजा[म] रसे सूत वगैरे याजसाठी किलेदाराची मानसे शहरास

याचे दिवान याचे विदमाने घेतली. दारमदार जमाबदीचा जाला. जमिदारास आनून भेटवाव व गारदी यास परगनियातून बोलाऊन घेतील.

जुबानी कासद शोहरत आहे की श्रीमंत माधोराऊजीचे लशकरात माहागाई फार आहे. तीन सेर आटा विकत आहे. हैदर नाईक आपले लशकरानसी आद्याप कायेम आहे. कोन्ही तालकदार सरकारचा त्या प्रांती होता त्याजला धरून नेऊन पैका खंडनी घेऊन ब्राम्हणास सोडले. दरगाहकुलीखाजीपासी येऊन सरजाम नेतात. दाईल परगनियातून गावगाव जमा जाले, थोडके दिवसा रवाना होईल.

¶*The writer reports several items of news from the Nizam's camp, e.g. the appointment of the Nizam's son as the Subha of Rajbandar, the intention of the Nizam to proceed to Adoni Raichur, etc.*

No. 172] [*3-5-1766 ?*

पौ छ ६ जिल्हेज हा॥
वयाजी गणजी जासूद

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसांवी यासीं

विनंती उपरी. गणेश संभाजी बेंगाल्याकडून पांच हजार फौजेनसी वराडांत आले आहेत असी बातमी ऐकिली म्हणोन लि॥ ते कलले. आले असतील. राजश्री रामचंद्र जाधवराऊ मोगलाचे लस्करांत आले. रा॥ छ २३ जिलकाद हे विनंती.

¶*Nana Fadnis informed the Peshwa of the arrival of Ganesh Sambhaji into Berar from Bengal. The Peshwa informs Nana of the arrival of Ramchandra Jadhao to join the Nizam's army.*

No. 173] [*3-5-1766 ?*

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २३ जिलकाद मु॥ नजीक उमरखेड वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर

श्रीमंत राजश्री दादानी लिहिले आहे त्याजवरून कलेल. अधिकोतर लिहिजेसे नाही. उमरखेड व म्हसे दोन्हीं परगणे खराब जाहाले. पेस्तर सालापासून कौल दिला पाहिजे. विना परिणाम नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. देवाजीपंत बुनग्यात का ठेविले होते म्हणोन लिा त्यास बरे वाटत नवते म्हणोन ठेविले होते. बरे जाले लस्करास आले. राजेबहादर पैठणास का आले म्हणोन; त्यास पुत्राचे मुंजीकरितां निरोप जाला. मुंजी जाली, आतां लस्करात येतील कलावे. हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes news about Dewajipant and informs the Peshwa that the province of Umarkhed and Mhase have suffered owing to the military operations (of the Nizam).*

No. 174] [*9-7-1766*

श्री

नकल

चिरंजीव राजमान्ये राजश्री माधवराव नीलकंठ यास माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहित जाणे विशेष. बदल देणे मुरारजी फालके सिलेदार सन सितैनात तांदुलज्याचे मुकामी निजाम-आलीखानाचे लढाईत ठार पडले. साा याचे मुलामाणसास बालपर्वेसी सालमाारापासून रुाा १०० शैंभर द्यावयांचे करार केल्या पौ मौजे हारणी ताा निरथडी पाा पुणे येथील मोकासा माारनिलेकडे पेशजीपासून आहे, त्याचा आकार होईल तो सदरहू पौ वजा करीत जाऊन बाकी ऐवज प्रां पुणे पौ साल दरसाल पावीत जाणे. जाणिजे छ १ सफर सुाा सबा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे.

¶*The Peshwa grants a maintenance allowance of Rs. 100 to the family of Murarji Falke who lost his life in the battle of Rakshasabhuvan.*

No. 175] [*About July 1766*

श्री.

पुा श्रीमंत राजश्री दादा-
साहेब स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. नवाबाचे मनात इंगरेजाचे पारपत्यास जावयाचे होतें. परंतु मराठे सरदार तन देईनात. अवघे निरोप घेऊन घरोघर गेले. नवाबानी व रुकनुदौलानी मराठ्यांचे फार वाईट मानिले कीं, मराठे सरदार पुरातन जागिरा

पुष्कल खातात आणि काम पडल्यास मागेपुढें पाहातात. पिराजी नाइकाचा जाबसाल नवाबाकडे होता व श्रीमंत रावसाहेबांकडेहि होता. त्यास, श्रीमंत रावसाहबांचे मानस कीं, पिराजी नायेकास पांचसातशें स्वारानसी ठेवावें. ते गोष्ट नायेकास कसी आनकूल पडती? याजकरितां नवाबाकडेच नायेकानी जाबसाल लागू केला. माहाराजांची पत्रें रुकनुदौलास व शेरजंगास पिराजी नायेकास न ठेवावें येविसीं आली व श्रीमंत रावसाहेबांचीहि मर्जी कीं, नायेकास नवाबानी न ठेवावें. त्याजवरून मीहि रुकनुदौलासीं जाबसाल केले. रुकनुदौला म्हणों लागले की, पिराजी नायेकास ठेवावयाचें मजला आगत्य नाही. परंतु मराठे आमचे कदीम त्यांची गति या प्रकारची. फौज तरी पाहिजे. इंगरेजाचे पारपत्यास गेले पा. त्यामध्यें पिराजी नायेकानी कबूल केलें कीं, मी बाजवाड्याकडे जातों. त्याजवरून नायेकांस ठेविले. नायेकानी पांच हजार फौजेनसी चाकरी करावी आणि आठरा लक्षांची जागीर व नळदुर्गचा किला असा द्यावा असा करार करून नायेकास ठेविलें. खंडागल्याची साहा लक्षाची जागीर व चितापूर, बोदन वगैरे माहाल दिल्हे. सनदा करून दिल्ह्या. पिराजी नायेकास मुलूक दिल्हा त्याची यादी पूर्वीं शेवेसी पाठविली आहे ती प्रविष्ट जाली असेल. पिराजी नायेकास दररोज आठरासें रु॥ नगद खर्चास द्यावे असा करार केला, त्यापैकीं तीस हजार रु॥ नख्त दिल्हे आणि रुकनुदौलाचे भाऊ तहवरजंग व मोरो धोंडाजी व गिरधरसिंग व पिराजी नाईक यांसी बाजवाड्याकडे रा॥ केलें ते खमम वरंगल पावेतो गेले आहेत. तहवरजंग वगैरे सरदार मिळोन हजारबारासें स्वार आहेत. हे विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed why Ruknuddaula had to engage in service Piraji Naik even against the wishes of the Peshwa and to send him to Bezwada against the English.*

No. 176] [*October 1766*

श्री.

पु॥ श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. माहाराजाचे जाणें उतर प्रांतास जाले. येथील बातनी वरचेवर शेवेसी लिहिली पाहिजे; त्यास, जासूद त्या प्रांतास पाठवावे ते चौकड्यावितरिक्त नाहीत. याजकरितां जासुदांची बेगमी करून पाठवावी व कांही कासीदहि पाठवांवे व येखादे समई सरकारचे जासूद कासद नसिले आणि बातनी तरी जरूर

लिहिली पाहिजे तेव्हा आजुरदार कासद पाठविले पाहिजेत येविसीची आज्ञा पाहिजे. त्यास जसी मर्जी व जे आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer seeks instructions from Raghunathrao regarding the want of messengers to carry correspondence and asks money for their employment.*

No. 177] [*1766?*

३

[पहिले दोन बंद गहाळ.]

नवाबाचा निरोप घेऊन गेले आहेत येका दो रोजात येतील. मानवर्तमान येथे आले कीं, माहाराव निंबालकर व रंभाजीराव निंबालकर आपले स्थलाहून निघून दोन कोस बाहीर येऊन नवाबाकडे यावयास्तव उतरले. नवाबास येऊन शामील होणार व पिराजी नाइकाचे आंजनडोह निबालकरानी मारले म्हणून पिराजी नाईक वसमतेत हजार पांचसे माणूस येऊन आंजनडोहचा समाचार घ्यावयास्तव व बदला करावयास्तव गेला. येणेप्रा वर्तमान आले. सराफा भागानगरीच आहे. आजमखा व तेगजंग व रुकनुदौलाचे भाऊ कांही कामामुले भागानगरीच आहेत. ते जलद येणार म्हणून वांजरेवर मुकाम येक दोन करून वाट पाहानार. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News from Haiderabad about some of the Sardars of the Nizam is communicated to the Peshwa. The first two sheets of the letter are missing.*

No. 178] [*1766?*

२

(पहिला बंद गहाळ.)

थडी प्रांतें जाऊन सुदामत घासदाणा आहे तो घेऊन फौजेचा आब राखून आपले प्रातांत जावें यास्तव दरमजल आंबाड परगणियांत येऊन मुकाम केले तों नवाब निजामआलीखां याजकडील वर्तमान आलें कीं, नवाब माघारें फिरोन गंगाथडी प्रांतीं आलें. संवंच नवाबाचीं व राजश्री विठलपंत यांचीं पत्रें आलीं कीं, वराडचें मामलतीचें वगैरें बोलणें आहे. तरी राजश्री कृष्णाजी मोरेश्वर यांसी पाठऊन द्यावें. आम्हाकडील वकिलाचें लिहिलें आलें कीं, नवाब नांदेडचें सुमारें येऊन निर्मळवर शेह दिल्हा, तेव्हां तेथून नागपूर पांच साहा मजलीं राहिलें. यास्तव

कृष्णाजी मोरेश्वर यांसी पाठऊन द्यावें आणि आपणासहि भेटीचा योग करावा लागेल. नाहीं तरी त्यांचा आग्रह आपल्या प्रातांत उतरावें असा फारसा आहे. कदाचित टाला दिल्ह्यास हर्षामर्षच वाढेल. याप्रमाणें वरचेवरी लिहिली येऊं लागली, याजवरून मशारनिलेस जरूर पाठवावें ऐसें जालें आणि पुढें भेटीचे योगाचें संकटच प्राप्त जाहालें. विरुधाचा प्रकार करावा तरी इतके फौजेनें थकतों यैसा अर्थ नाहीं. सारांश्य सांप्रतच्या करण्याचा विक्षेप मानून हा प्रकार आरंभिला आहे, त्यास येतद्विषयीं सला आम्ही गोसांवियाशिवाय कोण्हास विचारावी. ? सर्व मानअभिमान आपणांसच आहे. जे गोष्टीनें या सरदारीची स्तित राहून आपल्या कार्या उपयोगीं पडे या अर्थी जे लेहून पाठवणें तें पाठविलें पाहिजे, तदनुसार वर्तणूक होऊन येईल. रवाना छ ४ माहे शाबान. सुज्ञांप्राति (फाटलें).

¶*Krishnaji Moreshwar is sent to the Nizam for conducting negotiations on behalf of the Bhonsle. The letter is incomplete.*

No. 179] [*1766*

श्रीगणराज

शेवेसी गोपाल गोविंद व मल्हारराव भिकाजी कृा सा ना विज्ञापना. आजी भोमवारीं मोंगल खांबगावाहून कूच करून तीन कोस गेला. बहुतें(क) देलवडीवर गेला असेल. आमची मनुष्यें आली त्याणी सांगितलें की देल(वडी)वर गेला. हजूर बातमी आलीच असेल. विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopalrao Patwardhan reports that the Nizam has marched from Khamgaon and has encamped at Delavadi.*

No. 180] [*15-3-1767*

पौ छ १९ जिलकाद
मुा भांडेर

श्रीभवानीशंकर

श्रीमंत कृपावंत रो दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

सेवक गोविंद यादव बातमीनवीस अवरंगाबादकर करद्वये जोडून सां नमस्कार विनंती उपर विज्ञापना यैसीजे. छ १४ माहे शवालची पत्रे हैदराबादेहून आली, त्यात मजकूर की, फिरंगी राजबंदराहून दाहा हजार काफरी, पाच हजार दा (हा)

हजार गारदी, आलीगौहर पातशाहाचा हुकूम कुल दक्षणची सुबेदारी करणे या प्रकारचे फरमान, त्याही महमदआलीखानास राजबंदरचे सुबा, हसनआलीखानाने समागमे पंधरा हजार स्वार व फिरं (गीं) व काफरी व गारदी पंचवीस हजार फौजेन (सी) येऊन बाजवाडेजवळ कोडपली, तेथील किलेदार राजे मदनसिंह होता तो गोल्याखाले मारला गेला. किला दोन घटिकामधे घेऊन आमल बसऊन खममखलीस आले. हैदराबाद तेथून पनास कोस राहिली. कडपे व करनूल बसालतजंगास व पठानास सर्वत्र जागा जागा फरमानाचा नकला पाठऊन जो पातशाही बंदा आसेल तो या हुकुमास मानील यैसी जे पत्रे पाठविली. हैदराबादेस माहसरा फिरंगी याणी लाविला आहे. तेथील कुल रयेती गोलकुंडाचे किल्यात जाते. आबदुलकादरखा सुबा हैदराबादचा त्याने नवाबास आर्जी लिहिली आहे की, तुम्ही जवल जलदीने येऊन पोहचता तर हैदराबाद राहते. नाही तर किला व शहर फिरंगी घेतात. हे वर्तमान नवाब निजामआलीखानाने ऐकूण कुल जमीदारास व सरदारास इनायेतनामे पाठविले की, सत्वर येऊन पोहचणे, सत्वरच येतो. जानोजी निंबालकर वगैरे सरदार हे विदिल केले. दारकाबाई निंबालकर इची जागीर जप्त करावी. धारूरचा किल्यात नवाबानी सहलचे बाहाने करून पाहावयास गेले. तो किला पाहून नवाबाने आपला किलेदार तेथे बसऊन बेदरास गेले. याकरिता कुल मऱ्हाठे बेदिल केले आहेत. कूच दरकुच हैदराबादेकडे जातो. नवाबाने श्रीमंत रो रावसाबकड वकिलास बोलाऊ पा. इतके वर्तमान जाले ते सेवेसी लिहिले.

श्रीमंत रावसाहेब पुण्यास जाणार. रेणापुरास आहेत. सातार प्रांताकड प्रतिनिधि धोंडोपंत नामे उतपन जाला, त्याने फौज ठेऊन धामधूम

[पुढील बंद गहाळ.]

¶*Govind Yadav reports to Dadasaheb the substance of the letters received from Haiderabad describing the consternation created there by the advance of the English with a firman from the Emperor authorising them to take possession of all the southern territories. Nizam Ali therefore is preparing to resist the English, adds the letter.*

No. 181] *[1767?*

[पहिले दोन बंद मिळाले नाहीत.]

ते वदता यैसी आहे की, कलबुर्ग्याकडून अदवाणी, रायेचुराकडे जाणार. खोजे रहिमतुलाखा म्हणतात की, सिकाकोल राजबदरीकडे जुलफकारजंग याचा बदला घ्यावयासी जावे. पांच लाख रुपये सिबंदीस आपण देवितो. नवाबाही जाबसाल केला की सिबंदी फार आहे. पाच लाख पुरत नाहीत. कृष्णा उतरून पलाड जाऊन पैसे वसूल करून सिबंदी करावी यैसे म्हणतात. अद्यापिवर

निश्चये नाहीं. येथील सलतनत फार अफतर आहे ते लिहितां पुरत नाहीं. वकीलमुतलख जे आहेत त्याची बुधे लेंकुरपणाची आहे. जमाव येथील बिलकूल स्वार तेरा हाजार, गारदी च्यार हाजार, बरकंदाज पाच हाजार, जेजालदाज दोन हाजार व तोफा लाहान थोर बावन येणेप्रा सरजाम आहे. अजीपावतो मराठे सरदार कोन्ही आले नाहींत. सजावल जागा बजागा गेले आहेत. जुलफकार-जंगाचे वर्तमान पूर्वी लिहिले होते. त्यास सांप्रत तहकीक वर्त (अपूर्ण).

¶*This is the last of the three sheets of a letter communicating to Dadasaheb news of the rally of the Nizam's forces.*

No. 182] *17-5-1768*

श्री

पौ छ ३ मोहरम

सन तिसा

विज्ञापना. श्रीमंत उदैक बुधवारीं गणेगांवी प्रात:कालींच भोजन करून सिकरापूरावरून कोरेगावावरून वाघोलीवरून संगमावर मुकामास येणार येथून पधरा सोला कोस आहे. च्यार घटिका दिवसास येथून निघतील ते दाहाघटका अगर प्रहर दिवस सायंकालचा असतां संगमावर येतील. आपले भेटीस उद्यांच चांगले आहे. त्यास आपण तयारी करून श्रीमंत वाघोलीचे पुढें येतील, त्यांस पुण्यापासून तीन कोसपर्यंत आपण पुढें यावे. म्हणजे भेटी ठीक होतील. श्रीमंत मुकामास येऊन सायंकालीं पर्वतीस जातील. तेथें भोजन करून मुकामास येतील. मग पाहाटेचे सा घटका रात्रीस पुण्यांत येतील. कललें पाहिजे हे विज्ञापना.

¶*The probable time of the Peshwa's return from the campaign and arrival at Poona is reported in this letter.*

No. 183] *[25-8-1768*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंदराव कोनेर व मुकुंदराव रंगनाथ कृतानेक सा नमस्कार विज्ञापना आम्हास श्रीमंत राजश्री दादासाहेबी निजामअलीखान याजकडे सालगुा वकीलीस पाा होते :— समागमे सरंजाम येणेप्राा दिल्हा होता तपसील :—

४ नवाब निजामनअलीखानास

१ हाती नग

१ घोडा रास येक

6643

१ वस्त्रे सरब मोहर बस्ता येक
१ जवाहीर रकम जिगा त्याची थैली सरब मोहर येक.

४

३ बसालतंजंग यासी

१ वस्त्रे बस्ता सरब मोहर येक
१ जवाहीर रकम सरपेच थैली सरब मोहर येक
१ घोडा रास येक

३

२ रुकनुदौला दिवान यासी

१ घोडा रास येक
१ वस्त्रे बस्ता सरब मोहर येक
० सरपेच रकम येक हुजुरीहून दिल्हा नाही. लस्करात खरेदी करून आज्ञेप्रा दिल्हे. गुा धोंडो राम वकील किमत रुा २०० दोनसे

२

२ सेरजंगास वस्त्रे बस्ता येक सरब मोहर
० मोरो धोंडाजी यासी वस्त्रें हुजुरीहून दिल्हे नाहींत. आज्ञेप्रा लस्करात खा करून दिल्हे.

२६ उंटे नफर

२५ वोझ्यास व फरोक्त करात्रयासी
१ निा मुकुंदराव वोझ्यास

२६

१ पालखी जुनी निा मुकुद रगनाथ
१ राहुटी निा मुकुद रगनाथ जुनी सातगजी.

सदरहूपैकी हाती नग येक व घोडे रास तीन व वस्त्रे बस्ते तीन व जवाहिराच्या थैलिया दोन व दिवानजीस रकम सरपेच व मोरो धोंडाजी यासी वस्त्रें यैसी बहुमान ज्याचा त्यास प्रविष्ट करून सेरजंगाच्या वस्त्राचा बस्ता येक मारनिले लस्करात नवते बदल सिलकेस राहिला तो बस्ता व बसालतजेग याणी श्रीमंतास वस्त्रे व

जवाहीर सरपेच व घोडा दिल्हा तो व उंटे मैत व फरोख्त व चोरीस गेली ते वजा होऊन बाकी राहिली ते व आणिक किरकोल सामान कागदपत्रसुधा ताा प्राा सरकारात आम्ही आणून दिल्हे. बरहुकूम तपसील हरयेक कारखान्याकडे सर्व पावते करून पावत्या आणून दिल्ह्या, येणेप्राा

९ उंटे नफर सुमार २६ पैकी वजा

११ मैत उंटे मुकुंद रगनाथ याच्या निाा उंटासुधा

४ फरोख्त लस्करात

२ धोंडो राम वकील यासी दिल्हे नफर दोन किंमत रुाा ७००

१ मोरो धोंडाजी यास दिल्हा नफर येक किंमत रुाा २५० अडीसे

१ पांढरे याजकडे विकला नफर येक किमत रुाा ३६५ तीनसेपासष्ट

४

२ गुतीच्या मुलखात चोरीस गेले नफर दोन

१७

बाकी नफर ९ नव सरकारात उष्टरखान्याकडे पावते केले

२ जामदारखान्याकडे कापड पावते केले

१ बसालतजंगाकडील बस्ता सरब मोहर येक

१ सेरजंगाकडील बस्ता सरब मोहर सिलकेस राहिला होता तो

२

१ घोडा कर्डा रास येक बसालतजंगाकडील हुजूर पागेस लगाम व जुनी झूल व तरटी तोबरा यासुधा पावता केला

१ हातीचा किलावा सुती कड्या सुस्या होता तो पीलखान्याकडे दिल्हा

१ रत्नशालेकडे बसालतजंगाचे भेटीबाा सिरपेच १ थैली सरब मोहर होती ते पावती केली

२ दौलताबादेस धोंडों माहादिव याजकडे पावते करून निाा मुकुदराव रगनाथ

१ पालखी जुनी

१ राहुटी सात गजी जुनी

२

१ कागदपत्र उभयेपक्षीचे होते ते सर्व रा सदासिवपंत निा तोफखाना याचे विद्यमाने हुजूर दिल्हे कलम

सदरहू प्रो सर्व साहित्ये व कागदपत्र आम्हाजवळ होते ते सर्व सरकारात दिल्ह्याखेरीज आम्हाकडे काही राहिले नाही. कागदपत्र व सरकारचा डागिणा आम्हाजवळ निघाला तर सरकारचे अन्याई मिति सके १६९० सर्वधारीनाम संवछरे श्रावण शुद्ध ११ येकादसी छ १० माहे राखर सुरु तिस्सा सितैन मया व अलफ हस्ताक्षरे गोविंदराव कोनेर व मुकुदराव रगनाथ सही सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govindrao Konher and Mukundrao Rangnath report to the Peshwa how they gave away the costumes, animals and articles sent as presents to the Nizam and his sardars by Raghunathrao.*

No. 184] [*1-2-1769*

पौ छ ३० रमजान पौश.

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ २३ माहे रमजान मुा सास्तूर स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले ते सिरसां वंदिले. नवाब निजामअलीखान बाहादर याजला पूर्वी ऐनी आंबारी पाठविली होती त्यास त्या आंबारीस युक्त कलस प्रस्तुत सुमार.

९ आंबारीचे.
२ सायेबानाचे.

११

येकून आकरा कलस पाठविले ते नवाबास रुकनुदौलाचे विद्यमाने प्रविष्ट केले. नवाबानी पाहोन फार संतोषी जाहाले. कलस पावल्याचे उतर रुकनुदौलानी खलिता शेवेसी पाठविला आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram hands over to the Nizam through Ruknuddaula the pinnacles presented by the Peshwa for his elephant saddle and reports the matter to the Peshwa.*

No. 185] [Received on 16-2-1769

पौ छ ८ सवाल तिमा
सितैन माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ साबान मुकाम पेणगंगातीर नजिक वासीम यथास्थित जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आज्ञा घेऊन स्वार जाहालो तो तुळजापुरचे मुकामीं लश्करांत पोहोचलों. यंदा खासा स्वारी वालेघाट प्रांते आल्यामुळें मवास दोघांची पारपत्ये जाहाली. मोराजी जगथाप धारासिवकर धरुन आणिला. येक दोन वेळ ताडण होऊन आतां कैदेंत आहे. सुलताना वणजारा रामगडवाला बंधूसहित धरून आणून दोघांची डोचकीं मारिलीं. आणिखी कांहीं दिवस फौज तेच प्रांती आसती तर बहुत मवास तुटते ; परंतु इकडे येण्याची त्वरा म्हणोन श्रीमंतानी कूच करून किले धारुरास आले. तेथें नवाब रुकनुदौलाची भेटी जाहाली. त्याचे कूच करऊन आपणहि कूच केले. समागमेच धारूरचा घाट उतरून दरमजल मुकाम मजकुरास आले. राजश्री पिराजी नाईक निंबाळकर पणदुरांत होते. तीन वर्षे नवाबाची चाकरी करीत नाहींत. जाहागीर अनभऊन आणिखी मुलुक मारीत फिरून सेवटी नवाबासी भेटलेहि नाहींत. श्रीमंतासीहि भेटी न घेतली, याजमुळें नवाब इतराज जाहाले ; आणि नाइकावर फौज ठाणी ध्यावयाकरितां पाठविली. इकडीलहि राजश्री आनंदराव रास्ते व राजश्री हरि गोपाळ व आणिखी किरकोल पतके व तोफखाना यैसे पडदुरावर गेले. आज्ञा आहे कीं सामोपच्यारें भेटीस आले उतम ; नाहीं तर निग्रह करून आणावे यैसी आज्ञा. त्यास वर्तमान आले जे पिराजी नाईक, रास्ते यासी भेटले. श्रीमंताचे दर्शनास येतात. येतील. राजश्री देवाजीपंत निा भोसले आले म्हणोन वर्तमान कळतां लश्करांत न येणे. या प्रकारे श्रीमंताची आज्ञा केली आसतांहि येऊन पोहोचले. पाथरी परगणेयात मुकाम होता. तेथून कूच होते समई येऊन श्रीमंतासी भेटले ; परंतु रुखा मिलाला नाहीं. तसेच राजश्री मोरोबा दादा याचे दर्शनास आले तो हे स्मश्रू करीत होते. काहीं बोलले नाहीत. देवाजीपंत चकपक वक्तृत्व करून गेले. साईकालीं चार ठाणे याचे मुकामी राजश्री दादाचे डेरियास येऊन येक प्रहर येकांत केला. नित्य मजलीस रात्रो येतात. प्रहर दोनप्रहर खलबत करितात. कांहीं रंग पडता दिसत नाही. श्रीमंताची मर्जी निष्कर्षावरच दिसते. वासीम मंगरूलचा घाट दहाबारा कोस उतरला. येका दों

6647

रोजात घाट उतरतात. निश्चय कैसा होतो. याउपर होईल ते वर्तमान पत्रीं सेवेसी विनंती करूं. हिंदुस्थानाचे वर्तमान पूर्वी पुण्यात आले ते सेवेसी श्रुत केले. हाली राजश्री माहादाजीबावा सिंदे यांची पत्रें आलीं जे उदेपुरी राणा राजसिंगजी मृत पावले त्यांची स्त्री गरोदर होती. पुत्र राणा रतनसिंग जाहाले. आतां सात आठां वर्षाचा मूल आहे. त्याजकडे सोला उमरावापैकीं चौदा उमराव मिळाले आहेत. जातेपूरकर राजा विजेसिंग व जैनगरवाला राजा प्रिथीसिंग याणी राणा रतनसिंग याचा पक्ष धरून आम्हांकडील रा। यशवंत वाबले व होळकरांकडील रा। सदासिव गंगाधर फौजसुधां ते प्रांते होते, याजबरोबर या उभयतानी आपली फौज देऊन राणा रतनसिंग यास उदेपुरी स्थापावा यैसा निश्चय करून सारे उमराव मिलोन यास टिका द्यावा या अर्थे येशवंतराव वाबले व सदासिव गंगाधर व उभयतां राज्यांकडील फौज येकत्र होऊन उदेपूरची बारी तोडून शहरास मोर्चे लाविले. दो चौ दिवसात शहर खाली करून घ्यावे तो राजश्री विष्णु महादेव याणी सरकारात काय गैरवाका समजाऊन सरकारची पत्रें रा। रावोराम यासी पाठविली कीं तुम्ही राणा अरिसिंह उदेपुरात आहे त्याची कुमक करणे. त्यावरून मारनिले फौजसुधा तिकडे जाऊन बखेडा केला. उदेपूरकर अरिसिंह व आपण येकत्र होऊन वाबले वगैरे यासी हर्षामर्ष करून मामलतीत घाण केली. आम्ही उजनीस आल्यावर राणा रतनसिंग व उमराव येऊन आम्हास भेटले. दोहीकडील मामलतीचा प्रकार मनास आणितां उदेपुरी स्थाई आहे तो पंधरा निदान वीस लक्षपर्यंत कबूल करितो; आणि येथे आले ते पनास लक्ष मामलत व सरकारची बाकी आज ता। काय राहिली आसेल तिची निशा करून देतात. यैसियासी ज्यात सरकार किफायत आणि नक्ष तें करावें. राजे बिजेसिंग व पृथीसिंग उभयतांचा पक्ष रतनसिंग याजकडे भारी; आज आम्हीं हे गोष्ट न केली, अरिसिंह याजकडील मामलत करून च्यार रुा। येतील ते घेऊन दुसरे मसलतीस गेलो. माघे उभयतानी आमचे केले मोडून रतनसिंग स्थापिला तर तिकडून बदनक्ष असो. इतकेहि असोन सरकारकामहि पोख्त नाहीं यैसे जाणोन रतनसिंग येऊन भेटला. याचा पक्ष न धरला तेव्हां हिंदुस्थानात आब राहिला पाहिजे; यास्तव यांजकडील मामलत पनास लक्ष रुपये करार केली; व बाकी जे असेल ती घ्यावी यैसा निश्चय केला. उदेपुरी नेऊन यासी गादीवर बसऊन कराराप्रो। यैवज घ्यावा यैसे केले. आम्हीं त्रयोदसीचे मुहूर्ते निघोन उदेपुरास जातो. राज्याची फौज थोडीसी आली आहे. आम्ही येथून पुढे गेलो म्हणीजे उभयता राजे फौज वीस पंचवीस हजारसुधां शामील होणार. सरकारची पत्रे राघोराम याजकडे जातात. त्यावरून इकडील लक्षाप्रमाणे वर्तणूक करीत नाही. पुढे रवाना केले ते

उजनीहून माळव्यातील यैवज घेऊन मातीत मिळाऊन दिल्हा. हाली मामलतीत घाण करितात; तर ते चाकर आमचे लक्षाप्रा वर्तणूक न केल्यास पारपत्य करणे अगाध नाहीं; परंतु श्रीमंताकडे काय गैरवाका लिहितात हे कळत नाही. तर दोन्ही मामलतेचे वर्तमान श्रीमंतास विनंती करणे. आम्ही करू ते सरकार किफायत व नक्ष आणि च्यार रजवाडे यासी मान्य यैसेच करू. येथून निघोन मजल दरमजल जातो. सरकारची बाकी उदेपुराकडे आजता काय आसेल त्याचा हिसेब लेहून पाठवणे, त्याप्रा निशा करून घेतली जाईल. लिहिल्याप्रो श्रीमंताचे पत्र आम्हांस राणा रतनसिंगाचे स्थापनेविसीं व यैवज घ्यावयाविसी व रतनसिंग यास खातरजमेचे पत्र व राघोराम यासी पत्र आमचे लक्षाप्रा वर्तणूक करणे. न करिता कार्यास येणार नाही म्हणून यैसी पत्रे पाठवणे म्हणून पत्रे आली. वर्तमान आपणास कळावें. याकरितां विनंती केली असे. पत्र श्रीमतासहि होते. प्रविष्ट केले त्याचें उतर व विनंती करून लिहिल्याप्रमाणे पत्रे घेऊन रवाना करितों. बाकीविसी श्रीमंताचें पत्र स्वामीस येईल. त्यास बाकीचा सत्वर हिसेब राजश्री माहादजीबावा याजकडे रवाना करावयाविसी आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Ramchandra Shivdev in the camp of the Peshwa near Wasim in South Berar, to Nana Fadnis at Poona, reporting the punishments which the Peshwa inflicted upon some rebels, the chastisement of Piraji Nimbalker, etc. The interference of the Maratha generals in Rajputana politics arising out of the succession troubles at Udepur is also referred to.*

No. 186] [*7-3-1769*

पौ छ ३ जिलकाद
तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

पो नागोराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २७ सवाल मुा पैठण गंगा तीर वर्तमान येथास्थित आसे विशेष. छ २५ तारखेस व छ २६ तारखेस पत्रें डाकेचे स्वाराबरोबर पाठविली ती पावोन वर्तमान विदित जाहाले असेल. भवानी खिजमतगार मुजरत बिडाकडील पत्रे आली होती ती बजिनस पाठविली आहेत व मजकूरहि आम्ही लिहिला आहे. तोहि मार

सविस्तर ध्यानास आलाच आसेल. येथे मुकाम मजकुरी आलियावर येथेंहि वर्तमान लस्कराकडील ऐकिले की भोसले भालकीस करार गेले. जाधवराव यांच्या भेटी जाहाल्या. जाधवराव यांचा हेत आहे कीं मध्यस्ती करून सला करावा, ही बोलवा येथे यैकिली. लस्करांतून राजश्री हरिपंत बरवे व राजश्री बालंभट येथे बुणगियामध्यें होते ते वामोरीवरून पुणियास आले आहेत. येथे राजश्री वीरेश्वर दीक्षित सिवरात्रीकरिता गंगातीरी राहिले, तेहि आज उद्या येथून निघोन पुणियास येणार सर्व मजकूर लस्करचा निवेदन होईल. आम्ही येथे आपले पत्राची मार्गप्रतीक्षा करीत आहोत. आपली आज्ञा होती की तुम्ही बिडास तीनसे राऊत व पागा रा करून तुम्ही शंभर राउतानसीं नगराजवल राहाण. जसी आज्ञा करूं त्याप्रमाणें दौलताबादेस खजीना आहे तो तुम्ही येकत्र होऊन रा करणे तर करूं म्हणोन आज्ञा होती. त्यास बिडाकडील मजकूर कलावा म्हणोन बजिनस पत्रे खिजमतगाराबरोबर पाठविलीं त्याचे उतरहि आले नाही. डाकेबराबर पत्रे पाठविली त्याचेहि उतर आले नाहीं. इकडून बिडावरून लस्करचे सुमारे आवघे आम्ही मिलोन खजिना घेऊन गेलों तर मार्गी चिंता नाही. मुलूक सरकारचा व निंबालकराचा कलबर्गेपर्यंत मध्ये आहे म्हणोन विस्तारें विनंती लेहून पाठविली. सर्व अर्थ ध्यानास येऊन मर्जीस आले तरी आज्ञा पाठवावी. दौलताबादेस सरदार आहेत ते व आम्ही येकत्र होऊन जाऊ; अथवा आम्हासच आज्ञा पाठविली तरी आम्ही आपले सरंजामासुधा बिडावरून जाऊ. तेथे दोन चार मुकाम करून तेथीलहि कामाचा रंगराग पाहून कर्तव्य ते आज्ञेप्रा करून तेथून पुढें लष्करचे सुमारे जाऊ. अथवा बिडासच आम्हास राहून वसुलाचेंच काम करावे, यैसी मर्जी असली तरी सिदोजी भापकर व दारकोजी सुपेकर यांस पत्रे निक्षूण ताकीद पाठविल्यास हंगाम आहे तो यैवज वसूल करूं. अद्याप यैवज वसूल पंचवीस हजार रुा सिवाये जाहाला नाहीं. कागदींपत्री मात्र माार लिहितात. सर्व आर्थे त्याचे पत्रावरून ध्यानास आलाच असेल. कृपालु होऊन सत्वर आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. खर्चाकरितां पागेस चंदीस व दीडमाहीस व सिलेदारास रोजमरा नाही. फार गल्हाटा आहे. आज दीड महिना इकडेच गुंतोन राहिलों आहें. सर्व अभिमान स्वामीस आहे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Nago Ram writing from Paithan asks orders from Nana Fadnis whether the writer should proceed to Poona bringing with him the revenue he had collected so far or whether he should try and collect still more amount. He also wishes to know by which route the treasure should be sent. The strict and regular work of the administration now becomes fully visible under the all-pervading eye of the Peshwa.*

6650

No. 187] [14-3-1769

पौ छ ९ जिलकाद
तिसा सितैन

श्री

सेवेसी सुमेरसिंग कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ माहे जिलकाद मुाा दुरकिलगाव स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष. सेवक आज्ञेप्रमाणे राो रामचंद्र दामोदर व बर्गे याजबाा लस्करास जात होतो; तो राक्षसभुवनच्या मुकामी स्वामीचे आज्ञापत्र आले की माघारा फिरून दौलताबादेस जाणे; आणि खानमाा व तुम्ही मिळून येक जागा होऊन हुजूर लिहून पाठवणे. हुजुरून आज्ञा येईल तिकडे जाणे म्हणून. त्यास आज्ञेप्राा मौजे मजकुरी सुधा आलो. पुढे दौलताबादेस जाऊन मग स्वामीस विनंतीपत्र पाठऊ. वरकड सेवकाकडील वर्तमान राो गंगाधरपंत सेवसी निवेदन करतील. लोकास रमजानपासून रोजमरा पावला नाही. सांभाल करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sumersing says that as directed he would soon proceed to Daulatabad and join the Khan there. He asks for money for paying wages to his men.*

No. 188] [23-3-1769

पौ छ १८ जिलकाद
सुाा तिसा सितैन

श्री

सेवेसी आज्ञाधारक सुमेरसिंग मुकाम किले दौलताबाद साां नमस्कार विज्ञापना असीजे. येथील वर्तमाण ताा छ १४ जिलकाद पावेतो येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञेप्राा किलेमाारास आलो. त्यास खानमाा आम्ही येक जागा मिलालो. इतकियामधे स्वामीचे आज्ञापत्र आले की तुम्ही राो नारो शंकर याचाबाार जाणे, आज्ञेप्राा कूच करून त्याजबाार जातो. सेवेसी श्रुत होये. लोकाचे रोजमरियाकरिता राो तुकोपंत कारकून सेवसी तेथ आले आहेत. याजबाार आकार पाठविले ते प्रत्यास रवाणा करणार धणी समर्थ आहेत. आपण चाकरीस बेउजूर आहोत. सेवेसी श्रुत होये. बहुत ल्याहावयासी सेक्त नाही. हे विज्ञापना. विदनापन.

¶*Sumersing reports that he has joined the keeper of the Daulatabad fort and will soon proceed on a march with Naro Shanker as directed.*

6651

No. 189] [8-11-1769

पौ छ ८ रजब

सबैन:

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे शेवेशी

विनंति शेवक धोंडो राम कृतानेक सा नमस्कार विनंती. ता छ माहे जाखर मुा भागानगर स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींनी कृपावंत होऊन पत्र पाठविले ते पावोन संतोष जाहला. या प्रकारे निरंतर पत्र पाठऊन आपले कुशल लिहून सांभाल केला पा. स्वामीचे गावचा दुमोहरी परवाना करून पाठविला आहे. प्रविष्ट होईल. उत्तर पाठविले पा. राजकी वर्तमान तरी नवाब बाहीर निघावयाची तजविजेत आहेत. कारखान जातची तयारी होत आहे. कांही जाली आहे. सरदारांसहि पत्रे लौकर येण्याकरितां गेलीं आहेत. हैदरखानाकडून मेंहदीखान नवाबाकडे जाबसालास आला आहे. नवाबाचे सरकारची दोन सालची मामलत हैदरखानाकडे राहिली आहे; त्यास नवाब म्हणतात कीं कडपे, करनूल गदवाल येथील पैका घेतला आहे तो हैदरखानानी मावारी द्यावा म्हणजे, पुढे मामलतीचा जाबसाल होईल. त्यास मेंहदीखानाने हैदरखानास लिहून पाठविले आहे, त्याचे उतर येईल त्याप्रमाणे पुढे काये निश्चयांत येईल तें पाहावें. श्रीमंत स्वामी ज्याप्रो नवाबांस लिहितील त्याप्रो वर्तणूक करितील. आजपावेतों नवाब व रुकनुदौला श्रीमंतासी निष्टेनेच आहेत. नवाबानी स्वामीस गांव इनाम दिल्हा. स्वामींनी मजला कांहीं इनाम द्यावा, त्यास स्वामीचा इनाम इतकाच कीं आंत:करणपूर्वक ममता आहे. त्यांत आंतर नसावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram, Peshwa's agent at Haiderabad, writes about the military preparations started by the Nizam and says that he is in perfect accord with the Peshwa. The writer also reports the talk about the settlement of certain payments between the Nizam and Haider's agent.*

No. 190] [1769?

श्रीमार्तंड.

पुरवणी श्रीमंत रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. राजश्री आंताजीपंताविशई कितेक पत्री आज्ञा केली. त्यास त्याजला सर्व निवेदन केले. त्यानी आम्हापासी मान्य केले आहे जे माल मागन्हा

जाबसाल येक देठीस लागल्यावर तुमच्या मर्जीप्रमाणे वर्तणूक करू, यैसे उतर केले; आणि आपणास पत्र लिहिले आहे त्याजवरोन सर्व ध्यानास येईल. मौजे आंबे व जाब याचे ताकिदपत्राविशई आम्ही बहुत लागू आहो. ताकिदपत्र जालिया मागाहून लेहून पाठऊ. आपण मुछदीयास मात्र पत्रे लिहिली, परंतु श्रीमंतास पत्र येकहि बहुत दिवसात न आले यास्तव विनंती लिहिली आहे. त्यास श्रीमंत पंतप्रधान यांस पत्रे आधी लिहीत जावी, तेणेकडून तिकडील सर्व बातमी श्रीमंताच्या ध्यानास येईल आणि वर्तमान कचेपके कलत जाईल, तर श्रीमंत आदीकरोन सर्वांस पत्रे तपसीलवार लिहीत जावी. यानंतर बाजारी वर्तमान आज ऐकिले कीं, निजामआली याचा भाऊ मोगलआली पातशाहास जाऊन भेटला. पातशाहानी त्याचा गौर विशेष करोन त्याजबराबर मातबर फौज देऊन त्याजला दक्षणेच्या सुभ्याची वस्त्रे देऊन दक्षणेस रवाना केल आहेत. त्याजनिमित्य निजामआली पुण्यास याजला सामील करावयाबदल येणार आणि दुसरे महमदआली आर्काट सुभा याने फिरंगी मिलून फिरंगी आपण येकत्र होऊन हेदर नाइकाचा मुल्क घेतला. पुढे मजल दरमजल येतता. येणेकडूनहि निजामआलीस शह पोहचाला व आर्काट सुभ्याने यैसे केले, तो बलाविला. हेदर नाईक कमजोर जाला याजमुले श्रीमंत पंत प्रधान यासहि आसाह्य जाले आहे. ईश्वरे इछेने निजामआली येथे आल्यास पुढे काय मनसबा होईल आणि वर्तमान श्रवण होईल ते मागाहून लेहून पाठऊ. सध्या बाजारी वर्तमान शहरात चहूकडे जाले म्हणून स्वामीस लिहिले. कलावे. मामलत येथास्थित जाहाल्यावरी रा आंताजीपंत दादा येतील. रा त्र्यंबकराव नारायण आपल्या ममतेत बहुत आहेत. त्यासी आपल्या कल्याणाची इछा बहुत आहे. कलेल तैसे करून मामलत जाऊ न द्यावी. रा मोरो आपाजी बोकील व आनंदराव चिंतामण आपल्या पदरी आहेत त्याची सोय धंद्याची उतम प्रो केली पाहिजे. त्याचे घरचा संवसाराचा गळवांठा बहुत आहे येविशई विनंती उदास न करावी. आम्ही येथे खर्चास काय करावे? कर्ज मिलाले तेथवर घेतले, पुढे कोन्ही देत नाही. पुण्याची वस्ती पदार्थमात्र माहाग. आजीपावेतो संवसारसुधा दोन हजार रुा कर्ज घेऊन कालहरण केलें. नित्यकृत्यांचें संकट. आपणास कलावें हे विज्ञापना. रा हरिपंताचे खर्चाची तारांबल बहुत आहे, त्याची बेगमी करावी. हे विज्ञापना.

¶*The rumours about the assignment of the Suba of Deccan to Mir Moghal by the Emperor, the conquest of the Haidar's territory by Muhammad Ali of Arcot with the help of the English are reported to the Peshwa among other items of news.*

6653

No. 191] [18-4-1772

नकल

छ १६ मोहोरम तीन प्रहर.

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत
स्वामीचे सेवेसी

पोष्य विठल कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील वर्तमान तरी छ १३ मोहरम बितिंतीयास+ तोफा लागू जाहाल्या. सुरंग दरवाजियाखालें गेला. लोकांस भय प्राप्त जाहलें. राजश्री कृष्णराव किल्याखालें जाऊन लोकांस दहशत घातली व बोली लाविली कीं नवाब आज येतात. तुमचे जी(वि)-त्याची वाट पाहत नाहीं, आज तुम्ही कौल घेणें. जर आज कौल घेत नाहीं तर प्रातःकाळीं सुरंग उडवितों, ऐसी बोली केली, त्या दहशतीनें लोकांनीं कौल घेऊन उतरले. रात्रीस कृष्णराऊ याचे लष्करांत आले. आजी छ १४ मोहरमीं खडकेदावरी लोक आले. वस्तभाव उतरून दिल्ही. नवाब किल्ला पाहावयासी येणार आहेत म्हणून बोली आहे. पाहावें. मागाहून सविस्तर लिहून पुढील रागरंग पाहोन आपण वर्तणूक करून नवाबाचे कूच मुकाम सकाळीस सविस्तर कळेल. हे सविस्तर वर्तमान पुण्यास ताबडतोब ल्याहावें. बहुत काय लिहिणें हे विनंति. चैत्र वा। १ मंदवार दीड प्रहर दिवसास कागद रवाना केले. *

¶*Vithal Krishna reports to Ramchandrapant how the fortress of Bitinga was besieged and the garrison made to surrender.*

No. 192] [Received on 12-10-1772

पो छ १४ रजब अश्वीन वा। १
इंदुवार सुा सलास सबैन.

श्री

चिरंजीव राजश्री गोविंदपंत देवधर यासी रामचंद्र हरि देवधर आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष.

बसालतजंग याचा व सरकारचा तह जाहला आहे ते समई कवताल भनू व सिदनूर व रेवडी कुंदा हे च्यार

कर्णाटकचे माहाल गोविंद हरि यास सरंजामास दिल्हे त्या माहालची पेशजीची लक्ष्मण कोन्हेर याणी

+ जिल्हा नासिक. पहा पे. द. २५-७.

माहाल सोडून द्यावे आणि पावणे दोन लक्ष रुपये खंडणी घ्यावी या प्रमाणे त्यांजकडील वकील म्हणतात. त्यास सन सबा सितैनात अथवा सन समान-सितैनात स्वारीत तह जाहला आहे. त्यास कसकसा जाहला आहे तो लिहून काढावा व येविसी मोरोबा आबासहि पुसोन लिहून पा। कलम १

पावणे सा लक्ष सिबंदी कमकसर सरंजामास महाल दिल्हे, त्याची आहे म्हणोन गोविंद हरि याणी समजाविले, त्यावरून पासष्ट हजार रुो जाजती वरकड सरंजामीयापेक्षां नेमून देऊन कलम लिहून ठविले आहे कीं पावणे सा लक्षांत दप्तरी मागील रुजुवात पाहतां जाहले. तरी पासष्ट हजारात कमी करावे. त्यास पावणे सा लक्षाचा झाडा मोरोबा आबा याजकडून आणवावा व दप्तरी मागील हिसेब आहेत ते काढून सिबंदी काय खर्च आहे, त्याचा झाडा तपसीलवार आधी लेहून पा। त्याचे येथे काम जरूर लागले आहे सबब लौकर पा। कलम १

नगर व दवलताबाद येथील ताळेबंद आधी पा। द्यावे. अजमास दप्तरी लिहिले आहेत तेच पा.

जमाबंदीची बेरीज लिहून दिल्ही त्यास कमी अजमासें रुो मारनिलेनी समजाविले २९००००, पौ मजुरा दिल्हे रुो १४५००० एक लक्ष पंचेचाळीस हजार रुो मजुरा दिल्हे. त्यास दोन लक्ष नवद हजार रुो याचा झाडा कोणा महालास कसकसा तोटा आला तो मोरोबा आबा कडून आणऊन पा। देणे १

बसालतजंग याजपासून रास्ते पंचतीस हजार रुो खंडणी घेतात, त्यास बागलकोट वगैरे हिसेबी जमेस येतात की सरजामात करार करून दिल्हे आहेत हे समजले पाहिजे, यासकरितां पेशजी लिहिले आहे. त्यास पंचतीस हजार रुो बागलकोटच्या हिशेबी जमेस येतात किंवा सरंजामात करार करून दिल्हे आहेत त्याचा झाडा लिहून पा। १

श्री कालिका किले डबई यास नेमणूक सवातीनसे रुो आहेत त्यास हिसेबावरून तपसील लिहून पा। १

सोलापूर येथील अजमास केला आहे तोच पा। देणे

गोविंद हरि याचे तैनातजाबत्यावर कलमे लिहिली आहेत त्याचे फडशाची याद आम्ही आणिली होती,

तिची नकल पाा आहे त्यास त्या कल-
माचे फडशे जेथपर्यंत थाग लागेल
तेथपर्यंत लाऊन झाडा चांगला
निवडावा. गणेशपंत व विसाजीपंत
यास नेहमी काम सरंजामाचे सांगोन
झाडे तपसीलवार निवडवावे. दुसरे
काम त्यास न सांगावे.

बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

¶*Ramchandra Hari Deodhar writes to Govindpant Deodhar putting to him some queries and asking him to get them quickly cleared from one Moroba Aba. The queries pertain to the terms of agreement between Basalatjang and the Peshwa, and the Saranjam of Govind Hari. The paper reveals how strictly the administration was being carried on by the Peshwa almost to his last moment.*

6656

Index to Selection No. 38

Madhavrao Ballal and the Nizam

(Figures indicate the numbers of letters.)

A

A—*contd.*

B

C

D

E

G

G—*contd.*

H

I

J

K

K—*contd.*

M—*contd.*

M—*contd.*

M—*concld.*

N

N—*contd.*

N—*concld.*

P

R

R—*contd.*

R—*concld.*

S

S—*contd.*

T

U

V

Y

Z

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३९

माधवराव बल्लाळ,—राज्यकारभार

[किंमत—२ रुपये ११ आणे किंवा ४ शिलिंग ९ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 39.

PESHWA MADHAVRAO I—ADMINISTRATIVE PAPERS.

Of all the Peshwas, the historian of the Marathas has bestowed the highest eulogies upon Madhavrao I as an administrator, and has profusely extolled the Peshwa's strict, speedy and impartial justice, his upright character and his selfless devotion to duty. Grant Duff has only recorded what was a common sentiment among the Marathas of the day, and the papers brought together in this selection amply corroborate this verdict. The Peshwa's struggle with his uncle, his northern and southern campaigns, his dealings with the Bhonsles of Nagpur and the Nizam of Hyderabad have been already dealt with in separate selections. But documents which could not well be classified in any one of the above selections and which bear more or less an administrative character are now presented to the reader and will, it is hoped, be found of some historical interest. Indeed they hardly need a separate introduction. They show how minutely Madhavrao attended to all his duties as a ruler. Here he is seen ordering wells to be dug for supplying Poona with drinking water ; there he is found ordering remissions of revenue when crops had failed or when they had been damaged by the marching armies. He established mints on a contract system (No. 132) and gun-foundries and ammunition factories at Poona and other places (Nos. 108, 126), stopped Government clerks and officials from accepting bribes in the discharge of their duties (No. 80), and promptly punished misconduct in other directions (No. 135). Accidents, riots, disturbances of various kinds and irregularities of all sorts are found frequently and fully reported to head-quarters by his officials (No. 134).

Several letters from the pen of Haripant Phadke eloquently depict the stern character of the young and delicate Peshwa. Haripant and Nana Fadnis were his chief confidants ; the former advised on military matters when the Peshwa was conducting distant campaigns with Moroba Fadnis as his secretary, and the latter attended to the prompt disposal of administrative matters at Poona. Both of them appear to stand in great awe of their master, who was not slow in obtaining news even of their doings through his own confidential agents. In a typical letter Nana Fadnis says, " I do not know how and why complaints have reached the Peshwa against me. I am trying my utmost to execute his orders promptly and to satisfy him in all matters. I am surprised that he should entertain suspicions about me " (No. 64). On 16th October 1769, the Peshwa writes as follows to Trimbakrao Pethe : " Now that you are going to the Konkan, kindly pay a visit to Vijaydurg and find out if our navy at the place is in a fit condition or not. Let me know if the revenue officials in that part of the country are behaving properly and bring to my special notice those officials who are assiduous in looking after the interest of the ryots " (No. 115).

Shivaji's birth-place Shivner and other forts in the vicinity, which had long been in Mughal possession, appear to have been taken over by the Peshwa about the year 1747 from Mahamud Alamkhan, the Mughal commandant, not by sword but with gold (Nos. 52, 77, 87). Letter No. 138 mentions that King Sambhaji was captured by Aurangzeb's forces at Navdi near port Sangameshvar.

No. 1] [1761 ?

श्री

दादाजी पंडित गोसावी यांसी

श्रीमत्सकळगुणसंपन्न अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित दळवाई देवराज यांनीं स्वस्नेहानुसंप्रीतीई कार्यास लिहिलें विनियार्थ. उपरी. येथील कुशल जाणून आपले क्षेमाबा(हा?)स लिहीत असिलें पाहिजे. बनाजी माधवराऊ वकील रामराऊसहित पाठून दोनी महिने होऊं आले; अद्यापि जवाब सवाल करून पाठविले नाहीं. यैस जाहलिया श्नेहेभाव कैसा राहिले म्हणोन इत्यादि अभिप्रायकडून लिहिलें. लेखनावरून सकलहि विशद जाहले. यैसियासी प्रतिवारशिक सालावरी कैसाला+ संस्थानावरी आलिया निर्व्हा कैसा होईल? नवाब सलाबतजंग यानी भारी फौजानिसी पटणसमीप उतरले आहेत. याचा इत्यर्थ होताच बनाजी माधवराऊ वकील रामराऊ यासहि आपणांकडे पाठवीत असों. सांप्रत उभयतानी लिहिल्यावरून सकलहि विशद होईल. सदैव आपले कुशलासी लिहून पाठविले पाहिजे.

¶*Dalvai Devraj from Bangalore writes to Dada Saheb reporting the invasion by Salabatjang and requesting help.*

No. 2] [July 1761

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
महिपतराऊ बावा गोसांवी यासी

स्नेहपूर्वक भास्करराव दादाजी आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वक्षेम लिहिलें पाहिजे. विशेष बहुत दिवस पत्रागमनीं आपणांकडील वर्तमान न कळतां चित्त सापेक्ष; असें न होतां निरंतर पत्रप्रेषणीं परामर्ष घेत यावा. यानंतर श्रीमंत नानासाहेब यांणीं ज्येष्ट ६ वद्य षष्टी मंगळवारीं कैलासवास केल्याचें कळोन चित्तास परम दुख प्राप्त जाला तो पत्रीं लिंहितां न पुरवें., राज्यास छत्र होतें. कृत्येंहि तशींस केलीं. आतां त्याचें जागां श्रीमंत राजश्री दादासाहेब व श्रीमंत उभयेतां राऊ आहेत, त्यांहून विशेष करतील. आम्हांस जमावसहित येणेविशीं आज्ञापत्र आलें त्यावरून लोकांची समजाविशीं करीत असों. प्रस्तुत

\+ पीडा, संकट.

इकडे काटकांनीं शोखी[1] मांडिली आहे, अशास फौज आल्यानें बंदोबस्त येथास्थित राहतो. नाहीं तर लबाडीस प्रवर्तती. आम्ही श्रीमंतांचें पदरचे म्हणोन नवलगुंद वगैरें देसक क्षुल्लक बुद्धींत आहेत; तीर्थस्वरूप काकाहि तेथेंच आहेत. फौज आल्याविना कोणी हालखुद राहात नाहीं. राजश्री विसाजीपंत याच मार्गें गेले. तन्मुळें आम्हास शिबंदी वगैरें खर्च फार बसला. कसालेस सीमा न राहिली. येविशीचा कितेक अर्थ सांगून राजश्री गणेशपंत पाठविले आहेत; सर्वेहि आपणांस निवेदन करतील; तें अंतःकरणीं घेऊन तदनुरूप फडीं सर्व प्रकारें साहित्य पुरऊन आमची उभारणी हो ती करावी. बहुत काय लिहिणें? कृपा असावी हे विनंती.

¶*Bhaskar Rao Dadaji expresses his condolences at the death of Nanasaheb Peshwa and requests that his post be strengthened.*

No. 3] [*24-12-1761*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
गोविंद कल्याण दिा नारो शंकर गोसावी
यासीं

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा इसने सितैन मया व अलफ. तुम्ही विनंती पत्र पाठविले ते पावले. भेलश्याचे ठाणें भूपालवालियाणे घेतले, तेविसींचा अर्थ लिहिला व कितेक राजश्री नारो शंकर राजेबहादर याणी निवेदन केलें, त्याजवरून कललें. येशास पाा मारचा मामला मारनिलेस सांगितला असे. तर जमिदारास दिलासा देऊन पाा मजकुरचा बंदोबस्त करणे, आणि ठाणेंहि हस्तगत करणे. सिरोंजे आहिरवाडा याच्या सनदा पेशजी पाठविल्याच आहेत. तेथील बंदोबस्त उतम प्रकारे करणे. जाणीजे छ १६ माहे जमादिलावल.

¶*Madhavrao Ballal writes to Govind Kalyan asking him to recover the fort of Bhilsa from the Nawab of Bhopal.*

No. 4] [*10-1-1762*

श्री

नकल

राजेश्री विस्णु माहादेव कमाविसदार
पाा सुज्यालपूर गोसावी यासी

:॥ ७

अखंडितलक्षेमीअलंकंत राजमान्य श्री मल्हारजी होलकर व जनकोजी सिंदे दडवत सुा इसने सितैन मया व अलफ. श्रीमंतानी राजेश्री विस्वासराऊ

---

[1] गर्वाची वागणूक.

लक्ष्मण यास माळवे प्रांतीच्या बंदोबस्तास पाठविले आहे, तर यास तुम्हाकडून रुो ४०००० चाळीस हजार देविले असत, तरी सदरहू चाळीस हजार रुो पाा मार यैवजी मारनिलेस पावते करून कबज घेणे. पाा मारपैकी सरकारचे यैवजी मजुरी पडतील. जाणिजे. छ १४ जमादिलाखर बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶Malharji Holkar and Jankoji Sindia order Vishnu Mahadeo to give Rs. 40,000 to Vishwasrao Lakshman who was entrusted with the management of Malwa. Jankoji Sindia was not living at this time.

No. 5] *[February 1762*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाबूराव दीक्षित पटवर्धन स्वामी गोसावी
यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. पेशजी सन इसने सितैनात सरकारची मजमू तुम्हास सांगोन तुम्हापासून दोन लक्ष रुो नजर सरकारात घेतली; तो यैवज तुमचे कर्ज सरकारांतून देणे त्या यैवजी रद कर्जी लिहिले. त्यास हाली मजमू तुम्हाकडून दूर करून राा नारो नीलकंठ यास सांगितली. सबब नजर तुम्हापासून घेतली ते दोन लक्ष रुो तुमचे फिरोन द्यावे, याप्राो करार होऊन पेशजी रद कर्जी लिहिले ते दूर करून तुमचे कर्ज जमा सरकारात मिती माघ वद्य ११ येकादशी शके १६८३ वृषानाम संवत्सरे रुो २००००० दोन लक्ष कर्ज करार करून ठेविले असेत, यासी व्याज दर माहे दर सदे १ येकोत्रा सिरस्तेप्राो करार केले असे. जाले मुदतीचे व्याज व मुदल हिशेब करून देऊं.+

¶Madhavrao Ballal draws a loan of Rs. 2,00,000 from Baburao Dikshit Patwardhan and promises to return the amount with interest, at the rate of 12 per cent.

+ पत्र पुरें होणें आहे; कारण यापुढें ओढलेली एक कोरी रेघ आहे.

No. 6] **[21-5-1762**

पैवस्ती छ ६ जिलकाद इसने

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नागोपंत स्वामीचे सेवेसी

पो बालाजी जनार्दन सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २६ सवालपावेतों जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्हीं छ २७ रमजानचे व छ १ सवालची पत्रें पाठविलीं ती पावली. सुरतकर हाकीम व इंग्रेजाच्या बोलण्याचा मजकूर लिहिला; व सरकारच्या पत्रांत कलमबंदी लिहिली त्यांतील सारांष. शहरच्या कच्या वहिवाटीची दखलगिरी देऊन चौथाईचा आमल दिल्हा नाहीं. ज्याप्रो सालाबाद देत आलों त्याप्रो देऊं व बाकी गुदस्ताची देऊं. सनवाद[1] बाकी द्यावयास आनकूल पडत नाहीं म्हणतात म्हणून विस्तारें लिहिलें तें कललें. यैशास खुशकीचा बंदोबस्त जाहाला, असा जल-मार्गाचा बंदोबस्त करून सुरतेचा वारा बंद करून येथास्थित सर्व बंदोबस्त करावा; परंतु मसलत वाढते म्हणून सध्या करणे ठीक पडत नाही. यास्तव सुरतकराकडील भले माणूस सलुखास आले असतील त्याजवल सलूख करावा. पूर्वीपासून चालत आलें आहे त्याप्रों त्याणी पुढें सुरलीत चालावें; व गुदस्तांच्या बाकीचा फडशा करून घ्यावा. सनवाद बाकीचाहि संदर्भ लाऊन ठेवावा आणि ठासून दाब राखून विल्हेस लावावे येविसीं सरकारचेंहि पत्र तुम्हांस आहे; तरी सदरहू लिहिल्याप्रों विल्हेस लाऊन लेहून पाठवणें. सारांश दर्यातील बंदी होणे व बाहेरील इंग्रज कुमक करणार त्यास मातबर फौज व गाडदी असावे तेव्हां लांबणीवर पडतें, याकरता श्रीमंत कैलासवासी यांचे वेलेस सुरलीत अमल चालला त्याप्रों चालवावा. गुदस्तांची बाकी घ्यावी. मागील बाकीचाहि नाद लाऊन ठेवावा. पुढे सरकारचे कमाविसदारासी सुरलीत चालावे, याप्रो पके करून घेऊन सलूख करावा हेंच बरें. याच अन्वये श्रीमंताचेहि पत्र लस्करातून तुमचे नावें आणविलें तेहि पाठविले आहे. तुमची पत्रे आली ती अक्षरशाहा वाचून श्रीमंता-कडे पाठवीत गेलो. तेथून उतर यावयास दिसगत लागली यामुले येथून उतरें गेली नाहीं. आम्ही येक ल्याहावे, आणि तेथून आणीक सारखे उतर आलें तर ठीक नाही. याकरता तेथून उतर आणून पाठविले आहे. याउपर लौकर गुंता उरकावा. बहुत काय लिहिणे? लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Balaji Janardan gives instructions to Nagopant to settle amicably the right of collecting "Chauth" from Surat.*

---

[1] अनेक वर्षांची थकलेली.

No. 7] [29-5-1762 ?

पो छ १९ जिल्काद

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक वेकाजी माणकेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ ४ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. किले नांदगिरी जुन्या गडकरी यानी दंग्यानी घेऊन खूल केलें, यामुलें येथून राजश्री रामचंद्र दामोदर आंबीकर यांचें पथक व राजश्री राणोजी सिंदे यांचें पथक व आणिक पाच लोक व राजश्री लक्ष्मण कोनेर यांजकडील लोक किल्याखालीं पाठऊन मोर्चेबंदी करणें प्राप्त जालें, त्यास सिबंदीखर्च व साहित्य-सामान लागतें त्याचा खर्चवेंच भारीच पडतो, त्यास किल्यावर जुन्या लोकांत नारो जनार्दन आहे त्याणेच खुलांत सिरोन सिरोपस्थाईपण केलें, त्याचा भाऊ राजाराम जनार्दन फ़लटणास राजश्री मुधोजी नाईक निंबालकर याजवल आहे. फलटणची सेखदारी करितो. त्याचा कबिला व किल्यावरील हवालदार संकराजी पवार यांचा कबिला व गडकरी लोकांचे दाहा वीस कबिले नाइकाजवल आहेत, व जुने लोक किल्यावर चढले तेव्हां पंचवीस तीस माणूस नाईकाचेहि किल्यावर चढले आहे व रोजिना[1] कागदपत्र नाइकाचे किल्यावर खेलतच आहे. यावरून नाइकास येथून दोन च्यार वेल पत्रे सरकारचे नांवें लिहिलीं व कारकुनाबरोबर बोधयुक्त सांगोन पाठविलें कीं किलेकराचे कबिले तुम्हांजवल आहेत व राजाराम जनार्दन तुम्हांजवल आहे त्यास पाठऊन देणें. हें न केलें तर किल्यामुलें सिबंदी वगैरे बसल तो तुम्हांस द्यावा लागेल. कारण कीं तुमचें अंग या खुलांत आहे. याकरितां तुम्ही लांबलचक लागू न देतां किला खालीं करून देवावा हें चांगलें. तें न कराल तर राजाराम जनार्दन व किलेकरी याचे कबिले द्यावे म्हणोन, त्याजवरी त्यानी जाबसाल केले कीं आम्ही मराठे लोक, पोटचें देऊं, परंतु पाठचें देणार नाहीं. कबिले द्यावयाची गोष्ट घडत नाहीं. किला खालीं करून द्याव-याचा अर्थ तर राजश्री प्रधानपंताचे नांवाचीं पत्रें सातारियाहून येतात, परंतु खासा स्वारी कर्नाटक प्रांतें गेली. कारभारी साताराचे सरकारचे नावें पत्रें पाठवितात, परंतु किल्याचे लोकाचे जिवास धणी कोण होतो व आणिक त्यांचे मुदे आसतील ते कोण निभावतो, या गोष्टीस मातबर कोणी दरम्याने असावें, यैसे बोलिले, आणि त्याणीच सांगोन पाठविलें कीं आम्ही फलटणचे देशमुख व रामचंद्र

+ Of Satara. [1] रोजचे.

दामोदर सुपाचे देश्यपांडे, ते आम्ही सिवधडे आहों. ते या गोष्टीस दरम्याने येऊन निशा करीत असिले तर कबूल करूं. म्हणोन त्याजवरून येथून रामचंद्रपंत बाबा आंबीकर यास पत्र लिहून कारकून पाठविला व नाइकानीहि आपला कारकून पाठविला. त्याणी आम्ही गडकरी यांचे जिवास भये नाहीं ऐसें कबूल केलें. निमित्य कीं सिबंदी खर्च तुटावा, खूल मोडावें, याअर्थें कबूल केलें. परंतु नाईक त्यास मान्य न जाले. त्याणीच जो प्रकार काढिला तो आम्ही मान्य केला असतां तेच फिरले, तेव्हां थोरच आहेत. स्वामीस सर्व अर्थ विदित व्हावा यास्तव सेवेसीं विनंति लिहिली आहे. मुधोजी नाइकास पत्र व लढाइत गारदी पाठविल्यानें जरब बसेल. राजाराम जनार्दन व हवालदार याचे कबिले फलटणी आहेत ते हस्तगत जाहलियानें किला सहजांत येईल. निक्षूण मुधोजी नाइकास जरब बसविणार स्वामी समर्थ. तूर्त प्रतिनिधि किन्हईस छ २ जिलकादीं आलेत त्यांसहि पत्र निक्षूण प्रकारें जरबेचें आसावें म्हणजे फितूर तुटतील. त्वरेने ताकिदी व ढलाइत पाठवणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Venkaji Mankeshwar Potnis from Satara informs Raghunathrao Dada Saheb that the fort Nandgiri is resisting owing to the support it receives from Mudhoji Naik Nimbalkar. The writer advises chastisement of Mudhoji Naik (1748-1763).*

No. 8] *[10-12-1762?*

श्री

सेवेसीं विज्ञापना. राजश्री माहादाजी गोविंद यांजकडील झांसीचे मामलतीबाबत हिसेबाचें दप्तर असेल तें सरकारचें दप्तर जेथें पाठविलें असेल तेथें पाठवणें म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें मशारनिलेचे कारकुनास बोलाऊन आणून त्याणी रुमाल दिल्हे त्याप्रमाणें सरकारचें दप्तर सिहिगडास पाठविलें आहे, तेथें हे दप्तर ठेविलें असे. (फाटले) तपसिलवार (फाटले) (कार)कुनानी रुमाल दिल्हे त्याप्रमाणें (फाटले) घम ठेविले आहेत स्वामीस कळावें म्हणोन लिहिलें असे. रवाना छ २३ जमादिलवल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed that the Jhansi records have been sent to Sinhagad along with the Poona Daftar.*

No. 9] [*28-2-1762*

श्री

मा। अनाम देशमुख व देशपांडे पो। बागेवाडी सरकार विज्यापूर यासी माधवराव बलाळ प्रधान सुा। इसने सितैन मया व अलफ. पो। मजकुरचा अमल जागीर व मोकासा उदाजी चव्हाण याजकडे होता. सरकारात जफ्त करून राजश्री नागोराम यास जफ्ती सांगोन पाठविले आहे; तरी मारनिलेसी रूजू होऊन बाबती व सरदेशमुखी खो। करून बाकी दरोबस्त चव्हाणाकडील आमल सुरलीत देणे. जाणिजे छ ३ साबान आज्ञाप्रमाण.

¶*The Peshwa notifies to all Deshmukhs and Deshpandes of Bagewadi that the Jagir of Udaji Chavan has been confiscated and given into the hands of Nago Ram.*

No. 10] [*12-6-1762*

पौ। छ २२ जिल्काद.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक लक्ष्मण वेंकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १८ जिलकादपावेतों मुकाम मिरज येथें सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालों ते सातवे दिवशीं मिरजेस दाखल जाहालों. राजश्री गंगाधरराव याची भेटी घेऊन देशमुखीविशी सरकारचें पत्र होतें तें दिल्हें. त्यांणीं उतर केलें कीं राजश्री पांडुरंगराव यासी लष्करांत लेहून उत्तर आणितों. त्याप्रमाणें सांगू. तेव्हां देशमुखीचा बंदोबस्त केल्याशिवाय पुढें जातां नये, यास्तव मिरजेंत राहून आजितागाईत आलें वर्तमान

कलमें	बीतपशील
सरकारचीं ठाणीं घातलीं गावगंना १ कसबें बेडग आकार ६००० १ मौजे आरग ६००० १ कसबें मने राजोरी ६००० ३ येकूण तीन गावांचीं ठाणीं मातुश्री अनुबाईनीं बंदोबस्त केला असतां	राजश्री पांडुरंगराव याचें पत्र देशमुखीविशी आलें. तीन रोज जाहाले. राजश्री गंगाधररायांनीं मिरजेच्या बारा कर्यातीस चिठ्या दिल्ह्या. रुसुमे[१] इनामसेऱ्या वगैरे देशमुखीच्या वसुलास काम चालीस लाविल. कलम १

१ हक्क, कर, देशमुख देशपांडे यांचा वसुलांतील हिस्सा.

6663

सेवकानें गांवचा भेद करून ठाणीं घातलीं. माजी कमाविसदारांनीं जतीचें वर्तमान ऐकोन निकड करून निमे अधिकच वसूल घेतला. पळोन येऊन मिरजेंत व कांहीं आसपासच्या मिरजेच्या गांवांत बसले आहेत. सवाशें प्यादा ठेऊन तीन गांवच्या ठाण्यांचा बंदोबस्त सेवकानें केला आहे. वसूल चालीस लाविला. माजी कमाविसदार सालमजकुरचा पैका वसूल करून मिरजेंत बसले आहेत. गांवकरी यांचे रुजुवातीनें पैका त्यांचें आंगीं लागेल तो बेमुलाहिजा घेऊन लक्षुमण वेंकाजी याजकडे देणें म्हणोन येथील अधिकारी यासी सरकारचें पत्र लिहून पाहिजे. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. कलम १

राजश्री भास्कर हरि याजकडील मौजें शेडसाल गांवची जप्ती करणें म्हणोन आज्ञापत्र सादर जाहलें; गांव येथून तीन कोसावर आहे. आज्ञा येतांच गांवचा वसूल बंद केला. परंतु येथील अधिकारी म्हणतात कीं गांव आमच्या सरंजामांत आहे. लष्करांत राजश्री पांडुरंगराव यांस व हुजूर श्रीमंतांस विनंती लेहून उत्तर आणितों, तोंपर्यंत जप्ती न करणें. या गोष्टीस सेवकाचा उपाय काय? येक जाबसाल यावयासी तीन वार लागतात. आम्हांस क्ष(णां)क्षणां यांसी प्रयोजन लागतें. राजश्री शिवाजीपंत मिरजकर

नांदणी शिरढोण वगैरें आठदाहा गांवचीं सूत्रें आणोन ठाणीं घालावयाचें केलें होतें, तों मातुश्रीस वर्तमान कळोन आणखी च्यार पांचशें प्यादे पाठऊन गांवचा बंदोबस्त केला. गांवची तहशील निकडीनें करूं लागले, तेव्हा आम्ही राजश्री परशराम रामचंद्र यांसी सरकारच्या पत्राची नकल व हें वर्तमान लेहून पाठविलें. त्यांचें उत्तर आलें कीं देशमुखीचा बंदोबस्त चांगला करून लष्करास येणें, सरकारआज्ञे-प्रमाणें साहित्य करूं. त्यासी देश-मुखीचा वसूल चालीस लाविला, ठाणीं घातलीं; उदयीक निघोन लष्करास जातों. कलम १

मातुश्रींनीं राजश्री परशरामपंत यांजकडे सूत्र लाविलें आहे. काल दोन तोफा लाहनशा इचलकरंजीहून लष्करांत रवाना केल्या व आम्हांस पत्र आणिलें कीं तुम्ही गडबड न करणें. यावरून दाहा बारा गांव सूत्रें आणून ठाणीं घालावयाचीं केलीं, त्यांणीं बशा खाऊन गेले. मातुश्रीचें कौशल्य अगाध आहे, पत्रीं कोठवर ल्याहावें. ? सर्व विदितच आहे. कोल्हापूर शिंदाशीं घरोबा अत्यंत, हा काल पावेतों चालतो. मातुश्रीची भीडमर्यादा सर्वत्र सरदा-रांस; तेव्हां सरकारकार्य कैसें होतें? इचलकरंजी घेतल्याशिवाय तालुकि-याचा बंदोबस्त होत नाहीं, फितुर तुटत नाहीं. राजश्री परशरामपंत व

सेवेसी आहेत. येविशीची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. कलम १

बाबाजीपंत यांस लिहून ताकीद स्वदस्तुरची पाहिजे. कलम १

या प्रमाणें सेवकाचें वर्तमान सेवेसी विनंती लिहिली आहे. सविस्तर अर्थ श्रवण होऊन आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Lakshman Venkaji who was appointed Deshmukh to the Miraj District reports the action he took to recover revenue from various places in his district.

No. 11] *[18-10-1762*

पौ छ ७ राखर सन
सलास कार्तिक मास.

श्री

राजश्री शाहाजी भापकर
गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद सुा सलास सितैन मया अलफ. राजश्री जीवनराव केशव याणी पाा गाडापूर वगैरे माहाली बहुत उपद्रव माडला आहे म्हणौन विदित जाहाले. ऐशास तुम्ही व राजश्री सदासिव सखाराम मिलोन हजार बारासे स्वार आसोन, जीवनरायास तंबी पोहोचावीत नाही, अपूर्व आहे. तुम्ही मातबर सरदार हरतऱ्हेने कजाखी करून लुचे, लबाड सरकारच्या तालुकियास उपद्रव करितात हे गोष्टी तुम्हास उचित नसे. याउपरी तुम्ही [शिक्का] व सदाशिव सखाराम मिळून जीवनरावाचे पारपत्य खामखा करणे. याखेरीज राजश्री नारो बाबाजी हरयेक कामकाजाविसी सरकारच्या तुम्हास लिा पाठवींत जातील त्याप्रमाणें वर्तणूक करणे. जाणिजे, छ २९ रबिलोवल बहुत काये लिहिणे.

¶Shahaji Bhapkar is instructed by the Peshwa to chastise Jiwanrao Keshav for causing trouble in the Peshwa's territory.

No. 12] *[1762(?)*

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शास्त्रीबावा
स्वामींचे शेवेसी

विद्यार्थी अंताजी हरि कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील ताा आशाढ शुा १ पावेतो स्वामींचे आशीर्वादे मुा नागावे क्षेम असो विशेष. आपण

किल्यास आहेत हे वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री गोविंदपंत मामानी लिहिले त्यावरून संतोष जाहला. वरकड आमचे वृत्त आपणांस फडनिसानीं विदित केले आहे. आमची असामी हजुरून त्याजकडे होती. त्यास दुर्बुधी होऊन परराज्यांत गेले. आम्हाकडे तीन हजार फौज कारभार होता, त्याचे आमचे कटाक्ष फारच जाले, नंतर हजार लोक व आम्ही निघोन आलों. बाकी त्याजकडे होते तेहि दिलगीर होते. आम्ही आलेयावर ते कांही आले. आमचा संकेत श्रीमंताकडे जावें ऐसा होता, परंतु स्वारी लांब गेली, घोडीस दुखणे जाले. जर तर पंधरा दिवसी जावे तो यवन पुणेयास आला, आमचे लोक कबिले यांकडे गुंतले, चोहूंकडे बखाडा, मार्ग चालेना, यास्तव घरींच राहणे जालें. सिलेदाराची पत्रें आम्हास येतात कीं लवकर येणे. श्रीमंताकडे जाऊ. त्यास येज्यमान स्वामी कोठे आहेत, येणार किंवा छावणी हें तहकीक कांहीच कळत नाहीं. यास्तव सेवाचोर जालों. प्रसंगी नाही ऐसे जालें. पुढें प्रसंगी सर्व साहित्य करावयासी स्वामी समर्थ आहेत. मीहि सेवेसी आलेयावर सर्व कचे वर्तमान निवेदन करीन. सदासिव रामचंद्र यांनीं आमचा छळ फार केला तो पत्री कोठवर लेहूं ? संकट ईश्वरास आहे. स्वामिद्रोही याचें पारिपत्य करावयासी श्री समर्थ आहे सेवसी विज्ञाप्ति. फार ल्याहावयासी सामर्थ काय ? परंतु सूचना मात्र लिहिली आहे. सूज्ञाप्रति विशेष काय लिहिणे ? कृपा कीजे हे विनंती.[१]

¶*Antaji Hari in his letter to Ram Shastri explains why he remained absent from his duty, The campaign referred to in this letter appears to refer to the summer of 1763 when the Nizam invaded Poona.*

No. 13] . *[18-1-1763 ?*

पौ छ ४ रजब

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक राघो विठल व नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ रजब मुकाम नजीक किले मच्छिंद्रगड[+] जाणून स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आजी छ मजकुरी साईकालचे च्यार घटका दिवसास किले मजकुरावर निशाण चडविले. पंचवीस माणूस किलावरी चढविलें. किला स्वामीचे पुण्यप्रतापे फते जाहाला. किलावरी

---

१ या पत्रांतील मोहिमेचा उलगडा होणें जरूर आहे. + सातान्याजवळ.

6666

च्यार तोफा आहेत. वरकड सामान किलावरी असेल, त्याची चौकसी करून मागाहून सेवेसी लिहून पाठवितो. वरकड कितेक (सर) कामकाजाच्या च्यार गोष्टी बोलणे आहेत [एक ओळ फाटली.] विनंती लिहिली * * बंदोबस्त करून च्यार रोजाचे आवकाशें हुजूर यावयाची आज्ञा असावी. च्यार गोष्टी विदित करून सर्वेच आज्ञा घेऊन येऊं, विदित जाहालें पाहिजे. येथें खर्चावेचाची हैरानगी बहुत आहे. येंदा स्वामीनी बारगिरास औरंगाबाजेवरी येक रोजमरा दिल्हा होता त्या आलीकडेस कांहीं त्यास पावलें नाहीं. कराडास होतों तेव्हां पागेची चंदी व हस्तीचा रतीब चालत होता. तेथून आजी दाहा रोज मच्छिंद्रगडास आलियावर जाहाले. हजार पांचसे रुपये कर्ज काढून चाल केली; व सिलेदार यांसहि येक रोजमरा राजश्री सदाशिव रघुनाथ याजवरी दिल्हा होता, त्याजवरी सिलेदार यासहि रोजमरा नाहीं. याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे; तरी कृपाळु होऊन तूर्त दोन हजार रुपये खर्चास द्यावयाची आज्ञा करावी. राजश्री उधो जिवाजी निसबत राजश्री सदाशिव रघुनाथ हेहि जमावसुधां स्वामीसेवेसी वर मेहनत करितात. मशारनिले विदित करिता श्रुत होईल हे विज्ञापना.

¶*The surrender of the fort of Machhindragad is reported to Dadasaheb and a request is made to remit money to pay the arrears of the army.*

No. 14] [*19-1-1763* ?

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक राघो विठल व नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथलि कुशल तागाईत छ ४ रजब प्रातकाल मुकाम नजिक किल्ले मच्छिंद्रगड जाणोन स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. कालीं छ ३ रजबीं सायंकालचे च्यार घटका दिवसास किले मजकुरावर निषाण चढविलें. धण्याचें पुण्यप्रतापें किल्ला फते जाहला. स्वामीस विदित असावें याजकरितां लिहिलें आहे. बारगिरास नालबंदी व रोजमरा नाहीं. पेशर्जी येक रोजमरा बेगमी केली होती, त्या अलीकडेस पैसा पावला नाहीं, व शिलेदार यांचाहि तकादा बहुत याजबद्दल सेवेसी विनंती लिहिली आहे; तरी कृपा करून पागेचे लोकांस व चंदीची बेगमी व शिलेदार यांस (यासी) रोजमरेयाचे बेगमीस तूर्त दोन हजार रुपये देवावें म्हणजे पुढें आणखी कितेक कामकाज होईल. कराडाहून किले मजकुरास आलियानंतर हजार रुपये कर्जे घेऊन चाल केली आहे; तरी बेगमी करून पाठवणार आपण सर्वज्ञ आहेत. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ असो दीजे हें विज्ञापना.

¶*Ragho Vithal and Naro Ganesh report to Sakharam Bapu that the fort of Machhindragad is captured, probably from the Pratinidhi.*

No. 15] [28-1-1763

श्री

राऊ. नाना. भाऊ. दादा. राऊ.

करीना त्रिंबकराव व तुकोराम शितोळे याचा लेहून देणें म्हणून आज्ञा जाली त्यास परगणे राजदेहर व मेहुणबारे व नेर व देशी ता। निवोज यैसा सरंजाम श्रीमंत राजश्री साईहेब कैलासवासी यानी आठावीस खासे शितोळे यांस सरंजाम देऊन त्याची सनद आमचे तीर्थरूप राजश्री राहूजीबावा शितोले यांचें नावें दिल्ही होती आणि आठाविसांनीं येथाविभागें वांटणीप्रमाणें खात होते. मग येके ठायीं आठाविसाचे चालेना. मग विसा खासीयाची बोली यादीच करून ठेविलें. राजदेहर मेहुणबारें * * * * * * नावें पत्र केलें कीं * * * * * हुजूर चाकरी करावयास पाठऊन देणे. मग देउजीबावानी साहेबास पत्र लिहिलें कीं माझी सारी सरदारी त्रिंबकराव करितात. त्यामध्यें आज्ञा होईल तर पाठऊन देऊं. मागती फिरोन सरकारचें पत्र आलें त्यावरून हुजूर आलों. ते समयीं आज्ञा केली कीं तुमचा विभाग सरंजामांत आहे. तो तुमचा तुम्हास देतों, चाकरी हुजूरच करणें. जे दिवशीं आलों ते दिवशीं दीडशें रुपये व तीनसें आख खर्चास पाठऊन दिल्हे. बारा जण खासे होते त्यानी काये करावे म्हणून विनंती केली तेव्हां सा हजार रुपये बोली केली आणि आज्ञा केली कीं तुमचा सरंजामहि तुम्हास देतों. तूर्त मोगलाची लढाई आहे, पुढें सनद करून देऊं. पुढें मोगल सर जालियावर श्रीमंत राजश्री साहेब हिंदुस्थानास चालले. आम्हासहि बरोबर नेमलें. जेव्हां सरंजामाची विनंती केली तेव्हां भाऊसाहेबास सांगितलें कीं याची सनद करून देणें. त्यास तिकडे तों गत त्या प्रकारची जाली. देशीं आलियावर तुकाराम शितोळे यानी साहेबास विनंती केली तेव्हा श्रीमंत राजश्री राऊ याचे हातीं तुकोरामास दिल्हें कीं याच्या सरंजामाची सनद यास करून देणें. मग सन इसनेमध्यें मोगलाचे लढाईत पैठणच्या तलावर श्रीमंत राजश्री साहेब यानी परगणे मजकुरची जप्ती केली आणि नारायेणजी शितोळे यास घरींहून बोलाऊन आणून आज्ञा केली कीं त्रिंबकराव शितोळे याचा विभाग सरंजामांत आहे तो याचा यास द्यावा लागतो. तें समयीं नारायणजीनें सरकारांत कागद लेहून दिल्हे जे याचा सरंजामांत वांटा आहेच. खावंद वांटून देतील त्यास आपण राजी आसों. यैसा कागद लिहून दिल्हा आणि ते घरास गेले. मग श्रीमंत राजश्री कर्णाटकांत चालले, तेथें आम्हास निमेपैकी निमेची सनद करून दिल्ही. नारायेणजीची कांही सनद जालीच नाहीं. त्यानी परगणियात जाऊन बंदोबस्त वसूल घेतला. आम्हास पैसा पावला नाहीं. मग बाकी राहिली होती त्याचें रोखेंपत्र करून

निमेच्या वांटियाप्रमाणें समजलों. शंभर रुपये पदरचे देऊन पुढें चाकरीस पाठविलें. नारायेणजी शितोळे श्रीमंत राजश्री साहेबाकडे चाकरीस आले. आम्ही श्रीमंत राजश्री राऊसाहेबाकडे चाकरीस गेलों, ते समयीं आगोधर माहालची जफ्ती जाली. मागून नारयणजी शितोळे चाकरीस आले. त्यानी आमचा व आपला वांटा याची दरोबस्त सनद करून घेतली व सुभानराव शितोळे यानी चौवांचा सरंजाम याची सनद आपलें नांवे करून घेतली, हे कोणत्या दाखल्यानें घेतली हें पुसावें. पुढें उभयेतां श्रीमंत येके ठायीं जालीयावर सरंजामाच्या सोडचिठ्या मागाव्या तों हा लढा येऊन पडला. त्यास माझा विभाग पूर्वीपासून चालला याचा दाखला गुजरला तर दरोबस्त सरंजाम म्यां खावा. निमेच्या वाटियांत च्यार खासे आहेत तैसे याचे च्यार खांसे कोणते तें पुसोन चौकशी करावी आणि विल्हे लाऊन द्यावें हें विज्ञापना. सूर सन सलास छ १ जमादिलाखर पुस मास दरजागा लष्कर.

श्री

पुरवणी जबानी त्रिंबकराव सितोळे व तुकोराम याची विनंती कीं पूर्वीपासून तुमचा सरंजामाची वाटणी कैसी आहे म्हणून लेहून देणें, येविशी आज्ञा केली त्यास पूर्वी सरंजाम आठावीस खासे शितोळे यास जिल्हा होता, त्याची सनद आमचे तीर्थरूप राजश्री राहूजी सितोळे याचें नावें होती. त्या आलीकडे निजामनमुलकाची लढाई जाली ते वरषीं विसा खाशींयानीं रोजगार वेगळा करून घेतला, आठ जण खासे मात्र राहिले. त्यास परगणे राजदेहर व मेहूणबारे येथील सरंजाम करार करून दिल्हा, त्याची नावनिशी निमें मंबाजी शितोळे याचे पुत्र चौघे निमेचे वाटणींत

१ जिवाजी शितोळे
१ भगवंतराव शितोळे
१ पिराजी शितोळे
१ गणोजी शितोळे
—
४

२ संभाजी शितोळे याचे पुत्र
१ तुळाजी शितोळे
१ माधवराव शितोळे
—
२

२ राहुजीबावा शितोळे याचे पुत्र
१ जैसिंगराव शितोळे
१ मानाजी शितोळे
—
२

४

6669

येकूण आठावीसामार्गें या आठानी चाकरी केली आणि यासच सरंजाम करार करून दिल्हा; त्यावर काहीं दिवस चाललें. मग पुढें तुळाजीबावाची मातबरी पडली; आम्हास सुद्धां वांटा देईनात. मग आपण पोट भरावयास बाहेर गेलों. राजश्री देउजी ताकपीर याजपाशीं होतों. त्याउपर सन सितैनामध्यें श्रीमंत राजश्री नानासाहेब यांनीं बोलाऊन आणून आपल्या सरंजामाचा हिसा आपल्यास द्यावासा केला; ते समयीं कांहीं सनद जाली नाहीं. त्याआलीकडे सन इसनेमध्यें श्रीमंत राजश्री रावसाहेब यांनीं निमेपैकी निमेची सनद करून दिधली. याप्रमाणें आमचें वर्तमान आहे. हे विज्ञापना. छ १३ रजब माघमास सूर सन सलास सितैन मया व आलफ.

¶*Statement of Trimbakrao and Tukaram Shitole explaining how they came to enjoy the Saranjam assigned to the whole family of 28 members.*

No. 16] [*30-9-1763*

श्रीगणपति

मो अनाम देशमुख व देशपांडे पा। यादवाड यासी परशराम रामचंद्र सु॥ आर्बा सितैन मयां व अलफ. साल मजकुरी श्रीमंतानी राजश्री गोपाळराव गणेश बरवे यांजकडून पा। मजकुरचा अमल दूर करून आम्हांकडे फौजेच्या सरंजामास दिल्हा आहे; तरी राजश्री गणेश कृष्ण पाठविले आहेत, यासी रुजू होऊन पा। मजकूर वसूल सुरळीत देणे. जाणीजे छ २२ माहे रोवल.

¶*The Pargana of Yadwad was transferred to Parasharam Ramchandra Patwardhan from Gopalrao Ganesh Barve by the Peshwa. The ryots are ordered to pay the revenue to the former.*

No. 17] [*31-10-1763*

श्री

दमाजी गायकवाड याचे नावे सनद कीं त्रिंबकराव दाभाडे मोगलाईत गेले. याजकरितां त्याची वतनें देशमुखी व सरदेशमुखी व पाटीलकी व सरपाटीलकी व इनाम गाव वगैरे होते त्यांची जप्ती केली होती. त्यास त्याची सेनाखासखेली तुम्हास सांगितली सबब वतनाची जप्ती मोकली करून तुमचे तसलमातीस सरकारातून दिल्ही असे; तरी दाभाड्याकडील देशमखी व सरदेशमखी व पाटीलकी

व सरपाटीलकी व इनाम गाव वगैरे सुदामत प्रमाणें तुम्ही आपले निसबतीस करून घेऊन सदरहूचा अमल करणे म्हणोन सनद. छ २३ राखर सा आर्बा सितैन मया व अलफ.

¶*Trimbakrao Dabhade went over to the Nizam; hence his office of "Senakhaskel" and the villages held so long in possession by him were taken away from him for the breach of loyalty and made over to Damaji Gaikwad. This paper contains the deed of transfer.*

No. 18] [*24-11-1763 ?*

श्री

राजश्री सखारामपंत बापू
गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो दमाजी गायेकवाड समसेर-बाहादर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. मौजे अहीर बाबूलगांव पा मोहूल येथें इनाम मुकासा व बाबती, घासदाणा व हुजूर चौथाई हरि नारायेणबावा यांस कैलासवासी माहाराज यांणी दिल्ही आहे त्यापासून चालत आहे. हरि नारायणबावा यांचे पुत्र राजश्री शामराज व त्यांचे बंधु सखोपंत हे उभयता आजपर्यंत येथाविभागें अनभवीत आले. सांप्रत ते प्रगणे राजश्री नरसिंगराव उधव याजकडे जाहाले. त्यांजकडील कमाविसदार मौजे मजकुरी आहे. त्यांसी व सखो नरहरि यांसी विरुध जाहाले. यास्तव मारनुले यांणी गांवातून मुले माणसे बाहीर काढ़लीं. यैसियासी यांचे पुरातन चालत आले आहे. पूर्वी सरकारातून राजश्री गोपालराव यांणीहि पूर्ववत प्रमाणे सोला वर्षे चालविले. त्यास सांप्रत कलह प्राप्त होऊन अडथला जाहाला. याकरितां श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांणी राजश्री नरसिंगराव उधव यांस ताकीदपत्र येविसीं दिल्हे आहे व मानुलेचे पुत्र आम्हांकडे चाकरीस आहेत. यामुळें त्यांचे सर्व प्रकारें अगत्य जाणून आपणास विस्तारे वृत लेखन केले असे. तरी पुरातन चालत आले आहे त्याप्रमाणें आपण त्यांचे ठाई कृपा करून येथास्थित चाले तो अर्थ करावा. येविसी विशेष लिहावे यैसे काये आहे? ब्राह्मणाच्या धर्मकार्यास आपणाकडून अंतर होणार नाही, परंतु आम्हासहि त्याचे आवश्यक यास्तव लिहिले असे. राजश्री नरसिंगराव यास स्वमुखे सांगोन ब्राह्मणाचे कार्य करून देविले पाहिजे. रा छ १६ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणें लोभ आसो द्यावा हे विनंती.

¶*Damaji Gaikwad reports to Sakharam Bapu the differences over the possession of an inam granted to Hari Narayanbowa and requests him to restore it to the original donee.*

No. 19] [14-12-1763

पौ छ १६ जाखर आव
मार्गशिर्ष मुा पुणे

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक माधवराव विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ८ जाखरपरियेत स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. मी भेटीस यावें म्हणून माझे पत्री मजला आज्ञा केली. त्यास येविसी स्वामीनी तीर्थरूपास लिहिणे त्या प्रकारें ल्याहावें. त्यांचे विचारे सेवकाचे स्वरूपाप्रा स्वामी कृपा करतील. कितेक कामेकाजे आहेत, तीं लढा न पडता कृपा करून चालत आल्याप्राा सोये करून देऊन चालवितील तर मग तेहि मजला स्वामीचे दर्शनास जा म्हणतील. सेवक लोकांस स्वामीचे कृपेपेक्षा कोणती गोष्ट अधिकोतर आहे यैसे नाही. परंतु आल्यासारखे येथास्थित होऊन आल्यास उभयेपक्षीहि लोकिक उतम दिसेल. यास्तव पत्राचे उतर पाा असे. कृपा करून लिहिणें ते तीर्थरूपास ल्याहावें. सेवकास यावयास उसीर आहे यैसे नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Madhavrao Pethe requests the Peshwa to effect a division of his Jahagir with the consent of his elder brother Trimbakrao.*

No. 20] [28-11-1763 ? or 23-11-1764

श्रीगणराज

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
मोरोबा दादा स्वामीचे शेवेसीं

पोष्य गोपालराव गोविंद कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २२ जावल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. नवाब बसालतजंग याजकडून राजश्री नारो दादाजी श्रीमंतास पत्रे व वस्त्रें घेऊन आले आहेत. याचे सर्वविसीं आपण साहित्य करावे. हे नूतन आले आहेत. दरबारी माहीत नाहीत. हे आमचे पदरीचे आहेत, यास्तव आपणास लिहिले आहे. बहुत काये लिहिणें? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Gopalrao Govind requests Moroba Dada to look after Naro Dadaji who had come with dresses for the Peshwa from Basalatjang.*

lo. 21] *[28-1-1764*

पौ छ २७ साबान
माघ मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसांवी यासी

पेाा माधवराव बलाल प्रधान नमस्कार. विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. पोरी पावलकर दिाा आलीबाहादर याच्या घराकडे बापूजी कारकून दिाा गाडदी हे नवें घर बांधतात. त्याचे मोरीचे पाणी येते म्हणोन विदित जाले, त्यावरून तुम्हास हे पत्र सादर केले असे. तरी तुम्ही येविसीची चौकसी करून कारकून माार याचे घराचे मोरीचे व चांदईचे पाणी येत असेल्यास मना करणे आणि कटकट करू न देणे. जाणीजे. छ २४ रजब सुाा आर्बा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Nana Fadnis to inquire into and redress a petty grievance to which some females in the service of Ali Bahadar were subjected.*

No. 22] *[10-2-1764*

पौ छ २३ साबान सन अर्बा
माघ

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाळाजी जनार्दन स्वामी गो

पेाा रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. मौजे सिनोली ताा घोडे हा गाव राजश्री कुकाजी सिवराम यास तैनातेत साल गुदस्तां दरोबस्त दिल्हा आहे. त्यास साल मजकुरी सरकारातून तमाम कुरणाची चौकशी करविली. त्यात माारनिलेचे कुरण मौजे मजकुरी आहे. त्यासहि सरकारचे कारकुनाने अटकाव केला आहे. ऐशास गांवच याजकडे दिल्हा. तेव्हां कुरण सहजेच याजकडे जाहाले. याजकरितां हे पत्र लिहिले असे, तरी मौजे मजकूरचे कुरण माारनिलेकडे चालवणे. सरकारचा कारकून कोण्ही गेला असेल त्यास ताकीद करून अडथळा करूं न देणे, व

कुरणात झाडे आहेत त्यासहि अडथळा न करीत ते करणे; जाणीजे छ ७ साबान सुा आर्बा सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunath Bajirao writes to Balaji Janardan that Kukaji Shivaram is legitimately entitled to enjoy the use of the pasture in a village which has been granted to him, and instructs him that Government officers should not interfere with his rights.*

No. 23] *[13-3-1764*

छ १२ रमजान

श्री

यादी श्रीमंत राजश्री दादासाहेबाची पत्रे येणेप्रमाणे घ्यावीं.

१ भडोचकर मोगल दरसाल चौदा हजार रुपये घेतो. त्यास गुदस्ता लक्ष्मुमण नारायेण कमाविसदार ना वाकफ, निमित्य त्यानी चौदाचे येकवीस हजार मोगलाने जबरदस्तीनें राज्याच्या जबरदस्तीमुळें घेतले. सबब सालमजकुरी येकवीस मागतो, ते न मागे. आजी चौदा हजार रुपये प्रा जंबुसरचे घे यैसे पत्र दमाजी गायेकवाड सेनाखासखेल यासी ताकीदपत्र की फिरून कमाविसदाराचा बोभाट नये. मोगलास ताकीद करीत की ज्यास्त घेतल्याने पारपत्य होईल यैसे पत्र.

१ येक पत्र मोगलास की चौदा सिवाये घेतल्याने पारपत्य होऊन येईल यैसे ताकीदपत्र भडोचकरास.

दरहूप्रो पत्र देणे.

१ गुमेठेकर गिरासे यानी गुदस्तांपासून नवी कानू बसविली आहे कीं दोन हजार रुपये गिरास प्रा जंबुसरी घ्यावा. त्यास सालगुदस्तां गडबडीमुळे त्यानी घेतले ते माघारें देणे. पुढे प्रा मजकुरी उपद्रव लागल्याने मलाडजा होणार नाहीं. यैसे पत्र गुमेठेकरास.

सदरहूप्रो पत्र देणे.

आपाजी गणेश याजकडे मामलत होती. त्याचे कालकीर्दीत तह जाला असेल, त्याप्रो यैवज घेत जाणे. जाजती उपद्रव दिल्यास कार्यास येणार नाही, म्हणून पत्र देणे. छ ९ रमजान आर्बा सितैन.

¶*Memo. of three letters to be despatched under the signature of Dada Saheb (1) to the Mughal officer of Broach prohibiting him against undue exaction, (2) a similar letter to Damaji Gaikwad and (3) a letter to the Girasia Thakur of Gumetha.*

No. 24] [17-3-1764

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री हरिपंत तात्या स्वामीचे
सेवेसी

पोा बाजी गोविंद कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील वर्तमान छ १३ रमजानपावेतो मुाा चावडस वर्तमान येथास्तित असे विशेष. आपण छ १९ साबानचे पत्र पाठविले ते छ २७ साबानी पावले. लिहिले वर्तमान कलले. यैसेच हरघडी पत्र पाठऊन आपणाकडील व दरबारचे वर्तमान लिहीत जावे. पांढरे दगडाविसी लिहिले त्यास येविसी श्रीमंतास दोन तीन वेला विनंती केली. देण्याविसी मर्जी फारच नाजूक जाहाली आहे. फिरोनही विनंती करितो. दिल्हास मागोन घेतो. वरकड इकडील बारीक मोठे वर्तमान श्रीमंत दादा फडणिसाचे पत्री लिहिले आहे त्यावरून सविस्तर कलेल. सारांश मल्हारबाचे मानस यास हिंदुस्तानात न्यावयाचे. यांचे विचारे, पंधरा लक्ष रुपये दाहाबारा हजार फौजेचे सरंजामास पाहिजेत, त्याची तर्तूद मल्हारबानी करून दिल्हास जावे, नाही तर तूर्त च्यार महिने आधान सिध चैत्र मासी करून गंगास्नान करावे. बाजद बरसाद * * * ते करावे. होलकराचा मजकूर मागील फडशा होणे, त्यास कर्जपटी व दीड लक्ष पाणिपतचे माफ करून नेहसीचा यैवज सात साडेसात निघतील, ते हे हिंदुस्तानात जात असतील तर द्यावे ; नाही तर काहीच देऊ नये यैसे मानस आहे. ठरेल ते खरे. मोगलास दाहा लक्षाची, मुरादखान पनासाची याप्रेाा जाहागीर दिल्ही. आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. मल्हारबा दाहा लक्ष, तूर्त चैत्र अखेरपावेतो तीन दरमाहा येकप्रमाणे याप्रमाणे व वैजापूर रावेर चवथाईचे यैवजी याप्रमाणे देत होते. याचे मनातून जाण्याचेच नाही, तेव्हा लटकीच खरगोणची अड घालून राहिले. कर्नाटक प्रांती चलावे येविसी राजश्री आबा पुरंधरे याणी आग्रह फारच केला, परंतु पहिलेसे काही चितात आले होते. हालीचे पत्रावरून तेहि रा * * *. गंगेचा वियोग करून कोठेहि जात नाही. कलावे, बहुत काये लिहिणे ; कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Baji Govind writes to Haripant Phadke that Malharao Holkar is prejudiced against the Peshwa and hence evades taking his forces into the Karnatak.*

6675

No. 25] [2-4-1764

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. राजश्री बालाजी गोविंद याजकडील मामलत प्रां बुंदेलखंड वगैरे माहाल येथील देण्याच्या यादी तुम्हाकडे पाठविल्या आहेत. त्या पाहून सनदा लिहून देणे व पत्रें लागतील ती देणे. पेस्तर साल सन खमसचे ऐवजी तूर्त ऐवज मारनिलेकडे करार :—

१००००० वैशाख वद्य प्रतिपदा
१००००० जेष्ट वद्य प्रतिपदा

२०००००

येणेप्रो दोन लक्ष रुपये सदरहू मुदतीप्रो ऐवज घ्यावयाचा करार केला असे; तरी पुण्यात भरणा करून घेणे. सदरहूपैकी लस्करांत उंटे खो केली त्याची वरात रुपये १४०२९ चवदा हजार पंचवीस रुा जाली आहे. तो ऐवज जेष्ट मासचे हसियात मजुरा देऊन बाकी ऐवजाचा भरणा करून घेणे. रा छ २९ रमजान सुहुर सन आर्बा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa orders Balaji Janardan to execute proper deeds of contract with Balaji Govind for the management of Bundelkhand which was entrusted to him.*

No. 26] [15-4-1764

पौ छ २३ रमजान सन
आर्बा.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. सरकारचे वाड्याचे भोवती घरे आहेत त्यात इमारत कोणी बांधूं नये असा करार जाला होता, त्यास कोणी छपरे घातली, कोणी कोनी इमारत केली. वतनदार चार आहेत त्यास कसब्यात जागा नेमून देणे म्हणून आज्ञा होती. त्यास ते लांब जागा घेत नाही. कसब्यांत फार करून वतनदार आहेत. सदासिव रामचंद्र, त्रिंबकराव दीक्षित, हरि दामोदर, गणबा सेणवी, नारो बाबाजी यांच्या घराचे जागे आहेत हे दिल्यास तेथे जाऊन राहू, नाही तर आम्ही जात नाही

असे म्हणतात, म्हणून लिा ते कळलें व घराची यादी नावनिसीवार पाठविली ती पावली. अनगळ साखरे कानडे सावकार आहेत व अयाचित अग्निहोत्री वगैरे आहेत यांस जागा नेमून दिल्ही पाहिजे, घरे भोवताली आहेत. ती अगदी पाडून साफ करावी किंवा आहेत तसी असूं द्यावी ते आज्ञा करावी म्हणून लिहिले ते कळले. ऐशास प्रस्तुत जे आपल्या ठिकाणी छपरे घाळून राहातील त्यास राहू द्यावे. ज्याणी थोडी बहुत घरें बांधिली आहेत तीहि तूर्त असूं द्यावी. नवी मातबर इमारत मात्र कोणी करू नये. पुढे खासा स्वारी पुण्यास आलियावर जे आज्ञा करणे ते केली जाईल. रा छ ११ रमजान सुरू सन आर्बा सितैन मया व अलफ. खपरेलहि कोणी नच करावे केवळ छपर मात्र घाळून राहील त्यासच राहू द्यावें. * रा छ ११ रमजान बहुत काये लिहिणे हे विनंति

¶*Orders are issued to Nana Fadnis by the Peshwa regarding the structures to be erected round about the Peshwa's palace.*

No. 27] [*16-4-1764*

पौ छ २९ शवाल
सन आर्बा

श्री

सेवेसी बालाजी जनार्दन सा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ १४ सवालपर्यंत येथास्थित असे विशेष. राजश्री दमाजी गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादर याजकडे * * चा यैवज येणे; त्यापैकी राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यास रुपये दोन लक्ष व बसालतजंग यास येक लक्ष येकून तीन लाख रुपये सरकारातून देविले होते. त्यास संदरहु रुपयास दरम्यान राजश्री मल्हारजी होलकर राहिले होते. ऐशास तीन लाखापैकी येकूण नवद हजार रुपये पावले. बाकी दोन लाख अकरा हजार रुपये राहिले ते हाली सरकारातून गैरांदा+ करून गाईकवाडावर वराता जाहल्या. त्याचे वसुलास रा कृष्णाजी नाईक कडू रवाना जाहाले. ते स्वामीकडे येऊन हा सविस्तर अज * * * * दन करून पुढे गेले असतील. हाली * * स्वामीनी ऐवज करार केला आहे, त्यात * चित हा यैवज लाऊन देतील तरी हा यैवज सरकारचाच आहे. यास्तव सेवेसी विनंती लिहिली आहे. * शेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Janardan explains to the Peshwa, the account of dues to be exacted from Damaji Gaikwad.*

+ तगादा.

6677

No. 28] [1-5-1764

श्री

आसीर्वाद उपरी राजश्री दामोदर माहादेव याजकडे अंतरवेदीच्या माहालचा अजमास सन सलासपर्यंत समाईक रुपये ५१५९६९॥ पाचलक्ष पंधराहजार नवसे साडे येकुणाहतर दुवलपैकी सरकारचे वाटणीचा येवज तिजाई * * * * (१७१)९८९॥।= येक लक्ष येकाहातर हजार नवसे पावणेनवद चवल येणे आहे. त्यास हुजरून काही या यैवजावर वरात जाली नाही. राजश्री मल्हारबानी येवज घेतला असेल तो मनास आणून त्याप्रमाणें हिसेबी येवज होईल तो वाटणी बा वजा घालून बाकी येवज राहील त्याजवर सावकाराच्या वराता करावया लागतात तरी बाकी लिहून पाठवणे. (गंगाध)र पंत तेथेच आहेत. सन आर्बांची रसद रुपये ६०००० करार करून बालाजी सामराज याजपासून येथे घेतली असे. रा छ २९ सवाल, बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*The Peshwa orders Damodar Mahadeo, the revenue officer of the province of Doab, to submit the account of receipts of the province under his management.*

No. 29] [13-6-1764?

श्री

श्रीमद्भगवद्भजनावाप्तानेकवैभवेषु
अस्मदिष्टतमश्रीश्रीश्रीमत्बाबूरावजी
फडनीस बंधुवर्येषु

पोष्य विनायकभट कृतानेकासिष: समुलसंतु विनंती उपरी. येथील कुशल जेष्ठ शुध पौर्णिमापर्यंत मुा काल्पी समस्त सुखरूप असों विशेष. सैन्यात यावे तर मार्ग सुगम नाही यास्तव न आलों. इकडे येऊन रहावयाचे प्रयोजन प्रयागवल उभयता सिवप्रसाद यांणी कासीकर सितारामभटापासून पसतीससे रुपयांची खते लिहून घेतली. ती ती माघारी आणून द्यावी अगर रुपये भटजीस द्यावे याप्रो होते. आपणास विस्तारे लिहिलेच होते. प्रस्तुत रा हरि उमाजी वकील प्रयागास वैशाख शुध तृतीयेस आले होते. इतकियांत श्रीमंत राजश्री तात्या व दादा यांची पत्रें सार्वभौमास खताविषयीं आलीं त्यांजवरून सार्वभौमानी मुनीरतदौले यास आज्ञा केली. त्याणी प्रयागवलास शासन करून खते माघारी घेऊन सैन्यांत आपल्ये तात्या व दादा याजकडे पाठविली. हे वर्तमान हरि उमाजी वगैरे यात्रिक याणी समक्ष पाहिले. त्यानंतर वैशाख शुध पौर्णिमेस येथे आले. आम्हास सविस्तर सांगितले, त्याजवरून आपणाकडे व दादाकडे तीन चार पत्रें मी खतें येथें आम्हाकडे

पाठवावी म्हणून लिहिली होती. प्रत्युतर कांहीचं आलें नाहीं. यास्तव प्रस्तुत जासूद पाठविला आहे. यास समागमहि लाऊन देऊन पाठवावी. खते येथे आलियावर सितारामभटास देऊन मुक्तता करून श्रीमंतांची पत्रे सत्वर देशास यावे म्हणून आली आहेत. यास्तव पर्जन्यकालातहि देशास जाऊं. सर्व देणे आपले आहे. राजकार्याविषयीं आपणास तर अनेक कार्ये, परंतु हे कार्य मजकरितां आधिआधि करावे. श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत तात्या व विसाजीपंत दादास पत्र लिहिले आहे. त्यास देऊन कार्य करून त्यांचेहि पत्र पाठवावे. चातकन्याये करून खतांची प्रतीक्षा करित असे. परलंबायमान लिहिले म्हणून आलस न करावा. बहुत काय लिहिणे? लोभ कीजे हे आसीर्वाद. दादास संक्षेप पत्र लिहिले आहे. आपणास पत्र लिहिले आहे हेच दादास दाखवावे हे आसीर्वाद.

हरि उमाजी सार्वभौमाचे सैन्यात गेले आहेत. ते म्हणाले की श्रीमंत राजश्री दादास लिहून डाकेबरोबर खते माघारी आणवितों. तिकडेच खतें पाठविली असली तर हरि उमाजीसहि सूचनार्थ लिहावे की खते काल्पीस सत्वर पाठवावी. हे आसीर्वाद.

¶*Vinayak Bhat writes to Baburao Fadnis to recover the loans obtained by some priests of Prayag from Sitaram Bhat of Benares.*

No. 30] [*15-6-1764?*

पौ छ १३ जिल्हेज
सन खमस जेष्ट

श्री

सेवेसी विनंती. शेवक त्रिंबकराम जोसी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा जे: त्र्यंबक किल्यावर फितुर जाहाला, याचे चौकसीकरिता रा रामचंद्र नरसी रवाना केले आहेत. त्यास ते व तुम्ही मेलोन चौकसी करून फितुरांत कोण कोण आहेत व कोणीकडील सूत्र याचे ठेकाण लावणे म्हणौन. त्यास आज्ञेप्रो उभयेता मिलोन चौकसी उतम प्रकारे करून ठिकाण लागेल तेथवर लाऊन होईल वर्तमान ते सेवेसी लिहून पाठवीन. वरकड वृत रा रामचंद्र नरसी याणी सेवेसी विनंतीपत्री लिा आहे त्यावरून विदित होईल. हवेलीचे काम चालीपुर्ते सिध्य जाहाले आहे. अवकासेकरून येथील जाग्यांत वसती करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Trimbakram Joshi submits that as ordered an enquiry will be instituted regarding the treason reported from the fort of Trimbak and findings communicated.*

6879

No. 31] [26-6-1764

पौ छ २२ मोहरम
सन खमस सितैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. सरकार हांडे येथे तुपाची नेमणूक सरकारची सालाबादची पंधरा खंडीची आहे. त्याचे तीन हजार रुपये कमाविसदारांस मजुरा द्यावे. हांड्याचे कमाविसदारानी बराणपुरास आणावे. तेथून बराणपुरकरानी गंगथडीस नारो बाबाजी यांजकडे पावते करावे. त्याणी पुण्यास पाठवावे. याप्रा पहिल्यापासून करार आहे. त्यास सरकार मजकूर तीर्थरूप राजश्री दादासाहेबानी खासगी खाली ठेविला आहे. तूप पंधरा खंडी माहादसेट वीरकर याणी सरकारात द्यावे. त्यास तीन हजार रुपये सरकारातून द्यावे याप्रो सालगुा करार जाला आहे. प्रस्तुत माहादसेट याणीं विदित केले कीं तूप पुण्यास आले आहे. सरकारात घ्यावे आणि तीन हजार रुपये करारप्रा द्यावे. तूप कमाविसदारानी पुण्यास पोहचविलें नाहीं. आपण भाडे करून आणिले आहे. त्यास भाड्याचा पैका सालाबाद माहालकरी देत असतात त्याप्रो सरकारातून देवऊन तूप सरकारात घ्यावे, त्यावरून तुम्हास लिहिले असे; तरी पंधरा खंडी तूप सरकारांत कोठीस माप घेऊन तीन हजार रुपये माहादसेटीस देणे. भाडे यांस पडले आहे. त्यास सालाबाद जे माहालकरी तूप पोहचवीत असतात त्यास ताकीद करून भाड्याचा यैवज यास परभारा कमाविसदाराकडून देवणे. कमाविसदार केवळ पत्र लिहिल्यानेच ऐवज देणार नाहीत. यांजकरितां माहादसेटीचे माणसांबरोबर सरकारचे ढलाईत देऊन निकड करून पैका देवणे. असेहि करतां कमाविसदारानी नच दिला तरी तुम्हीं सरकारातून देऊन तूप घेणे. भाड्याचे कलम सालाबादचे आहे. नवे नाही. याजकरिता सख्त तगादा कमाविसदारांस जाला म्हणजे पैका देतील. गुंता पडणार नाही.

रा छ २९ जिल्हेज सुा खमस सितैन मया व अलफ हे विनंती.

¶*Madhavrao Peshwa asks Nana Fadnis to take charge of the ghee brought by Mahadshet Karanje from the district of Handia and pay him Rs. 3,000 according to contract.*

6680.

No. 32] [2-7-1764

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री प्रभाकर कृष्ण गो—

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुा खमस सितैन मया व अलफ. रा महादाजी सिंदे याची सरदारी दूर करून राजश्री मानाजी सिंदे यास सांगितली. त्यावरून मारनिले आज्ञेसिवाय उठोन गेले. त्याचे बदोबस्ताची आज्ञा राा नारो कृष्ण यास केली आहे. तरी तुम्ही सामानसुधा मारनिलेस सामील होऊन ते सागतील त्याप्रो वर्तणूक करणें. जाणिजे छ २ मोहरम बहुत काय लिहिणे.

¶Raghunathrao orders Prabhakar Krishna to join Naro Krishna asked to watch the movements of Mahadji Sindia who went away dissatisfied, his Saranjam having been transferred to Manaji Sindia.

No. 33] [2-7-1764

असल बमोजीब नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
हरि दामोदर स्वामी गोसावी यांसी

पौ रघुनाथ बाजीराव नाा विनंति उपर येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. माहादजी सिंदे यास हुजूर यावयाकरिता वारंवार पत्रें पाठविली, परंतु त्याचा येयाचा प्रकार दिसोन न ये तेव्हां कारकूनहि पाठविले तथापि न आले. इतकियात सकूबाई येथे आली हे वर्तमान त्यासी कळलियावर तेहि हुजूर आले. सरकारचे मुद्दे पाच लक्ष रुा द्यावे व खासा स्वारीबरोबर पांच हजार फौजेनसी यावे वगैरे सर्व मुद्दे कबूल केले. परंतु सरकारची मर्जी मारनिलेनी हमेशा सकूबाईच्या डेरियास जाऊन त्यांच्या च्यार गोष्टी आधिकउण्या सोसून त्यास राजी राखावे येविसी आज्ञाहि केली असता याप्रमाणें न करीत. येक महिना हुजूर होते त्यांत येक दिवस भेटीसहि न गेले. सकुबाई नित्य येऊन श्रमी होत, त्यांची भीड पडली सबब रा मानाजी सिंदे यासी सरदारीची वस्त्रें दिल्ही. माहादजी सिंदे यास तीन च्यार हजार फौजेची सरदारी सांगोण काही सरंजाम व काही नख्त याप्रमाणें द्यावयाचा प्रकार करीत असता ते न ऐकोण आज्ञेसिवाये पळोण गेले. त्याचे बंदोबस्ताची आज्ञा रा नारो कृष्ण याजकडील लोक ब्ऱ्हाणपुरी आहेत त्यासी केली असे. तरी तुम्हापासी राऊत असतील, त्यानिसी त्याची कुमक करून महादजी सिंदे पुढे न

जात ऐसा बंदोबस्त करणे. जाणिजे छ २ मोहरम. तुम्ही त्याजकडील कारकून असतील त्यासी हाती घेऊन हर तजविजेने माहादजीचा आटकाव होये ते करणे. जाणिजे छ मजकूर बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Raghunathrao writes to Hari Damodar saying that Mahadaji Sindia got alienated from him owing to his right of succession being transferred to Manaji. The addressee is asked to stop Mahadji proceeding to the North.*

No. 34] [*5-7-1764*

पौ छ १ सफर खमस
श्रावण मुा नाशीक

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हीं छ २१ जिल्हेजचीं पत्रें पाठविली ती छ ९ मोहरमी पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर विदित जाहाले. रसदांचा ऐवज जमा करावयाविसीं पत्रें आली त्यावरून तमाम मामलेदारांस बोलावणी पाठविली आहेत. ऐवजाचा भरणा करावयाची सोय बालोबा आदिकरून सर्वांचे मते पुण्यातच फडशे करून ऐवज घ्यावा. च्यार रुपये जाजती पडले तरी देऊ याप्रमाणें मामलेदार म्हणतात; परंतु श्रीमंताचे बोलावणे आले तेव्हा जाणे प्राप्त जालें. त्यास आषाढ शुध्ध द्वितीयेस निघोन जाणार. तेथे गेलियावर जसी मर्जी तसें करूं म्हणून तपसिले लिहिले तें कळले. ऐशास तुम्हीं पुण्यातच असोन माहालचें फडशे होते तर मातबर ऐवज जथोन इकडे उपयोगी पडता. याजकरिताच येथून तीर्थरूपास पत्रें दोन च्यार वेळ लिहिली कीं पुण्यास यावे; परंतु येणे न जाले. तुम्हासच तिकडे बलाविलें. ऐशास तुम्हीं तिकडे जातच आहा. तेथें जाऊन तीर्थरूपांस सविस्तर अर्थ समजाऊन च्यार रुपये अधिक जथत ते गोष्ट करणे; आणि यैवज इकडे वरचेवर रवाना करीत जाणे. येथून रसदेच्या ऐवजी वराता जाहाल्या आहेत, त्यांचा ऐवज मुदतीप्रो पावता होय ते करणे. कृष्णाजी हरि यांची वरात पंचावन हजाराची जाली आहे. त्यास ऐवज राजश्री नारो आपाजीं यासी बोलून पुणे सुभा व दाभाडी पारणे मिळून पंचेतालीस हजार रसद करार केली, ते देविले व वीस खंडी गला पागेकडे खरेदी करून द्यावयाप्रो करार करून विल्हे लाविलें म्हणून लिहिले ते कळलें. दाहा हजार रुपये वरातेपैकी राहिले तें हरयेक

यैवजी लाऊन देतो म्हणून लिा कळले. उतम आहे. राा छ ७ मोहरम सुाा खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंत

¶*Peshwa Madhavrao writes to Nana Fadnis asking him to explain matters to his uncle who had sent for the addressee at Nasik.*

No. 35] [*8-8-1764*

छ १० सफ.

श्री

यादी ताकीदपत्रें :

१ पेठकर चिमणाजी दळपतराव राजे यास पत्र कीं नेवजी सुभेदार मौजे असे प्राो वाशळे येथे राहत होता. यास त्याने मौजे मजकुराचा पाटील संभाजी याजला घरास बोलाऊन त्यास जिवे मारिलें, आणि पाच सात घरे कबिल्यासुधा पळोन गेला आहे; तरी तुम्ही आपले तालुकियात शोध करून, याजला ठिकाणी लाऊन, राजेश्री रामचंद्र नारायेण कमाविसदार याचे स्वाधीन करणे म्हणून पत्र.

१ सदरहुप्राो वासदेकर राज्यास पत्र.

१ आपाजी हरि तालुके वाघेरा यास पत्र.

१ जव्हारकर राज्यास पत्र.

४

येणेप्रमाणे पत्रे की राजश्री रामचंद्र नारायेण पारपत्यास कोल्याचे पाठविले आहेत तरी तुम्ही सामील होऊन कोली मजकूर ठिकाणी लाऊन मशारनिल्हेचे स्वाधीन करणे. पौ रुबरू छ ९ सफर खमस सितैन मया व अलफ.

¶*Chimnaji Dalpatrao is ordered to find out and hand over Nevji Subhedar who had murdered Sambhaji Patil and absconded.*

No. 36]. [*25-8-1764*

पौ छ १० जमाावल

श्री

राजश्री आनंदराव धुलप

गोसावीं यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्राो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुाा खमस सितैन मयां व अलफ. गोवेकर फिरंगी याणी, आपणास

6683

वस्त्रे पाठविली ते बजिनस हुजूर पाठविली. त्याचे मुबदला फिरंगीयासी बारासे रुपयेयाची वस्त्रें दिल्ही आहेत, त्याची आज्ञा करावी म्हणोन चिंतो नारायेण याणीं विनंती केली. यैशास फिरंगीयास तुम्हीं वस्त्रे पाठविली त्याची वाजबी किंमत आकारली असेल ते आरमाराचे हिसेबी खर्च लिहिणें; त्याप्रमाणे मजुरा पडेल. जाणिजे छ २६ सफर बहुत काय लिहिणे.

¶*Madhavrao Ballal informs Anandrao Dhulap that orders have been issued to make payment for the dresses sent to the Portuguese of Goa by Dhulap.*

No. 37] [*3-9-1764*

पौ छ २६ रोवल

खमस मुा भोगुर

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी

गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हीं पत्र छ २२ सफरचें पाठविलें ते पावले. लिहिलें वर्तमान कळलें. तोफखान्यांकडील सरंजाम पहिली रवानगी गोळे सत्रासें चौतीस व पावणे दोन खंडी शिसें येक खंडी, एक मण दारू व दुसरी रवानगी पंचवीससें येकाहत्तर गोळे, आठ खंडी दारू व अडीच खंडी सिसें याप्रों रवाना केले. मिरजहून पुढें न्यावयाची तर्तूद करावी म्हणून लिा तों केवळ त्यास पहिले रवानगीचा सरंजाम मिरजेस आला तेथे भाड्याचे बैल पाठविले आहेत, लस्करांत घेऊन येतील. दुसरे रवानगीचा सरंजाम मिरजेस पोहचला म्हणजे लस्करांत आणविला जाईल. वसईस विसाजी केशव यांस दारूगोल्याविसी दोन च्यार पत्रें पाठविली; परंतु अद्यापि काहीं तर्तूद होऊन न आली म्हणोन लिा. त्यास दारूगोल्याची तर्तूद जरूर जाली पाहिजे. येक कारकून या कामांत नेहेमी विसाजीपंताजवळ ठेऊन दारूगोला जो येईल तो आणून रवानगी करीत जाणे. विसापुरची दारू पुण्यास आणिलीच असेल. नवी पुटे देऊन तयार करून रवाना करणें. सोरा मिळत नाहीं म्हणोन लिा त्यास प्रेत्न करावा, मेळवावा; पुण्यांतील कारखाना नीट चालीस लाऊन, दारू नवी तयार करून वरचेवर पाठवीत जाणें. कापडाविसीं दोन च्यार वेळा तुम्हास लिहिलेच आहे; तर अखेर भाद्रपद कापड येथे येऊन पोहचे असे रवाना करणें. रा छ ६ रोवल सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Haripant Phadke writes to Balaji Janardan to replenish the store of ammunition to meet the needs of the army.*

No. 38] [14-9-1764

पौ छ २६ रबिलावल सुा खमस

श्री

सेवेसी बापूजी हरि पाटणकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १७ रबिलौवल मुकाम किल्ले गंभीरगड येथें फौजसुधा सुखरूप असों विशेष. स्वामीचे आज्ञेप्रमाणें किला सरकारांत आला; परंतु स्वामींनीं पांच रुपये दिल्हे नाहीं. राउताची व पागाची बेगमी पुरती नाहीं. लढाईचा दंगा पुरवतो परंतु (उ)पासाचा पुरवत नाहीं. घोडीं व बैल बहुत मेली. लिहितां पुर्वत नाहीं. नासिकांतून च्यार हजार रुपये कर्ज घेतलें ते उडालें. किल्यास तू(र्त) हजार रुपये लागतील, तेव्हां किंचित बंदोबस्त होईल. जखमीयांस खर्च बहुत लागतो. तीराच्या जखमा कठिण, मुलुक वैराण ऐसे हाल कोठवर लिहावे? परंतु स्वामीचे पुण्यप्रतापें ठिकाण आलें येणेंकरून दबाव भारी बसला; परंतु पर्जन्यामुलें उपाय नाहीं. माणूस उघडें थंडीनें हात पाय सुजोन मरतें. स्वामीस माझे हाल जे आहेत ते परभारेंच कलतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bapuji Hari Patankar reports the miseries of his men and requests provisions for his starving garrison.*

No. 39] [24-9-1764

नकल.

श्री

राजमान्य राजश्री हरि रंगनाथ
दिा राजश्री नीलकंठ माहादेव
गोसावी यांसी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार सुरू खमस सितैन मया व अलफ. रा जगजीवन पवार व जीवनराव केशव याणी किले देहर घेऊन खानदेशामधी धामधूम करितात, याजकरिता सरकारची फौज राजश्री अंबादास बलाल दिा रा नारो कृष्ण याजबरोबर देऊन उभयेताच्या पारपत्याकरिता रवाना केले आहेत, तरी तुम्ही आपलेकडील परगणियातील लोक व राऊत जमा करून मारनिलेकडे जाणे. ते सांगतील त्याप्रो वर्तणूक करून पर्वताचे पारपत्य करणे जाणिजे. छ २७ रोवल आज्ञा प्रमाण.

¶*Raghunathrao orders Nilkanth Mahadev to proceed with his contingents and help Ambadas Ballal in quelling the disturbance created by Jagjivanrao Pawar and Jivanrao Keshao.*

6685

No. 40] [16-10-1764

श्री

राजश्री तान्हाजी खराडे व
रघोजी गाढवे व आनंदराव
फालके गोसावी यांसीं

अंखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो राजे सदासिवराव रामचंद्र आसीर्वाद. उपर येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत जावे विशेष. तुम्हीं पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जाहालें. उमेदवारीचा मजकूर लिहिला, येसियास सांप्रत फौजेची तयारी जाहाली. मजल दरमजल जाणार. पेशजी पत्र आले असते तर उतम होतें. पूर्वीपासून घरचाच मजकूर आहे दुसरा अर्थ न जाणावा. येथील पुरता मनोदयानरूप बंदोबस्त जालियास तुम्ही पहिलेपासून पदरचेच आहां विसर नाही. सदैव पत्री पाठऊन संतोषवीत जावे. रा छ २० राखर बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sadashiv Ramchandra asks Tanhaji Kharade, Raghuji Gadhwe and Anandrao Phalke to be ready to join the writer's force which is about to start on an expedition.*

No. 41] [23-10-1764

पो छ ३ रोखर

श्री

राजश्रीया विराजित राजमान्य
राजश्री अंबादास बलाल स्वामी
गोसावी यासी

सेवक नारो कृष्ण सां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही पूर्वी पत्र पाठविले त्यात किले देहरचे उपरालियाविसी गीर्दनवाईचे कादारास वगैरे पत्रे सरकारची पाठऊन द्यावी म्हणून लिहिले त्यावरून हुजूरची पत्रे येणे प्रा

१ सटवोजी जाधवराव यासी
१ गणोजी सितोले
१ त्रिंबकराव सदासिव कादार पा फुलमरी
व कनड

6686

१ हरि रंगनाथ दिा निलकंठ माहादेव
१ मौजे सायेगांव पाा देहेर येथील अमलाविसी
—
५

येकून पाच पत्रें सरकारची घेऊन पाो आहेत. प्रसंगोपाद्य लागलियासी उपयोगी पडतील तसतसी देऊन सरकारचे कार्ये करून घ्यावे. तुम्हाकडील वर्तमान तपसीलवार लेहून पाठवावे. पेशजी तुम्हास वरचेवर लिहीत गेलो आहो, त्याजप्राो तुम्ही सर्व गोष्टीस खबरदार वर्तणूक करीतच असाल. तुम्हाकडील पत्रें आली त्यात गोविंद खंडेराव दिा ताकपीर व विनायेक दामोदर ऐसे रवाना केले आहेत, त्याचा मजकूर ध्यानास आणून बंदोबस्त करून द्यावा म्हणोन लिा त्याजप्राो ते आलिया-वर येथास्थित असेल तैसेच होईल. अद्याप आले नाहीत. तुम्ही लिहाल म्हणून पाा शेंदुरणीकरास येथूनहि पत्रें लिहून पाठविली आहेत. आणखी ताकीदपत्रे हुजूरची जी लागतील ती लिहून पाठवणे त्याजप्राा पाठवीत जाऊ. आसपासची कामे काजेहि मनास आणीत जाणे. रुजुवातीचे कारकून माहालोमाहाली सरकारचे भामेर वगैरे गेले आहेत, त्याचा उपराला वरचेवर उतम प्रकारे मुरवत माहाले-वाल्याची न धरिता करीत जाणे. भामेरकरास पंचवीस माणूस पिसोलाहून आम्ही देविले आहे. तुम्हाकडे लिहीत जातील त्याजप्राो करणे. देहर चालीस गावचा मोगलाई अमल तुम्ही फौजेचे खर्चास घ्यावा येविसी सनदाच पाहिजेत ऐसे नाही. राा छ २७ रोवल सुरु खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Naro Krishna informs Ambadas Ballal that as desired by him letters have been despatched to Satvoji Jadhav, Ganoji Shitole and other Kamavisdars to send help to the fort of Deher.*

No. 42] [*25-10-1764*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक माहादाजा त्रिंबक कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी विज्ञापना ऐसीजे : स्वामीनी आज्ञा केली की दिलीचे कारभारामधे अंताजी माणकेस्वर याने थोडीसी चौकसी केली. पुरती चौकसी केली नव्हती तोच सात लक्ष रुपये तुमचे बापाकडे लागू केले. ते पुढे चौकसी होणेच होती तो यैवज सरकारात दाखल

5687

आजपरियेत न केला. तुम्हीं गरिबीचा तोर बाहेर दाखवितात, परंतु तुमच्या भावाभावाची वाटणी दाहा पंधरा लक्षाची कमपेस जाली हाहि लौकीक आहे. येका दोघा मातबराचे दाखलियानें हे गोस्ट विदित जाली आहे. यैसे आसतां डोलेझांक करून काळ हरण करितात, तर या गोस्टीने परिणाम बरा होणार नाहीं. जर करितां हा मार खराखुरा आसल तैसा जाहीर करणे म्हणऊन आज्ञा जाली. त्यास मी बापाबा दिलीस गे(लो) नव्हतो; परंतु सात लक्ष रुपये बापाकडे अंताजी माणकेस्वर यानी तफावतीचे लाविले हे गोस्ट लटकी आहे. जर करतां कमपेस काही आमचे अंगी लागली तर सरकारचे कझेदार जालो खरे. आज्ञेप्रा॥ वर्तणूक करू. सरकारचा कझ्या हारून देऊ. दुसरी आज्ञा जाली कीं तुमचा बाप मेलियावर तुम्ही घरीं भावाभावाच्या वाटण्या केल्या, त्याहि वेलेस लाखो रुपये वाटणसि आले, म्हणऊन यैकिलियांत आले आहे; तर येकंदर किती यैवज वाटून घेतला तो जाहीर करणे. दर भावांस वाटणी किती किती आली ते लेहून देणे. चौकसीमुले तफावत निघाल्यास मुलाहिजा होणार नाही म्हणऊन आज्ञा. त्यास येकंदर यैवजाची वाटण्या साडेपांच जाल्या. चौघा भावाच्या च्यार मातुश्रीचा येक व भावजयेचा निमे येकूण साडेपाच हिसे वाटणी जाली. दर वाटणीस रुपयै व दर आसामीस आजमासे रूपये ४५००० पंचेतालीस हजार प्रा॥ कर्जवाम नगनगाटीसुधा वाटणी जाली. या गोस्टीस कमपेस जालिया सरकारचे गुन्हेगार; व तिसर कलम आज्ञा की वाटणीचे वेलेस सरकारच्या लांझ्याबरहुकूम काही रुपये समाहिक काढून ठेविलेत, हे खरे की लटके ते लेहून देणे म्हणऊन आज्ञा. त्यास सरकारचा कझ्या अथवा अंताजीपंताचा कझ्या आम्हाकडे आहे यैसे आपले तीर्थरूपांच्या बोलन्यांत आपण यैकिले नाही; व आम्हीहि माहित नाहीत; परंतु तीर्थरूप हिंदुस्तानात सन हिदेंत+ बोलले होते की जर करता सरकारचा कझ्या अंताजीपंताकडे लागोन, त्यासमधें रुा॥ सरकारात देणे पडले तर आपणासहि मदत करावी लागेल. तीस पसतीस हजार रुपये पावेतो देणे पडतील. हे वर्तमान आमचे बंधु यादवराव तीर्थरूपासमागमे होते त्यानी सांगितले होते, इतकी मात्र माहितगिरी आम्हास आहे. त्यावरून वाटणीचे समई करार भावाभावात ठरला आहे की जर करता तीर्थरूपाच्या बोलण्याप्रा॥ रुपये देणे पडले तर वाटणीप्रा॥ साडे पाच आसामी यानी द्यावे. याखेरीज आनत्र प्रा॥ नाही. चौथीया कलमाची आज्ञा जाली की भावाभावाचें वाटणीचा कागद जाला आसल तो आसल कागद आणून दाखवणे. त्यास ते वाटणीचे कागद बाबूजी ना॥ कुकडे नगरकर याचे हातचा व यादवराव आपला भाऊ त्याची

+ इहिदेंत

6688

फारखती आम्हापासी आहे. व तिचा बंधूचे हातची त्याजपासी आहे. येसी परस्पर फारखत्या ठरल्या आहेत. त्यास येका महिण्यात आणून देऊ. लिहिल्या मजकुरात तफावत कमपेश पडला तर आपण सरकारचे कर्झेदार व गुन्हेनार जालो. आज्ञेप्रो वर्तणूक करू. छ २९ रोवल सुा सन खमस सितैन मया अलफ; सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Trimbak being called upon by Raghoba to explain certain embezzlements of Government monies, replies that the affair belonged to his father's time and that so far as he is aware he knows nothing of any amounts owed to Government, but that he is fully prepared to make good any defalcations if such could be conclusively proved against him by documentaru evidence.*

No. 43] [*8-11-1764*

पौ छ ३ सवाल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाळाजी जनार्दन स्वामी गोसांवी यांसी

पो माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणें विशेष. त्रिंबक जगनाथ वकील राजश्री हैबतराऊ निंबाळकर यांजकडे बिडास असतात. त्यास खर्चास रुपये ५०० पाचसें देविले असेत. सरकारचा ऐवज बीड प्रांती (कोणा)कडे येणे असेल तर त्या ऐवजीं देवणें; नाही तर दुसरे ऐवजीं पावते करणे. रा छ १३ जोवल सुा खमस सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Balaji Janardan to arrange for the payment of the sum of Rs. 500 to Trimbak Jagannath, a Vakil of Haibatrao Nimbalkar, to meet his personal expenses.*

No. ᴛᴛ] [*24-11-1764*

१ पो छ ९ रजब खमस पौष

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. रा राजाराम गोविंद यांस किले पुरंदरचे मोर्चेबंदीस

पाठविले आहेत तरी यांस दारू व सिसे लागेल ते पुण्याचे दास्तानपैकी देते जाणे. रा[१] छ २९ जमादिलौवल सुरू खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Raghunathrao orders Nana Fadnis to supply ammunition to Rajaram Govind sent to Purandhar against the Kolis.*

No. 45] [*25-11-1764*

पो छ ४ जाखर
मुा तलेगाव बरोबर (?)

श्री

पुरवणी राजश्री अंबादास बलाल स्वामीस

इतकियांत मुलकी सरंजाम येकवटोन तुम्ही जाऊन तेथे ठेपावें. जेण्हेकरून त्याचे उठावणीस कमती पडे ते ते तजवीज योजावी. मेहेनतीचे दिवस आहेत. तुम्ही कराल. तुमची जरब त्याजवर पडोन त्यांची अवसान खत्ता जाली, गुंज मोडत चालली हें वर्तमान ताबडतोब आम्हास येऊन श्रीमंत संतोषाते पावोन खूष होत ऐसे करावें. जो कोण्ही सरंजाम द्यावयास अनमान करील त्याचे माहालापासोन मसलत म्हणून घासदाणा घेऊन खर्चवेंच करावा. तुम्ही ताबडतोब सरंजाम येकवटून त्याजवर जाऊन गाठ घालावी इतकियात सरकारची फौज व काही तोफखान्यापैकी तोफा घेऊन येतो. या कार्यास्तव जसजसी तरतूद तूर्त तुम्हास पाहिजे तसी करून येविसी कोण्हाची भीड मुरवत न करावी. बेजरब कर्तव्य तें करून बंड वाढो न द्यावे. +उगाच तोतिया भाऊसाहेबाचे नावाचा म्हणून अंदेशा करीत राहाल तर भाऊसाहेबाची रीत ऐसी नव्हे. सारांश ताबडतोब कूच करून गेलेच असाल. वरचेवर पत्रें पाठवीत जाणे. फौजेचा भरणा हुजुरून होत आहे. लवकरच तिकडे फौज पुर्तीसुद्धा येत आहो. त्यापूर्वी तुम्ही काही तरी तर्तूद करून हरतऱ्हेने दाखवावी. गोसावियांची झुंड गोला होते म्हणोन ऐकिल्यात येत आहे, त्यास याजमुळे लबाडीचे पारपत्य जेथ जेथ गोसावियाची ठावठिकाणें असतील त्याचे पारपत्य करावे लागेल. सारांश सर्व येकत्र होऊन जमाव पोख्त करून शहावर जाऊन दाखल व्हावे आणि बंदोबस्त करावा. तूर्त पैकाच पाहिजेसा जाहाला तर हरयेक माहाली तहसील असेल तेथून घ्यावा. पुढे समजावीश होईल.

---

१ पैवस्ती नानांच्या हातची. + येथून वळण निराळें,

6690

आपल्या बाबतीहि येणे सर्वत्र आहेत. रा छ १ जाखर सुरू खमस सितैन मया अलफ, बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति[१]

¶*Naro Krishna asks Ambadas Ballal to exert himself to the utmost in quelling the rising of the Pretender of Sadashivrao.*

No. 40] [*30-11-1764*

पौ. छ ९ जमादिलाखर

मुा तळेगांव.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
अंबादास पंत स्वामी गो

पोष्य त्र्यंबक हरि कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा मार्गसीर्ष श्रुा ८ शुक्रवार मुकाम किले देहरे सानी जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. किला मजकूर सरकारांत सर जाहला, त्यास राजश्री नारो कृष्ण दरवे म्हणतात की किला आम्ही सर केला व लक्ष्मण कोन्हेर म्हणतात की आम्ही घेतला. राजश्री राजाराम गोविंद म्हणतात की आम्ही किला घेतला व जीवनराव केशव म्हणतात कीं किला आम्ही सरकारांत नजर केला. यास्तव याचे चौकशीस हुजुरून आम्हांस श्रीमंतानी पाठविले. काल येथें दाखल जाहलों, त्यास याची चौकशी आज्ञेप्रों करावी लागते. यास्तव तुम्ही किला कसकसा सर केला, दग्याने घेतले, किंवा हमखास लढोन जरब पोहचाऊन घेतला किंवा फितुराने घेतला याचे कचे वर्तमान कळले पाहिजे. याजकरितां आपण येथे येऊन राजश्री बाजीपंतही येथे आहेत, समक्ष निवाडा होऊन जाहले वर्तमान निवाड्याप्रमाणे श्रीमंत यजमान स्वामीस निवेदन करून किला कोणाचे विद्यमाने घेतला याचे दस्तेवज जो असेल तो घेऊन सत्वर आले पाहिजे. लस्करचे कूच होऊन दरकूच चालिले. आम्हास त्वरेने हुजूर गेले पाहिजे. विलंब न करावा. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Trimbak Hari Patwardhan writes to Ambadaspant, calling on him to come personally with documentary evidence to prove who captured the fort Dehersani and by what methods.*

---

१ पत्र नारो कृष्णाचें तोतयाचे दंग्यासंबंधीं.

6691

No. 47] [1764?

श्री

यादी श्रीमंत रावसाहेबास व राजश्री सखारामपंत बापूस पत्रे जे, तालुके अमदाबादची मामलत आपाजी गणेशाकडून दूर करून राजश्री गोपाळराव गणेश यासी सांगितली असे. कारण की सरकारातहि यैवजाचा दरकार व मशारनिलेचे आगत्य, यास्तव याचे राहाणे पदरी जाले पाहिजे म्हणोन हे काम यांस सांगितलें असें, येविसी घालमेल करावयासी कोण्ही माजी कमाविसदाराचा पक्ष धरून तुम्हापासी रदबदली करील तरी ते कदापि न ऐकावी. यांस आम्ही वचन देऊन मामलत सांगितली असे. तुम्ही यांचे घालमेलीविसी कोणाचे न ऐकणे. यांचे मामलतीचे निभावणीचा करार यासीं आम्ही केला असे. येणेप्रमाणे पत्रे :

१ श्रीमंत रावसाहेबास

१ राजश्री बापूस

२

\+ आपाजी गणेश याजकडून कराराप्रा यवजाचा भरणा सालमारा जाला नाही सबब व सरकारातहि यैवजांची वोढ याजकार (णे) गोपाळराव गणेश याजपासून यैवज घेऊन आपाजी गणेशकडून मामलत दूर करून मारनिलेस सांगितली आहे. आम्ही यासीं वचन दिल्हे आहे. आपणहि याचप्रा देऊन माजी कमाविसदाराची रदबदली न यैकता यांचे हाते मामलत घ्यावी. याप्रो दोन पत्रे द्यावी. देणे.

लिहिणे.

¶*Draft letter addressed to the Peshwa and Sakharam Bapu recommending the transfer of the Subha of Ahmedabad from the hands of Appaji Ganesh to Gopalrao Ganesh.*

No. 48] [11-1-1765

पो छ १८ रजब सन

खमस पोष

श्री

विज्ञापना[१] राजश्री सखारामपंत बापू मजवळ बोलिले की, ब्राह्मणास वर्षासने पावतात त्याची चौकसी होत नाहीं. येक दोघाचे धर्मादायाची वर्षासने आली असें

+Reghunathrao's handwriting.

१ पत्र हरिपंत फडक्याचें नाना फडनिसास.

माझे कानास आलें. तेव्हां मी बोलिलों की अशा गोष्टी कधी होणार नाही. तेव्हां बोलिले की असें नसावेंच, परंतु मजला कानी पडली गोष्ट तुम्हाजवळ सांगितली. हें वर्तमान स्वामीस कळावे म्हणोन लिहिले असें. चौकसी चांगली करावी. तेथे चौकसी होतच असेल, गुंता नाही, परंतु ऐकिले वर्तमान सेवेसी लिहिलें असे. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke reports to Nana Fadnis what he heard from Sakharam Bapu about defalcations occurring in the allowances granted to Brahmins and suggests an inquiry.*

No. 49] [*28-2-1765*

पौ छ १६ रमजान
सन खमस

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. ता छ ७ रमजान जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. मालवण इंग्रेजानी घेतले ते त्याचे उपयोगी नाही, ऐसे दर्शऊन दोन लाख रुपये घेऊन द्यावे, ऐसे सूत्र लाविले आहे. त्यास वकील सरकारचा तेथे मुंबैस आहे, त्याणे लिहिले कीं दोन लाखास देत नाही. त्यावरून अधिकहि कबूल करून करून× घ्यावे म्हणून पुन्हा वकिलास लिहिले आहे. होता होईल ते खरें. आपणास कळावे म्हणून लिा असे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Letter addressed to Nana Fadnis reporting the news of Malwan being captured by the English and their proposal to sell it back.*

No. 50] [*28-3-1765*

पो छ ९ सवाल चैत्र
खमस सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र नारायेण सा ना वि ता छ ६ माहे सवालपावेतो सेवकाचे व तालुके सिवनेरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र

× मुळांत दोनदां हा शब्द पडला आहे.

सादर जाले. तथ आज्ञा की रा तुळाजी आंगरे याचे लेक किले विसापुरी कैदेत होते, ते तेथून पळाले; त्यास याजकडील भट पेशजी किले सिवनेर येथे कैदेत ठेवावयासी पाठविला आहे, त्याचे पाई बेडी घातली नसिल्यास नवी बेडी पायात घाळून बहुत बंदोबस्त करून ठेवणे. घरातून याजला बाहेर पडू न देणे. विसापुराप्रमाणे हैगै जालियास क़ार्यास येणार नाही म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे भट मजकुराचा बंदोबस्त केला. बेडी पेसजीच घातली आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramchandra Narayan, keeper of Shivner fort, reports to the Peshwa that according to his instructions iron fetters have been put on the priest of Tulaji Angria's son who fled away from Visapur.*

No. 51] [*23-4-1766*

पो छ २ जिल्हेज

श्री

सेवेसी गणेश मल्हार विज्ञापना मुकाम किले आसेर येथील वर्तमान तां चैत्र शुध १४ बुधवारपावेतो स्वामीसाहेबाच्या कृपावलोकनेकरून सुखरूप आसो. इकडील वर्तमान तर श्रीमंत रावसाहेब तो राक्षसभुवणावर आहेत. माणसे सोडून आली. जाणार नासिकाकडे. राजश्री सखाराम बापू तो सासवडास गेले. नवाब निजामआली तो हैदराबादेकडे दरमजल कूच करून गेले. तिकडे आरकाटचे सुभा भागानगराकडे येतो म्हणोन मोगलाणे दरकूच करोन गेला. रा। बाबूजी नाईक तो सोलापुरात आहेत. त्याजकडे फौजा रवाणा केल्या आहेत. रा। केसो गोविंदपंताकडे पत्रे पाठऊन त्याचे प्रतिउतर साहेबाकडे पाठविले आहे त्यामधे सर्व मजकूर लिा आसेल. दुसरे पत्रे पाठविली होती तीहि आनंदवलीस यैवजाचे पत्र रा। केसोपंत तात्याचे नावे लाखोटा होता तो वरचेवर जोडी जासुदाची रवाणा केली त्याचे उतर आले म्हणजे सेवेसी पाठऊन देतो. श्रीमंत रावसाहेबाचा लाखोटा येक आहे. भोसल्याकडून पत्रें आली तेहि पाठविली आहेत. आणकीचा किलेदाराने फारसी धूम केली आहेत, येवलेकर यासी फार उपद्रव मांडला आहे, वाट चालू देत नाही. वरकड वर्तमान तर येथास्थित आसे. सेवेसी विज्ञापना.

¶*Ganesh Malhar writes news of the movements of the Peshwa, of Nizam Ali and other items.*

6694

No. 52] [*7-5-1765*

पैवस्ति छ १८ जिल्काद
खमस

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येथील छ १६ जिलकाद मुकाम जुनर साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १३ रोजचें आज्ञापत्र सादर जालें तें छ १५ रोजीं पावलें. तेथें आज्ञा कीं महमुद अलमखान माजी किलेदार किले सिवनेर हे कांहीं सांप्रत खुलामध्यें होऊन लोक जागा जागा जमा करून सरकारचे स्थळास दंगा करणार म्हणून वर्तमान कळलियावरून तुम्हांस आज्ञापत्र सादर केलें असे. तर स्थळोस्थळांचा बारकाईनें शोध करून मुदा ठिकाणीं लाऊन धरून हुजूर व किलेदार मशारनिलेस पत्र सरकारचें पाठविलें आहे हें देऊन हुजूर रवाना करणें म्हणून आज्ञा. यैसियासी बारकाईनें शोध आम्ही सदैव सर्वांचा, जे आपल्यास संशई आहेत त्यांचा, वरचेवर शोध करीत आहो. तर आजी आठ वर्षें हालीमाजीत व धन्याचे जाग्यास संभाळीत आहों. कोठें अंतर पडलें नाहीं. आलीकडे सरकारांत कोणी वर्तमान सांगितले तो ध्यानांतच असेल. जेथें संशय नसेल तेथें संशये आणिला तो कोण गृहस्त, त्यास पुरते मायेत घेऊन वर्तमान पुसोन (फाटले) सेवकास कळावयाची आज्ञा केली पाहिजे (फाटले) आगत्य जरूर पाठवावा. त्या (फाटलेले) चा पुरता शोध निघेल. असा गोष्टी आजि आठरा वर्षें किला घेतल्यास जालीं, परंतु कोठें संशये आढलला नाहीं. आणि त्यास त्याचे येजमानाचें ठिकाण नाहीं. मागें येक दोन वेळां दंगे जाले. तेव्हां कुटुंबे सुधां किले हाये येथें श्रीमंताचे आज्ञेनें राहत गेले. गुदस्तां श्रीमंत रावसाहेबाचीं स्वारी गंगापुरीहून आली ते समईं आम्हींच नेऊन भेटविले. बहुत अंतरपुरःसर बहुमान केला. असो, असें असतां त्याचे प्रारब्धानें धाव घेतली असली तर नकले. कालगत विचित्र आहे. आम्हांस कोणाचा निश्चये समजत नाहीं. या भले माणसास उगेच दुखवावें, त्याचा मनांतहि नसतां त्यास संशयांत घालावें, येणेंकरून सरकारची नुकसानी आहे. तो गृहस्त आम्हांपासून बारा कोसांवर मौजे बेल्हे येथें राहतो. कर्जदार खर्चामुळें दोन वर्षें जाला. चालीस पनास हजार रुपये कर्ज आपले मंडलीतील गृहस्तांचे आहेत. अन्नास मोतात जाली आहे. लजेस्तव आपले घरीं बसला आहे. तो कोठें पलत नाहीं. त्याचें शरीर बसले ठिकाणीहून उठवत नाहीं, यैसे आहे. स्वामीचे चित्तांत येईल कीं सांगितले काम करावें

6695

तेथे बयाज कां लिहितात ? तर त्याचे वर्तणुकेस आम्ही माहीत आहों. सेवटीं लटकी गोष्ट पडलीयासी स्वामी शब्द ठेवितील कीं हुजुरून लिहिलें तथापि चौकसी करून जें कर्णे तें करावें होते, यास्तव येक वेल सेवेसीं लिहिलें आहे. याउपरीहि आज्ञा आली तर सिरसा वंद्य मा (फाटले) नाहीं. क्षणामध्यें सेवेसीं पावलें किंवा नाहीं. त्याचा भाऊ बापाचा पालक त्यासी (फाटले) आहे तो हालीं पुणियांतून * * * * * * * * * * * पाहातांच तेथून जुनरास पलोन आला आहे हेंहि कलावें. सरकारचा लाखोटा त्याचे नांवाचा दिल्हा नाहीं, ठेविला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Subha of Junnar who had been instructed to make inquiries about the treasonous activities of his predecessor Mahamud Alam, who had surrendered the fort of Shivner to Balajirao Peshwa explains that the report received by Madhavrao must have been concocted by some interested party and has no real basis whatsoever.*

No. 53] [*14-6-1765*

पौ छ ८ मोहरम आषाढ

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
सिवाजी बलाळ गोसावी यासी

सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. राजश्री त्र्यंबक खंडेराव याजकडे बाणाचा कारखाना घालावयास आज्ञा केली आहे. त्यास बाणाच्या कारखान्यास जागा जाली पाहिजे. यास्तव नासिकात दोन हजार रुपयाचे घर तयार करून देणे. मारनिलेकडील कारीगीर सांगेल त्या डौलाने घर तयार करून देणे. रुपयाची चौकशी तुम्ही करून लिहिल्या प्रो घर तयार करून देणे. जलदीचें काम आहे. जलदीनें तयार करवणे. जाणिजे छ २४ जिल्हेज. सुाा सीत सीतैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao asks Shivaji Ballal to build and hand over to Trimbak Khanderao a house suitable for establishing a factory of rockets which he had been asked to start.*

6696

No. 54] [17-6-1765

पो छ २७ जिल्हेज
वैशाख मुा वरकुटे
पा इंदापूर

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री त्रिंबक भास्कर गोसावी यास।

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुरु सीत सितैन मया व अलफ. रा नारो कृष्ण यास हुजूर बोलाविले असता येत नाही. बदमामलीची नजर दिसते. याजकरितां त्याचे पारपत्य जरूर जाले पाहिजे. सबब हुजुरून राजश्री मल्हार जगजीवन फौज सुधा रवाना केले आहेत. तरी तुम्ही पत्रदर्शनी आपले सरंजामी राऊत सुधा जलदीने बऱ्हानपुरास मल्हार जगजीवन याजवळ जाऊन पोहचणे. दिरंग न लावणे, लोकास सिरोप न देणे. लांब लांब मजलीने जाणे. जाणिजे छ २४ जिल्हेज आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa Madhavrao Ballal suspects disloyalty on the part of Naro Krishna and orders Trimbak Bhaskar to proceed and join Malhar Jagjivan who was sent against him (Naro Krishna).*

No. 55] [2-8-1765

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक दिवाकर पुरुषोतम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथिल कुशल ताा छ १४ माहे सफरपर्यंत सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबी कृपा करून सेवकास पत्री आज्ञा केली, त्यास श्रीमंत येजमान साहेबाचे आज्ञेखेरीज नाहींत. गुदस्ता वोढीमुले येण न जाल. घर बसल्या फौजेस तलब देत लागली. निरर्थक लोकाचा रुपया आंगावर आला. लोक कामावर पडते तर चिंता नवती. सांप्रत आज्ञेप्रमान गंगातीरास येजमान येतात. फौजेचा जमाव होईल. पुढे निर्वाह सर्व साहेबानी केल्याने स्थित राहील. नव वरस बंगाला मालवा बंद. प्रतिवरसी दक्षणेतच्च काम पडत. सर्व अर्थ ध्यानात असतील. गुदस्ता रा सखाराम-पंत बापूस पत्रे तिनि च्यार पाठविली की आलियावर पोटास मात्र द्यावे. ते लिहीत की साफ मिलनार नाही, लवकर येन. तर जाऊन फजिती दिसावी यात काये आहे!

स्वामीजींचे येने इकडे जाल्यास अगदी नेट न पुरे. जर आपले येन न होत तर येते. वडील धनी, आपन सर्व सांभालून घेतले असते. पुढेहि याजला हिमत येक पोटास पाहिजे. फौज आज्ञेप्रमान ठेवतील. गंगथडीचा येक रुपया आनत नाहीत. उलटे पदरचे सरंजामी फौजेस दगा जाला, हे वर्त(मान) साद्येत माहाराजास श्रुत आहे. हे येकनिस्ठ्यात अंतर नाही. सेवकान पायापासी विनंती केली, निरोपसमई ते स्मरन आहे. मुख्य ममता अंतरबाह्य येक असावी, दिसावी आज्ञांकित आहेत. दुसरा अर्थ नाही, हे विज्ञापना.

¶*Divakar Purushottam writes to Raghunathrao Dada explaining why his master the Bhonsle could not come and join forces with those of the Peshwa. He pleads financial difficulties. The letter is wholly autograph.*

No. 56] [*14-9-1765*

श्री

अपत्ये समान माहादाजी नारायण दिवेकर सा। ना। वि। ता। भाद्रपद वद्य १४ मंदवासरेपर्यंत यथास्थित असे विशेष. आपण पत्र पा। तेथें आज्ञा की पुरंधर येथील कोल्याचे दंग्यातील दागिने सोने रुपेयाचे व जवाहिराचे वगैरे यांचे ताळेबंद मखलासी व्हावयाकरिता राजश्री नारोपंत नानास परवानगी जाहाली आहे त्यास पाठऊन देणे म्हणोन, त्याजवरून जवाहिराचे वगैरे ताळेबंद रा। सदासिवपंत टिलक नि। जनोबा दादा याजबराबर पा। आहेत. त्याचे फेरिस्त अलाहिदा आहे तेणे प्रा। घेऊन पावलियाचे उतर पा। आज्ञा करावी. आमचे धर्मादायाविसी स्मरण असिले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. जासूद व खा। बारदार पाठवावे. येथे कामकाज पडते. तेव्हा माणूस हाताजवळ असिल्याने उतम आहे. हे विज्ञाप्ति.

¶*Mahadaji Narayan Divekar sends to Naro Appaji lists of the ornaments and jewels, etc., secured in the rising of the Kolis of Purandar and asks receipts for the same.*

No. 57] [*Received 18-11-1765*

पा। छ ४ जमादिलाखर
सन सीत सीतैन.

श्री

विज्ञापना. स्वामींनी पत्रे पाठविली ती पावली. राजश्री बज्याबाचा मजकूर लिहिला तो कळला. श्रीमंतास पत्र लि। आहे हे शफतपूर्वक दाखवणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे विनंती करून पत्र हाती दिल्हे, तो बोलिले कीं मजकूर

6698.

कळला. त्यावरून मी विनंती केली कीं, नानानी मजला शफत घातली आहे. कागद वाचून पाहिला पाहिजे. त्यावरून अक्षरशा पत्र पाहिले आणि राजश्री बापू व राजश्री नाना यास सासवडास लिहून पत्रे पाा की आपा सासवडास आहेत, तुम्ही तेथे आहां तो घराऊ वाद्याचा फडशा करणे. फडशा जाला नाही तो आपाने लस्करांत येऊ नये. तीन हजाराचे गाव तोडून द्यावयाकरितां कारकून नेमिला आहे तो जाऊन नेमून देईल. याप्रमाणे उभयताचे पत्रात लिा असे. आपल्यास पत्र लिा असे. स्वामी म्हणतील कीं आमचे समाधानार्थ कीं लिहिता तर तसे लिहीत नाहीं. निकड करून विनंती करितो आणि जाबसाल होतो तो स्वामीकडे लिहून पाठवितो. यातील मुख्यार्थ हाच की स्वामीनी येथे विनंती केली तेच लक्ष आहे. मनांत एक बाहेर एक असे नाहीं. घराऊ वाटा जाल्याखेरीज आपा लस्करास आले तर कामास येणार नाहीं असे स्पष्ट लिा असे. मातुश्री आजीबाईस आपण बहुत प्रकारे सांगोन उतावळी न करावी. आपले मनोद्यानरूप घडोन येते. गुता नाहीं. हे विज्ञापना.

¶*The writer Haripant Phadke informs Nana Fadnis that according to his instructions the letter was read out to the Peshwa who wrote in reply to Sasvad asking Bapu and Nana Purandare to get the domestic tension removed.*

No. 58] *[19-11-1765*

पो छ ६ जमादिलाखर सीत
मागसीर्ष ह्या जिवाजी

श्री

विज्ञापना, छ ५ जमादिलाखर मुा अडलगांव नजीक चांभारगोदे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री कृष्णराव पारसनीस यांस आपण पत्र लिहिले होते. त्याचा जाब घेऊन पाठविला असे. आज येथे मुकाम आहे. उदैक कूच करून मांडवगणचे सुमारे जातील. कळावे हे विज्ञापना. फौजेच्या नालबंदीच्या यादी खमसांत तोडजोड जाली आहे, त्या व सीतांत देणी आली आहेत त्या निराळ्याच आहेत, पाठवाव्या. येथे काम पडते याजकरितां पाठवावयास आज्ञा करावी. हे विज्ञापना. शागीर्दपेशाचे लोक पाठवावयाविसी आज्ञा एकदोन वेळा आली त्यास हरिपंत बर्वे काल आला. आतां नेमणूक करून घेतों व राऊत नेमून घेऊन पाठवितों हे विज्ञापना+.

¶*Haripant writes to Nana Fadnis that Krishnarao Parasnis will soon proceed to Mandavgan and requests him to supply him with the pay-sheets of the army.*

+ पत्र हरिपंताचें नानाफडणिसांस असावें.

No. 59] [1765

अभयपत्र राजश्री सदाशिव चिमणाजी तालुके मोकदम मौजे निरगुडसर ता। अवसरी प्रांत जुनर सुाासीत सितेन मया व अलफ. दिल्हे अभयेपत्र यैसीजे. देशमुख देशपांडीये ता। मजकूर याणी सुभा येऊन विनंती केली कीं सन ११११ मध्यें मोंगलाचा दंगा जाहला त्यामुळें गांव खराब पडिला. जूजवस्ती राहिली, याजकरितां साहेबीं कृपाळु होऊन सन ११७३ मध्य मौजे मजकुरास कौल चौसाला इस्ताविंयाचा देऊन आबादी केली त्या कौलाप्रमाणें सन १११३ व सन १११४ दुसाला उगवणी केली. सालमजकुरीं तिसरे साल याची कौलाप्रमाणें उगवणी करावी त्यास प्रज्यन्य कमी जाहला याजमुळें खरिफ दरोबस्त गेले. रबीची जमीन पेरली नाहीं. गांव खरिपाचे पिकांचा, याजकरितां सालमजकुरीं इस्तावीयाची बेरीज पडली आहे, त्यांत सोड देऊन गांवचे जीवनमाफीक खंडणी केलियानें सालमजकुरीं उगवणी होऊन पेस्तर लावणी होईल त्याजवरून.

* * *

¶*Remission of revenue on the ground of scarcity of rain is promised to the village Nirgudsar.*

No. 60] [1765 ?

श्रीमंत दादासाहेब

इकडील वर्तमान वरचेवरी विज्ञप्तिपत्री सेवेसी लिहिलेंच आहे. पुढें होईल ते सेवेसी लिहोन पाठऊ. जाटानें झासीस यावयास बाकी ठेविली नव्हती, परंतु खावंदाचा पुण्यप्रताप समर्थ. किल्याचा सरजाम व जमाव पोख्त जाणोन पर्जन्य काळांत स्थलास अटकोन सा च्यार महिने शाहास काये गुतावे यैसें चितांत आणून तूर्त टाला देऊन ग्वालेर प्रांताकडे गेला असे. इकडील उपराला जलदीने व्हावयाविसी सरदारास वरचेवर आज्ञापत्रे सादर असवीं. खासा स्वारीच हिंदुस्थानांत आल्यावरी सर्व राजेरजवाडे शासनाक्रांत होऊन खंडण्या सरकारचे मर्जीप्रो देऊन फौजासुधा चाकरीस हाजीर राहतील. जाट मदोनमत्त हस्तीसारिखा सिंव्हस्थलाचा ठाई प्रसर धरू पाहातो तोहि हतपराक्रम होऊन स्वस्थलीच राहे. माहाराज सर्वज्ञ आहेत. सेवक लोकाही विशेष काये लिहावे? कितेक हृद्रतार्थ राजश्री गोविंद रघुनाथ यास लिहिले असेत. सेवेसी निवेदन करितील. ध्यानारूढ करून आज्ञा करणार स्वामी धणी समर्थ आहेत. श्रुत होये हे विज्ञापना. सरदारास वरचे(वर?) जलदीने इकडे यावयाविसी आज्ञा असावी.

¶*The writer reports to Raghunathrao the measures that he took to check the advance of the Jats on Jhansi.*

No. 61] [*Later months of 1765*

श्री

पुा वो रा विठलभट स्वामीस

सा नमस्कार. श्रीमंत दादाकडील तुमचे ठाई ममता कसी आहे ते लिहिणे म्हणून लिा यैशास तुम्ही येविसीची काळजी कदापि न करणें. बहुत संतोषी आहेत. सर्व प्रकारे दौलत राखिली म्हणून बहुत स्तव करितात. आमचे त्याचें कागदपत्रहि पुरंधरामुळे खलले. आपलें कांहीं कोठे जात नाहीं. मुलाची गोष्ट म्हटली तरी याची सर्व प्रकारे खातरजमा की यासारखा दुसरा कर्ता नाही. याजला सोडू नये आसे चितापासून आहें; परंतु दादाकडील कल आम्हास जरूर राखावा लागतो. यास्तव याजला वाटतें कीं माझे लक्ष आसेल तेच करावें. बोलून दाखवीत नाहीं; परंतु चितातील भाव आहे. दुसरें दादाकडील किले कोट सर्व आपले लगामी आसावे, दादाचे माणूस दूर धरावे, आपले जवल करावे, हा भाव फार. याजकरितां खोटेपण करितो. हा पेच मोठा आहे. तथापि चितात विचारहि करितों की हे गोष्टीकरितां नासू नये. दौलतेस अपाय आहे आसे चितात येते. दादा लगामी लगिना, गोविंद सिवराम व मामा दादाजवल आहेत ते बहुत खटपट करितात. परंतु तेथे काही होत नाही, पुरंधराचे राजकारण बिघडते. आबा जाते तरी चिंता नवती. आमचे वस्तु जेथवरी राखवेल तेथवरी राखतो. परंतु आबा न जाय आणि दादा स्वारीस गेले तरी आबाचे सर्वस्व जाते, काही राहात नाही, हा मोठा पेच आहे. सेवट काय होईल न कले. सारांश सगली मर्जी दादाची आणि आर्धी याची, यांत संशय नाही. या मुलापासून आमच्या जिवास आबरूस भय होणार नाही इतकें तर बलकट आहे. वरकड आमचे थोडे बहुत चालवावे असेहि आहे. येद्यपि घरी राहिलों तरी काही राऊत ठेवितील. जातीस पोटास देतात ते चालवितील, आसें माझे बुधीने वाटते. येंदा छावणीची चाकरी केली·यानें बहुत उपकरी आहो. दौलत राहिली हे पुर्ते समजले आहे. याप्राा वर्तमान आहे. वाचून फाडून टाकणे हे विनती.

¶*In this wholly autograph letter Sakharam Bapu explains to his family priest, the delicate situation in which he often finds himself owing to the strained relations subsisting between Raghunathrao Dada and his nephew Madhaorao. Bapu asserts that in his conduct he looks only to the interests of the State, and does not care for the good or bad opinion of the two masters whom he has to serve. In view of the charge of double-dealing usually brought against Bapu, this letter will be read with special interest and enable a student to assess Sakharam Bapu's worth correctly. The letter refers to Aba Purandare proceeding with Raghunathrao into north India, a point which justifies the date of the letter.*

No. 62] [8-3-1766

छ २८ रमजान

श्री

यादी पत्र निा भारतशाहा सुा सीत सितैन.

१ माहासिंग राजे न्याहारराव संवस्थान सावलीगड यास पत्र की भारतशाहा राजे यांचे तर्फेचे सिपाई व रयेत तुमच्या गावांस गेली. त्याजवर तुम्ही बदनजर ठेविली आहे म्हणोन विदित जाहालें; तरी हे गोष्ट कार्याची नाही. यांची रयत व सिपाई मकडाईस पोहचाऊन देणे. त्यांचे सुतलीच्या तोब्यास उपसर्ग न देणें. भारतशाहा यांजवर कृपा करून सरकारची चाकरी त्यांस सांगितली. सरकारच्या तर्फेने त्यांस तेथें ठेविले आहे. याचे निसबतीच्या लोकास व रयतेस उपसर्ग केलिया कार्यास येणार नाही. येणेप्राा सदरहूप्राा माहासिंग राजे न्याहारराव यास पत्र देवावे. देणे.

छ २६ रमजान फाल्गुन सीत सितैन. लिहिणे.

¶*Raghunathrao orders a warning being issued to Mahasing of Savligad against the latter's ill-treatment of the subjects of Bharat Shah.*

No. 63] [13-3-1766

पौ छ ६ सवाल मंगलवार

अधिक मुाा देवीपुरा

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहब

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विस्वासराऊ लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वृत ताा आधिक चैत्र शुाा ३ स्वामीचे कृपाकटाक्षेकरून येथास्थित आसे. यानंतर स्वामीनी आज्ञापत्र सादर केले तेथें आज्ञा जे, राजश्री मल्हाजी होलकर याणी झासी तालुका ठाणीयासमेत सोडऊन स्वाधीन केला. मामलतीचे वर्तमान काहीच न लिहिलें व साल मजकूरचा यैवज येणे त्याची तर्तूद करून न पाठविली म्हणोन त्यास तालुकियाचे वर्तमान तर आपली आज्ञा घेऊन या प्रांते आलिया ताा पांच वर्षे होत आली. स्थल मात्र किला सरकारचा रक्षून राहिलों. परस्पर

स्वामीस विदितच आहे. सांप्रत साल मजकुरी राजश्री मल्हारजी होलकर याणी झासीचा किला व ठाणी मात्र घेऊन दिली. नऊ महिने या प्रांतात राहिले. गाव-खेडी घरें व रयेत आदीकरून राहिली नाहीं. कोठे वस्तीचा लेश नाही. राज्यावर दाडमात्र ठरविला त्यापौ नगदी यैवज जो त्याच्या प्रयत्नें करून जबर-दस्तीने निघाला तो घेतला. राहिला यैवज त्याजवर कारकून सरदाराकडील संस्थानिकाकडे येऊन बसले आहेत. वायदे दोन तीन साला केले आहेत. आम्हास आजताा पैशास दर्शन नाही. मागेहि कर्जदार होऊन बुडलो. पुढे पैसा प्राप्त होणे दिसत नाही. सरदारानी रोजमरास देखील यैवज दिल्हा नाहीं. आजताा कर्जवाम करून किल्यास व फौजेस निममाही मात्र देत आलो. निम-माही लोकांचे देणे राहिले. लोकाचे पेचात येऊन धरणीपारणी सुटत नाहीत. परस्पर स्वामीनी शोध मनास आणावा आणि ध्यानारूढहि आसेल. पुढे आमचा परिणाम कोणे रितीने लागेल. मामलतीचा बंदबस्त कोणे प्रकारे करावा? उजाड प्रांत, आस्था काही नाहीं. येविसी आज्ञापिले पाहिजे. सर्व प्रकारे आधार स्वामीचे चरणाचा आहे. तीर्थस्वरूप राजश्री नारोपंत यास राजश्री मल्हारजी होलकर यानी बोलाविले. त्यास यांजला स्वामीची आज्ञापत्रे आली की हुजूर येणे. त्यावरून आशीरवाडियातून वडिलाचा निश्चय माघारे स्वामीकड जावयाचा जाला. आम्हास सरदाराचे सैन्यात वर्तमान कळलीयावर पांच वर्षे भेटी नाही, याकरिता सरदारची आज्ञा घेऊन वडिलाचे दर्शनास आलो. दोन तीन रोज उभाउभी दरकुच्यात समागमे राहून तैसेच झासी प्रांते बिदा जालो. वडिलास आपलेकड जावयाची तांतड जाली. आम्हाकडील प्रांतचा बंदबस्त काहीच नाहीं. आजताा प्रथम दिवस आहे. पुढे धणी आज्ञा करितील त्याप्रो वर्तणूक करूं. पूर्वी या प्रांते पांच हजार फौज राहात आली तेव्हा बंदबस्त होत गेला. त्याप्रो स्वामीनी फौज ठेऊन पूर्ववत प्राा बंदबस्ताची आज्ञा केलिया जे होणे ते होईल. रजवाडीयाच्या बुधी ठिकाणी नाहीत. मस्त जाले आहेत. आम्हा-जवळ फौज दोन हजार आहे तिची भक्षावयाची आवस्था या रितीची आहे. खावंद आपण आहेत, विदित व्हावे यास्तव कचे वर्तमान सेवेसी लिहीले आसे. सरदारासहि येथील आर्थ लोपला नाही. त्याच्याच हातचे कारस्तान सर्व आहे. तेहि सेवेसी लिहीतच असतील आणि लिहितील. खासा स्वारी स्वामीची या प्रांते आलियावर सेवेसी येऊन सकलार्थ विदित करूं. पालण करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman writes to Raghunathrao describing the general condition of the province under him, and reports the difficulties that he had in collecting the revenue from the people.*

6703

No. 64] [पो 23-4-1766

पो छ १३ जिलकाद सन
सीत सितैन बा। रामजी
प्यादा दि। बहिरजी मोऱ्या.

श्री

विज्ञापना. स्वामीनी स्वहस्ताक्षरपत्र पाठविले ते पावलें. अक्षरशा वाचून पाहिलें. अंतस्ते प्रमाणिकाचे मुखें वर्तमान ऐकिलें की, श्रीमंतानी येकांती उदग्रेह[१] काढिले कीं, नानावर यख्तियार टाकिला त्यामुळे गर्व फार जाला. चिठ्या माडीवरून खाली टाकाव्या, खालून वरत्या टाकाव्या, वाल्याचे पडदे करून मौजा करितात, अशा कितेक गोष्टी बोलिले हे काय? तुम्हाजवल तों अशा गोष्टी बोलणे नाही. तथापि शोध करावा, खुलासा पाहावा; अशा गोष्टी येकूण फार श्रमी जाले, म्हणोन पत्रीं आज्ञा केली ते सर्व कललें. ऐसियास, गर्व जाला, चिठ्याचा हा प्रकार, वाल्याचे पडदे या गोष्टी मजदेखत कधी निघल्या नाही. मग येकांती कोणांजवल बोलिले असतील त्या प्रमाणिकानेच स्वामीजवल सांगितल्या हें श्रीहरि जाणें. परंतु प्रायशा बुद्धीनें पाहाता इतके वाईट मनापासून असतें तर कांही ना कांही उद्गार निघता. परंतु ती गोष्ट जाली नाही असे दिसते. वरकड गोष्टी निघत नाही म्हटलें तर रात्रीस निजतेसमई जवल फार करून असतो, ते समई आपली गोष्ट नित्य निघते. श्रीमंत म्हणतात की, नानाचें पुण्य अधिक. उव्हाला[२] ठाऊक नाही. स्नानसंध्या करितात. तेव्हां मी विनंती करितों कीं, प्रात:काली स्नान करितात. प्रहर दिवसपर्यंत देवपूजा करितात. तदोतर दोन प्रहरपर्यंत कारभार. मग भोजन. मग घटका कारभार. मग चार घटका निद्रा. फिरोन संध्याकालपर्यंत उद्योग. तदोतर * * पुराण बारा घटका रात्र होते. मध्यरात्र नित्य निजावयास होते असे सांगतो. इतके नित्य सांगावें लागत नाहीं. परंतु येकदोन वेला सविस्तर विनंती केली. नित्य संतोष मर्जी. समई गोष्ट निघाली तर ये समई नाना काय करीत असतील? तेव्हां प्रात:काल, दोन प्रहर, तिसरा प्रहर, संध्याकाल, रात्र, ज्या समई गोष्ट निघते तेव्हा मी अमकें करीत असतील असे सांगतो. कां की,

---

१ उद्गार? २ आळस.

मजला सर्व समय ठाऊक आहेत. परंतु वैपरीत्य गोष्ट मुखातून कधीहि ऐकण्यांत आले नाही. असे असतां इतका इतिहास स्वामीजवळ कोणे सांगितला, त्यास कशावरून कळलें तें जगंनिवास जाणें. वरकड प्रकृतीचा मजकूर म्हटले तर विश्वास कोणाचाहि नाहीं. त्यात कांही आहे तो आपले ठाई मात्र असे, कोठेहि बोलण्यांत दिसतें. अंतर्याम ईश्वरास ठाऊक. आपण लिहिले की, तुमचे विचारें जाल्यास हेच पत्र श्रीमंतास दाखवणें. त्यास, हे पत्र दाखवणें ठीक नाही व पुसावयाचेहि नाही व मनांत असलें तर सांगणारहि नाही. मग लटके विरुधास कारण करणे गरज काय? जे दिसी आपल्यास स्पष्ट कळेल ते समई सुचेल बुध तेणें विनंती करावी. ती गोष्टच नाही, मग पत्र दाखवणें हे यथास्थित नव्हे. याजकरितां वाचून ठेविले, कोणास दाखविलें नाहीं. आपण ये गोष्टीचा संकल्पविकल्प कांही चितात न आणावा. भेटीनंतर सविस्तर विदित करीन. मर्जी फार कठिण, विश्वास नाहीं. जन्मपावेतों विश्वासें कारभार केला आणि येक दिवस अंतर पडेल तर मागे चांगले केले ते आठिवणार नाहीत, ही प्रकृत स्वामीचे ध्यानांत पुर्ती आहे. असो. धणी आहेत. येकनिष्ठेने चाकरी करावी. मग पार पाडिणार जगंनिवास आहे. यांस मी फार भितों. सारा दिवस मर्जी सांभालितों. परिणाम आपलें पुण्य लावील. दुसरा कांही आपल्याजवल ऐवज नाहीं. माझे शरीर अशक्त; चाकरी फार कठिण. येक दिवस सेवटास गेला म्हणजे कृतकृत्य होतों. सार्वकाल जगंनिवासाजवल चिंतन हेच करितो की, आबरू रक्ष. विशेष लाभाची इछा धरीत नाहीं. स्वामींनी काय उणे केले आहे? फडनिसाचे चाकर म्हणवितो याजकरितां फार जपावें लागतें. आपले नावास बटा न लागावा हीच कायावागमनसा इछा आहे. येजमान यंदा आले ते दोन महिने लस्करांत राहिले. त्यांत येक महिना दुखणें जाले. सेवटीं पुण्याला गेले. मजला येक मास दुखणें जालें, परंतु च्यार घटका कोणी चैन पडो दिल्हे नाहीं. न करावे कामकाज तर कोणी वोढावयास नाहीं. जीवाभ्य श्रम करून मर्जी मात्र रक्षिली व पुढें काही दिवस बाहेर आहेत तों असेच करितों. माझे शरीर यंदा फार तुटलें. परंतु लाइलाज, उपाय नाहीं. तसाच फिरतों. येक वेल स्वामीचे पाय पाहिले म्हणजे सर्व पावेल. श्रीकृपेकडून दर्शन लवकरच होईल हे विज्ञापना.

¶*Letter addressed to Nana by Haripant Phadke reporting for his information Peshwa Madhavrao's attitude towards him. The letter is interesting and reflects the character of the Peshwa.*

No. 65] [23-5-1766

पो छ १३ जिल्हेज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
विस्वासरावजी स्वामीचे सेवेसी

पो. गंगाधर गोविंद साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ११ जिल्हेज मुाा लाहेरी जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. राजश्री श्रीधर विठ्ठल याजबराबर आपण पत्र व राजश्री महादजीबावा सिंदे याचे ताकीदपत्र पाठविले ते पावले, व सविस्तर मशारनिल्हेनी वर्तमान सांगितले त्यावरून कलले. एशियास आपणास पेसजी रा. केदारजी सिंदे याणी सनदा पाठविल्या. त्यास केदारजीबावाकडून डोल राा महादजीबावाकडे जाले त्याउपरी मशारनिलेनी आम्हाकडे सनदा पाठविल्या. आपणास तहगिरीची पत्रे एक दोन आली ती बजिनस आपणाकडे पाठविलीच होती. एसे असोन हली ताकीदपत्र पाठविले त्यास ताकीदपत्राची रीत ऐसी असत नाही. वरकड लहान मोठे सर्व कारभार करीत आले. आपणहि पत्राचा अन्वयें जाणतच असेल. आम्ही त्याहवेसे नाहीं. आपण सनदा आमच्या पाहिल्याच आहेत. सविस्तर काय लिहिणे. पत्राचा अर्थ सविस्तर पंत मशारनिले लिहितील. बहुत काय लिहिणे लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Gangadhar Govind complains to Viswasrao Lakshman about the illegality of the letter of injunction issued by Mahadji Sindia against him.*

No. 66] [9-6-1766

श्री

आज्ञापत्र राजश्री रघुनाथ बाजीराव ताा चौधरी व कानगो प्राा भदावर सुाा सबा सीतैन मया व अलफ. प्राो मजकूर राजश्री केदारजी सिंदे व माहादजी सिंदे याजकडे फौजेचे सरंजामाबद्दल करार करून दिल्हा असे तरी तुम्ही माारनिलेसी रुजू होऊन पो मजकुरचा अमल वसूल सुरलित देत जाणे. जाणिजे छ १ मोहरम.

¶*Raghunathrao issues orders to all chaudharis and kanugas to pay the revenue of Bhadawar to Kedarji and Mahadji Sindias.*

No. 67] [*June 1766*

श्री

राजश्री केदारजी सिदे व माहादजी सिदे गोसावी

यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। रघुनाथ बाजीराव आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. तुम्हास फौजेचे सरंजामाबदल माहाल बीतपसील:.

१ प्रात कछवाघार

१ प्रात भदावर

२

येकून दोन्ही माहाल फौजेचे सरंजामाबदल तुम्हाकडून करार करून दिल्हे असेत. तरी सदरहू माहालचा अमल करून फौजेस खर्च करीत जाणे आणि सरकारचाकरी येकनिष्ठपणे करीत जाणे. रा। छ १ मोहरम सु॥ सबा सितैन मया व अलफ.

¶*Raghunathrao grants the two provinces—Kachhwa and Bhadawar—to Kedarji and Mahadaji Sindia for the maintenance of the army and asks them to render loyal services to the Peshwa in return.*

No. 68] [*11-8-1766*

पौ छ ११ राखर

सन सबा.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक आज्ञाधारक दादो उधव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ४ माहे रबिलावलपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून शेवकाचे व तालुके हायचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील सविस्तर वर्तमान लेखन करून शेवेसी पूर्वी पत्रें पाठविलीं आहेत त्यांचीं उत्तरें पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. यानंतर इकडील वर्तमान सांप्रत:—

इतलाखे[१] यैवज नेमणुकेप्रमाणें बहुत करून ज्याचा त्याजकडेस पावता केला.

किले सातारा येथील बेहेडीयास नेहेमी ऐवज व वराता लाऊन दिल्या

---

१ नक्त.

मामलेदार आपलाले ठिकाणी बहुत सावध आहेत. चौकसीनें वर्तणूक करितात. कोणेविसीं गुता नाहीं.

कलम १

सोलापूरचा किला अद्यापि हस्तगत जाहला नाहीं. राजश्री विसाजी कृष्ण राजश्री बाबूराव सदासिव यांजकडील मध्यस्तीकरिता सोलापुराहून पुणियास आले आहेत. येक दोन आडी मशारनिलेनी मातबर घातल्या आहेत. मुख्यत्वें कदीम सरंजाम देखील इंदापूर देऊन पूर्ववतप्रमाणें चालवावें त्याचा जाबसाल ठरल्यानंतर किला लौकरच स्वाधीन होईल. पुरंदरचा किला राजश्री नारो आपाजी याचे स्वाधीन करून वस्त्रें दिल्हीं. कोंडाजी नाईक वगैरे मातबर सारे कोली पुणियास आले होते. श्रीमंतास मोत्यांचा तुरा व सोन्याचा चंद्र वगैरे थोडेबहुत जवाहीर नजर केले. श्रीमंतांही बहुमान करून समाधानपूर्वक मागती किल्यास रवाना केले. राजश्री रामचंद्र त्रिंबक यास हवालदार व सरनोबत सुधां देखील लोक उतराने पुणियास आणवावे म्हणून विचार जाहला होता, हें वर्तमान रामचंद्र त्रिंबक याणी सेवकास लिहिलें होतें, त्याजवरून श्रीमंत राजश्री रावसाहेबांस येथून विनंतिपत्र लिहिलें होतें कीं सोलापूरचा किला हस्तगत होये तोपरियेंत मशारनिल्हेची चाकरी लोकसुधा देखील हवालदार सरनोबत यांची पुरंधरींच होत्या त्यापैकीं दाहा हजार रुपये अपाजी गणेश याजकडील वरातेपैकीं तूर्त गैरादा जाहला आहे, व मुलकी यैवजांत बंडीमुळें वगैरे कमी आली, सबब खर्चाचे अजमासाप्रमाणें यैवजाची नेमणूक किले मजकूर व पागा दिमत राणोजी सिंदे यासुधा करोन दिल्ही होती त्यास तीस हजार रुपये यैवज पाहिजे म्हणोन किलेकरी यांहीं हिसेब लिहून सेवकाकडे पाठविला. त्याजवरून हिसेब पाहून राणोजी सिंदे यास देवआज्ञा जाहली, किल्याचा बंदोबस्त राहिला पाहिजे, सबब आनंदवलीहून राजश्री केसो गोविंद यांजकडून गैरसंदी तूर्त दाहा हजार रुपये किला व पागा मिळोन रोख पाठऊन दरकदारास व मशारनिलेचे पुत्र धोंडजी सिंदे यांसी पत्रें लिहून वाटणी लोकास अदा पावती पाहून करावयाविषई लिहिलें आहे. किले मजकूरचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे. राणोजी सिंदे यांचा काळ जाहला, तेसमईं श्रीमंत राजश्री रावसाहेबांकडून किले मजकूरचे खबरदारीकरितां कारकून गेले होते. परंतु किलेकरी याणी किल्यावर न घेतां युक्तीचे वाटेनें समजाऊन माघारे लाविले. राजश्री गणेश विठल व किलेकरी येकविचारें वर्तणूक करितात. कोणेविशई गुंता नाहीं येणेंप्रमाणें

कलम १

आणकाईकर किलेदारानी प्रांतांत उपद्रव फार केला आहे. सांप्रत श्रीमंत

घ्यावी. सोलापूर हस्तगत जाहलियावर आज्ञेप्रमाणें सर्व लोक हवालदार सरनोबत व मशारनिलेसुधां उतरोन जातील यैसी हुजूरची मर्जी आहे म्हणून लिहिलें होतें. त्याजवरून लोक व हवालदार सरनोबत किल्यावरच श्रीमंतांहीं ठेवऊन राजश्री रामचंद्र त्रिंबक यांस हिसेबाकरितां बोलाऊन पुणियासी आणिलें आणि बहुत प्रकारें समाधान करून हिसेब करून लोकांचा यैवअज देऊन किल्यास मार्गस्त करितो म्हणून सांगून अद्यापि पुणियासच ठेविलें होतें. किला हस्तगत जालियावर लोक नामजादी व दरकदार व रामचंद्र त्रिंबक आज्ञेप्रमाणें रवाना करून सेवेसीं लिहून पाठवितों. कलम १

गंगापूरचे मुकामी श्रीमंत राजश्री रावसाहेब आले होते, ते समईं हुजूरआज्ञेप्रमाणें सेवकानें विनंती केली व श्रीमंतांहीं आज्ञा केली. त्याचा सविस्तर मजकूर छ १३ जिल्हेजीं मुजरद जासूदजोडी समागमें लिहून पाठविला आहे त्यास त्याचीं उत्तरें सेवकास सादर जालीं नाहींत. प्रस्तुत पुणियाहून पत्रें आलीं आहेत. मजला पुणियास जावें लागतें. तेथें गेलियाउपर कितेक कामकाजाचे फडशे करून घ्यावे लागतील, याजकरितां कृपाळु होऊन आज्ञापत्रीं उत्तर सादर करावयासी आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. कलम १

राजश्री रावसाहेबीं मजला आज्ञा केली कीं पुणियाहून कांहीं लोक व साहित्य पाठऊन देऊं. तुम्हीं आपलाले तालुकियाचे लोक अणऊन अणकाईस वेढा घालून हस्तगत होय तें करणें म्हणोन आज्ञा केली आहे. येविसीची शेवकास हुजूरची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन, येणेप्रमाणें कलम १

इतलाख यैवज आनंदवलीहून तूर्त घ्यावा आणि मुबदला यैवज श्रीमंत रावसाहेबाकडून द्यावा म्हणोन समक्ष सेवकास आज्ञा जाली होती, त्याप्रमाणें आनंदवलीहून थोडाबहुत यैवज सारे तालुकियास हिसेब समजोन तूर्त जरूर जरूर घ्यावयाचा नजरेस आला त्याप्रमाणें पावता करून बोभाट कोठील ठेविला नाहीं. श्रीमंत गंगापुरी आले ते समईं इतलाख यैवजाची नेमणूक जाली आहे, त्याप्रमाणें द्यावा म्हणून विनंति केली. ते समईं उत्तर जालें तें बयाजवार लिहून छ १३ जिल्हेजीं मुजरद जासूद जोडी समागमें पत्रें पाठविलीं आहेत, त्याचीं उत्तरें सादर जालीं नाहींत व सांप्रत श्रीमंतास यैवजाकरितां पत्र लेखन केलें होतें त्याची आज्ञा आली कीं परगणे अमोद व परगणे भागेर या हरदु माहालाचा यैवज साल मजकूर सन सबा सितैनची रसद व सालगुदस्तां राजश्री महिपतराव आवजी याजकडून महाल दूर करून बालाजी बाबूराव याजकडे जसी सांगितली, त्यास कुल अकार पो माजी

श्रीमंत राजश्री राऊसाहेबाचे आज्ञापत्र छ २१ सफरीं सेवकास आलें. तेथें आज्ञा कीं परगणें अमोद व परगणें भामेर येथील मामल्याविसीं कितेक लोक दरबारी बोलतात, तरी तुम्ही लौकर येणें म्हणून त्यास हरदु माहालची मामलत हुजुरून विठल हरि याजकडे करार जाली आहे. मशारनिल्हेनी मामल्याचा बंदोबस्त केला. रसद करार केल्याप्रमाणें पेशजीं विनंतिपत्रें हुजूर लिहिलीं आहेत, त्याचीं उत्तरें येतपरियेंत पनास हजार रुपये तकूब ठेऊन येक लक्ष रुपयाचा भरणा करून दिल्हा. यैसा प्रकार जाहाला असतां पुणियास फिरोन मामल्याची घालमेल होणार यैसा भाव पत्रावरून दिसतो. त्यास पुणियासी गेल्यानंतर विठल हरिनी मामलत कबूल केल्यापेक्षां सरकारकिफायतीची गोष्ट दुसरा बोलत असेल ते तो विठल हरीस वाजबी गुंजाईस[१] असल्यास कबूल करावी लागेल. सरकारनुकसानी होऊन येतां येत नाहीं यैसा प्रकार समजोन विठल हरिकडून मामलत कबूल करविली आणि श्रीमंताचे विचारें हरयेकाद्याचे भिडेमुळें दुसरेयास मामलत सांगावीसी जाली तरी खसखसीत जाबसाल करून विठल हरिकडेसच मामलत करार करावयाची विनंती करावी किंवा श्रीमंत आज्ञा करितिल त्याप्रमाणें वर्तणूक कमाविसदाराकडे वसूल यैवज पडला असेल तो वजा करून बाकी राहील तो यैवज इतलाख यैवज तालुकियासी नेमिला आहे त्या यैवजी वजा करून बाकी हिसेबी यैवज देणे निघेल तो देविला जाईल म्हणून आज्ञा जाहली. त्याजवरून हरदु माहालचा गुदस्ताचा हिसेब आणावयासी कारकून पाठविले आहेत ते आले म्हणजे श्रावणमासीं हिशेब घेऊन पुणियास आले. तीन हरदुमाहालचा यैवज सालमजकूरची रसद व गुदस्ताचे अकार पो बाळाजी बाबूराव याजकडेस वसूल आला असेल त्यासुधां गुदस्तां अनंदवलीहून इतलाख यैवज तालुकियासी दिल्हा आहे त्या यैवजीं मजुरा देऊन बाकी इतलाख तालुकियासी दिल्हा आहे त्यायैवजीं मजुरा देऊन बाकी इतलाख यैवज राहील तोच श्रीमंताकडून घ्यावा कीं काये येविशीची आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. कलम १

हरदुमाहालचा यैवज अलाहिदा आनंदवलीस घेऊन इतलाख यैवज नेमणुकेप्रमाणें श्रीमंताकडून मागोन घ्यावा यैसी मर्जी असलियासी आज्ञा होईल त्या प्रमाणें पुणियासी श्रीमंतास विनंती करून निकाल होईल त्याप्रमाणें करून घेईन. कलम १

किले देहर निसबत राजश्री राजाराम गोविंद येथील वाडी बहुत दिवस बेचिराख होती, त्यास किला सरकारांत

[१] नफा. In fiscal language it is applied to the capabilities of a village, particularly with reference to a proposed increase of revenue. (Wilson)

करावी येविसीची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत, सदरहूविसी मर्जीस येईल त्याअन्वयें श्रीमंत रावसाहेबांस पत्र पाठविलें पाहिजे. कलम १

शहर बऱ्हाणपुरास पुणेहून राजश्री मलबा पानसी यासी फौजसुधा श्रीमंत रावसाहेबीं रवाना केलें त्याणी मोर्चेबंदी केली होती, येविसीचे सविस्तर असेरीहून सेवेसीं लिहिलेंच असेल त्यावरून विदित होईल. कलम १

राजमंडळ सातारा वगैरे तालुके येथील बेहडा हुजूर होऊन वराता इतलाख यैवज देणे निवाला त्या यैवजीं दिल्या आहेत, त्यापैकीं यैवज गैरादा जाहला आहे, त्याविसीं पुणियास तालुकदारानी लिहिलें; परंतु तिकडून यैवज पावता दिसत नाहीं. आम्ही आनंदवलीहून देवावा तरी आज्ञा नाहीं. येविसीची आज्ञा कर्तव्य ते करणार स्वामी समर्थ आहेत. आज्ञा होईल तदनरूप वर्तणूक करीन. कलम १

नेहमी सरंजाम तालुकियाकडेस आहे त्याचा यैवज सन खमसचे अजमासें व येका दो तालुकियासी चढ घालून यैवज खर्चास लाऊन दिल्हा आहे, त्यास सन सीत सालगुदस्तां परजिन्याचे आपत्तीमुळें कमी थोडा बहुत कोठे कोठें आकार नेमणूकसे जाहाला, त्यास मुबदला यैवज दुसरा दिल्हा पाहिजे. सबब तूर्त खर्चाचे नेमणुकींत अर्ज बाब वगैरे कलमे तूर्त खर्च न आलियावर किलेकरी याणी कौल देऊन वाडीची लावणी करविली. तेथें जगनाथ धोंडाजी निसबत नवाब निजाम अलीखान याजकडील कमाविसदार वाडींत अमल बसविणार, त्यास सरकारचे किल्याचे पायेनाक्याची वाडी तेथें मोगलाईकडील अमल बसला म्हणजे किल्याचा आब राहणार नाहीं, आणि रोज बखेडे किल्यास होतील, किला सरकारात आणि पेठ मोगलाकडे यैसे कोणे जहागिरींत नाही, तरी जगनाथ धोंडाजी याजकडून वाडी दूर करून किलेकरी याकडे द्यावयाविसीं सनद सादर जाली पाहिजे. जगनाथ धोंडाजी याजकडे प्रांत देहरे आहे त्या नात्यामुळें किल्याचे वाडीसहि अमल बसविणार, परंतु बसूं देत नाहीं. विदित होये. कलम १

किले मुल्हेर निसबत बालाजी बाबूराव येथें शामलाकडील बंदिवान असामी ९ नव होत्या त्या किल्यावरून पळोन गेल्या म्हणून मशारनिल्हेनी पत्र पाठविलें, त्यावरून शोधास माणसें पाठविलीं आहेत, व मशारनिलेसहि अत:पर यैशी गाफिली न करणें. किल्याची जागा बहुत खबरदारी करणें, म्हणून बरे वजेनेच लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये. कलम १

अवंदा पुणियासी दरबारी कोकणपटीचे तालुकदार आले आहेत, त्यांचे हिशोब बहेडे पाहून अमीन हजरनीस जमेनीस वगैरे असाम्या प्रकी व

6711

केल्यास बोभाट सिबंदीचा होणार नाहीं, यैसी वजा करोन बाकी साल मजकुरीं जरूर जरूर यैवज द्यावयाचा तो देऊन तालुकदाराची व सिबंदीची समजावीस पाडून बोभाट वारलेत.

कलम १

मामलेदारानी पुणियास यावें म्हणून सर्वांस पत्रें श्रीमंत स्वामीचीं परभारें गेलीं होतीं. परंतु कोण्हीहि गेले नाहींत. हलीं मी जाणारच होतों, परंतु फार जलदीनें येणें म्हणोन हुजरे आले आहेत त्याजवरून निघोन गेलों. श्रीमंताची मर्जी मामलेदारानी यावें यैसी असलियासी मजला हुजूर निरोपसमईं आज्ञा जाली आहे त्याप्रमाणें विनंती करीन यैसें असतां फारच मर्जी असलियासी तालुकदाराकडील फडनीस दफ्तरदार मात्र बोलाऊन घ्यावे लागतील, यैसा रंग यैकिल्यांत व श्रीमंताचे पत्राअन्वयें दिसतो येविसीची आज्ञा.

कलम १

किले पुरंधर येथील जव्हाहीर आनंदवलीस दाखल जालें. त्याचा मजकूर बयाजवार राजश्री केसो गोविंद याणी शेवेसी लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल.

सिबंदीपैकीं कितेक कमी तैनाता यैसी छयाटणी आरंभिली आहे, म्हणून सेवकाकडील कारकून नेहेमी पुणियांत दरबारी ठेविला आहे त्याचे पत्र आले होतें. हाली मीही जाणार तेथें गेलियाउपर कोकणपटीप्रमाणें कारभार करावयाची मर्जी श्रीमंताची नजरेस आलिया रदबदल करून गुदस्तां हुजूर बेहेडे आले आहेत त्याप्रमाणेच साल मजकुरीं खर्चाचे बहेडे करून घ्यावे कीं श्रीमंताचे मर्जीप्रमाणें खर्च कमीजाजती करणें तो करून बेहडे करून घ्यावे, येविशींची आज्ञा.

कलम १

छ २० मोहरमचें आज्ञपत्र छ ३० सफरीं सादर जालें तेथें आज्ञा कीं परगणे डबई येथील सालमजकूरचा यैवज येणें त्याची नेमणूक किले हायचे बेगमीस करून देऊन सालमजकूरचे रसदेचा व हतेबंदीचा यैवज आनंदवलीस केशो गोविंद याजकडे भरावयासी पत्र राजश्री नरोत्तम किशोरदास व त्रिंबक सूर्याजी व सदासिव हरि कमाविसदार परगणे मजकूर यांस इकडून परभारें पत्र पाठविलें आहे, ऐशास तुम्हीहि चिरंजीव राजाराम यास विनंति करून येविशीं त्याचें पत्र त्रिवर्गाचे नावे घेऊन त्याजकडे पाठऊन ऐवज सत्वर केशो गोविंद याजकडे भरीत ते करणें. किले हायेची बेगमीस गुदस्ताचा यैवज पुर्ता पावला नाहीं व सालमजकूरचाही द्यावयाचा त्यास देणें.

हा यैवज तर फार नाहीं, याजकारितां
अधिं मग देणे तो समजोन देणें
म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रो श्रीमंत
रावसाहेबास विनंती करून यैवज
अनंदवलीस भरवितों व तालुकीयास
इतलाख यैवज द्यावयाचा तो जरूर
जरूर समजोनच ज्यास द्यावयाचा
यास फार करून देऊन बोभाट
कोठील ठेविला नाहीं. बाकी ऐवज
किल्याचा देणें राहिला आहे तो तोड-
जोड करून जसा द्यावयाचा त्याप्रमाणें
समयाचे समयास समजोन देतों.

कलम १

येणेंप्रमाणें सतरा कलमाचा मजकूर सेवेसी श्रुत होऊन सेवकास आज्ञापत्राचीं उत्तरें पाठविणार स्वामी खावंद आहेत हे विज्ञापना.

¶*A lengthy communication to Raghunathrao giving information about various matters such as the seige of Sholapur, the rising of the Kolis at Purandar and other matters. The paper supplies a good review of the general situation.*

No. 69] *[24-10-1766 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक दादाजी गंगाधर+ परगणे जुन्नर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ १९ माहे जमादिलावलपावेतों सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. यानंतर आपलें शरीरीं समाधान नव्हतें, वेथा भारी याजकरितां राजश्री उधो वीरेश्वर याजसमागमें राजश्री माहादाजी गणेश सेवेसीं श्रीपंढरपुरचे मुकामीं पाठविले होते, त्याणी सविस्तर वर्तमान सेवेसी निवेदन केलेंच आहे. मोगलाची समजावीस काढून किला सरकारांत घ्यावा, यैसा करार करून सरकारचें निशाण उधोपंतासमागमें देऊन रवाना केलें, तें छ ११ जमादिलौवलीं जुनरास

+ चंद्रचूड.

दाखल जाहालें. किलेयावरून मोगल कबिलेसुद्धां छ १७ रोज खाली उतरोन शहरांत आला. छ १८ रोजीं अभि(जि)त मुहूर्ती सरकारचें निशाण व लोक घेऊन किलेयावर चढलों. सरकारचे आज्ञेप्रमाणें किले यांचा बंदोबस्त राजश्री उधोपंतीं केला. सेवकास आज्ञा जाहली आहे कीं निशाण चढऊन तुम्ही हुजूर येणें, त्यास आज्ञेप्रमाणें सेवेसी यावें, त्यास शरीरीं वेथा निर्मुक्त जाहाली नाहीं याजकरितां चिरंजीव राजश्री बाबाजीपंत सेवेसी रवाना करितों, सर्व वर्तमान निवेदन करतील. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. शरीरीं समाधान जाहालेंयावरी राजश्री धोंडो अनंत व आम्ही सेवेसी येतों. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Dadaji Gangadhar reports occupation of the fort of Junnar surrendered by the Nizam.*

No. 70] [*6-9-1766*

पौ छ १ रबिलाखर

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. सुतार ठेऊन तमाम तोफांचे गाडे तयार करणे म्हणोन आज्ञा येशास सुतार येथे कसबी नाहींत. याजकरितां दाहा पाच सुतार कारखान्यातील कसबी आले म्हणजे त्यांच्या हाताखाली इकडील सुतार देऊन तमाम गाडे तयार होतील व येथे लोहार कसबी नाहीं. आहेत ते कारागीर चांगले नाहींत. यास्तव दोनच्यार दुकाने तिकडील आल्याने सर्व कामाचा बंदोबस्त होईल. तोफाचे फर्मे पाठऊन देणे. त्याप्राो गोल्याची तरतूद केली जाईल म्हणोन आज्ञा, त्यावरून बतीस तोफांचे फर्मे पाठविले आहेत. गोल्याची तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत. येथील किल्यातील गोल्याची मोजदाद करून तपसीलवार सेवेसी पाठविली आहे त्यावरून निवेदन होईल. थोरा तोफाचे गोले तूर्त येथे आहेत. लहान तोफाचे गोले येथे बेगमीचे नाहींत. याजकरितां दर तोफास निदान पांचपाचसे गोले असावे. यांत स्वामीच्या मर्जीस येईल त्याप्राो तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड किल्यातील कांहीं मोजदाद जाहली. थोडी बहुत व्हावयाची आहे. आजच्या रोजात सारी मोजदाद करून उदईक सेवेसी लिहून पाठवितो त्यावरून निवेदन होईल. थोर तोफाचे गोले आहेत, परंतु फारसे नाहींत. जकिर्‍यास[1] असावेच याजकरितां त्याची तरतूद करणार स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पाा हे विज्ञप्ति.[2]

¶*The writer informs the Peshwa of the progress of the repair of guns and of the manufacture of ammunition.*

---

१ जड सामानसुमान. २ तोफखान्याविषयीचें पत्र.

No. 71] [6-12-1766

श्री

राजश्री नारो कृष्ण गोसावी यांसी.

सुा सबा सितैन मया अलफ. तुम्हास स्वारी बा येणे म्हणोन दोन तीन वेळा रूबरू आज्ञा केली, व पत्रेंहि पाठविलीं, ऐसे असतां अद्याप न आलां, हें उत्तम नाहीं. तुम्हांस येविसीं राजश्री बाळाजी जनार्दन सांगतील, तर तुम्ही हुजूर येणे. न आल्यास हुजुरून खिजमतगार पाठविले असत हे घेऊन येतील. पष्ट समजोन वर्तणूक करणे. जाणिजे छ ३ रजब बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa summons Naro Krishna to appear before him at once.*

No. 72] [29-12-1766

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन
स्वामी गोसावी यासी

विनंति उपरी. राजश्री बाबूजी नाईक यांचा ऐवज आजमासे येक लक्ष तेरा हजार नख्ती सरकारात आला. त्यापैकी चालीस हजार रुपयांची वरात आलाहिदा होईल. बाकी रुपये ८३००० त्र्यासी हजार रुपये देविले असेत. यासी ऐवज कर्ज घेऊन देणे म्हणोन पेशजी लिाच आहे. त्यास राजश्री गोविंद सिवराम लिहितील त्याप्रो ऐवज पावता करणे. रा छ २६ रजब सुा सबा सितैन मया व अलफ. ऐवजाकरितां यांचा खोलंबा जाला असी गोष्ट न करणे. रा छ मजकूर हे विनंती.

¶*Nana Fadnis is asked to remit Rs. 83,000 according to instructions that would be received from Govind Shivaram.*

No. 73] [Dec. 1766

श्री

सेवेसी केसो गोविद चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ माहे रजबपावेतो मुकाम किले अनंदवली येथे स्वामीचे कृपेकरून

सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील मजकुराची कलमें येणेप्रमाणे :— बितपसील

साल मजकूर व साल गुदस्तचे तालेबंद येणेप्रमाणे—

२ खासगीकडील
  १ साल गुदस्त सन सीत
  १ साल मजकूर सन सबा
  —
  २

२ सरकारी
  १ साल गुदस्त
  १ साल मजकूर
  —
  २

१ खासगी व सरकारी मिलोन येकंदर तालेबंद
—
५

येकून पाच तालेबंद आबाजी जासूद जथे भवानजी नाईक सेलके याजबराबर पाठविले आहेत. सेवेसी प्रा होऊन जमेचा व खर्चाचा आजमास ध्यानास येईल. पुढे अखेरसालपावेतो खर्चाचा आजमास करून पाठविला आहे त्याजवरून सर्व श्रुत होईल. पुढील बेगमी करणार साहेब समर्थ असेत. कलम १

किल्याच्या दरवाज्यापासून सात घरापासी भोजनशाला नवी करविली आहे तेथपर्यंत फर्ष च्यार हात रुंदीचा कर्णे म्हणून मोघम आज्ञापत्री

तोफखानापो कारखाने जयवंतराव येशवत व त्रिंबक खंडेराव यांजकडील बाणाचे व गोल्याचे कारखाने आहेत. त्यास तूर्त खासा स्वारी मोहीमसीर याजमुळे बाणाचा व गरनालेच्या गोल्याचा उपयोग नाही. खासा स्वारी देसी आल्यावर मातबरच कारखाना लावावयाचा आहे. याजकरिता कारखाने महकूब कर्णे. कारण की खर्चाची वोढ. यास्तव कारेगार मात्र यास थोडेबहुत खर्चास देऊन ठेऊन घेणे. बाकी कारखाना बंद करणे. परंतु जोपर्येंत खर्चास आसल तोपर्येंत मना न करणे. खर्चाची वोढ आसल्यास बंद करणे. कारेगारमात्र यास खर्चास देत जाऊन बाकी बद करणे म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे जोपरियेत पोतास यैवज आहे तोपरियेत कारखाना चालतच आहेत. यैवज सरल्यास कारेगारास मात्र ठेऊन बाकी कारखाना बंद करितो. कलम १

श्रीकडे निा सखाराम कृष्ण आगाशे हा आम्हांस नित्य हटकितो की नवा सिसवीचा देव्हारा आहे त्याजप्रो करून देणे यैसी आज्ञा आहे म्हणोन सखाराम म्हणतो. नवा देव्हारा केला तरी च्यार रुपये खर्च होईल. लाकूड, सुतार, रुपीयाच्या पथ्या व खिले, कोईडे यैसे लागतील. गैरसनदी खर्च कसा

आज्ञा. त्यास आनंदवलीच्या दरवाज्यापासून * * त घरपावेतो काली जमीन पर्जन्यकाली चिखल भारी होतो, याजकरिता भुईत गज सवा गज पाया भरून भुईवर पाव गज खुला ठेवावा * * उपयोगी पडल. वरील पाठ थर चुनियात बसविला पाहिजे. नाही तरी पर्जन्यकाली पाऊसाने काली भोई फुगून दगड चिखलात * * ऊन जातील. तेव्हा खर्च करून सेवटी उपयोग नाही. येविसी पूर्वी दोन वेला सेवेसी विनंतीपत्री विनंती लिहिली होती की चुना लावावा की नुसतेच काले मातीत दगड बसवावे. चुन्यात दगड बसविल्यास च्यार रुपये आधिक लागतील परंतु काम पक्के, पर्जन्यकाली उपयोगी होईल. मातीत दगड बसविले, पाया न खटला तरी पुढे उपयोगी पडणार नाही. याउपर जैसी मर्जी आसल तैसी आज्ञा उगऊन आल्यास आज्ञेप्रमाणे होईल म्हणौन विनंती लिहिली होती. त्यांची उतरे आद्यापि आली नाहीत. हा काळपर्येत मार्गप्रतीक्षा केली. निदानी निर्उपाय. खासा स्वारी आली आणि फर्ष न जाला तरी सेवकावर बेमर्जी होईल याजकरिता फर्षास आरंभ केला आहे. भुईत व भुईवर मिळून सरासरी पाव गज उंच व तीन गज रुंद (आ)सा करावयास आरंभ (के)ला आहे. त्याचा आजमासहि इर्जेमाहली[१] करून करावा? कदाश्चित त्याच्या सांगितल्यावर न केला तरी देवाकडील काम म्हणून खावंद रागास येतील. यैसे द्रोहीकडून संकट, याजकरिता विनंतीपत्री लिहिली आसे. तरी याची आज्ञा उगऊन ल्याहावी. त्याजप्रा वर्तणूक करीन कलम १

लक्ष्मण आपाजी व पाडुरंग कृष्ण गोडबोले याजकडील इमारतीस आजपर्येत आजमासे सतर पंच्याहातर हाजार रुपयेपावेतो पावले. पुढेहि लक्ष्मण आपाजी मागतील ते देतच आहे. कलम १

श्रीमंत राजश्री रावसाहेबाची स्वारी सोलापूर प्रांती गेली. बाबूजी नाइकाची रफेदफे होऊन पुढे निजाम आलीखान याचा रोख व कर्नाटकचा रोख आहे. पाहावे कोणत्या रोखे जातील हे न कले कलम १

किले अणकई विठलराव सिवदेव याजकडे गणीबेगाने दिल्ही. पेशजी गणीबेग याणे विठलराव याजकडील कारकून धरून नेले व येवलेकर ठाकूर व विष्णुपंत म्हणून ग्रहस्त याजकडून यैवज घेतला वगैरे बदमामली करीत होता. मुरादखान याचा चाकर परतु मुरादखान याचे कबिले किल्यावर आहेत यैसे जाहीरानीयात मात्र करून स्वबुधीने कर्म करीत होता. सरदारखान मुरादखानाचा भाऊ व बाइकामुले माणसे आंतुरावर घातली होती. मुरादखानाची गत सरदारखानास

१ तात्पुरता.

पाठविला आहे. त्यास चौकसी करिता * * कमपेश होईल. ते पाहो(न) आजमास करून पाठवावा. * प्रमाणे काम करीन. कलम १

आपाजी गणेश याजकडे यैवज येणे. त्याचा थोडथोडा तगादा कर्णे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे येक कारकून समा(ग)मे राऊत देऊन पाठविला आहे. येक महिना जाला. दमाजी गाईकवाडाकडून व आपाजी गणेश या उभयताकडे तगादियास पाठविला आहे. कलम १

(जग)जीवनराव पवार याजकडून नजरेचा यैवज घेऊ * * याचा आमल मोकासी (या)चा व पाटीलक्या व (कु)रणे खासगी माहाल * * * आहेत ती सरकार आज्ञेप्रमाणे चालती कर्णे, येविसी मामलेदारास * * परभारे आज्ञापत्रे (आ)हेत म्हणून सेवकास आज्ञापत्र सादर जाले. त्याप्रमाणे त्याचे मोकासे व पाटीलक्या चालत्या जाल्या. परंतु चाटोरीस कुरण मारनिलेचे आहे. येविसी कमावीशदारास व विठलराव तात्यासहि ताकीद की मारनिलेचे कुरणास उपद्रव न देणे. यैसे आसता विठलराव तात्याकडील कारभारी कुरणासी खटखट करितात. बलेच गवतास गाडे आणून जबरदस्तीने भरून नेणार म्हणून पवार मार याजकडील कारभारी याणी

करावी हेच नवाबाचे मांनस, परंतु खावंदानी त्यास जीवदान देऊन सोडविले. तेथून सुटून शहरात गेले तेथे त्यास नाना प्रकारचे उपद्रव होउ लागले, तेव्हा माहा प्रयासेकरून निघोन नगरास आले. परंतु आन्नवस्त्र आदीकरून तसदीच आहे ते लिहित येत नाही. परंतु खावदांची वस्ती सुखाचे पाणी निर्वेधपणे तेथे आहेत. गणिबेगास सरदारखानानी पाच सात वेळा सागोन पाठविले की तू बेकैदी करितोस हे कामाची नाही. आमचे निसबतीस किला तेव्हा आम्हास संकट. आम्हास श्रीमंताच्या पायावेगळी गत नाही. तू करितोस हे कार्याचे नाही. ते न मानीत तेव्हा सरदारखान उठोन आनंदवलीस आला की किला हरकसा हस्तगत करावा. गणीबेगाचे पारपत्य करावे. भाई मुरादखानाची वस्तभाव वर आहे व कितेक जाबसाल मुरादखानाचे मिर्जाकडे आहेत. त्याजपाौ थोडे बहुत आम्हास द्याल म्हणजे आमचे माध्यानकालाचे चालेल. यैश्या मारावर आले. हे वर्तमान मिर्जा गणिबेगास कलताच विठलराव याजकडील लोकासी सूत्र लाविले की मजकडे मुरादखानाची झटे वगैरे झटे फार आहेत. तुम्ही मला नरमदापार करून द्याल तरी मी किला तुमचे स्वाधीन करीन. यैसे येका दिवसात सूत्र लाऊन संध्याकाली लागलाच खाले उतरला आणि

(बो) भाट सांगितला. त्याजवरून आम्ही विठलराव तात्याच्या कारभारी-यास पत्र पाठविलें की तुम्ही कुरणासी खटखट न करावी. गवत कुरणा(त) (गं)ज घालून ठेवावे. नवी * * जी सनद येईल त्याचप्रो उभयेतानीं वर्तावे यैसे पाठविले. त्याजमुले त्यास फारच विशम वाटले. यैसी कितेक बारीक मोठी कामे जावसाली पड (ली) (आ)हेत. येविसी पत्रे ल्याहावी लागतात. त्यास तर विशम वाटते. याजमुळे सेवकाचे नावे गैरवाके राजश्री विठलराव तात्यास लिहितील त्याजवरून (हु)जूर विनंती करतील * * * प मर्जीस कसे येईल. यास्तव पूर्व सूचना विनंतीपत्री लिहिली आहे. पेशजी सेवकाचे नावे येक ता(की)दपत्र आले आहे की राजश्री विठलराव याची * * * * पुरियात विकत घेतले ते जागा तुम्ही (जब)रदस्ती करून घर बांधिता ते न कर्णे यैसे आले, परंतु ते पत्र काही सेवकास पावले नाही. दुसऱ्याची जागा याजवर जबरदस्ती करून घर बाधणे हेच गोष्ट आनुचित. त्याहीमध्ये विठलराव तात्याची जागा त्या जागियावर मी बलेच घर बांधितो याचा परि(णाम) (काय) होईल! तात्या [यापुढील बराच मजकूर फाटण्यात गेला आहे.]

(बाल)कृष्ण गोविंद व बलवंतराव (गो)पाल याजकडे पचेवीस हजार विठलराव तात्याचे लोक किल्यावर घेतले. त्यास हस्तगत होये यैसे जालेच होते. किल्यावर श्रम फार सांगतात व सरदारखानाच्याहि सांगितल्यात येते. परंतु सरदारखान गैरमाहीत. पहिल्यापासून कारभारात नव्हता. बारगिराप्रो जेऊन होता हे साहेबास विदितच आहे. गणीबेग उतरला. दुसरे दिवसी त्याजबा भारबारदारी देऊन त्यास काहाडून द्यावे या उदेगात विठलराव. तात्याचे लोकाचे मते, हे सरदारखानाने आम्हास सांगितले की मीर्जा गणिबेग हातचा गेला म्हणजे सर्व माग बुडतो. याजकरिता त्यास जाऊ न द्यावे. किल्याची तहकिकात करावी. जे किल्यावर आसेल ते खावदानी सरकारात घ्यावे. उचले हाते जे आम्हास द्याल ते घेऊ. आम [यापुढील बराच मजकूर फाटण्यांत गेला आहे.] सोडवतो यैसे नाही. मग त्याची बंदोबस्ती करून ठेविला आहे. त्यास काहाडून द्यावे हेच त्याचे मानस. परंतु परस्परे लोकानी त्यास च्यार गोस्टी साफ सांगितल्या की मीरजास तुम्ही काढून दिधल्याने त्याचे निसबतीचे झटाचा जावसाल तुम्हास पुरवावा लागल. यैसे पुरते कलल्यावर त्याचा बंदोबस्त करून ठेविला आहे. किल्यावर बंदोबस्त विठलरायाकडील आहे. थोडीसी नामजादी व हावलदार आनंदवलीहून किल्यास गेल्यास उपयोगी पडेल

6719

(दरबार) खर्चाबदल येणे येविसी * * * करावे म्हणोन आज्ञा. त्या * * * प्रा कारकून व स्वार पाठविलेच * * त निकट करून यैवज वसूल (करि) तो. परंतु श्रीमंत रावसाहेबा(पा)वेतो फिर्यादी करितात. वसूल जाल्यास सेवेसी लिा कलम १

(इ)मारत निा लक्ष्मण आपाजी व पा * * * गोडबोले मिळून आजमासे आज * * * कमपेस रुा यैसी हजारपावेतो (जा) ले. पुढे जैसी आज्ञा येईल त्यास * * * वर्तणूक करीन कलम १

(रा) चिमणराव देशमुख (निा) बागलान याणी विनंतीप(त्र) लिहिले आहे ते सेवेसी प्रा * * * कलम १

किले हायेचे बेगमीस विा * * दादो उधव यास रुा पोता * * * हुजूर आज्ञेप्रा दिधला * * श्रीमंत रावसाहेब लौकर * * * यैवज देतील म्हणोन आज्ञा. त्यास रावसाहेबाकडून यैवज लौकर हातास (ये)तो यैसा आर्थ घडत नाही. येक लाख रुा म्हणतात. त्याही वराताकडील देऊ यैसे दादो उधव याणी सेवकास लिा * * * हे वर्तमान हजूर लेहून * * साहेबास पत्र आणवावे * * * म्हणून दादो उधव याणी सूचना सेवकास लिहिली होती परंतु खावंदाची मर्जी कसी होईल. दुसर विठलरायाकडील लोकाच्या नजरा बिलंद[१] उच स्थानी चढविल्यावर जाल्या. हा रोख पाहून मोघमातच राहिलो. रावसाहेबाकडील खिजमतगार दोघे आले होते. त्यास किल्यावर मोजदाद काही दिल्ही काही न दिधली यैसी लोकवार्ता यैकिली. सेवकाने गणिबेगास न सोडावे म्हणून विठलराव तात्याकडील कारभारी यास पत्र पाठविले याजमुळे विशमता फ़ारच वाटली आहे. याजमुळे कितेक प्रकारचे गैरवाके हुजूर समजावितील हे न कळे. आणकईच्या मजकुराचा विस्तारेकरून विनंती पत्रे पेशजी रवाना केली ते येऊन पोहचलीच आसतील. हाली जाले वर्तमान लिहिले आसे. सरदारखानाची हालाखी आहे. माध्यानकालाची फारच तंगच्याई आहे. हुजूर यावे हे त्याचे मानस परंतु बाइकामुळे माणसे घरात, त्याची आन्नवस्त्राची तसदी, येणेकरून फारच हैराणगत आहे.

---

१ बिलंद = उंच.

* सदरहू यैवज लौकर पावते *
* * यैसे पत्र जरूर आणवणे
यैसे लिा होते. त्याजवरून सेवेसी
विनती लिहिली आहे. मर्जी *
* ल्यास राऊसाहेबास यैव(जा)-
विसी लिहिल्यास उपयो (गो) पडल
कलम १

सदरहूप्रा कलमे सेवेसी प्रविष्ट होतील. कलमाकलमाची उतराची आज्ञा करणार साहेब समर्थ (आ)सत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Keso Govind submits an account of the revenue collected, and expenditure incurred for the repair of the forts. Madhavrao Peshwa—continues the writer—reached Sholapur and is to proceed on his march into the Karnatak.*

No. 74] *[1766?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादा
साहेबाचे स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे :

अणकईकर किलेदार यानी मुलकात दंगा फार केला, त्याचा बंदोबस्त करणे म्हणून श्रीमंतास पत्र सादर जाले होते ते देऊन विनंती केली, ते समई सरंजाम देतो, तुम्ही जाऊन मोर्चे लाऊन किला घेणे म्हणून आज्ञा जाली. मागाहून मनसबा काये समजोन राहविला ते न कले. गणपतराव सिवाजी, विठल सिवदेव याचे नातू, त्याजकडील कारकून किलेदारानी धरोन नेले होते. सबब त्यानी उपद्रयाप करून, कारकून सोडऊन किले पालणा घेतला, त्याजवरून अणकई

प्रगणे आमोद व भामेर येथील रसद विठल हरी पासोन लाख रुपये घेतली आहे. हाली आम्हास ऐवजाची जरूर यास्तव दुसरे मामलेदार दीड लाख रुपये रसद देत ऐसे ठीक केले आहेत. याप्रमाणे मारनिलेनी कबूल केले तर उतम; नाही तरी यादवराव भागवत यासी मामलत सांगोन दीड लाख रुपये रसद घेतो. सनदेची डौले हुजूरची पाठविली पाहिजेत. भामेर किला पहिल्यापासून मामलेदाराकडेस असतो; त्याजमुले माहालची सिबंदी व किल्याची येक जागा सबब

जेर जाली. थोडकेच दिवसात हस्तगत होईल, येविशईचे वर्तमान मारनिलेनी सेवेसी लिहिलेच असेल.

कलम १

किले न्हावा व किले पिसोला नजीक किले मोल्हेर नारो कृष्ण याचे निसबतीस होते. ते किले मारनिलेपासून फार निकडीने घेऊन हवालदार मामलेदार लोक नेमून पाठविणार; सबब किले आम्हाकडेस द्यावेत म्हणून बहुत प्रकारे विनंती केली; परंतु इतबार सेवकाचा न पडे. तेव्हां निरुपाये जाणून किले आपलेकडेस द्यावे; परंतु लोक सरकारचे पाठवावे ऐसा जाबसाल जाला. निरउपाये जाणून तूर्त लोक आपलेकडे नेमणुकीप्रमाणे घेऊन कारभार आपले पेटी लाऊन मात्र अगत्यास घेऊन सविस्तर मजकूर सेवेसी लिहिला आहे, त्याचे उत्तर लौकर पाठविले पाहिजे. लोक नेमून घेतले ते अद्याप रवाना केले नाहीत. उतराची मार्गप्रतीक्षा करावी ऐसे मानस सेवकाचे आहे; परंतु कर्डील निकड फार, लौकर लोक पाठऊन किले हस्तगत करणे म्हणून जाली आहे. मासपक्ष उतराची मार्गप्रतीक्षा सोईस आलिया करीतच आहे. नाहीं तेव्हां लोक पाठवीन. सविस्तर मजकूर येविशईचा पूर्वी लिहिला आहे. श्रुत जालाच असेल. १

सालगुदस्ता मुलकी ऐवज लाऊन तालुकियास दिल्हा आहे. त्यापैकी खर्च कमी लागतो. यास्तव मर्जीस आलिया किला मामलेदाराचे स्वाधीन करावा. लोक नामजाद व हवालदार सरकारचे ठेवावेत. कारभार मामलेदारानी करावा याप्रो आज्ञा असावी. यांत किफायेत सिबंदीची पडेल येविशईची आज्ञा काये ती करणार स्वामी खावंद आहेत. सदरहू अन्वये किला मामलेदाराकडेस लाऊन द्यावा. याप्रमाणे मर्जी असिल्यास बालाजी बाबूराव यासी पत्रे सादर जाली पाहिजेत. हा कालपावेतो विठल हरिकडेस किला द्यावा यैसी आज्ञा असता बालाजी बाबूराव यानी किला दिल्हा नाही. पुढेहि उजूर करितील. मारनेलेकडेस किला असलियासी वीस हजार रुपये याची नेमणूक करून द्यावी लागते. ते मागतात, कमी करू नये म्हणोन म्हणतात, मामलेदाराकडेस किला असल्यास, सदरहू ऐवजात कसर पडोन सारे माहालाची सिबंदी देखील किल्याची बेगमी होते ऐसा प्रकार आहे, येविशईची आज्ञा. १

सोलापूर अद्यापि हस्तगत होत नाही. बाबूजी नाईक याचे कुटुंब मंगलवेढ्यास नरसिंगराव धायगुडे याजबराबर पाठविले आहे. रामचंद्र त्र्यंबक पूर्वीच फौज घेऊन गेले आहेत; परंतु नायेकांवर शह मातबर नाही याजमुळे किला लौकर येईल न येई ऐसा संशय दिसतो. हाली हारजी

आफ्तीमुळे कमी आकार जाहाला, त्याचा तपसील येकंदर तालेबंदी तालुकेवार लिहिला आहे, त्यावरून ध्यानास येईल. त्यास सदरहू आफ्तीमुळे कमी आली ते मजुरा द्यावयाची आज्ञा काये ती जाली पाहिजे. १

वागमारे हवालदार व सबनीस, फडनीस, सरनोबत येथे रिकामे होते. त्यास च्यारशे रुपये खर्चास देऊन रामचंद्र त्रिंबक याजकडेस उपयोगी जाणून पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होये. १

येणेप्रमाणे पांच कलमे सेवेसी लिहिली आहेत. यासिवाये किले, ताथवडा येथे कदीम सेतसनदी[१] गडकरी व बेरड देखील कारकून आसामी १२९ सव्वासे आहेत. त्याजकडेस सरंजामी जमीन पहिलेपासून चालत आली आहे. त्याची गाहणी करोन सिरस्तेप्रा आकार लेहून आलाहिदा तेरीज सेवेसी पाठविली आहे, याजवरून श्रुत होईल. सदरहू लोकाची चाकरी किल्यावर घेता येत नाही व सरंजाम जफ्त करावा तर तोहि प्रकार प्रशस्त नाही, यास्तव थोडीबहुत ईतलाख[२] नेमणूक करून हे विज्ञापना.

¶*News-letter addressed to Dadasaheb by some one of his party reporting the capture and condition of several forts.*

No. 75] [1766?

श्री

राजश्री सखाराम भगवंत यानी विदित केले, कीं आम्ही आपल्या दोघा बंधूस घरचे घरांत समजावे, बाहेर फजिती न व्हावी, म्हणून धर्मशास्त्राचे मतापेक्षा अधिक अगळा वाटा दिल्हा असता शंकराजी निंबाजी लबाडी करून नाना प्रकारे वल्गना करितात, मन मानेसे बोलतात म्हणौन. त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहिले असे. तर तुम्हास सखाराम भगवंत याणी ज्याजतीच विभाग दिल्हा असतां वल्गना करावयाचे प्रयोजन काये? तर यानी जो विभाग दिल्हा तो आगदी व तुम्हापासी जो कुणगा असेल तो शफतपूर्वक सरकारांतून अंताजी मल्हार कारकून पाठविला आहे त्याचे गुजारतीने सखाराम भगवंत यांचे हवाली करणे व तुमचे कचे वर्तमान मनास आणावे लागते यास्तव हुजूर येणे. सर्व बारीक मोठे मनास आणून धर्मशास्त्राचे मते जो तुमचा विभाग होईल तो तुम्हास मारनिलेपासून देविला जाईल. यास्तव पत्र पावतांच जो विभाग यानी तुम्हास दिल्हा तो व तुमचा

---

१ सेतसनदी = One holding a sanad or grant of lands for military service, applied especially to a local militia acting also as police and as garrisons of forts.

२ इतलाख नेमणूक = A fixed annual payment from public treasury.

कुणगा असेल तो शफतपूर्वक सरकारचे कारकुनाचे गुजारतीने सखाराम भगवंत याचे हवाली करून तुम्ही हुजूर येणे म्हणून बाजी भगवंत व शंकराजी निंबाजी यास पत्र देणे.

¶*The Peshwa asks Shankaraji Nimbaji to hand over to his uncle Sakharam Bhagwant a part of the joint property which he had unjustly appropriated.*

No. 76] [*1766*

श्रीशंकर

विनंती उपरी. राजश्री प्रतापजी राजे माहाडिक आज्ञाप्रा वर्तणूक करितात. राश्रजी साकरोजी माहाडिक श्रीमंतापासोन पळून आले, व राजश्री दुर्गोजी माहाडिकास हैदरनाइकाकडे चाकरीस पाठविला. श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी याणी व श्रीमंत रा दादासाहेब याणी रो भोसले याचे शेहेस गुंतले होते तेव्हा हैदरनाइकास आणौन, स्वराज्यात धामधूम करावी, राजा बाहीर काडावा, रो भवानराव यास कुल कारभार सोपावा, यैसे नाना प्रकारे क्षुल्लक कर्म योजिले होते; परंतु श्रीमंताचे पुणेप्रतापेकरून सर्वहि वारापाणी होऊन परभारे तोंडघर्स पडले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This appears to be a report from the Court of Satara, describing the conduct of the Mahadiks. Pratapji Mahadik was reported to be obedient and loyal ; Sakroji and Durgoji Mahadik were however planning to supplant the influence of the Peshwa by liberating the Chhatrapati from confinement.*

No. 77] [*1766 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री मोरोबादादा स्वामीचे शेवेसी

पोष्य गोविंद सिवराम सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिह्वीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री उधव वीरेश्वर चितळे यांचे सिवनेरचे राजकारणानिमित्य खर्चवेच सरकारचे रुो व मारनिलेनी कर्ज घेऊन नाजूक कामास वगैरे खर्च केला त्याची मखलासी गुदस्तां उभयेतां यजमानापासीं रदबदल करून मखलासी करून घेऊन देणे करून घेतले. ते समई व्याजाचा हिशेब करून मखलासी करून घेतली नाहीं. सदरहू नाजुक कामाकडे खर्च जाला त्यामधें एकुणीससे अडतीस रुपये मुदल व व्याज व चवदासे रुो पैकीं नवसे

देणे जाले. त्याचे व्याज राहिले त्यामुळे व्याजाचा हिसेब पुढें समजोन देऊं ऐसें सांगितले. त्याजवरून मारनिलेनी आपला कारकून व देण्याची यादी राजश्री बाबूरावजीकडे पुणियासी घेऊन आले; परंतु रावजीनी रुपया दिल्हा नाहीं. मारनिले आज ता। दौलताबादेस राहिले त्याजमुळें रुो तैसेच राहिले. मारनिले गरीब, सालस माणूस, सरकारची कार्ये मारनिलेचे हातून काय काय जाली, हेहि तुम्हा आम्हा सर्वांचे स्नेही सर्व प्रकारे अगत्य यांचे आहे. यास्तव हर कसे कळेल त्या रीतीनें साध्य होऊन दोनी रकमाचे व्याज व ऐन रुपया कर्जाचे वगैरे बक्षीस मिळोन होतात ते उगऊन द्यावे. अनमान करू नये. गुदस्तां फार खटपट केली. बक्षिसें द्यावी ऐसा करार होता. परंतु हिंदुस्थानचे स्वारीमुळें राहिलें, असो. याउपरी व्याज सुधां रुो हरएक तजविजेनें उगऊन द्यावे, व मारनिलेचे तस(ल)मातीस सरकारी ऐवज, त्याचा जमाखर्च उगऊन तसलमात दूर करावी. आम्हीच केवळ तुम्हांस लिहावें ऐसे नाहीं. तुम्ही आम्हापेक्षां स्नेही आहा; परंतु गुदस्ता आम्ही या कामास माहीत होतो म्हणून तपसीलवार लिहिले असे. कार्य खामखा करून कर्जापासून मुक्त होत ते करावे. वर्तमान समजोन कार्य करावें. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Govind Shivaram writes to Moroba Dada, saying that Udhav Vireshwar Chitale has incurred expenses for occupying Shivaner and for some purpose of secret diplomacy. It is requested to free him from the debt incurred on that account.*

No. 78] *[1766-67 (?)*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १ साबानपर्यंत जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. शागीर्दपेशाचे हिशेब व तेरजे वगैरे कागदपत्र लस्करांत पाठवावे म्हणोन श्रीमंतांचें व तुमचें पत्र आलें होतें, त्याजवरून फत्ते आली सांडणीस्वार दिमत पागा हुजूर याजबरोबर कागद पाठविले बीतपशील:

शागीर्दपेशाचे हिशेब होऊन सन खमसचे नेबाद[1] सर्वांचे पावलेच आहे. त्याचें नांवनिशीवार तेरीज धरून व सीतचे हिशेब होऊन पैका पावला आहे. त्याचे तेरीज धरून व ढलाईत

कारकून शिलेदार व मुछदी व शिलेदार यांस रोजमरा येकमाही व दीडमाही सन खमसांत स्वारींत पावत होता, त्याचा पट नांवनिशीवार आकारून पाठविला आहे.

१ नेबाद = पगारांचे हिशोब.

व खास जिलबीचे लोकाचें हिशेब होणें होते तेहि करऊन पाठविले आहेत; याचें फेरिस्त आलाहिदा तपशिलवार आहे.

निळकंठ. माहादेव याजकडील फौजेचे सरंजामाचे माहाल आहेत त्यांपैकीं खानदेश गुजराथचे माहालचे कमज्याजती निवडले आहे त्याचा पट पाठविला आहे. यास राजश्री गुरुजी बावा माहीत आहेत.

सन इसनेंत कर्नाटकांत स्वारी जाहाली, राजश्री त्रिंबकराव मामा गेले ते समयींचें कागदपत्र असल्यास खंडण्याच्या बेरजा व तेथील संस्थानिकांचा खर्च पडला असेल तो व बसालतजंग याजकडे आदवानीचा पैका येणें त्याचे कागद शिक्यानशीं घेतले आहेत; पाहून पाठवावयास आज्ञा करावी म्हणोन तुम्ही लिहिलें; त्यास त्या सालचे कागदपत्र तों सर्व गेलेच; परंतु खंडण्याचें पुडकें व वसूलबाकीचे तेरीज व देण्याच्या यादी असें प्रकर्ण सांपडलें त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत, त्याजवरून कलेल. बसालतजंग याचें पत्राचा शोध केला, परंतु सांपडत नाहीं.

पुणियांत सन खमसांत प्यादे हशम वगैरे लोक किती होते व सालमजकुरीं किती आहेत त्याच्या नकला व नकलाच्या यादी व सरतेरीज ऐसें पाठविलें आहे. घेणें.

राजश्री सखारामपंत यांचा सरंजामाचा पट फौजेचा खानदेश व गुजराथ प्रांताचे माहालचा कमज्याजतीचा येथें निवडला होता तो पाठविला आहे. यास राजश्री गुरुजी बावा माहीत आहेत.

पुण्याचे मुक्कामीं सन खमसांत माणूस किती होतें व सालमजकुरीं किती हें लिहून पाठवावें म्हणोन श्रीमंतांनीं लिहिलें होतें; त्यावरून तपशिलवार यादी व सरतेरीज पाठविलें आहे. यांत सरासरी पाहातां नवद माणूस सालमजकुरीं ज्याजती आहे. श्रीमंत कैलासवासीचे वेळेस च्यार हजार पांच हजार माणूस सहजांत असे. प्रस्तुत आहे इतक्या माणसांनीं बंदोबस्त चांगला, व लस्करांतून येकादें काम शें दोनशें माणसांचें अकस्मात येतें, ते वेळेस शोधीन म्हटल्यास ताळ पडत नाहीं. सविस्तर समजवावे. स्वारी गेली ते समयीं माणसांचा भरणा कमी होता. बंदोबस्त जाला पाहिजे यास्तव सवासे मात्र माणूस जदीद ठेविलें तें तों जात आलें आहे. कदाचित सोलापूर बारामतीचें माणूस आलें तर पाहाणी करून दूर करूं, गुंता नाहीं. या मजकुराविशी

निराळें पत्र श्रीमंतास लिहिलें आहे हें
तुमचें मतें प्रयोजन लागल्यास द्यावें;
आणि कलमवार कागद लिहिला आहे
तोच पाहून कांहीं प्रयोजन नसल्यास
कशास पाहिजे? विचारास येईल तें करावें

सालव्याची चिठ्ठी अद्याप आली
नाहीं. ते घेऊन लौकर पाठवणें.
सालमजकुरीं त्याच्या कमाविसदारांनीं
वसूल घेतला असेल तो झाडियानसी
माघारां सरकारचे कमाविसदारास देणें
असें चिठ्ठी मध्यें लेहून घेणें.

येणेंप्रमाणें कागदपत्र येक रुमाल पाठविला आहे, पावलियावर उत्तर पाठवणें.
बहुत+ काय लिहिणे लोभ असो दीजें हें विनंती.

¶*Nana Fadnis submits the returns showing the number of attendants in service and their wages for the Peshwa's perusal in the camp. The papers include lists of tributes due from the Nizam agreed upon in the Karnatak campaign. The letter is addressed to Haripant Tatya, and is meant for the information of the young Peshwa whose minute attention to all details is evident throughout.*

No. 79] *[1-1-1767*

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री रघुनाथ
पंडित स्वामी गोसावी यासी

पो सदासिव चिमणाजी कृतानेक नमस्कार विनंती उपरी. यथाल कुशल ताा पौष सुाा १ प्रतिपदापर्यंत संनिध श्रीत्रिंबकेश्वर येथें जाणून स्वकीये कुशल लेंखन करीत गेले पाहिजे विशेष. गतवर्षी आपली स्वारी पुणियाहून गंगातीरास जाली, ते समई आमच्या कामाकाजास्तव राजश्री आपाजी महादेव (याणी वि) नंती केली व मी स्वता येऊन वारंवार कळविले, परंतु आपण मनावर गोष्ट धरून करार करून दिल्ही नाही. आबाजी महादेव पुरंदरच्या कामाबदल ठेविले. त्यास मात्र आज्ञा केली जे, यांजविसी तुम्ही राजश्री माधवरावजीस सांगोन यांचे कार्य करून देवणे, त्यावरून ते पाठीमागे पुणियात आठ दहा दिवस होते; तेव्हां दोनच्यार वेळ समय पाहोन आम्हास बरोबर घेऊन जाऊन रावजीस बहुता

+ येथून पुढील मजकूर नाना फडणविसाचे हातचा.

प्रकारे विनंती केली. परंतु त्याणी त्याजपासी एकच उत्तर केले जे, हे काम आमच्यानें करार करवत नाहीं. दादासाहेब वडील तेथें निश्चय करून ज्यास सांगतील त्याजपासून आम्ही काम मात्र घेऊं. मग वारंवार विनंती कैसियास करावी? आबाजी महादेव पुरंदरास गेले. पुणियाहून सदासिव रघुनाथ यास साहित्यपत्रे राजश्री सखारामपंत बापूनी देऊन आपल्याकडे पाठविले, तेव्हां आपण कृपा करून त्याजकडे आमचा कारभार करार करून वस्त्रे देऊन करार केले, व पाठीमागून रावजीच्या लस्करासमागमे आमचे बंधु आनंदराव व कारकून वराड प्रांतात आपल्या दर्शनास आले. त्याणी आपल्याविसी काय विनंती केली असेल ते स्वामीस विदित असेल. परंतु सदासिवपंत व यांणी एके विचारांत चालून कारभार सर्व करावा ऐसा सिधांत आपण व रावजीचे लस्कर एकत्र जाले ते समई करार करून दिल्हे. मग आनंदराव निघोन माघारे मंडळीसुधां आले, त्यास हे वर्तमान आम्हास कळविल्यावर मनांत बरे म्हणून राहिलो, कां जे स्वामीच्या मर्जीस ही गोष्ट या समई करावी ऐसी आलियावरी आम्ही वारंवार विनंती करावी; याने मात्र बेमर्जी करून घ्यावी हे गोष्टी उपयोगी नाहीं. जे समई कृपावंत आपण होतील तेव्हा सर्व प्रकारें आमचा अभिमान धरून आमचे उर्जित करतील, हा भरवसा जाणोन आम्ही पुणियांतच राहिलो. त्यास आपली स्वारी वराड प्रांतातील कामकाज होऊन हिंदुस्थानच्या मसलतीस गेली, ऐसे वर्तमान कळले, त्यास बरे स्वस्त राहावे, राजश्री माधवरावजी मुलुकगिरीहून आलियावरी काय जाबसाल करार करून देतात हा सिधांत पाहून तदनंतर सर्व वर्तमान आमचे होईल तेहि (विस्तारे) ल्याहावे, यास्तव वारंवार वर्तमान आपणांस लेहून पाठविले नाहीं; त्यास वैशाखमासीं राजश्री माधवरावजीची स्वारी माघारे पुणियास आली. त्यांचे दर्शन जाले. आठा चौ दिवसीं दर्शनास जात होतों. सखारामपंत बापू सासवडास कन्येच्या लग्नाकरितां राहिले होते. त्यास दोन मासपर्यंत लागले, यामुळे आम्ही काहीं हाललो नाहीं, ते पुणियास आलियावर त्यांची भेट जाली. दोन चार वेळा त्याजकडे गेलो. सर्व प्रकारें बोललो. त्याणी उतर दिल्हे, रावजी व आम्ही याचा विचार करून मग तुम्हास काय सांगणे ते सांगू, तुम्हीं वारंवार उतावळी न करावी. ऐसे उतर त्याणी केलियाउपर आम्ही बरें म्हणून राहिलो, वारंवार पुसिले नाहीं. मार्गप्रतीक्षा करीत बसलों. मधें काही एक दिवस सखारामपंत याणी श्रावण भाद्रपदापर्यंत औषध उपाय केला. याकरितां वारंवार त्यांजकडे जातां नये. त्यांचे औषध समाप्त होय तो अश्विन मास प्राप्त जाला. दरबारास जाऊं लागले. त्यास आमच्या बंधूनी व फडणीस आम्हाकडील या उभयतांनी अगोधर दोन महिने नाना फडणीस व बापू यांजकडे बहुतच बळकटी करून त्यास गोऊन

घेतले. नवरात्रामधें बापूकडे एकदोन वेळां गेलों. बरे म्हणत त्यास दसरियास तीन दिवसांचा अवकाश होता. ते दिवसी सरकारचा चोबदार बोलाऊ आला. आम्ही दरबारास गेलो, दरशन जाले. मग आम्हासी बोलावयासी नाना फडणिसास सांगितले. दिवाणखानियांत नाना फडणीस सांगो लागले जे, श्रीमंताची आज्ञा ऐसी आहे जे, येथील सिधांत ऐसा जाला आहे जे तुमचे बंधु सर्व कारभार करतील. तुम्ही कागदापत्रावर सिके मात्र करून द्यावे. त्यासी मेळून असावे. आणि याप्रमाणें करावे हे पुरवत नाही तर वडिलांचे कारकीर्दीची सिकेकटार आहे ती यांच्या हवाला करावी लागती. तरी काय ते उतर सांगणे. त्याजवरून आम्ही उतर दिले जे, आपण खावंद कामकाज सांगतील ते करीन; परंतु आम्हास काही त्याच्या हाताखाली वर्तणूक होणार नाहीं. यापेक्षां एका पोरग्यानसी आपल्याबराबर राहूं, त्यांत शोभा आमची आहे याविषई मात्र आमचा उपहास न करावा, ऐसे साफ उत्तर दिल्हियावर, मग त्यासमई घरास जा म्हणाले, मात्र मग दसरा जाला. चतुर्दशीच्या मुहूर्ते रावजीचे डेरे बाहेर होऊन डेऱ्यादाखल जाले. तदनंतरी सरकारातून आज्ञा आमच्या मंडळीस दिल्ही जे, तुम्ही नवी सिकेकटार केली आहे, तिणेच कामकाज कागदपत्र करा, सर्व कारभार करणे, त्यावरून आम्हाकडील कार्यभाग चालता जाला. मग आम्ही व्यर्थ काय सबब पुणियात राहावे, या अर्थावरून मागती सखारामपंताकडे जाऊन बोललो जे, इतके दिवस आपली वाट पाहिली, या उपरी आम्हास आज्ञा देवावी म्हणजे श्रीत्रिंबकेश्वराची यात्रा करून कृष्णातीरास जाऊन राहूं. त्यावरून त्याणीं निरोप देविला. मग आम्ही यात्रेस आलो. देवसांनिध्य दोन महिने राहिलो. या उपरी मांघारे कृष्णातीरास जाऊं. ऐसे आमचे कचे वर्तमान जाले ते आपणास कळावे यास्तव विस्तारे लेख केला. कृपा करून ध्यानात असो द्यावे. आमचा सर्व प्रकारे अभिमान आपल्यास आहे. त्याचा शेवटहि लावणे आपल्याकडे. आमचा सर्व अर्थ आहे तो आपलाच आहे, आपले दर्शन होईल तो सुदिन होईल. रा छ १४ साबान बहुत काय लिहिणे, कृपा असो दिजे हे विनंती+.

¶*Sadashiv Chimnaji Sachiv reminds Raghunathrao of his promise to help him in the settlement of his affairs by the Peshwa. The writer also describes to him what had happened in the meanwhile, especially how he had approached Sakharam Bapu, Nana Fadnis and the Peshwa and how they all had asked him to hand over the insignia of the Sachiv's office to his brother. The writer therefore requests Raghunathrao to use his influence and save him from humiliation.*

+ सचिव सदाशिव चिमणाजीचें रघुनाथरावास पत्र. यानें सचिवपदाचा उपभोग सन १७५८-१७८७ पावेतों केला. याचा धाकटा भाऊ आनंदराव याचा उल्लेख पत्रांत आहे. तिसरा भाऊ रघुनाथ चिमणाजी हा सखाराम बापू बोकील याचा जावई. या पत्रावरून जुन्या सरदारांची आबाळ व्यक्त होते.

No. 80] *[14-1-1767*

पैवस्ति छ १३ साबान

सन सबा.

श्री

विज्ञापना. भिकाजी नाईक कोलटकर यांजबराबर श्रीमंतांनीं आपणांस निरोप पाठविला कीं तुमचे कारकून कारकुनी फार घेतात हें ठीक नाहीं. ताकीद करावी. तें समयीं आम्ही सांगोन पाठविलें कीं येथील कारकुनास ताकीद केली व लस्करांत ताकीद करावयाविशी हरिपंतास लिहिलें आहे. थोडें बहुत पहिल्यापासून घेत आले आहेत, ते मात्र घेतील. जाजती होणार नाही. त्यास येविशीचा अर्थ गारपिरावर आपण सविस्तर सांगितला. दुसरें पत्र भिकाजी नाइकाबराबर पाठविलें. तिसरें पत्र येविशींचेंच आलें. त्यास आमचे मतें आम्ही वर्तणूक करितों याचा बोभाट खावंदाजवळ जावा असें दिसत नाहीं. मग कोणामुळें बोभाट आला असेल तो असोत. चाकरी करावी पोटासाठीं. त्यांत रिझाले आहेत ते मनस्वी करितात. ज्यास अबरूचा दरकार आहे तो पैक्याकडे पाहात नाहीं. सहजांत मेळविलें तर विचाराचे वाटेने मेळवितात असे रीतीची वर्तणूक करितों. तथापि खावंदाचे कानास बोभाटाची गोष्ट गेली, येविशी स्वामींनीं आज्ञा केली ती गोष्ट आम्हास शिरसा आहे. येथें सर्वांस ताकीद केली. आपण ताकीद केल्यास शब्द येऊं देणार नाहीं असेंच श्रीकृपेनें घडेल. स्वामीचें अन्न भक्षितों. वावगी बुद्धि कधीं होणार नाहीं; व दरबारचाहि रंग समजतो. नित्य गांठ. पहिला प्रकार नाही. येथें चिवडणारे शंभर आहेत, परंतु सारा दिवस जपोन खावंदांनी वाईट न म्हणावें असेंच रीतीनें वर्ततों. इतकेंहि करून खावंदाचे चित्तांतील संशय न जाई तेव्हां मग शब्द कोणास लावावा? परंतु खरें वर्तल्यास असें होणार नाहीं असेंहि आहे. आज्ञेचें लक्ष धरून वर्तत असों. दरबारीं लाहान माणूस आमच्या उण्यापुऱ्या गोष्टी सांगणारे बहुत आहेत. परंतु आपली सिक्षा अशी नाहीं, कीं दुसरियाची जरब आपल्यावर चढावी. जे बोलतील तेच फजित पडतील. परंतु फार संभाळावें लागतें. येथेंहि या गोष्टी दोनच्यार रोज गेल्यावर श्रीमंत बोलत असतात. येक दिवस लक्ष्मणपंत आपटे यांजबरोबर सांगोन पाठविलें कीं तुम्ही जसा यैवज सरकारांतून पावेता तशी कारकुनी घ्यावी. होन पावल्यास होन घ्यावे. नख्त पावल्यास नख्त घ्यावें. तेव्हां आम्ही सांगोन पाठविलें कीं ये गोष्टीचा बोभाट कोणाचा आहे? आमचें घेणेंहि फार नाहीं. जो देतो तो संतोषानें देतो. परंतु मर्जी जसें सरकारांतून पावेल तसें घ्यावें अशीच आहे. जशी मर्जी तसें करावी लागेल. फौजेच्या

गणत्यांच्या वगैरे चौकशा असाव्या असें म्हणत होते. ते वेळेस खातरजमेचेच जाबसाल केले, व गणतीचा बंदोबस्त चांगला केला आहे. आळस करीत नाहीं. स्वामीचे कृपेकडून पार पडूं असें दिसतें, मग ईश्वरी इच्छा न कळे. सेवेसी कळावें हें विज्ञापना.

¶*Haripant Phadke assures Nana Fadnis of his strict observance of the instructions of the Peshwa as regards fees exacted by the clerks. The paper is important as it proves how minute and strict the Peshwa was in his administrative matters.*

No. 81] [*17-1-1767*

पौ छ १९ शाबान

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १६ साबान मु॥ झासी स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. शरीरी अद्यापिहि अनारोग्य आहे; परंतु आपले कृपेकरून आरोग्यहि होऊन योजिले कार्याची कार्यसिधि स्वामीचेच पुण्यप्रतापे होईल. पौष कृष्ण द्वितीयेस झांसीहून स्वार होऊन काल्पीस गेलो. संक्रमणप्रयुक्त तीलशर्करा थैली सेवेसी पाठविली असे. कृपा करून स्वीकारून पावलियाचे उतर पाठवावयास आज्ञा करावी. काल्पीस गेल्यानंतर तिकडील नवल विशेष सरकार उपयोगी मजकूर असल्यास सेवेसी पत्र लिहून पाठवीन. त्या उपर दूर लांबणें तर लांबावे. मनसब्यास कल बसल्यास फिरोन तसा घाट उतरीन म्हटल्यास उतरत नाहीं. सेवकलोकीं विनंती मात्र ल्याहावी यास्तव आमचे पत्राची प्रतीक्षा असावी. सेवेसी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Vishvanath reports to Raghoba Dada his arrival at Kalpi.*

6731

No. 82] [21-1-1767

पौ छ २ रमजान सबा
माघ वाा जासुद जेथे
मुंकुदजी नाईक.

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ २० साबान वर्तमान यथास्तित असे विशेष. स्वामीनी छ (१) साबानचे पत्र पाठविले ते छ ११ मिाा पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. कागदपत्र आणविले होते ते आपण पाठविले ते:

शागिर्दपेशाचे हिसेब[१] होऊन सन खमसचे नेबाद पावले. त्याचे तेरीज व सितात नेबाद पावले ते तेरीज व सीतचे हिसेब करावयाचे होते ते करून पाा ते तेरजेसुधा.

कारकून सिलेदार वगैरे दीडमाहीचा पट.

सन इसनेत कर्नाटकांत स्वारी जाली ते समईचे खंडण्याचे झाड्याचे पुडके सापडले त्याच्या नकला करून पाठविल्या त्या.

पुण्यातील माणसाचा तपसील सवासे जाजती माणूस ठेविले येविसीचा तपसील लिहिला व श्रीमंतास पत्र लिाा ते दाखविले. फारसा तपसील सांगणे पडलाच नाही. त्याणीच आज्ञा केली कीं सवासे नवे ठेविले बरे केले.

राजश्री सखारामपंत बापू व नीलकंठ माहादेव यांजकडील सरंजाम खानदेश गुजराथ प्रांती आहे, त्याचा जाजतीचा पट निवडला तो.

पुण्यांत हशाम प्यादे सन खमसात होते किती व सालमजकुरी किती आहेत त्याची तेरजें पाा ती पावली.

सालव्यांचे चिठीकरितां बापूस नित्य पुसतो. श्रीमंताचे कानावर घालितो; परंतु चिठी येत नाही. होईल ते लिहून पाठऊ.

येणेप्रमाणे कागदपत्र सर्व पावले. श्रीमंतास समजाऊ. उभयताचे जाजती सरंजामात बेरजा होतात त्या यादी समजेल म्हणजे उतर होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पुण्याचे नेमणुकेचे राऊत लस्करात आले त्यांस पाठऊन देतो हे विज्ञापना.

¶*Hari Ballal in a letter to Nana Fadnis acknowledges the receipt of the various files of papers sent by him.*

---

१ पगाराचे हिशेब.

6732

No. 83] *[27-1-1767*

श्रीशंकर

सेवेसी केसो गोविंद चरणावरी मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञापना तागाईत छ २६ माहे साबानपावेतो सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान कलम बिताा :—

राजश्री भिवराव पानसी याजकडील यैवज रुो ३०००० तीस हाजार निकड करून वसूल करून घेणे म्हणून पाच सात पत्री सेवकास आज्ञा. त्यास यैवजाविसी तगादा करीत होतो. त्याच यैवजावर कापडकरी सावकारास तीस हाजाराची वरात दिल्ही, त्याजवरून पंत माारनिलेनी सावकाराची निषा जेस्ट शुध्ध प्रतिपदेची केली. त्याचे बजिनस पत्र सेवकास आले की वायदेप्रमाणे रुपये अम्हाकडे आले. मागाहून आज्ञापत्र छ १६ जमादिलावलचे राा जाले ते छ २० जमादिलाखरी सेवकास सादर जाले. तेथे अज्ञा की चिरंजीव राजश्री राव याजकडील तोफखानियास यैवज खर्च जाला येविसी चिरंजिवाचे पत्र हुजूर आले. तुम्हीं माारनिलेपासी यैवज न मागणे म्हणून आज्ञा. त्यास यैवजाचा जाबसाल तो अगोधरच अस्विन वद्य त्रितीयेस कापडकरी सावकार राजश्री अबाजी नाा काबरस व रामचंद्र नाईक परांजपे यांची निशा होऊन साहेबाचे नावाचे पत्र दिल्हे त्याची नकल आलाहिदा पाठविली आहे. सेवकास आज्ञा की रुपये न मागावे.

किल्यापासून भोजनशाळापर्यंत फर्षा रुद हात सुमार च्यार प्रमाणे बांधणे. स्वारी वैशाख मासी येई तोपर्यंत तयार करून ठेवणें म्हणून सेवकास आज्ञा. त्यास पाच सात पत्री सेवेसी विनती लेहून पाठविले होते की किती रुपयामध्ये बाधावा व आजमासहि पाठविला होता, परंतु किती रुपयामध्ये बाधावयाचे आज्ञापत्र सादर न जाले. वैशाख मासपर्यंत नेमली कामे तयार कर्णे म्हणून वारंवार सेवकास आज्ञा. खासा स्वारी आलियावरी फर्षाचे काम न जालियास मर्जी बेमर्जी होईल याजकरितां फर्षास पाया खाणून किल्याचे दरवाजापासून भोजनशालेच्या नजिक नाल्यापावेतो पाया दगडाने भरून जमिनीबरोबर आणिला. तो लक्षुमण अपाजी यास पत्र सादर जाले तेथे कलम की फर्र्यास रुपये बहुत लागतात तरी न करावा त्याजवरून काम महकूब केले. काम तयार जाले याचा हिसेब तयार करून येका दो दिवसात सेवेसी रवाना करितो. त्याजवरून जाल्या कामाचा व पुढे बाकीस राहिले त्याचा आजमास ध्यानास येईल. कलम १

6733

त्यास येका महिनीयाने अगोधरच यैवज सावकारी पडला. सेवेसी कळावे.
कलम १

दमाजी गाईकवाड व आपाजी गणेश याजकडे रुपयाच्या तगादियास कारकून दोन महिने पाठविले आहे. तगादा करितात. यैवज हतास येईल तेव्हा खरे. कलम १

किले पुरंधर वगैरे पौ सोन रुपे वगैरे जे आसल ते केवळ यैवजाची वोढ पडल्यास खर्च करणे म्हणोन पेसजी आज्ञा, त्यास आज्ञेप्रो सरकार नुकसानी न होता जेथवर खर्च करणे ते करीतच आहे. सेवेसी कळावे.
कलम १

रा गोपाळराव गणेश आमदाबाजेहून निघोन नासकास येतात. समागमे से दोनसे राऊत आहेत. खासगत लग्न करणार आहेत कळावे.

खंडेराव गाईकवाड दमाजी गाईकवाड याजसी तूट खाऊ(न) मुलेलेकरे सुधा निघोन इकडे येत होते. मागाहून दमाजीबावाकडून समजुतीस ग्रहस्त आलेच आहेत. समजुती करून घेऊन जातील. कलम १

खासा स्वारीवर्तमान परस्परे लोकवार्तेन कळते. सरकारी पत्री सेवकास आज्ञा बहुत दिवस सादर नाही. येणेकडून सर्वत्र च्यातकन्याये-

श्रीमंत रावसाहेबाची स्वारी कर्नाटक प्राती गेली. कृष्णा सुरापूरच्या मुााची पत्रे बातमीची आली. सुरापूरची वगैरे किरकोळ स्वस्तानेचा जाबसाल उरकले. हेदर नाइकाकडील वकील आलाच आहे त्याचा जाबसाल लागलाच आहे. तोहि लौकर उरकून पंचमाहलाकडे रोख होणार. हेदर नाइकाचा जाबसाल जाला म्हणजे दरोबस्त करनाटकचा जाबसाल जाल्यात आहेत. नवाब निजामआलीखानाकडे कृष्णराव बलाल गेले आहेत. तेथील जाबसाल उरकल्यातच आहे. साल मारी त्याजकडून बिघाड होतो येसा प्रकार नाही. रा दादो उधव किलेहायेचे हिसेब घेऊन बराबरच आहेत. किलेहायचा यैवज हातास लौकर येसे दिसत नाहीत. किलेहायेचे बेगमीस यैवज दिधला. येणेकडून येथ खर्चास वोढ पडली आहे. त्याहीमधे कोन्हाचा बोभाटा न पडता आज्ञेप्रा नेमणूकाचा दरमाहाचा यैवज व आजपावेतो हजूरच्या वराता जितक्या आल्या त्याचा यैवज झाडून पावता केला. इमारतीच्या कामाकडे लक्ष्मण आपाजी व पांडुरंग गोडबोले मिळून कमपेस त्र्यासी चवऱ्यासी हजारपावेतो पावले. यैवजाची वोढ याजकरिता दोन दिवस आगमागे पावत आहे. हा काळपरियेत कोन्हाचा बोभाटा पडू दिधला नाही. इतके आसोन हुजूर कोन्ही बोभाटा लिा त्यास उपाये नाही. कलम १

करून आज्ञापत्री मार्गप्रतीक्ष्या करीत आसे. कृपा करणार साहेब समर्थ आसत. कलम १

रविशाक्रमणाचे तीलशाक्रायुक्त सेवेसी पाठविले ते प्रा होऊन सेवकास सनाथ करून उतराची आज्ञा करणार स्वामी समर्थ आसत. कलम १

सदरहूप्रो कलमे आक्षरशा सेवेसी प्रविष्ट होतील. उतराची आज्ञा करणार साहेब समर्थ आसत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Keso Govind reports probably to Dadasaheb several items of news and of the progress of the works entrusted to him. The fort referred to appears to be Trimbak.*

No. 84] [*12-5-1767*

पौ छ १२ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री रावजी
स्वामीचे शेवेसी

पो गणेश शंकर सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १३ जिल्हेज मुा गोपालपूर पा देवालपूर सुखरूप आसो विशेष. आपण कृपा करून पत्रोंतर पाठविले ते पावले. समाधान जाले. यैसेच कृपा करून सांभाल करीत आसिले पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीमंत इकडे आले. तुकोजी होलकर यास सरदारीची वस्त्रें दिल्ही. नजर पंधरा लाख घेतले. नवा व जुना सरंजाम त्याजकडे करार जाला. सिरोज खारगोण देपूर तीन पा सरकारात घेतले. सिंद्याची सरदारीमध्यें चिवडा फार जाहाला. केदारजी सिंदे, माहादजी सिंदे यास घरी बसवावे, आपण कारभार करावा याप्रो घरफूट करून बोलू लागले. त्याजवरून व बाजी नरसी व राघोबा पाग्या याणी माहादजी सिंद्यासी बखेडा केला, त्याजमुले राजश्री अवचितराव यास दिवाणगिरी देऊन केदारजी सिंदे याचे विचारे चालावे याप्रो जाले.' बाजी नरसी रावोबा यांस हुजूर आणून महिपतराव पानसे याचे हवाले केले. ते मागील हिसेब पाहोन लोकाचे देणे वारावे म्हणून बोलत आहेत; व नजर कबूल करून दिवाणगिरीचा कारभार आपणास सांगावा म्हणून रदबदल करीत आहेत. त्यास कसे कसे ठरेल हे पाहावे. सिंदे होलकर यास निरोप लौकरच होणार. खासा स्वारी माघारे हिंदुस्थानास फिरली होती; परंतु सिंदे होलकर याणी कबूल केले की छावणीस आम्ही गोहद प्रांते जातो, याप्रो कबूल केले. सा खासा स्वारी गुजराथचे सुमार

फिरली आहे. मग पाहावे, कोण्हीकडे जाईल. वरकड आपणास सरकारातून येकदोन पत्रे मामलत इजाऱ्याने करार करणे, अथवा कमाविसीने ठेवणे, यासाठीं आपणाकडील मातबर माणूस पाठवणे; आणि रसदेची ऐवजाची तर्तूद करणे, येविसी गेली आहेत. त्यास आपले मर्जीस येईल त्याप्रो कबूल करावी लागेल. येथील मर्जी यैवजाची आहे. यैवज आपण लाख पनास हजार लौकर पाठवावे, म्हणजे मर्जी ठीक करून आपणास पत्र पाठऊ. रा आपाजीपंत सपरे आपणापासी आहेत. सांभाल करावा. पेशजी रुो देविले ते दिल्हे, तरी यात्रा आपण करविलीसी होईल. आम्ही पदरचे जाणोन, वेडेवाकडे लिहितो, रागे न भरावे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दिल्हा पाा हे विनंती.

¶*Ganesh Shankar writes to Vishwasrao Lakshman giving a detailed account of Raghoba's doings in the North, particularly the investiture of Tukoji Holkar and the adjustment of the domestic differences in the Sindia family.*

No. 85] [*22-5-1767*

श्री

विज्ञापना. काल गुरुवारी रा माहादजी सिंदे व केदारजी सिंदे व बाजी नरसिंह व राघोबा पागे व पोतेनीस त्यांची मंडलीस वस्त्रे द्यावयासी चार घटिका रात्री गेल्यावरी आणिले. कचेरीस येऊन बसले. श्रीमंतानी हती घोडे वस्त्रे सर्व आणिविली. मुख्यानी कचेरीस येऊन त्याजला द्यावी, त्यासी त्रिवर्ग मुत्छदी व विष्णु माहादेव व अवचितराव यैसे येकचित. वरकड सर्व मंडली त्याजकडे. रा चिंतो विठल दिवाण यानी श्रीमंतापासी जाऊन काय सांगितले न कले. सवा प्रहर रात्र जाहल्यावरी श्रीमंती सांगून पाठविले कीं, तुम्ही डेऱ्यास जाणे. मग सर्व मंडली उठोन आपले डेरेयासी गेली. वस्त्रे जामदारखानियात माघारी पाठविली. घोडे हती जेथील तेथे गेले. कालचे वर्तमान यैसे जाहले. अजी सुक्रवारी श्रीमंत होलकराचे घरास गेले आहेत. नजर काय काय करितील ते पाहावे. मागाहून लिहू. रा तुकोजी होलकर याचे नावे श्रीमंती सिक्के खोदून ठेविले. अजी देणार. किताब सुभेदारीचा देणार. मागाहून लिहू. अजी रावजी वडिलाकडे प्रात:काली अले होते. त्याजवरी बहुत राग केला. तुम्ही आमचे होऊन अमचीच नुकसानी करिता. माझाच घरावरी उठला. बहुत संताप केला. हे प्रहरभर बसोन चार गोस्टी बोलावयाच्या त्या बोलोन मग बिऱ्हाडास आले. दरबारचे वर्तमान या रीतीचे आहे. कालची गोष्टी तर राहिली. रावजी तर पूर्वप्रा कारभार त्याचा करितात. श्री यासी कल्याण करो,

याजला राजी सर्व अहेत. पाहावे काय ठरेल. मिती वैशाख वद्य ९ सुक्रवार मागला प्रहर दिवस. सर्व मंडली बहुत शरमिंदी होऊ माघारी गेली. खर्चबेहडा तुम्ही परभारा पाठविला म्हणूनहि बहुत बोलिले. अम्ही रावजीस विनंती केली होती कीं नानासाहेबास दाखऊन मग पाठवणे. चितास त्यांचे न अले. अम्ही सांगावयासी चुकलो नाही. बेहडा परभारा गेला. बहुत क्रुध आहेत. बहुत विषम बोलिले. कोठवर ल्याहावे? हे विनंती.

¶*A news-letter narrating how Raghoba first having made arrangements for presenting Mahadji Sindia, Kedarji Sindia, Baji Narsi and others with dresses of investiture, at the eleventh hour cancelled the ceremony causing great disappointment thereby.*

No. 86] [*26-6-1767*

श्री

यादी महमद इसफ जमातदार यासी मदत खर्चास सुा
समान सितैन मया व अलफ छ २२ मोहरम रुा ४०००
च्यार हजार रुो धोंडो महादेव दौलताबाद याजवर
वरात देणे

¶*A sum of Rs. 4,000 has been advanced to Muhammad Isaf to enable him to meet his expenses.*

No. 87] [*August 1767(?)*

पुणें जमाव नं. १६८६.

नकल.

श्री

तीर्थरूप राजश्री दादासा
वडिलांचे सेवेसी

आपत्ये माधवराव सां ना विा उपरी. येथील कुशल ताा छ २१ राखरपर्यंत वडिलांच्या आसीर्वादेकरून येथास्थित असो विशेष. सिवनेर किला मोगलाईत होता, महमुद अलमखान यांचे निसबतीस किला जुनर प्रांतात; मातबर किला सरकारांत असावा, येविसी तीर्थरूप कैलासवासी रावसा व आपासाहेबी बहुत प्रयत्न केला. तथापि किला हस्तगत न जाहला. किला बहुत उत्तम किल्याप्रां वडील जाणतात. त्यास किला जबरदस्तीने येणे नाहीं

याजकरिता राजकारण करून किला वस्य करावयाचा प्रकार तीर्थरूप कैलासवासी नानासाहेबी व भाऊसाहेबी चितांत आणून महतूसायासें महमुद अलमखान यासी अनकूल करून घेतले. देणे ते त्यास द्यावे, वतनें इनामे मागे मोगलाईतून असतील तीं चालवावी या प्रा इमान प्रमाण यादी करार करून दिल्या. त्या मशारनिलेजवळ आहेत. सनदापत्रहि करून दिल्या असतां गांव चालत नाहीं. मारनिलेचा वतनी गाव पाटिलकीचा व इनामहि मोगलाईतून याकडेच आहे. यैसे असतां गांव मारनिलेकडे न चालावा यैसे नाहीं. बहुधा हें सर्व वर्तमान वडिलांचे सेवेसं विदित जाले नसेल यास्तव विस्तारे विनंती लिा आहे. कृपा करून यांचा गाव याजकडे चालवावा. वडिली यास वचन प्रमाण दिल्हे होतें ते प्रमाणात ये, येविसीचा अभिमान वडिलासच आहे. शफतपूर्वक यासी करार जाहाला आहे, यास्तव विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुा होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa Madhavrao requests Raghunathrao to remove at once the impediments in the way of Mahammud Alamkhan enjoying the Inam granted to him by the late Peshwa. He recounts the history about the fort of Shivner, how Bajirao, Chimaji Appa and Nanasaheb tried hard to secure the fort. But on finding they could not do it by fighting, they thought it expedient to secure it by persuasion which they did by the grant of an Inam to the keeper.*

No. 88] *[2-9-1767*

पौ छ ८ राखर
समान भाद्रपद

अस्सल बमोजिब नकल

श्री

यादी राजश्री पंत प्रतिनिधि सूरसन समान सितैन मया व आलफ. सालगुदस्तां राजश्री बाळाजी माहादेव मांडवगणे यांणीं सन सबांत प्रांत कराड वगैरे येथील कलमांची याद लिहून दिल्ही आहे, त्यापैकी लढे यांचीं कलमें आहेत त्याचा फडशा करून घ्यावा.

सन सितांत भवानराव यांचा दंगा जाहला. त्याणी वसूल घेतला, तो हिशेरसीदप्रमाणें द्यावा म्हणोन यादींत लिहिलें आहे. व रयतेकडे दंग्यामुळें सरकारची बाकी राहिली ती दुतर्फी

पाहाणी दरसाल करावी म्हणोन लिहिले. ऐशियास मुलकची पाहणी केलिया आगोधर दंग्यामुळें मुलुक खराब जाहला आहे. पाहणी करूं नयें, गरगशा यादींत पडेल.

मजुरा द्यावी येणेंप्रमाणें यादींत लिहिलें आहे. त्यास भवानराव यांच्या वडिलाची आम्ही हिसेरशीद कैशी द्यावी ? व रयेतेपासून भवानराव यांणी ऐवज घेतला, यामुळें सरकारचा ऐवज बाकी राहिला, त्यास हिशेरसीदीचा ऐवज मागूं नये, व सरकारची बाकी दंग्यामुळें रयतेस सोडावी.

उभयतांच्या दंग्यामुळें उभयतांकडे वसूल सीत अखेरपावेतों जाहला असेल तो रयतेचे रुजवातमुळें रयतेस मजुरा देऊन दंगा करून उभयतांनीं वसूल नेला तो नेला. यानीं गावगंना पाहून ज्याजती वसूल जाहला असेल तो जाहला. पेस्तर रयतेस मजुरा देऊं नये. उभयतांकडील वसूल मजुरा पडून ज्या गांवीं बाकी राहिली असेल ते दार नादार पाहून घ्यावयाची असेल ते सरकारांत घ्यावी. प्रतिनिधीस देऊं नये. दंग्यामुळें उभयतांकडे वसूल पडला तो सरकारांत घेऊं नये. येणेंप्रमाणें करार.

दरसाल पाहाणी करूं नये. दुतर्फा पाहाणदार इतबारी पाठऊन येकदां मात्र पाहाणी करावी. लागवड व पड सर्व जमीन मनास आणून इस्तावे शिरस्तेप्रमाणें बांधून द्यावे. हिसेरशीद कराराप्रमाणें वसूल घ्यावा ; येणें प्रमाणें करार.

रामाजी माहादेव याणीं किल्ले घेतले त्याचे शिबंदी बाबद दाहा हजार रुपये घ्यावें म्हणोन यादींत लिहिलें आहे, त्यास आमच्या माहालचा ऐवज त्यांणीं घेतला आहे व आमच्या लोकांनीं चाकरी केली आहे, ऐवज आम्हास द्यावयासी ठीक पडत नाहीं. रुपये मागों नयेत.

रामाजी माहादेव याकडील हिशेब हुजूर येतील ते पाहून प्रतिनिधीकडे ऐवज घ्यावयाचा निघेल त्याप्रमाणें सरकारांत घ्यावा. येणेंप्रमाणें करार.

¶*The paper discusses the question of recovering revenue from places which suffered in the quarrel of the Pratinidhis.*

No. 89] [*21-9-1767*

पौ छ २ जोवल
समान आश्विन

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी. समस्त सावकारास सन सितात तीन लक्ष रुपये हैदर नाईक याजकडील खंडणीपैकी द्यावयाचा करार जाहला होता. ते रुपये हैदर नाईक

याजकडील खंडणीपैकी साल गुा सन सबात यैवज दिल्हा. त्यात राजश्री रामकृष्ण गंगाधर याचा यैवज रुपये ७००० सात हजार नेमिलेले आहेत, ते देऊ नयेत. अमानत ठेवावयाची आज्ञा केली होती त्यास हाली नेमणुकेप्रमाणे मारनिलेचा ऐवज देविला असे; तरी रा आबाजी नाईक काबरस व रामचंद्र माहादेव यास सांगोन अमानत यैवज ज्याचे घरी असेल त्याजकडून देवणे. रा छ २७ राखर सुा समान सितैन मया व अलफ हे विनंती.

¶*Balaji Janardan is ordered by the Peshwa to pay back the deposited amount of Rs. 7,000 to Ramkrishna Gangadhar.*

No. 90] [*Recd. 2-10-1767?*

पौ छ १ जोवल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री दादा यासी बालाजी जनार्दन आसीवार्द उपरी. पा उमरखेड येथील मामलतीवर नवा येक ग्रहस्त दरसाल वीस हजार रुपये चढ बोलत आहे. त्यास जुने मामलेदारास साधतो न साधतो, येविसीचा मजकूर लेहून पाठवणे म्हणोन श्रीमंतानी लिहिले. त्यास पेशजी पा मजकुरची मामलत राजश्री अंबाजीपंत याजकडे होती. त्यास त्यानी तोटा आणिला; व पुढे तोटा मागू लागले. याजकारिता व मारनिलेकडे मागील तफावत आठ्यासी हजार निघाली, सा मारनिलेची मामलत दूर करून राजश्री कृष्णाजी अनंत तांबे याजकडे गुदस्ता भर मख्तियाची बेरीज घालून सांगितली. त्याजप्रा मारनिलेनी कसोकसी करून मख्ता साधून, ज्याजती सतावीस हजार रुपये साधले. त्याचा खर्च गुदस्ता येकसाला दरोबस्त घालमेलीमुले जाहला. येविसीचा मजकूर मारनिलेनी आम्हास पूर्वी समजाविला होता; व श्रीमंतास मुखजबानी समजाविले. त्याचे स्मरण नसेल ऐसे वाटते. साल मजकुरी ज्याजती ऐवज गुदस्ताप्रा साधतील यापौ दरबारखर्च वगैर दाहा हजार रुपये जाऊन बाकी सत्रा हजार रुपये राहतील, त्यापौ सिबंदीचा बाहेरील पेच न पडल्यास कसोसी करून पंधरा हजार रुपये पावेतो दरसाल सरकारात हेच देत जातील. +कृष्णाजीपंताचे अगत्य सर्व प्रकारे आपल्यास आहेच. त्यास श्रीमंताचे पत्र व अजमास श्रीमंतास पुर्ते समजाऊन तोटा नफा ध्यानात आणून देऊन मामलत करार राखावयाजोगेच आहे. करार राखून उतर पाठवावे. याविशी विस्तारे लिहावे नलगे. बहुत

\+ येथून पुढें हस्ताक्षर नाना फडणीस यांचें असे.

काय लिहिणें, लोभ असों दीजे हे आसीर्वाद. बीस हजार दुसरा देतो, त्यापौ पंधरा तर हेच साधून देणार व नफेहि मागलि फार केले, तेव्हा हेच उतम आहे. समजाऊन उतर पाठवावें हे आसीर्वाद.

¶*Nana Fadnis writes to Moroba Dada explaining why the mamlat of Peta Umarkhed was entrusted to Krishnajipant Tambe, and how it is in the interest of Government to continue it to him hereafter. The addressee is requested to represent the matter properly to the Peshwa.*

No. 91] [*13-10-1767*

पौ छ २१ जमादिलवल
समान आश्विन पाहटेची
च्यार घटका रात्र
बा डांक

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हीं पत्रे पाठविली ती पावली त्याचे उतर.

लोक सातारा नगर ताथवडा चंदन सिवनेर तालुका येथे लोक रवाना करावयाविसी तुम्हास लिहिले होते. लोक रवाना केले, त्याचा तपसीलवार पट पाठविला त्यावरून कळल. त्यास नगर सिवनेर येथे तीर्थस्वरूपाकडील लोक खाली उतरोन आपले लोक चढले. वरकडहि किल्यावर लवकरच लोक चढतील. गुंता पडावा यैसे नाही.

तीर्थस्वरूपापासून नगरचा किला घेतला. त्यास पेडगांव सुधा घेतले कीं पेडगाव खाा करून घेतले हे ल्याहावयासी आज्ञा करावी म्हणोन लिहिले. ऐशास पेडगांव सरकारांत घ्यावे असें ठरले आहे.

रा छ १७ जमादिलोवल सुा समान सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa acknowledges receipt of reports communicated by Balaji Janardan that the forts of Satara, Nagar, Shivner etc. were taken back from Raghoba Dada and placed in charge of new garrisons for each.*

No. 92] [19-10-1767

१/३

पो छ २४ जाखर साईकाल

श्रीराम

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवेसी

पो मल्हार रघुनाथ सां ना विनंती येथील क्षेम ता अस्विन वद्ये द्वादसी मुकाम नासिक स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशष. स्वामीचे आज्ञापत्र येका संवछरानी अले ते बहुत अनंद जाहला तो पत्री कोठपरियेंत लेव्हावे? सेवकाचे वर्तमान तरी स्वामीची आज्ञा घेऊन घरास अलो ते घरीच होतो. स्वामीच्या अज्ञापत्राची वाट पाहिली, परंतु सेवकाचे स्मर्ण जाहले नाही. अता कृपा करून बोलाविले. तयार आहो. सोबत पाहून सत्वर स्वामीदरसेनास येतो. माझी कालजी स्वामीखेरीज कोणास आहे? इतके दिवस राहिलो त्यासी वतनाचा कजिया. आठ महिने घरी कोणासी खटखट केली नाही. लोक म्हणतील जे मुलालेकरासी खटखट केली, यास्तव उगाच होतो. जेस्टमासी श्रीमंत नानो[१] अले त्याजबरोबर आमचे बंधु अले. मालेगावीं दोन महिने मुकाम केला तेव्हा गारदीपणास पाठविले ते उगेच होते. मग श्रीमंत नाना जेनस्थानास अले. अम्हास म्हणो लागले जे गाव सोडून देणे. मग श्रीमंत दादापासी गेलो. कजिया फार जाहला. मग श्रीमंत नानानी अड श्रीमंत दादाजवल घातली जे मल्हार-पंताचा कजिया ध्यानात न आणावा. त्यानी माने केले. याची भीड मोठी. पुडे श्रीमंत रावसाहिब पुणियाहून येणार यास्तव कबूल केले. मग आम्ही उगेच राहिलो. भाद्रपद मासी श्रीमंत रावसाहेब अले. श्रीमंत दादाची त्याची भेटी जाहाल्या. श्रीमंत दादासाहेब घरी बसले. दाहा लक्षाची जाहागीर दिल्ही. श्नानसंध्या अनंदवलीस करावी, कारभार सर्व सोडिला, किले दादाकडे होते ते दिल्हे. सातारा जुनर नगर असेर चेंदन यैसे दिल्हे. याजकडे किले रावसाहेबानी ठेवले, श्रीत्रिबकेश्वर कावनवी धोडप सुभा केले. सोला पटा यैसे याजला दिल्हे. याजला जाहगीर पाचा लक्षांची दिल्ही. पंधरा लक्षांची जाहागीर तीस लक्ष कर्ज दादाचे रावसाहेबानी वारिले. श्नानसंध्या करावी याप्रमाणे ठराव जाहला. दिपवाली जाहली म्हणजे पुणियासी जावे बरोबर सरदारानी जावे मग हिंदुस्थानात रवाना करावे. दरोबस्त कारभार श्रीमंत रावसाहेबाकडे पडला. अपले मामल-

१ नारो शंकर

तीचा जाबसाल रावसाहेबाकडे. येथे श्रीमंत नानानी अड घातली जे झासी अम्हाकडे सांगावी. गोपालराव गोविंद मधे घातले. श्रीमंत रावसाहेब यानी उत्तर दिल्हे की तुम्हास सांगत नाही. रदबदली करू नका. झासी रावजीकडे ठेवऊ. दोन लक्ष रुपये राजश्री गोविंद रावजी व नारोपंत याजपासी मागितले. श्रीमंत रावसाहेबाचा कारभार लबाडीचा नाही. येकवचनी प्रमाण. त्यानी जे मागितले ते द्यावे. या उभयेतानी बहुत प्रेत्न केला दरबार चांगले अरजीविले. रुपये देणे लागले. राजश्री बापूची ममता; फडणीस मोरोबा सर्व अपल्यावर ममता करितात. •रुपयाची तजवीज लवकर करून पाठवावी. तुम्हास सेतू तुमचे वडील. घडिघडी घडिघडी निजध्यास झासीचा. दुसरे तुमचा वसिला रुपया तरी रुपयाची तजवीज करून पाठवावी. येक दिवस निश्चिंत न राहावे. हुंडी करून पत्र उभयेताचे पावताच तजवीज करून पाठवावी. येथे तुमचे वडील पाच लक्ष देऊ म्हणतात. तरी हुंडी जलदीने पाठवावी म्हणजे तुम्ही पार पडला. श्रीमंत रावसाहेबाची मर्जी बहुत नाजूक आहे.' श्रीमंत दादासाहेब केवल सांब ! महिण्याच्या जागा दोन महिने कामात पडत होते. येथे कांठियाच्या अनिवार यैसे आहे. कारभारी याच प्रमाण. उभयेता कारभारी आपले. यानी बहुत श्रम केले. श्रीमंत नाना सारिया रुपये जे मागतील ते देतील. यैसे असता यानी जडावा करून अपले स्थापिलेयाचे सार्थक हेच की रुपये हुंडी लवकर पाठवावी म्हणजे सार्थक जाहले. स्वामी सर्वजाण आहेत. यैवज लवकर येकघडीचा विलंब न करावा. सर्व वर्तमान उभयेतानी लिहिले आहे त्याजवरून कलो येईल. स्वामी दरसेनास सत्वर येतो. भेट होईल तो सुदिन असे. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Malhar Raghunath reports to Vishvasrao Lakshman the terms of agreement between the Peshwa and his uncle Raghunathrao.*

No. 93] [*Nov. 1767 ?*

श्री

३

[पहिले दोन बंद गहाल.]

विज्ञापना राजकी वर्तमान श्रीमंत रा। माहादाजी सिंदे पुण्यास दाखल जाहले. रा। अवचितरावहि समागमेच आले. श्रीमताची भेटी जाहाल्या. अवचितराव

येक दिवस पुढे आले. ते श्रीमत नानाचेच घरी राहिले. वरकड त्याजबराबरील मंड(ळी) स्वार बाहेर राहुट्या देऊन राहिले. नानाची ममता साधावी म्हणून राहिले. परंतु त्याची चितातून ममता नाही. पूर्वी रा। बाजी नरसिंह यानी दिवाणगिरीची वस्त्रे घेतली, महादजी बावाची सरदारकी त्याचीहि वस्त्रें घेतलींच होतीं. बाजी नरसिंह व बावा येकच आहेत. रा। गंगाधरपंत तात्या बाजी नरसिंह याचे पक्षी आहेत. रा। चिंतो विठल त्याचा अभिमान रावजीकडे. त्यासी ते श्रीमंत दादासाहेबापासी. नाना तर दामुषायण. तूर्त रावजीकडे दिवाणगिरीचा कारभार ठरेल यैसे दिसत नाही, तथापि न कले. अद्यापि मोघमच आहे बाजी नरसिंह व बावाचे येक चित आहे. निश्चय ठरायासी पौष मास लागेल. माघ मासी सर्वाची रवानगी होईल. रावजीहि येत्नात आहेत. मार्गी माहादजी सिंदे यानी रावजीसी करारशपत केली होती की, बाजी नरसिह यासी दिवाणगिरी देणार नाही, तुमची तुम्हांसच देईन, यैसे शपतपूर्वक भाषणे जाहाली होती. येथे आल्यावरी आणिखीच बुधी जाहली, येसे वर्तमान आहे. वडिलाचा दोही दरडी हात आहे. माहादजी सिंदे हे येथे आले म्हणून रा। तुकोजी होलकर याजला बोलाऊ पाठविले. ते येका दो रोजानी येतील. त्याचे सिंदेचे येक चित करून उभयेतास वस्त्रे देऊ रवाणा करावे याजकरिता होलकरास बलाविले. होलकर जेजुरीस आहे, होलकरानी व तात्यानी कातराबाद मांडोगण येथे राहून फौज धरून चालावे. यासी येथून चालावयासी त्या प्रांतास दोन मास लागतील. आम्ही श्रीमंत रावसाहेबास विनंती केली आहे. त्याजकडून रा। तात्यासी व सरदारास आपल्याविशई निक्षूण ताकीद की याचा बदोबस्त करून देणे. चिंता न करावी. श्रीमंत रावसाहेबास विनंती करून खासा पोश्याक सनगे उतम घेतली. उतम सोबत पाहून पाठऊ. वस्त्रे घेतसमई बोलिले कीं, तुम्ही आल्यावरी हती देऊ. बहुत कृपावंत आहेत. मुख्य सतोटी दरबारची राखावी. कराराप्रो यैवज व दरबार खर्चाचा यैसे पाठऊन द्यावा. मग दरबारची कालजी न करावी. वडिलाचा पेच तिन लाख रुाची वरात दिल्ही. ते म्हणतात कीं मजला येक रुा पावला नाही. त्यासाठी कजिया करीन. त्यासी पावतीचा हिसेब न पाठविला. आता तरी सर्व पाठऊन द्यावा. रा। बाबाजी प्रल्हाद आपल्या बहुत ममतेत आहे. त्याचे उभयेताचा रड (?) नित्य येतो. त्यासी त्या हिसेबाची मखलासी करून देऊन यैवज कोठे देवावा. नाही तर हिसेब रुजू करून बाकी काहाडून द्यावी. ते वडिलापासी घेतील, परंतु वडिलास परम दुःख होईल. परंतु त्याचा रुा येक देसी लावावा म्हणजे बाबाजीपंताचे समाधान. चिमणाजीपंत मर्द माणूस त्याजला रिकामे ठेवावे यैसे नव्हते. जे आपल्या विचारास आले ते खरे.

ज्यामधे आपली सालसी वाढे ते करावे. यैवजाची रवाणगी सत्वर करावी. आम्ही आपल्या कल्याणासाठी शतचंडीचा संकल्प केला होता. श्रीने मनोदयानुरूप सिधीस नेला. याजकरिता शतचंडी करावा. कळावे म्हणून लिहिले. रा त्र्यंबकराव नारायेण येथे आले. रा कृष्णराव बलाल यांचे हाते श्रीमंतास भेटले. दोन वस्त्रे दिल्ही. वोंकारापासी राहिले आहेत, वडिलाचे त्याचे दर्शण नाही. श्रीमंतापासी दोनच्यार महिने राहून अर्जव करावे. पुढे काही सोय करून घ्यावी यैसे मानस आहे. नित्य दर्शणास येक वेळ जात असतात. रा अनंदराव यादव होलकर याचे ममतेस आहेत. याजकडून बोलणे दरबारी तर अनदराव बोलतात. रा अंताजी विश्वनाथहि मायेत आहेत. दुसरे रा अताजी विश्वनाथ याची ममता आपल्याकडे बहुत वोढती. म्हणतात की रावजी आम्हांस बोलावितील, आमचे हाते काम घेतील तर आम्ही जाऊ. पत्र आले तर जाऊ यैसे मानस आहे. शाहाणा माणूस कर्ता आहे. आपल्याहि ध्यानातच आहे. सूचनार्थ लिहिले आसे. हुंड्याचा जाबसाल काय होतो तो मागाहून लिहू. जाटाचे वर्तमान तर आपल्यास तिकडून कललेच आसेल. श्रीनें मोठे अरिस्ट निरशन केले. आता आपला बंदोबस्त उतमप्रा करणे. कछवाधार, भदावराविशई रावजीस विचारले. त्यानी उतर केले कीं, याजला येथून दोन महिने आधिकच पाहिजेत त्या प्रांतास यावयासी. तो पावेतो तुम्ही धोपटून बसूल घेणे. उस्तवारी करणे. मामलत सांगतील न सागतील. विश्वास नाही. बहुनाइकी आहे. कलावे म्हणून लिहिले. स्वार प्यादे ठेऊन अगास नये यैसे करणे. आपल्या तालुकियात सिबंदी न वाढवणे. जमा थोडी खर्च फार. दरबारी हिसेबाचे समई खटपट पडेल. याजकरिता मागे पुढे शब्द न ये यैसे करणे. फडानिसाचे हाते सर्व कामकाज घेणे. अजमाज त्याचे बाचा व त्याचा कारकून पाठवणे. त्याचे पत्र आपल्याविशई सालसीचे ये यैसे करणे. रा हरिपंत तात्यासहि उतम प्रा ममतेचे लिहिणे. आपाभट खरे याचे वरातेचे रुा देऊन कबज सत्वर पाठवणे. सर्व पत्राचा जाबसाल घेऊन पाठविला त्यावरून कलेल. हे विज्ञापना.+

¶*This is the third sheet of a full letter addressed from Poona to Vishwasrao Lakshman at Jhanshi, communicating news from the Poona Court where the Peshwa was trying to befriend Mahadji Sindia.*

+ पत्र पुणें दरबारांतून विश्वासराव लक्ष्मण याचा कारकून स्वतरेंत आपल्या यजमानास लिहितो.

No. 94] [1767?

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी नारायेण लिमये सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताो वैशाख शुद्ध १३ मुाा चिंचोली सरकार मलिखेड स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान प्राण रक्षूण मात्र आहे. विशेष सालमजकुरी खासा स्वारी बेदराहून सरकार मजकु(रा)वरून कृष्णापार जाहाले. घासदाणे काहीं जाहाले. मुलुक पायमली जाली. येक चितापूर माहाल, तेथे तिगस्ताची बाकी गुदस्ता रुजू करून घेतली. गुदस्ताबाबती सरदेशमुखी व सालमजकुरबाबती सरदेशमुखीचा यैवज आमचे रुो पंचवीस हजार, त्याचा ठराव काडलूर संगमचे मुकामी राा बाजीपंत व राा नागोराम याचे विद्यमाने जमीदाराचे व जाहागीरदाराचे कमाविसदाराचे विद्यमाने कागदपत्र जाले, तो मागे भोसले येक महिना राहोन तमाम चारणी केली. तदनंतर नवाब फौजसुधा येऊन गेले, याजमुलें तमाम मामलत बुडाली. येक पैसा वसूल यैवज नाही. त्याउपरी राज्याची गडबड जाली. याप्रमाणे तमाम मुलुक खराबी जाहला. सालगुदस्ता खाबाची मामलत केली ते तकूब जाली. यामुले सिबंदीचे पेचात च्यालीस पनास हजाराचे आलो व बाबतीपौ बाकी फार राहिली. साल मजकुरी पुणेयास येऊन चरणदर्शन जाले. राज्याचे गडबडीमुले माझे काम काहीच जाहाले नाही. यंदा मामलत न करावी तरी बाकीचा यैवज कसा उगवतो म्हणोन रसद दिली. यैवज मामलतीचा झाडून राा नागोराम याजकडे नेमून दिल्हा. मामलत तो बुडाली. त्याजकडून कारकून व राा राऊत येऊन फारच निकड केली आहे. तरी कृपालु होऊन नागोपंतास सरकारचे पत्र की उभयतां पुणेयास आलियावरी आज्ञा होईल त्याप्राो वर्तणूक करणे. दोन वाटेपावेतो मामलतीचा यैवज विसाजीपंताकडून पावला असेल. राहिले यैवजास तगादा तूर्त न करणे म्हणोन पत्र आलिया प्राण वाचतो. मज गरिबावर कृपावंत होऊन उत्तर आले पाहिजे. आज्ञा होईल त्याप्राो पुणेयास येईन. सर्व प्रकारे मी बुडालों आहे. सावकाराचे हाते पार करणार आपण समर्थ आहेत. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Narayan writes to Sakharam Bapu explaining the difficulties of his situation and asking relief in his Kamavisi business.*

6746

श्रीरामचंद्रवरद

विनंती सेवक राघो अनंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना कीं

पहिली जासूदजोडी सेवेसी पाठविली त्याची उतराज्ञा तिसरे मासांती पावली. त्यांत आज्ञा कीं, कमाना न घेणे व मोत्ये घेऊन ठेविली आसतील ते पाठवणे. ऐसियासी कमाना तो आज्ञेप्रो घेतल्या नाहींत. मोत्ये मोल्हेरीस पाठवावी म्हणून पहिली आज्ञा होती. त्यावरी हुजूर पाठवावयाची आज्ञा आली. त्यास मार्ग बहुत कठिण. जासुदासमागमे निर्वाह होणार नाही ऐसे जाणून (न) पाठविली. तैसीच आज्ञा आली तरी जासुदाबा पाठऊन देईन. कासीद जोड्या दोन हुजूर आल्या, त्याजला बहुत दिवस जाले. येकहि माघारी फिरली नाहीं. येथे जासूद होते त्याचे शरीरास दुखण्याचे उपद्रव जाले. आज्ञांकिताचेहि शरीरास स्वास्त नवते. येदाचा प्रज्यन्य काल भारी; जासुदाचा निर्वाह नाही, याजकरिता दोन पत्रे वारीदार कासिदाबा रवाना केली ते हुजूर पावली किंवा नाही हे न कले. प्रजन्य उघडलियावर जोडी रवाना करावी. त्यास अम्ही खरिदीचे कार्यावर ऐसे ज्यघन्य आणि बहुत दिवस शहरात राहिलो. खरिदी तों कांहीच केली नाही. येक मोत्याचा कारभार, तो तरी गुप्त, याजकरिता कितीक क्षुद्र माणसाचे सांगितल्यावर आमची विनंतीपत्रे हुजूर रवानगीची

बंदर सुरत येथील मजकूर तरी प्रस्तुत इंग्रेजाची जबरदस्ती व उदीम व्यापारहि सर्व त्याचेच घरी खरीदी फरोखत होते. मातबर मातबर व्यापारी सर्व कष्टी आहेत. आविंधासहि स्थिरतेची आशा नाही, ऐसे जाणून आहिर्निसी अन्याये द्रव्य मेलवावयात कमरबंदी केली आहे. परस्परे कारभारियांत विरूध चालते. तैसेच प्रजेत काहीं आविंधाचे पक्षी, कांहीं इंग्रज ऐसा डामाडोल आहे. प्रस्तुत काली नवा इंग्रेज मिस्त्र परहेज आलियावर फारसखान नामे आविंध मातबर याजकडे फुरजा बंदरची मामलत होती; तो पहिलेपासोन इंग्रेजाचे पक्षात याजकरिता मुख्य नवाबासी विरुध, व त्याचा पक्षी सिधी जाफर तोहि मातबर धनाधीश त्याजकडे खुशकीची मामलत, यासी विरुध, याजकरिता इंग्रेजाजवल दर्शविले जे फारसखान मामलतीत गुंजायेश ठेवितो. त्याजवरून इंग्रजाने मुंबईस लेहून त्याजवर आमीन टोपीवाला आणिला. तेव्हा मारनिले त्याचे विद्यमाने काम करून आपला जिमासा खत करून पुन्हा दर्शविले कीं सिदी जाफरवर टोपीवाला खुशकीचे मामलतीवर आणावा. हा निश्चये मारनिलेस कलोन इंग्रेजासी पैगाम केला जे आठ हजार रुपये

धरावी याजकरितां तीन मास परियंत विनंतीपत्र सेवेसी न लिहिले. सेवटी कार्तिक वद्य पक्षी यात्रेचे मिसे बाहेर निघोन मौजे इभ्रामे प्रा गल्हे आमल राजश्री दमाजी गायेकवाड हें गांव राजेश्री रामचंद्र बसवंत याचे मोकासियांत आहे. नजीक सुरत पाच कोस तापी उतर तीरी स्थल करून राहिलो. आतां बेफिकीरी जालो जे इकडून बातमी लिहिल्याची व तिकडून आज्ञोतराची चिंता नाही. आम्ही आठवे रोजी शहरात फेरी करीत जाऊ. हुजुरून आज्ञापत्र येईल ते इभरामियास यावेल. सेवेसी श्रृत होये.

कलम १

बंदर सुरत येथील मजकुरी आलमपन्हा पुरे जात कोट मजबुत म्हणावा तरी पुरुषाचे मस्तकपरियत उंच वर सफील[१] हात दीड; तो जीर्ण जागा, सफील पडली आहे. दरवाजे बारा; तेथे मात्र चौकी पंधरा वीस माणसे, मधे क्वचित दोन दोन च्यार च्यार माणसे बेफिकीर निःकालजी. तोफ तो कोठेहि ज्यारी होयेसे नाही. नवसरी दरवाजा पश्चमचा, तेथील मातबर बुरूज धसोन पडला आहे, त्याची देखील मरमत कोणी करीत नाही; मग कोटाची कोण करितो. खंदकहि खोल नाही. सहजात घ्यावेसे आहे. तोफा लावल्या सहजात कोटपडे ऐसा विचारे, पुरेजात घेतल्यावर प्रतिवर्सी नेमणुकसिवाये घेत जावे, परंतु टोपीवाला न आणावा ऐसे होता. गुंजायेशसी कलो न आली. हे वर्तमान मुंबईस लिहिले ते आज्ञा आली जे, आठ वर्से आमची मामलत जाली आहे, त्या दिवसापासून आजपरियंत सासष्ट हजार रुपयांची निशा करून घेणे; मग दुसरा विचार. याजवरून सिदी जाफर याजला तगादा केला. हा कालवर फडचा जाला नाहीं; परंतु सिदी जाफर याचा मनोभंग पुरता जाला कीं हरयेक प्रकारे इंग्रेजाचा उछेद करावा. याजकरितां राजश्री दमाजी गायेकवाड याजकडील चवथाईचा कमाविसदार रुद्राजी गिरमाजी नामे या प्रांतीचे सकल कमाविसदार महाला निहाय दिमत गायेकवाड मामलतीचे फडसे करावयासी पटणास जाणार. त्याजसमागमे उद्वेगात जाणून त्यासीं सिदी जाफर याणे मुख्य नवाबासी गुप्त मसलहत करून केवल येकोपा भासऊन राजश्री दमाजीबावासी पैगाम करविला आहे कीं तुम्ही फौजसह वर्तमान शहरावरी येणे. तुम्ही आम्ही येकत्र होऊन इंग्रेजास काढून आर्धोआर्ध मामलत वाटून घेऊ. इतके वर्तमान पत्रद्वारी तो त्याजपरियंत प्रविष्ट जाले. परंतु कमाविसदार समुदाये मंडली राजश्री रामचंद्र बसवंत राजश्री आपाजी गणेश व गोपालराव गणेश

१ तटाची भिंत.

शहरपन्हा तो सुरत वस्ती जाली तईचीं+. केवल जीर्ण, तोहि येईल. येक किला मात्र सत्वर यावयाचा नाही. तो शहर घेतल्यास विचारे येईल, चिंता नाही ऐसा प्रकार आहे. जर करितां खासा स्वारी माघारी देशाकडे फिरली, तरी माल्व्यातून पावागडावरून बडोदियास आल्यास राजेश्री दमाजी गायेकवाड याचेहि समाधान होईल, वगैरे कितीक कामे खंबायत व भाडोच इत्यादिक संपादोन शहर सुरतेवर यावे. हस्तगत व्हावयाचे संदर्भ श्वल्पात व्हावयाचे बहुतेक हुजूर येऊन पावतील. कदाचित मर्जी घ्यावयाची नसली तरी चालते स्वारीत दाहापाच लक्ष रुपये येतील; व या प्रांती प्रतापवृद्धि होईल. केवल आफ्तर विचार दिसतो. तथापि मर्जीस येईल कीं खासा स्वारी महत्कार्याविना येणे कठिण. हा आपले ऊर्जिताशेने लिहितो. ऐसियासी माझे प्रारब्ध. सर्व गुण असोन आज तेरा वर्षें स्वामीचरणी कुच रोटी कुच लंगोटी याजवरच निश्चल जाले. पुढे ऊर्जित हेच कीं स्वामींचा म्हणविलो. करून दिल्हे आभये आसामी स्थापन केल्यास येखादे क्षेत्री श्वानसंध्या करून आभीष्ट चिंतन करीन. नाही तरी स्वामीप्रतापवृधीनेच ब्राम्हणाची उपजीविका ते 'ब्रम्हं ज्यानातीं ब्राम्हण:' हे स्वामीचरणसंयोगे सिध जाले आहे, तेव्हा तीर्थे च गोचरी भिक्षा पवित्राणि यांचे मामलतीचे फडशानिमित्य आमदाबाजेस आटकले आहेत. थोडा-बहुत दखल शहरांत जाला. पुरता बंदोबस्त करून पटणास जातील तेव्हां श्नाहून मामलती विल्हेस लागतील. त्याउपरी गायकवाड सुरतसंमधी वगैरे कोणीकडे जावयाचा उद्योग करितील ते पाहावे. त्याचे मनासहि पूर्ण आहे काये म्हणून जाणावे; तरी रुद्राजी गिरमाजी केवल त्याचे दरबारी लाहानाचा थोर जाला, त्याजकडे आपले दरबारची चौकीयात तापी दक्षणतीरची मामलत च्यार पांच वर्षे आहे, ते गायेकवाडाचे मते आपलीच आहे; व यंदा त्याजला मुख्यानी बोध केला की ज्याप्रो चौकियात मामलत आपणाकडे करून घेतली आहे, त्याप्रो शहरची मामलत आपणाकडे करून घ्यावी म्हणजे कार्य बहुत साधेल. त्याजवरून मारनिलेने हुजूर श्रीमंत रावसाहेबाचे सेवेत आपला ग्रहस्त मामलत अरून घ्यावयानिमित्य पाठविला होता; परंतु श्रीमंत साहेबी त्याजला न देता नरोतमदास याजकडेसच बहाल ठेविली. प्रा डभई मात्र हे व विठल हरि व त्रिंबक सूर्याजी या तिघांची शराकत[१] होती ते दूर करून दुसरा मामलेदार पा व किलदारहि दुसरा पा. ते डभईस जाऊन बसले आहेत; परंतु त्रिंबक

+ त्या वेळेचा.

१ वाटेदारी, हिस्सा.

कलौयुगे ॥ कालक्षेप चालेल; परंतु खासा स्वारी त्या प्रांती आल्यानेच उतम आहे. यावरी मर्जी.

कलम १

राजश्री दमाजी गायेकवाड याणी बाबीचा पराभव करून कांहींयेक स्थल त्यांजला राहावयास दिल्हे व काहीयेक स्वार चाकरीस नेमणूक करून बाकी सर्व जागा हस्तगत केली. प्रा पटण प्राचीन मातबर स्थल व माहाल इमारत देखोन मन प्रसन्नतेने तेथेच वास केला आहे. तमाम मामलत तेथेच बसले करावी, या योगे तमाम कमाठीदारास तेथे बोलाविले आहे. मामलती विल्हे लागल्यावर काये करितील हे न कले. खासा स्वारी हिंदुस्थानात गेली ते समईपासोन कारकून बोलाऊ आले; व आज्ञापत्रे बहुतेक आली. सेवटी राजश्री रामचंद्र बसवंतहि आले आहेत; परंतु दमाजी-बावा हुजूर येतील हा भरंवसा आज्ञां-कितास तो पहिलेपासोनच नाही, मग आता कोठून यावा. यावर ए कले. पहिले याणी राजपिंपले येथील राज्य आर्धोआर्ध वाटणी केली. नवे स्थल राहावयाचे आपलेकडे ठेविले. जुना किला राज्यास दिल्हा. त्याउपरी प्रस्तुत काली गोविंदराव गायेकवाड मुख्याचे चिरंजीव बडोदियाहून जाऊन कोणीयेक माहितगारचा विद्यमाने जुने स्थल घेतले. राजा पलोन पलीकडे डोंगरात गेला. तो तमाम सूर्याजी याचे तर्फेने किले मजकुरी कारकून आहे तो म्हणतो कीं श्रीमंत दादासाहेबाची सनद आल्यास किला देईन कीं पुन्हा हुजूर विनंतीपत्र मारनिलेन लिा आसेल ते पुणियात होते. हुजूर आहेत. तेथे श्रीमंत साहेबाचे आज्ञेप्रो कारकून मारास ताकीद लिहितो; परंतु स्वामी हुजूर सनदेचे आपेक्षेने मानीत नाहीत. सेवेसी श्रुत होये. आज्ञांकित सुर्तेत येऊन बसला आहे याजवरून नरोत्तम-दास याचा हेत कीं परभारे इकडे न येता हुजूर हिंदुस्थानात यावे. मग सुरत साध्यविषई वगैर मामलत सेवा करून आपले ऊर्जित करून घ्यावे.

कलम १

राजश्री आपाजी गणेश हुजुरून आल्यादारभ्य राजश्री दमाजी गायेकवाड याजसमागमे कालक्षेप बहुत संकटे केला. राजश्री रामचंद्र बसवंत आता आमदाबादेस गेले आणि रा गोपालराव गणेश याचा यैवजाचा हवाला घेऊन मामलतीस आपले विद्यमाने कमाविस-दार करून यैवजाची निशा घेतात. आद्याप पुरता बंदोबस्त जाला नाही; परंतु थोडक्याच दिवसांत होईल. त्यावर गोपालराव याचा उद्योग कोणी-कडे होईल हे न कले. दैवयोगे उभयेथा खराबा होऊन मुलकाची खराबी केली. उभयताचेहि परिनाम लागतील तो सुदिन. कलम १.

6750

राज्याचे गांव मारितो; व सोनगडाकडेहि उपद्रव किंचित आहे. याजवरून गोविंदरायानी भाट राज्याकडे पाा कीं पनास हजाराचे राज्य देतो व राजपिंपले घेतल्यापूर्वीच बहुत दिवस नादोद प्राा याजला राज्याने दिल्हा होता तो देतो. ऐसियासी त्याणे न मानिले. राज्य झाडून बेचिराग करीन म्हणून बोलतो. राा दमाजीबावाकड राज्याची पत्रे गेली आहेत, त्याचे काये होईल ते पाहावे. येकूण राजपिंपले व खेडे व बाबीची मातबर स्थले याचे हाती चांगलीच बेफिकीर बसोन कालनिर्वाह कराविसी आली आहेत. त्याजवरहि दबाव खासा स्वारी या प्रांती आलियाविना होत नाहीं. कलम १

श्रीमंत रावसाहेबाचे सेवेसी मोगलाचे वकील बहुत दिवस येऊन बसले होते. त्याजवरून छावणी संमधी कामकाज विल्हे लाऊन श्रीपंढरपूर परियंत स्वारी दाखल जाली. पुढे जिकडे कार्य उपस्थित होईल तिकडे जातील, तेव्हा कलेल. वरकड चहूकडे पीक पाणी खरीप रबी देश स्वत क्षेम आहेत. कलम १

याप्रांती खासा स्वारी यावयाचा निश्चये जाला तरी आज्ञा आलिया बंदर सुरत येथील सर्व नक्ष हुजूर विनंती पत्रासमागमे दोनच्यार कागद कोरी पाने जोडून यथास्थित लेहून पाठवीन. अज्ञा आली पाहिजे. कलम १

सदरहू सात कलमे अक्षरशाहा अवलोकन करून मर्जीस येईल त्याप्रो उतराज्ञा सदर करणार धणी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Ragho Anant in his letter to Raghoba reports how the English power at Surat was growing and implores him to occupy Surat in the Peshwa's name as the present situation of the country offered the best opportunity for it.*

No. 96] [*1767?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण
स्वामी गोसांवी यांसी

पो माधवराव बल्लाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष. बिनीस ढमढेरे व जासूद नाईक चालत असतात, त्यास ते गांवगंना मनस्वी रुपये घेतात. रयतीस तसदी फार बसते याजकरितां

उभयतानी कांही घेऊ नये; याप्रो करार करून तुम्हास पत्र लिहिले असे. तर ढमढरे व जासूद नाइकास ताकीद करून मना करणें. सरकारचे बिनीवाल्यानी मात्र दर गावास दोन रुा सरकारांत घेत जावे. आणखी तसदी देऊ नये. याप्रों ताकीद करून करवणे.

¶This is the Peshwa's order to Ramachandra Ganesh and Visaji Krishna asking them to stop Dhamdhere and the head-Jasood exacting money from ryots and thus harassing them.

No. 97] *[1767*

श्री

यादी पत्रे संस्थान उदेपूर:

१ गोविंद कृष्ण याचे नावे पत्र की तुम्ही तुकोजी होलकर याजला फौजसुधा घेऊन जाऊन, मेवाडचा मुलुक मारविता, नाना प्रकारचे उपद्रव लाविले आहेत. त्यास संस्थानाकडे खंडणीचा यैवज करार केला तो वसूल जाला पाहिजे. त्यात खलेल पडल्यास तुमचा मुलाजा होणार नाही ऐसे समजोन फौज मेवाडातून काढून देवण.

१ होलकर यास पत्रे की तुम्हास दोन च्यार पत्रे पाठविली की तुम्ही परभारे राणाजीचे मुलकास उपद्रव न लावणे. तुमचा यैवज येणे पाचसा लाखहि बांधून यैवज घेणे ते तुम्ही तुकोजी होलकर यास फौजसुधा रामपुरियाकडे पाठविले. त्याणी तमाम मेवाडात उपद्रव मांडिला आहे. गाव मारितात. कमाविसदारास बोलाऊ पाठविले त्यास रोजीना दाहा रुपये लाविले आहेत. नाना प्रकारचे उपद्रव मांडिले म्हणून हुजूर विदित जाले. यैशास संस्थानाकडे खंडणीचा ऐवज करार केला आहे; त्यापौ तुमचे वाटणी बमोजीब रुपये तुम्ही गुदस्ताच वसूल घेतला. हाली संस्थानाकडे यैवज राहिला तो सरकारचा, ऐसे असोन सरकारचे वसुलास तुम्ही खलेल करिता हे गोष्ट परिछिन्न कार्याची नसे. याजउपर पत्रदर्शन फौज आपली मुलकातून आणावी. सरकारचे यैवजास दिकत पडल्यास मर्जी राहणार नाही यैसे समजोन वर्तणूक करावी. तुमचा यैवज येणे असेल त्याचा तह पाचसाला सरकारातून करून दिल्हा जाईल त्याप्रो साल मजकुरी जो यैवज ठरेल तो

श्रावणपावेतो तुम्हास कमाविसदार पावता करितील. तुम्ही परभारा उपद्रव न लावणे म्हणोन पत्रे :

१ मालजी होलकर+

१ गंगाधर येशंवत

१ तुकोजी होलकर यास तुम्ही पत्रदर्शनी मुलकातून फौज घेऊन येणे.

—

३ तीन पत्रे येक मजकुराची.

—

४

¶*The Peshwa issues orders to Govind Krishna, Tukoji Holkar and Gangadhar Yeshwant to stop ravaging the territory of the Rana of Udaipur and to march out with their forces from Mewar as the Rana was paying tribute to the Peshwa regularly.*

No. 98] *[26-6-1768*

पाा छ १० सफर

आषाढ

श्री

श्रीमंत राजश्री राऊ

साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति. येथील वर्तमान ताा छ ९ सफर पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विशेष. स्वामींनी आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा की सातारियाचे जामदारखानापैकी सोन्यारुप्याचे दागिने भांडी वगैर किले पुरंधर येथे होती त्याचा जाबता तुम्हाजवळ आहे तो पाठवणें म्हणून. त्यावरून जाबता सिकेयानसी होता तो सुबाजी इखे व खंडोजी धोत्रे जासूद दिाा आबाजी साठ्या याजबरोबर सा बंदी जोडगिरीचे बंद सेवेसी रवाना केला आहे. आवलोकन करून, माघारी पाठवावयाची आज्ञा जाली आणि फिरोन आल्यास पूर्ववतप्रो दतरी विल्हे लाऊन ठेऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञप्ति.

¶*Naro Ballal forwards to the Peshwa the list of jewellery and other valuable articles belonging to the Chhatrapati of Satara.*

+ Died on 27-3-1767.

No. 99] [*Before 18-8-1768*

श्री

यादा यणप्रा सरकारची पत्रे :

श्रीमंत रावसाहेबास पत्र की आपाजी गणेश यासी उतम प्रकारे लिहून शहर अमदाबाद व ठाणी गोपाळराव याचे हवाला करून तुम्ही हुजूर येणे म्हणून.

राजश्री सखारामपंत बापू यासीं पत्र की तुम्ही आपाजी गणेश यास पत्र रावसाहेबाचे व आपले यैसी दोन पत्रे पा की शहर अमदाबाद व ठाणी गोपालराव याचे हवाला करून हिसेब घेऊन तुम्ही लौकर येणे.

आलाहिदा-मसुदाप्रा

रा दमाजी गाईकवाड यास पत्र की तुम्ही गोपालराव याचे सर्वप्रकारे अगत्यवाद धरून साहित्य करून शहर आमदाबाद येथे अमल बसऊन देणे, येविसी पूर्वी तुम्हास दोन च्यार पत्रे पा परंतु अद्यापवर कार्य केले नाही. येकवाक्यता आज्ञा पाहिजे म्हणून खाली उतर पा तर आपाजी गणेश याचे पारपत्य उतमप्रा करून गोपालराव याचा अमल शहर व ठाणीसुधा बसऊन देणे म्हणून पत्र.

सदरहूप्रा

भगवानजी ताकपीर याचे (पत्रा)चे उतर की तुम्ही * * * * यासी सामील जाला. उतम * * * * कार चाकरी उतम प्रकारे करणे. गोपालराव याचा अमल शहर व ठाणीसुधा सुरू जाला म्हणजे तुमचे चालवितील म्हणून तुम्ही सरकारकाम येकनिष्टेने करणे म्हणोन.

भडोचकर नवाबासी पत्र की तुम्ही गोपाळराव याचे साहित्य.

गोपालरायाचे पत्राचा जाब की पत्र पावले ; मार कलला. त्यास रा दमाजी गास निक्षूण पत्र लि आहे ते त्यास पावते करणे, येविसी सरकारचे कारकून बलवंत बाबूराव यांसीहि आज्ञा करून गाडाकडे पाठविले आहे. त्याजसमागमे पत्रेहि

दिल्ही आहेत; तेहि येऊन पोहचतील. गायकवाडास सांगतील. भगवान ताकपिरास व भडोचकरास पत्रे पाा आसेत; घेणे.

—

३

तिन्ही पत्रांचे जाब सदरहुप्रो दिल्हे पाहिजेत.

¶*The letter gives drafts of the Peshwa's letters to several officers intimating them of the transfer of Gujarat from Appaji Ganesh to Gopalrao Barve and asking them to help the latter.*

No. 100] [*16-12-1768*

पो छ १४ साबान सन तिसा

श्री

विज्ञापना आपण छ २९ रजबची पत्रें जासुदाबराबर पाठविली ती छ ६ साबानी तुळजापूरचे मुकामी पावली. पत्रें आली ते समई श्रीमंत रा दादा व मी श्रीमंताचे डेऱ्यात बसलो होतो ते समई लाखोटे आणून दिल्हे. त्यास सरकारचे लाखोटे निवडिले. माझे मी निवडून घेतले. माझे हातचे दादानी घेऊन वाचून पाहिले ते समई काय म्हणावे? उपाय नाही. त्यांची मर्जी तर असी. त्या पत्रांत प्रतिनिधि व सचिवाचा मजकूर लिहिला होता व श्रीमंतास प्रतिनिधीचे मजकुराची येक पुरवणी होती. त्यास वाईट वाटावे असा मजकूर प्रतिनिधि व सचिवाचा होता. परंतु त्यांचे काही नाव नवतेंच. कागद वाचून मजजवळ दिल्हे. मी सहजाखालीच घेतलें. चाकरमाणूस धण्यानी लाखोटे फोडिल्यावर काय करावे? श्रीमंतास लाखोटा दिला व पत्र माझे लाखोट्यांत होते तें श्रीमंतास दाखविले. उत्तरे होतील ती मागाहून पुण्याहून जासूद आले आहेत त्याजबाा लेहून पाठवितों. सचिवाविसी विनंति येताच केली. जाबसाल लाखाचा जाला तो मागे लिहून पाठविलाच आहे. आता स्वामीनी लिाा त्यास येकांती गाठ पडत नाही काय करावे? श्रीमंत व दादा बसले असताच करितो. होता होईल ते खरे. असेहि करिता येकांती येकाधे दिवसी गांठ घातली आणि विनंति केली तर सकाळी याजवळ सांगतात त्यापक्षी सांगोन फल काय? श्रीमंत दादांजवळ नेहेमी असतों. परंतु दरबारचे वर्तमान काडीभर कळत नाही. मग आपणास काय लिहावे? सारांश गोष्ट कागद स्वामीचे येतील ते याची गांठ पडोन याणी फोडून पाहिल्यास चिंता नाही असे असावे. यंदा कांहीं नाजूक लिहावयाचे नाही. असे करिता लिहिणे जाले तर

परभारे पत्र श्रीमंतास लिहावे म्हणजे गुंता वारला. असे करिता मजलाच काही लिहिणें लागले तर तसीच रवानगी मजवल दुसरे कोणी नसता कागद पावला तर चिंता नाही. रोज लाखोटे यांचे दृष्टीस पडतात असे नाही. परंतु न जाणो यांची गाठ कोणे समई पडेल त्या पत्रात काय लिहिले असेल ते कलेना. जीव भितो याजकरिता विनंति लिहिली असे. सर्व स्वामीस समजलेंच आहे. त्याहून विशेष कांहीं नाहीं. या पत्राचे जाब इतकाच स्वामीनी पाठवा(वा) की तुलजापुरचें मुकामचें पत्र पो तें पावलें. म्हणजे हें पत्र पावलें असें मजला समजेल. श्रीमंत रा दादास न कलावे असे आता काय लिहावयाचे आहे! तथापि लिहिणे जाले तर मजवल कोणास न कलता पत्र पावे असें आल्यास चिंता नाही. कलले पाहिजे. बापू सचिव व सदासिवपंत काल निरोप घेऊन पुण्यास गेले. तेथे आल्यावर कागदपत्र सर्व आपणास दाखवितील त्याजवरून कलेल. येथे कारभार करून गेले. आपणाकडे येतील भेटतील, त्यास आपल्याकडून वाकडेपण त्यासी काही करू नये. ही माझी विनंति आहे. कां म्हणाल तर याचे कारण हेच की हा प्रकार पुण्यापासून घाटतो. न करावयाचे तें केलें. धणी आहेत. मग आपण उगेच वाकडे कशास दाखवावे? धण्यास वाटावे की आम्ही केल्या कारभारास हे हिसके मारितात. त्यास आपण इतक्या गोष्टी करणार नाहीत, परंतु मी आज्ञानपणे लिहिले असे. तिसरा मजकूर कर्नाटकात जावे, सुरापूरचे मुलकात तूर्त सिरावे असा मजकूर हाता ता राहिला. कारण भोसले येत नाही लौकर, त्यापक्षीं संशयाचें कारण जालें. याजकरिता विचार ठरला की भोसल्यासी बिघाड करावा, कर्नाटकात गोपालराव व रास्ते मात्र पाठवावे, वरकड सारी फौज घेऊन वराडचे रोखे व्हावे. याप्रो करार करून काल तुलजापुराहून कूच करून सुरापूरचा रोख सोडून ढोकी परगण्याचा गाव रामगड आहे तेथे दाहा कोस आले. येथे येक दोन मुकाम होतील. मग पुढे बिडावरून जाणार. रुकनुदौले धारूरचे घाटावर आहेत त्याजकडे पत्रे गेली आहेत की तुम्ही फौजसुध्धा येऊन भेटावे. रामचंद्र गणेश याजकडे पत्रे गेली की तुम्ही फौजसुधां पुढे न जाणे. वराडचे रोखे होणे. तुकोजी होलकर यास पत्रे गेली की नर्मदा उतरला असिला तरी फिरोन वराडचे रोखे येणे. याप्रो मनसुबा ठरला आहे. पुढे काय होईल पाहावे. लस्करचें वर्तमान स्वामीस कचे लिहावे परंतु कलत नाहीं. काय करावे? तजविजेने बाहेर मनास आणावे तेव्हा कलते. वरकड काय लिहूं. येथे मी बहुत जपोन आहे. स्वामीचा आसीर्वाद पार पाडील ते खरे. भोंसल्याकडे जावे असे ठरले ते दिवसी सखारामपंत, कृष्णराव, गोविंद सिवराम, दादा श्रीमंत होते. सखारामपंताचे स्वरूप पुण्यांत होते ते येथे नाही. गोपाल नाईक पुण्यात आपणाजवल

काही मजकूर सकारपूर्वकाचे मनसुब्याचा बोलिले तो मजकूर आपण मजजवल सांगितला. लस्करात आल्यावर श्रीमंतास व दादास येके ठाई बसले असतां सांगितला. कोठून हे वर्तमान निघाले, तुम्हाजवल कोण बोलिला ते सांगा असे म्हणत होते. परंतु मी काही नाव सांगितले नाही. प्रमाणिक मुखेकरून ऐकिले आहे, नांव कशास पाहिजे? मग काहीं बोलिले नाही. सचिवाचा व प्रतिनिधीचा जाबस्वाल सुधा करतीलसा दिसत नाही. विनंति करितो, उतरे मागाहून पाठवीन. वरकड कामें स्वामीनी सांगितली त्यास गाठ पडत नाही. स्वामीस सत्य वाटेल की नाही देव जाणे असो. स्वामीनी सांगितल्यावर मी अनमान करीन की काये हे मनात येतच असेल. मग पाल्हाल कशास लिहूं? आजपर्यंत जाले वर्तमान लिा असे. पुढे होईल तें लिहून पाठवीन. तुलजापूरचे मुकामचे पत्र पावले इतकाच जाब लिहावा म्हणजे पत्र पावले असे मजला कलेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना रवाना सोमवार

¶*Haripant Phadke writes a full letter to Nana Fadnis at Poona from the Peshwa's camp at Tuljapur. The letter discloses many important points in Peshwa Madhaorao's method of work. The Dada referred to is Moroba, cousin of Nana who was the principal Secretary of the Peshwa and without whose knowledge no affairs could be transacted. Nana Fadnis was rather jealous of his cousin Moroba Dada.*

No. 101] [*31-12-1768*

पो छ २४ साबान
मार्गसीर्श

श्री

श्रीमंत रा नाना स्वामीचे सेवेसी

पो माधवराव नारायण सां नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २१ साबान पावेतो वर्तमान येथास्थित असे. यानंतर तोतिया किले नगरी आहे. हा किले देवगिरीस पाठवणे आणि देवगिरीस तुलाजी आंगऱ्या आहे तो आणून पुणियास पावता करून पुरंधरावर पाठवणे म्हणोन हुजूरची आज्ञा जाली आहे. परंतु येविशी सरकारची सनद नाही व बराबर हुजूरचे लोक व राऊतहि आसिले पाहिजेत व कांहीं आम्ही येथून देऊ. त्यास पंचवीस राऊत व पनास गारदी व येक कारकून हुजुरून पाठऊन द्यावा. येथून राऊत व लोक त्याबरोबर देऊन तोतियास देवगिरीस पाठऊन देऊन तेथून तुलाजी आंगऱ्यास आणून सेवेसी पाठऊन देतो. बहुत काय लिा लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Madhavrao Narayan requests Nana Fadnis to send some more troops and gardis to safely escort the Pretender to Devgiri fort and Tulaji Angria back to Poona from Devgiri.*

तोतया घनगडास नेला त्यास त्याजला काये करतात आणि कसकसा ठेवितात हे तुम्ही व आम्ही मिळून घनगडानजीक जाऊन पाहू. त्याजवरून राघोपंत व आपण पर्वतीहून निघोन घनगडाआलीकडे पांच कोस भोवरकस म्हणोन गांव आहे तेथे गेलो. तों रावोपंताचे कोणी सोयरेधायरे भेटले. त्याचे जवल राघोपंत जाऊन भोजन केले. आपणास बोलाविले नाही. मग आपण चितात आणिले की याणे आपल्यास जेवावयास बोलाविले नाही, आपण त्याजपासी कशास असावे ? असे जाणून आपले हाते भात करून जेऊन लागलेच पुण्यास फिरून आलो. आपले बिन्हाडी पर्वतीस आलो. महिणाभर परियेंत पहिल्याप्रो भिक्षा मागूण असो. मग येके दिवसी सिवराम दीक्षित आपणास पुण्यात भेटले ते कोठेसे भेटले म्हणून पुसिले, त्यास मोरभटाचे घरी होते. मोरभटाचे तुम्हास काये ठावके म्हणून पुसिले, त्यास पर्वतीस रावोपंतानी सांगितले होते की सिवराम दीक्षित तोतयाचे बरोबरचा आहे. मग आपण त्याजला विचारले कीं हे दीक्षित कोठे राहतात ? तेव्हां रावोपंती सांगितले की पुण्यात मोरभट याचे घरी राहातात, त्याजवरून आपण सहज मोरभटाचे घरास गेलो. तेथे दीक्षितांची भेट जाली. तेथे मोरभटाची व कोंडभटाची वोलख झाली. त्याणी आपणास विचारले कीं तुम्ही कोठे असता ? आपण सांगितले कीं पर्वतीस असतो. ऐसे बोलून बिराडास आलो. मोरभटाचे घरी माहादाजी नारायेण येत असे. याची मग येका दो दिवसी मोरभटाचे घरी वोलख येत जात होतो. दीक्षिताचा आमचा नमस्कार होत असे. आपणास दीक्षिताकडे जावयास कारण हेंच की तोतया खरा आहे की खोटा आहे हे सिवराम दीक्षितास ठाऊक असेल, त्याजला विचारावे याजकरिता जात होतो. विचारावयाचे कारण हेच की जर खराच असला तर सिवराम दीक्षित त्याचे कश्चेपींचे आहे त्याचे बरे होईल. त्याची वोलख असल्यास आपलेहि बरे होईल म्हणोन दीक्षिताकडे जात असो. तेव्हां दीक्षित रोज गंगाधर-भट कर्वे याचे घरी जात येंत असत. आपणास येक दिवसी बरोबर गंगाधर-भटाचे घरी दीक्षित घेऊन गेले. भटजींनी विचारले कीं दीक्षितबावा तुम्ही बरोबर ब्राह्मण आणिले आहेत हे कोण ? मग दीक्षित बोलिले की हे द्राविड ब्राह्मण आहेत. हे राघोपंत रेवदंडेकर याजबरोबर घनगडाजवल जाऊन आले आहेत. त्याजवरून भटजींनी आपल्यास विचारिले की तोतयाचे वर्तमान काय आहे ? आपण सांगितले कीं किल्यावर अटकेत ठेविला आहे म्हणून ऐकतो ऐसे सांगितले. मग दीक्षित व आपण तेथून उठोन आपलाले घरास गेलो. साहेबी पुरसीस केली की तुम्ही घनगडाजवळून राघोपंतापासून आला हें वर्तमान दीक्षितास

काये ठाऊक ? त्यास आपण सहज दीक्षिताजवळ बोललो होतो. त्याजवरून दीक्षितानी गंगाधरभटजीजवळ सांगितले. पुढे दोनच्यार महिणे दीक्षित व आम्ही येका दो दिवसी भेटून बोलत असू. गंगाधर भटजीनी व विसाजीपंत गद्रे याणी श्रीमंतास राक्षेसभुवनाचे मुकामी पुण्याहून तोतयाविसी काही पत्र लिा आणि मजपासी दिल्हे. मजला म्हणाले की तुम्ही आमचे ममतेचे आहात. हें पत्र रघुनाथभट करवे श्रीमंतापासी आहेत त्याजवळ पावते करून ते त्याचे श्रीमंताचे उतर आणून देतील ते घेऊन येणे. त्याजवरून आपण पत्र घेऊन राक्षसभुवणीचे मुकामी जाऊन ते पत्र रघुनाथभटास दिल्हे. त्याणी श्रीमंतास देऊन उतर दिल्हे ते गंगाधरभट यास व विसाजपंत गदरे याजपासी घेऊन आलो. तें पत्र गंगाधरभटजीणी वाचले. त्यात श्रीमंताणी लिा होते की तुम्ही घनगडास जाऊन तोतया खरा आहे की खोटा आहे याची चौकसी करून येणे ऐसे आपण ऐकिले. मग दोचौ दिवसी गंगाधरभटजीणी नागोराम यासी घनगडास पाा. विसाजीपंत गद्रे व शामराव ऐसे भाऊ खरा म्हणत असेत, त्याजवरून त्यासहि नागो रामाबराबर दिल्हे. ते किल्यावर जाऊन तोतयासी पाहून खाली आले. आपण मणसुबा केला की हे गेले आहेत, तोतयासी खरे खोटे करितात हे आपण जाऊन पाहावे, यास्तव आपण घनगडाखाली नागो रामाजवळ गेलो. आपल्यास नागो राम बोलले, कीं तूं श्रीमंतापासी रघुनाथभटाजवळ जाऊन पत्राचे उतर घेऊन आलास, तू किल्यावर जाऊन आपले दस्टीने तोतयासी पाहून येणे. त्याजवरून आपण परवानगीने वर्ता जाऊन तोतयासी बोललो कीं तू खरे किंवा खोटे हे जसे असेल तसे सांगावे. उगेच भ्रमात घालता. त्याजवरून तो बोलला की जे बोलणे तें नागोरामापासी व विसाजीपंतापासी व रामरायापासी सांगितले आहे. तुझी आपली काही वोलख नाही, तूं येथून जा. त्याजवर आपण खाली नागोरामापासी आलो. त्याणी विचारिले कीं तुम्ही जाऊन काय केले ? आपण सांगितले कीं तोतयासी पाहेले आणि जे बोलावयाचे ते तुम्हापासी बोलिले आहेत असे आपणासी बोलला आणि मजला जाये म्हणोन सांगितले. मग आपण खाली आलो ऐसे नागोरामास सांगितले. त्याजवर नागोराम व विसाजीपंत व शामराये ऐसे वेहेरास आले त्याजसमागमे आपणहि आलो. तेथून नागोराम याणी गंगाधरभटास पत्र पुण्यास लिहून येक मणुष्य पाा. ते पत्र गंगाधरभटास पावलियावर तेहि वेहरास आले. तेथे भटजीसमागमे दीक्षितहि आले त * * नागो रामाचे व गंगाधर भटजीचे ऐसे याचे भाषण येकांतात काये झाले ते आपणास ठाउके नाहीं. येक दोन दिवस वहेरी अवघेच होते. उपरांतिक आपण पुण्यास आलो. बिन्हाडी राहिलो. त्याजवर दोचौ दिवसाणी नागोराम व गंगाधरभटजी वगैरे सर्व पुण्यास

6759

आले. आपण आपले बिऱ्हाडी दोन तीन महिणे होतो. सिवराम दीक्षित याचे येथे जात होतो. त्याजवर श्रीमंत राक्षेसभुवणाहून पुण्यास आले. गंगाधरभट व नागोराम याची व श्रीमंताची काये बोलीचाली जाली ते आपणास ठाउकी नाही. मग फिरोन गंगाधरभट श्रीमंताची आज्ञा घेऊन व पत्र घेऊन घनगडास गेले. समागमे विसाजीपंत गद्रे व शामराव व सिवराम दीक्षित व राम दीक्षित व अनंदराव देशपांडे पुणेकर व दौलतगिरी गोसावी गंगाधरभटजीचे समागमे होता तो ऐसे घनगडास तोतयापासी वोलखावयासी गेले तेव्हा आपणहि समागमे गेलो. तेव्हा किल्यावर अवघेजन गेले, आपणहि गेलो. तेथे तोतयाचे व गंगाधरभटजी व विसाजीपंत व दीक्षित याचे भाशन येकांतात काये जाले ते आपणास ठाऊक नाही. मग अवघेजन खाली आले. येऊन विसाजीपंत गदरा व शामराव व गंगाधर भट ऐसे कुदरीस जनकोजी तोतयाकडे गेले. दौलतगिरी गोसावी व अनंदराव देशपांड्या पुण्यास आले. आपण चितास विचारले कीं गंगाधरभट वगैरे कुंदरीस गेले आहे, हे तेथून येतात तोंपावेतो कोकणात च्यार दिवस पोट भरावयास जावे. इतक्या गृहस्थाच्या वोलखी जाल्या आहेत. तोतया खरा जाल्यावर हे ग्रहस्त आहेत, याचे बरे जाल्यावर आमचेहि बरे करतील. ऐसे जाणून कोकणात परभारा घनगडाहून गेलो. दोन महिने कोकणातच होतो. मग पुण्यास आलो तो वर्तमान ऐकिले की दौलतगिरी गोसावी याणी काही माणसे नेऊन घनगडात फितूर केला त्याजबद्दल नागोराम वगैरे याजवर इतराजी जाली. कितीकांची डोचकी मारली ऐसी वदंता ऐकिली. सिवराम दीक्षित व विसाजीपंत गद्रे व शामराव ऐसे धरले गेले. गोसावी पळून गेला ऐसे ऐकिले. पुढे घनगडाहून तोतयास पुण्यास तोफ-खान्यात आणिला ते समई कोंडभट पुण्यांतच होते, त्याची व आमची भेट होत असे. आपल्यास येकदोन वेळा गारदी येऊन तोतयासी भोजन व दशम्या करून घालावयासी घेऊन गेले होते. तेथे तोतयाचे व आपले बोलणे काही झाले नाही. पुढे तोतया अणुबाईचे वाड्यात नेला, तेथे गोधूबाई वाडियातून येत जात असे. साहेबी पुरसीस केली की गोधूबाईची व तुमची वोलख कधी जाली त्यास आपण गंगाधरभटाबरावर घनगडास गेलो आलो हे गोधूबाईस ठाऊक होते. आपल्यास गंगाधरभटाचे घरीहि येकदोन वेळा भेटली होती त्याजमुले तिची आपली वोलख होती. पुढे अणुबाईचे वाड्यांत तोतया होता. गोधूबाई आली ते आपल्यास विचारू लागली की शामभट घरचा मजकूर कसा काये आहे? तेव्हा आपण उतर केले की खरे खोटे आपणास ठाऊक नाही. आपण त्याजबरावर नवतो, तुमचे तुम्ही वोलखूण घ्या. खेपा झाल्यावर हिरमुष्टीभर अन्न मात्र आपणास प्राप्त करवावे. कोंडभटहि नित्या भेटत असे. तो व आपण बोलत असूं की

खेपा झाल्यास उतम आहे. मग तोतयासी तोफखान्यात नेले तेथेहि येक दोन वेळा गार्दी येऊन दशम्या करावयास नेले. दशम्या करून घातल्या. चौकीमुळे काही भाष झाले नाही. मगतो तयासी नगरास पाठविला. मग कोंडभट आपल्या घरास गेले. आपण पुण्यातच होतो. उपर मोरभट येक दिवस म्हणत होता की माहादाजी नारायण व कोंडभट ऐसे नगरास गेले आहेत म्हणून ऐकतो ऐसे बोलला. त्याजवरून आपण नगरास गेलो. तेथे चौदिवसी बाजारात कोंडभटाची व महादजीपंताची व आपली भेट जाली. तो व आपण चिमणाजीपंत मुजमदार याचे घरी त्याचे बिऱ्हाड होते तेथे गेलो, तों कोंडभटाणी सांगितले की किल्यातून तोतयाची चिठी आपणास आली आहे, कीं मीरखान वगैरे किल्यात फितावले आहेत. भगवतसत्येकडून काम घडोन येईल. मग त्याणी दोघाणी नारोबा शागिर्द माहादाजी नारायेणाचा होता तो पुण्यास कासीपंत फडके याजकडे काही ऐवज आणावयास पा।, तो कासीपंताजवळ जाऊन दोनसे पुतल्या घेऊन आला. त्या पुतल्या किल्यातील लोकास वाटल्या व कोंडभटाणी आपले घरीहून काही आणिले रुा व सोन्याची कडी तेहि वाटली. मग कोंडभट याणे खेडकडुसानजीक कोरगांव आहे तेथील पाटील रामजी व माहादजी व काही कोली ऐसे घेऊन नगरानजीक आले. तेथे लोक ठेऊन दोघे पाटील व कोंडभट ऐसे बिऱ्हाडास माहादाजी नारायणापासी आले. पुढे रात्री किल्यातील लोकाणी माल टाकावी आणि त्याणी तयार असावे, बाहेरून कोल्याणी वगैरे जाऊन माल वेंधूण किला घ्यावा ऐसा मनसुबा होता. तो अगोदरच किल्यात फितवा जाला म्हणोन कलले, त्याजवरून त्याणी किल्याची बंदोबस्ती केली. बोभाटा जाला. मग आपण व कोंडभट पळून पंढरपुरास गेलो. माहादाजी नारायेण कोणीकडे गेला आपल्यास ठाऊक नाही. नगरात होतो ते समई कोंडभट आपल्यास बोला होता की येथे कांही ऐवज लागला तर रामाजी माहादेव व शंकराजी केशव हे आपले या कार्याचे ममतेत आहेत, जो ऐवज लागेल तो देतील. पुढे तोतया दौलताबादेस नेला. आपण पंढरपुरी होतो. तेथे मणसुबा दोघाणी केला की खायापियास नाही, कोठे देवद्वारी राहावे. मग तेथून निघोन जेजुरीस आलो. देवलात होतो. तेथून पुण्यास गेलो. तेथे गणपतीचे दर्शणास गेलो, तो गोधूबाई आली होती तिची आपली भेट जाली. आपण त्याजला नगरचे वर्तमान साकल्यें सांगितले आणि आपल्यास खायास नाही, खराब जालो ऐसे सांगितले. मग गोधूबाईणे धर्मदाखल रुा शंभर देते म्हणून सांगितले आणि वाड्यांत गेली. आपण आपले बिऱ्हाडास परवतीस उभैता गेलो. तेथे गोधूबाईणे आपल्या माणसाबरोबर रुा शंभर पाठऊन दिल्हे, ते रुा आपण उभैताणी घेऊन पोटास खात होतो. पुढें

उभैताणी मणसुबा केला की येथे उगेच बसून काये? कोठे तऱ्ही पोट भरावयास जाऊ. आता जाणे तर औरंगाबादेस जाऊन पोटहि भरू आणि तोतयाचा काही कांही प्रेत्न जाल्यास करू. ऐसा मणसुबा करून सातारियास+ धर्मशालेस जाऊन राहिलो. रोज देवास जात येत असो. तेथे येक दिवस केशोभट पुजारी गणपति किल्यातील त्याचा तेथे आला, त्यास आपण विचारले. त्याणे किल्यात असतो म्हणोन सांगितले. त्याजवरून आपण त्यासी च्यार गोष्टी ममतेच्या बोलून आपले वर्तमान सांगितले आणि त्याजबरोबर काल्या चबुऱ्यापरियेत गेलो आणि त्यास वाटेणे सांगितले की किल्यावर तोतया आहे त्यास आमचा नमस्कार प्रविष्ट करून याचा जाब आणून देणे म्हणोन सांगितले आणि त्यास दक्षना दोन च्यार रुा दिल्हे. त्याणे कबूल केले की आमचा जेथवर प्रेत्न होईल तितका करून म्हणून बोलून किल्यास गेला. आपण सातारियास बिऱ्हाडी गेलो. पेशजी जेजुरीमधे मल्हारपंत व शामा ब्राह्मण आम्ही पंढरीहून जेजुरीस गेलो त्याचे अगोदर हे दोघे जन देवापासी सेवा व ज्येप करीत होते, तेथे देवलात त्याची आमची वोलख जाली होती, तेथे त्याला आपले हे वर्तमान कुल सांगितले होते. त्याणीहि आपले वर्तमान आम्हास सांगितले कीं दाहापांच वर्षे आपण येथे सेवा व ज्यप करितो. मग आपणास आसीर्वाद दिल्हा की तुमचे कार्य होईल आणि तोतियाहि खरा होईल. काही चिंता न करणे ऐसे बोलिले होते. त्या ब्राह्मणास जेजुरीत दृष्टांत जाला कीं सातारियास जाऊन सेवा करणे. त्याजवरून ते सातारियास आले. तेथे त्याची व आपली मागती गाठ पडली. त्यास आम्ही आपले वर्तमान सांगितले. मग ते व आम्ही येकत्र जालो. अंताजीपंत पहिले पुण्यामध्ये सदासिवभट धर्माधिकारी याचे घरी राहात होते ते तोतयाकडे अणुबाईचे घरी वगैरे येत जात असेत, याजमुले त्याची आपली वोलख होती. तो नगरचे फितुरात काही नवता. तो शहरात बाईजीपुऱ्यांत पाचसात महिणे राहिला होता. आपण येक दिवस साता-रियाहून शहरास आपला कोणी सोबती वोलखी असेल तर भेटल म्हणोन गेलो. तेथे अकसमात बाईजीपुऱ्यात हणुमंताची पूजा अंताजीपंत करीत होता त्याची आपली भेट जाली. त्याचे बिऱ्हाड बाइजीपुऱ्यात पाहेले. आपण आपल्या गोष्टीहि त्याजपासी सांगोन सातारियास आलो. येथून सारे सोबती घेऊन चौघे जन शहरीं अंताजीपंताचे बिऱ्हाडास आलो. तेथे दोनतीन महिणे होतो. चंपाशष्टी जालियावर येक दिवसी दौलताबादेस धोत्रजोडा घ्यावयास आलो आणि दरवाजियावर सांगितले की अगांतुक ब्राह्मण आहे. मजला आत भोजनास जाऊ द्या. त्याजवरून दरवाजकरी याणी जाऊ दिल्हे. मग शहरपणियात केशोभटाचे घर पुसत त्याचे

+ औरंगाबादेजवळील सातारा.

6762

घरास गेलो. त्याचे मुलाची व आपली वोलख नव्हती. आपण त्याजला पुसिले कीं तुम्ही केशो भटाचे कोण ? तेव्हा त्याणी सांगितलें कीं आम्ही त्याचे पुत्र आहो. मग आपण त्यास सांगितले कीं तुमचे बापाची आमची वोलख आहे, आम्ही कांही त्यास दक्षना दिल्ही आहे व आपले वर्तमान सांगितले आहे. तेव्हा कासीनाथ बोलला कीं तुमचें वर्तमान आम्हास कलले आहे. आमच्याणे नमस्कार तोतयासी पोहोचावयाचा जो प्रेत्न होईल तो करू. मग आपण त्यास सांगितले की तू शहरास येकदा येऊन आमचे बिऱ्हाड पाहून जाणे. त्याजवरून तो व आपण शहरास गेलो. तेथे अवध्यास भेटविला आणि वर्तमान सांगितले. मग तेथेहि तो बोलला की जेथवर आपल्याच्याणे प्रेत्न होईल तो करू. मग त्यास येक रुा दक्षना दिल्ही आणि वाटे लाविला. त्याजवर तो फिरून आला नाही व आपणहि किल्यास आलो नाही. आत्माराम नाईक सावकार शहरात असतो त्याची व अंताजीपंताची वोलख होती. पेशजी दोन वर्षे जाली, जनकोजी शहरात होता, तेव्हा आपण येकदा शहरात आलो होतो. तेथे चौकात येक ब्राह्मण बाबूराव सोणी म्हणून होता तो जनकोजीच्या गोष्टी बोलत होता. त्याजवरून आपण त्याजला विचारले की तुमचे नाव काये ? आणि कोणीकडे असता ? तेव्हा त्याणी सांगितले कीं आमचे नांव बाबूराव, आम्ही जनकोजी तोतया याजकडे असतो. मग आपणहि आपले वर्तमान सांगितले कीं तोतयाचे फितुराचे आपण आहोत म्हणून सांगितले होते, तो बाबूराव हली आत्माराम नाइकाचे घरी बिऱ्हाडी आहे, तो अंताजीपंताचे बिऱ्हाड विचारीत आला, तो अंताजीपंत देवास गेला होता. मग हाहि देवास अंताजीपताकडे गेला. तेथे त्याचे भाशन काय झाले ते आपणास ठाऊक नाही. बाबूराव तेथून आपले बिऱ्हाडास गेला. अंताजीपंत घरास आला आणि आम्हास सांगितले की बाबूराव आत्माराम नाइकाचे घरी राहात आहेत, त्याणे वर्तमान सांगितले कीं केवलराम पुरबी या किल्यातील चाकर आहे त्याचा बाप येथे आला होता, त्याणे आत्माराम नाइकापासी व आपण बाबूराव उभैतापासी सांगितलें कीं किल्यावर तोतया आहे, तो शामभटाचे व कोंडभटाचे व अंताजीपंताचे नाव घेत असतो. ऐसी पुरबियाणे बाबूराव यास सांगितले, म्हणून अंताजीपंताणी आपण साऱ्यास सांगितले कीं साऱ्याणी त्यासी उतर केले की येणे प्रो बाबूराव खरे सांगतो किंवा खोटें सांगतो हे काये कले ? मग दुसरे दिवसी बाबू याणे आपले नावे परभारा आपल्यास न कलता तोतयासी पुरबियाजवल पत्र दिल्हे ते पुरबिया घेऊन दौलताबादेस जाऊन आपले लेकास दाखविले. तो लेक हे पत्र खरे लटके कोण्ही दिले हे पाहावयासी शहरी आत्माराम नाईक याचे घरी आला. मग आत्माराम नाईक त्या पुरबियास आपणापासी आवघ्यापासी आला ते समई आपण परसाकडे बाहेर गेलो होतो. बिऱ्हाडी

आत्माराम नाईक व कोंडभट वगैरे बोलत होते. इतकियात आपणहि बाहेरून आलो. मग आम्हास अवघ्याणी पुरबिया केवलरामास भेटविले. आम्हास पुरबियाचे वर्तमान सांगितले. मग आपण सारे त्यास बोलिलो, की आम्ही तोतयासी चिठी देतो हे नेऊन त्याजला देऊन जाब घेऊन येसील की काये ? तेव्हा तो बोला की तुमच्या पहिल्या येक दोन चिठ्या आपणाजवल आल्या, परंतु तुमची आमची भेट नाही म्हणून चिठ्या तोतयासी दिल्ह्या नाहीत. हाली तुमची आमची भेट जाली, आता चिठी द्याल ती तोतयास पावती करून तिचा जाब आणून देऊ, ऐसे बोलला. मग आपण सार्‍याणी त्यास तीन रुा दिल्हे आणि कोंडभटाणी चिठी लिहून दिल्ही ती चिठी घेऊन दुसरे दिवसी अंताजीपंत व कोंडभट ऐसे आत्माराम नाईक याचे घरी पुरबिया होता त्याजपासी गेले आणि आणखी त्या चिठीत काही मजकूर आत्माराम नाईकाणी व त्याणी काये लिहिल्या हें आपणास ठाऊके नाही. आपण ब्रिन्हाडीच होतो. चिठीचा जाब घेऊन पुरबिया कधी येईल म्हणून आत्माराम नाईकास पुसिले. त्यास त्याणी सांगितले की येका दों दिवसी येईल, परंतु जाब काही आला नाही. त्याजवर आठा दाहा दिवसाणी साहेबाची स्वारी येऊन आपणास शहरातून चौघास धरून किल्यास आणिले. बाबूराव अगोधर आठ दिवस नासिकास घरास आपल्या गेला. मल्हारपंत दुखनाईत होता तो शहरातच राहिला. येणेप्रो वर्तमान ठाऊक आहे. छ १७ माहे रमजान.

बाो शंकरराव माधव * * कानुगो कुलकर्णी किले मजकूर

¶A certain Dravid Brahmin submits a written statement giving a long personal story and explaining how he came in contact with people who more or less were involved in the affair of the Pretender of Sadashivrao. The writer goes to Ghangad, interviews the Pretender, cooks food for him and converses and associates himself closely with a number of persons who figured most in this affair, notably Raghunathbhat, Shivaram Dikshit, Gangadharbhat Karve, Anubai and Godubai. Hence the statement is important.

No. 103] [*20-1-1769*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यांसी

पोा माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणू‍ स्वकीये लिहीत जाणे विशेष. प्रो येदलाबाद हा माहल राजश्री माहदजी सिं

याजकडे सरंजाम आहे. याची जफ्ती तुम्ही केली म्हणून हुजूर विदित जाले, त्याजवरून हे पत्र लिहिले आसे; तर या माहालची जफ्ती करावयास कारण काये? जफ्ती मोकळी करणे, वसूल घेतला आसल तो मारनिलेकडील चिटको सिवदेव कमाविसदार याजकडे माघारा देणे. फिरोन बोभाट येऊ न देणे. जाणीजे छ ११ रमजान सुा सन तिसा सितैन मया व अलफ. बहुत. काये लिहिणे हे विनंती.

¶*Madhavrao Ballal Peshwa orders Balaji Janardan to restore to Mahadji Sindia the province of Edlabad which belonged to him and which was attached by the addressee.*

No. 104] [25-1-1769

पौ छ ९ सवाल सुा तिसा
माघ वा भिवजी जासूद जथे
बजाजी नाईक.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य.
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गो

पा माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २९ सावानचीं पत्रे पाठविली ती छ १४ रमजानी पावोन लिखितार्थ कलला.

गद्वालचे खंडणीचा मजकूर तर वीस हजारावर चुकवावयाची नाहीं. पेशजी लिहिल्याप्रा कबूल करीत नसल्यावर इकडेच विल्हे लाऊ. तेथे वीस हजारावर न करणे.

गोविंद मल्हार खिजमतराऊ दिा रंभाजी निंबालकर याजकडे सन सबापासून साल मजकूरपर्यंत यैवज येणे येविसी लिा ते कलले. त्यास सारे निंबालकर येथे मिलाले आहेत. त्यासी बोलोनं मागाहून लिहून पाठविलें जाईल.

हैदर नाइकाचे हवाल्याबाबत नारायणदासाकडे दोन लक्ष सत्रा हजार सातसे पंचवीस रुा येणे. त्याचे होन हैदरी मिलेनात याजकरितां तोडमोड करून काही होन, बाकी नख्त, याप्रा फडशा करून घेतला. नुकसान बाजार पाडास आणि खंडणीचे दरास चोवीस हजार सवा तेरा रुपये येक आणा आला, परतु नुक(सा)न नव्हे. बाजार पाडास मात्र नुकसान. खंडणीचे दरास नुकसान नाही म्हणून लिहिले ते कलले. तोडजोड करून ऐवज घेतला उतम केले.

6765

मौजे टांकली ता। मानूर हा गांव पागा गणेश गंगाधराकडे आहे. त्याजकडे सिवचे सेरणीबाबत बारासे रुा करार केले. हवाला धोंडो केशवानी घेतला त्यास ताकीद होऊन भरणा लवकर करीत ते करावे म्हणोन लिहिले ते कलले. त्यास सदरहू यैवज गणेश गंगाधर यांजकडील पागेचे बाजे लोक पोग्यांचे नालबंदी-पैकी जमाखर्च लस्करांत जाला.

रा। छ १६ रमजान सु॥ तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The letter records the purport of the despatches sent to various powers, e.g., Haidar, the Raja of Gadwal, etc., in settlement of the tributes due from them.*

No. 105] [*16-2-1769 ?*

पौ छ २३ जिलकाद

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिंबकराव सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। माघ शुध्ध ११ मु॥ जैनाबाद जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. चिरंजीव तात्याचा काळ जाल्यावरी रा। खंडेराव पोवार मातुश्रीच्या लक्षानरूप दरबारास आगोधर सरकारांतून वर्जिले आसतां गेलेच होते. हे वर्तमान यैकूण गणेश संभाजीस उभे करोन जवल कारकून थोरले बाईने दिल्हे आहेत, त्यास न कलत रा। गोविंदराव गायेकवाड यांच्या विद्यमानें श्रीमंतापासी जाऊन विनंती करऊन नवे दिवाण करून कारभार आमचा आम्ही करूं, दोन लक्ष रुा नजर देऊं, म्हणौन विनंती केली. त्याजवर विचार करोन सांगू यैसे उतर केलें. मुत्सदीमंडलात कोणी कसे, कोणी कसे, बोलतच आहेत. चिवडा करावयासी कमी न केली. आतां गोपाल संभाजी व वासुदेव संभाजी मेरट प्राातून आले. तेहि आम्हास भेटून पुढे गेले. कांही देऊन रोजगार करावासी उमेद तर आहेच. यैसा खुलासा परभारे निघाला. थोरले बाईचे मानस आम्ही दरबारचा बंदबस्त करावा आणि दौलत राखावी. धाकटे बाईने खेकटे आरंभिले आहे. हातीचे तोंडी लांकूड देऊन काम बिघडले. याउपरी येविसीचा विचार काये

6766

करावा? सविस्तर विनती करावयासी राजश्री चिंतो कासी यांसी पाा आहेत. हे विनंती करितील. ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते करावी. तदनरूप वर्तू व कालाबाग, पाटण दोनी माहाल रदकर्जास लाऊन दिल्हे आसतां कर्ज फिटले नाही. दोनी माहालच्या रसदा सरकारांत घेतल्या. हा कारभार रा आबाजी माहादेव यानी केला. आमचा हिसेबहि आणविला तो जाऊन पोहचला. आतां पैका घेऊन माहाल परभारे लावले. पुढे होणे ते होऊ, ऐसे जाले. तूर्त आम्हांस रदकर्जातच च्यार रुा येणें तें हातचे गेले. इतका लाभ जाला. श्रीइछा प्रमाण. दरबारचे वर्तमान पोवाराकडील सरदारीचा बखेडा जाला आहे ते व राजकीये व स्वकीये सर्व वृत निवेदन मारनिले करितील. त्यास आज्ञा कर्तव्य ते करावी. येथील काम उलगडोन टोक्याचे मार्गे गंगातीरे येतो, तोंवर मारनिलेबराबर आज्ञा येईल तदनरूप श्रीदर्शनास जेजुरीस येणें आहेच. आपल्या दर्शनाचा योग घडोन समक्ष विनंती कर्तव्य तेहि दर्शनाती करू. राजश्री चिंतोपंत हे आपले कुटुंबीचे आहेत. यास इतर भाव नाही. विनंती करतील ते ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. बहुत काय लिहिणे? लोभाची वृधि केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Sivdeo Odhekar, the Pawar's minister, requests Sakharam Bapu to use his influence with the Peshwa that he (the writer) may be retained in his office and thus frustrate the plans of the junior queen who desires to have another minister in his place.*

No. 106] [*2-3-1769*

पाो छ २६ सवाल माघ मास
सुरु तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे शेवेसी

विनंति शेवक धोंडो माहादेव कृतानेक साष्टांग नमा विा ताा छ २२ सवाल-पर्यंत स्वामींचे कृपेवलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामींचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा जे, रा आबाजी माहादेव टोक्यात आहेत त्यास किल्यांत ठेऊन दो आसामीचा खासा उलफा देत जाणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें तेथून मारनिलेस आणून किलियात ठेवले. किलियाचा चौकीपाहारा बंदोबस्त करणें म्हणून आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाो बंदोबस्त आहे व पुढेहि करितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadev informs the Peshwa that Abaji Mahadev is put in confinement and is allowed his daily rations as directed.*

6767

No. 107] [4-3-1769

पो छ ६ जिलकाद

तिसा सितैन फालगून मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कमलाकर भास्कर सा॥ ना॥ वि॥ ता॥ छ २४ सवालपावेतो वर्तमान यथास्थित आसे विशेष. संगमरवरी बंगला शहरी आहे, त्याचे काम कसे आहे, दगड कसा आहे, लांबी रुंदी वलीची किती, आणावया योग्य आहे की नाही गाडे किती लागतील, तें ता॥वार लेहून पा॥ म्हणोन आज्ञापत्र सादर जाले; त्यावरून बंगल्याची चौकसी करितां शाहाजादेयाचे कबरेवर हुजरा होता, तो पूर्वी येसवंतराव पवार याणी खणोन नेला तो जैनाबादेस ठेविला होता ; त्यास रा॥ संकराजी नारायण येथे आहेत त्यास पुसिले, त्याणी दाखविला. सरकारचे कामावर पडतो न्यावा, त्यावरून रुंबरू तेथे जाऊन पाहिला. लांबी रुंदी गज च्यार व उंची आडीच गज, खाली तल नाही, वरता बगला नाही. च्यार दिवाली मात्र आहे, त्यात सुरूदार च्यार खांब असावे ते नाहीत, याखेरीज कोठे जाली नाही. कोदील दगड आडवा नाही. याची याद आलाहिदा लिहून पाठविली आहे व नकश्याहि करून पा॥ आहे. काम तर चांगले आहे परंतु कबरेवरील हुजरा आहे, बंगला नाही. त्यात खालीवर काही नाही व खांब नाही, काही दगड नाहीत आसे आहे. केवल तेथे नेऊन उपयोगी पडे आसे नाही. तथापि मर्जीस आले तर येक कारागीर आल्याने तो पाहील म्हणजे त्याचे विच्यारे न्यावा आसे जाल्यास सिध जाहे. आम्ही पूर्वी विनंति केली होती जे थोर दगड येक आहे तो पाहिला, परंतु कोदील+ आहे त्याची मूर्त होणार नाही. कारीगर हुजरा पाहावयास आलाच तर येथील दगड सर्व त्यास दाखऊ. त्यात कार्याच दगड निघेल तो रा॥ करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Kamlakar Bhaskar solicits from Nana Fadnis orders about stones of certain types for working them into idols.*

No. 108] [10-3-1769

पौ छ १८ जिलकाद तिसा

बा॥ देवजी जासूद जथे कचोजी ना॥

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. नव्या तोफा वोतवावयाची आज्ञा केली आहे. त्यास तुम्ही दोन तोफा एक पाचशेरी गोळाखाई ऐसी थोर तोप करविली आहे. त्यास तीन

\+ कोदील = ठिसूळ.

बोटे दळ धरलियानी फारच पातळ होते म्हणून कारीगारानी म्हटले त्याजवरून तुम्ही मनास आणून अडीच तसू दळ आतील आंगाचे व मोहरीचे कंगणी सुधा च्यार तसू करावयाचे करार करून काम चालीस लाविलियाचे तुम्ही लिहिले; ऐशास भांडे दळदार होते खरेच,-परंतु भारी फार, स्वारीच्या उपयोगाचे नाहीं. यात एक बोट कमी होईल तर करावे. किंबहुना लहान तोफ याप्रमाणे जाली तर जाहली. थोर तोफ तरी दळ दोन तसू व कंगणी दीड तसू येणेप्रमाणे तयार होई ऐसी करावी. याप्राो सरासरी साडेतीन तसू पडे ते करावे म्हणजे स्वारीत चालता भारी पडणार नाही. सारांश पंचरसात तांबे फार पडे व पंचरस फार चांगला होये ते करणें. रस चांगला जालिया वोतता चांगले भाडे वोतेल. राा छ १ जिलकाद सुाा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa sends Nana Fadnis instructions about the casting of guns.*

No. 109] [*18-3-1769*

पाौ छ २७ जिलकाद
फालगुन मास सन
तिसा, चिठी लिहिणे

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. बाा देणे ताा राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण याचे स्वारीकडे खर्चास रुपये ४०००० चालीस हजार रुपये देविले असेत, तूर्त पावते करणे. राा छ ९ जिलकाद सुाा तिसा सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Balaji Janardan to deliver to Ramchandra Ganesh and Visaji Krishna a sum of Rs. 40,000 to cover the expenses of their expedition.*

No. 110] [*9-4-1769*

पाौ छ ४ जिल्हेज चैत्र.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना
स्वामी गोसावी यासी

पोो बाबूराव सदासिव कृतानेक नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. श्रीमंतांची आज्ञा म्हसें मुधोल

येथील मुकामी घेऊन संवत्छर प्रतिपदेस टोक्यास आलों. त्यास, प्रवरासंगमकर ब्राह्मण व पाटील यानी हुताशनीचें गडबडीत वेदमूर्ति रा धोंडभट खरे याचें पुत्रास जिवेंच मारले व आणखीहि तीनच्यार माणसें टोक्यांतील मारली. हे कर्म मोठे दुर्घटच केलें. येविसींचें पारपत्य पुरतें जालें पाहिजे. त्यास, श्रीमंत देशास आल्यावर होणे ते होईल. प्रस्तुत त्यांजकडील काही सरकारातून सिक्षेचा प्रकार तूर्त जाला पाहिजे. तर प्रवरासंगमकरांची वतनें जोसी कुलकर्णी धर्माधिकारी व पाटिलकी क्षेत्रसंमंधे येजमानकृत्यें व मोकासे इनाम आहेत, त्यांची जप्ती रा वासदेव गणेश कमावीसदार पा नेवासे यांसी लिहून पत्र पाठऊन करवावी. या कजियाचें विस्तारें वृत राजश्री नारोपंत नेवाशात होते त्यानी समक्ष मनास आणिलेंच आहे. तेहि पुण्यास स्वार होऊन गेले. आपलें त्यांचें भेटीअंती विदित होईल. छ १ जिल्हेज. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Baburao Sadashiv reports to Nana Fadnis that some persons were roughly handled by the Brahmins and the Patil of Pravarasangam during Holi sports and died in consequence. He suggests that, pending the decision of the Peshwa regarding this outrage, all the vatans belonging to those involved should be forthwith confiscated.*

No. 111] [*30-4-1769* ?

पो + छ २९ जिल्हेज तिसा
चैत्र हा रामजी जथे बनाजी
नाईक

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावियासी

विनंति उपरी आपाजी राम दिमत हैदर नाइक याजकडे इनामगाव व मुकासा सरकारातून आहे. त्यास ते करार प्रो वर्तले नाहीत, सा गांवची जप्ती केली असे. तर कमाविसदारास कागद लेहून गावची जप्ती करणे. रा छ २२ जिल्हेज बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*The Vatan granted to Apaji Ram, Haidar's Vakil, is confiscated.*

+ पैवस्ती नानांच्या हातची.

No. 112] [15-6-1769

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी सखदेव दिाा राजश्री देवराव माहादेव हिंगणे कृतानेक सां नमस्कार विज्ञाप्ति यैसीजे. प्राा मेरट वगैर माहाल प्रांत आंतरवेद बितपसील:—

१ प्राा मेरट	१ प्राा सरावा
१ प्राा जलालाबाद	१ प्राा बरणावा
१ प्राा काधला	१ प्राा शामली
१ प्राा किराणा	१ प्राा मुलताना
४	४

८

येकून आठ माहालच्या सनदा सन सलासात घेतल्या होत्या; परंतु ईाा ताा सुाा तिसा आखर सालपावेतो आम्हाकडे आमल चालला नाही. छ १० माहे सफर सुाा सबैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shankaraji Sukhdev explains to the Peshwa that the eight districts mentioned in the letter did not continue to be in the possession of the Hingnes during the seven preceding years.*

No. 113] [24-8-1769

पौ छ जोवल सबैन

श्री

श्रीमंत महाराज राजश्री पंत
प्रधान साहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आपाजी गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा श्रावण बहुल सप्तमी मुकाम शहर आमदाबाद माहाराजाचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विज्ञापना ऐसीजे. माहाराजाचे आज्ञापत्र हुजूर यावयाविशी आले. यावयास उजूर नाही; परंतु पेशजी पटण वगैरे ठाणी बाबीकडील गायेकवाडानी घेतली आहेत. सांप्रत राजश्री फतेसिंगराव गायेकवाड हुजूर गेले आहेत. त्यांजकडील सरंजाम इकडे बहुतसा नाही जाणौन कोता अंदेशा करून गाजुदीखान बाबी याने मेळावा करून पटणास

मोर्चे दिले आहेत. पटणास गायेकवाडाकडील रा बच्याजी देवाजी आहेत. त्याची पत्रे आम्हास व राजश्री खंडेराव गायेकवाड नडियादेस आहेत यास आली की कुमक जाल्याने स्थले राहतील. मुलुक मवासी! ही जागा गेल्यास चहूकडे दंगा होईल. त्याजवरून हा मजकूर आम्ही राजश्री खंडेराव यास लिहिला. त्याचे उतर आले कीं सरंजाम समवेत शहरास येतो. तुम्ही आम्ही पटणास जाऊन मोगलाचे पारपत्ये करावयास्तव तेथे गेले पाहिजे. पर्जेन्य अतिशये, पेरणी देखील जाली नाही. शहरचा कोट जागा जागा जाया जाला आहे, तोहि नीट करवितों. पटणाकडील दंगा निवारण करून येथून भाद्रपद शुध पक्षात स्वार होऊन दर्शनास येतो. दर्शनानंतर माहाराजास सविस्तर वर्तमान श्रुत करीन. रसद सालगुदस्ताची बाकी राहिली, त्याजविशी ताकीद पत्र आले. त्यास पहिलाहि काही यैवज पाठविला. सरकारचे जासूद येविशीची पत्रे घेऊन आले. त्याचे उतर विनंती पत्र लिहिले की पाऊण लक्षाच्या हुंड्या रवाना केल्या आहेत. त्याच हाली रा माहादाजी जिवाजी याजकडे पाठविल्या आहेत. हुंडीचे मुदतीप्रमाणे यैवज सरकारात भरणा करतील. राहिला यैवज तोहि येते समई सेवेसी घेऊन येईन. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Appaji Ganesh of Ahmedabad writes to the Peshwa that he has sent bills of exchange amounting to Rs. 75,000 out of the revenue of Gujarat and adds that speedy measures have been taken to put a stop to the rising of Babi at Pattan.*

No. 114] [*7-10-1769*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही पत्र व आमचे पत्राचा जाब मल्हारजीबराबर पाठविलें ते पावली. मर्जी ठीक नाहीं, त्यापक्षी मग काय असों. मी उद्या यावयाचा निश्चय रविवारीचा केला, परंतु श्रीमंत म्हणतात कीं सोमवारी जावे. तत्राप तुमची येक पुरवणी दाखवावयाजोगी आहे, ललिताचे वेलेस पाहाटेस जाईन तेव्हां दाखवीन. मग आज्ञा दिल्ही तर येईन, नाहीं तर सोमवारी. रा छ ६ जाखर आवसीचा प्रहर रात्र हे विनंती.

¶*Nana informs Haripant that he was detained by the Peshwa and that he would return shortly.*

No. 115] [16-10-1769 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ १९ जमादिलाकरपर्यंत किले मर्दनगडी सुखरूप असों विशेष. स्वामींनी कृपा करून पत्र कृष्णातीराहून कूच होऊन स्वारी सुरापूराचे सुमारें जाली, बहुतकरून संस्थानाच्या खंडण्या विल्हे लागल्या, श्रीरंगपटण व बिदरूर हीं दोन्हीं संस्थाने विल्हे लागणें याकरितां त्या प्रांतें जात असों, दोहींकडील मजकूर विल्हे लागल्यावर विचार ठरेल तो लिहून पाठऊं; व पुरवणीं पत्रीं लिहिलें कीं कुलस्वामीचे दर्शनाकरितां गुहागरावरून तुम्हीं जाणार तर विजेदुर्गादिक स्थलीं जाऊन किले कोट आरमार बंदोबस्त पाहावा, इजोरत[1] करणें, न करणें, तालुकदार कोण कसे वर्ततात, रयेतेचें परिपालन कसें कोण करितो, हा बारीक मोठा अर्थ ध्यानांत आणून बंदोबस्त करणें तो करून लिहिणें, तो लिहून पाठवावा. त्यास स्वामीची आज्ञा प्रमाण. शरीर अशक्त. हे दिवस उष्ण. तथापि सामार्थ्यानिरूप प्रकृत स्वस्थ राहिल्यास विजेदुर्गादिक स्थलें मार्गानें लागतील तीं पाहून उचित जरूर प्रकार बंदोबस्त सांगणें तो सांगोन कलेल तितका ध्यानांत आणून जरूर लिहिणें तो लिहून पाठऊं; आणि कुल-स्वामीचे दर्शन घेऊन घरास जाऊं. शरीरीं आरोग्य श्रीकृपेकरून जाले. परंतु उष्ण देश, औषध कठिण, यास्तव प्रकृत सूक्ष्म फार जाली आहे. दिवसेंदिवस आरोग्यच आहे. आपले कृपावलोकनें श्रीदयेंकरून आरोग्यदृढताच होईल. फिरंगी यांचा प्रकार केवल येकदेसी मनसबा. सारांष हा प्रकार किमपि कलतच नाहीं. गारागोले बंदुखासाठीं बहुत प्रकारें प्रेत्न केला परंतु न दिल्हे. बेइतबारी फार, थोडक्या गोष्टी लांबिवतांहि न ये. मर्दनगडचे तालुक्याचाहि बंदोबस्त आपलेकडील आम्ही मात्र केला. त्यानी सेजारधर्मास परस्परें उचित मजकूर ते बोलून चालून कबूल न केले. चालता प्रकार मात्र राखून ठेविला. विस्वास धरतां येत नाही. ये प्रांतीचे ग्रहस्त वतनदार तत्रस्थित व अत्रस्थित प्रसंगास अनुपयोगीच. आपले बलें शाहाणपणें सावधपणें राहील त्याचाच परिणाम. बहुत प्रकारें बंदोबस्त करून दिल्हा व ताकीदहि केली. त्याचप्रमाणे

---

१ मक्केगिरी.

6773

कोणाचाहि विस्वास न धरितां सावध राहील तरच परिणाम. स्वामीनीहि परभारी ताकीद करणे ते करावी. हे विनंती.

¶*The Peshwa who is on an expedition in the Karnatak asks Trimbakrao Pethe to make enquiries as regards the condition of the ryots in Konkan when he will be proceeding on a journey to his family god, which he promises to do in spite of his indifferent health.*

No. 116] [*18-10-1769*

श्रीशंकर प्रा

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. आश्विन वद्य त्रितीया बुधवारीं दोन प्रहरां चिमणाजी देशमुख याची बातमी आली कीं वारसेंयाचे नजीक घाटाखालीं दोनप्रहरपर्यंत गाडदी सीदी भील व पंनास पाउणसेंपर्यंत स्वार याप्रो जमावसुद्धां सोनगडाहून निघोन सालेरीस जातो. तमाम गांव खेडीं जालीत पोलीत चालिला. याप्रमाणे बातमी येतांच आम्ही सडी फौज बराबरी घेऊन कलंबाचे बारीनें घाटाखालें उतरोन रातोरात गेलों. मार्ग झाडीचा, डोंगराळ, गवत भारी, अडचण फारच, परंतु रातत्रा खपोन उज्याडतां प्रात:कालीं त्याचा मुकाम होता तेथें गेलों. तों त्यांचीहि तयारी जाली होती. डोंगराचे आश्रयानें बराच दम खादला; तों आम्ही साऱ्या फौजेचा येकवेलच येलगार करून हला केली. तों श्रीमंत रावसाहेबांचे पुण्येंकरून फते जाहली. गाडदियांचा मोड जाहाला. दोन अडीचशे गाडदी ठार जाले. दोन अडीचशे जखमी जाहाले. कांहीं, गवत मातबर वाढलें आहे त्याचे आश्रयानें पळाले. चिमण देशमुख खासा यास जखमा लागून घोड्याखालीं पडला. मग पलोन गेला, किंवा मुडद्यामध्यें पडला, याचा पता पुर्ता लागला नाहीं. शोध बहुत केला. कोण्ही पलोन गेला म्हणतात, कोणी गवतामध्यें लपाला म्हणतात. वरकड गाडदी भील तमाम पलाले. बंदुखा व तरवारा वगैरे हत्यारें सहस्त्रावधी लोकांस सांपडलीं. पंनास साठ घोडे लाहान थोर पाडाव आले. निशान नगारा तासची तबल गाडद्यांचीं निशानें वगैरे बहुत पाडाव आलीं. याप्रों श्रीमंतांचे प्रतापें गोष्टी जाहाली. आम्हाकडीलहि दाहावीस भले माणूस जखमी, व घोडीं दाहापांच याप्रो जाहालीं. येणेप्रो ईश्वरें कृत्य केलें. आज गुरुवारीं त्रितीय प्रहरीं आम्ही लस्करांत आतांच आलों. येथून वीस कोसावर देशमुख होता. आज दोन दिवस घोड्यावरील जीन आतांच उतरले. आपण सरकारचे नेत्र आहेत. जाहालें वर्तमान आपणास कलावें. आपण कारकून येक मर्जीस आल्यास पाठवून

द्यावे. जखमी जाहलेलीं घोडीं व भले माणूस रुबरु पाहून जातील व देशमुखाकडील गाडदी किती मारून मुडदे पडले आहेत तेहि पाहोन जाईल. म्हणजे जाहालेले वर्तमान ध्यानास येईल. बहुत काय लिहिणे लोभ करीत जाणे हे विनंती.

¶*Naropant Nana receives a report of how a riot of the Bhils and the Gardis led by Chimanaji Deshmukh was put down.*

No. 117] [*13-11-1769*

पैवस्ति छ १३ रजबु
सबैन कार्तिक हस्ते कल्याण
सांडणीस्वार

श्री

पुरवणी विज्ञापना. श्रीमंताकडे आपले कागदावर विनंती करून घ्यावयासी मी गेलो होतो, तेव्हां श्रीमंत बोलले कीं नाना तेथून येतील तेव्हां पुण्यांतील चौकीपाहऱ्याचा बंदोबस्त चांगला असावा. त्याजवरून मी विनंती केली नानाचा बंदोबस्त भारी आहे, माणूस फार भितें. माणसापासून अंतर पडल्यास मुलाहिजा होत नाहीं. त्याजवरून बहुत प्रसन्न होऊन बोलिले, असे आहे तरीच पुण्यातील बंदोबस्त राहतो. बालाजीपंत ठोसरहि जवळ होते. आपल्या मेहनतीचा वगैरे बंदोबस्त आइकोन फार संतोषी होतात. भेटीअंती सविस्तर विनंती करीन. हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke intimates to Nana Fadnis how the Peshwa expressed his complete satisfaction with the addressee's work.*

No. 118] [*10-12-1769*

पो छ ४ साबान सुरु
तिसा सितैन हाा कृष्णाजी
खंडोजी जथे हावजी
नाा ठुबे रू

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी
गोसावि यांसी

विनंति उपरी. तुम्ही पत्र छ २४ रजब व छ २९ रजबचे पाठविले ते छ २८ मिनहूस प्रविष्ट जाहाले. डाकेची पत्रे पाठविली ती पावली. जीवनराव व

सेव्याजी आंटोले[१] याचा मजकूर लिहिला तो कलला. सेव्याजी आइतोले याणी रुा दिल्हे तर त्यास लस्करास पाठऊन देणे. न देई तर किल्यावर ठेवणार ते उतमच आहे. जगजीवन पवाराचा मजकूर तर त्याजकडील पंधरा हजार रुा येणे ते घेणे. न देई तर कोहजेवरी अटकेत ठेवणे. रा छ २९ रजब सुरू तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे ? रुपये दिल्हे तर पका जामीन घेऊन मोकले करणे. हे विनंति.

¶*Nana Fadnis is asked to receive money from Setyaji Aitole and Jagjivan Pawar and if they refuse to pay, to put them in prison.*

No. 117] [25-12-1769

पौ छ २० साबान तिसा
मार्गसीर्ष बाा रूपाजी
जासुद जथे बनाजी
नाईक.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन
स्वामी गोसावी यांसीं

विनंती उपरी :

गाइकवाडाकडील माहालच्या बंदोबस्ता राा चिटको आपाजी राा करावे लागतात. त्याजसमागमे दोनसे राऊत दिल्हे पाहिजेत ते देवावे म्हणोन लिहिले. त्यास माारनिलेबाा राा दुर्जनसिंग वगैरेचे राऊत द्यावयाविसी तुम्हास लिहिलेच आहे, त्याप्राो देणे.

किता कलमे :

१ भडोचकर मोगलानी आमोद वगैर माहाली दंगा केला, त्याचे पारपत्यास दोनसे राऊत देवावे.
१ खानदेशात दाभाडे व टोके व भिल लबाडी करितात त्याचे पारपत्यास सरसुभाकडे दोनसे राऊत दिल्हे पाहिजे.

२

याप्राो च्यारसे राऊत द्यावे लागतात. त्यास खानदेशच्या सुभ्याकडे दोनसे राऊत राा रामचंद्र गणेश याजकडून देवितों, व भडोचचे कामास दोनसे

---

[१] ऐतोळे.

राऊत दिल्हेच पाहिजे. त्याची सिबंदा तेथील तेथे फिटेल म्हणोन लिहिले ते कळले. ऐशास खानदेसच्या कामास दोनसे राऊत रामचंद्र गणेश याजकडून देविले, उतम केले. भडोचचे कामास यादवरायाकडे दोनसे राऊत देणे ते रा। विसाजी केशव याजकडून देऊन ते काम करावे.

रा। छ १९ साबान सुा। तिसा सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa writes to Balaji Janardan that four hundred troopers should be despatched to quell the disturbances created by the Mughal Subha of Broach and by the Dabhade, Toke and the Bhils in Khandesh.*

No. 120] [*28-12-1770*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंति सेवक विस्वासराव लक्ष्मण कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना येसीजे. किले करेरा वगैरे ठाणी राजश्री रघुनाथ हरि याचे स्वाधीन करून दिढा महिन्यानी मा।रनिलेची कबज आणून देऊ. यासी अंतर करू तरी सरकारचे आपराधी. दुसरे किले झासी येथील जकिरा सन इहिदे सबैनाच्या आवल सालापासून फरोक्त केला असल्यास त्याची निशा राजश्री रघुनाथ हरि याची करून पुरी कबज आणून देऊ. मिति पौष सुध ११ सके १६९२ शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vishvasrao Lakshman writing to the Peshwa undertakes to hand over to Raghunath Hari the fort of Karera and other places.*

No. 121] [31-12-1769

पौ छ १६ जिल्हेज
सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजी जनार्दन स्वामी
गोसावी यासीं

पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. धोंडी ठाकूर व जयराम ठाकूर वस्ती पेठ येवले पो पाटोदे याणी हुजूर विदित केले, कीं आपले कर्ज लक्षुमण ठाकूर नगडा वस्ती पुणे पेठ रविवार याजकडे येणे. त्यास दोन तीन वर्शे तगादा करितो; परंतु कर्ज वारून देत नाही. कोतवालाची वगैरे हिमाईत+ करून घटाई करितात. त्यास सरकारातून नजर ठराऊन कर्ज वसूल करून देविले पाहिजे म्हणोन; त्याज-वरून सावकार मारारकडे नजर करार करून हे पत्र तुम्हास लिहिले असे; तरी खताप्रमाणे वाजबी हिशोब व्याजसुधा निकाल करणे. या कामास घनशाम देवाजी कारकून व ढलाईत आा ९ पाठविले असे; तरी याचे वाजबी कर्ज असेल ते व्याजसुधा निकाल करून देवणे. जाणीजे छ २ रमजान सुा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶Nana Fadnis is asked by the Peshwa to realise the debts of Dhond Thakur of Yevla, which are due to him from Lakshman Thakur of Poona. A certain percentage was charged by Government for realising debts of individual creditors.

No. 122] [1769 ?

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसीं

विनंती उपरी. रद कर्जाच्या यादीच्या नकला व झासीचे यादीची नकल गुदस्ताची व गायेकवाडाकडे ऐवज नेमला त्या यादीची नकल पाठविली पाहिजे म्हणोन लिा. त्यास रद कर्जाच्या यादी नकला दोन व झासीचे यादीची नकल करून सांडणीस्वाराबराबर तीन यादी पाठविल्या आहेत. घेऊन उतर पाठवणे. गायेकवाडाकडे ऐवज नेमल्याची याद पुण्यास आपाजीपंता गेली, तिची नकल

+ हिमाईत=संरक्षण, आश्रय.

पुण्यासे गेल्यावर पाठऊन देऊ. आजि स्वामीचे दर्शन घेऊन श्राध करू. उदईक पुढी करून कूच करून जाऊ. काल पूज्यवार यामुले स्वामीचे दर्शन घेतले नाही. रवाना शुक्रवार हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Haripant, forwarding certain documents as requested and communicating programme of his tour.*

No. 123] [*1769* (?)

श्रीशंकर प्रसन्न

श्रीमंतर राजश्री पंत

प्रधान साहेबाचे शेवेशी

सेरीकर देसमुख व देशाई व देशपांडे तालुके नाणेमावल कृतानेक विज्ञापना. तागायत मजकूरचे वर्तमान सन. सितामध्यें रबी नाबूद जाली. त्यापासून तीन वरसे कुणबियास रबीचे बी मिलत नाहीं, यामुले रबीची कीर्द[१] पडली, खरिपावर अनावृष्टि जाली त्यामुले खरीप गेले. जुजबी पीक जाले ते मार्गाचे रहदारीमुळें जेठ्याचे खालीं आटले. दिवाण महसूल द्यावयास कुणबियाचे पदरी राहिले नाहीं. मार्गाचे रहदारी वसई कल्याण कुलाबा चेऊल आद्य करून जो येतो तो ओझीच घेऊन येतो. ओझी चालून त्यास जेवावयास घालावे या दहशतीनें खंडालेपासून वडगांवपावेतों गांव उध्वस जाहाले. ओझी बेमोईन येतात. उजूर केला तर तोंडावर मारून ओझी चालवितात याजकरितां रयेतीनें धास्त घेतली. पूर्वी लोहगड, राजमाची दोन किल्ले याचा मसाला रयतेस होतो त्याखालीं रयेत आजुर्दा असतां हल्ली विसापूर जाहाला त्याणे तो त्राहे म्हणविले, यैसा प्रजेवर ईश्वरक्षोभ. आपण ईश्वरी अंश जाणोन विनंति लिहिली आहे. कृपाळु होऊन पारपत्य केले पाहिजे. प्रजा स्वामीची आहे. प्रजेचे आशीर्वादे उत्तरोत्तर अभीष्ट होईल. विसापूरकर वाटेने जातात त्या पाटिलाची नाहक इजत घेतात. मागे खाबासेतच्या पाटिलास मारलें. प्रस्तुत मौजे भुसी येथील पाटिलास ओझ्यानिमित्त तोंडावर मारून काहाली (काबली) झोलणे डोईवर देऊन कुरवाडे याच्या घाटे नेला. त्यामुळें तो गांव ओस जाला. तेव्हां कोकणातून पाटील मात्र एकटा समजाऊन आणून गांवावर बसविला आहे. चार कुले चहूंकडे गेली, ती येत नाहीं. तैसेच खंडाले व कारले रहदारीमुळें ओस जाली. तमाम गावास पल सुटला. आवल्याची मोट सुटली आहे. मागती मोठेची मोट करणार स्वामी समर्थ आहेत. किल्ले लोहगडी राजश्री नारो रामचंद्र याणीं आम्हास व दाहावीस

+ येथून पुढें हस्ताक्षर नाना फडणीसाचें असे. [१] पेरण्याची जमीन.

पाटलि आणून कित्येक प्रकारे शब्दगौरव करून दिलासा केला. परंतु शुष्क गोष्टीनें रयेतेचे समाधान होऊन संचणी होत नाही. स्वामी कृपाळु होऊन सालमजकुरी चड सवाई आहे ते माफ केलियास रयेतेस उमेद होईल आणि वस्ती राहील. येविसी आभयेपत्र सादर करणार स्वामी समर्थ आहेत. रयतेचे जीवन आपणास न कलेसे काये आहे. प्रजन्यहि समीप आला. पेस्तरची कीर्द अद्याप नाहीं. भाजपोळ केल्याखेरीज (ज)मीनची संचणी कांहीच नव्हे. स्वामी सर्वज्ञ आहेत हे विज्ञापना.

¶*The Deshmukh, Desai, Deshpandes of Tarf Nane Mawal plead inability to pay increased assessment on the ground of irregular rainfall and damages suffered on account of armies marching. They also complain about the ryots being forced to carry loads.*

No. 124] [*1769 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबाचे शेवेशी

आज्ञाधारक देसमुख, देसाई देसपाडे तालुके नाणेमावल पायावर डोई ठेवून विनंती यैसिजे. तागायत मजकुरी आम्हास राहावयास पूर्वी साहेबी खेडी इनाम दिली आहेत. त्याजवर गुदस्ता विसापूरची धमक पटी केली. ते समई गवत व पानताटी घातल्या. त्यास गुदस्ता नवी जागा म्हणोन आज्ञेप्रमाणे गवत ताटी दिल्या. सालमजकुरी मागतात. त्यास साहेबी पूर्वापार आम्हास दिल्हे आहे म्हणोन त्या खेडियांत राहातो. वस्ती म्हणावी तर सा खेड्या मिळून तीस पंचतीस घरे आहेत. गांव बितपशील :—

मौजे पाले घरे	३	मौजे कारदोली घरे	५
मौजे भाजगांव	४	मौजे नांदगांव	१६ पैकीं
मौजे बुधले	५	मौजे गयालनहमी	१२
		पागलोली	६
	१२		२३

येकून सा गांवची घरें ३५ आहेत. त्याजवर येकूण चालीस से गवत व ताटी ३६ आहेत त्यास साहेब कृपा करून मना केली पाहिजे. पचतीस घरे आहेत ती आमची भाऊबंदाची व मागे मृत्य पावले त्याच्या बायका रांडरल्या आहेत. कोणी

कुणबी नाहींत त्यास बेछत्र करावे यैसे नाहीं. जमीदार म्हणजे मापाच्या अधोल्या. मोजिले तरी खंड्या मोजील. फोडिले तरी काहीच नाहीं. याजकरितां मना चिठ्ठी विसापूरकर यास आगत्य दिली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Deshmukh, Desai and Deshpande of Nane Mawal request the Peshwa to grant exemption from a certain tax (on thatch) which required to be paid in kind.*

No. 125]

[*25-1-1777?*

श्री

राजश्री मल्हारपंत साने स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री तुकोजी होळकर व माहदजी शिंदे याजकडील रुमाल तेथे पुरंधरी आहेत जुने व नवे त्यांत होळकराचे आवर्जे सन इसने सबैनचे वगैरे कागद चालते असतील ते पाठऊन * * जमेचे खतावणीचे व खर्चाचे खतावणीचे व बेज्याचे याप्रमाणें शोध करून सत्वर पाठऊन द्यावे. राजश्री माहदाजीपंत गुरुजी शिंदे होळकर यांजकडे गेले होते व श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडे गेले होते, त्याचे हिसेब

१ राजश्री दादासाहेब याजकडे खर्च जाहला आहे त्याचा हिसेब.

१ गुरुजीबावा याजकडे शागीर्दपेशा वगैरे लोक होते त्याचा हिसेब.

१

येकूण दोन हिसेबाचा नकला अगर येका तरी हिसेबाची नकल शिंद्याचे रुमालात असेल ती पाठऊन द्यावी. सदरहू हिसेब राऊ मल्हारपंत भाऊ याचे रुमालात होते तेथे शोध करावा, व आपाजीपंत गाडगीळ, याचें रुमालात शोध करावा, आणि दोहो हिसेबाच्या नकला करून व आवर्जे होळकराचे येणेप्रमाणे सत्वर पाठऊन द्यावे. जे कागद तयार असतलि ते लवकर अधिक पाठवावे. तयार नसितील त्याच्या नकला करून मागाहून पाठऊन द्यावे. हे विनंती पौष्य वद्य २ मंदवासर साईकाल.

¶*Some account papers with reference to Holkar and Sindia have been asked for from Purandar where the papers were kept for safety.*

6781

No. 126] *[18-1-1770*

पौ छ १४ सवाल
सबैन माघ.

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी नव्या तोफा वोतावयास बालाजी वामन पा। आहेत. त्यास पहिली जागा बांधिली आहे ती लाहान. याजकरितां दुसरें घर हतीचे खंबीन्यासारिखे[1] उंच मारानिले सांगतील त्याप्रा। तयार करून देणे. जनार्दन मुकुंद दामले यास पैठणास पा। आहे. त्यास घोडी तटूचे दाणावैरणीबदल रुा। २० वीस तसलमातीस दिल्हे आहेत याचा हिसेब घेणे. सदरहू घोडी तटूचा दाणा व बालाजी वामन याजबा। घोडी तटू आहे व यक उट आहे व मानाजी जाधव खिजमतगार याजबा। पागेचे घोडे आहे, त्यास दाणावैरणीची बेगमी पुण्यास पावल्यावर पुढें देत जाणें. बालाजी वामन याचे दिवटीचें तेल रमजानचे लस्करात पावले आहे, पुढे सवालापासून दररोज पावसेरप्रा। देणें. रा। छ २० रमजान सुरु सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती

¶The Peshwa writes to Nana Fadnis, giving instructions about the establishment of a gun factory and other matters.

No. 127] *[26-2-1770*

पौ छ १ जिल्हेज-
सबैन चैत्र.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यासी

पो। माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. रा। पांडुरंग कृष्ण गोडबोले यास मुंबईस पाठविले आहेत. यांस तोफा चांगल्या विकत मिळाल्या तर खरेदी करावयास आज्ञा केली आहे. लस्करांतून गोलंदाज समागमे दिल्हा आहे. त्यास हे मुंबईस जाऊन यादी लिहून दिल्ही आहे त्याप्रा। तोफा विकत मिळाल्या तर किमत करून तुम्हांस लिहून पाठवितील, त्याप्रा। रुपये पाठऊन देणे; व किल्यांवरून तोफा आहेत त्यांतील उपयोगी असल्यास पाहावयास सांगितले आहे. जर उपयोगी तोफा किल्यापैकी पुण्यास आणावयाच्या असल्या तर तुम्हांस लिहितील त्याप्रों

---

१ हतीचा तबेला किंवा साखळदंड बांधण्याचा खांब.

घाट चढऊन पुण्यास आणावयाची तर्तूद करणें. पाऊस पडूं लागला नाही तो घाट चढोन आल्या म्हणजे फार उपयोगी पडतील. आगाव ऐवज थोडा बहुत तोफाचे खोबद्दल लागल्यास लिहून पाठवितील, त्यास तोफेबद्दल आगांव ऐवज देणे. त्याजपासून मारनिले निशा घेऊन तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रों ऐवज देणे. रा छ २९ सवाल सुा सबैन मया व अलफ. हे विनंती.

¶*Madhavrao Ballal writes to Nana Fadnis that Pandurang Krishna Godbole is sent to Bombay to purchase big guns to replenish the artillery.*

No. 128] *[15-3-1770*

श्री

आसीर्वाद उपरी. येथील क्षेम छ १७ जिलकाद जाणून तेथील वर्तमान लिहीत जाणे विशेष: कडपेहून सोरा मीठ खरिदी करून आणविले ते किले मजकुरी पाठविलें आहे. तेथून यादी लिहून आलेले बजिन्नस तुम्हाकडे पाठविले आहे. त्याप्रमाणे कचे सेराने वजन करऊन रुजू पाहणे, मग पके सेराने वजन करून जमा धरणे, तपसीलवार लिहून पाठवणे. सोरा आणावयास बैल भाड्यानी करून पाठविले होते, त्यास त्याचा करार दर बैली सात फले[१] प्रों करून आठ मण सोरा दर बैली आणावा याप्रों करार होता. त्यास हाली सोरा बैलावर आला. त्याचें आधीं कचें वजन करऊन मग पकें वजन करावें त्याप्रों भाऊ याचे बैलाचा हिसेब करून पैका आकारावा. त्यापो मोघम पावलें आहे ते पोतनीसाकडे रुजू पाहून वजा करून घेऊन बाकीचा यैवज देवणें. कचे आठ मणास सात फलम भाडे याप्रमाणे करार आहे त्याप्रो समजून करणे आण उतर पाठऊन देणें. रा छ १६ जिलकाद हे आसीर्वाद.

¶*Instructions about weighing and valuing of the ingredients of ammunition are given in this letter.*

No. 129] *[26-4-1770*

पौ छ १० सफर जेष्ट
सबैन

श्रीवेंकटेशजी

श्रीमंत राजश्री नानासाहेब

याप्रति

आश्रित गंगाविष्णु वैद्य कृतानेक आसीर्वाद विनंती येथील क्षेम ता वैशाख शुध १० प्रतिपदापरियेंत मुा सवाई जयेनगर आपले कृपे करून येथास्थित असो. यानंतर आपली आज्ञा घेऊन स्वार पुणियाहून जालो ते दरमजल

---

१ तीन रुपये किमतीचें सोन्याचें नाणें.

सैन्यात श्रीमंत राजश्री माहादजी सिंदे पाटील साहेब याजपासी पावलो. त्यांचा निरोप घेऊन जावे तो श्रीमंत पाटीलबावा बोलिले की राजश्री बाजी नरसिंह याचे शेरीरास सावकाश बहुत नाही. त्यासी आपण राहून उपाये करावा. फार संकट घातले. सरकारची हेहि चाकरी आहे, यासी उपाये करणे. त्यासी आम्ही सागितले की, हे गोष्टी बहुत कठिन आहे. दाहा वीस वैद्य तुमचे उपाये करून चुकले. यासी तुम्ही सांगता की, कृपा करून याजला उपाये करणे श्री कृपा करील. त्याजवरोन तेथ राहिलो. आठा दिवसाचा करार करून राहिलो. त्यासी बोलिलो की आम्ही पचवीस हजार रुा घेऊ. त्यासी पाटीलबावा बोलिले की, याच्या जिवावरोन काही आदीक रुा नाहीत. साहा हजार रुो रोख आम्ही देऊ. ते रोख दिल्हे. आनि रसायेन दिल्हे, आनखी करार केला, दोन हजार रुपयाचा गाव वौशपरंपरा तुम्हास देऊ. बरे जालियावरी यैसे बोलोन आवशेष दिल्हें. आठा दिवसात गून आला. निरोप मागू लागलो तेव्हा पाटीलबावानी सनद दोन हजार रुपयाचे गावविशई सनद अजमेरीस लिहून दिल्ही; आनि निरोप दिल्हा. आजमेरीस आलो. आजमेरीचे सुभेदारानी गाव दिल्हा. आमल बसविला. निरोप घेऊन मुा मजकुरास गावीहून आलो. आता त्यानी गाव दूर करून आमल उठऊन दिल्हा. मातबर गावहि देत नाही. पाटीलबावा दुसरा गाव देतील यैसे लिहून आम्हास पाठविले. त्यास आपणास कलावे. आम्ही श्रम बहुत केले. मात्रा रसायेन बहुत खर्च जाले. त्यासी आपण कृपा करून श्रीमंत साहेबाचे कानावर घालोन की गाव वंशपरपरा देऊन सनद दिल्ही. गाव दिल्हा. आता आमल चालविला मागती बंद केला. आजमेरीच्या सुभेदारानी आमल उठऊन दिल्हा. त्यासी आपण कृपा करून पाटीलबावास पत्रें पाठवावी. गाव छ्यातडी आपण दिल्हा तो चालिवावा उचित आहे. आम्ही येथ आहे. आपल्या पत्राचे उतर आलियावरी शेवेसी येऊ. गावाविशाई बहुत प्रकारे लिहून आमचा गाव दिल्हा तो चालवीत यैसे करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष काय लिहिणे. कृपा वृधिमान केली पाहिजे हे विनंती.

सर्व मडळीस नमस्कार आनुकर्म (क्रमे) आसीर्वाद व जोसीबावास नमस्कार व पुरानिकबावास नमस्कार. आपण कासीद सुखलाल बराबर पाठविला होता. त्यानें नौकरी उतम करून जयेपुरास पोहचाविले. आपणास कलावे. याची तलब कृपा करून देविली पाहिजे. आम्ही पदरचे आसो हे विनंती. सुखलाल कासीद जबानी सांगता कलो येईल. हे विनती.

¶Ganga Vishnu Waidya cured Baji Narsinha, Sindia's Diwan, of a serious illness and was therefore given a village in inam by Mahadji Sindia. The jagir was later on resumed by Sindia's officer; Ganga Vishnu therefore requests Nana Fadnis to intercede on his behalf with Sindia and get the jagir restored.

6784

No. 130] [2-6-1770

दोन

श्री

विनंती यैसीजे. दाराज्याहा बाहादूर याणी आनागोंदीचाहि बंदोबस्त केला. बाबरजंग तेथें होता. तो याच्या स्वारी पूर्वी एक प्रहर अगोधर दोन तीन हजार जमावानसी होता. तो तुंगभद्रा उतरून गेला. पलीकडे कमलापूर आहे तेथें जाऊन राहिला. दाराज्याहा जाता गांवकरी येऊन भेटले. नजरा केल्या. याणी ठाण्याचा बंदोबस्त केला. दाणा तेथें फार, कांहीं सांपडला. एक तोफ बाबरजंगाची राहिली ते पंचरसी चांगली होती. याणी आणिली. याउपरी दुवाब्यांत यास घ्यावयास कांही राहिले नाहीं. कोपल, बाहादूरबिंडा दोन ठिकाणे राहिली. पलीकडे तो भाऊच आहेत. आजपावेतो दाराज्याहा याणी ठाणी व महाल व संस्थाने घेऊन बंदोबस्त केला त्याचा येकंदर एक उगणतीचा तपशील :—

१ परगणे सिदनूर हा माहाल दाराज्याहाकडील सरंजामातील त्या पैकीं गांव चांगले ठाण्याचे टिपूनें दाबले होते ते सोडून घेतले.

३ समता

१ कर्डीकल

१ लिंगसगुर

१ संती केल्लूर

———

३

६ ठाणी

१ केदकी नहाल

१ तलेखान

१ होकरण हाल

१ पंचन हाल

१ गंगावती

१ रारावी

———

६

४ संस्थानें

१ कनकगिरि

१ केचनगुंड

१ तावलगिरा
१ आनागोंदी

―――

४

―――

१४

चवदा घेतली. या उपरी दुवाब्यांत कोपल बाहादूरबिंड्यासिवाय कांहीं राहिले नाहीं. तेथें जाणार. या पैकीं कमाविसदार करून पैका दाराज्याहानीं घेतला. कर्डीकल वगैरे तीन समता पंचवीस हजारास विल्हे लाविल्या. तावलगिरा चालीस हजार व गंगावती वगैरे ठाणी पंचावन्न हजार. कनकगीरचे दोन लक्षाचे बोलणे लागले आहे. ठरेल. आनागोंदीचे आदियाप नाहीं. येकूण तीन लक्ष वीस हजार, याप्रमाणे नवाबाचा मुतसदी लिहिणार आहे त्याणे मधेस्तास लिहिले होते. रवाना छ ७ सफर हे विनंती.

¶*The letter reports tentative settlement of territory south of the Tungabhadra recently recovered from Haidar.*

No. 131] [*2-8-1770*

पौ छ १३ जाखर आश्विन शुा १४

मुा नजीक जलेश्वर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण स्वामी गोसांवी यांस पौ माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुमची रवानगी हिंदुस्थानांत केली तेसमई हिंदुस्थानचे माहालचें ऐवजाची नेमणूक तुम्हाकडे करून दिल्ही. त्यास तुम्ही त्या प्रांती गेल्यावर बुंदेलखंड वगैरे मामलती विल्हे लाविल्या; त्याचा जाजती ऐवज जाला तो स्वारीकडे तुम्हीं घेतला. सालमजकूरचा हिंदुस्थानचे माहालचा ऐवज येणे त्यास तुम्हाकडे ऐवज द्यावयाचा नाहीं; कारण की तुम्ही त्या प्रांती आहा. फौजेचा दबाव चहूकडे पडला. चार रुपये खंडण्याचे मिलतील. माहालचा ऐवज झाडून साल मजकुरीं हुजूर घ्यावा लागतो, याजकरितां तुम्हांस लिहिले असे; तरी तमाम मामलेदारास ताकीद करून रसदेचे ऐवजाचा भरणा जलदीने देसी होय ती गोष्ट करणे. जाणिजे छ १० रविलाखर सुा इहिदे सबेन मया व अलेफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Peshwa Madhavrao asks Visaji Krishna and Ramchandra Ganesh to pay into Government treasury contributions received by them from Northern provinces for the current year and not to appropriate them for their own use.*

No. 132] [*23-8-1770 ?*

[पहिला बंद गहाळ आहे.]

२

कचे वगैरे आणतात, त्यापैकी गैरसाल वगैर कितेक निघतात. त्याजवर सरकारचे निशाण पडत नाही. रुपयाहि वहाटाऊन कोण्ही देत नाही. तो रुपया वाजवी रीतीने वटावाप्रो घेऊन सरकारच्या व बाजारच्या चलनीचा रुपया देत जाईन; व खुर्दा विकावयास इतर उदमी व दालदी व भंडारी व कोली पाजकर वगैरे याजपासोन खरीदी येक पैशाचे आंतराने घेऊन विकत जाईन. सरकारात प्रयोजन लागल्यास जो खुर्दा पाहिजे तो मजपासून विकत घ्यावा. पेठेत न मिले तर कोठून तरी प्रयत्न करून आणून देत जाईन. यासमधे माझे दुकानास महसूल पालक व घर म्हैस पालक याप्रमाणे द्यावयाची आज्ञा करून, मजपासून काही जीवन माफीक सरकारात नजर घेऊन वतनी सराफी करून दिल्हीयानी, आणखी दुकाने सराफीची आणून पेठेत दुकाने चालवीन, याप्रमाणे करार होऊन आज्ञा जाहाली पाहिजे म्हणून विनंती. त्याजवरून मनास आणिता प्रांत मजकुरची रयेत सरकारदेण्याचा रुपया पोता लावावयास आणितात. त्यातील गैरसाल व हीण व फुटका रुपया निघतो, त्यावर सरकार पोत्याचे निशाण पडत नाही. तेव्हा रुपया माघारा घेऊन जाऊ. बाहेरून वटाहून आणावयास रयतास हेलपटा पडतो. तेणेकरून रयतेची हैराणगत व चाकरमाने याची वहिवाट चालत नाही; व सरकारात प्रयोजनानरूप खुर्दा पाहिजे, त्या समई थोक मिलत नाही, याजकरिता सराफीची दुकाने इतर तालुक्याचे पेठेत आहेत, व जंजिऱ्याचे पेठेत दुकान सराफीचे असावे ते नाही. सबब मामुरीवर नजर देऊन लक्षुमण सेठ बिन वीस सेठ मजकूर यासी रस्त्यात जागा नेमून दिल्हा असे. त्या जाग्यात नवे दुकान बांधोन सराफी चाल उदीम करील त्याची कलमे बितपसील :

रुपया गैरसल पोते चालनीखेरीज निघतील ते रयेतपासून सराफ मजकुराने घेऊन वाजबे रीतीचा बटा घेऊन रुपया खरा करून देत जावा.

कलम १

खुर्दा विकत घेणे तो दालदी भंडारी व कोली पाजकर वगैरे उदमी लोकापासून विकरीच्या दरास येक पैशाने

उदमी लोकानी रुपया किरकोलापासोन थोकपर्यंत वटावणे ते सराफ मजकुराचे दुकानी वटावावा. सराफ मजकुराने रास्त वटाव घेऊन द्यावा.

कलम १

पेठ मजकुरी नवी सराफीची दुकाने सरकारला कोन (कडोन ?) येतील व सराफ मजकूर आणील, त्या दुकानास

जाजती घेऊन विकत घेणे. देणे तो खरेदीच्या दरास येक पैशाने कमी गिराइकास इतर सराफाखेरीज करून इतर लोकास देत जावा.

कलम १

सरकारात खुर्द्याचे प्रयोजन लागेल, ते समई खुर्दा पाहिजे तो लक्षुमण सेठ मजकुरानें आणून द्यावा. त्याचे रुपये सरकारातून देणे ते खरेदीच्या दरास निमे पैसा कमी करून रुपये सराफास दिल्हे जाईल. कलम १

पेठेत दुकानदार उदमी आहेत, ते जिनसाची विकरी करितील. त्याचा पैका घेता रुपया बंधा घेऊन किरकोल उरेल तो गिराखास खुर्दा देतील त्यास सराफ मजकुराने मुर्जाहिम+ व्हावयास प्रयोजन नाही. कलम १

जागा व त्या दुकानास महसूल करून घेणे ते सराफ मजकुराचे रदबदलीवरून करून दिल्हा जाईल. आणखी सराफ आणून दुकाने घालवील. त्यास सराफानी खुर्दा लक्षुमण सेठ मजकूर याचे दुकान चालवीत घ्यावा. त्यास त्याणे खुर्दा देणे तो खरेदीच्या पाडास निम पैसा कमी करून देत जावा. सराफाचा उदीम पाहोन महसूल सरकारातोन करार केला जाईल.

कलम १

कलमे ६ साहा.

येणेप्रमाणे साहा कलमे करार करून लक्षुमण सेठ मार याजला पेठ मजकुरी सराफीचे वतन करून दिल्हे असे. यासमधे नजर जीवन मवाफिक सराफ मजकुरापासोन नख्त रुपये ७९ पाऊणसे सरकारात घेऊन हे पत्र भोगवटियास सादर केले आहे. या वतनसमधे लक्षुमण सेठ्या पालक++ सराफीचे येका दुकानाचा महसूल, येक घराची घरपटी व येक म्हैसीची ठाणपालक दिल्ही असे. दरसाल सरकारातून पालक पडत जाईल. पालक घेऊन पेठ मजकुरी दुकान घालोन सराफीचा उदीम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करील; व पेठ मजकुरी नवी सराफाची दुकाने हा आणील, व सरकार कौलाने येतील त्यास उदीम पाहोन, महसूल याचे रदबदलीने करून दुकानास जागा नेमून दिल्ही जाईल; तरी तुम्ही सराफीचे कामकाज सदरहू अन्वये लक्षुमण सेट मजकुर याचे हातून घेत जाणे. सराफीचे

+ विरुद्ध वागावयास.

++ पालक = Exemption from tax (Wilson).

वतनास येक दुकानाचा महसूल व येक घराची घरपटी व येक म्हेसीची ठाण याप्रमाणे दरसाल सरकारातून पाल पडत जाईल, ते पालक चालऊन यासी सराफीचे वतनाचा भोगवटा सुखरूप करून देणे. या पत्राची तालीक तुम्ही घेऊन, आसल पत्र सराफ मजकुरास भोगवटियास परतोन देणे. छ १ जमादिलोवल मोर्तब सुद.

¶*This is a Contract with one Lakshman Shet for minting copper coins. The conditions on which the contract is given are detailed in the paper. The first sheet is missing and with it the place and the names of the persons are also missing.*

No. 133] [*14-10-1770*]

पौ छ २६ जमादिलाखर
सन खमस सितैन.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
वेंकाजीपंत+ स्वामीचे सेवेसी

पो बालाजी जनार्दन सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २४ जाखरपर्यंत येथास्थित असे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री त्रिंबक नारायेण मंत्री याजकडील यैवज साताऱ्याचे खर्चास यैवज देविला आहे. त्यास या यैवजपैकी बाईचे रसदेचे पंचवीस हजार रुपये साताऱ्याचे खर्चास देऊन मंत्री याजकडील वरातेपैकी पंचवीस हजार रुपये पुण्याचे खर्चास घेता; त्यास मंत्री याजकडील यैवजाची घालमेल न करावी म्हणोन पत्री विस्तारे लिहिले ते कलले. ऐशास यैवजाची घालमेल येथून जाहाली नाही. श्रीमंतापासी जाहाली. मंत्री याजकडील यैवजी येकूण साठ हजार रुपयाची वरात पेसजी तुम्हाकडे साताऱ्याचे खर्चास दिल्ही आहे. त्यांत रसदेचे पनास हजार रुपये कार्तिक मासी व नऊ हजार रुपये वैशाख मासी ऐशा मुदती लाऊन दिल्या आहेत. त्यास मंत्री याजकडील रसदेचा यैवज पौष शुध पौर्णिमेस घ्यावयाचा करार गुापासून जाहाला, त्याप्रमाणेच साल मजकुरी करार जाहला. तेव्हा कार्तिक मासी यैवज यावयाचा राहिला. वाईचे रसदेचे पंचवीस हजार रुपये तूर्त यावे ते तुम्हाकडे देऊन त्याचे मुबदला मंत्री याजकडील मुदतीचे पौष मासचे पुण्याचे खर्चास लाऊन दिल्हे. मंत्री येथे आल्यावर हा मजकूर कलला. याजकरिता तेच समई सरकारचे पत्र

+ पोतनीस.

तुम्हास लिहून पाठविले. किंबहुना आगोधरचा यैवज पुण्याचे खर्चास लागला असता, तरी यैवजाची घालमेल होत्ये ही होऊ न द्यावी म्हणोन लिा तरी असोत. तो प्रकार नसतां, पुण्याचे खर्चाची वोढ असा प्रकार असतां, आगोधर वाईचा यैवज यावयाचा तो तुम्हाकडे दिल्हा, आणि मुदतीचा पुढील पुण्याचे खर्चास लागला, असे असोन मध्येच यैवजाची घालमेल करणे हे विहित नसेल म्हणौन तुम्ही लिहिलेत, हीच गोष्ट अपूर्वात आहे. असोत. घालमेल यैवजाची येथून होणार नाही. श्रीमंतापासीच जाहाली आहे. श्रीमंताचेहि पत्र आठा चौ रोजी तुम्हास[1] येईल. यैवजाची घालमेल काये जाहाली, वाईचे तूर्तचे पंचवीस हजार तुम्हाकडे देऊन पौष मास पौ पंचवीस पुण्याकडे घेतले, यांत तुम्हाकडील नुकसानी कोणती जाली व पैकाहि उणा कोठे जाहाला? तेथील खर्चासहि ऐवज जरूर असावा हेंच लक्ष आमचे आहे; तर मंत्र्याकडील पोषमासपौ पंचवीस हजार आपण घेऊ नयेत. बहुत काय लिहिणें, लोभ असों द्यावा हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Venkajipant at Satara, explaining the provision made by the Peshwa for the expenses of the Rani of Satara, out of the revenues of Wai and the draft drawn against the Mantri.*

No. 134] [*25-10-1770*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बालाजीपंत दादा स्वामीचे शेवेसी

पौ कृष्णाजी लक्ष्मण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ९ रजब जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री कृष्णाजी मैराळ व चिंतोपंत फडनीस श्रीमंत राजश्री नानास विनंती करितात की माहालची लावणी पाडली ते माजी मामलेदार व सरफडणीस येक होऊन पाडली, बखेडे केले, दहकाची तकरीर केली, म्हणोन वर्तमान सांगतात म्हणोन ऐकिले. त्यास मामलेदार व फडनीस सांगत आसतील ते खरेच आसेल, थोर आहेत. लावणीचा मजकूर पूर्वी राजश्री लक्ष्मण कोनेर याजकडील मामलत निघोन राजश्री नारो आपाजीकडे जाली, तेव्हा त्याणी दरोबस्त माहालचे वहित पडित निवडून समजोन घेतले व गावगना माहालानिहाय कारकून पाठऊन, पाहाणी करून, मग जमाबंदी केली. त्याप्रमाणे राजश्री कृष्णाजी मैराळ यास राजश्री कृष्णाजी बलाल दफ्तरदार याणी च्यार पाच वेळा सांगितले कीं जमीन वहित पडित याची चौकसी करावी व गावगना कारकून पाठऊन पिकाची पाहाणी करावी, नंतर

---

[1] येथून पुढें हस्ताक्षर नाना फडणीस यांचें.

जमाबंदी करावी. त्यानंतर माघसिमी (माघमासी) येथे आलो. तेव्हा त्यास सांगितले कीं गावगना पाहाणी केल्यासिवाये जमाबंदी कैसी करता? कोण्या गावचे पीक कसे आले, तुम्ही जमाबंदी करता त्यास गाव बुडतो की तरतो, सरकारकिफायेत होते की नुकसानी होत्ये, हे तुमच्या ध्यानात कसे येईल? मोघम जमाबंदी केल्याने सारेच गावगना पाटील हाका मारतील की आम्ही बुडालो. जमाबंदी सख्त जाली. मोघम जमाबंदी कर्णे ठीक नव्हे. मागील आमलदार पाहणी करून, मग जमाबंदी करीत आले, त्याप्रो॥च तुम्ही करावें. याप्रो॥ दाहावीस वेळा सांगितले, परंतु त्याच्या ध्यानासहि गोष्ट न येता जमाबंदी मोघम केली. जमाबंदीचा सांप्रदाये मागील पाहाता, माघआखेर जमाबंदीचा फडशा होऊन वसूल चालता करावा आणि जेष्ठ आषाढ आखेरपर्येत वसुलाचा झाडा होऊन, श्रावणमासी जमा वसूल होतात. भाद्रपदमासी हिसेब पुण्यास कारकून घेऊन येतात. हा मजकूर सर्व मामलेदारास पुसल्यास निवेदन करतील. साल मजकुरी सन इहिदेत राजश्री कृष्णाजी भैराळ याणी जमाबंदीस फाल्गुन शुधात याचे पुत्राचा वृतबंध जाल्यानंतर जमाबंदीस प्रारंभ केला, तो चैत्र आखेरपर्येत जमाबंदी जाली, आणि वैशाख जेस्ट दो महिन्यात वसुलाचा फडशा करून माहाली बाकी दाहा बारा हजार रुपये आजमासे ठेऊन, पुण्यास श्रीमंताचे भेटीस आले. येणेप्रमाणे येथील वहिवाट जाली. मग लावणी आम्ही पाडली की मामलेदारानी पाडली हे आपले ध्यानास येईल. माजी मामलेदारानी दिकत कोणे प्रकारे कसकसी केली याची चौकसी त्याणी केलीच आसेल, हे त्यास पुसावे. मी कारकून, हिसेबाचा मजकडे संमंध; मी लावणी कसी पाडली याचा तपसील काये सांगतात ती चवकसी करावी. दहकाची तकरीर केली ऐसे म्हणतात, त्यास दहकाचा हिसेब मामलेदारानी परभारे श्रीमंतापासी पाठविला, त्याजवरून श्रीमंतानी वरातदारास मनाई दिल्ही. ऐशास नारो बाबाजीपासून सरकारात हिशेब पाठवावा तो माझेपासून जात आसे. आसे असता मामलेदारानी परभारे हिसेब पाठविला. आम्ही नेवाशात कारकूनसुधा जवळ आसता हिसेब जाऊन, मनाई आली, तेव्हा आम्ही कारकून सरकारचे आसोन कामाचे काये, ऐसे जाणोन, महिना पंधरा दिवस गावगना बारकाईने शोध घेऊन दहकाचा हिसेब आकारून सरकारात पा॥, यात तकरीर जाली की काये? आम्ही हिसेब पाठविला त्यास व जमीदाराचा हिसेब व माहालचे फडनीस याचा हिसेब याची रुजुवात येथे राजश्री मल्हार जगंनाथ नि॥ नागोराम याचे गुजारतीने जाली, त्यात तफावत जाली नाही. शे दोनसे रुपयाचे अंतर पडले. येणेप्रो॥ मजकूर आहे. यात आम्ही बखेडा करून लावणी पाडली व तकरीर केली ती कसी हें आपण ध्यानात

आणावे. येथे मार होत गेला तो श्रीमंतास वरचेवर लिहीत गेलो. मामलेदारानी मामलतीस चड केला तो साधला नाही, म्हणोन ऐसी नाना प्रकारची तुफाने मजवर घातल्यास चड सुटतो की काये? कोण्या गावास तगाई, अथवा कोण्या गावास कौल, आथवा पडित जमीनीस इस्ताव्याचा कौल मामलतदार लावणीचा बंदोबस्त करीत आसता मी कोणास दिकत केली की काये? याजपासून लावणीचा बंदोबस्त घडला नाही व मी कोणास दिकत काही केली नाही. आपणास लावणी होईना, आणि कारकुनावर निमित्ये घ्यावी, आसा मी कमाविसदार कोठे पाहिला नाही. माजी मामलेदार व आम्ही येक जालो ऐसे राजश्री कृष्णाजी मैराळ श्रीमंतास सांगताव. त्यास नारो बाबाजीची मामलत निघोन लक्ष्मण कोनेर याजकडे जाली, तेव्हा मी नारो बाबाजीकडे जात होतो. त्याचे हिसेबाचा फडशा दोन वर्षे होत होता. लक्ष्मण कोनेरकडून मामलत निघोन नारो आपाजीकडे जाली, ते समई लक्ष्मण कोनेर याकडे येक वर्षे जात होतो; तेव्हा त्याचा फडशा जाला म्हणून राजश्री रामचंद्र नारायेण याजकडील मामलत निघोन राजश्री मैराळ जिवाजीकडे जाली. त्यास राजश्री माहादाजी अनंत जवल आहेत. हिसे रसिदीचा वगैरे हिसेब तुटमुदतीचा होणे, या कामामुळे पाचसात वेला त्याजकडे गेलो होतो. इतकेच निमित्य मजकडे येऊन लावणी पाडली म्हणतात, याची चवकसी करून लटक्याचे पारपत्य करणार श्रीमंत समर्थ आहेत. +मी तीस वर्षे चाकरी केली, सरकारात लटके बोलणें व सरकार-कामात नुकसानी करणे, ही गोष्टी मजपासून घडती तरी श्रीमंत राजश्री नानाचे पायापासी टिकणूक कैसी होती? मजला आपण लाहानपणीपासून माहीत आहेत. आता सर्व आश्रा स्वामीचा आहे. मामलेदाराचे वसिले बहुत आहेत. माझे साहित्य कळेल तसे करावे. सर्व मजकूर रा। कृष्णाजीपंत सांगता विदित होईल. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*Krishnaji Lakshman represents to Balajipant Dada that he has been wrongly blamed in the matter of the assessment of revenue and prays that an enquiry should be instituted and justice be rendered to the writer.*

No. 135] [*10-2-1771*

श्री

राजश्री मल्हारजी कापसे हवालदार

किले मुरूगमला गोसावी यासी

सुा। इहिदे सबैन मया व अलफ. समत मुरूगमला व पेठ किले मार येथें तुम्ही किल्यावरून परभारा रयेतेस उपद्रव करून दंड गुन्हेगारी घेता म्हणोन

\+ अक्षर निराळें.

हुजूर विदित जालें, त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असें; तरी तुम्हास समत मजकुरीं गावखेड्यास खंड गुन्हेगारी घेऊन उपसर्ग करावयास प्रयोजन काये? अत:पर हे गोष्ट परिछिन्न कार्याची नसे. आजतागाईत खंड गुन्हेगारीचा हिसेब लेहून हुजूर पाठवणें. या उपरी पेठेत व समत मजकुरी रयतेस वगैरे यास उपसर्ग न करणें. जाणीजे छ २४ सवाल. आज्ञा प्रमाण.

¶*Malharji Kapse is ordered to desist from molesting the ryots of the villages under fort Murugmala.*

No. 136] [*31-3-1771*

पैवस्ति छ ११ रबिलौवल इहिदे

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बालाजी पंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिंबकराव शिवदेवें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत चैत्र वद्य १ मुकाम आंतरवेदींत मथुरावृंदावनाजवळ येमुना उतरोन उत्तरतीरीं जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावें. विशेष, परगणें जैनाबाद मंडई, माजरोद, समेत व परगणें हातगड येथें ब्राम्हणांस इनाम जमिनी व गांव ब्राम्हणांस व फकीरांस वगैरे चालत आहे व आजीबाद जमिनी व धर्मादाय खर्च पडत असतो; याचा झाडा काढून आणावयास राजश्री गोविंद अनंत कारकून सरकारचें आज्ञापत्र घेऊन जैनाबादेस आले, त्यास कमाविसदार सालमजकुरीं नवे करोन पाठविले आहेत, त्यांची माहितगिरी पुर्ती नाहीं, याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. आम्हांस खानदेशचे माहाल जैनाबाद व मांजरोद मंडई वगैरे भोवरासें आदी करोन कच्चा हिशेब हुजूर समजावणेंचा आहे. कमाविसदार व जमीदार देशीं आल्यावर समक्ष आणून कच्चे हिशेब समजाऊन देऊन आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं. तूर्त माहालीं आधींच आफती पडोन निमे जमेस ठिकाणा नाहीं. त्याहीमधें कारकून माहालीं गेल्यामुळें बखेडा होऊन होत्या कामांत आंतर होतें. याजकरितां विनंती मान्य पडोन या समयीं कारकुनास माघारें बोलाऊन घ्यावयाची आज्ञा करावी. देशीं आम्ही आल्यावरी कच्चा हिशेब जमीदार देखील हुजूर आणून समजावयास अंतर होणार नाहीं. आम्हास सरकारआज्ञेप्रमाणें वर्तणूक करावयास उजूर काये आहे? माहालांत कमती दरसाल आफती पडोन मनमानेसी आली आहे. फौजेस खर्च दोन दोन तीन तीन छावण्यामुळें जाजती पडतो. यामुळें कर्जाशींच गांठ आहे. सविस्तर आमचें वर्तमान कच्चे आहे. स्वामीपाशीं निवेदून आज्ञाप्रमाणें

वर्तणूक होईल. आफतीच्या कारभारात कारकुनांनीं तेथें बखेडा केल्यास होणार कामांत आंतर पडोन नुकसान होतें, याजकरितां विनंती लिहिली आहे. सविस्तर विनंती माहालींहून राजश्री आपाजी गणेश कमाविसदार यांजकडून कारकून येऊन करितील तें ध्यानास आणून कारकून हुजरोन गेले आहेत त्यांस बोलाऊन घ्यावयाविशी आज्ञा केली पाहिजे. येविशी चिरंजीव राजश्री दादोशंकर खांसा स्वारी समागमें कर्नाटकांत आहेत ते फिरोन आल्यावर ते सेवेसी विनंती करितील. सर सुभेदार दरसाल येऊन पैका घेतात तितका माहालीं जमा होत नाहीं. सरकारमर्जीप्रमाणें सेवक लोकांस वर्तणूक करितां ज्याजती पैका लागतो व माहालींहि कमती यास्तव कच्चे हिशेब समक्ष आल्यावर समजावणें जरूर आहे. कमाविसदार नावाकफ नवे आहेत. सरकारमर्जीची समजोती पडणार नाहीं, याकरितां आम्ही देशीं येंऊ तोंवर महकूफ करावें. दर्शनास आलियावरी सविस्तर निवेदन होईल, सेवेसी कळावें. साडे नऊ हजार रुपये सरकारांतून सरसुभेदार येऊन घेतात, त्यास माहालीं ठिकाणा नाहीं. सविस्तर कच्चे हिशेब देशीं आल्यावर समजाऊं तेव्हां ध्यानास येईल. कृपा करोन कारकून माहालीं पाठविले आहेत त्यांस बोलाऊन घ्यावयास आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि केली पाहिजे हें विनंती.

¶*Trimbakrao Shivdeo writes from the Doab requesting Nana Fadnis that the inspecting officers sent by the latter to examine accounts of his talukas in Khandesh be recalled.*

No. 137] [*17-9-1771*

पौ छ २९ जाखर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामींचे सेवेसी

पौ सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ७ जमादिलाखर जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. केसो बलाल नऱ्हेकर चिंचवडी राहतात, त्याचे सुनेने जीव दिल्हा की काय जाहाले ये गोष्टीचा शोध लागला नाही आणि केसोपंतास व त्याचे गोत्रजास आपंक्त केले म्हणोन येथे मशारनिलेचे गोत्र पुरुष आहेत त्याणी विदित केले. त्यावरून येथे सिष्टब्राह्मणास पुसतां त्याणी शास्त्रमते सांगितले की याविसीचा दोष गोत्र पुरुषाकडे नाही, यांची स्नानसंध्या चालावी. त्यावरून सर्व ब्राह्मणांचे मते येथे पुरुष

आहेत ते मुक्त जाले. ऐसियासी देसी गोत्र पुरुषांचा मुलें मनुष्यें आहेत, शास्त्रता पाहतां गोत्रजांकडे हा दोष नाही. त्यावरून सिष्ट ब्राह्मण याणी त्याचीहि मुक्तता केलीच आसेल. येथे पुर्ता शोध मनास आणून श्रीमंतानी श्री देव यांस व वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्रीबावास व आपल्यास पत्रे लिहिली आहेत तर आपण उभयेतास सांगोन यांचो मुक्तता लवकर करावी. यांची घराणी थोर आहेत. लग्ने, मुहूर्त, हव्यकव्य सर्व राहिलीं आहेत. चौघा ब्राह्मणाचें मतें होईल तें करावे. बहुत काय लिहिणें? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bhagwant requests Nana Fadnis to execute the decision he had given in the case of restoring to normal social relations, relatives of a brahmin female suspected to have committed suicide.*

No. 138] [*19-10-1771*

श्री नकल

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री
रामचंद्र बलाल सुभेदार किले महीपतगड
गोसावी यांसी

सेवक भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधि नमस्कार. सुा इसने सबैन मया व अलफ. रावो बलाल व कृष्णाजी बलाल व बालाजी नारायेण व बहिरो लक्षुमण उपनाम कारले देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी सुभा दाभोल याणी कऱ्हाडचे मुकामी हुजूर येऊन विनंती केली जे, सुभे मजकूरचे आकरा माहालचे देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी आपलेपैकी ताा खेड तलवटीबंदर देखील नादबंदरपैकी देहे दरोबस्त व निमेचे व चौथाई स्वामीचे जिल्हेत तालुके महिपतगड व किले महीमंडणगड सदरहू तीन किले यांचे तनखेयास देहे सदरहू तर्फेपैकीं आहेत. यैसियासी वतनाचा हकरुसूम कैलासवासी संभाजी माहाराज नावडीचे मुकामीहून मोगलानें धरून नेले, तदोत्तर याकूबखान याणी किले अंजणवेल हबसी याणी घेतली, जंजिरे सुवर्णदुर्ग कानोजी आंगरे सरखेल यांजकडे जाहला, त्या सालापासून आपला हक रुसूम सरकारामध्यें जप्त जाहला. वडील आपले संभाजी बलाल व लक्षुमण बलाल लाहान कुटुंबसुधा हबसी व आंगरे यांचे किलेयात राहिलों. स्वामीकडे आपल्या हरदू वतनाची चाकरी करावयासी रूजू व्हावें, परंतु त्याचे कैदेमुळें येता नये. हबसी व आंगरे याजकडे आपले वडील व आपण हक रुसूम याचे यैवजीं मोघमे मुशाहिरा देत तो घेत होतो. यैसियासी कैलासवासी नानासाहेब याणी सन सीत खमसैनांत जंजिरे सुवर्णदुर्ग व किले अजणवेल सरकारात फते केले. त्या समयीं आपण पुणे मुकामी हुजूर येऊन सर्व आपली हकीकत निवेदन केली,

6795

त्यावरून कृपाळु होऊन वतनदारीवर नजर देऊन आपला हक रुसूम याचा अजमास पाहून त्या अजमासाच्या अन्वयें साल दरसाल जैसी जमाबंदी आकारेल त्यापैकीं सेपनास रुपये सरकारात ठेऊन बाकी यैवज आपणास देत होते तो घेत आलो. याअन्वये भोगवटा चालत आला. स्वामीकडे यानें त्यास सन सितैनात कैलासवासी यमाजीपंत आणा यांजकडे येऊन सदरहू अन्वयें विनंती केली. त्यावरून किले महीपतगडास व व्याघ्रगडास व महीमंडणगडास पत्रें दिली जे मारनिलेची वतनसमधे सेवा घेऊन यांचा हकरुसूम आकारले त्याप्रमाणें यांस पावता करणें, यैसी पत्रें घेतली. उपरांत तालुके तालुकेयांस पत्रें रुजू करून सेवा करावी तो आणास देवाज्ञा जाहली. उपरांत स्वामीचे जिल्हेत काही दिवस हाली-माजी जाहाली यामुळें ते गोष्टी न घडली. यैसियास हली स्वामीनी कृपाळु होऊन सरकारजमाबंदी साल दरसाल आकारेल त्याप्रमाणें परभारा रयेत निसबत आपला हक रुसुम बिा

नख्त बाब यैन बेरीज	यैन जिनस गला दर खंडीस
दर रुपयास ८॥·	राजभागास कैली ८॥·
नारल राजभागास दर	वजन किमती दर रुपयास नख्त ८॥.
हजारी नख्त ८=॥·	

येकूण नख्तबाब यैन बेरजेस निम आणा व गला दर खडीस अदमण वजनी किमतिवर दर रुपयास निम आणा व नारल दर हजारी राजभागास अडीच आणे येणेंप्रमाणें आपला हकरुसूम सिरस्ता आहे. यैसियासी राजश्री पंत प्रधान यास विनंती केली त्यावरून साल मजकुरापासून हकरुसूम परभारा रयेत निा देत जाणे म्हणोन राजश्री विसाजी केशव सर सुभेदार प्रांत कोकण व रामाजी महादेव तालुके सुवर्णदुर्ग येथील सुभेदार यांसी पत्रें दिलीं आहेत. त्याप्रमाणें स्वाम कृपाळु होऊन हक रुसुम परभारा रयतेनिसबत चालऊन वृत्तिची चाकरी घ्यावी म्हणोन, त्यावरून याचा पूर्वअन्वयें सविस्तर मनास आणून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी किले मजकूरच्या तालुक्यास तर्फ खेड व ताा नादू बंदर येथील देह आहेत तेथें साल दरसाल जमाबंदी आकारेल त्यास परभारा रयेत-निसबत सदरहू लिहिलेंप्रमाणें देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी यांचा हक रुसुम पावता करून वतनाची चाकरी घेत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करणें. या पत्राची प्रति लेहून घेऊन हे पत्र भोगवटीयास परतोन यांजकडे देणे. जाणिजे छ १० रजब निदेश समक्ष.

¶*Bhagwantrao Trimbak Pratinidhi issues orders to Ramchandra Ballal Subhedar to restore the vatan rights of the Karles, Kulkarnis of Dabhol. The paper incidentally mentions the capture of Sambhaji at Navdi by Aurangzeb's forces. Navdi is the name of the village where the present bazar of port Sangameshwar stands and through which the motor road now crosses the river. This spot is nearly two miles south of Kasba Sangameshwar.*

6796

No. 139] *[8-12-1771*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक भिकाजी नायक सरदेसाई तर्फ खिलणा सां। नमस्कार. विज्ञापना ऐसिजे. विठल नारायण नामजोशी व कृष्णाजी रामकाणा यांचा मौजे मुरबाड ता। संगमेश्वर येथील ठिकाणाचा कज्या होऊन मनसुबी हुजूर पडली, त्याविसी राजश्री बाळंभट मावलंकर नि॥ सदाशिव नायक सरदेसाई यांस हुजूर बोलावणे जालें. त्यास दादोबा नाईक यासी बरें वाटत नाहीं, यामुळें त्यास तूर्त येतां नये. मना चिठी द्यावी म्हणून राजश्री सदाशिव नाईक याचे पत्र आले त्याजवरून सरकारांत आम्ही विनंती करून दोन महिन्यांची मुदत मागोन हा कागद लिहून दिल्हा असे. तरी आजपासून दोनमहिनियानी बाळंभट हुजूर हजर होतील, न जाल्यास आपण हजीर करून देऊं. छ १ रमजान सु॥ इसने सबैन मया व अलफ हे विज्ञापना.

¶*Bhikaji Naik Sardesai writes to the Peshwa that he stands surety for Balambhat Mawalankar and pledges to produce the latter in the court after two months from the date.*

No. 140] *[8-12-1771 ?*

श्री

शेवेसी विज्ञापना तागायत छ १ रमजानपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. महादेवकर ब्राम्हणाचे देउली चोरी जाहाली. तिचा माग चोराचा ब्राम्हणानी काढीत नेला. चोराचा थांग लाऊन राजश्री बाबूजी नाईक जोशी याजकडे जाऊन सांगितले. त्याणी चोर धरून कांहीं वस्तभाव चोरापासीं सांपडली. ते ब्राम्हणाचे हवाला करून चोर बारामतीस पाठविले. ब्राम्हण महादेवास आपले घरीं आले. हे वर्तमान मलवडीकर घाटग्यास कलले. त्यावरून ब्राम्हणास बोलाऊन नेऊन वादपूस केली, तुम्ही चोराचा पत्ता लाऊन चोर आम्हाजवल आणावे, आम्ही पारपत्य करावे; ते आमचे मुलकांतील चोर पेसव्याकडे कसे नेले म्हणोन पुसिले. त्यावरून ब्राम्हणानीं सांगितले कीं बाबूजी नाईक याणी चोर धरिले, वस्तभाव सांपडली ते आम्हांस दिल्ही. ते देवाचे जामदारखानियास आणिली. चोर बारामतीस ठेविले आहेत. पुढें पेशव्याकडे पारपत्यास रवाना करतील ऐसे सांगितले. परंतु ते न आईकता ब्राम्हण धरून नेऊन कैदेंत ठेविले. मारहाण करूं लागले. तेव्हां दहा पाच ब्राम्हण पुण्यास आले

6797

आणि म्हणो लागले कीं मलवडीकरानीं ब्राम्हणावर गहजब केला आहे. त्यास लेहून मोकलीक करविली पाहिजे, म्हणोन सांगितले. त्यावरून येथून घाटग्यास पत्र लिहिले कीं ब्राम्हणास मारहाण करावी हे तुम्हास उचित नाहीं. चोर सरकारांत आले आहेत. खासा स्वारी आलियावरी पारपत्य होईल. तुम्ही ब्राम्हणास सोडून देणे, म्हणोन लिहून राजश्री नारो लक्ष्मण कारकून याजबरोबर पांचसात राऊत देऊन घाटग्याकडे मलवडीस रवाना केले. मशारनिल्हे मलवडीस गेले. पत्र घाटग्यास दिल्हे. ब्राम्हणास सोडून देणे म्हणोन नानाप्रकारें सांगितले, परंतु ते ब्राम्हणास सोडीत नाहीं. मारहाण करितात ऐसे मशारनिल्हेनी लेहून पाठविले आहे, तेच बजिन्नस सेवेसी रवाना केले आहे, त्यावरून सविस्तर निवेदन होईल. ब्राम्हणाकडे अन्याये दिसत नसतां सरकारचे पत्र कारकून गेला असतां त्यानीं भाषणे केली आणि कारकुनास सरकारच्या पिटून लाविले ते वृत सविस्तर पत्रावरूनच कळूं येईल. याप्रकारे वर्तणूक करणार राज्यांत बहुतकरून राहिले नाहींत. फौज पा। पारपत्यही केल्यास होते, परंतु कानावर पडून आज्ञा होईल त्याप्रमाणें करावे हे उचित जाणोन सविस्तर विदित व्हावे यास्तव लिहिले असे. ब्राम्हणास स्नानसंध्या नाहीं, अन्न नाहीं. नित्य चोराप्रमाणे मारहाण होते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a complaint lodged by the Brahmins of Mahadeo against the Ghatge of Malavdi for keeping them in confinement and beating them cruelly. A theft was committed at the temple of Mahadeo which was traced and the culprits handed over to Babuji Naik. The offenders were sent to Poona and the recovered property went back to the temple. Ghatge within whose jurisdiction lay the place, naturally took offence at the attempt of overreaching his authority and had the Brahmins confined whereupon the Brahmin community sought relief against him from the Peshwa.*

No. 141] [*1771-72.*

श्री

यादी त्रिंबकराव विश्वनाथ याजकडील अजमास सु॥ इसने सबैन मया व अलफ. खो। कापड रु॥

९४४०४३०॥–	हुजुरून यैवज पावला देखील सन सबैनचे बाकी मिलोन रु॥.
९४२१९३॥॥·	सन सबैनात फौज छावणीस राहिली त्यास नालबंदी पै॥ यैवज पावला तो रु॥.

३३००००	कृष्णराव बळवंत याजसमागमे फौज साल गुा गेली त्यास वगैरे यैवज पावला तो देखील गाव रुाो.
६३१२६२४।–	
४६२६७६१	माारनिलेनी माघ मासापासून वैशाख-अखेरपर्यंत खर्चाचा अजमास करून पाठविला ती बेरीज रुाो.
१७५००००	सालमजकुरची नालबंदी फौजेस द्यावी लागेल ती देखील कापड मिळोन रुाो
११६८९३८५।–	
२०००००	कापडाबाा कापड आख
	३५४००० किता
	४६००० किता
	४०००००
	पैाा निमे नख्त रुाो
१२८८९३८५।–	

¶*An account of monies spent by Trimbak Vishvanath Pethe on his Karnatak expedition.*

No. 142] [*Before 1772.*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोविंदपत तात्या स्वामीचे सेवेसी पोष्य सदाशिव दिनकर साा नमस्कार विनंति. येथील कुशल ताा छ २५ साबान मुकाम भादोले जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. बहुत दिवस जाहाले पत्री परामर्श होत नाहीं, तरी ऐसे नसावें. निरंतर पत्रद्वारा सांभाल होत असावा. यानंतर राजश्री विस्वासराव रामचंद्र यांजविसीं श्रीमंतास विनंती केली तो मजकूर आपलेहि श्रवणांत आहेच. त्याजवर घरास आल्यानंतर, माारनिलेकडील कारकुनास बोलाऊन, सरकारचे

जाबसालाविसी बोलून, त्यांजकडील उतरें जाली ती पूर्वी श्रीमंताचे सेवेसी विनंतिपत्र विनविलें होते. त्याजवर मारनिलेस समागमे घेऊन पुण्यांस यांवे, तर मी घरी आल्यापासून दिवसेंदिवस रोगाने क्षीण जाहालों याजमुलें दिवसगत लागली. सेवटी तसाच घरीहून निघोन, विस्वासरावजीस समागमे घेऊन, मुकाम मजकुरापावेतो आलो. येथे मजला ज्वर उत्पन्न जाहाला, तेणेकरून फार विकल जाहालो. काहीं उतार पडला म्हणजे पुढें यावे, याकरितां बारा दिवस येथें राहिलो; परंतु दिवसेंदिवस वाखा फारच होऊ लागला, त्यामुलें लाच्यार होऊन माघारा फिरलों. विस्वासरावजी समागमे होते ते पुढें यावयाकरितां आले आहेत. श्रीमंतांचे सेवेसी विनंतिपत्र विनविलें आहे. आपण प्रविष्ट करून ज्यांत सरकारचे जाबसालाचा उलगडा पडून मारनिलेचा परिणाम लागे ते करणें आपणाकडे आहे. तात्या, रावजी श्रीमंताचे दर्शनार्थ उदित आहेत, परंतु भयचकित आहेत, तें भय दूर करून यांस दरबारास नेले पाहिजे. मी समागमे येत होतो. माझी दशा असी जाली, याजकरितां मागे फिरलो ; स्वस्छ जाल्यावर येईन. रावजीचा जाबसाल अगत्यवाद धरून केला पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ करावा हे विनंती.

¶[*Sadashiv Dinakar who was not in good health earnestly requests Govind Shivaram to win the favour of the Peshwa in deciding the case of Viswasrao Ramchandra.*

No. 143] [*25-9-1772* (?)

पो छ १ रजब

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पो कृष्णाजी गोविंद गोरे कृतानेक सा नमस्कार. विनंति येथील कुशल ता भाद्रपद वद्य चतुर्दसीपावेतो यथास्थित असे विशेष. नवमीस माहामात्रा मातुश्रीस दिल्ही ते दशमी येकादसी तीन दिवस माहामात्रा दिल्ही. येकादसीस नुस्ते दुधातच दिल्ही. ऐसे तीन दिवस देऊन द्वादसीस पथ्य मीठ शाका इत्यादि पथ्य जाहाले. मर्जी बहुत नाजुक जाहाली आहे. चालावयासी सामर्थ नाही व पालखीत बसोन च्यार कोस जावयासी कठिण पडेल असा प्रसंग आहे. तथापि मात्रेने आपला गुण केला. किंचित प्रकृत हलकी जाहाली. दाहा[1] सीत निवारण

---

१ दाह.

जाहालें. पुढे आठच्यार दिवस पथ्य साधारण घडेल. त्या उपरांत येखादी मात्रा द्यावी असा योग मर्जीनुरूप करावा. नि:शेष अरोग्यता शरीरी बाणलियावरी अरोग्यतेचे वृत सेवेसी लिहून पाठवीन. येथे आलो तेच दिवसी कासीकर समर्थ पंडित आज दाहा महिने मातुश्रीपासी आहेत, त्यास माहावात होऊन संध्याकाल पावेतो बिदा व्हावे अशा योगात वैद्याचे येणे जाहाले. बहुत यत्न केला. मात्राचा अनुपानाचा प्रकार फार केला. त्यावरून त्या ब्राह्मणाचा त्रिदोष सनिपात दूर होऊ(न) आरोग्य जाहाले. कलले पाहिजे. श्रीमंत मातुश्री आईसाहेबी श्रीकासीस जावयाचा उद्योग फार चितात धरिला आहे तदनुरूप येथील निकटस्थहि भर देतात व श्रीमंतहि रवानगीचा विचार तरतूद करितात, परंतु येथे पालखीत बसावयासी सामर्थ नाही हे कोण्ही विचारीत नाही व तिरस्थली यात्रा व्हावी असी पत्रेहि हिंदुस्थानातून यावी, त्या उपरी प्रस्थान करावे असेहि कोण्ही लिहिले नाहीं, हें अपूर्व वाटते. येविशीचे मी छोटेखानी शागीर्द मला काये पडले आहे? परंतु ज्या गोष्टीनी परिणाम नीट ते येथे लिहिल्यातच उतम. कलले पाहिजे हे विनंति. राजश्री हरिपंत भाऊ बरवे यास नमस्कार रा शनवार अमवाश्या प्रहर दिवस.

¶*Krishnaji Govind Gore reports to Haripant Phadke, the improvement in Gopikabai's health and advises that on account of declining health she should not be allowed to proceed on a pilgrimage to Prayag.*

No. 144] [*4-11-1772?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीस

समस्त ब्राह्मण तालुके सुवर्णदुर्ग कृतानेक वेदोक्त आशीर्वाद विनंती येथील कुशल तागाईत मार्गशीर्ष शुद्ध १० पावेतों कृपालोकनेंकरून सर्व ब्राह्मण यथास्थित असो विशेष. समस्त ब्राह्मण तालुके सुवर्णदुर्ग म्हणोन स्वामीस पत्र लिहिलें आहे. त्यांतील अभिप्राय ऐकणेयांत आले कीं तालुके मजकूरची मामलत राजश्री मोरोपंत फडके याजकडेस आहे. त्यांणी रयतेस व ब्राह्मणासच वीस पंचवीस वर्षे बहुत दुख दिल्हें आहे, तें कशावरून समजावें? फडके तो इनामदाखल म्हणवितात. ब्राह्मणासीं विरोध करून आतीमुळें चौथाई वगैरे सुटी दिल्या असतां रयतेस पावल्या नाहींत. अनेक प्रकारें रयतेवर जलेल होतो. याजकरितां फडके याजकडील मामलत काढल्यानें दरसाल खर्च भागोन बारा पंधरा हजारपावेतों सरकारांत देणार, मामलतीची तहगिरी जाल्यावर साहासात

महिन्यांनीं सात आठ लाख रुपये तफावत लागू करून देणार व पुढें रयतेचा व ब्राह्मणाचा बंदोबस्त करून बोभाट न येतां मामलत करावी. याअन्वयें स्वामीस पत्र लिहिलें किंवा समजाविलें हें न कळे. त्याजवरून विनंती कीं आजपावेतों कोंकण तालुकेयांत दाहा तालुके आहेत. तेथील मामलेदार हरयेक कारणावरून रयतेस जलेल पोहचवितात. त्याजवरून रयत धन्याजवळ फिर्याद जाऊन आपलें पोटाचें कारण समजाऊन मामलेदारास ताकीद करऊन बंदोबस्त करवितात, अशी आजपावेतों परंपरा चाल आहे. परंतु सर्व प्रांतस्थांचें नांव सांगोन तफावती व तजकरे करणे आणि सर्वांस दोष लावणें हें प्रांतस्थाचें काम नव्हे. आमचे सरकारांतून सुटी वगैरे दिल्या त्याविषयीं मात्र हुजूर बोलणीं अथवा फिर्यादी करणें ते केली. सालगुदस्तां मोरोपंत सुभेदार खाली सुवर्णदुर्गास आल्यावर ब्राह्मण व खोत यास सर्वांस बोलाऊन नेऊन समजाऊन सांगोन द्वेषकारण मागील सर्व सोडून आमची समजी केली. येक साल दर व येक साला सूट आम्हास दिल्ही. व गांवगंनाचे खोत व जमीनदार आणून सर्वांची समजी करून यादीवर नांवनिशी ज्याची त्याची घेतली. याप्रमाणें सर्व प्रांताचा येकोपा केला असतां हाली समस्तांचें नांवाचें पत्र स्वामीस लिहिलें म्हणौन ऐकितों. त्यास ज्याणी पत्र लिहिलें अथवा ज्यांणीं स्वामीस समजाविलें असेल त्यास हुजूर बोलाऊन नेऊन त्यांची व आमची सर्व प्रांतस्तांची समक्ष रुजुवात करून उभयतांची नांवनिशीवार यादी जाल्यावर सर्व स्वामीचें ध्यानांस येईल. उगांच प्रांतस्थाचें नाव सांगून कोणीं पत्रें लिहितात ते आम्हा प्रांतस्थांत नाहींत व तफावती वगैरे करणें हें आमचा रयतांवेयाचा पेशा नव्हे. आजपावेतों फडके याचे मामलतीस अठावीस तीस वर्षे जाहालीं. परंतु कोणास कोणते गोष्टीविशी जलेल जाहालें नाहीं. सुटीचा व दुरादामाचा तंटा आमचा होता. ते त्याणी आम्हांस सर्वांस सांगोन समजी केली. आतां तंटा त्यांचा आमचा कोणे गोष्टीचा राहिला नाहीं. तंटा आहे म्हणोन स्वामीस समजावीत असतील, त्यास हुजूर बोलाऊन न्यावें. आम्हास आज्ञा जाहाली म्हणजे आम्ही येऊं. बोलणें समक्षच होणें तें होईल. तालुकेयांस तोटा आहे तो सांभाळून जाजती सरकारांत देऊं करून कोणी मामलत करणार आणि रयतेचा बच्याव बोभाट न येतां करणार. त्यास मामलतीच्या घालमेली वरघाटीं व कोंकण प्रांतीं होतात. परंतु जो नवा जाहाला त्याणें मागले मामेदारांपेक्षां आपणास बरें म्हणोन घेऊन रयतेचें बरेपण केलें ऐसें आजपावेतों ऐकण्यांत आलें नाहीं. प्रस्तुत कोणी ग्रहस्त उभा राहोन स्वामीजवळ बोलतो कीं रयेतचा बोभाट न येतां मामलत करतो. बरें आहे; असा पुरुष ईश्वरें निर्माण केला आहे. त्याची आमची गांठ समक्ष पडे तें स्वामींनीं

6802

केलें पाहिजे. गाठ पडल्यानंतर आम्ही त्याजवळ च्यार गोष्टी यथामतीनें पुसों म्हणजे आमचीहि समजूत पडेल. नंतर स्वामीचे विचारास येईल तसें करावें, बहुत काय लिहिणें लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*The Brahmins of Taluk Suwarandurga disavow the representations made by some busy body of the locality against Moropant Phadke, the Mamlatdar.*

No. 145] *[7-12-1772*

श्री

यादी जदीद गाडदी ठेवायाची आज्ञा जाली त्याविसी कलमे मुा इसने सबैन मया व अलफ.

गांडदी माणूस चांगले कसबी धडधडीत ठेवावे. त्यास सेरा दर आसामीस दरमाहा रुपये.

लोक करार होतील त्यांस आठ महिने दूर न करावे. प्रयोजन असो अथवा नसो; तत्राप ठेवावे. कलम १

सदरहू माणूस चांगले मुसलमान अरब वगैरे चांगले आणावे. तेरा रुपये नख्त सेरा केला जाईल. येणे-प्रो करार करावे. करार.

चाकरीचे तेरखेपासून आठ महिने दूर करू नयेत. चाकरीस जिकडे पाठऊ तिकडे जावे. येणे प्रो करार करावे. करार.

छ २९ साबान मार्गसीर्ष.

तीनसे माणूस गाडदी आणलियास दोन जमादार मर्द माणूस आढलाचे असिले तर पनास रुपया आलीकडे माणूस पाहोन तैनात केली जाईल कलम १

सदरहू गाडादियात दोन जमातदार ये ते पाहून त्याची तैनात पनासपर्यंत होईल. येणेप्रो करार करावें. करार.

¶*This is an order to recruit more Gardis into the Peshwa's service. The sanction appears to be given by Narayanrao against whom they ultimately acted.*

No. 146] [1772

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
गोपालराव गणेश गोसांवी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुाा सलास सबैन मया व अलफ. संस्थान गढेमंडळे प्राा बुंदेलखंड भोसले यांचा अमल खेरीजकरून व पाा रेवा व मुकुंदपुर वगैरे माहाल देखील सुहावल प्राां बुंदेलखंड येथील कमावीस सालमजकुरापासून तुम्हांस सांगितली असे; तरी इमाने इतबारें वर्तोन अमल चौकसीने करणे. मामलतसमधे कलमे

तालुक्यांत मवासाची ठाणी मातबर आहेत, तेथे अमल बसवावयासी सिबंदी खर्च लागेल त्यास तुम्ही कस्त मेहनत करून सालमजकुरापासोन दोन सालांत अमल बसवावा. अमल बसण्यामुळें सिबंदी वगैरे खर्च जो होईल तो अमल बसल्या सालापासून पांच सालांत उगऊन घेणे.

कलम १

दोन वर्षे अमल बसवावयास व पुढें पांच सालांत सिबंदी वगैरे खर्च बसेल तो तेथेच उगऊन घ्यावा. हुजुरून येक रुपया पावणार नाही. कराराप्रमाणें मामलत निभवावी. दरम्याने मामलतीची घालमेल सरकारातून करूं नये. केल्यास कचा हिशेब पाहोन फडशा करून दिल्हा जाईल.

कलम १

जोर तलबी संस्थानें सरकारात रुजू नसतील व भोंसल्याचाहि अमल

पाा रेवा मुकुंदपूर वगैरे माहाल पौ राा बालाजी गोविंद यांजकडे ऐवज कांही येत आहे म्हणौन कलले. ऐशास सन इसने सबैनात जो ऐवज आला असेल त्याप्राो पुढे साल बसाल त्याजकडे बेदिकत देत जाऊन वरकड अमल तुम्ही करणे.

कलम १

सरकारचे सरदार व राा बालाजी गोविंद वगैरे यांजकडील व भोसले यांचे तालुक्याचे माहाल संस्थानालगते आहेत त्यांस उपसर्ग करूं नये. उपसर्ग जाहाल्यास नुकसानी होईल ती भरून द्यावी.

कलम १

तालुके मजकूर येथील मामलत तुम्हांस सांगितली यामुळें शह संस्थानास पोहोंचोन संस्थानचे वकील हुजूर आल्यास खंडणीचा यैवज करार

नसेल त्याजवर स्वारी करून जरब बसऊन अमलांत आणावे.	होईल तो तुम्हांस सिबंदीचे वगैरे खर्चास दिल्हा जाईल.
कलम १	कलम १

येणेंप्रमाणे साहा कलमे करार केली असेत ; तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें.

¶*The Peshwa appoints Gopalrao Ganesh to some districts in Bundelkhand and specifies his duties.*

No. 147] [*1772?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबाचे सेवेसी

विज्ञापना. राजश्री जानोजिराऊ निंबाळकर खानदेश प्रांतें आले होते. त्यासी कितेक भावभक्तीचीं पत्रे साहेबाचा स्नेह दर्शऊन लिहीत होते. आपण साहेबाचा व त्यांचा स्नेह याजकरितां त्याच्याच लिहिल्याप्रमाणें वर्तणूक केली. कांहीं अंतर न दाखविलें. यैसें असतां तूर्त आमचे लोक आम्हांपासून निरोप घेऊन देशास जातात, त्यां मार्गी उपद्रव करून लुटितात व आम्ही श्रीतुकोबाबावाच्या कार्याचे निमित्य गाडा व दोघी शुद्रिया व नगारा सुपियास रवाना केला होता, तो कोरटीपासी माणकोपंताने घेतला. याजकरितां आम्ही राजश्री जानोजी निंबालकर यास लिहिलें. त्यास बटकी बजिनस करमलीयांत त्याचे घरीं जासुदानें वळखोन रुबरु दाखविल्या. गाडा बैल व नगारा नानजेच्या ठाणियांत आहेत यैसें असतां आमच्या पत्राचा अव्हेर करून दिल्हे नाहीत. वरचेवरी जाब लिहिला आणखी वरचेवरी लोकांस उपद्रव करितात. त्या (फाटलेले) तात गतवरसीहि त्यानी जे केलें (फाटलेले)च आहे त्याजबदलणीयाचे मु (फाटलेले) होती, परंतु साहेबीं आज्ञा केली कीं तूर्त प्रसंग आहे. आम्ही पुढें समजोन घेऊन. तूर्त तुम्ही यैवज मोबदला कोठें न करणें. आपण आज्ञेप्रमाणेंच वर्तणूक केली. यैसीयासी फिरोन त्यानी हा विचार आरंभिला आहे. अखेर सालचा प्रसंग आमची तो वाट करमलीयावरून, दरम्यान भीमातीरपावेतों त्याची ठाणी, ते ठाणेदार लबाडी करावयास चुकत नाहींत राजश्री जानोजी निंबाळकरहि कानाडोळा करून त्यास ताकीद करीत नाहींत. याजकरितां सेवेसी विज्ञापना लिहिली जाते कीं, राजश्री जानोजीराऊ यास जो बुधिवाद त्याहावयाचा तो लेहून गाडा

6805

दोन बटकी व बैल च्यार व गाड्यावरी बिशाद होती ते व नगारा यैसा श्रीसनिध सुपियास पावे तो अर्थ केला पाहिजे. आणखी कोठें मार्गामधें उपद्रव न होये तें करावें. आपण तों गतवरसीपासून (फाटलेलें) साहेबाच्या आज्ञेवरून सोसीत गेलों (फाटलेले) पोंह्चाविलीं असतीं म्हणजे ते (फाटलेले) करिते याजकरितां त्यास जे आज्ञापत्रीं ताकीद लिहिली ते लेहून मार्गामधें उपद्रव न होये तें केलें पाहिजे. मार्गातील उपद्रव कार्याचा नाहीं ये गोष्टीची पैरवी जैसी साहेबाच्या चित्तास येईल तेणेंप्रमाणें आज्ञा केली पाहिजे, व येक पत्र त्यास जें द्याल तें आमच्या जासुदाबरोबर देऊन आम्हांकडे पाठविले पाहिजे. तें आपण त्यास प्रविष्ट करून. सेवेसी विदित होये हे विज्ञापना. साहेब तों त्याजविषईं स्नेह धरितात, तो आपल्या जातिधर्मास चुकत नाहीं. विनंती वारंवार याजविषईं ल्याहावी यैसा अर्थ नव्हता; परंतु आज्ञेप्रमाणें सेवक लोकास वर्तावें लागतें हे विज्ञाप्ति. आज्ञेप्रमाणें रवाना (फाटलेले) सेडगर यास रुपये १० दाहा अक्षरी दहा (फाटलेले) विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to take steps to prevent the plundering activities of Janoji Nimbalkar's officers who, despite the avowed friendship existing between their master and the addressee, persist in capturing stray troopers and attacking the Peshwa's commissariat.*

No. 148] [*1772?*

श्री

राजश्री महादजी सदाशिव ठाणे कावी
स्वामींचे शेवेशी

विनंति उपरी. कावी व टप्याचे गावगनाचा उलगडा करावयाचा तपशील :—

१ सरकार तलपंत[+]चा कापूस सरकारांत दरोबस्त कापूस घेण्याविसी लिहिले आहे. रयतेस कापूस पाहिजे असे लोकाचे वगैरे म्हणणे. त्यास ज्या असामीचा कापूस घ्याल ते असामीचे खाड्यांत दर भारी मण दोन प्रमाणे ठेवून बाकीचा घ्यावा. कदाचित एका * * असामीस कमी पाहिजे व कोणास जाजती पाहिजे त्याचे गांवचे गांवीं संमधानें राखावे. येथें बोभाट मनश्वी येतो, याजकरितां गांवचे गांवीं पाटलास वगैरे सांगोन समाधान राखावे. येविसी पुन्हा लिहिणे न पडे तें करावें.

१ कापूस चौथे हिशाप्रमाणें रयतेचा घ्याल त्या ऐवजीं लागलीच ज्वार ठेवावी. बोभाट येऊं देऊं नये.

+ तलपत = Land paying full rent or assessment, or a half or other proportion of produce to the Government, as distinguished from lands held as private property, or at a quit-rent or rent-free. (Wilson.

१ पंसा(चा)येतपैकीं निमे भागाखेरीज जाजती कापूस येईल त्याचे मोबदला ज्वार ठेवावी ती आसामीवार निरनिराळे ढगले करून ठेवावे. बोभाट येऊं नये.

१ वाढ्याचा चौ भागा कापूस घेण्याविसी लिहिले आहे; परंतु दर भारी दोन मण प्रमाणें राखावा व सलामीकरितां जाजती कापूस येईल त्याची ज्वार देऊन जफ्ती खाली करावी राखावी व वाढ्याचा बाकी मालहि जफ्तच ठेवावे.

—

४

येणेंप्रमाणें वहिवाट करून एकंदर यादी गांवगन्नाच्या पाठवाव्या. त्यासहि ताकीद करावी, या उपरी दिवसगत लाऊ नये. माल खराब होतो. पुन्हा लिहिणे न पडे, व कोणाचा बोभाटही न येई असे करावे. दोन प्रांी सरकारची परवानगी जाली असे कोणास समथे देऊ नये. तुम्ही तुमचे कारस्थानें जितका कमी होईल तितका करून भरून घ्यावा. अजमासे पांच सहा हजार तलपतचे खाली तेराहून वरकड सरकारात येई असे कारस्थान करावे व ज्वार कापसाचे मोबदला घ्यावयाचा कोणाचा बोभाट येऊ देऊ नये व कावी टप्याचे व देगाव टप्याचे सालाचे हिशेब कुलारग वार लौकर पाठवून द्यावे. आवकाश कामाचा नाहीं हे विनंती.

¶*Instructions are issued about the collection of cotton from the ryots of Kavi and the villages coming under its jurisdiction.*

No. 149] [*1772 ?*

श्री

सेवेसी विनंती. इमारतीस काम येणेप्रमाणें चालत आहे.

जंजिरे वसई दर्या बुरुजाचे सारा काम लपेट तीनसे हात, त्यापैकीं दोनसे हात घेरा तयार जाहाला. चवदा तोफाच्या जंग्या[१] होऊन त्या बुरुजास भर आठ नव हात उंची भर घालून चवदा तोफा लागू केल्या. बुरुजाचा घेर शंभर हात होणे आहे ते काम जून पायावर चढवावे लागते ते करावयासी लाविले आहे. माघअखेर तयार होईल व दर्या बुरजापुढील

जंजिरे अर्नाला येथील इमारतीचे काम साल मजकुरी पश्चिमेकडील सवा दोनसे हात फाज कोरी आहेत. तिचे आतून पकी इमारत सवादोनसे हात होणे. त्यापैकीं दीडसे हात लांबी पाया नव हात खोली भुईत घालून भुईवर नव हात उंच इमारत आली. पुढें होतच आहे. बाकी पाउणसे हात लांबी पाया घालणे आहे. तो खणावयास लाविले आहेत. तेवढा

+ अक्षर वेगळें.

१ तोफ ठेवण्यासाठीं तटांतील जागा.

फौज पांचसे हात लांब आहे त्यापैकीं पावणेचारसे हात उंची, एकवीस हात आसून (आतून) अरूंद आहे त्यास तक्तपोसी करून बाहेरून गिलावा करून पावणे चारसे हात लांबी तयार जाले. त्यास चरक्याच्या जंग्या व बंदुकाच्या जेजालेच्या जेरजंग्या देखील तटास पाहरेकरी बसावयासी जागे देखील काम जाले. पुढें हे फाज सवासे हात राहिली ते माघ अखेर होईल. मग फाल्गुन मासापासून त्याचें पुढील फांजेचे काम लागेल.

कलम १

कोट डाहाणू येथाल इमारत पहिली पंधरा सोला हात उंची जाली आहे. त्याजवर दुसरे पांच हात उंची उत्तरेकडील फांज तयार जाली. त्याजबराबर सारामीद एकवीस हात करावयास लाविला आहे.

कलम १

पाया भरून काढला म्हणजे ते काम वरते चढेल. सारांष पश्चिमेकडील फाज अखीरसाल करणे सोला हात उंची होये यैसी करितो व उतरेकडील दरवाजियाचे काम दरवाजियाचे बाजूंचे उंच करून दरवाजा बरासा मजबूद करून लाविला व दरवाजियाचे उजवे हाताकडील सर्ज्या बुरूज याचे काम नीच होते तें उंच करून दुशाला[२] जाली व हाली येशंवत बुरुजाची दुशाल करावयास काम लाविले आहे व पश्चिमेकडील इमारत चालत आहे

कलम १

कोट सिरगांव येथील कोट तेरा हात उंची(चा) जाहाला होता. त्यास खाली साल मजकुरी त्याजवर उंची इमारत पांच सा हात पूर्वेकडील फाज व उत्तरेकडील निमे फाज व पुढें दुसरा दरवजा होत आहे दीड फाज उंची तयार जाली.

कलम १

येणेंप्रमाणें तयार जाहाले हे विज्ञापना.

¶*Repairs of forts in the Bassein territory are reported in detail in this paper.*

No. 150] [*1772?*

श्री

विनंति यैसीजे. शर्फुददौलाकडील मजकूर. सविस्तर मजकूर पेशजी लिहिण्यांत आलाच होता. दौलाचा कारभारी आली महंमदखान यख्तीयार तो मध्यस्तास

१ भोवतालची भिंत. २ तट.

मिळाला. पहिले तालुकियांत दहा अक्रा लाख रुपये वसूल करून समयास तीन चार हजार फौजेनें चाकरी करीत होते. स्वराज्याचा मख्ता वारीत होते ते हाल्ली मध्येस्तानीं दौलाचा कारभारी हाताखाली घेऊन ती दिवसांत कारभार करून खिताब वगैरे देऊन आली महंमदखान तालुकियांत गेला. इतकी जलदी केली. शर्फुदौलानीं आम्हास निरोप सांगून पाठविला कीं वख्तावर नजर देऊन होते तसे पाहातो असाच समये. खाविंदीच्या दर्ज्यापुढें बोलतां येत नाहीं. बरे, सर्व करणार भरणार आली मंहमदखा माझें नांव मात्र राखितो. मी होये नाहीं दोहोतून एकहि म्हणत नाहीं असे सांगून पाठविले. आम्ही उगेच होतो. तूर्त कारभार जाला त्याचा तपशील

पहिला तालुका

जागिरीत

१	बीड
१	पाथरी
१	धारूर
१	सिरसाले
१	
५	

यास अकार अजमासे — रुपये

११०००००	पहिला वसूल आली महंमदखान याणी समजाविला.
३०००००	हाल्ली काम हुसन्यास सांगू लागले सबब चढ कबूल केला.
१४०००००	

खर्च अजमासे — रुपये.

२०००००	महाल मजकूर
२०००००	स्वराज्य मख्ता वगैरे
१०००००	शर्फुदौला (यांस) दरसाल देत जावे जातीस
२०००००	शर्फुदौलाचे लेकास जेमीयेत नेहमी

१९०००० स्वार ९००
९०००० गाडद९००

२०००००

७००००००

बाकी रोख सरकारांत देत जावे ७०००००

सात लक्ष सरकारांत देत जावे. येणेप्रमाणे कारभार घाटून आहे. ते समई शर्फुदौला यांस दरबारास बोलावन नेऊन लटकण व भुजबंदी दिल्हे, शर्फुल उमराव यैसा किताब दिल्हा. व चिरंजिवास जिगा सरपेच आलम नकारा व यावरून दौला खिताब व आली माखान यास सरपेच व आली यावरजंग खिताब याप्रमाणें विध उरकला. जाले वर्तमान लिहिले असे. या सिवाय शर्फुदौला यांचे जातीस वानवले जागीर आहे. त्याचा मख्ता जाबीतजंग देत होता, त्या प्रमाणें हल्ली सरकारांतून चालीस हजार शर्फुदौलास पावतात. येकूण ते चालीस व हल्ली लाख येकूण एक लाख चालीस हजार रोख जातीस जाले. रवाना छ ३ रबिलौवल हे विनंति.

¶*The writer gives an explanation regarding the revenue administration for Parganas Beed, Pathari and Dharur under one Sharfudaula. He also mentions the honour and the robes of office granted by Sharfudaula to Ali Muhammad Khan.*

No. 151] *[1772?*

श्री

सेवेसी विज्ञापना.

प्रगणें आसेरी येथील किले गंभीरगड घेतला, तें समयीं कोणी कुल कोली वारली आले असतील ते त्यांनीं न्यावें. मागील कोणी पंच सामल्यांत कोली वारली असतील त्यांस तगादा न करावा. याप्रमाणें पत्र राजश्री रामजी माहादेव यासी. गंभीरगड सरकारांत घेतला त्या आलीकडे कुलें

किले गंभीरगड घेतला तें समयीं कुमकेस लोक गेले होते, त्यापैकी पंचवीस माणूस ठेविलें आहे; त्यांस निरोप देत नाहीं, येक किल्यास भरती नाही. म्हणून लोक देवावें.

तुमच्या किल्ल्याची भरती जाहली असली तर लोक पाठवणें. पत्र द्यावें. +देणें.

+हस्ताक्षर निराळें.

तुमचीं आलीं असतील तीं नेणें. पत्र द्यावें. पहिलीं पंच साला असतील तीं न नेणें. पत्र द्यावें, +देणें.

पेठेच्या राज्यास ताकीदपत्र बाबती सरदेशमुखीचा तह आहे त्याप्रमाणें सुरलीत अंमल पंताजी मोरेस्वर याच्या कमाविसदारांकडे देणे.

कलम १

वाजबी मक्ता असेल त्याप्रमाणें अमल देणें. पत्र द्यावें. + देणें.

तांदलाचें सालाबाद दस्तक खेप १ बैल सर २९ आहे. जाजती बैल ९ कुटुंबाची बेगमी होत नाहीं. यास्तव सेवेसी विनंती केली असें, कुरणपैकी गवत सालाबाद ४०००० पावत असतें तें द्यावयाची आज्ञा.

गुदस्तांप्रमाणें गवत + देणें.

जिवाजीपंतावर चिठी द्यावी. देणें.

किले गंभीर गड घेतला तें समयीं आमचें लोक रामनगरचें चाहुडीवर होते, त्यांची हत्यारें व पांघरुणें व दिवाणें कापड वहाणा गला व तेल तूप राज्यानें घेतलें आहे. हल्लीं रामाजी माहादेव यांचें ठाणें आहे तरी मशारनिल्हेस पत्र व राज्यास पत्र वस्तभाव द्यावी ऐसें पत्रें.

वाजबी याचें घेतलें असेल तें देणे. पत्र द्यावें. + देणें.

भोरपेखालून कांहीं लांकूड अणविलें आहे त्यास गाड्यास घनगडकरी व धारकर अटकाव करितात त्यांस पत्रें व जकातीचें दस्तक द्यावयाची आज्ञा.

दस्तक द्यावें. + देणें.

किले अशेरीं येथें भात उंदराचे उपद्रवेंकरून फार जायां होते, तर तेथें तक्तपोसी कोठी बांधावी लागते. तरी किले मजकुरीं कोठी बांधावयास आज्ञा.

दस्तक द्यावें. रुजू पत्र द्यावें. + देणें.

¶*Orders are issued in answer to demands made by officials at Gambhirgad and Aseri.*

No. 152] *[1772?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

धारूर सरकारच्या माहालचें वर्तमान तरी त्या प्रांतें आमचें आगमन जालें नाहीं त्याजकरितां बाकी तेढीच राहिली. सालमकुजरीं परस्परें खानदेश प्रांतीं

+ हस्ताक्षर निराळें.

6811

गेलों. तिकडे फौजाचा शह जमीदारानी * * * * अमची येकानें सेळगांवकर त्रिंबकजी देशमुखानें अमचा कमाविसदार धरून जें कर्म करूं नये तें करून सोळासें रुपये घेतले व कमाविसदार धरतांच तमाम परगणियांतील अमल उठला. अद्यापि चौ पगरणियांतील पांचसें रुपये वसूल नाहीं. याजकरितां या प्रांतें आलो आहो. मुलुक डोंगरी बणजोर हटकर तमाम जागाजागा वाडे बळावून बसले आहेत. केवल कटकट करावी तरी अखेरसालचा समये, सिबंदी घरास जावयाचा गवगवा, याजकरितां इलाजेकरून कांहीं कार्यभाग करावा लागतो, व लोकांची समाजावीस खरें लटकें बोलोन करावी लागते. याजकरितां आठ पंधरा दिवस या प्रांतें गुंतोन कार्यभागाचें ऊर्जित करून सेवेसी येतों. सविस्तर वर्तमान सेवेसी आल्यावरी विदित करून. श्रमपरिहार करणार साहेब आहेत. याउपरी दीक्षिताकडे * * रवाना केली आहेत. आज्ञेप्रमाणें येऊन सेवेसी पावता होईल. अंतराये होणार नाहीं. सेवेसीं विदित होये. साहेबीं लिहिलें जे राजश्री (सुलतानजी) निंबाळकर यास आम्ही लिहिलें होतें त्याचें उत्तर त्यानीं लिहिलें आहे, व तुम्हीहि त्यासी स्नेहेंच वर्तणें म्हणऊन आज्ञा केली. यैसियासी आम्ही त्यासी स्नेहेंच वर्तणूक करितों. त्यासी आम्हांसी मामलियामुलें कांहीं विपर्यास तों नाहीं; आम्हांस आपला कार्येभाग बरावाईट करावा लागतो; याजकरितां ते समीप आहेत. बोभाट जातात. परंतु साहेबांच्या प्रतापें सेवकाकडे कोणाच्यानें पाहवत नाहीं. याउपरी आमचा मनसुब्यावरी आठा दिवसा इकडील निर्गम साहेबाच्या * * * * * * सेवेसी येतों. विदित होये हे विज्ञापाना.

¶*The Kamavisdar of Khandesh dwells at large over his difficulties.*

No. 153] [*1772?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक बाबूराव राणे हावालदार व कारकून किल्ले चांवड तालुके शिवनेर चरणांवरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत व नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १४ रजमानपावेतों किल्ले मजकूरचें व सेवकांचें वर्तमान यथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान रामाजी जनार्दन जप्तीचें कामावर पुणेयाहून आले होते. त्यांणीं किल्ले मजकूरचे सरंजामाचे गांव जप्त करून बंदी केली. मुलकांत वसुलाचें व सरंजामाचें कामावर किले मजकूरपैकी शिपाई गेले होते ते उठऊन दिल्हे व कांहीं धरून नेले आणि कसबें आंबेगाव येथें ठाणें बसविलें. मुलकांत माणूस फिरों न

देत. तेव्हां किल्ले मजकूरची स्वारी पाठऊन त्यांची यांची लढाई होऊन ठाणें उधळून दिल्हें. त्यांजकडील च्यार आसामी ठार केल्या व आठ आसामी जखमी जाहाल्या; त्यांतील सरदार होता तो पडला. किल्ले मजकूरपैकी दोन आसामी जखमी जाल्या. त्यांजकडील दोन घोडीं ठार जालीं व दोन जखमीं व तीन तट्टे येकूण पांच घोडीं धरून आणिलीं; त्याजवरून रामाजी जनार्दन लष्करवाल्यांस मिळोन मुलकांत दंगा बहुतच मांडिला आहे. आमच्याहि स्वाऱ्या त्यांचे पल्ल्यावर फिरत आहेत. लष्करवाले यांणीं दोन तोफा आणून मागणीचा डोंगर किल्ले हडसर येथील पूर्वेस अतकोंशावर आहे, त्याजवर चढऊन पूर्वेचें अंगास आज दोन दिवस मारगिरी सुरू केली आहे. तालुके कर्नाळा येथून च्यारशें माणूस चक्रदेव यांजकडून वेढ्यास आलें तें नाणें घांटानें चढत होते. त्यास किल्ले मजकूरपैकी लोक व किल्ले जीवधन येथील लोक जाऊन घाटाची बंदी केली, त्याजवरून ते लोक माघारें फिरोन आहुदे घांटानें चढावयास गेले तों तेथेंहि इकडील लोक व किल्ले सिदगडकरी लोक जाऊन लोक माघारें फिरविले. नंतर ते लोक रातोरात निघोन मालशेजचे घांटानें चढोन वरते लष्करांत आले. हडसरें-भोंवतीं नाकेबंदी करून शह दिल्हा आहे. हल्ली रामाजी जनार्दन याजकडील जफ्तीचें काम दूर करून रामाजी मोरेश्वर यांजकडे जालें. त्याचा कारकून शामजी लक्ष्मण जुन्नरांत होते ते गढींत जाऊन राहिले आहेत. त्यांणीं किल्ले हाय येथें पत्रें सूर सन्न म्हणोन आणिलीं त्याच्या नकला किल्ल्यास पाठविल्या त्याची नकल सेवेसी पाठविली आहे. वरकड मजकूर राजश्री सुभेदार यांणीं लिहिला आहे त्यावरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The garrison of fort Chawand obstructed Ramaji Janardan, a Government officer sent from head-quarters to confiscate lands attached to the fort. The paper reports the complaint to the Peshwa.*

No. 154] [*28-3-1773*

श्री

राजश्री नारो आपाजी गोसावी यासी

सुा सलास सबैन मया व अलफ. पुण्यांत पाण्याचा तोटा फार जाला आहे व नलाचे पाण्यांत किडे पडले आहेत म्हणोन ऐकिले. त्यास खासा स्वारी पुण्यांस आली असतां येक महिना पाणी पुरेल कीं नाही व नलाचे पाण्यांत किडे पडले की काय ते लिहिणे. तल्यांत विहिरी खणल्याने पाणी पडेसे असल्यास दाहावीस विहिरी खणावयाचें काम चालीस लावणे. जाणिजे छ ४ मोहरम.

¶*In view of the Peshwa's impending stay at Poona, Naro Appaji is asked to state whether the water-supply there was sufficient and pure and if not, to dig more wells.*

No. 155]

श्री

विनंती सेवक त्रिंबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. लस्करांत वोली वैरण न आणावी व घरे न मोडावी. वाळली वैरण आणावी ऐसी ताकीद करावी येविसी आज्ञा आली. त्यासी आज्ञेप्रमाणे गोटांत ताकीद केली आहे. आज्ञेप्रमाणे आपले मिसलीवरच आहे. हे विज्ञाप्ति.

¶*Trimbakrao Sivdeo puts into force Peshwa's order about securing forage for the army in a peaceful manner.*

No. 156] [29-8-1773

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री रघुनाथ हरि गोसावी यासी

सेवक नारायणराव बलाल प्रधान नमस्कार विा. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. आपाजी राम गाडगीळ याची आसामी सा वोडसे तालुके झासी येथे पेशजीपासून दीडशे रुपयाची चालत होती. त्यास ते मृत्य पावले, सबब त्याचे पुत्र राजश्री कासीराव आपाजी याचे नावे सदरहू आसामी साल मजकुरापासून करार करून पेशजीप्रमाणे सालिना वेतन रुो १५० दीडशे करार केले असेत. तरी सालाबादप्रमाणे सदरहू वेतन मारनिलेस पावीत जाणे. +जाणिजे छ १० जमादिलाखर सुा आर्बा सबैन व मया व अलफ.

¶*Narayanrao Ballal renews the grant of an annual remuneration of Rs. 150 to Kasirao Apaji Gadgil and informs Raghunath Hari Newalker accordingly. The letter is important from the handwriting of Nana Fadnis which appears in the last line of the letter. It shows that Nana Fadnis functioned as the sole karbhari of Narayanrao up to the eve of his murder.*

\+ 'जाणिजे' पासून अखेरचा सर्व मजकूर नाना फडणिसाचे हातचा आहे. यावरून नाना फडणिस नारायणरावाचे कारभारावर अखेरपर्यंत होता हे निर्विवाद आहे. खुनाच्या आदले दिवसाचें हें पत्र आहे. कागद रवाना झाला नाही म्हणून पुण्यांत राहिला; नाहीं तर तो रघुनाथ हरीकडे गेला असता.

No. 157] [*12-10-1773*

पो छ २ साबान कार्तिक
शुा ४ इंदुवासर मो
पेडगाव.

श्री

अपत्ये गोविंदाचे सां नमस्कार विज्ञापना ताा आस्विन वद्य येकादसीपावेतो येथास्तित असे विशेष. राजश्री केदारजी सिंदे यांचें घर पेशजी जप्त होऊन जिनस सरकारात आला तो ज्या कारखान्याचा जिनस त्या कारखान्यात जमा जाहाला तो लिहून काढावयास राा बाजीपंत भावे यांसी लाविले आहे. त्यास येविसीची निकड फार आहे; तरी सत्वर जाबता लस्करात पाठऊन देणे म्हणोन आपली दोन तीन पत्रे आली. त्यास जिनस जमा आहे तो लिहून काडिला; परंतु त्यापौ कारखान्याकारखान्यांतून जिनस सिंदे यास पावला आहे तोहि लिहून काढिला पाहिजे. येकेका कारखान्यात दाहापाच वेला लिहून पाठवावे तेव्हा कारकून येऊन येक दुसरा जाबसाल होतो. याप्रो त्यास हिसके फार. बाजीपंत भावे याजकडे दुसरे काम तूर्त नाही. सिंदे याची जमा काये, त्यापो पावले काय, बाकी राहिले काय हेच नेहेमी लिहून काढितात. बहुत करून तयार जाहलेच आहे. पुर्ते जाहलियावरी लिहून पाठऊ; येविसी राजश्री आपाजीपंत गोंधलेकर यांस श्रीमंत राजश्री नाना याणी लिहून पाठविले, त्यावरून तोह आम्हास निकड फारच करितात. ज्या गोष्टीने लवकर तयार होऊन लस्करात पावे तेच करितो. पो होनगुदे येथील सन सलास सबैनचा हिशेब सत्वर आणऊन, दप्तरी तालेबंध धरून पाठऊन देणे म्हणोन लिहिले. त्यावरून हिशेब दप्तरी आणविला; आणि पाहिला तो वसुली जमा धरून हिशेब लिहिला आहे. पो मजकुरची जमाबंदी अद्याप जाहालीच नाही. वसुली हिशेबाचा तालेबंद धरिल्याने कम जाजती येथास्तित नाही, याजकरिता तूर्त इजमाईली समजीचा सूड लिहून पाठऊन देतो. पाटीलक्या वगैरे वतनाचा झाडा तयार करून पाठवितो. तालुके सिवनेरी व तालुके सोलापूर येथील अजमास व गुदस्ताचे तालेबंद तयार जाहाले. राजश्री उधोपंत दादा पुढे लस्करात गेलेच आहेत. अजमास व तालेबंद घेऊन कारकून लवकरच येऊन पोहचतील. श्रीत्रिंबकेश्वरचाहि अजमास लवकरच पाठवितो. पाा नेवासे व पाा पारनेर व पाा बागलकोट व प्रांत वाई येथील अजमास सालमजकुरचे करार जाहाले. त्याच्याखेरीज राजश्री गोविंदपंत आपटे यांजकडील तेरीज तप-

---

अंदाजी.

सीलवार ओढून दिल्याचे आहेत; व सदरहू च्यार माहालचा सूड आलाहिदा लिहून पाठवितो. राजश्री आबाजी माहादेव याच्या आसाम्या वगैरे निवडून पाठविल्या आहित. कळावे हे विनंती.

¶*One Govind reports why there was delay in sending Kedarji Sindia's accounts and says he is expediting the matter.*

No. 158]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री सखारामपंत स्वामी गोसावी
यांसी

पोष्ये विठल सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाले. यैसेच निरंतर पत्रद्वारे सांभाळ करीत गेले पाहिजे विशेष. सर्व मजकूर श्रीमंताच्या पत्रावरून विदित होईल. आपण लिहिले की घरचे सुख धरून बहुत दिवस न राहाणे आणि क्षुलक गोष्टीसाठी वाईट दाखवावे यांत जबून दिसते. ये गोष्टीसाठी * * च्यार वेला सांगितले परंतु स्मरण राहात नाही म्हणून लिहिले. त्यास प्रस्तुत तर कांही विपर्यास दाखविला नाही. पालनपूरची सनद माघारी पाठविली म्हणून लिहिले आसेल तर आम्हास सोरठात दों लक्षाची जागा द्यावी यैसा करार. आमच्या मते सोरटात निमे घ्यावे, निमे पालनपूर घ्यावे, त्यास आपण कदीम तीन लक्ष पालनपुरास येक पालनपूरच पाठविले याकरिता सनद माघारी पाठविली की आमचा हाहि करार सोरटचा आहे. घोड्याचे राण द्वारकासंन्निध याकरिता सोरटच आसावे. त्यास तुम्ही पोवार पांडबा गोपालराव व थोरले सरदार यास देऊ तेव्हाच तुम्हास देऊ. त्यास तुम्हासहि दंडक पडला आहे की दुसऱ्याचे मालेस जोडावे. धोंड्रोबानी इद्रोबाचे मालेस जोडिले, परंतु प्रसंग पडला तेव्हा निवड सहजच जाली. आद्यापहि काही जाले नाही. प्रसंग हमेशा पडतील. हे कर्म यैसे आहे की टेकीवर आहेत. टेकीस आल्यास काट कोण करील, कोण न करील, मरण तृणाप्रमाणे कोण धरील हें ध्यानांत आसो द्यावे. चौघाबराबर धरल्याचे सकट वाटत. वरकड त्या सरजामाचा आजच खजाना यावा यैसे नवते, परंतु लौकिक संपादावा लागतो. प्रसंग पडतो तेव्हा कळावयाचे तें धन्यास कळते. मग सर्वत्र सारखे हे येक आपूर्व वाटते. वरकड मजकूर तर दोघे सरदार वेगळे करून आम्ही मरणास आथवा

जबून = गैरमातबर.

निष्टेस कोण्हास गोष्ट सांगू देणार नाही. सरजाम आमची निष्टा असली तर ईस्वरे देवील, नाही तर जे आहे ते फारच आहे. ईस्वरे इछेने थोडे थोडे सर्व आनकूल आहे. खावंदासी वाईट मनातून कधी दाखवणार नाही. वरदल क्षेण-भर रुसू, मग काहीच नाही. आपणहि सिकेवणीचे लिहिले, उतमच जाले. पहिलेपासून आपण सांगतच आहेत त्याप्रा आम्ही चालतच आहों. पुढे चालू. विशेष काय लिहीणे हे विनंती.

¶*Vithal Shivdeo Vinchurkar expresses his bitter disappointment for not being assigned the particular provinces in Gujarat he was keen on securing.*

No. 159]

पा छ १.६ रजब भिवराव

श्री

राजश्री नरसिंगराव जाधव गोसावी

यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री भिवराव शामजी रामराम विनंती उपरी. श्रीमंत राजश्री पंतसाहेब याणी व तुम्ही आम्हा-पासी किर्या घेऊन आम्हास कार्यास पाठविले. आम्ही कार्य बोलल्याप्रमाणे रा आपाजीपंत याचे गुजारतीन राजकारण ठीक करून रा आपाजीपंत व मुस्तुपाखान पंधरा दिवसाचा वाइदा करून गेले. त्यास तीन महिन्यानी मुस्तुपाखान कटाळून न पुसतां उठोन आला ते वर्तमान विदित जाले. त्याउपरी दुसरे पत्र व ताजखान पाठविला त्यास दोन महिने जाले, स्वाल जाब काही कलत नाही. यैसे आसता आम्हास लबाड केले. खावदाकडे नामुसकी आली. सनदा होयाच्या 'नव्हत्या तर आम्हास कष्टी करावयाच नव्हते. कर्ज तीस रुपये खादले. याउपरी सात पाच परगण्याच्या सनदा हारइलाज करून आले पाहिजे. आजच्या प्रसंगी स्वस्थान हातास लागते. वतनदार मायेमध्ये गोविले आहेत. आजिचा प्रसंग पुढे दाहा हाजार रुपये खर्च केल्यानें साधनार नाही, त्वरा करावी. आम्हास तोंडगसी न द्यावें. खावदाच्या कीर्येवर पात्याजलो. तुलसी देवाच्या बाधून ठेविल्या आहेत, त्याचे स्मरण आसिले पाहिजे. सनदा अल्याखेरीज आमची सुटका होत नाही. कलल पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती. राजश्री आपाजीपंताने किले-दारासी बोलून त्याची कीर्या घेऊन आपण वचन देऊण आम्हास गोऊन पाडून गेले. थोरपण केले. पुढे आणिखी मनसुभा याजप्रमाण करतील. कळल पाहिजे हे विनंती.

¶*Bhivrao Shamji takes Narsingrao Jadhav to task for the latter and the Peshwa not having kept their word in a delicate matter which had been entrusted to the writer.*

No. 160] [1766 ?

श्री

राजेश्री राव प्रधान

गोसावी यासी

॥ॐ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्यें श्री मुधोजी नाइक निंबालकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून स्वकीये निजानंदवैभव लेखन केलें पाहिजे विशेश. प्रा बारसी येथील ठाणियाविशई आपणांस पत्र लिहिले होते, त्यास मान्येता करून जमीदार आणून ठाणी देविली. सुवार्ता कारकुनानी सांगितली. सेवक आठा रोजानी यैकिले की येक ठाणे ठेऊन तीन देताती, यावरून अपूर्व वाटले. आपली वचने रामबाण; जे बोलावे ते सिधीस न्यावे हे राजेश्री राव कैलासवासियापासून पाहिले. सांप्रती स्वप्नवत अशाश्वत वचनोक्ति व्हावयाचे आमच्याहि प्रत्यास येत नाही. दरमियाने क्षुल्लक मनुशाने चिताचे ठाई विकल्प केला असेल तो आम्हावर नजर देऊन दूर करावा, आणि ठाणियाची मोकलीक करावी. येणेकडून आम्ही आपली सेवा करितो व पूर्वी वडिलाजवल केलियाचे सार्थक होईल. रा मालोजीबावा रा नाना कैलासवासी यापासी कामास आले. त्याचे पुत्र रा कुसाजीबावा, त्याची स्थापना रा रायानी केली. त्यास वडिलानी दिल्हे, आणि आपण दिल्हे माघारे घ्यावे, हे शास्त्रहि नाही. आपल्यानी जयाची उभारणी केली, आपल्या कामास आले असतील त्यास कोन्ही उपद्रव करतील त्यास नतीजा द्यावा हे भूशनयुक्त आहे; आणि आपनहि ये रीतीनेच कितेकाचे चालविताती. सांप्रतीहि ठाणी देविली आणि फिरोन लोभ धरला हे यैकोन इतका तपसील लिहिला असे. ईस्वरे आपणास काही उणे केले नाही. पृथ्वी अजीक केली आहे. आम्हास दिल्हे, आपले यांतच मन घालावे यैसे नाही. सेवेसी रा माणकोपंत पाठविले आहेत, विंनंती करतील ते चितास आणून ठाणी देविली पाहिजे. अनमान न करावा.

¶*Mudhoji Naik Nimbalkar requests the Peshwa to place him in possession of the villages in the province of Barsi which had been previously granted to him.*

No. 161] [1771

श्री

यादी ताकिदी देन

१ राजश्री गणेश संबाजीस श्रीमंताची ताकीद होती की साल गुदस्ता प्रा जान्हापूर नेमणूक प्रमाण येवज देण

ते ताकीद मान्ये न केली. सांप्रत ताकीद निक्षणून द्यावी की नेमणुकीप्रमाण पां मजकुरचा यैवज द्यावा.

पेशजीच्या नेमणूकप्रमाणे पत्र पेशजी सादर जाले आहे त्याप्रमाणे देणे, म्हणून पत्र देणे.

१ राजश्री जानोजी भोसले याचा बंदोबस्त श्रीमंती करून दिल्हा होता की आटोळे याचे मुलकात घासदाणा व उपद्रव न द्यावा. त्यासी भोसलियाची फौज जे येती ते नाना प्रकार उपद्रव देती. यैसी ताकीद द्यावी मुलकास उपसर्गे न देण, यैसे परिछिन लिहिण.

भोसले याचे फौजेस ताकीद पत्र मुलकास उपद्रव न देणे, म्हणून पत्र देणे.

१ आटोळे यासी मसाला केला आहे, त्याची मनाईची पत्र देण.

गणेश संभाजीस पत्र कीं आटोळे * * यावयाविशी पत्रे कोणे तेरखेस पाठविली व कोणे तेरखेस आले ते नावनिसी * * * * * साला किती लोक आहे ते सविस्तर लिहून पाठवणे म्हणून पत्र देणे.

¶*The paper contains the entries of the purport of the Peshwa's orders addressed to Ganesh Sambhaji, Janoji Bhonsle and Atole.*

No. 162] [*1762*

पौ छ १२ जिल्हेज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी

सेवक शेषो नारायेण सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. शरीरव्यथेमुळें बहुत श्रमी होऊन पुण्यांत होतों. करवीरचा कारभार ज्या ग्रहस्थानी केला त्यानी आमच्या खेडियावर पावणा महिना मुकाम करून तोफा लाऊन खेडियाची खराबी केलीमुळें मनुष्यें इचलकरंजीस मातुश्री अनुबाईसंन्निध जाऊन राहिलीं. हरयेक जागां त्याची स्वच्छता करावी या उदेशें इकडे आलो. ,कृष्णातीरीं

स्वग्रामींच राहिलो आहो. राजश्री गणेशपंतास आपणासंन्निध पाठविलें आहे. विनंती करितील. चितांत आणून आज्ञा करणें ते करावी. बहुत काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Shesho Narayan complains to Haripant Tatya that an agent of the Karvir Darbar fired guns at his village and laid it waste and asks for redress.*

No. 163] [*Oct. 1767*

[पहिला बंद गहाळ.]

२

पुा श्रीमंत रा रावसाहेबे[1] स्वामींचे सेवेसी बाकीच्या यैवजाची रवाणगी सत्वरी जाणाल ते करून पाठविली पाहिजे. आम्ही संकटांत येऊ यैसे न करावे. दरबारखर्चाच्या यैवजाचा मजकूर लिहिलाच नाही. येथे आधी दरबारखर्च मग सरकारात यैवज देणे तर द्यावा. मुत्छदी जबरदस्त. खावंदापावेतो बोभाट गेल्याने काही होत नाही. मुत्छदी जेव्हा संतुस्ट होतील तेव्हाच सनदपत्र होणे तर होते. हा आनुभव पुर्ता पाहून मग यैवज मुबदला केला. यासाठीं मुजरद आजुरदार कासीद करून पाठविला आहे. याजबराबर पत्रदर्शणी साडेसदुस्ट हजार रुाचे हुंड्या पुण्याच्या करून पाठवणे. नाही तर चालती हुंडी पुण्याची करून देणे. वासुदेव मुरार खोटा दिवालखोर, त्याजवरी हुंडी केल्याने रुा येणारच नाही. त्याचा प्रकार सविस्तर दुसरे बंदी लिहिला आहे त्यावरून कलेल. तेथील सावकारास हुंड्याचे खोकी आणून देणे म्हणून महसली करावी. वासुदेव मुरारीसारिखा खोटा दुसरा कोन्ही नाही. चालिसा हजारात अद्यापि येक रुा दिल्हा नाहीं. पहिले साठीपैकी तिसा हजाराची हुंडी होती त्यापैकी पधरा बीस हजार बाकी; तो तगादा येथील सावकाराचा लागला आहे. संकटच आहे. सविस्तर पत्रे लिहून व सनदापत्रा वगैरे सरकारची पत्रे पाठविली ते पावलीच असतील. त्याउपरी पत्रे आपणाकडील आली नाहींत. पत्रे वरचेवर ल्याहावयासी कालजी असो द्यावी. दरबारखर्चाची याददास्त पहिले पाठविली ते ध्यानास आणून यैवज पाठविला पाहिजे. आपण येथे यैवजाची पैरवी लिहिली ते खरीच. परंतु आजी आखेर साल आले. या समई कर्ज द्यावयासी दिकत घेतात. रा अवचितराव यानी तर पस्टच उतर दिल्हे.

---

[1] विश्वासराव लक्ष्मण.

6820

रा त्र्यंबकराव नानानी उतर केले कीं, प्रस्तुत दरबारी आहे. येथून आज्ञा घेतल्यावरी मग सुचेल. आम्ही रावजीचे कार्यास अंतर करणार नाही. मातबरीच्या गोस्टी मात्र सांगितल्या. राजश्री संकराजीपंती सांगितले की, यासमई हात चालत नाही. ममतेचे त्याचे कर्जाचे प्रकार बहुत बोलिलो. तूर्त येथे काम होऊन दरबारची वोढ वारती यैसा अर्थ नाही. रा बाबाजी प्रल्हाद च्यार दिवस वाड्यास ढकलून नेतील. परिणामी रुा देतील हा भरवंसा नाही. त्याची आमची बोलणी जाहली आहेत. त्यानी सांगितले की साल मजकुरी मातबरी दाखऊन तुमचे कार्य सिधीस नेतो. येंदाचे साली दरबारात आमची मातबरी राहिली, सातोटीस उतरल्यापुढे आमच्याने जे साध्यता पांचपंचविसानी होईल त्यात अंतर करणार नाही. प्रस्तुत गावास गेले आहेत. ग्वाले(र)करास त्यानीच सागून आजीपावेतो राहविले. त्यानी कजिया करायासी चुकले नाहीत. हुता(श)नी जाल्यावर त्याचा तगादा सख्त आहे. ज्यात आमची भात राहील ते करावे. आमची फजिती जाहल्या शत्रु छिद्र पाहातच आहेत. श्रीमंत रावसाहेबाची मर्जी द्रव्यावर आहे. तुमचे मामलतीस बहुत उमेदवार आहेत. काही श्रीपतरावसाहिबाचे मर्जीस तुम्हाविशई न्यून्य देखिल्या जाबसाल घालावाच. रुा सिधच आहेत. श्रीमंताची दृष्टी माणसावर नाही. येथील प्रकार यैसा नाजूक जाहला आहे कीं दाहा विसा वर्षाचे मामलदार येकनिस्ट फरखत्या[१] घेतलाले त्याजवर तकरीर करावी. च्यार रुा पेचात अनून घ्यावे हे दरबाराची मर्जी जाहली आहे. माहालोमाहालची जुजेरसी[२] बहुत बारकाव्याने घेतात. किंचित अडल्या मुलाजा तिलमात्र नाही. पुरसीस नाही. रुा घ्यावा हेच दस्टी, रुाचे दरबार बहुत लालची. माणसाची आगत्य नाही. जो चढ देईल त्यासी मामलत सांगावी. माहाली यैवज असो अथवा नसो ते काही पाहाणे नाही. कोन्ही काही माहालात गुसाँईस[३] ठेऊन जाबसाल करील त्याची चौकसी फार. येक रुा गुंजाईस राहू देतील यैसा अर्थ नाही. फर्मावीस मडके वगैरे भेट वगैरे याचा देखील सुमार करून कमाविसदारास कायल करून घेतात. सिबंदीची चौकसी बहुत. त्याचा कबजा दाखला पाहावा, चोर जुसरवी वेगली यैसी बहुत दिकत कहाडून कोन्हाहि प्रा पेचात आणून रुा घेता(त). याजकरिता कागदपत्र जो तयार कराल त्याची चौकसी जमिदाराचे दस्तकानसी जमाबंदीचे कागद तैसेच वसुलाचे रुजुवाती येथास्थित करून कचेपके मनास आणून बहुत

---

१ फरखती = a written receipt and acquittance.   २ जुजरसी / जुजरवी } = बारीक चौकशी.

३ सवलत, फायदा.

जुजरसीने ध्यानात आणून कागदपत्र तयार करणे तो करावा. तैसेच सिबंदी सिलेदार त्याच्या हजऱ्या गणत्या पावतीची कबजे चौकसी करून घेतली असावी. जे आपल्या मायत आहे पुढमागे त्याचे बुधीस भ्रश न होय यैसाच संग्रह करावा. सांप्रत दरबारात मातबर जे आहेत त्याची रया राहिली नाहीं. मातबर सरदार येका महिनियात कामकाज करून जावे त्यासी साहा महिने जाहले तरी अद्यापि कारकुन कागदपत्राकरिता मागे राहिलेच आहेत. दरबारच्या मनोदयानुरूप. द्रव्याचा विचार जाहला तेव्हा आज्ञा दिल्ही. मुलकाची आशा नाही. द्रव्यावरी सर्व आहे. रा। राजेबाहादर याजला म्हणतात कीं आमची कर्जाची मदत करा. पुत्र दुसरा घेत होते त्यासी आज्ञा न दिल्ही. दुसराच जाबसाल घातला की रा। त्र्यंबकराव तुमचा दतपुत्र, त्याची सोय काहाडा. त्याजला हजारा स्वाराचा सरंजाम द्या. तुमचे खास जाहागिरीत याजला खर्चास पचवीस हजाराची जाहागीर द्यावी. मालेगाव पाटिलकीचे द्यावे. हे यैकून वडील परमश्रमी. वडिलाचे मनात येक रुा अथवा बिघाभर जमीन देणे नाही. श्रीमंताचा आग्रह बहुत आहे. आज्ञा मागत होते. देत नाही. तैसाच रा। त्र्यंबकराव सिवदेव याजकडे जाहागीर आहे, त्याचा हिसेब मागतात. जाहागीर किती, फौज काय धरिता, येकूण या घोरात घोलून च्यार रुा घ्यावे हे दस्टी आहे. येकूण कोन्ही सुखी नाही. रुा असेल तो घ्यावा हें दरबारची वृति प्रस्तुत आहे. तकरीर बहुत निघाली आहे. चढ द्यावयासी दोन च्यार असाम्या ह्याहि आहेत. येकूण मामलेदाराचा घोळ करावा, जमीदार उभे नसिले तर खामखा करवावे, यैसा प्रकार निघाला आहे. याजकरिता सविस्तर लिहिले. तुम्हाकडे तर जमा थोडी खर्च भारी. तथापि जर करणे ते येथील अनुसंधान पाहून करीत जावे. सिबंदीचे फरिस्त वरचेवर पाहात जावे. माहालचे कागद घडाल ते बहुत जुजरेवसीने करावे. पुढे पेच न ये. सरकारचे फडनिसाचे गुजरतीने जमिदारापासून कागद करून घ्यावे. जमाखर्च फडनीस मजमदाराचे हाते करावा. रुावरी नजर द्यावी तर तो पदार्थ तुम्हाकडे नाही. कर्जासी संमध. याजकरिता बहुत चौकसीने कागदपत्र जमेचा व खर्चाचा करणे. आंम्ही इतके लिहिले कार(ण) की येथील स्थित रीत पाहातो यांजकरिता तपसीलवार लिहिले आहे. कमाविसदार वगैरे याचे हिसेबचे मखलासी बहुत जुजरसीने करावी. भीड कोन्हाची न धरावी. फडनीस मजमदार याजला परिछिन्न सांगावे की दरबारी जाबसाल पडेल तेव्हा तुम्हास पुसतील याजकरिता हिसेब कोन्हाची भीड न धरिता उतम चौकसीने करावा. सिबंदी वगैरे सर्व चौकसीने करावा. रावसाहेब आपण च्यार दिवस मेह(न)त करून चौकसी बहुत बारकाईने

करावी. कारकून मायेचे आहेत करितील म्हणून हगइ न करावा. काल परम कठीण आला आहे. सरदारामधे चाकरी केली न केली हे दृष्टि नाही? कोन्हाहि प्राा पेचात आनून रुाा साधावा हा रंग आहे!! जे कराल ते पायासुध करावे. ज्यात कोन्ही काही बोलोन आपल्यावरी शब्द येईल येसे सहसा न करावे. साल मजकुरी कलेल तो विचार करून सतोटी राखावी. दरबार खर्चाचा यैवज, रसदेपैकी बाकी, हे कलेल तैसे करून रवाणा हुंड्या कराव्या. हुंडी वासुदेव मुरारिवर न पाठवावी. येथे यैवज कर्ज म्हणून देतो यैसा अर्थ तूर्त नाही. येत्नास अंतर किमपिहि केले नाही. यासी साक्ष श्री असे. फार काय लिहू? रावसाहेब मी येकनिस्ट, दुसरे देवत जाणत नाही, म्हणून अमर्याद करून लिहिले म्हणू(न) रागास न यावे. रंग या प्रकारचाच आहे. बारीक वर्तमाने आहेत. पत्री लिहिता. विस्तार तरी वेचे वेचे लिहिलेच आहेत. मुख्य सावधतेने जे करणे ते करावे. पुढ मागे पेच नये. फडनविसाचे हाते कामकाज घेतो त्याचा बिसालसीचे? पत्र पाठवितो म्हणून लिहिले उत्तम, आहे. आजी खावंद कृपावंत आहे म्हणून त्याजवरी न जाणे. मर्जी बहुत नाजूक, येकदा जो जाबसाल जाहला त्यात काही दिकत घेतली म्हणजे तेच क्षणी गैरमर्जी. काही लिहिता पुर्वत नाही. हुंडीचे वर्तमान सांगावे तर जाठ पराभवाते पावला. फौजा रवाणा केल्याच आहेत. तुमचा बंदोबस्त करून देतील. तुम्हापासी कोट किले मातबर जागा आहेत. तुम्ही मर्द मानूस आहा चिंता काय (अपूर्ण)

¶*The writer impresses on the addressee Vishvasrao Lakshman the necessity of preparing accounts carefully and forward them to Poona for inspection at an early date. He asks the addressee to use utmost vigilance in preparing accounts as Government officers are being harshly dealt with for even small frauds.*

No. 164] [*1762?*

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री . पंत

प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक मेघश्याम कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ९ राबिलोवलपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पाा बारडोल येथील देहहीचागिरीची गुरे श्रीनिवास बापोजी निाा राजश्री उदाजी चव्हाण यानी नेऊन रुपये साडेचारसे व गुरे साहा ठाव बुडविली म्हणोन स्वामीनी कृपा करून माारनुलेस मसाला व ताकीदी खंडोजी जासुद यासमागमे पाठविल्या. त्यासमागमे मनुश्ये देऊन पत्रे लाविली. श्रीनिवास

6823

बापोजी चव्हाणाजवळ होते. पत्रें हिमतबहादरानी घेऊन स्वामीस उतर लिहून दिल्ही आहे. गुराची वाट व मसालेची वाट न करिता जासूद माघारे लाविले. आम्हास पत्र लिहिले जे बारडोल परगणेंतील लोक रामराव डफलेकडे चाकर राहून विज्यापूर देश्यात उपद्रव केला. यास्तव हे कर्म श्रीनिवास बापोजीनी केले म्हणोन तुफानाचा मजकूर लिहून पाठविला. रोजगारी रोजगारास गेले. हे अंतर प्याद्याकडे काये? जे विचारणे ते रामरायास विंचारावे. ते न करिता बारडोलासी घसघस करितात; येविसी आम्ही फिरोन जासूद सरकारचे चव्हाणाकडे पाठविले जे चोरीचे मुदे बोलता, येविसीचा मुदा श्याबूत करावा. जाब करूं म्हणोन पाठविले, परंतु मुदा श्याबूत न केला. जे बोलणे ते तुमच्या धण्याच्या रुबरू बोलू म्हणौन जासूद मसालां न देता, चिठी माघारी न देता लाऊन दिल्हे. शेवेसी कलावे म्हणौन लिहिले असे शेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Meghashyam Krishna requests the Peshwa to order Shriniwas Bapuji, a subordinate of Udaji Chavan, to restore to the respective owners, the cattle plundered in the District of Bardol.*

No. 165] [*1770?*

नकल

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री चीं वस्त्रें कसी होत आली आहेत ते लेहून पाठवावयाविसी आज्ञा केली. यैशास पूर्वी राऊसाहेबाबराबर अंबाजीपंत तात्या मुतालकीची वस्त्रे घेत आले. नानासाहेबास प्रथम वस्त्रें जाली ते समई माहादाजीपंतास मुतालकीची वस्त्रे जाली. रामराजे याचे वेलेस नानासाहेबानी वस्त्रे घेतलीयावरी माहादोबास दिल्ही. त्याउपरी नानास मुतालकीची व धोंडोबास फडनिसीची याप्रमाणे दिल्ही आहेत. याप्रो स्मरणात आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives how and in whose regimes the robes of the Mutaliki of the Peshwas were given to the several Purandares during previous regimes.*

No. 166] [*Before 1761*

श्री

सेवेसी मानाजी पायगुडे दंडवत विज्ञापना. ताा छ १ रबिलावल सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञेप्रमाणे गोबुरास शुक्रवारीं मध्यान रात्रीस

रातोरात सडे देऊन गाठून चौक्या दिल्हा. काल मदवारी प्रात:कालीं राजश्री यशवंतराव पवार व रा हरि गोपाल व रा बापू सखाजी यांची फौज येथेच आली. तोफा आल्या नव्हत्या. मोर्चे लाविले तों येसवंतराव याकडे गांवातील भला माणूस आला. आम्ही वर्तमान आईकिल्यावर त्यांस सांगोन पाठविलें कीं, पंनास हजार रुपये दिल्हे तर कौल देणे, नाही तर गाव कापून काडणे म्हणून खावंदाची आज्ञा आहे. त्याणी चिठी लिहिली जे, भला माणूस आला होता त्यासमागमें कारकून गांवात पाठविला आहे, आलियावर तुमच्या विचारे जे करणे तें करूं म्हणून. त्यावर रा माधवराव तोफ घेऊन आले ते पवाराच्या मोर्च्या शेजारीच राहिले. बाण तोफांचे गोले आत मार द्यावयास लागलो. गावांत गुरू व चौकडील गाव आत आहेत व पैक्याचीं कुलें गांव मातबर आहे. घोडी पाऊणसें आसी आहेत. धास्तीने रात्री बोलावयास आले. वीस हजार रुपयेपर्यंत कबूल जाले होते. आम्ही साफ सांगितले की, पंनास हजारासिवाये आम्ही आइकत नाही. गांव कापून काढितो. त्यावर राजश्री पवार व बापू व माधवराव याणी मिलोन वीस हजार यैन मसाला व खर्च दोन हजार येकून बाविसा हजारावर करार करून आम्हास पुसावयास लागले जे, बावीस हजार देतो, यावर कांही होत नाही. रुपये बुडवीत असला तर हला करायाचा करार करा. नाही तर पुढें रुपया आधिक होत नाही यैसे बोलिले. आणिखी येक दिवस करार न कारितां मेहनत केली आसती तर चालीस-पंनास पर्यंत रुपये देता, यैसी बातमी आणिली व द्रिष्टीसहि पडले. परंतु सोबती आले त्याणी करार केला, आपण मोडावे त्यास खावंदाची आज्ञा पाहिजे, यास्तव सेवेसी लिहिले आहे. पवार व बापू यास पत्र पाठवावे जे येक दिवस मेहनत करून चालीस पंनास हजार रुपये घेणे म्हणून; अथवा जाली खंडणी हेच चितास आली तर तैसीच अज्ञा लिहून पाठवावी. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Manaji Paygude describes how Gobur was besieged and how it capitulated.*

No. 167] [*1763-64?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. सरकार हंडिया या प्रांताचाहि बंदोबस्त उतम प्रकारें केला आहे. मुलकाची लावणी करीत आहे. गुदस्ता थोडे बहुत चोराचे पारपत्य येक दोन मवासाचे केले तों बरसातीचा हंगाम आला, त्यामुलें राहिलें.

आता उन्हाळा दिवस आला आहे. फिरोन सरंजाम करून सिबंदी ठेऊन पारपत्य करितो. आणि लावणीचाहि डौल घातिले, परंतु रयेत लोक येतात, ते म्हणतात की, उज्याड गावावरी राहावे तो प्रथम भक्षावयासी पाहिजे. यास्तव तगाई मागतात. त्यास दिल्ही पाहिजे तेव्हा रयेत लोक येत जाईल यैसे आहे. तगाईची आज्ञा होईल तरी वीस पंचवीस हजार रुपये तगाई देऊन वस्ती करवीन, आणि चोराचे नाकेयावरी गाव आहे, त्याच्या गढ्या बांधिल्या पाहिजेत. विना त्या गावाची वस्ती होत नाही. त्याची आज्ञा जाहाली म्हणजे दाहा पंधरा गढ्या दोन तीन हजार रुपये लाऊन * * * न तेणे करून गाववस्ती होऊन चोराचा नाका बंद पडेल. तेणेकरून दुसरे पोटी गाव सारे वस्ती होतील. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. येविसीची आज्ञा आलियाने आबादीचे डोल उतम रीतीने होईल. सेवेसी श्रुत होय. साल मजकुरी रसदेच्या वराता दोन लक्षाच्या पुणेयाचे व सावकाराच्या व अनंदवली मिळून जाल्या. त्यासी ऐवज झाडून भरणा करून दिल्हा असे. त्यानंतरी स्वामींनी कृपावंत होऊन आनंदराव व रतनसिंग जमातदार याजबरोबर आज्ञा सांगोन पाठविली की, पुणेयाच्या वराता जाहाल्या आहेत, त्यापो पसतीस हजार रुपये पुढे माघ मासी ऐवज वसूल होईल त्याप्रमाणे देणे आणि अनंदवलीचा ऐवज आधी देणे, यैसी आज्ञा होती. त्यासी हे उभयेता आले नवते. त्याचे आगोधर भर्णा सारा केला असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*A revenue officer from Handia submits for Raghunathrao's consideration his proposal for settling the province and removing the nuisance of thieves and requests that he may be allowed to remit part of the revenue to induce people to return to their respective villages.*

No. 168] *[1773*

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री महादजीबावा
पाटील साहेबास आशीर्वाद

विनंती. वृध आवस्था, श्रम न होय, याकरितां तुम्हीहि इष्ट आहा. श्रीप्रीतिर्थ राजश्री तुकोजीबावास मातुश्रीबाई साहेबास सांगोन मुलालेकरावर लोभ करून कर्जपरिहार होये तें करावें. आमचे सहश्र अपराध क्षेमा करावे. ब्राम्हण आहों. कृपा करावी श्रुत होय हे विनंती.

¶*Gangoba Chandrachud asks for Mahadji's intercession with Tukoji Holkar for protecting his family and clearing his debts*

No. 169]

(19-8-1759)

छ २९ जिल्हेज

खर्च जामदार

कारकूरन दिा रामचंद्र कृष्णराव यास रा। भाऊची स्वारी भीमाशंकरास गेली होती तेथे कामकाज केले सबब (वगैरे)

सितैन मया अलफ

(1-10-1759)

छ ९ सफर खर्च पोतापैकी

३०० धर्मादाय देणे येसूबाई फणसी सौ आनंदीबाई याची मावसी कासीहून आली सबब (वगैरे)

समशेरबहादर यास साहेब नौबत दिली सबब वस्त्रे सदरेस विा रा। नाना (पुढे वस्त्रांचा तपसील)

३

सितैन मया व अलफ

(19-10-1759)

छ २७ सफर

खर्च जिनसखाना दिपवाली खर्च लोकाकडे लावावयासी वजा पके.

(चमेली तेल दिलेल्या लोकांत रेणको अनाजीचें नांव व तसेच माधवराव सदासिव जाधव याचे नांव आहे. तेल सुंगधराज दिलेल्या लोकांत आणाजी साटम याचे नांव आहे. तेल मोगरेल दिलेल्या लोकांत धनशेट कर्जे याचे नांव आहे.)

(13-6-1760)

इहिदे सितैन

छ २८ सवाल खर्च पोतापैकी

१३ राधा प्यारी कलावंतीण हिजबदल गाडी येक होती तिचे भाडे इा छ ८

राखर ता। माहे जमादिलाखर अखेर माहे २॥। दरमाहा रुा २॥। प्रा ३७॥.

४

(*13-6-1760*)

इहिदे सितैन

छ २८ सवाल खर्च पोता रोजमरा दीढमाही

या यादीत सिलेदार कारकुनांत

२३९ मल्हार हरि

३९ गोपाल रघुनाथ

२०० बाबूराव हरि देखील पालखी

४० सखाराम हरि

५२० निा खंडेराव दौलत

५०० खासा

२० रामराव दामोदर

५२०

६९॥ कुकाजी सिवराम

(*12-1-1761*)

छ ४ जाखर खर्च पोता

७९ तुळाजी आंग्रे याचे पुत्र राणोजी आंगरे यास खर्चास

(*8-2-1761*)

इहिदे सितैन

छ २ रजब

करमुदीखान मुजफरखान गाडदी याचा लेक व माणसे सिंहीगडावर बंदी आहेत त्यास साल गुा पावले त्याप्रमाणे (पुढे तपसील)

(*8-5-1761*)

छ २ सवाल

४० सिवराम आनंदराव कारकून सिलेदार रामचंद्र जाधव याजकडे वकिलीस आहे त्यास खर्चास (वगैरे)

6828

१७३.

(22-5-1761)

छ १६ सवाल

जमा जिन्नसखाना. जमाबाबद भेट राजश्री दादास सिदापा सेव्या राजश्री भाऊसाहेबाच्यां लस्करातून आला सबब लवंगा वजन रुा ९ तोले

इसने सितैन

(13-6-1761)

छ'९ जिलकाद खर्च पोता

१९९७६८÷ व्रतबंधखर्च चिरंजीव नारायणेराव यांचे व्रतबंधानिमित्य तपसील आलाहिदा बंद सुमार ९

गंगाबाई मावसी सगुणाबाईची

येसूबाई मावसी आनंदीबाईची

५

इसने सितैन

(21-2-1762)

छ २६ रजब

५५ रामशास्त्री माहुलीकर आश्रित यास रोजमरा दीड माही रुा चिठी

छ २९ रजब

२१४ पागा दिा भगवंतराव तुबाजी रोजमरा दीडमाही रसानगी गणती रुा

७५ खासा

१०० भोई

१७५

६५ आनंदराव तुबाजी

६५ कृष्णराव भगवंत

२० जिवाजी केशव

२४ बाजे लोक

३६४

(2-4-1762)

छ ६ रमजान

१॥ मल्हार चिंतामण वाघ कारकून सिलेदार रवाना मुरारराव याजकडे सबब रमजानचे तेल दिवटीस (वगैरे)

(5-4-1762)

छ ९ रमजान

पागा दिा धोंडो मल्हार तिखे भगंवतराव राम कडेकर

सलास सितैन

(15-2-1763—16-3-1763)

रोजकीर्द स्वारी पंतप्रधान विा नारो आपाजी मुा पुणे इा छ १ ताा छ ३० मिनहू साबान खर्च पोतापैकी

७

(15-2-1763—16-3-1763)

४८६९।= उत्तरकार्य लक्ष्मीबाई (बंद ७.)

२२५ निा शास्त्रीबावा याजकडे न्यायाधिशेचे कामास आहेत त्यास छ ९ रोज रसानगी यादं

१५० मोरो हरि

७५ बालाजी धोंडदेव

२२५

सलास सितैन

(20-2-1763)

छ ६ साबान

देणे खाशा चाकरीच्या बायेकाच्या मुलास पाडव्याचे पोशाख पाा मातुश्रीबाई रसानगी व ताा रामचंद्र नारायेण गोरे आंख

१४०॥ येसीचे मुल आा २ कुशांबा व बावा

6830

६९ गोंद्या कमलीचा

६९||| स्वरूपाचा लक्षुमण

२७९|.

(*21-3-1763*)

छ ५ रमजान

विसाजी दादाजी आठवले याचे घरी वोटभरण सुनेचे झाले सबब आंख

५.

छ २९ रमजान—सिलेदार कारकून चिंतो कृष्ण शालग्राम

(*14-4-1763*)

६

(*14-4-1763*)

५ नारो गोविंद पंतोजी यास पा मातुश्री-बाई रसानगी चिठी रा नारायेणराव याणी वर्षप्रतिपदेस कागदावर ल्याहाव-यासी मुहूर्त केला सबब धोत्रजोडा येक देविला त्याचा ऐवज नख्त छ १० रोज २०० मोरो हरि निा रामशास्त्री छ २३ रोज सालमजकूरचे वेतनाबद्दल सनद लस्कर रुपये ३५० पैकी वजा पावले १५० बाकी पहिले रा यादी

(*14-4-1763*)

छ २९ रमजान

देणे परदरबार अबदाआली याजकडे पाठवावयास दागिने ब्राा सनद लस्कर किाा रुपये

३५०० खाशास

१५००	सिरपेच	१
२०००	माल	१
३५००		२

१००० शाहावलीखान जेगासिरपेच २

५०० याकुबखान अली जेगा सिरपेच २

५०००

पैकी वजा सिलकेस दागिने नव्हते त्याचे नक्त दिल्हे रुपये २५०० बाकी रसानगी चिठी छ २ रमजान ता शंकराजी सखदेव कारकून दिा पुरुषोत्तम माहादेव हिंगणे वकील छ २३ रमजान किंमत रुपये २५०० (वगैरे)

(14-4-1763)

सलास सितैन

छ २९ रमजान खर्च पोतापैकी मुा पुणे विा नारो आपाजी इा छ १ ताा छ ३० मिनहू १२ जथे आबाजी साठे

१० छ ७ रोज खुद नाइक निजाम अलीखान याजकडे बातमीस आहेत त्यास घरी खर्चास अर्जबाब रा चिठी

२ छ मजकूर देणे हसन मा बारगीर दिा मजकूर याणे थेऊरचे स्वारीस केळीचे झाडात गज तरवारेनें तोडू लागला तेव्हा तरवार उडाली सबब विा रा नारायेणराव

(2-3-1767—31-3-1767)

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी पंत प्रधान सुरु सबा सितैन खर्च जामदारखानापैकी स्वारी मातुश्री इा छ १ सवाल ताा छ ३० मिनहू छ ३० रोज

खासे चाकरीच्या बाइकाची मुले बनसिंग हैबतसिंग यास मोईनपैकी वर्षप्रतिपदेस द्यावे ते गुा रामचंद्र नारायण गोरे सनगे येकूण आंख

१९९। बनसिंग

२००।= हैबतराव

6832

१७७

(*1-7-1767*)

समान सितैन

छ ४ सफर खर्च पोता

२० दिा पागा हुजूर अलीबहादर याची स्त्री औरंगाबादेस माहेरास जाते त्या बरोबर घोडी जातात त्यास वीस रोजा बेगमी अजमासे (वगैरे)

(*5-7-1767*)

छ ८ सफर खर्च पोता

खंडेराव रघुनाथ पैठणास बातमीदार
रामचंद्र तुकदेव जयनगरचा ,,
रंगनाथ कृष्ण उज्जनीचा ,,
मुरलीधर जातकराये दिलीचा ,,
पुरुषोत्तम महादेव ,, ,,

(*12-7-1767*)

छ १९ सफर

रा नारायेणराव याजकडील अमरकोष व पंचकाव्ये पुस्तक त्याहावयासी चिठी छा मजकूर ता रामचंद्र नारायण गोरे कागद गढी किंमत रुा २०॥÷ पैकी निमे गढी रुा १०।=॥

२

समान सितैन

(*19-7-1767*)

छ २२ सफर रामाजी कासी वाकेनीस रघोजी करांडे याचे पुत्रास वाड्यात मेजवानी आहे सा ता रामभट तैलंग वजन तोले ११।– १ दोन शेर साकर भातास

(*24-7-1767*)

छ २७ माहे सफर खर्च पोतापैकी

३० अजुरा खर्च कासीदजोडी श्रीरंग-पटणाहून निजामअलीचे लस्करातून

राघो शंकर दिा धोंडो राम याजकडून
आली त्यास अज़रा रसानगी पत्र ला
(वगैरे)

(27-7-1767)

छ ३० सफर खर्च पोता

२५ दिा रुस्तुम गंज

९ हकीम वा दादू महात धारण
सुधा

१६ गडेकरी

२५

¶*These are a few selected entries from the Peshwa's Diaries illustrating several items of interest pertaining to the regime of Peshwa Madhavrao I.*

Index to Selection No. 39

Administrative Papers of Madhavrao I (1761-1772)

(*N.B.*—Figures denote numbers of letters)

MO-II Bk Ca 18—24

G—*contd.*

H

H—*contd.*

J

K

K—*contd.*

L

M

M—*contd.*

M—*contd.*

M—*concld.*

N

P

P—*contd.*

R

R—*contd.*

S

S—contd.

S—concld.

T

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४०

बाळाजी बाजीराव–संकीर्ण

[किंमत—२ रुपये ४ आणे किंवा ४ शिलिंग ३ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

√ **Selection No. 40.**

MISCELLANEOUS PAPERS OF BALAJI BAJIRAO.

This selection brings together a number of important papers which came to light after the previous selections had been arranged and sent to the press. They refer to the various events with which the regime of Peshwa Balajirao is so full—the conquest of the Karnatak, the early history of Ramraja (29) and his struggle for power No. 65, and the pilgrimage of the Peshwa's mother, Kashibai. The rivalry that long existed between the Peshwa and Babuji Naik Joshi for the possession of the Karnatak is a subject which has already been dealt with in Selection No. 25 and which will be found further cleared in some papers reproduced in this selection, viz., Nos. 28, 33-35, 45, 48, 52 and 53. No. 28 in particular, being a sanad granted to Babuji by King Shahu, seems to point to the origin of the dispute. A few papers of the previous regime are also included as they throw light on the conquest of the northern Konkan, as far as Jawhar and Ramnagar first projected by Bajirao in 1724 and completed as late as 1759. The letters of Krishnarao Chaskar, Balajirao's maternal uncle who was for a time entrusted with the task, will be found full of interest. Nos. 79 and 86 show how the Peshwa and Tulaji Angria gradually came to a clash. The last few letters No. 129, 132, further elucidate the preparations made by the Peshwa for resisting the Abdali, a task for which Raghunathrao was already appointed and which at the last moment came to be entrusted to Sadashivrao at the famous meeting at Patdur. Although these papers are styled miscellaneous, they are by no means less important historically.

No. 1] [11-8-1724

तालिक

श्री

राजश्री सटवोजी जाधव गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअळंकृत राजमान्य स्नो बाजीराऊ बलाल प्रधान आशीर्वाद सुहूर सन खमस अशेरन मया अलफ. जवार व रामनगर व पेठ व वासंदे हे च्यारी संस्थानें व परगणे घणदिवी ऐसे स्वराज्यामधे आहेती. तेथील अमल स्वराज्याचा व सरदेशमुखीदेखील व याखेरीज सुरतप्रांतीचे माहाल वगैरे तापीपार आहेती. त्या महाली बाबती व सरदेशमुखीचा अमल जाला पाहिजे याकरितां सदरहू स्वराज्यामधे पांच स्थलेंयाचा अमल देखील सरदेशमुखी व सुरत प्रांत व तापीपार परगणे याचा बाबती व सरदेशमुखीचा अमल यैसा मामला तुमच्या स्वाधीन केला असे. तुम्ही इमानें इतबारें वर्तोन जबरदस्तीने जाबिता बसऊन अमल बैसवणे. कुल बाब जमा आकार करणें त्यापैकीं जमेती व ठाणी व महाल मजकूर देखील खर्चाचा व रसदी[1] यैवज हुजूर स्वारी मजकुरी पावावयाचा तह:—

जवार व रामनगर व पठे व वासदे व परगणे घणदिवी हे स्वराज्यामधी आहेती. याचा अमल तुम्ही करणें. मुलकाची जमा व जकायेती बंदर पाणवाट व खुसकी व कमाविश बाब देखील आकार करणे. तो ऐवज व त्या यैवजाचे जमेस सरदेशमुखीचा वसूल दरसदे रुपये १० दाहाप्रमाणे रयती निसबतीने वसूल घेणे. येणेप्रमाणे यैवज वसूल घेऊन जमा करणे. त्यापैकी दोनी तकसिमा यैवज जमेती व गड व ठाणी व माहल मजकूरच्या खर्चास तुम्ही घेणे. बाकी तिसरी तकसीम यैवज हुजूर स्वारी मजकुरी लावणे. पेस्तर अमल बस-

सुरतप्रांतीचे परगणे व तापीपार परगणे या परगणेयाचा बाबती व सरदेशमुखीचा अमल मुलूख व जकातीचा हासिलाची निमे बाबती व कमाविशबाब यैसा यैवज वसूल घेणे. दोनी अमलाचा आकार जमा होईल त्यापैकी सालमजकुरी निमे यैवज तुम्ही जमेती व माहाल मजकूर मिलोन खर्चास घेणे. बाकी निमे यैवज रसदी हुजूर स्वारी मजकुरी पावणे. सालमजकुरी अमल बैसलियावरी पेस्तर साली बाबती व सरदेशमुखीची कुलबाब जमा आकार होईल त्यापैकी तिसरी तकसीम यैवज तुम्ही जमेती व माहल मजकूरच्या खर्चास घेणे. बाकी दोनी

[1] रसद = Money paid into the public treasury by the native collectors as the amount of their collection (Wilson).

लियाउपरी निमे यैवज गड व ठाणी व जमेती व माहल मजकूरच्या खर्चास तुम्ही घेणे. बाकी निमे यैवज रसंदी हुजूर स्वारी मजकुरी पावणे.

कलम १

तकसीमा यैवज दोनी तकसीमा रसदी हुजूर स्वारी मजकुरी पावणे

कलम १

येणे प्रमाणे दोनी कलमे ह(स)दरहू प्रमाणे तह केला असे. तुम्ही जबरदस्तीने आमल बैसऊन स्वामिकार्य करणे. सदरहू तहप्रमाणे तुम्ही कबूल करून आपले पत्र लेहोन दिल्हे आहे. तरी सदरहू तह प्रमाणे रसदी यैवज हुजूरस्वारी मजकुरी पावता करणे. छ २ जिल्हेज बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa Bajirao assigns to Satvoji Jadhao the revenue administration of the provinces of Jawhar, Ramnagar, North Konkan and Surat. He fixes the percentage of the assessment to be received by Jadhav and that to be paid to the Peshwa. He also asks the addressee to settle the province of Surat and establish the Peshwa's authority in that region.*

J *No. 2*] [*30-12-1733*

पौ छ ९ साबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामींचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा पौष्य शुध पंचमी रविवासर जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावलें. तेथें आज्ञा केली कीं, राजश्री कृष्णराव महादेव यास जवार रामनगर पेठ वासंदे येथील मामला व सात माहालखेरीज जकाती धंदा सांगितला. त्यास तुमचे कारकिर्दीस साल गुदस्तां आकार जाहाला त्याप्रमाणें मााानिलेचे हवाली केला. त्यास सालमजकुरीं तुम्हाकडे वसूल जाहाला असेल तो व सालमजकुरी या मामलियांत कोणी जाजती चढ कबूल केला असेल तो लेहून पाठवणे म्हणून लिहिलें. येसियासी जाजती चढ जाहला त्याची यादी आलाहिदा लेहून पाठविली आहे त्यावरून कलो येईल. सालमजकूरचा वसूल तरी कमाविसदार आणून वसूल जाहला तो हिसेबु लेहून घेऊन मागाहून पाठऊन देतो. कलले पाहिजे हे विनंती.

¶*This paper refers to the appointment of Krishnarao Mahadev as the Mamlatdar of Jawhar, Ramnagar, Peint and Bansda in the place of Vasudev Joshi.*

No. 3] [1736 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी

सेवक कृष्णराव महादेऊ कृतानेक सां नमस्कार विनंती उपर येथील कुषल जाणून स्वकीय लिहिल पाहिजे. स्वामी किलियास आलियाने किला हातास येतो. नाही तरी हातचे जातो. आमचा पैका खाऊन किला घेऊन जे चढले तेच बलावलेसे जाहले. आपण किल्याखाले येऊन बसलो. आजि तागायत आपण वीस हजार रुपये पावेतों खर्चीखालें आलों. आतां ते लबाडी करितात आणि किलियाचा पेगाम आगरियाकडे लाविला असें जाहले असे. याउपर आपण जिवंत येतो येसें नाहीं. स्वामी आले तर किला खामखा जोरावरी घेऊन. चिंता न कीजे. हे होत नाहीं तर किला जातो. येथे च्यार दगे वाढले आहेत. आपण आलियानें सर्व उत्तम होईल. बहुत काय लिहिणें हे विनंती. आपण याचा राखोन बसलो आहो. सत्वर आलें पाहिजे हे

¶Krishnarao Mahadeo begs succour from Chimaji Appa to reoccupy the fort captured by a detachment of men financed by him who now refuse to deliver the place to him.

No. 4] [2-5-1733 ?

पाा छ ४ मोहरम

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव साा नमस्कार विनंती. येथील कुशल वैशाख वद्य अमवाशा मुकाम काा वाडे प्राा जवार जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले ते पावले. कोलवण प्रांतांतील रयेत कल्याण भिवंडी प्रांते गेली आहे. त्याजवरी बाकी आहे. त्याचे वसुलाचें तोट लाविले आहे. त्यास मनारोखे द्यावे, तगादा न लागे ते करणे म्हणून आज्ञा केली. आज्ञेवरून मना रोखे पाठविले. उपसर्ग किमपि लागन्हार नाहीं. वरकड आम्हाकडील वर्तमान तरी कोलवण प्राते स्वारी जाली, तेव्हा जवारकरा-कडून राा जिवाजी हरि सबनीस काा वाडे येथील मुकामास येऊन बाकीची विल्हे वाइदेबंदी करून तह करून गेले. पुढे रामनगराकडे गुदस्ताची बाकी

6837

व सालमजकूरचा यैवज राहिला आहे याकरितां उदैक कूच करून रामनगरास जाऊन तेथील पैकियाची विल्हे जाली म्हणजे सेवेसी येऊन. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे. पुढे त्या प्रांते जे वर्तमान होईल ते सेवेसी लेहून पाठऊन हे विज्ञापना.

¶Krishnarao Mahadeo promises to remit the revenue partially to the agriculturists of Kolwan.

/ *No. 5]* *[Before 1729?*

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी यासी

ॐ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित पिलाजी जाधव दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे. विशेष. पत्र छ १९ रबिलोवल जेजुरीचे मुकामाचे पाठविले ते छ २६ माहे मिनहूस कसबे देहरजे प्रा जवार येथे पावले. तेथे आज्ञा की बेलदार सेंभर व बरकंदाज उदापुरी होते ते व सुपाचे यैसे सें दिडसे पाठवितो. गडची बेहबुधी करून लोकाची समाधानें करून राजश्री रामचंद्रपंत व तुम्ही येके विचारे राहून तो प्रांत सोडवणे, गंभीरगड वगैरे स्थले हस्तगत करणे, उदापुरी मुधोजी चकोर ठेविला आहे त्यासहि जे सांगणे ते सांगितले आहे. तिकडील स्थले राजश्री रामचंद्रपंताचे विचारे सोडवणे म्हणून सविस्तर लिहिले. यैसीयास कल्याण प्रांते जवारकरानी चोर रात्रीचे घालून गाव दोन च्यार सदरेचे जाळिले, यास्तव ते निरोप घेऊन कल्याणास गेले. दाहु पाच माणूस रात्री गावास आग लाऊन जाते त्यास फौजेने काये करावे? जपोन माग काढून वाटा धरून धरावे, हा विचार त्यास आम्ही लिहिला आहे. बेलदार आम्ही पाच सात मेळविले आणि आपण सेंभर बेलदार जेव्हा पाठवितात तेव्हा बालेकिलाचा तट व पाहारे व गल्यास घरे व माचीस वाटा यैसे करऊन किलाची मजबुती करवितो. बेलदाराविण बेइलाज जाला होता, तर अगत्य बेलदार रवाना करावे. आम्ही येथे पाथरवट दाह माणूस ठेविले आहे व बरकंदाज परदेसी माणूस किलाच्या कामास चाकरीस चोखट आणि विस्वासूक याजकरिता सेंभर दिडसे जे मिलतील त्यास जमान घेवऊन दरमाहा च्यार रुपयेप्रमाणे सिरिस्ता करऊन पाठविले पाहिजे. वरकड स्थलाचा विचार आधी येक घेतला. त्याची बेहबुधी बलकटीने करावी. हे कायेम जालियावरी आणीक उपाये. गला सेंभर खंडी पावतो गडावरी घातला. आणिकहि गला घालीतच आहो. दारू गोली राजश्री

रामचंद्रपंतापासून तिशां रुपयाची घेऊन गडावरी घातली. खंडोजी मानकर व राणोजी रणजोर मिळोन साडेतीनसे माणूस गडावरी ठेविले आहे. परदेसी बरकंदाज जितके येतील ते गडावरी ठेऊन त्याचा ऐवज मऱ्हाटे खाले उतरऊन जवारकरानी राजश्री अंबोजी देशमुखाकडून मदत आणिली. फरादी वगैरे काही सिबंदी ठेऊन खटपट करिताती. याजकरितां जवार प्रांत तूर्त आठ पंधरा दिवस टाकून आणिका कार्यास जाता येत नाही. येथे बसोन गडचीहि बलकटी करवितो आणि जवारकर येकदा गाठी घालिते म्हणजे त्यास ठेचका देतो म्हणजे दुसरियाने कोण्हावरी तोंड न टाकीत आणि तहासहि येतील. रामनगराचीहि सरद च्यार पाच कोस, त्याजवर दबदबा पडला आहे. येका दो रोजा भेटीस येणार. सुरलितपणे चालिले तर बरे, नाही तरी त्यासहि सजा देतो; आणि पंधरा विसा रोजा जाऊन सुरत प्रांतचाहि धंदा मनास आणून येतो. आपण इकडील बंदोबस्ताची चिंता न करावी. तुम्हास सा महिने बोलावीत नाहीं, जड पडले तर लेहून पाठवणे, आम्ही खासा येऊन म्हणून लिहिले, तरी आपण दरबारचा विचार राखोन आमची खबर मात्र घेत जावी. आपणास येणे न लगे. आम्हास सा महिने ठेविले, बोलावीत नाही, तेव्हा इकडील बंदोबस्त आपल्या प्रतापे बराच होईल. दारू गोलीचा सामान पोख्त किल्यावरी आसिला पाहिजे. याजकरिता पूर्वीहि लिहिले आहे. तरी येक खंडी दारू तिकडून अनकूल पडली तरी पाठवावी अगर राजश्री रामचंद्रपतास लेहून देविली पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav writes to the Peshwa, reporting measures adopted by him to reduce Jawhar and Ramnagar.*

No. 6] [*Recd. 27-7-1736?*

छ २८ रबिलावल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. आम्ही पुणीया असतां राजश्री मल्हारजी होळकर यांस सांगितलें कीं आम्ही कोहीज प्रांते स्वारीस गेल्यामागें चासेस कारभारी होते त्याणी तुमचे लाकडापैकीं च्यार पांच लांकडे खर्च केली. प्रस्तुत लाकडे आहेत ही घेऊन जावी. आम्हाकडे खर्च जाला आहे, तेही ऊष्णकाल जाला म्हणजे आणून देवितों. तुम्हा आम्हामध्यें लाकडाची मालियत काय आहे? येशा कितेक प्रकारे

गोष्टी सांगितल्या व त्याजकडील रो गंगाधर (फाटलें *) णा यांस येकदोन वेळां ये रीतीनें सांगितलें आणि श्रीमंत राजश्री आपाचा निरोप घेऊन आम्ही गांवास आलों. मागें त्यांणी राऊत तयार करून आम्हावर पाठविले त्यांचा हेत कीं कलह करावा. त्याणी राऊत पाठविले ते नात्रेपर्यंत आले होते. आम्ही तो पुढेंच गेलो होतो. मागून माणसे आलीं त्याणी राउतांचे वर्तमान सांगितलें. आम्हासमागमें पांच खिजमतगार व पालखीचे भोई मात्र होते, त्यांणी तो परिछिन कपटबुध्धीनें राऊत रवाना केले (समजत नाही). ची त्याची वर्तणूक स्वामीच्या चितास येते कीं काय? पुढेंही त्याची उमेद आहे जे चासेस येऊन गावासी दंगा करावा आनि त्याजपासीं दाहा हजार फौज आहे. चासेस आल्यावरी आम्हास निघोन दुसरे खेडियांत जावे लागेल, गांवांची नास करितील. आम्ही ग्रहस्तपणे त्याजला निवल सांगितलें असतां त्याणी इ(त)का उपद्राप करावा येसे नाही. तथापि हा सर्व अर्थ स्वामीस नकलेसे काय आहे. आम्ही पुणीयास येतेसमई पांचा साता माणसानसी येतो जातो. मार्गी त्याणी आम्हासी कलह करावा, आम्ही मारले जावे हाच अर्थ उत्तम आसिला तरी रुणाबंधप्रमाणें स्वामी सर्वज्ञ आहेत. तपसील ल्याहावा यैसा अर्थ नाहीं. वरकड त्याचे चितांत खामखा आम्हासीं कटकट करावीच यैसे असेल तरी काय चिंता? स्वामीचे (फाटले आहे) समर्थ आहे. स्वामी वडील आहेत, आम्हास शब्द न लागे येसे व्हावें. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विज्ञापना.

¶*Krishnarao Mahadeo writes to the Peshwa a strong complaint against some one for despoiling his village.*

No. 7] [1-10-1736?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव कृतानेक सा नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर केसो हरि बराबर पत्र आले तेथे पुणियास यावयाची आज्ञा केली, येसियास दसरियास येकदोन दिवस मध्ये राहिले. विजयादसमी जाल्याउपरांतिक स्वार होऊन सेवेसी येतो. वरकड जुनरास (फाटलें * * *) चा मजकूर लिहिला त्यास किल्याचे वर्तमान आम्हास येथे कलोन उपरांतिक गेलो येसा अर्थ नाहीं. जुनरी असतांच वर्तमान कलले. तैसेच तजविजेने मोगलास पुसोन गुरुवारी स्वार होऊन चासेस आलों. तों

मार्गी चासेजवळच स्वामीचे पत्रही पावलें. जुनरचा मोगल फार श्रमी जाहला. मुल्याकडे सांड रवाना केली आहे तिचा जाब आल्यावर काय विचार होणे तो होईल. विषम तो फार जाले आहेत. सेवेसी (क)लावे म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*This is Krishnarao Mahadeo's letter to Chimaji Appa regarding some affair of Junnar.*

No. 8] *[8-11-1736 ?*

छ २१ रजब.

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. रामनगरकराची फौज जवार प्रांते आली होती ते फिरोन सर्देस आपले सिवेत गेली. देहरजे याचे मुकामी रामनगरकराचा मुकाम होता तेथे गुरुवारीं रात्रौ जवारकरानी छापा घातला, झुंज जाहले. रामनगरेयांही पिटून लाविलें. दोन च्यार माणूस याचे, दोन च्यार त्याचे जाया जाले. जवारकराकडील सरदार मानाजी सुरवे व सखोजी नटवे व गंगाजीराऊ जखमी जाले, याकरितां मोड होऊन जवारीस गेले. हे वर्तमान आजि प्रतिपदा सोमवारी प्रातःकालीं कोहिजेहून पत्रे आली त्याजवरून लिा असे. बहुत काय लिहिणे, लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*A fight is reported to the Peshwa between Ramnagar and Jawhar.*

√*No. 9*] *[18-12-1738 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे साो

सेवक विठल विस्वनाथ साा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ १७ रमजानपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. पूर्वी पत्र लिहिलें आहे त्यावरून सविस्तर कलो येईल. साप्रत आज्ञेप्रमाणे राजश्री गोपालमामा सेवेसी आले आहेत, इकडील सविस्तर वर्तमान सेवेसी निवेदन करितील त्यावरून कलो येईल. इकडील वर्तमान तर जवारकरानी रामनगरची बहुत खराबी केली. हली जाऊन गभीरगड खाली राहिले आहेत. तेथील मामला जवारकराचे पाई

6841

बुडाली या गोष्टीचे पारपत्य करणार स्वामी समर्थ आहेत. व खडोजी खांडे स्वामीकडे रवाना करितो. ते काही सरजामासाठीं गुतले आहेत लवकरीच येतील. व हिरोजी चौधरी रामनगराहून आलियावर त्यासीहि रवाना करितों. मागे पत्रें लिा आहेत त्याचे सविस्तर वृत चितात आणून त्याचे उतर पाठविले पाहिजे. तर जवारकराचे पारपत्य केल्यावाचून रामनगरचा टका वसूल होत नाहीं. याउपर जे आज्ञा ते प्रमाण हे विनंती.

¶Vithal Vishwanath reports to Chimaji Appa a conflict between Jawhar and Ramnagar.

No. 10] [पौ *4-1-1739*?

पौ छ ४ सवाल.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना प्राा खलोड व प्राा पवडी इकडील गावें रामनगरकराकडे फिरग्याचे आमदानीत गेले होते. त्याजविर्सी सेवेसी विज्ञाप्ति लिहिली होती त्याजवरून स्वामीनी रामनगरकरास पत्र व सनद सादर जाली याजवरून रामनगरकराचे पत्र रामनगरकरास दिले. सनदेप्रमाणे अमल बसविला.

अमल हली बसला.

१ अवली बेहेट पाडे १२ पैकी ठिकाणी लागले.

१ मौजे अवली
१ मजरे चिरावे
१ मजरे रिटवली
१ मजरे कुडोच
१ मजरे मघवहाल
१ मजरे मसाट
१ मजरे साबरवर्णी
१ मजरे सेलवाचे
१ मजरे बधवले
―――
९

सनदेपैकी देह वोस.

१ कोसी बकुवा.
१ चेहल पोढे
१ बारी
―――
३

४ सनदेखेरीज देहे ठिकाणी लागले.

१ पाटी
१ धगडमाल
१ वेकास
१ बरोल.
―――
४
वैराण
―――
७

6842

३ तीन पाडे ठिकाणी लागत नाही

१२

१ साइली.

१ मौजे दादरे

१ मौजे वागक्षेप.

१२

१ मौजे हातसाल प्रा नेर इकडे लागली. अमलांत आली.

१३

१ मौजे कुरगांव सालापासून अमलांत आले असे.

नवे देह उमगले ४ हली वैराण परंतु याचे गावची सनद आणि च्यार खेरीज आणिखी तीन गावची सनद येकूण सात गावची सनद मोघम पा पाहिजे. तीन गाव उमगावेसे आहेत, याजकरितां सेवेसी लिहिले असे.

सदरहु नवे गांव येथील येवज रामनगरकरी याणी वसूल घेतला आहे तो येवज नेटून मागाहून लिहून पाठऊन. त्याजकडे येवज गेला आहे, याजविसी आज्ञा होईल, की तो येवज घेणे तर त्याचे गांव आहेत तेथे येवज मोबदला जेथपर्यंत होईल तेथपर्यंत करून ज्याप्रमाणें स्वामी आज्ञा करितील त्याजप्रमाणें वर्तणूक करून नवे गावचा वसूल भात १०८।१॥ दाहा खंडी साडे चार पाईली घेतले. नख्त २१५ दोनसे पंधरा रुो घेतले. पुढे वसूल जेथपर्यंत होईल तेथपर्यंत करून हे विज्ञाप्ति.

¶*Chimaji Appa is informed of the Peshwa's authority being established in the villages mentioned in the list. These had been under the Chief of Ramnagar during the Portuguese regime.*

√*No. 11*] [पाो *5-1-1739*

छ ९ सवाल

श्रीशंकरवरद

पुरवणी राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. जवार प्रांतीचा अंमल राजश्री पिलाजीराव याजकडे आहे. येशास तेथील मख्ता अडीच हजार रुपये घ्यावे यैसा आपणच रा यशवंतराव

पाबळचे मुकामी पलीकडील वर्षी दर्शनास आले तेव्हां तह केला. त्याप्रमाणें साल दरसाल त्याणी उगवणी केली, यंदा धामधुमीचे प्रसंगामुले मुलूक उद्वस जाला. तन्मुलें थोडीबहुत बाकी राहिली, याकरितां राजश्री पिलाजी जाधव फौजेनसी जवार प्रांती आले. त्यास जवारकराकडून राजश्री यशवंतराव आमचे दर्शनास आले. त्याची आमची भेट होऊन त्याणी कितेक स्वामीचे चरणासी येकनिष्ठतेच्या गोष्टी सांगितल्या. त्यावरून राजश्री पिलाजी जाधव यास लेहून त्याची आमची भेट होऊन परस्परे त्याचे त्याचे सौरस्य करून बाकीची विल्हे केली; आणि ते निघोन रामनगर प्रांते जाऊन दवण प्रांत फिरगाण हा मुलुक मारिला. सांप्रत त्या प्रांते आहेत त्यास जवारकराही मक्ताप्रमाणे उगवणी केली. परंतु मख्याखेरीज कांही तगादा लावितात. ऐशियास मक्तीयाची बोली स्वामी सनिधच जाली आहे. करार जाला त्याचे पत्रही स्वामीचे जवारकरापासी आहे आणि सर्वस्व स्वामीचे म्हणवितात. आपणाखेरीज दुसरा अविलंब नाहीं आणि पुरातन संस्थानिक याचे चालवावे हेच विहित आहे. तरी राजश्री पिलाजी जाधवराव यास पत्र पाठवावे कीं पहिला करार अडीचा हजाराचा जाला आहे त्याप्रमाणें पैका घेऊन जाजती उपसर्ग कोण्हेविसी न लावणें. येस युक्तीने लेहून जे गोष्टीने जवारकरास उपसर्ग न लागे ते केले पाहिजे. मुलूक उद्वस आहे आणि त्याचा वोढीचा प्रसंग यास्तव त्याची शरम राहे तो पदार्थ केला पाहिजें. बहुत काय लिहिणे. याची बाकी नवसे रुा बाकी राहिली आहे आषाढमासी घेतली पाहिजे म्हणून जाधवास लिहिले पाहिजे. याचा नातवानी प्रसंग आहे व राजश्री यशवंतराऊ यांणीं (फाटलें आहे) प्रकारे विपर्यास वाढला आहे. आपले पदरी पडणार प्रधानकी टाकिलीयास एक पत्र पाठवले पाहिजे. कबिला घेऊन येणार कललें पाहिजे. हे विनंती.

¶*A representation is made to the Peshwa asking his officer to keep his hands off the Jawhar prince, who is unable to meet the Maratha demand owing to general distress in his territory.*

/ No. 12] [6-5-1739 ?

छ ८ सफर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेशी. विज्ञापना तागायत छ ५ सफर सांप्रत किल्ले गंभीर. पत्र आले आहे कीं राजश्री रामदेराणा फत्तेपुरीं आहेत. वेडेपडोल्याचा फडनीस व अवंधचा फडनीस येऊन राजश्री कृष्णशा यैसे एकरूप

जाले आहेत. फत्तेपुरकर राणा याणी आवंधास जावे. जवारकरानीं किल्ले वाघेरा नावे मुल्क उध्द्वस करावा, म्हणजे गंभीरगडाखालील मुल्क उध्द्वस होईल. उभयेतांही जाण्याचे तरतुदीस म्हणून लिहून आले. त्याचा शोध मनास आणितां झाले गवस? जमावसुद्धा कोहजेखाले जाऊन राहिले. त्या चलल्यास जिकडे तिकडे फिरो लागले आहेत. मानजवारकर जवारकर व फत्तेपुरकरास कलले त्याजवरून भरून जागा सोडोन जाऊन पुढं मुलूक वैरान करणार उध्द्वस जाल्यावरी सारे कोली एकत्र होऊन करावया वा विचार दिसोन येतो. त्यास सेवा किल्ले गंभीरगड येथील बंदोबस्त करणें तसा केलाच आहे. अद्यापि फत्तेपुरकर व जवारकर आपली स्थले टाकून गेलेच तरी आपले किल्याखालील बंदोबस्त उत्तम असला पाहिजे. हशमी माणूस व फौज रवाना करावी लागते. यास्तव स्वामीनी कृपाळु होऊन फौजेची रवानगी करावी. येथें हशमी राऊत मनवराकडील वगैरे होते, रवाना केले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News about the Gambhirgad and the Koli Chief of Jawhar is communicated to the Peshwa.*

✓ *No. 13*] [*May 1739?*

श्री

सेवेसी विनंती. पुढें कुरंग द्यावी आणि भास्कर सोडवावा हें आमचें वचन घेतलें. भास्करगड गेला तेव्हां राज्यच बुडालें. जवारींत जीव नाहीं व घेरा भोपतगड व बलवंतगडही मेटादाखल असते. लटका खर्च कशास पाहिजे? जवारकरात अर्थ नाहीं. स्वमीनी प्रतिपाल याचा केला. राणीनें कन्या म्हणविले आणि भास्करगड द्रव्य घेऊन देऊं केला. नव हजार तीस पावले. परंतु हे राज्यास कलतां न ये यैसें आहे. पुढें राहिले ते द्यावे लागतात. आम्ही क्रिया परस्पर मान्य केले ते अन्यथा करितां नये. बावाखान कुरंगेचा त्यास राणीनें शंभर रुपये खर्चास पाठविले तिजला रजावंद आहे यैसे ती सांगते. परंतु विस्वास येत नाहीं. राज्यास तों रजावंद नाहीं. राज्यास आम्ही सांगितलें कीं वेढा उठविला तरी मोगलास देतों. राणी तों बोलीप्रमाणें वेढा उठवा म्हणजे आम्ही तीस उत्तर देतों कीं लगामी कुरगडी जावें लागली तरी मग हुजूर विनंती लेहोन उठऊन. राणीची आमची पहिली बोली कीं भास्कर देतें कुरग सोडा यैसे आहे. स्वमीचे आज्ञेविना वेढा उठवीत नाहीं व भास्करगडासाठीं बलकवडे याणी पत्र सेवेसी लिहिलें. परंतु आम्ही विठलपंताचे स्वाधीन केला. पुढें हेच यांस पुरवतील व दुसरें स्थळ त्याचे येथें येणार. बोली आमचे विद्यमानें जाली. ते स्थळ येतच आहे. त्यास तनखाहि होईल हे विज्ञापना.

¶*The affairs of the queen of Jawhar and Bhaskargad are mentioned in this letter by Shankaraji Keshav.*

6845

No. 14] [27-5-1739

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजी
पंत आपा स्वमीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव सां। नमस्कार विनंती येथील कुशल जेष्ट शुद्ध प्रतिपदा मुा। का। वाडे प्रांत जवार जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन घाटाखाले आलियावरी जवारकरास भय प्रदर्शन होऊन को। वाडे येथील मुकामास रा। जिवाजी हरि सबनीस पाठऊन बाकीची वाइदेबंदी करून तह केला. पुढें रामनगरास गुदस्ताची बाकी व साल मजकुरचा मल्ता व जकात हा कालपर्येत तैसीच आहे. त्याची विल्हे करावयासी तेथपर्यंत गेले म्हणजे तेहि भयप्रदर्शने विल्हे करितिल या विचारें जावें. यैशास पेसजी स्वमीनी कल्याणाहून रा। विठल सिवदेऊ याजबरोबर राऊत होते त्यास आज्ञा केली. त्याजवर ते राजश्री विठलपंत याजपासी कोहजेस येऊन बैठा रोजमुरा पंधरा दिवस घेऊन कौल रयतेस दिले होते, त्याचीच वस्तभाव चिरगुटपावरूणें घेतली. याखेरीज राजश्री जिवाजी हरि सबनीस याची सासू का। वाडे येथून कोहजेस जात होती तिजला मार्गी लुटलें. रोख रु॥ ३०० तीनसे व भाडे चिरगुट पावरूण घेतले. त्याची याद अलाहिदा पाठविली असे त्यावरून विदित होईल. आम्ही वैशाख वद्य अमवाशा का। वाडे येथे आलों ते दिवसी राजश्री विठलपंत रा। विठल सिवदेऊ यांस रोजमुरा दिला. दुसरे दिवसी जेष्ट शुद्ध प्रतिपदा जवारकरास भयप्रदर्शन व्हावे, याजकारितां कहीस आज्ञा करून दाणे मात्र घेणे म्हणून कही पाठविली. त्याजबरोबर रा। विठल सिवदेऊ यांसहि सांगोन पाठविले जे आज कहीचा विचार आहे. रोजमुरा कोणास देत नाहीं. तुम्ही कही करणें. त्याजवरून त्यानीं राऊत पाठविणें ते तों पाठविलेच, परंतु तोंडीमात्र राऊत पाठवीत नाहीं, रोजमुरा देणें, नाहीं तरी उठोन जाऊन. यैशास अवघियास रोजमुरा दिल्हा नाहीं. ऐसे असोन यासच कही करून रोजमुरा द्यावा कीं काय? अवघियाचे वर्तणुकेप्रा। वर्तत नाहीं. रुसवा करून स्वामीकडे आले आहेत. त्याचा आमचा समंध येका दिवसाचा हा अर्थ स्वामीस कलावे. जेष्ट शुद्ध द्वितीयेस जवारकराचा तह जाला ते दिवसी चौ रोजा रोजमुरा अवघीयास दिल्हा, त्याप्रमाणें त्यास देत होतो, तो न घेतां उठोन गेले. सर्व कुचित विठल सिवदेऊ याचे आहे. कार्याचे समई रुसवा करून गेले, याजकरिता याचें पारपत्य करावयासी स्वामी वडील आहेत. बहुत काये लिहणें कृपा आसो दीजे हे विज्ञापना.

¶*Krishnarao Mahadeo informs that the Jawhar Raja has been coerced to pay the tribute. He also explains the mischief Vithal Shivdeo was playing.*

6846

No. 15] [27-5-1739 ?

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी स्वामीनी पेसजी कल्याणाहून राऊत दिल्हे ते रा। विठल सिवदेऊ हे समागमे राऊत १४० घेऊन आले. यैशास आम्ही आजी जेष्ठ शुद्ध प्रतिपद का। वाडे येथील मुकाम करून जवारकराकडे यैवज येणें त्याचा तह केला. पुढें रामनगरास जावें लागेंत. यैशास रा। विठल सिवदेऊ याजबराबरील राउतास रोजमुरीयाचा अर्थ ढमढरे, धायभोर, आपा माणकेस्वर वगैरे पथके आम्हासमागमे दिली त्यास रोजमुरा देतों. त्याप्रमाणें विठल सिवदेऊ याजला स्वामीनी नेमणूक करून दिल्ही आहे त्याप्रमाणें देतो. परंतु त्याचे मनास येत नाहीं. जे दिवसी कही जाते ते दिवसी अवघियास रोजमुरा देत नाहीं, त्याप्रमाणें यास देत नाहीं. आणि विठल सिवदेव याजकडील राऊतास द्यावा कीं काय? त्यास लूट जाली तर रुा। मागतात. याजकारिता रुसवा करून सेवेसी आले आहेत. आम्हास तो रामनगरास जाऊन त्याजकडील बाकी उगविली पाहिजे. स्वामीनी बराबर राऊत दिल्हे याची याद व रोजमुऱ्याची याद पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. विठल सिवदेऊ राजश्री विठलपंत याजपासी आगोधर पंधरा दिवस येऊ(न) बैठा रोजमुरा घेतला आणि ज्या गावास कौल होते त्या गावी कितेक उपद्रव केला. वस्तभाव रयतीचें व चिरगुटपाघरून नेलें. यावेगले राजश्री जिवाजी प्रभु सबनीस याची सासू का। वाडे येथून कोहजेस जात असता तिजला लुटलें. त्याचा वस्तभाव व रोख रुा। ३०० घेतले. त्याची याद अलाहिदा पाठविली असे. याजवरून विदित होईल. कोहज परगणियाचे बैल घेऊन गेले. सर्व कुचोद विठल सिवदेऊ याचे. राउतास फिताऊन नेले. याजउपरी विठल सिवदेऊ याचें पारपत्य करीत नाहीं, तरी आम्ही स्वामीची सेवा करीत नाहीं. कोहज किला व मामला स्वामीनी आटोपिला पाहिजे. आम्हांजवळ जे सामान राहिले आहे ते घेऊन जाऊन जे होईल ते सेवेसी लिहून पाठऊन हे विनंती.

¶Krishnarao Mahadeo makes a complaint to the Peshwa against Vithal Shivdeo and his detachment accompanying the writer to Ramnagar. Vithal Shivdeo, he says, demands payment for his contingent even when it was sent out on foraging expeditions.

No. 16] [28-6-1739 ?

छ ८ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २ रबिलाखर मुकाम बाहादूरपुरा स्वामीचे पुण्यप्रतापे सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. कोहज मामला राजश्री पंताजीपंत यास आहे. त्यास सालमारी कोणी ग्रहस्त जाजती कबुलात करून मामला स्वामी सांगतात म्हणून आइकिलें, येसीयासी पंताजी मोरेश्वर हे ग्रहस्त भले आहेत आणि स्वामिकार्याचे सेवक येकनिष्ट इतबारी आहेत आणि त्यांणी आजि दोन तीन वर्षे मामलाही चांगला राखोन कस्त मेहनतही चांगलीच केली आहे व असरीच्या वेढ्यासही मेहनत बरी केली, स्वामीसही विदित आहे. येसियासी त्यांचा मामला स्वामीनी काढून दुसरियास सांगावा असे नाहीं आणि याप्रमाणें दुसरा विश्वासें वर्तेल ऐसे नाहीं. मारनिलेचा मामला काढावा हे गोष्ट स्वामीनी न करावी. दुसरा मामलेदार येईल त्यास मशारनिलेप्रमाणें पोटाग(स) लागोन जहाज फरमास व स्वामिकार्याची तिडीक लागणार नाहीं. यामुलें आमचे साहित्य होणार नाहीं. स्वामिकार्यास अंतर पडेल. स्वामीपावेतो बोभाट येईल याकरितां सेवेसी लिहिले असे. त्याचे हाथे रामनगरकर हाथी धरून घेणे. प्रांतीचे कोळी व येक बनसाव्याचे राजकारण आणिले आहे त्याजकडून राजश्री गोपाल माहादेव जमावनसी भवानीगडास रात्र दिवस काम करितात. दाटून चालल्या कामास अंतर पडेसे न करावें. मारनिलेचा मामला त्याचा त्याजकडे ठेवणार स्वामी धणी आहेत. टकमकीखाली पचवीस गाव मनोरचे आहेत, त्याजवरी आमची सर्वस्त्र वेठ बेगार चालते. येक आटगाव तर्फे पाठीमागची गेली, हेही गांव इजारा करणार, तेव्हां आम्हांस कशास (फाटलें * *) ठेविले. स्वामीनी टकमकीचे गांव आमचे आम्हाकडेस असो द्यावे दुसरियास न द्यावे हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav reports to Chimaji Appa his views about the settlement of the northern districts and of the troubles caused therein by the Kolis.*

6848

No. 17] [14-8-1739

छ १९ जालोवल.

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजीपंत

आपा स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव सां नमस्कार विनंती येथील कुषल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे. यानंतर रामनगरकरानी आम्हांसी दंगा करून अमलास खलेल केले. तिळतुल्य अमल चालेनासारिखा जाला. याकरितां सेवगा किला रामनगरकराचा आम्ही घेतला. येसीयास किल्याखाली त्याचा वेढा येऊन बैसला आहे. निमित्य किल्याचे कुमकेबद्दल. खासा आम्ही स्वार होऊन गेलो. स्वामीस कलावे याकरितां लिहिलें असे. बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे. त्याणी दाटी केली तरी कुमक उपराला करावयास स्वामी समर्थ आहेत. हे विनंती.

¶*Krishnarao Mahadeo informs Chimaji Appa that he had to proceed in person against the prince of Ramnagar for establishing his authority.*

No. 18] [1739 ?

श्री

राजश्री रघुनाथजी प्रभु

गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो विक्रम पतंगराऊ राजे जवार विनंती विशेष. येथील कुशल जाणोन स्वकुषल सर्वदां लेखन करणे. यानंतर श्रीमंत राजश्री आपाचे सेवेसी रा नानाजीपंत मजकूर पाठविले आहेत. गोसावीहि प्रसंगी आहेत. आपलेविसी साह्यता सर्वथ्वे करतीलच. विशेष लिहिणे नलगे. कृपावृधि करीत जाणे हे विनंती.

¶*Vikram Patangrao, the Raja of Jawhar, writes to Raghunathji Prabhu, the minister of the Angrias, that one Nanajipant has been sent to meet Chimaji Appa.*

No. 19] [1739 ?

श्री

राजश्री चितामणाजीपंत आपा

गोसावी यांसी

॥ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रति माहाराज राजश्री राऊळ रामदेवराणा राजे प्रांत रामनगर कृतानेक दंडवत येथील कुशल श्रीकृपेने

6849

व आपले दयेने परिसोन स्वकीये कुशल सर्वदा लिहीत गेले पाहिजे. विशेष बहुत दिनावधि कर्मोन गेली. प्रेशणपत्रीं सांभाल केला नाहीं. तरी आपणास गोसावीयांनीं परकीये येसे मनाचेठाई विचारिलें न पाहिजे. सदेव पदरीचे जाणोन गौर करीत गेले पाहिजे. यानंतर राजश्री शंकराजी केशव यांजजवळ वसईस रा। क्रियाराम प्रधान व रा। वासुदेवजी प्रभु पाठविले होते. त्यास तेथें करार जाला कीं रा। सटवाजी जाधवराव त्यांजवल रा। रायाजी शंकर प्रभु पाठवीत आहों म्हणोन तुमची फौज यांजवल पाठविणे. हे वर्तमान प्रधान माईले आपणाजवल आलियावरी विदित होतांच राजश्री सटवाजी जाधवराव व राजश्री रायाजी शंकर आनपे (?) राजश्री भायजी प्रभु व रा। वासुदेवजी रवाना केले. गोसावी यांसी कलावें. वरचील प्रांत मजकूर फौजेचे अमदरफ्तमुळें खराब जाला. प्रत्यहीं लश्करचे लोक मुलकांत कही करावयास येतात म्हणोन लश्करचे सरदार यांसी ताकीदपत्र पाठविलें पाहिजे, की मुलकास कोण्हे गोष्टीनें उपद्रव न देत. आपण सर्वस्वें गोसावी यांचे पदरीचे आहों. वडीलपणें गौर करीत गेले पाहिजे. कृपालोभ असो देणें हे विनंती.

¶Ramdeo Rana of Ramnagar informs Chimaji Appa that he sent his contingents to fight under Shankaraji Keshav and requests the addressee to preserve his district from further molestation at the hands of Maratha soldiers marching towards Bassein

---

No. 20] *[1739?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधाने

स्वामीचे सेवेसी

पोष्य कृष्णराऊ माहादेऊ सां। नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविले तेथें आज्ञा कीं लोकांस रुपये देविले आहेत ते आधी पावणे व पनाल्याचे मसलतीचे लोक लौकर पाठवणे. येशास पैकीयाची बोली आपणाजवळ करून आलो, त्यावर वरातदा जे आले त्याचे पदरीं येवज घालून कबजे घेतली आहेत. कोण्हाचा पैसा राहिल आहे येसे नाहीं. लोकाचेविसी लिा। त्यासही पुण्यास येताच चहूकडे माणसे पाठविली आहेत, परंतु सांप्रत या मुलकांत ज्वराचा उपद्रव बहुतच जाला आहे. घरोघर कोण्ही मनुष्य पाणी द्यावयास नाहीं. राजश्री सखोजी सिंदे यास तो व्यथा भारीच जाली आहे. वाचा देखील बंद जाली आहे. आयुशाची मर्यादा काय असेल ते नकले. कितेक मृत्यहि पावले. लोहगडी पाचसात मनुष्ये मेली.

ऐसा प्रलय जाला आहे. कोकणात तो या दिवसांत वर्शास व्यथा लोकास थोडथोडी होतच असते. त्यामध्यें हा संचार जाला यामुलें तो बहुतच श्रमी लोक जाले. तेलभाते जनावरे खातात. भूमिवर पडोन जाया होतात त्यास आटोपायास कोण्ही नाहीं. आमचे घरी मुले लेकरे आदिकरून व्यथस्त पडिली आहेत. कल्याणी मातुश्रीबाईस बरे वाटत नाहीं. जानकीबाई रामचंद्रपंताची स्त्रीस तो अत्यावस्त वेथा. दशमीस प्रातःकालीं भुईवर उतरली, येसे पत्र आले. बाईसहि व्यथा, यास्तव सर्व काम टाकून आजी द्वादशीस प्रातःकालीं स्वार होऊन कल्याणास गेलों. पुढें श्री काय करील ते पाहावें. लोकाकडे माणसे पाठविली आहेत. सुस्ती केली येसे नाहीं. परंतु दुखण्यामुलें दिसगत लागेल यास्तव लिा आहे. जो जमाव तयार होईल तो वरीचेवर पाठऊन देतो. आणि श्रीने जानकीस कल्याणरूप रक्षिल्या आम्हीही लौकरीच लोहगडी येऊन. बहुत काय लिहिणे. येथें पनासा माणसाचा सरदार सकरोजी जाधव आला तो च्यार घटकांत जर येऊन मेला. कोणी माणूस बाहीर पडत नाहीं. सकाजी मईटी येक दोन दिवसाचे सोबती आहेत. आपल्यास आज तीन दिवस जर फार येतो. बाईस व जानकीस वेथा फार भारी, यास्तव आपण टाकोटाक अजि द्वादसीस प्रातःकालीं कल्याणास गेलो. नेमणुकप्रमाणे येवज लोकांस पावता केला. काहीं बाकी राहिली नाहीं आणि लवकरीच फिरोन येतो. आपलियास तिकडे वीस दिवस लागतील इतकियात होईल ते नकले. वरकड इकडील अवस्ता पत्र ल्याहावी सारीखे नाहीं. पिपरखेडचे ताकीदपत्र चिमणाजी परशरामाचे लेकास पाहिजे. त्या गावाकड पाहावयास दरकार नाहीं येसे आगत्य पाहिजे. हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev reports to the Peshwa from Kalyan an outbreak of a virulent fever of which many were dying fast.*

No. 21] *[1739 May?*

श्री

सेवेसी विनंति राजश्री बचाजी रघुनाथ याजबरोबर दोनसे माणूस व गणपा उतेकर माधवराव खोपकर अंताजी मलहार व गंगाजी हरि पराव दिमत येसाजी हरपला हे होते. त्यास गंभीरगडचे तटास सातहात सिडी गडगा कोरा होता तेथें लाविली. सिडीखाली सदरहू सरदार व धारकरी लोक होते. त्यास हव्या सिडीवर चढोन गेला. तो हव्याचेच धक्यानें दगड लवंडला. तेणेकरून व वरचे लोक धावोन सारा गडगाच लोकावरी लोटीला, त्यामुलें माधवराव खोपकर व गण-

पाटील व गंगाजी हरि पराव अंताजी मलहार हे मातबार पुढें होते ते पंचवीस तीस या वली दगडीखाली मेले. वरकड तीस चालीस दगडीचे जखमी वरकड शाबूद येत आहेत अद्याप पुरता शोध नाहीं, परंतु चौघे सरदार दगडानें मेले. यैसे हेच स्वारीतून लोक आले त्याणी सांगितले. शोधास माणसे पाठविली असेत. व रामनगरा कोलीयानें पा। बन्हे येथील एक गांव लुटून नेला त्यास रामनगरकरास लिहिले कीं सावकाराचे कासीद मारिले, पैका नेला म्हणून हे कर्तव्य प्राप्त जाले. त्यास पुढें रामनगरकरास ठेचगा द्यावयाचे असले तरी तसीच आज्ञा करावी. स्वारहि आलेच आहेत. त्याचे पारपत्य करून कांहीं परगणे घ्यावे हा विचार पौष सरलियावर मग करावा याची आज्ञा करावी. आग्रह करून बचाजीनें लोक नेले. आम्ही न द्यावे तरी खावंदास सांगोन म्हणत होते. आमचे विचारे * * जाले फिरोन वरचेवरी न करावेसेच होते. सेवेसी विज्ञापना पथकाची रवानगी जाली.

¶*The disaster that occurred at the time of scaling the walls of Gambhirgad and to which a number of people fell victims is described in the letter. An incident between the Kolis and the chief of Ramnagar is mentioned.*

No. 22] *[1739?*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. रामनगरकरानी आम्हास पत्र पाठविले, तेथे लिहिले कीं आपले मुलकी वर्तमान कितेक राजश्री पंतप्रधान यापासी निवेदन करावे लागते, तरी येविसी त्याचे पत्र आले म्हणिजे भला माणूस पाठऊन सविस्तर वर्तमानं विदित करून. येविसी आपणासहि पत्र लिहिले आहे, तरी त्यास उतर लेहून दिल्हे पाहिजे. भला माणूस येऊन वर्तमान विदित करून जाईल. आम्हास पत्र लिहिले. होते त्याचे उत्तर आम्ही लेहून दिल्हे. विशेष काये लिहिणे कृपालोभ असो दीजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhav intimates to Chimaji the intention of the Ramnagar prince of sending an envoy to the Peshwa to acquaint him with his situation.*

No. 23 [27-3-1740.

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

सेवक कृष्णराव माहादेव सा। नमस्कार विनंती येथील कुशल चइत्र शुध येकादसी गुरुवार येथास्तित जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. येथे आमचे जागीरीचा मोबदला होत नाहीं यास्तव जागीरी ठेविली तरी स्वामीनी आमची जागीर न घ्यावी आणि तिकडे कोणी माणूस न पाठवावें. आमचे अमलांत खलेल न होय ते गोष्ट करावी. इतके असोन स्वामी चालीवर दृष्ट देऊन जागीर घेतील तर आपण इकडील इकडे जाऊन. येसें समजोन यांस साफ उत्तर ल्याहावें कीं आपण हे जागीर घेत नाहीं, याचा येवज दुसर माहाल देणे, यसे पष्ट लेहून पाठविने. स्वामी जागीर घेतील तर आपण इकडील इकडे वाराणसीस जाईन, मग स्वामीवर निमित्य येईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे. वडीलपणास उचित ते कीजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev protests to Chimaji Appa against his Jagir being confiscated.*

No. 24] [16-8-1740

श्री

यादी राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांचे तीर्थरूप बाजीराव पंडित प्रधान यांस पेशजी इनाम होता, त्यास ते मृत्य पावले. त्यांचे पुत्र पंडित मशारनिले यांस इनाम व वतने करार करून दिल्हे. छ ४ जमादिलाखर सन इहिदे अर्बैन रौद्रनाम संवछरे.

१ कसबे पाटणे पा। निंबाईत दरोबस्त.

१ मौजे सिरवल वैजी ता। चिपळूण दरोबस्त.

१ कसबें सासवड प्रा। पुणे मोगलाई तर्फेने इनाम देखील इनाम तिजाई जाहागीर फौजदारी सायरसुधा.

१ कसबे पुणे प्रांत मजकूर स्वराज्य मोगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई.

पा। जलगाव हा माहालदेखील इनाम तिजाई व सरदेशमुखी कुलबाब व कुलकानू हलीं पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार करून इनाम वंशपरंपरेने.

प्रा। कल्याण व पा। भिवंडी दोन सुभ्याची खालसा तर्फेकडील सरदेशमुखी वंशपरंपरेने वतन माहाल.

२

१ मौजे कठापूर संमत कोरेगांव
प्रांत वाई स्वराज्य व मोगलाई येकूण
दुतर्फी देखील इनाम तिजाई सरदेश-
मुखी व सावोत्रा कुलबाब कुलकानू

येकूण पांच गांव व येक परगणा इनाम व दोन माहालचे सरदेशमुखीचे वतन दफ्तर रुजू असे.

¶*A list of inams transferred to Balaji Bajirao after the death of his father Bajirao, is given in this paper.*

No. 25] [December 1740

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी. सेवक कासीराऊ सिवदेव सा। नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुषल लेखन करीत गेले पाहिजे. विशेष. राजश्री चिमाजी अपा यांसी देवाज्ञा जाली म्हणून वर्तमान यैकिलें त्यावरून चितास परमखेद जाला तो लिहितां पुरवत नाहीं. फार वाईट जालें. स्वामीस तो अतिशयेंसी दुःखाच्या रासी जाल्या, परंतु हे गोष्टीस उपाय नाहीं. ईस्वरी सत्ता प्रमाण. स्वामी सुज्ञ आहेत. खेद न करावा. विवेक करून खेद परिमार्जन केला पाहिजे. विशेष काय लिहिणे. कृपा असो दिल्ही पाहिजे. हे विनती.

¶*Kashirao Shivdev, in a wholly autograph letter, offers Peshwa Nanasaheb condolences on the death of Chimaji Appa.*

No. 26] [1740 ?

तेरीजे[१] जमा वसूल बाकी साल मजकूर १/११
माहाये हिंदुस्तान प्रांत मालवा स्वारी

राजश्री पंत प्रधान सु॥ आर्बैन	अज रुपये
नि॥ मल्हारजी होलकर वगैरे	२०१००७॥≡
प्रगणे सिरोज वगैरे	२६६४५९॥≡॥।
प्रगणे भूपाल	२२५५००
प्रगणे खेचीवाडा	६९८५३

१ तेरीज=An abstract account completed from other detailed accounts (Wilson).

प्रगणे कोलाबाग वगैरे	३७४४७॥≡।
सरकार शाहाबाद	११८८१९८=
प्रगणे भोवेरासे वगैरे	९३०७३।≡।
प्रगणे उदेपूर सरकारचे	१२४००८–॥
प्रगणे महतपूर सरकार	५३०१८–॥
प्रगणे खेमलासे	९७२६॥.
प्रगणे डागीवाडा	३७०२॥.
प्रगणे खुटावद सरकार	१५७९३॥–॥
माल तपे सुनैरा सरकार	१५५१॥–॥
प्रगणे गुन्हा तालुका	१४६०॥·
प्रगणे बुंदी	४९५००
	१००४५९७॥≡॥

यैन नख्त रुपये	घोडी रास	सा किमत
२०१००७॥≡	०	०
२६६४५९॥≡॥	०	०
२२५५००	०	०
६९८५३	०	०
३७४४७	०	०
११८१९८=	०	०
९३०७३।≡।	०	०
१२४००८–॥	०	०
५३०१८–॥	०	०
९७२६॥.	०	०
३७०२॥.	०	०
१५७९३॥–॥	०	०
१५५१॥·॥	०	०
१९६०॥·	२	५००
४९५००	०	०
१००४०९७॥≡॥	२	५००

¶*This is an abstract of receipts from Malwa.*

6855

No. 27] [18-3-1741 ?

पौ छ १६ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विनंती विज्ञापना ता। छ १२ मोहरमपावेतो ठाणे मजकूरचे व लोकाचे वर्तमान येथास्तित आसे विज्ञापना. छ ११ मोहरमी प्रहरे रात्रीस उरुनाहून कागद साबाजी तुकाजी याचा आला की, राजश्री संभाजी आंगरे अकसीच्या (बदरी) येऊन दाखल जाले म्हणोन रा। मानाजी आगरे यानी त्यासी लेहून पा। की तुम्ही पत्र दरशनी येणे. त्यावरून माारनिलेनी पत्र पाठविले तेथ लिहिल की, या प्रकारचा प्रसग आहे. श्रीमंत राजश्री आपा स्वामी प्रसगी नाही तरी तुम्ही कुमक करावी म्हणोन त्यानी लि।. त्यासी स्वामीस रा। मानाजी आगर याने लि। आसे. त्यासी सारे फिरगानचे नाक हुरून हा जागा त्याचे हस्तगत जाला म्हणजे काये चव नाही. त्यासी त्यानी लि। यैसे आसो(न) उपराला न करावा हे गो। उतमात नसे. याजकरिता संभर माणूस निशान करणबा। रा। कानोजी राजे देऊन पुढे हुरुणास रवाना केले. त्यासी हे जाऊन दाखल जाहाले म्हणजे आणिखीहि लोक मागाहून पाठवितो. या समयांत कोणी येक गो। जाहाली तरी जाहली. त्यासी राजश्री शंकराजीपतासहि लिहिले आहे की श्रीमंत राजश्री आपा स्वामीचीहि आज्ञा तुम्हास जी होती तिचा हा प्रसग आहे. तरी तुमचे जे अरमार आसेल तितके घेऊन तेथील बदोबस्त करून तुम्ही येणे. जाजा व जमाव पा। यैसे त्यासीहि पत्र देऊन कारकून पा। आसे. यैसेच राजश्री नारायेण जोसी यासीहि लिहिले आसे. * * * * * आहे. त्यासीहि कलवीयासी बलाविले आसे. तेहि येतील तरी स्वामीजवल जे लोक आसतील त्यासी पत्र (पा)वताच रवाना करावे. येथे भरणा थोडका आहे. लोकास ताकीद खरपूस करावी की, दाहे दिवसी जाऊन पोहचावे, यैसी आज्ञा करावी म्हणजे येऊन पोहचतील. हा समये येणार नाही. वरकड साविस्तर वर्तमान वासुदेव गोविद सेवेसी निवेदन करितील. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo communicates to the Peshwa the contents of a letter addressed by Manaji Angria to Sabaji Tukaji asking him to send him succour for the capture of Uran. He has accordingly—he says—sent some succour to him with a view to prevent Sambhaji Angria occupying it. The place, adds the writer has much strategic importance, and as such must not be lost.*

✓

No. 28] [19-6-1743

नकल.

श्रीशंकर

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ७० रुधिरोद्गारी नाम संवत्सरे आषाढ शुध दशमी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यें-धुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री बाबूराव सदाशिव यासीं आज्ञा केली यैसीजे. कर्नाटक प्रांत विज्यापूर प्रान्त भागानगर अहद तुंगभद्रा दक्षणतीर तहद रामेस्वर हरदु सुभ्याचा तालुका हुजूर खासगीकडे आहे तेथील चौथाई व सरदेशमुखीचा अमल तुमचे स्वाधीन करून पांच साले साल दरसाल रुपये ७००००० सात लक्ष प्रमाणे मुकरर केले आहेत. सन इसने व सन सलास दोन सालाचे रुपये १४००००० चौदा लक्ष व बाबत हवाला चंदावर रुपये ५००००० पांच लक्ष येकून रुपये रुा १९००००० येकुणीस लक्ष पेशजीचे या मामल्याचे माथां आहेत ते तुम्हीं मान्य केले. यास्तव तह करून दिल्हा बितपसील :—

पूर्वील बेरीज

७००००० सन इसने

७००००० सन सलास

५००००० बाा हवाला चंदावर

१९०००००

येकोणीस लक्षापैकी वसूल तुम्ही साल मज़कूर सन आर्बा आर्बैनात दिल्हा रुपये

१५०००० नख्त छ ७ जमादिलावल माा देवराव मेघशाम.

५००० तुम्हास बहुमान मोत्याचा तुरा दिल्हा त्याचे देविले रुपये

११४६५०० हवाला वोली दमाजी गायेकवाड याचे भाऊ जयसिंग व केदारजी गायेकवाड

१३०१५००

एकोणीस लक्षपैकी बाकी राहिले रुपये ५९८५०० पांच लक्ष साडे अठ्याणव हजार, त्यापैकीं चंदावरकरां-कडील वरातानी व रोख वसूल जाला आसेल तो सदरहू बेरजेत वजा पडतील. बाकी राहिला यैवज रुपये

सन अर्बा अर्बैनापासून तुम्हास मामला सांगितला. पूर्वील रुपये दोन सालाचे तुम्ही मान्य करून वसूल दिल्हा. यास्तव साल मजकुरापासून पुढील सालाचा यैवज चडते सालानी वसूल द्यावासा तह केला आहे त्या प्रा॥ साल दरसाल देत जाणे कलम १

6857

तेरा लक्ष दीड हजार. बाकी रुपये
५९८५०० पाच लक्ष अठ्यानव हजार
यो कलम १

येणेप्रा पूर्वील रुपयाचा व पुढे साल दरसाल हुजूरचा यैवज पावता करावयाचा तह करून दिल्हा आहे. तहाप्रा यैवज पावऊन मामल्याची बंदोबस्ती करून अमल करणे. स्वामीस सर्व प्रकारे तुमचा अभिमान आहे. वालमेल होणार नाही येविषीं आपले समाधान असो देणे. छ ७ जमादिलावल सन आर्बा आर्बैन. खास दस्तक. मामला कर्नाटक प्रांतचा तुमचे स्वाधीन केला आहे तर तहनामाप्रा बंदोबस्त करून हुजूरचा यैवज हुजूर तहाप्रो पोहचावणे. सेवा करून स्वामी संतोसी होई ते करणे. मामला करणे. बहुत काये लिहिणे ? सुज्ञ असा.

¶*King Shahu assigns the Mamlat of the Karnatak to Babuji Naik and fixes annual payments to be made to Government. The paper mentions that Karnatak was one of the King's personal estates.*

No. 29] [*27-11-1744*

नकल

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षिनाम संवत्सरे माघ शुध्द पंचमी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित आमात्य हुकमतपन्हा यासी आज्ञा केली यैशी जे. चिरंजीव राजश्री रामराजे बावडियास तुम्हाजवल आहेत म्हणोन तीर्थस्वरूप माहाराज मातुश्री काकीसाहेबानी स्वामीजवल सांगितले. त्याजवरून आम्ही राजश्री भगवंतराऊ नरहरि दफ्तरदार दिमत मजमू यास पाठविले. त्याणी तुमची भेट घेऊन चिरंजिवास पाहून आले. सकल अर्थ कलविला व त्यांस तुमचे बोलणे होऊन राजश्री सिवराम पंडित यास गुप्तरूप येथे तुम्ही पाठविले, त्यांस तीर्थस्वरूप मातुश्री साहेबांचे विद्यमाने राजश्री गोविंद खंडेराव चिटणिवीस याणी भेटऊन दोन तीन वेला त्यासी बोलणे ठरले, त्याप्रमाणे तुम्ही चिरंजिवास पानगावीं पाठऊन द्यावे. तिकडहि सूचनेस भगवंतराऊ यास पाठविले जातील. येथून तुम्हाकडे सिवराम पंडित यांसमागमे गोविंदरायास पाठवावे असे ठरले आहे. त्यास मागाहून गुप्तरूपे पाठविले जातील. भगवंतराऊ दफ्तरदार यास पानगावीहून नेहमी इकड व तुम्हाकड येण्याजाण्यास आज्ञा केली आहे. सिवराम पंडित याणी स्वामीसंनिध विनंती केली की आमचा जिल्हा व

6858

जातीचा सरंजाम व वतने व इनाम गाव व कुल यखत्यार लिहिण्याचा दरख पूर्वी चालत आल्याप्रमाणे चालविल जाईल याप्रमाणे स्वामीचे वचन जाले; परंतु आमचा जिल्हा प्रतिनिधीस स्वामीनीं दिल्हा व प्रधानपंताकड मोठे मोठे गाव गुंतले व दरखाचे लिहिणे ठाईठाई होते. माहादाजी गदाधर यास स्वामीनी मजमू सांगितली आहे. त्याणी दरख राखिला नाही. आम्ही पेशजी आलो ते समई स्वामीनी मजमू व छदोग आमात्यपद आम्हास देऊन ठेविले. इतकियात श्रीमंत राजश्री बाबासाहेबी येऊन स्वामीस विनंती केली, तेव्हा स्वामीनी त्याजपासून शेफत घेऊन त्याचे स्वाधीन केले. त्याप्रमाणे याणी पुन्हा आम्हास इकडे येऊ दिल्हे नाही; आसे पुढे जाले तरी आमचा सेवक लोकाचा परिणाम काये? त्याजवरून मातुश्री साहेबाचे पायावरी हात ठेऊन, श्रीबालकृष्णाजीच्या व श्री अंबाबाईची फुले तुलसी सिवराम पंडित याचे हाती दिल्ही, ती तुम्ही घेणे; व त्याचीहि शफत स्वामीनी घेतली आहे. व सिवरामपंताची स्त्री सौभागिवती दुर्गाबाई याणी रामराजे यास फारफार जपून सौरक्षण केले म्हणोन कलले, त्यास दुर्गाबाईस साडीचोलीबदल देशमुखीचे वतन स्वामीचे आहे ते तिजला इनाम करून देऊन चालविले जाईल. माहादाजी गदाधर याणी दरखाची उजरिसी राखिली नाही, याजमुले पायमली आहे तसे पुढे होणार नाहीं. स्वामीनी शफत-पूर्वक मशारनिलेजवल वचन दिल्हे आहे. तुम्ही कोण्हेविसी संशय न धरणे. तुमचे ऊर्जित स्वामी करितील. जाणीजे छ २ जिलकाद सुा खमस आर्बैन मया व अलफ मोर्तब असे.

¶*This important letter addressed by King Shahu to Bhagwantrao Amatya reveals an important fact that Ramraja who was under the kind protection of Shivarampant Amatya at Bawada, was removed to Pangaon by the orders of Shahu, which he issued in consultation with Tarabai and his principal officers. Shivaram Pandit and his wife Durgabai who nursed Ramraja in his childhood were, the paper mentions, rewarded with Inams and other gifts for their valuable services.*

No. 30] [*1746?*

श्री

बालकें जयाजी सिंदे साष्टांग दंडवत विनंती उपरी. येथील वर्तमान रा मल्हारजीबाबानी लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. जुंज जालें ते समई गोविंदराऊ सिंदे यांची घोडी व सेटिबा भोईटा जदीद याचा घोडा व आमृतराऊ याजकडील घोडी यैसी पडलीं. पागेचे दोन घोडे पडले. दोन जखमी

झाहाले. मालोजी भोंसले यांजकडील सयाजी पवार झुंझात कामास आले. आणखीहि लस्करांत घोडी दोन च्यार जखमी जाहालीं. बेलदार व कामाठे पाठऊन द्यावे. दाहावीस माणूसहि जखमी जाले. हे विनंती.

¶*Jayaji Sindia reports a fight and mentions the losses. This may possibly refer to the siege of Jaitpur. (See No. 39.)*

No. 31] *[15-12-1745*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
अंताजी नारायेण स्वामी गोसावी यांसी

पोष्य बालाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लिहीत जाणें विशेष. राजश्री त्रिंबकराऊ विस्वनाथ यांचे पुत्राचे लग्न आहे यास्तव जामदारखानापैकी बादली अगर पैठणी सनगे जरुरीस जी लागतील ती देविली असेत. देणे आणि मारनिलेचे नावे खर्च लिहिणे. जाणिजे रा। छ २ जिल्हेज सुा। सीत आर्बैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Peshwa Balajirao asks Antaji Narayan Phadnis to lend some valuable clothes from the Peshwa's stores to Trimbak Vishvanath Pethe who was performing the marriage of his son.*

No. 32] *[23-12-1745 ?*

छ २३ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. बिदनूरकराकडील वकील राजश्री नारोपंत नवाब आसफ-ज्याह यांजवल आहेत. तेथील खंडणीचे रुा। तीन लक्ष नवाबास द्यावयाचा करार केला. मध्यें बिदनूरकराने कांही संशय धरिला. याजकरितां नारोपंत येहीं आपला लेक बिदनुरास पाठविला होता तेथून केल्या कराराप्रमाणें द्यावयाचा बंदोबस्त करून आला. नवाबास येक पालखी चंदनाची बहुत उतम व दांडीहि तारफेची व दोन हती, त्यामध्यें येक मोठा व येक लाहान व पांच घोडे उतम याजमधे च्यार नवाबास व येक मीर महमद हुसेनखान दिवाणास व येक बिलोरी डबा, त्याजमध्यें सोनेरी रुपेरी लंवगा, जायफल, येक जायपत्री व येक जहाराची लकडी. ते उगाळून प्रासन केलें म्हणजे विष उतरतें. याप्रो नवाबांस छ १३

जिल्हेजी नजर केली. तीन लक्ष रुपयात येक लक्ष रुपये रोख दिले. दोन लक्ष रुपयांचा सावकारी निशा करून दिला. सावकार येका महिनेयानें पैका देणार. मीर मा। हुसेनखा म्हणतो की तूर्तच पैका देणें म्हणोन गर्गशा पडिला आहे. त्या गोष्टीचा निकाल जाला म्हणजे नारोपंत बिदनुरास जातील. स्वराज्यांतून बिदनूरचा तह करावा याआर्थें नारोपंत राजश्री तुकोपंताजवल येऊन बोलिले कीं पंतप्रतिनिधि यानी या गोष्टीचा बंदोबस्त करून द्यावयास करार करून आम्हास पत्र पाठविलें म्हणजे आम्ही सातारेयास येऊन त्यांचे विद्यमानें माहाराज स्वामीस भेटोन बंदोबस्त करून घेऊ. येविषई तुम्ही प्रतिनिधीस लेहून आम्हास पत्र आणवावें. त्याजवरून तुकोपंती मान्य करून पत्राविषई प्रतिनिधीस लेहून पाठविलें आहे. स्वामीस सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed how the Chief of Bednore satisfied the Nizam with choice presents and agreed to pay a tribute of three lacs annually.*

No. 33] [*31-12-1745*

छ २९ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेशी

कृतानेक विज्ञापना. नवाब आसफज्याह छ १७ मिनहूस कलबुरगे याचे वाडीहून कूच करून साडेपांच कोश भीमेच्या दक्षणतीरीं सरडगीचे मुकामास आले. पुढे सरसगर आठ कोश सोडून सुरापुराजवली जाणार. बेरडाचा मुलुक खराब करावा, हा हेत. किलीच नाईक देवदुर्गवाला याचा भाऊ लस्करास आला आहे; त्याची मुलाजमत हिदायेत मोहिदीनखान याचे मारिफतीने होणार. बहीरजी सलगरहि आठा कोशावर आला आहे, तोहि भेटीस येणार. बहीरजी पांढरा नासरजंगाकडे गेला म्हणोन सेवसी विनंतीपत्रीं लिहिलें होते. मनास आणितां सुपेयांत सासुरवाडीस आहे. नवाबानें हरकारे पाठऊन, सावनुराकडील वाट चोख करविली आहे. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. लस्करांत माहागाई बहुत जाली. दर रुपयास जिनस कणीक सा सेर, हरभरे साडे दाहा सेर, जोंधले सजगुरे सोला सेर याप्रा। पाड आहे. खुर्दा रुपयाचे छतीस पैसे आलमगीर आहेत. नवाबाचे स्वारीमुले मुलकाची खराबी बहुत होते. गावाच गाव सिवार लुटून पस्त करितात. काही हाल राहत नाही. सेवेसी

विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. नवाबाचा दरयेक जागां येक दोन रोज मुकाम जाला म्हणजे दिवाणाचे मारिफतीनें खलबतांत भेट होऊन आज्ञेप्रो वर्तमान विदित करून जाबसाल करून घेतों. स्वामीचे पुण्यप्रतापे स्वामीचे मनोदयानरूप कार्य होतच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh reports to the Peshwa the Nizam's move from Kalburga to Saradgi in the direction of Savanur.

No. 34] [*4-1-1746*

२२ जिल्हेज.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. छ २२ जिल्हेजी राजश्री अंताजी सिवदेव यांजकडून जासूदजोडी राजश्री तुकोपंताकडे पत्रें घेऊन आली. त्या पत्राचा मजकूर मारनिले यानीं सेवकाजवळ गुप्त रक्षिला. सेवकानें युक्तीनें तीं पत्रे हाताखालीं घालून त्यांतील मजकूर मनास आणितां लिा आहे कीं बाबूजी नाइकांस आमचे भेटीचा हेत होता. आम्हीं माइणीचे मुकामास आलों. नाईकहि त्याच मुकामास आले. परस्परें भेटी जाल्या. आम्ही त्यांचे डेऱ्यास गेलों. ते आमचे डेऱ्यास आले. परस्परें वस्त्रें जालीं. नाईक बोलिले कीं आमचा हेत आहे कीं तुम्ही आम्ही येक व्हावें. येनदा आमचे चितांत प्रथम नवाबासी गांठ घालावयाचे आहे. मग आम्हीं नवाबास मोडिले तऱ्हीं व नवाबाने आम्हास मोडिलें तऱ्हीं लौकीकच आहे. ऐसे असतां नवाब तहावर आला तर उतमच आहे. सुलतानजी निंबालकराचा व जानोजी निंबालकराचा व आपला येक विचार जाला आहे. येनदां नवाबासीं मुकाबला केलिया विरहित आम्हीं कर्नाटकांत जात नाहीं म्हणोन नाईक बोलिले. आमचे चितांत नाइकांस सामील व्हावयाचें आहे ; परंतु तुमचे विचारावर आहे. तर तेथील नवाबाची मर्जी कसी काय आहे ? नवाब कोण्हेकडे जाणार याचा विचार तपसीलवार लेहून पाठवणें म्हणोन पत्रांत मजकूर आहे; व सदासिव येमाजी यानी याच जोडीबराबर देवराव प्रातिनिधीकडील तुकोपंताअगोदर लस्करांत आला आहे, त्यास पत्र लिा होते ; त्या लखोट्यावर नाव तुकोपंताचे नाव होते. याजकरितां तुकोपंती लखोटा फोडला. त्या पत्रांत लिा आहे कीं कितेक संकेताच्या गोष्टी प्रधानपंतास कळों देऊं नयेत, म्हणोन तुम्ही लिा तर कळों देत नाहीं. तुमची पत्रे वरचे सातारियास पाठविली, त्याची उतरे तुम्हास येतील. वरकड पंत प्रतिनिधि व पेशवे येक जाले. उभयतांचे वकील येकत्र

6862

नवाबाकडे गेलेच आहेत, हे प्रसिद्ध आहे म्हणोन लिा आहे. मग कोणता मजकूर हें कलत नाहीं. देवराव वकील पुरेयांत राहात नाहीं. आबुल खैरखानाचे डेऱ्याजवल राहातो. वकीलपुरेयांत तुकोपंत आहेत. आढललें वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. तुकोपंती नवाबास वस्त्रे आणिली ती छ २२ मिनहूस नवाबास रुजू केलीं ; परंतु तुकोपंताखेरीज केली. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. वस्त्रें २ मंदिले जामवारे बादलाई २ दुपटा बादलाई २ व पटके गुजराथी २ व किनखाब येक याप्राो वस्त्रे आहेत. हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh reports to the Peshwa the secret correspondence between Babuji Naik and Antaji Shivdeo which the writer cleverly obtained. Babuji Naik therein represented to Antaji Shivdeo how greatly advantageous it would be for them to work in co-operation in the Karnatak and oppose the Nizam. Antaji Shivdeo, it may be well to remember, entered Karnatak on behalf of the Pratinidhi. Tukopant mentioned in the letter was the Pratinidhi's agent residing in the Nizam's Camp.

No. 35] *[Jan. 1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. सेवेसी विनंतपित्रे लिहीत असतां बाबूजी नाइकाकडील जासूद आढलला. त्याजवल वर्तमान मनास आणितां बोलिला कीं नाईक कातरखटावापुढें अलंद म्हणून गाव आहे ते जागां आहेत. समागमे च्यारेक हजार राऊत आहेत. आबाजी नाईक मागाहून दोन हजारांनसी येत आहेत. विरापा चहू हजारानसी येत आहेत. आपल्यास नाइकास सोडून आठ रोज जाहाले. नाइकांनी येंनदा च्यालीस पनास हजार फौज धरिली आहे. येकल्या विरापास तीन लाख रुा दिल्हे आहेत. इतके रोजांत मिरज दाखल जाले असतील म्हणौन बोलत होता. नाइकाकडील वकील माहादाजीपंत म्हणौन औरंगाबादचा राहणार ये जागां लस्करांत आहे म्हणौन सांगत होता. महादाजीपंत ये जागां दरबार रुजू आहे, परंतु दरबारी जात नाहीं. आढललें वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. मागाहून आढलल्याप्राो वर्तमाने सेवेसी विनंतीपत्रीं लेहून पाठवितों. सेवकास राव प्रतिनिधीचे कामाकरितां स्वामीनें राजश्री तुकोपंताबराबर पाठविलें, त्या आज्ञेप्रों राहावें लागते. राव

6863

प्रतिनिधिचिंहि येक पत्र सेवकास आले कीं तुम्ही तुकोपंत येक विचारें राहाणें; त्याप्राा त्यांचे समाधानें असलियानें स्वामीस संतोष असें जाणोन त्यांचे जवलच राहिलो आहों. सेवेसी विदित व्हावयाकहितां लिाा आहे. सेवक अज्ञान आहे. परावर्दा करणार व अपराधांची क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed of the progress of Babuji Naik's expedition into Karnatak, and his plans to overcome the Nizam.*

No. 36] *[17-2-1746?*

छ ७ रबिलोवल

श्रीशंकर

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामी
वडिलांचे सेवेसी

अपत्ये रघुनाथाने चरणावरी मस्तक ठेऊन साा नांा विाा येथील कुशल ताा फालगुन शुध अष्टमी इंदुवारपावेतो वडिलाच्या आसीर्वादेकरून सुखरूप असो विशेष. आज तीर्थरूपाचे कूच झालें. ते निंबास गेले. येवतेश्वरास जाऊन जाणार. उद्या वाईस जातीलसे वाटतें. बराबर फौज सात आठसे आहे. आम्हा-बराबर सोलासे सतरासे फौज ठेविली आहे. आम्हास उद्या प्रातःकाली मुकामास बलाविले आहे. वाईस न्यावयाचे तीर्थरूपाच्या चितात आहे. नेले तर पाहावे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Raghunathrao writes to Bhausaheb saying that Nanasaheb has left for Nimb and will thence proceed to Wai and that he (the writer) is likely to accompany him to that place.*

No. 37] *[28-3-1746*

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्र बावा
स्वामी गोसावी यासी

पोष्य विसाजी दादाजी नमस्कार विनंति. येथील कुशल ताा चैत्र वद्य २ मो काा सिरोंज जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेस. सविस्तर वर्तमान मातुश्री ताईच्या पत्री लिहिले आहे त्यावरून कलो येईल. श्रीमंताचे आज्ञेप्रमाणे येथे येऊन आठदाहा दिवस मुकाम करून राहिलो.

पुणाहून स्वार जाल्यापासून रा बापूजी महादेव याजकडे सात जोड्या कासिदाच्या रा केल्या अद्याप येकहि पत्राचे उतर नाही. काये मनसबा जाला आहे हे न कले. येथे कितीक दिवस मुकाम करावा! पुढे छत्रपुराकडे जावे तरी तिकडे धामधुमेचा प्रसंग जाला आहे. पुढे पर्जन्य समीप आला. दाहा हजार यात्रा समागमे मिळाली आहे. दिलीचे पत्र दस्तक न ये आणि गेले कासीद ते माघारे येत नाही. वकिलाचाहिं जाब येत नाही. पुढे काये करावे ते आज्ञा करावी. त्याप्रमाणे वर्तणूक करू. सिरोंजेस दस्तक व राऊत आणविले त्यांचा खोलंबा होईल, याजकरितां श्रीमंतानी उज्यनीवरून जाऊ दिल्हे नाही. हाली येथे येऊन बैसलो. आपणास कलावे याजकरितां लिहिले आहे. मातुश्रीस पायाच्या वेथेने फार बरे वाट(त) नाही; येक वेल श्रीदर्शन होये ते करावे! बहुत काय लिा कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Visaji Dadaji writes to the Peshwa that the party of Kashibai proceeding on pilgrimage has now swollen to ten thousand pilgrims. He bitterly complains of the difficulty of securing passports from Delhi.*

No. 38] *[29-4-1746*

श्री

श्रीमत राजश्री रामचंद्रबावा
स्वामी गोसावियासी

पोष्य विसाजी दादाजी नमस्कार विनंती येथील कुशल ताा वैशाख वद्य पंचमी जाणून स्वकीय लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री नारोपंतास फौजेसहित पाठविले आहेत हे कालपीच्या घाटाखेरीज दुसऱ्या घाटे उतम वाट काढून येमुना उतरून देतील म्हणून आज्ञा केली, त्याप्रमाणेच कालपीचा घाट सोडून भदेखच्या घाटास आलो. घाट उतम सापडला. पाई-उतारा सर्व यात्रा उतरली. या उपरी पुढे प्रयागास जातो. वरकड रा नारो-पंत आले याणी मातुश्री ताईची मर्जी उतम प्रकारे राखोन पाचसात दिवस उतम प्रकारे शेवा केली. हली मातुश्री ताईनी निरोप मारनिलेस देऊन तुम्हाकडे रवाना केले आहेत. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Visaji Dadaji writes to Ramachandra Baba communicating the safe arrival of the pilgrim party at the Jumna whence he says they will proceed to Allahabad.*

6865

No. 39] [7-6-1746

श्री

शेवेसी विज्ञापना जैतपुरास आलो तो आगोधर रा जयापा यानी मोर्चे लाविले होते. किलियातून येक दोन वेळा चांगले माणूस बाहेर निघोन सलाबत बरीच घातली. कहीकबाड बाहेर जाऊ पावत नव्हते. धान्याची महर्गाहि बहुत जाली. बुंधेले फौजसुधा जमा होऊन भोंवताले ठाणीठुणी मातबर तेथे जमाव करून लस्करावर अवाई करून फौज उठवावी हा इत्यर्थ होता, तों त्या समई आम्ही येऊन पोहचलों. सर्व वृत मनास आणून भोंवताले दोन च्यार जागे मातबर मातबर होते त्याजवर पथके रवाना करून मोडून ताराज केले. धान्याची समृध्य करून कहीकबाड मोकळे करून मोरचे कायेम केले. सुरंग लाऊन शह जबर पोहचाऊन रा जयाजी सिंदे याचे फौजेने व त्यानीहि जातीने मेहनत उतमच केली. स्वामीचा प्रताप थोर यामुले कार्यें सिध जाली. किला फते जाला. तेथे ठाणे ठेऊन कूच करून बुंधेले खासा होते तेथे येऊन गांठिले. जेर करून सिकस्त केले. अंनवीण सुजले तेव्हा तहास येऊन मातबर पांच पाठऊन तह केला. पंधरा लक्ष बाकी, येकवीस लक्ष साल हाल येकूण छेतीस लक्ष रुो करार जाले. चौथाईचा मुलूक सध्या तोटू न द्यावा, बोला सुकदेव व कृष्णसिंग व रायाराव जगतराज याजकडील व सभासिंगाकडील हौंसराज बक्षी आणकीहि येक दोन आसामी पाठऊन दिधल्या. दोघा राजियाचे लेकमात्र वोलेस येणे राहिले. त्यासी आणावयासी स्वार त्याचे आमचे रवाना केले होते, ते दोन्ही मुले आलियाउपरी कूच करावें यैसा करार होता. त्यासी त्याची पोटाविण विपत्यें बहुत जाली. खाश्यास मीठ मिलेनासे जाले. त्यानी सांगून पाठविले, परंतु आम्हापासून प्राप्त न जाले. आणखीं की निरोप आला की जे मातबर माणूस होते ते पाठऊन दिल्हे. मुलेहि दोचौ रोजानी येतात. आम्हीच येऊन तुम्हा सेजारी राहतो, मग काये चिंता आहे! तुमच्या करारा प्रा कार्यें विल्हेस लाऊन मग तुम्ही कूच करणे. आम्हीहि आज्ञा घेऊन जाऊन, परंतु आनाची मोकलीक करणे, बहुत विपत्ये जाली आहे. आम्हावर द्रिष्टी देणे. यैसी बहुत प्रकारे आजीजी केली, परतु राजश्री बावाचा कारभार येक बोढी, मूल तर अज्ञान न अयेकत. त्यांची माणसें पोटानिमित्यें लस्करात येत त्याची विपत्ये होये. जागा जागा लुटीत. आम्ही आग्रह करून करावें तरी कार्यें मोठे, निमिल्यास भ्यावें. करार जालियाउपरी त्याची विपत्ये होऊ लागली. मामला निर्गमास पंधरा रोज पाहिजेत. त्यासी परिछिन सांगून पाठविले की कुली गुंता उरकलियावर मग अनाची मोकलीक करून. दुसरे यैसेहि कोणी भये दाखविले

की वोडसीयाच्या राज्याप्रमाणे करणार. बरकंदाज मिळून तमाम पळो लागली तेव्हा त्याजलाहि विस्वास पुरेनासा जाला, तेव्हा पळोन गेले. पाठी लागून उंटे घोडी हती काही लूट जाली. पळोन आज्यागडी कालिजरावर गेले. मग सहजच राहणे जाले. छावणी करावीसी जाली. मग जागा जागा फौजा पथके रवाना करून मुळकास कौल देऊन लावणी करून तहसील चाली लावावीसे केले आहे, परतु पैका मातबर येणे. छेतीस हे व हाली साल यैसे मिळून कमजादा साठी येणे, अमल बसणे. बुधेले तों कालिजरापासी प्रस्तुत आहेत. प्रस्तुत हतवीर्यै जाले. पुढे कैसे करतील ते पाहावे. फिरून पूर्ववत प्रा विल्हेस लावावे या लागी आहेत, परतु आमची वासना जाजती करावे. होता होऊन येईल ते करून. शेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar reports to the Peshwa the capture of Jaitpur and th*
attitude of Jayappa and Ramchandra Baba.

No. 40] [3-3-175

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक तुबाजी अनंत सा। ना। विनंति सेवेसी प्रार्थना ऐसीजे ता। छ १२ जाखर मु॥ कुरा जाहानाबाद आंतरवेदी स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. बागलकोटचा मुकाम * * * स्वामीची पत्रे आली वर्तमान त्यागायेत * * * * त नाही. कालपीच्य तलावरून शेवसी * * पत्रे पाठविली ती पावली असतील. तेथून कूच तिसरे दिवसी श्री ब्रम्हावर्तास गंगातीरास गेलो. स्वामीचे कृपाकटाक्षे येथ * * * * तीर्थविध श्रीगंगास्नान चवदा दिव * जाहाले. तीर्थरू मातुश्री बाई व सर्वत्रानी संपादिला. इतकी दिवस राहावयास कारण आयुध्येच सुभियाचा व बलवंतसिंग कासीचा राजा याने चार्णाचा किला घेतला म्हणू चालोन दहापंधरा हजारानिसी कासीस आला. बलवंतसिग पलोन डोंगरी गेला मातबर लोक कासी टाकून गेले यामुळे तिकडे धुंद जाहाली. आम्ही पुढें जाऊ कोठे राहावे? हें जागा आपली चौकडे जाणून राहाणे जाहाले. मग नवाबा व प्रयागच्या सुभियास स्वामीची पत्रे होती ती पाठविली. सर्वेच मागती मातुश्र बाईच्या नावें कागद व राजश्री गोपालराऊ गणेश याकडील नारोपंत म्हणू गृहस्थ होता त्यास नवाबाकडे पाठविला. त्याणे मुलाजमत केली. पत्रे गुजरान

लियावरी प्रतिउतर व दखणिराये प्रयागच्या सुभियाचा दिवाण पाठविला त्याची पत्रें व वकिलाची पत्रे येताच, दुसरे दिवसी चिचेडीस आलो. तेथून * * करून छा मरी येथे आलो. उदईक मजल दरमजल प्रयागास जाऊ. बाा राा गोविंद बलाल राा गोपाळराव गणेश फौजेनिसी आहेत. त्यास प्रयागपावेतो घेऊन जाऊ. त्या विचारासारिखे प्रयागाहून त्यास * * समागमेच फौजेनिसी गंगापार होऊ * * * हरि विठल यासी कालपीहून ब्रम्हावर्तापावेतो आणिले होते त्यांचे लग्न होणें याकरितां ते निरोप घेऊन कालपीस गेले. पुढे जाणियाचे स्वामीचे पुन्य समर्थ आहे. कोणे गोष्टीची चिंता आहे येैसे नाही. अमचा वकील व दखणीराय आपले सरदेस प्रयागा आलेकडे आहे. कोसावर भेटीस येणार. स्वामीच्या पत्राची उतरे ते घेऊन येणार आहेत. भेटी होतील. सेवेंसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant writes to the Peshwa the programme of Sagunabai's pilgrimage describing incidentally a scuffle between Balvantsing of Benares and the Subhedar of Oudh—which he says was the reason why the party of pilgrims was detained at Brahmawart.*

No. 41] [*About July 1746*

श्री

पुाा श्रीमत राजश्री
नाना स्वामीचे शेवेसी

विज्ञापना सविस्तर वर्तमान तीर्थरूप मातुश्री ताईच्या पत्री लिहिले आहे त्यावरून विदित होईल. वरकड मातुश्री ताईच्या पायाची वेथा पहिली होती त्याप्रमाणेच आहे. दो रोजानी चहू रोजानी ज्वरहि थोडा बहुत येत असतो. मी त्यांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितो. वेदमूर्ति राजश्री दीक्षित नित्य येत असतात. दानधर्म करणें तो त्यांचे विचारे करितो, विदित जाले पाहिजे. स्वामीची आज्ञा वरच्यावरी येत्ये की ताईचे मर्जीप्रमाणे वर्तत जाणे. तरी मातुश्री ताईचे आज्ञेवितरिक्त दुसरी जोड कोणती आहे? मर्जीप्रमाणें वर्ततो. वरकड राा कृष्णाजी नाईक जोसी याची स्त्री सौभाग्यवती मातुश्री काकू याणी मजपासी निरोप सांगितला की श्रीमंतास माझा निरोप लिहोन पाठविणे की नाइकास आठ हाजाराचे व्याजाचे देऊ केले आहेत त्यापैकी मजला खर्चास खासगत पाचशे रुाये येथे पाठवावे. वरकड राहिले ते नाइकास द्यावे. मग पुढें मी त्याजवळ सांगेन. येणेप्रमाणें दोन च्यार वेळा त्याणी सांगितले. त्यावरून विनंती लिहिली आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This letter possibly from Visaji Dadaji gives details to the Peshwa about Kashibai's pilgrimage.*

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्र
बावास्वामी गोसावी यासी

पो विसाजी दादाजी कृतानेक नमस्कार विनंति. येथील कुशल ता। श्रावण शुध सप्तमी इंदुवार मु॥ श्री विश्वनाथनगरी जाणून स्वकीय कुशल वर्तमान लेखन करीत असावे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहालें. आपल्या लिहिल्याप्रमाणेंच वेदमूर्ति राजश्री नाना दीक्षितांचे आज्ञेवरून वर्तणूक करितो. येश्यास मातुश्री ताई येथे येताच त्यांस जागा राजमंदिरी राहावयास बलवंतसिंगाने करून दिल्हा. वरकड घोडी उंटास सिलेदारास वोस (ढ) काठांत जागा दिल्हा त्याप्रा॥ राहिलो. त्यास आठ रोजामध्यें सरकारची घोडी पांच चोराकडून बलवंतसिंगानीं नेविली. येविसी बलवंतसिंगास झट लाविले जे घोडी तलास करून सत्वर पाठऊन देणें. त्यावरून दोन घोडी मात्र दिल्ही. आणखी घोडी येणे त्याचा तलास करून पाठऊन देणे म्हणून सांगोन पाठविले यावरून घोडी चोरल्याचा लौकिक होऊन नांव बदु होते येसे बलवंतसिंगाने समजोन केल्या कर्माचे संपादणूक करून चाकरीची दानतदारी दाखवायाबदल मातुश्री ताईची नालीस मनसूरआलीखानास लेहून पाठविली जे, याचे समागमे फौज आहे त्या लोकाकडून शहरात लोकासी कजिया करितात. अमलाची वाट राहिली याविसी काये आज्ञा ? त्यावरून नवाबाने लेहून पाठविले जे गयेस जावयास बिदा करणें. हे वर्तमान रा॥ बापूजी महादेवास कलले. त्यास नवाबाकडे जाऊन आपण व कितेक मातबराकडून सांगोन पाहिले. त्याचे न आइकिले. तेव्हा फत्तशाहाकडून नवाबास सांगितले. उपरांतिक श्रावणमास राहून गयेस जावयाची बिदा करणे म्हणून बलवंतसिंगास परवाना दिल्हा तो व कासिदासमागमे तपसीलवार वर्तमान लेहून पाठऊन दिल्हे त्यावरून कितेक मजकूर रा॥ बापूजीपंतास लेहून पाठविला आहे. तोच मजकूर राजश्री सुभेदारास व राजश्री जयाजी सिंदे यांस मातुश्रीनीं तपसीलवार लेहून पाठविला आहे, तो मजकूर ध्यानास आणून काये तो विचार लेहून पाठवावा. येथे तो पाहातां अर्थेकडून कोणास काडीमात्र उपद्रव आमच्या लोकाकडून जाहाला नाहीं. मोठी गोष्टी नेलीली घोडी माघारी मागितली म्हणून लबाडी बलवंतसिगाने केली. त्याचे वर्तमान चित्तात आणून बंदोबस्त करून येथे राहाणे कार्तिक पौर्णिमापावेतो होये ते करणें. जे वर्तमान होईल ते आपणास ल्याहावे, मग त्याचा विचार कर्तव्य तो आपण करितील. श्रावण जालियावरी हा जा म्हणेल तेव्हा पुढे जावे तरी पर्जन्य बहुत. मार्ग चालत नाहीं. उंट न चालत,

पुढे जाणे कैसे होईल हेच संकट आहे. दिलीसहि रा॥ बापूजीपंतास लेहून पाठवि आहे. याचे उतर पाठवावे त्याप्रमाणें वर्तण करू. बहुत काये लि॥ कृपा अ दीजे हे विनंति.

रा॥ रघोजी भोसले कोठे आहेत ते लिहणे म्हणून लि॥ त्यास रघोजी भोसले नागपुरास वराडात गेले. हे विनंति.

¶*Visaji Dadaji describes to Ramchandra Baba how the party with Kashibai was received by Balvantsing of Benares, how he carried away their horses and how he misrepresented the matter to the Nawab. The writer asks the addressee to communicate all this to Jayaji Sindia and to request him to intercede for the party with the Wazir.*

No. 43] [*11-11-1746*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना प्रति राधाबाई आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ मार्गसीर्ष शुध १० मंगळवारपावेतो जाणून स्वकीय लेखन करीत जावे विशेष. पत्र पाठविले ते आज प्रात:काली पावोन लेखनार्थ अवगत जाहाला. त्याजवरून चिरंजीव सौभाग्यवती भिऊबाईकडे बारामतीस पत्र पाठविले आहे की सातारियास न जावे म्हणोन. वरकड पूर्णिमा जाहालियानंतर चिरंजीव उभयतांस सौभाग्यवती गोपिकेस सातारियास पाठवितो. यानंतर उभयता नाईक उपोशणे करितात, अत्याग्रहास प्रवर्तले आहेत, याविसी पूर्वीच पत्र पाठविले आहे. वारंवार ल्याहावेसे काये आहे ? जे गोष्टीने जीव वाचेत तो अर्थ केला पाहिजे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Radhabai asks Nanasaheb to intercede for and save the life of Abaji and Babuji Naik who have started fasting. She has asked Bhiubai not to proceed to Satara.*

No. 44] [*27-11-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंति सेवक गोविंद कृष्ण कृतानेक सा॥ ना॥ विज्ञापना. येथील क्षेम ता॥ कार्तिक वद्य नवमी जाणून लोकसह वर्तमान सेवकाचे वर्तमान यथास्तित असे विशेष. श्रीहून मातुश्री ताईसमागमे सेवा करीत मजल दरमजल गयेस गेलो. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Govind Krishna who accompanied Kashibai in her pilgrimage reports to the Peshwa their arrival at Gaya.*

No. 45] [Recd. 27-12-1745

पाा छ १४ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब नासरजंगाहीं नेवासे वैजापूरचे मजकुरात स्वामीचे सेवेसी पत्र लिा आहे. ते थैली येक व राजश्री धोंडो माहादेव यांची हवेली शहरांत आहे. ते नवाब आसफज्याह येही जलगाव जाबुतकर जमिदारांचे चुकलीवरून जप्त करविली. त्या मजकुरांत स्वामीने नासरजंगास लिा होते. सेवकानेहि जाबसाल करावयाचा केला. त्यावर बोलिले, की आम्ही लस्करास जातों तेथे गेलियावर या गोष्टीचा फैसला करून देतो. त्या मजकुरांत स्वामीचे पत्राचें उत्तर सेवेसी लिहिले आहे ते थेली येक येकूण दोन थैलिया अजूरदाराबराबर सेवेसी पाठविलिया आहेत प्रविष्ट होतील. सोमवंशी यांजकडील कर्जाचे मजकुराबाबत व सेवकाने नवाबास मजकूर विदित केले त्याजबाा नासरजंगांचीं खतें सेवकाजवल येऊन पावली म्हणजे मागाहून सेवेसी रवानगी करितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. शहरीं माहागाई बहुत जाली. सजगुरे रुपयाचे तेरा सेर व त्याचप्राो जोंधले हरभरे आहेत. गहू आठ सेर, तांदूळ सात सेर याप्राा आहे. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना. नवाब नासरजंगाबराबर स्वार येक हजार आहेत. बराबर येक तोफ शंभर बैलाची आहे व कांहीं बाणाचे उंट आहेत. खोजमकुलीखान व सेखअली जुनेदी समागमे आहेत. बकरीद जालियावर रहिमुलाखान याजखानाचे बेटे शहरीहून लस्करास जाणार आहेत. हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh writes to the Peshwa news from Nasarjang. He also writes on the subject of the debt being recovered from Somawanshi.*

No. 46] [15-1-1747 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना ताागायत छ १४ मोहरमपावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून येथील सेवकाचें व प्रांत मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. पेशजीं विनंतिपत्र फिरंगी फरासीस गोव्यास

---

१ पत्र रघुनाथ गणेशाचें.

तयार होऊन निवाला आहे म्हणून अजम जनराल मुंबईकर यांनी पत्र पाठविलें होतें व भिकम भट मुंबईकर याची सिबाड गोव्याहून आली तिचें तांडेलानें सांगितलें त्यावरून सेवेसीं लिहिलें होतें, त्यास सांप्रत आधिकोत्तर टोपीकराचें वर्तमान नाहीं. राजश्री रामचंद्र हरि येथें दीड हजार राउतानसीं आहेत. आणिखीं फौज स्वामी पाठवितील तर न पाठवावी व साष्टीस राजश्री लक्ष्युमण बलाल पांचसें राउतानसीं आहेतच. दुसरे फौजेचें अगत्य प्रस्तुत नाहीं. याजकरितां दुसरी फौज न पाठवावी सेवेसीं विज्ञापना.

¶Shankaraji Keshao writing from Bassein asks the Peshwa not to send more forces, as the Portuguese were not reported to be aggressive.

No. 47] [*About 1-1-1747*

श्री

पुा राजश्री रामचंद्र
बावा स्वामीं गोसावियासी

विनंति उपरी. नवाब अमीरखान मारल्याची खबर येथे आलियामुळे थोडीबहुत येथे जमीदाराची वगैरे गडबड जाली आहे. जोपर्यंत दिलीहून दुसरा सुभा अगर पहिल्याकडील करार होये तोवर काही गडबड व्हायासी राहाणार नाही. आनि शिवरात्रपर्येंत आमचा मुकाम येथे आहे. यात्रा बहुत समागमे आहे याजकरिता येमुनापार विसापंचविसा कोसावरी दोन हजार फौज ठेवावी म्हणजे इकडे काही गडबड जाली तरी येमुना येथेच उतरोन पार येऊ. यात आपल्या विचारास येईल तैसे करावे. सूचनार्थ लिहिले आसे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति+.

¶Ramchandra Baba is informed of the confusion created by the murder of Amirkhan and the general disorder in the Province and is requested to post a guard of two thousand near the Jumna so that the pilgrims can cross without molestation.

No. 48] [*28-1-1746*

श्री

श्रीमंत राजश्रीं पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाअवलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान ताा छ १६

+ अमीरखानाचा खून २५-१२-१७४६ रोजीं झाला, सबब पत्र अदमासे जानेवारी १७४७ मधील धरलें आहे.

माहे मोहरमपावेतों येथास्थित असे. नवाब आसफज्याह सदे जालियावरहि, च्यार रोज त्याच मुकामी होते. राजश्री बाबूजी नायकाकडील बालमुकुंद वकील येथे आहेत. त्यांचे बंधु नायकाजवलोन छ १४ मोहरमी लस्करास आले. त्यांनीं वर्तमान आणिले की नाईक इंदापुरास आले. तेथून पंढरपुरास येतील. अविलंबे नवाबांचे दर्शनास येणार. हे वर्तमान नवाबास कलली (यावर) नवाब येहीं कलबुरगेयाचे रुखे छ १५ मोहरमीं कूच करून च्यार कोश आले. आजहि कूच आहे. पुढें चारापाणी पाहोन आठ दाहा मुकाम करणार आहेत. छ १२ मोहरमी निजामअलीखान बाहादर असदजंग कूच करून रघूजी भोसले यांचे तंबीस रवाना जाले. त्याची स्वारी माहोरपर्यंत होईल. नवाबाही येथे समीपच काहीक दिवस मुकाम करून राहतील. बाबूजी नाईक यांचे मनोधारण करावें हे गोष्ट नवाब असफज्याहास अवश्यक आहे असें दिसतें. कारण हेच की थापडवाईक विचार, दिल्हे तितकेच घेतील. नवाब नासरजंगास शरिरी सावकाश नाही. जुलाब घेतला आहे तेहि श्रमीच आहेत. नवाबाने मीर मा। हुसैनखान दिवाण तगीर करून पूर्णचंदास दिवाणगिरी जाली. पराडे यांचा किलेदार तगीर केला व येक रिसालदार दोन हजार स्वारानसी पाठविला त्याणे अंबाडचे किल्हेयात राहावें म्हणौन आज्ञा केली आहे. राजश्री सुलतानजी निंबालकरास न(वा)बाने पैगाम केला कीं, आम्ही बीड, पाथरी तुम्हास दिली आहे यैशास प्रस्तुत वर्तमान आहे सदरहू दोनी परगणे हुजरून शाहजादेयास जागीर जाली आहे. असो येथें आमचा उपाय काय? आम्ही तुम्हांस दुसरी जागीर देऊ. नवाब नासरजंगाही त्यांचे समाधान केले कीं तुम्ही येक परगणा शाहजादेयास देणे व येक परगणा शाहजादेयाजवलोन तुम्हास इजारा देऊन म्हणौन. यैशास या मजकुरावरून राव मारनिले श्रमी आहेत. बोलिले कीं सदरहू जागीर तगीर जालियावर आम्ही नौकरीचा इस्तिफा देऊन. आम्हास गनिमाईकडे जाणे नाहीं. म्हणौन बोलिले. यैसा मजकूर जाला आहे. पुढे काय होईल ते पाहावे. हे वर्तमान पणीखान पठाणाचे वकील राजश्री गणेशपंत आहेत ते नवाबाचे दिवाणखानेयांत जात असतात त्यानीं सांगितलें. तें सेवसी विदित व्हावयाकरिता विनंती लिा आहे. सत्य मिथ्य कलत नाही. वरकड वर्तमान दरबारचें राजश्री बगाजीपंती सविस्तर सेवेसी विनंती लिा आहे त्याजवरून विदित होईल. सेवकास खर्चाविषई लस्करांत आबाल बहुत आहे तो मजकूर लिहितां येत नाही. स्वामीनें कृपालु होऊन खर्चाचे बेगमीची आज्ञा केली पाहिजे व चोपदाराचेहि रोजमरे याची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. नासरजंगाचे विचारें सेवकास हुजूर रवाना करावें असें आहे. नवाब आसफज्याहची मुलाजमतहि

करवणगर आहेत. ये जागां सेवकानें असावें असे नाहीं. राजश्री बगाजीपंत आहेतच. परंतु नासरजंगाचे आज्ञेप्रो यावें लागलें. पुढें स्वामी आज्ञा करितील तर यांची आज्ञा घेऊन सेवेसीं येतो. येविषई आज्ञा ते प्रमाण. खर्चाची सरंजामाची आज्ञा करावयास स्वामी धणी आहेत. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh, the Peshwa's Vakil at the court of Nasirjang, writes news about the movements of Nizamulmulk, Nizam Ali and Babuji Naik Joshi.*

No. 49] [About the end of January 1747

श्री

पुा राजश्री रामचंद्र बावा
स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी श्रीहून गयेस जाऊन यात्रा तीस चालीस हजार तेथे जम जाली. सर्वांचे गया वर्जन होऊन मजल दरमजल प्रयागास येतो. त्यास प्रस्तुत मातुश्री ताईनी विचार केला आहे की येक वर्षपर्यंत आपण श्रीमध्यें राहावे. तुम्हार कोणास राहाणे असेल तरी राहाणे, नाही तर जाणे यैसे म्हणतात. श्रीमंताचं आज्ञा तो तिरस्थली यात्रा करून यावे. सोला महिन्याची बेगमी करून दिली दुसरी गोस्ट श्रीचा अधिकारी आहे त्याची वर्तणूक तुम्हास ठाउकीच आहे श्रावणमासी लोकानी लबाडी करून लिहिले त्यावरून घालवीत होता. यैसे असोन श्रीमंताचीहि आज्ञा नाही. मातुश्रीस बहुता प्रकारे आम्ही सांगतो परंतु चित्तात काहीं येत नाही. खावंदासी बळ किती चालेल हे आपणास कलत आहे. इलाज करून प्रयागपावेतो आली तरी घेऊन येतो. पुढे तेथून देशार येतीलसे दिस(त) नाही. जर करिता आतिशये करून जाऊ लागली तरी याच विचार काये करावा? आम्ही तो येकटे समागमे, ती जातील तेथे जाऊ. त्याण इजत कैसी राहात्ये? हा विचार श्रमिंतास लेहून तेथून जाब आणावा तरी दूरपं तुम्ही त्याचे जागा आहा. याचा विचार ठीक करून लेहून पाठवणे. आम्ह व राा कृष्णराव देखील सांगतो. परंतु ती गोष्ट ध्यानास येत नाही. श्रीमध्यें राहाणे तरी मनसुर अलीखानाचे सल्लखाखेरीज राहाणे कैसे होईल? तुम्हास सवि स्तर कलोन ज्याप्राा त्याहाल त्याप्रमाणे वर्तणूक करू. उत्तर मुजरद जोडी समागमे पाठवावे. बहुत काय लिाा कृाा लोाा असो दीजे हे विनंति. याचे उत्तर प्रयागी अगत्य पाठवावे. हे विनंति.

¶*Ramchandra Baba is informed of the unwillingness of Kashibai to retur home from Prayag, the holy place of the Hindus, and is asked how t persuade her.*

6874

No. 50] [5-2-1747

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्र
बावा स्वामी गोसावी यांसी

पो विसाजी दादाजी नमस्कार विनंति. येथील कुशल फाल्गुन शुध ७ मुा श्रीवेणींत जाणून स्वकीय लिहीत गेले पाहिजे विशेष. पूर्वी आपण पत्रें आम्हास व मातुश्री ताईस पाठविली ती प्रविष्ट जाली. सर्व वाचून दाखविली, परंतु काही विवेक करून कूच करावयाचे न करिति. नाना प्रकारे उपाये होते ते केले. तुमची पत्रे व दिलीहून राजश्री बापूजी माहादेव याची पत्रे आली ती व श्रीमंताची वरच्यावरी येतात की सत्वर येणे तीहि दाखविली. त्यावरूनहि काही विचार न होये. तेव्हा रा कृष्णराव याणी अतिशये केला की तुम्ही जर येमुना उतरत नाहीं तरी आपण वेणीत जीव देतो येसे म्हणून डेऱ्यातून निघोन गंगातीरी गेले. समागमे स्त्रीस घेऊन गेले. तेव्हां आम्ही बहुताप्रकारे सांगोन याच्या डेऱ्याजवल मातुश्रीस नेऊन त्यास राहाऊन निदानी इतकाच विचार केला की तुम्ही येमुना उतरून कालपीच्या घाटास चला. तेथे राजश्री मल्हारराव व रा जयापा व रा बावा आहेत ते सांगतील तैसा विचार करावा. इतके ठराऊन येथून कूच करावेसे जाले आहे. उद्या कूच करून पुढे येणार, परंतु विश्वास येत नाही. घडीघडी विचार नवेच होतात. ये सोबतीने यावयाचे आम्ही कबूल करीत नवतो त्यास बहुताप्रकारे श्रीमंतानी सांगोन समागमे लावून दिल्हे. आजीपावेतो तिरस्थली यात्रा उत्तम प्रकारे सर्वांची जाली, याउपरी हे विघ्न निर्माण जाले. आम्ही गरीब माणूस हे तो संकट येऊन पडिले. जर तुम्हापावेतो पावेसे केले आहे हे घडोन आले म्हणजे पुढे आपण विचार कर्णे तो करतील. आपणहि कालपीच्या जवलपास असतील तो येथून केल्या कराराप्रो निभाव जाला तर आठा दिवसी कालपीस येतो. आपणास वर्तमान कलावे याजकरितां लिा आहे. जिवावरी उदार होतात. कोणाचा इलाज चालत नाही. याचा इलाज काये करणे तो करावा. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे. भेटीनंतर साकल्य विदित करू. हे विनंति.

¶*Visaji Dadaji informs Ramchandra Baba that Kashibai was very reluctant to leave Allahabad, and that it was with great efforts that she was prevailed upon to move to Kalpee where her future programme would be fixed.*

No. 51}   [*March 1745*

पुरवणी

पाठवावे येसा करार जाहाला नाही. करार जाहलियावरी जासुदाची जोडी रवाना करितो. नवाबाचे चितात आहे की नाइकाबराबर फौज देऊन सवणुराकडे पाठवावे. सवणूरचा मोगल नवाबास भेटत नाही. नवाबासहि कष्ट जाहाले आहेत की नाइकास कोन्हीकडे पाठवावे. नाइकाचा करार कोन्हीकडे पाठवावयाचा जाहाला म्हणजे साहेबाकडे जासूदाची जोडी व सविस्तर वर्तमान लेहून पाठवितो. नाइक नवाबाची आज्ञा घेऊन येक दोन मजलीवर गेले म्हणजे आम्ही स्वार होऊन साहेबाचे सेवेसी येतो. नाइकाचे दरबारचे वर्तमान सर्व मणास आणून येतो. याजबराबर फौज तीस हजा(र) आहे. नाईक नित्य मुजऱ्यास जातात. नवाब म्हणतो की तुम्हास कोठे पाठवावे? नाईक म्हणतात आम्ही माघारे जात नाही. हे वर्तमान कारकून मंडलीचे मुखे ऐकिले. बहुत काय लिा हे विज्ञाप्ति.

¶*A fragmentary letter giving news of Babuji Naik's overtures to Nizam-ul-mulk.*

No. 52]   [*26-5-1745*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ताा छ ९ माहे जमादिलोवलपावेतो मो लस्कर नवाब नासरजंग येथास्थित असे. येथील वर्तमान सविस्तर आढलल्याप्राो छ २७ रबिलाखर तागाईत विनंतीपत्रीं लेहून हुजूरचे जासुदाबराबर सेवेसी रवानगी केली आहे तर ती विनंतीपत्रे सेवेसी प्रविष्ट जालीयावर वर्तमान विदित होईल. छ २८ राखरी नवाब दिढा कोशाचे कूच करून वेदवती अघहरी नदीचे तिरेच मौजे सिलूनकोटा प्राा चित्रदुर्गचे मुकामास आले. छ २९ रोजी मुकामच करून राहिले. छ ३० रोजी येका कोशाचें कूच करून नदीतिरेच मौजे वोकनहलीचे मुकामास आले. ते मुकामी छ १ जावल ताा छ २ दोन रोजी मुकाम करून राहिले. छ १ तेरिखेस अक्षतृतीयेचे दिवसीं दिनास्तापासोन दीढ प्रहर रात्रपर्यंत पर्जन्यवृष्टि अतिशय जाली. पर्जन्यवृष्टीने लस्करची दुर्दशा बहुत जाली. तेच दिवसीं नवाबाकडून बातमीचे हरकारे नाइकाकडे गेले होते ते आले. नाईक रायेदुर्गाहून पुढे दक्षणेस गलगले म्हणौन येक गाव आहे तेथे होते. तेथोन हरकारे निघाले तेव्हा नाइकानीहि कूच केले. नवाबाचे पछाडीस आसरेयाने येत आहेत. नवाबाचे लस्करास व नाइकास

6876

अंतरायें पंधराविसा कोशांचा आहे. छ २ रोजी नवाबानी नाइकाचे वकिलास बोलाऊन नेऊन खलबत प्रहर दिवस चढलेयावर केले. मागती रुकसत करून तृतीयप्रहरीं बोलाविले. वकील मार तृतीय प्रहरानंतरे गेला, तो चहूं घटिका रात्रीस आला. उतानार्थ मनास आणिता नाइकास नवाबाने येनायतनामा अर्जी नसतां लेहविला आहे तेव्हा दिसते की नाइकास आपले हमराहीस बोलावणार. आपण व नाईक मिळोन श्रीरंगपटणकरास शह द्यावा. प्रस्तुत श्रीरंगपटणकर देवन हलीचे मोर्चेयास आहेत. बारा चौदा हजार घोडा व तीस च्यालीस हजार प्याद आज पांच सा महिने या मसलहतीस आहेत. सिरेकर दिलावरखानहि त्यास सातशें राऊतानसी सामील जाला आहे. यैशास श्रीरंगपटणकर वाटेवर येत नाही याजकरितां नाइकास समागमे घेऊन जाऊन देवनहालीचा मोर्चा उठवावा या दबावानें श्रीरंगपटणकर वाटेवर येऊन मामलीयेत चुकवितील म्हणौन तर्क दिसतो. नवाबाचे लस्करांत नाइकाकडील स्वार दाहा पंधरा कोठे काजकामास गेले होते ते येऊन जमा जाले आहेत. त्यास नवाबाचे लस्कराहून नाइकांचे फौजेस सामील होणे मुस्कील पडली आहे. आज पंधरा वीस रोज लस्करातच आहेत. आवाडीस मुधोजी नाइकाचे गोटांत राहतात. नित्य उठोन पछाडीस वकिलाजवळ येऊन नाइकाजवळ प्रविष्ट व्हावयाचे विचाराकरितां बजीद आहेत येविसीं वकिलानें नाइकास लिहिले होते. त्याचें उतर आले कीं तुम्ही च्यार रोज लस्करांतच राहणे. यावयाची उतावली न करणे. छ २ रोजीचे खलबतावरून वकील सदरहू जणांस बोलिला की याउपर तुम्ही उतावली न करणें. च्यार दिवस धीर धरिलियाने आपले फौजेस सामील व्हाल. नवाबाचा व नाइकांचा प्रथमच करार जाला होता की काम पडलियास तुम्हास बोलाऊन दर रोज राउतास सा आणेप्रों देऊन कामकाज घेतले जाईल. नाईकहि मोठे हालात आहेत. नित्य उठोन चोरटे उपसर्ग करितात. बैल घोडी नेतात. नवाबाचे लस्करास जासूद पाठविणें संकट पडिले आहे. भुमेयाची सरहद लागलीयापासोन फारच श्रमांत आहेत. नवाबास भ्रम होता की आपले साहित्यास मुजफरजंग व कडपेकर व कनोलकर व अबदूल मजीदखान व सिरेकर दिलावरखान येऊन सामील होतील, त्यांचे भारबारदारीने हरयेक मनसबा करावा. सेवट आजपर्यंत सदरहू जणापौ कोण्हीहि आला नाहीं व पुढें यावयाची उमेद नाही, याजकरितां नवाबाची तबियत बहुत दिक जाली आहे. कितेक वर्तमाने लेहून आसफज्याहाकडे, सितूरस्वार रा केला आहे. त्या जाबाची प्रतीक्षा आहे म्हणौन लाहान कूचे करून मुकामे करीत जातात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's Vakil Raghunath Ganesh writes news about the movements of Nasirjang and Babuji Naik and the negotiations and plans they were carrying out.*

No. 63] [1745

छ ९ मोहरम. २७ जिल्हेज

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. स्वामीची आज्ञापत्रें छ १६ माहे जिल्हेजी बराबर कासीदजोडी सादर जालीं तीं छ २६ मिनहूस संध्याकालचा च्यार घटिका दिवस असतां प्रविष्ट जालीं. नवाबास व खानांस थेलिया होत्या त्याहि प्रविष्ट जाल्या. आज्ञापत्रांचा अर्थ सविस्तर ध्यानांत आणून त्याच समई निघोन खानाकडे गेलों तो खान दरबारास गेले होते. तिकडून साघटिका रात्रीस डेरेयास आले तेव्हां भेट जाली. खानाची थैली रुजू केली तेच समई वाचून पाहिली. यावर नवाबाची थेली खानानी आपणाजवल घेतली. प्रात:कालीं यावयाची आज्ञा केली. यावर छ २७ मिनहूस प्रात:काली खानाकडे गेलों. खलबतामध्यें भेट घेतली. स्वामीनें सेवकास आज्ञापत्रीं आज्ञा केली तो अर्थ अक्षरशा खानास वाचून दाखऊन समजाविला, याजवरून संतोषी जाले. तेच समई मुनसीस बोलाऊन सदरहू मजकुराचा तरजुमा पारसी नवाबास समजावावयाकरितां लेहविला. बोलिले कीं, आतां दरबारास जाऊन जाबसाल करून येतों. त्याजप्रों तुम्हासहि ल्याहावयास सांगोन व आम्ही जाब लेहून देऊन. मग आज्ञा घेऊन आलों. यावर छ २८ मिनहूस प्रात:कालीं खानाकडे जाऊन जाबाविषईं विनंती करितां बोलिले कीं, काल रात्रौ नवाबास तुमची थेली गुजरानिली व आम्ही आपलें खत व तुमचे खताचा तरजुमा रुजू केला. नवाबानी आपले हातें तपसीलवार वाचून पाहिला. खूब आहे म्हणोन बोलिले. यावर नवाब येहीं बगाजीपंत कधीं येतील म्हणौन पुसिलें. आपण जाब दिला कीं, बगाजीपंतहि लवकरीच येतील. मसलहत नवाबाचे खातिरेस आली. नवाबहि त्याच तरतुदीमधें आहेत. प्रस्तुत नवाब हिदायत मोहिदीनखानांस बाबू नायकास तंबी करावयास बराबर भारी फौज देऊन पाठवितात. माारनिलेस जरिदा व्हावयाची ताकीद जाली आहे. तुम्ही बगाजीपंतांस लवकर आणवणे म्हणौन खान बोलोन पेरोजाबादेस दरगास जावयास निघाले. सेवकाने जाबाविषईं हटकिले. यावर बोलिले कीं, दरगाहाहून आलियावर जाब लेहून देववितों व नवाबाचा जाब देववितों. नवाबहि छ मारीं दुपारची नमाज करून दरगाहास गेले आहेत. जाब यावयास दोनच्यार दिवस लागतील. स्वामीची आज्ञा कीं, कासिदांची रवानगी जलदीनें करावी, जाब मागाहून पाठवावे. याजकरितां आज्ञेप्रो कासिदांची रवानगी केली आहे.

मागाहून जाबाहे लवकरीच पाठावितों. हिदायत मोहिदिनखानाची रवानगी करार जाली आहे. समागमें रामचंद्र चंद्रसेन जाधव व सुलतानजी निंबालकर देणार म्हणौन लोक बोलतात. मग जातील न जातील न कले. परंतु खान मारनिले लवकरच रवाना होतील. बाबूजी नाईक विज्यापुरासमीप आले म्हणोन नवाबाजवल बातमी आली आहे. नायकांजवल फौज च्यारक हजार जमा जाली म्हणोन बातमी आहे. करनाटकांतून अनवरदीखान वगैरा येत आहेत, त्यांसहि नवाबाची ताकीद यावयाविसी गेली आहे. नवाब प्रस्तुत याच जिल्हेयांत आहेत. सरडगीचे मुकामी छ १८ मिनहूस आले. आजपर्यंत येथेंच मुकाम आहे. उदाजी चवाण शंभरेक राउतानसीं छ २६ जिल्हेजी आला. नवाबानी येक रिसालदार पुढें पाठविला होता. त्याचा भाऊ रताजी ये जागां आहेच. अद्याप नवाबाची मुलाजमत नाहीं. छ २७ मिनहूस उदाजीने मलाजमतीस यावयास साअत[1] आहे म्हणौन अर्जी पाठविली होती. नवाबाची आज्ञा आली कीं, जे समई बोलाऊ तेव्हां येणें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh a news agent with the Nizam writes to the Peshwa saying that his despatches were handed over to the Nizam and his minister and their replies are awaited. " The Nizam has deputed Hidayatmohidin Khan against Babuji Naik and Udaji Chavan is seeking an interview with the Nizam " says the writer in addition.

No. 54] [26-12-1747 ?

छ ७ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ ९ मोहरमपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. छ २ मोहरमचें आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा, राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याची अरमार बाहेर निघोन जंजिऱ्याचे बाऱ्यावर आले, पुढें वसईचे रोखें दर्यांत येईल. बंदरकिनारा आवडाव करावी ऐसी त्याची उमेद आहे. त्यास वसईचे तालुक्याचे जाग्यांची व साष्टीचे तालुक्याचे जाग्यांची खबरदारी करणें व जंजिरे अर्नाला येथें हेटकर लोक आहेत त्यांत भेद आहे म्हणोन आज्ञापत्रीं लिहिलें, त्यास सर्व जाग्यांची खबरदारी केली आहे. रोज बरोज चौकीपाहारे

---

१ साअत = वेळ, घटका.

6879

वद्लीत जावें असा सिरिस्ता करून जागा जागा शहाणे चौकस माणोस खबरदारी-बद्दल पाठविले आहेत ते नेहमी कार्तिक मार्गसीर्ष अखेर पावत जागा जागा ठेविले, व आज्ञापत्र येतांच सारे जागा हें वर्तमान लिहून पाठविले व दर किलेस दोन दोन खास बारदार ठेविले आहेत व वसईच्या किल्याची इमारत बंदरकिनाराकडे होणे राहिली आहे, तेथें चर बाहेरून खणून तयार केला व माहीम सिरगांव येथील इमारत जाली आहे. तरी बाहेरून खंदक खणून तयार केला व तारापूरच्या कोटाची पश्चमेकडील फाज अकरा हात उंच आहे त्याचे बाहेरून मेढा ताडाचा व मेढ्या-बाहेरून खंदक तयार होत आहे. कोट मजकुरची आडिच अंगें तों पकीं चिरेबंदी इमारत अठरा येकुणीस हात उंच जाली आहे. बाकी दीड आंग त्यापैकीं निमे आंग उत्तरेकडील बारा हात उंच आहे. पश्चमेकडील मात्र अकरा हात आहे. डहाणु इंद्रगड व अर्जुनगड हे तों जागे तयारच आहेत हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshao informs the Peshwa of the repairs and fortifications he has effected at Bassein and other places in face of the hostile intentions of Tulaji Angria.*

No. 55] [*1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री.
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना पातशाह अलमगीर यांचे खालसेचे पेशकार[१] मेहता त्रिंबकदास पूर्वी हस्तनापुरी होते. त्यांचे लेकीचे लेक शंभूनाथ बिरजभुकणदास क्षत्री खुदावंदखानाचे पेशकारास आपली कन्या द्यावयाचे नेमस्त करून दिलीहून आले. तों खुदावंदखान येतराजीखाले आले, याजकरितां पेशकार या वर्षी लग्न करीत नाहीं. पुढले सालीं लग्न करणार. याजकरितां मारनिले लस्करांत आले. अबूल खैर-खानाचे तर्फेस राहिले आहेत. त्यांचे कचेरीस येत असतात. माणूस मातबर आहेत. त्यांची व सेवकाची भेट खानाचे कचेरीस जाली. सेवक स्वामीचे सरकारांतील यैसे जाणोन सेवकाजवळ बोलिले कीं तुम्हाजवळ दोन गोष्टी बोलणे आहेत. सेवकास त्यांचे डेरेयास जावयास अनकूल न जाले. मग तेच छ २१ मिनहूस सेवकाचे भेटीकरितां आले. सेवकाचें बिराड तुकोपंताचे डेऱ्यांत तों

१ नायब, मुतालीक, सुनावणी करणारा अधिकारी.

तेच समई तुकोपंत मुरसीद कुलीखानाचे भेटीस गेले होते. मारनिले सेवकास भेटले. बोलों लागले कीं, आपण पातशाही नोकर आहों. पातशाहीमध्यें काही हाल राहिलं नाहीं. आपणास पातशाही अमीर गुजराथचा मनसुबा संगत होते. आपण बोलिलो कीं, पातशाह आपणास मनसबा सांगतील, परंतु गनीम जोरावर त्यास तंबी पोहचवावयास फौजबंदी करावी लागेल. यास मबलगा पैका खर्च करावा लागेल. याची सरंजामी कोण करितो? तुम्ही म्हणता तर दमाजी गायकवाड गुजराथेत मातबर सरदार आहे त्याचे भेटीस जाऊन त्यांसी सख्य (?) करून येतों यैसे बोलोन दमाजीचे भेटीस आलों. त्यास च्यार गोष्टी समजाऊन सांगोन बंदोबस्तच केला तों बाबूजी नाइकाचा मनसबा येऊन पडिला. दमाजी बोलिला कीं, बाबूजी नाइकास तंबी पोहचाविलीयावर तुमची रवानगी करून. पुढे दमाजीच सिकस्त जाले यामुळें तो मनसबाच राहिला. प्रस्तुत कालीं गुज-राथेचा मामला डामाडोल जाला आहे, याजकरितां पेशवे आपली दस्तगिरी करितील, अंतस्थे अभय देतील तर आपण गुजराथच्या सनदा पातशाहापासोन घेऊन येतो. पातशाहापासी आपला भाऊ मेहता गोपीनाथ आहे व रोज अफजूखान खोजा पातशाही शरफखासचा दरोगा आपला वकील आहे व तमाम अमीर उमराव आपणास जाणतात. जो अर्ज करू तो सरबरा होईल. नाना-साहेबी माझी गौरसी केली तर आपण सुरत भडोजदेखील गुजराथच्या सनदा घेऊन येतों. पातशाहापासी पैका मुकररा करून येतो. तितका पैका पातशाहास पोहचाऊन गुजराथ मुल्क नांदवावा. पायागड व उजैनदेखील मुल्क नानासाहेबाचा, तिकडे फरंगस्थान प्रांत नानासाहेबाचा, दरम्याने गुजराथ राहिली आहे हेहि हस्तगत जाली म्हणजे दक्षणेमधें दुसरा कोण आहे. प्रस्तुत दाबहि अनकूल आहे. बाबी आहे तोहि खराब पडिला. गफरखान पातशाहापासोन आला तोहि नातुराप होऊन राहिला. दमाजी गायकवाड माहाराजाचे चाकरांचा चाकर आहे. प्रस्तुत नानासाहेब अमीर आहेत. आपण नानासाहेबाचा अनन्य सेवक आहे. आपली वांछा कीं स्वधर्मस्थापना व्हावी. प्रजा पीडा पावते सुखरूप राहावी. याजमध्यें पुण्य पुरुषार्थ आहे. आपण बाह्यात्कारे पातशाही चाकर, अंतःकरणे नानासाहेबांचा चाकर आहे. हे आपले इमान आहे. नाना-साहेबाजवळ पैकाहि मागत नाही. आपले पदरचा पैका खर्च करीन, परंतु नानासाहेबी माझी गौरसी करावी म्हणजे सर्व कार्ये होतील. नानासाहेबाचे नांवें आपली कुमक करावयाविषई पातशाही सनदा पाहिजेत, तऱ्हीं आणऊन म्हणौन कित्येक प्रकारें बोलिला. स्वामीचे सेवेसी मारनिलेने पत्र दिले ते मागाहून रवाना करितों. स्वामीचे अभयोत्तर आलेयावर मारनिले आपला खर्च खाऊन

6881

भेटीस येणार आहे. माणूस थोर आहे. बोलतों तैसे करील असें दिसतें. याउपर स्वामी समर्थ आहेत. आढळलें वर्तमान विदित व्हावयाकरितां लिा आहे. हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa the substance of a conversation which he had with one Shambhunath Braj Bhukandas, who had arrived at the Nizam's court from Delhi on some private business. Shambhunath gives all kinds of promises and says that he would uphold the Peshwa's cause at the Emperor's Court and would secure Sanads of Gujarat for him. Though an Emperor's servant he would secretly serve the Peshwa—says he*

No. 56] *[1747-48*

श्रीशंकर

सालेसाल वोढणीस आणावा.

यादी बागाची गणती सुा समान आर्बैन मया अलफ.

किता दक्षणेकडील व पश्चमेकडील बाग

१ ताईचा बाग
१ बाईचा बाग
१ धोंडोपत जोगलेकर
३ जिवाजीपताचे
२ माहादोबाचे
१ बाईचा बाग पर्वतीचे बागाजवळील
१ विसाजीपंत
१ श्रीपतराव बापूजी
१ सिदोजी राऊत
१ पुरंधरे भट
१ पाटणकर
१ चिमणाजी भीवराव याचा बाग

किता उतरेकडील व पूर्वेचे ३ सरकारचे बाग निा आनंदराव

१ महिपतराव
१ आयाबा
१ मल्हारजी होलकर संगम
१ सुभेदाराचा
१ राणोजी सिंदे

किता बाग

१ वानवडीचा
१ त्रिंबक रामाचा

१ अंताजीपंत

१ गोविंद हरि

१ सदासिवभट दीक्षित

१ रामाजी मल्हार

१ वासदेव जोसी

१ शंकराजीपंत

१ मल्हारजी होलकर

१ सिवरामबावा चित्राव

१ कबुतरखान्याजवल सरका-
रचा बाग

१ बाजीभट शालग्राम

१ कोनरपंत

१ भिऊबाई

¶*A list of gardens round about Poona is given in the paper.*

No. 57] *[23-2-1748*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामी गोसावी यांसी

पोष्य गोविंद खंडेराव साा दंडवत प्राा विनंती उपरी. येथील कुशल ताा फालगुन शुध शष्टी मंगलवार जाणून स्वकीय कुशल लिहीत गेले पाहिजे. यानंतर आपण पत्रे पाठविली ती पावली. लेखनार्थ अवगत जाला. सविस्तर अर्थ श्रीमंताचे पत्रावरून कलला. त्यांचे सालजाब श्रीमंतास लिहिले आहेत त्यावरून विदित होतील. सारांश हेच की त्या रदबदलीचे समई तुम्ही होतांच. मुलकाची गोष्ट श्रीमंतानी आज्ञापिली ते समई आम्हीहि जखली (?) घेतली होती तोच भावार्थ यांचा दिसतो. पैक्यावर कबूल करून येश घ्यावे, मग याचे घर. वाचविल्यास झक मारून हेहि काही ऐकतील. अगोधर होता संकट आहे. मग दाभाडे याची दौलत जाणे. राज्यास आपाये होणे असे असले तरी इलाज नाही, परंतु ये समई श्रीमंतानी अड न धरिता साहित्य करावें हेच उचित आहे. तुम्ही प्रसंगी आहां. येथें या श्रीमंतास सांगून तिकडे श्रीमंतास लेहून पाठऊन जाबसाल लौकर आणवावयाचा विचार करावाच करावा. मागाहून आम्हीहि सिधातरूप उतर पाठवितों. दोहचहू दिवसात मातुश्रीची भेटी होईल. राा

माधवराऊ जिवाजी याची भेटी होऊन त्यास आपलेंसे केलें. सारेच हाताखाले घेतले आहे. श्रीकृपें वडिलांचे आशीर्वादें उतमच होईल, परंतु नवाबाची धाड मोठी चालली आहे हे निवारण जाले तरी उतम, नाही तर दाभाडे याची भट पडो, आम्ही माणसातून जातों, याचा उपाय तुंम्ही कराल तरी उचित आहे. राजश्री केशव राऊजीस नमस्कार पावता केला. त्यांणी तुम्हांस पत्र लिहिलें आहे त्यावरून कलेल. आपण सासवडास जाऊन सातारा कधी जातील ते लिहीत जावें. सातारियास गेलियावरी फड मारून न्यालच. वराता होऊ लागतील तेव्हा आमची गुंता जामदारखानेयाचा संमधी आहे तो चितात असो द्यावा. नाही तर आमचे सोबती यैवज वराताखालें नेतील. आम्ही प्रसंगी नाही तर तुम्ही धणी आहां. कलेल तैसे राखून वरचेवरी लिहीत जाणें. निठूर व चिरगोपे याचे बाबतीच्या सनदाविसी लिहिले तरी सनदा राघो अनंदराऊ यांजवल आहेत ते कार्यास गेले आहेत. आलियावरी पाठऊन देऊ. नाही तर दुसरिया करून देवितों. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणं कृपा लोभाची वृधि करावी. दूर लांबलो म्हणून दूर न धरावें हे विनंती.

¶Govind Khanderao Chitnis informs Nana Purandare about the difficulties in the settlement of the affair of the Dabhades and requests him to use his influence with the Peshwa to bring about a lasting settlement. The whole letter is in Govindrao Chitnis' hand.

No. 58] *[1748?*

श्रीअंबावरद

सेवेसी विज्ञापना माणिकगडचे नाव न घ्यावे म्हणजे सर्व निर्वेध करून देवितो म्हणोन आज्ञा. यैशास पूर्वापर ममता स्वामीची, पुढें संकटास पावावे, आपले ऊर्जित करावे हा अर्थ चितात आणून राजमाची, कोथला, बेरोटी, चोण नजर जालियाउपरी आंतर काडीमात्र पडणार नाही, सर्व प्रकारे आगत्य संकटास पाऊन श्वहितच करून, यास आतर नाही म्हणोन प्रसाद भाकर रोटी बेल उभयतां श्रीमंत कैलासवासीनी दिल्हा असता, तेंच कवच स्मरोन वर्तत असता पाल, मिरगड, बाहिरवगड घेतला. आम्हांकडून अपराध अंतर काये पडिले? आलीकड माणिकगड घेतला होता तो फिरोन दिल्हा असतां समर्थांनी दिल्हा टाकिला, त्याचा फिरोन आदर न करावा हेहि वचन समर्थांचेच आहे. यैसे आसोन नाव न घ्यावे, म्हणावे तरी खांदेरीचा तनखा फड फर्मास राहिली यास काये करावे? गेले तरी आम्ही तुमचेच यैसे म्हणता म्हणोन अचंबियांत स्वामी आणितात तरी सर्व सामर्थ्य पटे

व खुद पूर्वापर वडीलपण आपणाकड आसता आम्ही स्वामीचे न म्हणोन परिणाम काये? पाया आम्ही सोडीत नाही. वरकड संदर्भ तुम्ही न धरावे म्हणोन आज्ञा तरी श्रीनी गांठी येथें घातली आसतां आन्यत्र राजकारणे ममता लाविलीयाने आमचे स्वहित काये होणे आहे? याकरितां श्रीने गाठी स्वामीसी घातली तेच परंपरेने चालवावी हेच इछा. यासी साक्ष शफतपूर्वक श्रीच आहे. याउपरी स्वामीनी दुसरा कल्प न आणिता माणिकगड प्रांतसमेत समर्थानी दिल्हा तेच प्रमाण करून स्वाधीन माणिकगड करून रवानगी करावी. पुढें सर्व प्रकारें आमचे मामलियाती(ल) किंत तोडून देऊन निखालसपणे सर्व प्रकारे चालऊन सेवा घ्यावी. याउपरी विलंब माणिकगड स्वाधीन करावया न लावावा. सध्या माणिकगड स्वाधीन करणारा स्वामी समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*The writer probably Manaji Angria assures the Peshwa of his loyalty and devotion and asks the latter's good offices for Manikgad being restored to him.*

✓ *No. 59*] [*17-6-1748*

छ १९ शौवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी-

चे सेवेसी

सेवक केशव राम दिा कृष्णाजी ना‍ा भिडे व रामाजी नाईक भिडे सां नमस्कार. सेवेसी विज्ञापना यैसीजे. आपनास उभयेताहि राजश्री अमृतरावजीसमागमे बंगालियास माल खरिदी करावयाबद्दल रवाना केले. यैवजीहि थोडाबहुत समागमे आणिला होता. त्यास येथे यांची खर्चाची वोढ देखून असलीस साहित्य न करावे अयुक्त जाणून जे साहित्य होऊन आले तें केले. प्रस्तुत येथे रेसीम येक हजार मनपावेतो घेत आहे. त्यास येथील अधिकारी हसील महसूल मागतील म्हणोन विज्ञापना जे कृपा करून पत्रे राजश्री रावजीस व नवाबास पाठ(वा)वयाची आज्ञा केली पाहिजे, कीं सरकारात झालरीबद्दल रेसीम पाहिजे याची खरिदी करावयास केशव नाईक पाठविले आहेत. हे जो माल खरिदी करतील त्यास जकातीचा उपसर्ग न लावितां माल नावेवर घालून श्रीवारानसीस पावता होये ते करणे. यैसी पत्रे आलियास सेवकावर कृपा केलीसी होईल. बहुत काये लिहिने हे विज्ञापना. अशाड शुध ३ शुक्रवार शके १६७० विभव संवतछर.

¶*Keshavram, a clerk of Krishnaji Naik Bhide, requests the Peshwa to issue permits to the customs officials to enable him to bring silk from Bengal duty-free.*

✓ No. 60] [10-2-1749

श्रीशंकर

तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामी वडिलांचे सेवेसी

अपत्ये रघुनाथाने चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ताा छ ३ रबिलौवल मुाा कुबटे नजीक वर्धनगड पावेतो वडिलांचे आसी-र्वादेकरून सुखरूप असो. विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी ऐसे नसावे. सदैव पत्रद्वारा लेकराचा परामर्ष करीत असिले पाहिजे विशेष. काल आमचे जांबहून कूच जाहाले ते येथे आलो. राजश्रीचे तेरवाच्याच दिवसी कूच होऊन कोरेगावास आले. आमचे काल जाहालें. आज उद्या निरोप व्हावासा आहे. येथून जेजुरी कुरकुंब करून येतीलसे वाटते. राजश्री निरोप द्यावयास फार चुकावतात. सिकारीस जातात. नजर घेत नाही. फारसे जाहाले तर नजर आम्हापासी ठेऊन जातील. आम्हास महिना पंधरा दिवस रहावे लागते. राजश्रीनी सांगितले की पेशव्याच्या भावास येथे ठेवणे त्याज-वरून आम्हास ठेवावयाचा करार जाहाला आहे. हजार फौज आम्हाबराबर राहील. नाना व आम्ही मुंजीस निरोप घेऊन येऊ असे आहे. आपणास कलावे म्हणोन लिाा आसे. बहुत काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunathrao writing to Bhausaheb from the camp of Shahu says that he is accompanying the King and that with his permission he will shortly return to Poona for the thread ceremony of Vishwasrao.*

✓ No. 61] [March 1749?

श्री

[पहिला बंद गहाळ.]

२ पुाा श्रीमंत राा पंत प्रधान स्वामी

आम्हांस सांगाल त्या ठेऊ. आमल सुरळीत देऊ म्हणून चिमणाजी वामन यासी तह केला. दुधनेव्याच्या गढ्यांचाहि तह येणेप्रमाणेच लक्ष्मण नारायेण यासी जमिदारानी केला. मुल्हक कौली. याजमुळें मामलेदारांच्या मतें फौज राहिलियां पायेमालीनें मुल्हक खराब होतो. याजकरितां आम्हांस म्हणो लागले की, मुल्हकचा बंदोबस्त जाला आणि रोजमरियाची नेमणूक अखेर आस्विनापासूनं नाहीं. याजकरितां आम्हास फौज घेऊन हर कोठे गुजरान करावीसे जालें.

दूर पोट भरावयासी जावें तर सार्वभोम दिलीहून बाहेर निघाले आहेत. रोहिल्यानी बंगस बुडविला यामुळें आंतर्वेदीचा बदोबस्त करावा. त्यास कायेमखान बंगस याची आई पातशाही लस्करांत गेली. कारभारी याच्या हातें आपले मुलुकचा ठराव करावा. त्यास वजिराच्या चितास न आले. थोडा बहुत मुलूक त्यास देऊन वरकड मुलूक घेतला. काही पैका घेतला. पातशाहाच्या स्वारीचे रोख मकसुदाबाजेकडे जाऊन तिकडील खजिना आणावा आगर फरुकाबादेस यावें. नाहीं तर आगऱ्यास यावे, जाटाचा वगैरे बदोबस्त करावा. दुसरे खबर कीं, भदोरे जाऊन भेटले. वीस हजार फौज घेऊन भदावर प्रांतास येणार. त्याणी या प्रांतास येऊन बदोबस्त करावा यैसें वर्तमान व बुंधेल्यास सिरपाव, हती, वस्त्रे जाऊन पोहचलीं व ये प्रांती देसचे वर्तमान मनमानेसे उठऊन बड्दा करावयासी पाहातात यामुले आम्ही दुसरेकड न जातां फौजेनसी कछवाधार प्रांतीहून कूच करून ग्वालेर प्रांतास आलों. फौजेच्या दहशतीनें दबा खातात. आम्ही लस्करचा मुकाम शहावर केला आहे कीं, कदाचित स्वारी आगऱ्याच्या रोखें आली आणि भदोऱ्यानी गुंज बांधोन फौज आणिली तरी काये चिंता आहे. इकडे न आले, फरकाबादेकडे गेले तरी ते प्रांती राजश्री बापूजी बाजीराऊ आहेत त्यास लिहिले आहे. ते आम्हांस लिहितील आम्ही जाऊन पो (अपूर्ण).

¶*This is a fragmentary letter with both the beginning and the end missing. It refers to the developments in Northern India especially pertaining to the move of the Emperor towards the Doab on the overthrow of Bangas by the Rohillas and to the manœuvres of the Jats near Agra and Bhadavar.*

No. 62] *[1749?*

श्री

यादी किले तुंग येथील लोक जे समई भेटले ते समई तह येणेप्रा जाला. खंसैन मया अलफ रा हैबतराव व आमचे धारकरी निवडक सिरा यैसे पंनास साठ येणेप्रा समागमे किल्यास चढले व त्याचे माणूस च्यालीस पनास वरते आहे. येकूण त्याचे आमचे माणूस शंभर वरते आहे बंदोबस्ती किल्यावरती आमची आहे. किल्यावरून जुने लोक उतरावे तरी कबिलदार वतनदार आहेत. पुढे स्वामीकडे शेवा घेणे, याजकारणे त्याची आमची आणशफत होऊन येणेप्रा तह करून घेतला. त्याचे वरते प्राबल्यत्व कोणे गोष्टीचे नाही, ते आपले जिमे लागले. पुढे त्याचे उर्जित करणार स्वामी खावंद आहेत.

¶*The capitulation of the fort of Tung and the subsequent arrangements are reported in this paper.*

6887

J No. 62A] [22-2-1750

श्री

राजश्रिया विराजित रा रा
राऊजी स्वामीचे सेवेसी

सेवक श्रीपत विठल सां नमस्कार उपरी येथील क्षेम ता छ २९ रबिलावल मो दरजागा कलसपाक व तिरणामल या मोबैनमधें जाणून श्वानंद सदैव लिहून सनाथ केले पाहिजे. यानंतर पत्रावरी पत्रे सेवेसी लिहितो, परंतु येकहि उतर येत नाहीं. आमचे वर्तमान नवाब नासरजंग खवाघाट उतरून चंदावरास मजल दरमजल कूच केले. ज्या दिवसी घाट उतरले त्या दिवसीं दाहा कोस मजल जाली. सूर्यअस्त जाला. दाटी फार. घाटमाथा बैल कठाळ व राहुटी सुधा गेला. येत्न फार केला परंतु कोठे त्याचा खोज न लागला. सर्वा गोष्टीची विपत्य तरी येऊन घडली. बसावयास सावली नाही व पात्रे नाहींत. येक तो पूर्वीपासून कर्ज भारी होते. सांप्रत आणखी शंभर रुो कर्ज करून दोनी वस्त्रें व पात्रें करणे पडलें. वर्तमान या रीतीचे आहे. नासरजंग व मुसफरजंग उभयताही चालीस कोसाचे मफासलेने आहेत. अस भारी अरिष्ट उडवले आहे. श्री काय करितो पाहावें. विशेष काय लिहिणे हे विनंती.

¶*Shripat Vithal reports to the Peshwa the march of Nawab Nasarjang to Tanjore.*

No. 63] [13-3-1750?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १९ माहे रबिलाखरपावतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व येथील प्रांताचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सरयेतपन्हा महमद साले सतारी सावकार बंदर मजकूर यांची गुराब व रा सदासिव दादाजी गुमस्ते सबनीस जंजिरे अरनाला यांची सिबाड मालसुधा राजश्री तुलाजी आंग्रे सरखेल यांचे आरमारकरी यानी धरून गुराब व सिबाड जंजिरे विजेदुर्गचे बंदरी नेली. ते मालसुधा आणावी म्हणून येथून कारकून पत्र देऊन पाठविले होते. त्यास सरकारचे कारकून तेथे जाऊन पोहचत तो त्यानी गुराबीवरील व सिबाडीवरील माल खाली करून घेतला. तांदूल लोकास अडिसेरीस खर्च केले. वरकड माल कोठीस लाविला. कौल घेतला नाही म्हणून माल खाली करून घेतला. बादरीयाणे

लाऊन कागद येथें लिहिला आहे तोच बजिनस हुजूर पाठविला आहे. त्यांचे पत्रावरून त्यांचा मनोदय अवगत होईल. स्वराज्यात सावकारी तरांडियास त्याकडोन कौलाचा उपसर्ग लागल तेव्हां सावकारी कसी चालेल? आजपावत असे जाहाले नसता सांप्रत ते दुराग्रहास प्रवर्तले आहेत. मुखवचने सांगोन पाठविले आहे. सावकारांही कौलावण देत जावे. नाही तर सावकारास उपसर्ग लागल. येविसी त्यांचे पारपत्य कर्तव्य ते खुसकीने राऊत पाठऊन स्वामीने करावें. परिछिन त्यास शह पोचल्याविना सुरलित येत नाही. हुजूर त्याकडोन रा विसोपंत मंडलिक आले आहेत. त्यास निक्षूण आज्ञा केली आणि आंगरे मारनिले माल द्यावयास मान्य जाले तर माल देतां घालमेल करतात. याजकरितां मालाचा पैका करून मोबदला रुपये देतील तर घ्यावे. वरकड माल देतो म्हणाले तर मालाचा हरास[१] त्यानी केला याउपर मालाचा आकार करून रुपयेच घेता बरे. ते म्हणतील कीं मोबदला किमतीचा माल कोठीपैकी देतो तर नासका माल येका रुपयाचा ते चहू रुपयास देतील. तेण्हेकरून आपले पदरचे सावकारास तो बहुत येईल. मागे येक दोन वेला त्यानी असेच केले. परिछिन उभयेता आंगरकासी तह सरकारचे बंदरची नेहमी सावकारांची तरांडी व कोल्याच्या माहागिऱ्या हरयेक बंदरी जातील येतील त्यास दर्यात कौलावणीचा वगैरे उपसर्ग न द्यावा, व सरकारचे खाडियाची नस्ते आहेत त्याजवर नांगरवाडा त्यानी आपले अरमाराचा न करावा, नस्तापासून बारा कोसावर पलीकडेस दर्यात बाजेबंदरचे तरांडीयासाठी फिरणे तर त्यानी फिरावे. याप्रा जाहाले तर बंदरे चालतील, नाही तर बंदरे पडलीं. जकातदारास तोटे आले आहेत. आपले आरमार स्वारीस जाते आणि मागें उभयेतां आंगरे उपद्रव करितात. उभयेतांची पत्रें आलीं ती पाठविलीं आहेत. आपले पदरचे सावकार येणेकरून खराबीस आले व जकातदारांची दिवाली निघावयास आली आहेत. तुलाजी आंगरे उगच म्हटल्याने हे गोष्ट आईकणार नाहीत. ते म्हणतील की पुरातन आपली कौलावण आहे. तर अलीकडेस हे स्वराज्य जाले तेव्हां आपले उदम्याची कौलावण त्यास न द्यावी. याचप्रमाणे पायेंडा असावा. पूर्वी शामलाचा व आंगऱ्याचा तह असाच होता. परस्परे कौलावण, सावकारास कौलावण घेत नव्हते. शामल तो परकी होता. हें तों स्वराज्य. येथें परस्पराचे उदम्यावर कौलावण नसावी. त्यांस सावकारी आपले पदरची चालवणे नाही आणि दुसऱ्याचे बंदरची चालू देणे नाही, हा त्यांचा विचार. आपलीं बंदरे पनास साठ हजार रुपये आकारतात त्या येवजास मोनसिक[२] जाले, येणेकरून सरकारचे नुकसान होतें.

---

१ नुकसान. हराज = विक्री, लेलांव. २ तोटा, कमतरता.

6889

त्याही हे गोष्ट मान केली नाही तर त्यांचे पारपत्य करणार. स्वाम समर्थ आहेत. पारपत्य जाहालियाविना त्यांचेहि डोले उघडत नाही. त्याहीमध्यें तुलाजी आंगरे यांचे मुलकावरी निग्रह जाहाला म्हणजे राजश्री मानाजी आंगरे सहजेच आईकतील. तुलाजी आंगरे ठिकाणी न राहिले तर सरकारची बंदरे चालत नाही. विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Phadke, Sarsubha of the Konkan, writing to the Peshwa, makes a strong representation against Tulaji Angria levying his own tax on trading ships. This practice of the Angria has, the writer says, ruined the coastal trade: if the trade is to be saved, Angria must be severely punished. The paper explains the original cause of friction, which ultimately determined the Peshwa to put down the Angrias.*

No. 64] [Previous to 26-4-1750

श्री

राजश्री भाऊसाहेब गोसावी

यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्ये श्नो लक्षधीर दलपतराऊ विनती उपर. येथील कुशल जाणऊन स्वकीये निजानंदलेखन करीत आसिले पाहिजे. यानंतर साहेबाची आज्ञा घेऊन स्वार जालो ते स्वस्थली कृपायोगे सुखरूप पावलो. तो श्रीमंत राजश्री चे आज्ञापत्र आले की लग्नास यावे. त्यास सर्व प्रकारे आज्ञा प्रमाण, परंतु या देशात सांप्रत लावणीचा प्रसंगामुले योजना करावी म्हणौन चिरजीव सौभाग्यवती लालकुवर यासी पाठविले आहे. सर्व प्रकारे भरवसा साहेबाचा आहे. येथून मामा बदनजी शेवेसी आले आहेत. हे सविस्तर वर्तमान नवेदन करितील त्याप्रमाणे प्रत्योतर पाठविले पाहिजे की तदनुसार वर्तणूक करून. बहुत काये लिहिणे. स्नेहवृधि करावी हे विनती.

¶*Lakshdhir Dalpatrao to Sadashivrao Bhau expressing his inability to attend a marriage ceremony and saying that he is sending Lalkuwar instead.*

No. 65] [June 1750?

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना व ताा

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती आजी तिसरे प्रहरा येशवंतराऊ नागोराव विष्णुपंत दरबारास गेले होते. राजश्रीनी येशवंतरायास म्हटले कीं, कारभार काही होत नाही. लोकाचा गवगवा जाहाला आहे त्याची वाट करणे तर करा. नाही तर मी येका दिवसात माझा मी

बंदोबस्त करीन. कोणास भीत नाही. बाम्हणी काये करतात ते पाहातो. त्यावर हे त्रिवर्ग बोलले की येकांती बसावे. आम्ही आर्ज करितो तो चागला समंज्यसपणे यैकावा. नाना गोविंदराव घरी बसले आहेत. त्यास आणावे, म्हणजे कामकाज चालीस लागल. यैसे बोलून येकातास घेऊन त्रिवर्ग गेले. येशवंतरायानी स्वामीच्या लक्षाच्या गोष्टीवर बहुत तोडजोड सामदाम विचार फारच चांगले राजश्रीसी बोलले. परंतु राजश्रीच्या खातरेस स्वामीचे नाव काढताच न आले. राजश्री बहुतसे ताई भरून मोठ्या कुरुयानें बोलले.

पेशव्यानी संभाजी राज्याकडे रामाजीपंत पाठऊन सूत्र केले होते. गड किले मागत होते, तेव्हा संभाजी राज्याने यैकिले नाही. मग माझ्या पाया पडावयासी आले. मला सारे ठाऊक आहे.

मी कोठे पाया पडत होतो? मी किला येक देणार नाही. म्या काये कुणाचे घेतले आहे. यैसे साफच चागले बोलले.

येमाजीपंतास मी खासा जाऊन हाती धरून आणीन. तो बाम्हण चागला आहे. तो माझा करभार करील. मी त्याला आणीन. तुम्हाला वरकडाला भिणार नाही.

आईसाहेबाला कधी आणावयासी जाणार नाही. वरीसभर कुहीजिवीन. तिचे काम काय येथे आहे? खेली तर तीच आहे. तिला आणीत नाही. आली तर चागली कैदवार ठेवीन.

गोविंदराव येत असला, किले देत असला तर बरे. नही तर चिटनिसी दुसऱ्यास लेहून देईन. गोविंदरायाने मजवर जाच केला आहे तो मी कोठवर बोलू? काय सागू? याप्रा हे भाषण केले.

सिंहीगड देणार नाही. मोबदला येखादे टेकडे लाहानसे देईन ते घेणे तर घ्यावे. सिंहीगड देणार नाही. राजगड पाहिजे तर येथे साऱ्यानी यावे मग देईन.

येणेप्रमाणे राजश्रीचे चितापासून जे होते ते बोलणे यशवंतरायानी नागोरायानी राजाच्या बोलण्यात बाहेर काढले. हे त्रिवर्ग स्वामीच्या लक्षावर बोलणे ते बरे वजनाने समंज्यस बोलले. परंतु राजश्रीस स्वामीचे नाव काढण कामास येत नाही. तेव्हा दुख आपले उपसले ते दुख या प्रकारचे. केल्या कर्माचे उतराई राजे बरे जाहाले. काय ल्याहावे? हा मार त्रिवर्गानी आम्ही रघोजीबावा, बराणजी मोहिते आमचे घरी बसलो होतो तेव्हा दरबारीहून येऊन सागितला. याप्रो राजश्री बोलतात. कळले पाहिजे हे विज्ञापना.[१]

¶*Nana Purandare informs the Peshwa from Satara how Ramraja had taken offence against the Peshwa. The letter reproduces the words of the King.*

---

१ सबंध पत्र नाना पुरंदरे याच्या हातचें आहे.

No. 66] [11-10-1750

श्री

श्रीमंत राजेश्री पंत प्रधान स्वामी
समर्थाच्या पदांबुज्या प्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद दोन्ही करकमल जोडून सां नमस्कार विनंती ता। अस्विन वदी अस्टमी ब्रहस्पतवार च्यार घटका दिवस बाकी आसता विज्ञापत यैसिजे. काल बुधवारी प्राथःकालापासून ते मार्तंडउदयादारभ्ये मातुश्री अंबिकाबाई व राऊ सैनापति व देवजी ताकपीर व सोमाजी दाभाडे व विठलपंत मुजमदार व रेवापुरी गोसावी हे समस्तानी मसलहत केली की श्रीमंत पेशवे निस्चै गुजरात घेतात. माहादजी गोविंद याचे मारफतीने रसदा कमाविसदार माहालानी गुजरात मुकरर करून घेतल्या. श्रीमंत राजेश्री भाऊसाहेबी येमाजी सिवदेव याची ठानी घेऊन बदोबस्त करून लौकर सिदटेकास येणार. येथून श्रीमंतहि देवदरशणास जाणार. तेथे येकत्र जालिया फौजांची रवानगी होती म्हणोन निस्चये समस्तानी मिलोन केला की पचवीस हजार फौज ठेवावी, त्यामधून दाह हजार स्वार सैनाखासखेल मातुश्री आबिकाबाईसहवर्तमान गुजरात प्रांती जावें. दाह हजार स्वार घेऊन मातुश्री उमाबाई व सैनापतहि राजदरशण व श्रीमतासी कारभारी पाठऊन जाबसालाची भांडगड घालावी. पाच हजार स्वार तलेगावच्या जिलीयात जवलपास ठेवावे. जर काही श्रीमतानी आमची गुजरात घेता आमचे वचन मान्ये न करिता, खामखाहा गुजरातकडे फौजा रवाना केल्या, तर सोनगडीहून गाईकवाड व अंबिका फौजेसहवर्तमान येकत्र होऊन जुंज करावे. माघून पेशवे निघालिया मातुश्री व सैनापतींही पिछा करावा. गुजरात प्रांती फौजा जाऊन द्यावे. रायासी यैवज खजाना रेवापुरीने दाह लक्ष रुा देऊन केले व सेनापतींही आबिकाबाईसी करार केला की मातुश्रीकडून पधरा लक्ष रुा देविती. तुम्ही बाहेर डेरे देऊन दाखल होणे. हा स्त्रीपुर्शाचा करार जाल्यानंतर आज गतरात्री चंद्रउदये जालियानंतर तमाम गोटोगोट सिलेदारास जासूद पाठऊन जिनबंदी करविली, की रात्रीच पेशखानियात दाखल होवावे. तो त्यास सातारियाहून रेवापुरीस बोलाऊन आले, की बनसीपुरीचा काल जाला, किंवा चौ घटकानी मरनार, तुम्ही देखत पत्र श्वार होऊन येणे. म्हणोन रेवापुरीसीं मसलहत करून त्यास समागमे संभर स्वार पागा व दीडसे स्वार मातुश्री ताराबाईचे धर्मपुत्र नरसिंगराऊ व कारभारी बच्याजीपंत त्याची बोली तीनशाची त्यापैकी संभर स्वार व येक हस्ती लाहन वेऊन आले आहेत. त्यापैकी स्वार चालीस व येशवंतराऊ बलाल देसपांडिया करकमकर याचे स्वार चालीस व इतर सिलेदाराचे स्वार देऊन

6892

सातारियासी रवाना केला, तो आज स्वार होऊन गेला म्हणोन रात्रौ डेरेदाखल न जाली. त्यास आज दो प्रहरां ढाल व पेशखाना अंबिकाबाईनी मलेवाडीवर तलेगांवापासून अद कोस आहे तेथून इंद्रायेनी नदी ही जवल आहे, ढाल उभी केली; त्यांस च्यार घटका दिवस बाकी राहेलीया डेरे दाखल जाली. उदईक शुक्रवारी च्यार कोस जाणार. देवजी ताकपीरास व समस्त फौजेस आज्ञा केली की ढालेपासी येऊन उतरोन. त्यास सरदारही डेरीयाजवल जातात. पहिली गणती फौजेची पधरासे काही अधिक ; त्या उपरी भिवजी बंदर ५० व सुभानजी सिवदे ५० व बसतराये चक्र ६०. परस्तुत आले. बोलिया तिघा जनाची दर नफर दोनसे स्वाराची आहे. नालबदी पावलीया लोक जमा होतील. प्रस्तुत बाजरी घेऊन आठा दिवसाचा रोजमुरा दर नफरी रुा २ प्रा समस्तास दिधला. परंतु लोक बेदील नालबंदीवाचून आहेत. हे वर्तमान तर निस्चये, परंतु मातुश्री उमाबाईच्या दरबारात व बाजार अफवा तमाम गावांत की सासू सुनेसी आनबान की मातुश्रीच्या चितामध्ये कीं अंबिकाबाईने निराला पराक्रम न करावा, फौज न धरावी, कर्ज लोकापासून न घ्यांवे, आमच्या विचारे असावे. अबिकाबाई म्हणती की हे सुस्त, याचे कारभारात जीव नाही. अखर यांसी पेशवे फजित करितात व गुजरात घेतात. आपन या समागमे खराब होऊन अबरू गमावी हे योग्ये नाहीं. फोज ठेऊन दबावाने जे होईल बरेच होईल. सासासुनात व स्त्रीपुरशात सलूक होत नाही, म्हणोन सून रुसोन चालली. गुजरात प्रांती वरकड वर्तमान तर बंधूजी आले नाहीत. आज प्राथःकाली यादोपंत दिवान मातुश्रीपासी आले. यानी मातुश्रीस विनंती केली मजला बंधूजी यावर श्रीमताकडे रवाना करितां, परंतु बरे वाटत नाही. पोट चांलते+ म्हणोन जाणे होणार नाही. बालोबा सेनवई जामदारखनीयाचा कारकून सांप्रत कारभारी, तो म्हणतो की आपनास बोलता जाबसाल करता येत नाही. आपन जात नाही. आपाजी गणेशाची व मातुश्रीसी काही बोली कर्जावामास जाली म्हणोन ते रुसोन डेरा घेऊन गावाबाहेर राहिले. असे वर्तमान. हे कारकून मंडलीची मरर्जी घेतली. कलो आले की आम्ही श्रीमंतापासी जाऊन काये जाबसाल करावा. तथापि जर कांहीं तेथे गेलियावर काही तहरह जाला पाहिजे, त्यास याचे घरी फुट, येकाची गोस्ट व विचार कोन्हाचे चितास येत नाही. मग तेथे गेलिया फजित पडावे म्हणोन मल्हार गोविंदाचा मार्ग लक्षितेत की ते तुलजापुराहून आलिया त्यास रवाना करावे. परंतु बंधुजी आलियावर कोनती तजवीज मुकरर ते पाहवी. येथे कितेक सिलेदार आहे याचा मनोदय की श्रीमताची नौकरी करावी यांसी पाच लक्ष रुपये ज्याजती खर्च

+ चावते (?) = दुखतें.

केलियां, परस्तुत अबिकाबाईच्या फौजेचा व कूल दाभाडीयाचे फौजेचा जमाव उठतो. येथून लोक आज उठोन सेवेसी येतात. यासीं यैवज देवापुरी गोसावी सातारीयासी यैवज अनायासी गेला आहे, तो गुप्तरूपे यैवज घेऊन येणार. याजपासून घेऊन त्याजला रेवातीरास तपस्चर्येस पाठवावे. मातुश्री उमाबाईचा गांव खानदेशात कलमसर आहे त्यास मल्हारजी होळकराने मोरचे लाविले तेथे काही यैवज मातुश्रीचा आहे म्हणोन मातुश्री कस्टी आहे. दुसर वर्तमान मातुश्रीपासी कोन्ही सागितलें की मल्हारजी होळकर भोडगावास लागला. लवग-पुरीपासीं पाच लक्ष रुपये मागतात. हे यैकून बहुत गडबडू अबिकाबाईस रवाना केले. जानोजी माहाराव निबालकर यासी नवाब नासरजगानी ज्ञानमठी ठेविले. त्यावर इतराजी फार. मोरोपतान कुफराना केला यैसे वर्तमान रामराय दिवान पाढरी याचा त्याचा पुत्र श्रीनिवासराऊ त्याने सागितले ही विज्ञाप्त. रा। मल्हारजी होळकराने भोडगावास पीडा केली म्हणोन किवा काये त्यास सुचले म्हणोन येकटा येक कूच करून मजल दरमजल अबिकाबाई जाणार. श्रीमतानी फौजेची आपनाजवळ करावी. लोकास ताकीद सावधतेची केली पाहिजे. येथला मनोदये विपरीत आहेत, तह्रावर नाही. हेही सावध जाली व दमाजीनी सात हजारा स्वार नालबदी दिधली हे विज्ञाप्त.

¶*This is a news-letter from Krishnarao Govind to the Peshwa reporting the deliberations and plans formed by Ambikabai and Umabai Dabhade against the Peshwa, to prevent the latter from taking possession of the half share of the Province of Gujarat.*

No. 67] [*September 1750*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीनी पुसेसांवली येथील मुकामीहून पत्रें पाठविलें तेथे आज्ञा केली कीं, राजश्री प्रतिनिधि नवरात्राचा उत्साह करीत असतात सांप्रत ते दिवस आले याकारितां त्यास पुसोन सांगतील त्याप्रो साहित्य हजार दोन हजार रुो लागले तरी लाऊन करून देणे म्हणौन लिहिले होते. त्यावरून राजश्री प्रतिनिधीस विनंती केली कीं, नवरात्राचे उत्साहाचे साहित्याची आज्ञा करावी याप्रो करून देऊ. त्यास त्याणी आज्ञा केली कीं, देवाच्या मुहूर्ती थोर आहेत या तेथेंच राहिल्या, याकारितां उत्साह करावयाचे प्रयोजन नाहीं. येखादा दूसरा

ब्राम्हण सप्तशतीचे जपास घालून उपास मात्र करूं याप्रो आज्ञा केली. सेवेसी विदित व्हावे म्हणौन लिहिले असे. प्रतिनिधि राहिले आहेत, त्या घरांत त्याजकडील लोकास व आम्हास बसावयासी अडचणच होते व चौकीच्या लोकास बसावयासी जागा नाही. यास्तव स्वामीनी येक डेरा कनातासमेत पाठविलिया बसावयाची व चौकीच्या लोकांची बेगमी होईल. +सेवेसी श्रुत जाले पाहिजे. आंबेमोहराच्या तादलावरी प्रतिनिधीची भक्ती आहे तरी तादूळ आंबेमोहराचे कैली ८२ दोन मण पाठवावयास आज्ञा केली पाहिजे हे विनंती.

¶*Shripatrao Bapuji informs the Peshwa that the Pratinidhi who was in confinement did not wish to celebrate the Navaratra ceremony as usual. He would observe a fast and finish the fixture.*

No. 68] *[1750*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
नानासाहेबाचे सेवेसी

८ श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत सदा राजमान्ये स्नो लक्षेधीरजी दलपती राऊ प्रांत पेठ दंडवत विनती उपर. येथील कुशल जाणोन स्वानंद-लेखण आज्ञा केली पाहिजे. यानंतर कृपा करून आज्ञापत्र सादर केले की लग्नास येणें. त्यास आज्ञेस अवज्ञा नाही, परंतु सांप्रतच सेवेहून आज्ञा घेऊन आलो होतो. दिवस लावणीचे याप्रांताचे हेच आहेत. निमित्ये आज्ञेप्रमाणे मुलीस सेवेसी पाा आहे पावतील. आम्ही पदरचे आहो. सर्व प्रकारे पदरी पडलो आहो. लज्या माहाराजास आहे. आमचा जैसा अभिमान चिती धरिला आहे तैसा अभिमान सेवटास लाविला पाहिजे व सेवेसी मामा बधनजी मुलीबराबर पाा आहेत हे व रा आत्माजी बाबूराये आमचे सविस्तर वर्तमान घरकृत्याचे व सुरतेकडील व इतर येक वर्तमान आहे ते सर्व विनती करितील ते श्रवण करून उतर पाा पाहिजे, त्याप्रमाणे वर्तनूक केली जाईल. विशेश काये लिा हे विनंती.

¶*Lakshadhir Dalpatrao expresses regret at his inability to attend a marriage ceremony in the Peshwa's family. Possibly it is Bhausaheb's second marriage which was celebrated in the year 1750. The purport of this and of No. 64 is the same.*

\+ पत्र श्रीपतराव बापूजीचें आहे.

No. 69] [1750

श्रीभार्गवराम

श्रीमंत तीर्थस्वरूप राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

आपत्यें समान जगनाथ चिमणाजी मो धावडसी कृा सा ना विा येथील क्षेम ताा छ २ रमजानपर्यंत स्वामीचे कृपेकडोन क्षेम असे विशेष. स्वामीने पेशजी पत्रे पाठविली ते प्रविष्टकाली बहुत समाधान जाहाले. सदैव पत्रीं कृपा करावयासी स्वामी समर्थ आहेत. श्रीच्या पुण्यतिथीच्या मोहोच्छाहास प्रारंभ आजी च्यार दिवस जाहाला आहे. वार्शिक प्रा ब्राम्हणसंतर्पण व हरदास गोसावी आले. हरिकिर्तनहि होत आहे. नवदिवस अन्नशांत होईल. थोडेबहुत पीठमीठ केले ते खर्च करूं, परंतु बिदाईचे संकट पडिले आहे. समय तो रक्षिला पाहिजे. राजश्री विष्णुपंत अद्यापि काही अनकूल करीत नाही. नूतन कागदपत्र व खतें मनास येईल तैसी करून श्रीच्या यैवजाचा अभिलास करणार. इमारत तो पडिलीच आहे. राजश्री रघोजी भोसले याचा आमचा संबंध नसता व विष्णुपताचा व आमचा संकेतहि आजीपर्यंत रघोजीचे नावाचा नाही यैसे असोन काल साताराचे मुकामी आपले नावाचे खत रघोजीचे होते ते आमचे नावाचे करून घेऊन आपणाजवल ठेविले. मागले मितीचे खत क्रित्रिम केले आहे. कोणाचे यैकोन निकालावर यावे यैसे त्यांचे चितात नाही. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. विस्तारे किती ल्याहावे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना. राा नानास व राा गोविंदराऊ यांसी येविसी पत्र देवावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶Jagannath Chimnaji ruquests the Peshwa for help in celebrating the day of the anniversary of the Swami of Dhavadshi. There is towards the end of the letter, a complaint against Raghoji Bhonsle and Vishnupant regarding a document.

No. 70] [26-3-1751

॥ श्रीविठलराज प्रसन ॥

श्रीमंत माहाराजधिराज गोब्राम्हण-
प्रतिपालक राजेश्री स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारायेण तुकदेव साा नाा विनंति उपर येथील क्षेम ताा छ ९ जमादिलावल स्वामीचे प्रतापे येथास्थित असे. यानंतर काल छ ८ रोजी संध्याकाळीं राा तुबाजीपंत व राा केशोराव व राा विठलपंत अले. राा भुजंगराव पुढे इस्तकबल पाठऊन डेरियात दाखल केले. मग प्रहरा रात्री राा मुराररायाची

भेट जाली. परस्पर स्नेहाची उतरे बोलून उदईक मसलहत मोकरर करून स्वामीचे सेवेसी पत्र लिा यैस ठहरावलं. मग अज दीढ प्रहरपावेतो आपले जागा द्रष्ट विचार करून रा तुबाजीपंतास व आम्हास बोलाऊन सांगितलें की आम्हास श्रीमंताची भेटी घेण हेच मुख्यार्थ आहे. आपण पत्र लिहितो. तुम्हीहि लिा त्यास गुरुवारी येथून कूच करून येतील. पौर्निमा किंवा प्रतिपदेस भेटी घ्यावी हा निश्चेय जाला. त्यानी वीस श्वार आपले पत्र देऊन पाठविले असेत. आता काही अनमान दिसत नाही. श्रुत जाल पाहिजे बहुत काय लिा हे विनंति.

¶*Narayan Tukdev informs the Peshwa that Murarrao Ghorpade had agreed to proceed on his march to meet the Peshwa.*

No. 71] [*30-3-1751*

॥ श्रीविठलराज प्रसन ॥

श्रीमंत माहाराजधिराज गोब्राम्हण-
प्रतिपालक राजेश्री स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारायेण तुकदेव सा नमस्कार विनंति उपर. येथील क्षेम ताा छ १३ जमादिलावल मुकाम कृष्णातीर स्वामीचे प्रतापे येथास्थित असे. यानंतर काल तिसरा प्रहरा सांडनीश्वार अले तेथ आज्ञा की रा मुराररायास येत असतील तर सत्वर घेऊन येण. त्याच जाब तेच समई लिहून जासुदाबराबर सेवेसी पाठविला. पावली असेल. अज प्राथकाली यांनी कूच करून कृष्णातीरावर अले. याजला स्वामी दरशणाचीच इच्छा अहे. हे म्हणतात की सैन्याची वाट तो कृष्णातीरच अहे. समीप लशकर अलं म्हणजे अनिकहि पाच कोस येऊन भेटी घेऊ. याहीवर जैसी आज्ञा होईल तैस केल जाईल. विशेष काये लिा. येथून काडलूर संगम दीढ कोस असे. हे विज्ञाप्ति. छ. मारी तिसरा प्रहरा सांडनीश्वार रा वजारतमाबानी रवाना केले. श्रुत जाल पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Narayan Tukdev whom the Peshwa had despatched to bring Murarrao Ghorpade writes to inform him that Ghorpade was ready to join the Peshwa as soon as he drew near. As the Peshwa had to return suddenly to Poona owing to Damaji Gaikwad's rebellion, Ghorpade does not seem to have met the Peshwa at this time.*

No. 72] [*29-3-1751*

॥ श्रीविठलराज प्रसन ॥

श्रीमंत माहाराजधिराज गोब्राम्हण-
प्रतिपालक राजेश्री स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक नारायेण तुकदेव सा ना विनंति उपर. येथील क्षेम ताा छ १२ माहे जमादिलावल मुकाम देवरसुगर येथून कृष्णातीर दोन कोस स्वामीचे प्रताप-

येथास्थित असे. यानंतर कृपा करून दयापत्र पाठविले ते सांडणीश्वाराबराबर तिसरा प्रहरा छ मारी पावल. परम समाधान जाल. रा मुराररायास भेटीस सत्वर घेऊन येण म्हणोन आज्ञा त्यास रा तुबाजीपंत व रा केशेराव अले. त्यानी सांगितले की स्वामीच येण काडलरसंगमाकडे होत आहे म्हणोन रा मुराररायास घेऊन या रूखं आलो. त्यास लशकर तो दूर राहिल. त्यास यांचा हेत कीं आपण तीन कूच करून आलो. स्वामीनीहि येकदोन कूच करून यावं. त्यास हे उदईक शेनवारी कृष्णातीरास येताती. स्वामी समिप आल्यानं अनिकहि च्यार पाच कोस येतील. मुरारराव तो म्हणताती की अपण येथवर अलो अता पुढे अमच येण कसं होतं. परंतु त्याचे मुतसदी त्याचे रूबरूच म्हणताती की अनिकहि पाच कोस पुढे कृष्णेचे तीरानच येऊ, परंतु स्वामीनी येकदोन कूच करून अलं पाहिजे. मूळ हे अता भेटीस निश्चेयात्मक येताती. काही अनमान नाही श्रुत जाले पाहिजे. बहुत काये लिा हे विज्ञाप्ति.

¶*Narayan Tukdev informs the Peshwa that Murarrao Ghorpade had proceeded a few marches to meet the Peshwa.*

No. 73] [*28-3-1751*

॥ श्रीविठलराजप्रसन ॥

श्रीमंत माहाराजधिराज
गौब्राम्हणप्रतिपालक राजेश्री
स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक नारायेण तुकदेव साा नाा विनंति उपरी. येथील क्षेम ताा छ ११ जमादिलावल स्वामीचे प्रताप येथास्थित असे. अज गुरुवारी रा वजारतमाब यानी कूच करून रायेचुराजवळ उतरतील. अइतवारी दरशण घेणार असेत. श्रुत जाले पाहिजे बहुत काये लिा हे विनंति.

¶*Narayan Tukdev informs the Peshwa that Murarrao Ghorpade was proceeding towards Raichur to meet the Peshwa.*

No. 74] [*1751 ?*


श्री

श्रीमंत माहाराज राजश्री नाना-
साहेब साहेबांचे शेवेसी

ऽ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री
लक्षधीर दलपतीराव प्रांत पेठ दंडवत विनंति. येथील कुशल जाणोन स्वकीये

कुशल स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. आमचे वर्तमान माहाराजाचे कृपोदृष्टीकरून येथास्थित असे विशेष. बहुत दिवस माहाराजाकडील संतोषावृत कलले नव्हते त्यावरून चितास परम उदासीनता होती. त्यास रा धनजी मामा व चिरंजीव करामतजी यांचे पत्र आलें की माहाराज सेनासहवर्तमान सातारियास आले. त्यावरून परम आल्हाद जाला. यैसियास येंदा सेवेसी आपणच यावे यैसा बेत होता, परंतु शरीरीं सावकाश नव्हते याजकरितां रा मामांस व चिरंजिवास पाठविले. त्याजवर पूर्ण कृपा ठेऊन सर्व प्रकारे गौर केला म्हणून त्याणी आम्हास लिहिले. त्यास आम्ही तर सर्वस्वें आपले कृपांकित म्हणवितो. दुसरा अर्थ नाहीं, आमचे सर्व पदार्थें चालविणे संकट माहाराजास आहे. साद्यंत वर्तमान रा मामा व चिरंजीवाचे पत्रीं लिहिले आहे. सेवेसी निवेदन करितील त्यावरून श्रुत होईल. माहाराजांची स्वारी त्या प्रांती गेलियावर कुसाजी देसमुख याणे फारसा उपद्रव केला, येविसी त्यास आज्ञापत्र सादर केले पाहिजे. यानंतर येंदा जेष्टमासी आपले लग्न कर्तव्य आहे व चिरंजिवाच्या सुनता करणें त्यास सुनतांचे, साहित्य पूर्वीच करून पाठविले आहे. लग्नांचे साहित्य करणार आपण समर्थ आहेत. कृपालु होऊन बेगमी केली पाहिजे. सारांष आम्हास माहाराजांचे चरणाविरहित आश्रये दुसरा आहे नाही हें आपण जाणतात. विशेष काये ल्याहावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Lakshdhir Dalpatrao—the father-in-law of Samsher-Bahadar expresses to the Peshwa his gratefulness for the help and kind attention. He solicits the Peshwa's help for the incision ceremony of his son. The genealogy of this ruling family of Penth as given in the Gazetteer of the Nasik District is given below and can be usefully consulted :—*



No. 75] [28-4-1752

पो छ २४ जमादिलाखर

श्री

श्रीमंत माहाराजधिराज गौब्राम्हण-
प्रतिपालक अखंडितप्रतापवंत
अवतारपुरुष राजमान्ये राजश्री
भाऊसाहेबाचे सेवेसी

आज्ञांकित राजे बिरजनाथ दास बाहादूर सा। दंडवत विनात उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनार्थ विषो लेखकास आज्ञा केली पा। विशेष. अपली तीन कृपापत्रें लस्करांत येजमानापासी पावली, परंतु सेवक येजमानापासी पावला नवता. सबब की सिधटेकचे मुकामीहून श्रीमंत थोरले साहेबाची आज्ञा घेऊन पंढरपुरास आलो, तो उदाजी चव्हाण दोहजारा फौज सवे आले. यास्तव दाहापंधरा मुकाम करून हजार पाचसे लोक ठेऊन विज्यापुरास आलो. वर्तमान यैकिले की नवाबसाहेब अदवणीहून रायेचुरास येऊन कलबरगियाकडे गेले. हें वर्तमान यैकोन मीहि विज्यापुरीहून चालिली. ते फिरत फिरत आलंदचे मुकामी छ २० रोजी मुलाजमत केली. सविस्तर वर्तमान श्रीमंताही जो करार करून सेवकास आज्ञा * * * * * ते त्याप्रमाणे समजाऊन सांगितले. सेवक येजमानापासी पावला नवता, म्हणून बंधूकडे जावयाचा उद्योग केला होता. तो मनसुबा फिरऊन धारूरचा मार्ग सोडून कल्याणचा मार्ग धरिला. तेथे मुकाम करून आपले उतराची प्रतीक्षा करतील. जैसी आपली आज्ञा येईल तदनुसार वर्तणूक केली जाईल. विष्णुपंतास सेवेसी पाठविले आहेत मागाहून पावतील. सविस्तर मुखवचने विनंती करतील ते मान्ये करून येजमानास समाधानाचे पत्र व वस्त्रें बहुमानसहीत पाठविली पाहिजेत. सेवक माहाराजाचे आज्ञेविरहित नाही. आपले पदरचा माणून निरंतर कृपा करीत असिले पाहिजे. येथें ऐकिलियांत आले कीं आमचे नवाबसाहेबाकडेहि काही सैन्य पा * * * * हे तर त्याचें काही कारण नाही. इकडून दुसरा प्रकार कोणेहि प्रकारे नाही. पाठविल्या लोकास हजूर बोलाऊन घेतले पाहिजे. विशेष काये लिहिणे हे विनंति.

¶*Raja Brijanath informs Bhausaheb that according to the instructions from the Peshwa he had gone to Pandharpur where he was detained for a fortnight owing to the rising of Udaji Chavan. The writer then proceeded to Aland and interviewed the Nizam.*

6900

No. 76] [30-9-1752

पो छ २१ जिलकाद सुा
सल्लास खमसैन मया अलफ

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ २० जिलकादपर्यंत साहेबांचे कृपादृष्टीकरून सेवकाचे व हुजरातीचे वर्तमान येथास्थित असे. राजेश्री कान्होजी मोहिते यांचा आमचा कजिया जाला ते पत्र तपसीलवार सेवेसी लिहिले त्यावरून शृत जालेच आसेल. आजी त्यानी पत्र पाठविले होते की तुम्ही जुजास तयार होणे म्हणून पत्र आले. ऐसियास परवांचे दिवसी घोडियाखाली आले होते तेव्हाच दाटी करून धरावे, परंतु लोक अनिवार याकरितां मागे सरून त्यास वाट दिली. यैसे असतां त्यानी पत्र पाठविले तो मार सेवेसी लिहिला, येविशी आज्ञा करणे ते उदईक सूर्योदयापूर्वी पावली पाहिजे. त्या आज्ञेप्रा वर्तणूक केली जाईल. सरकारचे लोक जखमी जाले त्याकरितां फकीर महमद तबीब उदईक दो प्रहरा पोहोचे ते करावे आणि लोकास पोटास नाही, व जखम सेकावयासी पैसा नाही, यामुले सेवकाची गति बरी नाही, याकरिता एक आज्ञापत्र * * * * * * गीचे गाऊ आहेत त्यापैकी यैवज देविला पाहिजे, म्हणजे लोकाची दिलबरी होऊन कामकाज साहेब-सेवेसी होईल. सरकारच्या पोत्यापैकी चिठ्या आल्या आहेत त्याप्रो ऐवज लोकास पाठवावा. येथे खर्चाची बहुत ओढ आहे याकरितां सेवेसी विनंती लि(हिली) ती उदास न करोन सेवकाचा व हुजरातीचा परामृश करणार साहेब समर्थ आहेत. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*The writer refers to a scuffle between him and Kanhoji Mohite in which the latter was almost captured but was let off owing to the large number of followers with him. He also asks for more money.*

No. 77] [3-10-1752

श्रीमंत माहाराज
राजश्री नानासाहेबाचे सेवेसी

ॐ श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत सदा राजमान्य श्री करा-मतजी दंडवत विनंति उपरी. भाद्रपद वद्य ११ मंगलवारी माहाराज साहेबास वैकुंठवास जाला. ईस्वरे मोठा घात केला. आता सर्व प्रकारे माहाराजाचे पदरी पडलो आहो. आमचे चालवने माहाराजास आहे. सर्व लज्जा माहाराजास आहे. सविस्तर वर्तमान सेवेसी आलियावर विनंती करणे ते करू. माहाराजास

6901

वर्तमान कलावे म्हणोन लिहिले आसे. आमचेविशई पत्रे येक रा। बहिरजी बलकवडे यास व येक रा। त्रिबक सूर्याजी यास द्यावी व येक रा। विठल सिवदेव यास व येक रा। हरि कृष्ण यास यैसी पत्रे द्यावी की हरयेकविशई आमचे साहित्य करतील. आता अम्हास सर्व आश्रा माहाराजाचे पाये याचा आहे. बहुत काये लिहिणे हे विनंति.

¶*Karamatji informs the Peshwa Nanasaheb of the death probably of the writer's father Lakshadhir Dalapatraj and requests him to continue the same favour thereafter towards the writer.*

No. 78] *[6-12-1752*

श्री

श्रीमत सकलगुणालंकरण अखंडित-
यैस्वर्यसंपन्न राजमान्य राजश्री
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णाजी भास्कर गुरकार सवस्थान सोंधा कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील कुषल आंगीर संवछर मार्गसीर सुध प्रतिपदा ता। कुशल असो. स्वामीनी आपणाकडील स्वानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर संस्थानास थैली व आम्हांस पत्र प्रेषिले पावोन आनंदोत्सव जाहाला. लेखन केले जे, फिरंगीयाणे संस्थानच्या प्रांतास उपसर्ग लाविला आहे म्हणोन परस्पर विदित जाहाले. यैसियास संस्थानचा व फिरंगीयाचा घरोबा चालत असतां प्रस्तुत त्याणें यैसी वर्तणूक करावयास कारण काये? जर पूर्वरीतीप्रमाणे वर्तणूक करील. तर उत्तम; नहून[१] बेमानीच आरंभिलिया खबरदार असोन इकडेहि सूचना करणे; त्यासारिखे साहित्य उपराला केला जाईल म्हणौन आज्ञा केली. तर संस्थानचा व फिरंगीयाचा घरोबा चालत होता. परत आज दाहाबारा वर्षांमध्यें फिरंगी बलवंत होऊन राजश्री सांवताचा प्रांत हस्तगत करून, देवब्राम्हणाचा उत्सेद करून पांच वर्षे अनभविलीं. त्यास सजा पावला नाहीं. तेव्हां संस्थानच्या स्थळाची इछा होऊन निमित्य लाविले जे, इंग्रेज कडवाड बंदरास राहातां नये. त्यांस बाहीर घालावे म्हणौन. त्यास इंग्रेजाची वखार कडवाड बंदरास संस्थानाहून दिली म्हणावयाची नाहीं. आदलशाई, मोगलाई व सिवशाईपासूनं कडवाड बंदरी वखार असोन सावकारी करीत आले होते. त्याचप्रमाणें संस्थानातूनहि त्यांस चालविलें साठ पांसष्ट वर्षें होते. सांप्रत दाहापंधरा वर्षी उदीमव्यवसाये होत नाहीं, याकरिता मुतालिकास ठेऊन मुंबैस गेले. सांप्रत दोन वर्षें

---

१ नाहीतर.

6902

कडवाड बंदरास आले. सावकारी करीत आहेत. नहून नूतन त्यांस' आणून ठेविले यैसे नसतां उगेच त्याचे निमित्य करून संस्थानावर अतिशये आरंभून कडवाड बंदर घेऊन इंग्रेजासहि जाणें म्हणोन लाविले आहे व देवब्राम्हणाचाहि उछेद आरंभिला आहे; व वसईकडील आज दोन वर्षे धरून त्या उद्योगावरहि आहेत; याप्रमाणे धिगाई आरांभली आहे. तेव्हा त्यांचा विनाशकाल समीप प्राप्त जाहाल्याकरितां यैश्या वासना जाहल्या आहेत. त्यास संस्थानावर अतिशये आरंभिली याची खबर परस्पर यैकोन तद्विषई संस्थानास पत्रे प्रेषिलीं व तद्विषई साहित्य उपराला करीत आहों म्हणोन वज्रलेप वचन प्रेषिले. तेव्हां फिरंगियाचा लये होऊन देवब्राम्हणाची स्थापना होऊन हिंदु धर्म राखिला यैसा कृतनिश्चये मानिलाच.- स्वामी देवब्राम्हणप्रतिपालक व साभिमानी, ईश्वरांश, दैत्यांशविनाशक, स्वधर्मपालक व तद्विषई धर्मसंस्थानास वचन दिल्याप्रमाणे नसराणियास सीघ्र नशीयेत होऊन सत्‌धर्म संस्थानाचे कल्याण व देवब्राम्हणाची स्थापना होये आणि स्वप्रतिज्ञा पाळण करावयास सर्वज्ञ आहेत, यात्रिसी संस्थानातून थैली पाठविली आहे, त्यावरून स्वांतास येईल, व उपरालेविसीं राजश्री पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम यांस लिहीत जाणें, ते साहित्य पुरवितील म्हणौन प्रेषिलें; तेव्हां श्रीमंत ज्यास आज्ञा करतील त्यासच संस्थानाहून जाणवितील. तदनुसार त्यासहि लिहिले आहे. तेहि विज्ञापना जाणवितील त्यावरून स्वांतास येईल. पूर्वीपासून वडिलांवडिलानीं संस्थानचा अभिमान धरून कित्येक प्रकारे चालविले आहे. त्याहून संस्थानचा अभिमान स्वामीनी विशेष धरून वचन दिले आहे; तदनुसार संस्थानचे कल्याण होऊन, टोपीकार सजा पावोन देवब्राम्हणाची स्थापना होऊन श्रीमंताची प्रतिज्ञा सिधीस जाऊन आचंद्रार्क त्रैलोक्यात कीर्ति विस्तार होये ते करणार समर्थ सिखामणी आहेत. तेव्हां अधुना विशेष कार्ये लिहावें. कृपा पूर्ण असावी.

¶*Krishnaji Bhaskar is grateful to the Peshwa for his promise of help to the Sonda chief against the Portuguese aggression on the state. This affair of the Portuguese persecutions on the Malabar Coast has not been much known in current history.*

No. 79] [*January 1753*

मसुदा

श्री

राजश्री तुळाजी आंगरे सरखेल

गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद विनंतीं उपरी: येथील कुशल जाणौन स्वकीये

6903

कुशल लेखन केलें पाहिजे. यानंतर राजश्री भगवंतराव पंडित अमात्य याचा किला बावडा त्याचा तनखा खेडी व वतने खारेपाटण माहालचे सरदेशमुखी व सालसी माहालचे सरदेशमुखी व वतनी गाव आहेत तेथील ऐवज सुधामतप्रो पावावा. त्यास तुम्हाकडील उपद्रव लागतो. वतने व इनाम गाव तुम्ही आपणाकडे ठेविली आहेत. किल्याचे तनख्याचे गावास उपद्रव करितां. प्रस्तुत किल्याखालील गावीं स्वारी पाठऊन लांकडे सागवानी तोडवितां, रयतेस धास्त निर्माण जाहाली आहे म्हणोन कळो आले. ऐसियांसी तुमच्या वडिलीं राजश्री पंत आमात्य यासीं निष्ठेनेच वर्तणूक केली. हरयेकविसीं ममता धरून स्नेहभाव चालविला त्याप्रा तुम्ही घरोबा चालविल्याने उत्तम आहे. प्रस्तुत राजश्री भगवंतराऊ अमात्य श्रीमंत माहाराजासंन्निध आहेत. त्यांचे सर्वप्रकारें आवश्यक आहे. आम्हासहि त्यांच्या साहित्याविसीं अगत्य जाणौन हें पत्र तुम्हांस लिा आहे; तरीं यांच्या जिल्ह्यामध्यें किल्याचे गांव व इनामगांव व वतनें पूर्वीं चालत आली आहेत, त्याप्रा चालोन, तुमचा यांचा स्नेह चाले ते गोष्टी केली पाहिजे. वडिलार्जित स्नेहाभिवृध केल्याने उचित असे. पुनरोक्त येविसींचा लेख न होये; आणि तुमचा यांचा स्नेह चाले तो अर्थ केला पाहिजे.

¶*The Peshwa censures the unfriendly attitude of Tulaji Angria towards Bhagwantrao Amatya and requests that the cordial relations which subsisted between his father and the Amatya should be continued for their mutual good.*

No. 80] [15-4-1753

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी-
चे सेवेसी

आज्ञाधारक विसाजी नारयेण चरणावर मस्तक देऊन सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा चैत्र शुध त्रयोदसी रविवार मुकाम यादवाड येथे स्वामीच्या तपेतेजेकरून सुखरूप आसो. यानंतर येक दोन पत्रे लिहिली त्याचा जाबसाल लिहिलेप्रमाणे आला नाहीं म्हणोन रा भिमापा देसाई परम दिलगीर आहेत. तर खासी स्वारी सवणूर प्रंती आली हे यैकोन परम उल्हस जाहाला. या लोकांस स्वारी फिरून येईल हा भरवसा नवता, परंतु आपले आनुष्टानाचे सामर्थ विशेष तेणेकडू सर्वाची मुखे शामवर्ण जाली. मजल दरमजल लस्कर देसास चालले यैसे वर्तमान यैकोन देसाई परम श्रमी आहेत कीं, आमचा जाबसाल व बोल सुटली नाहीं. आम्ही याचक वृतीने आठ महिने वाट पाहातो. यैसियास आपण

सवणुरावर येणे जाहाले तर सवणूरकरास हटकून तिसा हजाराचा निशा ? करून वोल सवजतीस+ देसाई यांजकडे आहे. तर सवणूरकरांचे पत्र नवलगुंदकरास आले म्हणजे वोलीची (ची) मुक्तता होईल. रा॥ भिमापा देसाई यांनी भेटीस कोठे यावे ते पत्री लिहिले म्हणजे त्यासारिखे तरतूद करून येतील. रा॥ रामचंद्र आणाजीनी नाजूक कार्याविशीं जाऊन सवजतीस बैसले होते. पांडबा यादवाडाहून मनोलीस गे(ले). सिंदे यांचा निरोप व पत्रें घेऊन रा॥ विठल विश्राम फवजेसहवर्तमान आम्ही येकोन सामोरे जातेसमई सवजतीस गेले. रा॥ रामचंद्र आणजीची व त्यांची भेटी जाहाली, तेसमई नाजूक कार्याचा मनसबा सर्वहि त्यांस सांगितला. तेव्हां त्यानी सर्व गोष्टीचा भरवसा देऊन फिरोन मनोलीस आले. सिंदे यांस नानाप्रकारें सांगोन सिंदे व रा॥ देवजी मोहिते व च्यार पांचसें रा॥ रामचंद्रपंताचे प्यादे हजार ऐसे घेऊन निघाले ते नाजूक कार्याचे ठिकाणास गेले. तो सूर्यउदय जाहला. कार्य नासले. याचा विस्तार अगोधर पत्र लिहिले आहे त्याजवरून कळेल. आपणास पत्र पंतांनीं लिहिले आहे, तें ध्यानास आणून त्याचा जाबसाल समर्पक आलियानें समाधान होईल. भेटीचे प्रसंगास यांस व रा॥ देसाई यांस आज्ञा कराल त्याप्रमाणें देतील. सवेसीं श्रु* होय हे विज्ञापना.

¶*Visaji Narayan writes to the Peshwa from Yadwad, expressing his delight at the arrival of the Peshwa at Savnur and reporting the regret of Bhimappa Desai in being unable to meet the Peshwa and get his disputes adjusted.*

√*No. 81*] [*19-4-1753*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गणेश बलाल दामले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १४ जाखर मु॥ वेरवळी प्रांत देवले नजीक विशालगड तलघाट स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी पत्री आबाजी नाईक बाबूजी नाईक युध्यप्रसंगी गर्वभंग होऊन राजश्री प्रतिनिधि यशस्वी होऊन साताराचे ग्रहस्त त्याची उभारणी करणार व मातुश्री सतोशी जाली याचे वृत सेवेसी लिहून पाठविले ते विदित जाहालेच असेल. पुढे विशालगडास आंगरे याचा मोर्चा लागला. इकडे प्रतिनिधीस जाणे जरूर, परंतु वसंतगडचे पारिपत्य करावे म्हणौन वसंतगडास लागलो. तेथे प्रतिनिधि आणा अनमान करीत होते, तेव्हा त्यासी बीर देऊन तेथे राहून तेथील तहरह करून राजश्री कानोजी मोहिते

+ मौंदत्ती येथें.

6905

आपल्या विद्यमाने भेटऊन त्यासी आपले मर्जीत स्वामीच्या आज्ञेत वर्तत हे निराले मार्गे कितेक पुढे आईसाहेबाकडील मर्जी ठिकाणी आणून द्यावी याविसी आणक्रिया घेऊन त्यात त्याचे कल्याण स्वामीची सेवा घडोन याची याअन्वये बुधिवाद सागोन समागमे घेऊन आलो. त्यासी मध्ये याणी त्याची मर्जी बिघडून मागती किलेया-वरी जाऊन धामधूम माडिली. तेव्हा फिरोन त्याजकडे पत्रे पाठऊन आणा मसुरेस आहेत तेथे आणिले आणि विशालगडचे कुमकेस आलो. राजश्री दादोपंत अनमान करीत होते, परंतु बाबूजी नाईक याचे युध्य जाल्यास दुसरे दिवसी आलो. समयास आलो नाही. तेव्हा पुढे याजवरी काही स्वामीचा उपकार जाहाला पाहिजे यैसे समजोन राजश्री दादोपंतास श्रीमंताची मर्जी आहे यैसे सागोन इकडे आणिले. तो स्वामीची पत्रे प्रतिनिधीस आली की विशालगडिचे कुमकेस आमची फौज व आपली फौज देऊन साहित्य करणे. श्रीमंत राजश्री विस्वासराऊ स्वामीची पत्रे आली की विनापरवानगी जावयाचे नव्हते. त्यासी पत्रे पुणियासी पाठविली त्याचे प्रतिउत्तर येक मास न ये. तेव्हा राजश्री दिनकरपंत यासी पत्र लिहिले त्याचे उत्तर आले की विशालगडचे कुमकेसे जाणे त्यावरून आलो. नंतर विशा(ल)गडास आलो, तो प्रतिनिधि समागमे सातसे राऊत हशम विशालगडचे मनास आणिता सात आठसे त्यासी पोटास नाही. गडाखाली दोन कोसावरी मेढे त्यात माणूस किती आहे ती बातमी नाही. अमृतराऊ सत्यभामाबाई येक नाही. किल्यावरी कारभारी सेंभर यैसे जाणून मेढेयांत शंकराजी विस्वासराऊ होते त्यास पत्र लिहिले. त्यात लिहिले, पुरातन आम्ही सरखेलच्या राज्यातील, या प्रसंगी आमच्या श्रीमंतानी या श्रीमंताच्या साहित्यास पाठविले आहे. तुमचे ठाई मानाजी पायेगुडे याची घोडे बारगीर नेले आहेत ते सल हृदयांत आहे. प्रतिनिधीसी आपण लाविले तेहि तुमचेठाई विरुध, तेव्हा खाली उतरल्यास मुलुकाची खराबी होईल तरी प्रसंगी आम्ही आहो. चाकरी सरखेल घेतील तरी करून दाखऊ. या अन्वये-लिहून त्याजकडील मध्यस्त आणून मुलुकाचा नाश न करिता मेढे उठऊन लाऊन प्रतिनिधि सरखेल याच्या भेटी कराव्या निश्चयात आणून छ मारी दर्शनास आगरे पुढे येणार, आम्ही पुढे जावे म्हणून निघोन गेलो. येविसीचे व स्वामी सेवा कोणे-रितीने करितो याचे वृत राजश्री गोविंदराऊ लिहितील व दर्शनाती निवेदन करितील; व राजश्री दिनकरपंत यासी आमचे मध्यस्तीने ह्या गोष्टी जाल्या कार्याच्या नाहीं म्हणौन रा दादोपंतास पत्रे कसी लिहिली आहेत तेहि निवेदन गोविंदराऊ करितील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Ballal informs the Peshwa of the difficulties he had encountered in assaulting the fort of Vishalgad and in effecting reconciliation between the Pratinidhi and Angria.*

No. 82] [19-8-1753

श्री

राजश्री माहादाजीपंत
गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उंपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. दिलीस सार्वभौमाकडील वकिलीचे प्रयोजन राजश्री कृष्णाजी केशव यांस सांगोन पाठविले आहेत. त्यास राजश्री पंतप्रधान यांजकडील दिलीचे वकील राजश्री दामोदर माहादेव सांप्रत पुण्यांतच आहेत, तरी गोसावी यानी स्वमुखें जे सांगणे ते सांगोन यांची त्याची ऐक्यता करून देविली पाहिजे व पंडित मारनिलेची पत्रे पातशाहास व मनसूरआलीखा यांस मारनिले सांगतील त्याप्रमाणे देवावी. आपले भरोसियावरी यांस पाठविले [शिक्का] आहेत. तरी लिहिल्याप्रमाणे यांचे साहित्य होऊन येई तो अर्थ केला पाहिजे. रा छ १९ माहे शौवाल बहुत काये लिहिणे लोभ आसू दीजे हे विनंती.

¶*Raghuji Bhonsle requests Mahadoba Purandare to recommend to the Hingnes, Krishnaji Keshao whom the writer has appointed his representative at the Court of Delhi.*

No. 83] [8-2-1754

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री त्रिंबकराव स्वामीचे शेवेसी

पोष्य जनार्दन बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता छ २१ राखर जाणून स्वकीयें कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले तें पावले. तीर्थस्वरूप राजश्री गणपतराव मामा यांस माघ वद्य प्रतिपदेस शुक्रवारी देवआज्ञा जाहाली म्हणून लिहिले ते कळलें, ईस्वरें बहुत गोष्ट वाईट केली. ईस्वरी सत्तेस उपाये नाही. ईस्वरी सत्ता प्रमाण. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ असों दीजे हे विनंति.

¶*Janardan Ballal Fadnis communicates to Trimbakrao the news of the death of Ganapatrao Mehendale.*

No. 84] [6-10-1754

श्रीरामोजयति

सेवेसी विज्ञापना रामचंद्रबावा याचे वर्तमान केशवराव हरकारे याचे घरी आले. आश्विन वद्य पंचमीस काल जाहाला. दोन तुला सोन्याच्या व दोन तुला रुप्याच्या केल्या. उभयेता श्रीमंत नित्य घरी जात असेत. उपाये फार केला परंतु न चालला. त्याचे माउसभाऊ गोपालराम त्याचे फार समाधान केले. श्रीमंत भाऊसाहेब बाहि गेले होते म्हणून लिहिले आले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer reports the death of Ramachandrababa.*

No. 85] [19-4-1755

श्री

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी विज्ञापणा

सेवक लक्षुमण चाबुकस्वार चरणावर मस्तक ठेऊन सां ना विज्ञापणा आसा जे. स्वामीनी कलवांताचे ताफ्याविसई लिा त्यास पत्र येतांच स्वार होऊन सहरास गेलो. तेथून जे ताफे येतील यास पाठऊन देतो. परंतु येक पत्र दरगाकुलीखान यास आलियाने ताफे येतील. नाही तर अनमान * * * * याजकरिता सेवेसी विनंति लिा आसे. आनि आपनहि त्यास बोलावितो. जर आली तर पाठवीतच आहे. परंतु आमचे आयेकनार नाहीत. इतकियाकरता दरगाकुलीखानास पत्र पाहिजे. हली पानें त्रिब्याची सुमार २००० दोन हजार सेवेसी पाठविली आहेत ते प्रविस्ट होतील. बहुत काये लिा कृपा सेवकावर निरंतर असो देण हे विज्ञापणा. मिति सके १६७७ युवानाम संवछरे वैशाक सुध ८ रा गोविंदराव राम याजबा ऐवज बाकी राहिला तो रदकर्जी लिा म्हणऊन लिा त्यास उत्तम. स्वामीच्या लिा प्रमान जमाखर्च केला.

¶*One Lakshman undertakes to send a party of dancing girls but requests the Peshwa to write to Dargahkulikhan to expedite the matter.*

No. 86] [28-11-1755

श्री

तीर्थस्वरूप राजश्री देवबादादा स्वामी
वडिलांचे सेवेसी

अपत्यें जिवाजीनें चरणावर मस्तक ठेऊन विनंती. आज कार्तिक वद्य नवमी मुकाम किल्ले भगवंतगडीं फौजसुद्धां वडिलांचे आशी(र्वादें) क्षेम आहों. यानंतर

आम्हांकडील वर्तमान तर राजश्री चे आज्ञेनें राजश्री रघुनाथ दळवी व आम्ही व वरकड सरदार ऐसे भगवंतगडीं आलों. आठ च्यार रोज जमाव जुडे-पर्यंत आंगरेकडील आवई आली कीं फिरंगी व आंगरा येक होऊन अरमार व खुषगीनें भगवंतगडास येतात * * * * आली तों मागलेकडून गनीम येऊन भगवंतगडास छ १४ सफरीं लागला. युध्य प्रसंग होणें तो जाहाला. गनीम पराभव पावून आला, तें सविस्तर वृत्त राजश्रीच्या पत्रावरून विदित होईल. पुन्हा आंगरा व फिरंगी येक होऊन भगवंतगडास येतात. येका चौ रोजांत येऊन त्यांचा आमचा युध्यप्रसंग होतो. गनीमाची नेटबाजी भारी ऐसी समजोन राजेश्री मल्हारी (?) येऊन राहिले आहेत. नांदिवडेस कृष्णाजी माहादेव याजकडेस जावें याजकरितां श्रीमंतांचीं पत्रें हमेशा येत होतीं; परंतु भगवंतगडासच गनीमाचा मारा पडला तेव्हां नांदिवडेस जाणेंच राहिलें. भगवंतगडाहूनच काय होणें तें होईल. इंग्रज विजयदुर्गास येणार तेव्हां खुष्कीनें फौज जावी ऐसें होतें; परंतु क * * (?) विजयदुर्गी जाऊन राहिला तेव्हां इंग्रज विजयदुर्गास येत नाहीं; त्यामुळें खुष्कीनें फौज कशी विजयदुर्गास जाती? तेव्हां प्रस्तुत कजिया आम्हाचवर बनोन अला. बरें, श्रीची दया, वडिलांचें पुण्य असतां चिंता काय आहे? होईल वर्तमान तें मागून लिहून पाठऊं. वरकड आम्हा-कडील मजकूर सर्व येथास्थित आहे. आम्ही मलरीस (?) आहों, वरीं सध्यां जातां नये. राजश्री प्रतिपदेस नारळ ठेऊन वाडीस जातील. नारळ ठेऊन माघारां तसेच येतील. बाकटलीचीं (?) गलबतें सात स्वारीस सिद्ध केली; तीन स्वारीस जाऊन फिरोन आलीं. पैदास्त जाहाली नाहीं. याउपर सातहि समागमेंच रवाना केलीं आहेत. विठ्ठलराम पायगाऊकर (?) बावडेस गेले आहेत. येतांच मजकूर समजोन वडिलांकडेस रवाना करितों. मातुश्रीस वरघाटीं न्यावेंयास चिरंजीव गुणबानें पालखी पाठविली होती, न जावें ऐसें लिहिलें होतें; परंतु त्यांचा आग्रह जाणेचा असला तर गेलीच असतील. वडिलीं बहुत रोज ठेऊं नयेत. सवेच भेटून खाली रवाना करून द्यावीं. वरकड घरांतील मजकूर सविस्तर तीर्थस्वरूपांनीं लिहिला आहे त्याजवरून विदित होईल. हें विनंती.

¶*Jivaji Khanderao writes to Deoba Dada (Devrao Meghashyam ?) about a skirmish which he had with the combined forces of the Portuguese and the Angria at Bhagvantgad.*

’6909

No. 87] [17-1-1756

श्री

र्द

तालुके अजणवेल हबसी याजपासून तुलाजी आगरे याणी घेतली माघ शुा २ रक्ताक्षीनाम संवत्सरे शके[1] १६६६ सन खमस आर्बाईन मया व अलफ यावर्षी घेतली. किले अजणवेल ती त्याजवर बालाजी बाजीराव पंत प्रधान याणी शके[2] १६७७ युवानाम संवत्सरे पौष शुा १४ मंदवारी घेतली. सन सीत खमेसेन मया व अलफ यास मामलदार कारकीर्द पंत प्रधान.

१ रामाजी माहादेव बिवलकर सुभेदार याजकडे सन सीत खमसैन येकसाला होती शके १६७७ युवानाम संवत्सरे.

१ ईा सन सबा खमसैन मया व अलफ शके १६७८ धातानाम संवत्सरे चिमाजी माणकर सुभेदार ताा सितैन अखेरपर्यंत च्यार साले.

१ सन इहिदे सितैन गणेश कृष्ण कानेटकर याजकडे येक साला होती शके १६८२ विक्रम नाम संवत्सरे.

१ चिमाजी माणकर ईा सन इसने सितैन शके १६८३ वृषानाम संवत्सरे ताा सन सलास सितैन दोन साला होती त्या

१ सन अर्बा सितैन कृष्णाजी विस्वनाथ बर्वे शके १६८९ सुभानुनाम संवत्सरे ताा सन समानी मया व अलफ शके १७०१ विकारीनाम संवत्सरे पौष मासपर्यंत.

१ सन सामानीन मया व अलफ शके १७०१ विकारीनाम संवत्सरे त्रिंबक कृष्ण ताा सन सलास तिसैन शके १७१४ परिधावी नाम संवत्सरे जेष्ट वाा ११ साले चवदा साल.

(1) 23-1-1745. (2) 17-1-1756.

6910

१ सन सलास तिसैन ता। सन सबा तिसैन अखर शके १७१८ जलनाम संवत्सरे रघुनाथ त्रिंबक बर्वे.

१ बालकृष्ण बापूजी लेले सन समान तिसैन शके १७१९ पिंगलनाम सवत्सरे येकसाला.

१ सन तिसा तिसैन रघुनाथ त्रिंबक शके १७२० कालयुक्त नाम सवत्सर येकसाल.

१ सन मयातैन बालकृष्ण बापूजी लेले शके १७२१ सिध्यर्थी नाम सवत्सरे.

१ सन ईहिदे मयातैन रघुनाथ त्रिंबक शके १७२२ रौद्रनाम संवत्सरे ता। सन सलास मया तैन अखैर तीन सालापर्यंत.

१ जजिरे सुवर्णदुर्ग सन खमस सितैनात अगिरा सवत्सरी अंगरे याजपासून बालाजी बाजीराव यानीं घेतला शके १६७६ भावनाम संवत्सरे.

¶*This is a chronological list of the Mamlatdars of Anjanvel.*

No. 88] [*30-1-1756*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री जावजी बाबा
वडिलाचे सेवेसी

अपत्ये म्हलोजी गौली दंडवत विज्ञापना. वडिलाचा निरोप घेऊन स्वार जालो ते येसवतगडास शुक्रवारी साईकाली पावलो. गडास मोरचे जवले लागले आहेत. त्यास रा। तुलाजी अगरे यांजकडील ठाकूर व सुभानजी गीरकर हे त्याजकडून सनवार (?) रा। खडोजी मानकर याजकडे आले. त्यास याचा त्याचा बेटीचा मजकुराचा इतबार पडत नाही, तरी आपण खबरदारीन राहणे. रा। खंडोजी माणकर ज्या तलावर होते त्या तलावर येऊन राहावे. रा। तुलाजी अगरे याचा सोमवारी भेटीस यावयाचा सिधात मात्र केला आहे परतु सते (तसे?) दिसत नाही. आजणवेलीकडून रा। रामाजीपंत यानी कागद तुम्हास लिहिले आहेत ते रा। खडोजी माणकर याच्या माणसाहाती पाठविले आहेत. रा। तुलोजी अगरे याचे कागद रा। खडोजी बरगे याच्या राउताहातीं पाठविले आहेत

ते प्रवतील. खारे मासे पाठविले आहेत घेऊन पावलीयाचे उतर पाठवणे. कोरे कागदाची पाने दोन तीन पाठऊन घ्यावी. येथे धारण या प्रकारची आहे, त्यास पोटापाणीयाची खबर घ्यावी. तुम्ही तो घ्यालच परंतु सूचना मात्र लिहिले आहे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Mhaloji Gauli informs Javji Gauli of the movements of Tulaji Angria and Khandoji Mankar and advises the addressee where he should encamp.*

No. 89] [*26-2-1756 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
भाऊसाहेबाचे शेवेसी

प्रतिपूर्वक निंबाबाई सिंदे दडवत विज्ञापना. ताा छ २९ जमादिलौवलपर्येंत साहेबाचे कृपाअवलोकनेकरोन वर्तमान येथास्थित असे विशेष. चिरंजीव राजश्री खेम सांवत भोसले सरदेसाई यांजविसी चिरंजीव राजश्री पाटीलबावानी साहेबास विनंती केलीच होती. आण माहाराजानी मान्य केलीच आहे. यैसियासी श्रीमंत राजश्री नानासाहेब ते प्रांती जाणार आहेत म्हणोन यैकिले, त्यास खेम-सांवत यांचा सिदगड व सालसी त्याचा मुळूक त्यास द्यावा म्हणोन साहेबी नाना-साहेबास येक पत्र देवोन सदरहू सिदगड व सालसी मारनुलेची मारनुलेचे श्वाधीन होवोन त्यांच्या जिल्यामधे उपसर्ग न होई ते करणार माहाराज धणी आहेत. मारनुलेचे सर्व प्रकारे अगत्य साहेबासच आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*Nimbabai, mother of Jayappa Sindia, requests Bhausaheb and Nana-saheb to restore Sidhgad and Salsi to the Sawants of Wadi.*

No. 90] [*28-2-1756*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक नारो त्रिंबक चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञाप्त. ताा छ २७ माहे जमादिलावलपावेतो सेवकाचे व राजपुर प्रांतीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा, की शामलाकडून भले माणूस येथे आले आहेत. त्यानी मजकूर घातला जे दास्तान माडले येथे चौकी बसवावयाचा दुतर्फा करार होता म्हणून आम्ही ठाणे पाठीविले. सरकारतर्फेचे ठाणे यावे ते न

आले; आणि आमचे लोक बसले ते उठऊन लाविले. त्यास ठाणे बसावयाचा तह केला आणि ठाणे आपलेकडील लोक व तिकडील लोक येसे दुतर्फा जाऊन ठाणे बसावे ते त्याचेच कां बसले? बसलीयावर उठविलें कां व पुढे बसवावे की नाही त्याचा जाबसाल जाला पाहिजे. तर साद्यांत वर्तमान लिहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास पूर्वी शामलाकडील व सरकारतर्फेचे मिळून चौकी होती. याजवर बाणकोट हबशाकड आला तेव्हा आम्हाकडून दुतर्फे चौकी त्यानी बाणकोटी बसऊन तेथे घेऊ लागले. आम्हाकडील चौकी तर गेली. तेव्हा आम्ही सापेगाव बंदरकिनारा आहे तेथे खाडीचे तास लाहान जाले आहे ते नस्त पाहून आपले तर्फेची चौकी बसली. ते बाणकोटी आपली तक्षीम घेत आम्ही साप्यास घेऊ येसे काही दिवस चालले. त्याजवर बाणकोट आंगारकाने बसविले, शामलास उठऊन दिल्हे. पुढे आंजणवेल घेतली, तिकडून शामल अगदी खरडून काडला तेव्हा चौकीस थारा नाही येसे जाले. त्याजवर आपलेकडून शामलाचा बिघाडा जाला तेव्हा साडतीन माहाल आगदीच मना केले. जेसमई तह ज्ञाला ते समई त्यानी येक परगणा सरकारात देऊन तह केला, ते समई दुतर्फा चौकीची बोली केली जे साप्यास तुम्ही घेता ते न घ्यावे. माडल्यास दुतर्फा चौकी बसवावी येसा करार केला त्यास जाबसाल जाला जे आगरकाकड तुमचा बिघाड आहे. तुम्हास तिकडून काही प्राप्ति नाही. जेव्हा तुम्हाकड होते तेव्हा आम्हाकडून हसील घेऊन तिकड गड तुम्हास दिला, * * तो अंगारक घेतो. तुम्ही हिकडे घेऊ लागलेस म्हणजे रयतेस जलाल जाले. तुम्ही तिकड बसविल ते ते आगारक घेईल, हिकड मागती तुम्ही घ्याल येसे दुबारा होते. आगारक तुम्हास बसू देणार नाही. त्यास त्यानी मान्य केले की आमचा त्याचा तह करून देणे. त्याजवरून त्याकडील कारकून बोलाऊन आम्ही तहाचा मजकुर करावयास मुलाना वलीमहमद आले त्यास आम्हाकडून बोली लागून तह आंगारक करितो हा भाव समजोन त्याचे कारकून केसोपंत लिमये आले होते, त्यास जंजिरा घेऊन जाऊन आम्हास मध्येस्तास टाकून परभाराच तह केला. काही वंत त्यानी घ्यावासा करार केला. त्याजवर येक वर्ष चौकीचा मजकूर सोडला होता. हालीं सालमजकुरी चौकी बसवावी म्हणून मजकूर केला. तेव्हा आम्ही साफ लिहिले जे आंगारकाचा तुमचा तह नव्हता तेव्हा तुम्ही चौकी बसविणार होतेस ते बसविली * * हाली त्यांजकडील तुम्हास काही वंत आला, तेव्हा तुमचे चौकीचे यैवजी आला त्याचा मजकूर कसा आहे तो लिहिणे. मग तुम्हास काही तिकड प्राप्त काही नसले तर दुतर्फा चौकी बसेल ते गोष्टीच जाबसाल न करिता जंजिराहून पंनास माणूस पाठऊन चौकी बसवली. त्याजवर मार्ग आम्ही लिहून पाठविले जे दुतर्फा प्रांत येकतर्फे चौकी बसवावी येसे नाही. त्यामधे

त्याची चौकी बसताच आगदी जलमार्ग पडला. ठाणीयास तिवारा हसील पडो लागला. त्यामुळे बेपारी कस्टी, इजारा जकाती गोरेगावच्या दिल्ह्या होत्या त्या आगदी पडल्या. मुतलक पैसा आकारला नाही. खाडीत गलबत बंद आंगारकाने केले, त्याजवरून मागती जंजिरा आम्ही लिहिले परंतु जाबसाल नाहीत. तेव्हां चौकी उठऊन दिली. यापूर्वीही तुलाजी आंगरे याकडून बापूजीपंत बिवलकर आले तेव्हा त्यानी हुजूरचे चौकीसाठी विनंती केली होती की माडल्याची चौकी शामलास बसवून द्यावी. त्याजवरून आम्हास पहिले हुजूरचे ताकीदपत्रहि आहे जे माड-ल्यास चौकी शामलांची बसऊन देणे. याजकारणे चौकी उठऊन लाविली. बाणकोट शामले घेतला त्यापासून शामलांची चौकी माडल्यास नाही. सेवसी साद्यांत वर्तमान लिहिले असेत. खाडी शामलास जाली म्हणजे मतगडास आपाये आहे. गोरेगावच्या जकाती पडतात. हिकड हसील आहे तो बाणकोटी शामलाचे तर्फेचा घेतात, तेव्हा इकड जर त्याची चौकी बसली तर दुबारा ज्याजती कानू होईल. तेव्हा सहजच बंदर गोरेगावचे पडले. ये जातीचे वर्तमान आहे. तेथे चौकी त्याची त्याची कार्याची नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Trimbak writes to the Peshwa how Bankot and Mandle changed hands from time to time between the Peshwa, the Angrias and the Sidi and the difficulties it caused to shipping.*

No. 91] [Recd. 2-3-1756

पौ छ ३० जाावल.

श्री

राजश्री जावजी गौली
गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य स्‍नो॥ खंडाजी माणकर रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले पावले. राजश्री सरखलीची मुले माणसाकडील वर्तमान लिहावयाविसी लिा. यैशास समस्त सुखरूप आहेत. लाहान मुलाच्या देवी उताराखाले पडल्या, काही फिकीर नाही. वरकड किल्यावरील इंग्रज निघत नाही. इंग्रज हजारापर्यंत राहाणार. राजश्री रामाजीपंत याकडील पंचवीस माणूस निश्याण ठेवावे आणि राजश्री रामाजीपंत इंग्रजसुधा मुंबईस उदईक जाणार. तेथून बोलीप्रमाणे कैसी काय निभावणी होईल ते पाहावी. तेथून चिठी

आलियावरी इंग्रज जाईल किंवा राहील पाहावे. सर्व मालति तो पहिलीच नेली. हा प्रकार आहे. आपण सरखली बा आहेत, सर्व प्रकार साभालून न्यावे. बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Khandaji Mankar writes to Devji Gouli about Tulaji Angria's children and about the refusal of the English to deliver the fort of Vijaydurg to Ramaji Mahadeo.*

No. 92] [*8-4-1756*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोविंद सिवराम स्वामी गोसावी यासी

पो बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. नवाब सलाबतजंग आमच्या मदतीस मजल दरमजल येऊन पावले. शाहानवाज खान व मुसाबुसी याची भेट छ ४ रजबी जाहाली. नवाबाची मुलाजमत येका दो दिवसी होईल. मुरारराव वगैरे यास सावनुरात तंग केलेच आहेत. सरकारच्या फौजाचे मोर्चे गावकुसापावेतो गेले. नवाबाचा तोफखानाहि लागेल. अतःपर पारपत्य त्याचे सत्वरच होईल. तिकडील वर्तमान अलीकडे कलत नाही. राजश्री रामाजी माहादेव मुंबईस गेले आहेत. इंग्रेज देहावर येऊन किला देतो की नाही, मारनिल्हे जाऊन काये विच्यार आले न आले ते सविस्तर लिहिणें. वरकड कितेक तपसील लिहिणे. पहिले लिहिलेच आहेत. नवाबाची मुलाजमत छ ६ रजबी जाहली. या उपरी श्रीकृपेने सत्वरच शत्रूचे पारपत्य होईल. जाणिजे छ ७ रजब सुरु सीत खमसेन मया व अलफ. बहुत काय लिहिणे. तेथील कार्यसिधि लवकर होता दिसत नाही, तथापि तुम्ही गेलियावर उपायास अंतर होणार नाही हे विनंति.

¶*Peshwa Balajirao writes to Govind Shivaram Khasgiwale, communicating the writer's visit with Nawab Salabatjang and the stiff fight he was conducting before Savnur.*

No. 93] [*28-4-1756*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोविंद सिवराम स्वामी गोसावी यासी

पो बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. इकडील वर्तमान तरी मुरारराव घोरपडे व पठाण

यास गावांत जेर केले. मोर्चे चराजवळ गेले. त्यास नवाब सलाबतजंग आले. याच्या आमच्या भेटी जाल्यावर याचा तोफखाना लागू करून दोन्ही तोफखान्याचा मार फारच जाला, तेव्हा त्याणी तहाचा मजकूर करून सावनूर प्रांत निमे व आकरा लक्ष रुपये देऊन तह केला. मुराररायानी चाकर होऊन चाकरी करावी, पुण्यास यावे याप्रो करार जाला. या उपरी वर्कड संस्थानिकाकडील खंडण्या विल्हे लागतील. नवाब आमच्या डेऱ्यास आले होते. शाहानवाजखान व मुसाबुसी हमेशा येतच आसतात. फारच श्नेह ममता नवाब धरितात. अतःपर इकडील गुंता सत्वरच विल्हे लागेल. तिकडील वर्तमान कलत नाही. रामाजी माहादेव मुंबईस गेले होते ते आले न आले, इंग्रेज देहावर येतो न येतो ते लिहिणे. बरे तजविजेने श्वकार्य साधून येणे छ २७ रजब हे विनंति.

¶*Peshwa Balajirao writes to Govind Shivaram communicating the end of the siege of Savanur and the terms of peace agreed upon.*

No. 94] [9-5-1756

पो छ २८ रमजान

श्रीशंकर

चिरजीव राजश्री आमृतराव यासी दरदाचे आसीर्वाद. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तुमचे प्रयोजन आहे. तरी श्रावणमासी सडो+ येणें. फार सडा होऊन येणे. तेथे सामदेव (पुरा)णिक कारभारी ठेऊन व प्रकृतिही ते (थेच राहातील¹) येकटा मात्र येका तटानिसी येणे. व्याघ्राचे ताकीद पत्र येसाजीस आणविले होते, ते बळीवर्दाने सुधेसे पाठविले नाही. परंतु तांतडीने जसे दिल्हे तसेच पाठविलें आहे. प्रयोजन पडल्यास देणे. नाही तरी जवळच ठेवणे. अनेकांतास तरी पहिलें पत्र पाठविलेंच आहे. वरकड मजकूर तरी पहिले लिहिलेच आहेत. नवे ल्याहाव(या योग्य) नाही. इकडील वर्तमान तरी शार्दूलसिंहसहित दरद तुंगभद्रा तीरी आहे. व्याघ्रास मात्र निरोप देशास जावयास जाहाला. याचेही येणे देशास लौकर होईल. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद. वैशाख शुध १० दशमी रविवार मुकाम तुंगभद्रा दक्षणतीर हे आसीर्वाद.

¶*Addressed by Darada (a nom-de-plume) to Amritrao from the banks of the river Tungabhadra. The letter appears to be written in ciphers. Two letters of a similar nature are already printed, Nos. 1 and 2 in Selection 19. This one has a few more items expressed in ciphers. The handwriting does not shew it to be written by Raghunathrao. The dates of writing and of receipt can tally only for the year 1756. In that case the addressee Amritrao cannot be Raghunathrao's adopted son. The three letters require to be accurately interpreted.*

\+ असाच शब्द आहे. १ यथें कागद फाटला आहे.

No. 95] [13-5-1756

श्री

सेवसी सेट्याजी खराडे विनंती विज्ञापना ऐसीजे. राजश्री मुराररात्र घोरपडे याचे कूच आजी चतुर्दशी गुरुवारी होऊन दोन कोसावरे गेले. इतके दिवस लोकाचा मोठा गवगवा होता. साहेबाची आज्ञा तों सेंडुरास पोहचाऊन कार्ये करून येणे. येथील प्रसंग तो या रीतीचा आहे. येविसी रा मुकुंदरायानी सेवसी विनंतीपत्र लिा आहे, त्यावरून श्रुत होईल. मुसाफरजंगाच्या लोकानी गवगवा करून कूच होऊ देत नव्हते याजमुळे त्यांच्या डेरियास मुकुंदराव व आपण गेलो होतो. त्याच्या लोकाचे समाधान करून कूच करावे ऐसे जाहाले. मुसाफरजंगाने कफणी घालून फकीर होऊन बैसला आहे. त्यास साहेबाकडून माारकडील रो कोनेरराव आले त्यानी कितेक गोष्टी सांगितल्या त्याजवरून आम्हासहि सुचले तितके मुसाफरजंगासी बोलिलो. तो बोलिला जे, इतकियावर चाकरी कोन्हाची करावी ? श्रीमंतानी कृपा करून सेवा घेतली तर सेवा करू. नाही तर फकिरी निश्चये करणे. च्यार महिने बरसात आपल्या पिराचे जागा कर्मून मग मकेस जातो हा निश्चये करून आहे; यांत साहेब धनी आहेत. पदरी बाळगावा ऐसे धन्याच्या ध्यानात आसेले तर आम्हास आज्ञापत्र आलिया मुसाफरजंगास भेटीस घेऊन येऊ; अथवा रा मुकुंदयारास साहेबापावेतो पाठऊ. जे आज्ञा होईल त्यासारखे वर्तणूक करू. सेवसी विज्ञापना श्रुत होये.

¶*Setyaji Kharade reports the march of Murarrao Ghorpade to Sondur.*

No. 96] [18-5-1756

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाचे शेवेसी

विनंती सेवक मलारजी होलकर कृतानेक विज्ञापना येथील क्षेम वैशाख वद्य पंचमी मुा मलप्रभा येथास्थित असे विशेष. साहेबापासून आज्ञा घेऊन स्वार जाला ते मार्गी मुलगुंदचे ठाणे घेऊन तेथें सरकारचे ठाणे बसऊन छ १६ साबानी मुा मजकुरास येऊन बार (?) मुकाम केला. आलीकडे त्याच नईचा फाटा होता तो कललाच नाहीं. रात्री नदी पाणी आलें. नदी फांटा येक होऊन राहावयाचे स्थली गुढग्याबराबर पाणी जाले. बारा प्रहर केवळ उभेच राहिलो. लस्कर हैराण विशेष जाले. कर्म दुर्घट होते. परंतु स्वामीचा प्रताप थोर

6917

यापकरितां बारा प्रहर संध्याकालापासोन उतार पडला आणिक येक रात्र दम खाऊन छ १८ साबानी लस्करसह वर्तमान पार आलो. पुढे कूच होऊन जात असों. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar reports to Bhausaheb his return from Karnatak and the hardships he suffered from floods on the way.*

No. 97] *[22-5-1756*

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री दादासा-
हेबाचे शेवेसी

विनंती शेवक मलारजी होलकर कृतानेक विज्ञापना. येथील कुशल वैशाख वद्य नवमी मुा मुधल घटप्रभातीर साहेबाचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष. आम्ही आलियातागाईत तिकडील वर्तमान कलत नाही तर सविस्तर लेखन क(रा)वयासी आज्ञा केली पाहिजे. इकडील वृत मलप्रभेच्या मुकामीहून विनतीपत्रे पाठविली ते शेवेसी पावली आसतील. तेथून दो मजलीनी मुकाम मजकुरास आलो. येथे नदीस पाणी याजकरितां मुकाम केला. सत्वरीच उतरून पुढे जाऊ. शेवसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Malharji Holkar writes to Raghunathrao about his halt at Mudhol on the Ghataprabha.*

No. 98] *[2-6-1756*

श्री

श्रियाविराजित राजमान्ये
राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

पाेष्ये विसाजी बाबूराव कृतानेक सां नमस्कार विनंती येथील क्षेम छ ३ शवाल मुकाम मडकसिरे येथास्तित आसो विशेष. राजश्री श्रीनिवासराव व राजश्री राघो गगाधर यासी राजश्री राव ममलकतमदार याही निरोप दिल्हा. पंत मशारनुलेस वस्त्रे व खर्चास व येक टांकन[1] बसावयासी दिल्हा. मुलगुदास राजश्री विठल विश्राम याजकडे जाऊन ठाणे मुलगुदचे व राजश्री हरिपंताकडे साडेबत्तीस हजार रुा साल दरसाल तनखा श्रीमंत स्वामीनी करून दिल्हा. त्याप्रमाने रुजुवात करून नागोजीराव पुनियास जातील. जासुदाचे रोजमरे तेरीख जाली, कृपा करून रोजमरा देविले पाहिजे. आमचा रोजमरा दीड माहीचा पाठविला पाहिजे.

---

१ एकजातीचा घोडा.

आबदागिरीचा कलस येथे तयार कराविला. सरंजाम पाठविला पाहिजे. आबद्गा गिरियाचा रोजमरा दिवब्या सारवान मोहतादार याचे रोजमरे पाठविले पाहिजे. येथील कारभार राजश्री अमृतरावजीस विदित आहे. मानकोजी कडू सरकारात हुजूर पागेस आहे. त्याचा लेक गोकाकेवर दारूखाना उडाला ते वेलेस उडाला म्हणौन यैकिले, तो येथे राजश्री मुराररात्र घोरपडे ममलकतमदार याजपासी आहे. रायानी आम्हास बोलाऊन दाखविला. तो नव्हे म्हणौन तोच बोलत होता. त्यास राजश्री नरसिंगराव यास पत्र लिहिले आहे. वलखनारास पाठविल्या वलखोन घेऊन जातील. याजकरिता रायानीं आम्हास सांगितल्यावरून पत्र सेवेसी लिहिले आहे. आमच्या रोजमरियास पाच सा दिवस उणे आसले तर रोजमरा पाठवावे. खर्चीयास येथे मिलत नाही. कोन्ही कर्जहि देत नाही. हे विनंती. चिरंजिव जगनाथ आपणापासी आहे. त्यास रोजमरा पुरत नाही तर आर्जबाब देविली पाहिजे. चिरजीव राजश्री सदासिव यास येथून श्रीनिवासराव यासमागमे गावास वाटे लाविले. हे विनती.

¶*Visaji Baburao informs Naropant Nana (Naro Appaji?) of his having effected a settlement with Murarrao Ghorpade and asks for money for defraying the expenses of troops under his (the writer's) command.*

√*No. 98A]* *?6-10-1755?*

पौ छ २१ रबिलाखर

श्री

राजश्री जावजी गौली

गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो तुलाजी आंगरे सरखेल रामराम येथील कुशल जाणौन स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले प्रविष्ट जाहाले व राजश्री बाबूराव साटम व राजश्री चिमणाजी कडू देशमुख आले. उभयेताचे वचनावरून व पत्रावरून शफतपूर्वक बेलभडारा पाठविला त्यावरून कलो आले. कोणेविसी सौशये न धरिता भेटीचा योग करावा म्हणून लिा त्यास येविसीचा करार करून तुम्हाकडेस उभयेता मारनुले पाठविले. येथे भेटीस निघोन यावयाचा संदेह किमपि नाही. तुम्हा लोकाचा भरवसा मानून निघावयाचा क़रार केला आहे. तयारी करीत आसो. लौकरीच भेटीचा योग घडत आहे. सौशये नाही. छ २० माहे रबिलाखर बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे. [शिक्का]

¶*Tulaji Angria deputes Baburao Satam and Chimnaji Kadu for meeting the addressee Javji Gauli.*

No. 99] [1756-57

श्री

यादी खासगीकडील कारकुनाच्या तैनाता सुा सबा खमसेन मया व अलफ रुा

	तैनात रुा	कापड	रुा आंख
राजश्री जिवाजी गणेश व रघुनाथ सिवराम	८४९७		१२००
८२०० तैनात देखील पालखी			
१६५ अपदागिरे ३			
१३२ दिवट्ये ३ येकूण			
८४९७			
राजश्री गोविंद सिवराम	२५७३		१०००
२०० पालखी			
* ५ खासबारदार			
* * १०			
* * खिजमतगार			
* ५ दिवटे १			
५५ अपदागीर			
१५० ढलाईत			
२०० नि‍ा असामी ४			
२५७३			
नागेश सामराज	७१०		७५
६०० तैनात			
११० दिवट्यां व पोरगा			
७१०			
गोविंद चिंतामणी	५१०		७५
४०० तैनात			
११० दिवट्यां व पोरगा			
५१०			

6920

	तैनात रुा	कापड	रुा आंख
बालकृष्ण आपाजी	५००	०	७५
बालाजी कृष्ण दात्ये	४००	०	७५
मल्हार प्रल्हाद	४००	०	७५
* * जी केशव	४००	०	७५
गोविंद बलाल	३५०	०	७५
भिकाजी माहादेव	३५०	०	७२
धोंडो मोरेस्वर	३००	३०	
गणेश वामन	३००	१७	
अंताजी नारायेण	२००	०	५०
हरि नारायेण	१५०	०	४०
लक्ष्मण भिकाजी	२५०	०	५०
रामचंद्र गोविंद	३२५	०	७५
गणेश रघुनाथ	२००	२०	
रामाजी माणकेश्वर	२००	१५	
राघोबा नाईक भिडे पोतदार	२५०	२०	
कासी मोरेश्वर	२००	१५	
चिंतो आबाजी	१५०	१५	
सदासिव नरसी	२००	१२	
* * * बाबूराव	२००	१५	
बालकृष्ण नारायेण	२००	१५	
हरि केशव	२००	१५	
गंगाधर विस्वनाथ	२५०	०	५०
जगनाथ भगवंत	२००	२०	
सदासिव बापूजी सोनी	२००	२०	
सदासिव कृष्ण	२००	२०	
मल्हार चिंतामणी	३००	२२	
शामराव गौतम	२००	१५	
बाबाजी गोविंद	३००	२२	
नारो कृष्ण जोरा हजिरी इमारत	३००	०	५०
भगवंत सामराज लकडखाना	३००	२५	
शामजी खंडेराव * *	१५०	१५	

6921

	तैनात रुा	कापड	रुा आंख
दादो गोविंद लकडखाना	२००	१३	
केसो कृष्ण लकडखाना	२७५	२०	
भिमाजी खंडेराव इमारत	२००	२०	
बालकृष्ण विठल लकडखाना	१७५	१५	
भिकाजी जिवाजी इमारत	१२५	५	
गोविंद बापूजी इमारत	३००	३०	
लक्ष्मुमण विस्वनाथ इमारत	३००	३५	
मोरो बापूजी लकडखाना	२००	०	
बाबूजी बलाल लकडखाना	२००	०	
बाजी बाबूराव पर्वती	३००	२०	
नारो कृष्ण बाग बंगला	१५०	०	
गोविंद माहादेव बाग पर्वती	१३२	०	
कृष्णाजी गोपाल बाग वाई	१७५	१५	
वासुदेव विठल रमणा	१२०	१०	
सदासिव विष्णु बानवडी	३००	७	६०
भिवाजी नारायण वडगांव	१७५	१५	
सदासिव कृष्ण मोतीबाग	१७५	११	
सदासिव कृष्ण माणिकबाग	१५०	११	
रामाजी गणेश दारूखाना	३२५	२५	
दामोदर रामचंद्र दारूखाना	२००	०	
बालाजी जिवाजी पागा खासगी	१२५	१५	
गोपाल बाबाजी सिकारखाना	२००	१५	
विष्णु माहादेव रथखाना	२००	२०	
सदासिव बापूजी जोसी लकडखाना	१७५	१५	
गोपाल मोरेश्वर वहीतकोठी	२७५	२०	
माणको तुकदेव देव शुक्रवार	२००	१३	
	२५७६१	७००	

6922

	तैनात रुा	कापड	रुा आंख
* * * आसामी नेमणुकेत आहेत तूर्त चाकरीवर नाहींत रु.	७५०		
२५० विसाजी बलाल			
२५० हरि गणेश			
२५० विसाजी रघुनाथ			
७५०	२६५१७	७००	
महादाजी विस्वनाथ निा कामाठी	२००	०	४०
	२६७१७	७००	३२१५

¶*This is a list of clerks, their remuneration and servants they were allowed to entertain at Government expense.*

No. 100] [*14-2-1757*

श्री

तीर्थरूप राजश्री नाना वडिलांचे
सेवेसी

आपत्ये सगुणेने नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा माघ वद्य १० पावेतो मुाा कालपी उतरतीर वडिलाचे आसीर्वादे सुखरूप पावलो विशेष. बागलकोट येथील मुकामीहून पौष शुध त्रितीयेचे पत्र लिहिले ते पावोन समाधान जाहाले. यैसेच सदैव पत्र ल्याहावयासी आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. रेवातीर हांडे येथील मुकामीहून वडिलास पत्र लिहिले त्यावरून विदित जालेच असेल. त्याउपरात मजल दरमजल झासीस आलो. नारो शंकर भेटले. च्यार दिवस तेथे राहोन दरमजल कालपीस माघ वद्य पंचमीस आलो. राजश्री गोविंद बलाल व हरि विठल भेटले. उदईक निघोन दरमजल प्रयागास जाऊ. परदरबारचे कागदपत्र आणावयाविसी गोविंद बलाल याचे जासूद गेले आहेत व वडिली कागद लेहून दिल्हे ते पहिलेच रवाना केले. परंतु जाबसाल आले नाहीत, यास्तव उदईक निघोन ब्रह्मावर्तास भागिरथीतीरी दरमजल जाऊ. सिवरात्र तेथेच होईल, तो परदरबारी कागदहि येतील. उपरांत पुढे जाऊ. प्रयागी काही गडबड जाहाली आहे, यास्तव गोविंद बलाल व हरि विठल प्रयागपावेतो येतील. सर्वाकडील वकील व कागद आल्यानंतर गोविंदपंताचा पुत्र समागमे घेऊन त्यास माघारे जावयासी निरोप देऊ. गोविंदपंताचे चिरंजीव कासीपावेतो येतील.

वरकड वर्तमान पेशजी दिलीहून अलीअसकरखान कुबरा दाहा हजार फौज व पंधरा हजार प्यादा घेऊन अंतर्वेदींत येऊन दंगा बहुत केला. हे वर्तमान गोविंद बलाल यास कलताच हरि विठल यास समागमे घेऊन फौजसुधा इटावे यानजीक गाठ पडली. ते समई प्रहर येक युध्य बहुत जाहाले. मोगल तो भारीच होता. हरि विठल यानी फारसी मर्दुमी केली. मोगल मोडून लुटून पस्त केला. पुत्र-सहवर्तमान मारून सर्व फौज मारिली व कितेक लुटिले. ज्याणी युध्य पाहिले ते हरि विठल याची तारीफ गोविद बलाल देखील करितात. या प्रांतात हरि विठल याचा नक्ष बहुत आहे. वडिलास कलावे म्हणौन लिहिले असे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Sagunabai from Kalpi on her way to Benares writes to Nanasaheb Peshwa about a severe action that took place between Hari Vithal and the imperial forces under Ali Askarkhan in which the latter was killed and his force routed.*

No. 101] [*13-8-1757*

श्री

श्रीमत राजश्री भाऊ स्वामीचे
सेवेसी

विनती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २७ जिलकादपावेतो ये प्रांतीचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. माहाराज राजश्री शंभु छत्रपति स्वामी यांणी आज्ञापत्र बा। अलीखान व नाईकजी निकम हुजरे यासमागमे पाठविले तेथे नाहस्थानेचा प्रात बिदनूरचे दक्षणेकडील तहद कलीकोटपावेत घाटाखाली दर्याकिनारा मुल्क आहे तेथील सत्रस्थानीक सावरी राजा कलिकोट व येल्ल राजा सत्रस्थान पुबावर हे दोघे सखे बंधू. याचेच दुसरे ठेवणाईर्त चौघेजण याच्या राज्यात तेहि राजे म्हणवितात. परंतु मातबर उभयता बंधू लिहिले आहे. हे चौघेजण आहेत. ते या उभयताचे हुकुमतीत आहेत. त्यास याच्या मुल्क बिदनूरकर राजा बुदी बसापा नाईक याणी काही मुल्क घेतला आहे. सदरहू राज्यास मानीत नाही. याजकरितां हे राजकारण स्वामीकडे याणीच सागोन पाठविले, त्यावरून करवीराहून हुजरे दोघेजण दाखला पाहावयास रवाना केले. याणी जाऊन उभयता बंधू राजे व दुसरे चौघे यांची भेट घेतली. त्यास त्याणी सांगितले की अरमार व लस्करची फौज आली तरी आपण सामील होऊन हा मुल्क सोडऊन जे खावंद नेमून देतील ते घेऊन. लस्करची फौज आली तरी बिदनूरचे राज्य सोडऊन. लस्करची फौज आली तरी अरमारात भारी जमाव पाईचा आला तरी बंदरकिनारा

अरमार येता सामील होऊन. बंदराकिनारा मातबर गाव आहेत, तेथे पैदास्त करून देऊन, यैसी त्याची बोली आहे. याप्राा हे उभयेता सागता त्यास स्वामीचे आज्ञापत्र आले तेच या उभयतासमागमे देऊन सेवेसी पाठविले आहेत. स्वामीनी हे वृत मनास आणून राजश्री आणापाहि तिकडील माहीत आहेत. त्यासहि पुसावे व याजबाा दाखल्यास शाहाणे माणूस देऊन सा सवस्थानिकास सा पत्रे देऊन दाखला पाहावा. तेथील दाखला पाहून आलि(या)वर राजकारण ठीक असल्यास स्वामीच्या चितात येणे ते येईल त्यासारिखा विचार कर्तव्य तो स्वामी करितील. राजश्री स्वामीच्या पत्राचे उतर लेहून आलाहिदा पाठविले आहे. स्वामीचे विचारास येईल तरी पाठवावे * * * विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshao reports to Bhausaheb a dispute between the Raja of Bednore and the Sabari Raja of Kalikot (Calicut) and his brother, in which the intercession of the Pethwa is sought.*

No. 102] [*9-11-1757*

श्री

राजश्री रावजी स्वामीचे शेवेसी

विनंती येथील वर्तमान ताा छ २६ सफर सायंकालपर्यंत यथास्थित असे विशेष. आज राजश्री राघोपंत भाऊस बोलाविले होते. त्यास उदईक पातशाहा-कडेस जाण्याचा निश्चय आहे. पातशा त्रिबकराव नानाचे पलीकडे आहे. त्याचाहि खोजा दादास बोलावयास आला होता. उदईक जाणार असा निश्चय आहे. मुरादाबादेस कृष्णरावजी आहेत. त्यास राजारामपंताचे त्याचे बनत नाही. त्याचेहि प्रकरण येथे पडले आहे. कोणाकडे ठरेल तसे लेहू. सुज्यात-दौले याजकडून भवानी शंकराचे पत्र आले तेच बजिनस पाा आहे त्याजवरून सर्व कलेल. तेथील खडणीचा यैवज कितीक आजपर्यंत वसूल जाहाला हे ल्याहावे. येथेहि दादा पुसत होते. बहुत काय लिहिणे लोभ करीत असिले पाहिजे हे विनंती. बालाजी खडेराव यास गगेस पूल बांधावयास रवाना केले. आज निघोन गेले. जाटाकडील दयारामहि बरोबर दिल्हा आहे. हे विनंती.

¶*The writer mentions the names and movements of the persons that took part in Raghunathrao's campaign of Delhi in 1757 and that were responsible for the collection of tribute from the Doab.*

6925

No. 103 [1758?

श्रीभार्गव

मसुदा गंगाधर येसवंत दि॥ रा॥ मल्हारजी होलकर यांस सरकारचे पत्र कीं, बीज्यागड सरकार प्रा॥ खरगोण येथे पवाराचे मोकासे आहेत. त्यास मोकासबाबेचा यैवज कचेरीस सुदामत सरकारचे कमाविसदार पवारास देत आसतात त्याप्रोच ते सालाबाद घेत आसतात. साल मजकुरी पवारानी आपल्या आमलाच्या सनदा राजश्री मल्हारबाकडे दिल्हा. मल्हारबानी आपले तर्फेने कमाविसदार प्रगणियांत मोकासबाबेच्या आमलावर पाठविले ते हस्तबुद आमल करणार म्हणून हजूर वर्तमान विदित जाले. यैसियासी पवाराचे आमलाचा मजकूर तीर्थरूपाजवली यंदा लस्करात पडिला होता ते समई तीर्थरूपानी ताकीद केली कीं सुदामत ज्याप्रो॥ यैवज पावत आला आसेल त्याप्रो॥ घेत जाणे म्हणून. यैसे आसता तुम्ही पवाराकडून सनदा घेऊन हस्तबुद आमल करावा हे गोष्ट कार्याची नाही व पवारानी तुमची हिमाइत करून आमल सुधारावा यातहि त्याचे कल्याण नाही. जे करणें तें त्यानी हजरूनच रदबदली करून करावें हेंच त्यांस उतम आहे व तुम्हीहि त्याचे आमलास ञाव(?) विसी सुदामतची चाल मोडून जबरदस्तीने सरकारचे आज्ञेसिवाय अमल बसवावा, हजूरच्या लक्षाखेरीज आणावा, हेहि उतम नाहीं. पवाराचे आगत्य कोणे रीतीचे आहे हें पुर्ते चितात आणून रा॥ मल्हारबास च्यार गोष्टी समजाऊन सागून सुदामतप्रा॥ पवार यैवज घेत ते करणें. येथून मल्हारबास निषेधपुरसर पत्रीं ल्याहावें तरी ते सरदार, त्यास काय वाटेल यास्तव विशदार्थे लिहिले नाहीं. तुम्हास लिहिले आहे. याचा पुर्ता विचार व तीर्थरूपास पवारांचे आगत्यवाद किती हे मनन करून मल्हारबा त्याप्रो॥ वर्तणूक करीत व आपले तर्फेचे कमाविसदार व राऊत बरकंदाज माहालातून उठून नेत तें करणें. मल्हारबा सरकारचे मर्जीप्रो॥ वर्तत ऐसा बोध तुम्ही त्यास करावा तो करीत नाही,[१] यावरून तुम्हास काय म्हणावे? अत:पर तरी लिहिला आन्वय ध्यानास आणून हजूरचे मर्जीप्रा॥ वर्तत तें करणे म्हणून पत्रें.[२] येविसीचा कारभारसंमधाचा मदार सर्वेहि तुम्हावर आहे. ही गोष्ट उगीच तुम्ही जबरदस्तीने केली. तुम्हास परिछिन्न शब्द लागेल. खावंदाचे मर्जीची रीत तुम्हास सर्वेहि कलतच आहे. यास्तव विशदे तुम्हास लि॥ असे, आणि लि॥ प्रो॥ तुम्हास जरूर केलेच पा॥ करणे.

¶*This is a draft of a letter addressed to Gangadhar Yashvant from Poona in order to compose the differences between Pawar and Holkar regarding the mokasa dues of the former. The letter shows that Malharrao Holkar was defying the central authority of the Peshwa even in the regime af Balajirao.*

१ हा मजकूर मूळ मसुद्यांत खोडलेला आहे. २ या पुढील मजकूर त्र्यंबकराव मामांच्या हातचा. पत्राच्या मसुद्यांतील मजकुराचा मतलब लक्षांत घेतां पत्रलेखक रघुनाथराव असावा असें स्पष्ट दिसतें.

No. 104 | 14-1-1758

श्री

श्रीमंत राजश्री बाबासाहेब
स्वामीचे सेवेसी

सेवक मुकुंद श्रीपत साष्टांग दंडवत विज्ञापना येथील क्षेम ता। छ २३ रबिलाखर पावेतो स्वामीचे कृपेकडून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. पेशजी नंजराज सर्वाधिकारी याजकडील संदर्भ व त्याचे पत्रे हुजूर रवाना केलीच आहेत त्यावरून श्रुत जाहलेच असल. करारनामा नजराज याजकडील समर्पक यावा आणि फौजेच खर्चास बेगमी व्हावी तेव्हां खातरजमा होऊन कार्यभागी प्रवर्ताचा भाव श्रीमंताचे आज्ञापत्री पेशजी दर्शविले त्याप्रा। मोहरनसी करारनामा समर्पक लेहून सेवकाचे नावी राजेच पत्र व कारभारी यानी लेहून पाठविले आहेत. हली करारनामा येथे ठेऊन त्याचे नकल व सेवकाचे नावी अली पत्रें दोनी बजिनस पाठविली आहेत. श्रीमंताचे सेवेसी हे मजकूर लि।। आहे. स्वामीनी सविस्तरे श्रुत करून कार्यभाग विवेक करून देऊन करार प्रा। अमल मुलुकांत बैसवणेस जलद योजावें. कारभाऱ्यानीं सेवकाचे नावी लिहिली पत्रें माघारी पाठवावी. सारांष, मातबर माणुसांस वचन दिल्हेवर तेही येथून लिहिल्याप्रा। करारनामा फौजेचे खर्चास लिहिणे ते लिहिले आहेत. त्याचे पत्रावरून चितास आणून जलद कुमक पोहचाऊन स्थापना करणेस स्वामी समर्थ असा. कडपेकडील फौज येथे येणेविसी दोन तिनीदा लेहून पाठविले, परंतु तिकडे बसालतजंगाचा शेह पडला होता त्यावरून त्याचे येणे न जाहले. हली बसालतजंग (फाटलें * *) कडे जाणार आहे. आता ही टाकोटाक लिहिले आ (फाटले * * *) तरी घोरपडेकडील फौज़ आणऊन राजकार (फाटलें * * *) मनसुबा केला आहे; परंतु हाताखाले फौज (फाटलें * *) चितायोग्य कार्यभाग घडत नाही. स्वामीनी या कार्यात मन घालून तूर्त पांच हजार छेडी फौज जलद रवाना करावी. बहिरबुनगा माघे येणार येतील आणि घोरपडेचे नावी व राजश्री महिपतीराव कवड्याचे नावी ताकीदपत्रे पाठऊन जलदीने राजकारण गाठी पडे येसे केले पाहिजे. वरकड अर्थ श्रीमंताचे पत्री लि।। आहे त्यावरून श्रुत होईल. या कार्यास आपले आगमन दरमज़ल. बारा चौदा कोस येणे प्रा। जाहलिया बहुतच विशेष होईल. कदाचित आलस्य होऊन उपेक्षाखाले घातलिया नजराज थोर माणूस त्याचे हातास लागणार नाहीं, कार्य बिगडल. येसे संदर्भ येणार नाहीं. यावरी आपले चितास येईल त्याप्रा। होईल. हे राजकारण काही लहान नव्ह, मातबर राजकारण

6927

आहे, परंतु निकडीवरून राजेनें करारनामा समर्पक करून पाठविला आहे. आपण आल्यास हे यश आपले पदरी येणेस सौशय नाहीं. सविस्तर विनंती श्रीमंताचे पत्रीं लिा आहे त्याजवरून विदित होईल. ज्याप्रमाणे सन समानांत यश घेऊन गेला त्यापेक्षां लक्ष वाद्यानें हे समई स्वामीचे पदरी महद यश येऊन कीर्तीस पात्र होता खासा स्वारीच आपली जाहलीयास फार उतम आहे कदाचित काही गुता असेल तर पाच हजार फौज सडी आम्हाकडे चांगली पाठवावी. हैदर नाईकाचे पारपत्ये होऊन स्वामीस यश येई हाच प्रकार होईल. हरविलाजे फौज पाठवावी. सेवकाचे नावे नजराज्याची पत्रे आली ती व करारनामीयाची नकल पाठविली आहे. पाहून माघारे पाठविले पाहिजे. बहुत काय लिा लोभ असो दीजे हे विज्ञापना.

¶*Mukund Shripat communicates to Balwantrao Mehendale the result of his negotiations with Nandraj of Mysore and asks the addressee to come up with his forces to execute the proposed plans.*

No. 105] [*17-2-1758?*

छ ८ जमादिलाखर

श्रीराम

छ ८ जाावली रात्रौ बारा बान बाबलीचे नदीचे बेदाडाचे आसऱ्याने सैन्यावर टाकिले, परंतु कोन्ही जाया न जाले. तोपाची मार जाली. छ ९ जाावली कूच करून माहोलीपुढे चौ कोसाची मजल केली. उतरतेसमई पिछयाडी व उजवे बाजूकडे फौजा नमूद जाल्या. यानीहि तोफाची मार दिधली. छ १० जाावली कूच करून खोलापुरास आले. उतरतेसमई गावापलीकडे फौजा नमूद जाल्या. साईकाळपावेतो उभ्या होत्या. तोफाची मार जाली. छ ११ जाावली खोलापुरी काही पैका घेयाचा यास्तव मुकाम केला. छ १२ जाावली कूच करून कोसावर येऊन उमरावतीचे वाटेवर मजल केली. प्राथकाली सलुकाचे जौबसालानिमित्य रगोपंत वकील जानोजीचा आला होता. उतर प्रतिउतर करून मागती गेला. छ १३ जाावली कूच करून कसबे भातकुलीपुढे आधकोसावर येऊन उतरले. फौजा कोन्ही आल्या नाही. पनास स्वार आले होते. त्याची दोन घोडी मारून आनिली. छ १४ जाावली कूच करून उमरावतीस डेरे केले. प्राथकाली सांडनीबाा पत्रे आली की फडच्याचे जौबसाल लिहून त्रिंबक शंकर मनसबदार यासी पाठवने. यानी लिहून पाठविले, दुरून जौबसाल काये होनार? आम्ही उमरावतीवर येतो. तुम्ही कोन्ही मातबर पाठवने. त्यावरून छ १५ जाावली मुकाम केला आनी त्रिंबकरायासी पाठविले. त्याची फौज मागे कोलापरावर

होते, त्यासी विलंब लागला. छ १६ व छ १७ मुकाम केला. छ १८ कूच करून उमरावतीपुढे दो कोसावर नागपूरचे वाटेवर मजल केली. वाटेस त्रिंबकराये रंगोपंत वकील व येक सांडनीस्वार येऊन भेटले. छ १९ मुकाम करून पत्रे सांडनीस्वार त्याजबो गेली. साईकाली कृस्णाजी मोरेस्वर आले. रात्रौ राज्याजीची भेट जाली. छ २० जावल मुकाम जाला. कृस्णाजी मोरेस्वर सलुकाचा जौबसाल करून च्यार घटका दिवस राहता स्वार होऊन गेला. छ २१ जावली प्रहर दिवस चढता येनार. सलूक होनार यैसे दिसते. पहिले सिकाकोलाकडील राजे यांची पत्रे आली होती, त्यावरून धोंडाजीपंत आपले तरफेने ब्राम्हन पुढे पाठविला की आपन मागून येतो. तुम्ही आपला बंदोबस्त ठेवने, आनीब (?) फौज पुढे येऊन आमसी भेटने विशष विज्ञाती सामा.

¶*This paper refers to the movements of Janoji Bhonsle and of the Nizam towards Kholapur.. Can this refer to the war between them in 1758 when Ibrahim Khan Gardi took the side of the Nizam, after Bussy had departed.*

No. 106] [*3-3-1758?*

श्रीराम

छ १५ जाखरी दो प्रहरा रात्रौ राजे विठलदास जानोजी भोसले याची भेटी घेऊन आले. पैसे निघाल्याचे मध्यस्थ कृष्णाजी गोविंद[1] व कृष्णाजी मोरेस्वर आले त्यासमईच जाणोजीची कूल फौज तयार होऊन मुधाजी भोसले साता कोसावर त्यासी मदत आले होते त्यावर छयापा घालायानिमित्य धावले. बहीर व हती वगैरे सरंजाम हती लागला. फौज लुटली. काहीं पलाली. खुद मुधाजी दिढाशा स्वारासी निघू गेला. छ १६ जाखरी नबाब कूच करूण नागपुरची वाट सोडून कारंजबारेचे रोहके दोन कोस येऊन उतरले. छ १७ व छ १८ दो कुच्याणे वरधेचे काठास आले. छ १९ जाखरी मुकाम केला. त्याची फौज रघोजी करांडे याचे हतीसमेत निशान घेऊन गेला. म्हनऊन मुधाजीचे मागे लागली. काही फौज फिरली. रघोजी मागेच होता. मुधाजीने जातीने व पागेचे लोकानसी हरेऱ्या करूण केला. बहुत जाया केले. मुधाजीस भाला वरचेवर लागल्याची वार्ता आहे. लोकाचे कबिले बहुत धरूण आनिले. रघोजी करांडिये आपले निशान घेऊन आले. राणोजीची फौज यांचे फौजेपासून दो कोसावर येऊन उतरली. दिवस उतम नवते म्हणून छ २२ जाखरी च्यार घटका दिवस राहातां इबराहीमखां व राजे विठलदास जाऊन घेऊन आले.

---

१ भास्कररामाचे स्त्रीचा वकील.

जाणोजी भोसले व रघोजी करांडिये नऱ्होजी जाचक व पिराजी निंबाळकर वगैरे सरदार समागमे होते. गिरमाजी खंडेराऊ आले नाहीत. भेटी जाल्या. चार घटका रात्रपावेतो खिलबतेमधे होते. येक हती व येक घोडा व वस्त्रे व जिगा व सरदेच जवाहर दिधले. स्वार होऊन आपले डेऱ्यास स्वार होऊन गेले. उदईक नवाब त्यांचे भेटीस जातील. परवा येथून कूच होणार. आकोल्यामधे बहीर व आसबाब ठेविला होता व महालचे लोक होते त्या च्यार आसाम्या आनविल्या. मुधाजी भोसले चांद्याआलीकडे वन परगनियात आहेत. मागती जमाव करितो. बहीर व नुकसान घोडी मात्र गेली. भल घोडिये (?) कूल निघून गेले. उभयेताचा कलह निर्मान जाला. मुलकात धूम करील यैसे दिसते. नवाब सलाबतजंग भा(गा)नगरीस लागले. हे वर्तमान आहे. विशेष विज्ञती सामा (?)

¶*This appears to be a report of the fighting that was going on between Nizam Ali and the Bhonsle brothers in 1758 or thereabout.*

No. 107] [*26-11-1758*

श्री

श्रीमत राजश्री बळवंतरावजी
स्वामीचे सेवेसी

पोष्य रामचंद्र बावाजी कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती उपरी येथील कुशल ताा छ २४ रबिलवलपर्यंत यथास्थित असे. याप्रांते चहूकडे बिखाडा फार जाला. माझे जिमेस च्यार जोडा मातबर आहेत. लोकाची भरती आपली आपणास विदितच आहे. याकरितां हे सोडून फक्त हिसेबाचे मखलासीकरितांच आपणांकडे यावें हे गोष्टी विचाराची नव्हे. म्हणून या विचारांत असतां आपण हुजूरची आज्ञा पाठविली की, रसदेचा यैवज व मखलासीस कारकून पाठवणे. त्यावरून चिरंजीव विठोबास सेवेशी पाठविले आहेत. मायबापपणें जो साभाल करणे तो करावा. पटणप्रांते अलीकडे फारच गडबड जाली. राजश्री सिवाजी थोरात याजकडील लोकांचा ब्रम्हसमुद्रचे ठाण्यांत गलाठा जाला. सेंपनास घोडे गेले. अलीकडे त्याणी आणविल्याप्रमाणें येथून प्यादे थोडेबहुत पाठविले आहेत. हाली आणिखी प्यादे त्याणी आणविले आहेत. परंतु येक प्यादा मिलत नाही. बिदरूरचा राजा खरा म्हणोन बिदरूर प्रांतचे हजारपर्यंत लोक येऊन आणिखी प्यादे ठेऊन हरपनहलीकर मिलोन बिदरुरास निघाले आहेत. हे वर्तमान पेशजीहि लिहिले आहे व हाली सविस्तर राजश्री महिपतराव दादा यांचे पत्रीं विस्तारे लिहिले आहे त्यावरून विदित होईल. साराष प्यादा तिकडे वोढ पडिली. येक प्यादा

कोठेहि मिळेना आणि चहूकडे अनाहुत जाले आहे. बागूरची खेडी होसदुर्गकरांनी घेतली आहेत. ती सोडीत नाहीत. वरकड कसबा व खेडी याची गत काय ते आपण पाहिलीच आहे. नित्य तेथील काचणी लागली आहे. आपले आगमनाची प्रतीक्षा लागली आहे. रुणानुबंद प्रमाण. प्रस्तुत वर्तमान यैकिले की, सावनूरकराचे वकील रदबदली करितात. त्यावरून काही द्रव्य घेऊन रटेहली त्यास देणार म्हणून वदंता. त्यास हे गोष्ट तो सहसा घडणार नाही, कां जे रटेहाली जागा नामी आहे. तेथे सरकारचे निशाण झेडा कायम जाला तो उतरून ब्रम्हहत्यार त्याचें निशाण तेथे चढेल हे गोष्ट काय घडणे आहे. त्याहीमधे तेथें ईश्वरस्थान कदंबेश्वर म्हणून देवस्थान अपूर्व आहे. त्या देवालयांत सेंभर बरशाअलीकडे दीपाराधना होऊ लागली आहे. तेथे पुनरुक्त यथापूर्व रीतीस कसे यईल? त्यात रटेहली दिगर जागीर बलात्कारें आपलीं पोटे भरावी म्हणून यका दोघानीं सावनूरकरांचे तबेत भिडविली होती. अन्यथा त्यास काय प्राप्त होती ते शोध घ्यावा. गतवर्षी जेव्हा सलाबतजंगासी बिघाड जाला त्या हंगाम्यांत सावनूरकरानी नजर फिराऊन हरिहरावरी बदनजर धरिली होती. हरिहरची पेठ तमाम गुल्हे जाले होते. मग तेच फौज रटेहलीचे गला पडिली. मग आम्ही रटेहलीचे कुमकेस दोनसे प्यादे व पनास स्वार पाठऊन रटेहली राखिली व त्यांचीं फौज बुडावली. हा गुदस्ता या दिवसातील मजकूर असतां हाली रटेहाली सरकारांत आली असतां फिरून त्यास देणे हे गोष्टी परिछिंन्नयुक्त दिसत नाही व मसलतीचाहि खर्च उगवला पाहिजे. याकरितां साभिमान धरून रटेहली देऊ न द्यावी. मुख्य गोष्ट आपण कृपा करितात. सलग चालवितात. म्हणून सलगीने लिहितों. कृपा करणार आपण समर्थ आहेत हे विनती.

¶*Ramchandra Bawaji reports to Balwantrao Mehendale the troubles that the Chiefs of Mysore and Bednore were raising in the newly conquered territory in the South. Later on he speaks of the inadvisability of giving back the strong outpost of Ratehali to the Nawab of Savanur.*

No. 108] *[27-11-1758*

पौ छ १२ राखर सन तिसा

श्री

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामी

चे शेवेसी

आज्ञाधारक सेवक रामचंद्र बाबाजी कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान ताा छ २९ रबिलवलपर्यंत

येथास्थित असे. अलीकडे आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा कीं, सिरहटीकरांचा कज्या लागला आहे तरी तुम्ही राजश्री पुरुषोतमराव यांसी सामील होऊन त्याचे पारपत्य करणे. त्यावरून त्यांकडे जावयाचे योजनेंत सेवक आहे. प्याद्यांचा जथ काही जथरासारिखे जालें आहे. राजश्री गोपालरावजीनी हैदरनाइकास घेरलें आहे ते तसेच आहेत. पटणकरानी कडुराजवली ब्रम्हसमुद्र म्हणोन येक ठाणे होतें ते घेतलें. थोराताकडील से पंनास घोडें गेलें. थोरातानी आणविल्याप्रमाणें सेवकें प्यादे त्यांकडे रवाना केले आहेत. आणिखी पाठवावे म्हणून कारकून येथे येऊन बसला आहे. सेवक तलाश करीत असें. कडबाकडेहि प्यादे पाठविले. बागुरासहि सतत लागली आहे, तेथेहि भरती केली. बिदरूरचा राजा म्हणून गुंतुरांत ठेविला होता, त्याचें साद्यंत वर्तमान लिहून सेवेशी पाठविलें आहे. अलीकडे हरपनहलीकरानी त्याचा पुर्ता शोध करून बिदरूरचे आवाजीस सांगोन पाठविले. यांचा निरोप जातांच आवाजीनीं या राज्याचे निसबतीचे लोक कितेक होते, त्यांस आणून कोण्हास जिवे मारिले, कोणाचे हातपाय काढिले. हरपनहलीकरास लिहिले की तुम्हास लक्ष होनपर्यंत देतों, त्यास हाताखालें घालोन मारून टाका. यैसे पत्र येतांच हरपनहलीकरानी आपले दलवाई व राजश्री चिंतामण आपासमागमे तीनसे स्वार व तीन हजार प्यादे देऊन गुतुरास पाठऊन राज्यास घेऊन बेलवडीस येऊन उतरले. राज्याची व त्यांची फौज मिलोन हजार बारासें स्वार व पांच हजार प्यादे इतकी आहे. जेजाला, बाण, दारूगोली सर्व सरंजाम आहे. सेवकें येथें उकडकत्रीस येऊन दोनेहलींत बिदरूरची फौज राजश्री दलवाई वीरभद्रपा व सबनीस कृष्णपया आहेत यांस सांगोन व लिहून पाठविले की, दोन महिनेपर्यंत तुम्हांस वरिचेवरी लिहून व सांगोन पाठवितो की, येक कोण्ही मातबर येऊन प्रमाणपूर्वक हालठिका (?) यैसे सांगा म्हणिजे त्यास विचारें ठेऊन बंड मोडितो. त्यास तुम्ही येत नाही. हाली हरपनहलीकर त्यास घेऊन निघाले. अद्यापि तऱ्हीं तुम्ही यऊन पाहून जाणें. त्याणीं भेटीस येतों, हद्वरास त्यास घेऊन तुम्ही या, तेथें यतो आणि हालठिका म्हणोन सांगतो. तुम्ही त्यास मारावें ये गोष्टीस वीस हजार होनपर्यंत तुम्हांस देतों. याप्रों अंतस्त सांगोन पाठविले. सेवकें सांगोन पाठविलें, कीं मारणे हा यख्तीयार मजकडे नाहीं. तुम्ही येऊन खोटा म्हटलें तरी हे बंड मोडू. तुम्ही येणे, राजाही बोलतो की, त्याणी येऊन समक्ष मजला पाहून ठिका म्हटले तरी ते क्षणीं मजला तुम्ही मारा. याप्रमाणें मजकूर आहे. प्रांतास काडीमात्र उपसर्ग नाही. हरपनहलीकर त्यांचे फौजेस कचेपके करून यास घेऊन बिदरूरास जातात. त्यांत मार्गात कसें होतें हे न कले. अगर तेथे गेल्यावरी कसें होतें ते न कले. जालें वर्तमान

सेवेशी लिहिले आहे. मागाहून जे होईल ते लिहून पाठवितों. सेवकें सर्व, जागे ठाणीं बंदोबस्ती केली आहे. समागमें दाहाबारा प्याद्यानसीं येथें उकडकत्री खेडें रटेहली प्रांतचें येथें आहे. त्यास सावनूरकराचा वकील रा। व्यंकटराव म्हणून नेहमीं आजी दोन महिने सेवकाजवली येऊन बसला आहे. रदबदल करितात की, तुंम्ही पुरातन संभाजी माहाराजांचे वेलेचे आमचे मध्यस्त आहां. तरी हुजूर श्रीमंताचे सेवेशी कलेल तसी आमची रदबदल करून बंकापूर व रटेहली हे दोन्ही आमचे हातास येत ते करा म्हणिजे तुम्हांस मातबर कासाजी (?) देतो व येक गांव दरोबस्त देतों. याप्रमाणें रदबदल करितात त्यास हलीं सांगितले की, रटेहली द्यावी असा हुजूर करार जाला. सनदा येत आहेत. म्हणून मारनिलेनी सांगितलें त्यावरून सेवकास फारच विचार प्राप्त जाला आहे. आज्ञेप्रमाणें रटेहली सेवकें बहुत सायासें हस्तगत केली. स्वामिकार्य जालें. यामुलें धणी कृपालु होऊन सेवकाचे उर्जित होईल हा पूर्ण भरवसा असतां अकल्पित हे वार्ता यैकिली. मनसुबियाचे विचारें पाहातां जेव्हा बकापूर सोडणे लागेल तेव्हा रटेहली सोडावी. अन्यथा रटेहली सोडावयाची जागा नव्हे. त्यामधें रटेहली काही सावनूरकराची नाहीं. किलेदार स्वतंत्र. ते जागा सरकारचा झेंडा कायम जाला असतां सरकारचे निशाण उतरून त्याचे निशाण चढावें हे गोष्ट या प्रांतात येक प्रकार दिसेल. मसलतीस खर्च पडला तो अद्यापि उगवला नाही. अखेर सालपर्यंत उगवणी होईल असा प्रकार आहे. सेवकाचा निभाव होयेसारिखी आज्ञा करणार स्वामी धणी मायबाप समर्थ आहेत. सेवेशी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramchandra Bawaji reports the intrigues of the Chief of Harpanhalli and one Awaji to do away with the rightful claimant of Bednore. He advises the Peshwa to reject the demand of the Nawab of Savanur for Ratehali which happens to be situated at a strategic point.*

No. 109] [*1-12-1758?*

पौ छ ११ रबिलाखर
ऊर्फ मार्गसीर्ष १४.

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकपंतनाना
स्वामीचे सेवेसी

पोष्य शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत छ २९ रबिलावलपरयंत येथास्थित जाणून स्वकीये कुशललेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. रामनगर व जवारकर व पेठकर व सुरगाणकर येकत्र

होऊन मुल्क मारितात व जालितात; व दवणकर फिरंगी व रामनगरकर येक. येक जवारकरच आहे ऐसें नाहीं. हालीं सुलतानपूरनजीक नंदुरबार येथील दीड हजार कोळी रामनगरास आले. च्यार पांच हजार जमाव सिपाई व कोळी फत्तेपुरास जमा जाले, ते सत्वरच किले अर्जुनगड व इंद्रगड, बलालगड व डाहाणू पावत येणार. किले सेवग्यास रामनगरकराचा वेढा आहे. दारूगोळी दवणकर फिरंगी पाठवितो तो सर्वांस देतो, आणि परगणे खमेर पत्राडी व नेहरसंजाण व डाहाणू व वऱ्हे या प्रगणीयांची धूळ रामनगरकरानी मांडली आहे. तीन टोल्या केल्या आहेत. मुल्क जालितात व सेतेंभातें उडवी जालितात. येकी-कडे स्वारी कोल्यावर पाठवावी तर ते दुसरेकडे जातात. सारे खेल दुर्जनसिंग याचे. सारे संस्थानिक याणी उचलिले आहेत. बलेच येऊन किल्यास वेढा देतात. याउपर इद्रगड अर्जुनगड या किल्याखालीं येऊन बसणार हें वर्तमान तिकडून येका दोघानी लिहिलें आहे. फिरंग्यानें गोव्यास लेहून पाठविलें कीं अशामधें यावें. दवणकरहि लबाडीवर आला आहे. तेव्हां त्यास बल गोवेकराचें असेल व जनचर्चा इंग्रेज फिरंगी येक. इंग्रेजाचा जमाव मुंबईस दाहा बारा हजार जाला आहे व गोवेकर फिरंगी याचा जमाव येणार ऐसी मुंबईहून बातमी येते ; व हुजूरून वकील राजश्री संभाजी मंगेस मुंबईस आले आहेत त्यासी इंग्रेज गोड गोष्टी बोलतात. परंतु मायावी टोपीकर आहेत. मुंबईस जमाव करून मायावादाच्या गोष्टी सांगतात. याच समयांत इंग्रेजाचा जमाव जाला आहे व दवणकर फिरंगी रामनगरकरास दारूगोळी पोंहचावितो. रामनगरकर व जवारकर वगैरा याच समयांत मुलुक मारितात, जालीतात. तेव्हां दिसोन येतें कीं ह्या सर्वांचा विचार येक, रामनगरकरानी मुलकाची धूळ मांडली आहे. येक हजार राउत इंद्रगडा अर्जुनगडाकडे पाठवावयाची असते, तरी तिकडील मुलकाचा आरोप होता व वसई साष्टी येथेंहि राऊत असावे. अर्जुनगड इंद्रगड ह्या किल्यावर गला चढवित होतों तों रामनगरकरानी मना केला. रयेत तमाम पलाली. मुल्क वोस जाला. रयेतीने काय करावें ? येथें जमाव असता तरी सर्वांचे रक्षण होतें. सत्ताविससें माणूस परभारे स्वाऱ्यांस गेले. किल्याप्रमाणें भरती असावी तेहि नाहीं. तारापुरापासोन अलीकडे वसई प्रांतचे प्रगणे राखिले आहे. डाहाणूपासोन अर्जुनगडपावत वोस जाला. राजश्री कृष्णाजी अनंत कोहजेखालीं आहेत, त्यास तिकडे पाठवीन म्हटल्यास इकडे जवारकर कोळी येऊन मागती धुंदाई करतील, याजकरितां पाठवितां नये. येसी सविस्तर श्रीमंतास विनंतिपत्र पाठविलें. तेथून आज्ञा आली कीं राउताविसीं जें लिहिणें तें आपणांस ल्याहावें. त्याजवरून हें पत्र देऊन राजश्री गणेश अनंत आपणाकडे पाठविले आहेत, तरी आपणांजवळ राऊत

असतील ते पुढें पत्र पावतांच पाठवावे आणि पुढें जसेजसे जमा होत जातील तसतसे रवाना करित जावें. .राऊत आपण रवाना करीतील त्यांस आज्ञा करावी कीं शंकराजीपंत सांगतील तिकडे जात जाणे. याप्रमाणे ताकीद करून सत्वर रवाना केली पाहिजे बहुत काय लिहिणे कृपालोभ असों दिला पाहिजे हे विनंति.

¶*Shankaraji Keshao reports to Trimbakpant the disturbances created by the Chiefs of Jawhar, Ramnagar and Mandvi in the territories of north Konkan and requests more men being sent for keeping order.*

No. 110] [24-12-1758

छ २२ राखर मार्ग-
सीर तिसा

श्री

चिरंजीव राजश्री नाना यांसी बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. मिया अछनच्या मजकुराविसी मुजफरखान यास पत्र लेहून तुम्हाकडे पाठविलें आहे. त्यास अछनचे व हबशाचे बल होऊन अलीनवाजखान याचा तह जाला याजमुले ते पत्र मुजफरखान यास द्यावे असा मजकूर नाही, तरी पत्र त्यास न देणे. रा माहादाजी केशव व कृष्णाजी अनंत मागे फिरोन येणार होते. तेथून निघालेच असतील.

¶*The Peshwa asks Nana Purandare not to hand over the letter to Muzaffar-khan as an agreement has been made with Ali Navajkhan of Surat.*

No. 111] [26-12-1758

नकल.

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकपंत नाना
स्वामींचे सेवेसीं

सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंति. एथील कुशल तागायत छ १४ रबिलाखरपावेतों यथास्थित असे विशेष. पेशजी जासुदाबराबर सविस्तर वृत्त लिहिलें असे त्यावरून कललेंच असेल. सांप्रत वर्तमान आलें कीं इंग्रजाचें आठ मनवर यावयाचें होतें, त्यापैकीं पाच गोव्यास आले. त्यावरी मनवराचा सरदार आहे त्याणी जाऊन गोवेकर विजुरे याची भेट घेतली. उभयतांचें बोलणें जालें व

फिरंगियाचें अरमारहि तयार जालें असे. पंधरा तरांडी थोर पासष्ट लाहान, य ू र्ण असीं व इंग्रजाचे मनवर आठ बरोबर मुंबईस येणार. इंग्रजाचा जमाव तेरा हजार व फिरंगी पांच सात हजार व सिदी त्यास सामील जाला, त्याचा जमाव पांच हजार येकूण पंचवीस हजार जमाव करून साष्टी वसई विजेदुर्गावरी मसलत दिसते. फिरंगियाचे आरमार इस्मालखान येणार. सारांष बिघाडाची सुरत दिसते, यास्तव आपण कल्याणास सत्वर यावें, अनमान यासाठीं न करावा, हे विनंति.

¶*Shankraji Keshav fears that the combination of the fleets of the English, the Portuguese and the Sidi is directed against Peshwa's coastal places such as Salsette and Vijaydurga and calls Trimbakpant for consultation at Kalyan without any delay*

No. 112] [1-1-1759

पौा छ २१ जमादिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कर्णाजी सिंदे नामजाद किले माहुली साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ १ जमादिलोवलपावेतो मो जवार येथे स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा कीं राजश्री कृष्णाजीपंतास+ सामील होऊन माहितगिरीनें कोल्याचा नीर काढून अजम मुजफरखानहि जवारीवर उतरतील, परसपरे बातमी कळऊन कोल्याचे पारपत्य करणे म्हणोन आज्ञा. ऐसियासीं कृष्णाजीपंत सनदे आगोधर रामनगरात गेले आहेत. सेवकाने गोड्याचा माल व सूर्यमाल देखील वैतरणीचे काठाने नीर काढून अजम मुजफरखान यांसी अडीचशे लोकानसी छ २७ राखरी सामील जवारीस जाहालों. पुढें सेवकास आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून; तर आज्ञा करतव्य ते करणार स्वामी समर्थ आहेत. जवार हस्तगत जाहाली नव्हती, त्याचे आगोधर मौजे सावर्डे ताा खोडाले येथे कोल्याची व आपले लोकाची गाठ पडली. तेथे काही झीटपीट जाहाली, व मौजे गारगाव येथे युध्य जाहाले. कोल्याकडील बारा माणूस व दोन राऊत ठार जाहाले. आपले लोकापैकी दोन आसामी ठार जाहाले व सात जण जखमी जाहाले. त्याजवर तिहि चौ रोजी जवार अजम मुजफरखान

+ कृष्णाजी अनंत referred to in letters 195-196 of Selection 24.

याही हस्तगत केली. दोन आसामी ठार जाहालें आहेत. त्याचे लेकराबालाचे चालवणार स्वामी समर्थ आहेत; व जखमी जाले त्यास काही थोडेबहुत खर्चास येथे दिल्हें आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Karnaji Sindia describes a skirmish between his forces and the Kolis and further states that Muzaffarkhan has captured Jawhar.*

No. 113] *[Recd. 5-1-1759*

छ ९ जमादिलोवल

तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

साहेबाचे सेवेसी

ઙ श्री सुबाराव सिंदे साहेबसुभा दंडवत विनंती येथील कुशल मार्गसीर बहुल दशमीपावेतो आपल्या कृपाकटाक्षेकरून आम्हाकडील वृत येथास्थित असे. प्रति विनंती स्वामी यानी आज्ञा केलेप्रमाणे आषाढ श्रावण मासी ठिकाणी न राहाता राजश्री नारायेणराव यासमवेत हा कालपावेतो चाकरी करीत आहो. परसगड व कितूर मसलत करून प्रस्तुत नंदीकडे सोदेकराचा गाव मतब्बर आहे यास वेढा घातिला आहे. नित्यानी गोलीची चाकरी चुकली नाही. थोडी माणसे जाया होत जातात. साहेबाची मर्जी अवदा मान्ये केली. यापुढे कृपा होईल म्हणोन बेहडा जसा करून दिला तेच मान्ये करून आल्यास राजश्री लक्ष्मुमण कोनेरी न विचारिता रातोरात मजल दरमजल राजश्री गोपालरायाकडे गेले. राजश्री रास्ते पटणप्रांती आहेत. तेथून पत्रे आणली तऱ्ही थाक नाही. तसाच सिरहटीचा विचार कोणी येक पैसा दिला नाही. सनदा दिल्हीया हात-रोखे यावे म्हणतात. राजश्री नारायेणरायाकडील यैवज तोहि प्राप्त नाही. देतो देतो म्हणतात. आम्ही कराराप्रमाणे चाकरी करितो न करितो हे राजश्री यास लिहून समाचार घ्यावा, येविशीची विनंती राजश्री नारायेणराव यानी सेवेसी लिहून कारकुनास पाठविले आहे. विनंती करतील त्यावरून श्रुत होईल. बेहडा करून दिला तो आमचा आम्हापासी ठेऊन घेतला आहे. सालपावेतो चाकरीस तफावत न करिता करीत आहो. राजश्री बलवंतराव व आम्ही पतके समस्त येक जागा राजश्री संनिध आहो. विश्वजनाचा प्रतिपाल होऊन ऊर्जिते जाहाली. आमचा मात्र उधारकाल आला नाही. साहेबाविना अन्यत्र देवत आम्हास नाही. मनोवाककायेकडून सेवा करीत आहो. ऊर्जित करून सेवा घेणार स्वामी समर्थ.

आंतरसाक्ष ईश्वराचा आवतार आसता विशष लिहिणे शक्त नव्हे. दोन तीन वरुषे लोकास येक पैसा पावला नाही. आसी हलाखी कंठीत आहो. आपल्या आंघ्रीकमलावलोकन होईल तो दिवस धन्ये वाटेल. सेवेसी श्रुत होये हे विनती.

¶*Subrao Sindia serving under Gopalrao Patwardhan in the Karnatak reports the result of his loyal services and requests encouragement.*

No. 114] [*6-1-1759*

* * * (वरील भाग पार फाटून गेला आहे.)

येतेचा जाबता केला असेल तो (फाटलें * *)स खावंदाकडे पाठवावा लागतो. त्याचे उ(तर) दिल्हे कीं, किल्यांत कांही विशेष बहुतसा नवता. यथाकिंचित असेल त्याची यादी तुम्हास देवितो. मग मर्जी रक्षावी लागली. विदित होय. दुसरे खानास बर्धेऊन श्रीमंताची व आपली कृपा आहे. येथील कामाचे यष तुम्हास आलें व पुढें मातबर कार्ये घेणार तुमच्या जवामर्दीवरी. त्याजवरून बहुत खुश होऊन बोलिले कीं, जंजिरा आदीकरून सर्व हस्तगत करून देईन आणि खावंदासी येकसान राहून कबिले पुण्यास आणून ठेवितों. येसे बाह्यात्कारी भाषण करितातीं, परंतु दृष्टीस येईल ते खरे. जवारच्या तीन तोफा उतम व जेजाला येश्या स्वारीसमागमें तयार केल्या आणि किल्याचे ठाणें राजश्री त्रिंबक सूर्याजीचे स्वाधीन छ ६ जावली केले. रामनगर राज्याचा प्रधान भेटीस छ ७ माहे मारी आले आहेत. निवेदन होय. वाघेरकर देवजी अवधूतराव व महादजी सरनाईक यासी सदासिवरायानी रामभट मध्यस्त पा आहेत जे, या उभयतांस घेऊन आल्यावरी तुमचे व त्याचे उतम प्रकारे श्रीमंताकरवी गौर करविला जाईल. तेहि लोकरच येणार आहेत. हे वर्तमान रावमारनुले याणी स्वामीपासीं विदित केलेच आहे. वाघेरकर आल्यावरी येथून कूच करितील. खानापासीं बंदरकिनारेची व दुरील राजकारणे खेलत आहेत. नासिकापासून वाटाखाली आलियावरी पंचवीस हजार रुो कर्ज सावकारापासून घेऊन सिबंदीस पैसा दिल्हा नाहीं (फाटलें *) सर्व वर्तमान निबाजी. (यापुढील बंद फाटला आहे. अपूर्ण आहे.)

¶*The letter is incomplete the contents of which refer to some affairs regarding the capture of Jawhar and Ramnagar.*

6938

√No. 115] [5-3-1755

पौ छ २३ जावल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव मुा ठाणे साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १९ जावलपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. पहिले पत्र इग्रजाचे शेवकास होते व स्वामीस होते ते पाठविले. त्यातील खुलासा निवेदन जाहालाच असेल. त्याजवर आपण येथे येतांच रामजी शिवाजी व सिवजी रणसोड इंग्रजाकडे मुंबईस पाठविले. त्याबरोबर सांगोन पाठविले की, आरमाराची मुसुंब राहिली नाही. फारतर येक महिना अवकाश आहे हा खराच, परंतु कितेक नाजूक प्रकार आहेत. त्याच्या विचारे याच अवसरात जावे, सा महिने झुंजत बसावे, ते येक महिनीयाने खामखा काम करावे. तुमचा आमचा करार गुदस्ता जाहाला तो समय हाच होता. हुजुरून तुमचे करारीवर सर्व गोष्टी तयारी केली असतां आता मागे घ्यावे हेहि बैसाव; ऐसे सागोन पाठविल्यावर त्याणी पत्र पाठविले व रामजी सिवजींनी पत्र पाठविले तीं बजिनस शेवेसी पाठविली आहेत. त्याची आमची भेट उद्याचे बुधवारी छ २१ मिनहूस नेमिली आहे. भेट जाहालियावर करारमदार होईल. इग्रजाचा खुलासा की तुळाजी आंगरे सबळ. बहुत दिवसी दौलत जंजिरे आहेत. त्यावर जावे तेव्हा खामखा साच्यार महिने बसोन खणोन काढावें. श्रीमंताची मसलतीची चाल पहिल्यापासून याप्रमाणें आहे. प्रस्तुत गैरहंगाम, आरमाराचे दिवस दर्यात फिरावयाचे राहिलें नाहीं. याकरिता मागे घेतो. पाहाता अर्थ खराच, परंतु राजश्री खंडोजी माणकर व दुसरे ग्रहस्त कितेक आहेत ते या मजकुराचे आहेत. त्याचे मानस याच वेलेस जावयाचा ठराव हुजूर जाहाला याकरितां सामदामप्रकारे इग्रजास सागोन करार होईल तो शेवेसी लेहू. वरकड तयारी आज्ञेप्रमाणे जाहाली आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶[*Ramaji Mahadeo sends to the Peshwa the despatches received by him from the English and communicates to him their explanation in respect of help to be rendered to the Peshwa to destroy Angria's power. "Tulaji Angria is strong and a powerful navy is therefore required to annihilate him" said they.*

No. 116] [19-1-1759

पो २९ जमादिलाकर

श्रीगणपति

सेवेसी विठल सामराज मुा श्रीरंगपटन चरनावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ताा १९ जावल परियेंत साहेबांचे कृपावलोकनेंकरून श्वस्त क्षेम असों. वर्तमान. मैसुरास अद्याप मोर्चे लागलेच आहेत. उत्तरेच्या दरवाज्याकडून मोरचे जवल गेले आहेत. खंदकापासून हातधोंड्याचा तफावतीने जवल गेले आहेत. पूर्वेच्या दरवाजापासून अर्धे गोलीचा टप मोरचेजवल गेले आहेत. पुढें मोरचे चालायास विलाज नाहीं. उतरेकडून सुरंग चालविला होता तो खंदकाजवल गेला, तों वरून गोळ्यांची मार व धोंड्यांची फार करितात. खंदकांत तळयाचें पाणी सोडलें. सुरुंगाचा विलाज राहिला. किल्यांतून तोफांचा मार फार होतो. बाहेरल्या सहा तोफा किल्यांतील तोफांच्या गोळयांनीं फोडून टाकिल्या. वरून बेजरब मार देतात. सहा तोफा फुटल्या, म्हनून खंडेराये पटनास छ ८ रोजीं आले. पटनच्या किल्यावर फिरून तमाम तोफा पाहून पांच तोफा उतरावयाचा हुकूम केला. तितक्यांत किरतरानें बोलाऊन विचारले जे किल्यावरील तोफा कशास उतरितां, लष्करांत तोफांस काय कमी आहे! हे म्हनाले जे लांबटप्याच्या असाव्या, त्यांतून दोन तोफा उतरून व गर्नाळ येक येसी लष्करास पाठविली. लष्करांतही खर्चास नाहीं. येथें यांनीं खर्चाची योजना केली तों साहुकार तो देईनात. मग कर्तरास मागितलें. त्यांनीं सांगितलें जे सर्व राज्ये मुल्रख तुमच्या स्वाधीन केलें आहे. आम्हांजवळ काये आहे? त्यावर खंडेरायांनी विनंति केली जे, कांही तरी खर्चास देवावें. फिरून तो येवज सत्वरीच खजाने दाखल करीन. यैसा अर्ज केल्यावर राज्याने आज्ञा केली जे, येक लक्ष रुपयाचें सोनें देवितों. मग दिल्हें न दिल्हें नकळे. छ ११ रोजीं संध्याकाळीं खंडेरायांनीं आम्हाला भेटीस बोलाविलें. भेटी झाल्या. कितीक वर्तमान आज्ञेप्रमानें निरोपिलें. च्यार घटका येकांतीं बसले होते. कर्तराची थैली आम्हांजवळच दिल्ही. म्हणाले जे सकाल तुम्हांस बोलाऊं पाठवून कर्तराची भेट करितों. हें पत्रहि श्रीमंतांचे देऊन हें वर्तमानहि सर्व निवेदन करून पत्राचीं प्रत्योतरें देऊन श्रीमंतांकडे जोडी रवाना करूं. गतवर्षी राजेश्री गोपाळरावजीनीं जो करार केला आहे त्याप्रमाणें भुकणजीची निशा केली आहे. काही थोडे बहुत बाकी आहे त्याचाहि निर्वाह करून देतो. पुढें श्रीमंताची

मर्जी रक्षने आम्हास जरूर आहे. या कराराप्रो हली सालचीहि तजवीज करून तेहि सावजीची निशा करितो. संवंस्थानात तो काही बल राहिला नाही. सर्व आपल्या जिवावर आंगेजनी केली आहे. राज्याच्या घरांतील कलह या प्रकारचा लागला आहे त्याचाहि बंदोबस्त केला आहे. दो चौ रोजा सला मामला करून विल्हे लावितो. जवाहिराच्या येवजाचीहि तजवीज केली पाहिजे. इकडे मोगलाची बाकीहि राहिली आहे. च्यार पाच वर्षें झाली, पुढेहि त्याच्या फौजा येनार. वकील आला आहे तो अद्याप सिऱ्यातच ठेवला आहे. श्रीमंताची मर्जी रक्षने आम्हास जरूर म्हणून तुम्हास लवकर बोलाऊन घेतले येशा बहुताप्रकारें गोष्टी सांगितल्या. आम्हा दोघास दोन पासोड्या देऊन रवाना केले. सकाल फिरून बोलावितो. येकंदर दरवाज्याची परवानगी देतो. सुखी येत जात जावे असें बोलले. दुसरे दिवशी बोलावतील म्हनून वाट पाहेली. तिसरे दिवसी चिठी लिहून पाठविली. येक दोनदा तो जाबसालच न केला. येक दोनदा बोलले जे संध्याकालीं सकाल बोलावितो. न बोलावले. आम्ही चिठी लिहून पाठविली जे, आम्हास देवदरशेनास जायाची तरी परवानगी देवावी. आनि आम्ही येथे येऊन पोहोचलो ते वर्तमान श्रीमंतास पाठवावे. येक जोडीची गटीची चिठी देवावी. काही जाबसाल करीनात. पाचसाहा दिवस होते. छ १४ रोजी त्रितीये प्रहरी लस्करास उठून गेले. जाबसाल कांही नाही. याच्या नजरेत आजचे काळी कोन्हीहि नाही. आपले लस्करचे वर्तमान तो येथें कीं, मोगलाची श्रीमंताची लढाई लागली आहे. प्रस्तुत लष्कर येत नाही म्हणून बेफिकीरीनें आहेत. याजपासी येथे फौज दोन हजार गणतीची सात पाचसे स्वार चांगले निघता मुशकील. दोन अडीच हजार गाडदी आहेत. बारा तेरा तोफा आहेत, तमाम लष्कर बेजार झाले आहे. कोन्हीहि या उभयेतास बरे पाहात नाही. आबालवृध सर्व आपले फौजेचा मार्ग लक्षितात. रात्री लष्कर सामसूम असे, ते आतून काही गडबड झाली, प्यादे निघाले तर येकाचे घोडे येकाचे हती रात्रतून उग्याच लस्करात आवाया होत्यात. पटन्यात सर्व दरवाजे मिळून सेंभर दार आहेत. मुलकांत तर जागाजागा बेबंद, कोठे बंदोबस्ती नाही. मुलुक तमाम लुटितात. घाटाखाली मुलुक मात्र हैदरआली नायेकाखाली आहे तो खुशाल आहे. यांची फौज कडप्याच्या मुलकात गेली आहे त्यास इकडे येऊं न द्यावे, आपली दोन हजार फौज त्याजभवती असली म्हणजे इकडे येत नाहीत. दोन तीन हजार फौज घाटाखाली दिंडगलास पाठवावी आणि दोन हजार फौज इकडे आली तर फार आहे. अविंधाची जड पडेल. सर्व दिंडगलात आहे. आजचे काली सर्वहि आपले फौजेची वाट पाहतात. सर्वास कोटात मातबरास

आतूचे आत नागवितात. कोन्हास मामलती देतात, तर दुसऱ्या कोन्ही काही अधिक दिल्हे तर त्याजपासूनहि पैका घेऊन त्यास देतात. पहेल्याचा पैका बुडाला याप्रो करीतात. सर्व कारभार दोडमा कर्तराची मातुश्री व राव याचा आहे. याचा अविंधाचा व रायाचा मनोदये की मैसूर हस्तगत करून तेथें सर्व जकीरा भरून आपली माल मालियेत व कबिले बदस्त तेथें ठेवावे, सर्व मानें आपन करावे, असी तजवीज मैसुरांतील. वर्तमान राज्यापासी हजार बारासे स्वार चांगला आहे व दोन हजार गारदी व हजार दीड हजार प्यादा याप्रमाण जमियेत आहे. खायास आनपाणी लकडी दाल वगैरे सरंजाम पुस्कल आहे. वैरन व विड्याची पाने हे कम आहेत. दक्षनेकडून रस्त पोहचत होती ते आठ दहा रोज बंद झाली. पा * * जकिऱ्याची आहेत. दारूगोळा पुस्कल आहेत. साहा महिन्याची बेगमी आहे म्हनून सांगतात. सल्याचा मजकूर तर किल्यातून जतुचिक्या म्हनून कारभारी राज्याचा तो येत असतो व याजकडून लालखान म्हणून सौदागर आहे तो जात असतो. जाबसाल ते किल्यातून सांगून पाठवितात जे, बेंगलूर व नादगिरी व घाटाखाली अनंतगिरी याप्रो या तिही किल्यातून हे किल्ला राह्यास द्यावा व दीड लक्ष होनाचा मुलुक जिकडे द्याल तो द्या. हे म्हनतात घाटाखाली अनंतगिरी दिल्ही तर फिरंग्यासी राजकारण करील. बेंगलूर व मदगिरी दिली तर श्रीमंतासी राजकारण करील. होसूर घाटाखाली गढी एक आहे ते राज्याकडे अजून चालत आहे ते गडीत मात्र बसून अशी हजाराचा मुलुक देतो तो घ्यावा. हे म्हनतात ते यैकत नाही. असेहि करता सल्यावर गोष्ट ठहरली तर दरम्यान मातबर मानूस हैदरअलीखांचा भाऊ शाहासखा व भुकणजी आपल्याकडील यैसे दरम्यान यावे, यानी फौजेसुधा उठून जावे. आम्ही आपला बंदोबस्त करून जमियेतीनशी जाऊन. शहासखा दरम्यान येत नाहीं. भुकणजी शुभ्रमणीस गेले आहेत ते अद्याप आले नाहींत. हे दरमियान न येयास प्रयोजन हे बेइमान आहेत. याच्या चितात जे राजा व बारकी व्यंकटराव व श्रीनिवासराव या तिघास नाबूद करावे. या गोष्टीस हे चुकनार नाहीत. यास्तव हे मधें येईनात. भुकणजीस कागद खंडेरायाने छ १७ रोजी पाठविले आहेत. पाहावे येतो कीं काय. किल्यातील म्हणतात जे हे दोघे मधे आले म्हनजे कसेहि करून सला करावा. हा प्रसंग निवारून पुढें श्रीमंत आल्यावर पाहून घेऊं म्हनतात. आपल्या फौजाची चातकऱ्याये वाट पाहतात. फौजा आल्या असे यैकिले म्हणजे येथे वेढा उठेल असा रंग दिसतो. हैदरनाईकाची फौज घाटाखाली कडप्याच्या मुलकांत गेली आहे. त्यानी तर पालूर वानबंडी घेऊन कृष्णंगिरीगड पहाडी घेतला म्हणून यैकिल्यात आले. ह्या किल्यास

फार दिवस लागले. आपल्याकडील फौजा येणार म्हणून त्या फौजेस ह्यानी बोलाऊ पाठविले आहे. ते फौज इकडे न यावी. ये वेळेस फौजा लवकर यावा. आनेकल पालेकिराचे होते ते यानी घेतले. बेंगलुरावर मुराररायाची फौज आली म्हणून आवाई आहे. कागदीपत्री वर्तमान कळले नाही. नरसिपूर नंजराजाकडील अद्यापि भांडत आहे. याचे ५०० बार व हजार प्यादा व दोन तोफा आहेत. त्यानी बाहेर निघून याच्या लोकास तुडिवल म्हनून खबर छ १७ मिनहूस आली. यानी आज येथून २०० गाडदी रवाना केले. पटनच्या किल्यात जकिरा नाही. माहगाईमुळे उघां+ जातील. जकिरा तमाम खाली केला. आता छ १२ रोजी खंडेराय जाऊन पाहिले. जकिरा कांहीं नाहीं. मग तमाम गढीवाल्यास पत्रे गेली जे, गला खरेदी करून किल्यात दाखल करा. घाटाखालीहि पत्रे गेली. अशात आठा दाहा रोजाचा वेढा पडला तर खायावाचून याच्या आटा बंद होतो. सर्वत्र आम्हास पुसतात जे तुमच्या फौजा इकडे येतात कीं नाही? आठा पंधरा रोजात येणार म्हणून सांगतो. फौजा आधी दिंडगलाकडे व तिरतून वानबाडीकडे रवाना कराव्या, आनि इकडे एक दोन हजार फौज फार आहे. त्रिचनापलीचा किला फुलचेरीवाल्यानी महमदआलीपासून काही द्रव्य घेऊन किला दिल्हा. एथें पत्रे आली म्हनून यैकतो. पटनात दारूखाना छ ९ रोजी उडाला. गुरुगोडीची आग पडिली. तीस चालीस मानसे उडाली व पनास मानूस जखमी झाले, याप्रो वर्तमान देखले यैकिले. आमचा जासूद जायास कोठे फिरकूं देत नाही. गढीची चिठी देत नाही. आम्हाकडे कोनास येऊं देत नाही. लस्करात दोन तीनदा जासूद पाठविले होते. आता बंदोबस्ती केली आहे. वाटेवाट चौक्या बसविल्या आहेत. त्या चौकीवाल्यानी आमच्या जासुदापासून चिठी घेऊन जावी, यास येथेच बसवावे, यास जाब आणून द्यावे, याप्रकारे झाले आहे. तीन महिने मोरचे लागले आहेत. दीड दोन हजार मानसे बाहेरील मेली. चोरावे सुटले आहेत. एथें धारण तांदूळ चार पाच सेर, रागी सात सेर, दाल चार सेर, तूप सेरभर, तेल दोन सेर, गहू पाच सेर, उडीद साहा सेर, कुलथी सात सेर, पर च्यार सेर याप्रो धारण. आपले जोडीचा निभाव होईना म्हनून हरतजविजीनी सिन्यास पत्रे पाठविली. सेवेसी श्रुत होय. महागाईमुळे खर्चाची तसदी फार आहे हे विज्ञापिता. ताजा कलम छ मजकुरी प्रहरा रात्री राजश्री भुकणजी यात्रेहून आले. दुसरे दिवशी त्यांची भेट झाली. कितीक वर्तमान आज्ञेप्रो निवेदन केले. त्यानी सांगितले जे येथे शिवाये फौजा पैसा देत नाहीं. राजेश्री गोपालरावजी गेले तेव्हा ज्या हुंड्या करून दिल्ह्या त्या-

+ उघा=उगा, निमूटपणें.

पैकी प्राच लक्षे रुा आमचे बाकी राहिले आहे. राव खंडणी करून गेले त्याविसी प्रतेही खंडेरायास मागतो तेहि देऊ दिलाऊं करितात. येथे शिवाय जबरदस्ती शिवाये पैसा निघत नाहीं. याच्या घर कलह लागला आहे. त्यामुळें यास पुढें काही सुचत नाही. अविधाचा प्रबल झाले आहे. त्यापुढे कोण्हाचे काही चालत नाही. खंडेरायाचे हतीहि पाहता काही नाही. अविंधाने चितावर घेतले तर त्याचे पदरी पैसा मुबलग आहे. त्याजखाले मुलुक घाटाखाली पाच लक्षा हुनाचा वसुली गुंजाइसी आहे. तिकडील वसूल होतो तो दिंडगलास जातो. यावितरिक्त इकडील मुलकातील पैसा जो येतो तो सिबंदीचे भरीस घालितात. खंडेरायाचे त्याजपुढे काही चालत नाही. मुख्ये संवस्थानिक आता प्रस्तावी पडले आहेत. यामुख्याचे व दुर्गवासीचे सूत्र येक आहे. परंतु याजपुढें कांहीं चालेना. येसमई फौज असे तर हे उभयेता येक होऊ येत, सरकार किफायत विसेष होती. आद्यापवरहि येक महिना यांचे त्यांचे सखे होयास पाहिजे. तोवर फौजा येऊन पोहोचल्या तर फार उतम आहे. निदान फौजा येत्यात असा भरवसा झाला तरी तसा रंग करू. येथे फौज येत्यात तोवर बसवापटन व सिरे व होसकोट येथे ज्या फौजा आहेत त्यास तरी आज्ञा करविजे. श्रीमंताची आज्ञापत्रे आम्हास आली आहेत जे, संवंस्थानिकापासून जरूर वसूल करून घेने. बरेवजे देत असतील तर उतम, नाही तर मुलकात धामधूम करू असी याची पत्रे येथे आली; आणि थोडीबहुत यानी धामधूम केली म्हनजे हरयेक निकाल होईल, तोंवर काही रंग दिसत नाही. फौजा आल्या तर परभारे घाटाखाली मातबर सरदार व पाच हजार हे आधी रवाना करावी आनि होसकोट-वाल्यास सांगाव जे, कडप्याच्या मुलकात या अविंधाची फौज आहे ते इकडे येऊन पावे आनि संवस्थानाकडे पाच च्यार हजार फौज व बलवंतराव अगर गोपालराव असे मातबर सरदार आल्यावाचून काम होत नाहीं. खासा स्वारी झाली तर फार उतम आहे. येक छयावनी करून रामेश्वरपरियंत येकराजे होये. सारांश दोघेहि दो ठाई जे मुख्य आहेत ते आपले फौजेची मार्गप्रतीक्षा करितात. सावजीचें वर्तमान तर खंडेराव लस्करातून येऊन करारप्रा याचा निकाल केला तर करून घेतच आहेत. नाही तर कबिले बदस्त पुण्याकडे वाटे लाऊन हे उठून लस्करात येतील. दुर्गस्ताचा उलगी येक अम्हाकडे आला होता. त्याजबरोबर कितीक वर्तमाण सांगूण पाठविले आहे. पत्र लिहिलां नये. यास च्यार रोज झाले. आद्याप प्रतिउतर आले नाही. त्यानी येताच आधी विचारले जे फौज कधी येतात? श्रीमंत कोठे आले? महिन्या पंधरा रोजानी फौजा येतात म्हनून सांगून पाठविले आहे. स्वामीस श्रुत्य होये. देखले येकिले

वर्तमान कचे पके सेवेसी श्रुत्ये होये. धण्याचे मर्जीस येईल ते करावे. खर्चाची तसदी फार आहे. रोज पाच रुा खर्चास लागतात. आमच्या प्रारब्धास घरी दारी कर्जच लागले आहे. निवारन करनार स्वाम समर्थ. शेंक्रसणाचे तील सेवेसी पाठविले आहे. कृपा करून स्वीकारावे हे विनंती.

¶*The writer Vithal Samraj, reports the details of the siege of Mysore by the refractory commandant, at the same time dwelling on the miserable straits to which the Raja of Mysore had been reduced. He refers to the growing menace of Haidar Ali and suggests that there never could be a more opportune time to complete the conquest of Mysore, torn and distracted as it is, by civil feuds and risings all over the province, if a few more troops could be spared. The letter is very informative and shows how the rise of Haidar Ali was due to the defeat of the Marathas at Panipat.*

No. 117] [*17-2-1759*

श्री

यासी पत्रे

१ राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांसी पत्र की साल गुदस्ता जानेफलाचे मुकामी तुम्हाकडील सरकारचा यैवज येणे, त्याचे निशेकरितां महंत हवसपुरी गोसावी यासी बोलूण कितीक गोष्टीणे त्याची खातरजमा केलीत. तेव्हा सरकारात तुम्हाकडील यैवजाची निशेची चिठी गोसावी याणे दिल्ही तो यैवज व तुम्हाकडे यैवज त्यांचा येणे त्यापैकी तुम्ही बंगाला व कटक वगैरे माहाल येथील यैवज लाऊण दिल्हा होता त्यावरोण गोसावी याणे सरकारची निशा केली. ऐसे असता तुम्ही त्याचे यैवजास खलेल केली म्हणून यैसियास हे गोष्ट तुम्हायोग नव्हे. मातबर साहुकारास रजावंद रक्षिल्यास सरदारांस उपयोगी यैसे आसतां यासी आंजूरदे करावें हे उतम नाही. तुम्ही वचनास आंतर केल्यास होणे ते येथास्थित होईल, परंतु शब्दास आंतर नसावें. तरी यांचे समाधान करूण यासी जो आयेवज लाऊण दिल्हा आसेल तो आयेवज यांचे पदरी क्षेपनिक्षेप पडे आणि यांचा बोभाट न ये ते करावि विहित आसे.

१ राजश्री मुधोजी भोसले सेना धुरंधर यांसी पत्र की सरकारचा आयेवज राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा याजकडेस येणे. त्यांची निशा महंत रा। हवसपुरी गोसावी याजकडूण सरकारात देऊण त्यांसी बंगाला व कटक वगैरे यैवज लाऊण दिल्हा. त्या यैवजी कटकाहूण खजाना येत होता तो रा। बिंबाजी भोसले याणी रायेपूर प्रांत छेतीसगड येथे आटकाऊण ठेविला म्हणून तुम्हास कललियावर तुम्ही त्यांस पत्रे लिहिली ते पत्र आमान्य करूण खजाना सोडिला नाही. याजवरोण तुमचे आणुमते कर्म केले यैसे

6945

दिसोन आले. तरी हाली हे पत्र आपणे लिहिले आहे. तरी जे गोष्टीने खजाना येथे पोहचे आथवा महंताचे पदरी पडे ते केल्यास उतम आहे. हे गोष्ट तुमचेकडून होऊण न ये तरी परभारे पारपत्य करोण खजाना आणावा लागेल थैसे पष्ट समजोन खजाना सोडूण देवणे. पुढे त्या मार्गे आनीक खजाना महंताचा येईल त्यासी मार्गी उपद्रव न होये ते करावे.

राजश्री बिंबाजी भोसले यांसी पत्र की सरकारचा यैवज राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा याणी महंत हवसपुरी गोसावी याजकडून देविला आनि गोसावी यांसी यैवज कटक वगैरा येथे लाऊण दिल्हा, त्यापैकी कटकाहूण खजाना येत होता, तो तुम्ही रायेपूर प्रांत छेतिसगड येथे आटकाऊण ठेविला, हे गोष्ट उतम न केली. तुम्ही मातबर वंसज आसोण अनिष्ट कर्मे करावी, येन्हेकरूण लवकिकास हाण होऊन वेर्थ श्रम पावावे यात उतम नाही. सरकारच्या भर्णेयाचा आयेवज येत आसता तुम्ही आटकाऊन ठेविला, येणेकडूण परिनाम उतम होणार नाही, हे पुर्ते समजोन खजाना बदरका देऊन नागपुरास आथवा पुन्यास पोहचाऊन देणे. आनीक ते मार्गी खजाना येईल त्यासी मुजाहिम तुम्ही न होणे व होऊ न देणे. या कामास मुजरत कारकून व जासूद पाठविले आहे. यासी मसाला.

३

येकून तीन पत्रे द्यावी.

छ १८ जाखर तिसा माघ वद्य

लिहिणे

¶*Drafts of letters addressed by the Peshwa to Janoji, Mudhoji and Bimbaji Bhonsles regarding the collection of dues from Bengal and Katak by Haunsapuri Gosai. The provinces were given over to the Gosavi in settlement of the debts received from him. The paper shows how careful the Peshwa's Government was in preserving the credit of bankers.*

√ *No. 118*] [*12-2-1759*

पौ छ २ जमादिलाखर

तिसा माघ

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ-

साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक रामाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १३ माहे जमादिलाखरपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून

येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ ६ मिनहूचे सादर. तेथे आज्ञा कीं, केसो माहादेव काणे हबशाकडील चिठ्या आणून मुलकांत टाकून दंगा करीत होते. ते व सिवराम जंगम ऐसे दोघे सुवर्णदुर्गाहून हुजूर रवाना केल्याप्रा पोहचोन सर्व हकीकत मनास आणितां केसो माहादेव याचे आंगी मुदा लागला. त्यास हे म्हणतात कीं, सेख दरवेस व सेख हसन याचे कबिले सुवर्ण-दुर्गात अटकेत ठेविले आहेत, त्यांसी राजकारण करावयासी तुंम्ही सांगितलें त्यास आपली सचोटी पडावी याजमुळें इतका विचार केला. त्यास हा प्रकार तुमचे अनुमते जाहाला कीं कायेॽ तुंम्ही यांस राजकारण करावयास सांगितलें होते, ते तपसीलवार हुजूर लेहून पाठवणें. या प्रकर्णात राजेखान गोरेगांवी होता, त्याचें घर दस्त करून त्यास तुम्ही अटकेत ठेविले आहे त्यास हुजूर पाठवणें. त्याचे घरांत कागदपत्र चिठ्या वगैरे उपयोगी सांपडले असतील ते व सिके कटार त्याची, त्यास बळकटी करून हुजूर पाठवणें. याखेरीज आणखी या कामात असतील ते रवाना करणें म्हणौन आज्ञा. यैसियास केसो माहादेव यांणी गुदस्तां सेवक जंजिरे सुवर्णदुर्गी असतां सांगितलें कीं आपला संदर्भ सिदी याकूदकडेस आहे. त्याचे बोलीचा मजकूर कांही सांगितला. त्याजवर सिदी सुरूल व हसन नाईक व कुकजी बेल(?) याखेरीज रा। बालाजी कृष्ण व गोविंदपत सटकर यांची राजकारणें दाट लागली. इतक्याचे बोलीची येक-वाक्यता बालाजी कृष्ण याणी प्रमाणांत आणून लिहिलें तीं पत्रें हुजूर सेवेसी पाठविलीं, ते समई केसो माहादेव साहीस सेवकाजवल होता. म्हणो लागला कीं राजकारणे आपणाजवल सांगतात हीं प्रमाण नाहीं. मजला आज्ञा कराल तरी मी जंजिरेयांत जाऊन सिदी याकूद यासी भेटोन आपले निसबतीचे सूत्र ठीक करून येतों. येविसी आणभाश करून जावयासीं सिध्ध जांहाले. ते समई त्यास सांगितलें कीं, जंजिरेयावर जातों हा लौकीक होऊन शामल खबरदार जाहाला आहे. तुम्ही ठीक करून येणार, समयावछेदें तुमचा नाश केला तरी ब्राम्हणाचे दुर्निमित्य येईल. हे गोष्ट कांही कार्याची नाहीं. याचे उत्तर मार-निल्हे याणी केले कीं, माझे दुर्निमित्य कोण्हावर नाही. मी जातों. निमित्यास जंजीरकरांस वस्त्रें व पत्रें द्यावीं. त्यावरून सिदी इभरम खानजाद्या व सिदी याकूद यांसी वस्त्रे देऊन रवाना केलें. बराबर वाघोजी सिंदा व देवजी कदम वगैरे खासबारदार च्यार दिल्हे. त्यास मारनिल्हे जंजिरे यांत जातां वाघोजी सिंदा व देवजी कदम बरोबर नेले. दोन खासबारदार राजपुरीस बाहेर ठेविले. आत जाऊन वस्त्रें व पत्रें उभयेता षामळास दिल्हीं. उपरांत सिदी याकूदजवल केसोपंतानी खलबत केले. उभयेता खासबारदार यांसी त्यातील अर्थ न कलतां

सांगितलें कीं, मीं ठीक केले आहे. त्यावर जंजिरांतून निरोप घेऊन तल्यास आले. तेथें सेवकापासून दोनसें पुतल्या तूर्त सिदी याकुद यांसी द्यावयाकरितां म्हणून घेतल्या होत्या त्या वाघोजी सिंद्याजवल होत्या. त्या रोजेखान गोरेगांवी शामळा-कडून हवालदार होता. हा सिदीकडील म्हणून खासबारदार यांसी समजाऊन दोनिसे पुतल्या घेतल्या आणि खासबारदार याबा आम्हांस जजीरकरांची पत्रांचे जाब व आपलें पत्र पाठविलें त्यात लिा कीं, तूर्त काम होत नाहीं. मी घरीहून लौकरच येतों. उपरांत राजपुरीस सेवक आल्यावरी केसो माहादेव आला. त्याणें सांगितले कीं, राजेखान शामलाकडील हवालदार गोरेगांवी आहे. तो राजश्री त्र्यंबक विनायेक यांणी अटक करून ठेविला आहे. तो माझे निसबतीचे कामांत आहे. त्यास आणऊन माझे हवाला करावा. त्यावरून त्र्यंबकपंत येथेच होते त्यांस सांगोन याचे हवाला केला. सेख दरवेस व सेख हसन हे हसन नाईक याचे राजकारणाचे आहेत. यांचे कबिले सुवर्णदुर्ग प्रांते आहेत ते माझे हवालीं करावें. कबिले माझे स्वाधीन जाहाल्याने ते ममतेने येतील. उभयेता जंजिरेयांस आहेत. याप्राा करार करून राजपुरीहून आपले घरास गेले. पुढें राजेखान मुबईकडून जंजिरेयांत गेला. तेथून मुसलमान सिपाई व चिठ्या सिक्यानिसी आणून मुलकांत पैका वसूल करावयाचा आरंभिला. त्यावर प्रजन्य कालीं केसो माहादेव राजेखानास घेऊन राजपुरीस आले. पंध्रा दिवसांची मुदत जंजिरेयांत राजेखानास पाठवितों यैसा निश्चये करून तल्यास गेले. त्यास दोन मास होत आले. राजेखानांस घेऊन यावें तें नाहीं. त्यास माणसें पाठऊन केसो पंतास आणविलें त्यावरून आले. वर्तमान पुसिलें कीं, राजेखान नेलात तो कोठे आहे? त्याणी उतर केले कीं, लौकरीच येईल. त्याजवरी केसोपंतास राा बाजी गंगाधर यांचे स्वाधिन करून सेवकाचे शरीरीं स्वस्थता नाहीं म्हणून रेवदंडयास जाऊन पुढे उंदेरीच्या मोर्चेबंदीकारितां थळास गेलो. मागे बाजी-पंताजवल राजकारणाची घालमेल सांगोन तल्यास म्हणून गेले ते मुलकात जाऊन पैका वसूल करावयाचे विचारांत लागले. हे गोष्टीचे शोधास रसालगडा-हून राा जिवाजी अबरे व खेडाहून गोविंद माहादेव चौकसी करितां शामलाकडील सिपाई यांचे घरी राहून हे ते येक होऊन सिवराम जंगम चिठ्या मुलकांत टाकी याची चौकसी होतच आहे. तो राजेखान जंजिरेयाहून बाणकोटास येऊन कबिला लांबवणार, केसोपंत व राजेखान येक होऊन मनसबा करीत होतें, हे वर्तमान हसन नाईकास कलले. त्यांणी बाजी गंगाधर यांसी सांगितलें त्यावरून स्वारी पाठऊन राजेखान यास धरून राजपुरीस आणिला. तो बाजी-पंताजवल म्हणो लागला कीं, आम्हांस कामगारीस पाठविले होते, तेथून आलों आतां आपला कबिला मौजे तळे ताा खेड येथे केसो माहादेव याचे घर आहे तेथे

घेऊन जातों म्हणून निरोप मागत होता. त्यास हसन नाईक यास याचें लबाडी-चा मुदा पुरता ठावका होता याकरितां हसन नाईक रेवदंड्यास घेऊन आला. मनास आणितां राजपुरीस येक प्रकार मालुमात केली. आम्हाजवळ येक प्रकार सांगतो पहिलें आम्हाजवळ पध्रा दिवसां येतों म्हणून मुदत केली होती. त्यास च्यार महिने जाहाले. आपला कबिला बाणकोटी नेऊन लबाडी करावी हा मनसबा चितात आला म्हणून रेवदंड्यात अटकेत ठेविला. पुढे थलास गेल्यावरी रसालगडाहून पत्रे आली की, शामलाचे सिपाई मुलकात सिरोन चिठ्या टाकितात. हा सर्व मजकूर केसोपंत काणे याचे निसबतीनी होऊन सिवराम जंगम मारानिल्हे-कडील चाकरमाना सिपाई याणे का। खेड येथे चिठ्या टाकिल्या, हा मुदा शाबूत जाहाला. याप्रा। सिपाई धरावयासी गोविंद माहादेव का।दार खेड याणीं पाठविलें तो शामलाकडील सिपाई पलोन गेले. हा लौकिक जाल्यावरी केसोपंतानी सेवकास थलचे मुकामी पत्र पाठविलें कीं, आपले निसबतीचें राजकारणाचा लौकिक जाला म्हणोन परिहारयुक्त लिहिले. त्यास केसोपंत पुरा लबाड यैसे चितांत आले त्यावरून किले रसालगडी बेडी घालून ठेविला. जंगमास जंजिरे सुवर्णदुर्गी बेडी घालून ठेविला आणि यांचे वर्तमान कचे हुजूर ल्याहावें तों स्वामिचे आज्ञापत्र सादर होऊन उभयतांस हुजूर नेले. हाली आज्ञेप्रा। सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिले आहे. राजेखान यासी रे(व)दडेयाहून मजबुदीने हुजूर रवाना करणें म्हणोन रा। माहादाजी रघुनाथ यासी लेहून पाठविले आहे. राजे-खानाचे घर आम्हांकडून जफ्त जाहाले नाहीं. त्याचा कबिला रा। जयराम त्र्यंबक याणी गलागडी आणून ठेविला आहे. कागदपत्र सिकेकटार काय सांपडले असेल ते त्याकडेस असेल. सेख दरवेस व सेख हसन याचे कबिले केसो माहादेव याचे स्वाधीन केले होते. ते फिरोन रसालगडी नेऊन ठेविले आहेत. या प्रकर्णात दुसरा कोण्ही आढळांत आला नाही. राजेखान हुजूर रवाना केला आहे. शेवेसी कलावें. राजेखान यांसी राजपुरीस आणऊन वाजपूस करावी, त्यास शरिरास अनारोग्यता यामुलें वडोन आले नाहीं. हालीं सेवेसी पाठविला आहे. याची वाजपूस चागली जाहालीयासी केसो माहादेव याचे राजकारणात असतील ते सविस्तर निवेदन करील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo explains the duplicity of Keso Mahadeo who promised the writer his assistance to capture Janjira and did acts violating his promises.*

6949

No. 119] [14-2-1759

श्री

आसीर्वाद उपरी. राजश्री कृष्णाजी अनंते[१] याणी पत्र पाठविले त्यात खुलासा आम्ही रामनगरास येऊन शह दिल्हा. त्यास जवारीहून मुजफरखान याणी पत्र पाठविले की, रामनगरकरास आम्ही अश्वासन दिल्हे आहे, त्यास उपद्रव न देणे. यैसी पत्रे येत गेली. त्याचा मजकूर दिवसगतीवरी घालावयाचा दिसोन आला. त्याजवरून रा। सटवोजी जाधव व येशवंतराऊ पवार यास पत्रे पाठविली. ते आले. ते आम्ही येक होऊन रामनगरचे पारपत्य केले. त्याजवरी हे वर्तमान खानास कलताच जवारीहून आले. सर्व येक जालों. खान रामनगरकरास आम्ही आश्वासन दिल्हे आहे त्याप्रो तुम्ही सर्वांनी द्यावे, धन्याजवल नेऊन याचा गौरे करावा, याप्रो बोलले. त्यास राजाहि येऊन भेटला. त्यावरी सटवोजी जाधव व खानानी बसोन विचार केला, रामनगरकराचे राज्य रक्षावे. आपणासहि बोलाऊन सला पुसिली. आम्ही ते बिज्यापूरचे पातशाहाचे चाकर, विज्यापुराखालील त्याणी खाऊन आसावे, जबरदस्तीने ठिकाणे घेतली आहेत ती सोडावी ऐसे सागितले. या(स)प्रो जाले म्हणजे कोल्याची जड मोडेल म्हणून लिहिले व तुम्हास त्याणी सविस्तर मजकूर लिहिलाच आहे. त्यास याउपरी कोल्या(ची) जड मोडे, मुलकात उपद्रव न होये ते करणे. कोली लबाड जबरदस्ती आहे तो उगेच राहातील मागती लबाडी करावयास चुकणार नाहीत, याचा पुर्ता विचार करून करणे ते करावे. रामनगरकर व जवारकर व पेठकर वगैरे यास घेऊन खान तुम्हाकडे जाणार होते ते गेलेच असतील. सविस्तर[२] पेशजी लिहिलेच आहे. कृष्णाजीपतानी लिहिले हे चागले. ठाणे आसले तरी त्यापासून पा। (पैका) घ्यावा त्यात घ्यावे. वरकड पुर्ते पारपत्य व्हावे आगर जामीन घेऊन हुजूर सेवा करावी. कार्याकारण आपलाहि बदोबस्त त्याची स्थापना केली तरी त्यात आसावा. आपलेकडील त्रिबकजी आगर आपाजी रजावंदीस वाटेवर नीट चाले आसा पाहून जो ठेवणे तो ठेवावा. त्यात जे उतम बदोबस्त दिसेल तो करणे रा। छ १९ जमादिलाखर. हे आसीर्वाद.

¶*Sadashivrao Bhau writes to Nana Purandare regarding assurance of safety given to the Raja of Ramnagar by Muzaffarkhan. In this connection letters Nos. 109-112 in this Selection and No. 211 of Selection 24 may be referred to.*

---

१ उपनाम तांबे. २ येथून हस्ताक्षर भाऊसाहेबाचें. पत्र बहुधा नाना पुरंदरे यास असावें.

✓No. 120] [24-2-1759

पाो छ २९ जाालाखर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री कृष्णाजीपंत दाजी
स्वामीचे शेवेसी

पाो नारो त्रिबक कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत असावे. यानंतर आपण पत्र पाठविले त्यात लिहिले की घणदीवीचे मुकामीहून व मार्गीहून पत्रे दोन चार पाठविली ती व वसईहून व सरकारची पत्रे पाठविली ती पावलीच असतील. त्याचे उतर व तुम्हाकडील वर्तमान व शामलाकडील वर्तमान व इंग्रेजाचे तुमचे कैसे आहे ते सविस्तर बारीक मोठा मजकूर लिहून पाठवावा. आम्ही नवसरीस मुकामी आलो म्हणून लिहून पाठविले. त्यास आपली दोन पत्रे आज शनवारी दोन प्रहरा पावली व वसईचीहि आताच पावली व श्रीमंत राजश्री नाना स्वामीची पत्रे पाठविली त्याची उतरे पाठविलीच आहेत आपणास पावतील. शामलाने विसावे जमादिलाखरी इंग्रेज सुरतेवर चालून गेला होता त्यास दोहीकडून तोफखाना शुरू जाला. त्यास शहरातून मार किल्यावरचा जाला, त्याने इंग्रेजाचा येक भला माणूस व च्यार इंग्रेज गैरसिपा(ई) गोल्याने उडून गेले. त्याजवरून इंग्रेजाचा मोहला मुरडून मुकामास आला. सिदीमध्ये भांडायाचा जोम बराच आहे परंतु शहर हाती नाही, याजकारणे कसे होईल ते पाहावे. इंग्रेजाचे आमचे फारच सख्य चालते. तो रोज आम्हाकडे माणसे पाठऊन वर्तमान लिहून पाठवितो. आम्हाकडूनहि बातमीस माणसे जातात. हाली आपली स्वारी आलियावर राजश्री दामोदरपंत इंग्रेजाकडे पाठविले आहेत ते आलियावर आपणाकड पाठऊ. आपण याउपरी फार पुढे न जावे. येथील जाबसालासारिखे लिहून पाठऊ. वरकड आछनचाहि सीदीस भरवसा नाही. क्षणक्षणा त्यास बोलाऊन खरे करितो यैसा विचार आहे. बारीक विचार लिहिणे ते राजश्री दामोदरपंताबराबर सांगून पाठऊ. कलावे बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती. रा छ २९ जाखर हे विनंती.

¶*Naro Trimbak gives to Krishnajipant an account of the fighting between the English and the Sidi at Surat.*

6951

No. 121] [2-3-1759

छ ९ रजब फाल्गुण तिसा

(श्री)

आसीर्वाद उपरी रा। दमाजी गायकवाड याजकडील रुपयांची निशा होत नाही. याउपरी येके दोहो रोजांत उपाशी बसऊन निकाल करून घ्यावा लागेल म्हणून लिहिले ते कलले. ऐशास त्याशी च्यार गोष्टी उत्तम सांगोन पैका घ्यावा व त्यानीहि द्यावा, यातच उतम आहे. असेंहि करिता पैका न दैत तर त्यास सांगावे की चिरंजीव राजश्री नाना पुरंधरे तिकडे आहेत त्यास पत्र पाठऊन तुमच्या मुलकाची जफ्ती करितो. याप्रमाणें सांगोन पाहून पैका आला तर उत्तमच, नाही तर चिरंजिवास पत्र पाठऊन जफ्ती करवावी. रा। छ २ रजब सुहूर सन तिसा खमसैन मया व अलफ. निशा+ नच होय तेव्हा माहाल जफ्त केलेच पाहिजेत हे आसीर्वाद.

¶*Peshwa Nanasaheb writes that a threat should be administered to Damaji Gaikwad that if he failed to pay off the arrears due from him, the jagir in his charge would have to be confiscated.*

No. 122] [20-3-1759 (?)

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसीं

सेवक महिपाजी राम कृतानेक नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ २० माहे रजेब जाणौन सेवकांचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीनी दया करून जासूदजोडे समागमे आज्ञापत्र पाठविले ते छ १० रजेबी पावोन संतोश जाहाला. पत्री आज्ञा जे नवाबाच्या शरिरास आरोग्य जाहालीयाचे वर्तमान लिहून पाठवणे. त्या प्रांतीचे नवल विशष वर्तमान लिहून पाठवीत जाणे. वरकड सविस्तर उतरे तीर्थरूपानी लिहिले आहे त्याजवरून कलेल म्हाणौन स्वामींनी लिहिले. अशास नवाबास आरोग्य जाहाले. लेकाची शादी छ २७ रजेबी करितात. इकडील सविस्तर वर्तमान श्रीमंत राजश्री पंतप्रधान याचे पत्री लिहिले आहे त्यावरून सेवेसी स्रुत होईल. राजश्री बाबूराऊ सवदेहून हानगलास आले ते मागोन येतात. त्यासमागमे सविस्तर वृत लिहितो. त्याजवरून सेवेसी विदित होईल. बहुत काये लि(णे). सेवेसी श्रुत होये. हे विनंती.

¶*Mahipaji Ram to Bhausaheb communicating the recovery of the Nawab (Salabatjang) from his illness.*

+पत्र नानासाहेबाचें. सबंध पत्र नाना फडणविसाचे हातचें असून खुणेपुढील मजकूर पेशव्याच्या हातचा.

No. 123] [*16-1-1753*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक दमाजी गाईकवाड समसेरबहादुर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील क्षेम ताा छ १० माहे रबिलवल मुाा मौजे मलगांव प्राा निबायेत आपल्या कृपावलोकनेकरून येथास्थित जाणून स्वकीये श्वानंदलेखनार्थ आज्ञा केली पाहिजे. तेणेंकरून संतोषाभिवृधि होईल. यानंतर सेवकाचें वर्तमान तर भ्रमामुळें चरणाचें दर्शन घेऊन आज्ञा मागोन श्वार होऊन यावें तें न जालें. तदनंतर श्री प्रेमपुरास आलो. तेथें श्रीचे दर्शन जालियावर शरीरीं आरोग्यता जाली. तेथून कूच करून मजल दरमजल श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे सेवेसी कसबे खंदार येथें दाखल जालों. तेथून श्रीमंतासमागमे कूच दरकूच आवरंगाबादेस आलों. पाच मुकाम कामाकाजामुळें जाले. कसबे नासिकपावेतो बंदोबस्त जालियाचें वर्तमान आलिया कासारबारी उतरून मौजे मलगाव प्राा निबायेती येथे आलों. तेथील किलेदार देहावर न ये. मग हला करून पेठ लुटून फना केली. किल्यास मोरचे लाविले. येवनाकडील किलेदार खोज्या दोन दिवस भांडला. जागा बहुत बिकट. परंतु आपलें प्रतापतेजउत्कर्ष; तेणेंकरून कार्यसिधि जाली. किलेदार बाहेर काढून श्रीमंती आपले ठाणें बसविलें. इतकीयावर गुजराथ प्रांते जाऊन अमदाबादचें कार्य करणें तें आपल्या प्रतापें होऊन येईल. श्रीमंत राजश्री दादासाहेब सेवकावर कृपावृधि विशेष करितात. सेवकाचे शरीरीं निक्षूण आरोग्यता आहे. येविसीं चिंता न करावी. आपला निश्चय हाच की ज्याचें म्हणवावें त्याचेंच म्हणवावें. दोन पिढ्या राजश्री राव दाभाडे सेनापति यांची सेवा केली, परंतु त्यानीं आमचें प्राण जात येथवर आले, तऱ्ही सदयेता न धरिली. आद्यापिपरियेंत आमचे ठाई त्यांची ममता जे आहे ते साहेबास निवेदनच आहे. अस्तु. आमची येकनिष्ठा त्यांचे चरणीं सुधा होती. तर साहेबांची पूर्ण कृपा होऊन साहेबी सेवकाचा आभिमान धरून ऊर्जित केले. आथपर आपल्यास साहेबाच्या चरणाविंतरिक्त कोण्हाचाहि आश्रय नाहीं. कायावाचामनसा साहेबांच्या चरणासी लये लाऊन आसों. आपले ऊर्जित दिवसेदिवस आधिकोतर करणार साहेब समर्थ असत. वरकड आम्हाविसीं आपल्यास कोण्ही कितेक प्रकारें सांगत असतील तर सुखंनैव, परतु सेवकाचा निश्चय साहेबांचे चरणीं जो आहे तो किमपि ढळणें नाहीं. आपण साहेब चाकरीविरिक्त दुसरा आर्थ जाणत नाहीं. आमचा आभिमान सर्वप्रकारें साहेबास आहे. साहेब ईश्वररूप

समर्थ आसत. विशेष काय ल्याहावें? कृपा निरंतर वृधि करून आज्ञापत्रीं सांभाळ करावयास साहेब समर्थ आसत. हे विज्ञापना सेवेसी श्रुत होय.

¶Damaji Gaikwad, writing to Bhausaheb, gives ample assurances of his unswerving loyalty to the Peshwa. The writer, in the course of this letter, also gives the news of his successful assault of the fort of Malgaon.

No. 124] [*30-3-1759*

पौ छ १८ रमजान

श्री

तीर्थरूप राजश्री भाऊ
वडिलांचे सेवेसी

आपत्यें सगुणेनें नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चैत्र सुध त्रितीया मंदवार मुाा झोंसीनजिक प्रयाग गंगापार सुखरूप पावलों विशेष. कुरा जाहानाबादेहून पत्र लिहिले त्याजवरून श्रवण जालेच असेल. उपरांत तेथून कूच करून फालगुन वद्य चतुर्दशीस प्रयागास आलों. वेणीसंगमी त्रिरात्र राहून तीर्थविध उरकिला. उपरांत काली चैत्र सुध द्वितीयेस सुक्रवारी पार उतरोन येथं मुकाम केला. उदईक कूच करून पुढें श्रीस जात असों. या प्रांतीचे वगैरे वर्तमान तीर्थरूपांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶Sagunabai, wife of Janardanpant, informs Bhausaheb of her arrival at Prayag and of her intention to proceed to Benares.

No. 125] [*8-5-1759*

श्री

तीर्थरूप राजश्री भाऊ
वडिलांचें सेवेसी

आपलें सगुणेनें नमस्कार विनंति उपर येथील क्षेम ताा वैशाख सुध १२ मुकाम श्रीगया सुखरूप असो विशेष. प्रयागचे मुकामीहून पत्रें पाठविली ती ती पावलीच आसतील, त्यावरून सविस्तर कलतेंच आसेल. श्रीकाशीक्षेत्रास चैत्र सुध नवमीस आलों. तेथे आठ रोज राहून तीर्थविध उरकून तेथून कूच करून मजल दरमजल गयेस वैशाख सुध प्रतिपदेस आलों. येथील गयावर्जनें यात्रेच्या

लोकांची व आपली चालीस लागली आहेत येथील गुंता लौकरीच उरकून श्रीस माघारे जाऊ. उपरांत साकल्यवृत्त वडिलास लेहून पाठऊन बहुत काये लिहिणें हे विनंति.

¶*Sagunabai writes to Bhausaheb giving the programme of her pilgrimage to the holy places in the North.*

No. 126] [22-11-1759

छ २६ जमादिलौवल सितैन

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक गोविंद बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. ताा मार्गसीर शुध ३ पावेतो स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील नजिबखानाचे बिगाड जालियाचे वगैरे सर्व वर्तमान दोन च्यार पत्रीं सेवेसी लिहिलें त्याजवरून विदित जाहलेच असेल. आलीकडील वर्तमान तर आम्ही आपली सडी फौज व राजश्री जनकोजीबावाकडील पथकें व रा। अंताजी माणकेस्वर याचे पथक मिळोन सडे दाहा हजार राऊत हरिद्वारासनिध गंगा उतरोन पार जाहलों. तमाम पलीकडील * * * रोहिल्यांची लुटीत मारीत जला * * * * * * * तो जाबतेखान नजिबखा-नाचा * * * * * * सादुलाखान व हापस रहीम येसे रोहिले * * * * आम्हास आडवे आले, त्यांसी जूंज जाहलें. कितेक रोहिले जुंजांत मारले गेले. पांच सात गाड्या दारू बाण रेहकलें मिळोन आम्हाकडे आल्या. रोहिले जलालाबादेचा आश्रय करून राहिले त्यांस घेरून आमच्या फौजा त्यांचा दाणाघास बंद करून राहिल्या. येक दोन रोजांत निघोन जाते किंवा लुटले जाते. तो रा। साबाजी सिंदे लाहोराकडे आबदालीचे शहावर होते ते आबदाली आला म्हणून आपली फौज सुधां आले ते अकसमात्र लस्करीच दाखल जाहले; आणि नवाब सुजातदौलेहि आपली फौज तोफखानासुधां घेऊन नजीबखानास सामील जाहले. आम्हास त्यास थोडेंच अंतर राहिलें. आलीकडे फौजेंत आबदालीची गडबड जाहली. यामुळें राजश्री जनकोजीबावानी चिठी लिहिली की तुम्ही लौकर निघोन * * * * * * . * त्याजवरून आम्ही नजिबखानाचा गु * * * * * हिला लूटून जाळून गंगा उतरोन * * * * (आ)बदाली लाहोराकडे आहे जर तो आलि * * * * फौजा

निघोन् त्याजवरच जातील. नाही येत तर नजिबखानाचे पारपत्य जाहलेच आहे. विलंब नाही. फिरोन येक वेल फौजेचा लगट करून पार जाहल्या म्हणजे कार्यच जाहले. माधोसिंग, रोहिले व मारवाडकर यानी आज दोन वर्षे मनसबा केला की येक वेल आबदालीस आणून धामधूम करून दक्षणी अमल उठऊन द्यावा, याप्रो सर्वांची अतस्ते पत्रे गेली. वकील परस्परें जात येत. आम्हास तिलमात्र वर्तमान आजपावेतो कललें नव्हतें. हाली प्रत्ययास गोष्ट आली तेव्हा कलली. काये चिंता आहे. स्वामीचे प्रतापेंकरून ज्यानी ज्यानी लबाड्या केल्या, मनसबे हरामखोरीचे केले आहे ते सर्व फजित पावतील. आम्ही या प्रांती गुतलो म्हणून * * * कितेक कामकाज राहिलें त्यास * * * * * म्हणजे अधी तिकडे जाऊन माहलचा * * * * सर्व तिकडील वर्तमान सेवेसी लिहून पाठऊ * * * तपसिलवार वर्तमान चिरंजीव राजश्री बाबूराव यास लिहिले आहे ते विदित करितील. आम्ही येथे आलो. सरकारी चाकरी पडिली. जुजाचे काम पडिले त्याजकरिता टाकून जावे कसे, त्याजकरिता राहिलो. सत्वरच हेहि कार्य होईल. मी याची बिदा घेऊन फौज व चिरंजिवास येथे ठेऊन परगणेयात जातो. मी इकडे आलो म्हणून कितीकानी नालीसी फार लिहिली. जबानी सागितली. त्यास मजला स्वामीचे आज्ञेप्रा करणे. इकडे गुतलो की तपसील लिहिला तो ध्यानात येणार नाही. करून दाखवीन तेव्हा स्वामीस लिहीन. परगणेयात जाऊन सर्व ठीक करीन. खावदाची मरजी कलली, याजउपरी पैसा कोठे कसर राहो देणार नाही. सविस्तर मागाहून सेवेसी लिहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Govind Ballal describes how he crossed the Ganges and defeated the Rohilla. He had however to give up the offensive and recross as the Abdali was advancing from beyond the Indus.*

No. 127] [*Received 3-8-1759*

छ ९ जिल्हेज सितैन श्रावण

श्रीवेंकटेशः ॥

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान स्वामी समर्थांच्य

पादांबुजाप्रति

आज्ञाधारक कृष्णराव गोविंद कृतानेक सा नमस्कार विज्ञापना येसिजे. दोन मास होत आले की सविस्तर वर्तमान मामलतेचे व तीन स्वस्थानाचे दस्तावेज रो गोपालराव या प्रांती आले होते. कुमक फिरासिसाची करून आंगरेजास तंबी

6956

करावी. गोपालराव देशाकडे गेले म्हणोन मनसुबा बंद राहिला. परंतु सेवेसी जाले वर्तमान विनंती करून लेहून पाठविले त्याचा उतर पावले नाही. फुलचेरीस मुसा भुसी व लालीकडे न गेलो. मार्ग आज्ञेचा इच्छीत बसलो. जर फुलचेरीस जावे तर दस्तावेज परतून घ्यावे लागतील. सांप्रत आंगरेज कंचीवर येऊन फरासिसाचे ठाने मारून आपले ठाने बसविले. तीनसे मानसे फरासिसाचे कामास आले. येक सरदार आंगरेजाचा, अडीचसे मानसे कामास आली. हे वर्तमान लालीनी येकून फुलचेरीहून जलदीने येऊन लढाई घेतली. बेखर्चीमुळे लोकानी तन दिधले नाही. कार्यसिध्ये न जाली. लाइलाज होऊन मागती फुलचेरीस जाऊन बसले. पैसा मुतलक नाही. काताडियाचे रुाये करून सात आठ लक्ष रुायेपरियेत गाहन चरमी रुपये ठेऊन कर्ज घेतले तेहि खर्च जाले. पुढे बेखर्ची फार आहे. मुसाभुसीसी व लालीसी मुतलक बनत नाही. लालीचे आज्ञेत चालत नाही. लाली आलियाने तमाम मुलुक वगैरे जाऊन आपेशास पात्र जाला. मुसा भुसी वगैरे फिरंगी लहान थोर कुपनीवाले मुसेबासी म्हणोन सरदार मातबर लालीचे जोडीचा छतीस जाहाजे घेऊन येतो. येवजहि फार, फौज सा सात हजार समागमे, तो मुसा भुसीचा आत्पविशाई निकट आहे. त्याचा मार्ग लक्षीत वरी बसला आहे. ते जहाजे आलिया पैका व फौज जे जे लागल ते तो देऊन मुसा भुसीस रवाना करणार म्हणोन खुशाल स्वस्त बसले आहेत. दुसरे वर्तमान विलायेतेहून गोरोनदोरी कुलयेख्तियार फुलचेरी वगैरे खुश्की. (अपूर्ण)

¶*Krishnarao Govind reports fighting between the English and the French in which the latter are being pushed back. The writer further speaks of differences between the French Governor Lally and Bussy as a result of which Bussy is not heartily co-operating with the Governor.*

No. 128] [*Feb. 1760*

श्रीशंकर

यादी कलमे

T बारा लक्षाची जागीर आमचे जागीर सलगतीपैकी पांच सा लक्ष हाल वसुली चांगली येणे प्रां द्यावी.

T खानदेशांत गेलियामुळें सरकारचे जागिरीचे नुकसान जालें त्यास वाजवी

T नगर किला व दुसरें स्थल द्यावयाचे बोलीत करार केले तें येसी दोन स्थलें बोलीप्रमाणें द्यावी.

T भोसल्यांचा तह पूर्वी जाला आहे त्याप्रमाणे करावा.

नुकसानी जाली असेल तो यैवज हर-येक स्थलीहून पोहचेसा ठेवावा.

N नवाबांची रजावंदी राखोन कार्य करावे.

T भागानगर प्रांतीचा मुलुक व अरकाटचा नवाबाचे हुकुमाखेरीज गैर-अमीली जाला तो आमचे व तुमचे इतिफाकने सुटेल त्यापैकीं निमे तुम्हीं घ्यावा, निमे आम्हास द्यावा.

N आम्हास काम पडलियास जरब लाविले तर येऊन सर्व प्रकारे काम करावे.

N जागीर चिरंजीव भाऊस रायांस दा लाखाची उतम द्यावी.

नवाबाजवळ तुम्ही पोहचल्यावर पुढें कोणी येक मनसबा विचार करणे तो आमचे विचारें शाहानवाजखानाचे रितीने करावे.

N आमचे वकिलापासून जैसे शहा-नवाजखान काम घेत होते तैसे घ्यावे.

T अम्हाकडील सरदार जाचक वगैरे बगररजा जातील त्यांस तुम्ही परि-छिन्न चाकर ठेऊ नये. ते सरकारचे हुकुमाखेरीज गेले तर त्यास ताकीद करून फिरोन येत ते करावे.

N फिरंगीयाचा जो विचार करणे तो आमचे विचारे करावा.

¶*This paper enumerates the terms offered by the Peshwa to the Nizam after the latter's defeat at Udgir. The handwriting marked T is Trimbakrao Pethe's and that marked N is the Peshwa's.*

No. 129] [*Received on 20-2-1760*

पौ छ २ रजब बुधवार

श्री

विनंती उपरी. येथून दोन च्यार रोजात निर्गम होऊन कूच होईल. मल्हार नाइकास आज्ञेप्रा दाहा हजार फौज तोफखाना उद्या बोलून रवानगी करतो. वरकड सारी फौज मागले कूच करावे. आठ रोज बेदराजवळ जाईल तो गंगातीर परली वगैरे या सुमारे असलें पाहिजे. जानबा आपलें घरीं आहेत. त्याचा पुत्र पाठवणे तो बेदरापुढे जाईल. हणमंतरायास आपले भेटीस आणून मोगलाचा भला माणूस बा घेऊन त्याचे नीट करून लाऊन देऊ. जानबा हणमंतराव आपलेसेच जाणावें. त्याचे गावखेडे आम्ही भांडून राखिले व घेत नाही. खंडागले लबाड. त्याचे गाव जागीर वाटेवरच आहे. मोकले होईल. जाधवराव कलतच आहेत. कांहीं महालहि जातात. हिदुस्तानची फौज आठ दहा रोज फोडतां येणार नाही. मग पुढे रवाना करून. दादाचे लाब जाणे

स्वामीची भेट होऊन जाले पाहिजे. स्वामी तुलेकरतां गंगातीरास येतील. तेथून पडतूरचे सुमारे गांठ पडावी. भोसलियाचा निर्गम करणें व दादाची रवानगी तेथून करावी. कर्नाटक व माहालोमाहाली पथके जाणे ते याच आठा रोजात जातील. आवसेपलीकडे मोगल गेलियावर आम्ही घाट उतरावा. खाली दरमजल येऊ. स्वामीचे येणे लौकर जाले पाहिजे. भोसलियासहि पाच सात रोजी बोलायाचे मुले लाऊ. जानोजी पाच सा हजार, मुधोजी दोन तीन हजार, करांडे हजार दीड येकूण सारे दाहा हजार होतील. बाबूराव कोनेरहि बाा आणावे. स्वामीची गाठ पडलियावर यांचा कारभार सेवटास जाईल. पाच लाख रुपये रवाना केले ते येऊन पावावे. ते व सात स्वामीजवळ आहेत, त्यावर रवानगी दोहीकडील होईल. माहाल नवे आले त्यांचे मामलेदार करार करून रसद होईल तोहि यैवज जमा होईल. माहादाजी गोविंद, गोविंद बलाळ वगैरे मामलेदाराकडे यैवज पुढील दसरापर्यंत येणे फार, त्यांची निकड होत नाही. आजमासे पहिले केले ते मनास आणून पत्रे पाठवावी. काम पडल्या आसेच थोर मामलेदार त्याणी दाह लाख कर्ज का न द्यावे ? आसो, चालते ते चालते. बारिकाची मात्र निकसी फार होती. पंधरा वीस लाख नवा खर्च देखील आताचे पाच येणार ते सुधा वीस होतील. पांच हजार नवी फौज, दाहाबारा लाख इभराम खानाचा खर्च वाढला. त्यास साठी लाखाचा मुलुख व स्थले आली. येंदाहि जप्ती व अखेरसालपर्यंत वीसपर्यंत वसूलहि येईलसे वाटते. हिंदुस्तानचा पेच नसता तर सर्व दक्षणच स्वामीची होती. आताहि निर्माल्यपणें दाहा बारा हजार फौज दाहा हजार माणूस इतके बल आहे. मराठे दाहा हजार आहेत ते आपले लगामी आहेत. आताहि जाला कारभार निभावला, फौजा रवाना झाल्या म्हणजे उतमच आहे.

¶*This is a wholly autograph letter by Sadashivrao Bhau to the Peshwa offering his views on the provision of funds and troops for the northern expedition. It is quite clear that until the famous deliberations of Patdur took place, it was Raghunathrao who was intended to lead the expedition against the Abdali.*

No. 130] *[1760 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती आज्ञांकित गोपाळराव केशव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. नवाब निजामअलीखान बहादर याजकडील माहाली सरकारचा स्वराज्याचा यैवज

येणे. ,त्याचा करार हली जाला आहे की पेशजी निजामनमुलुक याचे वेळेस ज्या माहाली जो ऐवज घेतला असल त्याप्रमाणे पुढे तह ठराऊन यैवज घेत जावा. ऐसियास सरकार माहूर येथील सरदेशमुखी व बाबती सरकार नांदेड व बालाघाट येथील मामलत त्या समई कवडे याचे नावे होती. वहिवाट तुम्हास विदित; त्यास तिसा वर्षा पलीकडे खंडणी वगैरे यैवज कोणे माहाली काये घेतला, त्याची चौकसी करून कागदपत्र पाहून सदरहू ज्याजती यैवज ज्या सालांत घेतला असल त्याचा झाडा माहालवार लेहून पाठवणे म्हणौन आज्ञापत्र सादर जाले; त्याजवरून आज्ञेप्रमाणे हिसबाचे पत्रक माहाल व तनखा व सरदेशमुखी बाबतीचा यैवज चुकवल्या करून आवजी कवडे व महिपतराऊ कवडे यानी घेतला, त्याचे पत्रक प्रांत माहूर सरदेशमुखी व बाबती सरकार नांदेड व बालाघाट येकंदर पत्रक लेहून पाठविले असे. नवाब जफरदौला याजकडील फौज हजार व गारदी दोन हजार ऐसा सरंजाम या प्रांतास येऊन धामधूम मांडली आहे. सरकार निसबतीचे लोकास उपद्रव देणार म्हणौन चर्चा. तूर्त त्याचे फौजेचा मुकाम कसबा कोसंडी सरकार पाथरी येथे जाला असे. सेवेसी वर्तमान कळावे याजकरिता लिहिले असे. याचा सर्व बंदोबस्त करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Gopalrao Keshav submits to the Peshwa tabulated accounts of the districts of Mahur, Nander and Balaghat, as ordered.*

No. 131] [*29-3-1760*

पौ छ १२ साबान सि-
तैन चैत्र

श्री

अपत्ये सदाशिवाचे सां नमस्कार विनती. राजश्री बलवंतराव गणपत याचा तैनात जाबता लिहून पाठविला, त्यापौ निमेचे अजमासे सरंजाम सालमजकुरी नेमावे म्हणून आज्ञा. त्यास पो वांगी व पो उंदीरगाव पौ केम वजा करून बाकी सरकार अमल मशारनिलेचे तैनातेंत सरजाम लाविला हा व पेशजी गांव यांजकडे आहेत त्यासुधा निमेच्या आंतच आहे. हाली सरंजाम नेमला यापौ कोणी रदबदली करून गाव मागतील तर न द्यावा व निबालकरानीहि विनंती गावासाठी केल्यास देऊ नये. येथेहि त्यास सांगितले आहे. पो मजकूरचा कचा आकार जाहाल्यास आद्यातच पडेल. +जेंसा आकार होईल त (सा) पडेल.

\+ पत्रांतील आरंभीचा मजकूर नाना फडणिसाचे हातचा असून यापुढील मजकूर खुद्द भाऊसाहेबांच्या हातचा आहे.

उदरगाव तप्यात उपलावी चिठी बदला करावयाची रदबदली जानबाकडील करितात. येक मोहलचा मुबदला * जाला व करीत नाही आसे सागितले आहे. तेथेहि आईकू नये. रा छ ११ साबान हे विनंती.

¶*Sadashivrao Bhau recommends to the Peshwa the grant of a saranjam to Balawantrao Ganapat Mehendale.*

No. 132] [*1-4-1760*

घ. रु. नं. ५७३]

श्री

यादी देवास वगैरे नवस व कामें करावी सुा सितैन मया अलफ छ १४ साबान चैत्र (पानिपतावर जय मिळावा म्हणून हे नवस केलेले दिसतात).

गोपालराव गोविंदानीं करावी.

नवस तुळजापुरी नगारखाना पाठवावा. त्याचे बेगमीस कांटी परगणियांत गाव लाऊन द्यावे व सरकार तर्फेचा नैवेद्य नंदादीप पूजा नेमून खर्च द्यावा.

पंढरपुरी नगारखानियाची स्थलाची सोये करून नगारखाना घालावा. दरमाहा खर्च त्यांकडेच सनद आसावी. चौकसी करावी.

[पुढील अर्धा बंद गहाळ]

सदासिवपंत पागा

देवी अंबेजोगाईस येक गाव हजार रुाचा द्यावा. त्यात देवीस पूजा व पंचवीस ब्राम्हणाचे अंनछत्र करावे. वरकड देव आहेत त्यास पूजा नैवेद्य नंदादीप सरकारच्या यैवजी चालवावे. येविसी तपसिलवार जाबता करून दिल्हा आहे. आधिक करणे ते व केले प्रो ताकीद करून चालवावे.

* * * गैरी कामे करावयाची

तुळजापूर चाकर व जानबा सर्वा देवाची दक्षणा घेतात ते जानबाजवळून सोडवावी. पंढरपुरासारिखें सर्वा देवा-

अबदालीची फते माल्हारबा आथवा नाऊसाहेब आथवा दादासाहेब यातून कोणीहि केलिया वेंकटेशास रुो

पुढील दक्षणा वगैरे जमा करून जामदारखाना करावा. देवास खर्च करावा. कर घेऊच नये. करार खर्च आसेल तो जाहागिरीत करावा. तेथे मद्याचा प्रघात फार तो उतम नाहीं. यास्तव येक कलाल ठेऊन देवीस नैवेद्य मात्र किंचित देत जावा. वरकड कोणी पिणे आगर घेणे करूं नये. येणेप्रो करावे. येविसी नैवेद्यास मात्र मद्य द्यावें. देवीसहि पुसावे, नाही म्हणत नाही, मद्यदेखील सर्व करावें. जानबा पुजाराने नच देत तर सरकारातून द्यावा.

नव्ये जाहागिरीत रोज वर्षासने सेते वगैरे धर्मादाव ब्राम्हणाचे आसतील ते पेशजीप्रो शोध करून चालवावे म्हणून सर्वा कमाविसदारास ताकीद करावी. समानचे जागिरीत नाइकानी निमे केले आहे, परंतु हलीचे जागिरीत भोगवटा आसेल तो धर्मादाव खैरात सगलीच चालवावी. थोडा आर्थ आहे.

तालुकदारास सागून कर सोडवावे

१ माहूर कवडे

१ तुळजापूर व माणकेश्वर व सोनारी जानबा

१ नलदुर्ग सरकारातून

१ प्रमर (?) विठल सुंदर येणेप्रो कर सोडवावे. माहूरची सनद आहेच, वरकड आपलेच आहे. विठल सुंदराने कबूल केले आहे.

१०००० दहा हजार देवावे. काम जाहलियावर द्यावे. काम होईल तेव्हा करावे. सिंदखेडाजवल देऊलगाव वेकटेशाचें गाव थोर आहे, तेथे हजार दोन हजार रुापर्यंत देवाची पूजा वगैरे व्यवस्था जालनापूरच्या कादारानी करावी, करवावी. यास्तवच गांवचे जरूर करवावे. चांगले स्थल आहे.

वेंकटेशास तूर्त कडपेकराकडून पाच हजार रुाचे तुलसीपत्रें आगर आणिखी पदार्थ सुवर्णाचा करून आर्पण करावा. येथून सनद भगवंतपंत व विसोबाकडे पाठविली. तेथून ताकीद करून शोध करावा.

येलगदल सरकारांत राजेश्वर आहे. हकीमजीची जाहागीर करार केली त्यांत तो गांव आसलीयास हकीमजीस मोबदला देऊन तो गाव घ्यावा आणि आर्धा यैवज देवब्राम्हणास पावेसे करावे. हकीमजीच्या जाहागिरीत नसल्यास मोगलाकडे आसल्यास राहिले. हकीमजीकडे आसेल सरकारांत घेतले तर हे काम हरि दामोदराकडे सागावे. मोठे स्थल आहे. मोगलाकडे आसल्या राहिले. हकीमजीकडे आसल्या जरूर करवावे.

चिरंजीव माधवरावजी यांस त्रिंबक जेजुरी कुरकुंब मोरेश्वर येथे दर्शनास पाठवावे. थेऊरी जावे. चिंचवडी देवाकडे जावें.

लोणार क्षेत्रीं दोन तीन देवास पूजा नैवेद्य नंदादीप व पंचवीस ब्राम्हणाचे अन्नछत्र करावे व तीर्थावर मसीद आहे ती पाडून टाकावी. हे काम कृष्णाजी गोविंद गोरे याजकडून करवावे. त्यास येथील कमाविस सुभा सन मजकुरी सांगितली आहे तेथून करार करून दिल्हा आहे. समाच्यार घ्यावा.

टोके गाव घेतला आहे तो बाबूजी नाईकाकडे देऊन काही देव व काही ब्राम्हणास पाहून वर्षासने करून सारा गांव तेथेच व्यये करावा. नाइकाकडे सनद दिली. बदोबस्त पुढील नेमून खर्च द्यावा. फडके यास विशेष नेमावे.

त्रिंबकी मुकुंदतीर्थापासून नरसिंह तीर्थ व तलेगावपर्यंत प्रदक्षणेच्या वाटेवर झाडे लावावी. हे काम नारो-भगवंत देवलाच्या कामावर त्याकरवी करवावे. पंचवीस हातावर झाड लावावी. दुतर्फा लावावी.

नासिकचे चक्रेश्वराचे पटांगण चक्रतीर्थी होत आहे ते त्रिंबकराव मामा करवी सेवटास लौकर नेवावे. कमरभर खडक फोडून गंगातीर्थात खोल करावी. दोन तीन हजाराचे लाहन देऊल चक्रेश्वराचे करावे. मामाकडून सारे करवावे.

कुशावर्त सिध जाहाले. पुढे चहूं-कडून घरे काढून वोवऱ्या पक्या कराव्या. राहूजीपंत करितील तर उतम, नाहीतर सरकारातून कराव्या.

केसोपंत पाटील निा कृष्णराव मामा व सरकारचा कारकून देऊन कामे करवावी.

भीमाशंकर येथे जागा नेमून केसोपंतास दाखविली तेथे हजार दीढ हजारपर्यंत रुा लाऊन धर्मशाळा बांधावी. नेहमी येक दोन ब्राम्हण ठेऊन देवास पूजा नैवेद्य नंदादीप चालवावा.

१ कमलजेपलीकडे तले आहे ते दाहाविसा हजाराचे काम आहे ते करावे.

त्रिंबकेश्वरी पूजा वगैरे बंदोबस्त केल्याप्राा नीट चाले ते करावें. हुजुरून समाचार घेत जावा. नारो आपाजी आगर त्रिंबकराव मामास सागून नीट चाले ते करावे. हुजुरून समाचार घेत जावा. नारो आपाजी आगर त्रिंबकराव मामास सागून नीट चालवावे.

नारो आपाजी उधो वीरेश्वर भिमा-शंकरचे कामास वाकीब आहेत. यातील कोणी पाठवावा. नेमून देऊन केसो-पंताचे हाते सेवा तेथील घ्यावी.

लाख८ पाऊणलाखपर्यंत काम आहे. नारो आपाजीनी आगर मामानी पाहून नीट बेत करावा. कुशावर्त चांगले बांधले, तसे वोवऱ्या विस्तीर्ण कांही घरेहि जातील. त्यास यैवज देऊन करावें लागेल. येकजन्मी काम आहे. बहुतकरून रावजीपंत करितील, नाही तर सरकारांतून करावें. त्याणीं केले तर बेतून सरकारातून द्यावे.

हरि दामोदर

परली वैजनाथीं मार्कंडेयतीर्थ चालीस गज रुंदी आसी गज लांबी आसेल, ते पायापासून नीट करावें. चांगले पनास हजारापासून लाखपर्यंत काम होईल. येथून सनद दिली, परंतु गवड्या व शाहाणा पाठऊन बेतून नीट द्यावे.

गंगा म्हसलें येथे गणपति गंगेत आहे तेथे चऊथरा चांगला बाधावा. देऊळ नवे थेऊरी म्हातारीच्या डोहावर केले आहे तसे करावें. चऊथरा देऊल देवास पुसोन करावे. येक ब्राम्हण ठेऊन पूजा नैवेद्य नंदादीप चालवावा. दाहा पंधरा हजार लागतील जरूर करावें. आपूर्व स्थल आहे. हरि दामोदराकडे नेमोन सनद दिली आहे.

परली वैजनाथी देवाचा मला जानबाकडून जमीन घेऊन करावा. उपाध्ये आग्नहोत्री अयाचित यास घरें देविल्याप्रो करून देवावी. देवास पूजा नैवेद्य

खेड त्रिसाद येथे गणपति नरसिंह येक दोन देव आहेत त्यास पूजा नैवेद्य नंदादीप ब्राह्मणभोजन दरसाल पाचशें शोपर्यंत करावा. सिवरामपंतानी करावें. चौकसी हरि दमोदरांनी करावी. याप्रो करावें. येथून सनद दिली आहे.

क्षेत्र मुदगल निा हरि दामोदर मुदगल पहिले चवथाई ब्राह्मणास आहे. हाली आणीक चवथाई ब्राह्मणास द्यावे. येकून निमे ब्राह्मणास जाहले. बाकी निमे सरकारांत राहिले, त्यांत देवास नैवेद्य नंदादीप करावा. गगेत पटांगण केले आहे ते पुर्ते थोडेसे वाढऊन करावें. गांवचे यैवजी करावें. फारच गंगा तेथे चांगली आहे. येक ब्राह्मणहि तेथे सेवेसी आसावा. सनद दिली आहे. पूर्णासंगमी कंठेश्वर माहादेव आहे त्यास पूजा नैवेद्य नंदादीप चालवावा. सनद दिली निा हरि दामोदर.

नेमिल्याप्रो चालवावा. सनद निा कवडे सनंद दिली. हरि दामोदर याणी परामृष करावा.

उबड व कुशतर्पण दाहा दाहा हजाराचे दोनी गांव आहेत, तेथें ब्राम्हण सिष्ट पाहून निमे द्रव्य ब्राम्हण देव यांची व्यवस्था करून द्यावी. हरिपंताकडे गाव आहेत. मोघम सनद दिली. याची व्यवस्था कोणी तेथे पाठऊन करून द्यावी. ब्राम्हण फार तेथे आहेत.

शुक्लतीर्थ पश्चमवाहिनी गंगा निंबगावी आहे तो गाव हणमंतरायाकडून घ्यावा. आवघे हजार रुापर्यंत आहे, त्यांत आर्धा गांव पाचसात ब्राम्हण गावी ठेऊन आग्रहार करावे. अर्ध्या यैवजी देवाची पूजा नैवेद्य नंदादीप दोन च्यार देव आहेत त्याचे करावे. शुक्लेश्वराचे देऊलाचे सिखर हजार दीढ हजार रुा लाऊन करावे. देऊळ निंबाळकर हणमंतराव याचे फडनिसानी बांधलें. सिखर वगैरे काम आहे त्याची सनद हरि दामोदराकडे दिली आहे. येसाजीपंतास सांगून गांव मागून घेऊन शंकराजी केशवास आगर हरि दामोदर यास सांगून आग्रहार व देवखर्च करावा. याप्रो जरूर करावें. हणमंतरायास देणे तर मुबदला द्यावा, परली हा गांव घ्यावा. त्याप्रो करावे.

मनरथ सुलतानजी निंबालकराकडून घ्यावा. तेथील देव दोन च्यार आहेत. त्यास पूजा नैवेद्य नंदादीप चालवावे. चतुर्वेदी वगैरे सिष्ट पाहून येक हजार पर्यंत रुा धर्मादाव नेमून द्यावा. येसाजीपंतासहि सांगितले आहे. जरूर गांव घ्यावा अगर मुबदला द्यावा, परतु घ्यावा. याप्रो करावे हरिपंताकडे सनद दिली आहे.

नारायेणभट व शेषभट यांस हजार रुाचा गाव आबाडात द्यावा. सदरहूची सनद आंबाडपैकी संकराजी केशवास दिली. ताकीद व्हावी.

गोविंदबावा बिडात राहातात, त्यास तीन च्यारशे रुाचा गांव मानूर आगर आबाडात द्यावा. सदरहूची सनंद आबाडपैकी शंकराजी केशव यास दिली. पाचश्याचा वसूल व तितकाच तनखा भवानदास व गोविंदबावा दोघे बंधू त्यांचे नावे सनद मानूरपैकी दिली. तेथेच पाचशे रुपये याचा नेमून द्यावा.

रामपुरीकर दयालबावा यास आंबाड परगणियांत पाचशे रुपयांचा गाव इनाम जवळपास नेमून द्यावा. सनद दिली.

कृष्ण जोसी संगमेश्वरकर यांस पांचशेपासून सातशे रुपावेतो गाव गंगातीरी द्यावा. निघतेसमई चागले जाहले तरी द्यावा आसे वचन. सबब सदरहूची सनद पाा नासिकांत गंगातिरी नासिकच्या कमाविसदारास दिली. ताकीद करावी.

नारो आपाजी

मोरेश्वरी स्थलाची सोये करून नगारखाना घालावा. खर्च सुभाकडे नेमून द्यावा.

जेजुरीस देवास पाचशे रुाचा गांव धारवाड तालुक्यांत सन सबात दिल्हा तेव्हापासून यैवज पावला न पावला शोध करून पाववावा. नवा गाव सन मजकुरी पासून गंगातीरी नारो बाबाजीकडून पाचशे रुाचा द्यावा. त्याचाहि यैवज येकूण दोन्ही यैवज देवास येथास्थित पावतसे करावे. गाव नेमून देऊन पत्रे सनदा करून द्याव्या. गंगातीरी नारो बाबाजीकडे नेमून गाव द्यावा. यैवज दोहीकडील नारो आपाजीनी पाहून काही नग दागिना आगर जे करणे ते समाचार घेऊन करीत जावे.

तुलापुरी नेमिले जागा घाट बांधून त्यावर लाहानसे देऊल च्यार दिवाली लांकडी वोवऱ्या कराव्या. देवघरात आमचे लिंगाजवल बाण आहे तो स्थापना करावी. पूजा नैवेद्य नंदादीप पंचवीस चालीस ब्राह्मणांचे अंनछत्र चालते करावे. चालीस पंनास हजार रुा पावेतो काम करावें. गुाा काम लागले सेवट करावा.

पुण्याहून पाशाणेपर्यंत विठलवाडीपर्यंत कातरजपर्यंत आलंदीपर्यंत थेऊरपर्यंत वाटेवर झाडे पिपर वगैरे लावावी. पनास हतावर झाडें लावावी. प्रेत्न थोडा, उपकार फार, यास्तव जरूर याप्रों नारो आपाजी जिवाजीपंताकडून करवावे.

6966

नारो बाबाजी

भिगारचा शुक्लेश्वर याचे देऊळ बाधावे, पाण्यात आहेत. दाहा वीस हजार खर्च करून चांगले करावें. फार विशेष करणें नाहीं.

श्रावण मासीं ब्राह्मणास फार उपद्रव यास्तव पर्वतीस चौसोपी व मधले दिवसीं दाहा हजारपर्यंत आनं भोजनास होई व संगमावर धर्मशाला व भोजनाचे होई व कोरेगांव घोडनदी सिरवल दोन च्यार जागा जागा नव्या चांगल्या करून बाळाव्या. काम थोडे, परंतु नाश मोठा होतो यास्तव जरूर करावें.

लक्ष भोजन करविले ते सेवटास न्यावे. बहुतकरून जाले आसेल. शोध करून सेवट करावा.

राव आपाचे वेळेस गावोगाव दाहा वीस रुान्यात करून आबे लाविले ते जाले. पुढे आगदी न जाले, त्यास जुनर पुणे खानदेश गंगथडी बालेघाट सर्वत्र ताकीद आसावी. गांव पाहून से दोनसे झाडे वर्षास लावावे. दाहा वीस रुान्यातहि करावी. दाहा वीस हजार जमा कमी होईल, परंतु आंबराई फार होईल. यात लौकिक व पुण्य आहे व कोणाचाहि द्वेष नाही. उत्पन्न होईल.

¶*This very interesting extract copied from a rumal in the Ghadni Section, enumerates the offerings promised by the Peshwa to propitiate the various famous deities in the South in order to invoke their blessings and grant success to the Maratha arms against Afghan invaders. It is evident what a burden of anxiety the Peshwa was labouring under at the time when Sadashivrao Bhau started on the expedition. It is also clear that the Peshwa at that time intended to send Raghunathrao from the South to support Bhau with fresh troops. Apparently the Peshwa relied on divine favour as much as on his splendid preparations for a successful termination of the momentous issue.*

✓*No. 133*] [*5-9-1760*

आसल बा नकल

श्री

राजश्री घनसेट करंजे गोसावी

यांसी

ꣿ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा बालाजी बाजीराव प्रधान आसर्वीद सुा इहीदे सितैन मया व अलफ. तुम्हापासून कर्ज घेतले मुदल मित्या रुा

४९६६८॥ मिती श्रावण शुा १

२२२४९॥। मिती मार्गसीर्ष शुा बा व्याज

७२९१४।

येकून बाहातर हाजार नवसे सवा चवदा रुा, यास व्याज दरमहा दरसदे रुा १ येकोत्रा सिरिस्तेप्रो करार केले असे. जाले मुदतीचे व्याज व मुदल हिसेब करून देऊ. शके १६८२ विक्रमनामसवत्सरे जाणिजे छ २४ मोहरम आज्ञा प्रमाण.

¶*Balaji Bajirao Peshwa gives this bond in writing for having contracted a debt of Rs. 72,000 from Ghanshet Karanje at an interest of 1 per cent. per month.*

No. 134] [*19-10-1760*

असलबा नकल

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये

राजश्री खडेराव रामचंद्र गोसावी यांसी

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुहूर सन इहिदे सितैन मया व अलफ तुम्हापासून कर्ज घेतले मुदल रुा

२४१०० छ १२ रावल
५५३५० छ १३ रावल
५५० छ १४ रावल

८००००

येकूण ऐसी हजार रुा घेतले यास व्याज दरमाहे दरसदे रुपया १ ◌ = येक रुपया चवल सिरस्तेप्रमाणे करार केले आसे. जाले मुदतीस व्याज व मुदल हिसेब करून देऊ. शके १६८२ विक्रमनाम सवछरे जाणिजे छ ९ रबिलावल

खताची नकल मारनिलेनी आणून दिल्ही. छ
४ जिल्हेज सन खमस सितैन,

¶*The Peshwa borrows Rs. 80,000 from Khanderao Ramchandra at the rate of Re. 1 As. 2 per cent. per month.*

No. 135] [*14-10-1760*

छ ७ रबिलोवल

श्री

पुरवणी राजश्री नाना

पंडित प्रधान गोसावी यासी

विनंती उपरी. शामलावरी सरकारातून मोहीम जाहाली आहे यामुळे इंग्रेज आदिकरून टोपीकरास विषण असावे ऐसे नव्हते. इंग्रेजांची तरी सर्व प्रकारे

सरकारातून पुस्तपन्हा होऊन बाणकोटासारिखा जागा करून दिल्हा असता त्याचे करत्रुत्व या रीतीने रुपास यावे यैसे नव्हते. आलें तेव्हा गोवेकर फिरगीयाची बातमी अप्रमाण कशावरून म्हणावी ? फिरगीयासी वेध आहेच. वलंदेजाने जंजिरा आश्रये धरून मालमलियेत सावकारीस आणिली असता, इंग्रजाचे मनोगताकरिता बद केला होता. इग्रेजावरी येहसान सर्व-प्रकारे असता इंग्रजाने सत्य सोडिले. तेव्हा फिरंगी, वलंदेज तरी कललेच आहेत. याजकरिता इतक्याचाहि उपमर्द आसिला पाहिजे. फिरंगीयाची जड गोवे, वलंदेजाची जड सुरत व शामल तेथे प्रत्यक्ष आहेच. अथःपर गोवे, सुरतकडेस फौजाचा नेहट व राजपुरी उंदेरीस हशम फौज हुजुरून येणार. त्यास अथःपर आवकाशावरी रवानगी नसावी. सुरतेवरी मुख्य नेहट फौजाचाच पाहिजे. सरकारचे आरमार गेले आहे व जाईलच. तथाप टोपीकराचा संकेत शामलाकडेस आणि तरांडीहि बारेयावरी आसत, आणखी जाता विलंब नाहीं तेव्हां परस्परे आरमाराची गाठ दर्यातच पडोन राहील. मुख्य गोष्ट सुरतेतील शामल इंग्रेज वलंदेजदेखील उखळून काढणे हा जोरा फौजावरी आहे. हेविशी पंत मारनिले याणी सेवेसी लिहिलेच आहे. रा छ ४ माहे रावल. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The Peshwa is informed of the dangerous attitude of the English, and the Dutch who intend joining the Sidi against him. The Peshwa at this time sent an expedition against Janjira but was thwarted in his designs by the English.*

No. 136] *[16-4-1761*

छ २१ रमजान इहिदे

श्री

श्रीमत राजश्री बापू

स्वामीचे सेवेसी

पोष्य नारो त्र्यंबक मुा जंजिरे विजयदुर्ग साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ताा छ १० रमजानपर्यंत जाणून स्वकीये लेखन करीत असावें विशेष. राजपुरीकडील वर्तमान तरी खुशकीने व आरमारानें सर्व मोर्चेबंदी होती व कांसा याजवर गुराबानजीक भिडऊन मारगिरी नेटबाजीनें होत असतां, इतकेयांत फिरंगियाचे आरमार आणविलें होतें, ते अंजणवेलीचे बाहेर आलें. हें वर्तमान इंग्रजानें यैकतांच आपलें आरमारसुधां जलदी करून जंजिरेयास आला. त्यावरी शामलानें इंग्रजाचे काहीं थोडे लोक व निशाणें यैसीं जंजिऱ्यावर व कांशावर घेऊन निशाणें लाविलीं, व सामान सरंजाम दोनी किल्यावर चडविला आणि

इंग्रजानें दोनी * * * चा बंदोबस्त करून राहोन सांगोन पाठविलें * * * जागे आपले ताबीन जाहलें आतां * * उन निघोन जाणें पुढें श्रीमंतांच * * * * आम्ही निभावणी करून द्यावया * * * * * सतां तुम्ही मोर्चे उठविले नाहीं * * * * * परिछिन काय नासेल बखेडा तुम्ही * * * * श्रीमंतांचा शब्द तुम्हास लागेल म्हणून आला * * * गोन पाठविलें. त्यावर तेंव्हांच त्यासीं कज्या करावा तरी * * * ची आज्ञा नाहीं, तेव्हां इकडून इंग्रजास सांगोन पाठविले जे, हुजूरचे आज्ञेविना मोर्चे उठवितां येत नाहीं. तुमचे चितांत काय करणें असेल तें करणें म्हणून साफ सांगितल्यावर त्याणें हुजूराचा जाबसाल यावयांकरितां पंधरा रोजांची मुदत केली व फिरंग्याचाहि आशय मनास आणितां, इंग्रजाची निशाणें किल्यावर चडली, आता आपण मारगिरी करीत नाहीं म्हणून. तेव्हां हें सर्व वर्तमान राजश्री रामाजी विश्वनाथ व राजश्री रामाजी माहादेव यां उभयतांनी हुजूर पुण्यास लेहून पाठविलें. त्यावरी तेथून आज्ञा आली जे, यासमयीं इंग्रजासी बिघाड करितां येत नाहीं. पुढें जैसें करावयाचें तैसें केलें जाईल. तुम्ही मोर्चे उठऊन तेथून निघावयाचें करणें म्हणून, त्यावरून सर्व जमाव व अरमारें देखील तिकडील तिकडे गेले. यावर मागाहून आम्हीहि आरमारसुधा तेथून निघालों ते छ ३ रमजांनीं विजयदुर्गी येऊन दाखल जाहलों, येविसीचें सविस्तर वृत श्रीमंतास लिहिलें आहे त्याजवरून अवगत होईल. सर्व प्रकारें आम्हीं आपले आहों. तदनरूप आपण ममतायुक्त परामर्श करीत असावें. तूर्त राजंपुरीचे मोरचे उठले. स्वामीस कलावें. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Trimbak writing from Vijaydurg reports to Sakharam Bapu that he was forced to raise the siege of Janjira by the English and return to Vijaydurga.*

No. 137] [*31-12-1760*

पौ छ २३ जमादि-
लोवल इहिदे सितैन.

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २२ जमादिलावल मुकाम मौजे धणगर टाकली परगणें नांदेड वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर निजाम अली ठिकाणीच आहेत. कृष्णराव बलाल व मुरादखान पोहचलियावर पत्र आलें नाहीं. श्रीमंत मागें राहून राजश्री

सखाराम पंत बापू यासी पुढें निजाम अलीकडे कांहीं फौज देऊन रवाना करणार. याणी पुढें जावें, मोंगलास भेटावें, बोलोन चालोन श्रीमंताकडे घेऊन यावें म्हणजे मग बोलण्याचा गुता नाहीं. तडक हिंदुस्थानांत जावें असा मजकूर होत आहे. निश्चयांत येईल तें सेवेसीं लिहून पाठवीन. हे विज्ञापना.

¶Hari Ballal writes about the Peshwa's earnest desire to proceed northwards after interviewing Nizam Ali. Sakharampant, he adds, has been deputed by the Peshwa to bring him for an interview.

No. 138] *[6-1-1761*

असल बा। नकल

श्री

राजश्री घनसेट करंजे गोसावी

यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री बालाजी ब

आसीर्वाद सु॥ इहिदे सितैन मया व आलफ. तुम्हापासून कर्ज घेतले मुदल आरकटी रुो

१६८०९ छ २४ जमादिलावल मार्गसीर्ष शु॥ १२

शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे

१६४०० छ २५ जमादिलावल मार्गसीर्ष वद्य १३

१७९१ छ २६ जमादिलावल मार्गसीर्ष वद्य १४

३५०००

येकूण पस्तीस हजार यास व्याज दरमाहा दर सदे रुपया १ⅼ= येक रुपया चवल सिरिस्तेप्रा॥ करार केले आसेत. जाले मुदतीचें व्याज व मुदल हिसेब करून दिल्हा जाईल. जाणिजे छ २८ जमादिलावल आज्ञा प्रमाण.

¶Balaji Bajirao passes a bond to Ghanshet Karanje for a loan of Rs. 35,000 contracted at an interest of Re. 1-2-0 per cent. per month.

No. 139] *[January 1761*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री मोरो बाजी स्वामी

गोसावी यासी

पोष्य कासी नानाजी आसीर्वाद विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाला. विशेष पत्री मजकूर रा॥ मलारबा व खंडोबा

व भावबा व वरकड इष्टमंडली याचे वर्तमान लिहिणे. त्यास रा मलारबा व पागा दोन व बरसेयाचे कमावि(स)दार यैसे ग्वालरीस पोहचले, तो हिंदुस्थानचे फौजेवर ईश्वरीक्षोभ जाला हे वर्तमान त्यास मुकाम मजकुरी कलले, त्यावरून ग्वालेरीसच राहिले. तों दो चौ दिवसानी पल लस्करचा आला. चिरंजीव रा तात्या घोडी दोन व माणसे दोन यैसे रा मलारजी होलकर याजसमागमे भिंडेस सुखरूप आले. रा खंडो भगवंत व बाजी बापूजी व भावबा व आपाजी मलार वगैरे कारकून मडली व सर्व इष्ट मंडली यैसे सर्वथा हारण होऊन ग्वालेरीस आले आहेत. रा येशवंतराऊ पवार सुखरूप आहेत म्हणौन रा गंगाधर येशवंत याचे पत्र आली तेथे लिहिले आहे व रा गोपाल संभाजीचे पत्र आले तेथेहि लिहिले आहे. कृष्णगडी क्षेमरूप आहेत यैसी शुभ त्याची वर्तमाने येतात. श्री कृपा करून संरक्षण करून आणील तो सुदिन आसे. सर्वदा साकल्यलेखन करून संतोषवीत जावे. लोभ कीजे हे विनंती. पो लक्ष्मण कासी आसीर्वाद विनंती. सदैव सांभालीत आसावें. राजकी वर्तमान आढले तर लिहीत जावे. लोभ आसो दीजे हे विनती.

¶*Kasi Nanaji writing to Moro Baji describes the condition of the fugitive Maratha army after its defeat at Panipat.*

No. 140] *[20-2-1761*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राज-
मान्य राजश्री मोरो बलाल पटव-
र्धन गोसावी यासी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुहूर सन इहिदे सितेन मया व आलफ. तुम्हापासून कर्ज घेतले. मुदल रुपये

१६०००	जुने पंचमेल
८४०००	अर्कट
१०००००	

येकूण येक लक्ष रुपये घेतले. यास व्याज दर माहे दर सदे रुपया १ येकोत्रा बीन सुटप्रमाणे करार केले असे. जाहाले मुदतीस व्याज व मुदल हिसेब करून देऊ. मिति माघ वद्य प्रतिपदा शके १६८२ विक्रमनाम सवत्छरे जाणिजे छ १४ रजब बहुत काय लिहिणें

बार

¶*Balaji Bajirao incurs a debt of one lakh from Moro Ballal Patwardhan at 1 per cent. interest per month.*

No. 141] 7-5-1761

पौ छ १३ जिलकाद
जेष्ट इसने

श्रीराम

श्रीमंत राजश्री नाना पुरंधरे स्वा-
मीचे सेवेसी

सेवक गणेश वेदाती मुकाम श्रीमथुरा सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १ माहे सवाल मुकाम मजकूर सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविली ती छ २९ रमजानी पावली. लिहिले वर्तमान कलो अला. स्वामी सरकारातून वराता राजश्री गणेश संभाजी व रुपये चऊशाची व राजश्री बालाजी गोविंद याजवरी रुपये चउशाची पाठविली. यो रुपये आठाशाची पाठविल्या. यैसियासी पूर्वी स्वामीनी राजश्री बाल गोविंदा-वरी वरात करून पाठविली, त्यास कपर्दिक प्राप्त जाली नाही आणि मागती स्वामीनी उभयेता मशारनिलेवरी वराता पाठविल्या. यैवज हातास आलियाणे उतमं आहे. यैसियास आम्ही उभयतां मशारनिलेकडे वराता पाठविल्या आहेत. तेथून यैवज हातास आलिवरी उतर पाठऊन देऊ. यानंतर पूर्वी स्वामीनी बाल गोविदावर वराता रुपये आठाशाची पाठविली त्यापैकी आम्ही राजश्री आयोध्या-प्रसाद यासी वरात आयोध्याप्रसादास देऊन पैका येथें घेतला. त्यापैकी रुपये ४०० च्यारशे घेतले. तरी स्वामीनी कृपा करून मशारनिलेस यैवज देवावा. त्याणे वराता स्वामीकडे येतील तरी त्याचा यैवजाची निशा करून देनार स्वामी समर्थ आहेत. यानंतर शाहाजादा क्रमनाशावरी आला आहे. याकुबअलीखान+ दिलीस जाणार आहे. स्वामीकडे येणार होता. फिरोन दिलीस जाणार. श्रीमंत राजश्री गंगोबा तात्या व रजश्री चिंतोबा तात्या मुकाम मजकुरी आहेत. कुरा वगैरे महाल यामधे आमल आपला चालतो. नबाब सुज्यातदौला आयोध्या प्राती गेला. सेवेसी श्रुत जाले पाहिजे. बहुत काये लिहिणें कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Ganesh Vedanti writes to Nana Purandare from Muttra on the subjects of money drafts drawn in his favour and reports the movements of the Crown Prince, of Suja-ud-Daula, Gangoba Tatya and others.*

+ Abdali's ambassador.

6973

No. 142] [*13-5-1761*

पौ छ १३ जिल्काद
जेष्ट इसने.

श्री

श्रीमंत रा नाना स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक गणेष वेदांती कृतानेक सिर सा। नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुषल ता। छ ७ माहे शवाल मु। श्रीमथुरा जाणोन आपले कुशल निरंतर सेवकास लेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर सेवकाने पूर्वी पत्रें आगऱ्याचे किलेदाराविषी लिहिली होती. किलेदारासी जाटासी लडाई लागली आहे. किलेदारास आपले हस्तगत करावे याकरिता विज्ञापनापत्र सेवेसी लिहिली असे. आगऱ्याचा किला जाटाचे हातास गेल्याणे मग हातास येणे कठिण आहे. यानंतर याकूब आलीखानाचे पत्र सेवेसी पाठविले असे. मागून खलिता श्रीमंत पाठऊन देऊं. खलिताकरिता कासीद ठेविला आहे. यानंतर अंतरवेदीत आपला अमल बसला. रा। बालाजी गोविंद याचा व रा। गोपालराव याचा अमल शुकहाबादेपासून ते कुऱ्यापावेतो अमल झाला. सेवकाने जीवनराम गुमास्त्यास नवाब शुजायेदौलाकडे पाठविला. यानंतर शाहावलीखा याकूब-आलीखानास आपणाकडे जवाबस्वालास पाठवणार. त्यास तो आपल्याकडे येणार आहे. याकूब अलीखानाचे पत्राचे उतर पाठवीजे. नजीबखा दिलीत आहे. यानंतर मातुश्रीचे शरिरास सावकाश नाही. सेवक रा। गंगाधरपंत तात्याची आज्ञा घेऊन बिठुरास जाईन. कासीद सेवकाजवल बिठुरास पाठविजे. बिठुरास महिनाभर राहीन. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Ganesh Vedanti reports news from Muttra to Nana Purandare about Abdali's Vakil Yakub Ali Khan proceeding to the South and the restoration of Maratha rule in the Doab.*

No. 143] [*17-5-1761*

श्री

पुरवणी राजश्री रामाजी माहादेव स्वामी
गोसावी यांसी

विनती उपरी. मुंबईकर इंग्रेजास पत्र पाठविले म्हणून पत्रीं लिहिले. त्यास ते पत्र तूर्त पाठविले नाहीं. जाणिजे छ ११ सवाल सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती. +पत्र पाहिजे तरी मागाहून पाठऊ पहिले

¶*Raghunathrao writes to Ramaji Mahadeo saying that the letter addressed to the English at Bombay has not yet been despatched to them.*

\+ यापुढील मजकूर राघोबाच्या हातचा.

No. 144]

पौ छ ३ जोंवल.

श्री

पुा श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

विनंती. या प्रांतीचे वर्तमान तरी कोलवणांत मलई केली, त्यास जवारकर व रामनगरकर व वासदेकर राजपिपलेकर सुरगाणकर यासी सामील दुर्जनसिंग पारडीकर. दमाजी गायेकवाड बहुधा या मलईत होते. हली पारडीकर दुर्जनसिंग तो बहुधा तापीतीर नजीक मांडवी येथें. जाऊन ठाणे बाधत आहे. बायेको पारडीस आहे. आम्ही अर्जुनगडास आलियावर त्याजकडील मगलजी कारभारी (फाटलें * * *) भेटला. आम्ही त्यास दाटले तेव्हां त्याज (फाटलें * * *) पंचवीस प्यादे (फाटलें * * *) पुढें याचा विचार (फाटलें * *) कसी काय ते आज्ञा करावी. आपले आगमनाचा (फाटलें * *) लक्षीत आहों. पारडी वासदेकर याविसी आज्ञा जाली पाहिजे. रामनगरकर त्र्यंबक सूर्याजींनी आपलासा केला म्हणतात. आण डोंगरातून बाहीर राजा येत नाहीं त्यास पस्ट पत्रें ल्याहावी जे, रामनगरकर वगैरे तुम्हास भेटले ते हुजूर पाठवणें. आग आपल्यापासी भुमे खासा आणवावे. मग जे करणें ते करावें. येसेच आपले करून ठेविल्यास फिरून उपद्रव याचा आहे. केले निर्फल आहे. याजकरितां सर्वांस ताकीद करावी. आपण जी फौज जमा जाहली आहे त्यानिसीच यावें. यथें मध्य आहे. येथून सारीच राज्यें सुटतील. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Nana is informed by the writer (?) to take note of the hostile attitude of the Chiefs of Mandvi, Jawhar, Ramnagar and other places in north Konkan and is asked to visit the region with forces.*

No. 145] [*29-6-1761*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गणेशपंतबाबा व तथा राजेश्री भिकाजीपंत
दाजी स्वामीचे सेवेसी

पोष्य बाजी बलाल कृतानेक सां नमस्कार विनती येथील कुशल तागायेत वैशाख वद्य १० पर्यंत मुकाम नजीक मंथेली वर्तमान येथास्थित जाणोन स्वकुषल

6975

लेखन करीत असिले पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणाकडून पत्र येऊन कुशलार्थ कलत नाही तरी येसें न करितां पत्रीं परामृष करीत असावे. यानंतर राजश्री बाबाजीपंत आपणाकडून आले. त्यास मार्गी व्याक्षेप मदगिरी येथे सवा महिना जाहाला होता. श्रीनिवासराव कारकुन दिा बच्याजी सेटे हे न पुसतां निघोन गेले होते. त्याकरितां बच्याजी सेट्याने मदगिरीकरास लेहोन पाठविले. श्रीनिवासराव व बाबाजीपंत संगतीने येत होते त्याबदल गडकरी याणी अटकाविले. त्यास कितेक प्रेत्न करून तेथून निघोन आले ते वैशाख वद्य ५ पंचमीस येकोडीचे मुकामी येऊ(न) भेटले. त्यांची चिंता न करावी. याउपरी देशास जाऊन सर्वांस भेटोन आपल्याकडे येतील. वरकड दरबारचे वर्तमान राजश्री दादा स्वामींनी लिहिले आहे त्यावरून कळेल. हिंदुस्थानाकडील वर्तमान विपरीत बहुत लोक गेले. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाचा आद्यापहि थाक लागला, असें नाहीं. थोर घात जाहाला. येक वेल त्यांचा थाक लावणार श्री समर्थ आहे. तुंगभद्रेचे मुकामी येक महिना या लस्करचा मुकाम होता. चिकबालापूर गुमनाईवाले खंडणी बुडाली. रायदुर्गचा पैका हा कालवरी आला नाही. भुकणजी पुणेयास पटणाहून गेले. सरकारचे हुंड्या केल्या त्याचा यैवज त्यास मिलत नाही म्हणतात म्हणौन वर्तमान आहे. त्या प्रांते अजीजखान याणी उत्पाद मांडला म्हणोन वर्तमान आले. याकरिता साहित्यपत्रे आपल्याकडे श्रीमंतानी पाठविली आहे. दिवसेंदिवस काल दुर्घट आहे. आपण बहुत सावध असावे. कोणाचा विश्वास न धरावा. उभयता आपण परोपकारी आहेत. सर्व संकटे श्रीकृपेने परिहार होतील, परंतु सूचनार्थ लिहिलें आहे. तेथील वस्तभाव माया असेल ते हुसकोटे या प्रांतेच असावी. पत्री परामृष करीत असावें. आमच्या चिरंजिवाची आसामी. कारकुनाचे हाते सेवा घेऊन चालवावे आपल्या भाग्याचा विभाग आहे. राजश्री सुबाराव व खंडेराव यांचे सर्व प्रकारे चालवावे. कोनेरराव दिा हसनखान व दिलेलखान व भास्करराव दिा मावले हे आमचे आहेत. दया करून चालवावे. सुज्ञाप्रति विशेष काय लिहावे. लोभ निरंतर असो दीजे हे विनंती. सेवक बाबाजी आनंत साष्टाग नमस्कार लिा परिसोन कृपा कीजे हे विनती.

¶*Baji Ballal in the employ of Visajipant Biniwale who was in Karnatak writes to Ganeshpant Baba and Bhikajipant Daji reporting the condition of affairs in the South, at the time when the Marathas were returning from Panipat. The letter mentions several persons who were acting in the southern region.*

6976

No. 146] [1761 ?

श्री

सेवेसी भगवंतराव सिंदे नामजाद किले माहुली विज्ञापना. किले मजकूर हा किला आमचे आजे कर्णाजी सिंदे व मोरोजी सिंदे याणी पेशजी मोगलाकडे होता तो सरकारआज्ञेवरून तीन वर्षे मेहनत करून भेदाने सरकारात घेतला. त्याजवरून श्रीमंत कैलासवासी बाजीरावसाहेब व आपासाहेब याणी आमचे वडिलाकडे किला सागितला. त्याजवर वसईची मसलत करून साहेबाची स्वारी वसईस गेली त्यापासून आजतागाईत येकनिष्टपणे स्वामचरणाचे लक्ष धरून सेवा करीत आलो व साहेबानीहि कृपा करून चाकरी घेतली. त्याजप्रमाणे पुढेहि स्वामीनी कृपाळु होऊन आमचे चालविले पाहिजे आणि तालुक्याचे दरकदार मनस्वी बखेडा करून आम्हावर आदावती करितात, येविसी त्यांस ताकीद होऊन बंदोबस्त करून देविणार स्वाम समर्थ आहेत. ' सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

¶*Bhagwantrao Sindia requests the Peshwa to put an end to the harassments he is subjected to by his subordinates and leave the entire management of the fort Mahuli to himself which place he says was captured by his ancestors with great exertions from the Mughal.*

No. 147] [1761 ?

श्री

श्रीमंत माहाराज राजमान्ये
राजश्री पंत प्रधानसाहेबाचे सेवेसी

सेवक आत्माराम राजाराम साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून छ २१ जिल्हेजपरियेंत समस्त सुखरूप असो विशष. साहेबी जाते-समयी ताकित केली की खबरदार राहणें व पोरींची निगा करणें. तालीम उतम प्रकारें करवीत जाणे. त्यासी खाणे जेवणे उतम प्रकारे होत आहे व गावयाची तालीम उतम प्रकारे कासिबा पांच सात घटका देत आहेत व फकीर महम(द)हि तालीम उतम देत आहे. परंतु नाचावयाची तालीम नटवे सुधी देत नाहीत. येक घटकाभर टो टो करितात, आण पोरीस मारितात, आणि उठोनी आपल्या घरास जातात. आम्ही व भवानजीनें सांगितले की नाचावयाची तालीम सकालची पाच सात घटका व सांजेची पाच सात घटका देत जाणे यैसें सांगितले. त्यासी ते म्हणतात की तुम्हास काही कलत नाही. आम्ही घटकाच भर तालीम देऊ. माहाराजास कलावे म्हणून लिहिले आहे. कलले पाहिजे हे विज्ञाप्त.

¶*Atmaram Rajaram, the Peshwa's Manager of the Music Department, reports how the dancing and singing girls were being instructed in those arts.*

• 6977

No. 148]

पो छ २ रजब

श्री

राजश्री त्रिंबक रावजी

गोसावी यांसी

दंडवत विनंति उपर, तितर सुमार २० वीस पाठविले आहेत. घेऊन बागात सोडावे. काही श्रीमंताकडील वर्तमान आले असल्यास लेखन करावे. बहुत काय लिा लोभ असो दीजे हे विनंति. ताजा कलम तितर च्यार द्विवालीच्या बागात सोडिले तरच राहातील व तमाशा दिसेल. रमन्यात सोडिले तर द्रिष्टीस पडनार नाहीत. कलावे हे विनंति.

¶*The writer sends some twenty tittir (partridge) birds and asks Trimbakrao to keep them in a garden.*

No. 149]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक कर्णाजी सिंदे नामजाद किले माहुली सां दंडवत विनंति. ताा छ ४ माहे रजब पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे व किलेमजकूरचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की सांबरे व चितले भेकरी व मोर व डुकरे गवे बच्याचे प्रयोजन आहे. लोक रानात पाठऊन बच्याचा तलास करून बचे जिवंत धरून जो जिनसाचा बचा सापडेल तो जिवंत धरून जतनेने येऊन पोहचे ते करणे, म्हणून आज्ञा. त्यास आज्ञे-प्रमाणे लोक रानात पाठऊन तलास करून जे मिलतील ते सेवेसी रवाना करून. गव्याविसी मागे आज्ञापत्र आले होते त्याताागाइत त्या तलासात आहो. चाकरी घडोन येईल ते खरे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Karnaji Sindia writes to the Peshwa that, according to instructions, he is on the lookout for the animals and birds mentioned in his despatch and that he would send them as soon as he secures thei*

No. 150]

श्री

सेवेसी विनंती. सौभाग्यादिसंपन्न मातुश्री गोपिकाबाई श्रीहरिहरेश्वरास जाणार याजकरितां सार्ष्टीपैकी लोक आले आहेत. त्यापैकी शंभर माणूस सत्वर वाईस.

पाठवणे म्हणोन आज्ञा. ऐशास स्वामीचे पत्र पावले तेच समई शंभर माणूस रवाना केले.. या लोकांत बरकंदाज होते त्यास दारूगोळी देऊन काल छ २९ सफरी संध्याकाली रवाना केले. अमवाश्येस संधकाली जाऊन पोहचावे म्हणोन ताकीद केली आहे व खासबारदार पाठविले त्यासहि दारूगोळी दिल्ही. बोधे यांचे राऊत आज्ञेप्रो येथे आले त्यास दारूगोळी देविली ती आज्ञेप्रो दिल्ही आणि रवाना केले. बरगेयांस खानदेशांत रवाना केले. त्यास दारूगोळी देविल्याप्रो दिल्ही. सेवेसी हे विज्ञापना.

¶*The writer informs that in compliance with the orders received by him, he has arranged for an escort being supplied to Gopikabai on her journey to Hareshwar.*

No. 151]

छ १ साबान

श्री

श्रीमत माहाराज राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक भास्कर शंकर सा। ना। विज्ञापना. येथील वर्तमान ता। फालगुन वद्य अमावाश्यापावेतो सुखरूप आसे विशेष. नव्या बंगलियावरी दुसऱ्या मजल्याचें काम चालत आहे व कात्रजेच्या तल्याचे काम चालत आहे. वाडियातील मागील चवकात गार घेतली होती त्यात दगडाची पुरवणी घालीत आहेत. थोरल्या बंगलियाच्या पुढील सोपियाचे काम चालत आहे. पागेची घोडी आले-गावी आहेत. दाणियाचा निरख बाजरीचा निरख पाउ सवादोन आडच पाइ(ली)चा आहे. जोरी पावणेतीन पाइली, गहू आडीच पाइली प्रा। निरख आहे. तांदूल बारीक सवादोन मोठे पावणेतीन पाइली प्रा। आहे. शेवेसी श्रुत व्हावे याजकरितां लिहिलें आहे. बहुत काय लिहू. हे विज्ञाप्ति.

¶*Bhasker Shankar writes to Nana Fadnis about the repairs of the Peshwa's palace and rates of corn, etc.*

No. 152] [*14-12-1758*

नकल

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये राजश्री त्रिंबक

सूर्याजी गोसावी यांसी—

श्री बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सुा। तिसा खमसैन मया अलफ. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. मुजफरखान यांजबरोबर आम्ही आहों. यांचे विचारें

सेवाचाकरी करीत आहों. खान मारनिल्हे मेहनत फारच चांगली करितात. जवार व गंभीरगड घेतला. जवारचा राजा पळोन रामनगरचे रानांत गेला. त्याचा सूड काढावयासी विचारांत आहेत. कोल्यावर सलाबत यांची मोठी पडली. इकडील बंदोबस्त (यांच्या) खेरीज होणार नाहीं. व ठाणी * * * लोक असावे त्याचा तपसील लिहिला त* * * * ऐशास खान मार जवामर्दी करून कोळ्यांचे पारिपत्ये करितील यैसें जाणूनच त्यांची रवानगी केली. त्याप्रमाणें त्यानी आमलांत आणिलें हे गोष्ट उतम केली. प्रस्तुत कोली रान धरून राहिले आहेत, सरकारच्या फौजा आल्यावरी फिरोन कोली लबाडी करावयासी चुकणार नाहीं, याजकरितां त्यांचा सूड काढून हजार पांचसें कापून काढावे म्हणजे पुढें लबाडी करणार नाहीं. आवघी रयेत लबाडीस मिलाली होती. फौज तिकडे गेली याजमुले ते रान सोडून रयेत म्हणून येऊन भेटत असतील, यास्तव त्यांची बारकाईनें चौकसी करावी. जे हल्यास मिलाले असतील त्यांचें पारपत्ये करावे. याप्रमाणे मनास आणून खान मारनिल्हेस सागून करवणे. जाणीजे. छ २१ रबिलाकर. आज्ञा प्रमाण. दुर्जनसिंग जवारकर रामनगरकर यासी मिलोन उतेजन देऊन कोलियाचें खोड केले आसे सर्वप्रकार आहे म्हणोन ऐकतों. त्यास हें कसें आहे. दुर्जनसिंग यांस मिलोन सरकारनुकसान करणार नाहींत, यांत त्यांस नफा नाही. तत्रापि ते कसकसे यांसी मिलोन त्याणी यांस उत्तेजन कसकसें दिल्हे हें खरें लेहून पाठवणें. कोलियाचे पारपत्यास सर्व प्रकारें याउपरी उपेक्षा न करावी. त्यास जवार घेतली. रामनगरवाले यांचे पारपत्यें जरूर करावें त्यास रामनगर जागा बलकट कसी आहे, घ्यावयासी महिना दोन महिने पांचसात हजार फौजेस लागतसे आहे कीं सलाबतीनें फार दिवस न लागतांच येईसें आहे, तें सर्व माहीतगारीनें लिहिणे, आणि चिरंजीव नानास लेहून पाठवणे ते याची तरतूद करतील. मुख्ये गोष्ट ज्याजवर जरब बसवावी. ज्याजवर जरब न बसे त्यांस उत * * हमवार करून त्यांजपासोन मातबर नजर घेऊन पुढे लबाडी न करीत असें करावें. या फितुरांत मुख्यत्वे जवारकर त्याचें तों पारपत्य उतम करावें. रामनगर याचे साध्ये असाध्ये पाहून करावे. जर साध्ये आहे तरी उसीर करू नये. चिरंजीव नानाहि त्याचे रोखे येतील. आणिखी फौजा येऊन करितील. नाहीं साध्य तर त्यास हाहोन उतमप्रकारें हमवार करितील. जाणीजे. छ मार.

¶*Balaji Bajirao orders Trimbak Suryaji, in reply to the latter's representation, to complete the conquest of Jawhar and Ramnagar with the help of the artillery under the command of Muzaffar Khan. The Peshwa writes that more troops have been sent for that purpose under Nana Purandare. This letter contains a clear date and enables one to fix several other letters, in point of time, which refer to the same episode—the conquest of Jawhar.*

6980°

Index to Selection No. 40

Miscellaneous Papers of Peshwa Balajirao

[Figures refer to numbers of letters]

B—*concld.*

C

D

D—*contd.*

E

F

G

G—*contd.*

H

I

J

J—*contd.*

K

N—*contd.*

P

R

R—*contd.*

S

S—*contd.*

S—*concld.*

T

U

V

V—*contd.*

Y

Z

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

No. 2325] [3-6-1699

خان مهربان ملاذ مخلصان سلامت

سنبهاجي بدرگاه نصفت و جاه داد خواه شد که سیاجي ساکن
پرگنه بهادر گده مضاف صوبه خجسته بنیاد ده هزار تولچه سرب
از رافع بتعدی گرفته حکم جهان مطاع عالم مطیع صادر شد که
آن معاني دستگاه بکیفیت مرقومه وارسیده در صورت صدق
وا نمود رفع تعدي و احقاق حق نمایند و درین باب از پیشگاه
خلافت و جهان باني تاکید اکید دانند

چهار دهم ذوالحجه سنه ۴۳ جلوس والا قلمي شد

¶*A letter written by order of Aurangzeb to Fakhru'd-Din Khan asking him to investigate the plaint of Sambhaji and do full justice to him.*

No. 2328] [2-7-1699

خان مهربان ملاذ مخلصان سلامت

سیاجي بدرگاه نصفت و جاه داد خواه شد که پنج هزار روپیه
از مال مستغیث بر ذمه باجي نام ساکن پرگنه پربندا مضاف
صوبه خجسته بنیاد واجب الادا ست نمیدهد حکم جهان مطاع
صادر شد که آن معاني دستگاه بکیفیت مرقومه وارسیده در
صورت صدق وا نمود احقاق حق نمایند و درین باب از پیشگاه
خلافت و جهان باني تاکید اکید دانند

چهار دهم محرم سنه ۴۳ جلوس والا قلمي شد

¶*A letter written by order of Aurangzeb to 'Izzat Khan asking him to go carefully into the plaint of Siyaji and do full justice in the matter.*

No. 2329] [9-8-1701

خان مهربان ملاذ مخلصان سلامت

وکیل جیواجي بدرگاه نصفت و جاه داد خواه شد که
پانصد روپیه قرض رافع بر ذمه سنتوس ساکن قصبه چوله پرگنه کره

No. 1214] [18-8-1751

به ضیاء الدوله حکم شد که تیاری دیوان عام نمایند و بروز جلوس دیوان عام ملازمت گل بیگ ایلچي احمد ابدالي از دروازه دیوان عام تا دروزه لاهوري شهر پناه هر دو طرف بره فوج ایستاده شود بعرض رسید که ایلچي در احمد گنج فرود آمده و لوازمه ضیافت از حضور رفت

¶*Preparations to receive Gul Beg (Qalandar Beg ?), Ahmad Shah Abdali's envoy, in the Diwan-i-'Am.*

No. 1214] [19-8-1751

نواب بهادر یک پهر روز برآمده از حویلي خود معه مردم فوج هر چهار چوکي که بره بسته بود سوار شده یک پهر دو گهڑي روز بر آمده بباغ صاحب آباد رفته داخل شد معتضد الدوله و بخشي خان مجرا نموده علي نقي خان را براي آوردن ایلچي احمد ابدالي که در احمد گنج فرستاده بود چنانچه در عمل دو پهر ایلچي مذکور بباغ مذکور با نواب بهادر ملاقات کرده با یک دیگر جواب سوال کرده یک خط ابدالي معه تلوځ گذرا نیده نواب بهادر خلعت پنج پارچه و یک هزار روپیه به ایلچي و یک نفر همراهي سه پارچه و برحمت علیخان جماعدار معین الملک چهار پارچه داده رخصت کرده

¶*Nawab Bahadur receives the envoy of Ahmad Shah Abdali and gives him a Khil'at and one thousand rupees.*

No. 1271] [14-10-1751

کیشو راو هرکاره فوج معین الملک بهادر ناظم صوبه لاهور افایت ۲۰ ذي قعده سنه ۴ بعرض رسانید اول آنکه معین الملک در بلده لاهور قیام دارد و بتاریخ ۲۴ مومن خان را بنا بر تنبیه سکهان (که) بیرون شهر شورش دارند تعین کرده و گفته که باتفاق زمیندارن کوهستاني سکهان را استیصال نماید و بیست جزایر و

ولید صوبه خجسته بنیاد واجب الادا ست بتعدي نمی دهد حکم جهان مطاع آفتاب شعاع صادر شد که آن شهامت پناه بکیفیت مرقومه وارسیده در صورت صدق وا نمود فیصل دهند و درین باب از پیشگاه خلافت و جهانبانی تاکید اکید دانند

پانزدهم ربیع الاول سنه ۴۵ جلوس معلی قلمی شد

¶*A letter written by order of Aurangzeb to Fakhru'd-Din Khan asking him to investigate the plaint of Jiwaji and do full justice in the matter.*

A news-letter from the Court of Muhammad Shah.

No. 1927] [*5-10-1736*

از نوشته هرکاره کرناتک صوبه حیدراباد بعرض رسید — خبر رسید که ایکوجي زمینداري ... ... داشت بتاریخ ۲۴ ربیع الاول سنه ۱۸ فوت شده و صفدر علی خان پسر علی دوست خان تعلقدار ارکات و ... ... درضلع سهادر؟ بعد انفصال مقدمه او معاودت کرده بود باز بدان سمت رفت

¶*Death of Aikoji alias Vyankoji, Raja of Tanjore, on 24th Rabi'-i, 18th regnal year (22nd July 1736), and the return of Safdar 'Ali Khan, son of Dost 'Ali Khan, to Arcot.*

News-letters from the Court of Ahmad Shah.

No. 1215] [*14-8-1751*

نواب بهادر با لچهمین نراین و ناکرمل و بخشی خان و میر جمله و مجدالدوله وغیره جواب سوال کرده وعلی نقي خان داروغه داغ تصحیحه سرکار خود را براي آوردن ایلچي احمد ابدالي که از لاهور آمده است بباغ شالیمار فرستاده که ایلچي را در کتره محلدار خان فرود آرد — و ده عرابه پر از جنس لوازمه ضیافت برای ایلچي فرستاد

¶*Nawab Bahadur (Jawid Khan, eunuch of Ahmad Shah) sends 'Ali Naqi Khan to receive the ambassador of Ahmad Shah Abdali and to put him up in the Katra Mahaldar Khan.*

سوار با سپاه همراه بودند اشرفي و روپیه ها نثار تهنیت پیش
آورده و صلابت جنگ بهادر مقرر کرده که تا هشت روز نوبت
شادي ورود فرمان صد میمنت بنوازند

¶*Sayyid Muhammad Khan Salabat Jang, Governor of the Deccan, receives the farman of the Emperor conferring on him the governorship of the Deccan and the title of 'Asafud-Dawlah. Details of the ceremonies performed on this occasion are also given.*

No. 1930] [*20-10-1751*

راو کیشو راو هرکاره وقت شب نزد نواب بهادر آمده اخبار
کابل بحضور ارسال داشته جواب سوال کرده ظاهر شد که
احمد ابدالي بتاریخ ۱۲ ذي قعده سنه ۴ پیش خیمه بر نالم سرخاب
بنج کرده این طرف کابل بعزم پیشاور فرستاده و عبد الصمد و جهان
خان سردار فوج از جلال آباد و پشاور تا اتک رسیده اند و پل
دریاے اتک تیار مي شود و هاروت (Sic) خان ایلچي که در لاهور
رسیده است با معین الملک ملاقات نموده جواب سوال از
مالایطاق دارد

¶*1. Ahmad Shah Abdali sends his advance guard to Peshawar and his generals, 'Abdus-Samad and Jahan Khan, are constructing a bridge across the river Attock.*

2. Harut Khan (?), Ahmad Shah Abdali's envoy, has arrived at Lahore to meet Mu'inu'l-Mulk.

No. 1935] [*1-11-1751*

کیشو راو هرکاره فوج وزیر الممالک لغایت ۴ ذي حجه سنه ۴
بعرض رسانید اول آنکه وزیر الممالک از متصل موضع هرگانو پنج
کروهي این طرف بنارس قیام داشت بعد انفصال معاملت بلوند سنگه
زمیندار فوجدار انجا معرفت عمو او که آمده ملاقي شده بود در
دادن جواهر و فیل و نوشته استمالت به بلوند سنگه بتاریخ ۸ کوچ
مراجعت نموده بطرف چهار ده کروه متصل جونپور رسیده منزل نمود...

پنج ضرب رهکله و یک ضرب توپ کلان تعین میر امان الله خان فوجدار ایمن آباد کرده و به قیام الدین برادر داراب خان که از دار الخلافه آمده بود و به کمال بیگ مغل که از ولایت آمده و به امولک رام وکیل راجه کورا مل سه سه پارچه داده

دویم آنکه بمعین الملک خبر رسید که هاروت (Sic) خان ایلچي ابدالي نزدیک رسیده چنانچه یک نفر یساول را گفته که سراي حکیم واقعه نخاس براي بودن ایلچي خالي بکنانند

¶Mu'inu'l-Mulk sends Mumin Khan to punish the Sikhs with the help of the zemindars of the sub-montane tracts. He bestows Khil'ats on Qayamu'd-Din, Kamal Beg and Amolak Ram.

2. Harut Khan (?), envoy of Ahmad Shah Abdali, arrives in Lahore.

No. 1928] *[16-10-1751*

کیشو راو هرکاره بموجب نوشته راو مکند راو هرکاره فوج سید محمد خان بهادر صلابت جنگ ناظم صوبه دکهن لغایت ۴ ذي‌قعده سنه ۴ بمعرفت نواب بهادر مدار السلطنت بعرض رسانید که بتاریخ غره وقت شب فرمان والا شان متضمن تفویض خدمت صوبداري دکهن و عطای خطاب آصف الدوله فرستاده رام نراین وکیل همراه ده جوڑی قاصدان رسید چنانچه آصف الدوله بهادر صلابت جنگ خیمه فرمان باري بیرون شهر ایستاده کنانیده خود بتاریخ دویم پوشاک و جواهر مکلف پوشیده به توزک و تجمل تمام سوار شده فرمان والا را که موسوي خان گرفته ایستاده بود باداب گرفته بر سر گذاشته باز آداب بجاآورده دو گهڑی در خیمه فرمان باري نشسته شلک توپ خانه فرنگیان وغیره و مردم توپ خانه دیده شادیانه نوازان معاودت نموده یک گهڑي در دیوان خانه نشسته برخاسته بسواري فیل و راجه رگهناتهه ...... بهادر در خواصي و نصیر جنگ و مظفر خان بهادر و ... قلیخان بهادر و دیگر جمیع سرداران فیل

نو ملازم کرده چهار پارچه بر مهدی قلیخان که از اقربای افراسیاب
بیگ خان بهادر صوبدار کشمیر که دو مهر پیش آورده داده و سه
پارچه بر شمس الدین خان بساول که از کشمیر آمده بود و عیوض
بیگ و مالاتاش بیگ سرداران مغلیه چهار چهار پارچه داده ......
سیویم آنکه بسبب آمد آمد ابدالي در شهر لاهور تهلکه بسیار است
مردم اراده فرار دارند ـ ناظم تیاري کوچ و سامان سفر میخماید

¶1. Mu'inu'l-Mulk recruits 200 new horsemen. He awards Khil'ats to the kinsmen of Afrasiyab Khan, the Subedar of Kashmir.

2. It is rumoured that Ahmad Shah Abdali intends to attack Lahore and the people are thinking of flight.

No. 1944] *[20-11-1751*

کیشو راو هرکاره فوج وزیرالممالک لغایت هفتم محرم سنه ۴
بعرض رسانید که وزیرالممالک بقاء الله خان و میر معصوم را گفته
فرستاد که از دیره پرگنه بالگرام آنروی دریا گنگ از پل گذشته
فرود آیند چنانچه نام برده ها بعمل آورده از دریای مذکور
عبور شده رفته و محمد هادي داروغه جنسي را تاکید کرده که جنسي
را از پل عبور کنانیده آنروي دریاء مذکور ببرد و پرشوتم
پندت وکیل مرهته از قنوج آمده دو مهر پیش آورده و وزیرالممالک
بهادر مبلغ دو هزار روپیه براي خرچ بخانه علي اصغر خان کمبرا
فرستاد و از افغانان و روهله هر روز جنگ با مرهته ها مي شود ـ
نواب بهادر شفیع خدمتگار را نزد شجاع الدوله مبارکباد گفته
متیا فرستاد که افغان و روهله از مقابله مرهته فرار شده بطرف متیا گده
بتاریخ نهم محرم سنه ۴ روانه شدند چنانچه شجاع الدوله پنجاه
روپیه بخدمتگار داده گفته فرستاد که بادشاه را و مارا و شما و
خلق الله مبارک باشد

راو کیشو راو هرکاره فوج معین الملک بهادر ناظم صوبه
لاهور لغایت ششم محرم سنه ۴ بعرض رسانید که معین الملک در

دویم آنکه وزیرالممالک یک پاس شب مانده پیش خیمه روانه کرده بعد آن نقاره کوچ کنانیده بتاریخ ۱۲ از جونپور کوچ کرده بسمت ماہر گهات داخل خیمه شد و محمد ضیاء الدین را میر بحري الله آباد مقرر کرده سر پارچه داده و یک نفر شتر سوار به ماہر گهات برائے فراہم آوردن کشتي ہا فرستاد - سیویم آنکه وزیرالممالک بتاریخ ۱۵ از ماہر گهات کوچ کرده به حسن پور ...... وزانجا بتاریخ ۱۷ بطي چهار کروه بسمت لکهنو نزدیکي موہان داخل شد اراده قنوج است و ملهارجي بگذر سنگي رام پور قیام دارد و گنگا دہر پنڈت و جیاجي وغیره فوج بعد عبور گنگ آنردي قیام دارد - با افغان احمد خان و سعدالله خان فاصله پنج کروه درمیان است ...

¶*Waziru'l-Mamalik marches from Benares to Lucknow. He appoints Muhammad Ziyau'd-Din, naval commander of Allahabad. Malharji is camping at Singi Rampur. Gangadhar Pandit and Jayaji are encamped on the other side of the river Ganges at a distance of about 5 koses from Ahmad Khan Afghan and Sa'dullah Khan.*

No. 1941] *[15-11-1751*

بعرض رسید که با فوج مرہٹه و افغانان بتاریخ ۲۴ [ذي حجه] جنگ شده مرہٹه ہا پس پا شده چند راس اسپ ماده افغانان برده و بتاریخ ۲۷ [ذي حجه] مرہٹه ہا حمله کردند فوج افغانان را که مورچه پیشتر رسانیده بود بر مورچه قدیم رسانیده از طرفین جنگ تیر تفنگ مي شود

¶*It is reported that the Afghans forced the Mahrattas to retreat after a battle on 24th Dhul-Hijja (2-11-1751). On the 27th Dhul-Hijja (5-11-1751) the Mahrattas defeated the Afghans and forced them to fall back on their former entrenchment.*

No. 1942] *[16-11-1751*

راو کیشو راو ہرکاره فوج معین الملک لغایت ۲۹ ذي حجه سنه ۴ بعرض رسانید اول آنکه معین الملک بهادر دو صد سوار

سوار مرہٹہ در بن گڑہ قایم شد و اسمعیل خان فیلان و اسپان و
شصت پنج ضرب رہکلہ وغیرہ لوازمہ باورچی خانہ ... روہلہ و
افغان غارت نمودند

¶1. A Report is received from Bengal that the Europeans are advancing on Hoogli with the intention of attacking it and Shuja'u'l-Mulk is busy in blocking the passage of their ships.

2. The Mahrattas defeat the armies of the Afghans and the Rohillas on 9th Muharram (17-11-1165), and force them to fly for refuge to Saharanpur. The Mahrattas give pursuit and establish their camp at Bangarh, the fort of 'Ali Muhammad Rohilla.

No. 1946] *[24-11-1751*

راو کیشو راو ہرکارہ فوج معین الملک لغایت نہم محرم سنہ ۴
بعرض رسانیدند اول آنکہ خواجہ فیض و گل بیگ حیران کہ از
نزد نواب بہادر بدار السلطنت رخصت یافتہ بتاریخ پنجم محرم
ناظم دو سوار از طرف خود ہمراہ دادہ نزد ابدالی روانہ کردہ و
پانصد روپیہ نقد دادہ انہا روانہ شدند

دویم آنکہ راجہ کورامل معہ پسر و برادر خود و بخشندہ
بیگ خان و خیر اللہ بیگ خان وغیرہ سرداران فیل سوار
از خیمہ آنردی راوی بتوزک سوار شدہ آمدہ ملاقات معین الملک
کردہ یکصد روپیہ پیش آوردہ معین الملک خلعت پنج
پارچہ و جیغہ مرصع معہ پرکلگی و شمشیر و فیل براجہ کورامل
و پنج پارچہ و جیغہ مرصع بہ پسرش و پنج پارچہ بہ برادرش و پنج
پارچہ بہ بخشندہ بیگ خان و خیر اللہ بیگ خان و چہار پارچہ
بدیگر ہمراہیان ہر یک دوشالہ و قریب بیست دو خلعت و دوشالہ
دادہ استمالت کردہ و راجہ معزالیہ سردار عمدہ و سامان فوج
بسیار دارد

¶1. Nawab Bahadur sends Khwaja Faiz and Gul Beg Hairan to Ahmad Shah Abdali. From Lahore Mu'inu'l-Mulk sends two mounted soldiers to accompany them.

2. Raja Kura Mal, his son and brother are received by Mu'inu'l-Mulk who bestows on each of them suitable Khil'ats.

بلده قیام دارد و از آمد آمد ابدالی هر دو پیشخانه بر آورده یکے
بطرف ملتان و دویم بطرف دریای راوی متصل شاهدره نصب
کنانیده تیاری سامان حرب و بان و توپ می نماید و هر روز
فیل سواران ملاحظه می نماید نگاهداشت جاری است و خود
نیز اراده کوچ دارد و خبر است که راجه کورا مل از ملتان
حسب النوشته ناظم دوازده کروه بلده لاهور رسیده

¶ *Waziru'l-Mamalik instructs Baqaullah Khan Mir Ma'sum to cross the Ganges. Parshotam Pandit, Vakil of the Mahrattas, comes from Kanauj and has an interview with Waziru'l-Mamalik. Skirmishes take place between the Mahrattas, and the Afghans and the Rohillas.*

Nawab Bahadur congratulates Shuja'u'd-Dawlah on the defeat of the Afghans and the Rohillas at the hands of the Mahrattas.

Owing to rumours of Ahmad Shah Abdali's invasion, Mu'inu'l-Mulk is camping outside Lahore and is making preparations for defence. Raja Kura Mal is coming to his help from Multan.

No. 1945] [*22-11-1751*

از نوشته هرکاره صوبه بنگاله لغایت آخر ذی قعده سنه ۴
بعرض رسانید اول آنکه شجاع الملک ناظم صوبه نوشته ...
چکله هوگلی رسیده که جهازات کنار فرنگ به آلات حرب بعزم
طرف چکله هوگلی می آمدند متوقف شده بنابر احتیاط جمعیت
شایسته و لوازم و توپخانه برائے سد راه عبور جهازات مردم
مقرر کرده ایم ــ لهذا ناظم جمعیت دیگر بکومک فوجدار تعین
نموده و خود از پلاسی معاودت کرده بکوچهای متواتر بمرشد آباد
رسیده قیام دارد

کیشوراو هرکاره لغایت دوازدهم محرم سنه ۴ بعرض
رسانید که بتاریخ نهم افغان و روهله از مقابله مرهته ها
گریخته شبا شب بتاریخ دهم پنجاه کروه راه طے نموده در انوله
رفتند بتاریخ یازدهم در مراد آباد رسیده بتاریخ دوازدهم بطرف
سهارنپور فرار شدند و فوج مرهته به تعاقب رفته تهانه پنجهزار

از مراد آباد بطرف کاشیپور به تعاقب افاغنه رفته ـ افغان و روهله پیشتر از کاشیپور رفته اسپان و باربردار بالای کوه گذاشته در کوه کمایون رفته قبایل در انجا داشته بعد آن باز معاودت خواهند کرد در تعاقب افاغنه و روهله و سنبهل و امروهه و شاه آباد و مراد آباد وغیره در اثناء راه از فوج مرهته بغارت رفته و وزیر الممالک براجه کمایون وغیره نوشته فرستاد که به افاغنه و روهله بقلعه خود جای ندهند و یک دوشاله و خلعت شش شش پارچه به جیاجی و کهندوجی پسر ملهارجی و گنگادهر پندت دیوان فرستاد

¶Waziru'l-Mamalik orders the fort of Bangarh to be rased to the ground. Jayaji Sindhia and Khanduji, son of Malharji, leave Muradabad and proceed towards Kashipur in pursuit of the Afghans. On receipt of information that they intend to leave their families in the Kumayun mountains, Waziru'l-Mamalik writes to the Raja of Kumayun not to give them shelter in his fort.

No. 1952] [*6-12-1751*

کیشو راو هرکاره فوج معین الملک لغایت ۲۱ محرم بعرض رسانید اول آنکه خبر شکست افغان و روهله از دست وزیر الممالک بهادر و فوج مرهته به ناظم و تمام شهر لاهور رسیده موجب سرور مردم گردید و ناظم گفته که با قبال بادشاهی بدستور روهله و افاغنه اگر احمد ابدالی اینطرف حرکت خواهد کرد خواهد دید و به متصدیان تاکید کرد که توپخانه آنروی دریای راوی روانه نمایند و پیش خیمه پیشتر رفته و انتظار خبر ابدالی دارد لغایت یازدهم محرم در پشاور است دویم آنکه معین الملک از خبر حرکت احمد ابدالی از پشاور و آمد آمد او و رسیدن جهان خان سردار آنطرف رهتاس اراده کوچ دارد و پیش خیمه و توپخانه آنروی راوی فرستاده عنقریب داخل خیمه می شود و راجه کورامل آنروی راوی ڈیره دارد و سرداران و نائبان راجه مذکور بموجب طلب نزد راجه معزالیه رسیده

No. 1950] [2-12-1751

کیشو راو هرکاره فوج وزیر الممالک لغایت ۱۸ محرم سنه ۴
بعرض رسانید که وزیر الممالک بموضع لورصور سه کروه پیشتر
بدایون داخل خیمه شد * فضل علي وقایع نگار و سعادت یار عامل
جاگیر محمد عطا خان آمده پنج پنج روپیه پیش آورده و خبر
رسید که جیا جي و گنگادهر پندت دیوان ملهار جي در بن گده
ضرب ها ملاحظه کرده به انوله رسیده و اسمعیل خان و علي قلیخان
در انوله رسیدند و جیا جي بطرف شاه آباد رفته و تسلي نامه
بسکنه بریلي که بے استقلال شده بودند فرستاد و خبر رسید که
احمد افغان و سعد الله خان روهله اخراجی از کاشیپور قبایل خود.
پیشتر روانه کرده بسبب این که راجه کمایون راه افاغنه و روهله
بند کرده و مردم افاغنه را غارت کرده اراده رفتن طرف شیر کوت
دارند ازان راه متصل هردوار عبور گنگ کرده بطرفي خواهند
رفت

¶1. *Waziru'l-Mamalik enters Badayun.*

2. *Gangadhar Pandit, Diwan of Malharji, reviews the guns at Bangarh and returns to Anwala.*

3. *Ahmad, the Afghan, and Sa,dullah, the Rohilla, remove their families from Kashipur, as the Raja of Kumayun does not permit them to pass through his territory. They intend to proceed to Shirkot and to cross the Ganges near Hardawar.*

No. 1951] [5-12-1751

کیشو راو هرکاره فوج وزیر الممالک لغایت ۲۱ محرم سنه ۴
بعرض رسانید که وزیر الممالک از بدایون کوچ کرده بعد طے
چهار کروه بن گڑهه را از بیلداران مسمار کنانیده ملاحظه کرده
بفاصله نیم کروه بن گڑهه داخل شد و ملهار جي متصل موضع کهیے (؟)
پل تیار کرده عنقریب داخل فوج وزیر الممالک میشود بوزیر
الممالک خبر رسید که جیا جي سندهیه و کهندو جي پسر ملهار جي

No. 1206] [14-12-1751

کیشو راو ہرکارہ فوج معین الملک لغایت ۲۶ محرم سنہ ۴
بعرض رسانید کہ معین الملک بہادر متصل سرای بلخیان چہار
کروہے شہر لاہور مقام دارد ارادہ تنبیہہ ابدالی است و بیگمات
را بطرف جمون فرستادہ و خبر رسید کہ فوج ابدالی بطریق
ہراول در موضع کوتلہ سیدان متصل وزیرآباد این طرف ایمن آباد
دریای چناب استقامت دارد و نیز خبر رسید کہ مردم این طرف
ایمن آباد و رہتاس و اٹک از آمد آمد ابدالی فراری شدہ و می
شوند و مردم شہر لاہور بکوہستان میروند

¶Mu'inu'l-Mulk is encamped at a distance of four koses from Lahore. He sends his family to Jammu. Information is received that the advance guard of Ahmad Shah Abdali has reached Kotla Sayyidan, near Wazirabad. The people of Lahore are flying to the hills for refuge.

No. 1956] [19-12-1751

کیشو راؤ ہرکارہ فوج آصف الدولہ بہادر لغایت ۱۴ محرم
سنہ ۴ بعرض رسانید اول آنکہ بطے منازل بتاریخ یازدہم از موضع
نیم گانون پرگنہ مار بعزم تنبیہ بالاجی راؤ پانزدہ کروہی این
طرف پونا بمقابلہ مستعد بود با ترتیب فوج فرنگیان و توپ خانہ
جلو ہراول و چند اول و چپ و راست بطے دوکروہ بموضع جام کہ
تہانہ بالاجی بود منزل نمودہ و مردم لشکر آنجارا تاختہ و سوختہ
و بالاجی بفاصلہ دوکروہ بالاے کوہ ایستادہ بود ارادہ دست
اندازی ... داشت ......

دوم آنکہ بتاریخ ۱۲ آصف الدولہ بدستور براہ کوہستان
نشیب و فراز طے نمودہ و از ہر طرف کہ فوج بالاجی ہجوم می
آورد مثل پروانہ از آتش تیغ و برق کشتہ و مجروح می شد و راجہ
رگھناتھ بہادر افواج بہ کومک می فرستاد بسیاری را داخل
جہنم کردہ اسپان غنیمت آوردند و از فوج فرنگیان و راجہ ...
عظیم بظہور رسیدہ بطے دوکروہ بہ لونی منزل کردہ از انجا بتاریخ

فوج سنگین و توپ خانه همراه دارد و سرداران و سکهان را برای
رفاقت طلبیده تسلی کرده و نگاهداشت درپیش است

¶1. The news of the defeat of the Afghans and the Rohillas at the hands of the Mahrattas reaches Lahore and is received with great rejoicings.

2. Mu'inu'l-Mulk sends his advance guard to the other side of the river Ravi to await the arrival of Ahmad Shah Abdali. Raja Kura Mal arrives with his army to help Mu'inu'l-Mulk.

No. 1954] *[10-12-1751*

کیشو راو هرکاره فوج معین الملک بهادر لغایت ۲۲ محرم سنه ۴
بعرض رسانید که معین الملک بتاریخ ۲۱ زیارت خانقاه و درویشان
و پیرزاده و مزارات بزرگواران رفته نذر گذرانیده بتاریخ
۲۲ یازده گهڑی روز بر آمده از بلده لاهور بعزم مقابله احمد
ابدالی کوچ کرده عبور دریاء راوی کرده داخل خیمه متصل
شاهدره شده وقت سوار شدن یک زنجیر فیل ویکراس اسپ
و جاموش و غله وغیره خیرات کرده کورا مل بنا بر داخل شدن
زر نقد پیش آورده و سرداران ناظم صوبه از تاکید خیمه سبک
برداشته و نگاهداشت سپاه درپیش دارد و راجه کورا مل علیحده
نگاهداشت می نماید

¶Mu'inu'l-Mulk leaves Lahore, crosses the river Ravi and encamps at Shahdara to await the arrival of Ahmad Shah Abdali.

No. 1955] *[12-12-1751*

کیشو راو هرکاره فوج معین الملک لغایت ۲۴ محرم سنه ۴
بعرض رسانید که فوج ابدالی از رهتاس یکایک به ایمن آباد
رسیده ازین معنی معین الملک از خیمه آنطرف دریاء کوچ
کرده چهار کروه پیشتر رفته داخل خیمه شد و عیوض خان را
نیابت بلده لاهور مقرر کرده

¶Mu'inu'l-Mulk receives intelligence that the army of Ahmad Shah Abdali has reached Eminabad. He advances four koses to meet the invader leaving 'Aiwaz Khan as his deputy in Lahore.

کورامل و یک سوار از طرف ایلچي مع نوشتجات نزد جهان خان
سردار ابدالي فرستاده

دویم آنکه صوفي شکرالله همراهي غلام محمد پیرزاده که سابق نزد جهان خان سردار ابدالي رفته بود با سلطان علیخان ایلچي آمده معین الملک خیمه متصل ڈیره کورامل ایستاده کنانیده جواب سوال نموده حوالہ مرادخان جماعدار نموده ظاهر شد که ابدالي بعد عبور جهلم فوج خود را از غارت نمودن رهتاس منع کرده و رحمت خان را براي محافظت سیالکوت فرستاده

¶1. Harut (?) Khan arrives at the camp of Mu'inu'l-Mulk who accuses Ahmad Shah Abdali of having broken his plighted word. Harut Khan sends one of his own retainers to Jahan Khan.

¶2. Information is received that Ahmad Shah Abdali has crossed the river Jhelum, prohibited his soldiers from plundering Rohtas and despatched Rahmat Khan to Sialkot.

No. 1463] *[20-9-1752*

مسموع یافته که بندگان نواب صلابت جنگ بهادر خود بدولت ... و عزم پیشتر دارند لهذا این جانب هم بتاریخ یازدهم ذي قعده سنه ۱۱۶۵ هجري ... که هر دو ناسردار پناه قلعه مندیل گرفته اند عزم کوچ نموده ...... بسعي ... پرداخته بر عین وقت جنگ با جمیعت سوار و دو هزار جوانان بار و مع توپخانه وغیره خود را شریک و رفیق علم فرانسیس میگرداند ازین هیچ تفاوت و شبه نیست و ندارد ـ مي باید که ایشان هم به تقویت تمام مستعد جنگ و در سر انجامي آن پردازند بنابر اطلاع نوشته شد

¶Fragment of a letter probably from the Commander of the Mughal army to one of his allies saying that as Nawab Salabat Jang has decided to go to war with the Mahrattas, he would join the combined forces of the Nawab and the French.

۱۳ بدستور جنگ کنان دوکروه بموضع راکهور فرودگاه بالاجي دیره کرده نمازشکر ادا کرده همراهیان بنابرفتح زر نقد پیش آورده و فوج بالاجي راو که چپ و راست و هراول بجنگ مي پرداخت یک جماعدار با چند کس کشته شد و آصف الدوله به تدبیر راجه رگهناته موسي بوسي سرگروه فرنگیان و مظفرخان سرگروه را برفرودگاه بالاجي راؤ تعین نموده عقب انها نظر بیگ خان بخشي و حسین منور خان را با فوج فرستاد چنانچه یکایک رسیده شلاق توپ خانه نموده چون شب بود وقت خسوف بالاجی به غسل مشغول بود ناگاه از صدمه توپ تمام لشکر سراسیمه گشته و بالاجی بر اسپ سوار شده گریخته لشکرش بغارت رفته — سرداران اسلام اسباب لشکرش را یک جاکرده آتش داده شادیانه نوازان پیش آصف الدوله رسیده بابت مبارک باد زر نقد پیش آورده ناظم جیغه مرصع بموسي بوسي و مالا مروارید بمظفرخان و دو کس همراهي را خلعت داده بااقبال پادشاهي فتح عظیم شد ...

...... بتاریخ ۱۴ بالاجي چهار کروه رفته فوج خود جمع مي کند

¶*Asafu'd-Dawlah accompanied by the French General Bussy is encamped at a distance of fifteen koses from Poona. A battle takes place between his forces and those of Balaji on 12th Muharram, 1165, in which Balaji is defeated. He flies to Rakhor (Grant Duff calls the place Rajapur) followed in pursuit by the victorious army. His camp is captured, plundered and burnt, but Balaji manages to escape. Bussy and Muzaffar Khan receive Khil'ats.*

No. 2284] [*20-12-1751*

کیشو راؤ هرکاره فوج معین الملک لغایت ۴ صفر سنه ۴ بعرض رسانید اول آنکه معین الملک متصل سرائے بلخیان چهار کروه لاهور ڈیره کرده و بهارونخان ایلچي ابدالي که این مدت همراه است گفته که ابدالي بدعهدي کرده کدام شرط مسلماني است — من براے محافظت شهر بر آمده ایم — باز راجه کوراMل دست هارونخان ایلچي گرفته انچه باید گفت — ایلچي بعد رد بدل بسیار دو نفر سوار از راجه

Extracts from news-letters from the Court of Muhammad 'Alamgir II.

No. 1560] [*17-2-1759*

بعرض رسید که نواب نظام الدوله بهادر از موضع پاوکی تعلقه امراوتی سهوانی بیشتر شش کروه مقامات دارند و دیواجی پنڈت دیوان جانوجی بهوسله آمده از راجه ننهوجی دیوان نواب موصوف ملاقات کرد و سوال جواب مصالح در پیش است

¶*Peace negotiations between Nawab Nizamu'd-Dawlah and Janoji Bhonsla.*

No. 1571] [*20-2-1759*

بعرض رسید که از نواب نظام الدوله بهادر و از جانوجی بهوسله مصالحه گردید

¶*Peace arranged between Nawab Nizamu' d-Dawlah and Janoji Bhonsla.*

No. 1567] [*20-2-1759*

بعرض رسید که موسی بوسی فرنگی در قلعه چناپٹن مورچه بندی نموده است و عبدالوهاب خان برادر محمدعلی خان و دیگر انگریزان وغیره از ترچناپلی آمده و آمد شد مردم و رسد غله وغیره رفتن به مورچال ایشان مسدود کرده اند

¶*Bussy is entrenched in the fort of Chinapatan. Abdu'l-Wahhab Khan, brother of Muhammad 'Ali Khan, accompanied by the English forces, marches from Trichnapoly and cuts off all means of communication with the fort.*

No. 1570] [*25-2-1759*

عرضی مرسله رام‌نراین وکیل حضور پر نور از نظر عالی گذشت کیفیت آن پیرایه ایضاع یافت که ننکوجی و دتاجی سندهیه مغلپوره و نخاس پیٹه و روح الله‌خان پیٹه که به نزدیکی بلده شاهجهان آباد واقع است تاخت و تاراج نموده موجب اینکه توپخانه جنسی سرکار میخواست که همراه من کرده دهند که تنبیه جات نمایم - این معنی بحضور معلی منظور نگردید لهذا

No. 1963] [25-9-1753

از نوشته وکیل حضور پرنور بعرض رسید که غازي الدين خان از خضرآباد کوچ نموده با فوج فيروزی بقصبه فريد آباد فرود آمدند و از آمد آمد افواج فيروزي قصبه مذکور ...... آمد قلعه بلم گڈه که .... بودند بتصرف اولياي دولت قاهره در آمدند و منصور علي خان و سورج مل جاٹ متصل بلم گڈه بود از رسيدن فوج ظفر موج تاب استقامت نياورده بموضع سيکري از قصبه مذکور شش کروه مسافت دارد رخت ادبار برد

از زباني هرکاره هاي باطني بعرض رسيد که ملهار هولکر و رگهناته راؤ برادر بالاجي راؤ عبور نربدا نموده بقصبه حولے مهيشر رفته چند مقامات داشتند که خسرپوره هاي هولکر پيش مشار اليه براي ملاقات آمده بود هولکر را تنها يافته نظر بر قتل ...... از زخم شمشير يکي پيرسالي و ديگر دربار مردی دست راستش مجروح ساخت هولکر که باوصف زخمي شدن پای ثبات قايم ساخته هردو خسر پور را از زخم شمشير بجان کشت است

¶1. Ghaziu'd-Din Khan is encamped at Faridabad. The fort of Balam gadh is captured by the Mughal army from the Jats. Mansur 'Ali Kha and Suraj Mal Jat take refuge in Sikri.

¶2. Malhar Rao Holkar and Raghunath Rao, brother of Balaji, cross th river Nerbada and encamp at Maheshwar. Two brothers-in-law of Holka seek an interview with him and finding him alone attack him with sword: Malhar Rao Holkar escapes and kills his assailants.

No. 1964] *[No date 1785 (?)*

خبر است کہ از سکہان و راجۂ جمبو جنگ بمیان است چنانچہ چہار سردار سکہان گربخش سنگہ و جسا سنگہ وغیرہ بکار آمدند و باقي کہ ہستند از جمبو جنبیدہ اند

و درمیان تیمور شاہ پسر ابدالي و برادرزادۂ نادر شاہ عنوان، چپقلشہا از مدت بودند حالا اہلیہ شاہ ولي وزیر ابدالي رفتہ درمیان انہا صلح کنانیدہ ہر دو بجاي خود قایم ہستند

¶1. Four Sikh commanders are killed in a battle with the Raja of Jammu.

2. The wife of Shah Wali, Wazir of the Abdali, brings about a reconciliation between Timur Shah and a nephew of Nadir Shah.

No. 643] *[31-7-1788*

دیروز غلام قادرخان و اسمعیل بیک باتفاق نواب ناظر بعرض رسانیدند کہ غلامان قدیم خانہ زاد سرکار دولت مدارایم لیکن حضرت بدولت را اعتماد غلامان نیست — اگر قریب یک ہزار پانصد کس ہمراہیان خانہ زادان بر ہر دو دروازۂ قلعہ مبارک باشند و مردمان ملازم حضور ہم خواہند ماند درین صورت دل جمعي مي شود از شاہجہان آباد بمقابلہ سندھیہ بہادر کوچ مي غایم — در جواب ارشاد کردہ فرستادند کہ این معني مابدولت را قبول است لیکن شمایان بار دیگر بد عہدي نخواہید کرد — غلام قادرخان عرض کردہ فرستاد کہ عہدنامہ بہ قول و قسم از مہر خود نوشتہ میدہیم — چنانچہ نوشتہ خواند بعمل آمد — بعدہ غلام قادرخان و اسمعیل بیگ و نواب ناظر در دیوان خاص نشستہ خلوت کردند نواب ناظر دو مرتبہ بنابر سوال جواب بحضور حاضر شد حضرت بدولت بہ نواب ناظر فرمودند کہ این وقت پیش مابدولت باشید والا خود و ایشان را از پیش قبض ضایع خواہیم کرد — نواب مذکور بعد سوال جواب از حضور

اشقیا این چنین شوخی نموده — من بعد فوج ظفرموج وزیرالممالک
تعین گردید چنانچه مقهور مذکور را تنبیه و تادیب رسانید —
قریب یک هزار مردم طرف غنیم لئیم معه یک نا سردار معتبر
داخل جهنم گردید و از انجا هزیمت (Sic) خورده در نزدیکی
تکیه مجنون شاه - سکونت گرفت و وزیرالممالک بندوبست
بلده مذکور نمودند ——

سورج مل جانت روپ راو کتا را را بخابر کومک حضور
با جمعیت دوازده هزار سوار رخصت نمود

¶*Jankoji and Dataji plunder Mughalpura, Nakhas petta and Ruhullah Khan petta which are situated near Shahjahanabad (i.e. Delhi). They are defeated by the Waziru'l-Mamalik and retire to Takya-i-Majnun Shah.*

No. 1571] [*26-2-1759*

بعرض رسید که گجپتی راج زمیندار سیکا کول از قاسم کوتر
کوچ نموده به راج سدری ؟ رسیده جمعیت مفصله ذیل همراه دارد

سوار	پیاده وغیره	فرنگی و کامری وغیره	توپ کلان وغیره
۴ هزار	۲۰ هزار	یک هزار	۱۰۰ ضرب

¶*Gajpatiraj, zemindar of Chicacole, leaves Qasim Kot with a large army.*

News-letters from the Court of Shah 'Alam II.

No. 1964] [*No date 1785* (?)

این سه کس گورها که از نزد جرنیل بارکر فرنگی گریخته
آمده بودند انهارا حضرت بدولت بتاریخ شانزدهم شهر صفر
روانه بصوب لشکر جرنیل فرنگی مذکور فرمودند و تا رسانیدن
بلشکر حضرت دو ... مردم تلنگه از طرف خود تعینات آنها کرده
داده اند

¶*Three English soldiers who had deserted the army of General Barker (General Sir Robert Barker ?) are sent back with an escort.*

قادرخان مشوره نموده مرشد زاده بیدار بخت که از فرزندان احمدشاه بادشاه است تجویز نموده گل محمد خان و نسیم خان را برای آوردن مرشد زاده بیدار بخت فرستاده ـ نامبرده پا سواز کشاینده از تسبیح خانه آوردند چنانچه بیدار بخت بموجب ساعت سعید برمسند زینت افروز شدند ـ همه مراتب بادشاهی بعمل آوردند ـ هریک موافق مراتب نذر گذراینده آداب بجا آوردند و شادیانه نواختند ـ غلام قادرخان شاه عالم و نوزده سلاطین دیگر را معه سرفراز و تمکین وغیره در نو محل فرستاده نشانیدند و مردم برای چونکی شهر مقرر شدند بعده سوال جواب از غلام قادرخان و اسمعیل بیگ بمیان آمد که مردمان بادشما هردو در قلعه باشند غلام قادرخان این معنی منظور نه کرد از معزالیه ناخوش شده معه مردمان خود از قلعه برآمده متوجه لشکر خود گردیدند ـ سرداران از طرف غلام قادرخان برای آوردن مرزا موصوف رفته اند باید دید ـ تا دو پهر همین سوال جواب درمیان است ـ دیگر خیریت است

¶Ghulam Qadir Khan and Isma'il Beg, with the concurrence of the Nawal Nazir, request the Emperor to allow them to keep 1,500 of their soldiers to guard the gates of the fort. The Emperor permits them on condition of their giving him a written promise that they would not deceive him. They do so, but as soon as their men are stationed at the gates, they take the Emperor into custody. Great consternation is caused among the people of Delhi, and to restore confidence, Isma'il Beg personally assures the merchants that no harm would be done them so that they may keep their shops open. Bidar Bakht is raised to the throne. After this Ghulam Qadir and Isma'il Beg disagree about the control of the fort.

No. 650] *[3-8-1788*

... غلام قادرخان ... بخطاب امیرالامرای سرفراز شد ...

بعده خان مذکور در محل رفت دریافت شد که مرزا مدو چهارده نان و قدرے آب نزد شاه عالم فرستاده بود ... آقا صندل در مقدمه تکلیف نرسیدن آب و طعام بر شاه عالم و فرزندان

برآمده مردمان شرح بتالین را کہ بجماعتہ خود معہ توپہا تیار و مستعد بودند از نواب مذکور گفتند کہ اگر بہ مایان پروانگی حضور والا شود بنابر جنگ حاضرم و گولہ ہا زدہ غلام قادرخان را پس پا کردہ میدہیم ـ نواب ناظر جواب نداد ـ آخر مرزا اسمعیل بیگ جماعہ داران بتالین را فہمایندہ از قلعہ کسوچ کنایندہ ہمراہ بردہ متصل خیمہ خود ڈیرہ کنایند و گفت کہ شرح شش روپیہ درماہہ بشمایان خواہم داد بعد دلجمعی آنجا مردمان بتالین ہمراہی خود و توپخانہ اندرون قلعہ داخل شدہ از غلام قادرخان و نواب ناظر کہ در دیوان خاص بودند صلاح و مشورہ نمود و مرزا مذکور دو گہڑي روز ماندہ در خیمہ خود داخل شد و از زبان خود در بازار شہر بدوکان داران بہ تسلي گفتہ دادہ کہ دوکان ہا وا نمایند و کوتوال دیگر از طرف خود مقرر ساخت و غلام قادرخان بندوبست قلعہ قرار واقعي نمودہ شب را باتفاق نواب ناظر و سیتل داس و دیگر سرداران در دیوان خاص ماندہ و نوزدہ لک روپیہ را سوال از حضرت بدولت نمودند در جواب ارشاد شد کہ این قدر نزد ما بدولت کجاست ہرچہ منظور است بکنند

امروز غلام قادرخان مردمان خود بر کارخانجات و ڈیوڑہي ہاي محل و توشک خانہ نشانیدہ بندوبست خود نمود و قریب چہار صد مردم معہ یک توپ بر دروازہ تسبیح خانہ قایم ساخت و تقید (تاکید) نمود کہ جنس و اسباب بیرون قلعہ نرود گہڑي روز برآمدہ مرزا اسمعیل بیگ باتفاق سرداران ہمراہي و مرزا مطلب خان نزد غلام قادر خان آمدہ در دیوان خاص نشستہ خلوت باہم نمودند و سوال جواب معرفت نواب ناظر در باب طلب زر بمیان آمد مرزا مطلب خان گفت کہ این قدر زر بجہان پناہ از کجا بہم رسد اگر مي شد نوبت باین درجہ نمیرسید غلام قادر خان گفت کہ شما درمیان مایان گفتگو نکنید من بعد غلام

A Letter from William Andrew Price to the Peshwa.

No. 540] *[26-1-1772*

نقل خط بمهر مسٹر پریس تحریر بیستم شهر شوال سنه ۱۱۸۵ بنام شمریمنت صاحب

آنکه زینت بخش مسند ایالت و نامداری زیب افزای چار بالش حشمت و کامگاري رفیع الدرجات ذوی القدر عظیم المنزلت والاشان بلند مکان ادام الله تعالی اقباله - خصوصیت ...... اندرو پریس اسکوئر سردار کوتهي انگلیس وارماد و قلعه ارک بندر مبارک سورت بعد اهداي هدیه اخلاص و دعا و اتحاف تحف محمدت و ثناء مبرهن راي عالم آرای بیضا ضیاي میدارد عنایت نامه نامي وصول مکرمت نمود از دریافت خیر و تندرستي مزاج شریف مسرور گردید زینت نگارش پذیرفته که برای ایصال زر بقایاي سرکار عالي از سرکار نواب صاحب میر حفیظ الدین احمد خان بهادر ناکورام پنه را فرستاده اند و به معاني و جلالت رتبت جندرال صاحب و مخلص از راه دوستیها درین باب بقلم آمده مخلص درمیان آمده سبیل وصول بقایای مذکور بکناند مهربان من بمقتضاي دوستاي ها مخلص پیش از وصول عنایت نامه بموجب نوشتن ناکورام پنه درمیان آمده در دربار نواب صاحب موصوف آدمان ناکورام پنه را طلبداشته جواب سوال نموده سبیل وصول باقي واجبي از نواب صاحب قبول کنایند طبق معمول کاروبار سرکار جاري است و آینده هم اجرا خواهد ماند که مخلص درمیان است لیکن ناکورام پنه ناحق چند جواب سوال بیجا غیر معمول که بعمل آمدن آن در نظر مخلص نمي آید میکند برین معني اگر فساد برپا خواهد شد قصور طرف نواب صاحب نیست و ما قلعدار بادشاهي و والي شهر هستیم در شریک شدن با نواب صاحب لاچار خواهیم شد - بفضل حق سبحانه تعالی این مشکل نشود کار بدوستي و خوشي

موصوف عرض کرد پنج روپیہ از جیب خاص بر آوردہ گفتند کہ
از بازار نان وغیرہ خریدہ بیارند عرض کرد کہ وابستگان بسیارند
درین چہ خواہد شد فرمودند کہ نزد ما بدولت زر نیست

¶1. The title of Amiru'l-Umara is bestowed on Ghulam Qadir Khan.
2. Shah'Alam and his sons do not get proper food.

News letters from the Court of Akbar II.

No. 2304] *[31-1-1814*

خواجہ فرید حاضر شد کاغذ سہ آنی و چہار آنی کہ درماہ
ہرکس کہ تا پنجاہ روپیہ از حضور والا مقرر خواہد شد فی روپیہ سہ
آنہ و ہرکس را کہ در ماہ ایزاد از پنجاہ روپیہ خواہد شد آنرا
چہار آنہ وضع خواہد شد تیار کردہ آوردہ گذرانید ۔ بعد ملاحظہ
ارشاد کردند کہ این خاندان مثل آفتاب است درماہ ہرکس کہ
مقرر گردیدہ حالا کم نمی شود

¶Proposal to cut the pay of those receiving Rs. 50 a month by 3 annas in the rupee and of those getting above Rs. 50, by 4 annas in the rupee, is negatived by the Emperor.

No. 2262] *[5-2-1814*

دیروز بعرض والا رسید کہ این وقت طبیعت مرزا بہادر بخت
پسر مرزا جہانگیر بخت بسیار علیل گردیدہ حکیمان و افسون
گران آمدہ معالجہ خودہا کردہ رفتند لیکن ہیچ فائدہ نیست ۔
بعد مسموعہ خیلے متردد ماندند ۔ امروز عرض شد کہ بوقت سہ
گھڑی شب ماندہ بہادر بخت پسر مرزا جہانگیر بخت بہادر
بقضای الہی فوت شد

¶Illness and death of Mirza Bahadur Bakht, son of Mirza Jahangir Bakht.

A letter from Ghulam 'Ali Khan and 'Ali Raza Khan to G. F. Cherry.

No. 2004] [February 1793

خط غلام عليخان و علي رضاخان موسومہ چري صاحب بهادر
موصولہ يازدهم ماه فروري سنہ ۱۷۹۳ع

شرح آنکہ پيش ازين مخلص جهت عرض و معروض بعضي مقدمات کہ اظهار آن بالمشافهہ ضرور بود بحضور فيض گنجور روانہ شده تمامي حقايق روداد و توجهات لاڈ صاحب بهادر درباره يک جهتي و يک دلي فيمابين سرکارين و کمال اشفاق بحال صاحبزاده هاي بلند اقبال و مخلصان و نهايت خير طلبي سرکار حيدري من و عن معروض داشتہ بتاريخ بيست سيوم جمادي الاول سنہ ۱۲۰۷ھ حاضر خدمت صاحبزاده ها گرديد بلا تکلف نوک ريز خامہ وداد ميگردد کہ باستماع خوبي هاي لاڈ صاحب بهادر بالمشافهہ و بدل خيرخواهي و جانب داري سرکار احمدي برخاطر مبارک حضور سرور و شوق ملاقات لاڈ صاحب راه يافت کہ قلم بشرح شمہ ازان پردازد خالق الارض والسموات قادر است کہ يک مرتبہ فيمابين حضور و جناب لاڈ صاحب بهادر سرور مواصلت محصل ساختہ ماو آنصاحب را کہ در مقدمہ اصلاح طرفين آمد سرخرو خواهد فرمود غرض بدل شوق حضور باصغاى اخلاق لاڈ صاحب بهادر زياده از حيز حصر و شمار است چون حصول ملاقات طرفين موقوف بر افضال ايزدي و وابستہ وقت است بالفعل خريطہ حضور کہ المکتوب نصف الملاقات است بجناب لاڈ صاحب بهادر مينوسد بملاحظہ اين کيفيت يک روي و يک جهتي و جوشش قلبي بر آئينہ ضمير آفتاب نظير لاڈ صاحب صورت نما و جلوه پيرا خواهد شد و آنصاحب کہ حاضر خدمت لاڈ صاحب و مصلح امور و دولت خواه سرکارين اند يقين کلي ست کہ ... توجہ دلي مصروف خواهند فرمود کہ فيمابين غير از ازدياد مواد الفت و محبت وارتقای

صورت بزیرد ... مخلص از روابط دوستیها کہ از قدیم فیمابین مستحکم ازین معنی اطلاع داده مترقب کہ بارقام عنایت نامرجات مسرت سمات مسرور و شادمان میداشتہ باشند ـ آفتاب عمرو اقبال دوام درخشان باد

¶*A letter from William Andrew Price, the British representative at Surat, to the Peshwa regarding the matter of recovery of arrears from Nawab Mir Hafizu'd-Din Ahmad Khan by the Peshwa's agent named Nagu Ram, help given by the writer to the agent, and the possibility of disturbance owing to some annoying questions put by the agent to the Nawab. The writer hints that, being the Qila'dar of Surat by the order of the Mughal Emperor and the Governor of the City, the English shall have to side with the Nawab in case of fighting.*

A Letter of Mir Zainu'l-'Abidin to Nawab A'zamu'l-Umara.

No. 2407] [*19-3-1791*

عرضی میر زین العابدین برادر میر عالم بهادر موسوم اعظم الامرا بهادر مرقوم چهاردهم شهر رجب المرجب سنہ ۱۲۰۵ ہجری نواب صاحب والا جناب معلی القاب فیض رسان قدردان نیاز مندان دام اجلالہ ـ بعد از گذارش مراتب نیاز و تمنای خدمت مکرمت انباز مرفوع ضمیر مهر نظیر میدارد کہ درین ولا خانصاحب کرم مناقب مهدی علی خان صاحب برای التماس بعضے مراتب ضروری کہ فی الحقیقت مفید ہر دو سرکار است عازم خدمت گرامی شده اند یقین است کہ مورد توجهات سامی کہ از مدتی شامل حال ایشان است خواہند گردید چون نیازمند از ابتدا خواہان این معنی است کہ بفضلہ رؤسای اسلام معاضد و معاون ہمدیگر بوده رعب افگن دلهای عبده اصنام گردند اہل صادق حاصل میدارد کہ سعی مشکور در ہر امر از جانب آن فیض رسان بظهور آید ـ زیاده چہ التماس نماید

¶*Copy of a letter from Mir Zainu'l-'Abidin, brother of Mir 'Alam Bahadur to Nawab A'zamu'l-Umara Bahadur, persuading him to make common cause with other Muslim rulers and thus enhance their prestige in the eyes of the Hindu Rajas.*

سپرد مخلص شده از روي فرد عليحده ظاهر خدمت خواهد شد و
زياده تحويل و ترسيل آن نوعيکه ايما شود بعمل خواهد آمد ـ زياده
ايام جمعيت و کامراني باد

¶*A letter from Ghulam'Ali Khan and 'Ali Raza Khan, Wakils of Tipu Sultan, to Mr. G. F. Cherry, Persian Translator at Fort William, purporting to remove some misunderstandings due to allegations made against the government of Tipu Sultan by a released prisoner, and to settle some dispute arising out of the cession of the territory of Kalankot to the East India Company.*

A letter from Mir'Ali Hasan Khan to Mir'Alam Bahadur.

No. 1866] [*17-7-1793*

نقل دو فقره از خط مير علی حسن خان اسمي مير عالم بهادر
مرقوم دويم ذی حجه سنه ۱۲۰۷ هجري کمتر عبور دريای کشنا
نموده از نواب صاحب والا مناقب نواب عاقل الدوله بهادر و ميجر
رابرت بهادر ملاقي شديم و همه کيفيت کفايت سرکار ظاهر نموديم ـ
نواب عاقل الدوله بهادر بخانه کمتر آمده ظاهر فرمودند که ميجر
صاحب مي فرمايند که کار فروعي از ماها نمي شود کار ماها جنگ
است والا نه اين مردم آزاري نمي شود همين طور صاف بنويسند
و ماهم مي نويسيم کمتر هرچه فهمايندہ قبول نمي کنند درين مقدمه
کمتر لاعلاج است از مکان معلومه بفاصله سه کروه فرود آورده ام
تا حال مقام معلومه فراری نشده است مستعد است و کفايت سرکار
خاطر خواه خواهد شد و براي غله ميجر صاحب بسيار تکرار ميکنند
که اگر دو هزار گوني غله مارا آورده خواهند داد ما بيشتر ازينجا
بطرف کهکگيری (؟) کوچ خواهيم نمود قبله من هر روز بيست و
پنج راس گوني غله خرچ پلاتن است جمله يک کهندي چيزي
بالا غله هر روز خرچ مي شود کمتر فکر غله چهار ماه نموده است
که در مکان معلومه پانصد کهندي غله حاضر است تا چهار ماه از

مدارج یکدلی و یک جهتی امر دیگر درمیان نخواهد آمد و باستماع خوبی های سامی از حضور ارشاد شد که هرگاه همچو اشخاص دانا و فهمیده موصوف بصفات حمیده در هرجا که باشد یقین واثق است که فیما بین سرداران انضباط مراتب دوستی و اتحاد روز افزون خواهد بود بفضله نتایج آن که لا تعد و لا تحصی است جلوه ظهور خواهد نمود مرقوم قلم محبت رقم شده بود که باز چند مردم اسیر تا حال اسیر اند مهربانا مجمله اسیران و همی اگر احدی قدری هم قدر و منزلت میداشت بودن او در سرکار حیدری و درخواست صاحب احتمال داشت اگر شخصی از سهو یا از گمنامی در شمار نیامده و بعد چندین از انجا بر آمده از راه بغض و تلخی که لازمه اساری است سخنان بے اصل پیش صاحبان ظاهر کرده باشد درجه اعتبار را نشاید و گفته همچو اشخاص باوجود استحکام بنیان محبت و یگانگت و تنسیق عهود و مواثیق که دستورالعمل سلاطین است در خاطر جاگیر و دلپذیر شدن موجب کمال استعجاب و از جاده دوستی نهایت استبعاد رو نمود کیفیف کوتهی ها این است که سابق ملک کلنکوت در تصرف سرکار احمدی بود اکنون ملک مذکور در قبضه کمپنی سرکار انگریز بهادر است چه جای کوتهی ... برسر هناور کیفیت آن از خارج بسمع شریف رسیده باشد یا که خواهد رسید بعد ازان نوعیکه مزاج خلت امتزاج اقتضا فرماید ایما شود در مقدمه آمد و شد بیوپاریان قسمیکه از سرکار کمپنی انگریز بهادر حکم است همان قسم از سرکار احمدی حکم فرموده شده است احدی مانع یک دیگر نیست و نخواهد بود دربارهٔ عوض و معاوضه چند موضع کاویری پور ارقام یافته بود مشفقا در انفصال مقدمات کرور ها برای یک دو موضع سهل باوجود جاداد عوض مجمله مواضعات تعلقه کرور مگر تحریر این معنی زاید می نماید مشفقاً وقت روانگی مخلص از حضور بمقتضای یگانگت و یک جهتی فدوی اشیا بخدمت شفقت و نوازش مرتبت لاڈ صاحب بهادر و آنمهربان

خور سندي و راسخ القولی کہ بفضل الهي مخمر طینت خود دارند متیقن گردانید مرقوم قلم محبت شیم بود کہ بنام اہلکار سرکار انگریز در مقام منجري تاکید نوشتہ شده کہ مقدمہ شرارت کورگہہ والہ را امیني فرستاده بواجبي فیصلہ سازد موضوع شد کیفیت آنها این است کہ سرحد کورگہہ اندرون تراکم اشجار و سرحد ملک سرکار احمدی در میدان و بد ذاتان کورگہہ در ملک سرکار احمدي بوقت شب آمده رعایا را بغارت گري و دزدي ایذا میرسانند درین صورت رفتن امینان طرفین بسرحد مذکور احتیاج ندارد - مرقوم بود کہ از روي نوشتجات مستر مکلوڈ صاحب کہ امین از طرف سرکار کمپني انگریز است بدریافت آمد کہ بعد تحقیق و تجویز حال حاصل تعلقہ کاشانپور کہ بسمت شمال ندی کاویري واقع شده حوالہ سرکار کمپني انگریز گذاشت گردید از حال حاصل قسمت تعلقہ کاویری پور کہ حسب قولنامہ سمت جنوب ندي مذکور واقع شده حوالہ سرکار احمدی گذاشتہ شد منها گردید باقي مبلغ چهار ہزار و یکصد و چهار ہون ہفت انہ سہ پاو سالیانہ حق سرکار انگریز بهادر مي بر آید و نیز بدریافت مخلص در آمد کہ سید محمد آصف امین سرکار آنمهربان چهار موضع باسم لکم پٹي و کندم پٹي و شنکم پور و ساتا پالي متعلقہ تعلقہ اندور کہ بسمت شمال و مشرق ندي کاویري واقع شده در تصرف سرکار کمپني در آمده شامل تعلقہ پاکر دعوي نموده است و حال حاصل مواضعات مذکور سالیانہ یکصد و سي و پنج ہون کهنتي رائي است چنانچہ مبلغ یکصد و سي و پنج ہون از مبلغ چهار ہزار و یکصد و چهار ہون و ہفت آنہ سہ پاو بالا منها گردید باقي سرکار کمپني انگریز لاکلام سالیانہ سہ ہزار و نهصد و شصت و نہ ہون کهنتی راي است و ہفت آنہ و سہ پاو بالا از انجا کہ در مکاتبات سابق حساب حال حاصل تعلقہ کاویری پور بشرح و بسط بقلم در آمده بود و جواب کیفیت این معني کہ در محبت نامہ آنمهربان محرره

غلہ بیفکر می شویم ہمچو کار معتبر و قریب و پر کہ درآن کفایت سرکار لکوکھا می شود ایشان قبول نمی کنند آیندہ چہ طور بندوبست ملک خواہد شد امید کہ از دلاور جنگ بہادر یک خط بنام میجر صاحب چنان باید نویسایند کہ بلاعذر ہرکار معلوم مقید شدہ معمور شوند کہ در آن کار کفایت عظیم سرکار ہم می شود و بیفکری غلہ ہم می شود تا چہار ماہ و بعد چہار ماہ فصل بدست می آید و ہمہ کار ہای کفایت سرکار و بندوبست ملک ہم می شود ـ این کار را از دست دادن نقصان عظیم سرکار می شود تا حق از دست میرود و غلہ ہم بہم نمی رسد

قبلہ من کمترنہ این طرف نہ آن طرف درمیان پیکار افتادہ است و بجناب عالی درباب کفایت سرکار معروض نمودہ است و ہمین می خواہد کہ کفایت لکھوکھا بموجب معروضہ خود بکند اما فوج سرکار و پلاتن ہا را چنان تاکید باید فرمود کہ بلاعذر در نوکری سرکار بموجب گفتہ میر علی حسن معمور شوند

¶*Extracts from a letter of Mir 'Ali Hasan Khan to Mir 'Alam Bahadur giving details of his meeting with Nawab 'Aqilu'd-Dawlah Bahadur and Major Robert and the negotiations carried out by him with them.*

A letter from Tipu Sultan to Lord Cornwallis.

No. 477] [*1793*

خط ٹیپو سلطان موسومہ نواب مارکویس کارنوالس بہادر موصولہ

رفعت و عوالی مرتبت شوکت و معالی منزلت ملاذ مہربان معاذ دوستان دام محبتہ ـ مکتوب تودد اسلوب در ہا سخ رقیمتہ الوادد متضمن بحسن اخلاص و یکتا دلی چہرہ وصول افروختہ خواہش و تمنای روانگی برخورداران از روبروی خود بمقتضای اتحاد و

کری بگذارند و مواضعات ویرپا کچهي کہ سابق ازین بتصرف
کمپنی انگریز در آمده بود بعد ازان اہلکاران سرکار احمدي بزور
گرفتہ اند واپس حوالہ سرکار کمپنی شود و مخلص از دعوي خود
جہت عوض سالیانہ مبلغ سہ ہزار و نہصد و شصت و نہ ہون و
ہفت آنہ سہ پاؤ را دست بردار خواہد شد ظاہرا حال حاصل
مواضعات مذکوره چندان مالیت ندارد ہرگاه فیمابین مقدمات عمده
بوجہ احسن و شایان دوستیہا منفتح شده کے توقف و تساہل
براي معاملہ جزوی در آخر توقف مي تواند آمد از انجا تارسیدن
پاسخ رقیمہ ہذا وقفہ خواہد کشید و باعث تاخیر در استحصال
مقاصد دلي طرفین میتواند بود لہذا پیش اتفاق سواري جہاز حکم
ناطق بنام صاحبان اینجا خواہند داد کہ ہرگاه کیفیت داخل
شدن اقساط در سرکار نوابصاحب والا قدر عالیشان نواب آصف
جاه بہادر و راؤ صاحب مشفق مہربان پنڈت پردہان بہادر برسد
بذریعہ قرار نامہ سری رنگپٹن سرکارات مذکورین دعوي از سرکار
احمدي نداشتہ باشد صاحبزاده ہا را في الفور رخصت سامي
خدمت نمایند ظاہر و مفہوم گردید از انجا کہ اتحاد و اخلاص
روز افزوني فیمابین سرکار احمدي و سرکار کمپنی بہادر و
استرضای راي صوابدید آنصاحب مرکوز و پیش نہاد خاطر
دوستي مظاہر است و مبلغ حال حاصل مواضعات مرقومۃ الصدر
چندان مالیت ندارد بپاس خاطر آنصاحب و اتحاد و دوستي
فیمابین برفعت و عظمت نشان سید محمد آصف تاکید مرقوم شد
کہ موافق مرضي آنصاحب قریہ جات متعلقہ تعلقہ سولکري و ارپا
کچهي بہ تحویل کسان علاقہ سرکار انگریز بہادر واگذارند و بموجب
قول قرار از ہر سہ اقساط تمام و کمال بہ ہمہ سرکارات موصول

پانزدهم ذیحجه سنه ۱۲۰۶ هجري مرقوم بود از ینطرف نیز سمت ترسیل یافته مکرر جواب کلمات سید محمد آصف مذکور در باب دعوي سرکار کمپنی بابت قسمت تعلقه کاویري پور که بپاس مراتب قولنامه حواله سرکار احمدي میشود احتیاج ندارد چون حسب قرارنامه کل تعلقه کاویري پور بسرکار کمپنی گذاشت گردید ندی کاویري از طرفین سرحد مقرر شده است هر قدر از تعلقه کاویری پور سمت جنوب ندي کاویري واقع خواهد بود حواله سرکار آنمهربان گردید عوض آن از جاي دیگر حواله سرکار کمپنی انگریز خواهد شد پس حق سرکار کمپنی انگریز جهت عوض سالیانه سه هزار و نهصد و شصت و نه هون کهتی رای هفت آنه سه پاؤ بالا از روي قرارنامه ثابت و متحقق است وقتیکه (؟) این معني ذهن نشین شده مقرون باجابت خواهد شد و حق سرکار کمپنی انگریز درباب عوض مبلغ سه هزار و نهصد و شصت و نه هون هفت آنه سه پاؤ بالا که ثابت گردید بکدام سمت عوض آن زمین حواله سرکار کمپنی انگریز خواهد شد مگر هر چند اینمقدمه لایق انفصال تواند بود ظاهرا چند مقامات دیگر هم حاجت تجویز باقی هستند چنانچه سرکار کمپنی انگریز دعوي چند مواضعات متعلقه تعلقه ویر پا کچهي (؟) که سابق حسب قرارنامه بتصرف سرکار کمپنی درآمده اهلکاران احمدي آنرا بزور شمشیر کشیده گرفته اند مینمایند و دعوي سرکار آنمهربان از حد موضع متعلقه تعلقه سولکری که در تصرف سرکار کمپنی درآمده شامل تعلقه رامکوته شد روبکار است نیکو هویدا بوده باشد که در انفصال مقدمات فیمابین مخلص از طرف سرکار کمپنی مراتب حق و انصاف اگرچه همیشه مرعي داشته است تاهم در باب تمشید سررشته محبت و اخلاص دقیقه از دقایق فرو گذاشت نشد درباب عوض مبلغ سه هزار و نهصد و شصت و نه هون هفت آنه سه پاو بالا ثابت و متحقق است درین صورت نوک ریز خامه وداد میگردد که آن مهربان دعوي سوله

انند راو بدریافت آمده بود که در این صورت روانگي اینجانب و اشخاص مرقومه مضایقه ندارد بلکه بفضل الهي و اقبال خداوندی از تقرر شکل ملازمت راو پندت بردهان این گرهها که فیمابین افتاده است حل شدن آن متصور است و این جانب اطاعت امر خداوندي را بهر کاریکه حکم شود سعادت دارین مي پندارد و سود و بهبود دنیا و آخرت در تقدیم و ارشادات وخوشي خداوند نعمت خود مي داند قسمي که حکم خواهد شد بعمل خواهد آورد - و آنچه در باب تعاقب گریختگان ارشاد شد که سکندر جاه بهادر یا قطب الامرا بهادر را شرف دستوري حاصل خواهد شد کیفیت این است که بوقت تعاقب روز دوم یعني تاریخ دوازدهم بود حالا که فاصله بعید میان گریختگان و جمعیت سواران سرکار که بر بیدر اقامت دارند دست داده از سواران مذکور نیز بدون معلوم شدن سراغ سمت گریختگان تعاقب ممکن نیست تا بجمعیت سرکار و مرشد زاده یا سردار دیگر که از بلده مقرر شود چه رسد و قطع نظر ازین هرگاه در رکاب مرشد زاده یا هرکس که از حضور پرنور بسرکردگي مقرر شود همین جمعیت ها که احوال انها از نوشته اژدرالدوله بهادر شمه بعرض اقدس رسیده مشخص گردد توقع تردد قسمي که هست ظاهر مگر براي گفت و شنید که جمعیت و سرداري از سرکار دولتمدار بتعاقب مقرر و مامور شده مناسب است بلکه لازم است لیکن براي این قدر فائده جزئي تمام جمعیت را یکجا رخصت نموده حضور پرنور یا ملک سرکار را خالي از جمعیت نمي توان گذاشت این ها همه که بقلم آمد در صورتیست که سراغ آنها در تعلقات سرکار معلوم شود و اگر به پناه کسي برطبق نوشته اژدرالدوله بهادر که سابق در حضور پرنور رسیده و شب رخصت براي دیدن بحبس(؟) باین جانب عنایت شده بود رفته باشند در این صورت صرف کار سوال و جواب است نه جمعیت چراکه اگر جمعیت سرکار بي محابا و بي اطلاع و آگهي آنها داخل تعلقه بیگانه

• گردیده است اطلاعاً بترقیم در آمده پیوسته دوستدار را خواهان خیریت و مزید حشمت خود تصور فرموده بترسیل رقایم خیریت شمایم مسرور و مبتهج دارند - زیاده ایام مسرت باد

¶*Note. This document is a copy of a letter sent by Tipu Sultan to Lord Cornwallis. According to a note on it by G. F. Cherry, it was made on 13th December 1793. The date of writing is not given, but from a remark in the body of the letter, it appears that it was written shortly before Lord Cornwallis sailed for England on 10th October 1793.*

In this letter Tipu Sultan complains to Lord Cornwallis that as the boundary of his kingdom is in open land while that of Coorg is in a jungle, the people of Coorg cross over to his territory at night and plunder and kill his subjects in the villages on the border. He then enters into a long explanation regarding the disputed question of the revenue of Kashanpur Taluka, a portion of which had been ceded to the East India Company by the Treaty of Seringhapatam. He further requests Lord Cornwallis to issue instructions to his officers to allow his sons to return to him, as soon as the Nizam and the Peshwa receive the last instalment of the indemnity payable to them according to the terms of the Treaty of Seringhapatam.

A letter from Mir 'Alam Bahadur to Mustaqimu'd—Dawlah Bahadur.

No. 384] [*September 1795*

نقل خط میر عالم بهادر اسمی مستقیم الدوله بهادر موصوله سی ام ستمبر سنه ۱۷۹۵ع

رقیمه بهجت ضمیمه مشعر بر رسیدن عرضی اینجانب و گذرانیدن آن معه نذر در حضور پر نور و ارشادات کرامت بنیاد که بعد ملاحظه عرضی مذکور بر زبان مبارک گذشت وصول نمود - آنچه از ارادهٔ اقدس ارشاد شد که رخصت راوگوبند کشن و راجه رگهوتم راو و اینجانب بسمت پونه قرار گرفته یقین است که جواب باصواب بعضی مراتب که معرفت راجه رگهوتم راو با اهلکاران پونه برطبق ارشاد قلمی شده بود رسیده باشد چنانچه شمه زبانی

News-letters from the Court of the Maharaja of Gwalior.

No. 647] [*August 1788*

شاہ نظام الدین ظاہر نمود کہ در سر صد سال این چنین از
بادشاہ کسے نکردہ است کہ این نمک حراماں کردہ اند سندھیہ
بہادر گفتند کہ من تدارک مخالفان قرار واقعی نمودہ باز حضرت
را بر تخت خواہم نشانید ــ بعدہ راجہ رنجیت سنگہ جاٹ آمدہ
ظاہر نمود کہ تدارک مخالفان جلد نمایند بندہ ہمراہ خواہد رفت
واگر توقف نمایند بندہ رخصت میشود فرمودہ اندکہ دہارا راو را
معہ فوج روانہ می سازم

¶*Daulat Rao Sindia expresses his intention of punishing the enemies of Shah 'Alam II and placing him again on the throne. Raja Ranjit Singh, the Jat, also wishes to join forces with him.*

No. 2322] [*24-8-1816*

از احوال بھوپال معلوم شد کہ اہالیان سرکار انگریزی قلعہ
رایسنہ را از پسر وزیر محمد خان بتجویز چھاونی میخواہند مشار
الیہ اظہار دارد کہ مکان بزرگانم است و صاحب مالک اند و من
تابعدار ــ اگر ہمین مرضی است از حکم سرکار بیرون نیستم

¶*It is reported from Bhopal that the East India Company has demanded the Raisina fort from the son of Wazir Muhammad Khan for establishing a cantonment in it.*

شده یقین است که از آنطرف ممانعت بعمل خواهد آمد پس اگر
بر ممانعت آنها فوج سرکار در تعلقه سرکار بماند همانست که کار
بسوال و جواب افتاد واگر جمعیت سرکار ممنوع نشده و داخل تعلقه
بیگانه گردید و از طرفین کار بمقاتله و محاربه رسید خلل در کلیات
پیدا می شود و دیگر قباحتهای این بسیار است - خلاصه این
مراتب آنکه اگر جمعیت سرکار گریختگان را مهلت نداده پاشنه
کوب تعاقب میکرد داخل شدن جمعیت سرکار در ملک بیگانه نیز
در گرمی هنگامه تعاقب مضایقه نداشت و حاجت باطلاع و آگهی
آنها نمی شد - اما تقرر سردار از حضور و طی مسافت بآهستگی و
داخل شدن باطمینان در ملک بیگانه بنابر فرصت حاجت باطلاع
آنها دارد والا جای شکایت می تواند شد - در این صورت حاصل
مراتب مرقومه این که اگر جمعیت سواران بقدر مناسب بلاشرکت
جمعیت باز با سرکرده مثل میران یا رجنگ یا دیگری مامور بر تعاقب
گردد و دیگر جمعیتهای سرکار هم بندوبست و انتظام تعلقات
پردازد و نیز جمعیت معقولی در حضور پرنور مهیا باشد هم قراین
در دست می ماند و آینده بهر اسلوبی که رنگ کار بدریافت آید
موافق آن کاربند می توان شد خصوص جمعیت شایسته در رکاب
ضرور چراکه بتقریب ملازمت راو پندت پردهان نهضت رایات
عالیات بعمل خواهد آمد - حسب الارشاد خداوندی آنچه بعقل
ناقص آمد قلمی شد

¶*Attested copy of a letter from Mir 'Alam, Wakil of Sikandar Jah, son of Nizam 'Ali, Nawab of Haidarabad, to Mustaqimu'd—Dawlah Bahadur, received on 30th September 1795, regarding the desirability of sending Rao Govind Kishan, Raja Raghutam Rao and the writer of the letter to Poona in order to remove some misunderstandings by a conference with Rao Pandit Pradhan; and the advisability of allowing troops to enter alien territory while pursuing a defeated enemy.*

قلعہ ہندون را محاصرہ نمودہ افتادہ اند و راجہ بہادر نیز جمعیت
پانصد سوار و دو ہزار پیادہ از قلعہ کہریرہ کہ ازین جا شش کروہ
بطرف مغرب و علاقہ ہندون است جنگ میکند

¶*Colonel Muhammad Shah Khan has laid siege to the fort of Hindaun.*

No. 445] [*25-2-1815*

نرخ غلہ کوٹہ

گندم في روپیہ	جوار	نخود	مونگ	ماش	برنج
٢٣ ثار	یکمن ٨ ثار	٢٤ ثار	٩ ثار	١٤ ثار	١٠ـ١١ ثار
عدس	شکر	روغن زرد	روغن سیاہ	کنجد	قند سیاہ
٢٤ ثار	٤ ثار	٣ ثار	١١ ثار	٢٤ ثار	٦ ثار
نمک	پنبہ	بنولہ پنبہ	موٹھہ	جو	
٣٠ ثار	٨ ثار	٣٥ ثار	٢٤ ثار	٢٤ ثار	

¶*Rate of foodstuffs and other commodities in Kotah.*

No. 1515] [*6-6-1816*

استماع یافتہ کہ در میدان موتي ڈونگري از افواج راجہ
جے پور والہ واز نواب میر خان بہادر مقابلہ جنگ شدہ از افواج
راجہ عہد براي نیافتہ پایہ ہزیمت نہاد از موتي ڈونگري بمفاصلہ
چہار پنج کروہ دایرہ نمودہ اند ـ دیگر آنکہ راجہ راگھو گدہ والہ
در شیو پور کہ علاقہ جان بطیث بود بوقت شب چھاپہ انداختہ
قلعہ شیو پور را در تحت خود کردہ گرفت و پسر جان بطیث را
گرفتار نمود

¶*It is heard that the Raja of Jaipur defeated Nawab Mir Khan Bahadur in the plain of Moti Dumakri (?), and that the Raja of Raghugadh carried out a night attack on Shivapur, captured the place and took the son of Jean Baptiste Filose prisoner.*

News-letters from the Court of Rana Zalim Singh of Kotah.

No. 34] *[20-12-1810*

... عرض کردند کہ نواب مہتاب خان و طرہ باز خان از بہگونت گڈہ چنبیدگی نمودہ بود از طرفین قضایہ جنگ بمیان آمدہ و بسیاری کشتہ و زخمی شدند آخرش نواب مذکور تاب مقابلہ نیاوردہ شکست فاحش خوردہ رو بفرار نہاد و فتح مردمان بہگونت گڈھ گردید شنیدہ فرمودند کہ مردمان گڈہ مذکور خوب مردانگی نمودند حالا کمک نواب مذکور کسے نخواہد کرد

¶*It is reported that Nawab Mahtab Khan attacked Bhagwantgadh and after a fierce battle was defeated and forced to fly.*

No. 24] *[23-11-1814*

عرضی لالہ رام سنگہ و چھوٹے خان رسید مندرج بود کہ از جسونت راو بہااو و چہتو خان پنڈارہ و پنڈارہ ہاء کریم شاہی و از کرنیل جان بطیٹ قضایہ جنگ بمیان آمدہ چنانچہ بہااو و پنڈارہ ہاء مذکور تاب مقابلہ نیاوردہ رو بفراری نہادہ وسی یکضرب توپ و فیل و پالکی و تمامی ... بنگاہ بہااو موصوف بغارت آوردہ و پلٹن سرکار در جنگ مذکور بسیار شجاعت و دلاوری بکار آوردہ و کرنیل مسطور تا پنجکروہ پا شنہ کوب بہااو وغیرہ رفتہ بود نامبردہ ہا گریختہ بسمت بہوپال راہی شدند

¶*Colonel Jean Baptiste Filose defeated the combined forces of Jaswant Rao Bhao, Chitu Khan Pindara and the followers of Karim Khan Pindara, who fled in the direction of Bhopal.*

News-letters from Kotah.

No. 2323] *[2-4-1813*

محمد شاہ خان کرنیل بہ جمعیت یک ہزار پانصد سوار و شش بتالین و ... رام لوہرہ بہ جمعیت پانصد سوار و یک ہزار پیادہ

زخمي شدند و باقیمانده گریختہ در تعلقہ مذکور پناه بردند دو سہ کس ازین طرف ہم کشتہ و زخمي شدند

¶*Soldiers of Garhi, Taluka Rawa (?), are defeated.*

No. 2319] [*10-4-1813*

... عرضي بهیم سین اخبار نویس از جےپور رسید نوشتہ بود کہ بتاریخ سیزدہم شہر حال بعد نصف شب جمعیت تمامي تهاکران کہ در تعلقہ چومہہ فراہم شده اند بایراده شبخون زدن بر کرنیل مہتاب خان و مانجیداس پروہت سرگروه فوج جےپور آمده بودند چنانچہ کرنیل مذکور ہوشیار شده جنگیده انہارا فراري کرده داد وبست ہشت ضرب و پنج نشان و دیگر اسباب بغارت آورده باستماع آن خوش شده فرمودند کہ تمامی تهاکران از تنہا کرنیل مذکور تاب مقابلہ نیاوردند

¶*Colonel Mahtab Khan and Manjidas Parohat, commanders of the Jaipur forces, defeat the combined armies of the Thakurs which had collected in Chumah Taluka.*

No. 210-211] [*15-8-1817*

دیروز خود بدولت سوار شده تنہا در مورچال حیات خان کپتان رفتہ از دوربین مکانات مادہوراج پوره ملاحظہ کنانائدند بعد از انجا سوار شد شامل سواری گردیده در مورچال محمد عمر خان و محمود خان و تهاکر بہادر سنگہ رفتہ تشریف داشتند و از انہا کہ حاضر شدند متوجہ سخنان بوده فرمودند کہ صبحي گولہ ہائي ضراب توپ متواتر سرکرده دیوار فصیل مسمار سازند و یورش نمایند عرض کردند کہ ہمین قسم بعمل خواہد آمد بر آمد شدند

No. 2268] *[28-8-1817*

کیفیت این است کہ دو صد سوار لشکر مہاراجہ ہولکر بہادر
از مقام گاہ متصل پاٹن بمفاصلہ دو کروہ رسیدند و سواران پایگاہ
راجرانا صاحب گشت کنان رفتہ بود در آنجا باہم مقابلہ گردیدہ
در قرولی از طرفین دو سہ سوار زخمی شدند و از کوٹہ چہار صد
نرگاو و یابو محمولہ باروت گولہ روانہ لشکر نواب امیر خان
گردید ـ و خبر است کہ کریم خان پنڈارہ قریب پنج شش ہزار
سوار پنڈارہ فراہم نمودہ در ضلع بھوپال ہنگامہ غارتگری برپا می نماید

¶*A skirmish between the army of the Holkar Raja and Raja Zalim Singh It is also reported that Karim Khan Pindara with 6,000 Pindaris, is plundering the territory of Bhopal.*

No. 2147] *[No dat*

دریافت شد کہ صاحبان عالیشان بہادر دوازدہ پلاٹن و پنجہزار
سوار برای کمک جے پور والہ و جہت تدارک نواب میرخان تیار
نمودہ بودند چنانچہ جے پور والہ از نواب موصوف قرار و مدار کردہ
از صاحبان بہادر درخواست دو پلٹن انگریزی ساختہ ازین معنی صاحبان
انگریزبہادر خفا شدہ فرمودند کہ جے پور والہ دروغ گوی اند چنانچہ
وکیلان جے پور والہ درین مقدمہ باز نوشت خواند موکلان نمودہ
است باید دید چہ بظہور آید

¶*It is learnt that after entering into a compact with Nawab Mi Khan, the Raja of Jaipur requested the English to help him against th Nawab. It greatly annoyed the English.*

News-letters from the Court of Amiru'd-Dawlah Muhammad Amir Khan.

No. 2324] *[2-1-1812*

بعرض رسید کہ امروز چند کس از گڈی تعلقہ راوا برآمدہ بودند
ازین طرف گولہای اضراب توپ سرشدند چند کس کشتہ و

شدند غرضیکه در معرکه امروز قریب دو صد جوانان کشته و زخمی
شدند و بسیاری کس مادهو راجپوره واله نیز کشته و زخمی گردیدند
و محمد سعید خان رامپوریه زخمی شدند و در پای محمد اکبر
خان زخم گولی رسیده است

¶A detailed account of an attack on the fort of Madhorajpura by Muhammad Amir Khan and its defence by Raja La'l Singh.

News-letters from the Court of Malhar Rao Holkar.

No. 1092] *[5-2-1812*

نواب غفور خان عرض کرد که چتهی خیالی رام کارکن فدوی
از علاقه تال منداون آمده نوشته است که سمبهاجی پوار بجمعیت
پنج شش هزار سوار پیاده درین ضلع فساد برپا نموده است و جابجا
تهانه خود قائم نموده و در بدناور بالکلیه عمل دخل خود کرده
اگر ارشاد شود بنده رفته بندوبست آن ضلع سازد بائیصاحبه
فرمودند که رفتن شما هیچ ضرور نیست بنابر تدارک اوشان بهاو
بهاسکر و پانصد سوار کافی است این ها را روانه کرده می شود
نواب مذکور دیگر عرض کرد که امروز کریم خان پنداره سوار شده
ایراده رفتن بدیره میر مردانعلی نموده بود مردمان پهره واله مانع
کردند براین معنی مشارالیه هم برهم شده نزد بنده آمده گفت که
معلوم شد اینجانب را قید کرده اند بائیصاحبه فرمودند که اخبار
نویسان صاحبان بهادر و پیشوا صاحب و دولت راو سندهیه مدام
خبر این سرکار می نویسند لهذا بنابر ظاهرداری مضایقه نیست خاطر
جمع کرده میدهیم چنانچه پنداره مذکور را طلبیده سخنان
دلجمعی نموده دادند

¶Sambhaji Pawar creates disturbance in the district of Tal Mandawan and Bhao Bhaskar with 500 soldiers is sent to punish him. Karim Khan Pindara is detained as a prisoner.

خود بدولت ہمانجا آرام کردند - امروز گولہ اندازان ہر یک مورچال بموجب پروانگي گولہ ہاے ضراب توپ متواتر سر کردن شروع نمودند و راجہ لعل سنگہ اگرچہ بیمار است مگر باستماع خبر حلہ در مورچال خود آمدہ قایم شد بر اسپ سوار شدہ گرد نواح مادہو راج پورہ گردیدند و در مورچال ہر یک رفتہ تاکید نمودند بوقت دو پہر ہرکارہ ہا آمدہ عرض کردند کہ در دو سہ جا دیوار فصیل از ضرب گولہ ہا مسمار شدہ است و در مورچال محمد عمر خان بان سر شد چون باندار مہارت سر کردن بان نداشت بان مذکور در مورچال راجہ لعل سنگہ افتادہ چند کس زخمي شدند و از شنیدن آواز بان جوانان علي غول وغیرہ جمعداران زمرۂ رامپوریہ حلہ نمودند و خندق طے کردہ زیر دیوار فصیل مادہو راجپورہ رسیدند و چند کس جوانان علي غول وغیرہ بالاي فصیل رفتند و مادہو راج پورہ والہ آنطرف کہ دیوار فصیل مسمار شدہ بود چھپرہا فراہم کردہ آتش دادند و اندرون دیوار فصیل خندق و فصیل دیگر از پیشتر تیار بودند چہرہ توپ و گولیہاي بنادیق سر کردند و جوانان مذکور کہ بالاے فصیل رفتہ بودند کشتہ و زخمي شدند خود بدولت ہم پیادہ پا متصل خندق رفتند جمعداران افغانان زمرہ رامپورہ خود بدولت را از رفتن پیشتر مانع شدہ خود زیر فصیل رفتند و چند کس از مادہو راجپورہ زیر فصیل آمدہ بجنگ شمشیر در پیوستند و مردم پلاتن ہمراہي راجہ لعل سنگہ وغیرہ امداد انہا نکردند حلہ برگشت و سزیدال خان جمعدار و مصطفے خان پسر نجو خان مرحوم و برادر زادہ ہاے آخونزادہ محمد ایاز خان و محمد سعید خان افضل گڈہہ کشتہ

نربدا مقرر کرده خواهد شد و غارتگري موقوف دارند و الا نه تدارک
ایشان قرار واقع کرده خواهد شد خبر رسید که پلتن والرها از
مقامگاه کوچ کرده برلب سهار (؟) رسیده ڈیره کردند و سواران
هندوستانی و مرهته وغیره برهان پوره ڈیره دارند و پلتن والرها
از راج گفته فرستادند که غفور خان از ما قول و قسم گنگا و قرآن
درمیان داده نزد ایشان رفته بود که معامله ایشان اول کرانده
خواهد شد حالا معامله خود وسلیحداران کرده ما را جدا کردند
لازم که معامله مایان نیز کرانده دهند

¶*Mr. Elphinstone promises to grant property worth 5 lakhs to the Pindaris if they stop their d predations.*

News-letters from the Court of Ranjit Singh of the Punjab.

No: 2301] *[4-3-1813*

... هرکاره آمد خط عبدالرحیم خان قلعه‌دار اتک که از طرف
نواب عطا محمد خان است رسانید درآن نوشته بود که شاه زاده
ایوب باینجانب نوشته فرستاده اند که قلعه اتک خالی کرده در
آن عمل دخل شاهنشاهي کنانیده دهند و اینجانب را این معنی
منظور نیست که قلعه اتک باوشان بدهم مگر همیکه فوج آن
صاحب برسد سپرد او کرده خواهم داد بعد ملاحظه درجوابش
بدین نمط نویسانیده روانه کردند که فوج سرکار نزد ایشان برسد
بموجب نوشته خود بعمل آرند و خود در ینجا خواهند آمد
بروقت آمدن اینجا درستي تمه امورات اخراجات ایشان کرده
داده خواهد شد

¶*'Abdu'r-Rahim, the commander of the fort of Attock, offers to surrender the fort to Ranjit Singh.*

No. 282] [13-5-1813

نرخ غلہ لشکر ہولکر بہادر

گندم	نخود	جوار
ہفت آثار	ہفت نیم آثار	ہشت آثار
مونگ ماش	برنج و دال مسور	نمک
ہفت ہشت آثار	پنج آثار	نہ آثار

روغن زرد فی روپیہ را
دو آثار فروخت میشود

¶Rate of commodities and food stuffs in the army of the Holkar.

No. 379] [31-7-1813

لشکر ہولکر بہادر مرقوم سي یکم ماہ جولائي [۱۸۱۳]

راجہ پرتاب گدھ شبخون بر فوج مندسوروالہ زدہ بسیاري کشتہ و خستہ نمودہ تباہ ساخت ـ اما جنگ بدستور ہنوز فیصلہ نشدہ است و دو پلٹن ہمراہی بالا راو اینگلیہ متصل موضع سونیل ڈیرہ داشتہ غارتگري علاقہ راج ظالم سنگہ بہادر مینمایند و گرد پیش لشکر مہاراجہ ہولکر بہادر گراسیہ ہا ہنگامہ پرداز ہستند .

¶The Raja of Pratabgadh carries out a night attack on the army of Mandsor. The regiments of Bala Rao Inglia plunder the territories of Rao Rana Zalim Singh.

No. 2312B] [27-8-1817

چٹھي کہندوسہ از پونہ رسید مندرج بود کہ مسٹر الفنسٹن صاحب بہادر بصاحبان عالیشان انگریز بہادر کہ بر دریاے نربدا معہ افواج دایر اند نوشتند کہ از ہمہ پنڈارہاے اطلاع سازند و نوشتہ فریستند کہ جاگیر ایشان مکانات پنج لکھ روپیہ بطرف

الملک بستند بدل اراده دارم کہ از اوشان طلبیده بگیرم انہا
عرض کردند کہ مہاراج بہادر مالک اند ہرچہ بہتر دانند ......
لیکن پیشتر جواہر کوہ نور باین رسوای بدست آمده بود
حالا بدون ہمہ خرابی و سختی و بدنامی بدست کرده آید
بہتر آنست کہ حالا تسلی و دلاسا مشارالیہ سازند فرمودند کہ ہمین
صرف مرکوز خاطر است ـ خود بدولت رام سنگہ مختارکار
سرکار کنور کھڑک سنگھ را طلبیده فرمودند کہ ایشان از طرف
این جانب نزد شاه شجاع الملک رفتہ بگویند کہ حالا آنصاحب
را معہ فوج شایستہ بطرف پیشاور فرستاده خواہد شد و پروانہ بنام
حکمان سنگہ تھانہ دار لاہور بدین خط نویسانیده روانہ کردند کہ
خبرگیری ... حضرت ممدوح قرار واقعی باید کرد

¶*Ranjit Singh's plan to cajole Shah Shuja' to part with a saddle set with precious stones worth 28 lakhs of rupees, and a bedstead of coral, studded with large size topazes.*

No. 380] *[30-10-1813*

... جوری ہرکاره از کابل آمده خبر رسانید کہ حضرت محمود
شاه بادشاه بتاریخ دہم ماه شوال بہ جمعیت چہل ہزار سوار پیاده
قوم یوسف زہی و نور زہی و ایماق وغیره از کابل بطرف پیشاور
کوچ کرده اند و جمیع سرداران مسلمین روبرو بادشاه قسم قرآن
خورده اند کہ یکمرتبہ غلامان بر نمک حضور انور قربان خواہند
شد و حضرت والاہم امیدوار مراعات کلی نموده اند و سردار
فتح خان وزیر در کابل است و رقم مبارک درباب جمع آوری
اسباب نزد حاکم پیشاور آمده است چنانچہ حاکم پیشاور در
فراہم ذخیره مشغول است و میگویند کہ بادشاه بالا بالا از پیشاور
بطرف اٹک خواہند آمد

¶*Mahmud Shah's march on Attock at the head of 40,000 soldiers drawn from the Yusufzai and Nurzai clans, and the oath of all the Muslim Sardars on the Quran to stand by him.*

No. 1803] *[8-6-1813*

دیروز خود بدولت تا وقت شام از جواہریان رقم جواہر کوہ طور (کوہ نور؟) عنایات حضور شاہ شجاع الملک ملاحظہ میکنانیدند دریافت شد کہ بوزن سہ صد و چند سرخ بقیمت بے شمار است چرا کہ چون جواہر مذکور دیگر پیدا نیست ...... از نوشتہ ... امرت سر دریافت شد کہ خود بدولت از حضرت شاہ شجاع الملک دستار بدل کردہ اند

¶Appraisement of the diamond Kuh-i-Nur which was given to Ranjit Singh by Shah Shuja'u'l-Mulk.

No. 2055] *[29-6-1813*

... بوقت یک پاس شب گذشتہ جوري ہرکارہ آمد عرضي دیوان محکم چند رسانید نوشتہ بود کہ از سردار فتح خان وزیر جنگ خوب شد آخرش مشارالیہ از معرکہ میدان مع سی سوار فراري شدہ بطرف کشمیر رفت و فتح عظیم سرکار شد و فدویان ہر ڈیرہ مشارالیہ رسیدہ ڈیرہ کردہ ...... و دوازدہ قطعات خطوط بنام جہان دادخان و راجہاي ضلع کشمیر بدین مضمون نویسانیدہ فرستادند کہ سردار فتح خان وزیر مع سي سوار از مقابلہ فوج سرکار گریختہ بانطرف راہي شدہ و فوج سرکار تعاقب آن میرود و اگربآن ضلع رسید او را دستگیر سازند

¶Defeat of Sardar Fath Khan, wazir of the Shah of Kabul, and his flight to Kashmir.

No. 1627] *[10-9-1813*

از نہال سنگہ و ... و بہاي گوربخش سنگہ علیحدہ شدہ در خلوت ارشاد کردند کہ یک زین اسپ مرصع جواہرات قیمتي بیست و ہشت لکھہ روپیہ و یک پلنگ مرجان کہ بوسر ہر چار پایہ او یک نگ پکھراج کلان چسپیدہ اند از حضرت شاہ شجاع

اسباب دیگر افتاده است مهاراجه صاحب بهادر همه‌ها را ملاحظه کرده منجمله آن دو تمنچه و یک دو قبضه شمشیر و پیش قبض ولایتي در سرکار داشتند باقي تمام زیور و رقم جواهرات وغیره معه خوجه مذکور نزد شاه شجاع الملک واپس فرستادند و از رام سنگه ارشاد کردند که دیگر اسباب بدیره ایشان است همگي رسانیده دهند چراکه بعیوض جزوي مقدمه در تمامي ملک بدنامي خواهد شد مشارالیه حسب الارشاد بجا آورد

¶The confiscated property of Shah Shuja'u'l-Mulk is brought before Ranjit Singh who selects a few pistols and swords and orders the restoration of the rest to the Shah.

No. 2104] *[18-6-1814*

جوري هرکاره آمده عرض کرد فوج سرکار بنا بر تیاری پل ناله آب بهرم کله رفته بود از انطرف بندوقهاي سر شدند و مخالفان بنا بر مقابله آمدند مردمان سرکار تاب جنگ نیاورده واپس آمدند از بارش گولي بندوق متصل ناله آب رفتن نمي توانستند و فوج درانیان طرف ثاني بنا بر مقابله آمده استاده شده است بدریافت این معنی بسرکرده فوج نوشتند بهر طوریکه دانند تیاري پل زود کنانند و قریب ده هزار مردم دیگر بنابر کمک جمعیت خود روانه کردند و دو غول سواران خود را بنا بر چوکي مورچال فرستادند جوري هرکاره آمده عرض کرد که سردار مست سنگه بهرایه و راجه فتح سنگه الووالیه وغیره ...... برهمنوني راجه اکبرخان رجوري واله شاه راه پل را گذاشته جانب چپ بالاي ...... کرده بر جماعت طرف ثاني بندوقها سر کرده و شمشیرزني نموده باهم پیوستند آخرش مقهوران نابکار تاب مقابله نیاورده برخي در گڑهي قیام ورزیدند و بسیاري بطرف گهاته دیگر فرار شده رفتند و گهاته مذکور بدست سرکرده‌ها فوج

No. 2307] *[22-1-1814*

... دامودر مل وکیل سردار فتح خان وزیر حاضر شده بلونت راو خریطه سردار فتح محمد خان آورد ...... مرقوم بود که اینجانب فوج خود فرستاده قلعه ملتان بایشان خالي کرانده میدهم آنصاحب هم قلعه اتک ... خالي کرده دهند و اینجانب بر عهد و پیمان خود تا حال قایم است و همین منظور خاطر است که از طرفین اخلاص و دوستي روز بروز بر ترقي گردد خود بدولت از دامودر مل ارشاد کردند که حالا بر وزیر اعظم چه قدر جمیعت است عرض کرد که همگي هشت هزار مردم فوج درانیان و قزلباشان هستند و اراده آمدن سرداران قوم یوسف زهي بود اغلب است که غائبانه ... آمده باشند فرمودند که در فوج موکل ایشان نا اتفاقي کمال است ...... هرکاره آمد خریطه سردار فتح خان وزیر رسانید ظاهرا دران نوشته بود که آنصاحب فوج خود را بطرف ملتان روانه سازند و فوج من هم در اینجا خواهد رسید قلعه مذکور اول بایشان خالي کنانیده میدهم بعد ملاحظه ارشاد کردند که اگر فتح خان از فوج خود قلعه خالي کرانده باینجانب مي دهد و یازده لکه روپیه را ... سالیانه بابت معامله کشمیر در اینجا دهند البته قلعه اتک داده خواهد شد

¶Sardar Fath Muhammad Khan is willing to hand over the fort of Multan if Ranjit Singh evacuates the fort of Attock.

No. 2105] *[7-3-1814*

کنور کهڑک سنگه و رام سنگه صندوقچه هاي زیور معه بعضي رقم جواهرات از قسم جواهر و قبضه هاي شمشیر و پیش قبضه و تمغچه هاي وغیره بابت ضبطي شاه شجاع الملک معه سکو خان نامي خوجه شاه موصوف گذرانیده ظاهر کرد که دو منزل جهکڑه محموله پارچه هاي پوشاکي مردانه و زنانه و خیمه هاي وغیره

و کوچ راجهاے نیز کرانده دادند ... عرض شد کہ عیسی خان وزیر راجہ کوٹلی والہ در لشکر داخل شد بعد مسموعہ یکصد روپیہ بابت ضیافت بمشار الیہ فرستادند ... بتاریخ بست نہم ماہ جولای سنہ ۱۸۱۴ عیسوی در چھاونی لودہانہ دریافت شد کہ در قصبہ پھلور بوقت سہ پہر و شام یازدہ آواز توپ شلق سلامی شدہ معلوم شد کہ کھاٹہ کشمیر بدست آمدہ باشد و افواہ ہمین است کہ کشمیر فتح شد باز خبر رسید کہ در پھلور شادیانہ نواختند کہ کشمیر فتح شد۔ بتاریخ سی ام ماہ جولای سنہ صدر جوری ہرکارہ در چھاونی لودہانہ نزد نعد سنگہ وکیل سردار رنجیت سنگہ بہادر آمد دریافت شد کہ از راہ گھاٹہ بہا ہمہ راجہ کسکہ ہمہ (؟) بپوستگی کرد فوج سردار رنجیت سنگہ بہادر عبور شدہ بہ کشمیر رسیدہ و راجہ مذکور رسد غلہ در لشکر سردار صاحب بہادر رسانید. چنانچہ نرخ غلہ فی روپیہ بست آثار در لشکر شد و محمد اعظم خان ناظم کشمیر گریختہ رفت و کشمیر بتصرف سردار صاحب بہادر رسیدہ لیکن اخبار و کسے خط از کشمیر نیامدہ مگر افواہ است کہ کشمیر بیشک فتح شد از عقب دریافتہ معروض خواہم داشت

¶*An account of the conquest of Kashmir by Ranjit Singh.*

No. 1109-10] *[5-8-1814*

عرض شد کہ رام سنگہ مختیار کار کنور کھڑک سنگہ معہ اکبرخان رجوڑی والہ از مقام بہرم کلہ از نزد سردار دت سنگہ ہرانیہ وغیرہ رخصت شدہ در موضع تھتہ آمدہ اند و اکبرخان را نظربند کردہ داشتہ است و سردار مست سنگہ بہرانہ کہ باو زخم کاری رسید بود ازینجہان در گذشت بعد مسموعہ بنابر ماتم پرسی اش بہائی گوربخش سنگہ را نزد پسر او فرستادند. عرض شد کہ سردار دت سنگہ ہرانیہ و رام دیال وغیرہ سرداران شبا شب

سرکار رسیده لیکن وقت دو پهر هنگامه کارزار گرم ماند مظهرعلي و ... مختار کار فوج دیوان محکم چند وغیره بقدر چهار صد کس زخمي شدند و دیگر یک صد پنجاه نفر سکهان فوج سرکار بکار آمدند و طرف ثاني هم بسیاری کشته و زخمي گردیدند در انجا لاش بر لاش افتاده است و فتح سرکار گردید بعد مسموعه خوش شده بست روپیه بجوڑي مذکور انعام بخشیده ...... جوڑي هرکاره دیگر آمده بعرض رسانید که مورچال سرکار از گڑهي بهرم گله قایم شدند و جنگ میشود

¶*An account of a battle fought with the Kashmir forces on the banks of the river Baramgalla in Punch.*

No. 1668-69] *[8-7-1814*

قواعد سکهان اردلي خاص ملاحظه نموده بدوکس یک یک الایچه عطا کردند از سردار مست سنگه وغیره سرکردها فوج حکم شد که شمایان بطرف روڑي بفاصله چهار کروه از ینجا بطرف کشمیر است کوچیده بروید چنانچه اوشایان کوچیده رفتند سبحان رای عدالت واله و شیخ یوسف را بنا بر حفاظت آیند روند بسمت امرپور چومکهه متعینه نمودند دو هزار روپیه بطریق علي الحساب در پلٹن شیخ بساون تقسیم کنانیدند راجه فتح سنگه اهلوالیه درباره روانه نمودن زخمیان همراهي خود بسمت قصبه گجرات عرض نمود فرمودند بهتر و شما معه سردار جودهه سنگه کلسیه به پیشتر کوچ نمائیند عرض کرد وقت سه پهر کوچیده خواهم رفت عرضي سربلند خان روڑي والا بدین مضمون آمد که فوج محمد اعظم خان حاکم کشمیر درینجا فرود است ازین جهت بخدمت حاضر شدن نمي توانم پانصد روپیه بنا بر خرج به سوندي پسر میان خیراتا بخشیده کوچ مشارالیه پیشتر کنانیدند

دستگیر نموده و همراهیانش را از قلعه بدر کرده . پریم سنگه فرصت یافته گریخته رفت و قادر بخش در قید است بعد ملاحظه جوابش مشعر تحسین و آفرین و این که قادر بخش را باحتیاط در حضور ارسال سازند

¶*Intrigue of Prem Singh and Qadir Bakhsh to deliver the Kangra fort to Raja Bhup Singh.*

No. 2100] [*26-4-1815*

. عرضي قلعدار اتک بدین نمط بنظر گذشت که جمعیت سواران بموجب احکام سرکار عبور دریاي اتک شده بانطرف رفته از مخالفان بجنگ پیوستند قریب یک پاس جنگ گوله ... از طرفین مانده آخرش سواران سرکار هزیمت خورده واپس گردیدند قریب یک نیم صد کس اینطرف و پنجاه کس آنطرف کشته و زخمي گردیدند ...... حکما سنگه تهانه دار از لاهور آمده عرض کرد انچه که اسباب حضرت شاه شجاع الملک بود ضبط کرده در توشخانه سرکار رسانیده آمدم و همراهیان شادي خان و یوسف خان را از شهر لاهور بدر کرده دادم فرمودند خوب کردند ...... دریافت شد که حضرت شاه شجاع الملک از لاهور گریخته بطرف بهاول پور رفتند.

¶*Defeat of a detachment sent by the commander of the fort of Attock to the other bank of the river Indus.*

Flight of Shah Shuja' to Bahawalpur

No. 2306] [*10-6-1822*

... عرضي جی سنگه اتاریواله و دو سرداران محمد عظیم خان مشعر بر تابعداري رسید ملاحظه نموده جوابش بروقت ملتوی داشتند ...... هرگاه لشکر مهاراجه موصوف متصل دریای سنده رسید محمد عظیم خان خواست که بمقابله پردازد درین ضمن مردمان

از ارسسان کوچیده داخل موضع تهتہ شدند و دیروز اکثر کسان درمیان راه کشتہ و زخمي شدند و اسباب لشکر بغارت رفت و قریب دو ہزار بندوق و ہمین مقدار شمشیرہا و دیگر سلاح ہا سکہان زمینداران این نواح کشیده گرفتہ بردند پہلوان خان برادر راجہ کوتلي والہ ملازمت نموده عرض کرد کہ حالا نقصان سرکار نخواہد شد تا لاہور بیز بنگاه را بسلامت رسانیده خواہد شد مہاراجہ بہادر خوش شده خلعت سہ پارچہ و جوڑي کنگن طلائي باو عطا فرمودند - بتاریخ ششم ماه اگست ۱۸۱۴ع مطابق نوزدہم شہر شعبان ۱۲۲۹ ہجری روز شنبہ مقام پنج کروه اینطرف از سنہره بر پل لب نالہ آب موضع سنہره را آتش داده بالاے کریوه کوه استاده شده کذاره بیر بنگاه وغیره کنانیده پنج کروه این طرف از سنہره رسیده وقت شام داخل ڈیره شدند عرض شد کہ در اثناء راه از قوم بلکیہ ہا و پلاتن شیخ بدہا جنگ بمیان آمد اکثر کسان طرفین کشتہ و خستہ گردیدند مہاراجہ بہادر تعریف پلتن مذکور کرده فرمودند کہ در لاہور رسید دو سہ پلتن بختیان نوکر داشتہ خواہد شد

¶*An account of the disastrous return march of the army of Ranjit Singh after the conquest of Kashmir.*

No. 1355] [*13-10-1814*

عرضي متصدی مختار قلعہ دار قلعہ کانگڑه بدین مضمون بنظر گذشت کہ پریم سنگہ نامی و قادر بخش ماچہي متعینہ قلعہ مذکور از راجہ بہوپ سنگہ ہري پوریہ سازش نموده دادن قلعہ باو مقرر کرده بودند راجہ مذکور معہ جمعیت دو ہزار کس متصل قلعہ رسیده چونکہ اقبال سرکار یاور بود بنده مطلع شده ہر دو نامبرده را

ریواڑی و سہ ہزار روپیہ بابت سونی پت داخل خزانہ شدند و ڈاک
کہاران ولیم فریزر صاحب کلان بطرف مرہٹہ روانہ کردہ اند

¶*Muntazimu'd-Dawlah Charles Metcalfe sends Rs. 6,250 to a Munshi, Rs. 6,000 to Nawab Muhammad Mir Khan, Rs. 1,250 to Raja Gopal Kishen Jagirdar, and Rs. 5,000 to Mir'Izzatu'llah Khan, news-writer, in payment of his quarterly salary.*

News-letters from Burhanpur.

No. 282] [*20-5-1813*

نرخ غلہ

گندم و نخود فی پلہ	جوار باجرہ (فی پلہ)	مونگ ماش (فی پلہ)
پنج نیم روپیہ	سہ نیم روپیہ	شش روپیہ
برنج (فی پلہ)	روغن زرد فی روپیہ	روغن سیاہ (فی روپیہ)
ہژدہ روپیہ	پاؤ کم دو آثار	ہفت آثار

¶*Rate of foodstuffs in Burhanpur.*

No. 1035] [*17-7-1813*

دیروز معہ جمعیت صوبدار برہان پور بر جہان آباد رفتہ از حکیم
جیو عامل معزول انجا باتفاق عامل جدید جنگ کردہ بست نفر
حکیم جیو و سیزدہ نفر جمعیت مذکور در جنگ بکار آمدند و از
جہان آباد مورچہ بندی کردہ اند و ہفت سپاہی صوبدار مذکور
جدید بکار آمدند و بنابر اعانت خود عامل جدید پنجہزار روپیہ
بقلعدار اسیر میدہد و مشارالیہ دہ ہزار روپیہ بوعدہ خالی کنانیدہ
دادن جہان آباد و طلب میدارد لیکن چیزے تصفیہ نشدہ

¶*The Subedar of Burhanpur, makes common cause with the new 'Amil of Jahanabad, and attacks the forces of Hakim Jiu, the old 'Amil.*

قوم خٹک و بنگش و مهمند و خلیل وغیره افغانان یوسف زاي ها
كواغذات خود بمهاراجه بهادر نوشتند که اگر جاگیرات مایان
گذاشت کرده دهند همراهي محمد عظیم خان گذاشته طرف شما مي
آئیم محمد عظیم خان بدریافت این معني بزودي تمام معه
لشکر خود طرف کابل کوچ کرد و یار محمد خان برادر خان مسطور
حاکم پشاور چهل هزار روپیه بابت تعلقداري مهاراجه رنجیت سنگه
از بابت پشاور دادني مقرر کرده بست هزار روپیه ادا کرده و
براي بقیه را وعده نموده است معتمدان اروس معرفت محمد
عظیم خان بملازمت شاه ایوب مشرف شده عرض کردند که هر قدر
مبلغان براے مصارف فوج مطلوب شد خواهیم داد سردار محمد
عظیم خان گفت که بالفعل دشمن من رنجیت سنگه است اورا
بقوت خود خواهم کشت خواهش کمک شما ندارم خلعت ها
داده رخصت نموده

Invasion of the Punjab by Muhammad 'Azim Khan. The Khans of the Khatak, Bangash, Mohmand, Khalil and Yusufzai clans offer to desert Muhammad 'Azim if Ranjit Singh promises to confirm them in the Jagirs held by them.

A news-letter from the residence of Charles Metcalfe, Delh

No. 2308] *[15-7-1815*

بعد ازان شش هزار دو صد و پنجاه روپیه بنام منشي ...... و
شش هزار روپیه بنام نواب محمد میر خان و یک هزار دو صد و
پنجاه روپیه بنام راجه گوپال کشن جاگیردار و پنج هزار روپیه بنام
میر عزت‌الله خان اخبار نویس ضلع مغرب بابت تنخواه سه ماهه و
پانصد روپیه براے خرچ خوراک محبوسان حکم خزانه دستخط
کردانیده دادند ــ عرض شد که یک هزار روپیه آمدني پرگنه

سواران و پیاده‌ها از اوجین کونچ کرده بمفاصله دو کروه بر موضع موروکری متصل پنگلیشر مخیم شده اند و اراده جنگ نمودن از افواج هولکر بهادر مصمم داشته اند و بخشی بدامی لعل در اوجین از دوکان یک مهاجن مبلغ پانصد روپیه بطریق قرض گرفته گوله و باروت خرید ساخته نزد سمندخان فرستاده اند و انچه که سواران و پیاده‌ها بنابر تلاش روزگار در لشکر خان مسطور می آید اوشان را بخواهش تمام ملازم میدارند و اراده این است و میگویند طوریکه افواج هولکر بهادر جابجا پرگنه سندهیه بهادر تاخت تاراج کرده است انچنان مایان هم پرگنه اوشان تاخت تاراج و بے چراغ خواهیم کرد باین اراده سواران و پیاده‌ها نو ملازم نگاهداشت جاری میدارد

¶*Samand Khan Afghan and Colonel Dan Singh, with an army numbering 1,500 have left Ujjain and are encamped at Morukhari, near Pingleshwar, with the object of giving battle to the Holkar's army, and retaliating for their attacks on the territory of the Sindhia.*

No. 2315] [*13-7-1813*

نرخ غله اوجین

گندم في ماني	نخود في ماني	جوار في ماني
١٥ ٨ ٠	١٧ ٠ ٠	١٤ ٠ ٠
برنج باریک في ماني	دال نوار في ماني	دال مونگ في ماني
٥٠ ٠ ٠	٢٧ ٠ ٠	١٩ ٠ ٠
دال عدس في ماني	قند سیاه في ماني	روغن زرد فی دهڑي
١٧ ٠ ٠	٣٧ ٠ ٠	١ ٠ ٠
روغن سیاه في روپیه	شکر في روپیه	
٣¼ ثار	١¾ ثار	

¶*Rate of foodstuffs and other commodities in Ujjain.*

No. 2320] *[25-11-1813*

سواران رهبر پنڈاران قریب چهار صد سواران بر موضع کودر
آمده گردپیش موضع مذکور شده بود .... از جسونت راو قلعدار بر
تیر و تفنگ خوب جنگ کردید پانزده سواران پنڈاره زخمي شده
گریخته رفتند و رهبر پنڈاران تا حال بر موضع جاروه متصل چین پور
است درین جا افتاده اند و از دهشت رهبر پنڈاره موضع
بور گانون و موضع کودر و بهادر پوره ...... رعایا فراري شده رفته اند

¶*Jaswant Rao, commander of Kodar fort, defeats the Pindaris. The leader of the Pindaris is camping at Jarwah, near Chainpur.*

No. 391] *[23-10-1815*

مسموع شد که پریروز پنڈارها گرد نواح اینجا را غارت نموده
تارکشان را که مع قبایلان براي سیر از دو روز بمحل کواره رفته
بودند گرفته و زنان اوشان را بے ستر ساختند آخرش انها دو
نیم صد روپیه داده مخلصي زنان خود را کنانیده امروز درینجا
آوردند بعده پنڈارها موضع کهامتي را غنیمت کردند. دو سوار
اوشان از دست دیهه والها زخمي شدند و یک کس کولي موضع
مذکور کشته افتاد ــ من بعد موضع نرسنگي و موند را غنیمت
کرده سوختند.

¶*The Pindaris plunder the neighbourhood of Burhanpur, and the villages of Khamti, Narsangi and Mond.*

News-letters from Ujjain.

No. 2315] *[13-7-1813*

بعز عرض صاحب عالیشان خداوند نعمت کرنیل صاحب بهادر
دام اقباله ... ... احوال این است که جنسي و
چیزے فوج هولکر بهادر متصل پرگنه ترانه قیام میدارند و
سمند خان افغان نسبت کرنیل دانسنگر بجمعیت یک نیم هزار

A News-letter from Delhi.

No. 425] [*8-12-1813*

نرخ غله شاهجهان آباد – في روپیه

گندم	باجره	جوار	مکي	دال مونگ	دال ماش
۲۶ ثار	یکمن ۷ ثار	یکمن ۹ ثار	یکمن ۱۰ ثار	۲۹ ثار	۳۰ ثار

قند سیاه	شکر سرخ	برنج	نمک	روغن زرد
۱۴ ثار	۱۰ ثار	۲۰ ثار	۱۵ ثار	۲¾ سیر

¶*Rate of foodstuffs in Shajahanabad (Delhi).*

A News-letter from the Narbada Ghat.

No. 339] [*26-5-1814*

سروپ سنگه گراسیه بخت گدهه واله به جمعیت سه صد سوار و یک هزار پیاده به قصبه کسراده رسیده چنانچه زمینداران آنجا مقابله ساخته خوب جنگ کرده بسیاري را کشته و زخمی نموده غارتے اسباش کرده گرفتند آخرش ازانجا پشیمان برگشته دو دیهه مردانه (؟) را تاخت تاراج نموده داخل بخت گدهه گردید و دوصد سوار پیاده نامبرده بطرف دیگر بنا بر غارتے رفته اند – درین ضلع هنگامه گراسیه ها و افواج هولکر بهادر از حد زیاد است

¶*Sarup Singh Garasiya of Bakhtgadh attacks the village of Kasradah. He is defeated and forced to return to Bakhtgadh.*

News-letters regarding war with the Gorkhas.

No. 1535] [*Nov.-Dec. 1814* (?)

دریافت شد که ولیم فریزر صاحب کلان بدستور ڈیره دارند – درین ولا از مردمان گورکهه جنگ عظیم بمیان آمده بود چنانچه میگویند که قریب شش صد کس از طرفین کشته و زخمی شدند و در دست و پائي صاحب مسطور قریب سه زخم قدرے قدرے

No. 445] [27-2-1815

نرخ غله اوجین — في ماني

گندم	نخود	جوار	کوتر
٨ ٨ ٠	٧ ٠ ٠	٥ ١٢ ٠	٣ ٨
جے پور	مونگ	ماش	عدس
٤ ٩ ٠	١٠ ٠ ٠	١٠ ٤ ٠	٩ ١٢
لشکر سندهیه	حیدرآباد	دال مسور	برنج
٩٧ ٦ ٠	٨٨ ٨ ٠	١٤ ٠ ٠	٢٤ ٠
قند سیاه	ناگپور	بنارس	بڑوده
٢٦ ٠ ٠	١٧ ٠ ٠	٦ ٨ ٠	٨٧ ٨ ٠
نمک	شکر في من	روغن سیاه في روپیه	لونگ في آثار
١١ ٠ ٠	١٧ ٠ ٠	٧¼ ثار	٤ ٠ ٠
الائچی في آثار	دارچیني في آثار	بادام في آثار	پسته في آثار
٣ ٠ ٠	١ ٨ ٠	١ ٨ ٠	١ ٤ ٠
افیون في آثار	مشک في توله	زعفران في توله	
٨ ١٢ ٠	١٧ ٠ ٠	١ ٠ ٠	

¶*Rate of foodstuffs and other commodities in Ujjain.*

No. 1641] [9-3-1817

بافهام رسید که راجه جے سنگه راجه راگهو گڈهه واله بر موضع
میرایه علاقه پرگنه سونکچهه مقام ساخته است و از گڈهي مذکور
و از راجه ممدوح جنگ تیر و تفنگ درمیان است و قریب هفت
هشت مردمان طرفین کشته شده و از اوجین صد بندوقچي و از
دیگر پرگنات جمعیت براي اعانت موضع مذکور رفته

¶*It is reported that Raja Jai Singh of Raghugadh has attacked Mirayah in the Sonkachh Parganah and that help is being sent from Ujjain and other parganahs.*

بارش باران بشدت نازل می‌شود و سري جيوالاجي از ينجا بفاصله بست و پنجکروه مانده و گذاره کسی بانطرف ازمخاطره راه نیست و مردمان گورکهه ازبالا فرود آمده آیند روند را ضایع مي نمایند لیکن جنگ دیگر نکردیده است

¶*The English lay siege to the Rajgadh fort. The Raja of Bilaspur who was an ally of the Gorkhas is defeated and put to flight, but his soldiers and the Gorkhas have entrenched themselves in Bilaspur fort. It is rumoured that the English army is being sent against them.*

No. 666] *[21-2-1815*

......از قلعه جے تک جنگ بدستور مي شود و از سه طرف محاصره قلعه شده است و از طرف چهارم رسد غله بمردمان گورکهه اندرون قلعه مي رسد و مردمان رعایا انجا درشهر ناهن آباد میشوند و برف باری میگردد افواه و اشتهار است که از قلعه رام نگر که جنگ توپ گوله میشد چنانچه قدري دیوار شکست شده مردمان قلعه برآمد شده در قید شدند و میگویند که بتاریخ شانزدهم ماه فروري قلعه مذکور فتح شد مگر این معنی بطور اشتهارات است از کسے نوشته نیامده

¶*Jaitak fort is besieged by the English forces. The people of that place take shelter in Nahan. It is rumoured that Ramnagar fort has been taken by the English.*

No. 2102] *[23-4-1815*

جرنیل اختر لوني صاحب بهادر و ادم صاحب بهادر و کرنیل طامسین صاحب بهادر مع پتالین فراهم شده بر گورکها حله کرده مورچها گرفته و روز دویم بتاریخ هفتدهم ماه اپریل سنه ۱۸۱۵ عیسوی بهکتوتهانا و کاجي امرسنگه تهانا مع دوصد مردم بر فوج ایشان افتاده قریب چهارصد مردم هردو طرف کشته و زخمي شدند و بهکتوتهانا در جنگ کشته افتاد جرنیل صاحب بهادر یک

آمده اند و تاحال درگدهی و چژه با وجودیکه خالی افتاده است از باعث اشتباه که مبادا ... دغا سازند درانجا دخل خود نکرده اند و نواب گورنر صاحب بهادر بدستور در مرادآباد دایره دولت دارند و مستر متکاف صاحب بهادر ناظم صوبه شاهجهان آباد وجع میرتهه حاضر اند و اراده کوچ طرف نجیب آباد معلوم مي شود و خبراست که بتاریخ هفتم دسمبر کوچ بطرف هردوار خواهند کرد

¶William Fraser (the Political Agent with the division of General Gillespie) is wounded in a skirmish with the Gorkhas (according to Prinsep, i, 90, 2nd ed., he was wounded by an arrow in his throat at Nalapani on 31st October 1814). The Governor is camping at Moradabad.

No. 1117] [*15-2-1815*(?)

جرنیل اختر لوني صاحب بهادر بدستور بموضع بلو تشریف دارند و بدستور زیر دره کوه قلعه راجگهه رونق افروز اند دکاجي امرسنگه مقهور معه فوج بر قلعه کوه که مسافت سه کروه بالاي میدارد رخت ادبار دارد و صاحبان عالیشان بهادر از سه طرف کوه مذکور را محاصره نموده و از یک طرف رسد غله در لشکر مقهوران میرسد و چیزے فوج راجه کرم سنگه بلاس والا پیشتر رفته است و از بلاس پور مورچه قایم کرده یک جنگ از بلاس پور واله نموده بود چنانچه وزیر راجه مذکور را معه دوپسر و دیگران بجان کشته و راجه مذکور که از گورکهه موافقت میداشت گریخته از دریاے ستلج عبور شده است مگر فوج او و گورکهها در قلعه بلاس پور مضبوطي نموده جنگ میدارد و امروز قریب دو نیم صد مردم از بالاي کوه فرود آمده بر راسته بلاس پور بتفاوت دو نیم کروه از لشکر فیروزي فرود شده سدراه بلاس پور شدند و خبراست که چیزے فوج انگریزي بغابر تدارک انها خواهد رفت و هر روز

No. 216] *[14-5-1815*

عرض شد که کرنیل طامس صاحب بهادر معه یک پلٹن که کمان افسر بود به کرنال کوچیده رفتند بعد مسموع باتفاق کپتان راس صاحب مسوده عهدنامه و اقرارنامه تجویز کرده ماندند بکاجي امرسنگه تهاپا براي خالي کرده دادن قلعه ملون احکام برآمد شد نامبرده عرض کرده فرستاد که بتاریخ هفتدهم ماه مئي قلعه را خالي کرده خواهم داد بمنشي عبدالنبي خان فرمودند که پروانجات بنام سرداران و راجهاي تیار نمایند که فوج ایشان را بخوشي خود رخصت کرده شد و اقرارنامه از مهر دستخطي خود تیار کرانده نزد کاجي امرسنگه تهاپا فرستادند و عهدنامه مهري و دستخطي مشاراليه در سرکار رسید ظاهرا دریافت شد که انچه قلعجات مکانات مابین دریاي گنگ و جمن و مابین دریاي ستلج و جمن هستند همه خالي خواهند شد و در انجا عمل کمپني انگریز بهادر خواهد گشت و بناپر حساب رساله جدید حکم شد معلوم میشود که کاجي مذکور را معه متعلقان در لودهیانه آورده از انجا رخصت به نیپال او را خواهند کرد

¶Amar Singh promises to evacuate the Malaun fort on 17th May 1815, and to surrender all the land conquered by him between the rivers Ganges and Sutlej to the English. It is said that Amar Singh will be taken to Ludhiana before he is sent to Nepal.

News-letters from Haushangabad.

No. 1280] *[30-9-1815*

... زباني هرکاره آمده لشکر چنداجي گهوسله بدریافت رسید که گهوسله موصوف باز بر لشکر مرزا مذکور (مرزا روشن بیگ) رفته مقابله جنگ ساخت تا عرصه یکپاس جنگ گوله توپ و بندوق بمیان ماند آخرش نوبت به شمشیر رسید مرزا مذکور هزیمت خورده گریخته بر قصبه هرده رسیده قیام پذیر گشت ...

دوشالہ بیش قیمت برلاش او انداختہ بقلعہ اوشان رسایندہ اہلیہ اش
ہمراہ لاش شوہر خود سوخت شد وسہ صاحبان پلٹن انک (؟)
بکار آمدند و چہارکس صاحب زخمی شدند و دو صوبدار پلٹن
بلم نیر و یک صوبہ دار دیگر بکار آمدند آخرش حلہ نمودہ و جرءت
و دلاوری کردہ قلعہ سورج گڈہ را صاحبان بہادر گرفتند (Sic)
و بہجدہ ... توپ بران قلعہ رسانید دیگر مردم بسیار کشتہ و
زخمی شدند

¶*General Ochterlony attacks the Gorkhas and captures their position. On 17th April 1815, Bhaktu and Amar Singh fall upon the English army but are repulsed with heavy loss. Bhaktu is killed in battle and the Surajgadh fort is captured by the English.*

No. 2103] *[4-5-1815*

بتاریخ بست سیوم ماہ اپریل سنہ ۱۸۱۵ عیسوی میجر پاتن
صاحب بہادر کہ ہفت کردہ اینطرف از ایلورہ بودند رسیدہ از
ہستی دل تہانا جنگ کردہ چنانچہ تہانا مذکور کشتہ افتاد
و بسیار مردم مقہور بکار آمدند و یک صاحب فرنگی این طرف
کشتہ افتاد و یک صاحب و بست پنج سپاہی مجروح شدند
آخرش فوج گورکہا گریختہ رفت و بتاریخ بست پنجم اپریل
کرنیل صاحب کرنیل نکل صاحب بہادر از لشکر نواب گورنر
صاحب بہادر رسیدہ گورکہہا پنج باژہ گرد شہر پناہ ایلورہ
تیارکردہ بودند انہارا بزور شمشیر بتصرف خود آوردند و حلہ
نمودہ داخل شہر ایلورہ شدند و زیر قلعہ دو مکان بودند انہم
بتصرف سرکار آمدند و از بالای قلعہ دوازدہ ضرب توپ تا دو
روز سرشدہ ماندند ـ بتاریخ بست ہفتم ماہ اپریل قلعہ ایلورہ
مفتوح کردند و یک سردار گورکہہ کشتہ افتاد و باقی ہمراہیانش
از انجا گریختہ عبور دریای کاکرا شدہ رفتند

¶*Hasti Dal is routed by Major Patton and slain on 23rd April 1815. On the 25th of the same month, Colonel Nicolls makes a general attack on Ailorah (Almora) and the fort falls on the 27th.*

قریب قصبه ستوانس قیام دارد - دریافت شد که سرداران افواج پیش بخشي مذکور رسیده اظهار کردند که مایان از عدم یافتن زر تنخواه دو سه ماهیانه ... باین جمعیت بحدي تکلیفات میگزرد وقت کار از مایان هیچ نخواهد شد - بخشي مذکور جواب داد که چندي دل جمعي دارند وقعات بولي نعمت خود نوشته‌ام حالا هم بدستور گذارش میرود اگر جواب آن صرف بواعده آید بامدات در قلعه رایگدهه رسیده بندوبست اداي تنخواه شمایان کرده خواهم آورد

¶In this news-letter the position of the armies of Mian Wazir Muhammad of Bhopal, Gulab Kanwar and Imam Bakhsh Pindara is indicated, and it is stated that the army of Shripat Rao Bakhshi which is encamped near Satwas is suffering great hardships owing to non-payment of their salaries for three months.

No. 2353] [*27-10-1815*

اخبار هوشنگ آباد و بهوپال وغیره

واصل خان پنداره برادر دوست محمد مرحوم که از ابا کهنڑه بموجب گفته کهنڑه مرقوم مرخص گشته بسمت پرگنه قصبه باکرود و قصبه تیونده بنابر گرفتن تحصیل هردو محال بمعه جمعیت خود درآن جا رسیده بموجب تفویض مکانهاي تهانه خود نشانیده ضبط نسق عمل گردانید چراکه این هر دو مکان بموجب نوشته دولت راو سندهیه قرنیل جان بطیث سابق به پنداره مسطور حواله ساخته رفته بود من بعد آن سلپت راو پندت دیوان مشارالیه تهانه پنداره برخاست نموده در ضبطي خود آورده تحصیل آن مکانهاي داخل سرکار کهنڑه گردانید - الحال بعد یک سال بواسطه رفع خرخشه پنداره مرقومه مکانهای تسطیره حواله شان کرده داد - بعد ضبطي شدن پنداره برآن محال‌ها سواری کهنڑه مذکور از رایگدهه تاخت آورده شبخونی بر پنداره در باکرود انداخت - بسیاري پنداره

ضرب توپ و دو منزل پالکی و دیگر اسباب لشکرش بغارت بدست گهوسلہ مذکور رفت و گهوسلہ مذکور برجاے مقام مرزا مذکور بفیروزی و فرخي دیرہ کردہ است

¶*Chandaji Ghosla defeats Mirza Raushan Beg who takes refuge in Harda.*

No. 1641] *[6-2-1817*

نوشتہ مہاراجہ دولت راو سندہیہ موسومہ راجہ جے سنگہ صادر گشتہ کہ ایشان پسر جان بطیست را از قید خلاص دادہ ہرچہ کہ ایشان مکانات در تحت تصرف اولیاء دولت اند تہانہ خود نمایند و از حضور ما بدولت انحرافي و رو گرداني نورزند ہرچہ کہ اقرار سرکار بنفاذ رسد آنرا بسر انجام میرسانیدہ باشند و افعال ناموزون بار دیگر بظہور نرسانند

¶*Maharaja Daulat Rao Sindhia asks Raja Jai Singh to release the son of Jean Baptiste Filose.*

News-letters from Haushangabad and Bhopal

No. 2408] *[15-9-1815*

اخبار ضلع ہوشنگ آباد و بہوپال

افواج ہمراہي میان وزیر محمد خان بہوپال والہ قریب چہار ہزار سوار و پیادہ و شش ضرب توپ معہ گورمکہہ سنگہ وغیرہ سکہان و جمیع کارباریان بفاصلہ یک کروہ از قصبہ سلوانی برخ قلعہ انبامالي (؟) بر کنارہ رود بار پتیا ر بچہاوني قیام پذیر و گلاب کنور صبیہ نواب کریم خان پنڈارہ مرحوم بجمعیت یک ہزار سہ صد سوار قریب چہاوني افواج میان مذکور مقام دارد و امام بخش پنڈارہ و جمعیت ہمراہي پسر دوست محمد خان پنڈارہ مرحوم بچہاونی خودہا دایراند و شري بہت راو بخشي اپا کہنڑہ بجمعیت پنج شش ہزار سوار و پیادہ و دوازدہ ضرب توپ بچہاوني

A news-letter from Calcutta.

No. 807-808] [*4-5-1817*

...... از روی اخبار ضلع کتک دریافت شد کہ کپتان سوریصاحب معہ فوج انگریزي رفتہ آن قوم سرکش را کہ سر یورش برداشتہ بود نرغہ ساختہ فیمابین جنگ و جدل بمیان آمدہ بسیاري کسان را دستگیر ساختہ و بسیاری را کشتہ و زخمي نمودہ افسر آن فوج کہ نام آن مدوان است گریختہ رفتہ یک سردار انجا آمدہ نزد کپتان بہادر آمدہ عذر تقصیرات ساختہ از سرکار دولتمدار کمپني انگریز بہادر بہ جرنیل مارتندل صاحب بہادر احکام صادر شدہ کہ بضلع کتک چندانکہ فوج انگریزي است ایشانرا افسر کمان انجا نمودہ شد بعدہ کپتان مذکور را در آنموضع کہ سابق ازین یک صاحب بکار آمدہ بود فرستادہ چنانچہ مشارالیہ در انجا رفتہ زمیداران انجا را دستگیر ساختہ موضع انہارا تاراج کردہ راجہ کہ آمدہ شامل شدہ است چنانچہ او را معہ مردم ہمراہي قید ساختہ در میدني پور فرستادہ و راجہ مذکور بحضور گورنر صاحب بہادر عرضداشت عذر تقصیرات ساختہ بود گورنر صاحب بہادر معاف فرمودہ او را از قید گذاشت کردند و بدستور بر کاروبار پوجاري جگناتہہ جیو مقرر نمودند و کپتان دال سین (؟) صاحب نامي انگریز یک گڈھي در آنضلع تیار ساختہ بود در انجا مردم فوج انگریزی میماند وقتیکہ قضایۂ روبکار شدہ فوج انگریزی براي تدارک مفسدان برآمد شدہ است قضاقان (Sic) آنضلع آمدہ گڈي را تاخت و تاراج ساختہ ہفدہ مردم در آن گڈھي بکار آمدہ ویکصد مردم زخمي شذند ـ لي حر (؟) صاحب نامي انگریز براي درستي سوال جواب از طرف گورنر بہادر از امیران آنضلع مقرر شدہ دریافت شد کہ دو پلٹن و رسالہ ترکسواران از کنچام برائے تدارک این سرکشان کوچ ساختہ بعد آن دریافت شد کہ گنجام والہ در آنضلع چیزے فساد زیادہ برپا ساختہ است باستماع

همراهیان اوشان کشته شدند و میان و زیر محمد خان در قلعه کنور داخل گردیدند - خبر این هم است که به بهوج پور میروند و چنداجي کهوسله در میدان بهادون گانون ... بمعه افواج ها دایراند و نواب صدیق علي خان نزد راجه رگهوجي در ناگپور قایم مقام و چندین جمعیت میان مسطور بر موضع اتهي عمله بهوپال افتاده است

¶*Wasil Khan Pindara with his hordes goes to Makrod and Tiondu (?) Parganas for the collection of revenue, as these Parganas had been bestowed upon him by Daulat Rao Sindia. He is attacked by the soldiers of Appa Khande and many of his followers are killed. The position of the armies of Mian Wazir Muhammad, Chandaji Khosla and Nawab Siddiq 'Ali Khan is also given in this letter.*

A News-letter from Malkapur.

No. 382] *[25-10-1815*

مسموع شد که موضع کهرنے و وانکوڑي تعلقه ملکاپور را پنڈاران غنیمت کرده و زنان را بےستر ساخته و مقدمان هر دو دیهه را توبره مرچ سرخ داده از جان کشتند وقت شب بر موضع برکهیره قیام کرده و از قصبه کوتهلي سواران ولین بلاک صاحب قریب یک نیم هزار مردم دویده شبخون زده پنڈارها را شکست داده پنجاه مردم انها بکار آمدند پنڈاره مذکور گریخته بفاصله نیم کروه رنسیده استاده شد - ولین والها دست غنیمت بدایره گاه انها کشادند بملاحظه آن پنڈارها واپس شده لین وغیره را محاصره کردند تا این وقت لین مذکور در محاصره است

¶*The Pindaris plunder the villages of Kharni and Wankori, in the Malkapur Taluka and retire at night to the village of Barkherah (Wankhera, 35 miles east of Malkapur). They are routed by the English forces but while the victors were busy plundering, the Pindaris return and besiege their camp.*

این معنی گورنر صاحب بهادر احکام بافسر کپتان فوج انگریزی فرستاده و یک پلتن از دنباج پور و یک یک پلتن از دیگر جا و رسالہ سواران زود بضلع گنجام رسیده ترارک مفسدان کوتہ اندیش سازند چنانچہ پلتن‌هاي مذکور بموجب احکام بزودی تمام بر کشتی‌ها سوار شده عبور کردیده رفتند بعد ازان از روي اخبار ملهاری کہ بضلع جنوب است دریافت شد کہ کرنیل کین صاحب بهادر معہ شش رسالہ ترکسواران در عرصہ بیست شش گهڑي هشتاد و چار کروه را مسافت تعاقب پنڈاره‌ها طي ساختہ برلب دریا انها رسیده پنڈاره‌ها عبور دریاي میشدند از باعث خوف انگریزان سیاري بدریاي غرق شدند و بسیاری دستگیر آمدند و بسیاری کشتہ و زخمي شدند

¶*Report of disturbances in Katak and an account of the military operatio undertaken by the English to quell them.*

A news-letter from Nagpu

No. 2251] [*21 to 31-8-1817*

گوجابا دادا همشیره زاده راجہ رگهوجي مرحوم کہ در قید راجہ اپاجي بود بوقت شب فراري شده در جهاوني صاحبان بهادر داخل گردید نواب صدق (صدیق؟) علي خان وغیره اهلکاران بحضور راجہ صاحب بدربار حاضر شدند راجہ صاحب از فرار شدن مذکوره بر نواب معز وغیره خفگي فرمود کہ این همہ فتنہ برداشتہ ایشان است و راجہ صاحب من بهت (؟) و ماکو کالیکر را امورات علاقہ نواب بمعہ پرگنات تفویض کرده خلعت دوشالہ و مالا مروارید و سرپیچ مرصع عطا کردند کہ بندوبست پردازند و بهمہ اهلکاران تاکید فرمودند کہ از صلاح صوابدید مشارالیہ بیرون نشوند

¶*Gujaba Dada, sister's son of Raja Raghuji, who was kept as a prisoner by Raja Apaji, escapes and takes refuge in the camp of the English. Nawab Siddiq 'Ali Khan is accused of having connived at his escape.*

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

INTRODUCTORY NOTE.

The Persian Daftar in the Alienation Office, Poona, includes, among other documents, about 2,600 news-letters received, some by the Peshwas, and others by the British Resident at Poona, from news-writers at the courts of other Indian princes. The earliest documents in this Daftar are letters written about 1700 A.D. by the order of Aurangzeb to his Governors. Next in point of time are the letters giving news of the court of Muhammad Shah and Ahmad Shah which contain detailed information regarding the movements of the Mogul armies against Ahmad Shah Abdali. The remaining documents mainly deal with the period from 1810 to 1823, though there are several of earlier dates. These documents contain useful information regarding the court and private life of the princes, their political relations, their military operations, the movements of the Pindari hordes and their depredations, and the social and economic conditions of the people.

In the following selections, I have given the full text of 3 letters written by order of Aurangzeb, one each of Tipu Sultan, Ghulam 'Ali Khan and 'Ali Raza Khan, Mir'Alam Bahadur, Andrew Price, and of a news-letter giving a graphic description of the deposition of Shah'Alam II by Ghulam Qadir Khan and Mirza Ismail Beg. The rest of the selections are extratcs from the news-letters relating to the military operations of one prince against others or against the Pindaris. To give an idea of the nature of the economic information contained in these letters, I have also made a few extracts relating to the rates of food-stuffs prevailing in the first quarter of the 19th century at important places like Delhi, Ujjain and Kotah. These selections are intended only to give an idea of the nature of the contents of the documents in the Persian Daftar to scholars interested in their study, and it is hoped that when more funds are available it will be possible to publish them *in extenso*.